# लोकहितवादी : समग्र वाङ्मय

खंड १

संपादक : गोवर्धन पारीख,
इंदुमती पारीख

3045





**प्रा. गोवर्धन पारीख**

प्रा. गोवर्धन पारीख यांचा जन्म ७ नोव्हेंबर १९१५ रोजी मालेगावला झाला. जन्मभूमीप्रमाणेच त्यांची कर्मभूमीही महाराष्ट्रच होती. मराठी संस्कृती हा त्यांचा मानबिंदू होता. १९ व्या शतकात महाराष्ट्रात झालेल्या प्रबोधनाचा त्यांना नुसता अभिमानच नव्हता तर तो त्यांच्या सखोल अभ्यासाचा विषय होता. महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास लिहिण्याचा हाती घेतलेला प्रकल्प, प्रकृति बिघडल्यामुळे ते पुरा करू शकले नाहीत. या सामाजिक प्रबोधनाचे त्यांच्या दृष्टीने लोकहितवादी-गोपाळ हरी देशमुख, हे अग्रणी होते तर त्या कामात झालेल्या सुधारकात न्यायमूर्ती रानडे हे 'महामानव' (Giant) होते.

विसाव्या शतकात भारतात प्रबोधन झाल्याखेरीज आपला भविष्यकाल उज्वल होणार नाही असे मानणाऱ्या मानवेन्द्रनाथ रॉय यांचे ते शिष्य होते–सहकारी होते. जुन्यातील शाश्वत मूल्ये घेऊनच पुढे गेले पाहिजे अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणूनच या प्रबोधनासाठी ते आयुष्यभर राबले, झगडले व शिक्षणाला आपले आयुष्य वाहून घेतले. उच्च शिक्षणाचा विचार करीत असताना अज्ञानी जनतेच्या प्रबोधनासाठी त्यांनी अभ्यासमंडळे चालविली. इंग्रजी इतकेच मराठीतूनही लेखन केले.

□

किंमत : रुपये १४६-००

# लोकहितवादी समग्र वाङ्मय

खंड १ ला

# लोकहितवादी समग्र वाङ्मय

## खंड १ ला

संपादक
गोवर्धन पारीख
इंदुमती पारीख

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई.

प्रथम आवृत्ती : १९८८

★

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
५ वा मजला, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

★

© प्रकाशकाधीन

★

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय, वाई (सातारा).

★

सजावट :
कला विभाग, शासन मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय,
मुंबई – ४०० ००४.

★

किंमत :

विसाव्या शतकात स्वातंत्र्याचा शोध घेणाऱ्या
व त्यासाठी
सर्वांगीण समाजप्रबोधन व नवजीवनाची चळवळ
सुरू करणाऱ्या
गोवर्धन पारीख व मी यांना गुरुस्थानी असलेल्या
मानवेंद्रनाथ रॉय
यांस
एकोणिसाव्या शतकातील आद्य प्रबोधनकारांचे हे ग्रंथ
समर्पित

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मराठीतील विचारवंतांचे संपूर्ण वाङमय प्रसिद्ध करण्याची कल्पना आपल्या समोर ठेवली आणि त्यातून महात्मा ज्योतिबा फुले, आगरकर, आचार्य भागवत, गडकरी इत्यादिकांचे समग्र वाङमय आजपर्यंत प्रसिद्ध केले. लोकहितवादी यांचेही समग्र वाङमय तीन खंडात प्रसिद्ध करण्याचे ठरविले होते. लोकहितवादी हे अव्वल इंग्रजीतील पहिल्या पिढीतील समाज सुधारक आणि विचारवंत. त्यांच्या समग्र वाङमयाचा पहिला खंड प्रसिद्ध करतांना मंडळाला कर्तव्य साफल्याचा आनंद होत आहे. लोकहितवादींच्या वाङमयाचे उरलेले खंडही लवकरच प्रसिद्ध होतील.

सुरेंद्र बारलिंगे,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

४२, यशोधन,
मुंबई – ४०० ०२०.
२६ जानेवारी, १९८८.

# संपादिकेचे निवेदन

लोकहितवादी समग्र वाङ्मय ग्रंथ एकत्र करून ते तीन खंडांत छापावयाचा निर्णय महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने घेऊन बरीच वर्षे झाली. हे काम सुरुवातीला प्रा. गोवर्धन पारीख यांचेकडे दिले होते. त्यांचे कार्य अपुरे राहिले. तयारी झाली होती पण अवधी मिळाला नाही. त्यानंतर १९७७ साली हे कार्य पुरे करण्याची कामगिरी मंडळाने माझ्याकडे दिली.

प्रा. पारीखांनी बरेचसे काम केलेले होते. ७-८ पुस्तके सोडली तर सर्व एकत्र केले गेले होते. समग्र ग्रंथाच्या प्रस्तावनेबद्दल चर्चा होऊन मनात आराखडा ठरला होता. त्यामुळे हे काम करण्यास मला उशीर लागला नाही. एक वर्षात डॉ. अरुण जोशी यांच्या मदतीने पुरे करून मी ते मंडळाकडे दिले. पण छपाईचे कार्यात अनेक अडचणी येऊन आज जवळ-जवळ दहा वर्षांनी ते प्रसिद्ध होत आहे.

ग्रंथांची जुळणी व त्यावरील चर्चा या कार्यात प्रा. न. र. फाटक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रा. पारीखांना व मलाही पुष्कळच मदत केली आणि मला मार्गदर्शनही केले, त्याबद्दल आम्ही दोघेही त्यांचे ऋणी आहोत. त्यांचेखेरीज अनेकांनी मला या कार्यात मदत केली. डॉ. अरुण जोशी यांची मदत आभाराचे पलिकडे आहे, असे म्हणणे वावगे होणार नाही. ग्रंथ गोळा करण्यात गोव्याचे श्री. शांतू भरणे, प्रा. न. वि. सोवनी, श्रीमती प्रेमा रांगणेकर, ठाणे सार्वजनिक वाचनालयाचे संचालक आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे श्री. अच्युत तारी यांचे आभार मानलेच पाहिजेत. प्रा. सरोजिनी वैद्य यांनी लोकहितवादी लिखाणासाठी वापरलेल्या समयांचे छायाचित्र दिल्याबद्दल त्यांचे आभार. पण त्याहीपेक्षा त्यांना देशमुखवाड्याच्या ग्रंथसंग्रहालयात सापडलेल्या लोकहितवादींच्या हस्ताक्षरात लिहिलेला '*Infanticide*' भ्रूणहत्या हा लेख त्यांनी या ग्रंथांत समाविष्ट करण्यास दिल्याबद्दल त्यांचा ऋणनिर्देश आवश्यक आहे. नागपूरच्या 'तरुण भारत'चे संपादक श्री. दि. भा. घुमरे यांनी लोकहितवादींची १९५६ साली 'तरुण भारत'मध्ये प्रसिद्ध झालेली लोकहितवादींची डायरी शोधून पाठवल्याबद्दल त्यांचे आभार.

इतका काळ गेल्यानंतर हे वाङ्मय छापले जाणार नाही, अशी जवळजवळ खात्री झाल्यानंतर मी श्री. अनंतराव कुलकर्णी यांचेकडे मित्रत्वाचे नात्याने सल्ला मागितला व त्यांनी हे कार्य पुरे करण्याचे मला आश्वासन देऊन ते पुरे केले, याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानणे माझे कर्तव्य तर आहेच पण तो केवळ उपचार नाही तर त्यांचे प्रयत्नांमुळेच हे वाङ्मय छापले जात आहे हे म्हणणे जास्त उचित होईल.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेंद्र बारलिंगे, सेवानिवृत्त सचिव श्री. सु. द्वा. देशमुख व सचिव श्री. पंढरीनाथ पाटील यांचे ऋण मोठे आहे. मंडळाचे अधिकारी म्हणून व व्यक्तिशः त्यांनी लक्ष घातले म्हणूनच हे काम झाले. त्याबद्दल या सर्वांची मी आभारी आहे.

या ग्रंथांच्या छपाईची जबाबदारी घेऊन ते उत्तम प्रकारे व अल्पावधीत पुरे करण्याचे सर्व श्रेय शासन मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई या विभागाचे संचालक श्री. घनश्याम धोंड यांचे आहे. त्यांनी हे काम स्वतःचे समजून वैयक्तिक लक्ष घालून केले. त्यांचे ऋण कधीच चुकते करता येणार नाही. या ग्रंथांची सजावट, मुखपृष्ठ वगैरे सर्व गोष्टी शासन मुद्रण, लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालयाचे कलाकार्याधिकारी श्री. आनंद सबनीस यांनी आत्मीयतेने केल्याबद्दल त्यांचे आभार. शेवटी हा ग्रंथ ज्या वाईच्या शासकीय मुद्रणालयात छापला गेला त्याचे व्यवस्थापक श्री. वि. का. विसपुते व त्यांचे सहकारी यांनी तातडीने व सुंदर छपाई केली याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे. याखेरीज या ग्रंथांच्या योजनेस व प्रकाशनास अनेकांचा हातभार लागलेला आहे, त्या सर्वांचा मी व्यक्तिशः निर्देश केला नसला तरी त्यांचे आभार मानलेच पाहिजेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे औचित्य दाखवल्याबद्दल मंडळाचे आभार.

१५ जानेवारी १९८८ इंदुमती पारीख

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रस्तावना | ... | एक |
| लोकहितवादी–गोपाळ हरी देशमुख — डॉ. अरुण जोशी | ... | १ |
| गोपाळ गुण वर्णन — मोहनलाल दलपतराम | ... | १५ |
| लोकहितवादींच्या रोजनिशींतील कांही उतारे — श. वा. रानडे | ... | २२ |
| लक्ष्मीज्ञान | ... | २९ |
| हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणे आणि त्याचा परिहार व व्यापाराविषयीं विचार | ... | ५७ |
| ग्रामरचना | ... | ९२ |
| स्थानिक स्वराज्य व्यवस्था | ... | १३९ |
| महाराष्ट्र देशांतील कामदारांशी संभाषण | ... | १६३ |
| सरकारचे चाकर आणि सुखवस्तू हिंदुस्थानांतील साहेब लोकांशी संभाषण | | १७१ |
| स्वदेशीय राज्यें व संस्थाने | ... | १८१ |
| जातिभेद | ... | १९३ |
| भिक्षुक | ... | २०४ |
| बोधपत्र | ... | २१७ |
| यंत्रज्ञान | ... | २२१ |
| शब्दालंकार | ... | २६९ |
| खोटी शपत वाहूं नये आणि खोटी साक्ष देऊं नये याविषयीं लोकांशी संभाषण | | २७९ |
| पुष्पवन | ... | २९१ |
| सुभाषित अथवा बोध वचनें | ... | ३०७ |
| ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती | ... | ३७९ |
| दशपत्रे | ... | ४८४ |
| लोकहितवादी : नवे संशोधन : ३ | ... | ५०० |
| An Essay on Female Infanticide | ... | ५९५ |

# प्रस्तावना

लोकहितवादींचे समग्र वाङ्मय एकत्र करून त्यांचे संपादन करावे ही कल्पना **गोवर्धन पारीख** यांचे मनांत अनेक दिवस घोळत होती. महाराष्ट्रातील एकोणिसाव्या शतकात झालेल्या प्रबोधन-काळात गोपाळरावांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते असे त्यांना वाटत होते. "गोपाळरावांचे मत वा त्यांची विद्वत्ता विश्वकोशसदृश्य (एनसायक्लोपीडिक) असल्याचे त्यांच्या लेखनावरून स्पष्ट होते. तथापि त्यांच्या विचारांना आगळे महत्त्व प्राप्त होण्याचे कारण या विद्वत्तेच्या योगाने एकोणिसाव्या शतकातील वैचारिक प्रबोधनाचा गोपाळरावांनी पाया घातला हे होय. यामुळेच त्यांच्या विचारांची चिकित्सा होणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचे मूल्यमापनही झाले पाहिजे."[१]

लोकहितवादींच्या "लेखनाचे अथवा कार्याचे मूल्यमापन करणे एखाद दुसऱ्या व्यक्तिच्या आवाक्यातले नाही."[१] ही गोष्ट आपण स्वतः लिहिलेल्या लोकहितवादी गोपाळराव हरि देशमुख या छोट्या पुस्तकाच्या लेखनाचे वेळीच पारीखांच्या लक्षात आली म्हणून लोकहितवादींचे सर्व लिखाण एकत्र करण्यास त्यांनी सुरुवात केली. पाच सात लहानसहान पुस्तके वगळता लोकहितवादींचे सर्व ग्रंथ पारीखांनी एकत्रित केले होते. त्यांचा अभ्यास करून टाचणेही केली होती. **प्रा. न. र. फाटक** व **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** यांचेशी चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य भाषा संस्कृती मंडळाने लोक-हितवादी समग्र वाङ्मय तीन भागात छापावे असेही ठरलेले होते. त्याची रूपरेखा नक्की झाली होती. **डॉ. अरुण जोशी** यांचेशी चर्चा होऊन ग्रंथांच्या जुळवणीचा मसूदा त्यांना करावयास सांगितले होते. प्रस्तावनेत काय व किती लिहावयाचे ते डोक्यात तयार झाल्याबद्दलही बोलणे झाले होते. पण प्रत्यक्षात या गोष्टी करावयास त्यांना अवधी मिळाला नाही. ही सर्व तयारी व्यर्थ घालवणे अशक्य होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व दुसरे अनेक स्नेही यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व पारीखांच्या जीवनाबरोबरच त्यांचा वैचारिक जीवनात ३५ वर्षे केलेल्या भागिदारीमुळे त्यांचे अपुरे राहिलेले कार्य पुरे करण्याचे मी धाडस करीत आहे. पारीख प्रत्येक कामात शक्य तेवढी परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न करीत असत. मोजक्या शब्दात भरपूर आशय भरण्याची त्यांची हातोटी माझ्याजवळ नाही. पण वैचारिक दृष्ट्या आम्ही दोघेही एकत्र वाढलो. त्यामुळे दृष्टीकोनांत फारसा फरक पडणार नाही असा विश्वास वाटतो. त्यातील उणीवा माझ्या आहेत व त्याची मला जाणीवही आहे.

लोकहितवादींच्या या समग्र वाङ्मय ग्रंथात एकंदर ३२ ग्रंथ एकत्र आणले आहेत. गोपाळ-रावांनीच लिहिले आहेत अशी सर्वांची शंभर टक्के खात्री असलेले सहा ग्रंथ कोठेही उपलब्ध नसल्यामुळे छापता येत नाहीत. होळीचा निबंध या पुस्तकाचा उल्लेख १८५२ साली प्रसिद्ध झालेल्या "शब्दालंकार" या पुस्तकात "होळीचे दुराचार निषेध निबंध" असा केलेला आढळतो. दुसरे पुस्तक "सौभाग्यरत्न" हे १८६४ साली अहमदनगर येथे छापले गेले असावे व ते विधवा-विवाहाविषयी असावे. कारण नोव्हेंबर १८८७ च्या "ज्ञानदीप" या मासिकातच पुनर्विवाहावरील एका लेखाचे शेवटी "इंदुप्रकाशा"त या विषयावरील प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची यादी जोडली आहे त्यात लोकहितवादींच्या "सौभाग्यरत्न" या पुस्तकाचा उल्लेख आहे. "कलियुग" हे पुस्तक

१८७७ साली मुंबई येथे आर्य समाजात दिलेले भाषण होय. ते प्रा. प्रिओळकरांच्या मते "एशियाटिक"मध्ये छापले होते. पण तेही आता उपलब्ध नाही. "प्राचीन आर्य विद्या व रीती" या विषयावरील भाषण हे पुस्तकही आज उपलब्ध नाही. आणखी दोन पुस्तके "कात्यायन सूत्र" व "समाधान" याविषयी काहीही माहिती मिळत नाही. शतपत्रांच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या असल्यामुळे त्यांचा समावेश केला नाही. या ३२ ग्रंथांखेरीज डॉ. अरुण जोशी यांनी अलिकडेच प्रकाशात आणलेल्या लोकहितवादींच्या मराठी, गुजराथी व इंग्रजी भाषेतील दुर्मिळ लेखांचा व प्रा. सरोजिनी वैद्य यांच्या सौजन्याने भ्रूणहत्येवरील इंग्रजी लेखांचाही प्रस्तुत ग्रंथात समावेश केला आहे. या सर्व लिखाणाचे तीन खंडांत विभाजन केले आहे.

## ग्रंथरचना

(१) खंड पहिला : समग्र वाङ्मय ग्रंथाची प्रस्तावना, डॉ. अरुण जोशी यांनी लिहिलेले लोकहितवादींचे संक्षिप्त चरित्र, गुजराथीत मोहनलाल दलपतराय यांनी लिहिलेले गोपाळ गुणवर्णन व गोपाळरावांनी आर्थिक, राजकीय, सामाजिक व इतर विषयांवर लिहिलेली पुस्तके छापली आहेत. डॉ. अरुण जोशी यांना काही वर्षांपूर्वी शोधून काढलेले गोपाळरावांचे लेख व प्रा. सरोजिनी वैद्य यांना पुण्याच्या देशमुख वाड्यातील ग्रंथालयात सापडलेला भ्रूणहत्येवरील (इंफंटिसाइड) इंग्रजी लेखही समाविष्ट केला आहे.

(२) खंड दुसरा : धर्मविषयक ग्रंथ व प्रस्तावना

(३) खंड तिसरा : इतिहासविषयक ग्रंथ व प्रस्तावना

लोकहितवादींच्या सर्व ग्रंथांची भाषा सोपी व त्या काळची बाळबोधी आहे. त्यांची शैली उपदेशकाची, शिक्षकाची, वडीलधाऱ्या माणसाची आहे. शतपत्रातील जहाल, थोडीसी शिवराळ भाषा त्यांच्या दुसऱ्या पुस्तकात आढळत नाही. गुजराथी पुस्तके देवनागरीत लिहिण्याची गोपाळरावांची पद्धती आजही अनुकरणीय आहे. त्यांची गुजराथी भाषाही त्याकाळच्या मानाने सोपी व प्रगल्भ आहे. सर्व भाषांची लिपी एक झाली तर अनेक भाषा शिकणे किती सोपे जाईल याचा अनुभव "आगम प्रकाश" व "निगम प्रकाश" गुजराथीतून वाचताना अनेकांना येईल. "यंत्रज्ञान" या पदार्थविज्ञान शास्त्रावरील ग्रंथाची भाषा तर इतकी सोपी आहे की शास्त्रीय विषय मराठीत लिहिणारांनी हा ग्रंथ भाषेकरता जरूर पहावा असे मला वाटते.

गोपाळरावांनी १८४८ साली आपले लिखाण प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली असली तरी त्यांच्या लेखनास १८४२ सालीच म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी सुरुवात झाली असे त्यांच्या "हिंदुस्थानचा इतिहास पूर्वार्ध" या ग्रंथाच्या प्रस्तावनेवरून समजते. त्यांचा जन्म १८२३ साली म्हणजे पेशवाईच्या अंतानंतर पाचच वर्षांनी झाला व तोही प्रत्यक्ष पेशवे यांच्याशी घनिष्ठ संबंध असलेल्या हरिपंत देशमुखांचे घरात! त्यामुळे गोपाळरावांच्या कानावर पेशवाई संबंधी बऱ्यावाईट गोष्टी लहानपणीच पडल्या असणार व त्याही ज्यांनी पेशवाई अगदी जवळून पाहिली होती अशा मंडळींकडून. तो झपाट्याने बदलणारा काळ नव्हता. त्यामुळे पेशवाई गेली तरी त्यावेळचे वातावरण पुण्यात रेंगाळत होते याला फारशा पुराव्याची गरज नाही.

इंग्रजाबद्दल खोट्या कल्पना, भीती व गैरसमज यांचा या संक्रमण काळात सुकाळ होता. चौकस बुद्धीचा अभाव होता. पुणे वर्णनात श्री. ना. वि. जोशी लिहितात "ह्या वेळच्या लोकांची स्थिती म्हटली म्हणजे असी होती की, सुग्रास खावे आणि रिकामटेकड्या गप्पा मारीत बसावे. माहिती म्हटली की, इंग्रज कलकत्ता म्हणून एक बेट आहे तेथील रहाणारा… त्याचे नेहमीचे संभाषण म्हटले म्हणजे विशेष करून जेवणाविषयी व ग्रामण्याविषयी असावयाचे … ह्यांची विद्या दोन प्रकारची होती. एकतर कारकुनी व दुसरी याज्ञिकी … सर्व मुलुख लोकांकडे जहागिरीने

दिला होता. दरबारातील खिदमतगार वगैरे जे हलके लोक होते त्यासही जहागिरी दिल्या होत्या. आणि दर एक जहागिरदार मनास येईल तशी आपआपल्या जहागिरीचे गावात वर्तणूक करी. त्यास नेम किंवा कायदा नव्हता. रयतेवर जुलूम, लूट, दंगा करीत असत. तंटा करून एकमेकांची जहागीर लुटीत, जाळीत, स्वतः श्रीमंताशी बदलत राज्य अगदी बेकायदा होते. कोणकोणास लुटील याचा भरवसा नव्हता. वसूल मनात येईल तसा घेत महालांचे भत्ते देत".[२]

१८१८ साली पेशवाई खालसा झाल्याबरोबर ही परिस्थिती तावडतोब बदलली असण्याची शक्यता कमीच. जिंकलेल्या मुलखातील लोकांच्या धार्मिक बाबतीत ढवळाढवळ न करण्याचा इंग्रजांचा कटाक्ष होता. हिंदु माणसाच्या जीवनाच्या सर्व बाजू धर्माच्या कक्षेत येत असल्यामुळे कोणतीही सुधारणा आडवळणानेच करणे प्रथम तरी जरूर होते. खुद्द पुण्याची परिस्थिती बरीच वर्षे गोंधळाची होती. पुणे म्हणजे भिकारी ब्राह्मणांचे आगर बनले होते. पेशवाईत ३०–४० हजार ब्राह्मण रमण्यात जेवीत व दिवसभर मोकाट फिरत. त्यांची वस्ती अजून पुण्यात होतीच. पण महाराष्ट्राला मिळालेले इंग्रज अधिकारी उदारमतवादी होते. विशेषतः मौंट स्टुअर्ड एलफिन्स्टन सारखा कुशल प्रशासक सुरुवातीसच मिळाल्यामुळे येथील शासकीय घडी चटकन बसली. कंपनी सरकारच्या अनेक अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील राजकीय व शैक्षणिक बाबतीत नुसती सुधारणा केली असे नव्हे तर बरेच वेळा योग्य असे मार्गदर्शनही केले असे म्हणणे अतिशयोक्तिचे होणार नाही. या अधिकाऱ्यांनी इंग्रजी शिक्षणाला चालना देऊन येथील समाजात एक प्रकारचे नव-चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी शिक्षणामुळे हा समाज जागा होऊ लागला. इंग्लंड-मध्ये त्यावेळी उदारमतवादी विचारांचे वारे जोरात वाहत होते. त्याचा येथील सुशिक्षितावर परिणाम झाल्याखेरीज राहिला नाही. येथे राज्य करणारे इंग्रजी अमलदार ध्येयवादाने प्रेरित झाले होते. असे अनेकांप्रमाणे गोपाळरावांचेही मत होते.

"They were men who by middle of 19th Century had brought peace to the country instead of anarchy and mapped the fields, and made lists of every man's rights and made a beginning of the task of building roads, bridges. and railways, of hernessing the rivers to irrigation. More important, they had associated Indians with them in their work and the greater part of adminis-tration was carried out by Indians. But perhaps nothing the Company's servants did was of greatest value in the end then their release in India of some gusts of that dry and searing wind, that bracing scepticism, which swept throughout Europe after the French Revolution and which in the milder climate of England had come to be associated with the name of Jeremy Bentham. It was a spirit which inquired secptically whether an Institution was defensible by human reason, whether it contributed to human happiness and whether it was consistant with a respect for the value of human beings as individuals. It was a spirit which found much to question in India at a time when her own civilization had ceased to grow, when pity for human sufferings seemed used up and finished. This alin breath provided new life and indig-nant reaction, India began to grow again and her mind took on new vigor. India did not, as the English of the 'twenties' and 'thirties' had expected, accept the full doctrine of Christianity together with Western Education but this side-wind from the main current of Christendom stirred their minds deeply and changed their conception of their own religion."[3]

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यामध्ये अंदाधुंदी नाहीशी करून या माणसांनी (राज्यकर्त्यांनी) (देशात) शांतता प्रस्थापित केली. त्यांनी येथील जमिनीचे नकाशे तयार केले. प्रत्येक माणसाच्या

हक्कांच्या याद्या तयार केल्या. रस्ते, पूल, रेल्वे, नद्यांचे कालवे वगैरे बांधण्यास सुरुवात केली व विशेष महत्त्वाचे म्हणजे भारतीयांना या सर्व कामात व राज्यकारभारातही सहकारी करून घेतले. पण कंपनीच्या या अधिकाऱ्यांनी सर्वांत महत्त्वाची व अमोल कामगिरी जर कोणती केली असेल तर ती म्हणजे युरोपमध्ये फ्रेंच राज्यक्रांतीनंतर, झंझावाताप्रमाणे वाहणाऱ्या, मनाला चटका लावणाऱ्या विचारांचा,–प्रत्येक गोष्टीबद्दल शंका घेऊन त्याबद्दल प्रश्न विचारण्यास उद्युक्त करणाऱ्या विचारांचा–स्रोत हिंदुस्थानपर्यंत पोहोचविण्याची! इंग्लंडच्या सौम्य वैचारिक वातावरणात या विचारांचा संबंध जेरेमी बेंथेम यांचेशी जोडला जातो. या वैचारिक क्रांतीमुळे प्रत्येक संस्थापित संस्थेबद्दल, तिच्या विचारसरणीबद्दल तपासणी सुरू होऊन ती विचारांच्या निकषास उतरेल की नाही, ती माणसांच्या सुखास कारणीभूत होईल की नाही, ती प्रत्येक माणसाचा व्यक्ती म्हणून आदर ठेवू शकेल की नाही, याबद्दल विचार सुरू झाला. या विचारसरणीनुसार शंका घेण्याजोग्या अनेक संस्था, अनेक गोष्टी त्यावेळी भारतात अस्तित्वात होत्या. येथील संस्कृतीची वाढ खुंटली होती. मानवी हालअपेष्टाबद्दल वाटणारी सहानुभूती आटली होती, संपली होती. या परकी विचारांच्या वाऱ्याने नवे जीवन अंकुरले, पण त्या बरोबरच संतत प्रतिक्रिया पण निर्माण झाल्या. भारतीय मन पुन्हा वाढीस लागले. त्याला नवा जोम आला. १८२० किंवा तीसच्या सुमारास इंग्रजांना वाटले होते त्याप्रमाणे भारतीयांनी पाश्चिमात्य शिक्षणाबरोबर खिस्तिधर्म मात्र स्वीकारला नाही. पण खिश्चन विचारसरणीच्या अनुषंगाने पण जरा बाजूने वाहणाऱ्या या विचारप्रवाहाचा भारतीयांवर परिणाम होऊन त्यांनी स्वतःच्या धर्माचा अभ्यास सुरू केला व आपल्या धर्मकल्पना बदलण्यास सुरुवात केली.[३] या नव्या विचारांचा परिणाम अनेकांवर झाला. स्वतःचा धर्म, स्वतःचा इतिहास व स्वतःचा समाज तपासणारे लोकहितवादी हे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत व लेखक होते हे त्यांच्या समग्र वाङ्मयावरून सहज लक्षात येते.

या उदारमतवादी युरोपियन विचारसरणीचा गोपाळरावांच्या संवेदनशील मनावर खोलवर परिणाम झालेला दिसतो. त्यांचे डोळे इंग्रजी शिक्षणाने दिपले असे काहींचे म्हणणे होते. आणि सुरुवातीस ते सहाजिकही होते. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी त्यांनी केलेले श्रम प्रसिद्ध आहेत. त्यांनी एकत्रित केलेला ग्रंथसंग्रह त्यांच्या जिज्ञासेची व अभ्यासू वृत्तीची साक्ष देतो. एका बाजूस आपला ज्ञानपरांङ्मुख, अज्ञानी व निरुद्योगी समाज व दुसरीकडे दीर्घोद्योगी व ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात झपाट्याने प्रगती करणारे इंग्रज राज्यकर्ते अशा परिस्थितीत राग, उद्वेग, खिन्नता व वैताग येणे सहाजिक होते. पण गोपाळराव चिडून गलितगात्र झाले नाहीत. आपली परिस्थिती अशी का झाली, आपले काय चुकले व यातून बाहेर कसे पडावे याचा ते शोध घेऊ लागले. नव्याने संपर्कात आलेल्या इंग्रजी माणसाकडून त्यांच्या वाङ्मयातून शिकण्यासारखे जे जे होते ते शिकण्याची जिज्ञासा लोकहितवादींच्या सुदृढ मनोवृत्तीचेच द्योतक होय. इंग्रज जेता होता तरी त्याने आपल्याला का व कसे जिंकले याची चिकित्सा अत्यंत समतोल बुद्धीने त्यांनी केली. गोपाळरावांचे इंग्रजीविद्या हस्तगत करण्याचे प्रयत्न अव्याहत चालू होते. इंग्रजी व्याख्याने ऐकण्याकरिता त्यांना कमालीची पायपीट करावी लागली. अनेकवेळा घरी आल्यावर आंघोळ करावी लागली. पण त्यांनी आपली ज्ञानजिज्ञासा सोडली नाही. अनेक खिश्चन धर्मगुरूंची व्याख्याने त्यांनी ऐकली. हिंदुधर्मावर झालेली खरी खोटी टीका पण ऐकली व वाचली. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी हिंदुधर्माचा सखोल अभ्यास करण्यास सुरुवात केली. आपल्या लोकांचे दोष, वैगुण्ये शोधण्याकरिता ते इतिहासाकडे वळले. जुन्याचा अभ्यास केल्याखेरीज, आपले काय आहे ते समजल्याखेरीज इंग्रजांची टीका स्वीकारावयास ते तयार नव्हते. सुरुवातीस दिपलेले डोळे गतकालाचा शोध घेऊ लागले. त्यातून चांगले काय, टिकाऊ काय व टाकाऊ काय याचा तपास सुरू झाला. ते अभ्यास करून स्वस्थ बसले नाहीत, तर प्रत्येकाने तो करावा असे वारंवार

सांगू लागले. स्वपरदेशाचा इतिहास, धर्म, विद्या, कला, भाषा व राज्यस्थिती या सर्वांचा अभ्यास करण्याची जरुरी त्यांना प्रकर्षाने भासू लागली. ते लिहितात "या ग्रंथकाराची करद्वय जोडून सर्वांस प्रार्थना आहे की, त्यांनी यथार्थ स्वाध्यायास लागावे. जगाचे ज्ञान मिळवावे, सत्य इतिहास पहावा, ज्या गोष्टीस काही आधार नाही त्या असत्य मानाव्या, सर्व गोष्टीस प्रत्यक्ष अनुमान, उपमान व शाब्द ही जी प्रमाणे पूर्वऋषींनी ठरविली आहेत ती लावून पहावी, जे कोणी सांगेल ते ऐकून केवळ नंदीबैलासारखी मान हलवू नये. लोकांचे अभ्युदयात अडथळे घालू नयेत, अनेक तऱ्हेचे स्वपरदेशीय ज्ञान आणि पुरातन व सांप्रत माहिती, ही ग्रहण करून ती लोकांस प्राप्त होण्याची साधने वाढवावी आणि नूतन विचारात जे काही न्यायास, नीतीस व सत्यास अनुसरून असेल तेच धैर्यकरून स्वीकारावे आणि स्वार्थ बुद्धी सोडून द्यावी. हेच स्वाध्यायाचे मुख्य फल आहे."[४] यात गोपाळरावांचा जीवनाविषयीचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. तो आधुनिक अर्थानेसुद्धा शास्त्रीय दृष्टीकोन नाही असे कोण म्हणू शकेल? गोपाळरावांचे सर्व लिखाण याच दृष्टीकोनाने प्रेरित झालेले दिसते.

गोपाळरावांची शोधक दृष्टी सभोवतालच्या समाजाकडे पाहू लागली आणि त्यांत त्यांना सापडले काय तर सर्व विद्या ब्राह्मणांचे स्वाधीन व तेच सर्व बाबतीत हिंदुचे पुढारी. त्यांचे अज्ञान व गैरसमज एवढे अगाध की, "पुणे शहरात १८३२ साली इंग्रजी शाळा घातली तेव्हा लोकांची अशी समजूत होती की, इंग्रजांचा स्पर्श झाला तर स्नान करावे व इंग्रजी भाषा शिकली तर ब्राह्मणपणा जातो."[५] सर्व ज्ञान पुराणात साठविलेले आहे अशा दृढ समजुतीमुळे हिंदु समाजास जागृत करणे कठीण होते. पुराणांनी हिंदुसमाजात एकप्रकारची निष्क्रियता निर्माण केली होती. कारण "ह्या विलक्षण ग्रंथप्रसाराने एक अपूर्व समज जो सर्व लोकांत दृढतर होऊन बसला आहे, तेणेकरून तर सर्वांच्या कमरा अगदी मोडून त्यांच्यामध्ये कोणत्याही एका महत्कृत्यास हात लावण्याचे अवसान राहिले नाही. हा अपूर्व समज कोणता हे जरी जनविश्रुत आहे तरी त्याचा विचार कधीही कोणी केलासे दिसत नाही. हीही फार दिलगिरीची गोष्ट आहे. म्हणजे, सर्वांमध्ये ही एक पक्की समजूत झाली आहे की, आता कोणताही आणि कसाही यत्न केला तरी आपले नष्ट वैभव आपणास परत मिळून आपण उच्चावस्थेला येऊ ही गोष्ट कालत्रयीही होणे नाही. कारण हे कलियुग असल्यामुळे दिवसेंदिवस आपणास निकृष्टावस्थाच प्राप्त व्हावयाची."[६] यामुळे अनेक ब्राह्मण "विद्याहीन व उपयोगहीन, केवळ मात्रा तिलक व मुद्रा ही बाह्य चिन्हे धारण करून भांग, गांजा, अफू इत्यादि खाऊन आळसात निमग्न राहतात. असे भंगड ते साधू झाले; केवळ पाठ म्हणणारे ते ब्राह्मण झाले; आणि आळशांस पोसणे हाच धर्म असे लोक मानू लागले. यामुळे उद्योग नाहींसा होऊन भिकारी व अनेक निमित्तांनी फिरणारे अशा संत, साधू व ब्राह्मण यांच्या टोळ्यांच्या टोळ्या सर्वत्र प्रतिष्ठितपणे भिक्षुकवृत्तीने आणि देशास भारभूत अशा फिरू लागल्या व फिरत आहेत."[७]

### विद्यावाढ

समाज बदलण्यासाठी विद्येशिवाय दुसरे शस्त्र नाही अशी गोपाळरावांची खात्री होती. पूर्वीच्या विद्यांबद्दल विशेषतः पूर्वीची पुस्तके टिकविणाऱ्या ब्राह्मणांचे ते कौतुक करतात. "ब्राह्मण लोक मुळापासून विद्येचे शोकी यांत संशय नाही. जेव्हा छापखाने नव्हते. पुस्तकांची फार वृद्धी होण्यास साधन नव्हते, त्या काळच्या अडचणी एकीकडे ठेवून ते संहिता, ब्राह्मण, पुराणे इत्यादिक मोठे ग्रंथ तोंडाने पाठ करून ठेऊ लागले हे ग्रंथ एवढाले मोठे आहेत की, ते आजचे उठवणीचे काळात वाचण्यास देखील सामर्थ्य नाही. परंतु तसले ग्रंथ पाठ करून, घोकून, ताडपत्रांवर किंवा कापडावर लिहून संरक्षण केले. पुस्तके लिहिणारी एक कायस्थ जात वेगळीच झाली घोकणारी एक जात वेगळीच झाली. अशी मेहनत करून त्यांनी तट्टांचे ओझ्याइतके एकएक पुस्तक जे घरात बाळगण्यास देखील अडचण अशी भारते, रामायणे तयार केली, त्यांच्या नकला केल्या, असे यत्न

करून ग्रंथांची बरीच राशी उत्पन्न झाली, हे संस्कृत भाषेस भूषण आहे."[८] पण येवढ्यानेच ते भारावून गेले नाहीत. ब्राह्मण स्वतःला विद्येचे अधिकारी म्हणवीत असताना त्यांनी भारतीय विद्येचे केलेले नुकसान अपरिमीत होते ही गोष्ट गोपाळरावांनी पुराव्यानिशीं पुढे मांडली. समाजातील फार मोठा वर्ग ब्राह्मणांनी विद्येपासून दूर ठेवला ही त्यांची सर्वात मोठी चूक झाली. आपल्याखेरीज सर्व वर्ण व सर्व वर्णांच्या स्त्रिया विद्या शिकण्यास अपात्र ठरविल्यामुळे विद्यावृद्धी करणारा वर्ग अल्पसंख्यांक झाला. त्यांची दुसरी मोठी चूक म्हणजे त्यांनी ऋषींना देव करून टाकले" मागील सर्व ग्रंथकर्ते देव होते. म्हणून आता ग्रंथ करणे प्रशस्त नाही, असे त्यास वाटते. नवीन रीती व नवीन विद्या पढणे यांचे ते शत्रू असतात पाहा की, पांच हजार वर्षांपाठीमागे जी रीति आणि जे ग्रंथ संस्कृत पढावयाचे असतील, तेच आता आहेत. त्यांची सुधारणा त्यांजला नको व अक्कल तर्क आणि शहाणपण ही त्यास कमी असतात. व प्राकृत भाषा त्यास तुच्छ वाटून प्राकृतात ते काही कधी लेखणी उचलीत नाहीत. पोथ्यांची वेष्टने प्राचीन काळाप्रमाणेच आहेत ती आवडतात. प्राकृत भाषा सर्व लोकांची आहे. याजकरिता प्राकृत ग्रंथ असल्याखेरीज उपयोग नाही. हे मनांत आणीत नाहीत व शूद्र व इंग्रज वाचतील हे त्यांस भय असते. व्याकरण हे कोणी वाचू नये, वेद कोणी नीच जातीने वाचू नयेत; असे वचन आहे, त्याजवर सर्व आणतात."[९]

ब्राह्मणवर्गावर गोपाळरावांचा राग असण्याचे मुख्य कारण त्यांनी विद्येच्या बाबतीत केलेल्या अनेक चुका होत. एकापेक्षा एक मोठमोठे अडथळे विद्यावृद्धीच्या मार्गाला त्यांनी आणून ठेविले. परदेशगमनाविरुद्ध समुद्र ओलांडण्याबद्दलचा निर्बंध असाच घातुक ठरला. समुद्र ओलांडला तर नरकवास मिळतो. यामुळे भारतवर्षाच्या पलिकडे काही आहे याची माहिती मिळविणे अशक्य झाले. अनेक मंडळी स्वाऱ्या करून लूट घेऊन गेली. त्यांचा ठावठिकाणा पहाण्याची शक्यताच बंद झाली. भूगोलाचे अज्ञान भयंकर वाढले व कूपमंडुकवृत्ती वाढीस लागली. "ब्राह्मण लोक प्रतिबंधात पडले व त्यांच्यामुळे इतर जातीचे लोक सर्व प्रतिबंधात पडून आंधळ्यासारखे घरच्या उंबऱ्यापर्यंत चांचपीत बसले आहेत, हे मोठे वाईट झाले."[१०] ब्राह्मणांनी आणखी एक घातुक प्रथा निरर्थक चालू ठेविली व ती म्हणजे पाठांतर म्हणजेच विद्या असे ठरविले. पूर्वी ग्रंथ टिक-विण्याकरिता पाठांतराचा उपयोग होत असे पण पुढे पुढे अर्थ न समजताही पाठ करणाराला विद्वान समजू लागले. ब्राह्मणी विद्येवर आघात करण्याचे आणखी एक कारण म्हणजे संस्कृतात असलेल्या विद्येमध्ये ब्राह्मणांनी भर घातली नाही, ती कामाच्या ओघाप्रमाणे वाढविली नाही. इतकेच नव्हे तर होती ती विद्या सर्वांना उपलब्ध करून दिली नाही. संस्कृत भाषेत जे ग्रंथ आहेत ते सर्वांस कळत नाहीत. "आता संस्कृत भाषेत पाहिजे ते सर्व आहे असे नाहीच, पण आहे तितके कळले तरी लोक शाहाणे असते .... विद्या म्हणजे स्वदेशात व जे इतर देशात आहे ते सर्व आपल्यास कळावे, याचेच नाव विद्या. आलीकडे किती एक मूर्खपणाचे समजुतीमुळे लोक कैदेत आहेत म्हणजे त्यांच्या पायात बेड्या आहेत. त्यास इकडचे तिकडे हलवत नाही. जागच्या जागी श्रमी होतात आणि बिड्या तोडावयाजोग्या असूनही ते स्वस्थ दुःख भोगितात हे आश्चर्य होय."[११] गोपाळरावांनी अनेक विषयांसंबंधी संस्कृत व इंग्रजी ग्रंथ अभ्यासिले व सर्वांना समजेल अशा मराठीत व गुजराथमध्ये रहात असताना गुजराथीत आपले लिखाण केले.

लोकहितवादींचा खरा आक्षेप जुने अपूर्ण ज्ञानच पूर्ण समजून त्याविषयी खोटा अभिमान बाळगण्याबद्दल आहे, या अपूर्णतेची जाणीव होण्याजोगी परिस्थिती बदलली असूनही तिकडे लक्ष न देण्याचा आहे. "पूर्वी जुन्या काळचे ब्राह्मण म्हणजे ऋषी वगैरे यांणी अपुर्ती कामे ठेवली ती आपण पुर्ती करावी."[१२] विद्या वाढविण्यासाठी मनुष्याने ग्रंथ वाचले पाहिजेत, "पुष्कळ विद्या व भाषा शिकल्या पाहिजेत, म्हणजे बहुत गोष्टी कानावर पडून माहितगारी होते. केवळ संस्कृत वाचूनच होणार नाही. मला निश्चयेकरून वाटते की ज्यास शाहाणपण व ज्ञान मिळवावयाचे

असेल, त्याने इंग्रजी भाषा किंवा त्या भाषेतील ग्रंथाचे तर्जुमे तरी वाचावे. म्हणजे त्यास पुष्कळ गोष्टी कळतील. आता इंग्रजी विद्या फार सुधारली आहे, याचमुळे त्यातील भूगोलावर येक ग्रंथ पढलेला आणि जितके संस्कृत किंवा इतर भाषात ग्रंथ आहेत. ते जाणणारे जमा केले तर ह्या एकाची बरोबरी व्हावयाची नाही, असे आहे. कारण इंग्रज लोकांनी विद्या फार सुधारल्या, याज-मुळे त्या शुद्ध आहेत आणि पूर्वीच्या काळी शोध कमी होते, याजमुळे विद्या अर्धवट झाल्या, तितक्याच राहिल्या आहेत .... याजकरिता सांप्रत इंग्रजीत ज्या ज्या विद्या भूगोल, खगोल, राज्यनीती इत्यादिक आहेत, त्यांचा विचार करावा व त्यातील समजुती करून घ्याव्या. म्हणजे तुम्हास फार संतोष होईल असे केल्याशिवाय लोकांस कोणतेही कार्य नीट करता येणार नाही. सरकारने लोकास मोठी कामे दिली तर ते अनर्थ व जुलुम करतील, लांच खातील, ढील करतील व लोकांचे कल्याणार्थ झटावयाचे नाहीत. .... तात्पर्य ज्यास ईश्वराचे भय नाही व विद्या काय हे त्यांनी ऐकलेही नाही, त्यास नीती असेल कोठून? व शाहाणपण कसे येईल?"[१३]

गोपाळरावांच्या लिखाणावरून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते व तो म्हणजे ते अधुनिक इंग्रजी विद्येची नुसती महती सांगत बसले नाहीत तर विद्यादान करण्याचा सतत, प्रयत्न करीत राहिले. दीर्घकाळपर्यंत ते सरकारी नोकरीत होते पण त्यांचे लक्ष मात्र विद्यावृद्धीकडे विद्यादाना-कडे, लोकशिक्षणाकडे होते. लोकांना इतिहास समजावा म्हणजे शाहाणपण येईल याकरिता इंग्रज इतिहासकारांच्या भारतीय इतिहासावरील ग्रंथांची भाषांतरे करून छापली, समाजात दिसलेली वैगुण्ये उघड करून त्यावर उपाय सुचविले, पदार्थविज्ञानासारख्या आधुनिक शास्त्राची ओळख करुन देण्यासाठी माहिती गोळा करुन त्यावरही सोपे मराठी पुस्तक लिहिले हे सर्व करीत असताना त्यांनी आपली शिक्षकाची वृत्ती सोडली नाही. प्रत्येक गोष्टीचा कार्यकारण भाव उलगडून दाखविण्याचा त्यांनी प्रयत्न केला व जास्तित जास्त गोष्टीबद्दल सत्य माहिती सोप्या शब्दात उपलब्ध करून देण्याचे कार्य जन्मभर केले.

## स्त्रियांचे प्रश्न

याच दृष्टीकोनातून त्यांनी स्त्रियांचे प्रश्नाकडे पाहिले. मुलांचे शिक्षण लहानपणी आईने केलेल्या संस्कारावर अवलंबून असते हे बालमानसशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचे तत्त्व गोपाळरावांनी ओळखले होते. स्त्रियांना विद्येची केलेली बंदी याचमुळे समाजप्रबोधनाच्या दृष्टीने घातुक असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. बालविवाहामुळे विद्यावृद्धीवर कशी बंधने येतात याचीही चिकित्सा त्यांनी केली आहे. "ज्या वयात विद्या शिकावयाची, साहसांची व धाडसाची कामे करावयाची त्याच वयात मुलामुलींना संसारात लोटून सर्वांचे नुकसान" करणाऱ्या आईबापांवर ते फार रागावतात. त्याचप्रमाणे स्त्रियांना शिक्षण न मिळाल्यामुळे मुले शहाणी होत नाहीत व समाजाचे नुकसान होते "आमच्या रीती व चाली वाईट आहेत, आमच्या स्त्रिया अज्ञान आहेत. जोपर्यंत आम्ही आपल्या देशात बायकांस शाहाण्या करणार नाही, तोपर्यंत आम्ही मुर्ख राहू. कारण की, बायकांचे हातात प्रथम मुलास रीतभात लावणे आहे, तेथेच जर भिंवा पडला तर पुढे सुधारत नाही. लहानपणीं जी बुद्धी ती शेवटपर्यंत राहाते. याजकरिता बायका शाहाण्या पाहिजेत म्हणजेच मुलेही नीट होतात"[१४] एका बाजूने विद्येची वाढ व दुसरे बाजूस माणुसकीची गरज अशा दृष्टीकोनातून गोपाळराव स्त्रियांचे प्रश्नाकडे पहात होते. स्त्रियांच्या पुनर्विवाहास पाठिंबा देण्याबद्दल जाणत्या लोकांना आवाहन करताना ते म्हणतात. "दुर्दैवी मनुष्याशी दुष्टपणा करणे हे फार नीचपणाचे काम आहे. बायकांचे नवरे प्रारब्धाने मरतात. त्यास दुसरा करण्यास मना करता आणि हा धर्म आहे असे समजता! हा धर्म कशाचा बरे? धर्मशास्त्र हा केवळ कायदा आहे. व्यावहारीक गोष्टीकरीता त्यातील एका वाक्यास हरताळ लावला म्हणून काय झाले? आणि लोक तरी आता कोठे धर्मशास्त्राप्रमाणे चालतात? कितीएक चालत नाहीत. अधर्म करतात,

असे तुमच्या डोळ्यांपुढे असून तुम्ही आपल्या बहिणींची व पोरींची बुच्या घरे बुडविता हे तुम्हास कसे बरे वाटते ? नाही. तुमच्या पोरांची दया तुम्हास येत नाही. तुम्ही आपल्या पोटात दगड कसे घालता ? यांजकरिता माझे ऐका आणि स्त्रियांस पुरुषासारखे अधिकार आहेत असे ठरवा आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनी विद्या करावी, जाणतेपणी पुरुषांचे व स्त्रीचे लग्न व्हावे हे चांगले व जिचा नवरा मरेल तिणे खुशी असल्यास दुसरा नवरा करावा.[१५]

समाजात स्त्री पुरुषांनी मोकळे एकत्र वावरावे असे गोपाळरावांचे मत होते. त्यामुळे समाजाचा फायदाच होईल असेही ते म्हणत. "स्त्रियास पुरुषात मिसळविल्या असता पुरुषांच्या रीती-भाती व भाषण व्यवहार शुद्ध होईल. कारण की, स्त्रिया या जात्याच धर्मशील, श्रद्धाळू व पवित्र असतात व पुरुष दांडगे परंतु जगाचे माहितगार असतात. तेव्हा त्यांचे द्वाराने ती माहिती स्त्रियास होते व स्त्रियांचे साहचर्याने सात्विक गुण व पवित्रता ही पुरुषास लागतात. परंतु उभय-तास हे लाभ होतील हे ध्यान सोडून त्यास पिंजऱ्यात कोंडून ठेवितात ही ही चाल सुधारली पाहिजे."[१६]

लग्नाबद्दलची लोकहितवादींची मते तर आजही पुरोगामी वाटतील. "जशी खताची मुदत जाऊ लागली म्हणजे कोणीतरी वकील पाहून फिर्याद लावून टाकावी. मग काही होऊ. तसे आठ वर्षाची मुलगी झाली म्हणजे बापास तातड लागते. दुसरे अशी त्वरीत लग्ने केल्यामुळे मुलीस विद्याभ्यास होत नाही. तिसरे लग्नास मुहुर्त पाहातात व जातक पाहातात. त्यात गुणाकार भागाकार कमी जास्ती समविषम आला म्हणजे एकनाड, खडाष्टक वगैरे येऊन पडत नाही असे म्हणतात यामुळेही चांगले वर टाकावे लागतात. चौथे गोत्र प्रवर एक असू नये म्हणून ठराव आहे. त्यानंतर पाचवी हरकत अशी आहे कीं, देशस्थ, कोकणस्थ, यजुर्वेदी, ऋग्वेदी, कण्व, माध्यंदिन, गुजराथी व दक्षिणी ब्राह्मण इत्यादि हजारो भेद आहेत .... शास्त्राप्रमाणे लग्न ५ रुपयात होईल, परंतु त्याचा लौकिक इतका वाढला की, दहा रुपये महिन्याची ज्यास प्राप्ती आहे, त्यास दोनशे खर्चास पाहिजेत. उभय पक्षांची समजुत पडत नाहीं. दोघेही खराबीस येतात... पुर्वीचे ऋषी वगैरे शास्त्र करणारे होते. त्यांणीं ही मोठी चूक केली की, मुलीचा विवाह स्वच्छंदाने व्हावा तो न होऊ देता जबरदस्तीने करण्याची चाल घातली."[१७] लोकहितवादी दोष शास्त्र-कारांना कायद्याला देतात. आज कायदे बदलले आहेत. पण रीतीभाती बदलल्या नाहीत. एक लग्नाचे वय थोडेसे वाढल्यामुळे मुलीचे थोडेबहूत होणारे शिक्षण सोडले तर सर्व काही एकोणी-साव्या शतकांप्रमाणेच आजहीं चालू आहे असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. चालीरीती व धर्म यांची पुरातन कालापासूनची गल्लत विसाव्या शतकातही कमी झालेलीं नाहीं. लोकहितवादींच्या उपदेशांची आजच्या समाजांसही गरज आहे, हे निर्विवाद.

### धर्म व्यवहार

हिंदुधर्माच्या अभ्यास केल्याखेरीज धर्मांचा पगडा येथील माणसांच्या जीवनावर का व कसा बसला हे समजल्याखेरीज खरे समाजसुधारक होता येणार नाही याची जाणीव लोकहितवादींना प्रकर्षाने झाली व म्हणूनच इतिहासाबरोबर त्यांनी धार्मिक पुस्तकांचा अभ्यास सुरू केला. या पुस्तकाकडे सुद्धा ऐतिहासिक दृष्टिकोनातून पहाण्याचा प्रयत्न करणारे गोपाळराव हे पहिले विचार-वंत होते असे म्हणणे वावगे होणार नाही. धर्मामुळेच ब्राह्मणांना समाजात सर्वबाबतीत अग्रस्थान मिळाले ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली. हिंदुमाणसांचे जीवन धर्माने जखडलेले त्यांनीं पाहिले" ज्या देशाचा कारभार अथवा पुढारीपणा धर्माधिकाऱ्यांकडे असतो त्या देशास कधीही उन्नती येत नाही. व येवढ्याकरिता त्यांचे वर्चस्व जेणेकरून कमी होईल तितके करणे हे ऐतिहासिक अनुभवावरून सिद्ध होते"[१८] लोकहितवादींनी नव्या समाजात काय काय असावे हे सांगताना लिहिलेले हे बारावे कलम आहे. यावरून "धर्माचे सामाजिक जीवनातील स्थान मात्र ते मर्यादित

करु पाहातात. (हे सिद्ध होते)" मला वाटते की, संसार आणि परमार्थ ही दोन कामे पृथक आहेत. त्यांची मिसळ करु नये.[१९] "हीं दोन क्षेत्रे एकमेकापासून वेगळी केल्यावाचून सुधारणांचे कार्य पुढे जाणे अशक्य आहे" हा अत्यंत मूलभूत स्वरुपाचा विचार गोपाळरावांनी पुढे मांडला. "सामाजिक व्यवहार सनातन नियमांनी नियंत्रित झालेला आहे या कल्पनेला मर्यादा घातल्यावाचून सामाजिक जीवनासंबंधीचा ऐतिहासिक दृष्टिकोन वाढीस लागणे अशक्य होते, हे उघड आहे".

धर्मसमजुती व धर्मव्यवहार यात सुधारणा करण्यास लोकमानस तयार करण्यासाठी लोकहित-वादींनी पुष्कळ लिखाण केले. पण "धर्म समजी लेवाने वास्ते शाळा नथी. आचार्य नथी. बधाय धर्मनो पुस्तको संस्कृतमा छे ते कोईना जाणवामा आवता नथी. तेथी अर्थना अनर्थ थाय छे. तेथो धूर्त अने धूतरा लोकोनो घणू फावे छे". [२०] ह्या उणीवा भरुन काढणे सोपे काम नव्हते. त्यात अनेकांचे सहाय्य मिळण्याची जरुरी होती. धर्मसुधारणा करावी असे गोपाळरावांचे प्रमाणे अनेकांना वाटू लागले होते. व त्याकरिता अनेक नव्या चळवळींची सुरुवात होत होती. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, थिऑसॉफिकल सोसायटी वगैरेशी गोपाळरावांचा सहाजिकच जवळचा संबंध आला. आर्यसमाजाचे प्रस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचे त्यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. पण आर्यसमाजी लोकांप्रमाणे वेद "देवोक्त" आहेत असे गोपाळरावांनी मानले नाहीत वेद हे "फार प्राचीन ग्रंथ असून छंद ऋषींनी उच्चारिले आहेत ········ वेद हे ऋषीकृत आहेत, तरी ते ईश्वरोक्तिवत् असे सिद्ध होते" [२१] वेदांना ते "ईश्वरोक्तिवत्" मानतात. "ईश्वरोक्त" मानीत नाही. हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. वेद बोलणारे हे ऋषी कोण याचा ते शोध घेऊ पहातात. "ते ग्रंथकार, विद्यावृद्धी करणारे, ईश्वराची प्रार्थना करणारे, महाभक्त व आर्यांचे पूर्वज असून त्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र व स्त्रिया ही सर्व आहेत.[२२] या वरून गोपाळ-राव आर्यसमाजाच्या विचारसरणीपासून किती दूर होते हे स्पष्ट होते. पण प्रार्थना समाजाचे ते सभासद होते. असे ज्ञान प्रकाशात असलेल्या त्यांच्या मृत्यु लेखावरून समजते.

गोपाळरावांनी पंधरा कलमी धर्मसुधारणा सांगताना सर्व भर सामाजिक वर्तन व संबंध यावरच दिलेला दिसून येतो. यात माणसाचे वर्तन कसे असावे, त्याने काय करावे व करु नये याचा उहापोह आहे. त्याच्या मते धर्म म्हणजे-ईश्वराचे भजन, जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा, मुंज, लग्न प्रेतक्रिया हे तीन संस्कार ठेवून बाकीचे बंद करावे. कर्म करणे ते स्वभाषेत अर्थ समजेल असे करावे–प्रत्येकजण आपले विचाराप्रमाणे आचरण करण्यास व बोलण्या–लिहिण्यास मोकळीक असावी. अर्थाशिवाय काहीएक म्हणू नये – मनुष्यमात्रास तुच्छ मानू नये – जाति अभिमान नसावा. ज्यास पाहिजे तो त्याने रोजगार करावा – गुणे करुन व योग्यतेवरुन जातिभेद मानावा, कुळे करुन मानू नये – सरकाराहून प्रजेचे अधिकार जास्त असावे. राजाने जे नियम केले असतील ते व जे ईश्वरी बुद्धि सूचित नेम आहेत ते मानावे – क्रियावृद्धीकरिता सर्वांनी मेहनत करावी – दुःखितास सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान व दारिद्र्यास द्रव्य, शक्तीनुसार देण्यास अंतर करु नये — **सत्याने सर्वांनी चालावे** "सत्याचे विरुद्ध वर्तणूक करु नये".[२३]

गोपाळरावाचा मुख्य कटाक्ष, धर्म सत्यावर आधारलेला असावा यावर होता आवती भोवती धर्माच्या नावावर चाललेले अनेक अत्याचार ते पहात होते. काळाप्रमाणे आचार, विचार व रुढी बदलली पाहिजे अशा मताचे ते होते. 'प्रस्तुत कालावर लक्ष दिले असता, वेदास या काळात प्रमाण धरून त्याप्रमाणे आचरण केल्यास तिकडूनही अडचण येणार, स्मृतीसच सर्वथैव प्रमाण धरल्यास तीही अडचणच आहे आणि पुराणे ही प्रमाण धरली तर अगदींच अनवस्था होईल तर **श्रौत, स्मार्त** आणि **पुराण** यांचे नीट पर्यालोचन करून सारासार विचाराने आणि देशास हितकर असे आचार, विचार, रुढी आणि शास्त्रे ही विद्वान श्रेष्ठ लोकांनी ठरवावी असे आम्ही म्हणतो. आम्ही म्हणतो इतकेच नाही, तर पूर्वापार ऋषी वगैरेही याचप्रमाणे करीत आले आहेत".[२४]

हिंदुधर्मातील अनेक दुर्बल स्थानावर गोपाळराव अचूक बोट ठेवतात. मध्यस्थामार्फत धर्म करणे, चातुर्वर्ण व्यवस्थेला व जातीसंस्थेला धार्मिक अधिष्ठान देणे. यासारख्या अनेक गोष्टीवर ते टीका करतात, "जातीमुळे सर्वांचे भजन एक होऊ शकत नाही व मुळापासून धर्म ब्राह्मणांकडे सोपवला गेला. यास्तव इतरास धर्माची गरज आहे असे नाही. हिंदुधर्माची रीत अशी आहे की, मुखत्यारामार्फत धर्म करिता येतो. सर्व गावचे नवरात्र, होळी, जत्रा वगैरे एके ठिकाणी होतात, तसेच आम्ही करितो. होम, यज्ञ, जप भटाकडून करविले तरी चालतात .... आता लढाईचे काम क्षत्रियांकडे सोपवले, तसेच धर्माचे काम ब्राह्मणांकडे दिले. त्यात आणखी असे बीज ठेविले आहे की, ते मंत्र ब्राह्मणाचे मुखाने फलद्रूप होतात .. धर्म हा व्यापारच आहे व त्यापासून काही फळ आहे. मग ते मुखत्याराचे हातून करविले तरी चालते आणि त्यास वेतन दिले म्हणजे ईश्वराचे घरी मूळ मालकाने केल्याप्रमाणे त्याचे खाती जमा होऊन रुजू पडते .... ब्राह्मणांनी भजनाकरिता एक वेगळी जात करुन ठेविली आहे. ते असे समजत होते की, धर्म म्हणजे जशी सुतारकी, लोहारकी तसेच हे एक काम अशी लोकांची समजूत आहे. या कामावर भट नेमले आहेत .... यास्तव दरएक गावी जोशी व भट एक बलुत्यांत असतो. तो सर्व गावाचा धर्म सांभाळतो."[२५]

चातुर्वर्ण्यव्यवस्थेची त्यावेळी परिस्थिती म्हणजे "सांप्रत ब्राह्मण जे आहेत ते नावाचे आहेत व ब्राह्मणपणा फक्त कुळात आला आहे, गुणात नाही .... जसे हल्लीचे ब्राह्मण आहेत तसेच ते क्षत्रिय निस्तेज व हतवीर्य आहेत .... हल्ली कोणी क्षत्रिय असते तर राज्य परकी लोकांचे हाती का जाते ? व धर्मही बुडता ना .... आता तिसरा वर्ण वैश्य .... परंतु त्यांनी आपला धर्म सोडून दिला. व्यापार ते करते तर परकी लोक येऊन इकडे व्यापार करते ना. परंतु असे झाले. त्यापेक्षा वैश्य वर्णही बुडाला .... सांप्रत जितके लोक हिंदुस्थानात आहेत, तितक्यांचा एकवर्ण मला दिसतो. की, ते शूद्र आहेत. इतर वर्णाची नांवे मात्र घेतात. परंतु त्याचे गुण व कार्य नाही. हिंदुस्थानात तीनही वर्णाचे काम इंग्रज लोक चालवितात.[२६]

## धार्मिक क्रिया कर्म

याचप्रमाणे सध्या अस्तित्वात असलेले धार्मिक आचार व वेदिक मंत्र यांचा काहीही संबंध नाही, ही गोष्ट लोकहितवादींनी उदाहरणे देऊन सिद्ध केली आहे. "वेदात मंत्रामध्ये कर्मे दृष्ट आहेत असे मंत्र थोडेच सापडतील. संस्कार तर कोठेच दृष्ट नाहीत"[२७] म्हणजे वेदोक्त कर्म किंवा पूजा याला फारसे महत्व रहात नाही. वेदाचे अर्थ समजणारी माणसे अत्यंत थोडी त्यामुळे वेदाचे नावावर कर्मकाण्ड खपविण्याचा धंदा सुरू झाला. वैदिक मंत्राचा उपयोग निरनिराळ्या पूजाअर्चांचे वेळी करण्यास सुरवात झाली. अर्थाकडे लक्ष न देता उच्चार सादृश्यावरून कर्म व मंत्र याचा मेळ घातला जाऊ लागला. उदाहरणार्थ 'यत्पुरूषं व्यदधुः' ०–धूपः या मंत्राचा उपयोग देवाला धूप दाखविण्याकरिता करतात. परंतु तशा अर्थाचा संबंध त्यांत काहीच नसून प्रजारूपी पुरूषाचे विभाग कसे केले असा त्यात प्रश्न मात्र आहे."[२८] अशा तऱ्हेने खोटे, चुकीचे अर्थ न समजता वैदिक मंत्राचे वापर पुष्कळ वेळा कर्मकाण्डात वापरण्यात येतात. वैदिक संस्कृत समजणारा सामान्य माणूस दुर्मिळच म्हणून आतापर्यंत भटाभिक्षुकांचे चालत आहे. वामनपंडितांचे श्लोक म्हणून क्रिया कार्य करण्याइतकेच ते हास्यास्पद आहे, असे लोकहितवादी म्हणतात, यात खोटे ते काय आहे ? पण कर्मकाण्ड म्हणजेच धर्म असे समजून त्यात पिढ्या न पिढ्या मशगूल असलेल्या हिंदुसमाजास गोपाळरावांनी कर्मकाण्डावर केलेली डोळस व प्रखर टीका पसंत पडणे अशक्य होते. विसाव्या शतकाच्या शेवटीही बऱ्याच प्रमाणात हीच परिस्थिती कायम आहे. लोकहितवादीसारखा सच्चा टिकाकार बाळीत पडण्याचे जसे हे एक कारण असू शकेल तसेच त्यांच्यासारख्या टिकाकारांना वाळींत टाकण्याचा आजची परिस्थिती हा परिणामही असू शकेल.

गोपाळराव यांचा दोष ग्रंथकारांना देतात. "जो ग्रंथकार झाला त्याने आपले शेपन्नास नवे विनियोग लिहावे! सर्वांचा उद्देश एकच कर्मवृद्धि; आणि त्याजवरून अशी ख्याति झाली की, जो या प्रकरणाचा अधिक उपयोग करील, तो अधिक पवित्र आणि अधिक विद्वान समजावा ...... शिवाय, सर्व कर्मांचा अधिकार ब्राह्मणांनी आपलेकडे ठेविला, यात वैदिक कर्म तर ब्राह्मणांची वतनदारीच ठरली."[२९] यामुळे सर्व समाज रसातळाला पोचला. लोकहितवादींची कर्मकाण्डावरील टीका व आघात आजच्या हिंदु समाजापुढे मांडण्याची गरज आहे. धर्मकर्मातील खोटेपणा त्याचा पोकळपणा लोकहितवादींच्या इतक्या हिरिरीने कोणत्याही समाजसुधारकाने मांडलेला दृष्टीस पडत नाही. पण त्याचबरोबर लोकहितवादींनी पुरातन हिंदुधर्मातील चांगल्या शाश्वत गोष्टींचा शोध घेतला, ते हिंदुधर्माचे अभिमानी होते. आपल्या धर्माची वैगुण्ये पाहून ते डगमगले नाहीत. की दुसऱ्या धर्मात गेले नाहीत. शाश्वत धर्मतत्वे त्यांना टिकवावयाची होती म्हणून त्याच्या भोवती जमा झालेल्या फुफाट्यातून ती वेगळी करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. त्यांना ती लोकांपर्यंत पोचवावयाची होती. "या देशांत बहुत ऋषी व साधुपुरूष ज्ञानी झाले. परंतु त्यांनी या कर्मास मिथ्या जाणून हे सर्व वृथा आहे लिहून ठेविले आहे.

## धर्म सुधारणा

न कर्मणा न प्रज्ञया धनैर्न त्यागे नैके अमृतत्वमानुशुः ॥ –कैवल्योपनिषद (एक त्यागानेच (ऋषींनी) अमरत्व मिळविले. कर्माने (कर्मकाण्डाने) प्रजोत्पादन करून वा धन संपादन करून (अमरत्व मिळविले) नाही.[३०] मग प्राचीन वेदान्द धर्म काय आहे?" प्राचीन काळचा खरा वेदान्त असा होता की, ईश्वर एक आहे, जीव हा उत्पन्न झालेला. प्राणी हा परस्वाधीन असून त्याने धर्माधर्म पाहून विवेकाने वर्तणूक करावी, जग सत्य आहे, आपल्या प्रमाणेच सुख दुःखाविषयी लोकास समजावे, वगैरे अत्यंत स्तुत्य मते वेदान्त संबंधाने चालत असत".[३१]

हिंदु धर्म सुधारण्यासाठी "आम्हास असे साधू पाहिजेत की, सर्व ज्ञातीत व सर्व देशात जे जे अनर्थ घात करणारे आहेत ते काढणारे, जगास सद्‌गती देणारे, नीतीचा व सदुद्योगाचा ठसा दाखविणारे ... म्हणून ज्या दिवशी असे साधू हिंदुस्थानात होतील आणि लोक जुन्या चालीचे, आळशी, निरद्योगी, अज्ञानी अशा साधूंची भक्ति सोडून हितकर्ते साधूस भजू लागतील, तेव्हाच हे सर्व अनर्थ दूर होतील."[३२] "कारण हिंदु माणूस आजही अनेक तऱ्हेच्या वेड्यावाकड्या अडचणीने प्रत्येक जीव स्पष्टतर जरी तुरुंगात नाही, तरी तो तुरूंगापेक्षा मोठाल्या श्रृंखलांनी बांधलेला दिसतो. इकडेतिकडे फिरतो, पण त्यास मोकळेपणा कोठे आहे याचा विचार करावा. प्रत्येक हिंदु हजार दोन हजार बिड्या घातलेलाच आहे असा आम्हास दिसतो. बिचारा पोटाकरिता फिरतो मात्र, परंतु डोक्यावर जबरदस्त ओझे असून खरडत खरडत चालला आहे असाच सर्वांस दिसेल. तर ईश्वरकृपेने ही दुर्वृत्ती मावळून सद्‌गतीचा उदय होईल तो दिवस सुदिन."[३३]

## मुसलमान

गोपाळरावांनी सर्व भारतीयांकडे लक्ष दिले, त्यांचा अभ्यास केला, त्यामुळे मुसलमानहीं त्यांच्या दृष्टीतून सुटले नाहीत. याच बरोबर पार्शी, शीख, यहुदी व ख्रिश्चन लोकांवरही त्यांनी टिपण्या लिहील्या इतिहास वाचताना त्यांनी मुसलमान कोठून आले त्यांचा धर्म काय, धर्मगुरू कोण वगैरेचा अभ्यास केला. हिंदुच्या चालीरीतीने मुसलमानात केलेला प्रवेश त्यांच्या ध्यानात आल्याखेरीज राहिला नाही." मुसलमानांनी हिंदुच्या चाली येथपर्यंत ग्रहण केल्या आहेत की, बहुतेक ठिकाणी मुसलमान गोवध करीत नाहीत. गुजराथेत तर किती एक ठिकाणी मुसलमान लोक मांस देखील खात नाहीत. त्याचप्रमाणे सय्यदांचे वगैरे वंशात कन्येचा पुनर्विवाहही करीत नाहीत ... शिवाय त्यांचेमध्ये हिंदु सारख्याच जातीही झाल्या आहेत ··· त्यांच्या बायका हिंदुसारख्या लुगडीचोळया नेसतात, पुरुष धोतरे, पागोटी घालतात."[३४] यापुढे जाऊन ते म्हणतात

"मुसलमानांची सांप्रतची स्थिती फार वाईट आहे. जरी त्यास हिंदुसारखी खाण्यापीण्यासंबंधी विटाळाची वगैरे अडचण नाही. तरी अज्ञानाने व ऐषआरामी सवयीने त्यांचे ऐश्वर्य नष्ट होऊन ते अगदीं मागे पडले. ते विद्याभ्यासही करीत नाहीत.

## हिंदुस्थानचे दारिद्रय

"या जगात जसे ज्याचे चालेल तसे तो चालवितो" हा न्याय ब्राह्मणांनी शूद्रांस लावला व तोच इंग्रजानी हिंदुना लावला हे गोपाळराव विस्तृतपणे मांडतात. वेदांचे ऋषीत शूद्र, निषाद व क्षत्रिय जातीचे आहेत परंतु जेव्हा ब्राह्मणांचे वैभव वाढले, तेव्हा ते आपल्यास भूदेव असे मानू लागले व आपले चरणांगुष्ठाचे तीर्थाने इतरास पावन करु लागले · · · यावरून पहाता ब्राह्मणानी आपणास जे महत्व मानून घेतले ते हल्ली जरी उपहासास्पद आहे, तरी त्याच्या अभ्युदयकाळी ते हल्लीचे इंग्लिश लोकांचे समजूतीप्रमाणेच पुष्कळ बलवत्तर असेल नाही बरे? "[३५] शूद्रांना कमी लेखणे कसे सुरु झाले असावे हे सांगताना इंग्रजाचे वर्तणूकीवरही गोपाळराव टीका करतात. विलायतेतून इकडे येणारे सर्वच इंग्रज शहाणे असतात असे नाही. परंतु ते राज्यकर्ते असल्यामुळे सहजासहजो लठ्ठ पगारांच्या व सत्तेच्या जागा पटकावतात. "गव्हर्नरापासून असिस्टंट कलेक्टरपर्यंत व कमांडर इन चीफ पासून सोजीरापर्यंत" सर्व माणसे बाहेरुन आणतात कारण, "हिंदुलोकास राज्य कारभाराची अकल नाही"[३६] ही बाहेरून येणारी लठ्ठ पगाराची माणसे येथून संपत्ती बाहेर घेऊन जातात व हिंदुस्थानला दारिद्य येण्याचे ते एक कारण आहे ही गोष्ट लोकहितवादीचे १८४९ साली म्हणजे वयाच्या सव्विसाव्या वर्षीच लक्षात आली होती.

इंग्रजांनी इतर मार्गाने चालविलेले देशाचे शोषणही त्यांच्या लक्षात आले होते. सुरुवातीला हिंदु लोकांमध्ये मूर्खपणा वाढला तो दूर होण्याकरिताच हे गुरु दुर देशातून इकडे पाठविलेले आहेत. असे म्हणणारे गोपाळराव इंग्रजी राज्याचे आर्थिक दुष्परिणाम लक्षात येताच उघड करु लागतात. "१८६१ सालापासून पैमाप झाली. तीत कर मनस्वीं वाढले. शिवाय बारीकसारीक कर इतके वाढले, लोकास जशा जळवा लागतात तशा अनेक जळवा लागल्या आहेत" युरोपिअन फौजांची वाढ त्यांचा पगार, विलायतेत असलेल्या कचेरिचा खर्च, रेल्वेकरिता घेतलेल्या कर्जाचे व्याज, हिंदुस्थान सरकारला असलेले विलायत सरकारचे कर्ज, चाकर लोक घरी पैसे पाठवितात ते व या खेरीज आयात निर्यात व्यवहारात असलेला तफावत या सर्व मार्गानी देशाचा पैसा विलायतेला जातो." [३७]

एकेकाळी व्यापार उदीमीत अग्रेसर असलेले राष्ट्र मागे का पडले याची कारणमिमांसा लोकहितवादी अनेकवेळा करतात "आज दोन हजार वर्षापासुन या देशातून मालाची रवानगी बाहेर होत होती. आणि बाहेरचे कोट्यावधी रुपये या देशात येत होते. त्याजमुळे येथे चंगळ होत होती व हिंदुस्थानच्या द्रव्याचा लौकिक सर्व जगात पसरला होता."[३८] पण पुढे "हा देश मोगलाई मराठी अमलापासून राजे व सरदार लोकांच्या अनितीने दुष्टपणाच्या वर्तुणुकोने त्रासला होता. परगणे उजाड पडले. अधिकार, हक्क, सत्ता व स्वस्थता नाहीशीं झाली होती. अशा समयी इंग्रज सरकार उत्तम रितीने राज्यव्यवहार चालवितात, हे पाहून रयतेस असा धनि मिळाला म्हणून आनंद झाला. तेणेकरुन सरकारचा अंमल चोहोकडे सुलभ रीतीने बसला. देशात निर्भय झाले. न्यायादिकाची रीती फार चांगली चालू लागली. प्रामाणिकपणा सरकारच्यात इतका वाढला की, त्यांची कोट्यावधीचो खते बाजारात वर्तवळयाने चालतात. विद्या वृद्धी चोहोकडे शाळा वगैरे चालल्या आहेत. मोठ्या मोठ्या सुधारणा चालू झाल्या. लोकांमध्ये विचार उत्पन्न झाला. आजपर्यंत लोक दबलेले होते. राजांची व भटांचो अनेक प्रकारचीं जाचणी होती तो दूर होत चालली, अशा समयी इंग्रज सरकारचे कर्तव्य येवढेच की, हा देश धनवान झाला पाहिजे. उद्योगी झाला

पाहिजे. आणि स्वतंत्रतेस आला पाहिजे. या देशात पार्लमेंट स्थापन झाले पाहिजे. देशातील लक्ष्मीचे शोधन झाले पाहिजे आणि मोठाले अधिकार प्रजेस मिळाले पाहिजेत[३९] लोकहितवादींना इंग्रज राजवटीबद्दल वाटणारा सुरवातीचा विश्वास फोल ठरला व आपल्या लोकांनी स्वतःचा उद्धार स्वतःच करावयास शिकले पाहिजे असे ते म्हणू लागले "पूर्वी लाखो फौजा घेऊन होळकर शिंदे, गायकवाड युद्धास व लुटावयास निघत, परंतु हल्ली त्यांनी या चढाईवर (हुन्नराच्यां) हल्ला केला तर काही हरकत नाही, आपले खाजगीतील दागिने विकून फौज उभी करीत तसेच आज सर्व जवाहर विकून वाफेची यंत्रे आपल्या महालोमहाली घालतील तर देशाचे मोठे कल्याण व त्याचे वडील फौजा घेऊन नाश करीत होते त्यापेक्षा हल्लीच्या त्यांच्या वंशांचा अधिक प्रताप व कीर्ती होईल ··· या कामात सरकारची फारशी अशा धरू नये. कारण सरकारच्या मनात विलायतेचा व्यापार गरम राखावा असे आहे" याचेही पुढे जाऊन गोपाळराव म्हणतात की, "विलायतेतील जी कामे चालू झाली ती लोकांनीच केलीं. त्यास राजाची मदत होती असे नाही. परंतु या शोधांकरिता विलायत व पोर्तुगॉल वगैरेचे लोक हिंदुस्थानात येऊन बसले तसे येथील लोक तेथे बसले पाहिजेत···येथील कंपन्या हुन्नर शिकण्याकरिता विलायतेत बसल्या पाहिजेत[४०]··· कारण येथील रोजगार विलायती यंत्रांनी खाल्ला व शेती करांनी बुडाली तेव्हा लोकांनी काय करावे[४१]

हिंदुस्थानला दारिद्य येण्यास नुसते इंग्रजच कारणीभूत झाले असे नाही. हिंदुलोकाचे आळसाने व निरुद्योगाने देशाचे फार नुकसान झाले. लक्ष्मी उत्पन्न करण्यास खूप मेहनत करावी लागते हे गोपाळराव स्पष्ट लिहितात. "लक्ष्मीचा बाप उद्योग आहे व लक्ष्मीचे वृद्धीचे कारण शहाणपण आहे" या खेरीज लक्ष्मीचे वृद्धीची आणखी तीन कारणे लोकहितवादी देतात "एक शहाणपण १ येक येकाने वेगळा वेगळा व्यापार करणे, २ लक्ष्मी जमविणे व त्याचा उपयोग करणे, व ३ लक्ष्मी जास्त प्राप्त होईल त्याने निर्भयपणे भोगणे[४२]" लक्ष्मीचा उपयोग लोकांना सुखी करण्याकरिता झाला पाहिजे. असेही गोपाळराव सांगतात. "मनुष्यास सुख व्हावयास दोन गोष्टी पाहिजेत. एक लक्ष्मी पुष्कळ उत्पन्न झाली पाहिजे आणि लक्ष्मीची वाटणी लोकांमध्ये बरोबर केली पाहिजे. या दोनही गोष्टी होण्यास सरकार आहे आणि सरकार कायदे करीतात. हेच आहे की, लक्ष्मीं पुष्कळ होऊन लोकांमध्ये व्हावी ज्याप्रमाणे सरकार त्याप्रमाणे लक्ष्मीची व्यवस्था होईल'[४३] लक्ष्मीचे वाटप मुख्यत्वे करुन सरकारवर अवलंबून आहे हे पण त्यांनी ओळखले होते.

"आपले लोकास सुखी होण्यांची युक्ती कोणती म्हणाल तर अशी आहे की, जितके इंग्रज लोकांचे व्यापार व रोजगार इकडे कमी होतील तितके त्या लोकांस जास्ती सुख आहे, याजकरिता या लोकांनी विद्या व ज्ञान यांचे प्राप्तीस झटावे व इंग्रजांप्रमाणे शहाणे व्हावे, आणि जे व्यापार ते करतात ते आपण करावे"[४४] आपले दारिद्य घालविण्याचा वरील उपाय सोडल्यास आणखी एक उपाय म्हणून लोकहितवादी स्वदेशीचा मार्ग सांगतात. १८४९ साली ज्यावेळी स्वदेशी चळवळीचा कोठे मागमूसही नव्हता त्यावेळी लोकांनी एकत्र होऊन जर असा करार केला की, आपले देशात दुसरे मुलखांचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाही आपले देशात पिकेल तेवढाच माल घ्यावा. आपले लोक कापडे जाडी वाईट करतांत. परंतु तीच नेसावी इकडे छत्र्या करितात त्याच घ्याव्या म्हणजे या लोकात व्यापार राहून इकडे सुख होईल, परंतु हे लोक असे करीत नाहीत आणि थोडीं किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिले तर दाणे मात्र इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशातील येऊ लागले नाहीत. बाकी सर्व पहावे ते परदेशाचे आहे"[४५] असे गोपाळरावांनी स्वच्छ लिहिले आहे. स्वदेशीचा मार्ग सांगणारे लोकहितवादी पहिले विचारवंत होत." परदेशी माल उत्तम व स्वस्त मिळू लागला म्हणून लोकांनी त्यांचाच अंगिकार व त्यामुळे स्वदेशीय मालाचा राळ होऊन स्वदेशीय उद्योग करावे व ते सुधारण्याविषयी कोणीही लक्ष देता नाही"[४६]

दागिन्यांचे शोकामुळे भांडवलवृद्धी होत नाही व भांडवलवृद्धी झाल्याखेरीज उद्योगधंदे वाढणार नाहीत, असेही लोकहितवादींनी सांगितले. "पराक्रम, बुद्धि, कौशल्य यांची वृद्धी द्रव्याने व्हावयाची ती झाली नाही. आमचे सुतार, लोहार, दर्यावर्दी अन्नास महाग यांनी कोणाचे जिवावर कसब वाढवावे? श्रीमंतांनी तर द्रव्याचे ढीग हातात, पायात, गळ्यात घातले आहेत.[४७] 'वास्तविक म्हटले तर राजांनी मुगुट, सिंहासने देखील धारण करण्याचे कारण नाही. कोणत्याच डौलाचे कामात द्रव्य बुडवू नये. सर्वकाळ द्रव्यांची उपयोगी कामात वृद्धी करावी, म्हणजे प्रजा सुखी होते[४८] दिखाऊपणात पैसा खर्च न करता तो भांडवल म्हणून वापरावा हा विचार यात स्पष्ट आहे.

हिंदुस्थानला दारिद्र्य येण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्रजावाढ "तिकडील (इंग्लंडातील) लोकांत ज्यास मिळविण्याची शक्ति असेल तो आपले लग्न करून संसार थाटतो, आणि इकडे मिळविण्याची शक्ति व ज्ञान असो किंवा नसो, मुलांचे आईबापच त्यांची हाडे बालपणी भाजून दूर होतात .. दाराशी ज्या भिकारी बाया भीक मागण्यास येतात त्यांच्यामागे पाच पाच, सात सात पोरे केवळ उदरभरणार्थ दारोदार फिरून कसे तरी आयुष्याचे दिवस काढतात. दिवसेंदिवस अशा अनुपयुक्त लोकसंख्येची वृद्धीच असल्यामुळे देश विशेष दारिद्र्यग्रस्त होत चालला आहे.[४९] वाढती लोकसंख्या आजच्या जगापुढील यक्ष प्रश्न आहे. व लवकर लग्न करणे हे त्याचे एक प्रमुख कारण आहे. त्याची जाणीव लोकहितवादींना होती व त्याचा उल्लेख शंभर वर्षांपूर्वीच्या त्यांच्या लिखाणात सापडतो, याबद्दल आश्चर्य वाटते.

हिंदुस्थानाला दारिद्र्य येण्याची अनेकविध कारणे देऊन लोकहितवादी पुढे म्हणतात, "परंतु या सर्व तार्किक कारणात अमुकच कारण सर्व प्रकाराने सत्य व निर्विवाद आहे असे काही ठरविता येत नाही, तर ती सर्वही कारणे अंशतः अंशतः खरी असतील व म्हणून, **देशात उत्पादक उद्यमाची वृद्धि झाली पाहिजे.** हाच दारिद्र्यनिवारणोपाय होईल असे सिद्ध करून दाखविता येईल. सारांश, लोकांनी उद्योगवृद्धीचे मार्ग शोधले पाहिजेत. परदेशात गेले पाहिजे, लौकर लग्ने व भोजनाच्या समारंभाच्या घातकी चालीही सोडल्या पाहिजेत. आपसातील वैरे मिटवून बंधुप्रिती व देशप्रिती जागविली पाहिजे. आणि विद्या व ज्ञान यांची वृद्धी केली पाहिजे. असे न होईल तर दिवसेंदिवस देश जास्त जास्त दारिद्र्यग्रस्त होत जाईल आणि अन्नाने निर्वाह होणार नाही.[५०]

## देशप्रेम व सुधारणा

आर्थिक उन्नतीप्रमाणेच देशाच्या स्वातंत्र्याबद्दलही गोपाळरावांना तळमळ होती. आपल्या लोकांमध्ये देशप्रीती फार कमी आहे असे ते वारंवार म्हणत, त्याबरोबरच असे का या प्रश्नांचे उत्तरही देत. ते म्हणत "प्रीतिजन्य पदार्थ असला म्हणजे तो आपणच सर्वांचे अंतःकरण आपलेकडे ओढून घेतो. तद्वत देशामध्ये प्रीत्युत्पादक चालीरीती उत्पन्न झाल्या म्हणजे लोक सहज देशप्रीती व देशाभिमान बाळगतील. अमेरिकेतील लोकास किंवा इंग्लंडातील लोकास आपल्या देशावर प्रीति करा म्हणून सांगावे लागत नसून त्यास असे वाटते की, आपल्या देशासारखा उत्कृष्ट देश दुसरा कोणताही नाही... परंतु आमच्या देशातून स्वदेशप्रीतीचे व पूर्वजांच्या अभिमानाचे बीजच नाहिसे झाले आहे. यास वर लिहिल्यापैकीच काहीतरी कारणे असावी. ज्यांनी सतीची निर्दय चाल बंद केली, पुनर्विवाह सुरू केला, स्त्रीशिक्षण चालू केले व अनेक विद्याशाळा स्थापिल्या त्यांनी देशप्रीतीरुप वृक्षाचे बीजच रुजत घातले असे म्हणावयास काही हरकत नाही.[५१] इंग्रजांनी देशप्रेम व देशाभिमान शिकविला असे म्हणणारे लोकहितवादीनंतर कितीतरी सुधारक होऊन गेले.

देशसुधारणा म्हणजे देशातील लोकांची सुधारणा असे गोपाळराव मानीत व त्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे, प्रयत्न केले पाहिजेत असे सांगत. "देश सुधारणा देश सुधारणा असा जप केल्याने देश सुधारणा होणार नाही. मूळ देश सुधारणेचे लक्षण व व्याप्ती मनात येऊन तदनुरुप काही तरी हातपाय हालविले पाहिजेत. देशाची माहिती झाली पाहिजे व सुधारणा करण्यास इतर देशांच्या चांगल्या रीतीभातीचे अनुकरण केले पाहिजे. सुधारणा करणारे लोक पोक्त अनुभविक व वजनदार असले म्हणजे या गोष्टीस महत्व येऊन सर्वास ते मार्ग अनुसरणीय वाटतो."[५२]

## इतिहासाची जाणीव

हिंदुमाणसाच्या सर्व वैगुण्याचे एक महत्वाचे कारण म्हणजे त्याचे इतिहासाकडे झालेले दुर्लक्ष होय. समाज बदलत असतो, पुढे जात असतो ही कल्पना हिंदू समाजात रुजली नाही. त्याचे कारण "हिंदुसमाजामध्ये काळगणना मोठी चमत्कारिक आहे व तिचा अंतपार नाही काळाचा ठिकाण नाही, असे समजून त्यांनी त्याचे जितके होतील तितके विभाग केले आहेत. व शेवटी त्याचे चक्र करून त्यात पाहिजे ती गोष्ट मावेल असे केले आहे ... या कालाचे विभागामुळे जागोजाग उत्पत्ति व जागोजाग लय कल्पायासही सोय पडली .. यावरून हिंदुलोकास असे वाटते की, कोणतेही कामाची आपलेजवळ माहिती नाही असे नाही. मागील कल्पाचे कल्प लिहिलेले आहेत, तेव्हा इराणची आणि इंग्लंडची बखर, किंवा चीनचा इतिहास यांत आहे काय ? त्यात मोक्ष मार्ग किती दाखविले आहेत ? ... ज्याचे दाराशी हत्ती असतो, त्यास घूस आणून नजर केली, तर तुच्छता दिसते, त्याप्रमाणे हिंदु लोकास अर्वाचीन इतिहासाचे ऐकून तुच्छ वाटते."[५३]

इतिहासाची जाणीव असती तर "मुसलमानांनी सहाशे वर्षे राज्य केले, व येथे सोयरगतीही केल्या. परंतु हे कोण, याचा धर्म मतलब व धोरण काय याविषयी एकाही हिंदुने विचार केला नाही. कोणी ग्रंथही लिहिला नवून आजपर्यंत कोणास काही ठाऊकही नव्हते. पोटासाठी फारशी भाषा शिकले, हकीमाची औषधे घेऊ लागले, व फौजेत तबीब ठेवू लागले. मुसलमान गवई याणी तर गांधर्व वेदासही हरविले, तरी त्याचा शोध केला नाही व आता तर तेच बहुतेक लोक इंग्रजी शिकत आहेत. सारांश भाड्याच्या बैलाप्रमाणे, ज्याने गोणी घालावी व काठी मारावी त्यांच्यापुढे चालण्याचा क्रम पडला, याप्रमाणे लोकस्थिती झाली. त्याप्रमाणे इतके उदासी, बेफिकीर, बेपर्वा व पराक्रमहीन असे लोक या भूमंडळात कोठेही नसतील"[५४]

इतिहासाची जाणीव आणि उर्जितावस्था यांचा अत्यंत निकटचा संबंध गोपाळरावांना दिसत होता. त्यांच्या इतिहासविषयक दृष्टीकोनात स्वदेश विषयीची तळमळ ओतप्रोत भरली आहे. "वास्तविक पाहिले तर विशेषकरून स्वदेशाची माहिती आधी करून घेऊन नंतर परदेशीय माहितगारी शिकावी. हा शिकण्याचा उत्तम क्रम आहे. परंतु आपले देशास व शास्त्रास लोक विसरल्यामुळे शिकण्याचा विक्रम झाला आहे."[५५] यावरून हिंदुलोकांचे इतिहासाकडे दुर्लक्ष आहे व त्यामुळे बदलाकडे, प्रगतीकडेही दुर्लक्ष होत आहे. असे त्यांना सारखे वाटत होते. कारण "इतिहासाच्या जाणिवेचा अभाव म्हणजे एकापरीने बदलाच्या जाणिवेचा अभाव. स्थलाची, कालाची व कार्यकारणसंबंधाची जाणीव, या सर्वांचाच अभाव. गोपाळरावानी हिंदुच्या स्थल-विषयक अज्ञानावर कडाडून हल्ला चढविला आहे. तसेच खऱ्या व खोट्या, प्रत्यक्ष घडलेल्या व काल्पनिक गोष्टीचे आमच्या लेखनात होणारे मिश्रण हेही त्यांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे."[५६] इतिहासाची जाणीव या समाजात नाही असे म्हणणे म्हणजे सामाजिक जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील गती किंवा बदल याचा अर्थ त्याला समजत नाही असे म्हणणे होय. ते समजावून सांगताना निरनिराळ्या क्षेत्राचा वैचारिक परामर्श गोपाळरावांनी घेतला आहे. त्यांच्या समीक्षेचा मूलभूत दृष्टीकोन सांगावयाचा झाल्यास त्याचे पुढील विधान मौलिक स्वरूपाचे मानावे लागेल. "कालदेशमन्वन्तराप्रमाणे लेख फिरतात, राज्यक्रांती बदलतात आणि कायद्यात वगैरे फेरफार करावा

लागतो, हे अगदि साधारण असून आमचीच धर्मशास्त्रे (कायदे) कशी अप्रतिबद्ध चालविण्याचे लोकांच्या मस्तकात वेड शिरले आहे हे कळत नाही. तर असे अडून बसता कामा नये व हा मूर्खपणाचा अभिमान सोडून आपल्या परंपरात ज्या चुका आपल्या वंशाचा व देशाचा नाश करीत आल्या आहेत त्या तर्काने सुधारण्याचे आपले कर्तव्य आहे असे समजले पाहिजे."[५७] समाज सतत बदलला पाहिजे, परिस्थितिनुरूप धर्मशास्त्रात म्हणजेच माणसाचे जीवन समाजात नियंत्रित करणाऱ्या कायद्यात योग्य बदल केले पाहिजेत. हा धडा इतिहासावरूनच माणसाला मिळतो. कारण खरा इतिहास समाज कसा बदलत असतो हे सांगत असतो. म्हणूनच समाजातील नेत्यांनी इतिहासाचा अभ्यास करणे व त्यावरून धडे घेऊन पुढे जाण्याची गरज लोकहितवादी तळमळीने सांगतात. त्यांनी स्वतः इतिहासात काय होते ते पाहिले. त्यातले चांगले काय घ्यावे काय न घ्यावे याचाही विचार केला. सामाजिक बरोबरच राजकीय आर्थिक व धार्मिक सुधारणा झाल्या पाहिजेत असे त्यांनी आवर्जून सांगितले. हिंदुस्थानला धर्माने बंदिवान केले आहे, यासाठी त्यांची धार्मिक कर्मकाण्डाच्या बंधनातून मुक्तता केली पाहिजे, "स्मृती" हे सामाजिक वर्तनाबद्दलचे कायदे असल्यामुळे ते कालमानाप्रमाणे बदलणेच योग्य आहे, असे स्पष्ट केले. ब्राह्मणाचे वर्चस्व कमी करणे म्हणजे नीतीचे वर्चस्व कमी करणे, असा अर्थ त्यांनी कधीच लावला नाही. ब्राह्मणीवृत्तीचे वर्चस्व कमी करावे असे ते सांगत होते. कारण समाजातील ब्राह्मणापेक्षा खालच्या पातळीवर असलेल्या जमातीत सुधारणा म्हणजे ब्राह्मणांचे अनुकरण असे मानू लागल्या होत्या" ब्राह्मणावाचून इतर लोकास आपणास उच्चता आणण्याचा असा एक विलक्षण उपाय सुचत आहे की, आपल्यामधील गतभर्तृक स्त्रियांचा आपणास उक्त असा जो पुनर्विवाह तो करावयाचा नाही. इतकेच नाही तर त्या अबलास सकेशाही न ठेविता ब्राह्मणाप्रमाणे त्यांचे निर्दयपणे वपन करविण्याचीही रीत सुरू केली आहे हे किती हृदयविदारक आहे?[५८] आजही गरीब मागासलेल्या लोकात सुशिक्षित व सुधारलेल्या (?) जमातीच्या वर्तनांचे अंधानुकरण करणे म्हणजेच सुधारणा असे समजले जाते.

कर्मकाण्डावरील गोपाळरावांची टीका आजच्या काळासही लागू पडणारी व डोळ्यात अंजन घालणारी आहे. आजचे सुशिक्षितही कर्मकाण्डाने भारावलेले दिसतात. अर्थ न समजता मंत्र म्हणतात, ब्राह्मणाकडून पूजा करवितात, गोपाळराव स्वतः सुद्धा कर्मकाण्डात वेळ घालवीत पण त्यातही त्यांनी अलिप्तपणा ठेवला होता अशा तऱ्हेची गोष्ट श्री. नरसिंहराव भोलानाथ दिवेटिया यांच्या स्मरणमुकुट ग्रंथांत सापडते. "गोपाळरावांचो मूर्तिपूजेवर अथवा कशावरही श्रद्धा होती की काय हे एक गूढच होते. आपल्या सरकारचे कामाच्या संबंधात गोपाळराव नडियाद येथे महिन्यातून एकदा जात असत. अशाच एका प्रसंगी नडियाद येथील मुक्कामी ते पूजा करीत असता एक तूप विकणारा आला. तूप तोलणे सुरू झाले. रिकाम्या तपेलीचे वजन करण्यासाठी विक्रेत्याने समोरच्या पारड्यात टाकलेली वजने अपूरी पडली म्हणून विक्रेता इकडेतिकडे दगडगोटे शोधू लागला. लागलीच गोपाळरावांनी पूजेच्या देवातील शाळिग्राम उचलून वजनाच्या पारड्यात टाकला गोपाळरावांच्या दृष्टीने मूर्ती आणि दगड सर्व सारखेच सारे विश्वयंत्र हे एक मजेचे खेळणेच असावे अशीच जणू काही त्यांची मनोवृत्ती वाटे"[५९] अशा माणसाने देव पूजा केली काय व न केली काय सारखेच असे वाटते.

वैचारिकदृष्ट्या समाजात दिसलेल्या दोषावर कुणाची भाडभीड न ठेवता त्यांनी कोरडे ओढले. जन्माने ब्राह्मण असले तरी ब्राह्मण भटांचे वाभाडे काढले, सरकारी नोकर असून इंग्रजावर टीका करण्यास कमी केले नाही. ज्या काळात विद्या मिळविणे कठीण होते निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासाला लागणारी साधने उपलब्ध नव्हती, त्याकामीं पदार्थविज्ञानापासून सर्व आधुनिक विषयावर माहिती गोळा केली, जुन्याचा कसून अभ्यास केला व लोकांना शिकविण्यासाठी

चाळीसचेवर पुस्तके लिहून प्रसिद्ध केली. निरनिराळी नियतकालिके काढून ती चालविली. हे सर्व कशाकरिता तर आपले लोकांचे हित साधण्याकरिता, त्यांना शहाणे करण्याकरिता, त्यांनी स्वतःचे स्थिती सुधारण्याच्या प्रयत्नास लागावे म्हणून, येथील माणसाची प्रगति व्हावयाची असली तर त्याने इंग्रजी शिक्षणाची कास धरली पाहिजे अशी गोपाळरावांची खात्री झालेली होती. "युरोपियन जात इकडे आल्यापासून इकडे किती एक नवीन नवीन कल्पना व तर्क लोकांमध्ये उत्पन्न होऊन ते प्रचारात आणण्याविषयी लोक प्रवृत्ती होऊ लागले." ज्ञानाचा प्रसार होण्यास योग्य वातावरणाची लागणारी गरजही लोकहितवादींनी ओळखली होती. हे वातावरण इंग्रजी राज्यकर्त्यांनी निर्माण केले होते असे त्यांना वाटत होते. "ज्या कल्पना व तर्क कित्येक प्रसंगी मनुष्यास स्वातंत्र्य असल्याशिवाय प्रसृत होऊ शकणार नाहीत, ते तर्क व कल्पना प्रस्तुतच्या स्वातंत्र्योभोक्त्या साम्राज्यात निर्बंधपणे प्रसृत करण्यास योग्य स्वातंत्र्य व परवानगी आहे, हे फारच चांगले आहे."[६०]

लोकसुधारणा म्हणजेच देशसुधारणा व देशसुधारणेस द्रव्य व बुद्धि याबरोबरच नीतीचीही गरज असते असे लोकहितवादींचे स्पष्ट मत आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. "देशसुधारणा ही नीति, बुद्धि व द्रव्य या तीन गोष्टी मध्ये अंतर्भूत आहे. या तीन गोष्टींचा ओघ जेथे अखंड वहात आहे तीच देशसुधारणा होय... नीतीची वृद्धि म्हणजे सच्छास्त्र, सद्ग्रंथ सज्जन व सुबोध यांची विपुलता झाली पाहिजे.[६१]

गोपाळरावांचा विचार समग्रलक्षी (Integrated) होता. समाजाचा विचार करीत असता ते त्याचे कप्पे पाडीत नव्हते तर सर्वांगीण उन्नतीचा मार्ग ते शोधीत होते. आपल्याला दिसलेला मार्ग लोकांना दाखवीत होते. यातूनच ठिकठिकाणी वाचनालये काढण्याची त्यांनी खटपट केली. पुस्तके उपलब्ध करून दिली म्हणजे ज्ञान मिळेल व जास्त मिळविण्याची इच्छा होईल हाच त्यांचा दृष्टीकोन होता. एखाद्या प्रेमळ पण अभ्यासाबद्दल कडक असलेल्या गुरूजीप्रमाणे त्यांचे लेखन आहे. त्यांत ज्ञान आहे, विचार आहेत, ते पटवून देण्याची हातोटी आहे पण त्याबरोबरच अवखळ विद्यार्थ्यास हटकून रागवून प्रसंगविशेषी अगदी टाकून बोलूनसुद्धा त्याला विद्याभिमुख करण्याचा आटोकाट प्रयत्न करण्याची त्यांची हातोटी पण विलक्षण आहे. समाजसुधारक हा हाडाचा शिक्षक असावा लागतो असे वाटते व लोकहितवादी हे एक पट्टीचे शिक्षक होते असे म्हणावेसे वाटते. आपल्या शतपत्रांचा इत्यर्थ सांगताना त्यांनी स्पष्ट केलेली भूमिका पण हेच दर्शविते. "लोकहितवादीने कुणाची मजूरी पत्करली नाही. कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाही. कोणाचे सांगण्यावरून व शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केले नाही. लाभावर किंवा द्रव्यावर नजर देऊन कीर्ती व्हावी या हेतुने लिहिले नाही व जितके लिहिले आहे, ते अक्षरशः खरे खरे निवडून विचार करुन काळजीने लिहिले आहे. हे सर्व लोकांस नजर आहे . ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाही. पाहिजे त्यांनी ही पत्रे छापून प्रसार करावी. कितीएक प्राचीन काळचे लोकास कितीएक लोकहितवादींची मते विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील. परंतु हा त्यांचा मिथ्याभास आहे, कारण की, त्यांत हिंदुधर्मास काही विपरीत नाही. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे... माझी सर्व जनास एवढीच विनंती आहे की, तुम्ही सर्वजण विचार करण्यास लागा, वाचावयास लागा, नवीन ग्रंथ व वर्तमानपत्रे वाचा व तुमचे शेजारी काय होत आहे, याचा विचार करा. इंग्रजामध्ये कितीएक चांगले गुण आहेत व ते तुम्हास प्राप्त व्हावे म्हणून ईश्वराने त्याची तुमची संगत घातली आहे हे लक्षात आणा. सारासार पहा. परंपरा आंधळ्याची माळ लागली म्हणून तीच चालवू नका......धर्मसुधारणा करा म्हणजे टाकू नका, परंतु त्याचा अर्थ ध्यावयाचा तसा काम पाहून घ्या, व ईश्वरासंबंधी व जगासंबंधी ज्ञान सर्व लोकात वृद्धिंगत करा, आळस सोडा, तुमच्यामध्ये वास्तविक बुद्धिमान असेल त्यास पुढारी करा, त्याचे अनुमतीने चाला, सर्व लोकांची जूट असू द्या,... सर्व देशाची काळजी प्रत्येक जणांनी करावी. राज्य कसे चालले

आहे व राजा कोण, त्याची वर्तणूक कशी, हे पहात जा, माहितगार व्हा, तुमच्या प्राचीन काळच्या विद्या, ग्रंथ तर्क व कल्पना यांचे शंभरपट व हजारपट आता चांगल्या विद्या व अधीक कल्पना निघालेल्या आहेत. त्या सर्व पाहा, तुमचे संपत्तीवर तुम्ही लक्ष देऊन आळसात राहू नका, भट व पंडित हे केवळ मूर्ख हे पक्के समजा. खरी नीती कोणती ते पाहा,... प्रपंच संसार भलाईने करा, आपले शत्रूस देखील वाईट इच्छू नका......तुम्ही आपले मुलाची काळजी करून त्यास शहाणी करा, व सर्व लोकांची काळजी करा. असा सर्वांनाच उपदेश करुन शेवटी लोकहितवादी म्हणतात "मी जे लिहिले आहे त्याचा विचार करुन पाहा, तुमच्या चांगल्या वाचून त्या लिहिण्याचा हेतु नाही. तुमचे कल्याण व्हावे म्हणून मी झटतो व तुमच्या चुका वगैरे मी उघड करुन दाखविण्यात तुम्हांस रागरोष येईल, हे मी मनात आणले नाही. कारण की, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझे अंतःकरण सर्व तिकडे आहे.[६२] वरीलप्रमाणे लोकहितवादींनी आपले मनोगत अगदी स्पष्ट केले आहे. परंतु लोकहितवादींच्या नंतरचा काळ समाज सुधारणा मागे पडण्याचा, समाज प्रबोधनास फाटे फुटण्याचा व सर्व समाज राजकारणाने भारावून जाण्याचा होता. त्यामुळे हा कळकळीचा उपदेश फारसा कोणाचे कानावर पडला नाही. त्यांची दखल घेतली गेली नाही.

एकोणिसाव्या शतकाचे शेवटी व विसाव्या शतकाचे सुरुवातीपासूनच देशभर राजकारणाचे वारे जोरात वाहू लागले. "आधी राजकीय की आधी सामाजिक" हा वाद महाराष्ट्रात माजला. एकीकडे इंग्रजी शिक्षण वाढत होते पण समाजसुधारणा मागे पडून राजकारणाची सरशी होत होती. आधी स्वराज्य मग सुधारणा-सुधारणेसाठी पण राजकीय सत्तेची गरज आहे हा विचार प्रकर्षाने पुढे आला. पण स्वातंत्र्य पाहिजे म्हणणाऱ्यांनी स्वातंत्र्यात कशी राजवट असावी, त्यासाठी आपण पूर्व तयारी कोणती करावी, स्वतंत्र समाज रचना कशी असावी याचा विचार केला नाही गोपाळरावांनी मात्र या बद्दल फार पूर्वी विचार केलेला त्यांच्या लिखाणात ठिकठिकाणी दिसून येतो. "आमचे लोकांच्या रिती अगदी बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही. व या लोकास स्वतः राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशातून गेले तरी उपयोग होणार नाही. पुन्हा गर्दी होईल व बेबंदी अंदाधुंदी मालेराई, होळेकरी गर्दी व पेंढरी अशा गोष्टी पुनरुपी होतील. आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय रहाणार नाही."[६३] आजची परिस्थिती यापेक्षा वेगळी आहे का?

लोकहितवादींची विचारसरणी अजूनही ताजी वाटते. पुराव्याखेरीज आंधळेपणाने काही स्वीकारू नका, ही त्यांची ताकीद आजच्या समाजालासुद्धा जरूर आहे. त्यांचे स्त्रियांविषयीचे व त्यांच्या शिक्षणाबद्दलचे विचार, लग्नाचे वय वाढविण्याची जरूरी व त्याची कारणे, जातिसंस्थेबद्दलची मते, 'संसार व परमार्थ यांची मिसळ न करण्या'बद्दलचा उपदेश, 'सुखदुःख देणारे कायदे सर्व जातींस व धर्मांस सारखेच असावेत' असे म्हणणे, कर्मकाण्डातून बाहेर पडण्याचा उपदेश, दागिन्यावरील व डौलावरील विचार, प्रजावाढीचे तोटे, राजा सुधारण्यापूर्वी प्रथम प्रजा सुधारली पाहिजे अशासारखे विचार आजही सर्वांसमोर मांडण्याची गरज आहे. लोकहितवादींचा सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखा एकच सल्ला आहे व तो म्हणजे 'बुद्धिरेव बलीयसी' "मनूचे वचन असो याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो ब्रह्मदेवाचे का असेना, 'बुद्धिरेव बलीयसी'– शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धि चालवा विचार करून पहा"[६४] त्यांच्या मते शास्त्राचा अर्थ सांगणारे सर्व ऋषी (विद्वान) मरण पावले तरी प्रत्येकाच्या अंतकरणात असलेली 'तर्क बुद्धि' या जगात मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे. गोपाळरावांच्या सारखा समाजजीवनाचा खोलवर अभ्यास करून त्यावर पद्धतशीर व सोदाहरण टीका करणारा समाजप्रबोधनकार महाराष्ट्रास लाभला. यामुळे आजचे महाराष्ट्राचे समाजजीवन भारतातील इतर प्रांतापेक्षा जरासे का होईना पण वेगळे दिसते असे म्हणणे वावगे होणार नाही. अर्थात महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकात

एकापेक्षा एक वरचढ प्रबोधनकार निर्माण झाले पण या सर्वांचे पायाभूत व अग्रणी गोपाळरावच होत असे वाटते. एकोणिसाव्या शतकात समाजपरिवर्तनाची अंकुरलेली ही चळवळ विसाव्या शतकात कोमेजली. तिला नवा जोम आणणे, पुन्हा पालवी फुटून हा वठलेला समाजवृक्ष कसा फोफावेल व समाजजीवन आमूलाग्र कसे बदलेल याचा विचार आज प्रामुख्याने व्हावयास पाहिजे. पण अजूनही राजकारण्यांची सद्दी संपली नाही असे वाटते.

स्वराज्य आले व जेमतेम चाळीस वर्षांत आम्ही लोकहितवादी यांनी वर्णन केलेल्या स्थितीप्रत येऊन पोचलो. एके काळी धर्माने ग्रासलेले व म्हणून स्वार्थी ब्राह्मणांचे वर्चस्वाखाली आलेले समाजजीवन आज सत्तेच्या राजकारणाने ग्रासले आहे व ब्राह्मणांच्या ऐवजी स्वार्थी राजकीय पुढाऱ्यांच्या आहारी गेले आहे. माणूस सुधारण्यासाठी शिक्षणाची कास धरा असे आवर्जून सांगणाऱ्या लोकहितवादींची आज फार मोठी गरज आहे. सुदैवाने इथला माणूस बदलल्याखेरीज समाज बदलणार नाही. इथल्या स्त्री-पुरुषाने जुन्या बुरसटलेल्या कल्पना सोडून दिल्याखेरीज, धार्मिक कर्मकाण्ड सोडून दिल्याखेरीज व सर्वात महत्वाचे म्हणजे सत्तेचे राजकारण न खेळता स्वातंत्र्याचे, समतेचे व माणूसकीचे राजकारण सामाजिक जीवनात रूढ केल्याखेरीज या देशाला तरणोपाय नाही याची जाणीव अनेकांना होत आहे. हा समाज आमूलाग्र बदलला पाहिजे. इथे नवजीवनाचे वारे वाहू लागले पाहिजेत. माणूसकीची कदर राहून स्वातंत्र्य, समता व बंधुभाव यांचा प्रसार झाल्याखेरीज देशाचे स्वातंत्र्य टिकणार नाही त्यासाठी समाजप्रबोधनाची फार गरज आहे हे ध्यानात घेऊनच प्रा. गोवर्धन पारीख यांनी लोकहितवादी समग्र वाङ्मय पुन्हा प्रकाशात आणण्याचे ठरविले. एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेचा मुलगामी विचार मांडणारे गोपाळराव एक थोर विचारवंत, शिक्षक व समाजसुधारक होऊन गेले – नव्हे महाराष्ट्रात झालेल्या सर्व सुधारकांचे ते अग्रणी होते. त्यांचा समग्रलक्षी विचार व वाङ्मय आजच्या समाजप्रबोधनकारांचे स्फूर्तीस्थान झाल्यास नवल नाही. या वाङ्मयाच्या पुनर्मुद्रिताने येथील समाजप्रबोधनास चालना मिळून वैचारिक दृष्ट्या हा समाज घुसळून निघावा, येथील माणसांचे लक्ष खऱ्या विद्येकडे, ज्ञानाकडे व सत्यावर आधारलेल्या शास्त्रीय दृष्टीकोनाकडे वळून तो खऱ्या खुऱ्या अर्थाने स्वतंत्र व्हावा याच हेतूने प्रा. पारीखानी हे काम हाती घेतलेले होते. त्याच उद्देशाने मी ते काम पुरे करीत आहे.

जानेवारी १९८८ इंदुमती पारीख

# लोकहितवादी – समग्रग्रंथ प्रस्तावना

## तळटिपा

| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| १. पारीख – लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख | १–२ |
| २. ना. वि. जोशी, पुणे वर्णन | ६९, ७०, ७१ |
| ३. फिलिप वुडरफ – The Men who Ruled India Vol. I — Introduction | १३ |
| ४. स्वाध्याय | ८४ |
| ५. प्रिओळकर – लोकहितवादीकृत निबंधसंग्रह (शतपत्रे) | ७८ |
| ६. स्वाध्याय | १२२ |
| ७. स्वाध्याय | ११८ |
| ८. शतपत्रे | ३९४ |
| ९. कित्ता | १९२ |
| १०. कित्ता | २४२ |
| ११. कित्ता | ५७ |
| १२. शतपत्रे | २११ |
| १३. कित्ता | १७२–७३ |
| १४. कित्ता | १९९ |
| १५. कित्ता | १७५ |
| १६. स्वाध्याय | ८६ |
| १७. शतपत्रे | २२७–२८ |
| १८. स्वाध्याय | २६० |
| १९. शतपत्रे | ६१ |
| २०. आगम प्रकाश प्रस्तावना | ११–१२ |
| २१. स्वाध्याय | ३२० |
| २२. कित्ता | ३२० |
| २३. शतपत्रे | १६१–६२ |
| २४. स्वाध्याय | १५७ |
| २५. शतपत्रे | ४७९–८० |
| २६. शतपत्रे | ५२–५३ |
| २७. स्वाध्याय | १० |
| २८. कित्ता | १४–१५ |
| २९. स्वाध्याय | १७ |
| ३०. कित्ता | १७ |
| ३१. कित्ता | ६१ |
| ३२. शतपत्रे | ४५८ |

| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| ३३. शतपत्रे | ४६० |
| ३४. हिंदुस्थानचा इतिहास प्रस्तावना | ८८–८९ |
| ३५. शतपत्रे | ५२५ |
| ३६. शतपत्रे | १९४ |
| ३७. हिंदुस्थानला दारिद्य येण्याची कराणे | ४० |
| ३८. कित्ता | ५५ |
| ३९. कित्ता | १२–१२ |
| ४०. कित्ता | ५९–६० |
| ४१. कित्ता | ७६ |
| ४२. लक्ष्मीज्ञान | प्रकरण १ ते पृ. १ |
| ४३. कित्ता | प्रस्तावना २ |
| ४४. शतपत्रे | ११३ |
| ४५. कित्ता | १४३–४४ |
| ४६. स्वाध्याय | ३०७ |
| ४७. शतपत्रे | ५१७ |
| ४८. शतपत्रे | ५१६–५१७ |
| ४९. स्वाध्याय | ३११ |
| ५०. स्वाध्याय | ३१५ |
| ५१. स्वाध्याय | प्रस्तावना ६ |
| ५२. स्वाध्याय | ३१० |
| ५३. शतपत्रे | ४६८–७०–७१ |
| ५४. स्वाध्याय | ८२ |
| ५५. शतपत्रे | ३४९ |
| ५६. पारीख | १४ |
| ५७. स्वाध्याय | १२८ |
| ५८. स्वाध्याय | १४१ |
| ५९. पारीख | ८१ |
| ६०. स्वाध्याय | २५९ |
| ६१. स्वाध्याय | ३०४ |
| ६२. शतपत्रे | २५०–५१ |
| ६३. शतपत्रे | २२३ |
| ६४. कित्ता | १७४ |

# लोकहितवादी–गोपाळ हरी देशमुख [१८२३-१८९२]

डॉ. अरुण जोशी

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्रजी राज्य महाराष्ट्रात स्थिरस्थावर झाल्यानंतर येथील समाजाचा पाश्चात्य संस्कृतिशी परिचय झाला. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाल्यावर हा परिचय अधिक निकटचा झाला. काही दशकांपूर्वीपर्यंत स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या मराठी समाजाला म्हणता म्हणता गुलामगिरी पत्करावी लागल्यामुळे भांबावलेला व काहीसा अंतर्मुख झालेला हा समाज स्वसंस्कृतिकडे चिकित्सक नजरेने पाहू लागला. प्राप्त झालेल्या गुलामगिरीचा संस्कृतितील वैगुण्यांशी संबंध जोडला जाऊ लागला. अव्वल इंग्रजीतील बऱ्याच नवशिक्षितांना पाश्चात्य संस्कृती सर्वस्वी अनुकरणीय व हिंदु संस्कृती सर्वस्वी त्याज्य वाटू लागली. याउलट येथील संस्कृतीचे गोडवे गाणारा वर्गही होताच. या उलटसुलट विचारमंथनातून महाराष्ट्रात प्रबोधनाची पहाट उगवली. प्रबोधनाच्या या सुरवातीच्या काळात मराठी समाजाला ज्यांनी मार्गदर्शन केले अशांमध्ये गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी हे अग्रभागी होते.

## बालपण व शिक्षण

गोपाळ हरींचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ या दिवशी पुण्यातील एका सरदार घराण्यात झाला. देशमुखांचे हे घराणे मूळचे कोंकणातले चित्तपावन ब्राह्मण; सिधये हे त्यांचे आडनाव; परंतु पेशव्यांकडून मिळालेल्या देशमुखी वतनावरून ते देशमुख म्हणून ओळखले जाऊ लागले. गोपाळरावांचे वडील हरीभाऊ हे पेशवाईतील शेवटचे सेनापती बापू गोखले यांच्याकडे[1] फडणीस होते. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आल्यावर इंग्रज सरकारने एक फतवा (११ फेब्रु. १८१८) काढून असे जाहीर केले की, "बाजीरावसाहेब यांजकडे जे चाकरीस असतील त्यानी चाकरी सोडून

---

१. लोकहितवादीनी आपल्या आत्मवृत्तांत प्रथम असे म्हटले आहे की हरीभाऊ धोंडोपंत गोखल्यांकडे फडणीस होते व पुढे, हरिभाऊना बापू गोखल्यांकडून फडणीशी वतन मिळत होते असे विधान केले आहे. (यापुढे या साधनाचा संक्षिप्त उल्लेख *आत्मवृत्त* असा केला आहे. इतर आधार ग्रंथांबाबत अनुसरलेली पद्धती अशी : लेखक-ग्रंथनाम-प्रकाशन स्थळ-प्रकाशन काळ असा संपूर्ण तपशील संबंधित ग्रंथाच्या प्रथमोल्लेखात दिला आहे. पुढील तळटीपात फक्त लेखक व ग्रंथनाम एवढाच उल्लेख केला आहे.) हे धोंडोपंत गोखले धोंड्या वाघ या

आजपासून दोन महिन्यात आपले घरी यावे जे कोणी न येतील त्याचे वतन जप्त होऊन खराबी जाहाल्याशिवाय राहणार नाही,"[२] या सुमारास हरीभाऊ ब्रह्मावर्तास जाण्याच्या तयारीत असलेल्या बाजीरावासमवेत असल्यामुळे ठरलेल्या मुदतीत ते पुण्यास परतू शकले नाहीत. त्यामुळे त्यांचे वतन रद्दबातल करण्यात आले. याच्या अगोदर काही वर्षे पुण्याची जी होळकरी लूट[३] झाली तींत देशमुख कुटुंबाच्या बऱ्याच मालमत्तेचा नाश झाला होता.[४] अशाप्रकारे गोपाळरावांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती फारशी चांगली नव्हती. सुदैवाने, रद्द झालेले हरीभाऊंचे वतन पुढीलवर्षी पुनरपि सुरू झाले.[५]

तत्कालीन प्रथेनुसार गोपाळरावांचा विवाह वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी मोठ्या थाटामाटात पार पडला.[६] त्यांची पत्नी गोपिकाबाई ही सरदार मोरो लक्ष्मण गोळे यांची कन्या. याच सुमारास त्यांचे प्राथमिक शिक्षण सुरू होऊन वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत ते घरच्या घरीच पूर्ण झाले असावे.[७] इ. स. १८३६ मध्ये वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर गोपाळरावांनी नोकरीस[८] उपयुक्त ठरणारे मराठी हिशोब व महसूल लिहिण्याचे काम शिकण्याचे ठरवून विष्णूपंत पाटणकर यांच्या कोर्टात व अमृतराव अप्पाजी रानडे[९] यांच्या कचेरीत जाण्यास सुरुवात केली. इंग्रजी भाषेचा

---

बंडखोराशी लढतांना कामी आले. पहा : गो. स. सरदेसाई *मराठी रियासत* उत्तर विभाग-३ (१७९५–१८४८) मुंबई, १९३२, पृ. १५८–१६४. त्यानंतर बहुधा हरीभाऊंची बदली बापू गोखल्याकडे झालेली दिसते. बापू गोखले हा धोंडोपंत गोखल्यांचा पुतण्या. २. "कंपणी सरकारचा जाहिरनामा", दि. ११ फेब्रु. १८१८, वि. ल. भावे (संपा.) *मराठी दफ्तर-रुमाल* दुसरा, ठाणे, १९२२, पृ. १४१–१४४. ३. अमृतरावावर १ कोटी रुपये खंडणी देण्याची अट यशवंतराव होळकराने लादली व या पैशाविषयी तगादा लावला (१८०३) तेव्हा पैसे वसूल करण्यासाठी पुणेकरांवर अनेक अत्याचार झाले. [ना. चिं. जोशीकृत *पुणे वर्णन* २ री आवृत्ती (संपा. गं. दे. खानोलकर) मुंबई, १९६६, पृ. ६६] ४. *आत्मवृत्त*. ५. रद्द झालेले हे वार्षिक दहा हजाराचे वतन परत सुरू व्हावे यासाठी खुद्द दुसऱ्या बाजीरावानेही खटपट केली, तिला यश येऊन इ. स. १८२४ पासून वतन पुनश्च सुरू झाले. एवढेच नव्हे तर मागील वर्षांची बाकीही मिळाली. हरिपंतांना स्वारीखर्चासाठी १२००० रुपये अलाहिदा मिळत असत. R. H. Jalbhoy, *The Portrait Gallery of Western India*, Bombay, 1886. पृष्ठांक नाही. ६. त्या काळात त्याच्या विवाह प्रित्यर्थ ८००० रुपये खर्च झाला. *आत्मवृत्त*. ७. गोपाळरावांचे एक मराठी चरित्रकार म्हणतात की त्यांचे प्राथमिक शिक्षण मराठी शाळेत झाले. –कृ. ना. आठल्ये, *लोकहितवादी···यांचे चरित्र*, पुणे, १९२६, पृ. २५; याउलट त्यांचे एक समकालीन गुजराथी चरित्रकार लिहितात : "लखवां वांचवानुं अने हिसाब *विगेरेनुं* सामान्यज्ञान गोपाळरावे खानगी शिक्षकना हाथतळे घर आगळीज मेळव्युं हतुं. कंई निशाळे बेठेला नहीं." "गोपाळराव हरिनुं जन्मवृत्तांत" *बुद्धिप्रकाश*, आक्टोबर-नोव्हेंबर १८९३ [नवलराम त्रिवेदी व अनंतरायरावळ संपादित *बुद्धिप्रकाश* लेखसंग्रह इ. स. १८५४–१९०८, भाग १, अहमदाबाद, १९४१ या खंडात समाविष्ट. पृ. ३०५–३१६.] ८. हरिपंतांच्या मृत्यूनंतर त्यांना पूर्वी मिळणारे वतन फक्त तहहयात आहे या सबबीखाली पुन्हा एकदा बंद करण्यात आले. त्यामुळे परत खटपट करून त्यांच्या विधवेसाठी व तीन मुलांसाठी (गोपाळराव धरून) काहींतरी तरतूद करणे भाग पडले. सरकारने गोपाळ रावांच्या विधवा आईला सालीना ६०० रुपये व तीन मुलांना प्रत्येकी २०० रुपये देण्याचे मान्य केले. परंतु यापुढे सरकारी मदतीवर विसंबण्यात अर्थ नाही आपण स्वतःच नोकरी करून पैसे मिळविले पाहिजेत. अशी गोपाळरावांना जाणीव झाली असावी. ९. न्या. रानडे यांचे आजोबा.

त्यानी थोडाफार अभ्यास केला होताच. इंग्रजी भाषा चांगली अवगत केल्याशिवाय आता तरणोपाय नाही हे ओळखून गोपाळराव इ. स. १८४१ त पुण्याच्या सरकारी इंग्रजी शाळेत दाखल झाले. तेथे तीन वर्षेपर्यंत अभ्यास करून ते इ. स. १८४४ त शाळेतून बाहेर पडले. या काळात त्यांनी इंग्रजीवर इतके चांगले प्रभुत्व मिळविले की त्यांबद्दलचा खास उल्लेख बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या वार्षिक अहवालात करण्यात आला होता.[१०]

## सरकारी नोकरी

इंग्रजीच्या ज्ञानासंबंधीच्या उपरोक्त उल्लेखामुळे गोपाळरावांना सरकारी नोकरी मिळणे सुलभ झाले. इ. स. १८४४ मध्ये पुण्यातील एजंट फॉर दी सरदारस् इन दि डेक्कन यांच्या कचेरीत त्यांना ७७ रुपये मासिक पगाराची कारकुनाची जागा मिळाली.[११] या ठिकाणी आठ वर्षे काम करून ते शिरस्तेदाराच्या हुद्यापर्यंत चढले. मध्यंतरी इ. स. १८४६ त ते मुनसफीची परीक्षा उत्तीर्ण झाले होतेच. त्यामुळे १ ऑक्टोबर १८५२ पासून त्यांची वाई येथे फर्स्टक्लास मुनसफ म्हणून नेमणूक झाली. पुढे बढत्या मिळत मिळत ते उत्तरविभागाचे सब असिस्टंट इनाम कमिशनर झाले (१० फेब्रु. १८५५) आणि ४ एप्रिल १८५७ पासून साताऱ्याला असिस्टंट इनाम कमिशनर म्हणून काम पाहू लागले. इ. स. १८६१ मध्ये इनामकमिशन बंद झाल्यावर हिंदू व मुसलमानांच्या कायद्याचे digest बनविण्यासाठी सरकारने त्यांची खास नेमणूक केली. यानंतरही अनेक बढत्या मिळून स्मॉल कॉजेस कोर्टाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक झाली. या पदावर १ मे १८६६ पासून ते अहमदाबादेस काम करू लागले व पुढील जवळ जवळ ११ वर्षे ते तेथेच होते. या काळात त्यांनी गुजरातमध्ये बहुविध सामाजिक कार्य केले. शेवटी सेशन्स जज्ज म्हणून इ. स. १८७८ मध्ये ते निवृत्त झाले.

सरकारी कामाचा व्याप संभाळून व वारंवार बदल्या[१२] होत असूनही गोपाळरावांनी ऐन तारुण्यांत समाजकार्याचे व्रत जे एकदा अंगिकारले ते आयुष्याच्या शेवटापर्यंत अव्याहतपणे चालविले. ग्रंथ लेखक, ग्रंथ प्रकाशक, रुग्णाईतांची सेवा करणारे, विधवाविवाह चळवळीला सक्रीय उत्तेजन देणारे, कौन्सिलचे सभासद, प्रांतिक सभेचे अध्यक्ष, शाळा व वाचनालय यांचे संस्थापक, विविध सभांचे व संस्थांचे अध्यक्ष अशा नानाविध भूमिका वेळोवेळी पार पाडणारे गोपाळराव म्हणजे जणुकाही तत्कालीन महाराष्ट्राचा एक चालता बोलता इतिहासच.

## 'लोकहितवादी' लेखक

विद्यार्थिदशेपासूनच गोपाळरावांचा वाचनाचा झपाटा मोठा होता. वाचलेल्या ग्रंथातून टिपणे काढून छोट्या छोट्या कागदाच्या तुकड्यावर त्यांची नोंद करून ठेवण्याची त्यांना सवय होती.[१३] याच्या जोडीला अत्यंत डोळसपणे ते सभोवतालची परिस्थिती न्याहाळीत होते; हिंदू समाजात आढळणाऱ्या दोषांची मनोमन नोंद करीत होते. समाजाचे दोष जाहीरपणे सांगणे आवश्यक आहे असे वाटल्यामुळे त्यानी वर्तमानपत्राचा आश्रय घेतला. मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या *प्रभाकर*[१४] या साप्ताहिकात त्यांचे पहिले पत्र १९ मार्च १८४८ रोजी प्रसिद्ध झाले. 'लोकहितवादी'

---

१०. कृ. ना. आठल्ये, *लोकहितवादी ... यांचे चरित्र*, पृ. ३०. ११. सरकारी नोकरीसंबंधीची माहिती *The History of Services of Gazetted Officers* (Bombay) 1879. वरून घेतली आहे. पृ. ८९. १२. सरकारी नोकरीच्या निमित्ताने ते वाई, सातारा, अहमदनगर, सुरत, मुंबई, अहमदाबाद, नाशिक व ठाणे इतक्या ठिकाणी हिंडले. १३. N. R. Phatak & others, *Rationalists of Maharashtra,* Calcutta, 1962, p. 6. १४. *प्रभाकर* हे मराठी साप्ताहिक भाऊ महाजन उर्फ गोविंद विठ्ठल कुंटे यांच्या संपादकत्वाखाली मुंबईस दर रविवारी प्रसिद्ध होत असे. यात देशस्थिती विषयक विचार निर्भीडपणे मांडले जात. इंग्रजी राजवटीवरही

असे टोपण नाव घेऊन मे १८५०[१५] पर्यंत त्यांनी अशी एकूण १०८ पत्रे प्रसिद्ध केली. त्यांची प्रसिद्ध *शतपत्रे* ती हीच. या पत्रातून हिंदू स्त्रियांची शोचनीय अवस्था, बालविवाह, विधवाविवाहबंदी, खऱ्या ज्ञानाबद्दल दिसणारी उदासीनता, 'ब्राह्मण्य' हरवून बसलेल्या ब्राह्मणांचे समाजातील वर्चस्व, अंधश्रद्धा व वचन प्रामाण्य अशा अनेक दोषांवर त्यांनी प्रखर शब्दात कोरडे ओढले. *शतपत्रा*तील या टीकेचे समकालीनांनी संमिश्र स्वागत केलेले आढळते. *शतपत्रां*मुळे स्वतःचा फायदा झाला असे बाबा पदमनजी यांनी म्हटले आहे.[१६] लोकहितवादींचे विचार आमच्या चर्चेचा विषय असे, असे[१७] केशव शिवराम भवाळकरांनी नमूद केले आहे. *शतपत्रां*-संबंधी लिहितांना विनायक कोंडदेव ओक लिहितात, "त्या सुमारास कैलासवासी गोपाळराव हरि देशमुख ह्यांची 'लोकहितवादी' सहीची पत्रे वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊ लागली होती, आणि त्यावरून इकडच्या लोकांच्या आचाराविचाराविषयी आणि ज्ञानप्रसाराविषयी लोकांची मने प्रचलित होऊन, त्याविषयी आपली खरी खरी स्थिती सगळ्या प्रकारच्या लोकास – आणि विशेषे करून त्यांच्या पुढाऱ्यास – कळू लागली होती."[१८]

शतपत्रातील विचारांना आद्य विरोध शतपत्रे चालू असतानाच पुण्यातील *ज्ञानप्रकाश* वर्तमानपत्रातून 'यथार्थवादी' या टोपणनावाने कोणी तरी केल्याचे आढळले.[१९] त्याच सुमारास पुण्यातील कल्याणोन्नायक मंडळीच्या सभासदांबरोबरही लोकहितवादींचा वैचारिक संघर्ष झाला.[२०] परंतु लोकहितवादींवर प्रखर हल्ला चढविला गेला तो पुढे पंचवीस वर्षांनी. आपल्या निबंधमालेत शास्त्रीबोवांनी (विष्णुशास्त्री चिपळोणकर) जवळजवळ १५० पाने खर्च करून लोकहितवादींना झोडपून काढले. [२१] अर्थात या त्यांच्या हल्ल्यात वैचारिक टीकेपेक्षा वैयक्तिक टीकाच होती तो भाग वेगळा. यानंतरही अलिकडच्या काळात कांही टीकाकारांनी लोकहितवादींवर आग पाखडली.[२२] पण हा सर्वच, शास्त्रीबोवांची प्रायः री ओढण्याचाच प्रकार होता.

लोकहितवादीनी जे लेखन केले ते लोकरंजनासाठी नसून लोकशिक्षणासाठी होते. साहित्याचा हेतू कलेसाठी कला हा नसून जीवनासाठी कला आहे असे त्यांचे ठाम मत होते. एका समकालीन नवोदित लेखकाच्या कादंबरीवर अभिप्राय देताना त्यांनी लिहिले, "कुमार्गापासून (मन) परावृत्त करून सुनीतीस लावणे हा जो ग्रंथलेखनाचा मूळ उद्देश, तो ह्या पुस्तकांत बराच साधला

---

कडक टीका येत असे. १५. अरुण रा. जोशी (संपा.) *लोकहितवादी : नवे संशोधन* (शतपत्रे *आणि इतर लेख*) मुंबई, १९७७, पृ. १२७. १६. बाबा पद्मनजी, *अरुणोदय*, ३ री आ. मुंबई, १९६३, पृ. ८७–८८. १७. *रा. सा. केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त* (संपा. भ. श्री. पंडित), नागपूर, १९६१, पृ. ८९. १८. विनायक कोंडदेव ओक, 'नारायण मेघाजी लोखंडे' चरित्र. *बालबोध* मासिक, डिसेंबर १९००, पृ. २. १९. *शतपत्रे* क्र. ८१ – हे पत्र या यथार्थवादींच्या टीकेस उद्देशून लिहिलेले आहे. २०. *शतपत्रे* क्र. १०१ ते १०४–कल्याणोन्नायक मंडळीचा सुधारणाविषयक दृष्टीकोन कसा चुकीचा आहे ते लोकहितवादींनी या पत्रातून सांगितले आहे. कल्याणोन्नायक मंडळी ही पुण्यातील काही मध्यममार्गी लोकांनी ८ मे १८५० रोजी स्थापन केलेली संस्था होती – अतिरेकी सुधारणावादी व अतिरेकी पुराणमतवादी यांच्या मधला मार्ग चोखाळून समाजाला पचतील तसतशा सुधारणा आणाव्या असा तिचा उद्देश होता –*ज्ञानोदय*, १५ जून १८५०; पृ. २२० – २२२; परंतु पुढे ही संस्था पुराणमतवाद्यांच्या हातात सापडली असावी. थोड्याच काळात ही संस्था बंद झालेली दिसते. २१. विष्णुशास्त्री चिपळूणकर, *निबंधमाला*, ३ री आ. पुणे १९२६, अंक ६४ ते ७१ व ७३ ते ७५, पृ. १०४६ – १२०५. २२. ग. त्र्यं. माडखोलकर, *महाराष्ट्राचे विचारधन*, नागपूर, १९७३, पृ. १९–२०; ना. सं. इमानदार, *मंत्रावेगळा*, २ री आवृत्ती, प्रस्तावना पृ. २४–२७.

आहे · · · '[२३] लोकांना सुधारावयाचे तर त्यांचे दोष दाखवून देणे क्रमप्राप्तच होते; त्यासाठी कोणाच्या रागलोभाची पर्वा करून चालण्यासारखे नव्हते. आपल्याला जे पटते ते सडेतोडपणे लोकांसमोर मांडणे आवश्यक होते. लेखनाच्या याच एका उदात्त हेतूने प्रेरित होऊन त्यांनी लहानमोठी अशी ३९ पुस्तके[२४] लिहून प्रसिद्ध केली – अर्थात ही सर्वच पुस्तके सामाजिक विषयावरील आहेत असे नव्हे. इतिहास अभ्यासाची आवड निर्माण व्हावी व त्यातून गतकालातील चुकांची जाणीव व्हावी या हेतूने लिहिलेले इतिहासविषयक ग्रंथ, हिंदूधर्माच्या निर्मळ स्वरूपाचा बोध व्हावा व त्यात शिरलेल्या विकृतींचा मागोवा घेता यावा म्हणून लिहिलेले धर्मविषयक ग्रंथ, फिजिक्स् सारख्या आधुनिक विज्ञान विषयाची ओळख व्हावी म्हणून लिहिलेला *यंत्रज्ञान* सारखा ग्रंथ, हिंदुस्थानच्या दारिद्र्याची चिकित्सा करणारा किंवा *हिंदुस्थानास दरिद्र येण्याची कारणे* · · · हा अर्थशास्त्रविषयक ग्रंथ, एतद्देशीय राज्यांची स्थिती विशद करून सांगणारा *स्वदेशी राज्ये व संस्थाने* अशा विविध ग्रंथाचा त्यात समावेश आहे. नुसते ग्रंथ लिहून व प्रसिद्ध करूनच लोकहितवादी थांबले नाहीत. मराठी वाचकाला ग्रंथ वाचनाची आवड लागावी म्हणून त्यांनी स्वतःचे शेकडो ग्रंथ जाहिरात देऊन लोकांना मोफत वाटले.[२५]

लोकहितवादींचे लेखन – कर्तृत्व येथेच संपत नाही. त्यांनी स्वतः *लोकहितवादी* नावाचे मासिक व त्रैमासिक काही वर्षे चालविले. शिवाय वर्तमानपत्रातून व मासिकातून शेकड्यानी लेख लिहिले.

लोकहितवादींचा काळ हा मराठी गद्याच्या बाल्यावस्थेचा काळ होता. केवळ स्वतः ग्रंथनिर्मिती करून भागण्यासारखे नाही तर इतरानाही ग्रंथनिर्मिती व प्रकाशनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे असे लोकहितवादींना तीव्रतेने वाटले असावे. म्हणूनच त्यांनी दोन योजना सुचविण्यात व त्यांची कार्यवाही करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला. यापैकी पहिली योजना 'दक्षिणा फंड' सुरू करण्याची व दुसरी 'मराठी ग्रंथोत्तेज्जक मंडळी' स्थापण्याची.

पेशवाईत दरवर्षी श्रावण महिन्यात ब्राह्मणांना दक्षिणा [२६] वाटण्याची प्रथा चालू होती. दक्षिणेची ही रक्कम सालीना काही लाख रुपये इतकी असे. इंग्रजी राजवट आल्यानंतरही ही पद्धत तशीच चालू ठेवण्यात आली होती. फरक इतकाच की दक्षिणेची रक्कम ५००००रुपयांपर्यंत खाली आणण्यात आली. इ. स. १८४० नंतरच्या काही वर्षात वाटली न गेलेली दक्षिणेची रक्कम साठत जाऊन ती ३००० रुपये झाली. ही रक्कम सरकार कदाचित दुसऱ्या काही कामासाठी वापरील अशी भीती निर्माण झाल्यामुळे लोकहितवादींनी दक्षिणाफंडांतील या रकमेच्या संकल्पित (गैर) विनियोगाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी मराठी व इंग्रजी वृत्तपत्रातून काही लेख लिहिले.[२७]

---

२३. ब. मो. पंडित, *सुशील यमुना* · · · ५ वी आवृत्ती, मुंबई, १९३०; प्रस्तावना पृ. ३, वाङ्मयविषयक विचार त्यांनी आपल्या इतर काही निबंधातही मांडले आहेत. *लोकहितवादीकृत निबंधसंग्रह* (संपा.–प्रियोळकर) मुंबई, १९६७ (पृ. ३८२–३८७). २४. संपूर्ण यादी या खंडाच्या शेवटी दिली आहे. २५. आत्मवृत्त : 'लोकहितवादी', *विविध ज्ञानविस्तार*, सप्टेंबर १८७९, पृ. १९५. २६. छत्रपती शाहूने तळेगावच्या खंडेराव दाभाड्यांकरवी श्रावण महिन्यात ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची पद्धत प्रथम सुरू केली. पहिल्या बाजीरावाने दाभाड्यांचा पराभव केल्यानंतर ती जबाबदारी स्वतःकडे घेतली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत दक्षिणेची रक्कम पाच लाखापर्यंत वाढत गेली. पेशव्यांचा पाडाव केल्यावर एलफीन्स्टनने ही रक्कम कमी केली. तसेच त्यांपैकी काही रक्कम गणित, कायदा, विज्ञान अशा आधुनिक विषयात प्रावीण्य मिळविणाऱ्या ब्राह्मणांना बक्षिसे वाटण्यासाठी उपयोगात आणण्याचे ठरविले. मुंबई विद्यापीठातर्फे दिली जाणारी 'दक्षिणा फेलो' शिष्यवृत्ती म्हणजे याच दक्षिणा फंडाचे नवीन रूपांतर होय. २७. ना. वि. जोशी, *पुणे शहराचे वर्णन*, पृ. ८४.

एवढेच नव्हे तर दक्षिणावाटपाच्या एकूण पद्धतीत आमूलाग्र बदल सुचविले. दक्षिणा ही केवळ वेदाध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांनाच न देता तिच्यातील अर्धा भाग उपयुक्त पुस्तके (भाषांतरित अथवा स्वतंत्र) लिहिणाऱ्या लेखकांना बक्षिसरूपाने द्यावा अशी त्यांची सूचना होती. पुण्यातील काही नवशिक्षितांनी लोकहितवादींच्या नेतृत्वाखाली सरकारला याबाबतीत एक निवेदन सादर केले.[२८] यामुळे सनातनी पुणेकर ब्राह्मण चवताळून उठले व लोकहितवादी आणि त्यांचे साथीदार यांच्यावर त्यांनी ग्रामण्य करण्याचा बेत केला.[२९] तो बेत फसला व सरकारनेही शेवटी लेखकांना बक्षिसे देण्याची योजना स्वीकारली. इ. स. १८५१ मध्ये दक्षिणा-प्राईझ कमिटी स्थापन झाल्यावर लोकहितवादींनी स्वतः त्या कमिटीचे सेक्रेटरी म्हणून काही काळ काम केले.

दक्षिणाफंड योजनेप्रमाणेच 'मराठी ग्रंथोत्तेज्जक मंडळी' स्थापण्यामागेही ग्रंथकारांना प्रोत्साहन देणे हाच प्रमुख हेतू होता. लोकहितवादी व न्या. रानडे यांच्या सहीने ७ फेब्रु. १८७८ च्या *ज्ञानप्रकाश*मध्ये प्रसिद्ध झालेल्या या योजनेच्या प्रकटनांतील पुढील उतारा याबाबतीत पुरेसा प्रकाश टाकतो.

> या देशांत उपयोगी ग्रंथ फार थोडे आहेत व त्यांचे वाचणारेहि फार थोडे आहेत. याजमुळे विद्येचा लाभ फार थोडे मनुष्यास होतो. विलायतेत ट्राक्ट व बुक सोसायटी या नांवाच्या मंडळ्या बहुत असून त्या ग्रंथकारांस उत्तेजन देऊन ग्रंथ प्रसिद्ध करून स्वल्पदराने विकतात. यामुळे फार परोपकार होतो व लोकांचे ज्ञान वाढते. यास्तव या देशांत ग्रंथकारांस उत्तेजन यावे व स्वस्त दराने ग्रंथ प्रसिद्ध व्हावे हा हेतु आहे.[३०]

या योजनेखाली प्रसिद्ध करावयाच्या पुस्तकांत इतिहास, विज्ञान, समाजसुधारणा, मोठ्या माणसांची चरित्रे, धर्म, नीतीपर गोष्टी व संस्कृत भाषेतील उपयुक्त विषयांचा समावेश व्हावयाचा होता. इ. स. १८७८ ते १८८१ या काळांत ग्रंथोत्तेजक मंडळीने विविध विषयावरील १४ पुस्तके प्रसिद्ध केली.[३१] प्रसिद्ध करण्यासाठी पुस्तके निवडावयाच्या समितीत लोकहितवादीखेरीज कृष्णशास्त्री चिपळूणकर, श्रीकृष्णशास्त्री तळेकर, रावजीशास्त्री गोडबोले व न्या. रानडे यांचा समावेश होता.[३२] ग्रंथोत्तेजक मंडळीच्या एकूण कामकाजाविषयी साधकबाधक चर्चा करण्याच्या हेतूने मराठी लेखकांचे एक संमेलनही पुण्यास भरविण्याचे ठरविण्यांत आले.[३३] दत्तो वामन पोतदार यांच्या मते हेच पहिले मराठी साहित्य संमेलन होय.[३४]

### शैक्षणिक कार्य

लोकशिक्षणाच्या हेतूने लोकहितवादींनी वृत्तपत्रलेखन व ग्रंथलेखन केले हे खरे. परंतु त्यांचा जुन्या पिढीवर फारसा विश्वास नव्हता. नव्या सुधारणा व बदल पचविण्याची शक्ती फक्त तरुण वर्गातच आहे असा त्यांचा रास्त विश्वास होता. 'नीतिप्रशंसा' या आपल्या पत्रात ते लिहितात.

---

२८. *ज्ञानोदय*, १ नोव्हेंबर १८४९, पृ. ४०१–४०३. २९. *रावसाहेब केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त*, पृ. १०४-१०९. ३०. *लोकहितवादीकृत निबंधसंग्रह*, प्रस्तावना पृ. ३२ वर उद्धृत. असेच प्रकटन गुजराथींतूनही प्रसिद्ध झाले होते. *बुद्धिप्रकाश*, मार्च १८७८, पृ. ६८. ३१. ही चौदा पुस्तके अशी : (१) *कृषिकर्म*, (२) *तारानाटक*, (३) *हिंदुस्थानचा इतिहास*, (४) *शिवाजी चरित्र*, (५) *सार्थ अश्वलायन सूत्र*, (६) *स्वपराक्रम*, (७) *स्वाध्याय*, (८) *कृषि कर्मांतर गत रसायन शास्त्र व भूगर्भ शास्त्र*, (९) *ऐतिहासिक गोष्टी भाग ३*, (१०) *आरोग्य रक्षक विद्या*, (११) *रसायन शास्त्र*, (१२) *कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील राजांचा इतिहास*, (१३) *तुर्क व रुस देशांतील लढाईचा इतिहास*, (१४) *बापू गोखल्यांचे चरित्र*. ३२. *नेटीव्ह ओपिनियन*, २४–२–१८७८. ३३. तत्रैव. ३४. द. वा. पोतदार, *महाराष्ट्र साहित्य परिषद-इतिहास*, वृत्तविभाग व साधनविभाग, पुणे, १९४३, पृ. १०.

'बाळपणापासून जी सवय झाली ती सवय मोठेपणी कितीही सांगितले तरी जात नाही. परंतु मी आशा करितो कीं, पुढें जे होतकरू मुलगे आहेत ते ही पत्रे पाहून अज्ञानांतून सुटतील ······ मला वाटते कीं, जुने म्हातारे ब्राह्मण आहेत ते असोत, परंतु नवीन उमेदवार लोक यांनी आपले अंतःकर्ण ज्ञानेकरून व विचारेकरून पवित्र करावे. म्हणजे पुष्कळ फायदा होईल.'[३५]

तरुणांबद्दल त्यांना वाटत असलेल्या आस्थेचे एक उदाहरण नमूद करण्यासारखे आहे. विष्णुपंत नावाच्या नाटकवाल्याने (= विष्णुदास भावे) मुंबईस एक मराठी नाटक सादर करण्याच्या प्रसंगी विद्यार्थ्यांची मदत घेतल्याची बातमी मुंबईच्या *ज्ञानबोधक* पत्रांतून कळतांच लोकहितवादीनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नुकसान होईल अशा अर्थाची कडक टीका केली.[३६]

तरुणांप्रमाणेच स्त्रियांच्या उन्नतीचाही त्यानी ध्यास घेतला होता. हिंदु स्त्री पारंपारिक बंधनांतून बाहेर पडल्याशिवाय हिंदु समाज सुधारणेची वाटचाल यशस्वीरीत्या करू शकणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. आपल्या ८० क्रमांकाच्या पत्रात त्यानी म्हटले आहे, 'बायकांचे हातांत प्रथम मुलास रीतभात लावणे आहे, तेथेच जर बिघा पडला तर पुढे सुधारत नाहीं. लहानपणी जी बुद्धी ती शेवटपर्यंत राहाते. याजकरितां बायका शहाण्या पाहिजेत म्हणजे मुलेही नीट होतात.' यामुळेंच तरुणांच्या विकासासाठी व स्त्रियांच्या उन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या अनेक उपक्रमांत ते सक्रीय सहभागी झाले.

इ. स. १८५२ पर्यंत लोकहितवादी पुण्यांत होते. आयुष्याच्या पहिल्या टप्प्याच्या या कालावधीत पुण्यात मुलींची जी प्रारंभीची शाळा सुरू झाली तिला आपण साह्य केले असे त्यांनी स्वतः नमूद केले आहे.[३७] ही शाळा कोणती ते निश्चित सांगता येत नाही. परंतु याच सुमारास जोतीराव फुल्यांनी पुण्यांत मुलींच्या पहिल्या दोन शाळा काढल्या होत्या.[३८] लोकहितवादी फुल्यांचे चाहते होते.[३९] फुल्यांनाही लोकहितवादींच्या सुधारणा कार्याचे कौतुक वाटत होते.[४०] अशा स्थितींत या दोघांनी संयुक्तपणे मुलींच्या शाळेची खटपट केली असणे अगदी शक्य आहे.

वाईस मुन्सफ म्हणून नेमणूक झाल्यानंतर पुढील कांही वर्षे लोकहितवादींची वारंवार बदली होत गेली. त्यामुळे या काळांत काही भरीव कार्य करणे त्यांना शक्य झाले नाही. परंतु अहमदाबादला १८६६ साली बदली झाल्यानंतर त्यांना दीर्घकाळ स्वास्थ लाभले व या स्वस्थतेचा त्यांनी पुरेपुरे उपयोग करून घेतल्याचे दिसून येते.

आपल्या सहकाऱ्यांसमवेत लोकहितवादींनी अहमदाबादेत फीमेल नार्मल स्कूल (स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज) स्थापन करण्याचा प्रश्न हाती घेतला.[४१] त्याच सुमारास (१८६६) मिस् मेरी

---

३५. *शतपत्रे* क्र. ६५. ३६. *ज्ञानप्रकाश*, ५ जून १८६२. लोकहितवादींचे पत्र 'झाकलेल्या माणकाचा प्रकाश' या मथळ्याखाली प्रसिद्ध झाले आहे. ३७. *आत्मवृत्त*. ३८. धनंजय कीर, *महात्मा जोतीराव फुले*, २ री आवृत्ती, मुंबई, १९७३, पृ. ३५ व ४५; अगोदर मुलींची एक शाळा इ. स. १८३० च्या सुमारास सुरू झालेली होती; पण ही शाळा गुप्तपणे चाले. ती लवकरच बंद पडली असावी. –ना. वि. जोशी, *पुणे शहराचे वर्णन*, तळटीप ६४, पृ. ८५–८६. ३९. न. चिं. केळकर, *लो. टिळक यांचे चरित्र*, पूर्वार्ध, पुणे, १९२३, पृ. ७०. ४०. '*शूद्रातिशूद्रांस*' या आपल्या कवितेंत फुले म्हणतात, आर्याजींची नीति अति अमंगळ ॥ कथीली ॥ गोपाळ ॥ देशमुखें धनंजय कीर व स. गं. मालशे (संपा.) *महात्मा फुले समग्र वाङमय*, मुंबई, १९६९, पृ. ४९६. *दक्षिणा फंडाच्या* प्रश्नाबाबत लोकहितवादींवर झालेल्या ग्रामण्याचा उल्लेख मागे आलाच आहे. ग्रामण्याच्या या सभेत जोतीरावांनी स्वतः लोकहितवादी व त्यांच्या पाठीराख्यांच्या शरिर संरक्षणाची व्यवस्था केली होती. *रा. सा. केशव शिवराम भवाळकर यांचे आत्मवृत्त*, पृ. १०७. ४१. Mary Carpenter, *Six Months in India*, Vol. II, Londan, 1868, p. 42.

कार्पेंटर ही आंग्लशिक्षणतज्ञ अहमदाबादेस आली होती. स्त्रियांच्या ट्रेनिंग संबंधी तिच्याशी जी चर्चा घडून आली तीत लोकहितवादींनी पुढाकार घेतला होता व याविषयासंबंधीची माहिती तिच्याकडून मिळविण्यांत फारच आस्था दाखविली होती.[४२] अहमदाबादच्या हरकोरबाई कन्या शाळेच्या संचालक समितीचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी काम केले.[४३] अनेक शैक्षणिक संस्थांना त्यानी सढळ हाताने आर्थिक साह्यही केले.[४४] स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या लोकहितवादींनी स्वतःच्या दोन्ही मुलींना शिक्षण दिले होते.[४५] एवढेच नव्हे तर स्वतःच्या अशिक्षित पत्नीलाही शिकवून त्यांनी इतकी तयार केली की शाळेतील मुलींची परीक्षा घेण्याइतपत पात्रता तिच्या अंगी आली होती.[४६]

अहमदाबादला असतांना तेथील गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीच्या कार्यात त्यांनी अत्मीयतेने भाग घेतला. सुरुवातीला ते या सोसायटीच्या आर्थिक व्यवहाराची हिशोबविषयक कामे पहात.[४७] पुढे इ. स. १८७२ मध्ये ते संस्थेचे सेक्रेटरी झाले. सेक्रेटरी होताच त्यानी संस्थेचे नियम तयार केले.[४८] व संस्थेच्या सर्वच कामात एक प्रकारचे चैतन्य आणले. या संस्थेतर्फे बुद्धिप्रकाश नावाचे एक मासिक निघत असे. त्यांत लोकहितवादींनी स्वतः अनेक लेख लिहिले.[४९] शिवाय तरुण लोकांसाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धाही सुरू केल्या.[५०] तरुण विद्यार्थ्यांमध्ये ते इतके प्रिय होते की नाशिकला बदली झाल्यानंतर अहमदाबाद येथे २४ फेब्रु. १८७७ रोजी त्यांना निरोप देण्यासाठी जो समारंभ (गोपालोत्सव) झाला त्यासाठी जमलेल्या १४००० उपस्थितांत ४००० विद्यार्थी होते.[५१]

निवृत्तीनंतर लोकहितवादींचे मुंबईला काही काळ जे वास्तव्य होते त्या काळांत त्यांचा 'आर्यज्ञानवर्धकसभा' या संस्थेशी जवळचा संबंध आला. आर्यसमाजाचीच ही एखादी संस्था असावी की काय अशी शंका अ. का. प्रियोळकर यांनी उपस्थित केली आहे.[५२] या संस्थेचा आर्य समाजाशी काहीही संबंध नव्हता. चुनीलाल जमनादास, केशवदास माधवदास व गंगादास अमरजी परेख या तीन मुंबईकर गुजराथी विद्यार्थ्यांच्या मनांत परस्परांचे ज्ञान वाढविणे, सद्‌गुणांची जोपासना करणे व स्पष्टवक्तेपणाची सवय लावण्यासाठी बालज्ञानवर्धक सभा स्थापन करण्याची कल्पना आली. (१५ सप्टेंबरला १८८०) पुढील दहा दिवसांत या संबंधीचा विचार पक्का करून २५ सप्टेंबरला मुंबईच्या शेठ जीवराज बाळू कन्या शाळेंत या संस्थेची रीतसर स्थापना झाली. या तरुणांच्या संस्थेला लोकहितवादोचे जवळजवळ सुरुवातीपासूनच सहाय्य होते. 'पुढे त्यांच्या सारख्याच इतर वयोवृद्ध गृहस्थांनी सूचना केल्यावरून ह्या सभेपासून तरुणांखेरीज इतरांनाही लाभ मिळावा या हेतूने या संस्थेचे नांव बदलून ते 'आर्यज्ञान वर्धक' असे करण्यांत आले. (१ जाने. १८८१) लोकहितवादी या संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. संस्थेतर्फे तरुणांच्या

---

४२. तत्रैव पृ. ३५. ४३. *बुद्धिप्रकाश*, जाने. पृ. १७. ४४. R. H. Jalbhouy, *Portrait Gallery of Western India*. ४५. रमाबाई रानडे, *आमच्या आयुष्यांतील काही आठवणी*, मुंबई, १९१०, पृ. ६४–६५; लोकहितवादींच्या एका मुलीने अहमदाबाद प्रार्थना समाजमंदिरात ८ ऑगस्ट १८७४ या दिवशी 'एकेश्वरी पूजा' या विषयावर व्याख्यानही दिले होते. –– *नेटीव्ह ओपिनियन*, २४ ऑगस्ट १८७४. ४६. *नेटीव्ह ओपीनियन*, २४ फेब्रु. १८६७, –– ४७. *बुद्धिप्रकाश*, नोव्हें. १८७०, पृ. २५७. ४८. तत्रैव फेब्रु. १८७३, पृ. ३. ४९. प्रस्तुत खंडातील 'संकीर्ण लेख' हा विभाग पहा. ५०. *बुद्धिप्रकाश*, मे १८७३, कव्हरपृष्ट, तरुणांसाठी घेतलेल्या निबंध स्पर्धांचे निकाल बुद्धिप्रकाशच्या अनेक अंकात पहावयास सांपडतात–उदा., जून १८८३, पृ. १३७; फेब्रु. १८७३, नोव्हें. १८७४, पृ. २६१. ५१. *बुद्धिप्रकाश* लेखसंग्रह–– भाग १, पृ. ३०५–३१६. ५२. *लोकहितवादीकृत निबंधसंग्रह*, प्रस्तावना पृ. २२.

विकासाच्या दृष्टीने वक्तृत्वोत्तेजन, मासिक प्रकाशन, वाचनालय असे विविध उपक्रम हाती घेण्यात आले. स्वतः लोकहितवादींनी संस्थेच्या वाचनालयाला १३ पुस्तके भेट म्हणून दिली.[५३]

तरुणांच्या संस्थांना लोकहितवादींनी जसे मार्गदर्शन व मदत केली तशाच प्रकारे त्यांनी अनेक तरुणांना व्यक्तिगत मदतही केली. प्रसिद्ध क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा यांना ऑक्सफर्ड येथे जाऊन शिक्षण घेता यावे यासाठी त्यांनी मोनियर विल्यम्स यांच्यामार्फत पुष्कळ खटपट केली. पुढे श्यामजी बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानात परत आल्यावर रतलामच्या दिवाणपदासाठी लोकहितवादींनी शामजींचे नाव सुचविले होते व ते मान्यही झाले.[५४] नाशिकच्या वास्तव्यांत ना. वा. टिळक, गणेश नारायण खरे व वामन बाळकृष्ण रानडे इ. तरुणांबरोबर त्यांचा नियमित संपर्क असे.[५५]

लोकहितवादींनी केलेल्या शैक्षणिक कार्यांत त्यांच्या ग्रंथालय चळवळीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. नवी शास्त्रे व ज्ञान मिळविण्यासाठी ग्रंथांची नितांत आवश्यकता आहे असे त्यांनी वारंवार प्रतिपादन केले आहे. "… बहुत ग्रंथ झाले असतां उपयोग होईल, व देशांतील लोक शहाणे होतील."[५६] असा त्यांचा दृढविश्वास होता. ग्रंथ प्राप्तीचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे ग्रंथालय. ज्या काळांत लोकांना वाचनाची विशेष अभिरूची नव्हती.[५७] अशा काळांत त्यांनी ग्रंथालय स्थापनेच्या कार्यांत मोठ्या उत्साहाने भाग घेतला. ७ फेब्रु. १८४८ रोजी झालेल्या पुणे नेटिव्ह जनरल लायब्ररीच्या स्थापनेत त्यांचा वाटा होता. या लायब्ररीचे ते कांही काळ सेक्रेटरीही होते.[५८] फर्स्ट क्लास मुन्सफ म्हणून ते जवळ जवळ तीन वर्षे वाईला होते. या काळात त्यांनी वाईलाही एक वाचनालय स्थापन केले.[५९] पुण्यांतील लष्करभागांत ऑक्टोबर, १८८५ मध्ये तेलगु भाषिकांसाठी एक वाचनालय सुरू झाले, त्यांच्या स्थापनेतही लोकहितवादींनी मोलाची मदत केलेली होती.[६०]

शाळा आणि वाचनालये यांच्याप्रमाणेच वर्तमानपत्र हेही प्रबोधनाच्या सुरूवातीच्या काळांतील ज्ञानप्रसाराचे एक महत्त्वाचे साधन होते. इ. स. १८३२ मध्ये *दर्पण* हे बाळशास्त्री जांभेकरांनी सुरू केलेले साप्ताहिक वर्तमानपत्र मराठींतील पहिले वर्तमानपत्र होय. परंतु ते मुंबईहून निघत असे. पुण्यांतून प्रसिद्ध होणारे पहिले मराठी वृत्तपत्र म्हणजे ज्ञानप्रकाश होय. *ज्ञानप्रकाश*च्या स्थापनेत लोकहितवादींचा महत्त्वाचा वाटा होता. आपल्या आत्मवृत्तांत त्यांनी म्हटले आहे, "पुण्यांत लायब्ररी, छापखाना, रयतेची सभा, दवाखाना, मुलींची शाळा, या प्रारंभी यांचे आश्रयाने सुरु झाल्या."[६१] ज्ञानप्रकाश हाच पुण्यांतील प्रारंभीचा छापखाना होता, तसेच त्यांच्यावरील एका मृत्यु लेखात[६२] व इतरत्रही[६३] ते *ज्ञानप्रकाश* पत्राच्या संस्थापकांपैकी एक होते. असा उल्लेख

५३. आर्यज्ञानवर्धकसभेचा पहिला वार्षिक अहवाल २९ जाने. १८८२ रोजी वाचण्यात आला. त्यांत वरील माहिती सांपडते. *आर्यज्ञानवर्धक* (मासिक) आषाढ, सं. १९३८, पृ. २३५–२४०. ५४. *लोकहितवादीकृत निबंधसंग्रह*, प्रस्तावना पृ. ३०–३१. ५५. गा. ह. केळकर, *लोकहितवादी सरदार गोपाळराव हरी देशमुख*, २ री आ. पुणे, १९३७, पृ. ४३. ना. वा. टिळक म्हणजेच सुप्रसिद्ध कवि; रानडे हे पुढे *ज्ञानचक्षू* मासिकाचे संपादक झाले. ५६. *शतपत्रे* क्र. ९३. ५७. *तत्रैव* क्र. ३. ५८. *Report of the Board of Education*, Bombay, 1851, pp. 141–142 सेक्रेटरी या नात्याने लोकहितवादींनी सरकारला पाठविलेले एक पत्र या रीपोर्टात समाविष्ट केले आहे. ५९. *वृत्तसार* (वाई) १७–१०–१९९२–*लोकहितवादीकृत निबंधसंग्रह*, प्रस्ता. पृ. १२ वर उद्धृत. ६०. *ज्ञानप्रकाश*, १५ ऑक्टो. १८८५. ६१. *आत्मवृत्त*. ६२. *इंदुप्रकाश*, १७ ऑक्टो. १८९२. ६३. ना. वि. जोशी, *पुणे शहराचे वर्णन*, पृ. ११९; रा. गो. कानडे, *मराठी नियतकालिकाचा इतिहास*, मुंबई, १९३८ या आपल्या ग्रंथात लिहितात की

आहे. पुढे इ. स. १८६२ मध्ये मुंबईहून *इंदुप्रकाश* हे पत्र निघू लागले. या पत्राच्या स्थापनेतही विष्णु परशराम पंडितांबरोबर लोकहितवादीच होते.[६४] त्यांतील इंग्रजी विभागही त्यांनी काही दिवस चालविला.[६५] अहमदाबादच्या त्यांच्या वास्तव्यांत हितेच्छू या इंग्रजी साप्ताहिकाच्या स्थापनेमागेही लोकहितवादींचीच प्रेरणा होती असे त्यांचे एक चरित्रकार कृ. ना. आठल्ये सांगतात.[६६] याबद्दल इतरत्र कोठे उल्लेख नाही. तरीपण बडोद्याच्या तत्कालीन राजकीय स्थितीवर कडक टीका करणारे काही लेख या पत्रांतून त्यांनी लिहिले होते.[६७]

## महाराष्ट्राचे 'ईश्वरचंद्र विद्यासागर'

समाज सुधारणेच्या चळवळीत समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीचा विचार अटळ ठरतो. शिक्षणाखालोखाल हिंदुविधवांच्या प्रश्नांकडे लोकहितवादींचे लक्ष वळले ते याचमुळे. बंगालमध्ये ज्याप्रमाणे सतीच्या प्रश्नाने उग्र स्वरूप धारण केले होते तद्वत् महाराष्ट्रामध्ये एकोणिसाव्या शतकांत विधवांचा प्रश्न बिकट बनलेला होता. लोकहितवादींच्या अगोदर बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांनी या प्रश्नात लक्ष घातले होते. १८३७ साली *दर्पण* मध्ये त्यांनी विधवा पुनर्विवाहाविषयी काही लेख लिहून या प्रश्नास वाचा फोडली होती.[६८] इ. स. १८४१ मध्ये पुणे पाठशाळेचे एक अध्यापक विष्णुशास्त्री बापट यांनीही पुनर्विवाहविषयक चळवळीला चालना देण्याच्या उद्देशाने *पुनर्विवाह प्रकरण* नामक ग्रंथ पुण्यास प्रसिद्ध केला.[६९] परंतु विधवांच्या प्रश्नांची साधक बाधक चर्चा एवढ्या मोठ्या प्रमाणावर घडवून आणण्याची कामगिरी महाराष्ट्रांत प्रथमतः लोकहितवादींनीच केली. आपल्या सार्वजनिक जीवनातील तीस वर्षांपेक्षा अधिक काळ त्यांनी या चळवळीबाबत इतके भरीव कार्य केले की ते महाराष्ट्राचे ईश्वरचंद्र विद्यासागर ठरावेत. लोकहितवादींना, विधवा-बद्दल वाटणारा कळवळा पुढील उताऱ्यावरून अगदी स्पष्ट होतो :

> मला तर असे वाटते की, स्त्रियांचे दुःख इतके भारी आहे की, त्याची स्मृती झाली तर रोमांच उभे रहातात…अरेरे! हा अनुभव घरोघर आहे…बारा, पंधरा, वीस, तीस वर्षांच्या पोरींचे गळे कापतात. हे पाहून अंतःकरण खवळून न जावे काय?…स्त्रियांनी पुनर्विवाह केला म्हणून त्यात काय तुमचा नामोश झाला?…पोरे आणि बाळे घेऊन पतीशिवाय काय काय उपास तापास, दुःख, या विधवा भोगितात. परंतु भले हिंदु हो, धन्य तुमची! तुम्हीच आपल्या मुलींचे खाटीक स्वस्थपणाने होता…[७०]

या कळवळ्यापोटीच त्यांच्या शतपत्रांपैकी १० पेक्षा अधिक पत्रे या विषयासाठी खर्ची पडलेली आहेत.

यापेक्षाही २६ मे १८४८ या तारखेचे तेव्हांचे गव्हर्नर लॉर्ड फॉकलंड (१८४८–५२) यांस इंग्रजीत लिहिलेले अनावृत पत्र म्हणजे विधवांच्या प्रश्नांबाबतची एक सर्वंकष सनद ठरावी. Bombay Times and Jorrnal of Commerce या द्विसाप्ताहिकाच्या १० जून १८४८ च्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या या पत्रांत[७१] हिंदु विधवांची स्थिती, त्यांच्यात आढळणाऱ्या गुन्हेगारीचे स्वरूप व विधवाविवाह रूढ करण्याच्या दृष्टीने अनेक उपाय सुचविलेले आहेत. ऐन तारुण्यांत

---

लोकहितवादी *ज्ञानप्रकाश* पत्राच्या सुरवातीचीं बारा वर्षे संपादक मंडळावर होते. पृ. ३७. ६४. *इंदुप्रकाश*, १७ ऑक्टोबर १८९२. ६५. *बुद्धिप्रकाश लेखसंग्रह, भाग १*, पृ. ३०५–३१६. ६६. कृ. ना. आठल्ये, लोकहितवादी … यांचे चरित्र, पृ. ६३. ६७. *गुजरात व्हर्नाक्युलर सोसायटीनो इतिहास*, विभाग १ ला, १९३२, पृ. १५८. ६८. गं. गं. जांभेकर (संपा. व लेखक) *बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर*, खंड २ रा; पुणे, १९५०, पृ. १३०–१३५. ६९. हा छोटासा ग्रंथ *ज्ञानदीप* मासिकाच्या नोव्हें. १८८७ च्या अंकास 'पुरवणी' म्हणून जोडला आहे. पृ. २७९–२९२. ७०. *शतपत्रे* क्र. १०४. ७१. प्रस्तुत खंडांतील 'संकीर्ण लेख' हा विभाग पहा.

लोकहितवादींनी या विषयाचा किती सखोल अभ्यास केला होता याची प्रचीती त्यावरून येते. या पत्रांत सुचविलेले उपाय अत्यंत व्यवहार्य व तेवढेंच दूरदर्शित्वाचे आहेत. हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

आज स्वतंत्र भारतात लोकसंख्या वाढीला आळा घालण्यासाठी कुटुंबनियोजनाच्या विविध उपक्रमात सहभागी होणाऱ्यांना नोकरीमध्ये बढती अथवा अन्य सवलती दिल्या जात आहेत. तसेच नियोजनकार्यक्रम कानाकोपऱ्यात पोहोचण्यासाठी अनेक माध्यमातून हीरीरीने प्रचार करण्यात येत आहे. सव्वाशे वर्षांपूर्वी लोकहितवादींनी असेंच उपाय विधवाविवाहाच्या प्रचारासाठी सुचविले होते. पुनर्विवाहासारख्या सुधारणांच्या कैवाऱ्यांना मोठी बक्षिसे द्यावीत, बरचा हुद्दासुद्धा याच तत्त्वावर दिला जावा, सरकारतर्फे ज्या हरदासांना व गोसाव्यांना धर्मादाय वर्षासने मिळतात त्यांवर पुनर्विवाहासारख्या समाज-सुधारणांचा प्रचार करण्याची सक्ती करावी असे उपाय लोकहितवादींनी आपल्या या इंग्रजी पत्रांत सुचविले आहेत. अर्थात् प्रचार कोणत्याही प्रकारे केला तरी "···लोकांना जाणीव न होईल अशा बेताने हे काम सावकाश केले पाहिजे." असा रास्त सल्ला देण्यास ते विसरले नाहीत, सामाजिक बाबतीत सक्ती केली की चांगल्या योजनांचाही कसा विचका होतो हे आता आपल्या चांगलेच परिचयाचे आहे.

"विधवांशी जे विवाह करतील त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी एक विधवाफंड उभारला पाहिजे." असे प्रतिपादन लोकहितवादींनी आपल्या उपरोक्त पत्रांत केले आहे. विधवांचा प्रश्न सोडविण्यासाठी एकादी संस्था आवश्यक आहे ही जाणीव लोकहितवादींना होती असाच या प्रतिपादनाचा अर्थ आहे. पुढे इ. स. १८५० मध्ये *ज्ञानोदय*ने पुनर्विवाह स्थापक नावाची एक मंडळी स्थापावी असे सुचवून वरील आवश्यकता अधिक स्पष्टपणे सांगितली.[७२] इ. स. १८६५ मध्ये 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी' स्थापण्यास विष्णुशास्त्री पंडितांना लोकहितवादींनी मोलाची मदत केली या त्यांच्या कृतीचे बीज त्यांच्या इंग्रजी पत्रांत सामावलेले आहे.

विधवांचा पुनर्विवाह–त्यांतही ब्राह्मण विधवांचा–म्हणजे अधर्माचा पाया होय असे त्या काळांत मानले जाई.[७३] मात्र शिक्षणामुळे अशा कल्पना हळूहळू बदलत होत्या. सर्व देशभरच्या समाजधुरीणांच्या विचारांचा कानोसा घेऊन इ. स. १८५६ मध्ये इंग्रज सरकारने विधवाविवाहास कायद्याने मान्यता प्राप्त करून दिली. सनातनी हिंदुकडून अर्थातच या कायद्याला कडाडून विरोध झाला.[७४] कांही पुणेकर ब्रह्मवृंदांनी या कायद्याविरुद्ध अपील करण्याची खटपट चालविली होती. लोकहितवादींना हे कळतांच *ज्ञानप्रकाश*मध्ये त्यांनी एक पत्र लिहिले व असा विरोध करणे समाजहिताच्या विरुद्ध आहे हे पुणेकर ब्राह्मणांना पटवून देण्याचा प्रयत्न केला.[७५]

विधवाविवाहाच्या या चळवळीत लोकहितवादींचा आतापर्यंतचा वाटा वैचारिक स्वरूपाचा होता. इ. स. १८६३ मध्ये काही काळ ते अहमदाबादेस असताना या चळवळीत सक्रीय भाग घेण्याची संधी त्यांना लाभली. अहमदाबादेत 'विधवाविवाहोत्तेजक मंडळी' या नावाची संस्था स्थापन करणाऱ्यांत ते एक होते. पुढे १०–१२ वर्षांनी नामशेष होण्याच्या मार्गास लागलेल्या

---

७२. *ज्ञानोदय*, १ ऑगस्ट १८५०, पृ. २८६. ७३. दोन ब्राह्मणविधवांचा विवाह झाल्याचे वाचताच *प्रभाकर* पत्राचा एक वाचक लिहितो : 'महाराज आपले मागल्ये पत्रांत बेळगांव मुक्कामी दोन ब्राह्मणांचे विधवा स्त्रियांचे पुनर्विवाह जाहाले असे आपण लिहिले ही गोष्ट ऐकून मला फार आश्चर्य वाटले कारण हा अधर्माचा पाया मुख्यत्वे ब्राह्मणानीच घातला · · ·' *प्रभाकर*, ६ फेब्रु. १८४२. ७४. ना. ग. चंदावरकराचा निबंध 'The British Govt., and Hindu Religious Customs' एल. व्ही. कैकीणी संपादीत The Speeches and writing of Sir N. G. Chandavarkar, Bombay, 1911, p. 321. ७५. प्रस्तुत खंडातील 'संकीर्ण लेख' पहा.

या संस्थेचे पुनरुज्जीवन झाले त्यांतही लोकहितवादींचा मोठा वाटा होता.[७६] मध्यंतरी १८६४ मध्ये त्यानी *सौभाग्यरत्न* हे विधवाविवाह-विषय पुस्तक नगर येथे प्रसिद्ध केले.[७६-अ]

इ. स. १८६५ मध्ये मुंबई येथे 'पुनर्विवाहोत्तेजक मंडळी' स्थापन करण्यात विष्णु शास्त्री पंडीत हे प्रमुख होते. त्यांना या कामी अनेक सुधारकांची मदत मिळाली. त्यात लोकहितवादींचा वाटा मोलाचा होता.[७७]

इ. स. १८६९ मध्ये पांडुरंग करमरकर यांचा वेणूबाई परांजपे या विधवेशी मुंबईत झालेला विवाह मोठाच गाजला. या विवाहाच्या आमंत्रण पत्रिकेवर सही करणाऱ्या 'सप्तर्षींत' लोकहितवादी एक होते. प्रत्यक्ष विवाहाला मात्र ते उपस्थित राहू शकले नाहीत. बडोद्याच्या मुजुमदारांकडे लोकहितवादींची एक कन्या दिलेली होती. पुनर्विवाहास हजर रहाल तर मुलीचा त्याग करू अशी मुजूमदारांकडून धमकी मिळाल्यामुळे लोकहितवादींचा नाईलाज झाला. स्वतःच्या सुधारकी मतांमुळे आपल्या कन्येला त्रास होऊ नये असे त्यांच्या पितृहृदयाला वाटणे अगदी स्वाभाविक होते. त्यामुळे अर्थातच त्यांची सुधारक म्हणून असलेली प्रतिमा डागळली. तरीसुद्धा पुनर्विवाहाच्या चळवळीतून त्यांनी अंग अजिबात काढले नाही. पुनर्विवाहाचा शास्त्रार्थ सिद्ध करण्यासाठी बडोदा दरबारच्या पंडितांशी चर्चा करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.[७८] पुढे पुण्यास शंकराचार्यांच्या उपस्थितीत या पुनर्विवाहाबाबत मोठा जाहीर वादविवाद झाला. या '···वादविवादाविषयी कलमबंदी यादीचा विचार झाला. त्यांत पुनर्विवाहोत्तेजक मंडळींकडून शास्त्रवादाच्या संबंधाने ठरलेले नियम छापून प्रसिद्ध झाले आहेत, ते स्वामींस पसंत नसल्यामुळे श्रीमंत पंतसचीव व रावबहादूरगोपाळराव हरी देशमुख, आबासाहेब नातू व बापू रावजी मांडे व विष्णु शामजी रानडे यांचे संमताने . . .'[७९] नियम ठरविण्यांत आले. या वादाच्या शेवटी पुनर्विवाहपक्षीयांना प्रायश्चित घेण्याची 'श्रीं'नी आज्ञा दिली. त्यावेळी लोकहितवादींनी प्रायश्चित घेतले. सुधारणापक्षाच्या विरोधकांना त्यामुळे आनंदाच्या उकळ्या फूटू लागल्या व त्यांनी कुत्सित टीका करण्यास सुरवात केली. या टीकेचा अतिरेक होऊ लागताच लोकहितवादींनी आपली भूमिका विष्णुशास्त्रीपंडितांस एक पत्र लिहून कळविली. या पत्रातील काही भाग ३० मे १८७० च्या इंदुप्रकाश पत्रांत प्रसिद्ध करण्यांत आला. त्याचा मथितार्थ असा होता; 'मी नडीमुळे प्रायश्चित घेतले तरी माझे मत कायम आहे व मी पूर्वीप्रमाणे सर्व प्रकारे साहाय्य करीत जाईन'[८०]

उपरोक्त जाहीर आश्वासनाप्रमाणे लोकहितवादींनी या पुढेही विधवाविवाहाच्या प्रश्नात पूर्वीप्रमाणेच रस घेऊन काम केले. अहमदाबादच्या पुनर्विवाह मंडळाच्या पुनरुज्जीवनाचा उल्लेख मागे आलाच आहे. २६ ऑगस्ट १८७२ रोजी अहमदाबादेस जीवकुवर या गुर्जर विधवेचा

---

७६. बुद्धिप्रकाश, जून १८७८, पृ. १४०–१४१. ७६-अ. *ज्ञानदीप*, नोव्हें. १८८७, पृ. २७९ विधवाविवाह या विषयावर तोपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची एक यादी दिलेली आहे. ती अशी : (१) *पुनर्विवाह प्रकरण* – बा. गं. जांभेकर व गंगाधरशास्त्री फडके, (२) *पुनर्विवाह प्रकरण* विष्णुशास्त्री बापट, (३) कन्या पुनर्विवाह विशे-दलपतराम डाह्याभाई, (४) *पुनर्विवाहाविषयी विचार* – विष्णुबुवा ब्रह्मचारी, (५) *मोरोबा कान्होबा* यानी लिहिलेले पुस्तक, (६) *सौभाग्यरत्न* – लोकहितवादी – १८६४, (७) विधवाविवाह, (८) *विधवा खंडन* (विवाह), (९) *विधवोद्वाहविवेक*, (१०) *पुनर्विवाह निषेध*. ७७. श्री. स. पंडित, *विष्णुशास्त्री पंडित यांचे चरित्र*, पृ. २५. ७८. तत्रैव, पृ. ४०–४२. ७९. दाजी आबाजी खरे, *विधवाविवाहाविषयी पुण्यात झालेला वाद*, पृ. १. ८०. 'पुनर्विवाहाच्या प्रचारार्थ आजपर्यंत झालेला

लल्लुभाई मथुरादास यांजबरोबर विवाह झाला. लोकहितवादी या समारंभास जातीने उपस्थित होते.[८१] यानंतरही अनेक पुनर्विवाह अहमदाबादेंत घडून आले.

१ सप्टेंबर १८७८ रोजी सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर लोकहितवादी काही काळ मुंबईस वास्तव्य करून होते. या काळांत ते 'आर्यज्ञानवर्धक सभा' या संस्थेचे अध्यक्ष होते.[८२] या संस्थेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या *आर्यज्ञानवर्धक* या मासिकाचे संपादक सवितानारायण गणपतिनारायण यांच्याशी लोकहितवादींचा विधवाविवाहविषयक प्रदीर्घ पत्रव्यवहार झाला. या पत्रांतून विधवा-विवाह सशास्त्र की अशास्त्र याची साधार चर्चा त्यांनी केली. ऋग्वेद, आश्वलायनगृह्यसूत्रे, पराशरस्मृति, ब्रह्मपुराण इ. अनेक ग्रंथांमधले दाखले देऊन लोकहितवादींनी विधवाविवाहांचे समर्थन प्रभावीपणे केले. या पत्रव्यवहाराचा काळ १८८१–८२ असा होता.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींत लोकहितवादींनी जसा भाग घेतला तद्वतच तत्कालीन धार्मिक चळवळीतही ते सहभागी झाले.

## धार्मिक कार्य

प्रचलित हिंदुधर्मात सुधारणा करण्याची आवश्यकता लोकहितवादींनी शतपत्रांतूनच प्रतिपादिली होती. कालांतराने महाराष्ट्रांत धर्मसुधारणा करण्याच्या उद्देशाने विविध पंथ कार्य करू लागले. स्वाभाविकच लोकहितवादी अशा पंथांकडे वळले.

मुंबई प्रार्थना समाजाची स्थापना ३१ मार्च १८६७ या दिवशी झाली. लोकहितवादी त्यावेळी अहमदाबादला होते. अहमदाबाद प्रार्थना समाजाचा संस्थापना दिन १७ डिसें. १८७१ हा आहे. या अहमदाबाद शाखेशी लोकहितवादींचा अगदी सुरवातीपासूनच संबंध आला. या शाखेचे ते काहीकाळ उपाध्यक्षही होते. समाजाचे एक प्रार्थनामंदिर असावे अशी कल्पना त्यांनीच मांडली होती,[८३] अहमदाबाद समाजांत त्यांची अनेक भाषणेही झाली होती. पुढे नाशिकला आल्यावर त्यांनी तेथील प्रार्थना समाजाची शाखा स्थापण्यांत न्या. रानडे यांच्याबरोबर पुढाकार घेतला,[८४] तेथेही त्यांची काही व्याख्याने झाली. निवृत्तीनंतर पुण्यास आल्यावर पुणे प्रार्थना समाजाच्या कामातही त्यांनी सक्रीय भाग घेतला होता.[८५]

एवढे जरी असले तरी प्रार्थनासमाजाच्या तत्वांशी ते एकरुप होऊ शकले नाहीत. एक तर प्रार्थना समाज पुढे पुढे भक्तीमार्गाकडे वळला; उलट लोकहितवादींचा ज्ञानमार्गाकडे ओढा होता. शिवाय प्रार्थना समाजाची उभारणी ख्रिश्चन धर्मतत्वांवर झालेली आहे असाही त्यांचा समज झाला होता असे दिसते.[८६] केसरीत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या आत्मवृत्तांत फक्त आर्य समाज व थिओसफीकल सोसायटी यांच्याशी असलेल्या त्यांच्या संबंधाचाच उल्लेख केलेला आहे. प्रार्थनासमाजाचे नाव कटाक्षाने टाळले आहे ही गोष्ट मोठी सूचक वाटते.

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांच्याशीही लोकहितवादींचा संबंध अहमदाबाद येथेच प्रथम आला. आर्य समाजाची स्थापना (१० एप्रिल १८७५) होण्यापूर्वी

---

उद्योग व त्याचे फल.' *ज्ञानदीप*, नोव्हें. १८८७. पृ. २६३. ८१. *बुद्धिप्रकाश*, ऑक्टो. १८७२, पृ. २३०. ८२. याविषयी अधिक माहिती मागे आली आहे. ८३. *बुद्धिप्रकाश*, सप्टेंबर १८७४, पृ. २१७. या मंदिराच्या इमारतीचा शुभारंभ २२ ऑगस्ट १८७४ रोजी झाला. ८४. रमाबाई रानडे, *आमच्या आयुष्यातील काही आठवणी*, पृ. ६४. ८५. पुणे प्रार्थना समाजाच्या १६ व्या व १७ व्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगी लोकहितवादींनी भाषणे केलेली होती. *ज्ञानप्रकाश* ९ डिसेंबर १८८६; *इंदुप्रकाश*, १२ डिसेंबर १८८७. ८६. आर्यसमाजाच्या तत्वांची भलावण करताना त्यांनी प्रार्थनासमाजावर केलेली अशा अर्थाची टीका *श्रीमद्दयानंद सरस्वती* या लोकहितवादींच्या पुस्तकांत वाचावयास सापडते. *लोकहितवादी* (मासिक) जाने-फेब्रु. १८८४,

लोकहितवादींच्या आमंत्रणावरून स्वामी अहमदाबादला गेले होते. तेथे त्यांची भाषणेही झाली. मुंबई आर्यसमाजाची स्थापना झाल्यानंतर लोकहितवादींनी आर्य समाजाच्या कामात जातीने लक्ष पुरविले. आर्य समाजात त्यांची अनेकवार भाषणे झाली. काही काळ तर दर पंधरावड्यास त्यांची भाषणे होत.[८७] सरकारी नोकरींतील निवृत्तीनंतरही लोकहितवादीनी आर्य समाजाविषयी एक व्याख्यानमाला गुंफली.[८८] मुंबई आर्य समाजाचे ते काही काळ प्रमुख होते. मुंबई आर्य समाजाच्या इमारतीची जागा खरीदण्यापासून तो बांधकाम पूर्ण होईपर्यंतच्या सर्व कामांत लोकहितवादींचा प्रत्यक्ष वाटा होता.[८९] समाजाचे नियंत्रण करणाऱ्या 'परोपकारिणी सभा' या समितीत दयानंदांनी त्यांची नियुक्ती केली होती तसेच लाहोर आर्य समाजाचे नियम सुधारून मुंबई समाजास लागू करण्याच्या दृष्टीने अनुरूप बदल करण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगटांतही दयानंदानी लोकहितवादीना सामील करून घेतले होते. यावरून दयानंदांचा लोकहितवादींवर किती विश्वास होता हे दिसून येते. दयानंद व लोकहितवादी यांचे वैयक्तिक संबंधही जिव्हाळ्याचे होते.

---

पृ. १३. सदाशिव बळवंत लोटलीकर या लोकहितवादींच्या एका जिवलग स्नेह्याच्या मतानुसार ख्रिश्चनधर्मतत्त्वांचाच मुख्य आधार प्रार्थना समाजाला होता असे लोकहितवादी मानीत. **लोटलीकर यांचे पत्र**–*ज्ञानोदय*, २० ऑक्टो. १८९२, पृ. ३४२. ८७. याविषयी दयानंद लोकहितवादींना पत्राने कळवितात. "I am very glad to hear that you visit Bombay Arya Samaj every fortnight and deliver beautiful lecture there on different subjects with a view of public interest". दयानंदांचे पत्र दि. २८–११–१८७७ *ऋषी दयानंद सरस्वती के पत्र और विज्ञापन* (संपा.) पं. भगवद्दत्त (१९५५) पृ. ७०. ८८. *इंदुप्रकाश*, १७ ऑक्टोबर १८९२, (इंग्रजी विभाग). ८९. दामोदर सुंदरदास, *मुंबई आर्यसमाजानो इतिहास मुंबई*, १९३३, पृ. ४० व ५५.

# गोपाळ गुण वर्णन

मोहनलाल दलपतराम

२५ जानेवारी १८७५

श्री. रा. ब. गोपाळराव हरि देशमुख वर्णन ते कवि मोहनलाल दलपतराम जव्हेरीवाडे कोठारी पोळमा अहमदाबाद प्रेसमा भोगीलाल दोलतराम छपेली प्रसिद्धं कर्यु छे

आ चोपडीनी किंमत रु. ०–२–० राखी छे
केहनारा पुरषो छे तेमने तेटलु छुट

(आ-चोपडीने राव बहादुरना मित्र मेहरवान शेट कावसजी मंचरजी तथा चुनिलाल दलपतरामे अगाडथी सहायता आपि छे माटे तेमनो अमे मोटो उपकार मानीये छीये)

जाय क्षमाये गाळ न खावा मोटा जो कहेवाय
नम्र थईने नगर वाळवा जत मोटा नव जाव १
धैर्य राखीने माणुस मरवा दे न पोतानुं परतुं
सई आत्मभुसिरखा जाणी आटे मां न केतर नु २
त्रिगुणात्मक तेमां सत्वशील शणगारजी
आत्मांनु ज्ञान छे उरमा वणानो नही नीरधारजी ३
वान के वृद्ध वये पण जीवने बय नही जाणेजी
एनी जीवने छे नही उत्पत्ती लय नही जाणेजी ४
जेने हृदये चढे नही मोह मायाथी अळगोजी
ऐक षडरिपु तेतो अंके न जेने वळग्योजी ५
माणसना दुःखनो ते तु छु हर
गरीब गरबानी तु वारे चडनार
बींवा देखीने तु छु दिल दिलगीर
दुःख भ्यंजन तु विक्रम वीर
धर्मराज दिवानीनो कवि कुल पाल
मुख तारा जोई हरखे मोहनलाल

कोई बेसी त्याहा विडिये बनावे रे
कोई बैठा तमाखु चावे रे
जमी रहे साब आरे रे
एक बिडी लहे पोते त्यारे रे
कोई रावनु उचके अंगरखु रे
कोई पाननी डाबडी परखु रे
मुखी मस्तक पागळी चाले रे
आवी कोराने बंगले महाले रे
जोगी संन्यासी गृहस्थी भिकारी रे
करे राव तेथी यारी रे

## दोहरो

चाये रा. ब. जी मन जाणो मलवाये
जात जात मा ते नई वात करी फुलागरे
वात करी फुलाता हिंडे बेसे जई कोरटमा
एक नजर धंटासामी बीजी ते राव निकटमा
मनमा जाणे क्यारे वागे पाच दर्शन पामु
रा. ब. सामो बेसी वेगे जई विश्रामु
साहेब पण मत जाणी रहया जे थता असे खोटी
ते मुजने मळवाने माटे तेथी चिंता मोठी
कोरट माथी उठे तेवा बाहेर उणवी बुलावे
आवो आवो क्यारना आव्या एमकही समजावे
मेज उपर खुर्सी मांडी बैसे सभा भरीने
कामकाज जे जरूरना होय ते परवारे करीने
मधुर भाषण मीठा वचनोथी पछी वडती चाले
नवु वागे के दस वागे के बार थाय कोइ काळे
कोई वखत तो त्याहाच सोये कोक वखत जाई घेरे
घेरे आवे तो तेना साथे कर्ता कर्ता लहेरे
त्या पोटे तो पण त्या तेवु कैक रहे त्याहा रात
साहेबने छोडीने जावानी गमे न कोने बात
कोरट सभामा कही पधान्या पाछळ लोको थाय
कोरा केस रूप वर्णव्यु माराथी न वर्णाय
एवो तो आभास रहे थई वादी प्रतिवादीने
झूट केवा निश्चये आव्या तो साचू त्यहा कहिये
लाडा लडी त्यहा करे वकील पाडे बहु बराडा
ते वक्ते साहेब करे आपे नित्य निवाडा
वादीने पण कहे बे वचनो प्रतिवादीने कहीने
कहिल थई पोते कहे ते थी जाय बे राजी थईने

दोहरो

राजी थईने जाय सौ एमसीज नवाई
पण बीजी हू बात कहू आस्चर्य कारक छे रे

पद

एक समय अमे जाता हता नदी साबरमती तर नह्वा जी
मागण एक गरोडे मळ्यो ते शु जाणे जो जाड्ज छे रावजी
बापजी वस्तर घो एम बोल्यो टेक मोथे सबूरजी
सत्वगुणी राव बहादुर बोल्या आवो भावो गरो जोशीजी
सु सु कन्या ते गुरु कर्यो तप किधो हतो क्या अभ्यासजी
नाम कवण अने गाम कवण सिध्य केटला छे तप मासजी
क्या क्या ग्रंथो तमे जोया प्रजा तमारे शीछे जी
केटली उमर थई तमारी प्रेम सही ते पुछेजी
एम काही एक वख्त दिधु थया खोटी त्यांकलाक वारजी
आवजो एम करोने कह्यु अनो आश्चर्य भाग्यु अपारजी
बीजी वख्त एक बनाव बनीयो श्रोता जो साचू माने जी
राव बहादुर जाता हता बेशी घोडाउपर एक स्थाने जी
वाटे जाता एक विप्र मळ्यो एक हातमा लोटो साहाईजी
कर बीजामा लाकडी खंदे पंचीयु तेमा काईजी
वृद्ध जाणी राव बहादुर बोल्या डोसो जशो कोण कामजी
लोटामासु धोतीमासु छे ने सु छे तमारी नामजी
केम लिधि छे लाकडी हातमा क्या छे तमारे निवासजी
प्रजामा सु छे आम क्याहा जासो मागवा केने पासजी
नजर पडे तेने निश्चय पुछी आप करे ओळखाणजी
मेळावी जनने मन वश्यो थई जीवनो जीवन प्राण जी

दोहरो

जीवनो जीव प्राण ए कोट करे जे वार
शोभाते हु सी कहु कहे न आवे पार
रुपाल राजनगरनी सारी जड्ज गोपाळराव बलीहारी
वादी प्रतिवादी अपरंपार बैठा बीजा कई कोरट बहार
कई साक्षिओ हो नरनारी स्टँप वेंडर बेठा आगाडी
हाजर नाजर शिरस्तेदार अडसे पडसे मध्ये अमलदार
सामा वकीलो त्याहा वाद करे छे पाछळ तकासी उभा रहे छे
कोट धार्‍यो रावे रावे रुडो एनो अर्थ तो छे हाति डंडो
दया धर्म छे बाहो बनावी बेठा मस्तक बिजानु चढावी
सगासंबंधीने परिवार प्रजा आस्थळे छे एक हार
पिछु रागा रुपीछे ओसार पण नयन झरे स्नेह धार
मोहँ उपजे मुखारविंद जोई त्यारे ते पण जाय खुश होई
जिणी नजरथी दावा तपासे पण मोटी नजर गया कान पासे

आवे समंध ते शोक न लावे वादी प्रतिवादी खुश थता आवे
बळथा दावो जीतो के न जीतो पण रावने मुख जाई जित्यो

पद

दिठो दिठो देवांशी दिनेश किरण झाक जमाळ छे
पड्या अधिक अधिक उजेश तो राव गोपाळ छे
राव रुडा कृष्णरावजी बॅरिस्टर मा थया पास
छे रामचंद्र बीजा रुडारे वीर्य क्षेत्र मा
मोरेश्वरने लक्ष्मण रावजीरे रघुनाथराव गणेश
कुळदीपक छ कुमार छेरे पुत्री बे छे आपी परमेश्वरे
दिसी रुडी देशमुखनीरे मोटा पुरुषप्रराखा वंश
लक्ष्मण पंत विश्वनाथ नारे चार बंधुना चौथा अंश
पेशवा नारायणरावजी रे विधवा गंगाबाई
वाली थयाते पामा तणारे ज्यारे राखी पुरंदरभाई
हिंमत बहादुर हरिपंत तोरेगोखलेना फडनीस
धोंडी मरा मो जे युधमारे तेमा हरिपंत शामील ते दिस
इसवी सन १८२२ रे जनरल वेलसलीजे ठाय
हा सेना युद्धमा उतऱ्यो रे त्यहापण हरिपंतनु हतो नाम
अंत्याजीपंत वामनरावजीरे लक्ष्मण पंतन ना भ्रात
जहागीर बीजे मिळवीरे खरी क्षितीमा मिळवी ख्यात
अंत्याजी अंगथी अत्पन्यारे फडणीस कृष्णाजीराव
वीयुर कोर सतारे वस्मारे तेना दिवाण गणपतराव
न्हाना मोटा बे भाईओ रे कृष्णाजी गणपतराव
मायुराणुमा चित्रावन कसारे बहुनामोक्ती ए छे बनाव
फागण सुधी अष्टमीरे सके सत्तर चुम्माळीसमा
जन्या गोपाळरावजीरे पाम्या अष्टासिद्धी बक्षिस
मुनसफ सार अमीननेरे सिनियर सह अधिकार
मोटा मोटा हुदा मिळव्यारे साचा दिलथी रिजया सरकार
सहस्त्र पगार छेरे राजनगरमा छे जज
ससुधारानो स्तंभ छेरे कुडके किर्ती मोठे ध्वज किरण

पद

सरकारी नोकर थई राख्यो व्यवहारिक संबंध
जुठी प्रतिज्ञा लाच विषय वळी संग्रह रचवी निबंध
कन्या शाळा पुस्तकशाळा शाळा ऐ हुशीलो
रावबहादुर निराधारनो वगसग अने वशीलो
आगम निगमना ग्रंथो लख्या संस्कृत माथी शोधी
नवी सभाओ किधी बहु लोकोने बोधी
बाळलग्न अटकाव कऱ्यो ने पुनरविवाह प्रसराव्यो
घरना प्रमुखे एकच बिज्यो न थी बनाव्यो
सभा प्रसंगोपात भराय त्यहा फंड करे जे ठाम

यथाशक्ती त्यहा नामो अपणा लखी पोताने नाम
फर्स्ट नंबर फारसीमा कहिये संस्कृत विशे सुजाण
इंगरेजीमा आदि नंबर बहु विद्यानु वखाण
स्मृतीशास्त्र नीतनवजुथेनी कथा सुणे वई कान
भलो पुरुष भाषण करवामा उपकारमा भगवान
वेदधरमपर मननी वृत्ती शिवपूजनपर प्रीत
परमार्थीने पुरोप्रमाणिक स्वदेश इच्छक हीत
विद्यार्थिने फकीर भिकारी भिक्षुक ब्राम्हण बटोना
खाली हाथे फरे न पाछा त्या जई कीजे पोहमा
वैदक केरा जहा विशेषे दवा गाठनी देछे
तनमननी पीडनो टाळक राव बहादुरे एछे
साधुसंत नवा कोई आवे देवे भाव सहीत
जोतिषी जोशी साथे भई वाद करे छे प्रीते
गणीतमापण ज्ञान मिळवी सौविद्या सरिते
सागरनो न मळे सो कोशेच किनारो

पद

बाळ मा बाप पासे मांगे भडगण तो खिजवा लागे
पुस्तक मागे तो तनने प्रहारे चढे रा. ब. तेनी वाटे
कोना पुस्तक आपे प्रेम आणि भलामण आपे अशक्त जाणे
नर नोकरी शोधतो आवे शिफारस करी धंदे चढावे
भले अन ओळखीतो जो होय एवो करुणानिधी नथी ले थाय
मे जो जोईने एकच रह्‍यो हुतो रावनी कीर्ती ने मोह्‍यो
अनुभव करी औषध बनाव्यो लोक मफत लेवाने आवे
घडी पछीनी नही एनी चिंता जाणे जे छे एनी ओळखीता
वृद्ध युवा वामाओ आवो बेटी जाणी राह बनावे
कोई सुतनी आवे फर्यादे कोई आवे पतीनी दादे
बहुनु सिखव्यु सुत करे छे कई द्वारा एमज उग्रे छे
मारो सोक्री मने दुःख दे छे कई कामनी एक कहे छे
मारो डिक्रा मने नथी गणता मारे छोकराथी नथी मळतो
एक नर भ्रमर आवी थाके रा. ब. मनमाही राखे
गुप्त उपकाने गुन्हा बतावे अरसपरसना असे समजावे
द्वी पक्षमा रहे समाधान एक राव आपे वरदान
गणती थाइजी आकाश ग्रहनी गणती थायतो रावना गुणनी
भले बीजा हशे बाणुलाख पण रावनी श्रेष्ठ होशाख

पद

श्रेष्ठी सकळमा शाख पडी गयी श्रोता लेसेजी
साबरमीतट अमे गया हता रा. ब. साथे वेरोजी
ब्राह्मणी एक गरीब बिचारी उभेली आगु ओठीजी
वेगळे रहीने सुतने सिखवे रावने दे पान बीडीजी

बाळक विचारो बीती फरे दूर उमर जेनी वरस आठजी
रावने मळवा हिंमत न चाले उपरा थाय उचारजी
एटलामा माग्यो रावनी नजरे तरत अने बुलाव्याजी
आवने भाई तू म्हारे वास्ते आ पान सु छु लाव्योजी
पान लई अने दक्षिणा दिधी बात किधी मुखवारजी
आवजे घेरे वळी एम किधु बोध दिधो बेसुमारजी
वरी कहू एक अचरज मोटु आप गया नडियादजी
एक स्त्री त्यारथी संगत आवी उतरी राव प्रसादजी
जमी करी पण घेर गम्यु नही कोरटमा आवी साथेजी
बालकने लई बाईने पोते बैसावी कोरट माथेजी
तमे शु कोड छे निकळयो सासरोमा सुख गेऊजी
फरी पती परणे छे शु तारो बापना बोल्या जेऊजी
डिकरीने जेम बाप पुछे तेम पोते पुछे दिल आपिजी
क्रोध कामुनु वास मळे नही कहणेसे तेणे कदापिजी
एवा एवा जो दाखला दाखु पुस्तक मोटी थाय पुरावाजी
लखता अखी उमर थसे बडा पुरुषना वखाणजी
शेष समर्पण भार लखे नही रावतणा गुण गाता जी
जोशी आत्रे तो नामीका बांधे रा. ब. बतावे ज्ञानजी
जेमातेमाथी गुणग्रहण करे तेथी करे बातजी
भले अने ऋद्धिसिद्धी मळी अन रुदय थया हळीवा बारजी

## गरिबी

महापद पाम्या ये पुण्ये रे ओवेनी मोटा —टके
सुक्ष्मदर्शन जेवा अल्प होय प्राणी एवा
कही ने देखाडे केवार ओवेना १
सरदारोनी शिरताज मत्मथीने महाराज
पण जाणे जोगी राज रे ओवेनी २
त्रिसवंत नोकर सारा मा रहेमाश
सभा तो मोठा विचारा रे ओवेनी ३
वाटे जता मोटा होई ओळखी न शके कोई
तेने बहु मोठा तोमरे ओवेनी ४
वरश्री वेशाले घेरे न होय मोटाने मंदीर
भाव जेना फार फेर रे ओवेना ५
अज्ञानी जो इजा करे क्रोधपण कदि न धरे
समर्थ थई क्षमा धारे रे ओवेनी ६
अदिलानु दिठुं हशे छोटा कभी मोटा थशे
छते छलकाई जसे रे ओवेनी ७
अवसे दिवस एकादो करे मम किंकर तगादो
सादो जिते राय जादोरे ओवेनी ८
कृत्रिम मोठा निरामे खुदरती मोटा जे जामे
अचळमदो पामे रे आवेनी ९

पद

वैदकने थी वैदक लईनी तनमा हरे उताप
नाम सुने गुणवान जणु त्या सय सिधाने आप १
घेर भवा माने बुलावी बोध करे बद्द सारो
नवा नवा कहे नाटक काढो धंदो छे जी तमारो २
जेने देखे तेने पुछे कशु थसे छो काम
नाम तमारा सु छे करीने पुछे रहवा नो गाम ३
नात जात पुछीले पळमा आप करे ओळखाण
जाणे जगत बधीनो गरजु मन मोठा महाराज ४
एक वखत निज घेरे रसोयो चाकरने आपे
रसोई घरमा माथु चढयु चाकरते नव चापे ५
चाकर कहे ते घृत नथी मुक्यो भले हवे परमारे
आव्यो ताज रसोयो ने बहु चाकर चाले बहारे ६
रावे सर्व हकीकत सामळी उठ्या निद्रा छोडी
चाट्यु शिररसोयोने ने आवी निद्रा घडी ७
जाणे दिल रसोयो तेथी चाकर माथु चाट्यु
ते गुणने बदले चाकरने घृत रसोयो आप्यु ८
चाकर कहे केकु प्रतत लीधु एम कही फुलाव्यो
कहे रसोयो ते शिर चाट्युं हु छु दिलना ए वो ९
माटे मे तुजने घृत आप्यु ए दिले गडबड जाणी
राव रसोयाने बिचारे ते सिर पीडा त्यागी १०
ज्याहा ज्याहा लिधी नोकरी त्याहा त्याहा प्रेमा जगाडी
जे पृथ्वीवर रावे पगलु जरा हशे मांडेलु
ते पण आजी सभारती हशे कळवाने मोटु वेल्हु
ते तरू बीचे पण राव हशे उभेला
ते तरू पण झुरीझुरीने हशे सुकाई गयेला
जेणे जगत बधाने जोइ मनमा समजो साथ
पण जो रावना कन्यान दर्शन जिवतर तेनु व्यर्थ
नई मनोनी कीर्ती पुछो तेथी नजर न्यारी
सुरज उभ्यो रहेत छानु संशय मनना टाळो

आशिर्वाद

घणु जीवो घणु जीवो घण घणा काळ। देशमुख कुळ दिप्ती घुणु जीवो राव
कुळदिवो कुळदिवो राव गोपाळ। देशमुख कुळ दिप्ती घणु जीवो राव
स्मालकॉजना जज आजे अहमदाबाद। नरनारी अहर्निश तमे करे याद
धज धज जज पणु तारू जरूर। जोई जोई प्रगटे आनंद आम ऊर
फुलैड बधाविषे राव बहादुर। मारी ये प्रार्थना करी प्रभुनी हजुर

(हे काव्य अपुरे आहे कारण गुजराथ विद्यापीठातील प्रत खराब झाली आहे. त्यावरून घेतलेल्या फोटोप्रतीवरून हे देवनागरीत लिहिले आहे.)

— संपादिका

# लोकहितवादींच्या रोजनिशींतील कांही उतारे

(संपादक– शरदचंद्र वामन रानडे, बी. ए. नागपूर)

हप्ता पहिला

माझे वडील, पुण्याच्या "ज्ञानचक्षु" साप्ताहिकाचे संपादक, कै. वामन बाळकृष्ण रानडे यांच्या, माझ्या संग्रही असलेल्या, कागदपत्रांत त्यांनी स्वहस्ते मोडीत लिहिलेले लोकहितवादींच्या रोजनिशींतील काही उतारे उपलब्ध झाले, ते खाली दिले आहेत.

माझ्या वडिलांच्या कागदपत्रांतील काही महत्त्वाचे कागदपत्र 'तरुण भारता'तून सवडीने क्रमशः प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

खालील बहुतेक माहिती रा. ब. गोपाळराव हरी देशमुख यांचे स्मरणवहीतून घेतली आहे. ही फार उपयोगी वाटल्यावरून घेतली. कारण ती फार निवडक योग्य रीतीने दिलेली आहे. गोपाळराव हरी देशमुख सारखा पुरुष फारच विरळा होय.

या महाविद्वानाचा जन्म फाल्गुन शु. ८ शके १७४४ ता. १८ फेब्रु. २३. (१८२३)

यांचे पत्नीचा जन्म ३० मार्च २४ ह्या दिवशी. (१८२४)

उभयताचा विवाह सन १८३० मध्ये झाला म्हणजे अर्थात गोपाळराव यांचे ७ वर्षाचे व त्यांच्या पत्नीचे ६ वर्षांचे वय होते. एक वर्षाचे अंतर.

गोपाळराव यांचे तीर्थरूप रा. हरीभाऊ देशमुख १६ मे, ह्या दिवशी वारले. तेव्हा गोपाळराव यांचे वय सारें १४ वर्षांचे होते. (१८३७)

८ फेब्रुवारी १८४१ रोजी गोपाळराव इंग्रजी अभ्यास करावयास शाळेत गेले.

गोपाळराव हरी यांनी १६ ऑक्टोबर १८४४ रोजी चाकरी पत्करिली.

२३ सप्टेंबर १८४९ तुळसीवात ज्ञानप्रकाश.

१ डिसेंबर १८५० गोपाळराव हरी हेडक्लार्क झाले.

१ मे १८५२ रोजी गोपाळराव हरी शिरस्तेदार झाले.

१ ऑक्टोबर १८५२ मुनसिफ झाले.

१७ फेब्रुवारी जेआय.एस.ए. १८५२

२१ मे १८५३ पुन्हा मुनासिफ झाले.

१० फेब्रुवारी १८५५ एस. ए. जेआय. S. A. JI

२२ फेब्रुवारी १८६२ नगरास असिस्टंट जज्ज झाले.

सप्टेंबर १८६५ मध्ये अमदाबादेस स्मालकॉझ कोर्टचे जज्ज झाले. पगार एक हजार रुपये.

११ मार्च १८६१ कांही दिवस घरी बसविले.

४ मे १८६१ सदर अदालतीत लागले (१)

ऑक्टोंबर १८३९ हवेली कचेरीत वगैरे उमेदवारी करीत होते.

१८४५ साली मुंबईत परीक्षेस गेले परंतु नापास.

१८४६ साली पुन्हा मुंबईस परिक्षेस जाऊन पास.

१८४९ साली कुटुंब कलह लागला.

१८४६ सालीं विनायकराव देशमुख वारले.

१८५२ सप्टेंबर १ रोजी साताऱ्यास गणेश चतुर्थीचे दिवशी जाऊन तेथुन वाईस आले. धाकटा मुलगा कृष्णा याची मुंज करून साताऱ्यास गेले व कामावर रुजू झाले.

१२ जुलई ५३ रोजी वाईस कृष्णास महापूर येऊन पेठ वगैरे वाहून गेली. पूर्वीही २-३ दिवस महापूर आला होता.

२१ जुलई ५४ रोजीं गोपाळरावजींची पहिली मुलगी वारली.

२६ फेब्रुवारी ५५ रोजीं रामभाऊंची मुंज झाली.

१४ मे ५७ रोजीं रघुनाथतात्याची मुंज.

२२ जुन ५७ रोजीं साताऱ्यास मानसिंग यास फाशी दिले.

२२ नोव्हेंबर ५७ रोजीं गोपाळराव हरी वासोट्यास गेले.

४ दिसंबर, ५७ रोजी विजापुरास गेले.

१ ऑक्टोंबर, ५८ धूमकेतू १५–२० दिवस सारखा मोठा दिसत होता.

१ नवंबर ५८ राणीचा जाहीरनामा पुण्यात संगमावर क्यानन साहेबांनी दरबार भरवून वाचला.

२० नवंबर, ५८ तांदुळवाडीस देशमुख गेले.

२४ मार्च ५९ कृष्णाचें लग्न.

१८ नवंबर ५९ ढमढेरे यांचे घर जळाले.

२८ मार्च ६० रोजी कोरेगांवास गेले.

४ एप्रिल ६२ चैत्र शुद्ध ४ शुक्रवार ४ घटकांची नानाची मुंज झाली. २३ एप्रिल रोजीं सोडमुंज.

९ एप्रिल ६२ आपांची मुंज चैत्र शके १० बुधवार घटी ५, ३० एप्रिल सोडमुंज.

४ एप्रिल ६२ मुनसफीची परीक्षा सुरू झाली–मुंबई.

१२ एप्रिल ६२ मुनसफीची परीक्षा समाप्त.

१६ ऑगष्ट ६२ अर्जी केली व २० ऑगष्ट रोजी फ्रयर साहेब यांची सूचना आली की, स्मॉल्कॉझ कोर्ट पुणे ही जागा मिळेल.

५ सप्टेंबर ६२ बिन्ही साहेबाने खबर दिली की, अहमदाबादेस ॲक्टिंग नेमतात.

७ सप्टेंबर ६२ सरकारचें पत्र आलें की अमदाबादेस जावे. त्याच दिवशी पुण्यास रात्री १२ वाजता गेले.

८ सप्टेंबर ६२ फ्रयर साहेब, एलिस साहेब, गव्हर्नर साहेब वगैरेंच्या भेटी झाल्या हावर्ड हा भेटला.

९ सप्टेंबर ६२ मंगळवारी भेटी वगैरे घेऊन चिठ्या घेतल्या. सायंकाळी ढमढेरे यांचे घरी जेवून मध्यरात्रीस निघालो तो मुंबईस आलो.

१६ सप्टेंबर ६२ मुंबईहून १० वाजतां आगगाडीत बसलों ते आगबोटीवर आलों संध्याकाळी आगबोट चालू झाली बरोबर घोडेस्वार व ब्राह्मण दाजीबा होता. मंगळवार-पुढे गुरुवारी सुरतेस पोहोचलो.

सुरतेस १८ सप्टेंबर पर्यंत आपाजी रामचंद्र यांनी चांगली बरदास्त ठेवली. १९ सप्टेंबर ६२ रोजी अमदाबादेस जाण्याकरिता रेल्वेत बसलों वाटेने तापी, नर्मदा, महाचे पूल चमत्कारिक पाहिले.

२० सप्टेंबर ६२ शनिवारी अमदाबादेस दाखल.

२१ सप्टेंबर ६२ रविवारी जज्जसाहेब यांची भेट घेतली. फार चांगले माणूस.

२२ सप्टेंबर ६२ सोमवारी शपथ घेऊन चार्ज घेतला.

जगजीवन याचे घरी होते तेथून भद्रेत दिवाणचे घरी ५ ऑक्टोंबर ६२ रोजीं आले.

४ नवंबर ६२ मंगळवारी रात्री कांमीरन साहेब चार्ज देऊन कलकत्त्यास परत गेले.

गणपतीची बायको सौ. सरस्वतींचे ११ नवंबर ६२ कार्तिक व. दुंदुभी नाम संवत्सरी गर्भादान झाले.

खांडेराव महाराज गायकवाड २० जानेवारी ६३ शुक्रवारी अमदाबादेस आले या वेळी सांडविथ साहेब जज्ज याचा अपमान झाला.

३ मार्च ६५ शुक्रवारी नगराहून शनिवारी पुण्यास पोहोचलो. ह्याच दिवशी आई वारल्या मुर्छा वायू व अर्धांगवायू फाल्गुन शु. ७

रंगपंचमी, शुक्रवारी निघालो तो दौंडाकडून, नगरास तारीख १८ मार्च ६५ रोजी पोहोचलो.

२७ मार्च ६५ सोमवार रोजी मुंबईस रजा घेऊन.

मंगळवारी पाडवा निंबगांवी धारगांवी भीमातीरी त्याच दिवशी २८ मार्च ६५ दौंडहून पुण्यास.

बुधवारी सकाळी पुण्याहून मुंबई मुरारजी गोकुळदास यांचे घरी गिरगांवात.

गुरुवारी गव्हरनरचे दरबारास व रात्री भेटीस

शनिवार १ एप्रिल महालक्ष्मीस संध्याकाळी मुलींची परीक्षा सुरु.

सोमवार ३ तागाईत ११ मंगळवार पर्यंत परीक्षा मुनसफीची.

८ एप्रिल शनिवारी टौनहालांत युनिव्हर्सिटी कॉनव्होकेशन

बुधवारी १२ एप्रिल मुंबईहून निघालो तो इगतपुरीस मुक्काम नरसय्या मामलेदार होते.

गुरुवारी १३ एप्रिल ६५ चाळींसगावी दाखल. संध्याकाळी निघून हिरापुरावरुन कोतगांवी परधाणीचे घाणीचे घाटावरुन जातेगावी. तेथून पुढे वेरुळास उजाडतां आले.

शनिवारी १५ एप्रिल ६५ वेरुळास लेणी पाहून रोज्यावरून घाटावाली दौलताबादेस गेले.

रविवारी १६ एप्रिल ६५ संध्याकाळी औरंगाबादेस

सोमवारी १७ एप्रिल ६५ निघाले ते टोक्यास दुसरे दिवशी सकाळी पोहोचले.

मंगळवार १८ एप्रिल प्रवरा संगमी स्नान करून संध्याकाळी नेवाशास गेले व मोहोनीराजाचे दर्शन घेतले.

बुधवारी १९ एप्रिल घोडगांवी राहून संध्याकाळी निघून गुरुवारी २ तारखेस नगरास दाखल झाले.

तारीख ३० एप्रिल ६५ अकानरेल येथे शाळा पाहिली. जहागीरदाराची बाग पाहिली. संध्याकाळी पुष्कळ पाऊस पडला.

१९ जून ६५ गुरुवारी पुणे येथे आले.

वामोरीस ६ ऑगष्ट ६५ रविवारी डोंगरगाव कडून परत.

मुंबईस बदली झाली पत्र ता. १३ ऑक्टोबर ६५.

पगार बंद म्हणून कर्ज काढून जाणे भाग कधी कर्ज नाही असे होत नाही. पुण्याहुन सातान्यास गेलो वाईस गेलो तरी कर्ज होतेच. ते तेथून फेडले तेथुनचें कर्ज नाशिकाहून फेडले. नंतर मुंबईहून फेडले. मुंबईचे पुण्यास फेडले. अमदाबादचे नगराहून आणि आतां नगरचे मुंबईहून फेडले. याप्रमाणे बरकत आहे. (!!!)

१ एप्रिल ७० पुण्यास सार्वजनिक सभा स्थापन झाली.

ता. २९ एप्रिल ६९ अधिक वैशाख व. ३ गुरुवार १७९१ गावळकोंडा आगब टावर कृष्णाजी गोपाळ देशमुख विलायतेस गेले. सामानावगैरे बद्दल रु. ५,००० खर्च झाला. बरोबर नारायण काळे यास पाठविले.

मुंबईस १५ जून ६९ पुनर्विवाह झाला.

ता. २० मे ६९ ठाकूरद्वारी सभा भरून.

३ ऑगष्ट ६९ ला जनार्दन सखाराम गाडगीळ बडोद्यास आले.

२३ ऑक्टोंबर ६९ खंडेराव महाराज याणी इंग्रजी नाच नाचतात तो पाहिला व मडमास कंठ्या वगैरे बक्षीस दिल्या.

तारीख २५ ऑक्टोंबर ६९ कृष्णराव गोपाळ पत्नी राधाबाई इजला २ रा मुलगा झाला.

ता. ५ नोव्हेंबर ६९ बारसे झाले मुलाचे नाव वासुदेव ठेविले.

डिसेंबर १ – ६९ भाऊ सिंदे बरतर्फ झाले.

मार्च २५–७० कृष्णशास्त्री चिपळोणकर यांचे प्रायश्चित ठरले.

२२ मे ७० खड्गधारेश्वरी गोपाळराव हरींनी लोकांच्या आग्रहावरुन प्रायश्चित केले.

श्रीखंडेराव महाराज मयत चंपाषष्ठी मार्गशीर्ष शु. ६/१७९२ तारीख २८ नोव्हेंबर ७० अकस्मात तारीख १२ डिसेंबर ५६ राज्यावर बसले होते.

राजाराम महाराज छत्रपती इतालित फ्लोरन्स येथे वारले. तारीख ३० नवंबर ७० उमर २० वर्ष

ता. १२ फेब्रुवारी ७१ चिमणाजी पंडीत सचीव भोरकर वारले.

१७ फेब्रुवारी मोरोबा कन्होबाने बायको सुद्धा जीव देऊन मेले.

विष्णूबाबा ब्रह्मचारी १८ फेब्रुवारी ७१ वारले.

५ जुलाई ७१ खंडेराव महाराजास मुलगी झाली. ताराबाई नाव ठेविले.

मल्हारराव महाराजांस वस्त्रे श्रावण व. १० १७९३ ता. १० ऑगष्ट ७१ रोजी मिळाली.

विष्णू परशुराम रानडे ता. ८ ऑगष्ट ७१ वारले.

लार्ड मेयो १५ फेब्रुवारी ७२ रोजी मारेकरी याणे मारिले.

ता. २७ फेब्रुवारी ७२ प्रिन्स ऑफ वेल्स करितां सर्वत्र प्रार्थना झाली.

वैशाख व ४ रविवार १७९४/२६ मे ७२ श्री गोपाळराव भैराळ यांनी बडोद्यास देह ठेविला. नारायण शास्त्री साठे यांची पत्नी लक्ष्मीबाईंनी याच दिवशी नाशिकास वारली.

डॉ. विनायकराव लिमये पुण्यास वारले. ता. १७ नोव्हेंबर ७२

**कोल्हापूरची माहिती :–**

१८१२ इसवींत कोल्हापूरकर राजा वारला. म्हणून मुलगा दत्तक घेतला.

१८२१ सदरहून मुलगा मारला गेला. त्याचेमागून त्याचा भाऊ आला. त्याचे नाव बोवासाहेब.

१८३० बोवासाहेब मेले. १८४४ दगा झाला.

१८६६ राजा मुलगा दत्तक राजाराम महाराज. २९ ऑक्टोंबर रोजीं दरबार ता. ९ ऑक्टोंबर ६८ कारभार आला.

१८७० राजाराम महाराज विलायतेस गेला. मे.

१८७१ श्री. ताराबाईस दत्तक शिवाजी महाराज दिनकरराव भोसले यांचा मुलगा ता. २३ ऑक्टोंबर

[अपूर्ण – साप्ताहिक तरुण भारत रविवार ता. १४-१०-१९५६ च्या सौजन्याने]

[मूळ टिपणाप्रमाणे दिनांक घेतले आहेत.]

**कै. वामन बाळकृष्ण रानडे**

(लोकहितवादींचे लेखनीक त्यांची कागदपत्रे यांनीच जपून ठेवली)

आमचे वडील वामनराव हे नाशिक येथे पंचवटीत बाळकृष्णशास्त्री म्हणून मोठे विद्वान शास्त्री होते. त्यांचे वडील चिरंजीव होते. त्यांचा जन्म शके १८७६ म्हणजे सन १८५४ मध्ये झाला. घरच्या अत्यंत गरिबीमुळे त्यांना शाळेतील अभ्यासक्रम पुरा करतां आला नाही. तरी संस्कृत विद्या घरचीच असल्याने तिचे ज्ञान त्यांना चांगले झाले होते. वयाच्या १४ व्या वर्षीच ते वर्तमानपत्रांत लेख लिहू लागले. प्रथम "इंदुप्रकाश"चे बातमीदार म्हणून पत्रे ते पाठवीत. तसेच विद्यार्थिदशेतच ते "नाशिकवृत्ता"चही संपादक झाले. १८७९ मध्ये ते "लोकहितवादी" या नावाने प्रसिद्ध असलेले रा. ब. गोपाळराव देशमुख यांचे जवळ राहिले. "लोकहितवादी" यांच्या ग्रंथाची कच्ची टिपणें वामनरावाचे हातूनच होत त्याच अवकाशात ठाणे येथील "हिंदुपंचा"-चेही संपादकत्व त्याजकडे आले. ते त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांजकडे होते. "सूर्योदय ही त्यांनी बरेच दिवस चालविला. रा. ब. गोपाळराव देशमुख यांचेकडील काम संपल्यावर वामनरावांनी १ मे, १८८४ पासून "ज्ञानचक्षु" चे संपादकत्व पतकरिले, व ते काम अखेरपर्यंत, म्हणजे ता. २२ ऑगष्ट, १८८९ मध्ये प्लेगने त्यांस हिरावून नेईपर्यंत पहात होते. हिंदुपंचातील काही प्रकारणे फार मनोरम आहेत. तशीच "ज्ञानचक्षु"तील तत्कालीन पुरुषांची चरित्रमालाही फार लोकप्रिय झाली होती. ते राष्ट्रीय सभेचे मोठे भक्त असून ती वारी चुकवित नसत. समाजसुधारणावादी सुधारक पक्षाचे आसल्याने आप्त वगैरे कडून झालेला त्रास त्यांनी धैर्याने सोसला. लो. टिळक वगैरेनी एक सुधारणावादी संघ काढून तयार केलेल्या प्रतिज्ञापत्रकांत वामनरावांची सही ५ वी दिसते विनोदी व मनमिळाउ स्वभावामुळे त्यांचा मित्रपरिवार फार मोठा होता. ते विलक्षण मार्मिक व संग्रही होते. लेख, टिपणे, कविता, स्फुटे फोटो वगैरेंचा त्यांचा संग्रह मित्रमंडळीत मोठा कौतुकाचा विषय असे.

## लोकहितवादी वाङ्मय – ग्रंथांची यादी

| पुस्तकाचे नाव | प्रथम प्रकाशन |
|---|---|
| (१) लक्ष्मीज्ञान | १८४९ |
| (२) महाराष्ट्र देशातील कामगार लोकांशी संभाषण | १८४९ |
| (३) सरकारचे नोकर आणि सुखवस्तु हिंदुस्थानातील साहेब लोकांशी संभाषण | १८५० |
| (४) यंत्रज्ञान | १८५० |
| (५) शब्दालंकार | १८५१ |
| (६) खोटीशपथ वाहू नये आणि खोटी साक्ष देऊ नये याविषयी लोकांशी संभाषण | १८५१ |
| (७) पुष्पवन–गुलिस्तान | १८५१ |
| (८) भरतखंड पर्व | १८५१ |
| (९) लोकहितवादीकृत निबंध संग्रह हे अनेकप्रकारच्या विषयावरील उपयुक्त लेख | १८६६ |

(१०) आगम प्रकाश (गुजराथी) १८७४
(११) निगम प्रकाश (गुजराथी) १८७४
(१२) हिंदुस्थानला दारिद्र्य येण्याची कारणे १८७६
(१३) जातीभेद १८७७
(१४) भिक्षुक १८७७
(१५) पानिपतची लढाई १८७७
(१६) हिंदुस्थानचा इतिहास (पूर्वार्ध ८) १८७७
(१७) ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती-भाग पहिला १८७७
(१८) बोधपत्र १८७८
(१९) सुभाषिते अथवा बोधवचने १८७८
(२०) ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती भाग दुसरा १८७८
(२१) गीतातत्त्व १८७८
(२२) अश्वलायन गृह्य सूत्र १८८०
(२३) स्वाध्याय १८८०
(२४) ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती १८८०
(२५) ग्रामरचना–त्यातील व्यवस्था आणि त्याची हल्लीची स्थिती १८८३
(२६) स्वदेशी राज्ये व संस्थाने १८८३
(२७) स्थानिक स्वराज्य संस्था १८८३
(२८) दिल्लीचे शेवटचे क्षत्रिय राजे–पृथ्वीराज चव्हाण १८८३
(२९) पंडितस्वामी श्रीमद्दयानंद सरस्वती १८८४
(३०) गुजराथचा इतिहास १८८५
(३१) लंकेचा इतिहास १८८८
(३२) राजस्थानचा इतिहास–(उदेपूरचा इतिहास) १८९४
(३३) सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास १८९९
(३४) स्फुटलेख
(३५) भ्रूणहत्या –Infanticide

या समग्रवाङ्मय ग्रंथात छापता न आलेले ग्रंथ (न मिळाल्यामुळे)

(१) पदनामा १८५०
(२) होळीचे दुराचारनिषेध निबंध
(३) वेदाविषयी १८६३
(४) ब्राह्मण कन्याविवाह विचार १८६४
(५) पुरुषसूक्तव्याख्या १८६४
(६) कलीयुग १८७७
(७) विद्यालहरी
(८) एक दिवसात लिहीलेले पुस्तक
(९) हिंदुस्थानातील बालविवाह
(१०) सौभाग्यरत्न
(११) समाधान

# लोकहितवादी समग्र वाङ्मय

## खंड १ ला–प्रस्तावना

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी अनेक विषयावर विपुल लिखाण केले. हा पहिला खंड म्हणजे विविध विषयावरील लिखाणाचा संकीर्ण संग्रह आहे. अनेक विषयावर लिहिलेली छोटी छोटी पुस्तके व लेख या सर्वांचा हेतु एकच आपल्या लोकांना अनेक विषयांची माहिती करून द्यावयाची व आपले विचार सर्वांपर्यंत पोचवावयाचे–थोडक्यात म्हणजे समाजप्रबोधन करावयाचे. या संकीर्ण लिखाणाचे विषय पाहिले तर गोपाळरावांच्या विश्वकोषवत् विद्वत्तेची कल्पना येते. त्यात लक्ष्मीज्ञान किंवा हिंदुस्थानला दारिद्य येण्याची कारणे या सारखी अर्थशास्त्रावरील पुस्तके आहेत. ग्रामरचना, स्थानिक स्वराज्य यांचा विचार आहे. 'यंत्रज्ञान' सारखे पदार्थविज्ञानावरील लिखाण सापडते व हिंदुस्थानातील भिकारीवर्गावरील पुस्तकही यात आहे. याचबरोबर सर्व व्यवहारात नैतिक वर्तणूक महत्त्वाची आहे असा विचार मांडण्यासाठी लिहिलेली खोटी शपथ वाहू नये, बोधवचने, बोधपत्रे यासारखी पुस्तकेही आहेत. त्यातील ऐतिहासिक गोष्टीवरील (भाग पहिला) पुस्तक म्हणजे तर एक कोशच हाती आल्यासारखे वाटते. जोंधळ्याच्या व तांदळाच्या जातीचे त्यात वर्णन आहे, तोडे लोक काबे लोकापासून साधूसंताबद्दल माहिती आहे. तर गोवेकरणी पासून वेदान्तापर्यंत अनेक लहानसहान व मोठमोठ्या गोष्टींवरील टिपण्या आहेत. त्यांचा भ्रूणहत्येवरील (Infanticide) लेख त्यावेळची परिस्थिती तर दाखवतोच पण आजच्या काळात करण्यात येणारी शास्त्रीय पद्धतीने चाललेली भ्रूणहत्या त्यावेळेपेक्षा वेगळी नाही हे पण दाखवते. त्यामुळे तो लेख आजही कालोचीत वाटतो.

यातील प्रत्येक पुस्तकात भरपूर माहिती व लोकहितवादींचे परखड विचार वाचावयास मिळतात. त्यामुळे त्यांचे लिखाणाबद्दल कुतुहल जागृत होऊन त्यांचा समग्रलक्षी विचार माहित करून घ्यावासा वाटल्यास त्यांचा मूळ हेतू–समाज प्रबोधनाचा-साध्य होईल. लोकहितवादींच्या वाङ्मयाला माझ्या सारख्यांच्या 'भलामणी' ची गरज नाही. ते स्वयंसिद्ध आहे. ते उपलब्ध करून देण्यात मला आनंद आहे.

इंदुमती पारीख

# *Political Economy*

# लक्ष्मीज्ञान

महाराष्ट्रदेशांतील

"कामदार लोकाशी संभाषण"

या ग्रंथाचे कर्त्यानें हा ग्रंथ

क्लीफ्ट्साहेबांच्या इंग्रजी ग्रंथाचे

आधारानें केला.

ज्ञानप्रकाश छापखान्यांत

पुणें येथें

छापिलें.

संन् १८४९

किंमत १० आणे

## अनुक्रमणिका


| | | | पृष्ठापासून | पृष्ठापर्यंत |
|---|---|---|---|---|
| प्रस्तावना | | ग्रंथाचे हेतु | १ | ७ |
| प्रकरण | १ | ज्ञान | ७ | २० |
| प्रकरण | २ | उद्योगाचे विभाग | २० | २८ |
| प्रकरण | ३ | क्रयविक्रय | २८ | ३६ |
| प्रकरण | ४ | भांडवल | ३६ | ४६ |
| प्रकरण | ५ | निर्भयपणा | ४६ | ५३ |
| प्रकरण | ६ | किंमत | ५३ | ६० |
| प्रकरण | ७ | धारा, नफा व मजूरी | ६० | ७६ |
| | | हिंदुस्थानाविषयी विचार | ७६ | ८७ |

## विल्हेवारी


| | |
|---|---|
| शाहाणपण हीचलक्ष्मी | ९-७३ |
| श्रीमंत लोक | १८-४०-४२-७७-८२ |
| सकीर | ४६ |
| समाईकी | ७२ |
| स्त्रिया | ७९ |
| हिंदू लोक विद्येस तुच्छ मानितात | २० |
| हिंदूलोकांची स्थिती | ८३-८६ |
| हिंदूनी विद्या शिखावी | ७ |
| ज्ञान | १८-२५ |

| | पृष्ठ |
|---|---|
| अश्रित | ७२ |
| इंग्रजाची स्थिती | १३ |
| इंग्रजी युक्ती | १५ |
| इंग्रजी राज्य | ४४ |
| उद्योग | ६ |
| उद्योगाचे प्रकार | ८-२७ |
| उपयोगी लक्ष्मी | ३६ |
| ऐश्वर्याचें फळ | ६ |
| कागदाचा पैसा | ३५ |
| गरज | १० |
| जमीन | २-६२ |
| जात | १८-२५ |
| टंकसाळ | ३२ |
| दरदाम | ५३-६२ |
| धातू | ३३ |
| पैसा | १-३३ |
| फौज | २७ |
| भट | ७८-८० |
| मेहनतीचा संक्षेप | ३-२५ |
| मनुष्यास सुख | ५ |
| मनुष्याची स्थिती | १० |
| मनुष्याचे शाहाणपणाचा अनुक्रम | १३ |

| | पृष्ठ |
|---|---|
| राजधर्म | ४५-७३ |
| राजा विष्णूचा अंश | ६ |
| लग्ने | ७० |
| लक्ष्मीज्ञान | १-८७ |
| लक्ष्मीची व्याख्या | १ |
| लोकहिताची कामे | २३ |
| लोकदृष्टी | २३-६८ |
| लक्ष्मीची वृद्धी | ८ |
| विलायतेतील व्यापार | २१ |
| व्यापाराचे मूळ | ३१ |
| विद्वानाचा धर्म | ८२ |
| विद्या सर्वांनी करणे | १७ |
| वेतनें | ६५-७४ |
| शहाणपण हीच लक्ष्मी | ९-७३ |
| श्रीमंत लोक | १८-४०-४२-७७-८२ |
| सर्कार | ४६ |
| समाईकी | ७२ |
| स्त्रिया | ७९ |
| हिंदू लोक विद्येस तुच्छ मानितात | २० |
| हिंदू लोकांची स्थिती | ८३-८६ |
| हिंदूंनी विद्या शिखावी | ७ |
| ज्ञान | १८-२५ |

# प्रस्तावना

लक्ष्मीज्ञान ही येक विद्या आहे. यामध्ये लक्ष्मी म्हणजे काय व तीची उत्पती वृद्धी व तीची वाटणी लोकामध्ये कशी होत्ये याचा विचार केला आहे. या विद्येची उत्पती युरप खंडांत जाहली आहे यास्तव तिकडील देशांत या विद्येचे ग्रंथ फार आहेत. त्यांतील विषय स्वदेशीय लोकांस कळले असतां फार हित आहे. यास्तव हा लहानसा ग्रंथ केला आहे. लक्ष्मीची आशा सर्व लोकांस आहे व लक्ष्मीकरितां सर्व माणसें प्रयत्न करितात. परंतु वास्तविक लक्ष्मी कोणती हें कळत नाही. सामान्यतः बोलण्यांत पैक्यास लक्ष्मी समजतात. परंतु हें अज्ञान आहे कारण कीं मी जर सुखेंकरून निर्वाह व्हावयाचे पदार्थ धान्य वस्त्र इत्यादि नसतील आणि फक्त पैका असेल तर त्याचें मोल मृतिकेप्रमाणेही होणार नाही. यास्तव पैका ही लक्ष्मी नव्हे व जे पदार्थ निर्वाहास जरूर आहेत परंतु त्यांस किंमत न पडेल तरि तोहि पैका नव्हे. कारण कीं, वायु, उजेड, जमीन हे जिन्नस अवस्य पाहिजेत, परंतु ईश्वराने ते विपुळ निर्माण केले आहेत. सबब त्यांस किंमत नाही. यास्तव असले पदार्थही लक्ष्मी नव्हे. कोणी म्हणतात की जमीन सर्वांस पोसत्ये यास्तव हीच लक्ष्मी आहे परंतु हें बरोबर नाहीं. तुर्कस्थानांत जमीन चांगली आहे. परंतु राज्य वाईट व लोक अडाणी याजमुळें सुखी नाहीत व लक्ष्मीवान नाहींत. तसेंच अमेरिकाखंडांत कितीएक देश आहेत तेथे जमीन अशी आहे कीं येक बिघाभर जमीन पेरली तर पन्नास मनुष्यांस पुरे असे धान्य सापडेल. परंतु तेथील लोक क्षुधेने व थंडीनें मरतात व युरोप खंडात कितीएक देशांत बिघाभर जमीन पिकविली तर दोन माणसास पुरे इतकें धान्य निघते तथापि लोक सुखी आहेत, व कितीएक देश पहिले लक्ष्मीवान होते आणि तेच देश आतां दरिद्रानें पीडलेले आहेत. तेव्हां जर जमीनीत लक्ष्मी असती तर असें न होतें. हिंदुस्थान देश पांडवाचे वेळेस सुखी होता व अलीकडे तसा सुखी नाहीं, तेव्हां तेथील जमीन बदलली असें म्हणवत नाहीं परंतु दुसरें कांहींतरी कारण असावें.

यास्तव लक्ष्मी या शब्दाचा अर्थ असा आहे कीं मनुष्याचा उपजीविकार्थ व सुखार्थ जे जिन्नस पाहिजेत व असल्या ज्या जिनसाची किंमत होत्ये ते पदार्थ. तेव्हा या प्रकारची लक्ष्मी ईचा शिवाय मनुष्याचें जीवन होणार नाहीं हा ईश्वरी नेम आहेच, व दुसरा ईश्वरी नेम आहे कीं लक्ष्मीची प्राप्ती उद्योगाचेविना होणार नाहीं. तेव्हां उद्योगाशिवाय मनुष्याचें जीवन होत नाहीं हा निर्णय जाहला.

इतर प्राणी यांचा निर्वाह उद्योगाशिवाय होतो. त्यांस वस्त्राची वगैरे गरज नाहीं. तसेंच वृक्षादिकांस पानें ईश्वर देतो परंतु मनुष्यास धोंगडी विणुन करावी लागत्ये व अन्न पिकऊन खावें लागतें. तस्मात लक्ष्मी मेहेनतीने उत्पन्न होत्ये हें सिद्ध होतें. परंतु मेहेनतीचा पर्याय असा आहे कीं कितीएक रानटे लोकांचे देश व बेटें येथील लोक पराकाष्ठेची मेहेनत करितात व लाहान पोरापासून स्त्रिया, वृद्ध इत्यादि सर्व खपतात परंतु पुरतें अन्न मिळत नाहीं व कितीएक शाहणे लोकांचे देश आहेत तेथे मुलें बाळें व स्त्रिया काम करीत नाहीत. काम करणारे लोक थोडे असतात तत्रापि सर्वजण पुरतेपणी सुख भोगितात याचे कारण असें आहे कीं शाहणे बुध्दिपुरस्सर मेहेनत करितात, म्हणून नानाप्रकारचा युक्ती काढून बहुतांचें काम थोडेजण करितात आणि सुखाची वृध्दि करितात. जर जाते करावयाची युक्ती मनुष्यास ठाऊक नसेल तर दाहा माणसांचे पायली भर धान्य बारीक करावयास दहाजण मनुष्यें येक दिवस बसली पाहिजेत तेव्हां पीठ कदाचित होईल. जर खलबत्ता केला तर त्याहून थोडका वेळ लागेल, जर जातें केलें तर त्याहून थोडका वेळ लागेल, जर पवन चक्की केली तर त्याहून थोडका वेळ लागेल. त्याप्रमाणे टपाल टंक-साळ गाड्या शस्त्रें यांची व्यवस्था आहे. तेव्हा जितका बुद्धीचा व्यय करून मनुष्य मेहेनत करील

तितकी लक्ष्मी वाढेल यांत संशय नाहीं. यास्तव जे लोक बुद्धीचा उपयोग करीत नाहींत ते लक्ष्मीवान नसतात.

किती एक नीतिज्ञानविद्येविषयीं बोलणारे म्हणतात कीं लक्ष्मी पापाचें मूळ आहे. परंतु त्याणी लक्ष्मीचा दुरुपयोगमात्र जाणून असें लिहिलें आहे. लक्ष्मीचा उपयोग चांगला होईल तर त्यापासून फायदा सर्व लोकांचा होईल.

लक्ष्मीचा बाप उद्योग आहे आणि पुराणांत समुद्रमंथनापासून लक्ष्मी निघाली याचेंही तात्पर्य हेंच असेल कीं, सर्वांनी जेव्हां मेहेनत केली तेव्हां लक्ष्मी प्राप्त जाहली. लक्ष्मी देशांत किती आहे याची बेरीज त्या देशांतील लोकांचे मेहेनतीची बेरीज काढली म्हणजे त्याजवरून समजते. मेहेनत हीच मूळ लक्ष्मी आहे, सोनेंरूपें ही लक्ष्मी नव्हे. जें सुख मनुष्यास होतें व जें मनुष्यें खातात पितात हें सर्व मेहेनतीनें उत्पन्न होते.

मनुष्यास सुख व्हावयास दोन गोष्टी पाहिजेत. येक लक्ष्मी पुष्कळ उत्पन्न केली पाहिजे. आणि लक्ष्मीची वाटणी लोकामध्यें बरोबर केली पाहिजे. या दोनीं गोष्टी होण्यास सर्कार-----आहे आणि सर्कार कायदे करितात. -----हेच आहे कीं लक्ष्मी पुष्कळ होऊन-----लोकामध्ये व्हावी. ज्याप्रमाणें सर्कार----त्याप्रमाणें लक्ष्मीची व्यवस्था होईल.

पुराणांत असा लेख आहे कीं-----स्त्री आणि राजा विष्णूचा अंश. यांचे तात्पर्य असे दिसतें कीं राजाचे हातीं लक्ष्मीची व्यवस्था करणे आहे. म्हणून तीचें भर्तृत्व राजास कल्पिले आहे.

कोणते येका देशांत ऐश्वर्यवृद्धी होत्ये. याचें कारण असें आहे कीं त्या देशांतील लोकांची वृध्दी जाहली पाहिजे, व लोकांची अवस्था चांगली पाहिजे. लोकांस निर्वाहाकरिता पाहिजे त्याहून अधीक उत्पन्न जाहलें पाहिजे म्हणजे लोकांची वृध्दी होत्ये व लोक कळा कौशल्यादिक पाहूं लागतात. जर त्यांस निर्वाहापुरते पदार्थ नसतील तर लोक वृध्दी पावत नाहीं किंवा पदार्थ असून त्याची लोकांमध्यें चांगली वाटणी झाली नाहीं तरही लोक दरिद्री राहतात. जसे को-----कांस घोंगडी नसेल तर ते शालजोडी करण्याची विद्या ते शिखणार नाहीत. प्रथम घोंगडी-----नंतर अवकाशानें चित्तस्थीर आणि-----त्यास ते पाहातील.

असा विचार या विद्येत केला आहे याजकरितां ही विद्या जाणणें हें सर्वांचें हित आहे. लक्ष्मीची उत्पत्ती व लक्ष्मीची वाटणी ही कोणत्या नियमाप्रमाणें घडतात याचा विचार या ग्रंथांत संक्षेपेकरून करूं. व ज्ञानापासून कितीयेक वाकड्या समजुती दूर होतात व राज्यकर्ते यांस व लोकांस या ज्ञानाचे लाभ बहुत आहेत आणि या ग्रंथांचा उपयोग लोकांस होऊन त्यांची सुधारणा जाहली म्हणजे ग्रंथ करणाराचे श्रम सफल होतील. स्वदेशीय लोकांस हा विषय नवीन वाटेल, यास्तव त्याणी लक्ष पुरऊन या ग्रंथाचे अध्ययन केलें पाहिजे.

"लोकहितवादी"

## प्रकर्ण १

# ज्ञान

लक्ष्मीचे वृद्धीचें मुख्य कारण शाहाणपण. लक्ष्मीची उत्पत्ती मेहेनतीनें होते व ज्या योगानें मेहेनतीची वृद्धी होत्ये त्याच योगानें लक्ष्मीची वृद्धी होत्ये. मेहेनत दोन प्रकारची आहे, येक शरीरें-कडून व येक मनेंकडून. परंतु मन हें शरीराकडून कर्म करविण्यास साधन आहे. यास्तव ही दोनीं हात आणि कुऱ्हाड या दोहोंचे संगमाने लाकूड तोडतात. त्याप्रमाणें मेहेनत करतात. तत्रापि किती-येकांचे कामात मनाचा व्यापार फार होतो व कितीयेकांचे कामांत शरीराचा व्यापार होतो. जसें न्यायकर्ते व ग्रंथकर्ते यांस मनाची मेहेनत फार असत्ये आणि मजूरदार वगैरे यांस शरीराची मेहेनत फार असत्ये.

मेहेनतीची वृद्धी होण्याची चार कारणें आहेत, येक शाहाणपण १ दुसरें येकयेकानें वेगळा वेगळा व्यापार करणें २ तिसरें लक्ष्मी जमिवणें व त्याचा उपयोग करणें ३ व लक्ष्मी जास प्राप्त होईल त्याणें निर्भयपणानें भोगणें. या चोहों कारणाचा तपशील पुढें लिहिला आहे.

शाहाणपण पाहिजे याचें कारण असें आहे कीं जर मनुष्यानें चाती व राहाट सूत काढावयास केला नाहीं आणि हातानें कापूस विणीत बसला तर वस्त्र कसें होईल. विहिरीतून पाणी मोटेनें काढावें ही युक्ती जर अक्कल चालऊन काढली नसती, येक बिघाभर जमीनीस पाणी शिंपायास किती माणसें खपवावी लागतीं? व्यापार वेगळा वेगळा पाहिजे याचें कारण असें आहे कीं येक मनुष्यास दोन हात आहेत. आणी जर वस्त्र करणें, नांगर धरणें, लिहिणें, दागीनें करणें इतके रोजगार येकटा मी करीन असें जर कोणी म्हणेल तर होऊ सकणार नाहीं, कारण की येक मनुष्य साळी, कुळंबी, कारकुन, सोनार होईल कसा? यास्तव ही चारी कामें चौघांनी पृथक करून येकमेंकास जिनसा पुरिवल्या म्हणजे ठीक होईल. लक्ष्मी जमिवली पाहिजे याचें कारण जास नाव करावयाची असेल त्याणें लाकडें तोडून आणिली पाहिजेत, लोखंड आटऊन खिळे केले पाहिजेत, व नाव घडण्यास साहा महिने लागतील, तितके दिवस खाण्याची बेगमी घरांत पाहिजे. तेव्हां इतकें भांडवल जवळ केल्याशिवाय नाव घडली जाणार नाहीं, याजकरितां लक्ष्मी संपादन पाहिजे. लक्ष्मीस निर्भयता पाहिजे याचें कारण असें आहे कीं माळी याणे बागेंत पुष्कळ फळें व फुलें यांची झाडें लाविली, त्याचें उत्पन्न त्याचे हाती येणार नाहीं असें जर असेल तर तो झाडें लावील कशाला? सराफ दुकानात खुर्दा घेऊन बसला आणि तेथुन त्याचा माल कोणी उचलून नेईल असे असलें तर तो बसेल कशाला. यास्तव संपादन केलेले पदार्थ हे माझे आहेत यांजवूर कोणाची जबरदस्ती चालणार नाहीं असें असल्या शिवाय लक्ष्मी वृद्धी होणार नाही.

मनुष्यें आतां आहेत तशीं पहिल्यापासून नवती. असें हल्ली समुद्रांत बेटे आहेत तेथील मनुष्यें रानटी आहेत व कितीयेक ठिकाणची सुधारत चालली याजवरून असें ठरतें कीं या देशांतही पूर्वी रानटी माणसें असतील व त्यांचा अंश भील वगैरे अद्यापि आहेत.

मनुष्यांची प्रथम अवस्था असी आहे की त्यास कांही शाहाणपण नाहीं. अन्नाचा पाक नाहीं, केस वाढलेले आणि नग्न रानात फिरतात व ज्या वनस्पत्या खाण्याजोग्या आहेत त्या भक्षण करून निर्वाह करितात.

मनुष्यांची दुसरी अवस्था असी आहे कीं रानांतील जनावरें मारून खातात व तीरकमठा किंवा सोटा बाळगतात व जनावरांची कातडीं नेसतात परंतु ही स्थिती पहिल्या स्थितीहून

शाहाणपण आल्याशिवाय प्राप्त होत नाहीं कारण कीं जनावरें मारावयास शस्त्रें करावी लागतात जनावरें मारावी कसी व षिकार (शिकार) कसी करावी या युक्ती ध्यानांत ठेवाव्या लागतात व मांस शिजविण्यास विस्तव करावा व त्यास लाकडें पानें घालून पेटवावा हें समजलें पाहिजे.

मनुष्याची तिसरी स्थिती असी आहे कीं जनावरें बाळगतात आणि रानांत चारतात आणि त्यांजवर निर्वाह करितात. घर नसतें, परंतु ही स्थिती शाहाणपणाची पाहिरी चढल्याशिवाय प्राप्त होत नाहीं, कारण कीं त्यास इतके समजलें पाहिजे कीं जनावरें मारुन नफा नाहीं परंतु चारून वाढवावी व त्यास बांधावी कसी, चारावी कसी व चारणीचे दिवस कोणते हें समजलें पाहिजे.

मनुष्यांची चौथी स्थिती शेत करण्याची आहे, ही फार शाहाणपणा आल्याशिवाय प्राप्त होत नाहीं. कारण कीं खाण्यास योग्य दाणे कोणते हें लक्षांत ठेऊन ऋतु जाणून पेरून त्याची कणसें वेचुन दाणे करून दळून शिजऊन खावे हें समजलें पाहिजे, व घर बांधून राहण्याचे समजले पाहिजे. व या स्थितींत मनुष्य आल्यावर राजा असला पाहिजे, कारण कीं दाणे जो पिकवितो त्याचे कोणी घेऊन न जावें याजकरितां येक रक्षक पाहिजे. परंतु पूर्वीचा तीन स्थितीस राजा नको, सर्दार नको व त्या स्थितीत लोक आहेत तेथे राज्य नाहीं. लक्ष्मी संपादन होऊ लागली म्हणजे राज्याचा आरंभ होतो. राज्याची प्रथम स्थिती असी आहे कीं शेत केले असतां पिकतें हें लोकांस कळूं लागलें म्हणजे पिकवितात, परंतु अराजिकामुळें दुसरे बळकट लोक असतात ते घेऊन जातात. याजमुळें लोक त्रासले म्हणजे आपल्यामध्यें जो बळवान असेल त्यास प्रमुख करितात आणि त्याचें सांगितल्याप्रमाणें वागतात. अशा स्थितीतल्या राज्यांस फौज वगैरे कांहीं नसत्ये व सिंव्हासन मुकुटही नसतो. हे डौल मनुष्ये जशीं शाहाणीं होतात तसतसे होतात. प्रथम स्थितीतले राज्यांत, राज्यास कांहीं कायदा नसतो. तो म्हणेल तो कायदा. त्यानंतर राजाहि भ्रष्ट होऊन अन्याय करू लागतो तेव्हां कायदे व शास्त्र त्याचे प्रतिबंधाकरितां होतात. परंतु तितक्यानेंहि प्रतिबंध पुरता होत नाही याजकरितां आणखी तजवीज करावी लागत्ये.

मनुष्याची पांचवी स्थिती व्यापाराची आहे. या स्थितींत मनुष्य केवळ शेतकीपासून सुटत नाहीं, परंतु बहुत युक्ती काढुन विद्या शिखुन, तारवें करून देशांतरास जाणें इत्यादि करू लागतात व राज्य बहुधा लोकसत्तात्मक करितात, म्हणजे स्वतां लोक राज्याचे अधिकाराचे भागीदार होतात.

या पांच स्थितीवर गेलेले लोक अजून जगांत नाहीत, परंतु या पांच स्थितींत लोक आढळतात. आमचा देश चौथे स्थितींत आहे व इंग्लंड देश पांचवे स्थितीत येक पाहिरी वरती आहे हें लक्षांत वागवावें.

परंतु येका स्थितींतून दुसरें स्थितींत मनुष्यें जातात याचें कारण काय? हा विचार पाहिला तर असें दिसतें कीं मनुष्यास ईश्वरानें बुद्धी दिल्ही आहे व मनुष्यास नाना प्रकारचा अडचणी प्राप्त होतात, येणेकरून मनुष्याचें नेहमीं पुढें पाऊल टाकण्याचे धोरण असतें व येकमेकांची वर्तणुक पाहून सुधारणा करितात.

कोणत्ये जमिनीवर कोणतें पीक होईल हें ध्यानांत ठेवितात आणि त्या प्रमाणें पेरणी करतात व दुसरे देशांत पदार्थ आढळतील ते आणून स्वदेशांत लावितात. हेमाडपंतानें लंकेहून बाजरी आणिली अशी दंत कथा आहे आणि खरी असेल. सांप्रत बटाटे व पांढरा ऊस इकडे आला आहे व छापण्याची विद्या आली आहे. परंतु या सर्व गोष्टी मनुष्यांनीं बुद्धीचा उपयोग केल्याशिवाय होत नाहींत. जनावराला बुद्धी नाहीं, याज करितां तीं जशीं पांच हजार वर्षामागें होती त्याच स्थितींत अजुन आहेत, व पुढेही कधीं सुधारतील असें वाटत नाहीं, परंतु मनुष्य दिवसेंदिवस दर रोजचे माहितगारीनें शाहाणा होतो. प्रथम कापुसाचें वस्त्र होईल हें ठाऊक नसेल. परंतु पाहातां पाहातां या झाडाचे फळांस कापुस आहे, याचें सुत होईल त्याला विणतां येईल असें कितीयेक दिवस विचार करता व पाहतां ठाऊक झालें असेल. याचप्रमाणें सर्व गोष्टींचें आहे.

विश्वामित्री दृष्टी पुराणांत आहे त्याचा अर्थ मला असा दिसतो कीं, त्याणें कांहीं पदार्थ नवीन झाडें वगैरे आणली असतील.

ज्या देशांत मागसें फार असतात तेथे बुद्धीहि फार असत्ये. जर मनुष्याची बुद्धी नसती तर मनुष्यें आजपर्यंत सुधारली नसती. परंतु बुद्धी आहे म्हणून गरज वाढत्ये व मी आपल्या च्यार पोरांस काय खाण्यास घालुं असें संकट पडतें. त्याचे अंतीं उद्योग अधीक होतो व लक्ष्मी वाढत्ये.

बुद्धिकौशल्य आमचे देशांत अजून फारसें प्रगट जाहलें नाहीं याजकरितां बुद्धीनें लक्ष्मी किती वाढते हें दाखविण्याकरितां दुसरे देशाचें उदाहरण घेतलें पाहिजे.

इंग्रजलोकांचा देश पाहा. तेथे लोखंडाचे पदार्थ सुलभपणानें करितात. ही धातु प्राचीन काळापासून लोकांनीं सोधुन काढली व त्याचे पदार्थ करू लागले. परंतु इंग्लंडांतील लोक याणी कल्पना बसऊन जें काम हजार माणसांच्यानें व्हावयाचें नाहीं ते दोन माणसांकडून करतात आणि ते पदार्थ बाहेरील देशांत नेऊन स्वस्त विकतात आणि पांचशे माणसांचे मजूरीची किंमत घेतात व लोक हजार माणसाची मेहेनत म्हणून संतोषानें घेतात.

लोखंडाचें पोलाद चांगले करितात व खाणीत कोळसा सापडतो त्याचा विस्तव फार तीक्ष्ण होतो. तो या कामास लावतात. परंतु त्या खाणी खणत्ये वेळेस अकस्मात आंतून ज्वाळा निघते आणि माणसें मरतात. त्याजवर, सर देवी साहेबाने, Davy's lamp कल्पना बसऊन त्या ज्वाळांनी माणसें मरेनात असें केलें. व त्या ज्वाला धरून नहर बांधून त्यांत सोडून देऊन घरोघर दिवे तेला खेरीज लागावे असी तजवीज केली. कितीएक विद्वानानी कल्पना बसऊन चिंध्याची साखर करण्याची युक्ती काढली व वाळलेलीं हाडें व लाकडांचे पीठ याची भाकरी युक्तीनें करता येते त्याजवर निर्वाह होतो. तेव्हा काळ कशाला पडेल, याचप्रमाणें जमीन नांगरण्याची युक्ती व कोणचा जिन्नस कोठे पेरावयाची युक्ती, दाणे दळण्याची युक्ती व पाण्याचे योगाने वोझें उचलणें व वाफेचा योगानें गाड्या व नाव चालविणें व वस्त्रें विणणें, रंगिवणे, ऐंशी ऐंशी कोस धागे लांब काढतात, व सुलभ रीतीनें विस्तवातून ओढून घेतात त्याणें त्याचें वरचेवर फुलमात्र जळतें पण सूत जळत नाहीं. हा केवढा चमत्कार. पूर्वी कापसाची वस्त्रें इंग्रजलोक हिंदुस्थानांतून नेत होते, व गरीबास मिळत नव्हतीं, श्रीमंतमात्र पांघरत, ती वस्त्रें आतां मजूरदारदेखील नेसतात व हिंदुस्थानचा व्यापार वस्त्राचा अगदी बुडाला. अशा मोटाल्या युक्ती बहुत विचार केल्याशिवाय निघाल्या नसतील, हे सहज लक्षांत येईल.

मनुष्यास गरज पडल्या शिवाय ज्ञानवृद्धी होत नाहीं, कारण की स्वभावानें मनुष्यास काम करण्यास नको. परंतु इलाज नाहीं म्हणून मेहेनत करतात, मुख्य पोट भरण्याची गरज, नंतर मुलें बाळें यांचे निर्वाहाची गरज, इत्यादि गरजा असतात, याचा दाखला असा आहे की जे लोक समुद्राचे तीरचे आहेत, त्यांस नौका करणें व मासे धरणें याचा युक्ती अधीक ठाउक असतात.

कोणत्या मनुष्याची कोठे बुद्धी चालत्ये याचा ठिकाण नाहीं. विलायतेत ज्याणी मोटाल्या युक्ती काढल्या ते कोणी, गवई, कोणी साळी, कोणी न्हावी, कोणी सोनार, असे असून त्याणी आपल्या व्यापाराबाहेरचा कल्पना काढल्या. याजकरितां सिद्ध असें आहे, की ज्ञानाचा प्रतिबंध कोणास असू नये. ज्ञान शिखण्याची सर्वांस पर्वानगी असावी. नाहीं तर ज्या देशांत दोन लाख मनुष्यें आहेत, परंतु त्यातील दोनसे मात्र विद्या शिखण्याजोगे आहेत, तर दोनसे माणसांचा देश तो समजला पाहिजे आणि तितकीच त्या देशाची लक्ष्मी होईल. कारण कीं जितकीं अधिक माणसें विचारांत असतात तितकी अधिक कल्पना व युक्ती निघतात. याजकरितां विद्येचा दर्वाजा सर्वांस खुला असावा.

या विचारावरून शास्त्रांत जातीचा भेद व ब्राह्मणाशिवाय विद्या कोणी शिखु नये असें ठरविलें आहे तें निर्फळ दिसतें व तेणेकरून सुधारणा होणार नाहीं, अटकाऊन पडेल. याच कारणानें आज

३००० वर्षांत हिंदुस्थानची स्थिती बदलली नाहीं, पूर्वी होतें तसेंच आहे. सुतार, तांबट, लोहार, कासार, वगैरे जाती अडाणी सबब त्यांचे हातून कांहीं सुधारणा जाहलीं नाहीं व ब्राह्मणास तीं कसबें येत नाहींत म्हणून यांचे हातून जाहलीं नाहीं. सरासरी कांहीं नाहीं.

दुसरे असे आहे कीं, हिंदुस्थानातील लक्ष्मीचा व्यय असतू फार होतो. जे लक्ष्मीवान आहेत ते गरीबाची स्थिती सुधारण्याकरितां द्रव्येंकरून अनुकूल होत नाहींत, परंतु नाच लग्नें वगैरे यांत पैसा उडवितात. तो अळसाचे वृद्धीकडे जातो आणि विद्या आणि गरीब तसतसेच राहतात.

हिंदू लोकांचा विद्या व युक्तीपासून दुसरे देशचे लोक शाहणे होतील असे कांहीं नाही. परंतु दुसरे देशचा युक्ती याणी शिखल्या पाहिजेत. जरी बाहेर त्या जुन्या आहेत तरी यांस नव्याच आहेत, व साळीपणा किंवा सुतारपणात हे रोजगार अगदी नादान असे या देशांत मानितात, परंतु दुसरे देशांत या रोजगारावर लक्षावधी रुपये मिळवितात व त्या रोजगाराची कोणास लाज वाटत नाहीं. या देशात शिपाई वगैरे म्हणतात कीं अम्ही त्याहावयास कशास शिकावें? परंतु हा मूर्खपणा आहे. विद्येशिवाय शिपाईगिरी व कोणताहि व्यापार कच्चाच होईल.

यास्तव हिंदु लोकांनीं विद्या वृद्धी केली पाहिजे. सर्व लोक कोणत्याहि जातीचे कसबाचे असोत त्यांस विद्या कळविली पाहिजे व यास श्रीमंतानी मुख्यत्वेकरून मदत दिल्ही पाहिजे. परंतु या देशाचें केवढे दुर्भाग्य आहे कीं छापखान्यासारखी युक्ती विद्यावृद्धीचें साधन असून लोकांस अजून त्याचें फल समजत नाहीं. हिंदू लोकांमध्ये जे छापखाने चालवितात त्यांस या लोकांची विद्येविषयींची आर्तता पुसावी.

विचार पुष्कळ केला तर उपयोग नाहीं. परंतु विचार करून त्यांप्रमाणें वर्तणुक जाहली पाहिजे.

हिंदुलोकांतील शास्त्रीपंडीत विद्वान बहुत आहेत. परंतु अजुन कोणीं असा नाहीं कीं आपली विद्या लोकांचे उपयोगांत व व्यापारांत सफळ केली आहे.

---

## प्रकर्ण २

# उद्योगाची वाटणी

लोक शाहाणपणाचे स्थितींत जितके अधीक येतात तितकी उद्योगाची वाटणी अधीक होत्ये यास्तव जे देश फार शाहाणपणाचे स्थितीस आले आहेत तेथे बहुत प्रकारचे व्यापार असतात.

सुया करण्याचा कारखाना विलायतेत असतो तेथे दहाबारा माणसें असतात. प्रत्येक माणसाचा व्यापार भिन्न. कोणी तार करतो, कोणी तुकडे पाडतो, कोणी टोक करितो, कोणी भोके पाडतो, इत्यादि विभाग करून घेऊन कामे चालवितात. तसेच कापडें करण्याचे कारखान्यांत लोकर पिंजणारे, धुणारे, निवडणारे, वळणारे, विणणारे, छापणारे इत्यादिक सरासरी पन्नास असामीचे हातातून येक कापड जातें. पत्रें छापणारे यांचे कामाची वाटणी असते. दाहा बारा असामी पार्लिमेंटांत बोलणें ऐकावयास पाळीपाळीनें जाऊन बोलणे कागदावर टिपुन घेतात. येकाचा जाहला कीं तो जातो दुसरा ल्याहावयास लागतो. छापखान्यांत कागद येतांच अक्षरे जुळणारे असतात ते जुळुन तयार करितात. इतक्यात दुसरा कागद येतो. याप्रमाणे तीन लाख अक्षरें जुळतात आणि बारा हजार पत्रें छापून रवाना करितात. इतके करण्यास साहा तासांचा अवकाश आणि शंभर माणसे लागतात. छापखाना हातानें फिरवीत नाहीं परंतु वायूचा जोरानें फिरवितात त्याजमुळे फारच त्वरा होते.

उद्योगाची वाटणी जाहल्याशिवाय लोकांचा परिणाम नाहीं कारण कीं येकास सगळी कसबें येत नाहींत याजकरितां कोणी सुतार, कोणी न्हावी जाहला पाहिजे. आणि येकामेकास आपला उद्योग अदलाबदल करतात. तसें घड्याळ करणारा आपला उद्योग कपडे करणारास देतो. कपडे करणारा शेतकऱ्यापासून दाणे घेऊन कपडे देतो, जोडा करणारा दाणे घेऊन जोडा देतो. असे अनेक उद्योग अनेकानी करून एकमेकांस जे जिन्नस पाहिजेत ते पुरवावे.

उद्योगाची वाटणी करण्याचें तात्पर्य असें आहे कीं सर्वांस सारखी बुद्धि नसत्ये. मुळीं ईश्वरानें स्त्रिया आणि पुरुष केले. पुरुष घराबाहेरचे कामास योग्य आहेत आणि बायका घरांतील कामास योग्य आहेत. तसेच ईश्वरानें नानाविध बुद्धी दिल्या आहेत, त्याजमुळें वाटणी होणे जरूर आहे. प्रधान राज्य चालवतो त्यास त्याची बुद्धी असते, त्यास लोहाराचे कामांत वाकब नसते व बुद्धीही नसते. आणखी लोहाराचें काम करतो त्यास सुताराचे काम येत नाहीं. उद्योगाची वाटणी हीच व्यापाराची माता आहे. जर प्रत्येक मनुष्य आपलीं सर्व कामें करू सकेल तर व्यापार नको.

उद्योगाची वाटणी गिऱ्हाईकांवर आहे. गावांत येक वाणी असतो, तोच सराफ. वाणी असतो तोच लकडवाला, सावकार तोच, पीठ विकणारा तोच, याचे कारण जर इतके व्यापार पृथक पृथक लोकांनीं केले तर गिऱ्हाईक नसतें. परंतु शहरांत पहा. हे व्यापार वेगळे असतात. सराफ वाणी नसतो. लकडवाला सावकार नसतो. याचे कारण लोक फार. गिऱ्हाईक फार याजमुळें इतकी वाटणी अधीक होत्ये.

जितके लोक वाढतात तितका व्यापार वाढतो, कारण कीं तितकी गिऱ्हाईकें फार होतात. व दुसरे व्यापार वाढविण्यास असें कारण आहे कीं लोकांस येकामेकांस समीप आणण्याची तजवीज करावी म्हणजे रस्ते, पूल, नावा वगैरे येऊन इकडील माल तिकडे जाऊन लौकर पोचे असें करावें. विलायतेंत लोखंडी रस्ते आहेत याजमुळें विलायतेची लांबी ३०० कोस क्षेत्र आहे. तरी येका गांवचे लोक जरी दुसऱ्या गांवापासून शंभर कोस असले तरी दोन कोसावर असल्याप्रमाणें आहे. याजकरितां सर्वांचे हातीं व्यापाराचा जिनस पोहोचतो, तितकी गिऱ्हाईकें अधीक होतात, आणि व्यापार वाढतो, तसेंच येका देशांत दुसऱ्या देशांतील लोक येऊ जाऊ लागले म्हणजे तितकी गिऱ्हाईकें अधीक वाढतात. याजकरितां तारवें करणें हें येक मोठें लोकहिताचें कारण आहे.

कांहीं वर्षांपूर्वी विलायतेंतून नावेंत बसून फरासिसाच्या मुलुखांत येण्यास बहुत दिवस लागत होते, व जो परत येईल त्यास राजा मोटी पदवी देत असे. आतां सात आठ तासांत जातात व हजारो लोक जातात व येतात इतकें सुलभ जाहलें आहे, कारण कीं तारवें चालविण्याची विद्या व वायूचें यंत्र करण्याची विद्या निघाली, तेव्हा अर्थातच व्यापार अधिक वाढला.

हिंदू लोकांस असें वाटतें, कीं जलदीनें कांहीं उद्योग व्हावयाचें काम असेल तें वाईट, कारण कीं बहुतांची पोटें बुडतात. परंतु ही समजूत याजवरून खोटी आहे. जितका उद्योग अधीक निघेल तें चांगलें व पन्नास मनुष्यें काम करीत होतीं तें येकट्यानें करावें अशी विद्या असेल ती चांगली, कारण कीं कांहीं दिवस हें वाईट असें दिसेल, परंतु पुढें उद्योग वाढून, पन्नास असामी जें काम करतील तें पांच हजाराचें काम जाहलें तेव्हां अर्थातच तितकी लक्ष्मी अधीक वाढली.

हिंदू लोकांमध्ये प्राचीन काळीं च्यार वाटण्या म्हणजे, चार जाती होत्या. त्या नंतर लोक अधीक अधीक शाहणे जाहले तसतसे च्यार जातींच्या हजारो जाती जाहल्या व आणखी कितीएक होणार कारण कीं इंग्रज इकडे आल्यामुळे छापणें व तारू करणें हे व्यापार अधीक निघाले आहेत. तस्मात जातीचे पर्यवसान व्यापारावर आहे, दुसरें कांहीं नाहीं.

जितका व्यापार वाढतो तितक्या लोकांच्या इच्छा वाढतात. छापण्याची विद्या निघाली म्हणून बुकें पुष्कळ जाहलीं, परंतु वाचणारेही पुष्कळ निघाले. याजकरितां कोणताहि पदार्थ नवीन व्यापाराचा जाहला, म्हणजे जाला, त्याला, द्यावा असें वाटून तो उद्योग करून पैसा मिळवितो

आणि घेतो, तेव्हां उद्योग वाढतो हा निश्चय. इंग्रजांनी टपाल बसविलें आहे, परंतु याजमुळें लोकांचें अनहित नाहीं. लोकांस कागद थोडे खर्चांत जातात म्हणून पुष्कळ पाठविण्याची इच्छा होत्ये. जितका जिन्नस तितकें गिऱ्हाईक होतें, परंतु जिन्नस स्वस्त करून विकण्याची युक्ती निघेल तितके चांगलें.

देशांतील लोक वाढले नाहींत व त्याणीं परदेशांत व्यापार करणें व उद्योग सुलभ होण्याची युक्ती काढल्या नाहीत तर व्यापार आहे तसा राहतो, व शहाणपणही आहे तितकें राहतें, व सुखही आहे तितकेंच राहते, कांहींच वाढत नाहीं. याजमुळें दुसरे देशांतील लोक येऊन जिंकितात, कारण कीं अधीक शाहण्यानें श्रेष्ठत्व करावें हा ईश्वरी संकेत आहे.

परदेशांतील लोक लोभानें किंवा हेव्यानें उपद्रव करितात म्हणून फौज बाळगण्याचें प्रयोजन पडतें, फौजेत जे लोक आहेत ते कांहीं उद्योग करीत नाहींत, परंतु त्याचें पोषण सर्वांस रक्षणाकरितां करणें जरूर होतें, यास्तव युद्ध, कला, जितकी सुलभ होईल तितकी चांगली, कारण कीं परदेशांतील दोनशे लोकांस चार माणसें जिंकितील असें जाहलें असतां या देशांतील तितकें ओझें कमी होतें, व ते लोक उद्योगास लागतात याचप्रमाणें सर्व विद्येचा उपयोग आहे.

उद्योगाची वाटणी केल्याचें फळ असें आहे, कीं उद्योग पुष्कळ होतो, व जो येका कामांत प्रवीण असतो तें काम तो लौकर करितो, याजमुळें थोडा वेळ लागतो. आणखी कितीएक कामें असी आहेत, कीं येक काम सोपऊन दुसरे कामास लागण्यास हत्यारें बदलावी लागतात, जागा बदलावी लागत्ये व येकाचें चित्त येका कामाकडे असलें म्हणजे त्यांत त्याला सुधारणा करावयास सापडते, तो नवी हत्यारे व नव्या युक्ती करून सुलभ काम करीतो, तसे येकाकडे सर्व कामें असल्यानें होत नाहीं. पूर्वी सुईचा दाखला लिहिला आहे. तेंच काम चौघांनी केलें तर येके तासांत हजार सुया करितात आणि येकटा करणार कसबीही असला तरी येक तासांत शंभराहून अधीक करीत नाहीं. जसे सैपाक करणार, व वाढणार, गंध लावणार, पाट मांडणार वेगळाले असले तरी काम किती लौकर होतें, व तीं सर्व कामें येकट्याकडे असल्यानें तशी होणार नाहींत व सर्व बिघडतील. तसें हें आहे.

---

## प्रकर्ण ३

# क्रयविक्रय

क्रयविक्रय करण्यास समर्थ मनुष्य आहे, दुसरें जनावर नाहीं. जरी मधमाशा सर्व मिळून येक मोहोळ करितात, हें त्यांस ज्ञान आहे, तरी क्रयविक्रय त्यांचाने होत नाहीं. ती शक्ती मनुष्यासच आहे. उद्योगाची वाटणी जाहली म्हणजे त्या पासून अर्थातच क्रयविक्रय होऊ लागतो. येकजणाने शंभर सुया केल्या तर त्यास दोनचार पाहिजेत त्या तो घेईल बाकीच्या दुसरीकडे ज्यास पाहिजे त्याचे घरी जाऊन तेथला दुसरा माल याचे घरीं आला पाहिजे, तर त्याचा निर्वाह लागेल. ही मनुष्याची अवस्था आहे. तशीच देशाची अवस्था आहे. क्रयविक्रय ह्यास ही ईश्वरी इच्छा आहे, कारण कीं येका देशाचे भागांत कोणे येका जिनसाचें पीक फार होतें, दुसरे प्रदेशी दुसऱ्या जिनसांचें पीक होतें, येका देशांत येक जिन्नस पुष्कळ स्वस्त असतो, तोच जिन्नस दुसरे देशांत माहाग असतो. यास्तव सर्व लोकांस सारखे पोचण्याकरिता या प्रदेशांहून, त्या प्रदेशांत व या देशांतून त्या देशांत नेणें आणणें अवश्य आहे. जसें शालजोड्या, कस्तूरी काश्मीराकडे होतात, दुसऱ्या कोठे होत नाहीं. तेव्हां तिकडून इकडे तो जिन्नस आणावा

लागतो, व मीठ समुद्राचें काठीं पिकतें, परंतु तेथून जर ते मध्यदेशीं, न आणलें तर कसें होईल. असे हजारों जिन्नस आहेत. जर लोक आपले देशावरच भरवसा ठेवितील तर सुखी होणार नाहींत यास्तव पदार्थाचा शोध लाऊन जेणेकरून सुखवृद्धी होईल तें केलें पाहिजे.

बहुधा व्यापार करणारे दुकानदार लोक पृथक असतात. जे जिन्नस उत्पन्न करतात तेच व्यापार करीत नाहींत, याचें कारण असें आहे कीं त्यांस उत्पन्न करणेंमात्र ठाऊक असतें, परंतु गिन्हाईक व देशावरची माहितीगारी नसते, व कोठें माहागाई आहे व कोठें स्वस्ताई आहे ही बातमीही त्यांस नसत्ये, व कोण गिन्हाईक कोणता जिन्नस घेईल हें ठाऊक नसते, याकरितां उत्पन्न करणें आणि विकणे या उद्योगाचे दोन हिस्से होतात, जे लोक क्रयविक्रय करितात ते उत्पन्न करीत नाहींत, म्हणोन उत्पन्न करणारे यांजपासून घेऊन विकतात. ही उद्योगाची वाटणी ठीक आहे. नाहींतर अडचण पडेल, जसें कितीएक लहान गांवांत ज्याचे घरी गुरें असतात तेथें तूप घ्यावयास जावें लागतें.

जो मनुष्य व्यापार करितो, तो आपल्या हिताकरितां करितो, पाहा, पाणबुड्या मोत्यें श्रमानें काढतो तो आम्हांवर दया करीत नाहीं. केवळ आपल्या पोटास पाहिजे म्हणून करितो. तसेच येके देशाचे लोक दुसऱ्या देशांत व्यापार करितात, तोहि आपल्या हिताकरितां करितात, त्यांत येक-मेकाचें हित सहज होतें. तात्पर्य मनुष्यास येकमेकांचा आधार असला तरच सुख होतें आणि असा कोणताही मनुष्य स्वतंत्र नाहीं. जें आपण खातो, पितो, पांघरतो, त्यास हजाराचे हात व उद्योग लागले आहेत व अणखीं जितक्याचे लागतील तितके अधीक सुखी होऊं व मनुष्यानीं येकत्र होऊन वागावें हा इश्वरी संकेत आहे.

आपले सर्व लोक व जवळचे दुसरे देश जितके शाहणे असतील तितकें आपल्यास चांगले. कारण कीं युक्ती वाढतात आणि ज्ञान वाढतें, येका देशांतून माल दुसरे देशांत गेला तर त्यांत तोटा नाहीं, कारण कीं दुसरे देशांतील माल इकडे येतो तत्रापि मालाचें स्थळांतर होण्यावर व परदेशांत जाण्यावर जकाती वगैरे सर्कार बसविते हें कांहीं व्यापारवृद्धीस चांगलें नाहीं, अडथळे मात्र आहेत.

प्राचीन काळीं माणसें व्यापार करूं लागली तेव्हां त्यांस येक अडचण पडूं लागली कीं न्हावी याणें हजामत सुताराची केली तर त्यांस द्यावें काय. सुताराजवळ लाकडें तासलेलीं आहेत तीं न्हावी यास नकोत. असेच येकमेकापासून जिन्नस घेऊन वागविण्यास खर्च फार पडतो. तेव्हां उद्योग सर्वांचे चालावे व क्रयविक्रय अडचणीशिवाय व्हावा यास्तव मोबदल्याचा जिनसा पुष्कळ प्रकारचा देशोंदेशी आहेत. कोठे कवड्या, कोठे बदाम, कोठे शिंप्या. या जिनसा फुटल्या म्हणजे व्यर्थ जातात व लवकर नासतात. दुसरी कांहींतरी असी जिन्नस पाहिजे होती कीं ती नासेना व फोडली तरी उतरू नये व सुलभ व वजन थोडी, सर्व देशांत चालणारी असावी. अशी माणसें अडचणींत असतात (असतां) त्यास खाणी सापडल्या. त्यांतील धातू काढून सोन्यारुप्याचे तुकडे व्यावहारिक द्रव्य केलें. अद्यापि शाईपैसा वगैरे नाण्यावर शिक्का नाहीं, फक्त तांब्याचा तुकडा आहे, परंतु असे नाण्यातून लोक तुकडे कापून घेतात आणि ठकवितात. म्हणून पुढे शिक्के करू लागले व कडावरती देखील रेघा मारूं लागले. या प्रमाणे हल्लीचा सुर्ती रुपया आहे.

सर्कार लोभानें आपल्याकडे शिक्का करण्याचे काम ठेवितात, परंतु याचें कारण कांहीं दिसत नाहीं. सबब अन्याय व लोभिष्टपणा आहे. नाणें पाडण्याची पर्वानगी सर्वांस असती तर त्यापासून कांहीं तोटा जाहला नसता, सर्कारचे रुपये पाहिजेत तर मग सरकारचें धोतरें पागोटी त्याचे कोष्ट्यांनी केलेलीं कां नसावी ? याशिवाय कितीएक ठिकाणीं सर्कारानें लोकांस ठकविण्याकरितां धातूंत हीण मिसळ करून खराब नाणीं पाडलीं आहेत व वजनें कमी करून आपला खजिना भर-तात. येणेकरून लोक फसतात आणि जो गुन्हा रयतेने केला तर सर्कार शासन करतात तोच गुन्हा आपण करितात. हा अन्याय आहे.

व्यावहारिक द्रव्य हें व्यापार खेळिवण्यास मुख्य कारण आहे व क्रयविक्रय सुलभपणानें होतो. याजकरितां सोने रूप जरीं लक्ष्मी नव्हे, तरी लक्ष्मी उत्पन्न करणारा पदार्थ आहे व उद्योग वृद्धीस कारणरूप आहे. सोने रुपें जर व्यापारांत नसेल तर त्याचा उपयोग व्हावयाचा नाहीं. घरांत सोनें तें मातीचे ढिगाप्रमाणेंच आहे. तें जर व्यवहारांत खेळेल तरच त्याचा उपयोग वर्ती सांगितला आहे तो होईल. यास्तव जें सोनें रुप्यांचा संग्रह त्यास लक्ष्मी समजून करितात त्यांची चूक आहे. जर देशांत सोनें रुपें फार असेल, येकाचे हातांतून दुसरेयाचें हातीं असें व्यापारांत खेळत नसेल, तर तो देश दरिद्रीच म्हटला पाहिजे. परंतु बहुधा सोनें रुपें व्यापारांत येतें, सबब ज्या देशांत ते फार आहे तेथें व्यापार फार आहे असें जाणावें. कारण कीं त्याशिवाय क्रयविक्रय होत नाहीं. जो देश आपलें सोनें रुपें दुसऱ्या देशांस देऊन त्याचे दुसरे पदार्थ खरेदी करितो त्या देशाचें नुकसान आहे, कारण कीं, सोनें रुपें चिरकाल राहण्याचें धन हें त्याचे हातीं जातें, त्याजमुळे उद्योगची चौपट वृद्धी होते, परंतु याणी जे जिन्नस घेतले ते खाऊन जातात. सबब याचा तोटा आहे. जा देशांत पैसा फार आहे तो देश सुखी असें समजावें, कारण कीं पैसा व्यापाराचा दर्शक आहे.

ज्या देशांत पैसा कमी आहे तेथें सावकार लोक बहुधा पैसा पाठवितात आणि, तेथला जिन्नस थोडे पैशांत खरेदी करितात व पुढे त्या लोकामध्ये पैसा जमला म्हणजे पैसा पाठवावयाचा बंद करितात आणि माल पाठवितात, आणि माहाग विकून पैसा काढतात. अशीं सावकारांची धोरणें असतात. पैसा हा जिन्नस खरेदी करण्याचा उपयोगाचा मात्र आहे, दुसरें कांहीं याचें कर्तव्य नाहीं, व त्याचा दुसरा काहीं उपयोग नाहीं. फक्त मोबदल्याचा मात्र रस्ता आहे.

सावकार लोक आपले सोईकरितां भलावणपत्रें, हुंड्या, चिठ्या वगैरे देतात ते कागदाचे पुर्जे असतात परंतु देशावर खेपा चालतात. कितीयेक देशांत सर्कारानीही चिठ्या पैशाबद्दल देण्याची चाल घातली आहे. कांहीं राजानीं हिंदुस्थानातही कागदाचे तुकडे चालविले. परंतु कागदास व्यावहारिक द्रव्य करण्यात नफा आहे खरा, परंतु पत व विश्वास पाहिजे. धातूचा येकपट उपयोग आहे तर कागदाचा दसपट आहे, कारण कीं धातू भरून नेण्यास कांहींतरी श्रम आहेत परंतु कागद नेण्यास श्रम नाहींत, शिवाय दूर देशाचे व्यापारास सोय अशी आहे की येकानें लाख रूपयाचा माल काशीस विकला आणि तेथुन हिकडे पैसा आणावयाचा आहे तर ज्याला काशीस माल विकला त्याचे लाख रुपये पुण्याचे सावकाराकडे येणे असतात त्याजवर हुंडी दिल्ही म्हणजे हरकतीशिवाय पैसा पुण्यांस पदरी पडतो. याप्रमाणे सावकारांचा, तोड जोडी, पुष्कळ आहेत. धातूचे तुकड्यावर व्यापार चालू जाहल्यापासून फार उपयोग जाहला, व त्याजवर सर्व देवघेव होऊ लागली, याजमुळें कितीयेक लोक फक्त पैसा द्यावा घ्यावा, इतकाच व्यापार करितात. व्यापाराचें व लोकसुखाचे धोरण पैशावर फार येऊन ठेपलें आहे. पैसा कमी होईल तर उद्योग कमी होईल. अधीक असला तर अधिक होईल परंतु पैसा चालता पाहिजे.

---

प्रकर्ण ४

## भांडवल म्हणजे लक्ष्मी जमिवण्याविषयीं व तीचा उपयोग करण्याविषई

उपयोगी लक्ष्मी म्हणजे देशांत लक्ष्मीचा जो भाग वृद्धिंगत होण्याकरितां कामास लाविला असतो, त्यास म्हणावें. देशांतील सर्व लोक जो पैसा व्यापारांत घालतात व जिन्नस खरेदीकडे

लावितात व कुळंबी बैल, नांगर घेण्याकरितां जो पैसा खर्च करितो, व चाकर ठेविले त्यास वेतन देण्याकरितां जो पैसा लागतो तो सर्व उपयोगी लक्ष्मीचे पोटी आहे.

उपयोगी लक्ष्मीपासून जो नफा होतो त्यास उत्पन्न म्हणावें व उत्पन्नापैकीं खर्च जाऊन राहतें तें पुन्हा उपयोगी लक्ष्मीत पडतें. उपयोगी लक्ष्मी दोन प्रकारची आहे. येक स्थावर व दुसरी जंगम. स्थावरांत खाली लिहिलेले पदार्थ येतात.

उद्योग थोडक्या वेळांत होण्याची यंत्रे व हत्यारें. म्हणजे माग, पवनचक्की, तारवें, लोखंडी हत्यारें वगैरे, याशिवाय भाड्यानें लागणारी घरें, म्हणजे दुकानें, गोदी, लैब्ररी, घरें वगैरे. आणखी जमीन नीट होण्याकरितां जें लागतें तें म्हणजे मोटा, नांगर, गाडे, बैल, मजूरदार, रस्ते, पूल, पाट, तळीं, विहिरी ही जमीनीत असतात सबब तींहि यातच समजावी.

## जंगमात खालीं लिहिलेले पदार्थ येतात.

जे पदार्थ जवळ असल्यानें उपयोग होत नाहीं, परंतु ज्या वेळेस त्याचा खर्च होईल किंवा विकतील तेव्हां त्यापासून उत्पन्न होईल असे पदार्थ. नाणें, दुकानदाराचे दुकानांत जो माल विकावयाचा असतो तो, मजूरदाराकरितां दाणेवगैरे बेगमी करावी ती, व जी हत्यारें व जिन्नस कामात नासतात म्हणजे तेल, कोळसे, कापूस, लोकर, बी, खत व मोठ्या इमारतीचे व पुलाचे वगैरे दागदोजीस जे पदार्थ चुना वगैरे लागतात ते सर्व यांत समजावें.

देशांत जितकी येकंदर लक्ष्मी आहे त्यापैकीं जितकी उत्पन्न होण्याकडे लाविली आहे, तितक्यास भांडवल म्हणजे (म्हणावें). भाड्याची गाडी हें भांडवल आहे परंतु श्रीमंताचे घरचे गाडीपासून कांही उत्पन्न नाहीं, सबब तें भांडवल नव्हे. तसेंच जव्हाईर विकणाऱ्याचे घरीं मोत्यें भांडवल आहे. कारण कीं तो त्यापासून तो ऊत्पन्न करून विकणार, परंतु तीच मोत्यें श्रीमंताचे घरी आलीं म्हणजे शोभेचा उपयोग, त्यापासून उत्पन्न नाहीं. याजकरितां ती निरुपयोगी लक्ष्मी होती. याचप्रमाणें सर्व पदार्थाविषयीं विचार आहे.

पूर्वी एक मनुष्य तारू फुटून येका बेटावर लागला तेव्हा त्याजवळ येक चाकू व येक बंदूक व दारू राहिली, तेव्हां त्या भांडवलावर त्यानें दोन वर्षे आपला निर्वाह केला. बंदुकीचे पोलादानें विस्तव पाडला व मासे पाखरें वगैरे मारून खाई व चाकूनें लाकडें तोडून लहानशीं झोपडी बांधून व तेथे कांहीं भाजा वगैरे शिजऊन खाऊन हाल काढीत राहिला. बेटावर दुसरा कोणी माणूस नव्हता व लोखंड नव्हतें म्हणून लाकडाचे सोटे वगैरे त्याणें हत्यारें केलीं व कातडीं नेशी. पुढें काहीं दिवसानीं येक इग्रज तेथें आला. तो त्यास हा मनुष्य तेथे भेटला. त्यास पुसलें त्याजवरून त्याणें सर्व हकीकत सांगितली. नंतर त्यास विलायतेंत आणला.

तेव्हां सदरहू मनुष्याचें भांडवल ती बंदूक व सुरी. त्याजवर त्याणें संसार केला. तद्वत भांडवल असल्यावाचून निर्वाह होणार नाहीं. परंतु श्रीमंत देश आहेत त्यांचे भांडवल मोटें असते व गरीब देशांचें भांडवल लाहान असते. भांडवल फार आहे तेथे मोटाली कामें इमारती पूल वगैरे फार असतात कारण कीं जर भांडवल नसेल तर ही कोणी बांधणार नाहीं. मोटें काम करावयास दोनशें चारशें माणसें लागतात तितक्यास खाण्याकरितां बेगमी असल्याशिवाय काम होणार नाहीं. तेव्हां जें अन्न देशांत पिकतें त्यांतील खर्च होऊन इतकें अन्न कोठारांत पडेल तेव्हां कोणीं मोटीं कामें करील. याप्रमाणें सर्व मोटाले कामाचा व ज्या कामास बहुत माणसें व द्रव्य लागते त्याचा न्याय आहे. देशांत खर्चापेक्षां उत्पन्न अधीक होईल तेंव्हा शिलक राहील त्या शिलकेवर मोटें काम व्हावयाचें येरवीं जर खाण्यापुरतें उत्पन्न जाहलें तर मोटे काम होणार नाहीं मोटे काम आरंभीं कांही लाभ देत नाहीं तयार जाहल्यावर लाभ देतें तेथपर्यंत खाण्याची व द्रव्याची वगैरे तयारी पाहिजे तेव्हां भांडवल शिलक दरसाल पडून जमलें तेव्हां त्याचो उपयोगी लक्ष्मी कोणी करील.

श्रीमंत म्हणजे इतकेंच कीं लोकांचे मेहेनतीचा संग्रह त्यांजवळ फार असतो. लोकांनीं खपून सोनें काढलें प्रयत्नानें शालजोड्या केल्या प्रयत्नानें मोत्यें काढली तीं सर्व श्रीमंताजवळ असतात म्हणजे काय कीं इतक्या लोकांनीं मेहेनत केली त्याचें फळ त्यांचे हातात असतें. जे श्रीमंत आहेत ते आपलें भांडवल ज्यास भांडवल नाहीं त्यास देतात आणि त्याचें उत्पन्न आपण घेतात याचें नांव मजूरदार. मजूरदार म्हणजे त्यांजवळ भांडवल नाहीं म्हणून लोकांचें भांडवल घेऊन आपला निर्वाह करितात. मजुरी चाकर वगैरे ज्या देशांत अधिक असतो तो देश धन्य असें समजावें. कारण कीं बिनभांडवली लोक थोडे आहेत असा निर्णय होतो व दर फार असल्यानें मजूरदाराचा नफा आहे. त्यांस खाऊन पिऊन शिलक ठेवावयास येत्ये मग कांहीं दिवसानें तेंच भांडवल होतें आणि तो मजूरदार मजूरी सोडून स्वतां आपलें भांडवलावर निर्वाह करितो. यांजकरितां दर मोठे असणें चांगले आहे.

आजचे काळी इंग्रजांचे देशाचें भांडवल किंवा उपयोगी लक्ष्मी सर्व देशांहून फार आहे याजमुळे त्याचे उत्पन्नही फार आहे. पाहा कीं, ते जिन्नस उत्पन्न करितात तो त्यांचे देशास पुरून जगांत कितीयेक दुसरे देशांस राहिला तो पाठवितात. तसेंच इमारती वगैरे विलायतेस मोठाल्या व कारखाने मोठाले व ज्ञानाची पराकाष्ठा जाहली आहे तसीच तारवें कोणत्याही ठिकाणी नाहींत असें नाहीं सर्व देशांत इंग्रजांचा माल आहे याचें कारण काय कीं त्यांचें भांडवल मोठें आहे व भांडवलाचा उपयोग कसा करावा हें त्यांस चांगलें कळतें.

देशांत खर्च होऊन जरी लक्ष्मी पुष्कळ शिलक राहिली तरी विना लोकांस त्या लक्ष्मीचा चांगला व लाभदायक अुपयोग करावयाचें समजल्याखेरीज ती लक्ष्मी वाढणार नाहीं. अमेरिकेंत इंग्लंडांत जमीन आहे तितक्या जमीनीने इंग्लंडांतील लोकांचे हजाराचा हिस्सा लोक देखील सुखाने निर्वाह करीत नाहींत कारण कीं जमीनीचें उत्पन्न कसें करावें हें त्यांस कळत नाहीं. अडाणी लोक आहेत. तसेंच हिंदुस्थानांत कापूस पिकतो पण लोकांस उद्योगाचें ज्ञान नाहीं याजमुळें विलायतेंतील वस्त्रें पांघरतात.

देशाची आणि येक मनुष्याची वाट येकच आहे. जसा येक मनुष्य आपलें उत्पन्न व आपला खर्च व शिलक पाहतो तद्वत देशाची स्थिती पाहिली असतां आहे. देशांत उत्पन्न दरसाल होतें त्यापैकीं देशांतील लोक खातात व खर्चतात व बाकी राहतें तें भांडवल सुधारणेचा उपयोगी पडतें परंतु शिलकेचा उपयोग करावयाचें ज्ञान लोकांस पाहिजे.

हिंदुस्थानातील लोक तर आपले शिलकेस मातीत टाकितात. इंग्रज लोक आपली शिल्लक उत्पन्नांत लावितात. संपूर्ण गृहस्थांचा पैसा सावकारांचा हातीं असतो याजमुळें उत्पन्न होतें व देशाची सुधारणा होत्ये परंतु हिंदुस्थानचे श्रीमंत-मूर्ख याजमुळें सावकारीत पैसा ठेवीत नाहीं व्यापार वाढवीत नाहींत ज्ञान वाढवित नाहींत. परंतु श्रीमंती आली म्हणजे प्रथम लाख रुपयाचे तोडे दोन लाख रुपयाचे जसे याप्रमाणें व्यवस्था श्रीमंताचे भांडवलाची असते सबब ती लक्ष्मी व्यर्थ होत्ये. उद्योगाची शिलक राहते त्याजवर अणखी उद्योग जाइला पाहिजे परंतु तसे होत नाही.

भांडवल भयात घालावयाचें असलें म्हणजें सावकार नफा फार पाहतात कारण कीं बुडीताची व नफ्याची बेरीज मिळाली पाहिजे. याजकरिता व्यापारात विश्वास जरूर पाहिजे. जितकी भयवृद्धी होईल तितके सावकार हात आखूड करतात आणि व्यापार नीट चालत नाही.

या देशांत भांडवल फार कमी. तथापि लक्ष्मी पुष्कळ आहे. परंतु त्याची शिलक रक्षण करणें आणि त्याची वृद्धी करणें व उपयोगांत लक्ष्मी घालणें याचें ज्ञान कमी आहे. परंतु येक हे बरें आहे कीं इंग्रज लोकांजवळ भांडवल पुष्कळ आहे त्याचा समागम आहे. कारण कीं आपण गरीब असलो तरी आपला शेजारी तरी श्रीमत असावा भांडवलाला हात न लागतां त्याचें उत्पन्न होईल तें खर्चावें. आणि त्या उत्पन्नातील कांहीं शिलक ठेवावी. हिंदुस्थानचे लोक मेहेनत करितात

खरे परंतु यांस मेहेनत वाढिवता येत नाहीं, व दुसरें उत्पन्न जें होतें, त्यापेक्षां खर्च फार वाढला. कारण कीं इंग्रज लोक आपले देशांत इकडील द्रव्याचें भांडवल करितात याजमुळें जें इकडे भांडवल व्हावयाचें, तें तिकडे गेलें, आणि अर्थातच या देशातलें उत्पन्न, खर्चास कमी होउं लागलें. याजमुळे उत्पन्नाची शिलक येकीकडे राहून, भांडवल मोडू लागलें, पहिले काळचे राज्यात जें भांडवल जमलें, त्यास हात लागू लागला म्हणजे इनामदार गाव विकू लागले, जमीनी, वाडे, सोन्यारुप्याचे दागिने, सर्व लोक विकावयास लागले, व आम्ही कितीही मेहनत करून उत्पन्न केलें तरी त्यास दुसरी वाटणी लागून आम्हास अबादी नाहिसी जाहली, व या देशांतील भांडवल वाढावयाचें बंद जाहलें. भांडवल बंद होतांच उद्योगही बंद जाहला. कारण कीं भांडवल उद्योगाचें मूळ आहे, लक्ष्मीजवळ, लक्ष्मी जाते. याजमुळें सर्व लोक बर्कत नाहीं म्हणून हाका मारतात. लोकांस आम्ही विचार करून जो निर्णय काढला, तो लोकांस दिसतो पण त्यास इतकीं कारणें सांगतां येत नाहींत. तत्रापि अशा प्रसंगी लोकांस योग्य आहे कीं आपला उद्योग वाढवावा व ज्ञान वाढवावें.

उत्पन्न फार जाहलें म्हणजे खर्चही वाढतो कारण कीं खर्चानें उत्पन्न वाढतें, जर कोणीं खर्च करणार नाहीं तर मग शिलक ठेवल्याचा उपयोग नाहीं, खर्चावर शिलकेची प्रतिष्ठा आहे. जो शिलक ठेवितो त्याची आशा खर्चाची असत्ये याजकरितां देशाचे आबादीस जमा वाढली पाहिजे व खर्चही वाढला पाहिजे. परंतु व्यवस्था पाहिजे जर खर्च वाढेल तर जमा वाढली पाहिजे. जमा न वाढेल तर देशांतील भांडवल जाऊ लागतें व किती मेहेनत केली तरी लोकांस बर्कत नाहिशी होत्ये.

राजाचा धर्म असा आहे कीं भांडवल देशांत वाढवावें व व्यापार वाढवावा, परंतु कितीएक राजे आपला स्वता खर्च फार वाढवितात, व लोकांस व्यापाराचें अटकाव, गाद्या, जकाती वगैरे करितात. व लोकांस आबाद करण्याचें निमित्तानें त्यांस खराब करितात व किती एक देशांत निरुपयोगी लोकांचे पोषणार्थ लक्ष्मीचा व्यय होतो, याजकरितां जे लोक देशाचे उपयोगी पडतील त्यांस मात्र लक्ष्मीचा हिस्सा पोचावा व सर्कारानें गैरवाजवी खर्च करू नये, व लोकांनी, व श्रीमंतांनी रिकामे लोकांस डौलाकरिता बाळगूं नये. या कारणानी लक्ष्मी जमत नाहीं उपयोगास लागत नाहीं शेवटी देश खराब होतो.

---

## प्रकर्ण ५
## निर्भयपणाविषयीं

लक्ष्मी वाढण्यास मिळकतीस निर्भय असणें जरूर आहे. मागील प्रकरणांत लिहिलेल्या गोष्टी विशेषेकरून सर्काराचानें होऊ सकत नाहीं त्या लोकांनीच बहुधा केल्या पाहिजेत. परंतु मिळकत निर्भयपणानें राखणें हें काम केवळ सर्कारचें आहे. मनुष्यास जरी कळतें कीं लोकांचे घेऊ नये व दुसऱ्यानें मेहेनत करून संपादन केलें तें हरण करूं नये तत्रापि मनुष्याची बुद्धीस दुष्ट वासनांनीं भ्रंश होतो याजकरितां लोकांस सरकार नेमावें लागतें व सर्कारचे कायदे असतात तदनुसार लोकांचे मिळकतीचें संरक्षण होतें. मिळकतीचे रक्षणापासून असें होतें कीं येक श्रीमंत वाढतो आणि बहुत गरीबांचे श्रम तो येकटा आपले सुखाकरितां घेऊन लक्ष्मी उधळतो आणि गरीब लोक उपाशी मरतात याकरितां श्रीमंतांचे घेऊन गरीब लोकांमध्यें वाटणी करून दिल्ही तरच काय चिंता ? परंतु हें बरोबर नाहीं. त्याची कारणें खाली लिहिली आहेत.

लोक जेव्हां अगदी रानट होते तेव्हां त्यांजजवळ मिळकत नवती परंतु जों जों लोक शाहणे जाहले, तों तों मिळकतीचा संग्रह करू लागले, परंतु मनुष्यें स्वतां आळशी आहेत, गरजेशिवाय मेहेनत अगदी करीत नाहींत याजमुळें दुसऱ्यानें जमिवलें, तें पाहून त्याचा लोभ धरितील आणि जो बळकट असेल त्याची सर्व मिळकत होईल आणि जे निर्बळ व भले असतील त्याचे सर्व हरण होईल आणि सामर्थ्यवान लोक गरीबास खाऊं देणार नाहीं, याजकरितां सर्कार पाहिजे नाहींतर लोक फळ पिकण्याचा देखील अवकाश करीत नाहींत. रानांत बिनवारस झाडें असतात ती पाहा. त्यांजवर फळें पिकत नाहीं तोंच पाडतात तीच अवस्था सर्कार नसलें तर गांवांत होईल. आणि पुढें जरीं पुष्कळ लाभ होईल असें असलें तरी नाश करतील.

जर मेहेनत करून पिकविलें तें खावयास कोणी बसू देणार नाहीं, असे असलें तर कोण नांगरील, कोण पाणी घालील, कोण राखण करील. जर पदरीं पडेल अशी आशा राहिली नाहीं तर कोण मेहेनत करील. मेहनतीचें कारण भोगेच्छा आहे याजकरितां जमीन वाटून देतात मिरास करितात वतनदारी करितात याचें कारण हेंच आहे कीं ही जमीन इतकी अमक्याची आहे असें ठरलें व त्यांत घालमेल होणार नाहीं असें असलें म्हणजे तो मनुष्य ती सुधारून उपजऱ्यास आणून उत्पन्नास आणील. नाहींतर इमारती जमीनी बागा कोण करिता. याजकरितां लोकांचे आबादीचें प्रथम कारण हें आहे कीं जें जाणें मिळविलें तें त्याजपासून कोणी अन्यायानें घेणार नाहीं असा निश्चय पाहिजे. अमेरिकेंतील लोक याजमध्यें जमीनीची वाटणी व मिळकतीस निर्भय नाहीं. याजमुळे मोटाल्या जमीनी येक येकाकडे आहेत तरी तेथें कांहीं पिकत नाहीं व लोक दरिद्री आहेत. तुर्कस्थान, सिरिया व, आर्बस्थान येथें राज्यें फार वाईट आहेत सबब शेतकऱ्यास देखील लढाईची तयारी करावी लागते नाहींतर कोणी दांडगा येऊन सर्व हिसकाऊन नेईल. प्रत्येक मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं सर्व मला असावें दुसऱ्यास कांहीं नसावें याजकरितां हा स्वभाव त्याचा दमन करण्याकरितां जबरदस्त सरकार पाहिजे.

विश्वासही मुख्य पाहिजे. व्यापार विश्वासाखेरीज व पतीखेरीज चालत नाहीं. जर प्रत्येक मनुष्यानें आपले स्त्रियेचा चाकराचा यजमानाचा अविश्वास केला तर जगणे होणार नाही. मोटाले व्यापार तर दूरच आहेत. याजकरितां लोकांनी इतबारानें वागणें जरूर आहे. कोणी कोणाचे मिळकतीवर जबरीनें हात घालू नये जो घालील त्यास शासन करविण्यास सर्कारानें मदत करावी नाहींतर सावकार भयानें पैसा बाहेर काढीत नाहींत व व्यापार उघडे मनानें चालत नाहीं सर्व काम बंद होतें.

याकरितां सर्कारास आपले मेहेनतीचा हिस्सा घेऊन राखावें लागतें व ते जो कायदा हिताकरितां करितील ते लीनतेने मानणें योग्य आहे. कारण कीं सर्वांचे चांगल्याकरितां जे करितात त्यास सर्वांनी मानण्यास असा मान देण्यांत अपमान नाहीं. लोकांचे सर्कार चाकर आहे व सर्कारचे लोक रयत आहेत. येकमेकांचा निर्वाह येकमेकाशिवाय चालणार नाहीं. सर्कार म्हणजे काय कीं लोकांतून जे चांगले लोक विश्वासू आहेत त्यांस या कामावर मुकरर केले म्हणजे त्या सर्वांचे नाव सर्कार असें पडते. जशा कमीट्या, पंचायती, सभा वगैरे आहेत तद्वत सर्कार ही येक मोटी कमेटी आहे. परंतु पुष्कळ ठिकाणी सर्कार आपला धर्म सोडून लोकांची मिळकत खावयाची व त्यांची लक्ष्मी वाढवायाची सोडून त्यांचे मिळकतीचा नाश करितात. अंमल हाती आला आहे तो लोक अडाणी म्हणून जाणार नाहीं. याजकरितां पाहिजे तशी वर्तणूक करितात. नाना प्रकारचा लढायांत पैका व माणसे खर्च विनाकारण करितात. याजमुळें लोकांचे नुकसान फार होतें परंतु सर्कारास असें समजत नाहीं की सर्कार ही किती माणसें व रयत ही किती माणसे आहेत? तेव्हां लोकांचे सत्व घ्यावें हें नीट नाही.

जो मिळकत मिळवतो त्यास व त्याचे वंशाकडे चालेल हेहि सर्कारास ठरविणे जरूर आहे. कारण कीं जर मरणापाठीमागे तें जाईल असें ठाऊक असलें तर त्यानें चित्त लागणार नाहीं. याजकरितां निरंतराची आशा त्यांची असली म्हणचे सुधारणा ठीक होत्ये, याच कारणावरून ज्याणी मोटाली कामें केलीं त्यांस बक्षीस व इनामे देतात.

श्रीमंताचे घरचें वर्णन पुष्कळ लोक करितात, कीं त्याचे येथे काय वाडे, वस्त्रे काय, जर काय, सुवास काय, सोनें, परंतु हें उपयोग नाहीं, देशांत येकाचे घरी श्रीमंती असली म्हणून फळ काय ? त्याणें सर्वांचे लुटून आणलें असते तें तो उधळतो व वाईट राज्यांत बहुधा श्रीमंत लोक माहान अपराधी असतात व लोकांस अन्याये करून लुटल्याशिवाय श्रीमंत होण्याचा मार्ग विदित नसतो. आणि इकडील देशांत मागें राजे जाहले त्यांची कर्में ऐकिली तर अंगास शाहरे येतात. होळकरांची लूट, गोखल्याची लूट, टिपूचा जुलूम इत्यादि फार अत्रघड स्मरणास देखिल आहेत. मग त्या देशांची गती काय पुसावी. राजा मूर्ख असला म्हणजे देश खराब होतो. याजकरितां राज्यावर नेमणें त्यास चांगला, विद्वान, सुशील, योग्य, पृथ्वीचा मोलाचा, माणूस पाहून नेमावा म्हणजे वाकडें होत नाही.

सर्व मिळकतीपेक्षां मुख्य मिळकत मनुष्याचे हातपाय. ही प्रथम मिळकत जन्मतः प्राप्त होत्ये कोणापासून आणावी लागत नाहीं, परंतु ईश्वर पुरवितो. तीचा उपयोग पाहिजे तसा करण्याची परवानगी असली पाहिजे. परंतु याचा प्रतिबंध सर्कार करितात अशी सर्कारें फार वाईट व जे मिळकतीचा उपयोग पाहिजे तसा करण्याची पर्वानगी देत नाहीत आणि गाद्या, मक्ते, देतात तेंहि ठीक नाहीं. परंतु इंग्लंडांतील चाल येक चांगली आहे कीं नवीन युक्ती किंवा बुक कोणी केलें तर त्याजवर कांहीं दिवसपर्यंत त्याचे हक्क ठेवीतात ती युक्ती किंवा ग्रंथकर्त्याचे इछेशिवाय प्रगट करण्याचे सर्कार मना करितात. हें बरोबर आहे.

जसे आपले शरीराचा व मिळकतीचा तसाच आपले बुद्धीचा उपयोग करण्यास सर्वांस सारखी आज्ञा असावी. येविषयी हिंदू लोकांच्या चाली व शास्त्रें कांही विपरीत आहेत. येणेकरून त्यांचें असें जाहलें आहे कीं जसा येक हात बांधून येका हातानें खुषीने येकादा मनुष्य काम करितो आणि हाल विनाकारण सोसतो. तद्वत इतर जातींनें ज्ञान मिळविण्याची बंदी व कितीयेक पृथ्वीत उत्पन्न पदार्थ होत असतां भक्षण्याचा निषेध व व्रतें, यात्रा, उपास, तपें, वगैरे यांत काल कितीयेक जातो. याचा उपयोग व लाभ लोकांस काय होतो याचा विचार पाहिला पाहिजे. दिसण्यांत तर कांहीं नाहीं.

जर निर्भयपणा देशात नसेल तर कोणाचा परिणाम लागणार नाहीं. श्रीमंताचा नाश प्रथम होईल. परंतु गरीबाचे श्रीमंत होणार नाहींत व जे ते आजचा विचार पाहूं लागेल, उद्याचा पाहणार नाही व संग्रह करणार नाहीं. उद्योग खुंटेल याजकरितां निर्भयपणा हा देशाचे आबादीचें लक्षण आहे व सर्कारचें मुख्य काम आहे.

---

## प्रकर्ण ६

# किमतीविषयीं

लक्ष्मी देशांत जमत चालली म्हणजे ती घरोघर प्रवेश करिते. कोणाचे हातीं फार कोणाचे हा कमी जाते व याची कारणे काय आहेत त्याचा विचार करण्यास पाच गोष्टींचा प्रथम विचार केला पाहिजे.

१ मोल्य २ किंमत ३ खप ४ अमदानी ५ खर्च

मोल्य म्हणजे येक पदार्थ दुसऱ्या पदार्थास खरेदी करितो, तो गुण. जसें पांचशे शेर कापूस बाजारांत दिल्हा, तर येक हजार शेर तेल किंवा गूळ मिळतो, तेव्हां कापसाचे मोल गुळाचे दुपट जाहलें याप्रमाणें सर्व पदार्थांचे मोल जाणावें परंतु बहुधा सोने, रुपें, तांबे यांचें नाणे मोलाचा अजमास करण्याकरितां काढलें आहे. कारण कीं सोनें रुपें यांचे मोल जरी बदलतें, तरी इतर पदार्थांसारखे वरचेवर बदलत नाहीं. यास्तव बहुत करून मोल ठरविण्यात किंमत करितात.

किंमत म्हणजे पदार्थाबद्दल जितके रुपये येतात ती त्याची किंमत. वरती उदाहरण लिहिलें आहे, त्याचा आकार रुपये.

५०० कापूस रुपये १००=१००० तेल रुपये १००

दोहो जिनसाची किंमत सारखी आहे. तत्रापि किमतींवरून जुने काळचे किंवा पुढचे मोल्य समजत नाहीं व दुसरे देशांतीलही समजत नाहीं. याचें कारण असें आहे कीं शेपन्नास वर्षांनी सोनें रूपें देखील किमतीत कल खातें व नवीन धातूची खाण सापडली म्हणजे धातूचा दर कमी होतो व दूर देशांत दोन प्रकारचे दर असतात. जसे येका देशांत पाचशे शेर कापूस पन्नास रुपयास मिळतो. परंतु १००० शेर तेलाला शंभर रुपये पडतात. तर

५०० कापूस रुपये ५०=५०० तेल रुपये ५०

कापूस व तेल समान आहेत असें जाणावें. मागे पेरू म्हणून अमेरिकेंत येक देश आहे. तेथे पहिल्यानें युरोपियन लोक गेले आणि मजूरदार ठेऊ लागले तों दर मनुष्यास रोज तीन रुपये द्यावे तरी त्याचें पोट भरेना. कारण कीं रुपें फार स्वस्थ होतें. परंतु लोक कांही श्रीमंत व सुखी नवते· याजवरून किंमतीचा दरावरून जिनसाचें मोल्य सांप्रतकाळचे जेथील तेथे काढता येते. परंतु स्थळांतर किंवा काळांतर जाहले म्हणजे निघणार नाही. कारण कीं रुपें सोन्याची अुत्पत्तीवर न्यूनाधिक्य होते.

मोल्य दोन पदार्थाचें सारखे किंमतीनें असते. त्याजवरून असें समजावें कीं सदरी लिहिलेप्रमाणें पांचशें शेर कापूस करण्यास जी मेहेनत व जो खर्च लागतो तितक्याच खर्चात व मेहेनतीत हजार शेर तेल निघतें. म्हणून त्या दोहो पदार्थाचें शंभर रुपये किंमत सारखे आहेत. मोल्याचे मूळ जे कापुसात आहे तेंच तेलात आहे. दोघांचे ढीग मात्र लाहान मोटे परंतु मोल्य फिरवणारी वस्तु दोहोमध्ये सारखीच आहे. म्हणून ते दोनी ढीग येकामेकाशी बांदले जातात. आणखी असें आहे कीं पांचशे शेर कापुसास जी मेहेनत लागली तीच पन्नास रुपये भार चांदीस लागली आहे. म्हणून तींत कापूस पन्नास रुपयाचा मोबादला होतो.

सोनें रुपें मातींतून काढण्यास मेहेनत फार लागते. म्हणून त्या मेहनती अन्वये दर आहेत. तोळाभर सोनें काढावयास जितकी मेहेनत लागते तितक्या मेहेनतीने १८ तोळे रुपे निघते. व येक तोळाभर रुप्याच्या मेहेनतीत ८० तोळे तांबे निघते. हे येक कारण व दुसरें कारण असें आहे कीं सोन्याच्या खाणी थोड्या आहेत. रुप्याच्या त्याहून पुष्कळ आहेत. याजमुळें सर्वांस सोन्याचे खाणीशी पोचायास रुप्याच्या आठपट अधिक श्रम पडतात.

याजवरून सोनें रुपें हा निरुपयोगी पदार्थ आहे तरी इतर पदार्थांची अदलाबदल करण्याच्या उपयोगी आहे व जसे इतर जिन्नस तसाच हा येक जिन्नस आहे. या जिनसाचा उपयोग इतकाच कीं इतर जिन्नस येकापासून दुसऱ्याचे हातीं जलद पोचवितो. जसें बोलणें सर्व लोकांस येतें परंतु प्रत्येक मनुष्य बोलून निर्वाह करू लागला तर किती अडचण पडेल बरें? आणि लिहिणे आहे याजमुळे कोठेले कोठे किती दूर बोलणें होतें. येथून पत्र पाठविलें म्हणजे त्या मनुष्याचे कानांत तितका मजकूर बोलल्याप्रमाणेंच आहे. तद्वत इतर जिन्नस येकामेकाशी बदलू सकतो. परंतु पैशाविना अडचण फार पडेल आणि दूर देशांत जिन्नस पोचविणें वगैरे कांही होणार नाहीं.

कांही पदार्थ असे आहेत कीं त्यांची किंमत त्याचे दुर्मिळपणानें असल्ये कितीही मेहेनत केली तरी त्यास अधीक पिकविता येत नाहीं. परंतु असे पदार्थ थोडे आहेत.

खप म्हणजे मनुष्यास घेण्याची इच्छा आणि शक्ति दोन असलीं म्हणजे खप कोणतेहि पदार्थाचा होतो.

अमदानी म्हणजे पदार्थ पिकून बाजारांत विकावयास येणे.

खप आणि अमदानी या दोहोकडून किंमत कमिफार होत्ये. जर खप आहे तितकाच आहे आणि अमदानी फार झाली तर किंमत कमी होत्ये. आणि जर अमदानी आहे तितकीच आहे आणि खप फार असेल तर किंमत फार होत्ये याजमुळें येके ठिकाणी लष्कर जमलें म्हणजे किंमती चढतात. पाऊस पडला म्हणजे दाण्यांच्या किंमती उतारतात याचें कारण हें आहे. किंमतीत फरक खप आणि अमदानीसारखी असेल तर पडणार नाही. दोनी आधीक जाहली तरी पडणार नाही. दोनी उणी जाहली तरी पडणारी नाहीं. परंतु त्यांत जसें न्यूनाधिक्य होईल तसें किंमतीतही होईल.

पुण्यांत जर सालाबाद खप आहे तितक्याहून येकदंम फार माणसें आली तर खप वाढेल. मग जे पैसेकरी असतील ते माल घेण्यास किंमती फार लावतील. म्हणून तेजी होईल. परंतु जर येथील दाहाहजार माणसें येकदंम कोठे जातील तर किमती कमी होतील. कारण कीं विकणारे यांस भय पडून जो तो आपला माल लौकर विकील म्हणून मंदी होईल. यास्तव तेजीचे व मंदीचे कारण विकत घेणार व घेणाऱ्याचे चढाओढीत आहे.

खर्च म्हणजे माल पिकविण्यास जो खर्च लागतो तो. हेंही येक मुख्य कारण बाजारांतील किंमतींत फरक पडण्याचें आहे. काहींयेक पदार्थ बाजारांत आणला म्हणजे तो उत्पन्न करावयास जो खर्च लागला असेल तो भागून कांहीं नफा सावकारास होईल तर तो आणील. जर येक वस्त्रे करावयाचें किंवा कागद करावयाचें यंत्र आणलें त्याणे इतर लोकापेक्षां आपण माल थोडे खर्चात लौकर तयार केला आणि तो बाजारांत आणला तर आपल्याला फार नफा होईल, कारण कीं नेहेमीची किंमत येईल. परंतु ही गोष्ट प्रसिद्ध जाहल्यावर दुसरे लोक तें यंत्र करितील आणि माल करून आणितील. तेव्हां खपापेक्षां माल फार आला म्हणजे अर्थातच किंमती उतरतील. परंतु किंमत कोठपर्यंत उतरेल कीं जोपर्यंत खर्च भागून थोडा नफा राहील तेथपर्यंत, कारण कीं कोणी तोट्यानें विकीत नाहीं तेव्हा किंमत उतरतां उतरतां येका धाऱ्यावर बसेल.

खप व अमदानीनें किंमतींत फरक पडण्यास शेकडो कारणें आहेत. परंतु नेहेमी किंमत उतरण्यास कारण खर्च आहे. जर खप आणि अमदानी सारखी राहील तर खर्च कमी जाहला तरीं किंमतींत फरक पडणार नाहीं. जसें जर पावसाबरोबर धान्य पिकतें तितेकें आकाशांतून पडले आणि कांहीं मेहेनत लागलीं नाहीं तर त्याची किंमत उतरणार नाहीं कारण कीं जितका खप तितकीच अमदानी परंतु जर पिकविण्यास खर्च खंडीस दाहा रुपये लागत होता तो कांहीं युक्तीनें पांच रुपये लागावा अशी तजवीज निघाली आणि जर खपाइतकाच दाणा पिकविला तर किंमत उतरणार नाहीं. परंतु अशी स्थिती राहात नाहीं. खर्च कमी जाहला म्हणजे सगळेजण धान्य पिकऊ लागतात. कारण कीं खर्च कमी आणि नफा होतो. परंतु सर्व धान्य पिकऊ लागलें म्हणजे अमदानी फार होत्ये आणि खप वाढत नाहीं तेव्हां अर्थातच किंमती उतरतात.

कोणचाही जिन्नस पिकऊन बाजारांत येण्यास दोन गोष्टी पाहिजेत. येक मेहेनत लागली त्याची मजूरी मिळाली पाहिजे. व दुसरें जें भांडवल घातलें तें नफ्यानें परत आलें पाहिजे. कारण कीं नफ्याशिवाय भांडवल व वेतनाशिवाय चाकरी कोणी करणार नाहीं या कारणावरून पदार्थांच्या किंमती ठरतात.

---

## प्रकर्ण ७

# धारा मजूरी व नफ्याविषयीं

भांडवल व मेहेनत याजवरून किंमत होत्ये व किमतीनें धारा होतो. जशी किंमत बाजारांत येईल तसा धारा कुणबी देईल. लक्ष्मीचीं मुख्य दोन कारणें आहेत. येक भांडवल व दुसरें मेहेनत यास्तव सर्व लक्ष्मी प्रथम तिघांचे हातात असत्ये. सर्कार मजूरदार सावकार या तिघांपासून सर्व उत्पन्न होत्ये. याजकरितां धारा, मजूरी, नफा याविषयीं विचार केला पाहिजे. कोणचे कोणचे देशांत जमीनींचें मालक सर्कार नसतें. परंतु सर्व जमीन लोकांची असत्ये. व सर्कारचा वसूल सर्व जकाती व छापी कागद वगैरेपासून होतो. याप्रमाणे विलायतेत आहे. जमीन वाटून लोकांस माल (मालक) करण्याचें कारण असें आहे कीं ज्याची जमीन मिळकत जाहली तो तिला उपजयास आणितो व पैसा खर्च करून लागवड करितो. आपले मिळकतीची त्यास काळजी लागत्ये. परंतु हिंदुस्थानात जमीनीचे मालक सर्कार आहे. जमीन पिकविणारे त्याचे भाडेकरी आहेत. तत्रापि इकडे मिरास व जमीन करून देण्याची चाल आहे. मिरास इनाम जमीन त्याची मिळकत जाहली त्याजवर सर्कारचा जोर चालत नाही. तत्रापि जमीन सुधारणें हें मुख्यत्वेकरून सर्कारकडे आलें. कारण कीं जो धारा देऊन जमीन वाहतो, तो फार पैसा खर्च करणार नाहीं. याजकरिता तगाई वगैरे देण्याची चाल आहे. परंतु पडीत जमीन पुष्कळ पडत्ये त्याची लागवड सर्कारही करीत नाहीं.

ईश्वरानें उत्पन्न केलेल्या पदार्थांचें भाडें द्यावे लागतें असा पदार्थ काय तो जमीन आहे. बाकी वारा पाऊस उजेड हे बिनभाड्यानें चाकरी करितात. मनुष्यानें जीवनाचें धान्यवगैरे सर्व पृथ्वींत उत्पन्न होते. परंतु जर ईश्वरानें असा नेम केला असता कीं जितकें माणसास पाहिजे तितकेंच जमीनीनें पुरवावें. तर सर्व लोक येक धंदा करिते. सर्व नांगर धरतें व येक जातच पृथ्वीवर होतीं व मनुष्याची स्थिती येकसारखी राहिती. कोणी शाहाणा होताना विद्या वाढतीना व कोणास वस्त्रे करावयास व घड्याळे करावयास व विद्या करावयास बनतेना आणि लोक रानटी राहते. परंतु भगवंतानें कृपेनें करून जमीनीचे अंगी शक्ती अशी ठेविली आहे कीं मेहेनत दोघानी केली तर पाचाचे पोट भरावें. याजमुळें बिनमेहेनतीनें खाणारे तीन असामी कांहींतरी नांगराशिवाय दुसरा उद्योग करितात अणि ज्ञानसुख आणि शरीरसुख दुसरे प्रकारानें वाढवितात.

जमीनीचे वसुलावरा सर्कारचा निर्वाह होतो. याचे कारण असें कीं हा देश सुधारलेला नाहीं. जमीन सोडावी तर दुसरें कांहीं नाहीं. यास्तव प्राचीनकाळीं जेव्हा लोक मध्यम शाहणे होते तेव्हापासून चाल चालत आली आहे. परंतु विलायतेंत असें नाहीं. सर्कार श्रीमंतावर कर बसवितें. गरीबावर बसवित नाहीं व जमीनीचे लोक इनामदार आहेत. कोणाकडे किति कोणाकडे किती असी जमीन सर्वांस प्राचीन काळापासून वाटून दिल्ही आहे. त्याची लागवड व वसूल आपण भाडेकरी ठेउन इनामदाराप्रमाणें करावी. जमीन कधी सर्कार घेत नाहीं. सर्कारचा कर बहुधा श्रीमंती भोगणारे गाड्याघोडीं बाळगणारे यांजवर असतो. कारण कीं सर्कार श्रीमंताचें संरक्षण गरीबाप्रमाणेंच किंबहुना श्रीमंताचें अधिक करितें. तेव्हां सर्कारचा चरितार्थ होण्यास त्याणी पैसा द्यावा हे योग्य परंतु या देशांत असें नाहीं. सर्कार गरीबापासुन घेतात आणि लक्षाधीशावर कांहीं कर नसतो. जरी सर्कारचा लाभ त्यांस सारखाच आहे.

कांहीं देश असे आहेत कीं तेथे माणसें फार कमी व जमीन फार आहे. तेथे जमीनीचा धारा नाहीं. कारण कीं जमीनीस कोण पुसतो. चांगली पुष्कळ जमीन पडली असत्ये. जमीन जर येकसारखे प्रतीची व बहुत असेल तर कोणी धारा देणार नाहीं. परंतु असें नाहीं. जमीन पुष्कळ प्रतीची असते. व जमीन थोडी आहे. याजकरितां देशांत जितकी माणसे असतात त्यांचा निर्वाह होण्यापुरती चांगली जमीन असते. तितकीच पहिल्याने पेरतात. परंतु पुढें माणसें वृद्धिंगत जाहली म्हणजे

तितकें उत्पन्न पुरत नाहीं. मग मध्यम प्रतीची असती ही पेरू लागतात. मग धारा चालू होतो. चांगली जमीन पाहून सर्कार म्हणते की याबद्दल कांहीं नफा दिल्हा तर देऊ नाहींतर ती वाईट घ्या तेव्हा शेत करणारा कबूल करितो आणि धारा देऊ लागतो. याप्रमाणें धाऱ्याची चाल पडते.

यास्तव धारा म्हणजे जमीनीचा जो उत्पत्तीचा अविनाश गुण आहे त्याचे उपभोगार्थ मालक जो ठरविला आहे त्यास स्वामित्व देणें याचें नांव धारा. जमीन ईश्वरानें केली याचें स्वामित्व येकास असावें व दुसऱ्यास नसावें हें कशाकरितां याचें कारण पूर्वी निर्भयाचे प्रकर्णात लिहिलें आहे.

कितिएक जमीनी अगदों खडकाळ आहेत. त्याचा उगेंच नांवाला धारा देतात. कितियेक जमीनी वाईट चांगली येकाखाली एक देतात. परंतु धारा देण्यास इतकें जरूर पाहिजे कीं तो जमीनींत वर्षभर खपेल. त्याचें वेतन त्यास मिळावें आणि धारा देण्यास कांही वरती मिळालें पाहिजे. पडीत पडतें याचें कारण असें आहे कीं त्यास पिकविण्यास जो खर्च लागतो तितकें उत्पन्न होत नाहीं. याजकरितां पडित पडतें व त्याचा धारा कोणी देत नाहीं. परंतु जर माणसें देशांत वाढतील तर त्या जमीनीसही पिकवावें लागेल. आणि धाराहि देतील. परंतु माणसांपुरेतें अन्न पिकत असल्यास मग वाईट जमीनीस कोण पेरतो. यास्तव जमीन जितकी कमी लागवड होईल तितका धारा कमी होईल. आणि जितकी जमीन अधीक लागवड होईल तितका धारा फार होईल कारण कीं फार जमीन लागवड जाह्ली म्हणजे वाईट जमीनदेखील लागवडीत येते व त्यांस मेहेनत व पैसा फार लागतो. याजकरितां सर्कारास तगाई वगैरे फार द्यावी लागेल. व कौल कितीएक सालचें द्यावे लागतील. मग तितक्याबद्दल धारा अधीक दरानें सर्कार घेईल.

वाजवी रीतीनें धारा याप्रमाणें चढतो, उतरतो, परंतु याखेरीज सर्कारचा जुलूम व हरण करण्याची इच्छा व रयत लोकांचा गरीबपणा व अज्ञानपणा याजमुळेंही चढउतार होतो. परंतु या कारणानी चढउतार जाहल्यास लोकांची दुर्दशा होत्ये.

मजूरी म्हणजे वेतनेहि नाना प्रकारचें लोकांस नाना प्रकारची असतात. याचें आश्चर्य लोकांस वाटेल. परंतु विचार केला असतां सहज समजेल कीं दर वेगळाला असणें जरूर आहे. मजूरीचे दराची पांच कारणें आहेत. प्रथम कामाचा योग्यायोग्यपणा, दुसरें तें काम शिकण्याचा खर्च, तिसरें काम सदोदित राहील किंवा नाही, चौथें विश्वासाची कामे पांचवें जाखीम.

पहिलें कारण असें आहे कीं कामाचा घाणेरेपणा व अब्रू व शरीरास पीडा यामुळें असें काम करणाराची मजूरी अधीक पडते कारण कीं अशी कामें इतरासारखी मजूरी मिळाली तर कोणी करणार नाहीं. याप्रकारची कामें खाटीक अपराध्यास फाशी देणारी याची आहेत. तशीच जा कामामुळे बेअब्रू नाहीं व फार बुद्धी नको त्यास वेतनें कमी आहेत. अशी कामें शेतकी, मासे धरणें वगैरे आहेत अणखी विद्या शिखणें म्हणजे ज्यौतिषी वैद्य वकील कारागीर यांची वेतनें मोटी आहेत कारण कीं हीं कामें अवघड आहेत बुद्धी फार पाहिजे फार काळ शिखण्यांत घालवावा लागतो. सिपायाचें कामास वेतन फार आहे कारण कीं ते दुःखदायक आहे जरी शिपाईगिरी पुष्कळ लोकांस करावी असें वाटतें याचें कारण शिपाई बहुधा निकामी डौलदार असतात. परंतु वास्तवीक पाहिलें तर त्यांस दुःख फार जीवाचें भय फार आहे. तसेच तारवावरचे लोक यांची वेतनें शिपायापेक्षां फार आहेत कारण कीं जमीनीवरचें फौजेपेक्षां तारवांतील फौजेचे हाल फार आहेत. तमासगीर व गाणारे वगैरे यांची वेतनें फार आहेत. कारण की त्यांस बुद्धी विशेष पाहिजे असे नाहीं तत्रापि त्यांत लज्जा आहे याजकरितां बहुतलोक त्यांत पडत नाहींत. परंतु हा चमत्कार आहे कीं जी कामें लज्जयुक्त आहेत असे लोक जाणतात परंतु त्यांचे पोषण पैसा देऊन करतात.

दुसरें कारण असें आहे कीं चित्र काढणारे, वैद्य, वगैरे ज्यांस तें काम शिखण्यास मेहेनत पडते कितीयेक वर्षे शिखतात तेव्हां येतें अशा कामास वेतन इतरापेक्षां फार आहे.

तिसरें कारण असें आहे कीं चामार, सिंपी वगैरे यांस नेहेमी कामें आहेत परंतु कुंभार हे बारा महिने विटा करूं सकत नाहींत, कितीयेक दिवस रिकामे बसतात. यास्तव त्यांचे वेतन अधीक आहे, कारण कीं दोन महिने काम करून चार महिने त्यांस निर्वाह करावा लागतो.

चौथें विश्वासाचीं कामें म्हणजे सोनार, मोत्यें छेदणार, हिरे कापणार, वकील, वैद्य, ही कामें या प्रकारची आहेत.

पांचवें कितीयेक कामें अशी जोखिमाची आहेत कीं तीं दहाजण शिखत असेल तर येकास येतें अशा प्रकारची विद्या शिखण्याची भाषा शिखण्याची वगैरे कामें आहेत. यास्तव त्यांस वेतन अधीक पडतें.

या प्रमाणे वेतन अधीकउणें असण्याची कारणें. शिवाय दुसरें कारण असे आहे की लोक फार व रोजगार कमी असले म्हणजे दर कमी होतात व रोजगार वाढलें आणि लोक थोडे असले म्हणजे वेतन फार होतें. जर लोक फार जाहले तर त्यांस रोजगार वाढिवणें जरूर आहे. नाहींतर त्यांचीं दुर्दशा होईल. रोजगार वाढणें लक्ष्मी वाढल्याशिवाय होत नाहीं किंवा लोकांची वृद्धी न व्हावी असी तजवीज केली तर येक लोक सुखी राहतील.

मनुष्यांची वृद्धी होत्ये याचा हिशेब पाहण्यास मनुष्यासारखी दुसरीं जनावरें आहेत त्यांची वृद्धी पाहिली. त्याजवरून असें दिसतें कीं स्त्रिया दर वर्षास प्रसवतात. परंतु ज्यांची मुलें अंगावर पितात त्यांस गर्भसंभव लवकर होत नाहीं. याजकरितां सरासरी दोन वर्षांस एक मूल धरलें तर स्त्रीचा प्रसवकाळ विसापासून पंचेचाळीसपर्यंत अजमासें आहे. तेव्हां वीस वर्षांत दहा दहा मुलें सरासरी पडतात. परंतु गरीब वगैरे यांची मुलें ददातीनें, रोगानें, वगैरे कारणांनी मरतात यास्तव सरासरी येके दंपत्यास पांच मुलें धरलीं म्हणजे त्यांत सर्व वजाबाकी आली. याप्रमाणें हिसेब धरला तर वीस वर्षांत सरासरी दुपट लोक व्हावे. परंतु असें होत नाही. लोकवृद्धीस अटकाव फार पडतात. तथापि अमेरिकेंत इंग्रज लोक गेले तेव्हां जितके गेले त्याचे दुपट पंचवीस वर्षांत जाहले. त्याचे दुपट पन्नास वर्षांत जाहले. याप्रमाणें दीडशे वर्षेपर्यंत वृद्धी पावले. परंतु असे नेहमी वृद्धी पावत नाहींत. जर असे वृद्धी पावतील तर इतक्यांस अन्न पाहिजे. परंतु जमीनीपासून किती उत्पन्न होईल याचाही अजून अंत नाही व लोक किती वाढतील याचाही अंत नाहीं. यास्तव या गोष्टीचें भय नाहीं. तत्रापि इतके खरें कीं जमीनींत अन्न उत्पन्न होईल तेथपर्यंत पराकाष्ठा लोक वाढतील, अधीक होत नाहींत. जर लोक मनस्वी वाढले तर सर्वांस पोटापुरतें अन्न मिळतें इतकें वाढतील, अन्न संपले म्हणजे लोकाची वृद्धी आटोपली हा अखेर नियम आहे.

लोकवृद्धीस नेहेमी अटकाव पडतात. याजमुळें जितके लोक वाढावे असें आहे तितके वाढत नाहींत. ते अटकाव असे की लोकांचे दुर्गुण, दरिद्र, आयुष्यक मी होणारी कामें, रोग, साती, लढाया दुष्काळ, व्यसनें, पाणी वाऱ्यात खपणें इत्यादि. यांतील जितकी कमी होतील तितकी करावी हा धर्म प्रत्येक दयाळू माणसाचा आहे.

लोकांचे जन्म सुखांत व्हावयास मुख्य कारण लग्न आहे. जे पुरुष लग्नावाचून किंवा लग्न करून व्यसनग्रस्त होतात ते फार निंद्य. त्यांस फळेंही तशीच प्राप्त होतात, व ज्या स्त्रिया लग्न टाकून उनाड फिरतात त्याहि निंद्य व जनावरें होत व त्यास फळे फजीती, रोग, पाप, दरिद्र, हींच प्राप्त होतात. यास्तव येक स्त्री करणें पुरुषास योग्य आहे आणि त्यांत सुख आहे. येकाहून अधीक स्त्रिया करितात ते मूर्ख व फजीतखोर आहेत. ईश्वराची इच्छा काय आहे हें कळण्याचा मार्ग असा आहे कीं सर्वांस जें चांगलें तीच ईश्वराची आज्ञा. यास्तव सर्वांनी जर पुष्कळ स्त्रिया करूं म्हटलें तर

जगांत स्त्रिया व पुरुष सारखे आहेत. तेव्हां ही गोष्ट सर्वांस चांगली नाहीं. तस्मात ईश्वरआज्ञेस विरुद्ध. दुसरे असें आहे कीं लग्न करणें तेंहि बहुत विचाराने केले पाहिजे. लहानपणी लग्न हें सर्वथैव विचारास व शास्त्रास व ईश्वरआज्ञेस विरुद्ध आहे. जेव्हा मनुष्यास असी शक्ती येईल कीं आपले मुलांस व स्त्रीस सुखें करून पोशील तेव्हा त्याणें लग्न करावें. लाहानपणी लग्न केल्यानें आपल्यासही खाण्यास नाहीं आणि स्त्री व मुले यांसही खाण्यास नाहीं अशा प्रसंगास आपण आणलेसें होते, व तेणेंकरून दुःखवृद्धी होत्ये व रोग, आयुष्यहीनता, होते आणि असा लौकर लग्न करणारा मनुष्य महान दोषी होतो. आणि लाहानपणीं पोर मेलें म्हणजे त्यास जितके खाण्यास घातलें ते सर्व व्यर्थ गेलें. तें पुनः परत येत नाहीं. पोरास वाचिवणें हें आईबापाचे दुःख खेरीज देशांतील लक्ष्मी वाढिवणें आहे. असें असतां जे लौकर लग्ने करितात व लोकांस क्षीणायु व रोगी उत्पन्न करितात ते केवढे मूर्ख, आणिक मूर्खपणा किती हिंदुस्थानात आहे याचा अंत नाहीं.

जे लोक म्हणतात कीं जन्मास येतो त्यास ईश्वर निर्वाहाची सोय करतो. ते वेडे आहेत. कारण कीं जर शाहाणपणानें वागलें तर ईश्वर सोय करील, परंतु मूर्खपणा केला तर आपला दोष आहे. सद्‌गुणावांचून सुख नाहीं आणि व्यभिचाराचा त्याग हा येक मोठा सद्‌गुण आहें आणि सावधान हाहि सद्‌गुण आहे. याजकरितां लग्नाचे कामांत दोनीं पाहिजेत. आईबाप लौकर लग्नें करून पोरास दुःखी करितात, तसेंच जे गरीबास लग्नास पैसा देतात तेहि दोषी आहेत. लग्न कोणी स्वतंत्रपणानें संसार करण्याचें सामर्थ्य आल्याखेरीज करू नये. यास्तव लोक सुखी होण्यास नीतिमान असले पाहिजेत.

लोकांमध्यें स्वतंत्रता असली पाहिजे म्हणजे व्यंग लोकाखेरीज प्रत्येकानें आपले उद्योगानें मिळऊन खाल्लें पाहिजे. कारण कीं स्वतंत्रता नसली म्हणजे लोकांचा खरेपणा, आपले गुणाचा अहंभाव व आपली स्वता किंमत व गुण व उद्योगाची थोरवी परतंत्री लोकांत नसतात. परंतु परतंत्र हा गुण हिंदु लोकांचा फार आहे. आणि ही केवढी लज्जा व बेषरमपणाची गोष्ट आहे कीं येकऱ्याचे पदरी अर्जवांत व नातें जडऊन खुषामतीनें काळ घालवावा. परंतु श्रीमंतांचें घरीं असे कितीक असतात. असे लोक जगांत नसतील. ते आपल्यास बेकिंमत करून दुसऱ्यास नासतात. येकत्र कुटुंब राहाण्याची चाल फार आहे. परंतु ही चांगली नाहीं. येक मिळवितो आणि पन्नासजण त्याचे पदरी निरुद्योगी राहून खातात. या लोकांची निंदा कितीहि केली तरी ते पात्र आहेत. परंतु जर हें श्रीमंत लोक शाहणें होतील तर लोक आपले सुखास जो पैसा लागेल तितकाच खर्च करून बाकी कांहींतरी उपयोगास लावितील आणि आळशी रिकामें मूर्ख लोकांस पंक्तीस न बाळगतां त्यांस उद्योग करून पोट भरा असें सांगून हाकून देतील तर बरें होईल, तेव्हां हा देश सुधारेल आणि त्वरित लग्नाची चाल मोडली पाहिजे.

ज्ञान हें सर्व रोगाचें ओषध आहे. आणि ज्यास ज्ञान आहे त्यांस आपली स्थिती सुधारण्यास पुष्कळ वाटा सापडतात. यास्तव जे गरीब लोकांची स्थिती चांगली व्हावी अशी इच्छा करितात त्याणीं गरीब लोकामध्ये ज्ञानप्रसृती करावी. व सर्कारचा हा मुख्य धर्म आहे. पोलिसाचे फार लोक ठेऊन अपराध कमी होत नाहीत. परंतु लोकांची सुधारणा केल्यानें कमी होतात. गरीबास ज्ञान नाहीं म्हणून असें वाटतें कीं श्रीमंताचे येथे चोरी जाहली तर म्हणतात कीं त्याजवळ पुष्कळ आहे. चोर किती नेईल. याचें कारण ते श्रीमंताचा हेवा करितात परंतु शहाणपण आल्यावर असें करणार नाहींत. सर्कारानें अपराधाचें मूळ तोडलें पाहिजे. कैदखाने व शिपाई मूळ तोडित नाहींत.

कोण म्हणतात कीं यंत्रें व युक्ती निघून लोक उपाशी मरतात. परंतु ही चूक आहे. यंत्रें व युक्ती निघाल्यानें इच्छा वाढते व खप अधीक होतो. आणि उद्योगाचा संक्षेप होऊन लोक दुसरे कामास लागतात. देशांत जितकें अन्न वगैरे लक्ष्मी आहे तितकें लोकांचें पोषण होतें. यंत्र व युक्ती निघाली तर त्या लक्ष्मीस क्षीण करीत नाहीं परंतु लोकांस मात्र सुखवृद्धी करिते. पाहा कीं

छापण्याची विद्या कापुसाची वस्त्रे वगैरे करण्याची विद्या याणी काय अवस्था केली आहे. कांहीं वाईट केलें नाहीं. परंतु इच्छा वादविली खप अधीक केला ज्ञानवृद्धी जाहली.

मजूरीचे दरार्चे आणखी येक कारण आहे कीं जोंपर्यंत मजूरदारार्चे पोट भरेतोंपर्यंत त्याचा दर कमी होईल, त्याखाली होणार नाहीं. परंतु कांहीं देशांत गरीब लोक सुखांत आहेत व खाण्या-पिण्याचे हाल करीत नाहीत. परंतु हिंदुस्थानातील गरीब लोक फार वाईट झोपड्यांतून नुस्ती भाकर खाऊन राहतात. अशा स्थितींत राहिल्यामुळें त्यांची मजूरीही कमी आहे. विलायतेंत मजूरी कनिष्ठ पक्ष पंधरा रुपये महिनाभर माणसी पडतात आणि या देशात दोन रुपये महिना आहे. मजूरदार लोक बाहेरदेशी वगैरे जाऊ लागले म्हणजे त्यांस सुखाची गोडी लागते आणि ते लौकर लग्नें करीत नाहींत, कारण कीं त्यांस बाहेर जाण्याची वगैरे अडचण पडत नाहीं. परंतु इकडील मजूरदार लोक यांची वेतनें फार कमी याजमुळें त्यांस सुखाची गोडीं नाहीं व फक्त भाकरी खातात. जरा पाऊस कमी पडला तर लागलाच काळ पडतो. कारण कीं वेतनें कमी म्हणून पैसा नाहीं. यास्तव मजूरदारांची वेतनें मोटीं असावी म्हणजे जरी काळ पडला तरीं ते मोजीत नाहींत, निर्वाह करितात.

धारा व मजूरी सदरी लिहिली गेली. आतां नफा मात्र राहिला. नफा म्हणजे जो भांडवलाचा मालक असतो त्यास भांडवल व्यापारांत घालून तें परत येते समयीं अधीक होऊन येतें, त्या अधिकार्चे नांव नफा. जसा व्यापार असेल तसा नफा अधीककमी होतो. दारूचा व्यापार आहे तर त्याजवर येक विस्तवाची फुणगी पडली तर हजारो बुडतात म्हणून त्या व्यापारांत भांडवलाचा नफा फार घेतात.

या प्रमाणें देशांतील लक्ष्मीर्चे तीन भागांर्चे निरूपण जाहलें. याजवरून वाचणाराचे लक्षांत देशाची व्यवस्था चांगली वाईट व उपाय काय योजावे हे समजण्यांत येतील. आणि या शास्त्रार्चे ज्ञान सर्वांस जरूर पाहिजे.

## लक्ष्मीज्ञानातील गोष्टी हिंदुस्थानास लाऊन पाहिल्या असतां काय वाटतें ?

पृथ्वीवर जे सुधारलेले व शाहणे देश आहेत त्यांचे बरोबरीस हा देश नाहीं व येथील लोक अनुपयोगी व अधीर फार आहेत व कितीयेक गैरसमजुतींनी त्यांस नाना प्रकारचे अटकाव पडून त्यांचे पाऊल पुढें पडत नाहीं.

मागील राज्यांत नीच जातीचे लोक सुखी होते असें नाहीं. त्याची स्थिती हल्ली पहिल्या-प्रमाणेंच आहे. परंतु जे रोजगाराने पोट भरणारे आहेत व आळसांत राहून खाणारे यांची स्थिती सांप्रत बदलली आहे. कारण कीं शेतकीचा धंदा मागील राज्यासारिखाच दुःखदायक आहे. तत्रापि मागील राज्यांत आशा होती कीं दुसरा रोजगार करू आणि मिळतही होता. तें आतां नाहीं.

भांडवल होतें तेव्हां उद्योग केला नाहीं, भांडवल गेलें तेव्हां उद्योग सुचून उपयोग नाहीं.

सांप्रत जें भांडवल आहे तितकें विलायतेंत आहे, व हिंदू लोकांस शेतकीमात्र राहिली आहे. तत्रापि इंग्रज इकडेस शेत करण्यास येत नाहीं म्हणून बरें. नाहींतर तो रोजगार जाऊन शेतकी-याचे घरचे गड्याची कामें मात्र या लोकांस राहती. यास्तव सर्कारास योग्य आहे कीं दिवसें-दिवस या लोकांस जागा मोठ्या दिल्ह्या पाहिजेत. तरच कांहीं भांडवल इकडे राहील.

आज श्रीमंत कितीयेक लोक आहेत त्याणी आपला व्यापार वाढविला तर व विलायती यंत्रें व युक्ती इकडे आणल्या तर होईल. परंतु त्यांचे डोळे उघडून हें त्यांस सुचें तों ते दरिद्री होतील म्हणून त्यांची आशा नकोच.

श्रीमंत लोक हे साधारण हिंदू लोकांचा गुण अधैर्याचा आहे त्यांत श्रेष्ठ असतात आणि ते पैसा उपयोगी किंवा देशहिताचे व्यापारांत घालीत नाहीत. परंतु गहाण वगैरे व्याजबट्टा गांवांत होईल तितका मात्र करितात. हा स्वभाव अज्ञानमूलक आहे.

हिंदु लोक प्राचीनकाळीं विद्या व ज्ञानाचे चौकी होते. परंतु तो काळ गेल्याला ३००० वर्षे सुमारीं जाहली. या तीन हजार वर्षांत याणी कांहीं केलें नाहीं. विद्यावृद्धीचा भाग मूर्ख भट खाऊं लागले. व इतर लोक अडाणी राहिले. याजमुळें इतके वर्षांत त्यांची स्थिती सारखी राहिली आणि आतां चाली बदलल्याशिवाय ही स्थिती बदलेल अशी आशा नाहीं. भटानी विद्यावृद्धी व ज्ञानवृद्धीचें काम केलें पाहिजे. नाहींतर कांहीं दुसरा धंदा केला पाहिजे.

हिंदू लोकांचे शहर म्हणजे आळशी लोकांचा समुदाय असतो. त्याणी गरीब लोकांस पिळून अन्न घ्यावें आणि रिकामें बसून खावें. परंतु हीच शहरें जर उद्योगी लोकांची होतील तर लक्ष्मी वाढेल.

मागील राज्यांत गरीब लोकांचे स्थितीकडे कोणी पाहिले नाहीं. जबरदस्त लुटून खात असत. परंतु आता सर्कारास योग्य आहे कीं गरीबाची स्थिती व जमीनीचें मालक सर्कार आहे तीची स्थिती सुधारली पाहिजे. याजकरितां तळीं, विहिरी, वगैरेसाठी कौल तगाई सर्कारानें अधीक दिल्ही पाहिजे.

हिंदूलोक अविचारी आहेत यांस विचार करण्याची व वाचण्याची गोडी नाहीं. हे लोक साधारण गोष्टी सांगत बसले तर कोणी म्हणतो कीं वांगी खाऊं नयेत कोणी म्हणतो शनिवारचा उपास केला तर मोठें फळ आहे. द्वैत अद्वैतवाद व बसावें कसें स्नान करावें कसें इत्यादि पोकळ वाद करितात. कोणी बायका मासपाळण कोणी तिथीपाळण करितात. परंतु विचार आणि राजकीय प्रकरणें कोणी बोलतदेखिल नाहीं व त्यांस कळतहीं नाहीं. यास्तव चांगल्या बुद्धी निरुपयोगी कामांत व्यर्थ खर्च होतात. म्हणून आजपर्यंत त्यांची मनें अज्ञानमार्गांत पडली आहेत, तीं फिरऊन ज्ञानाचे ओघात घातली पाहिजेत. म्हणजे अर्थातच शुष्क गोष्टी सोडून देतील व बायकांची स्थिती अवश्य सुधारली पाहिजे.

लोकांमध्ये ऐक्यता, खरेपणा विश्वास अधीक आला पाहिजे. सांप्रतची नीती ठीक नाहीं व भट कमी जाहले पाहिजेत. व दुसरें जे आळशी लोक आहेत त्याचे ओझे कमी जाहलें पाहिजे. आजपर्यंत मागील राज्यांत लक्षावधी अप्रयोजक व निरुपयोगी प्राणी असे हे भट जेवले. यांजपासून इतकेंच जाहलें कीं गरीबांची दुर्दशा जाहली आणि जी लोकांची लक्ष्मी त्यांचे जवळ राहावी किंवा ज्ञानवृद्धीकडे लावावी ती नदीत पडली असें जाहलें. भटानी खाऊन कांहीं सार्थक केलें नाहीं. कोणतीही विद्या व विचार केला नाहीं. यांजकरितां हे लोक ताळ्यावर आणले म्हणजे त्यांस त्यांचें कर्तव्य समजेल.

हिंदुस्थानासारिखा देश उत्पत्तीस कोठे नाहीं व येथील लोक स्वभावें करून बुद्धिवान आहेत. परंतु त्यांस अटकाव फार आहेत. सबब येथील लोकांसारखे मूर्खही थोडेच ठिकाणी आहेत. असे हे लोक आहेत तोपर्यंत यास परतंत्र राहिलें पाहिजे. मुसलमान जाहलें इंग्रज आले, इंग्रज गेले तर दुसरे कोणी येतील. परंतु या लोकांस आज कांहीं सामर्थ्य स्वतंत्र भोगण्याचें नाहीं. जसा अर्धांगवायू जाहलेला मनुष्य उठत नाही त्यास हाती धरणारा पाहिजे. जर येक गेला तर दुसरा पाहिजे. परंतु येक गेला तर त्याचा वायू गेला असें होत नाहीं. ज्या काळीं वायू जाईल तेव्हा त्यास कोणी नको.

कोणी म्हणतील कीं आजपर्यंत अम्ही सुखाचे होतो. आतां इंग्रज आले म्हणून भिकारी जाहलो. तर आजपर्यंत सुख होते तें सुख नव्हे परिणामी तें विष जाहलें. तुम्ही ज्यास सुख म्हणता त्यास अम्ही सुख म्हणत नाहीं परंतु मूर्खपणा म्हणतो. तुम्ही आजपर्यंत सुखांत खाण्यापिण्याच्या

होतेत, परंतु शहाणपण मिळविलें नाहीं. म्हणून त्या सुखानें तुम्हांस इतकें मूर्ख केलें कीं कांहींयेक शुद्धी नाहीशी जाहली. जसें रोगाच्या उदभवाच्या प्राक् कुपथ्यॆंकरून सुख होतें परंतु तें नाशाचें कारण. तसें तुम्ही शेवटी मूर्ख जाहलेत कीं तुम्हास कोणीही यावें आणि जिंकावे. त्यांत कांहीं अवघड नाहीं असें जाहलें. तुम्ही लाख येकीकडे आणि परकी पांचहजार येकीकडे तरी तुमची दुर्दशा व्हावी अशा स्थितीप्रत पोचविणारे सुखास सुख म्हणू नये.

विद्या व ज्ञान याशिवाय दुसरे औषध या लोकांस भानावर आणण्यास नाहीं. यास्तव सारांष हाच कीं यामध्ये ज्ञान वाढून शाहणे होतील तो प्रयत्न करण्याचा ज्यांस हे मूर्ख आहेत असें वाटतें त्या सर्वांचा धर्म आहे.

हिंदुस्थानांत पूर्वीपेक्षा आतां लोक अधीक वाढू लागले कारण कीं लढाया दंगे वगैरे कमी आहेत. परंतु लग्न करण्याची व्यवस्था नाहीं. भिकारी लग्नें करितात आणि म्हणतात, कीं अम्ही कुटुंबवत्सल आहो. हा मूर्खपणा मोडला असतां दरिद्र अर्थात कमी होईल.

सर्व देशांत असें आहे कीं श्रीमंतांस मुलें फार होतात व गरीबास कमी मुलें होतात व मरतात फार. परंतु येथे उलटें आहे. याचें कारण येथील श्रीमंत नीतिभ्रष्ट असतात.

श्रीमंतांनी द्रव्य खर्च करून मोठाली कामें पतकरून लोकांस मार्ग दाखविले पाहिजेत किंवा सर्कारानें तरी दाखविले पाहिजेत.

बहुत देशांत असे लोक जाहले आहेत कीं त्याणी लोकांचे कल्याणार्थ प्राण अर्पण केले. त्याची नांवे मार्टरस् (मार्टियर्स) इंग्रजीत, पारसीत शिया म्हणतात. तसे लोक हिंदुस्थानांत जाहल्याच्या गोष्टी कदाचित पुराणांत आहेत, परंतु अलीकडे कोणी नाही.

आणखी हिंदू लोकांनी मागील ग्रंथ लिहिले ते देव होते ही समजूत सोडली पाहिजे; याजमुळें त्यांस फार माघारेपणा आला आहे.

लक्ष्मीचा उपयोग संयुक्त जाहला पाहिजे. याजकरिता फार कलाबतूची पांघुरणें व अत्तरें वगैरे निरुपयोगी पण बहुत किमतीचे पदार्थ याचा खप थोडा होई आणि उपयोगी पदार्थ फार व्हावे याजवर राजानें लक्ष ठेवावें. बहुधा श्रीमंत लोक लक्ष्मीचा उपयोग वाईट कामाकडे करितात. याजकरितां लोक सुख पावत नाहींत. बाजीरायानें बहूत पैसा व्यर्थ खर्च केला. लोक भ्रष्ट जाहले व नीतीन्याय इत्यादि चांगलेपणाचा नाश जाहला.

कोणी म्हणतील कीं विद्या करणें ही श्रीमंतीच आहे. कारण कीं पैसा खर्च केल्याशिवाय विद्या होत नाहीं. सर्वास विद्या करणें शक्य नाहीं याजकरिता जे श्रीमंत असतात तेच मात्र पैका खर्च करून विद्या शिखतात. ही गोष्ट खरी आहे. परंतु विद्येकडे खर्च होईल तो उपयोगी कामाकडे खर्च जाहला असें समजावें. तेणेंकरून लक्ष्मी व वास्तविक सुख अधीक होईल. याजकरितां जे श्रीमंत व ज्यांस अनुकूळ असेल त्याणी विद्या शिखावी व लोकांस पढवावी याज येवढा धर्म नाहीं. याजकरितां विद्यावृद्धीस लक्ष्मी पाहिजे.

लोकांच्या स्थिती वरचेवर बदलतात. बहुधा देशांतराचे इतिहासावरून पाहण्यांत आलें आहे कीं प्रथम लोक रानटी असतात. त्याजमध्यें कांहीं विशेष ज्ञान व बंदोबस्त नसतो. परंतु भोळसरपणा व प्रामाणिकपणा असतो. त्यांस विलास ठाऊक नसतात व लक्ष्मी खर्च करून निरुपयोगी पदार्थावर प्रीती नसते असे असतात. परंतु नंतर अशा लोकांस द्रव्य किंवा शक्ती जर प्राप्त होईल तर त्यांस ओझें पडलेसें होतें, कारण कीं त्यांस माहिती नसल्यें. परंतु असें असतां असतां ते सुखाची ओळख पडतांच मनस्वी सुखास लुब्ध होतात आणि पहिला आपला सरळपणा वगैरे रानटी अवस्थेमध्यें जे गुण दर्शविले असतात ते सोडून भ्रष्ट, मारामारी करणारे व अन्याय करणारे होतात. त्यांचे चित्त विद्येवरून निघतें व निर्बळ व रोगी, असंपत्तीवान, असंततीवान, निःशौर्य,

निस्तेज, होतात कलहास प्रवर्तक धैर्यभग्न होतात. ही लक्षणें लोकांचें राज्य बुडण्याची आहेत व असे लोक जाहले म्हणजे त्यांजवर कोणीतरी येऊन पडून या बेवारशी लोकांवर सत्ता चालवितो.

याप्रमाणें रूमचे लोक, ग्रीक देशाचे लोक व हिंदुस्थानचे लोक आहेत व त्यांची अशी दशा जाहली. व कितीयेक देशचे मध्यावस्थेंत व कितीयेक देशचे प्रथमावस्थेंत व कितीयेक देशाचे उत्तमावस्थेंत आहेत. मराठे लोक नीचावस्थेंत आहेत. प्रथम हे लोक सरळ भले प्रामाणिक असे होते. पुढें त्यांस सुखानुभव जाहला, परंतु त्याजमुळें ते इतकें माजले कीं त्याणी सर्व भान सोडलें व बाजिरावाचे वेळेस तर मराठे लोक भ्रष्ट होऊन गेले. म्हणून लागलेंच राज्य बुडालें. तसेंच शिक लोक आलीकडे असेच जाहले म्हणून बुडाले. याप्रमाणें सर्वांची अवस्था आहे. इंग्रज लोक अजून मध्यावस्थेंत आहेत, परंतु त्याणी अत्यावस्थेंत यावें म्हणून फार यत्न केला आहे व ज्ञानास प्रमुख ठेवले आहेत. असी सावधगिरी ठेविली तर बुडावयास उशीर लागेल यांत संशय नाहीं.

मुख्य आमचे लोकांस विचार करता येत नाहीं व देशांतील रीतिस्थिती कांहीं पाहात नाहींत. सर्व आपुलपोटे आहेत. विलायतेंतून इकडे माल विकावयास येतो किती व इकडून जातो कीति हें पाहावे, व आणखी जाईल व तिकडचा कमी होईल असें करावें. या देशांत पैसा राखण्याकरितां लायखी संपादन केली पाहिजे. नंतर ते न देतील असें नाहीं. उद्योग करावा म्हणजे सर्व प्राप्त होईल. परंतु जर जेवणाच्या गोष्टी सर्वांनीं सर्व काळ सांगितल्या तर कोणचे रीतीनें हे मोठाले विचार घडून येतील हें लक्षांत आणावें. उद्योग व शाहाणपणा याचा लोप जाहला म्हणजे तीच अवदशा व त्याची वृद्धी जाहली म्हणजे तीच लक्ष्मी.

हिंदू लोक मुख्यत्वेकरून मराठे लोक यांची सांप्रत अवस्था आहे त्याहून चांगली स्थिती होण्यास याणी शोध बहुत केले पाहिजेत व विद्या वाढिवली पाहिजे व हल्लीच्या रीती व समजुती सोडल्या पाहिजेत. जोपर्यंत या कायम आहेत तोपर्यंत बरें होण्याचें चिन्ह नाहीं. जसें रोगी पथ्य करीत नाहीं तोपर्यंत रोग जाणार नाहीं तद्वत या देशचे लोकांची अवस्था आहे. सर्वांस लक्ष्मी पाहिजे, परंतु तिला प्राप्त करण्याचे मार्ग थोडे लोकांस ठाऊक असतात. उद्योग, विद्या, सुनीती हे लक्ष्मीस आणणारे आहेत म्हणून यांची वृद्धी होईल ते यत्न करावे. खरेपणा वाढला पाहिजे, बुद्धी सुधारली पाहिजे, भाषा सुधारली पाहिजे. ही जितकी व्यंगें आहेत तितकीं नीट ज्या काळी होतील त्या काळीं हे लोक लक्ष्मीवान होतील.

लक्ष्मीज्ञान आम्ही मुळापासून संक्षेपाने निवेदन केलें हें आपले देशाशी मिळऊन पाहिलें म्हणजे दुर्दशेचें कारण व त्याचे उपाय समजतील, व आम्ही लिहिण्याचे तितकें पराकाष्ठा करून लिहिलें आहे. बाकी जें करणें तें या पुस्तकाचे वाचणारे असतील त्याणी करावें. किती एक वाचणारे असे असतील कीं त्यांस यातील विषय कांहीं समजणार नाहींत. परंतु त्याणी अवघड पुस्तक आहे असें म्हणून टाकू नये श्रम करून बुद्धी मोठी करून सर्व समजेल व त्यांतील सर्व तर्क समजतील असें करावें म्हणजे आमचे श्रमाचें सार्थक आहे.

# हिंदुस्थानास दरिद्र येण्याचीं कारणें

आणि

# त्याचा परिहार व व्यापाराविषयीं विचार.

इंदुप्रकाशांत आठ पत्रें, सदरहू विषयांवर आज दोन तीन वर्षांत प्रसिद्ध झालीं.

त्यांची

पुनरावृत्ति

मुंबई :

इंदुप्रकाशच्या मालकांनीं "इंदुप्रकाश" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

सन १८७६.

किमत ४ आणे.

# प्रस्तावना

हिंदुस्थानास दरिद्र आलें किंवा नाहीं व आलें असल्यास त्याचीं कारणें काय व त्याचा परिहार कसा करावा व व्यापारांत सुधारणा कशी करावी हे विषय प्रस्तुत जिकडे तिकडे बोलण्यांत येतात, त्यातील सारांश लोकांस कळावा म्हणून इंदुप्रकाश पत्रांत आज दोन वर्षांत आठ पत्रें प्रसिद्ध झालीं त्यांत कितीएक उपयोगी माहिती व सूचना आहेत त्यांविषयी पृथक् पुस्तक झालें असतां तें थोड्या किमतींत बहुतांस घेण्यास उपयोगी पडेल अशी कितीएकांची सूचना आल्यावरून त्याची पुनरावृत्ति करून हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे. त्यांत आंकडे, हिशेब व तर्क जे आहेत ते जसे हातीं आले व जशी माहिती मिळाली त्याप्रमाणें दाखल झाले आहेत, त्यांत चूकवांक पडली असेल तर ती कोणी लिहून पाठविली असतां हरकत नाहीं. परंतु आज दोन वर्षांत याविषयीं कांहीं तक्रार आली नाहीं याजवरून त्यांत बहुधा चूक नसेल असें वाटतें.

इंग्रज सरकारचा अंमल या देशांत झाल्यापासून रस्ते, पूल व जहाजें तयार होऊन चालू झाली याजमुळें देशांतील व्यापारास मदत पुष्कळ मिळाली; परंतु तो व्यापारही हल्लीं थकला; अफिणीवर कर बसला व कापसावर अमेरिकेचा चढ झाला. लोखंड, कागद, काच वगैरेवर विलायतची सरशी झाली. मुलखांतील व्यापारी देशांत खेड्यापाड्यांनीं देण्याघेण्याचा व्यापार करीत होते तोही थकला; कारण त्याचा आधार शेतकरी लोक होते ते भिकारी झाले व सान्याइतकेंही शेतांत पीक होत नाहीं, तेव्हां त्यांणीं सावकारास कांय द्यावें? कसें तरी करून सरकारचा सारा रडतकढत भरतात; कारण कीं, सरकार जबरदस्त. तें लागलेंच घरदार, जमीन व भांडींकुंडीं जप्त करील या भयानें त्याचें देणें अगोदर वारतात. सावकार मागावयास आला म्हणजे हातपाय पसरून बसतात. जा, फिर्यादी करा असें म्हटलें म्हणजे सावकार मनांत आणतो कीं, कुळें नादार, आणखी फिर्यादीस रुपये काढले पाहिजेत, कोडतांत फेरे घातले पाहिजेत, जितके रुपये मागावयाचे त्याच्या अर्धे खर्च केले तरी ते हातीं येणें मुष्कील असें समजून तें देतील तें घेऊन उगीच बसतात. ज्याच्या घरीं वर्षास हजार रुपयांची प्राप्ति होती त्याच्या घरी दोनशें येत नाहींत, व पैसा दिला तो पुनः येईल असा भरंवसा नाहीं. कारण कीं, शेतकींत व व्यापारांत कसर कोठेंच राहिली नाहीं. अदालतीचे कर लुटारूसारखे आहेत. एका अदालतीचें सर्टिफिकिट घेणें तर मिळकतीप्रमाणें स्टांप घ्यावा लागतो. ज्या कामांत तें सर्टिफिकिट दाखल करावयाचें तें दहा रुपयांचें असतें. त्याकरितां पन्नास रुपये खर्च करावा लागतो. हा कर पिढी दरपिढी लागला आहे. ही अवस्था पाहतां लोकांस आश्चर्य वाटतें कीं, लोक जगतात कसे? एका वैद्यानें मृतशरीर फाडून पाहिलें, त्यास असें वाटलें कीं, मनुष्य मरतो हे मुळींच आश्चर्य नाहीं. जगतो हें आश्चर्य आहे. कारण त्यांत इतकी बारीक बारीक यंत्र-योजना आहे कीं, आयुष्य चालतें हाच विस्मय आहे. ही केवळ ईश्वरीकृपा आहे त्याप्रमाणें या देशांतील रयत वांचली आहे हेंच आश्चर्य वाटतें; परंतु ईश्वरीकृपेनें थोड्यांत निर्वाह होतो व निर्वाहाचें पदार्थ पुष्कळ पिकतात याजमुळें कसेंही करून जीवन होतें. त्यांत आता दारूचें व्यसन अतिशय वाढत चाललें हें मात्र मोठें विघ्न आहे. हें जर वृद्धिंगत झालें तर दुर्दशेस पार नाहीं असें होईल. विलायतेंत कोट रुपयांची दारू वर्षास खर्च होते आणि त्यापासून दरिद्र व निर्बलता वाढते. तोच प्रकार येथें होणार आहे. मनुष्यास निर्वाहाकरितां मद्यमांसाची कांहीं गरज नाहीं असें बहुत करून हल्लीं विलायतेंतील वनस्पतींवर निर्वाह करणाऱ्या लोकांनीं सिद्ध केलें आहे व हजारों डाक्टरांनीं त्यास अनुमोदन दिलें आहे. मनुष्य दीर्घायुषी व बळकट होण्यास चांगलें अन्न, निष्काळजी, ब्रह्मचर्य व व्यायाम यांची जरूर आहे. एक शेर तांदूळ किंवा गहूं, पावशेर डाळ व चार पैसेभार तूप इतकें मिळालें म्हणजे दुसऱ्या कोणत्याही खुराकाची जरूर नाहीं व

याहून दुसरा बळ देणारा खुराक नाहीं असें हल्लींच्या रसायण शास्त्राच्या योगानें सिद्ध झालें आहे; परंतु ही गोष्ट लोकांचे ध्यानांत येत नाहीं व दारूंत कांहीं अधिक गुण आहे असें ते समजतात ही भ्रांति आहे. "ढवळ्याच्या शेजारीं बांधला पोवळा, वाण नाहीं पण गुण लागला" याप्रमाणें इंग्रजांचे सहवासानें लोक असें समजतात कीं, त्यांच्या मध्यें बळ, शौर्य व वीर्य आहे तें त्यांच्या खुराकानें आहे म्हणून आपण त्यांचा खुराक घेऊं या. पण त्यांच्या मध्यें जें काय पशुत्व आहे तें मात्र त्यांच्या मद्यमांसाच्या आहाराचें फळ आहे. बाकीं अन्नाचा आहार हाच योग्य आहे. पैसा थोडा खर्च होतो, हा एक यांत लाभ आहे, धर्मन्यायाचें रक्षण होतें आणि पशुत्व प्राप्त होत नाहीं. पूर्वी हिंदु लोक हा आहार करीत होते; परंतु त्याचा वाईट परिणाम जाणून त्याचा त्याग होत आला आहे. याजकरितां आपल्या साध्या चाली जितक्या आहेत त्यांचें रक्षण करावें. हल्लीं मद्य-मांसाची घाण स्वीकारीत नाहींत असें इंग्रज लोक बहुत आहेत आणि त्याचा पुरा विचार करून तें त्यांणीं टाकलें आहे. आणि टाकलेली पीडा आपण पुनः घेण्यास पाहत आहों याविषयी सर्व आर्यहितेच्छूंनीं सावध राहावें.

कोडताचे कर भारी पडले म्हणून पंचाईतकोर्टें लोकांनीं काढलीं आहेत तीं नीट चालली व लोकांनीं त्यांची वृद्धी केली तर त्यापासून बहुत नफा आहे, व सरकारही त्याविषयीं बंदोबस्त करील अशी आशा आहे. त्याच प्रमाणें स्वदेशीय मालाचीं दुकानें जिकडे तिकडे झालीं आहेत. तेणें करून स्वदेशीय मालाचे उत्पत्तीस व खपास उत्तेजन येत चाललें आहे. हेंही चिन्ह चांगलें आहे. स्वदेशांत पैसा राहील व उद्योग वाढेल हें मोठें काम आहे. हल्लीं कोणांस रोजगार धंदा नाहीं व आपलीं मुलें काय करतील हें कोणांस सुचत नाहीं. हाताचीं कामें पूर्वापार करीत आले त्यांची यंत्रांवर सरसी होत नाहीं. भाड्याच्या घोड्यावर बसून रेलवेबरोबर चालेल म्हणून मोठा निश्चय केला तरी तो चालणार नाहीं हें लक्षांत ठेवून वागावें.

उद्योग हीच लक्ष्मी आहे. भूमिच केवल फलद्रूप होत नाहीं. कारण कीं द्रव्य घालावें तेव्हां मोठाले बागबगीचे व विहिरी होतात; पण त्यांत फायदा नसला म्हणजे हीं कोणी करीत नाहींत. त्यांत श्रीमंत लोक कमती झाले म्हणजे असले धंदे पडून राहतात. प्रजा निर्धन झाल्यामुळें आकाशातून पाऊस पडून त्यांत पिकेल तितकें खाऊन निर्वाह करितात. पूर्वीच्या केलेल्या विहिरी आहेत त्यांस कोणी मोट जोडीत नाहीं; कारण कीं खर्चाचा मेळ पडत नाहीं. सरकारचे कर असे आहेत कीं, ते वारून शेताकडे खर्च करण्यास कांहीं राहत नाहीं. उलटा सरकारसारा देण्यास सावकाराचें घर किंवा मुंबईचें बंदर पाहावें लागतें. उत्तम पीक आलें तर थोडी कसर राहील; परंतु नेहमी उत्तम पीक येत नाहीं त्याचा हिशेब येणेप्रमाणे :—

## १. एक बिघा ऊंस लाविला तर त्याचा तपशील

| | खर्च रु. |
|---|---|
| सात वेळा नांगरणी | १०॥ |
| खत साठ गाडे | ६० |
| कुंपण करण्यास | १० |
| रखवाली...... | ३६ |
| लावणी......... | ६ |
| खुरपणें... ..... | ७॥ |
| बांधणें........... | ५ |
| बावन्न वेळा पाणी द्यावें लागतें त्याच्या खर्चाबद्दल | ५२ |
| गुऱ्हाळ जळण सुद्धां | ४५ |
| सारा ...... | ६ |
| बियाची किंमत | ३० |
| | २६८ |

सोळा घागरींची एक कढई, त्यांत गूळ ३॥। मण होतो, १३ शेरांचा एक मण याप्रमाणे नऊ कढया रोज उतरतात. गूळ ३३॥। मण त्यांत महार, सुतार, परीट, कुंभार व गूळवाल्यांस वांटणी द्यावी लागते व त्यांचीं कामेंही पडतात. आठ दिवस गुऱ्हाळ चाललें आणि उत्तम पीक आलें तर १२ खंडी गूळ होईल, त्याची किंमत ३९०. मध्यम आलें तर ८ खंडी होईल, त्याची किंमत २६०. कनिष्ठ ४ खंडी, त्याची किंमत १३० रु. यावरून खर्चाशीं मिळवून पाहावें.

## २. हळद लाविली तर त्याचा तपशील

| | खर्च रु. |
|---|---|
| तीन वेळा नांगरणी | ४॥ |
| खत ........ | ५० |
| पांच खंडी बीं......... | ५० |
| पेरणी......... | ५ |
| पाणी बावन्न वेळा | ५२ |
| खुरपणी ......... | ८ |
| खोदणी ...... ..... | १० |
| सुकवणी ... ..... | ४ |
| शिजवून घेणें ...... | ५ |
| सारा ..... ..... | ६ |
| | १८७ |

उत्तम पीक २० खंडी, वाळवून ५ खंडी, त्याची किंमत २०० रुपये; हीच पंधरा खंडी होईल तर रुपये १५० होतील व तोटा येईल. कनिष्ठ १० खंडी होईल तर १०० रुपये येतील; तेव्हां सर्वदा उत्तम पीक येईल तर मात्र कसर पडेल; परंतु तसें होत नाहीं.

## ३. लसूण लाविली तर त्याचा तपशील

| | खर्च रु. |
|---|---|
| तीन वेळा नांगरणी | ३ |
| रोप ...... ... | ७ |
| पाणी १५ वेळा | १५ |
| खुरपणी ...... ... | ५ |
| खत ........... | २५ |
| खोदणी......... | ५ |
| | ६० |

उत्तम पीक आलें तर १०० रुपये येतील. मध्यम आलें तर ६०, कनिष्ठ आलें तर ४० रुपये येतील. तेरा शेरी मणाचे खंडीस २५ रुपये, चार खंडीचे रुपये १००; परंतु पिकावर असमानी फार होते.

याजवरून सर्व पिकाचा अदमास समजावा. या रोजगारांत लंगोटी घोंगडी शिवाय आशा नाहीं. नेहमीं तोटा भरण्यास सावकार पाहिजे. याशिवाय गति नाहीं.

केवळ लोक आकाशी शेती करितात त्यांतही विशेष कसर नाहीं. दाणें विकून टाकावे तरी चावडी फिटत नाही. दोन पैसे तान पैसे रोजचीं मजुरी पडतें. शेण आणून गोंवऱ्या कराव्या. बांधावरचें गवत काढून भारे विकावे तरी पोट भरत नाहीं. मग पितर पाट, दुखणें, मरण वगैरे-बद्दल खर्च आला कीं, वेळा गाहाण, नथ गाहाण, बैल एकादा असला तर त्यास बाजार दाखवावा अशी चोहोंकडून तारंबळ होते. बागाईतांत कांहींच नफा नसून उलटा खर्च मात्र अंगावर येतो याजमुळें बागाईत फारसें कोणी करीत नाहीं. द्राक्षी, कौले, डाळिंबें वगैरे उंच्या मालास बाजार नाहीं. मुबई लगत असेल तर मात्र कदाचित् रमारमी होईल. याप्रमाणें शेतीची स्थिती आहे.

व्यापाराची स्थिती पाहिली तर बाजार विलायती व चिनी मालानें भरला आहे. कागद, शाई, लोखंडी सामान, काच व वस्त्रें सर्व बाहेरून येतात तेव्हां देशांत धंदा नाहींसा झाला. कागदाचे कारखाने उजाड पडले. रक्तवान शाई करीत होते त्यांणी आपला धंदा सोडला. लोखंड करणाऱ्या घावडांचे वाडे उजाड पडले. हुंड्यांचे ठिकाणीं नोट व मनीऑर्डर मिळतात. रेल्वेंत माल घातला म्हणजे विम्याची गरज नाहीं. जिनगर, शिकलगर, लोहार घरीं बसले. सोनाराजवळ उंची धातु येईल तर पोट भरणार. ती धातु नाहींशी झाली. खेड्यापाड्यांनीं ज्या सोई होत्या त्या सर्व गेल्या. वतनदार रयतेसारखे झाले. रयत भिकारी यामुळें कर्जरकम दिलें तर परत येत नाहीं. फौजेंतील रोजगार सर्व गेले. कन्ट्राक्टावर चढ होऊं लागले त्यामुळें त्यांतही फायदा नाहीं. मोदीखानें वगैरे पहिले उदार मनाचे साहेब लोक होते ते निभावित. आतां रुपयांचे चार आणे होत नाहींत.

रोजगाराकडे पाहिलें तर जेथें तेथें साहेब पुढें येतात. पोलीस व त्यांत सिविलसर्विस तर राज-वंशीच म्हटली पाहिजे त्यांत नेटिवांचा प्रवेश न व्हावा याजबद्दल जितक्या युक्ती असतील तितक्या लागू केल्या आहेत. बाकी राहिलेल्या जाग्यांत मिलिटरी व डाक्टर दाखल होतात. कांही कांही बारिस्टरही त्यांत येतात. नेटिव बारिस्टरांस कोणी पुसत नाहीं; परंतु विलायती व हिमायती असतील त्यांस हायकोर्टांत वगैरे ठिकाणीं अनेक जागा आहेत त्या मिळतात. विलायतेंतील थकून राहतील तर नेटिवाची पाळी येणार. या देशांत उमेदवार, व्यापारी व भिकारी यांची जशी गर्दी आहे त्याहूनही विलायतेंत अधिक आहे, त्यामुळें द्रव्य मिळविण्याचा आवेश त्यांस हिंदुलोकांपेक्षां अधिक आहे. असल न मिळतील तर कदाचित् हाफक्यास्ट लोक व पोर्तुगीज लोक हे सर्व आश्रित थोडे आहेत असें नाहीं. इतके जवळचे लोक टाकून नेटिव जरी स्वभाषा शिकून परभाषा शिकला, त्यानें मोठ्या बिकट परीक्षा दिल्या, व लाखांत एक असा बुद्धिमान् असला तरी त्याची चीज होत नाहीं. लष्करी खात्यांत रिघाव नाही, पोलीटिकल, इंजनेर, व्यापार, रेविन्यु. इत्यादी सर्व ठिकाणीं खरे काम करणारे तर नेटिवच; पण मानकरी मंडळी त्याजवरती आहेच. एक डेप्युटी कलेक्टर असला म्हणजे तिजोरी, फौजदारी, व किरकोळ सर्व कामें सदर जागीं राहून फैसल करितो; परंतु चार पांच असिस्टन कलेक्टर जिल्ह्यांत नजर ठेवण्यास फिरतात, त्यांची नजर इतकीच कीं, थंडोशाच्या ठिकाणीं तंबू लावून काळ काढावा, आणि कलेक्टर होण्यास जो अनुभव पाहिजे तो मिळवावा. एकादी भाषा शिकावी, मामलेदाराचें टपाल मागें पुढें पोंचवावें. सारांश खर्च बहुत आहे, परंतु हें म्हणण्यास नेटिवांस संकोच बहुत झाला आहे.

पोट भरण्याचे मार्ग तीन—उत्तम खेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी; परंतु तिहींतही सोय राहिली नाहीं. तेव्हां लोकांनीं उद्योग धंदा वाढेल याची तजवीज जरूर केली पाहिजे. अलीकडे नेटिव संस्थानांत कांहीं विद्वानांचा प्रवेश झाला आहे ही गोष्ट चांगली आहे. येणेंकरून बचाव झाला आहे; परंतु दरसाल विद्याशाळेंतून लोक तयार होतात त्यांणीं कोठें जावें व तयार होण्यास पैसा कोठून आणावा? तयार झाल्यावर करावें काय हा विचार मोठा आहे. या देशांतील लक्ष्मी

वाढण्याचा यत्न सरकार कांही करीत नाहीं. कोळशाच्या खाणी, लोखंडादि धातूच्या खाणी वगैरे पुष्कळ आहेत, परंतु त्या कामीं मदत सरकारची नाहीं. सावकार व श्रीमंत यांस अक्कल नाहीं, ते अद्याप समजले नाहींत, जुन्या भ्रांतींत व जुन्या वेडांतच अद्याप गर्क आहेत. सरकारास द्रव्याची भरज लागली तर दोन मार्ग काढितात, कर अधिक घाला किंवा कर्ज काढा. विलायतचें कर्ज कोट्यावधी रुपये या देशावर आहे त्याचें 'व्याज' भरावें लागतें; परंतु या स्थितीचा पुढें परिणाम काय होईल हा एक प्रश्न मोठा आपल्या मनास विचार करण्याजोगा आहे. नेटिव राज्यापेक्षां इंग्रजी राज्य चांगलें व सुखकर अशी जी समजूत होती ती जाण्यास हीं बहुत कारणें उत्पन्न झालीं व मोगलाई तऱ्हा जास्ती जास्ती दृष्टोत्पत्तीस येत चालली तेव्हां परमेश्वरानें काय योजना केली असेल ती खरी, असें म्हणून समाधान करणें भाग आहे.

हा देश मोंगलाई मराठी अमलापासून राजे व सरदार लोकांच्या अनीतीनें व दुष्टपणाच्या वर्तणुकीनें त्रासला होता. परगणे उजाड पडले. अधिकार, हक्क, सत्ता आणि स्वस्थता हीं नाहींशीं झालीं होतीं. अशा समयीं इंग्रज सरकार उत्तम रीतीनें राज्य व्यवहार चालवितात, हें पाहून रयतेस असा धनी मिळाला म्हणून आनंद झाला. तेणेंकरून सरकारचा अंमल चोहोंकडे सुलभ रीतीनें बसला. देशांत निर्भय झालें न्यायादिकांची रीती फार चांगली चालूं लागली, प्रामाणिकपणा सरकारचा इतका वाढला कीं, त्याची कोट्यावधींचीं खतें बाजारात बर्तवल्यानें चालतात. विद्यावृद्धी, चोहोंकडे शाळा वगैरे होत चालल्या आहेत. मोठ्या मोठ्या सुधारणा चालू झाल्या. लोकांमध्यें विचार उत्पन्न झाला. आजपर्यंत लोक दबलेले होते, राजांची व भटांची अनेक प्रकारची जाचणी होती ती दूर होत चालली; अशा समयीं इंग्रज सरकारचें कर्तव्य येवढेंच आहे कीं, हा देश धनवान झाला पाहिजे, उद्योगी झाला पाहिजे आणि स्वतंत्रतेस आला पाहिजे. या देशांत पार्लमेंट स्थापन झालें पाहिजे. देशांतील लक्ष्मीचे शोधन झालें पाहिजे आणि मोठाले अधिकार प्रजेस मिळाले पाहिजेत. इकडे नजर इंग्रज सरकारांनीं देऊन नेटिव राज्यापेक्षां इंग्रजी राज्य सर्वदा उत्तम आहे असें लोकांच्या मनांत राहावें अशा रीतीनें चाललें पाहिजे. तर इंग्रज सरकारच्या राज्यास दीर्घायुष्य येईल आणि नेटिव राज्याच्या तुलनेस जितक्या प्रमाणानें जवळ येईल तितक्या प्रमाणानें त्याचें आयुष्य कमी असें पूर्वी इंग्रज सरकारचे उदार मनाचे अंमलदार बोलत आले हीच गोष्ट खरी आहे. नेटिव राज्यांचीं लक्षणें कोणतीं तर तीं उघडच आहेत. कोणत्याही नेटिव राज्यांत जाऊन पहावीं. प्रजेस सत्ता नाहीं, मुलखांत शांती नाहीं, राजे मन मानेल तसे चालणार, मोकळीक कोणतेही प्रकारची नाहीं, प्रजा दरिद्री व कराच्या भारानें थकलेलीं विद्या विचार शून्य झालेली. सरकारांत प्रामाणिकपणा नाहीं. न्याय मर्जीवर, कायदा मर्जीवर, नजराणें दर कचेरींत घेतात, या धोरणावर इंग्रजी राज्य जितके वाढेल तितकी त्याची शक्ती कमी समजावयाची. जीं जीं नेटिव राज्यें गेलीं तीं या दुर्गुणानेंच. पाहा पुण्यांत बाजीरावांची कारकीर्द, बडोद्यात मल्हाररावांची कारकीर्द, लखनौंत वजीदअल्लींची कारकीर्द, पंजाबांत महाराणीची कारकीर्द, साताऱ्यांत आपासाहेब महाराजांची कारकीर्द व तारकसाचें चरित्र; तेव्हां त्यांचा दुष्टपणा त्यांच्या नाशास कारण झाला असें इतिहासावरून दिसतें. याजकरितां इंग्रज सरकारची प्रजा बळवान, धनवान, विद्वान, संपत्तीमान, सत्तावान अशी होण्यास जे जे कायदे पाहिजेत ते ते करून राज्यरीती चालली तर प्रजा संतुष्ट होऊन दुवा देईल. याच्या विरुद्ध जे जे मार्ग निघतील ते असंतोष उत्पन्न करून राज्याची बळकटी कमी करतील. इंग्रज सरकारचे उपकार या देशावर बहुत आहेत सबब त्याचें हित इच्छिणारांनीं यथार्थ आहे तेंच बोलावें अन्यथा जे मसलत देतील तेच शत्रु समजावे. यास्तव हल्लीं इंग्रज सरकारची प्रजा दरिद्री झाल्याचा जो बोभाटा आहे तो दूर करण्याचें यत्न चालू आहेत त्यास सरकारानें सहाय होऊन प्रजेची बहादारी करावी. ही आमची सरकारास प्रार्थना आहे.

**लोकहितवादी**

# हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याचें कारण

## निबंध १ ला

हल्लीं जिकडे तिकडे लोक असें बोलतात कीं, द्रव्य नाहींसें झालें व अधिकाधिक नाहींसें होत चाललें आहे. वीस हजारांची हवेली पांच सात रुपये महिन्यास भाडें दिलें तर मिळते. युरोपियन लोकांस राहण्याजोग्या बंगल्यांचें मात्र भाडें बरें येतें; परंतु घराच्या भाड्याची मारामारच आहे. कुणबी लोक माल तयार करतात व ते ह्मणतात कीं, उत्पन्न करण्यास खर्च लागतो तितकेही पैसे हातांत येत नाहींत व कितीएक लोक ह्मणतात कीं, माल खपत नाहीं. तो देऊं लागलें तर मातीच्या मोलानें जातो. ज्याला त्याला असें वाटतें कीं, पुढें दिवस कठीण येत चालले आहेत. लहान मोठे व्यापारी व शेतकरी या सर्वांचें एकच ह्मणणें आहे. हलवाई, भडभुंजा, कोष्टी, कोळी, तेली व कुंभार या सर्वांचें ह्मणणें असें आहे कीं, गिराईक नाहीं. एक रुपायाचे डाळेंचुरमुरे तयार केले आणि ते एक दिवसांत खपले तर चार आणे नफा पदरीं पडेल; परंतु एक रुपायाचा माल खपविण्यास चार दिवस लागतात. बाजारांत, स्टेशनावर, जत्रेंत, चोंहींकडे धांव घ्यावी तरी चार आण्यांचा माल खपत नाहीं आणि नफा आणा अर्धआणाच मिळतो. लोकांस माल घेण्याची इच्छा आहे, पण ताकद नाहीं. खाणेंपिणें व सुख भोगणें हें पैशाच्या स्वाधीन आहे. पैशाचा तोटा असला तर घरचें पीठ बांधून पंढरीची वारी करावी आणि जाऊन येण्यांत दोन आण्याचे पैसे खर्च केले नाहीं तरी म्युनिसिपालिटी चार आणे कर मागते तेव्हां मोठें संकट पडतें. असा जिकडे तिकडे पैशाचा तोटा कां पडला याचें कारण काय याचा तपास करितां असें दिसतें कीं, जुन्या काळचीं अज्ञानी सरकारें जुलूम करीत होतीं व व्यर्थ पैसा खर्च करीत होतीं; परंतु तो सर्व पैसा देशांत राहात होता. दोन-हजार वर्षांपूर्वी अशोक राजा झाला त्याणें डोंगर कोरून लेणीं केलीं. दिल्लीच्या बादशहानें आग्र्यास ताजमहाल बांधला. मल्हारराव गायकवाड यांणीं लक्ष्मीबाईकरितां मोठी नजरबाग केली तीस लाखो रुपये खर्च झाला. आतां अशा कामांत धर्मभोळेपणा किंवा सुखेच्छा यांखेरीज दुसरें कांहीं प्रजेच्या हिताचें धोरण नव्हतें, तरी जो पैसा खर्च झाला तो सर्व परत प्रजेकडे आला. कांहीं गवंड्यांनीं, कांहीं सुतारांनीं, कांहीं पाथरवटांनीं, कांहीं मजुरांनीं नेला व त्यांचे अंगलें वाणी वगैरे सावकार यांचे हातीं तें द्रव्य परत आलें, परंतु हल्लींचे सरकारांत लक्ष्मी दर्यापार जाते असें ह्मणतात व पुराणिक सांगतात कीं, समुद्रमंथन करून देवांनीं लक्ष्मी दर्यांतून काढली ती आतां आपले माहेरीं चालली आहे. असें वाटण्याचें कारण कोणी सांगतात कीं, लोक निंदक आहेत व कोणीं ह्मणतात कीं, लोकांची परराज्यावर प्रीति नाहीं कोणी ह्मणतात कीं, हल्लीं लोक श्रीमंत होत चालले आहेत,

लोकांस उगीच दरिद्राची भ्रांती वाटते. जसें ज्यांचें वळण तसें ते बोलतात; परंतु यांतील तथ्यांश काय आहे याचा आतां विचार करूं.

देशांतून माल बाहेर जातो त्यास रवानगी ह्मणतात व देशांत येतो त्यास अमदानी ह्मणतात. कोणत्याही देशांतून रवानगी होईल तर त्याची किंमत व त्याजवर नफा इतके परत आले तर तो व्यापार ठीक झाला असें समजावयाचें. आतां किंमत व नफा रोकड रुपयांनीं मिळो अथवा परदेशांतील मालाचें मोबदल्यानें मिळो त्यास चिंता नाहीं. आतां हिंदुस्थानच्या रवानगीचे हिशोब आहेत त्यांची दहा साली सन १८५८ पासून सन १८६७ पर्यंत तपासतां असे दिसतें कीं :—

| | |
|---|---|
| रवानगीची बेरीज | रु. ४५६ कोटि. |
| अमदानीची बेरीज (पैकीं ७२ कोट रुपयांचें रेलवेकडून लोखंड वगैरे) | रु. ४१९ कोटि. |
| माल नव्हे ती बेरीज वजा करितां बाकी | रु. ३४७ कोटि. |
| माल गेला त्याचा मोबदला कांहीं परत आला नाहीं त्याची बेरीज. | रु. १०९ कोटि. |

तेव्हां दहा वर्षांत १०९ कोटींची खोट हिंदुस्थानानें खाल्ली, ह्मणजे दरसाल दहा कोट नव्वद लाख रुपयांचा तोटा आहे. हा तोटा ऐन रवानगींत आहे. नफ्याचें तर आह्मी नांवच घेत नाहीं.

दरसाल या देशास दहा कोटींची खंडणी भरावी लागते. या देशापाशीं रोकड पैसा भरण्यास नाहीं, तर तितक्या किंमतीचा माल द्यावा लागतो. ह्मणजे इतकें उपयोगी द्रव्य अनेक रूपानें या देशांतून जाते, व त्याचा मोबदला या देशास कांहीं मिळत नाहीं. याप्रमाणे दादाभाई नवरोजी यांणीं पत्रक करून दाखविलें आहे.

आतां दुसरें पत्रक कर्नल म्यारियट यांनीं केलें आहे त्यांत ते असें दाखवितात कीं, सन १८६१ पासून सन १८७३ पर्यंत बारा वर्षांचा हिशोब तपासाला त्याजवरून दिसतें कीं :—

| | |
|---|---|
| रवानगी माल | रु. ६५५ कोटि. |
| अमदानीं सोनें रुपें सुद्धां | रु. ५२२ कोटि. |
| तोटा | रु. १३३ कोटि. |
| सन १८६१ पासून १८७३ पर्यंत वर्षें बारा, त्यांनीं भागलें तर दरसाल तोटा येतो तो | रु. ११ कोटी. |

विलायतेहून रोकड नाणें किंवा नोटा इकडे येत नाहींत व इकडून तिकडे जात नाहींत; कारण या देशांचें नाणें त्या देशांत चालत नाहीं व तिकडील इकडे चालत नाहीं. जी काय घालमेल व्हावयाची ती मालाचे रवानगी अमदानींत होते. ती अशी कीं, निकलकंपनीनें पन्नास लाख रुपयांचा कापूस मुंबईहून रवाना केला आणि त्याचे पैसे विलायतेहून यावयाचे; परंतु तेथें महाराणी सरकारचे सेक्रेटरी आहेत ते त्या सावकारांस पन्नास लक्ष रुपयांची हुंडी देतात आणि सांगतात की; हा पैसा तुह्मांस मुंबईचे तिजोरींतून मिळेल. तेव्हां ती हुंडी मुंबईत येते आणि हिंदुस्थानच्या द्रव्यापैकींच निकलकंपनी आपला पैसा घेते, तेव्हां हिंदुस्थानच्या रयतेनें माल पिकविला, विलायतेस पाठविला, आणि त्याची किंमत हिंदुस्थानच्या रयतेच्या पैशांतून दिली. मालाचा उपयोग विलायतेच्या लोकांनीं एक पैसाही दिल्यावांचून केला. हुंड्या वगैरे कागद इकडून तिकडे जातात व येतात त्यांत कांहीं अर्थ नाहीं; परंतु माल जातो त्याचा पैसा तिकडच्या तिकडे वळून घेतल्यामुळें हिंदुस्थानच्या रयतेस ही खंडणी भरावी लागते, ही नगदी खंडणी नाहीं; परंतु ऐनजिनशी खंडणी आहे तेणेंकरून अकरा कोटि किमतीचे द्रव्याचा उपयोग या देशांतील लोकांस मिळत नाहीं. परदेशांतील लोक घेतात. हिंदुस्थानसरकारचें आफिस विलायतेस आहे. त्या कारखान्याच्या फक्त खर्चाबद्दल सेक्रेटरी यांजकडून दरमहिना कोट रु. च्या हुंड्या येतात.

कितीएक लोकांस असें वाटतें कीं, या देशांतून माल रवानगी फार होतो व अमदानी थोडी आहे. यावरून या देशाचे उत्कर्षाचें चिन्ह आहे; परंतु यांत मोठी भूल आहे. रवानगी होते त्याची बेरीज मोठी दिसते; परंतु त्याची किंमत या देशास मिळते किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. किंमत मिळण्याचें द्वार त्या देशांतून जो माल इकडे येतो तेंच आहे. तो माल जर कमी येतो तर असें समजावयाचें कीं, आपला रवानगीचा माल फुकट गेला किंवा वळून घेतला, आणि त्याची किंमत आपणास मिळाली नाहीं. आतां कोणी ह्मणतील कीं, इंग्रजी राज्यापासून अनेक लाभ या देशास आहेत तीच किंमत समजावी आणि ते लाभ कोणते ह्मणाल तर ऐका.–

१. परदेशांतील शत्रूस अडवून धरणें.

२. देशांत स्वस्थता राखणें.

३. विद्यावृद्धि करणें.

४. सती, कन्याहत्या, आत्महत्या दुर्दशेचें वैधव्य इत्यादि बंद केलीं आहेत.

५. लेखी कायदा चालत आहे, मर्जी बंद झाली.

६. लिहिण्याची व बोलण्याची मोकळीक आहे.

हे लाभ मोठे नाहींत कीं काय? तुमची आई किंवा बहीण प्रारब्धानें विधवा झाली असती तर भटांनीं तिला जीवंत चितेंत घातलें असतें, ती इंग्रज सरकारानें वांचविली, तेव्हां तुमचें आई-बहिणीसारखें महातीर्थ तुह्मांत राहिलें, त्याची किंमत दर माणशीं लाख रुपये धरण्यास काय चिंता आहे. तसेंच इंग्रज सरकारचे शाळेंत जे मोठाले विद्वान झाले आहेत त्यांनीं प्रत्यक्ष पैसा विद्येकडे खर्च केला असेल; परंतु त्याची किंमत कोट रु. धरण्यास काय चिंता आहे. सर टी. माधवराव, भाऊदाजी, दादोबा पांडुरंग, दादाभाई नवरोजी व फरदुनजी अशीं माणसें इंग्रज सरकारामुळें या देशांत निर्माण झालीं त्यांची किंमत दर एकाची कोटि रु. ह्मणण्यास काय चिंता आहे? तसेच एम्. ए., बी. ए. वगैरे पदव्या मिळविणारे लोकांची किंमत दहा दहा वीस वीस लक्ष नव्हे काय? जर या देशास त्यांचे निष्पत्तीबद्दल इतका खर्च पडला आहे तर इंग्रज सरकार त्यांची किंमत न करोत; परंतु या असाम्या कोट्यावधीच्या आहेत असें समजण्यास आपणास काय चिंता आहे? या लोकांस पाठशाळेंत महिना पांच रु. दहा रु. भरावे लागले तरी ज्या सरकारानें पाठशाळा घातली त्या सरकारचे स्थितीकरितां आपण यास जितके कोट रु. दरसाल भरावे लागतात त्यांचे बदली ह्याच असाम्या समजाव्या. दयानंद सरस्वतीसारखे उघडपणें बोलणारे उपदेशक फिरतात याजमुळें लोकांस प्रबोध होतो त्यांची किंमत क्रोड रु. धरण्यास काय चिंता आहे? जुनीया देशांतील जंगली सरकारें असतीं तर या स्वामीची धिंड काढली असती; परंतु आतां ब्राह्मणांनीं मनांत चुरमुरावें इतकेंच राहिलें आहे; परंतु सर्व लोकांस राज्यावर व धर्मावर चर्चा करण्यास जी कायद्यानें सत्ता मिळाली आहे ती कोणीही घेऊं सकत नाहीं. छापखानेवाले यांसही याचप्रमाणें अधिकार आहे. तेव्हां या मोकळीकेची किंमत लाखो रु. समजली पाहिजे. दुसरें, विलायतेस किंवा चिनांत कोणी जाऊन लौकिक केला असतां एका आळींतील कुतरा दुसऱ्या आळींत गेला तर ज्याप्रमाणें त्या आळींतील सर्व कुत्रीं त्याजवर तुटून पडतात त्याप्रमाणें सर्व ब्राह्मणमंडळ त्याजवर तुटून पडत असे आणि दहा दहा वीस वीस वर्षें पैसे खाण्याचे इच्छेनें भट हा रोजगार पिकवून बसत, तें आतां बहुतेक बंद झाले. ब्राह्मण लोभी आहेत असें सर्व नवीन गृहस्थ समजूं लागले. हा सर्व प्रताप इंग्रज सरकारचा आहे. याची किंमत किती समजावी?

पाहा कीं, सर्व हिंदुलोक मुळापासून बकऱ्यासारखी जात, त्यांस कोणीही पोटास दिलें तर ते स्वदेश किंवा बापभाऊ यांची ओळख सोडितात. एक जातीचे लोक दुसऱ्या जातीशीं वैर करतात, आपण फितुर होऊन आपलेच लोकांस मारतात व आपणच पेंढारी होऊन आपणासच लुटतात

अशा या देशाच्या गुणी लोकांस आंवरणारा मोठा जबरदस्त राजा पाहिजे. नाहीं तर शिंद्यांनीं होळकरांस लुटावें, होळकरांनीं पुणें लुटावें असा प्रकार होणार. याच कारणानें हिंदुस्थानच्या सभोंवतालीं काबूल, इराण वगैरे जीं राष्ट्रें आहेत तीं याचा दुर्बलपणा पाहून लांडग्यासारखीं टपत बसलीं आहेत तीं पुढें सरसावतील. हिंदुलोकांमध्यें युद्धसंबंधी धीरपणा मात्र आहे; परंतु युद्धांतील कलाकौशल्य यांस टाऊक नाहीं. याजमुळें इंग्रजलोक यांचें संरक्षण करण्यास जरूर पाहिजेत; तेव्हां यांस संभाळण्याची किंमत पांच कोट रुपये समजण्यास हरकत नाहीं. इंग्रजसरकारतर्फे गवर्नर जनरल या देशांत जबरदस्त अधिकारी आहेत ह्मणून शेरअल्ली खानासारखे काबूलचे राजे त्यांचा आश्रय इच्छितात आणि नेटिन लोकांसारखें पोकळ राज्य येथें असतें तर पूर्वी जसे अबदल्ली व नादरशाहा या देशावर आले तसे शेरअल्ली येणार नाहींत काय? तर या सर्व शत्रूंस दूर राखण्याजोगें सामर्थ्यवान सरकार पाहिजे कीं नको?

सदरहूवर नजर देऊन आपण मोठे उदारपणानें आपले खंडणीबद्दल आपणास कांहीं लाभ आहेत असें समजलों तरी याजमुळें द्रव्य जातें तें जात नाहीं. असें होत नाहीं. या देशांतील माल बिन किमतीनें जो आपणास इंग्लंड देशास द्यावा लागतो तो तोटा भरण्याजोगा लाभ यांत एकही नाहीं. जें द्रव्य गेलें तें गेलें; इतकी विद्यावृद्धी हल्लीं या देशांत होत आहे तरी त्या विद्येनें द्रव्यवृद्धि होईल असें नाहीं. हल्लींच्या विद्येनें जागा मागणारे उमेदवार व मोठ्या उमेदी राखणारे गृहस्थ पुष्कळ होतात; पण यांत या देशांतील द्रव्य वाढविणारा कोण आहे? जसें दुर्दैवानें आपणावर कांहीं निमित्त आलें तर त्यांतून बचावण्याकरितां मोठा बारिस्टर दहा हजार रुपये देऊन केला व घरांतील दागदागिने सर्व विकून त्याची भरती केली व पुढें दैववशात तें निमित्तही दूर झालें तरी जो ऐवज गेला त्याचे बद्दल लाभ झाला; परंतु जें द्रव्य गेलें तें उत्पन्न झालें नाहीं, तो धकाच बसला. याप्रमाणे या सर्व लाभांनी आंबादानी आहे; परंतु द्रव्य जातें त्याची वाट काय? आपण साखर व कागद विकत घेतो, कांच लोखंड, कोळसे विकत घेतों आणि लाखो रुपये देतों ते बंद पाडणारा विद्वान कोणी तरी आहे काय? वास्तविक ह्मटलें ह्मणजे पूर्वीपेक्षां हजारपट कागदाचा खर्च वाढला आहे; परंतु त्यांचा ऐवज सर्व विलायतेस द्यावा लागतो. आमचे देशी कागदाचे कारखाने सर्व ओसाड पडले. लोखंडाचे कारखाने रद्द झाले. विमा व हुंड्या यांची दुकानें बंद पडलीं. याप्रमाणें या देशातील सर्व उद्योग बुडाला, जमीन नांगरण्याची मात्र राहिली; परंतु स्वस्ताई व कर यांजमुळें त्या उद्योगांत पोट भरण्याची सोय नाहीं. फौजे संबंधी सरंजाम, पोषाख, सामान, दारू, हत्यारें वगैरे सर्व विलायतेंत खरेदी होतात याजमुळें क्रोडो रुपये विलायतच्या सावकारांस व विलायतच्या कारागिरांस मिळतात आणि त्याप्रमाणें सामान येथें पैदा होईल ही आशा नाहीं, व तें सामान इंग्रज सरकार येथें कारखाने करवून करील याचीही आशा नाहीं व जरी केलें तरी सरकार खरेदी करील याचीही आशा नाहीं,

आतां दुसरे देशचा रवानगीचा व अमदानीचा हिशेब पाहिला तर काय वाटतें त्याचा खुलासा खाली लिहितों :—

१. विलायतच्या व्यापाराचा हिशेब सन १८५८ तागायत १८६७ याजवरून दहा साली.

| | |
|---|---|
| अमदानी माल ..... .................. | रु. २६६० कोटि. |
| रवानगी माल वजा .................... | रु. २११० कोटि. |
| दहासाली फाजील अमदानीची बेरीज ...... | रु. ५५० कोटि. |
| दरसाली फाजील अमदानीची बेरीज .. ... | रु. ५० कोटि. |

याजवरून दरसाल इंग्लंड देश पन्नास कोट रुपयांनी जास्त श्रीमंत होतो, असें या दहासाली हिशेबावरून दिसतें. बाहेर माल थोडा जातो व खरेदी फार होतो हेंच श्रीमंतीचें चिन्ह आहे.

२. आतां आस्त्रेलिया ह्मणून विलायतचें उपराज्य आहे तेथील व्यापाराचा हिशेब सदरहू दहासाली तपासतां असें दिसतें कीं,

| | | | |
|---|---|---|---|
| अमदानी दहा साली ...... | रु. ३०९ कोटि. | रवानगी दहा साली ...... | रु. २६८ कोटि. |
| फाजील .............. | " ४१ कोटि. | एक साली फाजील ...... | " ४ कोटि. |

याजवरून चार कोट रु. दरसाल या देशांत वाढतात असें दिसतें.

३. ब्रिटिश कानडा ह्मणून विलायतेचें उपराज्य आहे, त्याचा हिशेब.

| | | | |
|---|---|---|---|
| अमदानी दहा साली ...... | रु. १४८ कोटि. | रवानगी दहा साली ...... | रु. १२० कोटि. |
| फाजील .............. | " २८ कोटि. | एका साली फाजील नफा. | २॥। कोटि. |

दरसाल २॥। कोटिंच्या मानानें या देशाचें द्रव्य वाढत आहे.

४. युनाइटेड स्टेट्स आफ अमेरिका हें पूर्वीचें विलायतेचें उपराज्य; परंतु हल्लीं स्वतंत्र आहें. त्याचा व्यापाराचा हिशेब, दुसाली सन १८६८।९ वरून.

| | | | |
|---|---|---|---|
| अमदानी ........ | रयाल ८४४ कोटि. | रवानगी ........ | रयाल ७०६ कोटि. |
| फाजील ........ | " १३८ कोटि. | दरसाली ........ | " ६९ कोटि. |

याजवरून ६९ कोट रयाळ ह्मणजे १६ कोट रुपयांचा फायदा या देशास आहे.

या चारी देशांवरून विलायतेसारखा श्रीमंत देश दुसरा नाही. तेथें व्यापाराचा नफा दरसाल पन्नास कोट रुपये आहे, असें सिद्ध होतें.

आता पार्लमेंट सभेंत इंडिया, चीन व सिंगापूर येथील व्यापाराचा हिशोब दाखविला तो सन १८१४ तागायत १८३५ एकूण एकवीस वर्षांच्या हिशोबांत बेरजा आहेत त्या –

| | | | |
|---|---|---|---|
| अमदानी | रु. ९२,३३,०८,८४४ | रवानगी ...... | रु. ६८,४४,३४,३०४ |
| फाजील ...... | " २३,८८,७४,५४० | | |

याजवरून २३८ कोटि रुपये विलायतेंत २१ वर्षांत जास्ती झाले. इतकी परदेशाची लक्ष्मी विलायतेत शिरली.

हिंदुस्थानाची लक्ष्मी दरसाल १० कोट कमी होत आहेत याजमुळे येथील रयतेमध्ये पैशाची तूट दिसून येते.

या देशांत विलायतचा माल थोडा येतो आणि जातो पुष्कळ. त्याचे मोबदला या देशास इंग्रजी राज्याचा मात्र लाभ आहे, याशिवाय द्रव्यवृद्धीचा प्रत्यक्ष लाभ नाहीं. द्रव्यदृष्टीनें पाहिले तर तोटा आहे. ज्ञानदृष्टीनें पाहिलें तर सदरीं फायदे लिहिले आहेत ते मानून घ्यावे.

---

## निबंध २ रा

जनरल मारियट यांचे म्हणणे असे आहे कीं, दहा कोट पासून सुमारें १४ कोट पर्यंत दरसाल हिंदुस्थानचें द्रव्य विलायतेस जातें याजमुळें हिंदुस्थानचे प्रजेस मोठी अडचण उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. याच कारणामुळें हिंदुस्थान देश भिकारी झाला आहे. कितीएक कुटुंबें रात्रंदिवस मेहनत करितात; परंतु धुटे व आंबील खाऊन निर्वाह करावा लागतो. या देशांत मनुष्य मद्यमांस खाणारे फार नाहींत, याजमुळे त्यांचें जीवन फार सुलभ आहे. पांच सहा पैसे मिळाले तरी त्यांचा निर्वाह होतो. परंतु तितकेही हातीं येत नाहींत. कोठे जेवणावळ असली तर हजारो लोक बायकापोरें तेथे शितें खाण्यास व पत्रावळी घेण्यास येतात व दिवसें दिवस उत्तर हिंदुस्थानचे भिकार उद्योग नसल्यामुळे बाबा, बैरागी, गोसावी होऊन नानाप्रकारचीं रूपे धरून लक्षावधि

फिरत आहेत. बडोद्याचे खिचडीवर पाहिले तर हजारो हतभागी दरिद्री लोक लाचारीनें सकाळपासून तेथें जमतात आणि ओंग्राळेंभर दाणे देतात ते घेऊन जातात असें आढळतें. त्यांची आज वीस वर्षांत दुप्पट तिप्पट संख्या झाली आहे, हें पाहून या देशाची करूणा कोणास उत्पन्न होणार नाहीं असे नाहीं. या दक्षिणेत रयत लोक यांस जोडा, अंगरखा तर कोठून, पण लंगोटी व पटकोरेंही अंगावर घेण्यास मिळत नाही व त्यांचा उद्योग पाहिला तर बिरवाडीस पळसाचीं पाने काढून घाटावरून पुण्यास विकावयास येतात, या कामास पांच दिवस लागतात; तेव्हां ४८ चे पैसे हातीं येतात. कितीएक शेण गोळा करून त्यांच्या गोवऱ्या करून विकतात. दक्षिणेपेक्षां गुजराथेंतील लोक व्यापाराचे कामांत जास्ती उद्योगी व साहसी आहेत व तेथें कापूस व अफू पिकते यांजमुळे कांही पैसा तेथे परत येतो. शिवाय राजेरजवाडे गुजराथेंत व काठेवाडांत फार आहेत याजमुळें देशी माल खपतो. त्याजवर लाखो माणसांचा निर्वाह आहे. ते दक्षिणेंत नाहीं. तेथें रात्रंदिवस मेहनत केली व शेत पिकविलें तरी पट्टी आली म्हणजे चला मुंबईत, मजुरी करा, तेथून पैसे पाठवून कुटुंबाचा निर्वाह व सरकार व सावकार यांचें देणें वारा. इतक्यांत पाऊस कमी झाला किंवा एक दोन माणसें दुखणेकरी झालीं तर मग पंचाईत पडते कीं, आतां काय करावे. मग उपाशी मरण्याची वेळी येते;

हिंदुस्थान देश मुळापासून मोठा सुपीक आहे. त्यांत दाणा वगैरे निर्वाहाचे पदार्थ पुष्कळ पिकतात. हे पदार्थ खाऊन पाणी पिऊन लोक सुखी असत व बाकी राहील तो माल परदेशांत जात होता, त्याचे मोबदला सोनें रुपे वगैरे जिनस घेऊन किंमत व नफासुद्धां मिळत होता व जो माल बाहेर जातो त्याजवर शेकडा पांच रुपये तरी नफा मिळालाच पाहिजे; परंत दहा कोटींची खाद आहे तो तोटा पुरा करण्यास रस्ता नाहीं. हा रखवालीबद्दल खर्च समजला पाहिजे. त्याचे मोबदला चाकरी होते खरी; परंतु एकादे सावकाराचे घरावर चोरांनीं पाळथ राखिली ह्मणून त्याणें चार शिपाई ठेविले तर त्याचें रक्षण झालें हें खरें; परंतु दरसाल दोनशे रुपये खर्च झाला हा बुडीत झाला हें उघड आहे. मग ते रुपये तो रोकड देओ अथवा शिपाई यांस खतें फाडून देऊन भरणा करो अथवा घरांतील दाणे, लांकडें, देऊन पुरा करो; परंतु हें नुकसान खचितच आहे. या शिपायांनी त्याचे घरांत फायदा केला नाहीं, शेत पिकविलें नाहीं, दुसरें नफ्याचें काम केलें नाहीं. फक्त रक्षण मात्र केलें त्याचप्रमाणें विलायतेहून जितके लोक येथें हुद्यावर येतात ते सर्व प्रधान, साहेब, सोजीर, इंजिनियर, पंतोजी, डाक्टर, उपाध्ये, खलाशी हे सर्व हिंदुलोकांची चाकरी करण्यास येतात; परंतु यांजबद्दल जितका अधिक खर्च होतो तितका बुडीत समजला पाहिजे. पण जोंपर्यंत आपण आपलें रक्षण करूं शकत नाहीं तोंपर्यंत दुसरे लांडगे आपणावर पडून फाडून खातील अशी स्थिती आहे तोंपर्यंत हा खर्च उपयोगीं आहे, व ईश्वरानें आपलें संरक्षण इंग्रज सरकारचे हातून केलें आहे, ही त्याची कृपाच आहे; परंतु एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, आपला तोटा आहे तो भरण्याची तजवीज काय करावी हा विचार केला पाहिजे. हिंदुस्थानांत मजुरी फार स्वस्थ आहे. या देशांत भीक मागणारे फार आहेत व या देशांत कितीएक भिकारी होण्याजोग्या चालो आहेत. लग्नसंबंधी जेवणावळी वगैरे उडवेपणा कमी झाला पाहिजे. आपण जेव्हां श्रीमंत होतों आणि खर्चवेच जाऊन पैसा शिलक पडत होता तेव्हां हें सर्व ठीकच चाललें; परंतु ज्यापेक्षां आपलें संरक्षण करण्याकरितां विलायतेहून तीन हजार साहेब व ऐंशी हजार सोजीर व त्यांच्या लवाजम्याचा तऱ्हेतऱ्हेचा खर्च आपणास भरावा लागतो तर हा पैसा पुरवून शिवाय पहिल्याप्रमाणें खर्च निभावूं म्हणाल तर हा केवळ मूर्खपणा आहे. अखेर दिवाळें निघण्याचा प्रसंग येईल याजकरितां जें कांहीं द्रव्य अद्यापि राहिलें असेल तें उत्पन्न वाढविण्याकरितां उपयोगास लावावें. सर्व राजे, सरदार व सावकार यांणी देशांत ऊतन्नें जास्ती होऊन ही खाद भरेल याची तजबीज पाहावी. देशांत स्वस्थता आहे व मोकळीक आहे. याचा लाभ घेऊन आळशीपणा व

खर्चीकपणा सोडून द्यावा. आणि उद्योगास लागावें तर आपण दुसरे देशाची बरोबरी करण्यास समर्थ होऊं. आपल्या देशांत खाणी शोधून काढून जमिनीची लागवड जास्ती करून नवीं यंत्रें व युक्तींचा अंगीकार केला पाहिजे. असें जर आपण करणार नाहीं तर सर्वस्वी नाश होईल. ही सांप्रतची स्थिति लोकांस कळविणें फार अवश्य आहे. विलायत सरकारास या देशापासून कोट्यावधि रुपयांचा फायदा आहे त्यापेक्षां त्याचे नफ्यास धक्का न लागतां द्रव्यवृद्धीस्तव जे कांहीं प्रयत्न आपण करूं ते त्यांस मान्य होतील व त्यांस ते कांहीं मदतही करतील; यास्तव हा तोटा पुरा काढण्याचे उपाय खालीं लिहल्याप्रमाणें आहेत :-

१. देशांत जें कांहीं द्रव्य राहिलें आहे त्याची योजना द्रव्यवृद्धीकडे करावी.

२. आपणास दरिद्री करण्याजोग्या ज्या चाली असतील त्या सर्व सोडून द्याव्या. दोन रुपयांत मुंज व पांच रुपयांत लग्न हीं करावीं; पण द्रव्य रक्षावें.

३. सामर्थ्यवान भिकाऱ्यास भिक्षा देऊं नये म्हणजे ते आपलेआपण उद्योगांत पडतील आणि पडले तर देशाची संपत्ति कांहीं तरी वांचेल.

४ परदेशचा माल जितका थोडा घेववेल तितका घ्यावा अथवा परदेशचा माल वापरण्याची खोड अगदीं सोडून द्यावी. म्हणजे अर्थात देशांत द्रव्य राहिलें व एकदम लोकांस उत्तेजन आलें.

५. यंत्रसिद्धि करावी. ती अशी कीं, जेणेंकरून हजारो माणसांची मेहनत फुकट पदरीं पडेल.

६. मुत्सदीपणा, वैद्यगिरी, इंजनेरी काम या सरकारचे रीतीप्रमाणें शिकून सरकारचाकरींत जितका अधिक प्रवेश होईल तितका करावा म्हणजे तितकें द्रव्य येथें राहील.

सरकारचा खर्च कितीएक बाबतींत फाजील आहे. त्याचें शोधन करून उघडीक करावी. हिंदुस्थानचे सर्व प्रजेचा निर्वाह जमिनीवर आहे; परंतु जमिनीचें उत्पन्न हल्लीं दर माणशीं दरसाल १२ रु. होतें. कारागिरी वगैरे उद्योग परदेशचे स्वस्त मालाचे अमदानीमुळे बुडत चालले. द्रव्य उत्पन्न होण्याचीं साधने देशांत असतील त्यांप्रमाणे निर्वाह होणार आहे परंतु हल्ली हिंदुस्थानांत हीं साधनें अगदी कमी आहेत त्यांचा पुरावा येणें प्रमाणेंः-

हिंदुस्थान सरकारचे हिशेबावरून जमिनीचे उत्पन्न रु. ······ २० कोट दरसाल.

यांतून इमान धर्मादाय जमिनी अर्ध्या नाहीत,

परंतु अर्ध्या आहेत असें समजलें तरी त्या. ······ ···१० कोट मिळून ······ ··· ३० कोट

सरकार उत्पन्नापैकीं अर्धा भाग घेते, परंतु अगदीं कमी अदमास ह्मणजे रुपयास चार आणे घेतात असे समजले तरी चौपट ऐन उत्पन्न ह्मणजे ······ १२० कोट.

आतां मागील मोजदादीवरून इंग्रजी राज्यांत १९ कोट प्रजा आहे. त्यापैकी दरशेकडा ऐंशी शेतकरी आहेत असें वाटतें; परंतु जरी निमे धरले तरी ९॥ कोट माणसें होतात. त्या संख्येनें एकशे विसांस भागले तरी डोईस उत्पन्नाचा आंकडा १२ रु. १० आणे होतो.

परंतु खरा हिशेब काढला तर ९ रु. दर माणसास पडतील असें वाटतें.

एकुणीस कोट माणसांपासून ५० कोट रुपये वसूल करितात. तेव्हा डोईस सरकार देणे २ रु. १० आणे पडते.

आतां विलायतेत दर माणशीं कर २५ रुपये आहे; परंतु दर माणसाचें सामर्थ्य ३०० रुपये उत्पन्न करण्याचे आहे.

तेव्हा ९ आणि ३०० यांत जें अंतर आहे त्या मानानें हिंदुस्थानचें दरिद्र आणि विलायतची संपत्ति यांचें अंतर समजावें.

आतां ५० शेतकरी वरतीं दाखविले ते वजा करितां बाकी ५० पैकीं ३० कारागीर ह्मणजे सुतार, लोहार, गवंडी, कोष्टी, गौळी, सोनार, वगैरे हे लोक उपयोगीं आहेत; कारण कीं, हे द्रव्याची किंमत वाढवितात. मुख्य लक्ष्मीचे प्रकार तीन आहेत, एक शेती, दुसरा खाणींतून पदार्थ

सांपडतात ते व तिसरा कारागीर स्वाभाविक पदार्थ घेऊन युक्तीनें त्यांची किंमत वाढवितात ते. पाषाणाची मूर्ति केली, तर त्याच पाषाणाचे दसपट किंमत येते मातीचीं भांडीं केली तर त्यांची मातीपेक्षा किंमत फार येते. विलायतेत लोखंडाच्या खाणी आणि कोळशांच्या खाणी सांपडतात आणि स्पेनदेशांत सोन्याच्याखाणी आहेत; परंतु सोन्याच्या खाणीचा देश रसातळी गेला आणि कोळशांच्या खाणीच्या देशांत लक्ष्मी फुगड्या घालीत आहे हें सर्व युक्तीचें व कारागीरीचें माहात्म्य आहे; परंतु दहा वर्षामागें बाराकोट रु. चें सूत व कापड येथें येत होतें तें आतां १९ कोट रु. चे सूत व कापड येतें यावरून सात कोट रु. चे येथील कोष्टी मेले असें समजावयाचें किंवा ते कुळंब्यांत मजूरदारांत गेले असतील. दिवसें दिवस येथील कारागीर हटतात व विलायतेंतील कारागिरांस फायदा होत आहे. एकंदर कारागिरीबद्दल वीसकोट रु. व्यापारांत विलायतेस नफा आहे. याचें कारण हिंदुस्थान जो माल विलायतेस पाठवितें तो माल सर्व धान्य वगैरे कच्चा जातो व तिकडून येतो तो सर्व माल कारागिरांचा अदमासें हल्ली साठ कोट रु. चा आहे. त्यांत तृतीयांश मजुरी आहे. तेव्हां वीसकोट रु. मजुरीचा फायदा विलायतेस आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. शिवाय सरकारी फायदा आहे तो खेरीज करून इंग्लंड देशाचें भांडवल अदमासें चाळीसकोट रु. या देशांत व्याजावर आहेत. रेल्वे वगैरे मोठीं कामें विलायतचे पैशावर होतात. ते पैसे जेव्हा इकडे खर्च होतात जेव्हां ज्या प्रांतांत रेल्वेचें काम चाललें त्यांत कारागीर लोकांस तितके दिवस फार सुख होते, व पुढें काम आटपलें ह्मणजे पुनः भिकारी होऊन फिरतात; कारण हें दुसऱ्याचे दुकानांतून कर्ज काढून व्याजावर मेजवानी केल्याप्रमाणें होतें. घरांत काहीं नाहीं. बरें इंग्रज सरकारानें वीस कोट प्रजेवर हुकुमत मिळविली आणी पन्नास कोट रु. वसुलाचें राज्य स्थापलें आणि इतकें मिळविण्यास त्यास विलायतेस एक पैसाही खर्च पडला नाही. सर्व हिंदुस्थानचे पैशावर लष्करें उभीं झालीं. खर्च झाला तो येथीलच सर्व आहे. पूर्वी दहा हजार पंधरा हजार सोजीर येथें राहत होते. बाकी सर्व नेटिव फौजेचे हातून काम झालें. सर्व राज्य उभें करणारी फौज येथीलच होती. तिचा खर्चही थोडा होता. त्या फौजेवर आता भरवसा नाही ह्मणून ऐंशी हजार सोजीर राखावे लागतात. युरोपियन १ पलटणीस सहा नेटिव पलटणींइतका खर्च लागतो. तेव्हा हेंही देशावर मोठें ओझें झालें आहे. हा बंडावा झाला त्याचे प्रायश्चित्ताचा खर्च समजला पाहिजे. आणि विलायत सरकारास परभारां खर्च होऊन आपली फौज वाढली तर फायदाही आहे. याजकरितां हिंदुस्थानाचे खात्यांत पाहिजे तो खर्च लिहिण्यास सापडतें. येथें जमा पाहण्यास पार्लमेंट किंवा नेटिव कौन्सिलदार कोणी नाही तेव्हां परकीय देश यास जी सोय पडेल तसे सर्व प्रकार घडतात हें उघड आहे.

आतां कारागिरांची रोजी दररोज ४ आण्यांपासून ८ आणे पर्यंत आहे तिची सरासरी सहा आणे ह्मणजे १२ रुपये महिना किंवा १४४ रुपये साल दरमाणशी पडतात. हे लोक देशांत द्रव्य उत्पन्न करणारे समजले पाहिजेत. त्यांचे हातीं जितकें द्रव्य व जितकी युक्ति अधिक येईल तितकी त्यांची द्रव्यवृद्धि करण्याची शक्ति वाढेल. कारण कीं पृथ्वींत निर्माण झालेले पदार्थ त्यांचे हातीं अधिक किमतीस व अधिक सुख देण्यास पात्र होतात. याजकरितां त्यांस अधिक सामर्थ्य येईल असें होण्यास त्यांस यंत्रशक्ति, बुद्धि व ज्ञान हीं दिलीं पाहिजेत. कारण कीं मनुष्याची द्रव्योत्पादक शक्ति किती वाढते हें ध्यानांत येण्याकरितां एका सुताचे कारखान्याचा हिशेब खाली देतों.

सुताचे कारखान्यांत ......... ७०० माणूससंख्या

त्या कारखान्यांत दरसाल कापूस खरेदी. ....३॥ लाख रु.

त्या कारखान्यांत सदरहूकापसाचें सूत व कापड तयार झालें त्याची किंमत .... ७ लाख रु.

या हिशेबावरून दर माणसाची द्रव्य उत्पन्न करण्याची शक्ति ५०० रुपयांची आहे. इतकी वाढण्याचें कारण विलायती यंत्रें. तर अशा यंत्रांनी माणसाची शक्ति वाढविली पाहिजे.

विलायतेंत जीं यंत्रें वाफेनें चालतात त्यांचे बळ ३० लाख घोड्यांचे आहे. दर घोड्यास ६ माणसाचें बळ आहे. तर एक कोट ऐशीं लाख माणसें यंत्रद्वारा-ह्मणजे इतक्या माणसांचे काम यंत्रानें होत आहे तें रात्रंदिवस थकल्याशिवाय व भूक लागल्याशिवाय दोन पैचे दरानें काम होतें तेव्हां त्यापासून किती फायदा होईल.

आतां परकीय राज्य राखण्याबद्दल जास्ती खर्च पडतो तो तोटा पुरा पाडण्याकरितां या देशांतील लोकांचा माल उत्पन्न करण्याची शक्ति वाढविली पाहिजे. हें आपण आज न पाहिलें तर "वरातीमागें घोडें होईल" हें सर्व राजे, प्रधान, सावकार या सर्वांनीं मनांत आणिलें पाहिजे; परंतु नाच, बैठकी, भाट, गोंधळी, भांग, अफू, माजूम, कुसुंबा चावून बुद्धि सुचेल ती खरी.

आतां ५० शेतकरी, ३० उदमी व बाकी राहिलेले २० ते सुखवस्तु, म्हणजे ऐशी असामींनीं त्यांचें पोषण करावें लागतें असे आहेत. या वर्गांत शिपाई, भिकारी व सरकारी चाकर वगैरे धरले पाहिजेत; परंतु या पोष्यवर्गातील जितकीं माणसें उदमी होतील तितका देशास नफा आहे. याजकरितां हे उदमी होण्याचा उपाय होईल तितका करावा.

आतां सरकारी खर्च बहुत वाढला आहे त्याजमुळें उदमी व शेतकरी यांजवर ओझें फार होतें त्याचा हिशेब.–

सन १८३० सालापर्यंत खर्च. ........ ...... २० कोटि.
सन १८५६ पर्यंत दरसाल सरकार खर्च ......... ३२ कोटि.
हल्लीं ... ........ .. ... ........ ... ५० कोटि.

आलीकडील अठरा वर्षांत अठरा कोटि रुपये जास्त खर्च वाढला. आतां हा खर्च पुरा कसा पडावा ? जर या देशाचें उत्पन्न खर्चाच्या मानानें वाढलें असतें तर एक पुरा पडता. जमिनींतून पीक जास्ती निघतें असें आपणास ह्मणता येईल; परंतु लोकांची हाकाहाक तर अशी आहे कीं, जमिनी पहिल्याप्रमाणें पीक देत नाहींत. त्यांचें पीक देण्याचें सामर्थ्य हल्ली कमी झालें. कदाचित आपण असें ह्मणू कीं, हल्लीं पूर्वीपेक्षां जास्त जमीन लागवड झाली; परंतु त्यांत असें समजलें पाहिजे कीं, विलायतचे मालाचे अमदानीमुळें जितका उदीम कमी झाला तितकी शेतकी वाढली; परंतु असें झालें तर फायदा कांहींच नाही. उदिमापैकीं फायदा बुडाला आणि शेतकीचा वाढला. "आजा मेला आणि नातु झाला" तर घरांतील माणसें बरोबरच आहेत.

हिंदुस्थानांतील प्रजा पूर्वापार बहुत रुपये खर्च करून ज्ञान खरेदी करीत आली आहे. मुळीं ब्राह्मणांनी थोडीशी विद्या वाढविली त्याजवरून त्यांणीं या प्रजेपासून हजारो कर घेतले व अजूनही घेतच आहेत. अद्यापि त्यांजकडे कर थोडे भरावे लागतात असें नाहीं. या मानानें पाहिलें तर हल्लीं हिंदुस्थान दुसऱ्या देशाचें ज्ञान खरेदी करीत आहे व त्याची भारी किंमत देत आहे हें फारसें आश्चर्य नाहीं. मागील वहिवाट आहे त्याप्रमाणेंच चाललें आहे. विद्येचा आरंभ करण्याचें भाडें कोट्यातवधि रुपये ब्राह्मण घेत आहेत, तर हल्लींचे ज्ञानाची किंमत विलायतचे ब्राह्मण घेतात यांत नवल नाहीं.

परंतु जरी इंग्रजसरकारानें आपल्या देशाचे हिताकरितां हा देश सर केला तरी हें धोरण चांगलें नाहीं असें आह्मांस दिसतें. अमेरिका व्यापारांत फार वाढत आहे व राजकारणांत रशिया वाढत आहे. हे दोन्ही देश फार जबरदस्त आहेत याजकरितां हिंदुस्थान देश आपला आहे व विलायतचें व हिंदुस्थान देशाचें हित हें एकच आहे असें समजून वहिवाट केल्यास विलायतच्या मदतीस हा देश फार उपयोगीं पडेल व येथें जें द्रव्य वाढेल तें विलायतचे उपयोगीं आहे. आणि या देशांत संपत्ति उत्पन्न होण्याचीं साधनें फार मोठीं आहेत त्या सर्वांचा उपयोग केल्यास येथील प्रजा फार

सुखी होईल व त्या मानानें विलायत जबरदस्त होऊन राहील; परंतु सवतीच्या मुलांसारखी जी हल्लीं स्थिति आहे ही हितकारक नाहीं. विलायत सरकारचें राज्य या देशांत बहुतकाल राहावें अशी आह्मांस इच्छा आहे व जरूरही दिसतें. यास्तव छिनाल बायकोचा नवरा जसा तिचा अविश्वास धरतो आणि घरांतल्या किल्ल्या कमरेस बांधून फिरतो तशी वहिवाट इंग्रज सरकारनें न केली तर फार चांगलें. गैरवाजवी खर्च या देशावर घालूं नये. येथील लोकांची ममता संपादन करावी. पूर्वी कंपनीसरकारास मोठीं मोठीं राज्य ज्यांनीं मिळवून दिलीं ते कांहीं विलायतचे लोक नव्हते. तर टिपू सुलतानापासून रणजितसिंगापर्यंत येथील जे मुलूख घेतले ते एथल्याच लोकांनीं घेतले. त्यांचा आज भरंवसा तुटला ह्मणून ऐशीं हजार सोजर बाळगावे लागतात; हें चिन्ह चांगलें नाहीं, असें इंग्रजसरकारचे मोठे मोठे नामांकित दोस्तही ह्मणतात. याजकरितां येथील लोक थोड्या खर्चांत मिळतात त्यांसच राखावें. कौंसलापर्यंत नेटिव लोक राज्यकारभारांत घेऊन त्यांचे सल्लामसलतीनें कारभार करावा, ह्मणजे सर्वत्र आबादानी होऊन उभयदेशांचें ऐक्य होईल, आणि त्यापासून बहुत लाभ होतील. येथील उदीम वाढवावे व येथें खाणी काढाव्या तें एकीकडे राहून जकातीचा कायदा ठरविण्याचे वेळीं होपसाहेबांनीं जें भाषण केलें त्याजवरून येथील उद्योग कमी व्हावा व सुताचे कारखान्यांवर कर घालून त्यांस जेर करावें. उंच प्रतीचा कापूस येथें येऊ देऊं नये. बारीक कपडे येथें करतील त्यांस अडचणी घालाव्या. हें धोरण सर्वथैव अयोग्य व परिणामीं विषासारखें आहे. लोभामुळें अशी बुद्धि धरण्यांत कांहीं फायदा नाहीं असें, इंग्रज-सरकारचा उपयोग समजून त्याजवर जो आमची निष्ठा आहे तिच्या प्रेरणेनें आह्मी स्पष्ट बोलून दाखवितों. हें ज्यास रुचेल त्यास रुचो, न रुचेल त्यास न रुचो.

---

## निबंध ३ रा

हजारो लोकांचें मत असें आहे कीं, हिंदुस्थानांत रेलवे झाली हें मोठें सुख आहे. मोठें सुख हें खरेंच; परंतु आपण ध्यानांत धरलें पाहिजे कीं, आपल्या शिल्केंतून हें काम झालें असतें तर या देशास फार फायदा झाला असता; परंतु विलायतेहून चाळीसकोट रुपये आले त्यांचें आपणास व्याज भरावें लागतें, तेव्हां परक्यांचे भांडवलावर ही मौज आहे. तुह्मी कर्ज काढून बायकोस वेळा करितां; परंतु वाण्याचे घरीं दुप्पट दाम भरले तरी सुटका होत नाहीं.

याशिवाय इंग्रजसरकारास शंभरकोट रुपये कर्ज आहे त्याचें व्याज सरासरी चार कोट रुपये आहे. तें या हिंदुलोकांस भरावें लागतें, त्यांतील बराच भाग विलायतेंत जातो.

युरोपियन लोक या देशांत चाकर आहेत त्यांचीं वतनें आठकोट रुपये दरसाल आहेत. त्यांपैकीं चार आणे ते येथें खर्च करितात, याजवरून सहाकोट रुपये विलायतेंत जातात. सरकारी हुंड्या विलायतेंतील खर्चाकरितां १२ कोट रुपयांच्या जातात त्याखेरीज ही बेरीज आहे.

हें सर्व एकंदर केलें तर वसुलापैकीं सुमारें २० कोट रुपये विलायतेस जातात. आतां याची भरती कशी करावी याचा विचार आपणास केला पाहिजे. धन्य या देशाचें सामर्थ्य आणि या देशचे लोकांची सहनशीलता !! इतकी खंडणी भरून हे लोक अद्याप खाऊन पिऊन भाकरी चटणीवरही निर्वाह करीत आहेत.

विलायत सरकारची जीं उपराज्यें आहेत त्यांपेक्षा हिंदुस्थानची दशा वाईट आहे; याचें कारण हिंदुस्थानांत कालोनीप्रमाणें लोकांचा संभाळ होण्याचें साधन नाहीं. हिंदुलोक दूर राखिले आहेत. ते कौंसलांत किंवा मोठे अधिकारांत नाहींत व कर घालणें व खर्च करणें यांचे विचारांत त्यांचा

शब्द नाही; जेव्हां जेव्हां सरकारचा खर्च वाढतो तेव्हां मोठे मोठे फिनान्सियर मि. विल्सनसारखे विलायतेहून येतात आणि नवे कर घालून जातात; परंतु येथील रयतेची व्यवस्था काय व येथील उत्पन्न कसें वाढेल याचा विचार कोणी करीत नाहीं. भाड्याचा उंट, त्याजवर लादतां लादतां नाळी पडल्या तरी कोणी मनास आणीत नाहीं. एकतर्फी काम चालते, त्याजमुळे दत्तक देण्याची नामंजुरी; खालसा करण्याची मसलत; स्टांप कायदे; थोडे मुदतीचे कायदे; इनामकमिटी; जमिनींवर मनस्वी धारे इत्यादी गोष्टी उत्पन्न झाल्या; परंतु या जमिनींत काय पिकतें व लोक खातात काय याचा विचार कोणी करीत नाही. शहराची मोजणी काढून प्राचीन घरांचे नकाशे करावयाच्या सनदा घ्यावयाच्या अशीं खातीं उत्पन्न करून लाखो रुपये व्यर्थ लोकांपासून घेतात आणि दोन तीन साहेब मिळून ते खातात. याचें नांव व्यवस्था कोण ह्मणेल? द्रव्य जितकें जास्ती निघेल तितकें काढून घेण्याच्या तजविजी करील तो हुशार कामदार आणि असें द्रव्य गोळा केले तें खर्च तरी व्यवस्थेनें होतें असें नाहीं. त्रिगानोमेत्रीसर्वे खात्यास दोन लाख रुपये महिना खर्च. बरें त्यापासून फायदा एक पैशाचा नाहीं आणि एकदां खातें निघालें ह्मणजे तें बंद होण्याचा संभव नाहीं. कारण कीं, नफा दाखविणारे साहेब असतात ते पाहिजे त्या रीतीने नफा दाखवितात. त्यांच्या विरुद्ध बोलणारा कोणी नाही. जिकडे तिकडे हांहू होऊन पुन्हा सांकशन येतें. यास्तव इंग्रजी राज्याची रीति आहे त्या रीतीप्रमाणें राज्य सुयंत्र चालण्यास लोकांचा हात त्यांत पाहिजे. गैरवाजवी गोष्टींचा बंदोबस्त करण्यास लोकांस कांहीं अधिकार पाहिजे. वेडा राजा आणि शाहणा कारभारी याचीं उदाहरणे या देशात थोडीं नाहींत. तसा हा कारभार हल्लीं चालला आहे.

जमिनीवरचे कर अतिशय. जेथे चार आणे एकर असावा तेथे दोन रुपये घातले आहेत. याचें कारण सरकारांनीं जेथें जेथें शेतकी केली आहे तेथें तेथें दिवाळे निघाले. खानदेशांतील सरकारी फार्म याचा परिणाम पाहा. त्यासाठी युरोपियन घेऊन पाहिलें व नेटिव येऊन पाहिलें तरी उत्पन्नास व खर्चास ताळा पडत नाहीं. सरकारच्या घरीं ही अवस्था, मग लोकांच्या घरीं काय असेल. चाळीस गांवीं पेनशनदार शिपाई यांस जमिनी देऊन वस्ती केली त्यांत कोणी सुखी झाला नाही.

आतां जे सुशिक्षित लोक आहेत व जे सावकारी करितात त्यांस शेत करणे ह्मणजे दिवाळें काढणें असें वाटतें. हातांत असेल तेही घालविण्याचा मार्ग शेतकी असें लोक समजतात, याजमुळे जमिनिचे कामांत कोणी पडत नाहींत. जे पडले ते फसून बसले आहेत. नेटिव लोकांची भूक इतकी थोडी आहे कीं, जर चार पैसे मिळतील तर निर्वाह होईल; परंतु त्यांचेंही धोरण नाहीं. याजकरितां जमिनीचे सुधाऱ्यांत कोणी पडत नाहीं व खानदेश, पंचमहाल, गुजराथ वगैरे ठिकाणीं जमीनी पडीत आहेत; आणि तीन रुपये महिन्याची एक चाकरी असली तर तीनशें अर्जा पड-तात याचें कारण हेंच आहे. रयत दारीद्र आहे याची खात्री करून घेणें असेल तर दर गांवांत कर्ज किती आहे याचा आढावा पाहावा आणि लार्ड लारेन्स व लार्ड मेयो असे मोठमोठे अधि-कारी यांनीं हिंदुस्थान हा देश भिकारी आहे असेंच लिहिलें आहे. याची दुसरी कसोटी अशी आहे कीं, येथें प्रत्येक माणसास परदेशचा माल दर माणशीं तीन रुपयांहून अधिक घ्यावा लागत नाहीं; परंतु परदेशचे लोक दर माणशीं वीस, कोणी पन्नास, कोणी शंभर रु. पर्यंत खरेदी करितात. याचें कारण जितका देश श्रीमत असेल तितका परदेशचा माल आधिक खरेदी करील व जितका भिकारी असेल तितका थोडा खरेदी करील, येथें प्रजा १९ कोट व माल ५० कोटीपासून साठ कोटपर्यंत येतो. तो दिवसेंदिवस अधिक होत चालला आहे त्यांत फक्त कापड २० कोटींचें येतें आता दर माणशीं दोन रु. चें कापड ह्मटले तरी ४० कोटींचें कापड पाहिजे त्यापैकीं अर्धे विला-यत पुरें करतें अर्धे या देशांतील कारागीर करतात; परंतु दिवसेंदिवस तें मागें हटत चालले आहेत. पन्नास वर्षांच्या पाठीमागें दहा पांच लक्षांचें विलायती कापड येत होतें तें पुढे दहा कोटींचें झाले. आलीकडे दहा वर्षांत वीस कोटींचें झालें. तेव्हां दरसाल हा व्यापार वाढत आहे

व त्या मानानें आपला कमी होत आहे. या देशांतील लोक भिकारी, त्यांस जाडी कापड फार लागतें, ह्मणून तितका तरी खप देशांतील कापडाचा आहे. आतां इकडे सुताचे कारखानें सुरू झाले आहेत त्यांत बारीक कापड तयार होईल हें भय मांचेस्टरचे लोकांस पडून ते लोक तें न होऊं देण्याचा प्रयत्न करीत आहेत. देशी कापूस भरड सबब मिसर देशांतील वगैरे बारीक कापूस आणून करतील या भयास्तव त्या कापसावर जकात बसविली आहे तेणेंकरून येथील व्यापार अडून राहील.

आतां या देशांतील लोक बुद्धिमत्तेत कमी नाहींत हें चांगले प्रकारानें सिद्ध झाले आहे. कोणी बारिस्टर, कोणी सिविलसरविस, कोणी डाक्तर, कोणी इंजिनीयर अशा परीक्षा देण्यास उमेदवार गेले ते सर्व उत्तम प्रकारानें परीक्षा देऊन विलायतचे लोकांबरोबर पसंत पडले. हिंदुस्थानांतही परीक्षा देऊन पदव्या मिळवितात. जरी त्यांच्या परीक्षा विलायतेपेक्षां कठीण आहेत तरी ते देतात. दुसरें कठीणपणाचें कारण असें आहे कीं, विलायती लोकांस स्वभाषेंत परीक्षा देणें सुलभ आहे. आणि हिंदुलोकांस प्रथम भाषा शिकून नंतर विद्या शिकावयाची, तरी त्या सर्व अडचणींतून ते पार पडत आहेत इतकेंच नाहीं; तर नेटिव लोकांत इंग्रजींत ग्रंथ व बखरा लिहिणारे बहुत आहेत; इंग्रजी भाषेंत बोलणारे असे आहेत कीं, त्यांचे प्रतीचे इंग्लंडासही थोडे असतील. इतकें आहे तरी अशा नेटिवांचा विशेष मान नाहीं, व इंग्रजी राज्यांत त्यांस स्थळही नाहीं. त्यांची हद्द बांधली आहे त्याबाहेर त्यांची गति नाहीं. तीन रुपये महिन्याच्या पंतोजीजवळ जे शिकले व जे मोठ्या शाळेंत शिकून त्यांत परीक्षा देऊन पदव्या मिळवितात या उभयतांची मति सारखीच. किंबहुना विद्वानापेक्षां अविद्वान पुढें सरतात. कारण त्यांची साधनें अनेक असतात. आर्जव-शक्ति असते, आणि पांच रुपयांपासून चढण्यास ते तयार असतात. आणि पदवीवाले यांस असें वाटतें कीं, आह्मी पांच रुपयांची नौकरी कशी करावी. याजमुळें ते मागें पडतात. कारण प्रवेश करण्याचें द्वार लहान चाकरी हेंच आहे. बरें साहेब लोकांमध्यें जात्याभिमान आहे त्याचा मत्सर इतका दीर्घ आहे कीं, ब्राह्मण जेवायास मात्र निषेध धरितो; परंतु बाकी व्यवहारांत तो सारखेपणा राखतो. परंतु इंग्रजांचा नियम असा आहे कीं, नेटिव लोकांशीं कोणताही व्यवहार ठेविला कीं, त्यास बाळीत पडेल. इतके जज्ज, कलेक्टर व असिस्टंट वगैरे आहेत; परंतु कोणत्याही नेटिव लोकांस ते आपणाबरोबर मानीत नाहींत व कोणाचे घरी जात नाहींत. कोणासही गाडींत बस-वून जाणार नाहींत. आतां जिल्ह्यांत यांचे बरोबरीचे कोणीच नाहींत काय? परंतु नेटिवांशीं व्यवहार ठेवणें हें अतिनीच काम आहे असा त्यांचा निर्बंध आहे तो ते तोडीत नाहींत. कोणी राजे असले तर त्यांस मात्र ते आपल्या बरोबरीचे असे समजतात. बाकी कोणास समजत नाहींत. हिंदुस्थानचे सांप्रतकाळीं हे देवच आहेत, परंतु पूर्वीचे देवांची तृप्ति तूप, तांदूळ, फार झालें तर दोन चार बकरीं दिलीं तर होत होती. या देवांस वीस कोट रुपयांचा हविर्भाग दिला तरी प्रसन्नता नाहींच असा हा धनमेध हल्लीं चालला आहे. आतां या मानानें नेटिव लोकांची भक्ति उडत चालली. पूर्वी इंग्रजी अंमल आला तर खुषी होत होते. आतां दुःखी होतात. सर दिनकरराव यांचें ह्मणणें असें आहे कीं, इंग्रजसरकारच्या शब्दाचें आतां बहुतेसें वजन राहिलें नाहीं. लोकांचे हिताकरितां अमुक कायदा करतों असें प्रसिद्ध झालें कीं, लोकांस भय पडतें, कीं कांहीं तरी विलक्षण अस्त्र आपणावर येत आहे. आतां सिविलसर्विसमध्यें लोकांचा प्रवेश न व्हावा ह्मणून काय तजवीज चालली आहे, ती ध्यानांत ठेवा. सन १८३२ सालीं कंपनीचे सनदेंत कलम घातलें कीं, नेटिव लोक सर्व कामांत लायक समजले जातील. पुढें कंपनीस १८५२ सालीं दुसरी सनद मिळाली तींतही तेंच कलम घातलें आहे. पुढें १८५९ सालीं राणी सरकारचा जाहीरनामा लागला त्यांत त्याची पुनरुक्ति स्पष्टपणें केली आहे. पुढें १८६१ सालीं एक कायदा झाला त्यांत जरूर असेल त्यावेळेस सरकारनें काळे लोकांस सिविल सर्विसमध्यें घालावें असें ठरलें; परंतु जरूर

आहे कोठें ? नेहेमी उमेदवारांची भरती येतच आहे. तेव्हां त्यांत कांहीं सवड नाहीं असें पाहून हिंदुस्थानांतून ९ असामी सरकारांतून खर्च देऊन पाठवावे ह्मणून सरकारानें जाहिरनामा सन १८६९ सालीं लावला तो लागलाच रद्द करून स्टेटसेक्रेटरी यांणीं सांगितले कीं, वीस कोटी मनुष्यांचा मुलूख, त्यांत नऊ जागा ठेवून काय होतें असें ह्मणून नऊ असामी लागलेच बंद केले. त्या निमित्तावर नवा कायदा केला त्यांत रूळ ठरविण्याचें लिहिलें त्यांत रुळास पांच वर्षे लागलीं. आजपर्यंत ९९ असामी गेले असते तर सुमारें ६०।७० असामी विलायतेस जाऊन आले असते. परंतु कोणीकडून तरी काळ काढायाचा. याप्रमाणें पन्नास वर्षे आज चाललें आणि आणखीं पन्नास वर्षे जातील यांत संशय नाहीं. या निमित्तानें नेटिव लोकांस जाण्याची हरकत घालण्याचा विचार आहे. युरोपियनांस उमरीची मुदत वाढविण्याचा विचार आहे. आणखीं यांतून काय काय निघेल तें निघो. असा सर्व विचार नेटिवांविरुद्ध पाहून सर दिनकरराव यांसारखे सरकारचे मित्र यांस वाईट वाटतें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हल्लीं सुशिक्षित लोकांस नेटिव राज्यांत प्रवेश करण्यास ठीक पडतें; परंतु इंग्रजींत सर्व प्रकारचें दुःख व जागा नाहींत व आहेत त्या भलत्यास देतात. सर दिनकरराव, सर माधवराव, दादाभाई, हरिश्चंद्र चितामण वगैरे नेटिव राज्यांत आहेत त्यांस इंग्रजींत कोठें तरी स्थळ आहे काय ? ब्राह्मणाचा जो घेडाविषयीं अभिप्राय तो साहेब लोकांचा नेटिवांविषयीं आहे असें प्रदर्शित होतें. बी. ए. ची परीक्षा दिली तर अव्वल कारकून व्हा ह्मणजे कोणी व्हावयास नको व कोणास जागा द्यावयास नको. हजार मनुष्यांतून एकादे मनुष्यास बी. ए. ची परीक्षा देण्याची बुद्धि असते व तितका खर्च संकटें भोगून जर परीक्षा देईल तर त्याणें अव्वल कारकून व्हावें बरें तरी अव्वल कारकुनांची हद्द केली!! पटेवाल्याची केली असती तरी नको ह्मणणार कोण ? अशा धोरणापासून काय परिणाम होईल तो होओ ! ही इंग्रजसरकारचे मित्रांस मोठी फिकर आहे.

---

## निबंध ४ था

हिंदुस्थानांत शेतकी करणाऱ्या लोकांचा समुदाय मोठा आहे. गांवांत जाऊन पाहिलें तर गरीब लोक बायकापोरेंसुद्धां मेहनत करणारे आढळतात. त्यांस कापड जाडे भरडे, जोडा आहे नाहीं, कांट्यांतून फिरून कोणी ह्मशीस गवत, कोणी बैल घेऊन रानांत, कोणी गुरांच्या मागें, कोणी शेळ्यांचे मागें असा बारीक रीतीनें निर्वाह करून असतात. त्यांस शहरचें कांहींच सुख ठाऊक नाहीं. त्यांस वाचतां लिहितां येत नाहीं. एक दोन वाण्याचीं दुकानें व त्यांजवर त्यांचा निर्वाह. पिकेल तें खाऊन राहातात. परंतु हल्लीं कुळव्यांची स्थिति पाहिली तर ते कर्जभरी होऊन गेले आहेत. दक्षिणेत गांवोगाव शिलेदार, सरदार असत ते आतां नाहींत. ते असो; परंतु माती उकरून तरी पोट भरतें ? तर तसेंहीं नाहीं. एकीकडे सावकार व एकीकडे सरकार त्यांस तगादा करितात. पट्टी भरण्याचा वखत आला ह्मणजे पंचाईत पडते. त्यांमध्ये कांहीं उधळेपणाचा दुर्गुण आहे. लग्नाचे वगैरे खर्च जास्ती करितात त्यामुळे कर्जही होते. शिवाय त्यांजवर करांचें ओझें फार आहे. पन्नास रुपयांची वर्षाची प्राप्ति त्यास दोनशें तीनशें रुपये लग्नास खर्च होतो. मग तें कर्ज फिटावें केव्हां? त्याचें व्याजही रुपया दीडरुपया याप्रमाणें; ह्मणजें महिन्याचे पांच रुपये यांतच गेले. मग शेत विका, घर विका, बडोद्यास रोजगारास जा किंवा मुंबईस मजुरी करण्यास जा; पण त्यांत नशीब असेल तर कांहीं प्राप्त होते. त्यांत कांहीं विपरीत झाले तर अडचण पडते. त्यांत सावकार घेऊं लागला ह्मणजे चांगली कसरीची जमीन असेल ती घेतो. वाईट धन्यास राहते. याप्रमाणें

दहावीस जणाच्या चांगल्या जमिनी हातीं आल्या ह्मणजे वाणी, मारवाडी जहागिदार होऊन बसतात. वाईट जमिनी कुळंब्यापाशीं राहतात त्यांत जें कांहीं पिकेल तें देखील सर्व घरीं राहत नाहीं. त्याजवर वाण्याची नजर असते. खळें घातलें कीं, मारवाड्याचा शिपाई येऊन बसतो. त्याची समजूत करण्यास्तव दहा पांच मण दाणे देऊन बाकी दोन चार मण राहतील ते घरीं ठेवून बायकोस बरोबर किंवा घरीं ठेवून गवताचे भारे किंवा गोवऱ्या विकून पोट भरण्यास सांगून त्यांस मुंबईचे मजुरीवर आठ महिने जावें लागतें. याप्रमाणें मुंबईतील घाटी लोक सर्व बाहेर प्रांतांतून येतात. खर्चवेच जाऊन दहा वीस रुपये घरी आणतात त्याजवर पुनः बैल बीं घेऊन चार महिने शेत करण्याची तयारी करावी, लागते. ज्यास मुंबईतील मजुरी होत नाहीं त्यानें दोन बैल असले तर आठ महिने गाडी फिरवावी, किरकोळ मजुरी करावी, परंतु निर्वाहास कांहीं तरी मिळविलें पाहिजे. वीस पंचवीस बिघे शेत, त्याची खत वगैरे घालून मेहनत केली तर जास्ती पिकेल; परंतु इतकी सबड नाहीं, पोंटाचा तगादा मोठा? तो पहिल्यानें वारला पाहिजे; याकरितां यांतूनही लोकांचा निर्वाह कसा चालतो याविषयीं कलेक्टरखात्यांत चौकशी राहील तर फार चांगलें. पूर्वी जमाबंदी करावी लागत होती; तेव्हां रयतेचा अहवाल तपासावयाचें कारण होतें. जमीनदारास बोलवावयचें कारण होते; परंतु पैमाषी झली त्यापासून या गोष्टींकडे कोणीच लक्ष देत नाहीं. या खात्यांत दरिद्रामुळें कुळंबयांचीं मुलें शाळेंत जात नाहींत. लिहावयास शिकत नाहींत, व जमिनीवर मेहेनत होत नाहीं यांजमुळें पीकही होत नाहीं

महागाईचे वेळीं कर बसले ते सर्व जुलमी आहेत. चार आणे एकराचे जमिनीवर १॥ रु. कर घातला आहे. गुजरार्थेतही सर्व याचप्रमाणे आहे. दक्षिणेंतील चढाचे पैमापीमुळें तेथेंही कर असेच वाढले. आतां कैक ह्मणतील कीं, लोक जमिनी सोडून कां जात नाहींत तर सोडून जावें कोठें ? घरदार घेऊन दुसरे ठिकाणीं जाण्यास बहुत संकटे आहेत. दोन दिवसांचा दाणा शिल्लक नाही. नित्य मजुरी करून तेल मीठ आणावयाचें, तेव्हां बाहेर कोठें जावें ? बाहेर जाण्यास जागा तरी कोठें राहिली आहे ? नेटिव राज्यांतही रयतेवर जुलूम आहे. ह्मणून नवसरी वगैरे प्रांतीं गायकवाडाची जमीन पडीत आहे. मोटस्थळाचा खर्च फार येतों. त्याची खर्चाची बेरीज आणि जमेची बेरीज यास कांहीं ताळा राहिला नाही. स्वस्ताईमुळें पैसा हातीं येत नाही. काहीं केलें तरी किंमतीवर खर्च होतो. कांदे, लसूण, मिर्ची, वांगी, भाजा वगैरे जो कांही धंदा करावा तो आंत येतो. दाण्याचे उत्पन्न बरोबर होत नाहीं. पावसानें अळमटळम, थंडीचे कडके व किडे यांजपासून शेत वांचलें तर राखण करावीं लागते. जमिनीवरील कर वेगळे, शिवाय लोकलफंड, म्युनिसिपल कर, शिवाय स्टांपाचा कर, रस्ते, पुलांच्या दस्तुऱ्या जागोजाग आहेतच. रजिस्टर फी, जंगल फी, मिठाचा कर यांशिवाय शंभर रु, कर्ज घेतलें तर पांच रु. सावकार कापून घेतो. चार आणे लिहिणावळ, आठ आण्यांचा स्टांप, रजिस्टर फी २ रु. असे जातां जातां ९२ रु. हातीं येतात. ते मुद्दल फिटण्याची आशा नकोच; परंतु व्याज भरलें तरी सावकार तृप्त असतो. ते व्याज दहा बारा रुपये द्यावयाचें त्याकरतां पुढले सालचे पिकावर डोळा असतो आणि त्यांत कांहीं विघ्न आले तर मोठी पंचाईत, सरकारचें कर इतके भारी आहेत कीं, सर्व कारखान्यांत खर्च भागून लाखो रु. शिलक पडतात. दरएक कोडतचा खर्च जाऊन शिलक राहते. रजिस्टर खात्यांत खर्च जाऊन शिल्लक राहते. सर्व कारखाने भरपूर आहेत; परंतु शिलक राहतात ते तरी परत देतात असें नाहीं. आतां जर व्याज भरलें नाहीं तर सावकाराच्या मागें मुदतीच्या कागद्याचा तगादा. तो ह्मणतो की, १५० रुपयांचे नवे खत करून दे. नाहीं तर अर्जी करतों. अर्जी केली म्हणजे हुकूमनाम्याचा खर्च रु. २५ मिळून रु. १७५ चा हुकूमनामा होतो. बैल जप्त झाले तर दहा वीस रुपयांस लिलांव होतें आणि दहावीस रु. जाहीरनामा लागून लिलाव होईपर्यंत खर्च लागतो. मोटा वगैरे सामान नाझराकडे पडलें ह्मणजे उंदीर खाऊन वीस रुपयांचे सामानाची पाच

रु. किंमत येते. शिवाय माजिस्त्रेटी कधीं उत्पन्न झाली तर पन्नास रु. दंड येतो. गांवांत जमीन गुरे चारण्यास राहिली नाही. सर्व जमिनीचे लिलाव होतें; यास्तव पडीत जमीनही विकत घ्यावी लागते. जंगलातील लांकडे तोडतां नये. माती, दगड, रेती या सर्वांवर सरकारी कर आहेच. जमींदारलोक रयतेची बहादरी पूर्वी राखीत असत ते आतां कोणी नाहींतसें झालें. सरकारी काम पडलें तर वकील लुटून घेतात गांवखर्च वगैरे सर्व पुज्य घातलें आहे. तीस वर्षे भरत आलीं ह्मणजे आतां कर किती होतो कोण जाणे या काळजींत लोक पडतात याजमुळे जमिनीवर कोणी पैसाही देत नाहीं. शाळेंत मूल गेले तर तेथेंही फी द्यावी लागते. जिकडे तिकडे पैशाशिवाय नाहीं आणि पैसा तर हातीं येत नाहीं; यापेक्षां सरकाराने या दरिद्रावस्थेत एक जिनसी धारा घालून पिकाची वांटणीं करून घेतली तर रयतेस बरें पडेल. तिसरा हिसा पीक सरकारांस दहा आणे कुळंब्यास याप्रमाणें ठरवून काय उत्पन्न होतें ते सरकारास समजेल. पैसा मुलखात फिरत होता तोपर्यंत नक्की जमाबंदी ठीक होती; परंतु आतां पैसा पळाला, तेव्हा पीक होईल तें सरकारी हवालदार येऊन कुळकर्ण्यांचे विद्यमाने हिसा घ्यावा म्हणजे या कामाची पोटफोड होईल. हा देश जेव्हां भिकारी होता तेव्हां ऐन जिनसी जमाबंदी होतो. पुढें कांहीं दिवस बरे आले व इंग्रज सरकारचे योगाने चोरांचा बंदोबस्त झाला व चीनचा व्यापार वगैरे उघडला. रेल्वे व पूल झाले. तेणेकरून रयतेची स्थिती बरी झाली; परंतु आतां लोक परत माघारें पूर्वस्थितींत चालले आहेत. याजकरिता सरकारानें तपास करून त्यांचा बचाव केला पाहिजे.

हिंदुस्थानांत जिकडे तिकडे मोंगलाईचे अखेरीस दंगे होते त्यांमुळें इंग्रज लोकांस राजकारणांत पडावें लागलें. त्यासमयी फ्रेंच, पोर्तुगीज, डच वगैरे लोक हिंदुस्थानांत होते त्या सर्वांस मागे सारून इंग्रज लोक आपले शहाणपणाचे जोरानें पुढें सरले. त्यांचा अंमल जेथें जेथें झाला तेथे प्रथमतः लोकांस सौख्य वाटू लागले व त्यांच्या अमलाचें आवाहन लोक करू लागले. मोठ्या प्रतीचे लोक चिरडून जात, परंतु गरीब रयतलोक सुखी होते. याचें कारण रयतेवर जुलूम कमी करीत, जमिनीवरील सारे कमी करीत, रयतेवर जमिदार लोकांचे वगैरे वेठ व बिगार इत्यादि अनेक जुलूम असत ते बंद होत यामुळे रयतेस बरे वाटलें. पुढें तो मार्ग सुटून कर बसविण्याचें काम जारी झालें. विंगेट साहिबांनीं सरवे केली तोंपर्यंत रयतपरवर्षीवर नजर चांगली राहिली. त्यामुळें इंदापूर वगैरे ओसाड प्रांत वसाहात झाले व लोक आबाद झाले. पुढें सन १८६१ सालापासून पैमाष झाली तींत कर मनस्वी वाढविले. त्याखालीं खानदेश, पंचमहाल, गुजराथ वगैरे देश सांपडले तेथें कापसाचा भाव अमेरिकेचे लढाईमुळें वाढला होता तोपर्यंत लोकांस हा जुलूम समजला नाहीं. कापसाचा भाव उतरल्यापासून ही गोष्ट व्यक्त होऊ लागली. शिवाय बारीक सारीक कर इतके वाढले कीं, लोकांस जशा जळवा लागतात तशा अनेक जळवा लागल्या आहेत. जंगलावर कर, कोडतांतील इनसाफावर कर, म्युनिसिपालिटीस अर्जी करणें तर त्यास स्टांप, माती घेणें तर मामलेदारास आठ आण्यांच्या कागदावर अर्जी करावी तेव्हां माती घ्यावी. शिवाय रस्ते, पूल वगैरेंवर कर आहेतच. मीठ, अफू वगैरे सर्व पदार्थांवर कर पडले आहेत. पूर्वी गांवांत गायरान असे त्यांत गुरे चारण्यास सांपडे, जंगल असे त्यामुळें गरीब लोक लांकडें तोडून त्यांचे भारे विकून त्याजवर पोट भरीत, गुरे राखण्यास हरकत नव्हती त्यामुळे जळण, खत वगैरे पुष्कळ मिळत असे, व गांवचे लोक सुखी असत. धारा थोडा त्याजमुळे कसर पडत असे. कोणास गरीबी आली तर खेड्यापाड्यास जाऊन रहात, म्हणजे थोड्यांत निर्वाह होऊन थोड्या खर्चात सुखवस्तु राहात असत. आतां करांचे उपद्रवामुळे सर्व सोई बुडाल्या. गांवचा पाटील असे त्याचे वतन मोठें, असे. महादजी शिंदे यांसारखे मोठे पराक्रमी असत त्यांसही पाटीलकी मिळविण्याची इच्छा असे. याचे कारण पाटिलाचे मानपान व रयतेवर धनीपणा असे तेणेंकरून पाटील आपले गांवांत राजा असे. तसेच खोत व जमेदार लोक सुखी होते. जितक्या जुलमी वहिवाटी बंद

केल्या तितक्यांपासून लोकांस सुख आहे; परंतु इनामजप्त्या व देवस्थानजप्त्या व जमिनीचे वगैरे धाऱ्यांचा चढ यांमुळे हल्ली लोक इतके त्रासले आहेत कीं, बडेलोक आपली सत्ता व अधिकार गेल्यामुळे रडतात व रयत कारभारानें रडतात. मिळून दोन्ही प्रतीचे लोक दुःखी झाले आहेत हे फार वाईट आहे. बरे, इतकेही दुःख पडून सरकारास कर्ज भारी आहेच. शंभर कोट रू. देणे आहे. याचे कारण हें कीं, जसा करभागाचा ताळमेळ राहिला नाहीं त्याचप्रमाणे खर्चाचाही ताळमेळ नाही. पहा सोजिरांचीं पलटणें व बाकी सर्व नेटिव फौज थोड्या खर्चात ठेवून सर्व हिंदुस्थान काबीज केले. आतां त्या फौजवर भरंवसा नाहीं याजमुळे युरोपियन फौज ऐशी हजारपर्यंत वाढविली आहे. त्यातील धोरण लोक म्हणतात कीं, विलायतच्या राज्याच्या उपयोगी पडेल म्हणून मोठी फौज ठेवून हिंदुस्थानाच्या नांवे खर्च लिहितात. बाह्यात्कारी दाखविण्याचा पर्याय वेगळा व आंतील मतलब वेगळा आहे. लोक जंगले तोडून नाहींशीं करतील म्हणून अरण्यसंरक्षक खाते काढिले; परंतु त्याचा मतलब मुफत लोक खात होते ते आपल्यास मिळावे. लोक भांडखोर, त्यांजवर खर्चाचा धाक असावा म्हणून स्टांप कायदा केला असे बाहेर दाखवितात; परंतु आंत पैसा काढण्याचा मतलब. अशी अशी अनेक प्रकारची धुपणी रयतेस लागली आहे. इनामदार व जहागिरदार यांजवर कर्डी नजर. ते त्रास पावतात. मामलेदारापासून वरिष्ठ सरकारापर्यंत ते डोळ्यांत खुपतात आणि त्यांची अमर्यादा व अपमान होईल तितका करितात. अनेक खर्च विलायतेच्या उपयोगी ते हिंदुस्थानावर लोटले आहेत. पैशाचे कामी नेटिव लोकांशीं टंचाई व युरोपियन लोकांशी इंग्रजलोकांचे हितांकरितां पाहिजे ती नेमणूक कबूल विलायतेच्या व्यापाराकरितां सर्व सोय. अशा धोरणाने हिकडील रयत निष्कांचन झाली. ही स्थिति फार दिवस निभावयाची नाहीं. रयतेस सुखी करून विलायतेहून एक पैसाही न आणितां येथे एवढे राज्य उभे झाले. मोठ्या मोठ्या मसलती, पेंढारी लोकांचे दंगे, सर्व मराठ्यांचे राज्य, टिपू सुलतानाचे राज्य, येथील जमेने घेतले. तीच जमा आतां नित्याचे खर्चास पुरत नाहीं नेहमी बजेट करतां करतां तूट येते. याचे कारण नेटिव लोकांवर भरवसा नाहीं. पोटांतील आणखी मतलबाकरिता म्हणा विलायती फौज वाढविली तसेच दुसरे खर्च वाढविले. दिवाळखोर सरदारांचा धूर्त कारभारी जसा संसार पाहतो तसें इंग्रजसरकार या देशाचे राज्य चालवीत आहे. या गरीब रयतेचा बोलणारा पार्लिमेंट वगैरे ठिकाणी नाही, कौंसलांत नाहीं, जिल्ह्यांतील अधिकारी नाही. जसे या रयतलोकांस वागवावे तसे ते वागतात. म्युनिसिपालिटी यःकश्चित काम. ते तरी लोकांचे हातीं यावे कीं नाहीं ? परंतु त्यांतही कलेक्टर साहेब आहेतच व त्यांचे धोरणाने सर्व काम चालणार. नांवाचे कमिशनरांस पुसतो कोण ? याप्रमाणे सर्व व्यवस्था आहे. सर्व अधिकार व सर्व पैसा आपले जवळ. रयतेस कांहीं सत्ता नाहीं याजमुळे त्यांत हिताहित पाहतां येत नाहीं. मलिकंबर तोडरमल व विंगेट यांचा मार्ग सोडणारे रेविन्यूसर्वेवाले यांणीं सर्व देश जरजर केलां, तेव्हां याविषयीं कांहीं विचार सरकारानें करावा हें योग्य आहे. जमीन नांगरून किमानपक्षीं पोट भरणें आहे. जमीन नांगरून किमानपक्षीं पोट भरणें इतके तरी लोकांस उपजीविकेकरितां पाहिजे. सर्व नागवणुक झाली तर चालेल कसें ?

———

# निबंध ५ वा

## उद्दीम कसा चालतो त्याची माहिती

गुजराथ देशांत पूर्वापार कापूस फार पिकतो त्याच्या जाति-कानमी, रोजी, बागड, नरमा, व लाळिया. यांमध्यें फरक इतकाच कीं, कानमी भडोच जिल्ह्यांत होतो. त्याचें झाड लहान, व तो दर वर्षास पेरावा लागतो. हा कापूस चांगला असतो. दुसरा चार वर्षांनीं पेरावा लागतो. तो एकदां पेरला ह्मणजे त्याचें झाड कमरेइतकें होतें. त्याजवरील कापूस घेऊन तें दरसाल खची करावें ह्मणजे नवी फूट येऊन, त्याजवर कापूस येतो. तिसरा बागड हा कापूस मध्यम असतो. चौथा नरमा हा फार उंची. त्याची बी लांब व दहा वीस बिया एकत्र झालेल्या असतात. त्यास दक्षिण-प्रांतीं देवकापूस ह्मणतात. त्याचें झाड दहा पंधरा वर्षे राहतें व दरसाल फुलतें. पांचवा जो आहे त्यास बोंड येतें तें वरती फुटत नाहीं. तें तसेंच काढून घेऊन फोडावें लागतें. जो कापूस नरम व ज्याची तांत लांब असते तो उंची. त्याचे सूतही बारीक निघतें. गुजराथेंत कापड विणणाऱ्या पुरातन लोकांच्या जाति बहुत आहेत. धेड लोक जाडी भरड्या कापसाचें कापड काढतात. धेडांचा मुख्य धंदा हाच आहे. कुळंबी लोकांस नेसण्यायोग्य जाडे धोतरजोडे तेच करितात. दुसरे मुसलमान ताई लोक हे पागोटीं, शेले, साड्या व धोतरजोडे विणतात. तिसरे, खातरी लोक यांचाही धंदा तोच आहे. शिवाय कुणबी वगैरे विणण्याचें कसब शिकतात. त्यांत किनखाप, गजनी, मश्रू, तोय इत्यादि परोपरीचे कांठ व तऱ्हेतऱ्हेचें बुट्टीचें बेलदार वगैरे रेशमी सामान व कलाबतूनें मिश्र विणण्याचें कसब गुजराथेंतच फार आहे. किनखाप शंभर रु. गजास पडतात इतका उंचा विणणारे आहेत.

गुजराथेंत स्वदेशीय सूत तीन प्रकारचे निघतें. रेटिया, नरमा व गोडियू. याचा दर एका रतलास म्हणजे दक्षिणचा अधाशेर अथवा गुजराथचा ४० रुपये भार शेर याची किंमत.–

१. रेटियाचें सूत बायका राहाटावर हातानें काढतात. एक रतल काढण्यास तीन दिवस लागतात. त्याची मजुरी हल्लीं ४ पैसे मिळते. हें सूत विलायती १० नंबरच्या सुताबरोबर आहे.

एक रुपयाचा कापूस १२ शेर बियांसुद्धां मिळतो. त्याची बी काढण्यास मजुरी सहा पैसे पडते ह्मणजे त्यांतून रू ह्मणजे बीशिवाय कापूस ४ शेर निघतो व आठशेर बिया निघतात. त्या बियाचा भाव बाराआणे मण आहे. त्या ढाशीस खाण्यास फार उत्तम आहेत, याजकरितां त्या बिया दिल्या तर पैसे द्यावयास नकोत. आतां हें काम हातराहाटावर बाया करितात. बीं निघाल्यावर तो रू पिंजाऱ्याजवळ द्यावा लागतो. त्याचे तो कांकडे करून देतो. त्याजबद्दल दोन आणे मजुरी किंवा अर्धशेर रू द्यावा लागतो ह्मणजे तो ३॥ शेर कांकडे वजन करून देतो. त्या कांकड्यांस पुणिया ह्मणतात. या पुणिया सूत काढणाऱ्यानें घेऊन त्याचें सूत पंधरा दिवस मेहेनत केली तर तयार होतें. त्यांत कांहीं घट पडून नुकसान होतें सबब ३। शेर सूत होतें त्याची किंमत १। रू ०. दर २॥ शेर प्रमाणें आहे याप्रमाणें झाली; तेव्हां सुमारें चार आणे मजुरी पंधरा दिवसांत मिळाली. तें सूत धेड वगैरे लोक खरेदी करितात.

२. दुसरा प्रकार, नरमा हें सूत बारीक विलायती नंबर ४० प्रमाणें आहे. यास शेरास १। रु० पडतो. हे सूत गजनींत अर्धे रेशीम व अर्धे सूत भरावें लागते त्यांत घालतात.

३. गोडियु सूत हें शंभर नंबराबरोबर असतें. याचा व्यापार हल्लीं बुडाला आहे; परंतु हे सूत पाहण्यांत येतें. हे माळव्याकडून येते.

हल्लीं विलायती सूत येतें त्याचे प्रकार व किंमत :–

नंबर १० ह्मणजे एक रत्तल वजनाचे पुडक्यांत १० गुंड्या असतात म्हणून यास दहा
नंबर म्हणतात – दर रतलास किंमत ·।= (६ आणे)

नंबर १६ यांत १६ गुंड्या एक रतलांत असतात—

दर रतलास किंमत ।=॥· (·६॥ आणे)

नंबर २० यांत २० गुंड्या असतात— किं ·॥· (८ आणे)

नंबर ३० यांत ३० गुंड्या— दर ·।॥· (१२ आणे)

नंबर ४० यांत ४० गुंड्या— दर रु. १ (१ रु.)

नंबर ५० यांत ५० गुंड्या, दर १~= (१ रु. २ आणे)

नंबर ६० सदहू प्रमाणें— दर १।=॥ (१ रु. ६॥ आणे)

नंबर ७० सदहू प्रमाणे— दर १॥।= (१ रु. १४ आणे)

नंबर ८० सदहू प्रमाणे— दर २~= (२ रु. दोन आणे)

नंबर १०० सदहू प्रमाणे—दर रु. ३ (३ रु.)

विणण्याच्या कामांत उभें सूत हलकें व आडवें सूत उंचें असतें त्यास बाणा व ताणा ह्मणतात. सूत खरेदी केलें ह्मणजे त्याचा बाणा व ताणा करण्यास द्यावें लागतें. हें काम धेड करितात व ते त्याची गुंडी उपयोगी पडे अशी करून देतात. हा संस्कार झाल्यावर पानार यांजकडे तें सूत द्यावें लागतें. तो त्यास खळ देऊन तयार करितो. नंतर फणी बांधणाराकडून फणी घेऊन ते राजभरा याजवळ देऊन तो तें सूत फणीवर चढवून देतो. असे कांठ व नकशी काढायाची असेल त्याप्रमाणें रेशीम व सूत याची योजना तो करितो. ती फणी सुतासहित विणणारापाशीं द्यावी ह्मणजे तो आपल्या मागावर ती फणी चढवून विणण्यास आरंभ करितो, ह्मणजे कापड तयार होतें. गोमी कांठ, रूईफूल, बकुळी, साधे, लकीरदार वगैरे करण्याकरितां हे योजना करणारे करागीर घनपाठीबुवांसारखे स्मरणशक्तिमान व तर्कवान असतात. ते फणीवर जशी योजना करतील त्याप्रमाणें तो प्रकार विणून निघेल. साड्या करणें असल्यास सूत रंगवावें लागतें व त्यापासून पोफळी, चंद्रकळा, रास्ता वगैरे हजारो तऱ्हा उत्पन्न होतात व हें काम करणारे सावकार हे बहुत बुद्धिमान असतात. कारागिरांजवळ मसाला किती द्यावा रेशीम किती, सूत किती व कलाबतू किती याचें गणित त्यांजवळ इतकें चांगलें असतें कीं, एक सूत व्यर्थ जाऊं देत नाहीत. कापड पाहतांच ते सांगतात कीं, यांत अमुक विसा सूत व अमुक विसा रेशीम आहे. त्यांत घट वजा करण्याचे प्रकार व दर प्रकारच्या मजुरीचें मान वेगळें आहे तें त्यांस सर्व अवगत असतें. तें दृढ अभ्यासानें होतें. त्यांत समजूत नसल्यास समजदार गुमस्ते ठेवावे लागतात तर तें काम चालतें.

बाण्याचें सूत हलकें व ताण्याचें सूत उंचें. त्यांत दोन आण्यांचा फरक असतो. हें विलायती सूत इकडे आल्यापासून देशी सुताची राळ झाली व दोन पैसे मजूरी दिवसास पडूं लागली. यंत्राबरोबर हाताची मेहेनत होत नाहीं. यंत्राचें सूत सस्तें पडतें. आणादोनआण्यांचा फरक पडला ह्मणजे व्यापारी लोक तिकडे धांवतात. देशी सुतास कोणी विचारीत नाहीं. हल्ली विणकराजवळ कोठें देशी सूत येत नाहीं. सर्व विलायती सुतावर कारभार चालतो. फक्त खाद्या व जाडे धोतरजोडे व दाणे व तंबाखू बांधण्याचे भोत करण्यास मात्र देशी सूत घेतात. तेंही जुलमानें दोन पैसे मजुरी पतकरून विकील त्यास मात्र. याजकरितां रिकाम्या बायका वगैरे अद्यापि सूत काढतात; परंतु त्यांची मजुरी अगदीं कमी झाली.

हल्लीं जीं सुताची यंत्रें हिंदुस्थानांत चालू झाली आहेत त्यांत १०।१६।२० व ३० पर्यंत सूत निघते. जास्ती नंबराचें निघत नाहीं; कारण हिंदुस्थानांत उंचो कापूस हल्लीं कोणी करीत नाहीं. नरमा कापसाचें मोठें झाड होतें व त्याखालीं दाणा पेरण्यात सांपडत नाहीं. याजकरितां नरमा कोणी पेरीत नाहीं. बाकी कापसाचें सूत ३० नंबरावरील प्रतीचें होऊं शकत नाहीं. यास्तव या देशांतील यंत्रांवर मिसर व अमेरिका देशाहून कापूस आणला तर मात्र उंचें सूत निघेल. तो येथें

न यावा यास्तव त्याजवर जकात घातली आहे. येथील यंत्रांनीं ३० नंबर पर्यंतचा रोजगार विलायतेचा होता तो तोडीत आणला; परंतु उंची सुताचा रोजगार विलायतचा कायम आहे. त्यांत बाध न यावा ह्मणून उंचा कापूस इकडे येण्याची बंदी करण्याचें कारण आहे. दर सुताच्या यंत्रांत १५०० पासून पंचवीस हजार पर्यंत चाती असते. एकंदर हिंदुस्थानांत जीं यंत्रें आहेत त्यांच्या चात्यांचा अदमास दहा लक्ष आहे. इतक्या चात्यांचें सूत येथें निघतें; परंतु विलायतेस एकंदर चात्या ४ कोट ह्मणजे चाळीसपट अधिक आहेत; रूस देशांत २१ लक्ष; स्वीडन देशांत ३ लक्ष; आस्त्रिया देशांत १६ लाख; जर्मनींत ५१ लाख; फ्रांसांत ५२ लाख; इतालींत ७ लाख; स्पेन देशांत १'५ लाख; स्वीजरलंडांत २१ लाख व हालंड देशांत २॥ लाख, आहेत. याजवरून इंग्लंड देशाचा व्यापार किती मोठा आहे तें समजेल.

एकंदर सुताचे गठ्ठे खपतात त्यांचा तपशील : –

१. विलायतेंत. ........... ३१ लाख.
२. युरोपखंडांत. ........... २२ लाख.
३. अमेरिकेंत. ........... ११ लाख.

हिंदुस्थानांत कापड एक लाख गांसडी यंत्रानें निघतें व देशी विणकरीच्या ५ लाख गांसड्या होतात. एकंदर हिंदुस्थानांत कापड लागतें ते रतल ४४ कोट; पैकीं यंत्रांनीं निघतें ४ कोट. विलायतेहून येतें २० कोट व मागांवर देशांत निघतें २० कोट रतल. हें विलायती सूत घेऊन येथें सर्व कापड विणलें जातें त्याची बेरीज फार आहे; परंतु सूत सर्व विलायती, देशी सूत अगदीं बुडालें आहे तेणें करून विकण्यांत कांहीं नफा नाहीं, तेव्हां यास तोड इतकीच कीं, आणखी यंत्रें इकडे ठेवून व उंचा कापूस येऊन उंचें कापड निघून विलायतीपेक्षां सस्तें विकलें तर अर्थातच लोक तें घेतील. तसें न झालें तर सर्व लोकांनीं विलायती न घेण्याचा नियम केला पाहिजे. जाडी भरडें जसें मिळेल तसें स्वदेशीय कापड घ्यावें. जसें जातिधर्मामुळें परक्यानें केलेलें अन्न कोणी खात नाहीं. तसेंच परदेशीय वस्त्र व सूत धर्म समजून टाकलें तर चालेल; परंतु असें होणें कठीण. उंचेपणा व सस्ताई यांस लोक भुलल्याखेरीज कधींही राहणार नाहींत खाण्याचा रिवाज पूर्वापार पडला आहे ह्मणून चालत आहे; परंतु तोही बहुतकरून सुटत चालला आहे.

जसें सदरीं लिहिल्याप्रमाणें सूत काढण्याचे मजुरीचा ऱ्हास झाला त्याच प्रमाणें लोखंड काढणारी जात धावड ह्मणून स्वतंत्र आहे; परंतु ते लोक हा धंदा करीत नाहींत. ते मोलमजुरी करितात; कारण कीं, लोखंडाचे दगड आणून त्यांस देशांतील रिवाजाप्रमाणें भटींत घालून कुटावें लागतें व पुन्हा भटींत घालावें लागतें. याप्रमाणें सात भट्या कराव्या तेव्हां निर्मळ लोखंड हातीं येतें. त्याचे तवे कुऱ्हाडी वगैरे पदार्थ करितात; पण धावडी तव्यास किंमत १ रुपया पडते; पण तो तीन पिढ्या चालतो; कारण कीं, तो बोटभर जाडी असतो; परंतु पत्र्याचा तवा गहूभर जाडी असतो आणि तो दोन आण्यांस मिळतो दोन तीन वर्षे चालतो; परंतु सस्ता व हलका मिळतो तोच लोक घेतात याजमुळें धावडास मजुरी सर्व दिवसभर लोखंड कुटून दोन पैसेही मिळण्याची पंचाईत व विलायती लोखंड रुपयाचें मणभर उत्तम प्रकारचें मिळतें, याजकरितां त्याशीं धावडाच्यानें सरशी करवत नाहीं. याजकरितां माभळेश्वर वगैरे ठिकाणीं धावडांच्या वस्त्या होत्या त्या नाहींशा झाल्या.

सदरहूप्रमाणें कागद करणाऱ्यांची अवस्था झाली आहे. दोन तीन पैसे देखील त्यांत मजुरी मिळत नाहीं.

याचप्रमाणें शेतकरी शेताचा धनी ह्मणून अभिमानानें सर्व दिवस मेहेनत करितो. पण त्यास डोईस दोन पैसे मजुरी पडते. अधिक पडत नाहीं. मग शेतवाडींतून दुसरी मजुरी किंवा कर्ज काढून प्रपंच चालवावा. कर्ज फार झालें ह्मणजे तो गांव व वाडी टाकून दुसरे ठिकाणीं जावें. कर्जाच्या मुदती गेल्या ह्मणजे परत यावें. असेंही कितीएक करतात. शेतावर कर फार झाले व

सोई बुडाल्या, गुरांस सोय नाहीं, पाण्याची सोय नाहीं, जंगलाची सोय नाहीं, सर्व सोई, पैशाच्या झाल्या, याजकरितां शेतकीचा कस गेला आणि शेतकरी अत्यंत भिकारी झाले व कर्जभरी झाले. श्रीमंतांनीं शेतकी केली तरी त्यांस घरचा पैसा घालून करावी लागते. याप्रमाणें उदीम हल्लींच्या काळांत आहे, तेव्हां करावें काय हें कोणास सुचत नाहीं.

---

## निबंध ६ वा

हिंदुस्थानांत दारिद्र्य शिरलें कीं नाहीं याचा विचार करण्यामध्यें दोन पक्ष आहेत. एका पक्षाचें म्हणणे असें आहे कीं, हिंदुस्थानांत लक्ष्मी वाढत आहे. या पक्षांत इंग्रज सरकारचे मोठाले अधिकारी ज्यांजकडे हिंदुस्थानांतील राज्यकारभार आहे ते मुख्यत्वेंकरून आहेत. त्यांची मुख्य तकरार इतकीच कीं, हिंदुस्थानांत स्वस्थता नव्हती आणि जाण्यायेण्याची सोय नव्हती ती इंग्रज सरकारानें करून दिली. त्याचें फळ असें आहे कीं, लोकांचा उद्योग आणि व्यापार वाढला याजमुळें महागाई झाली आहे. दुसऱ्या पक्षाचे लोक ह्मणजे हिंदुस्थानचे नेटिव लोक यांचे ह्मणणे असें आहे कीं, हिंदुस्थानात दारिद्र्य वाढत चाललें, मनुष्यांस उद्योग धंदा नाहीं आणि रेलवे सडका वगैरे झाल्या तरी द्रव्य नाहींसें होत चाललें. आतां या दोन पक्षांच्या बोलण्याचा विचार केला तर असें दिसतें कीं, हल्लीं हिंदुस्थानांतून रोकड पैसा विलायतेंत जातो त्याची दर सालची बेरीज:—

| | कोटी. |
|---|---|
| विलायतेंतील खर्चाबद्दल दरसाल हुंड्या रवाना होतात ... ... ... | १३ |
| रेलवे कंपन्या आठ नऊ या देशांत आहेत त्यांणीं जो पैसा खर्च केला आहे त्याचें व्याज सरकार भरते आणि त्याचे घेणारे बहुतकरून विलायतेतील लोक आहेत ... | ५ |
| हिंदुस्थान सरकारास शंभर कोट कर्ज आहे त्याचें व्याज घेणारे बहुतकरून विलातेंयतील लोकच आहेत ... ... ... ... ... | ४ |
| चाकरलोक व सावकार ज्या नफ्याच्या रकमा विलायतेस पाठवितात त्यांची अजमासानें बेरीज. ... ... ... ... ... ... | ४ |

एकूण सव्वीस कोटी रुपये, हिंदुस्थानचें निव्वळ उत्पन्न पन्नास कोट रु. आहे त्यापैकीं दरसाल परभारें रवाना होतात. याजमुळें पैशाची घट फार पडली आहे. परदेशस्थांचें राज्य या देशांत आहे त्याजबद्दल हिंदुस्थानांतील लोकांस ही किंमत देणें पडते.

दुसरें कारण विलायत वगैरे देशांतून ३५ कोट रुपयांचा माल दरसाल हिंदुस्थानांत खरेदी होऊन येतो. कापड व सूत मिळून पंधरा कोटि रुपयांचें येतें. तशाच तांबें, पितळ, लोखंड वगैरे सर्व धातु दहा कोट रुपयांच्या येतात. फक्त कागद अर्धकोट रुपयांचे येतात व कांचेचे जिनस मिळून पस्तीस कोट रुपयांची बेरीज होते याजमुळें या देशांतील लोकांचा उद्योग बुडाला. कापड काढणारे व सूत काढणारे व कागदाचे कारखानेवाले आणि कोष्टी, साळी वगैरे मंडळी भिकेस लागली.

शेती करणारे लोक लंगोटी व घोंगडी यांवर निर्वाह करितात; परंतु शेती न करणाऱ्या लोकांस अन्नाचीही भ्रांति आहे. एकंदर जे लोक या देशांत आहेत त्यांत शेती करणारे शेंकडा ३८ आणि शेती न करणारे शेंकडा ६२ याप्रमाणें हिशोब पडतो. यास उदाहरण:—

| | |
|---|---|
| अमदाबाद जिल्ह्यांत लोकसंख्या ... ... | ८,२९,६३७ |
| वजा मुलें व बायका मिळून ... ... | ४,५३,५९२ |
| बाकी ... ... ... ... ... | ३,७६,०४५ |

तपशील.

| | |
|---|---|
| शेती करणारे ... ... ... ... | १,३०,७६१ |
| दुसऱ्या धंद्याचे ... ... ... ... | २,४५,२८४ |

याजवरून ३८/६२ याप्रमाणें हिसेरशी पडते.

इंग्रजसरकारचें राज्य दुसऱ्या देशांत आहे त्यांत बाहेरचा माल खरेदी होतो त्याची दरमाणसास सरासरी किती व हिंदुस्थानांत सरासरी किती याचा हिशोब येतो असा

| | रु. |
|---|---|
| विलायतेंत दर माणशीं बाहेरचा माल. ... ... ... | ६५ |
| कानडा अमेरिकेंत ... ... ... ... ... | ३० |
| आस्ट्रेलिया ... ... ... ... ... | ११० |
| हिंदुस्थान ... ... ... ... ... | २॥ |

याजवरून हिंदुलोक किती भिकारी आहेत तें दृष्टीस पडतें. आतां हिंदुलोक बुद्धीनें कोते आहेत असें नाहीं; परंतु दुसऱ्या देशांत हुन्नर वाढलें त्याजमुळें हिंदुस्थानाची पायमल्ली झाली. यास फार दिवस लागले असें नाहीं; परंतु आलीकडे १०० वर्षांत हा गोंधळ झाला आहे. आज दोन हजार वर्षांपासून या देशांतून मालाची रवानगी बाहेर होत होती आणि बाहेरचे कोट्यावधि रु. या देशांत येत होते याजमुळें येथें चंगळ होत होती व हिंदुस्थानच्या द्रव्याचा लौकिक सर्व जगांत पसरला होता. "ओरियन" ह्मणून इसवी शकाच्या दुसऱ्या शतकांत एक मुशाफिर या देशांत आला होता तो असें लिहितो कीं, भडोच व मछलीपट्टण वगैरे ठिकाणीं कापड खरेदी होऊन बंदराबंदरांनीं युरोपखंडांत जात आहे व याप्रमाणें आणखीही बहुत साक्षी आहेत. हिंदुस्थानांत मुळीं पुर्तकाली व लंडनी इंग्रजी लोक यांच्या कंपन्या आल्या त्या बंदराबंदरांवर कोठ्या बांधून कापड खरेदी करीत. दलाल लोकांना बोलावून आगाऊ विसार देऊन हल्लीं कापूस खरेदी करितात त्या प्रमाणें कापड खरेदी करीत आणि युरोपांत पाठवीत. डिफोज वुइक रिव्ह्यु जानेवारी १७०८ यांत असें लिहिलें आहे कीं, इंग्रज कंपनी फक्त ढाक्यास ८० लाख रुपयांचें कापड घेत असे. शांतिपुर येथे १५ लाख रुपयांची खरेदी होती. तशीच इतर कोठ्यांतून व वखारींतून खरेदी होत असे आणि दहा पंधरा कोटींचा माल कापड व सूत रवाना होत असे. असें होतां होतां विलायतेंत ग्लासगो व एडिंबरो शहरांत कितीएक स्वदेशाभिमानी लोक होते त्यांणी १७७३ साली असा ठराव केला की, हिंदुस्थानचें कापड आपण कोणी घेऊं नये, जो घेईल त्याशीं स्त्री अथवा पुरुष कोणीही असो, संसर्ग करूं नये. सरकारास या मंडळयांनी अर्ज करून कायदे करविले कीं हिंदुस्थानच्या मालावर जास्ती कर घालवा. अशी गडबड लोकांमध्ये झाली तेव्हां डाक्टर आर्क राईट वगैरे लोक होते त्यांणीं आपल्या देशांत कापड होईल कीं नाहीं याचा प्रयत्न चालविला, आणि मोठालीं संकटें भोगलीं व आपला कामधंदा सोडून या शोधास लागले. त्यांणीं सूत काढण्याची युक्ति सिद्ध केली, त्यांपैकी सन १८१५ ह्या सालीं विलायतेहून आठ शेर सूत हिंदुस्थानांत विकण्यास पाठविलें होतें असें डाक्टर यूरच्या कापसाच्या व सुताच्या इतिहासांत लिहिलें आहे. याजवरून पाहतां आज ५८ वर्षांत यंत्रवृद्धीनें किती फेरफार झाला हें लक्षांत येईल; पंधरा रुपयांचे सूत १८१५ त आले त्या ठिकाणीं हल्ली १५ कोट रुपयांचें येतें. हें सर्व कशानें झालें तर स्टीम एंजिन्स (सुताचीं व कापडाचीं यंत्रें), लोखंड व कोळसे यांणीं केलें. सर्व हिंदुस्थानची मजूरी विलायतेस गेली. विलायतेंत एक लक्ष बाइलर आहेत. बाइलर ह्मणजे वाफेचीं यंत्रें. त्यांचा विचार पाहतां कांहीं लहान मोठीं आहेत; परंतु सरासरी एक यंत्र ४० घोड्यांच्या जोराचें असतें, आणि एक घोड्याचा जोर ह्मणजे आठ माणसें होतात, तेव्हां चाळीस लाख घोडे ह्मणजे तीन कोटि वीस लक्ष माणसें झाली; तेव्हां हीं यंत्रें फिरतात याजमुळें इतकी माणसें रात्र दिवस काम करीत आहेत असें झालें. माणसें काम करताना थकतात; पण वाफेचीं यंत्रें थकत नाहींत; सर्वकाल काम करितात. माणसांत मजूरी चार

आणे, आठ आणे व रुपयापर्यंत दररोज जसें कसब असेल त्याप्रमाणें दिली पाहिजे. परंतु वाफेच्या यंत्रांस फक्त जळण मात्र द्यावें लागतें त्याचा हिशोब दर माणशीं एक पैसा पडतो; तीन कोट वीस लाख मनुष्यें एक पैशाच्या मजुरीनें कामें करितात तेव्हा संपत्ति वाढेल यांत आश्चर्य नाहीं. आणि त्या देशानें कापड व सूत सर्व पृथ्वीस आच्छादन करील यांतही नवल नाहीं. या सर्व हकीकती-वरून असा सिद्धांत होतो कीं, परदेशचे हुन्नराची चढाई या देशावर झाली आहे तशी पूर्वी कधींच झाली नव्हती. पूर्वी शिकंदर, महंमद गिझनी, तेमूर, अबदूल अल्ली व नादिरशाह इत्यादि-कांची चढाई झाली होती त्यापेक्षा ही तीन कोट माणसांची चढाई झाली, याजमुळे आपण अगदीं भिकारी होऊन लुटले गेलों. दिवसेंदिवस शिकणें पुष्कळ होत चाललें; परंतु उद्योग धंद्याच्या नांवें पूज्य पडलें याजमुळें सरकारचाकरी काय ती मोठी अशी दशा झाली आहे. याजकरितां आतां जे विद्वान् व विचारी लोक असतील त्यांणीं यंत्रज्ञान वाढवून वाफेचीं यंत्रें जितकीं आणवतील तितकीं या देशांत आणून टाकलीं पाहिजेत व कृतीचे किंवा खाणीचे कोळसे येथेंच काढले पाहिजेत. येथें जंगलें बहुत आहेत त्यांतून लांकडाचे कोळसेही करितां येतील. तसेंच धातूच्या खाणीचे शोध केले पाहिजेत. मि. ओल्डाम ह्मणून सरकारनें जिओलाजिकल सर्वेयर नेमिला आहे; परंतु ही सर्वे कोठें आहे व काय झालें त्याचा ठिकाण नाहीं. मेजर फुल जेम्स पूर्वी रेवाकाठ्यांत पोलिटिकल एजंट होते त्यांणीं पंचमहालावर रिपोर्ट केला आहे त्यांत बहुत ठिकाणीं लोखंड व सोनें व कोळसे सांपड-तील असें लिहिलें आहे; परंतु त्याचा पुढें तपास कोणी केला नाहीं. पंचमहाल हल्लीं इंग्रज सरकारांत वीस वर्षांपासून आहे; परंतु हा शोध वाढला नाहीं. माळव्यांत बढवाईस व दक्षिणेंत महाबळेश्वर व ग्वालेरीजवळ नरवर वगैरे ठिकाणीं लोखंडाच्या खाणी होत्या त्या बंद पडल्या. कारण कीं तेथील लोखंड करणारे लोक धवड वगैरे विलायती मालाबरोबर लोखंड स्वस्त विकू शकत नाहींत व त्यांस कारखाने सुधारण्याची शक्ती नाहीं व कोणीं मदत करीतही नाहीं याचप्रमाणे कापडवंज येथील काचेची अवस्था आहे. पूर्वीपेक्षा हजारपट अधिक कागदाचा खप हल्लीं आहे. छापखाने वगैरे कागद फार खातात; परंतु हा सर्व पैसा विलायतचे लोक नेतात. हल्लीं दोन तीन प्रकारचें लोखंड विलायतेहून येतें त्यांत बीड, रुपाशाई व सकई असे प्रकार आहेत. त्यांत उंच प्रकारचें लोखंड लाकडाच्या कोळशानें होत असतें. खाणीच्या कोळशाचें लोखंड नीच होतें. तेव्हां येथील जंगलांत कोळसे पाडले तर उंच जातीचें लोखंड होईल. तसेंच लाखो रुपयांची साखर देशावरची येते आणि येथें ऊस पुष्कळ पिकतो; परंतु हुन्नर नाहीं याजमुळें परदेशांत पैसा जातो. तसेंच रेशीम व उंच प्रतीचा कापूस उत्पन्न केला तर बाहेरचा व्यवसाय नको. त्यापासून पैसा येथें राहील व मेहनत मजूरी या देशाच्या माणसांस मिळेल. येथील राजे वगैरे गाढ निद्रेंत आहेत त्यांस या चढाईची खबर अद्यापि लागली नाहीं ग्वालेर, इंदूर, व बडोदें येथें वर्षास वीस लाख रुपये धर्मादाय आहे; परंतु घनपाटी आले त्यांणीं हजार रुपये नेले, जठापाठी आले त्यांनी ५०० नेले याप्रमाणे बक्षिसें, बिदाग्या व दक्षिणा वाटतात; परंतु नारळी कांठी, आस्वली पदरी, माइफूल काठी जो विणतो त्यास कोणी पैसाही देत नाही. त्याचें देणें असेल त्यांत उलटें कमी करितात. नवें हुन्नर काढणारास कांहीं मिळत नाहीं. वास्तविक पाहिलें तर देशास हितकारक घनापाठी बुवा कीं, साखर करण्याचा हुन्नर करणारा व कोणास बक्षिसें द्यावी? पूर्वी लाखो फौज घेऊन होळकर, शिंदे, गाइकवाड युद्धास व लुटावयास निघत; परंतु हल्लीं त्यांणीं या चढाईवर हल्ला केला तर कांहीं हरकत नाहीं आपले खासगीचे दागिणे विकून फौज उभी करीत तसें आज सर्व जवाहीर विकून वाफेची यंत्रें आपल्या महालोमहालीं घालतील तर देशाचें मोठें कल्याण व त्यांचे वडील फौजा घेऊन नाश करीत होते त्यापेक्षा हल्लींच्या त्यांच्या वशाचा अधिक प्रताप व कीर्ति होईल. हल्लींच्या यंत्राच्या चढाईवर हल्ला करणें हे साधारण काम नाहीं आणि हें सिद्धीस गेलें तर पंचवीस वर्षांत बहुत फेरफार होईल. या कामांत सरकारची फारशी आशा धरू नये; कारण सरकारच्या मनांत

विलायतेचा व्यापार व बाजार गरम राखावा असें आहे. तेथील तेजी कमी होऊं नये ह्मणून जितकी त्यास मदत होईल तितकी करतात. एक बंगला बांधणें तरी लोखंडी सामान विलायतेहून आणून बांधतात. तिकडे पैसा जाईल तितकें बरें; परंतु हा सरकारचा विचार आहे तो अल्पदृष्टीचा आहे. कारण कीं जरी हिंदुस्थानांतील लोकांचें द्रव्य हरण केलें तरी एशिया, अमेरिका वगैरे देशांत यंत्रज्ञान बहुत वसत आहे व हल्लीं अमेरिकेंतील लोक कापूस व लोखंड विकून कोट्यावधि रु. विलायतेंतून नेतात त्यांस हिंदुस्थानाच्या शेजारीं ठेवीत आहेत. कांही वर्षांनी विलायती मालावर त्यांची सरसी होईल यांत संशय नाहीं. परंतु हा विचार सरकारास तूर्त सुचून तें सावध होईल असें दिसत नाहीं. जर या देशांत त्यांणीं संपत्ति वाढविली तरच विलायतची शोभा आहे. कारण हिंदुस्थान हा देश मोठा आहे तो व चीन हे दोन देश मिळून अर्धे जग ह्मणवितें, यास्तव इंग्रजांनीं या देशाची संपत्ति वाढविण्याचा प्रयत्न स्वदेशाप्रमाणें करावा, आणि विलायत व हिंदुस्थान एक आहे असें समजलें तर निभावणी होईल. नाहीं तर फजिती होईल. हा विचार सरकारास सुचेल तेव्हां सुचो; पण स्वदेशीय लोकांनीं तो करणें फार अवश्य आहे. विलायतेंत जीं कामें चालू झालीं तीं लोकांनींच केलीं. त्यांस राजाची मदत होती असें नाहीं परंतु या शोधाकरितां विलायत व पुर्तकाल वगैरेचे लोक हिंदुस्थानांत येऊन बसले तसे येथील लोक तेथें बसले पाहिजेत. जातिसंबंधी हरकती अज्ञानी ब्राह्मण घालतात त्याजमुळें देश जास्ती भिकारी झाला व होत आहे हें आंधळे पंडित समजतील असें नाहीं; परंतु लोकांनीं याचा विचार केला पाहिजे. येथील कंपन्या हुन्नर शिकण्याकरिता विलायतेंत बसल्या पाहिजेत व हें आवश्यक काम समजून सर्व ज्ञात्या लोकांनीं याविषयीं आज्ञा दिली पाहिजे; मग पंडित बाजूस राहिलें तर आपलें सौभाग्य घेऊन बसतील; परंतु राजे व बहुत लोक यांची समजूत या कामीं पडली ह्मणजे पंडितांचा आग्रह फारसा चालणार नाहीं. पुणें सार्वजनिक सभा व मुंबईचीं स्वदेशीय मालाचें दुकानें चालू झालीं हें चांगलें आहे. परंतु हुन्नर आपल्या देशांत येऊन जो माल पाहिजे तो सर्व आपणच निर्माण केला पाहिजे व जास्ती केला असेल तो बाहेर पाठविला पाहिजे, ह्मणजे या देशास नफा होईल व पंचवीस कोटि रु. परदेशच्या राज्याचा लाभ घेण्याकरितां दंड द्यावा लागतो तो सहज देतां येईल. हल्लीं हा देश अमदानीचा झाला आहे. पूर्वी खानगीचा होता, तो पुनः खानगीचा झाला पाहिजे ही मुख्य गोष्ट आहे. परदेशच्या राज्याबद्दल खंडणी व व्यापाराचा नाश वगैरे एकदम या देशावर आल्यानें फारच दारिद्य उत्पन्न झालें आहे. त्याचा प्रतीकार कसा होईल याचा विचार सुज्ञांनीं रात्रंदिवस केला पाहिजे, आणि सर्व देशांतील लोकांस मुख्य साधनें पोटभरण्याकरितां तीन आहेत तीं हीं कीं, उत्तम शेतीं, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी; त्यांपैकीं शेतीवर जुलमी कर बसल्यामुळें शेती करणारे लोक अगदीं भिकारी झाले. त्यांस जोडा, अंगरखा व धोतरही मिळत नाहीं; देण्याचे भाराखाली दडपले आहेत. तेव्हां उत्तम शेती असें कोणी समजत नाहीं. व्यापाराची दशा वर वर्णन केलीच आहे. कनिष्ठ चाकरी ती सर्व इंग्रज लोकांनीं आटपली. नामांकित रोजगार या देशांतील लोकांस मुळींच मिळत नाहींत. एकंदर वाळित पडलें आहे. याजमुळे ज्यांच्या आधारानें गरीबांचा निर्वाह होत होता व शेतकी वगैरे करण्यास मदत मिळत होती ते बडे लोक मुळींच नाहींसे झाले; तेव्हां आतां लोकांनीं उपजीविका कोणत्या रीतीनें करावी याचा मार्ग दिसत नाहीं. हजारो भिकार, बैरागी व गोसावी यांच्या रूपानें फिरत आहे. पण ते सर्व घरप्रपंचास कंटाळून पोटाकरितां वेष घेऊन फिरतात. जर धंदा मिळेल तर करणार नाहींत असें नाहीं. हल्लींच्या मन्वंतरावर सर्वांनीं लक्ष देऊन व्यापार वाढवून आपल्या निर्वाहाचे पदार्थ तरी या देशांत पिकवावे ह्मणजे हल्लींची अवदसा कमी होईल. दिवसेंदिवस जों जों भिकारीपणा येईल तों तों स्वस्ताई होईल आणि पैसा दृष्टीस पडणार नाहीं. अशी स्थिति चार प्रांतांत ह्मणजे गुजरात, दक्षिण, कोकण, कर्नाटकपर्यंत व्याप्त होण्यास पाहत आहे. उत्तर हिंदुस्थान तर व्याप्त होऊन गेलेंच आहे. याजकरितां विचाराची वेळ जाऊं देऊं नये. या

देशांतील लोकांचा निर्वाह थोडक्यांत होतो, मजुरी स्वस्त आहे, येथें अतिशय थंडी नाहीं व कापडाची फारशी जरूर नाहीं व लोक दारू पिणारे व झिंगे नाहींत याजमुळें यांच्या हातून काम पुष्कळ होतें व खर्च थोडा लागतो, यास्तव अद्यापि हे विलायतेवर चढ करूं शकतील; परंतु यंत्रें आलीं तर ही गोष्ट होणार आहे. इकडून माल बाहेर जातो त्याजवर सरकारच्या जकाती फार आहेत. कारण विलायतचे सावकार स्टेटसेक्रेटरीशीं हिम्मायत करून नानाप्रकारचीं साधनें करून विलायतच्या मालाचा खप जास्तो होईल ती तजवीज करितात याजमुळें हिंदुस्तानच्या व्यापाऱ्यांस उत्तेजन नाहीं. सरकार हें मोठें गिऱ्हाईक आहे; परंतु ते विलायतच्या सावकारांच्या स्वाधीन आहे. येथील मालास गिऱ्हाईक नाहींसें झाले. आपल्या लोकांची देखील अभिरूचि विलायतच्या पदार्थांवर झाली आहे असें कालमाहात्म्य आहे. मुसलमानी राज्य सरासरी पांचशे वर्षे चाललें, त्यांत आरंभीं मोठी लुटालूट व गडबड झाली आणि पूर्वींचीं मोठालीं शहरें कनोज, चंपानगर, अनहीलपूर, देव-गिरी, विजयनगर इत्यादि उजाड झालीं; परंतु क्षत्रिय राजे थकतांच लढाई बंद होऊन देश पुन्हा अबाद झाला. नवीं शहरें दिल्ली, बऱ्हाणपुर, अमदाबाद, औरंगाबाद, विजापुर वगैरे उत्पन्न झालीं आणि मलिकंबर, तोडरमल्ल वगैरे यांणीं पाहण्या करून रास्त जमाबंदी ठरविली. मुसलमानांच्या दरबारांत हिंदुलोक मोठाले मुत्सदी, सरदार, मानकरी व किल्लेदार झाले. त्यांतील बिरबल, अभय-सिंग, चंदूलाल, शामजी भोंसले वगैरे प्रसिद्ध आहेत. हल्लीं लोक जसे इंग्रजी शिकतात व बूट घालतात तसे पूर्वी फारशी शिकत होते आणि मुसलमानी पोषाक करीत होते; परंतु हिंदुस्थानचे उद्योग धंदे व रोजगार सर्व कायम होते याजमुळें मुसलमान लष्करी धंदा सोडून ताई, रंगारी, दरजी, मश्रुवाले असे नानाप्रकारचे धंदे करूं लागले. कागद व बंदुकीची दारू करण्याचा इलम मुसलमानांनीं या देशांत आणला तो अद्याप मुसलमानांच्याच हातीं आहे. हिंदु लोक त्यांत त्यांत अद्याप शिरले नाहींत; परंतु जुन्या काळीं सोन्याचीं नाणीं मोहोर, होन, फलक वगैरे बहुत चालत होतीं व जुन्या काळचीं तळीं, विहिरी, घरें, दारें, पाहतां त्यावेळची संपत्ति अधिक होती. हल्लीं लोक अशक्त व दरिद्री झाले असें दोन्ही काळच्या निशाण्या तपासून पाहणाराच्या ध्यानांत येईल. इंग्रजींत चिनास अफीण पाठविण्याचा व विलायतेस रू वगैरे पाठविण्याचा धंदा नवीन आला तशीच रेलवेची मजुरी नवी आली हें खरें; परंतु अफिणीवर कर मोठा आहे व रेलवेच्या सर्व पैशांचें व्याज भरावें लागतें याजमुळें एकंदरींत देशांतील लोकांस कांहीं नफा होत नाहीं असें दिसतें.

---

## निबंध ७ वा

### शेती, नौकरी आणि व्यापार, या तीन धंद्यांमध्ये हल्लींच्या काळांत उत्तम धंदा कोणता?

वरील धंद्यांपैकीं हल्लींच्या काळांत विशेष फल देणारा कोणता धंदा आहे हें सिद्ध करण्यास मागील काळच्या मतावर अवलंबून राहणें हें बरोबर नाहीं. कारण पूर्वींच्या आणि हल्लींच्या स्थितीमध्यें कालगतीच्या आणि राज्यक्रांतीच्या योगानें फारच अंतर पडलें आहे हें विचार केला असतां सहजरीत्या लक्षांत आल्यावाचून राहणार नाहीं, व त्यामुळें कांहीं धंद्यांच्या योग्यतेमध्यें आणि प्राप्तीमध्यें पूर्वींच्यापेक्षां बरेंच अंतर पडलें आहे. परंतु हल्लींची सर्वच स्थिति पूर्वींच्या विरुद्ध आहे असें नाहीं. वरील सांगितलेल्या फेरफारांचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील; परंतु त्यांचा येथें थोड्यांत समावेश होऊं शकणार नाहीं असें समजून आम्हीं तीं विस्तारानें देण्यास इच्छित नाहीं.

पूर्वीच्या मताप्रमाणें शेती ही सर्व धंद्यांमध्यें उत्तम गणली आहे. याचें कारण असें दिसतें कीं, पूर्वी जमिनीला अल्प श्रमानें चांगलें पीक येत असे तेणेंकरून शेतकरी लोक सुखी असत. दुसरें असें कारण दिसतें कीं, हा धंदा स्वतंत्र आहे म्हणजे नोकरीप्रमाणें दुसऱ्याची ताबेदारी करावी लागत नाहीं. परंतु हल्लीं पाहूं गेलें असतां जमिनीला पूर्वीपेक्षां पीक बरेंच कमी येतें. याचें कारण असें दिसतें कीं, ती जशी जशी लागवडींत आणावी तशी तशी तिच्या अंगीं पीक देण्याची शक्ति कमी होत जाते, यामुळें ती पूर्वीप्रमाणें थोड्या आयासांनीं व्हावी तशी फलद्रूप होत नाहीं. दुसरें कारण असें आहे कीं, हल्लीं धाराही फारच जबर वाढला आहे. यामुळें झालेल्या उत्पन्नांतून तो भागून फारसा फायदा खालीं राहात नाहीं, एवढेंच नव्हे तर कितीएक ठिकाणीं शेतीवाल्यांची अशी दुर्दशा आहे कीं, केवळ धाऱ्याकरितां देखील त्यांची जमीन आणि मालमत्ता नाहींशी झाली आहे. मग नफ्याची गोष्ट कशाला पाहिजे ? याशिवाय शेतकरी लोक सुधारणुकीच्या कामांत व्यापारी व मुत्सद्दी लोकांच्या मागें राहतात असा एक साधारण नियम दिसतो. पण ते पूर्वीप्रमाणें एकीकडच्या श्रमाचें चांगलें फल अनुभवून अशा अज्ञानांत राहते तरी एका प्रकारें समाधानाची गोष्ट होती. परंतु तिकडे कांहीं लाभ न होतां दुसरीकडच्या हितास मात्र ते व्यर्थ अंतरतात. हल्लीं शेती करणें तर ती पूर्वीच्या नमुन्यावर करून उपयोग नाहीं. हें तर प्रसिद्धीस येत चाललेंच आहे. ज्यास पदार्थविज्ञानशास्त्राची माहिती आहे व जो जमिनीचे गुण व धर्म चांगले जाणूं शकतो आणि पीक येण्यास तिजमध्यें मुख्य द्रव्यें कोणतीं लागतात हें समजतो त्यानें मात्र हल्लींच्या काळांत शेतकीस हात लावावा. सारांश या कामांत हल्लीं इतक्या अडचणी उभ्या आहेत कीं, त्या एकीकडे सारून नुसत्या उदरनिर्वाहाची सोय करू असें कोणी म्हटल्यास तेंही होणें कठीण आहे.

एखाद्या गोष्टीविषयीं मनुष्याच्या अंतःकरणावर बरा अथवा वाईट जो कांहीं ग्रह लहानपणापासून झालेला असतो तो सहसा फिरूं शकत नाहीं. त्यास कितीही बाधक कारणें असलीं तरी तीं आपल्या लक्षांत येत नाहींत व मनावरही ठसत नाहींत. आपणांपैकी कांहीं विवक्षित लोकांत नोकरीची जी कांहीं सर्वापेक्षां विशेष प्रतिष्ठा मानली आहे तिचें कारण आपल्या पिढीजात आपणास तोच धंदा माहीत आहे, त्याशिवाय दुसरें कांहींएक करतां येत नाहीं. इतर प्रकारचे धंदे व कारागिरी यांत न पडतां चाकरीच्याच मागें लागण्यांत पूर्वी खरोखर फायदा होता. किंबहुना प्रतिष्ठा व संपत्ति मिळण्यास तो एक मार्ग होता; पण आतां त्या धंद्यांचें ऐश्वर्य नाहीसें होऊन पोकळ प्रतिष्ठा मात्र लोकांच्या मनांत राहिली आहे ती मोठ्या प्रयत्नाशिवाय निघेलसें दिसत नाहीं. ज्या ठिकाणीं पोकळ प्रतिष्ठा आहे तेथें अपमान व हाल ह्या दोन्ही गोष्टी असावयाच्याच. वास्तविकरीत्या पाहिलें तर गुलामगिरीपेक्षां नौकरी कमी नाहीं. पहिल्यांत जितकीं दुःखें आहेत तितकींच कांहींशा निराळ्या स्वरूपानें दुसऱ्यांत आढळतील. दुसरा प्रकार असा आहे कीं आमच्या लोकांस (सर्व एतद्देशीयांस म्हटलें असतां चालेल) मोठाल्या जागा मिळत नाहींत अशाबद्दल गवगवा आहेच; पण लहान जागा तरी कोणी तयार करून ठेविल्या आहेत काय ? आपल्या लोकांस दहा पंधरा रुपयांची नोकरी मिळाली म्हणजे झालें. यापुढें मोठ्या हुद्यावर शंभरांतून एकादा वाढणारा; कारण हुद्याच्या जागा परद्वीपस्थ लोकांनीं सर्व व्यापल्या आहेत असें पूर्वी स्वराज्यांत नव्हतें. हें "तळें राखणारा पाणी चाखल्यावांचून राहणार नाहीं" या म्हणीप्रमाणें झालें आहे. हलक्याप्रतीच्याही जागा आपल्या लोकांस मिळविण्यास काय काय करावें लागत आहे, कितीएक प्रकारच्या अनीतीच्या गोष्टी कराव्या लागत आहेत व कधीं कधीं सद्गुणांची कशी हेळणा करावी लागत आहे हें त्या यंत्रांतून पार पडून जे वाढले आहेत ते चांगले सांगतील. हल्लीं आपल्या लोकांची स्थिती अशी झालेली आहे कीं, नौकऱ्या थोड्या आणि करणारे फार. इतकेंही असून ती दहा पंधरा किंवा वीस पंचवीस रुपयांचीं नौकरी मिळण्यास वर लिहिल्याप्रमाणें पराकाष्ठेची पंचाईत पडते. फार तर काय अंमलदाराच्या येथें सत्रा जोडे फाडावे लागतात आणि अर्धे

नाक झिजवावें लागतें. थोडा विचार केला असतां असें दिसतें कीं, डाळपिठाचें दुकान घालणारे सुद्धां यापेक्षां अब्रूनें व स्वतंत्रतेनें दहा पंधरा रुपये मिळवूं शकतात. परंतु आपले लोक कधीं व्यापारांत शिरले आहेत काय? नाहीं. कारण आमच्या लोकांचे मत असें आहे कीं, नोकरी ह्मणजे मोठा प्रतिष्ठित धंदा व कारकुनी केली ह्मणजे आह्मी शतकृत्य केलें. ही केवढी चूक आहे बरें? भाटे, गुजराथी व मारवाडी हे लोक व्यापारामध्यें मोठी प्रतिष्ठा मानितात (व हल्लीं हिंदुस्थानांत हेच सुखी व पैसेवाले लोक आहेत.) सुज्ञ मनुष्यानें आपला जिकडे कल असेल त्या धंद्यांत शिरावें व वाडवडिलांनीं जो धंदा केला तोच आपण केला पाहिजे असें नाहीं. विद्या ही मनुष्याचें भूषण आहे. मग त्यानें कोणताही धंदा केला तरी त्यास दोष येईल असें दिसत नाहीं. व्यापार हा धंदा मोठा विस्तीर्ण आहे आणि त्यामध्यें असंख्य लोकांचा समावेश होण्यासारखा आहे. हा सुद्धां धंदा बऱ्याच अंशी परद्वीपस्थ लोकांनीं येथें येऊन आपलासा केला आहे. या धंद्यांमध्यें मनुष्य आपले जसे श्रम व चातुर्य खर्च करील त्या मानानें त्याला फायदा होईल. आतां हें खरें आहे कीं, व्यापार करणें हें सोपें काम नव्हे, तर हें नौकरीपेक्षांही कठीण आहे, आणि दोन्ही बाबदींत जर सारखेच श्रम आहेत, किंबहुना नौकरीपेक्षा व्यापार धंद्यांत अधिक श्रम आहेत तर व्यापारांत फारसा अर्थ नाहीं असें वाटेल. तर हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, पहिले श्रम तुमच्या इच्छेवर नसून ते एका प्रकारच्या भीतीनें तुमच्या हातून घडतात. आणि त्या श्रमांमुळें खरोखर तुह्मी श्रांत होतां; परंतु दुसऱ्या प्रकारचे जे श्रम ते तुमच्या साहजिक हौसेचे व स्वातंत्र्यामुळें विशेष उत्साहानें होण्यासारखे आहेत. तेव्हां अशा प्रकारच्या श्रमानें मनुष्याचें शरीर कधींही लवकर शक्तिहीन होणारें नव्हे. आणि हें उघडच आहे कीं, सक्तीनें जें काम होतें तें जितकें व्हावें तितकें होत नाहीं; पण त्याहून दुसरी गोष्ट ही आहे कीं, तें थोड्यांत तुह्मांस जेर करून टाकील आणि स्वैच्छिकपणाचे (यात योग्यायोग्य विचार असलाच पाहिजे) जे व्यवसाय आहेत त्यांत बहुत वेळ व्हावें त्याहून अधिक काम उठतें; पण तें आनंदाच्या व स्वतंत्रतेच्या लहरींत झाल्यामुळें कधींही तुह्मांस दुःखकारक वाटणार नाहीं. साधारण असा नियम आहे कीं, थोड्या श्रमानें व अल्पकाळांत जो गुण किंवा धंदा संपादितां येईल त्यामध्यें विशेष भूषण नाहीं, तेव्हां अर्थातच जो धंदा चांगला त्यांत श्रम व चातुर्य यांची विशेष जरूरी लागणार. देशाची संपत्ति वाढण्यास हाच धंदा वाढला पाहिजे. व्यापारांत जसा योग्य मनुष्य लवकर भरभराटीस येईल तसा इतर धंद्यांत येण्याचा संभव नाहीं.

या सर्व वरील कारणांवरून असें दिसतें कीं, व्यापार हा तिन्ही धंद्यांमध्यें उत्तम आहे. यावरून आमचें असें मत नाहीं कीं, सर्व लोकांनीं नौकऱ्या सोडून व्यापाराच्याच नादीं लागावें; परंतु इतकेंच कीं, या धंद्याच्या योग्यतेबद्दल आमच्या लोकांस जो कांहीं वाईट ग्रह झालेला आहे त्यामुळें आमचे नवीन शिकलेले उमेदवार संपत्तीच्या, अब्रूच्या व खऱ्या सुखाच्या रस्त्यास चुकून आडरानांत भटकत आहेत. परंतु ज्या गोष्टींची निरंतर त्यांनीं प्रशंसा ऐकिली आहे आणि ज्यांस ते पूज्य मानितात तेही ज्या व्यर्थ प्रतिष्ठेंत पडले आहेत असें त्यांनीं पाहिलें आहे त्या गोष्टीच्या नादापासून त्यांस मोकळें होतां येत नाहीं यांत त्यांचा अपराध नाहीं. आतां या संकटाचें निवारण होण्यास ही तोड आहे कीं, ज्यांचा व्यापाराकडे कल आहे आणि ज्यांस ईश्वरानें थोडींबहुत साधनें अनुकूल केलीं आहेत त्यांनीं तो नुसता कल मनांत बाळगून न ठेवितां आपल्या आचरणानें आपल्या गैरवाकब बंधूंस एकदा स्तुत्य उदाहरण घालून द्यावें ह्मणजे अर्थातच त्यांची वरील भ्रांति दूर होईल आणि ते आपल्या खऱ्या कल्याणास अंतरणार नाहींत. येथें दुसरी सूचना करावयाची आहे ती ही कीं, असंख्य लोकांनीं असंख्य प्रकारचे धंदे, व्यापार केले तथापि सगळेच श्रीमंत कोठून बरें होणार? परंतु हें खचित आहे कीं, ते हल्लींप्रमाणें एका पायानें लंगडे राहणार नाहींत. हल्लींची स्थिति अशी आहे कीं, जो उठला तो प्रतिष्ठितपणानें उदरनिर्वाह करण्याचें साधन नौकरी हेंच समजून तिच्याच पाठीस लागतो व तिची स्थिति वर लिहिल्याप्रमाणें असल्या कारणानें

ती न मिळाल्यास हात जोडून त्यास हरि हरि करीत बसावें लागतें. या सृष्टींत सर्वोपरी चांगली आणि परिपूर्ण अशी वस्तु आढळावयाचीच नाहीं. आपण जीस चांगली गोष्ट ह्मणतों ती दुसरीच्या तुलनेनें ह्मणजे त्या दुसऱ्या वस्तूपेक्षांही पुष्कळपट चांगली इतकाच अर्थ आहे. यावरून नोकरीची हल्लींची स्थिति व, ती न मिळण्याचीं साधक बाधक कारणें यांचा पोक्त विचार केल्यास तिचा मोठेपणा नाहींसा झाल्यावांचून राहणार नाहीं. याकरितां ज्यांस सरकारी नोकरींत यश येणार नाहीं त्यांनीं परंपरेनें चालत आलेल्या क्रमास अनुसरून उपाशी राहण्याच्या भीतीमुळें आपलें शरीर झिजवावें आणि दास्यत्वांत आयुष्य काढून या जगांतून एके दिवशीं निघून जावें हें सर्वथैव लाज आणणारें आहे. आमच्या ह्मणण्याचा अर्थ विशेष स्पष्टपणानें ह्मटला तर असा आहे कीं, जे आपले असंख्य लोक पंधरा, वीस अगर अशाच संख्येच्या पगारावर राहतात आणि ज्यांचें मन त्याबद्दल त्यांस खात असतें त्यांनीं तशा गुलामगिरीच्या अवस्थेंत कधींही राहणें बरोबर नाहीं. नियमित प्रमाण जेथपर्यंत चाललें आहे तेथपर्यंत सरकारी नोकरी वाईट नव्हे. पण ती संख्या भरपूर झाल्यावर राहिलेल्या शतशः लोकांनीं तिकडे डोकें खुपसणें यास वेडेपणा किंवा पायांवर दगड घालून घेणें अथवा सुज्ञ जन या कृत्यास जें दुसरें कांहीं ह्मणतील ते ह्मणणें रास्त होईल. ह्मणून अखेरची विनंती ही आहे कीं, अशा लोकांनीं आपल्या सुखाचा मार्ग दुसरीकडे अगत्य काढावा.

---

## निबंध ८ वा

आलीकडे दादाभाई नवरोजी शेट यांणी इष्ट ईंडिया असोशिएशन लंडन यांच तर्फेनें "पावर्टी ऑफ इंडिया" या नांवाचा एक ल्हानसा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला आहे. त्यांत प्रांतोप्रांतचें पिकाचें उत्पन्न छापलेल्या हिशोबावरून जमेस धरून त्याजवर पुष्कळ कसर सोडून माणसांचे संख्येवर हिसेरसी बसविली तर दर माणसास पराकष्ठेनें पधरांपासून वीस रु. दर वर्षास पडतात याजमुळें त्याची अडचण फार असते. या ग्रंथांत, साहेब लोकांनी बहुत साक्षी भरल्या त्यांचे उतारे दाखल केले आहेत. त्यांत मुख्य मारियटसाहेब, जीबर्नसाहेब, नार्टनसाहेब वगैरेंचे आभिप्राय दाखल केले आहेत, त्या सर्वांवरून असेंच अनुमान निघतें. दादाभाई यांणीं हा विषय कितीएक वर्षांपासून लक्ष लावून तपासला आहे, त्यापेक्षां दुसरा कोणी चांगला आधार दाखवून बोले तोंपर्यंत हेंच खरें ह्मटलें पाहिजे. उगीच वायकळपणानें कांणी लोक तकरारी घेतील त्यांत जीव नाहीं. हें बूक दादाभाईनीं केवळ बुकें पाहून रचलें आहे; परंतु लोकांची वास्तविक स्थिति कशी आहे हे प्रांत फिरून डोळ्यांनी पाहणारे जे नौरोजी फरदुनजी शेट वगैरे गृहस्थ यांचाही अभिप्राय याचप्रमाणें आहे. लोक दिवसेंदिवस अगदी कंगाल बनले आहेत, त्यांस अंगरखा व जोडा देखील मिळत नाही व खावयासही चांगलें खाणें मिळत नाहीं याचें कारण जमिनीवर वगैरे कर वाढले ते भरतांभरतां लोक जिकिरीस येतात. याजमुळें ह्मणतात कीं, हिंदुस्थानची रयत, मनस्वो लादलेल्या गाढवाप्रमाणें एकदा थकून बसली ह्मणजे मग कीतीही काठ्या घातल्या तरी ती उठणार नाहीं. कोणी ह्मणतात कीं, चांगलेही दिवस येतील; परंतु यांतील जें काय घडणें असेल तें ईश्वराधीन आहे. परंतु यत्रद्वारा युरोपांत काम चालू झाल्यामुळें येथील रोजगार बुडाला, लोक शोधक नाहींत, त्यांचे बुद्धीवर घोर तिमिर व अंधकार पसरला आहे, त्याजमुळे काय होत आहे व काय जात आहे याचा ठिकाण त्यांस नाही. "अतिशय ताप पडतो तेव्हां पाऊस येतो" या ह्मणीप्रमाणे फार दरिद्रानें व्याप्त झाले ह्मणजे कलाकौशल्य आणि उद्योग वगैरे त्यांस सुचतील. तो प्रसंग अगदी ठेपून राहिला आहे. जे हतभाग्य राजे ते लोकांस कोणत्याही प्रकारचें उत्तेजन देत नाहींत व लोकांस शक्ति राहिली नाहीं. जी आहे ती पुरातन

चालीप्रमाणें खर्चवेच करण्यांत खर्च होते. उपयोगी कामाकडे लावण्यास कांहीं राहत नाहीं. सरकारचा खर्च फार वाढला याजमुळें कर अधिक पडले आणि त्यांतील पैसा विलायतेंत फार जातो. "कविनाटेड" व "अनकविनांटेड" हा भेद ब्राह्मणकुळंब्यांपेक्षा सख्त ठेविला आहे, याजमुळें नेटिव लोकांचा पुढें पाय पडत नाहीं; परंतु त्यांचे लायकीविषयीं कांही संशय राहिला नाहीं. सरकारचा इतबार मात्र कमी एवढेंच कारण आहे. पहिले सरकारचें लक्ष रयतेवर चांगले होते. रेविन्यू कमिशनर वगैरे त्या कामीं फार लक्ष देत व धारे व कर कमी करीत. मोहतर्फे वतनदारांचें कर हे रद्द करीत; रयतआबादानीवर लक्ष देत; परंतु तसे मायपोट साहेब लोक आतां नाहींत असें बहुतांचे मत आहे. याचें कारण या देशांत येण्यास सुलभ झालें तेव्हां या देशावर पहिले राज्यकर्ते साहेब यांचा भाव होता तसा आतां नाहीं. त्यांत पहिले आप्तसंबंधी येत त्यांस आपले वडील येथें मोठें नांव मिळवून गेले त्यांची मुरवत असे. आतां तो अर्थ कांहीं नाहीं. हमालाचे डोकीवर ओझें द्यावें तें केव्हां पोंचवीन आणि पैसे घेईन इतकीच त्यास फिकीर असते तशी हल्लीं बुद्धि आहे. उदारपणा व उमदेपणा अगदी गेला. मोगलाईसारखी स्थिति व्हावी अशा धोरणाचे म्युनिसिपाल कमिटीचे व कोडतांचे वगैरे अधिकार क्षीण करण्याच्या मतलबाचे कायदे होऊं लागले याजमुळें मोंगलाई व इंग्रजी नजीक नजीक येत चालली. विद्यावृद्धि होत चालली, परंतु त्याचें भूषण नाहींसें झालें हजारांत एक मुलगा म्यट्रिक्युलेशन परिक्षा देतो. दहा हजारांत एक बी. ए. पर्यंत जातो. लक्षांत एक एम. ए. पर्यंत पोंचतो. असा बुद्धिमान् असला तरी त्याची बूज होत नाहीं. त्यांत रेविन्यू खात्याचे साहेब त्याचा दुष्टावा फार करतात. ते ह्मणतात कीं तुह्मी कारकून व्हा; मामलेदार होण्यास तुह्मी योग्य नाहीं. आतां अव्वल कारकून व्हा. मनुष्य किती योग्यतेचा असो, तो केवळ लिहिणार व वाचणार; दुसरे कांहीं त्यास येत नाहीं व अगदी साधारण मनुष्य अव्वलकारकून होऊं सकतो त्याचे बरोबरीस त्यास बसविणार ह्मणजे त्याची विटंबना ह्मणा, किंवा मानखंडना ह्मणा, समजून उमजून करणार; याजमुळे कैक शिकून चडफडत बसतात. वास्तविक ह्मटले ह्मणजे असि. कले. व असि. जज्ज व रजिस्टर जनरल वगैरेच्या जागा या लोकांस देण्याचा काल आला आहे; परंतु मामलेदार ह्मणजे तुमच्या योग्यतेचा कळस, असा ब्रेत रेविन्यू खात्याचा आहे व त्या खात्याचा जोर हल्लीं फार वाढला आहे याजमुळें शिकण्यांतही भूषण दिसत नाहीं. खर्चवेच करून बारा वर्षे जंजाळ भोगावे आणि परकी भाषेचा अभ्यास करावा; तेव्हां ह्या भाषेत हजार शिकणार असेल तर एकाची समजूत पडते. बाकी फजीत होऊन अभ्यास सोडून घरीं बसतात. इतके लोखंडाचे चणे खाऊन शिकणारास फळ कांही नाहीं हें या सरकारांत मोठें आश्चर्य आहे शिकविणारे तेच व निर्फळ करणारे तेच. हायकोर्टाचे जज्ज यांनी अशा लोकांस एकदम डेप्युटी रजिस्टरच्या जागा दिल्या; परंतु तें कांहीं रेविन्यू खात्याच्या ध्यानास येत नाहीं. हे असें समजतात कीं आमच्या कचेरींतील विद्या विलक्षण आहे. ती शाळेत यावयाची नाहीं. जो आमचे जवळ राहील त्यासच येईल. "गुरुशुश्रूषया विद्या" हें एकच वाक्य ते धरून बसले आहेत व सरकारांत त्यांचा जोर, याजमुळें त्यांचें बोलणें एक कटानें पार पडतें. असे विचित्र चमत्कार हल्लीं पाहण्यांत येत आहेत. चाकरीची ही स्थिति, रोजगार विलायती यंत्रांनी खाल्ला, शेतकी करांनीं बुडाली; तेव्हां लोकांनीं करावें काय? जिकडे तिकडे लोक कर्जांत बुडून राहिले आहेत. जे वरच्या वर्गाचे आहेत त्यांस रोजगारधंद्यांत पडलें असतां सुखी होऊं असें दिसत नाहीं. लंगोटी व घोंगडी घालून निर्वाह करण्याचें त्यांस पतकरत नाहीं. यास्तव सरकारानें दयाळूपणानें प्रजेवर नजर ठेवून त्यांस रोजगार अधिकाधिक मोकळे करून द्यावे. कोळशाच्या खाणी वगैरे चालू करण्यास मदत द्यावी, आणि शेतकरी लोकांचे कर कमी करावे तर ही प्रजा सरकारास दुवा देऊन सुखानें नांदेल. सरकार, रोग झाला तर औषधें पाठवितात, काळ पडला. तर मदत करतात, पाण्याचे पुरानें नुकसान झालें तर साह्य करितात; परंतु हें नैमित्तिक साह्य आहे नित्यसाह्य झाले पाहिजे आणि

नित्यसाह्य आपला थोडासा लाभ सोडल्यावांचून व्हावयाचें नाहीं. सिविल सर्विसमध्ये दाखल करण्याचा अधिकार पार्लमेंटानें सरकारास दिला आहे; परंतु असले हुकूम बहुधा मागें पडून राहतात हें एक नेटिव लोकांचें दुर्भाग्यच होय. परंतु शेतकीनें, व्यापारानें व रोजगारानें रयतेस सुखी राखावें हा सरकारचा धर्म आहे. आणि लोक सुखी झाले ह्मणजे संतोषी असतात, कुरकुर करीत नाहींत व ते संतोषी असले ह्मणजे त्यांचे ठायीं राजभक्ति दृढ होते आणि ज्या स्थितींत आपण सुखी आहों ती स्थिति कदापि बदलू नये, चिरकाळ राहावी अशी इच्छा लोकांस स्वाभाविक उत्पन्न होते. धन्यानें सुख दिलें असता त्याविषयीं कृतज्ञताबुद्धि असणार नाहीं असें कधीही होणार नाहीं. हा अनुभव सर्व धनीपणा बाळगणाऱ्यां लोकांस आहे. चार चार पिढ्या गेल्या तरी धन्यास लोक विसरत नाहींत अशीं उदाहरणे बहुत आढळतात. त्याचप्रमाणें सरकारही एक, देशाचें धनी आहे त्याजकडून रयतेस सुख होईल तर संतोष व समाधान का होणार नाहीं? त्यांजवर हमेष कडीं नजर ठेवून त्यांस दरिद्री करून वारंवार त्यांचा मानभंग करून त्यांस नीचपणानें वर्तविलें तर ते संतोषी होणार नाहींत व ज्याचे जवळ दहा माणेसे आहेत त्यासही हा अनुभव येतो. याज-करितांजबरदस्तीनें लोकांचा छळ न करितां त्यांस सुखाचीं आणि अभिवृद्धीचीं साधनें देत असावीं हेंच योग्य आहे. ज्यास दुसऱ्या एका जीवावर किंवा अनेक जीवांवर मुखत्यारी आहे त्या सर्वांनी हा नेम पाळवा हीच ईश्वरी आज्ञा आहे.

• •

## ग्रामरचना

॥ श्री ॥

# लोकहितवादी

### मंगलाचरण

मूकं करोति वाचालं पंगुलंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥

जो भगवान् सच्चिदानंदस्वरुप, भक्तवत्सल, दीनबंधु, दयासागर, जगद्गुरु, परात्पर, परमपवित्र, अव्यय, जगदात्मा व जगत्कारण त्याचा नामोच्चार करुन कोणत्याही कार्यारंभी मंगल करण्याचा महाजन संप्रदाय आहे. त्याला अनुसरून आम्ही त्या सर्वशक्त गुणराशीच्या अगम्यकृति-चमत्कारांचें लेशतः मनन करुन हाती घेतलेल्या कार्यास हात घालूं. त्या जगच्चालकाचे आपणा पामरांवर अनंत उपकार असून त्याचे गुणानुवाद आपण जितके गाउ तितके थोडेच होत. त्याच्या कृपालुतेची कल्पना मनांत आली म्हणजे आपलें अंतःकरण कृतज्ञताबुद्धीनें परिप्लुत होतें. आपणां मानवी प्राण्यांनां त्याणें जन्म देऊन आत्मोद्धाराची अशी विचार, बुद्धि, वाणी अित्यादि साधनें दिली आहेत. आपण परस्परांनी त्याच्या कृपेच्या पाखरे खाली राहून व आपल्या मनुष्य-बांधवास योग्य साह्य देवून त्यांच्या उन्नतीविषयी प्रयत्नी असावें हा त्या परमेशाचा मुख्योद्देश दिसतो.

या विश्वाच्या रचनेकडे क्षणभर विचारदृष्टीनें अवलोकन केले म्हणजे त्या नटनाटाचे अलौकिक कौशल्य आपल्या लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाही. या भूगोलाभोंवती प्राण्याच्या जीवनास आवश्यक व मुख्याधार असें वायूचें पटल निर्मून या ब्रह्माण्डांत प्राण्यांचे रक्षणार्थ किती प्रकारचे पदार्थ तरी त्याने उत्पन्न करुन ठेविले आहेत! आकाशात सूर्यचंद्रासारखे तेजोगोल आम्हांस उजेड व शीतोष्ण देण्याकरितां अहर्निश भ्रमण करीत आहेत. अनेक प्रकारची नक्षत्रें स्वप्रकाशाने आकाशांत चमकून त्या स्रष्टाच्या रचनाचातुर्याचे आम्हास दर्शन देत आहेत! ही वसुंधरा सर्व प्रकारची द्रव्यें, धातु, रस यांनी परिपूर्ण असून तिच्यांतील सांठा जों जों आम्ही रिता करण्याचा प्रयत्न करुं तों तों तो जास्त जास्त वाढत जातो! श्रवण, प्रेक्षण, घ्राण, रुचि व स्पर्श या पंचेंद्रियांच्या वासनांची तृप्ति करण्याकरिता त्या चराचरसमर्थ प्रभूनें या भूतलावर नानाविध श्रवणीय, प्रेक्षणीय, सुवासिक, रूचिकर आणि सुखावह असे पदार्थ निर्माण केले आहेत! लहान-मोठे वृक्ष, झाडे, झुडपें, नद्या, पर्वत, फळे, फुलें वनस्पती, काष्ठे, औषधी, वेली, खनिज पदार्थ

वगैरे त्या जगदेकस्रष्ट्यानें उत्पन्न केले आहेत. आपल्या शरीराच्छादानाकरितां कापूस, लोंकर, रेशीम, ताग वगैरे तंतुमय पदार्थ, रुचिकर अन्नसेवनार्थ गूळ साखर वगैरे मिष्ट व त्याचप्रमाणें आंबट, तिखट, वगैरे नानारुचीचें पदार्थ – को, त्या भिन्नरुचीस पाणी माती व जमीन एकच असून त्यांतून निरनिराळे रस उत्पन्न होतात! –; लोखंड, शिसें कथिल, तांबे वगैरे निर्वाहाला व रक्षणाला उपयोगी पडणाऱ्या धातु; इत्यादि उत्पन्न करुन मनुष्याला किती उच्चावस्था देण्याचा संकल्प आहे बरें? त्या जमिनीत ऊस लावला त्याच जमीनींत बचनाग लावावा. दोहोनाही मृत्तिकापाण्याची सामग्री एकच असून इक्षुदंड अत्यंत मधुर व्हावा व बचनाग प्राणघातक हलाहल व्हावें हा रसायनव्यापार किती अगम्य आहे बरें? हे रासायनिक प्रयोग व तत्संबंधाची मानवी-दृष्टिस अज्ञात अशी यंत्रे या पृथ्वीचे पोटांत ईश्वरानें किती आणि कशी सांठविली आहेत! ईश्वरें दिलेल्या कल्पकतेनें आणि मानवी दीर्घप्रयत्नानें, या जगातील नानाप्रकारची भांडारें आपल्याला हस्तगत होत असून या भूगर्भातील ऐश्वर्याचा आपण पूर्ण सुखानुभाव घेत आहों! आणि या योगानें आम्हा मनुजांस या महीतलावरील पशुसृष्टीमध्यें केवढे वैभव प्राप्त झाले आहे!

सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयात्मशक्त्या
वृक्षान्सरीसृपपशून्खगदंशमत्स्यान ॥
तैस्तैरतुष्टहृदय पुरुषं विधाय
ब्रह्मावलोकधिषण मुदमापदेवः ॥ २८ ॥ अ. ९, स्कं. ११-भागवत.

आपल्या शरीररचनेकडे पाहिलें म्हणजे हें विलक्षणं यंत्र रचण्यांत परमेष्ठीचे कौशल्याची काय कल्पना करावयाची? आपले हस्तपादाद्यवयव, चक्षुवाक् श्रोत्रनासादि इंद्रियें मनबुद्धितर्कविचारादि अदृष्ट शक्ती हे गुण किती विलक्षण प्रकारानें विधात्यानें या नरदेहांत स्थापित केले आहेत! या सर्व रचनाकौतुकानें आपलें अंतःकरण त्या जगत्कर्त्याच्या संबंधीनें कृतज्ञ, सादर, सभय, आणि तत्सेवातत्पर नसावें काय? आपण त्याच्या शक्ती, त्याचें कौशल्य व त्याच्या एकंदर घटना समजावयास यद्यापि असमर्थ असलो तरी त्याजविषयी आपण पूज्यबुद्धि धारण करणें हे आपले कर्तव्य आहे. आपण वृथागर्व, द्वेष, अहंकार, मात्सर्यभाव, दोषैकदृष्टि अशा किती दोषांनी बरे कलुषित आहोंत? व यामुळें त्या परेशाचे निर्मल कृतीस आपण किती दूषणावह होतों? हा आपणाकडून महदपराध घडतो; त्याजपासून आपलें परावर्तन व्हावे व ईश्वरानें त्याजबद्दल आपणास क्षमा करावी म्हणून आपण त्यास शरण जावें हें आपलें कर्तव्य आहे. आमची क्षुद्रदृष्टि असून या अवाढव्य जगत्त्रयांत काय काय घडामोडी चालल्या आहेत, त्या आपणा पामरांस अज्ञात आहेत इतकेंच नव्हे; तर आपला म्हणून म्हटलेल्या या साडेतीन हातांच्या जड देहांत नित्य कसे कसे आणि काय काय व्यापार चालले आहेत हें देखिल आपणास कळत नाही! आम्ही मानव अगदी अशक्त, अल्पधी व अल्पायु असून शक्तिमान् धीमान् व आयुष्मान् असा काय तो या ब्रह्मांडाचा नायकच आहे.

पिताऽसि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूजश्च गुरुर्गरीयान् ॥
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥ ४३ ॥-११-गीता.
त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ॥-भागवत.

आम्हां दीन जनांचा मातापितर, आप्तसुहृत आणि इष्टमित्र असा काय तो सर्वस्रष्टा प्रभुच आहे. असें जाणून त्याची प्रसन्नता मिळवावी हाच आपला धर्म होय. आपणांमध्यें जें कांही लेश-मात्र सामर्थ्य आहे ते त्या प्रभूच्याच कृपेवरून आहे. वेद, शास्त्र व पुराणें ही सर्व त्या विश्वेशाचें

गुणवर्णन करून थकली तेथे आम्हां सारख्यांची वाणी किती वदणार? शेवटी आम्ही त्या सर्वेशास आम्ही जें कार्य आरंभितों त्यांत निर्विघ्नता देण्याविषयीं, प्रेमपुरःसर प्रार्थितों.

सर्वदा सर्वकार्येषु नाऽस्ति तेषाममंगलम्।
येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनं हरिः॥
पवित्राणां पवित्रं यो मंगलानां च मंगलं।
दैवतं देवतानां च भुतानां योऽव्ययः पिता॥

---

## -: उद्देश :-

कोणतेंही कृत्य करावयाचें म्हणजे त्याला उद्देश किंवा कारण कांही तरी असलेंच पाहिजे कारणाशिवाय कार्य होत नाही. तेव्हां प्रस्तुत आम्ही जें हे अेक कृत्य करण्याचें योजिलें आहे त्यालाही कांही उद्देश असलाच पाहिजे. तो उद्देश कोणता हें अगोदर सांगून नंतर या कार्याला हात घालूं.

राष्ट्राच्या नीचोच्चावस्थेचें दर्शक तेथील ग्रंथसंग्रह आहे असें कित्येक विद्वानांचे मत आहे व तें असत्य नाही. या अफाट पृथ्वीतलावर किती प्रकारची राष्ट्रें आहेत पहा. कांही राष्ट्रे वर्णमालेसच अपरिचित आहेत, कांही मध्ये अजून ग्रंथ लिहिण्यासच सुरूवात झाली नाही. कित्येक राष्ट्रांमध्ये ग्रंथ झाले आहेत पण ते तादृश उपयोगी नाहीत, आणि कित्येक राष्ट्रांनी उपयुक्त व ज्ञानप्रसाराचे ग्रंथ लिहून आपले ज्ञानबल वाढविले आहे असें दिसतें. आतां हे निरनिराळे प्रकार हिंदुस्थानाच्या संबंधानें बघितले तर काय दिसतें हे पाहूं. प्राचीन काळापासून या देशांत जातिविभाग होऊन त्या प्रत्येक विभागांतील लोकांनी आपली आपली संसाराची कामे करून चरितार्थ चालविले. त्या विभागात विद्येचें काम प्रथमपासून ब्राह्मणवर्गाकडेच असून त्याप्रमाणे त्यांनी पहिल्यानें ईश्वर-प्रार्थनेचे वेद म्हणून ग्रंथ अुपदेशिले. त्यानंतर कर्मकांड म्हणून भगवत्पूजनाचा पंथ निर्माण झाला. एतत्पंथीय आचार्यांनी यज्ञयागादि विधानांचे बहुत ग्रंथ लिहिले. त्यानंतर झालेल्या लोकांचे तर्क वाढून त्यांस मागील ग्रंथ निरर्थक वाटू लागले व त्यांनी षड्दर्शनादि तर्कशास्त्राचे ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. त्यातच सूत्रादि वादविवादाचे ग्रंथ झाले. पुढें त्या ग्रंथांवरची ही रुचि उडून पुढल्या पिढ्यांनी सुलभ असा भक्तिमार्ग काढिला व तत्संबंधानें पुराणे, तंत्रे, प्राचीन ग्रंथांवर अनेक टीका व अनेक प्राकृत ग्रंथ असे उत्पन्न झाले. त्याच प्रमाणे अनेक साधुसंत झाले. त्यांणी भक्तिपंथासच जोर देऊन तो विशेष दृढ केला, व तोच हल्ली सर्व देशभर चालत आहे. याप्रमाणें या हिंदुस्थान राष्ट्राची ग्रंथपरंपरा दिसते. वरील सर्व प्रकारच्या परंपरागत ग्रंथश्रवणानें व त्यांच्या अभ्यासाने हिंदु-लोक परम धार्मिक झाले ते इतके की, हिंदुस्थानांतील आबालवृद्ध व राजारंकांपर्यंत जी धर्मबुद्धि आणि श्रद्धालुता दिसते तितकी पृथ्वीवरील कोणत्याही देशांत दिसत नाही. इतकी गोष्ट असून व धर्मचारांत इकडील लोक इतके पुढे असून त्यांच्या एकंदर ग्रंथसमुदायांत व्यावहारिक विषयांवर जसे व जितके ग्रंथ व्हावयास पाहिजे होते तसे व तितके होण्याकडे मुळापासूनच ग्रंथकारांचें लक्ष्य कमी असल्याचे दिसून येतें. आतां याचें कारण पाहिले असतां हें उघड दिसेल की, ग्रंथकर्तृत्वाचें काम काय तें ब्राह्मणांकडेच असल्यामुळे व ते स्वभावतः धर्माचर प्रवृत्त असल्यामुळें विशेषेंकरुन त्यांच्या त्यांच्या व्यवसायास अनुकूल असा ग्रंथसमूहच त्यांनी केला. निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर जें ग्रंथ व्हावयाचे ते, त्या त्या विषयांत ग्रंथकार स्वतः माहितगार व जाणते असल्याखेरीज, व्हावयाचे नाहींत हा नियम आहे. त्याप्रमाणें पाहिले असतां ब्राह्मण लोकांनी जें संसारिक व

व्यावहारिक विषयांकडे फारसें लक्ष दिलें नाहीं ह्याचें कारण कळेल. आतां त्यांनी कांही व्यावहारिक ग्रंथ लिहिले आहेत; नाहींत असें नाहीं. परंतु त्यातही त्यांनीं आपलें धर्माचें सूत्र लावून ठेविलेंच आहे. औषधांचे संबंधाने व शारीरिक पीडांचे संबंधानें मंत्रतंत्र, जपतप, कर्मविषयक इत्यादि धार्मिक भाग सांगितले आहेत; ज्योतिषाचे संबंधाने ग्रहपीडा, त्यांच्या शांती, दानें इत्यादि लिहिलीं आहेत; शिल्पाचे संबंधानें चंद्र, दिशा, ग्रह इत्यादि साधून दिवस, नक्षत्र यांच्या शुभाशुभावर कोणत्याही शिल्पास हात घालावा असें ठरविलें आहे; आणि ऐतिहासिक विषयांचे लेखांत अस्त्रें, तपे, मंत्र-सामर्थ्य इत्यादि गोष्टी समाविष्ट केल्या आहेत. येणेंकरून तोटा इतकाच झाला कीं, सत्यशास्त्रांचा खऱ्या शोधांचा पत्ता लागण्याचें एकीकडे राहून व्यावहारिक गोष्टींविषयीं परंपरेने फारच अज्ञान राहत गेले. त्याचप्रमाणें, प्रत्येक विषयांत धर्माचा समावेश केल्यानें लोकांमध्ये संसारिक सुधारणां-विषयीं उदासीनता वसत चालली. यामुळें राज्यव्यवहारांत लोकांचा संबंध नाहींसा होऊन आपले राष्ट्र उन्नत्यवस्थेस कधींच आलें नाहीं असें एकंदर ग्रंथसमूहांवरून अनुमान होतें. आपलें राष्ट्र कधीच उन्नत्यवस्थेस आलें नाहीं हें म्हणणें मोठें साहसाचें आहे असे म्हणण्याचे कारण नाहीं. सद्ग्रंथ संग्रहानें आलेली उन्नत्यवस्था बहुतकालपर्यंत टिकते. क्षणमात्र आलेली जी उन्नति ती उन्नति नसून तो तत्तत्कालीन राज्यग्राहकाच्या बुद्धिकौशल्याचा व राज्यनीतीचा प्रभाव होय इतकेंच म्हणावें. अतएव, आमच्या राष्ट्राचा आजपर्यंतचा जो ग्रंथसमूह आपले समोर आहे त्यावरून तो राष्ट्राची उच्चावस्था दाखविणारा नाहीं हे सिद्ध होतें.

आमच्या लक्षावधि ग्रंथश्रवणाचा सर्व हिंदुस्थानराष्ट्रांत ह्याच परिणाम दिसतो कीं, लोकांनी धर्मनिष्ठा धारण करून त्यांच्या झुंडी तीर्थस्थाने, तीर्थयात्रा वाऱ्या, व्रतें, दानें वगैरे करण्यांस फिराव्या. ते कापसाच्या वातींनी आणि कापुराच्या आरत्यांनी देवास ओंवाळतील; परंतु कापूर येतो कोठून, त्याची शुद्धी कशी होते, कापसाचा व त्याजपासून होणाऱ्या वस्त्रांचा इतर काय अुपयोग होतो, लोखंड कोठून येतें, कांच कशी व कोठून येते अित्यादिचे शोध कोणासही नकोत व तीं तीं ठिकाणेंही बघण्याची कोणास अिच्छा होत नसे. आतां याचे कारणही स्पष्टच होते कीं पूर्वकालीं अिकडे सर्वत्र हल्लींसारखी पोटापाण्याची विवंचना नसल्यामुळें कोणाचेंच या गोष्टींकडे लक्ष्य लागलें नाहीं. व याकरिता त्यांस फारसें कोणी दूषणही देणार नाहीं. त्यांचा मोठा पुरुषार्थ काय तो धर्म, ईश्वर प्राप्ति व पारमार्थिक ज्ञान हीं संपादन करण्यांतच आहे असे तें मानीत असल्यामुळें, हल्लीं आपल्यास इतर सुधारलेल्या राष्ट्रांतून दिसत असलेल्या नानाप्रकारच्या सुधारणा, कला, कौशल्ये, शोधकता यांजविषयीं त्यांचे औदासिन्य दिसतें. यांतही फारसे आश्चर्य नाहीं. परंतु आतां तो काळ गेल्यामुळे व लोक उदरभरणाविषयीं संचित असल्यामुळें सुधारलेल्या लोकांशी होइल तितकी बरोबरी करून संसारिक सुखवृद्धीकडे आपलीं मनें लावण्याची आवश्यकता प्राप्त झाली आहे, तर हे काम कसें होइल ? याचा विचार केला असतां प्रारंभींच म्हटल्याप्रमाणे चांगल्या उपयुक्त ग्रंथाची वृद्धि या देशांत सर्वत्र झाली पाहिजे हेंच उत्कृष्ट साधन दिसतें.

पूर्वीच्या लोकांत विवेक, चिकित्सा, तर्क हे गुण नव्हते असें नाही. परंतु ऱ्हासकाळ डोकावून बघत होता; त्याची फेरी आली तसे सर्व गुण समाधिस्थ होऊन सत्यज्ञान, दयागुण आणि यत्नबुद्धि यांजविषयीं सर्वांशांनी लोकांस विस्मृति झाली आणि त्यांचें जागीं असत्य, पाखंड, मनस्विता आणि जडता येऊन तत्संबंधानें जो द्रव्यव्यय होतो तो अर्थात् त्या त्या दुर्गुणांची वृद्धि करण्या-कडेच होतो हे स्पष्ट दिसत आहे. येणेंकरून उत्तरोत्तर सरस्वती, लक्ष्मी आणि अन्नपूर्णा या तिघी बहिणी या देशाचा त्याग करून परदेशवासी होऊ लागल्या. कोणतीहि गोष्ट क्रमशुद्ध आणि शालाशुद्ध राहिली नाहीं. श्रेष्ठ लोकांनी इतर लोकांस चांगले वळण लावण्याचा यत्न केला असतां तो सिद्धिप्रद होतो. परंतु श्रेष्ठ म्हणून मानलेल्यांची स्थितीच अशी आहे कीं, उपयुक्त कामांकडे त्यांची बुद्धीच वळत नाहीं. उपयुक्त गोष्टींत साह्य देण्यास सुदामदेवाच्या घरचें दारिद्र्य जणूं

काय त्यांच्या घरीं आले असतें. याचें अनुमान देशांतील अनेक सभा मंडळ्या, पुस्तकशाला, ग्रंथकार, उद्यम, व्यापार यांची कशी काय स्थिती आहे हें बघितलें म्हणजे सहज लक्षांत येइल. तेव्हां यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीची लालसा जी शून्यवत झाली आहे तिचा पुनरागमनप्रसंग यावा हे इष्ट आहे व तसा सुप्रसंग येण्याचीं सुचिन्हें भासूं लागून सज्ज्ञानोदयाचें दर्शक अशी ही चांगल्या राज्याधिकाऱ्यांच्या अमलांत सुप्रभात होऊ लागली आहे. तरी या देशावर फार दिवसांचा जो गाढ अज्ञानांधःकार पसरला आहे तो निस्तोष होऊन या सुप्रभातकालची स्वच्छ प्रभा सर्व भारतभर पसरण्यास कांही कालाची अपेक्षा आहे व त्यांकरितां सर्व देशहितैषी लोकांकडून होतील तितके प्रयत्न चालून त्यांची विद्या, ज्ञान, बुद्धि व धन यांचा या कृत्याकडे विनियोग झाला पाहिजे. म्हणून, प्राचीन सत्य इतिहास व सत्यतर्क हे वाढले पाहिजेत. हल्लीं आपणांस कापड, रेशिम, लोखंडाचे व तांबे व पितळेचे जिन्नस, कागद, साखर, कांच, इत्यादि जे उपयोगी पडत आहेत ते निर्माण करण्याचे हुन्नर कोठें व कसे चालतात या शोधाचे मार्गे लागून जे शोधेकबुद्धीचे लोक, यात्रेकरी कावड्ये प्रदक्षिणा करणारे व बैरागी यांचेप्रमाणें इतर सर्व विषयांचे संबंधाने विरक्ति धारण करून फिरण्यात उद्युक्त असतील त्या शोधक लोकांच्या जत्रा भरविल्या पाहिजेत. हरिद्वार, प्रयाग, नासिक, गया वगैरे क्षेत्रीं जाऊन आत्मोद्धारार्थ व पितरांस सद्गति मिळावी म्हणून जसे लक्षावधी नैष्ठिक लोक घरें दारें व चीजवस्तु विकून श्राद्धे व पिंडपितृयज्ञ वगैरे करितात, तसे या प्रापंचिक व व्यावहारिक विद्येच्या शोधार्थ आपल्या सर्वस्वाचा विक्रय करून यत्न करणाऱ्या बैरागी, गोसावी व यात्रिक वगैऱ्यांच्या झुंडी या देशांत उभ्या राहिल्या पाहिजेत. वेदांचे मंत्रजागर, भजनें, पुराणें, कीर्तनें आणि तर्कव्याकरणांचे पूर्वोत्तरपक्ष करून 'असं घटः' अयं पटः' म्हणून वादविवाद व कंठशोष करण्यास आजपर्यंत ठायीं ठायीं जमत आलेले व भरणारे समाज व सभा यांच्याप्रमाणे मोठमोठ्या वैद्यक, शरिक, यांत्रिक, राजकीय, व्यावहारिक, संसारिक, सामाजिक, शोधक आणि व्यापारवर्धक अशा नानाप्रकारच्या विषयांचे ऊहापोहार्थ सर्वदा व सर्वत्र समाज आणि सभा भरल्या पाहिजेत. आतां पूर्वीच्या ढंगांवर आणि भपकीवर जाऊन उपयोग नाही. आपले पूर्वीचे ग्रंथ व त्यातून निघालेलें ज्ञान व समजुती हीं गतार्थ झालीं असून त्यास आज कांहीच किंमत राहिली नाहीं हे समजलें पाहिजे व यास्तव उपयुक्त ज्ञान चोहोकडे प्रसिद्ध करण्याकरितां जी राष्ट्रे आज पुढे आहेत त्यांच्या तोडीचे ग्रंथ आपल्या लोकांत प्रसृत झाले पाहिजेत. या उद्देशानेंच प्रस्तुतचे मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा हेतु धारण केला आहे. यांत वर लिहिलेल्या उपयुक्त विषयांपैकीं यथावकाश अनेक विषयांचे विवेचन करण्याचे योजिलें आहे. त्याप्रमाणें हा प्रयत्न जर निर्वेधपणे चालून कांही अंशी लोकोपयोगी होइल तर आमच्या श्रमांचे साफल्य झालें असें मानावयास कारण होइल.

या पुस्तकात प्रसिद्ध होण्याकरितां व्यावहारिक, सार्वजनिक किंवा असेच दुसरे उपयुक्त विषय कोणीं पाठविले तरीं त्यांस यथावकाश स्थल देण्यांत येइल. मात्र ते विषय सुबोध, स्पष्ट अल्पविस्तृत आणि प्रौढ विचारांचे असावे. बाष्कळपणाच्या आणि व्यर्थ वाद वाढविणाऱ्या लेखांस आमच्या या पुस्तकांत स्थळ मिळणार नाही.

या पुस्तकांत जे निरनिराळे विषय येतील त्यांची पृथक पृथक पुस्तके बांधण्याच्या सोईसाठीं त्यांची पानें निरनिराळी छापण्याची व्यवस्था ठेविली आहे. बहुत दिवसांपासून लोकहिताच्या गोष्टीचे संबंधानें आमचा लिहिण्याचा क्रम आहे तो या प्रकारें स्वतंत्र रीतीनें व अप्रतिबद्ध चालविण्याचे मनांत आणून या मासिकपुस्तकास सुरुवात केली आहे. त्यांत निर्विघ्नता आणि हेतूंची सिद्धि ही त्या सर्वशक्त प्रभूच्या आणि ज्याच्या अमोघ व अपरिमेय पाशामध्ये हे सर्व विश्व सांपडले आहे त्या कालाच्या कृपेवर अवलंबून आहे.

लोकहितवादी

## ग्रामरचना, त्यांतील व्यवस्था आणि त्यांची हल्लींची स्थिती

या भरतखंडांत प्राचीनकाळीं वस्ती कशी झाली व त्याची व्यवस्था व राज्यकारभार कसा काय चालला होता हें शोधून पाहणें, अनेक मोठें बारकाईचें व शोधकतेचें काम आहे. या विषयींचा सविस्तर अितिहास -- लिहिलेला कोठेंहि आढळत नसून त्याच्या अतिप्राचीनत्वामुळे लोक तो विसरले आहेत. म्हणून एतद्विषयक कांहीं अुपयुक्त लेख लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे.

शोधांतीं, हा वसतिक्रम आणी ग्रामरचनेची व्यवस्था या देशांत ध्रुव-वंशीय वेनराजा याचा पुत्र पृथु* याणें लाविली, असा श्रीमद्‌भगवंतात कथाभाग आढळतो. हा पृथुराजा अितका सच्छील आणि अन्वर्थ राजा होता कीं – श्रीमद्‌भगवतांतील चोवीस अवतारांत याची गणना केली आहे. वरील कथाभाग असा आहे :--

चूर्णयन्स्वधनुःकोट्या गिरिकूटानि राजराट् ॥
भूमण्डलमिदं वैन्यः प्रायश्चक्रे समं विभुः ॥ २९ ॥
अथाऽस्मिन्भगवान्वैन्यः प्रजानां वृत्तिदः पिता ॥
निवासा कल्पयां चक्रे तत्र तत्र यथाऽर्हतः ॥ ३० ॥
ग्रामान्पुरः पत्तनानि दुर्गाणि विविधानि च ॥
घोषान्व्रजांश्च शिबिरा-न्नरान् खेटखर्वटान् ॥ ३१ ॥
प्राक् पृथोरिह नैवेषा पुरग्रामादि कल्पना ॥
यथासुखं वसन्ति स्म तत्रतत्राऽकुतोभयाः ॥ ३२ ॥

श्रीमद्‌भागवत, अ. १८, स्कं. ४.

भावार्थ-- "नंतर राजाधिराज वेनपुत्रानें आपल्या धनुष्याग्रानें–पर्वतशिखरें चूर्ण करून हे सर्व भूमंडल बहुतकरू साफ केलें. व प्रजेला अुदरभगार्थ त्या पितृवत् पृथुराजानें घरादारांची यथायोग्य योजना केली. ती अशी:— गांवे, नगरें, राजधान्या, अनेक प्रकारचे किल्लें, गौळवाडे, गोठे, सैन्याचे गोट, खेडीं, प्रांत अित्यादि संपूर्ण व्यवस्था पृथुराजाच्या पूर्वी नसून ती त्याणेंच केल्यानें सर्व प्रजा सर्वत्र निर्भय होऊन यथास्थित रीतीनें सुखेंकरून राहूं लागल्या."

या पृथुरायाचे नांव ऋग्वेद संहितेतहि प्रसिद्ध आहेः-

यद्वां कक्षीवाँ अुत यद्व्यश्व ऋषिर्यद्वां दीर्घतमा जुहाव ॥
पृथु यद्वां वैन्यः सादनेष्वेवेदतो अश्विना चेतयेथां ॥ १० ॥

ऋग्वेदसंहिता, अष्टक ५, आध्याय ८, वर्ग ३१

मनुसंहितेंतही या राजाच्या अुत्कृष्ट राज्यकर्तृत्वाबद्दल ख्याति लिहिलीं आहेः--

बहवोऽविनयान्नष्टा राजानः सपरिच्छिदाः ॥
वनस्था अपि राज्यानि विनयाप्रतिपेदिरे ॥ ४० ॥
वेनो विनष्टोऽ विनया-न्नहुषश्चैव पार्थिवः ॥
सुदामो यवनश्चैव सुमुखो निमिरेव च ॥ ४१ ॥

---

*वेनराजा अतिदुष्ट होता म्हणून त्यास ब्राह्मणांनीं शापून मारिले. परंतु त्याचे राज्यास अधिकारी पाहिजे यास्तव त्याचा देह मंथन करून त्याजपासून पृथु व अर्चि अशीं दोन पुत्रकन्या अुत्पन्न केलीं व तींच स्त्रीपुरुषें झालीं. (महाभारत, द्रोणपर्व अध्या. ६९. यावरून, बंधुभगिनींचे विवाह होण्याचा जैनधर्मग्रंथांत वर्णिलेला जो युगुलकाल, तसला काल पृथुराजाचे वेळेस असावा असें अनुमान होतें.

पृथुस्तु विनयाद्राज्यं प्राप्तवान्मनुरेवच ॥
कुबेरश्च धनैश्वर्यं ब्राम्हण्यं चैव गाधिजः ॥ ४२ ॥
मनुस्मृति, अ. ७ वा.

भावार्थ--"राज्यसामग्रीनें युक्त राजे असतां ते अविनयाने बहुत नष्ट झाले; आणि वनांत राहणारे राज्यसाम्रीविरहित असे राजे असतांही ते केवल विनयेंकरून राज्य पावले:-वेन, नहुष-राजा, सुदास नामक यवनराजा, व सुमुख नामक निमिराजा, हे सर्व अविनयानें नाश पावले, परंतु पृथु आणि मनु यांना विनयेंकरून राज्य प्राप्त झालें; कुबेराला विनयेंकरून धनाधिपत्य प्राप्त झालें; आणि विश्वामित्र हा क्षत्रिय असतां विनयेंकरून त्याच जन्मामध्यें ब्राह्मणत्व पावला."

सारांश हा विजयशील सत्पुरुष लोकप्रिय राजा होता. पृथुराजानें प्रजेपासून अुत्पन्नाचा सहावा भाग मात्र कराच्या रूपानें घेत जावा त्यांचे असें वर्णन आहे. याशिवाय, त्याचे पूर्वी या पृथ्वीवर व्यवस्थित वसतिक्रम नव्हता असें वर श्रीमद्भागवतांतून अुतरून घेतलेल्या प्रमाणावरून कळेलच. आता ही ग्रामरचना पृथुराजाने कोणत्या प्रांतीं चालू केली याबद्दलचा स्पष्ट खुलासा कळत नाहीं. तथापि, अुत्तर हिंदुस्थानांत ज्यास ध्रुवक्षेत्र म्हणतात त्या ब्रह्मवर्त प्रांतीं ही ग्रामरचना सुरू झाली असावी असें अनुमान आहे. व पृथुराजाची राजधानी गंगा-यमुनेच्या मध्ये अंतर्वेद म्हणून जी पुण्यभूमि म्हणतात ती असावी असा कित्येकांचा अभिप्राय आहे.

हल्लीं वसती झालेल्या बहुतेक प्रांतांस पूर्वी अरण्य अशी संज्ञा होती; व त्यांत वसती नसून या अरण्यांत जाण्याची देवलस्मृति निर्माण होईपर्यंत बंदी होती. क्वचित् कोणी तसल्या अरण्यांतून जाअुन आल्यास 'देवलांनें' त्याला पुनःसंस्कार म्हणून प्रायश्चित्त लिहिलें आहे:--

सिंधुसौवीरसौराष्ट्रां-स्तथा प्रत्यन्तवासिनः ॥
अंङ्गवंङ्गकलिङ्ऽन्ध्रान् गत्वा संस्कारमर्हति ॥-मिताक्षरा.

भावार्थ--'सिंध, काठेवाड गुजरात, म्लेंच्छदेश, बंगाल, बिहार, ओरीसा व तेलंगण या प्रांतीं गेलें तर पुनःसंस्कार मौजिबंधन केला पाहिजे."

आतां हल्लींच्या वसती झालेल्या प्रांतांस अरण्य किंवा वन म्हणत याविषयीं दाखले मिळतात व त्याचप्रमाणे पुढें ज्या पुरुषांनीं कित्येक प्रांतांत वसती केली त्या प्रांतांस त्यांच्या नांवांवर क्षेत्रें म्हणून म्हटलेलें आढळतें. लखनौ प्रांतास पूर्वी नैमिषारण्य म्हणत; गया प्रांतांस चंपकारण्य, गुजराथ प्रांतास अर्बुदारण्य हरिद्वाराकडील प्रांतांस अद्वैतवन, खंडवा प्रांतांस खांडववन, दक्षिण प्रांतांस दंडकारण्य अित्यादि नांवें असल्याचें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे कोंकण प्रांतास परशुरामक्षेत्र, दक्षिण प्रांतास रामक्षेत्र, गुजराथ प्रांतास कन्याकुमारीक्षेत्र अशीं नांवें असल्याबद्दल धर्मकार्यांतील कालदेशादि संकल-पोच्चारणांतून समजते. व त्यांवरून ते ते प्रांत त्या त्या पुरुषांनीं वसविले असावे असे वाटते.

वसती होण्यास चार गोष्टींची आवश्यकता आहे. अन्न, वस्त्र, जल आणि छाया. या चार गोष्टींची जेथें प्राप्ती आहे तेथें वस्ती करण्याला लोक लटकलेच समजावे. अन्न, वस्त्र आणि छाया हीं मनुष्यप्रयत्नानें दूरवरच्या प्रदेशातून आणून त्यांचा पुरवठा करतां ईरेल; परंतु जलाची वस्तीच्या कमास विशेष जरूर आहे. आपल्या या हिंदुस्थानांत वरील चारहि गोष्टींचे वैपुल्य असल्यकारणाने कोठेहि वसती करण्यास अडचण पडत नाहीं मोठमोठ्या नद्या चोहोंकडे घोंवावत आहेत. अनेक प्रकारचीं धान्ये, फळमूळे, कंद, शाकभाज्या यांचे पीक फार व अुत्तम आहे. अच्छादनास कापूस, रेशीम, ताग, लोंकर वगैरेंची बिलकुल कमताओी नाहीं; आणि अनेक प्रकारच्या प्रचंड वृक्षांची राने जिकडे तिकडे यथेच्छ आहेत. येणे करून जल, अन्न, वस्त्र आणि छाया यांचा तोटा बिलकुल नाहीं. परंतु अितक्याहि गोष्टींची अनुकूलता असून प्रजासंरक्षक राजा मात्र

जुलमी, लोभी, दुष्ट, अपहारी व क्रूर अशा दुर्गुणांचा नसला पाहिजे. तरच लोक सुखसंपत्तीने युक्त होऊन वृद्धी आणि आबादानी पावतील.

पहिल्यापासून हा देश मोठा विस्तृत असून त्यांत अन्नपाण्याची समृद्धी फार; परंतु त्या मानानें त्यांत वसती करणारीं माणसें कमी असल्यामुळें पूर्वीपासून प्रजावृद्धि करण्याकरितां बहुत अुपाय आणि प्रयत्न करण्यांत येत असत. गरिबांची लग्नें करून त्यांस इनामें. घरें, अग्राहार, वतन, वर्षासनें, नेमणुका वगैरे करून देण्यांत मोठें पुण्य गणिलें आहे व त्याचप्रमाणें, कुटुंब-वत्सल, सपत्नीक, पुत्रवान असे जे पुरुष असतील ते अधिक पवित्र गणले आहेत. तसेंच पुत्रावाचून सद्‌गति नाहीं, म्हणून विधूर असूं नये, कुमारिका राहूं नयेत, अित्यादि अुल्लेख धर्मशास्त्रांत आढळतात. त्याचें कारण तरी वसती आणि लोकवृद्धि व्हावी हाच हेतु असावा असें वाटतें. परंतु आतां पूर्वींचा काळ राहिला नसून हल्लीं प्रजावृद्धि कमी कोणत्या उपायांनी होअील याविषयीं लोकांस विचार पडला आहे. कारण प्रजावृद्धीचें सर्वांस मोठें संकट वाटत आहे!

ग्रामरचना झाली व ठिकठिकाणीं लोकांनी वसती करून त्यांत त्यांनीं आपआपल्या निर्वाहाकरितां जमीनी, शेतें, बागा, मळें वगैरें व्यवस्था करून घेतली. परंतु प्रत्येक गांवाला जें निरनिराळें नांव आहे तें कोणत्या आधारानें कसें दिलें आहे याजविषयीं कांहीं बरोबर नियम सांगतां येत नाहीं. कित्येक गांवांची नांवें झाडांवरून दिलेलीं सांपडतात. जशीं– आंबेगांव, बोरगांव, वडगांव, पिंपळगांव, अुंबरगांव, निंबगांव, बाभूळगांव, करंजगांव, सावरगांव, टाकळगांव वगैरे. याजवरून प्रथमतः ज्या ठिकाणीं वस्ती केली तेथें तीं झाडें असतील असें वाटतें. कांहीं पदार्थांवरून नावे पडली आहेत असें दिसतें, तीं– दूधगांव, दहीगांव वगैरे. धातु वगैरेंवरून दिलेलीं नावें आढळतात तीं– लोहोगांव, सोनगांव, डोंगरगांव, रांजणगांव वगैरे. कांहींस ठाण-म्हणतात– चिखलठाण, मलठाण, वालठाण, वगैरे. कित्येक संख्यावाचक असतात– चाळीसगांव, तीसगांव, सुरत-चौऱ्यांयशी वगैरे. कितीएक फळ या नांवांनी प्रसिद्ध आहेत. धांदरफळ, ढाकेफळ, खुटेफळ अित्यादी. कांहीं मूळ पुरुषांचे नांवांवर प्रसिद्ध आहेत– नारायणगांव, रहिमतपूर, जामनगर वगैरे. किती अेक गांवांस घर म्हणतात, कितीएकांस देव म्हणतात, व कित्येकांस गण म्हणतात.– रुईघर, थिटेघर, मांढरदेव, नरपदेव, मांडवगण, डोंगरगण वगैरे. एकाच नांवांची दोन गावें असली तर ओळखीकरितां खुर्द व बुद्रुक अशीं विशेषणें लावतात किंवा दुसरीं कांहीं खुणेची नांवें देतात– बसवंताचें पिंपळगांव, पिंपळगांव गरुडेश्वर, शिंपेटाकळी, मारुतीची टाकळी; कंदाची लोणी, ढमढेऱ्यांचें तळेगांव, जाधवांची वाघोली वगैरे. याप्रमाणें अनेक प्रकारांनी अनेकांनीं गांवास नांवें दिलीं असून ग्रामरचना झाली आहे असें दिसतें.

जेथें गांव वसले तेथें त्याचे भोंवतालची जमीनहि धरली जाऊन–सोईप्रमाणें व निरनिराळ्या खुणेसाठी त्या जमीनींस पूर्वी ठिकीं व शेतें अशीं नांवे दिलेली आढळतात. परंतु हल्लीं ठिकी व शेते हीं खुणेचीं नावे बदलून त्यांचे जागीं सरकारनें नंबर लाविले आहेत. ठिकी वगैरे नांवें देण्याची पूर्वींची रीती हो कांहीं बावगी होती असें नाहीं. अशीं नांवें देण्याचा हेतु अितकाच कीं, त्याशिवाय धनीपणा मजबूत होत नाहीं. मोराचें ठिकें, पिंपरणीचें ठिकें, अित्यादि नांवें वर लिहिल्याप्रमाणें दिलेली आढळतात. आतां ह्या जमीनी अनेक प्रकारच्या असतात. व त्यांच्या गुणांवरून त्यांचे काळी, बर्डी, पांढरी, गांवकुसीची, भातखाचराची वगैरे वर्ग केलेले असून त्यांत अुत्तम मध्यम व कनिष्ठ अशा प्रती असतात. यांत नानाप्रकारची पिकें होतात बाजरी, गहूं, तांदूळ, अुंस, भाजीपाला वगैरेंची पीक निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींत होतें. याचप्रमाणें मैदानें, खोरीं, मूरीं, नहरें, नेर किंवा नेहेर, रानें, जांगळ, दर्यागर्क, जंगलगर्क, नदीगर्क, लवण, कोतरें वगैरे नाना प्रकारची जमीनींवरून गांवांस नांवें दिलेलीं असतात. साधारण साफ जमीनीवर वसती झालेले गांवांस मैदान म्हणतात. दोहों बाजूला डोंगरांच्या ओळी असून मध्यें वाहणाऱ्या नदीचें

कांठी जी वस्ती होते त्या गांवास खोरी म्हणण्याचा परिपाठ आहे. जसें– पौडखोरें, मुसेखोरें परळखोरें वगैरे. भामनेर, कुकरनेर, भिन्नेर, संगमनेर वगैरे नद्यांवरून नांवें पडलेलीं आहेत. जांगलदेश म्हणजे नद्यांचे अुगमाकडे मोठी रानें असून त्यांत धनगरांचे महाल असतात ते. हे धनगर म्हशीं, मेंढरें वगैरे राखून आपला निर्वाह करितात. म्हशींचे लोणी, तूप आणि मेंढरांची लोंकर हीं विकून त्यांजवर निर्वाह चालण्यास धनगरांना कठीण पडत नाहीं. त्यांत मेंढरांची अुत्पत्ती फार असल्यामुळें धनगरास-त्यांजपासून मोठें अुत्पन्न होतें. तरी त्यांस रोगांचेंहि मोठें भय असून त्यांची जितकी उत्पत्ति होते तितकी सर्व त्यांचे पदरांत न पडतां सुमारें तिच्या अर्धीच पडते. सोलापुरप्रांती डोंगरी प्रदेश पुष्कळ असून त्यांत बारीक गवत मात्र होतें. धान्य होत नाहीं. म्हणून अशा प्रदेशांत मेंढरें चारण्याची वहिवाट आहे व त्या संबंधानें धनगर, गुराखी यांची वस्ती त्या प्रदेशांत पुष्कळ आहे.

जमिनींतील मुख्य भेद कुमरी, डोंगरी, जिराईती व बागाईती असे असून पिकांमध्ये खरीफ व रब्बी असे दोन प्रकार आहेत. खरीफाचे पिकांत बाजरी, अुडीद, मूग वगैरे काठवण धान्य होतें, आणि रब्बींत गहू, हरभरा, जोंधळा, हीं धान्यें होतात. प्रत्येक गांवची जमीन जशी चांगली किंवा वाईट असेल त्याप्रमाणें तो गांव खरीफाचा किंवा रब्बीचा समजला जातो. बहुतकरून जमीनींत अेकच पीक होतें. रब्बीच्या पिकास जमीन चांगली पाहिजे. कारण, तिजमध्यें जें पीक होतें तें पावसावर नसून, अगोदर पडलेल्या पावसाचीं जी ओल ती जमीन घेऊन बसते त्या ओलीवर असते. व अशी ओल धरणारी जमीन म्हणजे डोंगरी किंवा बरड नसली पाहिजे. तर मऊ, काळी व मातीच्या पुष्कळ जाड थरांची पाहिजे तेव्हां ती ओल पिकास पुरते. कित्येक जमीनींत दोन्ही प्रकारची म्हणजे खरीफाचीं व रबीचीं पिकें होतात. कोंकणांतील तांदुळाच्या वगैरे जमीनींतून तर तीन तीन देखिल पिकें होतात. त्यात पिकें काढण्याची मात्र युक्ती आहे. म्हणजे, अमुक पीक काढले म्हणजे अमुक पीक काढावें असा नियम आहे. तो नियम राखून पिकें काढावी लागतात.

जमिनीस मुख्य खत अुन आहे. जमिन चांगली तापेल तर पीक चांगले येअील. हें स्वाभाविक खत झाले. याशिवाय राख, शेण वगैरेचींही खते जमीनींत घालावी लागतात. परंतु ज्या देशांत लाकडांचा तोटा असतो तेथे गोवऱ्यांचे जळण होऊन शेतास लागणाऱ्या खताचे वांट्यास शेण येत नाहीं. अशा ठिकाणीं शेतांतून कित्येक दिवस बकरी बसवतात. म्हणजे त्यांच्या लेंड्यांचे खत होते. जिराअिती जमीनींपेक्षा बागाअिती जमीनींस खत फार लागते व त्या करिता कांतड्यांचा चुरा, मासळीचा कुचा, अनेक प्रकारचे कुजलेले व वाळलेले पाले वगैरे खतांचा अुपयोग करावा लागतो. खत जास्त घातले तर त्या मानानें पाऊसही जास्त पडला पाहिजे. नाहीं तर खताचे अुष्णतेने पीक नासेल. ज्या जमीनींत अुंसाची लागवड होते त्या जमीनींत खत फार घालावें लागतें व त्याचप्रमाणे त्यास पाणीही विपुल पाहिजे, आणि येवढ्याकरितां बागाअिती जमीनीशिवाय अुंसाची लागवड दुसऱ्या कोणत्याही जमीनींत होत नाहीं. केळीची लागवडही खतापाण्यावरच अवलंबून आहे. व रताळी, भुअीमूग वगैरेसही खतापाण्याचें साधन पाहिजे. तरी या पिकांस अनुक्रमे अुंसापेक्षां कमी कमीच खतपाणी पुरते.

मोठ्या अुत्पन्नाच्या पिकांत तंबाखु व अुंस मुख्य धरितात. तंबाखुचे अुत्पन्न दर बिघ्यास शंभर रुपये होतें व त्याचप्रमाणें अुंसाचे अुत्पन्न दर बिघ्यास दोनशें रुपये होतें. परंतु तंबाखूपेक्षां अुंसाला मेहनत फार लागून त्याच्या नुकसानीच्या वाटाही फार आहेत. अुंसाला कीड लागण्याचें भय आहे तें तंबाखुला नाही. त्याचप्रमाणें अुंसाला कोल्हे वगैरे अुपद्रवी जनावरांची मोठी भीति आहे ती भीति तंबाखुला नाहीं. तंबाखूला कीड लागत नाहीं व कोल्हे वगैरे खादाड जनावरांचा अुपद्रव होत नाहीं व यामुळें बहुतकरून तंबाखूचे आलेले पीक पदरांत पडतें. परंतु ही गोष्ट अुंसाची नाहीं.

यामुळें अुंसाचे पीकांत नफा होअिलच अशी खात्री नसून कधीं कधीं त्याचा खर्च शेतकऱ्याच्या अंगावर पडून कुळंवी साफ बुडून जातो. सर्व व्यापार रोजगारांत जसें प्रारब्ध किंवा नशीब आहे. तसेंच शेतीतही नशीब आहेच. जें पेरिलें त्यास पाअुसपाणी वेळच्यावेळीं यथास्थित मिळत जाअुन, नुकसान किंवा नासधूस, चोऱ्या, जनावरांचे अुपद्रव, कीड, टोळधाड वगैरे व्याधी त्यास नसले तर मग शेतकऱ्यांसारखे सुखी व श्रीमान दुसरे कोणत्याही धंद्याचे लोक नसते. परंतु तसें कोठें आढळत नाहीं. सर्व देशाचें जीवन ज्या शेतकरी लोकांवर, त्याची स्थिती जितकी चांगली असेल तितकी अिष्ट आहे. पण त्याचे विरुद्ध प्रकार आपल्या दृष्टीस पडतो. याचें कारण वरील व्याधी होत. मनासारखा वेळच्यावेळीं पाअुस पडत नसून, दहा वर्षांत अेक दोनदां चांगलें पीक येतें. जिराअिती जमीनीस तर हें पावसाचें मोठेंच भय आहे. आणि हिंदुस्थानांतील पावसाची अितकी चमत्कारिक स्थिती आहे की बैलाचें अेक शिंग भिजतें परंतु दुसरें कोरडेंच राहतें असें म्हणतात. याशिवाय तालुक्यांतील दहा गांवी पाअुस पडत नाही, बाकीच्या गांवी पडून पीक चांगले होतें, अितकेंच नव्हे, तर अेकाच गांवातील दहा शेतांवर पाऊस पडत नाहीं आणि बाकींच्यावर पडून शेते चांगलीं पिकतात अशीं ठिकठिकाणीं शेकडों अुदाहरणे आढळतात. तसेंच कधीं कधीं अतिशय पाऊस पडून पेरलेले धान्य कुजून किंवा वाहून जातें. याप्रमाणें अवर्षण आणि आवर्षण होऊन पिकें बुडतात अनावर्षण, पांखरें, राघू, अुंदीर, घुशी, किडे, टोळ, नाकतोडे वगैरे क्षुद्र जीवांचा अुपद्रव, कोल्हे, हरणे, डुकरे, आणि चुकार व मुद्दाम घातलेल्या जनावरांच्या खादीः त्याचप्रमाणे चोर, भिकारी, राजांचे मनस्वी सारे, आणि गांवकरी लोकांच्या व शेजारचे शेतकऱ्यांच्या अदावती, द्वेष व मत्सर यांमुळे होणाऱ्या नुकसानी वगैरेंची शेतकऱ्यांस फार भीति असते. आपसांतल्या कलागती आणि दावे कमी नुकसान करितात असें कोणीं समजूं नये. अदावतदार दुष्ट लोक आपल्या शत्रूचें शेत चांगलें आलेलें बघून रात्रीं बेरात्रीं त्याच्या शेताचा कुंप अुसकटून टाकतात. त्याचीं कृषिकर्मोपयोगी गुरें विष घालून मारतात, त्याच्या अुभ्या पिकांत खुशाल चरावयांस गुरे सोडतात, चोरटेलोकांस फूस देऊन त्यांजकडून शेतांतला माल चोरवितात, अथवा यापेक्षांही अत्यंत घोर व अधमपणाचा अुपाय म्हणजे त्या शेतकऱ्याच्या तयार झालेल्या व शेतांत रचून ठेवलेल्या मालास बेलाशक आगी लावून तो जळून फस्त झाला म्हणजे समाधान पावतात. याचप्रमाणें भिकाऱ्यांचाही अुपद्रव कमी नसतो. जमींनी पिकल्या कीं, भिकाऱ्यांची अुडी त्यांजवर आलीच भिकाऱ्यांचा अितका त्रास असतो कीं, पिकाचा अष्टमांस तर हे याचकच खाअुन जातात. मागणारांमध्ये बलुते, गोसावी, ब्राह्मण वगैरे लोक असून ते गांवची शींव फिरून पेंढ्या, कणसे, दाणे, अुंस, गुळ, रस वगैरे जें मिळेल तें घेत असतात. आतां यांत बलुते हे गांवचे काम करणारे म्हणून हक्काने आपला वांटा मागतात. तेव्हा त्यांस निष्कारण भीक मागणारे असें म्हणवत नाहीं. परंतु अितर भिकाऱ्यांचा त्रास मनस्वी असतो. अशा नानाप्रकारच्या अधिव्याधि शेतकऱ्यांचे मागें असतात. जीं गावें जुटीचीं, अभिमानाचीं, आणि आपण अेका धंद्यातले सर्वजण अेकमेकांचे भाअु आहोंत असें समजणारे लोक जेथें असतात, तीं गांवे वरील मानवी अुपद्रवाच्या भीतीपासून अगदीं मुक्त असतात. परंतु अशीं सुदैवी व सुखी गांवें फारच थोडीं असतील. या जगावर सर्वत्र द्वेष, अदावती, कलह, मत्सर परोत्कर्षासहिष्णुता, अपहारबुद्धि, आलस्य, कपट, ढोंग वगैरे दुर्गुणांचे वास्तव्यच फार असल्यामुळे कोणताही व्यापार, अुदीम, रोजगार किंवा धंदा पाहिला, तर त्यामध्यें ईश्वरी संकटांनीं आणि आपत्तींनी होणाऱ्या नुकसानींपेक्षा वरील मानवी दुर्गुणांनींच लोकांस बहुत आपत्ति, दुःखें नुकसानी आणि अपयशें सोसावीं लागतात असें दिसतें.

गांवांचें मुख्य भूषण शेतकी, आणि शेतकीची मेहनत करणारीं मुख्य जनावरें आहेत. बैल, टोणगे, (रेडे, हेले) व घोडीं, गाढवें ही जनावरें शेतीच्या कामांत प्रमुख आहेत. शिवाय दुभत्यास म्हशी, गाअी, शेळ्या, मेंढ्या हीं जनावरे मुख्य आहेत शेताचे कामांस घोडीं, गाढवें, व

खेंचरें लावण्याची आपल्या अिकडे वहिवाट नाहीं यूरोपांत घोड्यांचा अुपयोग शेतकामांकडे करितात व अेशियाखंडातील अर्बस्थान, तुर्कस्थान व तार्तरी देश वगैरेंमध्ये गाढवें व खेंचरें यांचा अुपयोग होतो. परंतु आपल्या अिकडे बैल व रेडे यांचा मात्र अुपयोग करितात. वरील सर्व जनावरांचे निर्वाहास कुरणें, पडीत जमीनी, रानें, डोंगर वगैरे प्रत्येक गांवांत असले पाहिजे. त्यांवाचून जनावरांचे रक्षण नाही. म्हणून प्रत्येक गांवांत गुरांस चरावयास व अुभें राहावयास पुष्कळ जमिनी पडीत टाकून ठेवितात. आणि त्यांजमध्यें कोणासही लावणी करू देत नाहींत. आठ महिनेपर्यंत त्यांत गुरे चरतात व पुढें उन्हाळ्यांत तोटा आल्यास शेतांत होणाऱ्या धान्याचा कडबा, ताटें, काड्या वगैरे जीं साठवून ठेविलीं असतात, त्यांवर त्यांची गुजराण होते. याजवरून, कुरणे वगैरे शिवाय जनावरें राहणें नाहीं, जनावरांवांचून शेती नाहीं, आणि शेतीवांचून गांवाची वस्ती होणे नाही. तेव्हां जमीनी, जनावरें, शेती आणि वस्ती मिळून ग्रामरचना होते.

वर अेके ठिकाणी असें म्हटलें आहे कीं, वस्ती होण्याला अन्न, पाणी, आच्छादन आणि छाया अशीं चार साधनें मुख्य आहेत. अन्न, पाणी आणि आच्छादन (वस्त्रें वगैरे) यांची समृद्धि जशी हिंदुस्थानांत पहिल्यापासून आहे तशीच छायेच्या संबंधानेंही हिंदुस्थानांत कोणत्याही प्रकारानें आपत्ति नाही याविषयीं आपणामध्ये अशी म्हण चालू आहे. कीं, "घरावांचून बायको नाहीं व घरांवाचून मनुष्य नाही" म्हणजे प्रत्येक मनुष्यास छायागृह आहेच. या छायागृहांचे प्रकार अनेक आहेत, दगडी धाबी, गच्ची, कुअिटारू, कौलारू वगैरे. काशीकडे दगडी घरें असतात. औरंगाबाद खानदेश वगैरेंकडे धाबी घरें आहेत. धाबी घरें म्हणजे खळगा अेक प्रकारची माती असते ती घरावर पसरतात. त्या मातीचा गुण हा आहे कीं, ती पाण्यानें भिजत नाहीं. घरांवर जसी ही माती घालतात तसाच घरांवर चुना घातला म्हणजे तीं गच्चीची घरें होतात. कुअिटारू म्हणजे गवत किंवा पाने यांची छायाकरून जीं घरें बांधितात तीं. आणि कौलारू घरे तर प्रसिद्धच आहेत. कौलांमध्ये अनेक प्रकार आहेत. त्याप्रमाणें जशीं ज्यांस कौलें आवडतील तशीं तो आपले घरावर घालितो. कोंकणप्रांतांत नळीच्या कौलांचाच विशेष परिपाठ आहे. सारांश, छायागृहाला जीं लांकडे, दगड, माती, झाडपाला, गवत, वगैरेंची आवश्यकता तीं येथें विपुल मिळतात. तसेंच घरांच्या भींतींस वगैरे कूड करण्याला कारव्या, बांबू, तुऱ्हाट्या वगैरेंचेंही अिकडे दुर्भिक्ष नसल्यामुळें सर्वांस छायेचें म्हणून संकट नसून त्यामुळें गांवे वसण्यास हरकत पडत नाहीं. या देशाची हवा साधारणतः समशीतोष्ण असल्यामुळे साधारण मनुष्यासही आपल्या छायागृहाची जुळवाजुळव करण्यास फारसे आयास पडत नाहींत. आणि कसलीही पर्णकुटी असली तरी शेणमाती व पाणी यांनी तिला शोभा येअुन तींत जी स्वच्छता वाटते ती म्हणजे अगदीं यःकश्चित नसते.

या प्रमाणें ग्रामरचनेचा प्रकार झाला. आतां त्यांतील व्यवस्था कशी काय असते ती आपल्याला पहावयाची आहे. प्रत्येक गांव म्हणजे अेक चिमुकलेंसें राज्यच असून त्यांत तेथला पाटील हा राजा, कुलकर्णी हा प्रधान आणि यांशिवाय चौधुले व रखवालदार असे त्यांचे साह्यकर्ते कामदार असतात. तसेंच गांवांत, सुतार, लोहार, चांभार व महार हे पहिल्याप्रतीचे बलुते असून गांवच्या अुत्पन्नावर त्यांचा हक्क सर्वांत जास्त असतो, आणि कुंभार, न्हावी, परीट व मांग हे दुसऱ्या प्रतीचे बलुते असून गुरव, जोशी, भाट व मुल्लावर हे तिसऱ्या प्रतिचे बलुते असतात. यांस गांवकरी लोकांकडूनच हक्कांचें देणें काय मिळवयाचें असेल तें मिळतें. यांशिवाय जे कसब्याचे मोठे गांव असतात तेथें पोतदार, वेसकर, जंगम, शिंपी, डौरी, तेली, माळी, गोंधळी, तांबोळी, धिसाडी, तराळ, कोळी वगैरे कित्येक वतनदार व हक्कदार आणखी असतात. गांवांतील रयतेस सर्व पदार्थ मिळतातच असें नसून त्यांच्या गावांत होणारें धान्य, भाजीपाला वगैरे मात्र त्यांस मिळतो. परंतु मीठ, हळद, जिरें, मिरें, हिंग मसाला वगैरे त्यांस बाहेर गांवी कोठें बाजार असेल तेथून किंवा कसब्यांतून आणावें लागतें. याकरितां बहुशः अशा बऱ्याच लोकवस्तीच्या गांवात

आपला निर्वाह होण्यासारखा रोजगार चालण्याचे धोरण असेल तर तेथें कोणीतरी मारवाडी, गुजर, किंवा वाणी बकाल येवून आपलें दुकान थाटतो. अथवा फिरते बाजारकरू असतात ते प्रत्येक दिवशीं नियमानें अेकेका गांवीं बाजार भरवितात, व त्या बाजाराच्या दिवशीं तेथील लोक आपल्या घरांत मीठ मिर्चीवा आठ दिवसांपुरता पुरवठा करून ठेवितात. अशा गांवांतल्या लोकांमध्ये पैशाचा आयव्यय थोडाच होत असून गांवचे लोक जो पदार्थ घ्यावयाचा त्याचे बदला आपल्या जवळचें धान्यधुन्य देअुनच वाण्याकडून ते ते पदार्थ घेतात. सर्व गांवांत सर्व पदार्थ पिकतातच असें नाहीं. कापूस, धान्य, गूळ, मिर्च्या, घने, वगैरे जो जिन्नस ज्याजकडे होईल तो त्यानें मोबदला करून आपल्याला लागणारे पदार्थ खरेदी करावे असा गांवांतून परिपाठ असतो.

वर जे तीन प्रकार बारा बलूते सांगितले ते सर्व अुपयोगी व कारागीर लोक असून सर्वांच्या सुख-सोअीकरितां त्यांचे हक्क गांवच्या लोकांनी कबूल केलेले असतात. शेतकीचीं आऊतें वगैरे करण्यास व घरें बांधण्यास सुतारांची जरूर विशेष असते. याचप्रमाणे लोहार हे लोखंडी काम करण्यास पाहिजेत. जोडे, मोटा, दोरखंड, दोऱ्या वगैरे करण्यास महार, चांभार व मांग आणि याचप्रमाणें न्हावी, धोबी वगैरे लोकांची आवश्यक कामांकरितां योजना केलेली दिसते. अशाप्रकारची योजना नसली तर गांवकऱ्यांचें एकमेकांवांचून अगदीं अडून राहिलें असतें. मग जें काम करावयाचें त्याकरितां शेजारच्या गांवी किंवा कसब्यांत जावून तेथून त्या कारागिरास बोलावून आणावयाचें या बोलावण्यावर त्या कारागिराला त्या गांवीं जाण्यास फावले पाहिजे, व तो गेला असता अेका दिवसाच्या मजुरीबद्दल त्यास जातां येतां दोन दिवसांची मजूरी मिळाली पाहिजे, तरच तो तें बोलावणें पतकरणार येणेंप्रमाणें दुप्पट मजुरी जावून शिवाय त्या कुळंब्याचा दोन दिवस खोळंबा व्हावयाचा तो होणारच व या खोळंब्यांत त्यांचे किती नुकसान होण्याचा संभव आहे या विषयींचा कल्पना वेगळीच. अतअेव, वरील प्रकारची बलुत्यांची योजना फार चांगली असून तेणेंकरून गांवचा वसतिक्रम सोईचा चालतो.

कित्येक गांवांचे व्यापार व मुख्य मुख्य कामें ज्या अेका मोठ्या गांवांत चालतात त्यास कसब्याचा गांव म्हणतात. कसब्यांतील बलुते मेहेतरे हे असून यांची योजना विशेष प्रकारची व जास्त अधिकाराची असते. प्रांतांखाली अनेक कसबे व गांवें असतात आणि तेथील अधिकारीही मोठाले असतात. देशमुख, देशपांड्ये, नाडगौड, मुजुमदार, अमीन, हेजीब, यादीं वकील, मुश्रीफ, काजी, चिटणीस वगैरे प्रांतांचे वतनदार असतात व त्यांस देशाधिकारी म्हणतात. गांवाच्या, कसब्याच्या व प्रांताच्या सर्व वतनदारांचा पूर्वी मोठा मान असे. सरकारास जमीनींची वगैरे जीं कामें पडत त्यासंबंधानें त्यांजकडून मोकद्दमास व देशाधिकाऱ्यांस पत्रें जात. जमीनींचे वसूल वगैरे देशाधिकारीच करीत व रयतेच्या तर्फेचें जें कांही सरकाराशीं काम पडे तें त्यांजकडेच असे. या कामाचे संबंधानें त्यांस दफ्तर ठेवावें लागे व त्याकरितां त्यांजकडेच जमीदारी असे. सुटींची वगैरे सरकाराशी जी बोलणी व्हावयाची ती सर्व त्यांचे मार्फत होत. सारांश, रयतेच्या सुखाच्या, कल्याणाच्या आणि आबादीच्या ज्या कांहीं गोष्टी त्या सर्व या देशाधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या असत. त्यांच्या तोंडून सरकारानें रयतेच्या तक्रारी, अर्ज्या, दुःखे व मागण्या वगैरे ऐकाव्या अशी पूर्वी वहिवाट होती व ही वहिवाट हिंदुराजे, मोंगल बादशाह आणि मराठे यांचे कारकीर्दीपर्यंत अव्याहत चालू होती. पूर्वी लोकांमध्ये या देशाधिकारी वतनदारांचा मान मोठा असे व हल्लीही कोठें कोठें जेथें अजून पुरीशी अिंग्रजी राज्यव्यवस्था सुरु झाली नसून जुन्या रीतीनेंच गांवाचे कारभार चालत असतात तेथें तेथें या वतनदारांचे मानपान बरेच चालतात. तेथें लग्न कार्यात देशाधिकारी व गांवचे जमीनदार यांस आग्रपूजेचा मान असतो. त्याचप्रमाणे वतनदारांचीही प्रतिष्ठा मोठी असून रयतेच्या तर्फेचा सर्व मानपान त्यांस मिळतो. वतनदारांमध्ये निरनिराळे वर्ग असून त्यांच्या त्यांच्याहक्काच्या शाखा वेगवेगळ्या आहेत. बाजारावरील व पेठेवरील आणि त्याचप्रमाणे अितर महत्त्वाच्या कामांतील

वतनदार शेट्ये, महाजन, डांगे, पथकी, अवटी, दाणी अित्यादि असत. कोणताही हस्तलेख (दस्तैवज) करणें झाल्यास ह्या वतनदारांनी लिहावा; अितर जमीनीदारांनी त्यावर सह्या कराव्या, आणि काजीने त्यावर मोहर करावी असे पूर्वीचे दस्तुर होते. परंतु ह्या व्यवस्था हल्ली दरोबस्त बंद होअुन त्यांचे ठिकाणी रजिस्टर ऑफिसें केली आहेत. ह्या फेरबदलीचा परिणाम अितकाच दिसतो की, पूर्वीचे राजे रयतेवर व जमीनदार वतनदार यांजवर भरंवसा ठेवून राज्यकारभार चालवीत होते. व म्हणून ते आपल्या लोकांकडे मोठमोठे अधिकार व हक्क ठेवून त्यांचे हातून कामें घेत होते. तो प्रकार नाहींसा झाला.

पहिली वतनदारांची प्रतिष्ठा व अब्रु मोठी असल्यामुळे त्यांस शाश्वत अधिकारी म्हणत. मामलेदार वगैरेंचे जे अधिकारी ते अशाश्वत होत. म्हणून पूर्वीचे राजे व सरदार, जिकडून आपण वतनदार होऊं तिकडून प्रयत्न करत : शाहूराजानें दिल्लीहून बादशहाकडून सरदेशमुखीची सनद घेतली, शिंदे व होळकर आपल्यास पाटील म्हणवीत; याप्रमाणेंच सर्व सरदार वगैरे शाश्वत अधिकारी होण्याविषयीं नेहमीं प्रयत्न करीत. आणि ही गोष्ट खरी आहे कीं, कितीही मोठाल्या दौलती असल्या तरी त्यांचा भरंवसा नसे. परंतु वतनदारी ही वंशपरंपरा अव्याहत चालावयाची असा ठराव असल्यामुळें त्यांचे वैभवास शाश्वत असे. नानाफडणीस यांची येवढी मोठी दौलत होती. परंतु ती कोणीकडे गेली त्याचा पत्ता नाही. तरी त्यांचे वंशाकडे वेरूळची देशमुखी अजून चालू आहे. याचप्रमाणें सेनापती दाभाडे, राजेबहादर वगैरे सरदारांच्या बड्या बड्या दौलतींचा चक्काचूर झाला तरी त्यांची वतनें व तत्संबंधी मान कायम आहेत व असा अनुभव आहे* वरच्या-सारख्या पराक्रमी सरदारांनी बहुत दौलती कमावल्या; परंतु त्यांचा त्यांस विश्वास नसे. त्यांणीं हरप्रयत्नानें आपल्याकडे कांही तरी आणि कोठेंतरी वतनदारी करून ठेवावी असा त्यांचा संप्रदाय दिसतो. त्यांणी ह्या वतनदाऱ्या आपल्या नावें करून त्यांची वहिवाट करण्यास गुमास्ते नेमावे अशी वहिवाट असे. शिवाय, पूर्वी अशी एक विशेष व्यवस्था असे कीं, बुडालेलीं वतनें, पहिले दाखले व कागदपत्र पाहून पुनः नवी करून देत. परंतु हल्लीं या सर्व व्यवस्थांचा अभाव होअुन वतनें निरंतर चालूं न देण्याकडेसच अिंग्रज सरकारचा कटाक्ष दिसतो. यामुळे देशाधिकारी व वतनदार सर्व कामांतून दूर होऊन, जी कोठे गांववतनें शिल्लक आहेत तींही खाली होतील तितकी करण्याचा सरकारचा क्रम चालू आहे. व या क्रमास सुलभ पडावे म्हणून, जे कोणी बिचारे आपली वतनदारी आजपर्यंत भोगीत आले त्यांजवर जोखीम व जबाबदाऱ्या फार ठेविल्या असून, अेका-कडून जर कांही गुन्हा घडला तर त्याचे वंशाकडील सर्व वतन एकदम खालसा केले जातें! अशा अनेक अडचणींनीं त्यांचा अभिमान व कैवार प्रस्तुतच्या सरकारास न राहिल्यामुळें पूर्वीच्या ग्राम-रचनेंत वतनदारीच्या संबंधानें जी सुव्यवस्था व चिरस्थायिता होती तिला व नष्टदशा प्राप्त झाली आहे! कितीअेक गावी सिळोत्री हे बलुतेदार असून त्यांजकडे भातखांचरांच्या बांधांची** कामें त्या त्या गांवच्या लोकांनी सोपविली असतात व त्याबद्दल अितर बलुतेदारांप्रमाणेंच त्यांसही गांवच्या उत्पन्नाचा हक्क दिलेला असतो. आतां मात्र हे हक्क दिवसानदिवस कमी कमी मानावर येत चालले आहेत!

---

*देवगिरीचे (दौलताबादचे) राजे जाधव होते. त्यांचें सर्व राज्य गेले तरी, त्यांची देअुळ-गांवची देशमुखी अद्यापि त्यांच्या वंशजांकडे चालू आहे. मुसलमानी अमलांत त्यांच्या राज्याची खलबल झाली. परंतु त्यांचें वतन त्या जुलमी राजांनीं कायम ठेविलें! **कोंकण प्रांतांत समुद्राचे किंवा खाडीचें कांठी भातखांचरें असून त्यांत समुद्राच्या भरतीचें पाणी शिरूं नये म्हणून त्या खांचरांभोवतीं बांध घालावे लागतात; व भरतीच्या जोरानें बांध वाहून जाऊं नयेत म्हणून मजबुती व रक्षण करावें लागतें. हीं कामें शिळोत्री लोकांकडे असतात.

कसब्याचा जो गांव त्याजवरून परगण्यांचीं नांवें पडतात. परगण्यास कोठें कोठें प्रांत, देश, महाल, तालुका, तर्फ, संमत, टप्पा, हवेली अशीं हीं नांवें दिलेलीं आढळतात. याची अुदाहरणें :– परगणे, नेवासें; प्रांत मिरज; वाअी देश; तालुके पुरंदर; तर्फ चाकण; संमत वाघोली; टप्पा पाल; पेटा पौड; हवेली पुणे वगैरे. कोठें कोठें परगण्याचे पोटीच तर्फा असतात. मोंगलाईमध्यें, कांही परगणे अेकाच अधिकाऱ्याचे ताब्यांत असले म्हणजे त्या सर्व मुलखास सरकार किंवा सुभा म्हणण्याची वहिवाट असे. याची अुदाहरणें :– सरकार जुन्नर; सरकार विजापूर; सुभे औरंगाबाद; वगैरे. परंतु राज्यक्रांतीमुळें ही जुनी रचना बदलून जाअुन हल्ली तालुक्यांची मोडणी झाली आहे. त्यामुळें अेका तालुक्यांत चार परगण्यांचे गांव जातात; पांच तर्फे गांव अेकाच पेठ्यात जाऊन तो पेटा दुसऱ्या तालुक्यांत मिळतो; यामुळे चार गांवचे कुळकर्णी असले तर तालुक्याचे अेका मामलेदाराचे हाताखाली दोघांनी काम करावें लागतें व दुसऱ्या तालुक्याचे मामलेदाराचे हाताखाली दुसऱ्या दोघां कुळकर्ण्यांस काम करणें पडतें. ह्याप्रमाणें पूर्वीच्या व हल्लींच्या ग्रामरचनेंत आणि त्यांतील व्यवस्थेत बराच फेरफार झाला आहे.

कसबा म्हणजे मोठा गांव. हा मोठा गांव अनेक कारणांनीं होतो. तेथे कसबी व कारागीर लोक राहून त्यांच्या व्यापाराची चळवळ झाली पाहीजे. असे कसबे मानवत, पैठण, येवले, चंदेर अित्यादि आहेत. कित्येक गांवें, तीर्थें, क्षेत्रें, पवित्रस्थानें, व देव यांच्या संबंधानें मोठेपणास पावून ती कसब्याचीं गांवें झाली आहेत. अशी गांवें नाशिक, वाई, पंढरपूर, तुळजापूर वगैरे आहेत.

मोंगलअींत धारे वसूल करण्याची व्यवस्था जमीनदारांचे मार्फत होती. त्यांणीं सर्व वसूल करून पोतदाराबरोबर किंवा माहराबरोबर सरकारांत भरणा करावा. जमीनीवरील धाऱ्याची तरी रीती हल्लींपेक्षां भिन्न असे. म्हणजे, कोठें कोठें ऐनजिनसी सारा असे व कोठें कोठें रोख पैसा घेत. जमिनीवर कर, सारे, वगैरे किती किती आणि कसे कसे घ्यावे याविषयीं मनूनें तर असें लिहिलें आहे कीं,

पंचाशद्भाग आदेयो राज्ञा पशुहिरण्ययोः ॥
धान्यानामष्टमो भागः षष्ठो द्वादश एव वा ॥ १३ ॥-७.

भावार्थ–"राजानें पशु व रोकड द्रव्य यांजपैकी पन्नासावा हिस्सा आपला कर म्हणून घ्यावा, आणि धान्यावर म्हणजे जमिनीवर तिच्या अुत्पन्नाप्रमाणें सहावा, आठवा किंवा बारावा हिस्सा घ्यावा." अर्थात् अुत्पन्न जर फार कमी होत असेल तर बारावा हिस्सा घेण्याविषयीं मनूची आज्ञा आहे. येणेंप्रमाणें जमिनींत जें अुत्पन्न होअील त्या अुत्पन्नाचें मान पाहून त्यांतून सरकार देण्याचा हिस्सा काढून घेणें, याचे नाव ऐनजिनसी सारा. हा ऐनजिनसी सारा वसूल झाला म्हणजे त्यांची ठिकठिकाणीं कोठारें नेमून त्या कोठारात तो माल नेअुन सांठवायचा असे. कोठांरांतून माल सांठविला म्हणजे तेथे वाणी अुदमी येअुन ते तो माल खरेदी करीत. ही वहिवाट अजूनही कित्येक ठिकाणीं आहे. सरकारचा भाग सरकारनें घेतल्यावर बाकीचा माल शेतकऱ्याचा शेतकऱ्यानें न्यावा अशी वहिवाट असते. ऐनजिनसी वसूलाची रीति बरी असा कित्येकांचा अभिप्राय आहे. पिकें म्हणजे सर्वदा चांगली येतात असा अर्थ नाहीं. येवढ्याकरितां जें कांहीं अुत्पन्न होअील त्याचा अमुक हिस्सा ठरवून तो हिस्सा त्या ऐन मालांतून सरकारानें घ्यावा हें बरें असे कित्येक म्हणतात. व ह्याप्रमाणें चालल्यास अुभयपक्षीही तोटा नाही. सरकारानें जास्त सारा घेतला असें म्हणता येणार नाही व शेतकरीही सरकार देण्यानें बुडाला असें होणार नाही.

ज्याकाळी मराठ्यांनी मोंगलांपासून राज्य हिरावून घेतलें, तेव्हां कांही मुलुख स्वराज्य म्हणून घेतला. स्वराज्य म्हणजे, त्यांत मुसलमानांचा कांही हिस्सा नाहीं. कांही मुलखांत चौथाअी घेतली. चौथाअीचे नांव मात्र होतें; परंतु जेथें फावले तेथें सर्वच मुलूख घेतला. तसेंच, कोणीं कुमकेस

बोलावलें, कोणीं लढाअीस बोलावलें, तर वेगळा करार होअुन प्रांताचे प्रांत त्यांजकडे आले. याप्रमाणें महाराष्ट्र देश, कर्नाटक, कोंकण, खानदेश, माळवा, गुजराथ, हिंदुस्थान, बुंदेलखंड, बगेलखंड, अंतर्वेद अित्यादि मुलूख मराठ्यांच्या कबजात आला. वर जी चौथायी म्हटली तिला मोकासाही म्हणतात. चौथाअीशिवाय तीन हिस्से राहिले, त्यांस जहागीर किंवा मोंगलअी अमल असें म्हणतात. हैदराबादचे मुलुखांत चौथाअी मिळून मोंगलाअी हिस्सा निजामाकडे राहिला. त्या भागास अमलवांटणी म्हणतात. चौथाअीचे मालक व मोंगलाअीचे मालक आपले भागावर अिनाम, धर्मादाय, नेमणुका, सरंजाम व बालपरवर्षी देत. अेकेका गांवावर पांचही सनदा होत. पेशव्यांची सनद; अेकास, साहोत्रा अेकास, मोंगलाअीची सनद अेकास व सरदेशमुखीची सनद अेकास असा प्रकार असे. मग जो वसूल येअील त्याचे दामाशाई वांटणीनें सर्वजण हिस्से घेत. कधीं कधीं सर्व हिस्से अेकासच दिले तर त्याचे सनदेंत "चौथाअी, मोंगलाअी, सरदेशमुखी, कुलबाब व कुलकानु गांव दिला असे" असें लिहीत. अथवा, अेखादा अमल पूर्वी दुसऱ्या कोणास दिल्यामुळें अथवा सोय नसल्यामुळें द्यावयाचा नसेल, तर त्या सनदेत "मोंगलाअी व सरदेशमुखी सुद्धा चौथाअीखेरीज" असें लिहीत.

चौथाअी म्हणजे शेंकडा २५ रुपये. त्यांतून राजांनी सचीवांस सहा रुपये दिले. तेव्हा ऐन मोकासबाबेस राजाकडे शेंकडा १९ रुपये राहिले. हे जे सचीवांस सहा रुपये दिले या भागास साहोत्रा म्हणतात. कितीअेक ठिकाणीं वर लिहिलेल्या वांट्याच्या व हिश्शांच्या हिशेबाची जिकीर पडू नये म्हणून नेमणूका ठरविलेल्या असतात अथवा कितीअेक ठिकाणीं अुत्पन्नाच्या आकारान्वयें त्यांचे त्यांचे भाग पाडतात. असे फोडून फोडून अम्मल देण्याचें कारण असे होतें की, मुलुख रक्षण करण्यांत सर्व सरदारांचे हित व्हावें, व सर्वांनी त्याला जपावें. म्हणजे अेक गांव गेला तर त्यांत एकाची चौथाअी जाअील, दुसऱ्याची सरदेशमुखी जाअील व तसाच तिसऱ्याचा साहोत्रा जाअील. म्हणून सर्वच आपले आपले भागास जपतील आणि सर्वांस त्या गांवचे रक्षणाची काळजी राहील.

लोकांकडे गांवच्या जमिनी चालतात त्यांच्या रीतीही अनेक आहेत. कांहीं जमीनी लोकांस इनाम म्हणून दिलेल्या असतात. त्यांजवर सरकारचा सारा वगैरे कांहीं नसतो. कांहीं जमिनी जुडी या नांवानें लोकांकडे वहिवाटीस असतात. त्यांजवर स्वामित्वादाखल सरकार थोडासा सारा घेतें कांही जमिनी मिरासीनें लोकांकडे दिलेल्या असतात. मिरास म्हणजे, कांहीं नियमित साऱ्यानें कुळांकडे जमिनी लावून त्या जमिनी त्यांजलडून कधींहीं काढावयाच्या नाहीत व त्यांजवर नियमित दरापेक्षां जास्त धारा घ्यावयाचा नाही असा ठराव असतो. आणि कांही जमिनी गतकुळी म्हणून चालतात. त्या विषयीचा सर्व अधिकार सरकाराकडे आहे. वस्तुतः सर्व जमिनी मिरासीनेंच कुळांकडे असावयाच्या. परंतु मिरासदार आपण होअुनच जर ती जमीन सोडून गेला तर ती गतकुळी जमीन समजतात. हल्लींच्या रीतीप्रमाणे बघितलें असता सर्व जमिनी शेतकऱ्यांच्या मिरासीच्याच आहेत. परंतु त्यांच्या कौलकराराची आणि धाऱ्याची मुदत तीस वर्षांची असते. येणेंकरून कायमचे सारे न राहतां तीस तीस वर्षांनीं सारे दीडपट किंवा दुप्पट होअुन, शेतें वाहणारांस किफायत काहीच राहीनाशी होते. ही तीस वर्षांची मुदत करण्यांत सरकारचें म्हणणें असें आहे की, हल्ली देशाची सुधारणा व आबादी दिवसेंदिवस वाढत असून व्यापार व तज्जन्य संपत्तिमत्ता वाढत आहे; व त्यामुळे रयतेस प्रति तीस वर्षांनी जास्त सारा देण्यास अडचण पडत नाही! सरकारचें हें म्हणणें किती अंशांनी रास्त होअील याचा विचार स्वतंत्र विषयानें करण्यासारखा असल्यामुळे प्रस्तुतस्थळी तद्विषयक विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं.

पूर्वी अिस्ताव्याने जमिनी देण्याची वहिवाट असे. म्हणजे, पहिले वर्षी चार आणे बिघा, दुसरे वर्षी सहा आणे बिघा, तिसरे वर्षी आठ आणे बिघा याप्रमाणे चढता सारा घेअून दहा वर्षांनी किंवा पंधरा वर्षांनी भर सारा घेत. या रीतीस अिस्तावा म्हणतात. कित्येक प्रसंगी असेंही करावें

लागे की, पांच वर्षे माफीने जमीन वाहून सहावें वर्षी सारा घ्यावा. या प्रकारास कौल म्हणतात. याचप्रमाणे अर्धेल तिर्धेल वगैरे रीतींनींहीं जमीनी वाहण्यास देण्याची रीती आहे. म्हणजे, पिकेल त्यांतील अर्धा भाग जमीनीच्या मालकास द्यावा व अर्धा भाग मेहनत करणारानें घ्यावा; किंवा दोन भाग मालकास देअुन तिसरा भाग शेत करणारानें घ्यावा. परंतु कोठें कोठें जमीन फारच खराब असेल तर मालक अुत्पन्नाचा पांचवाही हिस्सा घेअुन शेतकऱ्याला जमीन वाहण्यास देतो. तरी, जो जास्त हिस्सा घेअील त्याजकडे सरकार देण्याचा बोजा जातो. ह्या सर्व घरगुती जमिनी लावण्याच्या रीती झाल्या. परंतु सरकारच्या पद्धती हल्लीं निराळ्याच पाहण्यांत येतात.

कोंकणांत मक्ते ठरवून गांव दिले आहेत. ह्यास खोती म्हणतात. ह्या मक्त्यांचे ठराव, कोठें पन्नास खंडी, कोठें शंभर खंडी ऐनजिन्नस वसूल घ्यावयाचा, असे आहेत. कोंकणांत पूर्वी ओसाड गांवें असत. तेथें वस्ती करून, दर्यास बांध घालून व जंगलें कापून ज्यांणी जमिनी लागवडीस आणिल्या, त्यांशी सरकारनें कांही ठराव करून त्यांना त्या गांवचे खोत नेमिलें आहे. ह्यामुळें तिकडे ज्या त्या गांवचा जो तो खोत मालक असून, तो आपल्या पोटांत दुसऱ्या कुळांस त्यांच्या मगदुराप्रमाणे सारा घेअुन जमिनी वाहण्यास देतो. या कुळांमध्ये काही काईमची कुळें असतात. त्यास धारेकरी म्हणतात. या धारेकऱ्यांवरील धारा वाढविण्याचा अधिकार मात्र खोतांस नाहीं.

कित्येक गांवें जमीदारांकडे आहेत. जमीदारीची रीत अिंग्रजी राज्यांत अशी सुरू झाली कीं, जेव्हां कलकत्याकडचा मुलूख अिंग्रजांचे ताब्यांत आला, तेव्हां त्यांणी तिकडील सर्व गांवें, जमीदारांकडून कांही नियमित खंडण्या ठरवून त्यांजकडे दिली. बंगाला प्रांतात दरोबस्त जमीदारीची रीतिच चालू आहे. व येणेंकरून तिकडील लोक सधन आहेत. जमीदारांची गांवें ही निरंतरच्या कराराची, म्हणजे त्यांची जिंदगी असें असल्यामुळें, ते आपली गांवें चांगल्या रीतीनें लागवडीस आणण्याविषयीं नेहमीं प्रयत्नी असतात. पूर्वी जी गांवें लढाया, दंगे, दुष्काळ वगैरे कारणांनी उजाड व ओसाड होती तेथें सर्वत्र वसाहती झाल्यामुळें पूर्वीपेक्षां जमीदारांची अुत्पन्नें वाढलीं आहेत, व त्यांस त्यांत पुष्कळ कसर पडते. हे जमीदार म्हणजे छोटे छोटे राजेच असून त्यांच्या जमिनी वाहणारीं जी कुळें तीं त्यांची स्वामीभक्त प्रजा असतात. काशीचे म्हणजे रामनगरचे राजे, बलरामपूरचे राजे, मकसुदाबादाचे लक्ष्मीपति, धनपति, कलकत्त्याचे टागोर अित्यादि, हे सर्व जमीदारच असून त्यांची निव्वळ अुत्पन्नें चार चार पांच पांच लक्षांची आहेत. व असे अुत्पन्नवाले जमीदार अुत्तर हिंदुस्थानात बहुत आहेत. ज्या राणीगंज प्रांतांत हल्लीं कोळशाची खाण सांपडली आहे. तेथील जमीदारीण श्रीमती महाराणी स्वर्णमोहिनी ही असून ती अन्वर्थ श्रीमती व उदारबुद्धिची असल्याविषयीं प्रसिद्ध आहे. अेकंदरीत जमीदारी पद्धत फार सुखावह व हितकारक आहे असा अनुभव समजला आहे. मध्य प्रदेशांत (नागपूर प्रांतांत) जमीदारी पद्धतीप्रमाणेंच कांहीं अंशीं रीती चालू आहे. बंगाल्यांत वगैरेकडे जसे जमीदार आहेत तसे मध्यप्रदेशांत मालगुजार नेमिलेले आहेत. परंतु मालगुजारांकडे असणारीं गांवें निरंतरच्या करारानें दिलेली नसून ती फक्त तीस तीस वर्षांच्या मुदतीनें नियमित ठराव ठरवून वहिवाटीस दिलेली असतात. ह्या मुदतींत सारा ज्यास्त करणें वगैरे बंद असतें. ती मुदत संपल्यावर सरकारास धारे वाढविणें असल्यास वाढवावें. त्याचप्रमाणें या मालगुजारांचें ताब्यांत दिलेल्या गांवामध्यें खाणी वगैरे सांपडतील तर त्यांचीं मालकी व हक्क मालगुजारांकडे नसून सरकाराकडे राखून ठेवलेला असतो. ही गोष्ट जमीदारांची नाहीं. जमीदारांचें नैरंतर्य व त्यांच्या गांवांवर त्यांची हरअेक प्रकारची मालकी हा मालगुजारांपेक्षां अर्थात त्यांच्या सुखसंपत्तीच्या वृद्धिला विशेष कारण होते हें साहजिक आहे.

परंतु वर लिहिल्याप्रमाणें सरकारानें रयतेस जमीदाऱ्या दिल्यानंतर सरकारच्या ध्यानात असें आलें कीं, ही मोठी चूक होअून यांत आपला मोठा तोटा होतो. म्हणून, जमीदारी वहिवाट जेथें सुरू नाहीं तेथें तरी निदान ती चालू करूं नये. असा निश्चय करून सरकारानें दक्षिणेकडे रयतवारी

पद्धत चालू ठेविली. रयतवारी पद्धत म्हणजे काय हें कांहीं अिकडील लोकांस विशेष खुलाशानें सांगण्याचें प्रयोजन नाहींच. या पद्धतीनें अितकें मात्र झालें कीं, प्रत्येक जमीन वाहणारा शेतकरी सरकारचा खातेदार होअुन त्याजवर सरकार हेंच जमीदार झालें. तरी, जमिनीवरील कर वगैरे वाढविणें तर तीस तीस वर्षांच्या मुदतीनें वाढविण्याचा ठराव आहे; यामुळें तितक्या मुदतीपुरती तरी जमीन वाहणारास आपल्या वहिवाटीची अस्थिरता वाटत नाहीं. किती अेक गांवीं जमीदारांच्या तक्षिमा (भाग) असतात. ज्याप्रमाणें कित्येक ठिकाणीं चार कुळांतील पाटील अेकाच गावांत हक्काचे भागीदार असतात, त्याप्रमाणें अेकाच प्रांतात अनेक जमीदारांचे भाग असतात. जमिनीचें जें अुत्पन्न सरकारांत जमा व्हावयाचें त्याला हिशेबी आकार, कमाल तनखा, ऐनवसूली प्रतबंदी आकार वगैरे नांवे असलेलीं हिशेबांतून सांपडतात.

पूर्वी सरकाराचें मुख्य अुत्पन्न म्हटलें म्हणजे, जमिनीचा वसूल आणि आयात व निर्गत मालावरील जकात हेंच असून व्यापारी कारखान्यांपैकी कसब्याचे ठिकाणच्या दुकानांवर कांहीं पट्टी असे. या करास मोहतर्फा म्हणतात. यांपैकी गांवखर्चाकडे कांही रक्कम खर्ची पडे तिला चिल्हरखर्च किंवा महालमजूर असें म्हणत. हल्लीं अुत्पन्नाच्या बाबी अनेक निघाल्या असून त्यांच्या खर्चाचे मार्गही वेगळे झाले आहेत. वरील चिल्हर खर्चासारखे खर्च सर्व तोडले जाअुन गांवखर्च अगदीं संपुष्टात आला आहे. पाटील कुळकर्णी यांस कागद, शाअी वगैरे लिहिण्याचें सामान, आणि बसावयाला चवाळें व दिव्यास तेल येवढा मात्र खर्च गांवच्या चावडीवर नेमून दिलेला असतो.

गांवच्या वसुलाचे हिशेब लिहितात तें कुळकर्णी किंवा तलाठी होत. हे हिशेबी कामांत मोठे हुशार असतात. हिशेबाचा चोखपणा असा कुळकर्ण्यांकडूनच राहतो व याविषयी त्या वर्गाचा मोठा अभिमान आहे. पूर्वी हें हिशेबी काम जमीदारांकडूनच होत असे व त्या हिशेबांवर त्यांच्या सह्या होत. तसेच, सरकारांत जमीदारांकडून जे हिशेब जात, त्यांतच कोणास सूट वगैरे देण्याची असल्यास ते शिफारशी व रदबदल्या करीत. याचें कारण अुघड आहे कीं, देशाची आबदानी व रयतेचा संतोष राखण्याचें काम जमीदारांचें असल्यामुळें ते अनेक अुपायांनीं सरकारच्या कडक अमलांतून लोकांस वांचवीत असत. व त्यांचेंही सरकारांत वजन असल्यामुळें सरकार त्यांचें बोलणें ऐकत असे. हल्ली तो भाग नाहींसा होत जाअून, रयतेचा साक्षात सरकाराशी संबंध झाल्यामुळें व तिचा कोणी वाली नसल्यामुळें, सरकाराशी कमी ज्यास्त बोलता येत नाहीं. व यामुळें सरकारच्या अेकंदर धोरणात जी गोष्ट येअील त्याप्रमाणें तें करितें. परंतु या योगानें लोकांचें नुकसान होअून कुरकुरी अुत्पन्न होत असलेल्या दृष्टीस पडतात. सरकारच्या ठरावाप्रमाणें वसूल बाकी यथास्थित झाली पाहिजे. व त्याचप्रमाणें करण्यास सरकारनें नेमलेले कुळकर्णी व तलाठी हे स्वकर्तव्यांत दक्ष असतात. रयतेच्या हालहवालीची माहिती घेअुन ती सरकारांत कळविण्याचा व तदनुरोधानें सूट किंवा विद्वत्ता, नीती आणि पात्रता ही आपल्या अंगी आणिली पाहिजेत; अनेक कारागिरीचे व कसबाचे धंदे आणि मोठेमोठे उद्योग सुरु करून एकमत्यानें व्यापार, कारखाने वगैरे काढिले पाहिजेत व त्यांमध्यें लक्ष्य व धोरण ठेवून परदेशीय व्यापारी व कारखानदार यांशीं टक्कर दिली पाहिजे; सरकारच्या जबर सान्याधान्याबद्दल सरकाराजवळ तक्रारी नेउन, आपल्या उत्पन्नाचें व सरकारदेण्याचें मान सरकारच्या कानावर वारंवार घातले पाहिजे; आपसांतील कज्जे, भांडणे, दावे वगैरे सरकारापर्यंत नेउन दोन्ही पक्ष खर्चांत बुडून जाण्याच्या प्रसंगापासून जितकें दूर राहवेल तितकें राहिलें पाहिजे; मितव्ययी होउन होईल तितकी शिल्लक राखिली पाहिजे; आपल्या संततींत ज्ञान व विद्या ही वाढविली पाहिजेत; आणि कर्तव्यतत्परता ही नेहमी पुढें ठेवून सर्वदा योग्य महत्वाकांक्षा धारण केली पाहिजे. इतक्या गोष्टी जर सरकार व रयत यांजकडून अनुक्रमें घडतील तर, देश दारिद्र्यग्रस्त झाला, इत्यादि ज्या चोहोंकडून आरोळ्या होत आहेत त्या सर्व बंद

होतील. देशाचा फायद्यावर निर्वाह व्हावा तो हल्ली मुद्दलावरच चालला आहे हें बरोबर नाहीं. हल्लीच्या इंग्रजसरकारच्या शांत व चिरस्थायी कारकीर्दीत लोकांना वरील सुखे व सोयी मिळणे फारसे कठीण नाहीं. रयत सुखी व संपन्न कशी होईल याविषयी सरकारच्या अकबरी व संन्यायी मंत्रीमंडळांत हल्ली बराच विचार चालला आहे. तो ईश्वरी कृपेने लौकर सिद्ध होवो. आमची खात्री आहे कीं, हल्लीची दुःस्थितीच आतां पुष्कळ दिवस राहील असें नाहीं. सरकारची राजनीती आणि रयतेचें सुख ही चांगल्या रीतीनें व जास्तीतजास्त अनुभवास येत जाऊन हल्लीची अकबरी (लॉर्ड रिपनची) कारकीर्दच सदोदित आणि सुदामत राहो असें आम्ही इच्छितो.

तगाअी देण्याची शिफारस काण्याचा अधिकार कुळकर्ण्यास किंवा तलाठ्यांस मुळींच नसल्यामुळें, ते आपल्या कामांत मात्र लक्ष्य लावून हिशेबी काम तेवढें चोख ठेवितात म्हणजे झालें. हिशेबाचें सोअीकरितां त्यानी हिशेबांत अनेक शाखा काढलेल्या असतात : चिठ्ठा, ताळेबंद, तहसील, पत्रक, जमाखर्च, शिलकबंद, पहाणीखर्डा, बासलात, तुमार, ठरावबंद, झडती वगैरे नानाप्रकार कुळकर्णी आपल्या सोअीकरितां आणि चोखपणाकरितां करीत असतात.

ज्या प्रांती जमीदारी वहिवाट चालू आहे तेथील श्रेष्ठ लोक सुखी व ऐपतदार असतात असा अनुभव आहे व असें कां असावें याविषयीं वर अेके ठिकाणीं विवेचन झालें आहेच. परंतु रयतवारी वहिवाट जेथें चालू आहे तेथें श्रेष्ठ, सुखी व ऐपतदार कोणीच आढळत नाही. सरकारानें रयतवारीची रीति चालू केली त्यांत त्यांचा उद्देश असा होता कीं, रयतेंतील अमुक श्रेष्ठ वर्गच सुखी व ऐपतदार असून इतर लोकांनीं दारिद्र्यात कां रहावें? तर सर्वांना सुख व ऐपत असावी व या धोरणावर रयतवारी चालू केली. परंतु त्याच्या अगदीं उलट अनुभव आला हें सरकार जाणत नसेल असें वाटत नाहीं. गांवोगांवीं जाऊन बघावें तों पूर्वीच्या श्रेष्ठ व धनिकलोकांचे मोठेमोठे वाडे व हवेल्या शून्य व ओसाड अशा दृष्टीस पडतात. सावकारलोक दरिद्री, भिकार व नादार होऊन रयतेमध्यें तर कांहींच ताकद व त्राण राहिलें नाहीं. असें सर्व देशभर दिसते. जुन्नर, खेड, सासवड, इंदापूर सुपें, वाअी, नाशिक वगैरे लहान मोठी गांवे पूर्वी जी सधन, सुखी आणि चांगली होती तें त्याचें वैभव नष्ट होऊन हल्लींचीं दारिद्र्यावस्था त्यांस प्राप्त झाली आहे. असें कां व्हावें व लोक इतके जेरीस व टेकीस कां यावे याविषयी जिकडे तिकडे विद्वान, राज्यकराख्यानी व देशकल्याणैकनिष्ठ लोक विचार करीत आहेत. व या विचारांत अनेकांची अनेक मतें निघत आहेत. देशस्थितीचा विचार करण्यांत ज्यांणी आपला बहुत काळ घालविला ते देशहितेच्छु दादाभाई नवरोजी, यांणीं या विषयी अनेकवार निबंध लिहून व व्याख्यानें देऊन, त्यांस जी देशाच्या निकृष्टावस्थेची कारणें वाटली ती त्यांणी निर्भीड रीतीनें आणि पोक्तपणें सरकारास, सरकारच्या मुत्सद्यांस आणि आपल्या देशबांधवांस कळविली. त्यांणी एकंदर असा आढावा काढला आहे कीं, प्रत्येक मनुष्यास सालीना अठरा रुपयांची प्राप्ति असून त्यांतून तीन रुपये सरकार देण्यांत कराचे रुपानें जातात. तेव्हा बाकी अवघे १५ रुपये काय ते प्रत्येक माणसास वर्षाचेंकाठी मिळतात असें ठरतें. आता या पंधरा रुपयांत मनुष्यानें आपला संसार कसा करावा, पोटास काय खावें, कपडालत्ता काय करावा, लग्नकार्य कसें करावें, दुखणें बाहणें कसें काढावें, औषध पाण्यात काय खर्चावें, दुष्काळांत कसा निभाव लावावा, व ऐषआराम काय भोगावा? याचा विचार जर कोणी करील तर देशस्थिती कशी आहे याची मूर्ति त्याचे समोर उभी राहील. दादाभाईच्या मतानें याचें कारण असें आहे की, या देशांतील पैसा विलायतेस फार जातो. याचा शाश्वत मोबदला इकडे कांहीच येत नाहीं. दरसाल तीन कोटी रुपये विलायतेस जातात ते तिकडेच ठार होतात. त्यांचा अंश इकडील लोकांस कांहीच मिळत नाहीं. हें दादाभाईंचें म्हणणें झालें. दुसरें कोणी देशहिताचा विचार करणारे असें म्हणतात, कीं, आलीकडे पाऊस जसा पडावा तसा पडत नाहीं व जमिनीमधला कस नाहींसा होऊन लोकांकडून जमिनीची मेहनत व मशागत राहावी तशी राहत नसल्यामुळें पीक कमीं झालें,

व हेच देशास बुभुक्षितत्व येण्याचें कारण आहे. कोणी शोधक असें म्हणतात कीं, अदालतीकडील न्याय फार महर्घ होऊन शिवाय मीठ, दारु, जंगल, जमिनीचे धारे वगैरे सरकार देणी मनस्वी वाढल्यामुळे रयत भिकारी झाली. कोणी असे म्हणतात कीं, सरकारचा मनस्वी खर्च रयतेच्या डोक्यावर बसतो व सरकारचे बड्या बड्या पगाराचे सर्व अधिकारी विदेशीय असल्यामुळें त्यांचा बहुतेक पगार अचानक विलायतेला जाऊन या देशाची बरकत नाहींशी, होते. कोणी म्हणतात, या देशाच्या सर्व उद्योग धंद्यात, काम कारभारांत आणि त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या निर्वाहाचे पदार्थांत येथून तेथून सर्वत्र विलायत आणि विलायती लोक पसरल्यामुळे देशी लोकांस कोठेंच ओलावा न सांपडता, सर्व प्रकाराने ठणठणाट झाला आहे. अल्पस्वल्प चाकऱ्या नोकऱ्या ज्या कांही मिळतात तेवढ्यावर लोकांचा निर्वाह होऊन बाकीचा पैसा समुद्रपार निघून जातो. कोणी मोठासा रोजगारी अथवा वंशपरंपरेच्या उत्पन्नांशाने अम्मळसा खाऊन पिऊन सुखी असला की, त्याचें भोंवती शेंपन्नास लोक असून त्यांचा निर्वाह चालतो. हा फायदा या देशांत असलेल्या विलायती रोजगाऱ्यांकडून किंवा ऐपतदारांकडून अेतद्देशीयांस मुळीच मिळत नाहीं. विलायतेहून जे कोणी इकडे येणार ते सर्व पैसा मिळविण्याकरितां येणार. त्यांस इकडील उत्पन्नवाल्या किंवा रोजगारी लोकांप्रमाणे चाकर माणसांची मिजास लागत नाही. त्यांच्या उदरनिर्वाहाला इकडे काय खर्च होईल तेवढा काय तो या देशांतील वाण्याउदम्यांस मिळेल. बाकीची त्यांची सर्व किफायत विलायतेचीच वाट धरिते. याप्रमाणें विलायतचे कामदार किंवा बारिस्टर, डाक्टर व व्यापारी दहा, दहा लाख रुपये गांठी मारून स्वदेशी जातात. परंतु त्यांचेमागें येथील लोकांस, त्यांणी खाऊन पिऊन फस्त केलेल्या लेमोनेल, सोडावाटर व पोर्टवाअीन वगैरे पेयद्रव्यांच्या फुटक्या तुटक्या कुप्यांचे तुकडे व त्यांणी वाचून टाकलेल्या रद्दी वर्तमान पत्रांचे खर्डे हें काय तें मिळतें. त्यांचा सर्व संचय आणि संग्रह विलायतेकडे धांव घेतो. परंतु या देशांत त्यांचा यत्किंचित् देखील भाग राहात नाही व त्यामुळें देशांत दारिद्य वाढत चाललें आहे. कोणी म्हणतो, इकडे सर्वमाल परदेशांतलाच येऊन खपतो यामुळें या देशांतील धंदे, रोजगार, सर्व बसून व्यापार ठार बुडाला. हुंड्या, देवघेव, वगैरे स्तब्ध झाली. अमुक व्यापारांत म्हणजे अंमळ हातपाय हलविण्यास जागा आहे असें नाहीं. कोणाला उसनवार पैसा दिला तर तो परत येत नाहीं. इतके लोक भिकारी. त्यांजवर हुकूमनामे मिळविले तरी त्यांची पुडकी बांधूनच ठेवावी लागतात. कारण, येण्यापैकी वसूल म्हणून छत्रपतिही होत नाहीं. तेव्हां फायदा व किफायत अशी कोणच्याच धंद्यांत दिसत नाहींत आणि येणें प्रमाणें देशांतील संपन्नतेची वाताहत झाली. कोणी म्हणतात, इकडील अडाणी लोकांमध्ये उधळेपणाची संवय फार वाढत चालली आहे. त्यांच्या हातांत पैसा आला की, ते अवाढव्य खर्चानें लग्नकार्ये, ब्राह्मणभोजनें, यात्रामात्रा वगैरे करुन भिकारी होओपर्यंत पैशाची धूळधाण उडवितात. त्यांस द्रव्यसंचयाचे ज्ञान नाहीं हाच दारिद्र्याचा पाया आहे. कोणी म्हणतात, परदेशीय यांत्रिक शक्तीनें अिकडील हस्तकौशल्याचें आणि कसबाचें मातेरें झालें व ती यांत्रिक शक्ति अुचलून तिच्या प्रसारानें लाभ करून घेण्याचे वकूब अिकडील लोकांस मुळीच नसल्यामुळें देशाची पतनावस्था दिवसानुदिवस अशीच दृढ होत जावयाची. कोणी म्हणतात, देशांत शांतता, व्यवस्था वगैरे विशेष वाढत जाअुन लोकसंख्या जास्त जास्त होत चालल्यामुळें दारिद्र्याचा पाया मजबूत होत चालला आहे. अशी नानाप्रकारच्या लोकांकडून यांच्या विचाराप्रमाणें देशाच्या विपन्नावस्थेची कारणें सांगण्यात येतात.

परंतु याच्या अुलटही कित्येक प्रतिपादन करितात. कोणी म्हणतात कीं, हल्ली व्याजाचा दर कमी झाला आहे. म्हणजे पुण्यासारख्या ठिकाणीं अकोत्र्यांचे व्याजानें लोक घरें गहाण ठेवीत होते तेथे आता आठ आण्यांनी ठेवितात. याचप्रमाणें मजूरांची व कारागिरांची मजूरी वाढली; जमिनीच्या किंमती वाढल्या; कालवे, पाट, वगैरे बांधून बागा, मळे यांच्या लागवडी होत चालल्या, पूर्वीपेक्षां जमिनी लागवडीस पुष्कळ आल्या; पूर्वी देश अुजाड व पडीत फार होता तसा हल्लीं

नसून वस्तीची दाटण आणि शेतीची वृद्धि ज्यास्त होत आहे; आगगाड्या, तारायंत्रें, पक्क्या सडकेचे रस्ते, पूल, वगैरे साधनांनी रहदारी फार वाढून व्यापारास सौलभ्य आलें आणि त्याची वृद्धिही फार होत आहे; विलायतेस माल फार जातो; पूर्वी ज्या मालास कांही किंमत नव्हती तो माल हल्लीं महर्ग झाला आहे; तागाचें बी, जवस, अेरंडी वगैरे बारा बारा पायली विकत होती तीं आज दोन पायलीच्या भावानें विकलीं जातात; जेथें पूर्वी दहा हजाराची दारू (मद्य) खपण्याची मारामार पडत असे तेथें आज लाख लाख रुपयांचे मद्य विकण्याचा सरकारांतून मक्ता दिला जातो; शाळाखातें वाढून पाठशाळा, विद्यालयें वगैरेंची वृद्धि होत असल्यामुळें लोकांमध्यें ज्ञानप्रसार दिवसानुदिवस जास्त जास्त वाढत आहे; अिस्पितळें, दवाखानें, देवी काढणें, नानाप्रकारच्या रामबाण औषधींचे शोध येणेंकरून लोकांचे आरोग्य वाढलें आहे; जमिनींच्या वसुलांत सुटी वगैरे देत नाहींत; तरी सारे वगैरे नेमस्त असल्यामुळें ते देण्याला रयतेस अवघड वाटत नाही; वक्तशीर व विपुल पाऊस मिळावा म्हणून जंगले राखण्याची योजना केली आहे; न्यायमनसुबी चांगल्या रीतीनें चालून त्याचा खर्च स्त्यांप वगैरेंनीं निघून जाअुन त्याजबद्दलचा रयतेवर निराळा बोजा पडत नाहीं; पोलिस शिबंदी वगैरेची व्यवस्था फार अुत्तम झाल्यामुळें, चोऱ्या, दरवडे, लुटालुटी, घातपात पूर्वीसारखे होत नसून लोकांस आपल्या चीजवस्तूची शाश्वती वाटत आहे व परचक्राचा भीति अुडाली आहे; डांक, टपाल, संदेश यांची बरोबर आणि नियमितपणें व्यवस्था राखली जात असल्यामुळें सर्व देशांतील दूरदूरच्या लोकांचें दळणवळण आणि स्नेह अतिशय वाढत चालली आहेत; नौकानयन वाढून आगबोटी, जहाजें, तारवें वगैरेंची वृद्धि अशून परदेशगमन आणि परदेशाशीं व्यापार हीं सुलभ झालीं आहेत; व्यापाराला तेज यावें म्हणून जकाती काढून टाकिल्या आहेत; पूर्वीसारख्या पाटील कुळकर्णी वगैरे बलुतदारांच्या हक्कदाऱ्या फर्मासी वगैरे मुळींच काढून टाकल्यामुळें कोणासही आपल्या अुत्पन्नाचा सुखानें अुपभोग घेतां येतो. दर्याचा व्यापार वाढल्यामुळें समुद्राच्या कांठच्या कोंकण, काठेवाड वगैरे मुलखांतून बंदरें वाढून लोक सुखी व सधन झाले व ते प्रांत भरभराटीस आले आहेत; नाणें मोजण्यास, नेण्यास, वापरण्यास, व ठेवण्यास वेळ, खर्च जोखीम आणि स्थळ अितकीं लागत होती तीं आतां नोटी निघाल्यामुळें लागेनाशीं होअुन ओझी वाळगण्याची यातायात व कटकट पडत नाहीं ? व कोणाला पैसा देण्यास किंवा कोठें रवाना करण्यास सोय झाली आहे; अित्यादि नानाप्रकारच्या सुव्यवस्था पाहिल्या असतां देशस्थिति आणि लोकसुख हीं पूर्वीपेक्षां हजारोंपटींनी चांगली आणि वृद्धिंगत होत आहेत. हीं सुखें व ह्या सोअी पूर्वी कधीं कोठें असतील असें वाटत नाहीं. दिवसानुदिवस लोकांस आपले हक्क व अधिकार यांचें ज्ञान होअुन आपण वरिष्ठ व्हावें अशी महत्वाकांक्षा त्यांजमध्यें वाढत असल्यामुळें जो तो आपली विद्या, धन, व ऐषआराम वाढवीत असलेला दिसतो. अर्थशास्त्रदृष्टीनें बघितलें असता जिनसांची किंमत वाढली म्हणजे लोकांजवळ पैसा आहे असें मानण्यास हरकत नाहीं. त्याप्रमाणें, हल्लीं प्रत्येक पदार्थ महाग विकतो; यावरून लोकांजवळ पैसा आहे असे सिद्ध होतें. पूर्वी दाद फिर्यादीं बरोबर लागत नसून बेबंद कारकीर्दी असत. तसा हल्लीं प्रकार नसून कायदे कानू जेथल्या तेथें व्यवस्थित असल्यामुळें व पक्षपाताचें निर्मूलन केल्यामुळें गरीब व श्रीमंत आणि रयत व अधिकारी अशा दोन्ही वर्गाच्या कनिष्ठ श्रेष्ठवर्गास समदृष्टीनें न्याय व शासन मिळतें. अपराध, गुन्हें, वगैरे छपले जात नसल्यामुळें लोकांची चिंता, हुरहुर, काळजी वगैरे जाअुन त्यांजमध्यें स्वास्थ्य व शांति विशेष येत आहे. असे अनेक लाभ रयतेस होत आहेत. असें अेका पक्षाचे लोक म्हणतात. परंतु यावर दुसऱ्या पक्षाचें असें म्हणणें पडतें कीं, हे जे लाभ म्हणून कोणास वाटतात ते सर्व खोटे असून लोकांची दिवसें दिवस निकृष्टावस्थाच होत चालली आहे. ते असें म्हणतात कीं, पूर्वीपेक्षां हल्लीं अन्याय, जुलूम, वृथादंभ, मनसोक्तआचार, नानाप्रकारच्या बाबी, कर, पट्ट्या, दुर्व्यसनें, छिछोरपणा, लुच्चगिऱ्या, हीं फार

वाढत आहेत. पूर्वी कोठेंही दारूचे पिठे हल्लींसारखे राजरोस रीतीनें गल्लोंगल्लींला बसलेले आढळत नव्हते. परंतु प्रस्तुत त्यांचा सुकाळ होअुन जिकडे तिकडे मद्यपी व छाकटे लोकांची समृद्धि झाली आहे. यामुळें कुटुंबात सुख, शांति आणि व्यवस्था हीं नाहींशी झालीं. अुधळेपणा वाढत जाअुन लोक निष्कांचन होत चालले. बाहेरचा डौल व मिजास मात्र बघून घ्यावी; बाकी "अंदरकी बात राम जाने" अशी अवस्था सर्वांस आली आहे. भिकारपणा आणि बाह्य डौलाचा दिखाअुपणा वाढत आहे. कोणाजवळ चार पैशांचा संग्रह नाही; रोजगारधंद्यानें चार दिवस चांदरात झडते तेवढ्यावर मजा आणि मौजा मारतात. परंतु ती बंद झाली किंवा दुर्दैवानें आयुर्दाय संपून मृत्यू आला म्हणजे मागें मुलांबाळांस फांकेच पडतात. मोठमोठ्या रोजगाऱ्यांची हीच स्थिती दृष्टीस पडते. तो मेला कीं, त्याच्या दहा दिवसांत त्याचीं गाड्या घोडीं व मौल्यवान वस्त्र-प्रावरणें विकावयाला बाहेर निघतात. बाह्यरंगावरून अंतःस्थितीचें अनुमान करणें चुकीचें आहे; "बाहेर झकपक, पण आंत भकभक" अशी स्थितीच सर्वत्र दिसते. पूर्वी लोक जवळ चार पैसे बाळगून असत. परंतु हल्लीं जी काय संपत्ति, ठेवा किंवा पुंजी असेल ती वरच्यावर दिसते. कडकडीत अंगरखे, पावशेर पावशेर घेरा, चक्रीदार, व लफ्फ्याची पागोटीं, आठ आठ रुपयांच्या अूपरण्यांच्या जोड्या, बूट, अिस्ताकिण्या, हातांत गुळगुळीत यष्ट्या, खिशांत 'कोपरब्रास' नावांच्या धातूचीं घड्याळें, वगैरे अंगावरची संपत्ति आणि घरीं हंड्या, ग्लासें, बशा, चहाचें प्यालें, जस्ताचे डबे, औषधांच्या किंवा पेय द्रव्यांच्या कुप्या, खुर्च्या, टेबलें, बुकें वगैरें यापलिकडे कांहीं संग्रह नसावयाचा; या पगाराची त्या पगारास गांठ पडत नाही; सोन्यारूप्याचा विटाळ नसतो, पूर्वी बायकांच्या अंगावर चार भारी दागिने असत, परंतु हल्लीं दागिने करून घालण्यास शिल्लकच कोठें राहते ? 'लंकेच्या पार्वतीचे अवतार सर्व बायका बनत आहेत ! त्यांचा बिचाऱ्यांचाही थोडक्यात शृंगार आटोपतो; डोकींत अदपावभर गंगावन, खोप्यावर फिरकीचें फूल, गळ्यांत अेखादी पाठीवर मोठाले गोंडे सोडतां येतील अशी गांठवलेली वज्रटीक, अंगात तटतटीतशी चोळी, बारीकशी कुंकवाची टिकली, हातांत चार चार बिल्वर, आणि पायघोळ ओचा हा काय तो बायकांचा थाट आणि नखरा; मुलांच्या अंगांत बंड्या, वासकुटें, कडतीं, जाकिटें, टोप्या आणि पायात बूट यापलिकडे कांही असत नाहीं व ठेवण्याची कोणास शक्ती नाहीं; खून, घातपात पूर्वीपेक्षा जास्त होत आहेत हें दिवसेंदिवस जी न्यायाची कोर्टे, म्याजिस्ट्रेटच्या कचेऱ्या, पोलिसांची ठाणीं, तुरूंगाच्या अिमारती, व नवे नवे अधिकार वाढत आहेत त्यांवरून सिद्ध होत आहे.

पूर्वी अेक न्यायाधिश आणि अेक फौजदारी अधिकारी असे तेथें जज्ज, सब्जज्ज, असिस्टंटजज्ज, अेक्स्ट्रा असिस्टंटजज्ज, जाअिंटजज्ज अित्यादि न्यायाधिशांच्या नेमणुकी होत आहेत; त्याचप्रमाणें म्याजिस्ट्रेट, मामलेदार, सिटी म्याजिस्ट्रेट, क्यांटोनमेंट म्याजिस्ट्रेट, आनररी म्याजिस्ट्रेट अित्यादि फौजदारीचे निवाडे करण्यास, अधिकारी नेमावे लागतात; अशा नेमणुका जास्त जास्त होत जातात यांवरूनच गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस जास्त असून लोकांचे स्वास्थ्य मोठ्या नाजूक स्थितींत आहे असें म्हणावें लागतें; पूर्वी साताऱ्यास अप्पासाहेब महाराज यांचे वेळेस त्यांच्या सर्व कारकीर्दीत अेकदां काय तो अेका मुलाचा खून झाला होता; पण हल्लीं प्रति महिन्यास ठिकठिकाणीं सेशनें भरून खुनाच्या खटल्यांत फांशीं, जन्मठेप, काळेंपाणी अशा शिक्षा होअुन तुरुंगातून कैद्यांची दाटी झालेली आढळतो; आगगाड्या तारायंत्रे होअुन प्रवासाचें व दळणवळणाचें सुख झालें पण त्यामुळें देशास दारिद्र्य आलें; त्यासंबंधाने येथील लोकांपासून अुत्पन्न झालेला पैसा सर्व विलायतेचा रस्ता पकडतो; तीं खातीं आमच्या लोकांची असतीं व आमच्या अिकडे त्यांचीं सर्व यंत्रे होतीं तर त्याचा फायदा आमच्या लोकांस होता; परंतु तसें आमच्या लोकांत सामर्थ्य राहिलें नसून येवढें कर्तृत्वही त्यांचें अंगीं नसल्यामुळें फायदा दुसऱ्यासच होअुन क्षणिक सुखाला लुब्ध होअुन आम्ही मिटक्या मारीत बसावें यापेक्षां या सुखांत अर्थ नाहीं; भरीव व चिरकालिक सुखाचा

असा होअुन पोंचट व फोल सुख आमच्या दृष्टीस अंध करून टाकीत आहे; मोहरा, होन, पुतळ्या चुली, डाळी, रुपये, वगैरे किंमतवान् धातूंची नाणीं समूळ जात जाअुन त्यांच्या जागीं कागदांचें तुकडे चालू लागले; लोक अशक्त व फुंकरीनें अुडून जाण्यासारखे होत चाललें; अभ्यास करकरून हाडाचा मणी आणि रक्ताचे पाणी होतें. परंतु त्याचा फायदा त्यांस व त्यांच्या कुटुंबांस न मिळतां, अल्पकाळीच तरुणांच्या विद्येचा व आशेचा शेवट होतो; दर्याकिनाऱ्यास वस्ती आणि भरभराट झाली, परंतु जुन्या पेंठा आणि कारागिरीच्या जागा अद्रस्त पडल्या; त्यांचेकडे कोठें लक्ष्य जातें? अिंग्रजींत अेक म्हण आहे कीं, नवीन शास्त्रांचा शोध म्हणजे नवीन संकटांचा अुद्भव आहे; त्याप्रमाणें औषधें, वनस्पती, रसायनें, सूक्ष्मपदार्थ यांचे जों जों शोध निघत आहेत तों तों लोकांस सुखाभाव होत चालला आहे; नवे नवे रोग व आगंतुक व्याधि लोकांमध्यें वाढत आहेत; लोकांच्या प्रकृती क्षीण व नाजूक होत चालल्या आहेत; त्यांची सहनशीलता, धिटाअी, मर्दुमकि, गंभीरता, टणकपणा, जोम व आवेश हीं मंद व लुस्कान होत जाअुन पोशागीपणा फार वाढत चालला आहे; कायद्यांच्या विलक्षण विलक्षण अधिकारानें लुच्चेगिऱ्या, अपहार व बुडवणुकी यांचें पीक दिवसानुदिवस जास्त जास्त येत आहे; सात्विक व घातुक अशा दोघांचाही पक्ष घेअुन सरकार दरबारांत भांडण्यास वकीलांचें भक्कम यंत्र नेहमीं तयार असून दोन्ही पक्षांकडून द्रव्य पिळून जाऊन दोघेही निर्धूत होत आहेत; टवाळकी व वाच्यता वाढत जाऊन लोक भांडखोर फार होत चालले आहेत; बंधुप्रीती व स्वदेशाभिमान यांचें वाटोळें होअील अप्पलपोटेपणा व तिऱ्हाअितपणा वाढत चालला आहे; कोणाचा कोणास वचक, मान, मर्यादा व अदबी हीं न राहून अुद्दामपणा, गर्व, दांडगेपणा आणि आढ्यता हीं प्रसृत होत चाललीं आहेत; स्त्रीपुरुषांच्या प्रेमाचें स्थैर्य व विश्वास हीं राहिलीं नसून चावटपणा आणि फाजील स्वातंत्र्य वाढलें आहे; नास्तिकता, अधर्माचार, पेयापेयभक्ष्याभक्ष्य व गम्यागम्य यांचे विषयीं अविचार, यांच्या ठिक्याणीं ठिक्या सर्व देशभर लागून राहिल्या आहेत; पूर्वी लोक सदाचारी, नीतिमान् व सत्यप्रतिज्ञ होते; शेतकरी व देशी कारागीर अन्नान्नगत व भुकेकंगाल झाले आहेत; व त्यांस तरणोपाय काय याचा सरकारी अधिकारी शोध व तपास करून पाहात आहेत: या सर्व गोष्टींवरून देशस्थिति व लोकसुख हीं अितकीं प्रशंसनीय आणि संतोष मानण्यासारखीं बिलकुल नाहींत. असें दुसऱ्या पक्षाचें म्हणणें अैकूं येतें. त्यावर पुनः पहिल्या पक्षाचें म्हणणें पडतें कीं, जीं पूर्वीं होती असें वाटतें तीं खरीं सुखें नसून हल्लीं जीं दुःखें व आपत्ती वाटतात हीं भावी चिरकालिक सुखप्राप्तीची दर्शक आहेत; पूर्वीची संपत्ति खऱ्या उद्योगानें व सात्विक आचरणानें आलेली नसून महाराष्ट्रीयांनी हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून व हिंदुस्थानी लोकांनी भोंवतालच्या मुलखांत स्वाऱ्या करून, अशा प्रकारच्या अपहारानें व दांडगाअीनें जी आणलेली ती चिरकाल कोठून राहणार? सांचलेलें पाणी किती दिवस पुरेल? कारागिरी, कुशलता, व्यापार यांणी कमावून आलेलें द्रव्य देशाची आबादी आणि सुख वाढवितें; पूर्वीं साताऱचे संस्थानाचा वसूल चौदा लक्षांचा होता तो हल्लीं तीस लाख रुपये झाला आहे हा कशानें झाला? तेव्हां व्यापार वाढून देशांतील जमीनी लागवडीस येअुं लागल्यामुळें अुत्पन्न फार वाढत चाललें असें सिद्ध होतें; पूर्वीचे राजे व सरकार भिकारी व जुल्मी असून रयतेस भारी त्रास देत असत, तसा हल्लीं प्रकार नाहीं; हल्लींच्या राज्यकर्त्यांचा वचक, दरारा व भीति फार आहे; पूर्वीं रयतेकडून वसूल न आल्यास तो काढण्यास राजांना व सरकारला फार प्रयास पडून त्यांजकडून त्यांजवर विलक्षण प्रकारचे जुलूम होत; हल्लीं वसूल थकला कीं, अेकदां सरकारांतून नोटिस लागतें; त्याबरोबर बिन बोभाट सरकारच्या तिजोरींत भरणा होतो, पूर्वीच्या राजांची व सरकारांची अब्रु, साक, विश्वास, चिरस्थाअिता आणि सौरक्ष्य हीं कमी होतीं तशीं हल्लीं नसून लोक राजनिष्ठ, राज्यभक्त व दमदार झाले आहेत असें, सरकारनें चालू केलेल्या नोटींचें नाण्यावरूनच सिद्ध होतें; सरकारवर रयतेचा भरंवसा नसता तर आपलें सोनें रुपें सरकारच्या स्वाधीन करून त्याबद्दल

कागदाचे तुकडे रयतेनें कां घेतले असते? विद्याज्ञान वाढत चालल्यामुळें देशादेशाचे द्वेष, मत्सर वगैरे सर्व विलयाला जाअुन मनुष्य-जाती म्हणजे अेकंदर बंधुवर्ग अशी भावना होअुन रक्तपाताच्या लढाया, परस्वापहार अेका देशातील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस लुबाडण्याची दुर्वासना, अित्यादि नीच गुण नाहींसें होत चाललें आहेत व साम, दाम, भेद, अशांसारखे सौम्योपाय चालू होअुन परस्पर देशांचे वैभव व अधिकार रक्षण करण्यांत येत आहे. हा प्रकार पूर्वी नव्हता. देशातल्या देशांत धुमाळी आणि लाथाळी चालून अेकमेकांची संपत्ति अेकमेकांनीं हिरावून व लुबाडून आणण्याकडेच सर्वांचा कल असे. दाक्षिणात्यांनीं (महाराष्ट्रीयांनीं) अुत्तरेकडे हल्ले व पुंडावें माजवून त्यांचा पैसा लुटून आपल्या प्रांताची धन करावयाची व हिंदुस्थानांतल्या लोकांनीं दक्षिणेकडे स्वाऱ्या व लुटालुटी करून अिकडील द्रव्य आपल्या प्रांतांत हिरावून न्यावयाचें; असा क्रम कित्येक वर्षेपर्यंत सारखा चालला होता व यांतच त्यांचा मोठा अभिमान असून त्यांस अितिकर्तव्यता वाटे. परंतु आतां तो दुष्टकाळ बिलकुल राहिला नसून दयाळू राजराजेश्वरी महाराणीचे अेकछत्री अमलाखालीं शांतिसुखानें व बंधुप्रीतीनें आपण सर्व अेकमेकांविषयीं पूज्यभाव आणि वात्सल्य धारण करून आनन्दानें संसारयात्रा क्रमीत आहों. पूर्वीची लुटून लुबाडून आणिलेली सर्व संपत्ति नष्ट झाल्यामुळें हरामाचा पैसा बरकत देत नाहीं तसें अुघड अुघड सर्वांस समजूं लागून जो तो उद्योगधंद्यांनें आणि निढळाच्या घामानें द्रव्यसाधन करीत आहे. द्रव्याला चिरस्थाअिता येते ती अपहारबुद्धीनें आणि लुटी फाटीने येत नाहीं. उद्योग, बुद्धिमत्ता, साहस अित्यादि गुणांनी संपत्ति चिरस्थायी होअुन वृद्धिंगत होते. लोकांमध्यें जितका अुद्योगीपणा, बुद्धिमत्ता आणि साहस होतें तितक्या मानानें सधनता राहून फाजील द्रव्यसांठा जो होता तो आज विलयाला गेला. सारांश, शिवाजीमहाराजांचे वेळीं किंवा त्यापूर्वी जी स्थिती होती त्यापेक्षा शेंकडों पटींनीं सर्व गोष्टींत हल्लींचीं स्थिति फार चांगली आहे. त्याकाळीं अितकी ज्ञानवृद्धि नव्हती, अितकी वसती नव्हती, अितकें शांतिसुख नव्हते, अितकें दळणवळण नव्हतें, अितकी माहिती नव्हती, अितकी समजूत नव्हती, आणि अितका व्यापार व तज्जन्य संपत्ति नव्हती. तेव्हां हल्लींचा काल वाअीट आला हें म्हणणें निखालस असत्य आहे. असें अुलट पक्षाचे लोक म्हणतात.

आतां, हीं दोन्हीं पक्षांचीं म्हणणीं ऐकिलीं म्हणजे तीं दोन्हीही सर्वांशांनी खरी अथवा दोन्हीही सर्वांशांनीं खोटी आहेत असें आपल्याच्यानें म्हणवत नाहीं. दोघांच्याही म्हणण्यांत सत्यमिथ्या आहे. तरी, अेकंदरींत देश दारिद्यग्रस्त होत चालला आहे यांत शंका नाहीं व त्याचीं कारणेंही यथार्थ आहेत.* त्या कारणांचे प्रतिकाराकडे आजपर्यंत देशबंधूंनी द्यावें तितकें लक्ष्य दिलें नाहीं व जितकें लक्ष्य दिलें आहे तितक्यांत त्यांस यावें तसें यश मिळत असलेलें दिसत नाहीं; हें आपल्या देशाचें दुर्दैव होय! संपत्तीच्या व अेकंदर सुखाच्या क्षयवृद्धीचें परिणाम बघावयाचें असल्यास आपण पूर्वीच्या अुत्कृष्ट भरभराटींत अेका शहराचें अुदाहरण घेअुं. याविषयीं पुणें शहर बरें आहे. हें नाना फडणीसांचे अखेरपर्यंत मोठमोठे रोजगारी मुत्सदी व सावकार यांणीं भरलेलें होतें. त्यावेळीं तेथील राजकारस्थानें, संपत्ति, आणि कर्तबगारी हीं लोकश्रुत होतीं. परंतु अेकच काल सर्वदा असावा असा अीश्वरी संकेत नसल्यामुळें त्या कालाची आणि आजच्या कालाची जमीन अस्मानींची तफावत पडली. यांत कित्येक गोष्टी पूर्वीपेक्षा अिष्ट झाल्यास व कित्येक गोष्टी अनिष्ट झाल्या. नाना फडणीस गेल्यानंतर बाजीरावांची डेंगळे, घाटगे वगैरे मंडळी पुढे येऊन त्यांच्या शहाणपणाच्या मशाली पाजळूं लागल्या. पुढें होळकरी माजून पुणें शहराचा

* हिंदुस्थानाच्या दारिद्यस्थिती विषयींचे विस्तृत विवेचन येथें करून जागा अडविण्याचे कारण नाहीं. तें आमच्या हिंदुस्थानला दारिद्य येण्याची कारणें आणि त्याचा परिहार इ. नांवाच्या छोट्याशा निबंधात लिहिलें आहे.

धुव्वा अुडाला. अन्याय, अस्वास्थ आणि अराजिकता यांचें प्राबल्य पुण्यांत होअुन लोकांमधील शांतिसुखाची दुर्दशा झाली. पुढें अिंग्रजी कारकीर्द आली. अितक्या अवकाशांत पुण्याच्या संपत्तिची आणि लोकांची अगदींच वाताहत झाली. मोठमोठे घरंदाज व लौकिकवान लोक उठून गेले, व कित्येक अगदींच गारद झाले. मोठ मोठे वाडे ओस पडले. सर्व आदिवारपेंठ आणि पेढीवाले यांचा नायनाट झाला. लाखों रुपयांची जेथें प्रत्यहीं खलबल चालावयाची तो वैभवदीप मालवून अंधार गुडूप झालें ! घरमोडे म्हणून नवीनच अुदमी लोक निघून, त्यांचा घरें, वाडे वगैरे पाडण्याचा रोजगार चालला ! लोकांच्या जाहगिरी, वतनें, अिनामें वगैरे बंद होऊन थोर लोकांस आपल्या घरांतले लक्षावधी रुपयांचे सोन्या रूप्याचे दागिने व भांडीकुंडी बाजारांत विकावयास काढावीं लागलीं. घरांच्या व जमिनींच्या किंमती अुतरून लोक अगदी टेंकीस आले. असा काल १८५७ पर्यंत चालला. पुढें लोकांमध्यें स्वस्थता होअुन ते रोजगारधंद्यास लागतात व चार पैसे मिळवितात तों शेरबाजाराचें वेड पिकून तो शेर बहुत लोकांचे अंगावर अुतला आणि त्याखालीं बहूत लोक धुळीस मिळाले. पुढें दहा वर्षेपर्यंत जरा भरभराटीचा काळ आला. जिनसांच्या किंमती चढल्या. लोकांना रोजगारधंदे लागून चार पैसे मिळूं लागले. नवीं घरें व जिंदगी करण्याकडे लोकांजवळ शिल्लक राहूं लागली. न्यायमनसुबीचे कामांत सुधारणा होअुन जप्त झालेलीं देवस्थानें वगैरे सुटून स्वस्थतेनें व सुखासमाधानानें लोक राहूं लागले. घरमोड्यांचा धंदा बंद पडून ते काम आटोपलें. ह्याप्रमाणे पाहिले असतां पूर्वीपेक्षां लोकांची डोकीं बरींच वर निघालीं, अितक्या गोष्टी झाल्या म्हणून लोकांची हाय हाय गेली काय ? नाहीं. आणि पुढेंही कधीं जाअिल असें दिसत नाहीं ! लोकांची ददात, आपत्ती आणि विवंचना हीं म्हणून नाहींशीं झालेली दिसत नाहींत. ज्या विषयावर प्रस्तुत निबंध लिहिण्यास सुरूवात केली त्याच ग्रामव्यवस्थेकडे बघितले म्हणजे आम्ही म्हणतो ह्याचें ढळढळीत दर्शन होअील. शहराची गोष्ट जरा बाजूस ठेवा. परंतु शहरास ज्या गांवांहून धान्यधुन्य, लाकुडफांटी, गवतकाडी, धने-मिर्ची वगैरेंचा पुरवठा होतो त्या गांवांची दैना आणि लोकांची गरीबी कशी काय आहे ती पहा. शहरातले लोक गाड्या घोड्यांवरून हिंडतात फिरतात, लग्नकार्यांत नाच रंग, आतषबाज्या, सुस्वरवाद्यांचे गजर, पंक्तिभोजनें, मेजवान्या, वगैरे थाट अुडतात ह्यांवर देश संपत्तिमान झाला असें धोरण बसविणें चुकीचें होणार आहे.

लोकांच्याजवळ खरोखरच त्राण राहिले नाहीं. याचा अनुभव पाहणें असल्यास अेखाद्या वर्षी दुष्काळ किंवा अनावर्षण कांहीं प्रांतांवरून डोकावून जाअुं द्या म्हणजे त्या प्रांताचा काय देखावा दृष्टीस पडतो तो समजेल. दुसरें कांहीं दृष्टीस पडणार नाही; लोक अन्नान्न करून पटापट मरून पडलेले दिसतील ! गेल्या १८७६-७७ च्या दुष्काळांत* काय दुर्दशा झाली ती सर्वास ठाअुकच आहे ? साधारणपणें घरांत मिळवितां मनुष्य आजारी पडूं द्या, कीं, हातातोंडाशींच गांठ येते ? घरांत आठ दिवसांची देखील बेगमी नसते. मण अध्यीमणाचा संचय कांहीं घरांत सांडपत नाहीं. गरीब बिचारे लोक ! गवताचा भारा किंवा लांकडाची मोळी आणावी, ती आसपासच्या शहरांत नेअुन विकावी, तेव्हां बाजार होणार. त्यांची तरी किती विपुलता ? कीं सर्व जंगलांस आणि कुरणांस, सरकारच्या जुलमी जंगली कायद्यानें, कुलपें ठोकलीं गेलीं आहेत ! तेव्हां त्यांतून बापड्या गरीब लोकांस अुदरभरणार्थ काय व कोणत्या रीतीनें मिळत असेल याचें साधारण अनुमान करणें फारसें कठीण नाहीं. दादला आजारी पडला कीं, बायकोनें गोंवऱ्यांचे व शेण्यांचें ओझे नेअुन

* ह्या ताज्या दुष्काळाचें स्मरण आबाल वृद्धांस चिरकाल राहील यांत संशय नाही ! या दुष्काळाचें चित्र 'सदु सलगर' नांवाचें अेक छोटेसे पुस्तक प्रसिद्ध झालें आहे त्यांत अुत्कृष्ट रीतीनें दर्शित केलें आहे. तें अेकवार वाचून पाहण्याविषयीं आमची वाचकांस शिफारस आहे.

विकून, त्याचा बाजार करून, घरीं येउन, त्याची भाकरी करून आपल्या दुखणाईत नवऱ्यास घातली पाहिजे. ही स्थिति अेकाच ठिकाणीं आहे असें नाहीं; सर्वत्र दृष्टीस पडेल ! दुष्काळामध्यें आगगाड्यांमुळें ठिकठिकाणाहून दूरवरचा माल येउन दुष्काळग्रस्त प्रांतांत धान्याचे ढीग पडत. परंतु त्यांतील धान्य खरेदी करून पोट भरण्याचें सामर्थ्य कोणास होतें ? यामुळें धान्यराशी डोळ्यासमोर असून द्रव्यापत्तीमुळें लक्षावधी लोक अन्न अन्न करून मेले ! तेव्हां वरील सालीं जो, 'काळ पडला, काळ पडला' म्हणून बोभाट झाला तो धान्याधुन्याचा काळ नसून द्रव्याचाच काळ होता हें खचित. त्यास धान्याचा काळ म्हणतां येतच नाही; कारण स्टेशनां स्टेशनांवरून पल्लोंगणती धान्याची पोत्यांवर पोतीं पडलीं होतीं. पण त्यांचा अुपयोग काय ? जवळ पैसा असेल तर तें धान्य मिळणार; अेरवीं कसें मिळणार ? आणि अशामुळें कित्येक लोकांचा संहार झाला; कित्येक लोक देश सोडून गेले; व कित्येकांनी अत्यंत कष्टानें कसें तरी प्राण संरक्षण केलें ! माजी गव्हरनर सर रिचर्ड टेंपल हे जेव्हां दुष्काळग्रस्त प्रांतांचा देखावा घेण्यास गेले, तेव्हां ठिकठिकाणीं धान्य-राशी बघून त्यांस असें वाटलें कीं 'दुष्काळ ! दुष्काळ !' म्हणून जी लोकांची ओरड चालली आहे ही काय म्हणून ? सर्व प्रांतांत धान्याची अितकी विपुलता असून लोक अन्नावांचून मरतात म्हणजे काय ? याविषयीं त्यांची कांहीं समजूतच पडेना. ते म्हणत, जर वाटेल तितके धान्य घरांत सांठविले आहे तर दुष्काळ कोठचा ? परंतु त्यावेळीं हे त्यांच्या लक्ष्यांत आले नाहीं कीं, घरांत (गांवांत) जरी धान्याचे ढीग व राशी पडल्या आहेत, तरी त्यांतून अेक मुष्टीभर देखील धान्य त्याची किंमत त्या राशींपुढे ठेविल्या शिवाय मिळत नाहीं ! तरी, पुढें त्या साहेब बहादुरां-सही ही गोम समजून, त्यांस देखील वाटूं लागलें कीं, लोकांजवळ पैसा राहिला नाहीं व त्यामुळें हे दीन लोक अुपाशी मरत आहेत ! अस्तु.

यावरून आतां अनुमान काढावयाचे ? लोक पूर्वीपेक्षा संपन्न सुखी आणि निश्चिन्त झाले आहेत असें म्हणायचें किंवा ते निकृष्टावस्थेस पोंचत आहेत असें म्हणावयाचें ? याचा विचार होअुन तन्निवारणार्थ पुढारी लोकांचें लक्ष्य लागलें पाहिजे.

येथपर्यंत पूर्वीच्या ग्रामरचनेंत व हल्लीं चालू असलेल्या व्यवस्थेंत काय काय फेरफार झाला व त्यापासून रयतेस सुखलाभ किती अंशाने आहे किंवा मुळींच नाहीं याचें अंशतः अविष्करण झालें. तथापि ग्रामरचनेचा विषय येवढ्यानेच पूर्ण होत नाहीं म्हणून आतां अवशिष्ट भागाकडे वळू.

लोकवस्तीच्या सोयीकरितां ग्रामरचनेची व्यवस्था आहे हें तर सिद्धच आहे. परंतु लोकांचे संरक्षणास मुख्य जमीन हींच कारण आहे. ईश्वरानें ही पृथ्वी निर्मून तिच्यामध्यें सर्व प्रकारचा सांठा करून ठेविला आहे. त्याचप्रमाणें ती रत्नगर्भा म्हणजे रत्नांनी विपुल अशीही आहे. परंतु गरीब बिचाऱ्या लोकांना तिच्या पोटांतल्या रत्नांशीं काय करावयाचें आहे ? ती त्यांना सुफलदा झाली म्हणजे झालें. पेरलेलें धान्य सृष्टिक्रमाप्रमाणे उत्तम रीतीनें पिकून शेतकऱ्यास मिळालें म्हणजे तींच त्याला रत्नें मिळालीं असें तो समजतो. जमीन सुपीक होण्यास तिच्या अंगचे गुण जे पूर्वी (पृष्ठ १२ मध्यें) सांगितले ते असले, नाना प्रकारचीं खतें घालून पिकाऊपणा आणण्याची मालकानें मेहनत केली, आणि वेळच्या वेळी ईश्वरी प्रेरणेनें पडणारा जो पाऊस त्याचा नियमित-पणा राहिला म्हणजे मग जमिनीच्या मालकास काय कमी आहे ? आणि ह्या तिन्ही गोष्टींची जेथे अनुकुलता तेथे 'उत्तम शेती' म्हणून जें म्हणतात तें म्हणणें यथार्थ व्हावयाचेंच. याशिवाय सरकारचें धोरणही नीट असलें पाहिजे. ईश्वरी कृपेनें आपल्याकडे राजत्व आलें व म्हणून सर्व स्थावराचा आपण मालक असें समजून सरकारनें किंवा राजाने जमिनीवर वाटतील तसे सारे व धारे चढवितां उपयोगी नाहीं. पाऊसपाणी आणि पिकें बघून सरकारनें व राजानें आपलें घेणें आकारावें. आवर्षण, दुष्काळ वगैरे बघून सूट, तगाई दिली तरच रयतेचा बचाव होणार आहे. व याकरितां धारेबंदी फारच सोयीची करण्याकडे प्रजाजनहितैषी राजानें व सरकारनें लक्ष्य दिलें

पाहिजे. तसेंच चांगले साल आणि तोट्यांची सालें बघून शेतकरी निभावतील अशी कसर त्यांस ठेवण्याकडे धोरण असलें पाहिजे.

जमिनीची ईश्वरी नियमानें जी यथाक्रम व्यवस्था राहते ती पाहिली म्हणजे मोठा आनंद वाटतो. प्रथमतः अतिशय कडक उन्हानें जमीन तापून शुष्क होते व ती उलून तिला भेगा पडतात. ही तिची पूर्वावस्था होय. नंतर पर्जन्यकाळ लागून पावसाची वृष्टी होते; त्यामुळे वरील उलर जमीन भेगांतून उतरून आपोआपच वरची माती खाली व खालची माती वर येऊन व जेथें कोठें जमिनीवर मोठमोठी ढेंकळें आणि उंचवटे असतील तें सर्व पाण्यानें भिजून व विरघळून जमिनीला सपाटी येते. याप्रमाणें जमिनीला चांगल्या रीतीनें शिंपणें बसून ती थंड व नरम झाली म्हणजे ती नांगरण्यास फारसे आयास न पडून नांगरही फार खोल घालावा लागत नाही. येथ-पर्यंत सर्व व्यवस्था नीट होते. पण पुढें या जमिनीचें शत्रू कांहीं थोडें नसतात व त्यांचा सत्यानाश करून मुबलक पीक पदरांत पाडून घेणें म्हणजे आल्पायासाचें काम नसतें. जमिनीमध्यें आपण जें धान्य पेरूं तेवढेंच उगवून आपल्या पदरांत गुण्यागोविंदानें पडेल म्हणावें तर तसें बिलकुल होत नाहीं. शेतें पेरिल्यावर त्यांमध्यें कुंद, कास, हरळी वगैरे जातीचीं गवतें आणि धोत्रे, कुई वगैरे झाडें ही आगांतुक मंडळी उगवून सर्व शेतें व्यापून टाकितात. व या त्यांच्या व्यापानें पेरिलेलीं धान्यें सुखानें आणि जोमानें वाढण्यास मोठा प्रतिबंध होतो. या आगांतुक व त्रासदायक गवतांच्या व झाडांच्या मुळ्या फार खोलपर्यंत जाऊन त्या नुसत्या उपटल्यानें त्यांचे निर्मूल होत नाहीं. त्या पुनः पुनः उगवून साऱ्या शेताची नासाडी करतात. म्हणून दहा वीस वर्षांनी एकदां सोळा बैलांचा नांगर घालून सर्व जमीन खालवर करून तीं मूळखंडे काढून टाकावीं लागतात. बरड जमिनीपेक्षां जेथें फार खोलपर्यंत काळ्या मातीच्या थराचींच जमीन असते तेथें वरील शत्रूंचा उपद्रव मनस्वी असून वरील संस्कार तर वारंवार करावा लागतो.

खानदेश, गुजराथ वगैरे प्रांतांत दोन दोन बैलांनी नांगरणीचें काम होतें. परंतु कोठें जमीन फार कठीण आणि रेंवट असेल तेथें चार चार आठ आठही बैल लावावें लागतात. प्रारंभी एकदां पाऊस पडून मध्यें उघाडी झालीं म्हणजे त्यास वाफसा म्हणतात. ह्या वेळांत जमिनींतील वाफ बाहेर पडत असते व तेवढ्या अवकाशांत जें काय धान्य पेरावयाचें असेल तें पेरावें लागतें. हा वाफसा कोठें आठ दिवस व कोठें चार दिवस असा फारच थोड्या अवकाशाचा असतो व म्हणून जवळ खाजगत दोनचार बैल असले म्हणजे हा अवकाश बहुधा फुकट जात नाही. परंतु बहुतेक शेतकरी गरीब असल्यामुळें त्यांस बैल बाळगण्याचें सामर्थ्य नसतें व त्यामुळें अशा वेळीं त्यांस दुसऱ्याचे बैल कांहीं बोलीनें व करारानें उसने आणावें लागतात. परंतु कधीं कधीं असें होतें कीं, वेळेवर मिळण्याच्या संधानांतले बैल दुसरीकडे कामास लागल्यामुळे हा वाफसा फुकट जाऊन शेतकरी हळहळत पडतो. मग वाफसा गेल्यावर पेरणी कोठची? दुसरा पाऊस पडल्याबरोबर तर जिकडे तिकडे चिखल होऊन शेतांत पाऊलही देण्याची सोय नसतें, बरें, वेळेवर बैल मिळून पेरणी झाली म्हणजे पुढें तरी कमी अट्टाहास असतो असें नाहीं. वर लिहिलेले जमिनीचे शत्रू जे गवत व झाडें तीं उपटून काढण्यास मनुष्यांची मदत आवश्य पाहिजे. ज्यांच्या घरीं बायका मुलें वगैरे पुष्कळ मंडळी असते तीं सर्व शेतांत जाऊन वरील कामें करितात. परंतु ज्याचें घरीं तशी मनुष्यांची ऐपत नसते त्यास मजुरीनें मनुष्यें ठेवावीं लागतात. तेव्हां अशा प्रसंगी मजूरी देण्याचें तरी सामर्थ्य पाहिजे. परंतु गरीब शेतकऱ्यांस ती अनुकुलता नसते. घरचीं माणसें असलीं म्हणजे तीं सर्व खपून अंगमेहनतीनें शेताची मरामत ठेववेल तितक्या चांगल्या रीतीने चांगली ठेवितात. परंतु जेथें केवळ दादला बायको आणि घरांत पोरवडा असतो त्याच्या घरची शेती म्हणजे पैशाच्या मदतीनेंच जी काय होईल तेवढी होईल. पण हो मदत फारच थोड्यांस असते यामुळे शेतें ओसाड पडतात. त्यांची लागवड नीट रीतीनें होत नाहीं. आणि असें झालें म्हणजे शेतजमिनींत रानझाडें

फार माजून तो एक मोठा त्रासच होतो. याकरितां शेतें नेहमीं वहिवाटींत असावीं. शेतांची कामें म्हणजे कांहीं अल्पस्वल्प नसून शेतकऱ्यांस तीं सारखीं बारा महिने पुरत असतात. तीं कशीं हें पुढील शेतकामांच्या अनुक्रमांवरून समजेल: पहिल्यानें नांगरणी करावी लागते; नंतर कुळवणी झाली पाहिजे; कुळवणी म्हणजे पाळ्या पाडणे. त्यानंतर पेरणी होते; पुढें कोळपणी म्हणजे, जमीन चाळवून व धान्यांच्या रांगा सारख्या करून मधील गवत वगैरे काढून टाकावें लागतें; आणि नंतर कांपणी, मळणी वगैरे कामें असतात. तें शेतकऱ्यांस बाराही महिने पुरतात. याचप्रमाणें, कांहीं धान्यें लौकर होतात व कांहीं उशीरानें होतात. त्या धान्यांची मिसळ करूनच पेरण्याची वहिवाट आहे. पहिल्यानें जें धान्य तयार होतें तें काढून त्याचे बरोबर पेरलेलें परंतु उशीरां तयार होणारें धान्य तसेंच राहूं देऊन मागाहून काढून घेतात. ह्यास मोगणी म्हणतात. याशिवाय शेताच्या कांठाकांठानीं कर्डई, अंबाडी, एरंडी वगैरे पेरितात. याच्या योगाने शेतास एक प्रकारचें वई-सारखें रक्षण होऊन शेतांमध्यें गुरें जाऊन जी नासधूस करितात ती होत नाहीं. व कर्डई वगैरेंचा भाजीकडे उपयोग होतो. हीं झाडें फाल्गुनपर्यंत उभीं असून तीं काढण्याचीं वगैरे शेतकऱ्यांस उन्हाळ्यांत कामें पुरतात. एका कुटुंबास तीस बिघे जमीन संभाळण्यास ठीक पडते. म्हणजे घरीं दोन बैल ठेवून चांगल्या रीतीनें शेती करितां येते. व तेवढ्या शेतांचें काम त्यांस बारा महिने पुरतें. येणेंप्रमाणें शेतीचा उद्योग असतो. हा शहरांत राहणाऱ्या लोकांस कोठून माहित असणार? तो, ज्यांच्या घरीं शेतेंभातें व कुणबावा असतो अशांस किंवा गावठ्यांत राहणाऱ्या व केवळ शेती-वरच निर्वाह चालविणाऱ्या लोकांस मात्र ठाऊक असावयाचा.

पदार्थमात्रास परिमाण व मोजणें, मापणें हीं असलींच पाहिजेत. त्याप्रमाणें जमीनीच्या मोजणी-मापणीचेही देशादेशाच्या संप्रदायाप्रमाणें निरनिराळे नियम आणि निरनिराळी मापें केलेलीं असतात. पुरातन काळापासून जमिनीची मोजणी मापणी करण्याची चाल आहे. आपल्या इकडील जमीन मापणीचे बिघा, पाईन, रुका, खंडी, पांड, कांठी, चाहूर वगैरे अनेक भाग केलेले आढळ-तात. यांत कांहीं भाग पिकाचे मापावर केलेले असतात. ज्या शेतांत खंडीभर धान्य पिकतें त्या शेतात खंडीभर जमीन असें म्हणतात. गुजराथेंत जमीनींचें माप कुंभे म्हणून भागांनीं चालतें. आपल्या इकडील बिघे वगैरे व गुजराथेंतील कुंभे वगैरे या भागांचे हल्लीं सरकारनें एकर, गुंठे वगैरे मापें केली आहेत. आपल्या इकडे जें बिघ्याचें माप चालतें ते बिघे तरी सर्वत्र सारखे आहेत असें नाहीं. कोठें बिघा लहान असतो व कोठें मोठा असतो. तेव्हां असें लहान मोठें माप असलेलें सरकारी हिशेबास चांगलें पडत नसून घोंटाळा होतो. म्हणून सर्वत्र सारखें माप चालू ठेवण्याकडे सरकारचें विशेष धोरण दिसतें.

हिंदुस्थानच्या भूमीस नाना वृक्षरूप अनेक अलंकार आहेत. त्यांत मोठा अलंकार म्हटला तर आंबा आहे. आंब्याचे गुण व त्याचें वैपुल्य यांमुळें या देशांत तो सर्वप्रिय पदार्थ आहे. त्याला अमृतघुटका, मनोहर बत्तासा, दिलपसंत अशीं अनेक नांवें अनेक लोक देतात. हिंदुस्थानांत हे वृक्ष विपुल असून त्यांचे मधूर फल सर्वांना प्राप्य आहे. आम्रफलाची तारीफ हिंदुग्रंथकारांनी ठिकठिकाणीं केली आहे. मनुष्य गरीब असो किंवा श्रीमान् असो; त्याला आपला पाहिजे तसा हर प्रयत्नानें आंबा मिळतोच. आंब्याचें माधुर्य आणि अदुर्मिलता हीं सर्वप्रसिद्ध आहेत!*

---

*सुभाषितांत एके ठिकाणीं आंब्याविषयीं वरील-गोष्टी-माधुर्य आणि अदुर्मिलता फारच सुरेख वर्णिलेल्या पाहिल्या आहेत. आंबा म्हणतो:

गर्वं मा कुरू शर्करे! तव गुणान् जानन्ति राज्ञां गृहे
ये दीना धनवर्जितास्च कृपणाः स्वप्नेऽपि पश्यन्ति नो॥

आंब्याप्रमाणेंच फणस, चिंच, नारळ वगैरेंचें वृक्ष या देशांत पुष्कळ असून ते एकदां लागले म्हणजे शेंकडों वर्षेपर्यंत त्यांपासून मनुष्यनिर्वाहाचे पदार्थ उत्पन्न होत असतात. आंब्याचे अनेक खाद्य पदार्थ होतात आणि त्यांच्या लांकडांच्या इमारती वगैरेंकडे उपयोग होतो. याप्रमाणेंच नारळीचींही गोष्ट आहे. या वृक्षांचींही शाखाफलपर्णे हीं सर्व लोकांच्या अत्यंत उपयोगी पडतात. नारळाचें डव तर सर्वप्रसिद्ध आहेत. जुन्या काळीं हे डव, हल्लीं उपयुक्त म्हणून चालू असलेल्या कांचेच्या कुप्यांचे जागीं, अप्रवाही पदार्थ ठेवण्याच्या फार उपयोगी पडत. नारळाच्या हीरांच्या केरसुण्या, त्यांच्या सालींचा काथ्या व सुंब, फांद्यांचे ओमण, सोटांचे नळ, खोबऱ्यांचे तेल व मसाला आणि त्याचप्रमाणें नारळाचे मिष्ट दूध व त्याच्या किसाचीं अनेक पक्वान्नें होतात. खोबरें हें खाण्यास खमंग असून पौष्टिक व रुचिकर आहे. असे कित्येक वृक्ष फलें, धान्यें फुलें व वल्ली वगैरे या हिंदुस्थानांत आहेत कीं, त्यांची अविभाज्य, उपयुक्तता सर्व जगांत मान्य व पसंत आहे. आणि त्यांचें वैपुल्य असल्यामुळें एतद्देशस्थांसारखे गरीबगुरीब लोक देखील थोड्याथोडक्यांत निर्वाह करून आयुष्याचे दिवस सुखासमाधानांत काढण्यास समर्थ होतात! त्यांना दुसऱ्यांच्या मोठमोठ्या संपत्ती घेऊन, दुसऱ्यांचा घातपात करून किंवा दुसऱ्यांचा अपहार करून आपला मात्र तळीराम गार करून बसण्यासारखा रुक्ष मुलुख ईश्वराने त्यांचे वाट्यास दिला नाहीं; व येवढ्याकरितां हिंदुस्थानासारखें निरुपद्रवी दुसरे राष्ट्र कोणतेंही सांपडणार नाहीं.

ह्या सर्व गोष्टी असून मग लोकांची हलाखी कां जिकडे तिकडे गाईली जाते? हा प्रश्न या मागून येतो. या देशांतील जमीनीं पिकाऊ, हवा चांगली, देश समशीतोष्ण, ग्रामरचना व्यवस्थित, लोक सालस, आणि वाटेल त्या पदार्थांची विपुलता, इतक्या गोष्टी अनुकूल असून लोकस्थिती अशी शोच्य व दीन कां झाली आहे? यावरून कांहीं तरी यंत्र बिघडलें आहें हें खचित. व हा यंत्रबिघाड जनसमुदायांतील नसून, राज्यकर्तृत्वभागामध्ये त्याचें कांहीं तरी बीज असावें असें वाटतें. तेव्हां त्याजविषयीं प्रकृतविषयविवेचनांत कांहीं प्रसंगोचित लिहिणें इष्ट आहे. देशस्थिती जर वर लिहिलेल्या सर्व अनुकूल गोष्टींनी युक्त आहे तर त्याची जी हल्लीं दुष्ट स्थिती अनुभवाला येत आहे ती कशामुळें हा विचार नको कां करायला? प्रथमतः आपण हा विचार केला पाहिजे कीं

वनानि गिरयो नद्य-स्तीर्थान्यायतनानि च।
देवखाताश्च गर्त्ताश्च न स्वाम्यं तेषु विद्यते॥ निर्णयसिन्धु.

"रानें, डोंगर, नद्या, तीर्थे, देवस्थानें, मीठागरें व तळीं वगैरेंवर कोणाचाही धनीपणा नाहीं." अतएव, त्यांजवर सर्वांचा सारखा हक्क असून त्यांचा सर्वांनी बिनहरकत उपभोग घ्यावा अशी पूर्वीच्या राज्यकर्त्यांची मर्यादा असें. परंतु हल्ली कसा काय प्रकार आहे तो सर्वांस माहीतच आहे! पूर्वी ज्या गोष्टींच्या संबंधानें निखालस प्रतिबंध म्हणून धर्मनीतींत लिहून ठेविला आहे तद्विरुद्ध गोष्टी हल्लींचे राज्यकर्ते चकचकीत आपले कर्तव्य व नीति म्हणून करीत आहेत! तेव्हां लोकस्थिति बिघडली यांत नवल ते कसले? पूर्वी राने, डोंगर, नद्या, तीर्थे, देवस्थानें, मीठागरें व तळीं वगैरे आवश्यक पदार्थांस कांहीं एक खर्च न पडता ते यथेच्छ मिळत होते. परंतु हल्ली ते सर्व पदार्थ राज्यकर्त्यांच्या करांखालीं गेल्यामुळें गवताची एक काडी, किंवा लांकडाची एक फांटी अथवा

---

आम्रो ऽहं मधुकूपकैर्मधुफलैस्तृप्ता हि सर्वे जना
हे रंडे! तव किं गुणा? मम फलैस्तुल्यं न किंचित फलं!

"हे साखरें? तूं गर्व करूं नकोस; तुझें गुण फक्त श्रीमान् लोकांचे घरीच काय ते समजतात; परंतु जे दरिद्री, दीन व कृपण आहेत ते तुला स्वप्नांत देखील बघत नाहींत! पण माझी गोष्ट अशी नाहीं. मी आम्रफल असून माझीं मधाच्या सांठ्यांची गोड फलें खाऊन सर्व लोक तृप्त असतात! तेव्हां, अगे! तुझे गुण ते कोणते? माझ्या फलांबरोबर कोणत्याही फलाची बरोबरी होणार नाही!"

मिठाचा खडा फुकट म्हणून कोणास मिळेनासा झाला आहे! दूध, तूप, गुरांचा चारा; इमारती लांकडे वगैरे सर्व महाग झाली. तीर्थें, देवस्थानें यांच्या संबंधानेंही रूपांतरानें पण लोकांस कर पाव्या द्याव्या लागून त्यांजवरचेंही स्वामित्व राजकर्त्यांकडेसच पूर्णपणें गेलें आहे. अशी जेव्हां स्थिती आहे तेव्हां लोकांची दैना होऊं लागली यांत ते आश्चर्य कसलें? सर्व प्रकारें प्रजेला नाडिल्यावर तिणें डोकें लागली वर काढावें कसें व देशस्थिति चांगली आहे असें दुसऱ्याला कळावें कसें?

आपल्या देशाचा व आपल्या ग्रामाचा प्रत्येकाला अभिमान असावा व असतो. परंतु, राज्यकर्त्यांच्या चमत्कारिक आचरणानें लोक हल्लीं जिकडे तिकडे उदासिन दिसतात. कारण, त्यांचे म्हणून कोठेंच कांहीं राहिलें नाहीं असें त्यांस वाटूं लागलें आहे. आपण मोठ्या कष्टानें व श्रमानें मिळविलेली घरदार, शेतेंमळे वगैरे जिंदगी ही आपल्याकडे चिरकाल भोगवट्यास राहीलच अशी खात्री बाळगणें मोठ्या संशयाचे झालें आहे असें सर्व लोक समजतात. आणि नाना प्रकारचे विलक्षण विलक्षण कायदे, कानू व म्युनिसिपालिटीचे कर, स्थानिक कर, बादशाही कर वगैरेंनीं आपल्या जिंदगीवरचें स्वामित्व सर्वांशानी उडून गेले असें सर्व लोक मानितात. तेव्हां हा सर्व प्रभाव कशाचा बरें? तर प्रस्तुतच्या विलक्षण राजनीतीचा, मनुष्यांमध्येंही अपहार बुद्धीची कांहीं कमाल दिसून येते! मनुष्यामधील सत्य, अस्तेय व नीतिमत्ता हीं मुळींच नाहींशीं झालीं तर लोकांनींही आपपरपणा विसरून जाऊन उदासीनवृत्ति धारण करणें हें ही साहजिकच आहे. वस्तुतः आपल्या देशाविषयीं किंवा ग्रामाविषयीं रामचंद्राची जी लक्ष्मणाला उक्ति आहे तीच असणें स्वाभाविक आहे –

> पित्राऽर्जिता च या भूमि-निर्धनाऽपि सुखावहा ॥
> अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण! रोचते ॥ रामायण.

'वडिलांनी जी जागा मिळवून ठेविली ती निर्धन जरी असली तरी सुखावह आहे. परंतु सोन्याची जरी लंका असली तरी ती मला आवडत नाही.' असे रामचंद्र लक्ष्मणाला म्हणाले. परंतु वर लिहिलेल्या विलक्षण कायदे वगैरेंमुळें लोकांस आतां असें झालें आहे कीं,–'जिकडे भरला दरा तोचि गांव बरा!' नोकरी चाकरी लागून पोटापाण्याचा धंदा चालू राहील व आपलें व कुटुंबाचें आणि मुलालेकरांचें कसेंबसें पोट भरून अन्नवस्त्राची यातायात न पडेल अशी जेथे संस्था असेल तोच गांव प्रिय वाटून, आयुष्याचे दिवस तेथेंच घालविलेले बरे वाटतात! आपला गांव आणि आपला देश म्हणावा कोणी?' आपले काय आहे? असे उद्गार लोकांकडून निघतात. तेव्हां एकंदरीत हल्लीं ग्रामरचनेची शिस्त बिघडली आहे यांत संशय नाहीं.

या देशांतील पूर्वापार संप्रदाय असा आहे कीं, एकदां पिकें तयार झाली म्हणजे शेतांची पाहणी करण्यांस कामदार निघत. व त्यावेळीं कमी जास्त पिकें बघून कोणास सूट, तगाई वगैरे कमी जास्त देणें असेल ती देत. ह्यामुळें ज्या कित्येकांच्या पिकांस पावसानें, टोळांनीं, उंदरांनी व जळितानें वगैरे धोका बसे, त्यांवर सरकारांतून हल्लीं सारखा एक सहा जुलूम होत नसें. परंतु ती वहिवाट हल्लीं मोडून, बिनसूटधारे ठरविल्यामुळें रयतेची हलाखी होऊन सावकाराचे अधीन गरीब लोक झाले! क्षत्रिय राजे होते तेव्हां जमीनीच्या उत्पन्नाचा षष्ठांश राजभाग म्हणून घेऊन बाकीचे पांच भाग रयतेला मिळत. त्या काळीं येथे व लहान लहान मांडलिक राज्यें व संस्थानें बहुत असून त्यांजवर चक्रवर्ति म्हणून राजराजेश्वर असे. राजांचें लक्ष्य प्रजेच्या हिताकडे असून, तिला धुऊन पिळून काढण्याकडे नजर नसल्यामुळें रयत स्वदेशाविषयीं व स्वग्रामाविषयीं अभिमानी असे. परंतु पुढे राजनीति जी बिघडत चालली ती हल्लीं करांच्या वगैरे जुलमानें ह्या थराला आली. लोकांमध्यें कितीही शांति, सुख, स्वस्थता, थापडवाईकपणा आणि निरुपद्रविता असो. परंतु लोकांचे पूर्ववैभव, अभिमानछाती आणि कर्तव्यतत्परता हीं शिथिल पडत चाललीं आहेत हें अनेक उदाहरणांनीं सिद्ध

करून दाखवितां येईल. हें शैथिल्य येण्यास एकच कारण नसून अनेक कारणें आहेत व त्यांतीलच ग्रामरचनेचें व त्यांतील कारभाराची अव्यवस्था हें एक कारण निघत आहे.

वर सूट तगाईच्या संबंधानें पूर्वींची रीति सांगितली ती आजही सर्वांशीं अनुकरणीय आहे. ऐनजिनसी सारा* हा रयत व सरकार या उभयतांसही देणें व घेणें सुखकर असून त्यांत रयतेच्या हिताकडे विशेष लक्ष्य पुरविलेंसें होणार आहे. परंतु सरकारानें धान्याची ही रीति कां मोडली याचें कारण पाहिलें तर इतकेंच दिसतें कीं, वसूलाचा नक्की आंकडा म्हणून त्यांस हल्लीं सारखा अगोदर न समजतां जमाबंदीच्या संबंधानेंही कामदारांस विशेष खटपट व श्रम पडणार आहेत. व यांमुळें सरकारच्यानेंही पूर्वींची रीति चालू करवत नाहीं. बिनसूट वसूलानें कामदारांस मात्र फार सुख होतें. नेमलेल्या तारखेस जमा होणारा वसूल गोळा करावयाचा व ज्याचे कडून वसूल येणार नाहीं त्याची जमीन, घर, दार, शेत वगैरे जें असेल त्याचा लिलांव फुंकून पैसा वसूल करून चालतें व्हावयाचें. यापेक्षां हल्लीं जास्त खटपट आणि श्रम पडत नाहींत. नाहीं तर सुटींचीं पत्रकें तयार करा, ज्याचा पैसा ज्यास्त आला असेल त्याचा त्याला व्यवस्थेनें पोंचता करावा, सूट देणें किती अंशानें बरोबर आहे किंवा नाहीं हे बघा, त्यामध्यें अनेक वाद तक्रारी ऐका, इतका व्याप करण्यापेक्षां एकदम ठरविलेला सारा मुदतीच्या मुदतीस वसूल करून कुळाला पावती दिली कीं आटोपलें काम. म्हणजे दुसऱ्या कामकाजांकडे लक्ष्य देण्यास वेळ होतो; अशा धोरणावर सरकारनें हल्लींची वसूलीची आणि धारेबंदीची वहिवाट ठेविली आहे. आतां ह्या दोन योजनेंत सरकारनें आपली कांहींही सोय काढिली असो; परंतु येणेकरून रयतेचा फायदा आणि तज्जन्य तिची उर्जितावस्था हीं अगदी नाहींशी झालीं इकडे सरकारचें लक्ष्य गेलें पाहिजे. हा या देशाचा चिरकालिक तोटा आहे. सारांश, रयतेस सुख म्हणून भासत नाही. ती बिचारी अज्ञान असून तिजला आपला पैसा संभाळण्याचें वकूब व ऐपत नाहीं. एवढ्याकरितां रयतेचें व्यवस्थापकत्व सरकारसारख्या वजनदार पुरुषांनी आपलेकडे घेऊन तिचें तज्जन्य आपलें कल्याण करून घ्यावें. रयतेला काळजीचा व्यवस्थापक पाहिजे हें म्हणणें कित्येकांस चमत्कारिक दिसेल. परंतु तसा चमत्कार वाटण्याचें कारण नाहीं. हल्लीं गांवांतून फिरूनच पाहिलें तर गरीब व अज्ञान रयतेचें व्यवस्थापकत्व बहुशः व्यापारी, वाणी, गुजर, मारवाडी किंवा सावकार यांजकडे असलेलेंचे आढळेल. रयतेच्या अनेक प्रकारच्या अडचणी सरकार पुरवूं शकत नाहीं. याजकरितां त्यांस सावकारांची गरज हमेषा लागते. शेतकऱ्यांस बीं, नाडा, मोट, बैल, पोटास दाणा, लग्नकार्यांत खर्चावयाला व शेतांतल्या मजूरांना पैसे वगैरे, लागले म्हणजे त्यांस सावकरांवाचून गत्यंतर नाहीं. व त्यामुळें हें सावकारच त्यांचे व्यवस्थापक होतात. त्यांच्या शेताभातांत किंवा गांवढ्यांवर त्यांचे जें उत्पन्न होईल त्याला नीट दर लागून त्या मालाची विक्री झाली म्हणजे सावकार आपल्या कर्जाची व्याज वगैरेंपुरती तरी फेड करून कुळांच्या निर्वाहाची काळजी ठेवतो. ह्याप्रमाणें सावकार हेच त्यांचे व्यवस्थापक होऊन त्यांजकडून उद्योगधंदे करवितात. यास्तव, शेतकऱ्यांकरितां पेशाच्या पेढ्या घालाव्या व त्यांस तगाई, सूट वगैरे द्यावी याविषयीं अलीकडे लार्ड रिपन साहेब यांणीं ठराव केले आहेत; ते उदारपणें अंमलांत येतील तर रयतेस फार सुख होईल. कारण, वरील व्यवस्थापकांपासून रयतेचा म्हणून कांहीं फायदा होतोसें दिसत नाहीं. आणि त्यांवांचून तर गति नाहीं. सरकारच्या तोंडाकडें बघावें तर तें काय रयतेविषयीं अगदीं उदासिन! पिकांत तोटा आला म्हणून सरकाराला कांहीं करूणा येत नाहीं. तें जणू काय निष्करुण बनलेले! त्याचा सारा तर जितकाचा तितका भरला पाहिजे; नाहीं तर वहिवाटींच्या शेतभातांचा लिलांव होऊन पुढें

* ऐन जिनसी सारा घेण्याचे वहिवाटीस गुजराथेंत 'कळतर' किंवा 'भागवटाई' म्हणतात. याच वहिवाटीस कोंकणांत 'तसर' म्हणतात व नक्त रुपये किंवा भात दाणें देतात त्यास 'खड' म्हणतात.

निर्वाहाची पंचाईत पडणार. या धास्तीनें कसेंही करून सावकाराच्या अटी कबूल करून सरकारचा तगादा शेतकरी लोक दूर करितात. मग राहिले सावकार. ते तर त्यांच्या जन्माला पुरले असतात. प्रतिवर्षी कांहीं वसूल होईल तो व्याजांत धरून व पुनः कार्यप्रसंगी आणखी कर्ज देऊन माक्त्यांनं मुद्दल रक्कम कायमची कायम राहते. ह्याप्रमाणें सर्वांशी शेतकरी व गरीब कुणबी सावकारांचे अधीन होऊन राहतात. त्यांचें डोकें म्हणून वर निघत नाहीं! बरें, अशा धंद्यांत सफै बुडाल्यानें परदेशांत जाऊन तेथें कांहीं निर्वाहाचा उद्योग बघण्याचे मनांत आणिलें तर तेंही सर्वांशी असंभाव्य. लोकांना परदेशी जाऊन राहण्याचे धैर्य नाहीं, त्यांजवळ द्रव्य नाहीं, व त्यांना कोणा पुढाऱ्याचें बल नाहीं. शिवाय, यदाकदाचित् जीवाचा धडा करून ते परदेशांत वसाहतीला किंवा निर्वाहोद्योगाला गेले तरी त्यांच्या मागच्या आपत्ती आणि संकटे त्यांना कोठें सोडितात? अनेक प्रकारच्या व्याधि व तज्जन्य दुःखे व नुकसानी हीं सोसण्याचें सामर्थ्य पाहिजे. प्रवास करावयाचा व रानावनांत फिरावयाचें तर पायांत जोडा नाहीं व अंगांत अंगरखा नाहीं. अशी सर्वांशानें गरीब लोकांची मोठी दैन्यावस्था आहे. तेव्हां ती दूर व्हावी कशी आणि ज्या राजाचे अंमलाखालीं ते लोक आहेत त्यांस त्यांबद्दलची काळजी वाटावी कशी?

लोकांच्या जवळून आपण जो पैसा घेतों त्याचा हिशेब पैसा घेणाऱ्यानें लोकांस दाखविला पाहिजे. म्हणजे त्या पैशाचा सद्व्यय झाला किंवा अपव्यय झाला हे लोकांस समजून समाधान वाटेल. त्याप्रमाणेंच मनसोक्त आचार बंद होऊन वरिष्ठाच्या आचरणास कांहीं तरी नियमन आणि बन्धारण असलें पाहिजे. पूर्वी वसूल बाकीचे हिशेब असावे तसे नसून लोकांजवळून पैसे घेतले तर त्यांजबद्दलची त्यांस भरपाईची पावती देण्याची रीति नसे. व यामुळें कधीं कधीं वसूलाची दुसारणी देखील होऊन रयतेवर जुलूम होई. तशीच, जमिनीची मोजणी व प्रतबंदी वगैरे नसल्यामुळें वसूलाचे वगैरे कामांत अत्यंत अंदाधुंदी आणि जुलूम चालत असत. परंतु पुढें तोडरमल्ल व मलीकंबर वगैरे जे राजकारस्थानी व दूरदृष्टि पुरुष होऊन गेले त्यांणीं जमीनीची मोजणी मापणी करून व कमाल आकार आणि तनखे ठरवून बरीच व्यवस्था केली. तरी त्या ठरावाप्रमाणे वसूल कधीं होत नव्हता म्हणजे जो वसूल होई तो जमा करीत, सूट वजा करीत आणि बाक्या काढीत, म्हणजे झालें. पुढें इंग्रजी झाल्यावर विंगेट साहेबानें पाहाणी केली.* व धारेबंदी ठरविली. ते धारे माफक असून त्यामुळें रयत आबाद झाली. याचें कारण बघितलें तर, दर ठरोतीच्या पूर्वी बाजीरायांच्या कारकीर्दीत अत्यंत अव्यवस्था होती. दंगे, लढाया, लुटालुटी मक्त्याच्या मामलती वगैरेंनी रयत फार पीडित झाली होती. व तिची ती हलाखी इंग्रजी होऊन वीस वर्षे झालीं तरी तोंपर्यंत होती. पुढें रस्ते पूल वगैरे होऊन देशांत बरीच स्वस्थता वास करू लागली व मुंबईचा व्यापार वाढला; वर लिहिलेली नवीन पैमाष होऊन लोकांना चिरस्थायिता वाटूं लागली; व बाजीरावापेक्षा आबादानी वाढूं लागली. इंदापूर, भीमथडी, सोलापूर, चिकोडी, खानदेश वगैरे प्रांत बहुतेक उजाड पडले होते. त्यांत पुनः लोक येऊन राहूं लागले व बहुतेक जमीनी आपल्या नांवावर घेऊन पड जमिनी लागवडीस येऊं लागल्या. पाटील कुळकर्णी वगैरेंच्या हक्कदाऱ्या आणि जुलूम जबरदस्ती वगैरे सर्व बंद झाल्या. आणि लोक सुखानें शेतीभाती करून निर्वाह करूं लागले. हाच काळ जर पुढे तसाच अबाधित चालता, तर आज जी लोकांच्या दीनावस्थेची पुनः ओरड करण्याचा दुष्ट काळ आला आहे तो कदापि आला नसता. परंतु ते व्हावें कसें? लोक बिचारे जरा पुढें

*अद्यापि असेंही कित्येक प्रांत आहेत कीं, त्यांची मोजणी अजून झालीच नाहीं. अशा ठिकाणीं जमाबंदीची वहिवाट 'आऊतबंदी'ने असते. 'आऊतबंदी' म्हणजे दोन बैल व एक नांगर येवढ्यानें जितकी जमीन लागवडीस आणिता येईल तितक्या जमीनीबद्दल दोन किंवा चार रुपये सारा सरकारास भरावा. आणि अशा रीतीनें जी जमाबंदी होते तिला 'आऊतबंदी' असे ह्मणतात.

सरसावताहेत तों पुनः दुसरी पाहणी होऊन जमिनीचे दर एकदम दुप्पट झाले! आणि तेन्हांपासून हिंदुस्थानच्या भाग्योदधीस पुनः ओहोटी लागली ती अजून तशीच आहे व त्यामुळें चोहोंकडून ओरड ऐकूं येत आहे!

हिंदुस्थानांत कांहीं एकच प्रकारचे लोक नसून सर्वांच्या स्थिति रीति आणि अवस्था कांही एकसारख्याच नाहींत. संपत्ति, विद्या, उद्योगीपणा व श्रमसाहकता, इत्यादि गुणांनी लोकांचें निरनिराळे वर्ग होतील. परंतु त्या सर्वांत, अत्यंत निकृष्टावस्थेत असलेले, सदैव पराङ्मुख आणि पूर्ण दैवदुर्विलासी असे हिंदुस्थानांतले भील, कोळी, कातकरी, रामोशी, कातवडी, दुबळे, ठाकूर, वारली वगैरे जातींचे रानटी व मूढ लोक आहेत. ते बिचारे मोलमजूरी किंवा शिकार वगैरे करून पोट भरितात. या लोकांची स्थिति बघितली म्हणजे दारिद्यदेवतेचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यासारखे होतें! त्या बिचाऱ्यांचे दारिद्य वर्णनास आपली भाषा कोती किंवा असमर्थ आहे असें म्हटले तरी चालेल! ते बापडे बोलतात, चालतात यांवरून त्यांस मनुष्य म्हणावे इतकेच. बाकी त्यांची अवस्था निव्वळ जनावरांप्रमाणें आहे! त्यांच्या जवळ चिंधी परकुऱ्या शिवाय वस्त्र मिळावयाचें नाहीं. मग इतर वस्त्रांचे स्वप्न देखील पडावयाला नको. त्यांच्या बायकांचे बाळंतपणास एक आणाही खर्च करण्याचें त्यांस सामर्थ्य नसतें. तेव्हां कोठें त्या बिचाऱ्यांच्या बायका आणि कोठें पांढरपेशांच्या तीन तीन महिने बाळंतपण भोगणाऱ्या स्त्रिया! ते दुबळे व अनाथ लोक, आपली आयुष्यें अशा दुःखाकष्टांत आणि हालाविपत्तींत काढतात! काय करतील बिचारे? ईश्वरानें जणू काय हीच दुःस्थिति त्यांच्या वांट्यास दिली आहे! मनुष्यपणाचीं सुखें, विलास, मौजा, कर्मणुकी, विविधकलाकौशल्यनिरीक्षणजन्य महानंद, चार लोकांत जा ये, त्यांचें त्यांस नांव तरी कशाला पाहिजे? बारा महिने तिन्ही काळ हे ईश्वराचे जीव बिनवस्त्रांनी आणि अन्नानें दिवस काढतात! रानावनांत पारध करून पक्षी, जनावरें, ससे वगैरे मारून त्यांजवर कसा बसा निर्वाह करावा ही त्यांची रीति आहे, ते आपले पशुतुल्य असून अक्कल, विद्या ही त्यांच्या विभागास विधात्याने दिलीच नाहीं असें दिसतें. याचें कारण उघड आहे कीं, सृष्ट्युत्पत्तीपासून त्यांना सुधारणेच्या स्थितींत आणण्याचा कोणींच प्रयत्न केला नाहीं. त्यांजवळ पैशाअडक्याचा तर विटाळ नाहीं; तेव्हां त्यांणीं विद्या-शाळांची कल्पना तरी मनांत कशी आणावी? ईश्वरानेंच त्यांचा सर्वस्वीं पतकर घेतला आहे. त्यांना दुखणें बाहणें आलें तर त्यांस औषध पाण्याची योजना त्यांची त्यांजकडून जी होईल ती होईल. त्यांना वैद्य, डाक्टर, सुईणी, वगैरेंच्या ज्ञानाचें आणि हस्तकौशल्याचें सुख स्वप्नांत देखील पहावयास सांपडावयाचें नाहीं. सारांश, सर्व प्रकारें त्यांची लाचारी व नादारी असून त्यांचें वर्णन देखील हुबेहूब करणें कठीण आहे. कोईनकांठचे गांव, घांटमाथा, पाटणखोऱ्यांतील मोरगिरीचा बाजार अथवा पेंठ संस्थान इकडे जाऊन पाहिलें असतां त्यांच्या स्थितीचें चित्र दिसेल. त्यांची अवस्था काय आहे ती प्रत्यक्ष डोळ्यांनींच बघावी म्हणजे त्यांत सर्व कळून येतें!

येथपर्यंत या विषयास अनुकूल तेवढे भाग विवेचन केले. आतां ग्रामरचनेसंबंधी उत्पन्नाची वगैरे थोडीशी माहिती देऊन पूर्वीच्या व प्रस्तुतच्या वहिवाटींत यासंबंधानें काय फेरफार झाला आहे व तो किती हिताऽवह आहे तेवढे पाहूं म्हणजे झालें.

गांवचीं वतनें एक तर्फा, दुतर्फा किंवा चार तर्फा असून प्रत्येक तर्फेच्या वडील घरचा मनुष्य आपापला हिस्सा अनुक्रमें पांच पांच किंवा दहा दहा वर्षे भोगितो ह्या तर्फा भावाबंदांच्या वांटण्यांनीं झाल्या असतात; किंवा वतनदारानें पूर्वी कधीं आपल्या मदतीस कोणाला बोलावून त्याजकडून कांही कार्य करवून घेतल्यामुळें त्याच्या उपकाराबद्दल देणगी म्हणून, आपल्या वतनांतील एक तर्फ (भाग) त्या साह्यकर्त्या व उपयोगी पडणाऱ्या मदतगाराला दिलेला असतो, त्यामुळे झाल्या असतात; अथवा तीं वतनें दोन किंवा अधिक कुळांनीं संपादन केल्यामुळें त्या सर्वांस त्यांचा उपयोग मिळावा म्हणून अशा तर्फांनीं वांटें केले असतात. हे तर्फावाले वतनदार आपल्या वांटणीप्रमाणें

स्वतः पांच किंवा दहा वर्षे वतनाच्या गांवाचा भोगवटा घेऊन आपला हिस्सा पावतात अथवा आपल्या तर्फे कोणी मुखत्यार नेमून त्याच्या मार्फत आपल्या वतनदारीचा भोगवटा घेतात. मग अर्थात त्या वतनदाराला जो गांवकऱ्यांकडून मान मिळावयाचा तो या वहिवाटदार मुखत्यारास मिळतो. कोठें कोठें हे मुखत्यार परंपरेचे झालेले आहेत व ह्या वहिवाटदारांस कागद पत्रांतून अजा-हत (मदतगार) असे म्हणण्याची वहिवाट दिसते. पूर्वी, जे कांही प्रयत्न करावयाचे त्याचें धोरण कोठें तरी वतनदारी मिळवायची इकडे असल्याविषयीं मागें (पृष्ठ १८) सांगितलें आहेच. तेव्हां असल्या वतनदारीच्या हक्कांस कोणी आडवे आल्यास त्याबद्दल मोठाले वाद चालावे व त्याकरितां लोकांनीं जीवप्राण टाकावें हे साहजिकच आहे. या वतनदारीच्या हक्कासंबंधानें उपस्थित होणारे वाद फार बिकट आणि घोंटाळ्याचे असतात. व त्यांचा न्याय करण्यांत फार खोल चौकशी होऊन योग्य निकाल झाला पाहिजे असे ते असतात. तसें न झाल्यास खरा हक्कदार वंशपरंपरा उपाशीं मरावयाचा व अपहारी व लबाड लोक वंशपरंपरेने सुख भोगणार असें व्हावयाचें. परंतु हल्लीं वतन-दारीकडील लोकांचे लक्ष्य उडालें आहे. याचें कारण सरकारांतून त्यांस मिळावा तसा मान मिळत नाहीं व सरकारास त्यांचा अभिमान नाहीं. सारांश, त्यांची इतर लोकांप्रमाणेंच दैना व हायहाय ऐकूं येतें. सर्व गोष्टींत वतनदारांस सरकारचें असहाय असल्यामुळें ते जागच्या जागींच ठार होत चालले आहेत व हेंच सरकारास कर्तव्य आहेंसें दिसतें!

पूर्वीच्या ग्रामरचनेप्रमाणें वतनदारांची आणि त्याच्या उत्पन्नांची हल्लीं काय व्यवस्था आहे ती सांगितली. आतां एकंदर विषयाचें मनन करून ह्या ग्रामरचनेच्या व तज्जन्य एकंदर देशाच्या हल्लींच्या स्थितीवर आपण थोडा विचार करून हा विषय संपवूं म्हणजे झालें. ग्रामरचनेचा विषय आम्हीं लिहिण्याचें योजिलें याचें कारण तरी विचक्षण वाचकांस कळून येईलच कीं, देशस्थितीच्या संबंधाने आज जे लोकोद्‍गार निघत आहेत ते उगाच कांहीं तरी बडबडत आहेत किंवा तत्वतः विचारानें खरोखरच त्याप्रमाणें सर्व प्रकार आहे हा लोकांस व सरकारास कळावा. याकरितां आतां यापुढें तो सर्व विचार थोडक्यांत देऊन या विषयाचा उपसंहार करूं म्हणजे झालें.

हल्लीं इंग्रजी राज्यांत पूर्वीची व्यवस्था सुधारून चालू केल्यास सर्वांस इष्ट आहे असे लोकोद्‍गार निघतात. व याचें कारण बघितलें असतां अगदीं बरोबर आहे. इंग्रजी राज्यांत मोठी चूक ही आहे कीं, सरकार एत्तद्देशीय लोकांचें मत म्हणून कांहींच घेत नाहीं. काळे लोकांवर म्हणून त्याचा विश्वास नसून त्यांस तें हलकट समजतें! आणि त्यांचे मत घेण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं; आपण जें करूं तेंच योग्य असून सर्वांनी तें मान्य केलें पाहिजे असें सरकारास वाटते. आतां हा कोण न्याय बरे? हा देश जिंकून त्यांणीं आपल्या ताब्यांत घेतला हें एत्तद्देशीयांच्या पापाचें फळ काय? आणि त्या पापामुळें सरकारची अशी बुद्धि होते काय? नकळे! सरकारच्या या काळ्या-गोऱ्याचे पक्षपाताने गोऱ्या कामदारांकडून अज्ञानानें अन्याय फार होतात. त्यांस काळ्या लोकांत मिळून मिसळून राहण्याचें आवडत नाहीं; त्यामुळें काळ्या लोकांच्या पूर्वापार रीतीभाती व आचारविचार हे कसे आहेत. हें माहित नसतें; आणि तेणें करून त्यांजकडून जे त्यांच्या वादांचे व कज्जांचे निकाल होतात ते भलतेच होतात असें अनेक प्रसंगी सरकारास व रयतेस कळून आले आहे. तथापि पहिल्यापासून जी सरकाराकडून डोळेझांक झाली तीच अद्यापि चालू आहे हें पाहून फार नवल वाटतें. दिवसेंदिवस सरकारास ज्यास्त ज्यास्त अनुभव येत जाऊन तें आपल्या कारभारांत आणि अंमल बजावणींत सुधारणा करील म्हणावें तर तसा प्रकार कांहीं दिसत नाहीं व लोकांची कुरकुर आणि ओरड कांहीं कमी होत नाहीं. सरकार आपल्या कारभारांत मुळींच सुधारणा करूं इच्छित नाहीं किंवा करीत नाहीं असें नाहीं. तें सुधारणा करूं इच्छितें व त्याप्रमाणें करूंही लागलें असेल; कबूल, परंतु ज्या गोष्टींविषयीं आणि ज्या कारभारांत पहिल्यानें आणि आवश्य सुधारणा व्हावी असे लोक इच्छितात व अपेक्षा करितात त्या गोष्टींत व त्या कारभारांत सरकारांकडून सुधारणेसारखा

कांहींच फेरबदल होत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ज्या गोष्टींत व ज्या कारभारांत सुधारणा व्हावी असें लोक इच्छितात त्या गोष्टी व ते कारभार म्हटले म्हणजे-जमीनीच्या बाबी, वसूल वासलाती आणि सर्व प्रकारचे दिवाणी फौजदारी न्याय. ह्याच गोष्टी आणि हेच कारभार अगोदर सुधारावे म्हणजे कोणाची कुरकुर आणि कागाळी ऐकूं येणार नाहीं. जमीनबाबींच्या चालू वहिवाटींनी आणि दिवाणी फौजदारींतील विलक्षण खर्चानें रयत अगदीं साधी आणि बिनखर्चाची असेः गांवकरी लोकांचे अनुमतानें पाटील कुळकर्णी वगैरे वतनदार नेमीत, व ते सभ्य लोकांना पंच नेमून त्यांजकडून पंचाइती करवीत. त्याप्रमाणें आतां केलें तर होणार नाहीं असें नाहीं. सरकारचीं मोठमोठीं कामें करून हल्लीं पेन्शनें (बैठे पगार) खात बसलेल्या सभ्य लोकांकडून जर असली पंचाइती कामें करविली तर होणार नाहींत असें नाहीं, व त्यात अन्यायही होण्याचा संभव कमी दिसतो. परंतु सरकाराचा लोकांवर भरंवसा पाहिजे ना? तो तर मुळीं त्याजमधून अगदीं नाहींसा झाला आहे! या बेभरंवशानेंच या देशाच्या लोकांचें असें हाल आणि अशा अपेष्टा मांडिल्या आहेत. हा भरंवसा जर आमच्या सरकारच्या मनांत असता तर मग काय पाहिजे होतें? पण तें व्हावें कसें? सरकारच्या मनांतून काळ्या लोकांविषयींचा विश्वास किंवा भरंवसा याचें सांठवण अगदींच रितें झालें आहे असें दिसतें. त्याच्या मनांत काळ्यांच्या विश्वासाचा एक थेंबही वसत नाहीं; सरकारला त्याचे जेवढे काळे लोक कामावर आहेत तेवढे मात्र अंशतः अथवा कांहीं पर्यायानें किंवा बाताबेतानें विश्वसनीय वाटतात; परंतु सरकारच्या नौकरींत नसणारे लोक मूर्तिमंत बेभरंवशाचे वाटतात असें म्हणतात हें खरें काय? पूर्वीच्या सरकारांचे आणि राजांचे सर्व विश्वास आणि भरंवसे, त्याचप्रमाणें सभ्य म्हणविलेल्या लोकांची अब्रू, साक, वजन, कीर्ति आणि मान हीं हल्लीं सारीं नाहींशीं होऊन ते जणूं काय कवडीमोल झाले असें सरकारास वाटूं लागलें काय? एल्फिन्स्टन साहेबांनी पुणें घेतलें तेव्हां बाळाजीपंत नातु यांस आपले कौन्सिलदार नेमून त्यांच्या सल्ल्यानें त्यांणीं दहा वर्षें काम चालविलें होतें. आणि त्यांच्या मसलतीनेंच त्यांणीं सरंजाम, जाहगिरी, पेन्शनें, बडे लोकांच्या यादी वगैरेचें बंदोबस्त केले. याचप्रमाणें इंग्रजीच्या अव्वलीस दरएक कलेक्टरांजवळ एकेक दप्तरदार नेमिलेला असून त्याचे मार्फत महालाचीं व जिल्ह्यांचीं कामें चालत होतीं. इतकेंच नव्हें, तर त्याचे सहीवांचून कलेक्टराचा हुकूम चालत नसे. यामुळें कलेक्टरांस सर्व प्रकारची माहिती व वर्तमानें स्वतः रास्त रीतीनें समजून घेण्याची संधी असे. परंतु आतां तसा प्रकार मुळींच राहिला नसून, सर्व साहेब लोक आपल्याला स्वतःसिद्ध समजतात व यामुळें त्यांस काळे लोकांचा सल्ला घेणें म्हणजे मोठी लज्जास्पद गोष्ट होय असें वाटतें. असें कां व्हावें हें कांहीं समजत नाहीं. हल्लीं सरकारनें पूर्वीच्या पंचाइती, लवाद, शिष्टमत वगैरे दरोबस्त एकीकडे सारून त्यांचे जागीं कोर्टें कचेऱ्या व वकील आणिले. परंतु त्यांच्या भाराखालीं रयत चिरडून जाऊं लागली तिकडे सरकारचें मुळींच लक्ष्य जात नाहीं हा चमत्कार नव्हे काय?

पूर्वी महजर होत होते. त्यांवरून असें दिसतें कीं कोणताही कज्जा असो, तो एका नियमित मुख्य कामदाराकडे येऊन, त्याचा निर्णय त्या गांवचें वतनदार व जमीनदार यांची सभा भरून होई. त्याचप्रमाणें कोणत्याहीं जिंदगीची, मालाची व चीजवस्तूची खरेदी विक्री वगैरे झाली तर त्याचे पत्रकावर गांवचे देशमुख, काजी यांच्या सह्या साक्षी होत म्हणजे झालें. असा सर्व शांततेचा सौम्यतेचा व बिनखर्चाचा व्यवहार असतां तो आतां जसा कांहीं एखादा मोठा बाऊ करू ठेविला आहे! हल्लींची कोर्टें, कचेऱ्या आणि वकील यांचें घोंटाळ्यांत बिचाऱ्या गरीबांची मुळींच दाद लागत नाहीं. तसेंच, एक पाटिलकी किंवा कुळकर्णपणाचें वतन यांचा एक आण्याचे हिश्याचा वाद असून तक्रार पडली तर मामलेदार, कलेक्टर, कमिशनर व हायकोर्ट किंवा सरकार यांच्या-मार्फत त्याबद्दल कागदपत्रें चालून दहा रुमाल कागद होतात आणि कोणास समजूत पटत नाहीं. शिरस्तेदारापासून तों कौन्सिलदारांपर्यंत सारखा धुमाकूळ माजून सर्व थकतात; तरी निकाल

होतच असतो. पैसेवाल्यांची मात्र चैन असते. सरकारचे कामदार बहुतकरून आळशी किंवा पोस्ती फार असून त्यांना जिकिरीच्या कामाचा मनापासून तिटकारा असतो. दिखाऊ कामें सर्व करितात; परंतु जिकीरीचीं आणि घोटाळ्याचीं कामें करण्याचा भाग म्हणजे त्यांना कंटाळवाणा वाटतो. ते काळजीनें किंवा खास्तीनें आपल्या कामावर वेळेवारीं हजरही नसतात. सगळे आपल्याच ऐटींत दंग असून आपल्याकडे गरीब रयत आणि आपले देशबंधु हिसके खाऊन आणि खेपा घालून दाद मागत आहेत; तेव्हां काळजीनें आणि उत्साहानें आपल्याकडे असलेल्या थोर अधिकाराचा त्यांस लाभ देऊन आपण त्यांना निश्चित करावे हें त्यांच्या स्वप्नींही वागत नसतें ! साहेब लोकांच्या कचेऱ्या आणि न्यायाधिशांची कोर्टें यांजमध्ये फेरे घालीत असावे, पैसे मोडीत जावे आणि वकील ब्यारिस्टरांची पायधरणी करावी तरी दाद लागत नाहीं ! अधिकाऱ्यांमध्यें चित्त देऊन काम करणारे अंमलदार फारच थोडे. ज्याचें त्याचें तारखा मोजण्याकडे लक्ष्य असतें. पहिली तारीख येते कधीं आणि पगार पदरांत पडतो कधीं याकडे ते चित्त देऊन बसले असतात. तेव्हां अर्थातच रयतेच्या दादीचें आणि न्यायाचें संकट होऊन प्रजेला दीन व लाचार होऊ बसावें लागतें ! खालच्या न्यायाधिशांनी विरूद्ध न्याय केला तर त्यावर हायकोर्टापर्यंत अपीलें करण्यास आणि भांडण्यास मार्ग ठेविले आहेत. परंतु त्यांचा काय उपयोग ? या भांडण्यांत आणि न्याय मिळविण्यांत घरदार विकून कफल्लक व्हावे लागतें ! हायकोर्टांत अपील लागलें म्हणजे घर बसल्या बोलावणें येतें. परंतु हें समन्स लागलें म्हणजे त्या मनुष्याला पाहिल्यानें काळजी ही पडते कीं, "मुंबईस अपीलाच्या दिवशीं हजर राहण्यास जावयाचें, तर गाडीचे भाड्याच्या खर्चाला पैसे कोठून आणूं" ? बरें, मुंबईस गेल्यावर त्याला कळतें कीं, वकील पहिल्यानें पंचवीस रुपये मागतो व १०० चा बक्षीस रोखा लिहून दे म्हणतो. त्याचप्रमाणें हायकोर्टात साक्षी आणण्याकरितां कोर्टाचा भत्ता, साक्षीदारांचा खुराक, स्टांपांचा खर्च त्याशिवाय कारकून शिपायांस चिरमिरी इत्यादि खर्चांची सदरें भरावयाला पैसे पाहिजेत. हे इतके पैसे आणूं कोठून ? ही त्याला आणखी काळजी उत्पन्न होऊन त्याची कंबर खचून जाते. दाद लावून न्याय मागावयाचा म्हणजे पैशांशी उठावयाचे आणि पैशांशीं बसावयाचे असें त्याला आढळून येतें व हें सर्व पैशांचें गारूड व गौड बंगाल आहे असे कळून येऊन त्याची निराशा होते. मग तो बिचारा व्यग्रचित्त होऊन असें म्हणतो कीं, जळो तो कज्जा आणि दावा. या भानगडींत आणि खर्चांत पडून आपल्याला आणखी खर्चांत बुडवून घेऊ नयें ! असें म्हणून तो परत घरीं येऊन स्वस्थ बसतो. त्याला कोर्ट म्हणचे पैशाची अुधळपट्टी आणि धूळधाण करणारी अशी कालिकादेवीच्या बलिदानाची महावेदीच वाटते ! यामध्यें लक्षावधी रुपये घातले तरी स्वाहा होअुन न्याय मिळतच असतो ! काय हीं पैसा पिळून काढण्याचीं विलक्षण यंत्रें सरकारनें लावून दिली आहेत ! हे अनर्थ आणि व्याप टाळण्यास पूर्वीची पंचाअिती करण्याची रीति फारच सुखसोयकर आणि व्यवस्थित आहे असें विचारांतीं आढळून येतें. जेथें तेथें माहितगार, लोकांच्या वागणुकी समजणारे आणि व्यवहारज्ञ असे पोक्त विचाराचे व केले सवरलेले लोक असतातच. त्यांजकडून ह्या देण्याघेण्याच्या पंचाअिती करविल्यास सत्य काय असेल त्याप्रमाणेंच न्याय होअील. ह्या लोकांस कायदाकानूंचे ज्ञान नसलें तरी सत्य समजण्यास कायदे कानू लागत नाहींत. आणि पूर्वी हीच पंचाअितीची रीति सर्वत्र प्रचारांत असून ती सर्वांस अनुकूल वाटत असे. आतांची कोर्टें, त्यांतील कायदे, त्यांच्या मुदती आणि त्यांजमध्यें लागणारे हत्तीसारखे खर्च हीं लोकांस बिलकुल अनुकूल न पडतां अगदीं जेरीस येतात. तसेंच, कायदेही फार अवघड असून त्यांचे अर्थ साधारण मनुष्यांस होत नाहींत अशी पंचाईत असते. तेव्हां यांजविषयी जर सरकारनें योग्य तजवीज केली तर लोकांचे पुष्कळ कल्याण झालें असें होअील. हा न्यायमनसुबीचा भाग झाला. आतां जमीनबाबींचा आणि वसूलवासलातीचा कसा काय प्रकार आहे आणि त्यांत काय व्यवस्था झाली पाहिजे ते बघूं.

जमीनींची व्यवस्था कशी असते, त्यांना लागणाऱ्या पर्जन्याची अनियमितता किती असते, कीड काजळी टोळधाड अुंदीर वगैरेंचें त्यांना किती भय असतें, त्यांची मरामत आणि मशागत नसल्यामुळें पिकें कमी किती येतात, हा सर्व प्रकार बघून धारेबंदी झाली पाहिजे; व कायमचे धारे फार तोट्याचे असतात म्हणून सूट तगाअीची पूर्वीची रीति चालू झाली पाहिजे; वगैरे पूर्वी अनेक वेळां सांगण्यांत आलें आहे. हल्लीं शेतकरी गरीब, अन्नाला महाग आणि संसार हांकण्यास असमर्थ झाले असतात. सरकारचे कर, सारे व धारे अतिशय जरब असून ते भरण्याचें दीन कुळंब्यांना मोठें संकट पडतें. त्यांणीं जीवापाड मेहनत करावीं; परंतु त्यांचें फलभाक् सरकार आणि सावकार होअुन त्यांनां आठ महिने मोलमजूरी किंवा नौकरी चाकरी करून पोट भरावें लागतें. त्यांची बायका पोरें वीस कोसांवरून गवत, लांकडे, पानें वगैरे आणून बाजारांत विकतात; परंतु त्यांत त्यांस मजूरीपेक्षां ज्यास्त कांहीं मिळत नाहीं. माल फुकटच जातो; बिरवाडीहून गरीब लोक पानाचे भारे आणितात. त्यांचा हिशोब बघितला तर चार दिवस पानें काढावयास लागतात व त्यांचे भारे बांधून पुण्यास यावयाला दोन तीन दिवस लागतात. ह्याप्रमाणें एक आठवडा एक भारा आणण्यांत जातो. त्या भाऱ्याची किंमत सुमारें बारा आणे किंवा फार तर अेक रुपया मोठ्या मारामारीनें मिळते. तेव्हा अुन्हा वनांत खपून व लांबचा प्रवास करून दोन आणे प्रमाणें रोजी त्यांस मोठ्या भाग्यानें मिळते असें म्हणावयाचें. मालाला किंमत नाहींच. मालाची किंमत म्हणजे त्यांची मजूरी दिली त्यांत झाली! बरें ह्यांत तरी सुख आहे, काय? सरकारच्या जंगल संबंधी कायद्याने सर्व अरण्यांस कुलपे घातल्यामुळें राना वनांतला गवत काडी, लांकूड-फांटी, पान पाला वगैरे माल मुबलक मिळण्याची मोठी पंचाअित झाली आहे. ह्याप्रमाणें चोहोंकडून गरीबांस दुर्दिन आले आहेत! गरीबांची सर्व प्रकारें अनास्था आणि दुर्दशा आहे! काय करतील बिचारे? पोटाच्या पायीं नवऱ्याला बायकोची काळजी करितां येत नाहीं व आअीला मुलांचा ळळा पाळवत नाहीं. ही निकट संबंधाची स्थिती. मग दूरस्थ संबंध आणि नातें या दरिद्र्यावस्थेमुळें कितीसें पाळलें जावें हें दिसतेंच आहे. दूर गांवी झोपड्यांत आपलीं पोरें टाकून लांकडांचे, गवताचे व पानांचे भारे नेऊन विकणाऱ्या लेंकुरवाळ्या बायांकडे पाहून कोणा पाषाण हृदयांस द्रव येणार नाही? पण करावयाचें काय? हा प्रकार केवळ अयोग्य कारभाराचा आणि प्रजाहिताविषयीं असणाऱ्या औदासिन्याचा होय. जमीनीपासून उत्पन्न होणार एक रुपया आणि सरकार घेणार आठ आणे. या सरकारी धाऱ्यांशिवाय शेतकऱ्यांस लोकलफंड, स्टांप, रजिस्टर (नोंदणी) वगैरेंसंबंधानेंही पुष्कळ खर्च सोसावा लागतो. सारांश, शेतीच्या कामांत त्यांस बरकत म्हणून राहिली नाहीं. शेती सोडून दुसरे धंदे करावे तरी बरकतीचें अनुष्टुपच. कसा बसा मजूरीनें निर्वाह व्हावयाचा. घरच्या गाड्या ठेऊन भाडोत्र्याचा धंदा केला तरी याबद्दलचीही नाकेबंदी केलेली असून गाड्यांच्या मागें दस्तुऱ्या ठेविल्या आहेत; बैल गुरें चारण्याला रानें व कुरणें शिलक नाहींत; वेळेवर पैशा अडक्याची गरज करणारे व हमेषा अुपयोगी पडणारे पैसेवाले कोणी राहिले नाहींत; आणि कोणत्याही धंद्यात मालाचा खप म्हणून होत नाहीं. तेव्हां लोकांना बरकत यावी कशी?

सर्व राज्यकर्त्यांमध्यें मुसलमानांसारखें रानटी, क्रूर, मनस्वी जुलमी, अपहारी, परधर्मद्वेष्टे वगैरे जीं नाना निंद्य विशेषणें द्यावी तितकींही त्यांच्यातील कित्येक बादशाहांस लागतील व त्यांच्यासारखे कोणी नसतील; परंतु त्यांणीं सातशे वर्षे हिंदुस्थानांत राज्य करून ही पूर्वीची नीतिच कायम ठेविली; व जमीनबाबींमध्यें त्यांणी बिलकुल हेरफेर न करितां रयतेची काळजी बाळगून सूट तगाई वगैरे यथास्थित पाळिलीं. आणि ज्यांचा सर्व जुन्या व नव्या पृथ्वींतील राज्य कर्तृत्वकौशल्याविषयीं डंका वाजत आहे व जे धूर्त, चतुर, कार्यसाधु आणि सारासारविचारद्रष्टे म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेत त्यांणीं, पूर्वी कधीं कोणीं न दाखविलेली निर्दयता आणि अमानुषता दाखवावी हें हिंदुस्थानच्या प्रजेचें दुर्दैव होय यापेक्षां तें दुसरें काय म्हणावयाचें आहे? सातशें वर्षेपर्यंत रयतेला

सुखावह ज्या जमीनबाबी त्या मुसलमान राजांनी पाळिल्या, आणि त्याच अिंग्रज सरकारला दरोबस्त मोडून टाकाव्याशा वाटतात! तेव्हां अशी विपरित बुद्धि चांगल्या राजास होणें म्हणजे रयतेचें नष्टचर्यच समजलें पाहिजे दुसरें काय? बिनतुटी हिशोबात शेतावरच निर्वाह करणें हल्लीं अगदीं होत नाहीं हें अनेक अुदाहरणांनी व अनुभवांनी राजाप्रजेस कळून आलें आहे. शेतें आपलीं अुगाच निमित्ताला वतनदारी म्हणून सारे भरून ठेवावीं व कांहीं बांहीं जें अुत्पन्न होअील तेवढ्यानें सरकारचा सारा वारावा अेवढाच काय तो शेतकऱ्यांचा हेतु असतो. वस्तुतः शेतकऱ्यांना त्यांजकडे असलेल्या शेतांपासून निर्वाहापुरता फायदा होत नाहीं. पूर्वी शेतकऱ्यांस आपलीं शेतें चांगल्या रीतीनें लागवडीस आणण्याला अनेक साधनें असून अुमेद असण्याचें पहिलें कारण हेच कीं, हल्लीपेक्षां त्यांजवर सरकार देणें फारच कमी असून त्यांना शेतांना खत, राब वगैरेंची हल्लींप्रमाणें दुर्मिलता नव्हती. पाहिजे तितकें व फुकट खत मिळवून आणून जमीनींची मशागत करावीं; माळीपणा, काछ्यांचा धंदा, वगैरेंमध्यें शेतकऱ्यांना हात घालण्यास सांपडून त्यांचा पैसा चोहोंकडे फिरे व त्याजबद्दल त्यांस चांगली किफायत होअी; बडे लोकांच्या आश्रयानें शेतकऱ्यांस कोणत्याही गोष्टींचे संकट वाटत नसे; ते त्यांस लग्नकार्यांत मदत करीत व प्रसंगविशेषीं बक्षीस अिनाम देअुन त्यांस खुष करीत; आणि तेणेंकरून शेतांची आणि जमीनीची पोटच्या लेंकरांप्रमाणें ते काळजी बाळगीत. परंतु आतांची स्थिति काय आहे? बडेलोक, राजे, संस्थानिक, वगैरे सर्व बुडाले: श्रीमंतांच्या वस्त्या अुठल्याः जाहगिरी, सरंजाम वगैरे दरोबस्त लयास गेले; आणि तो सर्व पूर्वींचा आश्रय, आणि अुत्तेजन तुटून, कोणाच्या पाठीं पडावें असें एकही स्थल राहिलें नाहीं!

कसब, कारागिरी, कलाकौशल्य हीं सर्व परदेशीय यांत्रिक शक्तींनीं आटोपिलीं. देशांत श्रीमंत व आश्रयदाते अशा लोकांचा भरणा नष्ट झाला. मजूरीशिवाय गरीब लोकांस निर्वाहाला दुसरें साधन राहिलें नाहीं. परंतु सर्वच मजूर होअू लागल्यावर त्यांना आश्रय तरी कोणाकडून मिळावा? श्रीमंतीचीं सुखें व तत्प्रीत्यर्थ भक्ष्य भोज्य पदार्थ जे लागावयाचे त्यांचा खप कमी होअून लोक अन्नाला महाग झाले आहेत. बागवानानें केळी नारळी व द्राक्षें यांची लागवड करून पीक काढलें तरी हे महागाअीचें पदार्थ घेतो कोण? चार आण्यांचीं द्राक्षें घेअुन खावीं त्यापेक्षां तेवढ्याचे दाणे आणून दोन दिवस पोट भरून भाकरी खाल्लेली बरी; असें लोक म्हणू लागले आहेत. बरोबरच आहे. द्रव्यावर सर्व गोष्टी अवलंबून आहेत. अैष आराम आणि चांगल्या प्रतीचें खाणें हीं, जवळ द्रव्योष्मा असला म्हणजे त्यांच्या नुसत्या वाफेनेंच होतात. परंतु जेथें द्रव्योष्मा नाहीं तेथें निर्धनतारुप शीतामध्येंच कुडकुडत मीठभाकरी जशी मिळेल तशी खाणें प्राप्त होतें. अर्थात अुत्तम प्रकारचा माल तयार झाला तर त्याचा खप करावा कोठें व लोकांजवळ तो किमतीचा माल घेण्यास पैसा कोठें आहे? हा विचार पुढें अुभा राहतो

पाअुसपाण्याची हरकत आणि पिकाअुत्पन्नाची रडारड कोठेंही नाहीं असें स्थल व काळ सापडणार नाहीं. तेव्हां सरकारी कर धारे वगैरे चढवून गरीब शेतकऱ्यांपासून जो पैसा पिळून घेअुन सरकारच्या खजीन्याची भरती होते ती निखालस जुलुमानें मिळविलेल्या पैशाच्या संचयाप्रमाणें होय असें लोक समजतात. याकरितां अुत्पन्नाप्रमाणें सरकारनें आपलें घेणें घ्यावें व सूट वगैरे द्यावी हें बरें. सुटीच्या वगैरे वहिवाटीनें आतां सरकारास असें वाटेल कीं, लोक आम्हास फसवितील. परंतु याला सरकारनें निमताने बघण्याची वहिवाट ठेवावी म्हणजे झाले. चार गांवच्या पिकांचे निमिताने घेअुन साऱ्याची आकारणी करावी म्हणजे लोकांना फसवायला मार्ग राहणार नाहीं व सरकारही फसलें जाणार नाहीं. थोडी बहुत कसर राहिलीच तर ती कांहीं कोठें व्यर्थ जात नाहीं; प्रजेच्या घरांत राहिली असें होअील. व अितकी अुदार बुद्धि सरकारनें नेहमी राखिली तरच प्रजा कसदार राहील. नाहीं तर पैसा पिळला जाअुन ती निःसत्व व निर्धूत होतच आहे! जमिनीवर कायमचे धारे नसल्यामुळें, आपल्या ताब्यांत वहिवाटीस असलेल्या जमिनींची मरामत

व काळजी फारसे कोणी बाळगीत नाहींत. कारण, आपण पुष्कळ काळजी बाळगून जमिनींत खत वगैरे घातलें व पूर्वीपेक्षां ती पिकाअू केली तर, ती जमीन आपल्याकडेच राहील अशी कोणाची खात्री आहे? कारण दर पाइणीस तीस वर्षांनीं जमीनीवरचे सारे चढणार. तेव्हां आज आपण मालक आहों, पण अुद्या पुनः जमीनीची पैमाष होअून नवीन प्रतबंदी व धारेबंदी होअुन साऱ्याची आकारणी जास्त होअील आणि आपली मेहनत व खर्च विनाकारण व्यर्थ होअील; या भीतीनें कोणीही जमिनींच्या शुश्रूषेकडे द्यावें तसें लक्ष देत नाहीं. तेव्हां यांत रयतेची तरी कोणती चूक आहे? तिचा विचार बरोबरच आहे. ज्या गोष्टीपासून कांहीं फायदा असेल ती गोष्ट कोणीही करील. गैर फायद्याचे कष्ट व परिश्रम कोण करितो? सारांश, रयत संतुष्ट व आबाद होण्यास सरकारच्या हातची अत्यंत सुलभ योजना म्हटली म्हणजे अुत्पन्नाप्रमाणें सारे सूट आणि लोकांच्या अैपतीप्रमाणें कर पट्ट्या ठेवाव्या.

आतां सरकारच्या साऱ्याधाऱ्यांची अशी असंतोषाची रीति असतां लोक अशा अमलांत राहतात कां? सरकारच्या राज्यव्यवस्थेपासून जर सुखशांति नसेल तर जेथें सुखशांति होण्याचा संभव असेल तेथें जाअुन आनंदानें ही संसारयात्रा क्रमावी; अथवा दुसऱ्या देशांत जाअुन वस्ती करावी, म्हणजे तेथें सरकारच्या जुलमी ठरावांपासून व अमलापासून ताप होणार नाहीं असें कोणी म्हणतील. परंतु सरकाला असें त्रासून जावें कोठें ? जिकडे जावें तिकडे तें आहेच. गायकवाड व हैदराबाद ह्या दोन सरकारच्या संस्थानांत पुष्कळ पडीत जमीनी असून तेथें जाअुन वसाहत केली तर होण्यासारखी आहे. परंतु तसें धैर्य, बल, अैपत आणि कर्तृत्व कोणामध्येंही नाहीं. खुद्द सरकारच्या ताब्यातल्या खानदेश, नागपूर, गोंद्रें, पंचमहाल वगैरे प्रांतांतून पुष्काळ लागवडीजोग्या ओसाड जमीनी आहेत. त्याचप्रमाणें, कलादगी, सोलापूर वगैरे प्रांतांतून दुष्काळानें ओस पडलेली गावें व पडीत जमीनी बहुत आहेत. तेथें जाअुन वसती केली व शेतें लागवडीस आणिलीं तर पाहिजे आहेत. परंतु हें धैर्य करावें कोणीं? व धैर्य केलें तरी त्यापासून फायदा काय हा लोकांस समजला पाहिजे. लोकांनां जेणेंकरून चिरस्थायिता व शाश्वती वाटेल असें फायद्याचें कृत्य करण्यास ते अेक वेळ धैर्य करतील. परंतु ही चिरस्थायिता आणि शाश्वती जिकडे अिकडे आहे. तितकीच सरकारच्या अितर प्रांतांतही आहे. यामुळें कोणीही आपला मुलुख सोडून परक्या ठिकाणी गाडगीं मडकीं अुचलून घेअुन जाण्यास धजत नाहीं. परदेशांत वसाहतीला जावें तर त्याचें नांव देखील नको. हें पूर्वी अेके ठिकाणीं सांगितलेच आहे. परदेशांत वसाहती करण्याचें धैर्य व निश्चय यूरोपिअन लोकांचा खरा. हिंदुस्थानातून परदेशांत वसाहतीला जाणारे लोक अीश्वरानें या देशांत जणूं काय अजून अुत्पन्नच केले नाहींत. सरांश, कोणत्याही प्रकारें रयतेचें कल्याण व्हावयाचें असलें तर येथच्या सरकाराकडून होऊ शकेल.

अिंग्रजींत शेतकीला अडचणी फार आहेत त्या दूर झाल्या पाहिजेत. म्हणजे, कोणाजवळ हत्यार नाहीं, रानें नाहींत सूट तगाअी नाहीं. रस्त्यांवर कर दस्तुऱ्या फार, अशा अनेक कारणांनीं शेतकऱ्यांचा कोंडमारा होअुन गेला असून त्यांना आपल्या पुढील ऊर्जितावस्थेची बिलकुल आशा वाटत नाहीं. वर सांगितलेल्या ओसाड गांवी जाऊन तेथील पडीत जमिनी लागवडीस आणिल्या तरी त्यांचीही हीच दशा व त्यांजविषयींही हीच ओरड आहे. ह्या नव्या लागवडीच्या जमिनी, पहिलीं तीन वर्षें वहीतदारास मोफत मिळणार; त्याचें पुढें सात वर्षें पर्यंत चौथाअी धारा द्यावा लागून पुढें रीतीप्रमाणें सरकारचा सारा भरावा व जमीनी वहिवाटाव्या असा ठराव आहे. नागपूर प्रांतीं खांडवा स्टेशनपासून जबलपूर पर्यंत पुष्कळ जमिनी पडीत असून त्या हुसिंगाबाद येथील डेप्युटी कमिशनराकडून किंवा हरदा येथील तहसिलदारपासून घ्याव्या लागतात. ह्या मध्यप्रदेशांतल्या जमीनी अुत्तम असून पहिलीं तीन वर्षें त्यांची लागवड केल्यास त्याबद्दल सरकारदेणें कांहीं पडत नाहीं असा सरकारचा ठराव आहे. पुढें सात वर्षें पर्यंत दर अेकरास दोन आणे प्रमाणें आणि त्यानंतर

दहा वीस वर्षेपर्यंत दर अेकरास चार आणे प्रमाणें आकार सरकार देणें द्यावें लागतें. आणि त्यापुढें सरकार आपल्या कुळाशीं अुत्पन्नाचें तान मान बघून स्वतंत्र ठराव करितें व त्यास कौल देतें. जमिनींची लागवड करून वसती करण्यास वर लिहिलेले मध्यप्रदेशांतील, सरकारी ठराव हितकारक व फायदेशीर आहेत. परंतु यांत अेक मोठी गोम ही आहे कीं, हा प्रदेश वसविण्यास मध्यप्रदेशांतील म्हणून कोणी लोक आले न पाहिजेत, अशी अेक सरकारची अट आहे. यामुळें दक्षिणेकडील व अुत्तरेकडील लोक तिकडे जाअुन वसाहत करतील म्हटलें तर फार खर्च व श्रम पडतो. म्हणजे, शेतेंभातें करण्यास व घरें दारें बांधण्यास मजूर, कारागीर वगैरे दक्षिणेकडून किंवा अुत्तरेकडून न्यावे तेव्हां येथें राहण्याची टापटीप लागणार. अेरवीं घरादारांच्या सोअी कशा होतील? तेव्हां, मध्यप्रदेशांतील मनुष्य न घेण्याची अट फार कठीण आहे व यामुळें तिकडील जमिनींचा फायदा दूर ठिकाणच्या लोकांस घेववत नाहीं. तसाच, त्यांचा दुसरा ठराव असा आहे कीं, प्रारंभी अेक हजार अेकर जमीन आपल्या ताब्यांत घेऊन पहिले तीन वर्षांत चौथाअी जमीन तयार करून दाखवावी लागते तेव्हां अर्थात ही मोठीच जबाबदारी आहे. कसें झालें तरी त्या पड जमीनी; त्यांत बारीक सारीक झाडाझुडपांचे रान माजलेलें असतें; ते रान समूळ काढिलें पाहिजे; त्याच्या मुळ्या जमीनींत खोल गेल्या असतात त्यासुद्धा खणून काढल्या पाहिजेत; तेव्हां ती जमीन साफ होणार अशा कामास मजूरांचा थोडक्यांत पुष्कळ पुरवठा मिळाला पाहिजे. परंतु वर लिहिलेल्या पहिल्या अटीप्रमाणें त्या प्रदेशांत मजूर मिळत नसल्यामुळें किंवा मिळविणें योग्य नसल्यामुळे दूरवरचे मजूर नेले पाहिजेत. बरें ते तरी अितकें भाडें तोडें खर्चून अितक्या दूर नेल्याप्रमाणें ते टिकले पाहिजेत. पण तसें होत नाहीं. मजूर लोक अितके प्रमाणिक आणि अेकविचाराने मिळणें कठीण असून ते चंचल वृत्तीचे होअुन पळून जातात. असें झालें म्हणजे पुनः मजूर शोधण्याच्या नादीं लागा, असें होतें. अस्तु; वर लिहिल्याप्रमाणें हजार अेकर जमीन तयार करण्यास पांच हजार रुपये लागतात असें अनुमान निघालें परंतु अितकी अैपत आहे कोणास व अितका अुद्योग करतो कोण? बाबू नवीनचंद्रराय नांवाच्या अेका ब्राह्मधर्मी गृहस्थांनीं मध्यप्रदेशांत अेक वसाहत केली आहे. तेथें त्यांस बाहेरुन मजुर वगैरे न्यावे लागले व त्या कामांत त्यांस फार श्रम पडले. तेव्हां, तिकडे दक्षिणेकडील दहा वीस लाख मनुष्य गेलें तरी त्यांच्या निर्वाहाची अुत्तम सोय होअील असें नवीनचंद्रराय वगैरेचें म्हणणें आहे. परंतु तें व्हावें कसें? हिंदुस्थानाबाहेरही आसपास जवळच झांजीबार, मॉरिशस वगैरे ठिकाणी वसाहतीला जमीनी आहेत. परंतु हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांतच ह्या प्रांतातून बिऱ्हाड अुचलून जाण्याचे ज्यांस महत्संकट वाटतें, तें हिंदुस्थान सोडून परमुलखांत वसती करण्यांस जातील हा संभव तूर्त तर दिसत नाहीं व याचीं कारणेंही अयुक्तिक नाहींत हें पूर्वी अेकदां कळविलेंच आहे. तीं कारणें हीच कीं, दूर ठिकाणीं जर बिऱ्हाड अुचलून जावयाचें म्हटलें तर तेथें सर्वस्वीं नवी विटी व नवा डाव मांडावयाचा असल्यामुळें सर्व गोष्टींनीं नडणार, तेव्हां अितका अुपद्व्याप करून सुखाचा जीव दुःखांत घालण्याविषयीं कोण धजतो? ह्या गोष्टी म्हणजे निखालस पैशाच्या किंवा निव्वळ धाडसाच्या आहेत. पैकीं पैशाच्या नांवानें तर लक्ष्मीच्या जेष्ठ भगिनीची हल्लीं अेतद्देशीय लोकांवर पूर्ण कृपा आहे; आणि धाडसानें बीज बालविवाह वगैरे सारख्या विलक्षण व घातुक चालीरीतींरुप कीटांनीं कुरतुडून नाहींसें केल्यासारखें झालें आहे! अेतावता, लोकांच्या दैन्यावस्थेतून ह्या देशाचा पाय सध्या पुढें पडेलसा दिसत नाहीं. आणि सरकारची नजर तर, निघेल तितका पैसा रयते जवळून पिळून काढावयाचा अशी असल्यासारखी दिसते आहे. तेव्हां पुढें गति तरी काय होणार?

रयतेला दुसरा कांहीं धंदा व दुसऱ्या कोणाचें रक्षण नसल्यामुळें, सुनेला ज्याप्रमाणें, कशीही सासू द्वाष्ट व खाष्ट असली तरी सासरीं डोकें खुपसून तिच्या हाताखालीं नांदावें लागतें, नाहीं तर मुलगी नाठाळ हट्टी वगैरे निंद्य विशेषणें लावून घ्यावीं लागतात, तद्वत्, सरकारानें कसेंही

वागविलें व तरवारीच्या धारेवर धरिलें तरी खालीं मान घालून सरकारचा अधिकार व कबजा मानिला पाहिजे. परंतु सासूबाओीचा द्राष्ट-व-खाष्टपणा बघून ज्याप्रमाणें लोक तिचा अुपाहास करतील, त्याच प्रमाणें नाणावलेल्या, राजनितीकुशल व रयतेच्या सुखाकरितां दुसरीं भांडणें विकत घेऊन जुलमी देशी राजांकडून रयतेची गांजणूक कमी करणाऱ्या अुदारधी सरकारानेंच असें विरुद्धाचरण पाहिलें म्हणजे सुज्ञ जन त्याचा अुपहास करणार नाहींत असें कदापि होणार नाहीं. रयत नादान व सर्वांशीं परावलंबी झाली म्हणून तिच्या सौख्याकडे अितकें दुर्लक्ष्य करणें किंवा तिच्या ओरडण्याकडे अितक्या अुदासीनतेनें पाहणें चांगलें नाहीं. रयत जी आज गांजल्या-सारखी व त्रस्त झाली आहे व अितका वेळ पुनः पुनः सांगत आल्याप्रमाणें हेंच आहे कीं, सारे धारे व कर पट्या यांचे ओझें रयतेवर अुचलेना अितकें जड असल्यामुळें ती त्या ओझ्याखालींच गारद होत आहे! व याविषयीं चोहोंकडून ओरड अैकूं येते. मोठ्या दर्यात गलबत फुटून त्याजवरचे लोक ज्याप्रमाणें त्या अथांग पाण्यांत गटंगळ्या खात पडावे व अितक्यांत त्यांस एखादा लाकडाचा मोठासा ओंडा मिळावा, म्हणजे मग ते जीव जाओी पर्यंत किंवा कड लागेपर्यंत त्यास धरून राहतात व तोच काय तो त्यांचा आसरा होतो, त्याप्रमाणें, अफाट राज्योदधींतील नाना-राष्ट्ररुप गलबतांची कालरुप महावातानें वाताहत झाल्यामुळे त्यामध्ये प्रस्तुतच्या सरकारासारखा आश्रयभूत ओंडा रयतेला सांपडला असून त्यास, त्या महोदधींत बुडणारी प्रजा चिकटुन राहिली आहे. तिचें संरक्षण त्या आश्रयदात्या सरकारानेंच केलें पाहिजे.

लोक अशक्त व निरुत्साह होत जाअून देशस्थिति बिघडत चालली आहे. याचें बीजही प्रस्तुतच्या राज्यव्यवस्थेंत आहे असें म्हणतात, तें खोटें असें म्हणवत नाहीं. मनुष्याची सशक्तता त्याचा निष्काळजीपणा, खाण्यापिण्याची अनापत्ति आणि स्वातंत्र्यसुख यांवर अवलंबून आहे. परंतु त्या तिन्हीही गोष्टी रयतेपासून आज दूर सारख्या झाल्या आहेत. अुदरंभरणाची जबरदस्त काळजी, खाण्यापिण्याची आबाळ आणि परमावधीचें पारतंत्र्य ह्या गोष्टींनीं लोक अशक्त व निरुत्साही होत चालले आहेत. भिकारपणांतली संतती, बालपणापासून आबाळलेली, ती जोरदार व्हावी कशी आणि तिच्यापासून मर्दुमकीचीं व धाडसाचीं कामें व्हावीं केव्हां? देशामध्ये गाओी, म्हशी वगैरे दुभतीं जनावरें विपुल असलीं म्हणजे त्यांच्या दुधातुपावर लोक शक्तिमान होतात. त्या गुरांना चारा पाणी विपुल मिळालें म्हणजे तीं पुष्ट व दुधाळ राहतात. त्या गुरांपासून शेणाचें वगैरे जमीनीला आवश्यक तें खत मिळतें. त्या खतामुळें जमीनी सुपीक होतात. व जमीनी सुपीक झाल्या म्हणजे देशामध्यें धान्याचें वैपुल्य होअुन देशाला बरकत येते. असे परंपरेनें लाभ होतात. परंतु यांत अेक दोन मुख्य गोष्टींचा कमीपणा झाल्यामुळें किती तोटा आणि अनर्थ या देशाचे वांट्यास आला आहे तो पहा :–सरकारानें रानावनांस कुलुपें ठोकल्यामुळें गुरांना गवतकाडी महाग झाली. यामुळें लोकांना गुरें बाळगण्याची अैपत नाहींशी झाली. तेव्हां अर्थात् दुभत्याचा तोटा होअुन मुलांलेंकरांस मातुःस्तनांतील दुधाशिवाय पुढे दूध मिळणें दुर्मिळ झालें. मुलांच्या वाढत्या वयांत त्यांस दूध तूप न मिळावें तर त्यांच्या शरीरप्रकृती दृढतर व्हाव्या कशा? गरीब बिचारे लोक! गाओी म्हशी बाळगण्यास असमर्थ झाल्यामुळें त्यांना आपल्या मुलांची दुग्धपानाविषयींची समजूत अुपमन्यूच्या माते प्रमाणेंच करावी लागते! अुपमन्यु गरीब ऋषिकुलांत जन्मला असल्यामुळें त्याला कधींही खरें दूध म्हणून मिळालें नाहीं. आओीनें पाण्यांत पीठ कालवून त्याला दूध म्हणून द्यावें व त्या बालानें तें प्यावें. परंतु पुढें एका सोबत्याचे घरीं सोबत्याच्या आओीनें खरें दूध या खिलाडू मुलांस दिलें व त्या खऱ्या दुधाची रुचि समजल्यावर अुपमन्यु, आपल्या गरीब मातेनें दिलेल्या दुग्धरूप पिष्टान्वित श्वेतजलाचा तिरस्कार करून खऱ्या दुधासाठीं हट्टन बसला व पुढें त्याला ओीशकृपेनें क्षीरसमुद्रच मिळाला, अशी पुराणांतली कथा आहे. पण तसा अनुभव ह्या मन्वंतरांतही गरीबांच्या मुलांस येता तर त्या बापड्यांच्या विवंचना आणि

आओबापांच्या फसवणुका तरी कमी होत्या. शेतकऱ्यांपैकीं कोणाजवळ एखादी गाय म्हैस असली तर तिचें दूध विकून किंवा लोणी तूप करून त्याजवर रुपया दोन रुपये मिळतील ते लुगडें, घोंगडी वगैरे घेण्यास अुपयोगी पडतील म्हणून, मुलांच्या वांट्यास दूध जात नाहीं; त्यांची समजूत ताकाच्या पाण्यावरच करितात. सारांश, प्राप्ति असून आपत्ति रयतेच्या भोगवट्यास आली आहे!

गुरें असल्यापासून मनुष्यप्रकृतीस आणि शेताभातास कसा काय व किती मोठा उपयोग आहे हें वर सांगितलेंच आहे. व हीं जनावरें बाळगण्यास लोक असमर्थ झालें यामुळें गुरें कमी झालीं हेंही सांगितलें. परंतु आणखी गुरें कमी होण्याचें भक्कम कारण गोवध आहे. व या गोवधामुळें गुरांची संख्या कमी होत चालली आहे. प्रजेला जें सुख द्यावयाचे व तिचें कल्याण व्हावयाचें तें कायद्यांचे पर्वत करून ठेविल्यानें मिळत नाहीं किंवा होत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत सर्वांची ओरड ही आहे कीं, सरकारनें गोवध बंद करावा व त्याबद्दल कायदा व्हावा.* सर्व हिंदु राज्यांत म्हणजे नेपाळ, राजपुताना, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणी गोवधास शिक्षा ठरविली आहे. परंतु तसा प्रकार इंग्रजीत नाही. हिंदुस्थानांत मुसलमानी कारकीर्दीपासून गोवध चालू झाला. मुसलमान हे प्राणिमात्रास मनुष्यरूपी काल असून त्यांस हिंसेची तर खंतीच नाहीं. तथापि राज्य-वैभवास आपल्या गुणशीलांनीं शोभणारा जो इतिहास प्रसिद्ध सम्राट अकबर बादशहा त्याणें आपल्या बिरबल नामक प्रधानाच्या संमतानें गोवधाचा दुष्ट प्रचार एकदम बंद केल्याची इतिहासात आख्यायिका आहे, ती प्रसंगानुसार येथें दाखल केल्यास प्रस्तुत विषयाचें महत्व वाचकांस समजेल; म्हणून ती गोष्ट थोडक्यांत येथें घेतो.

वर सांगितलेल्या अकबर बादशहाचे कारकीर्दीत गाई मारण्याचा अनर्थ पाहून एकदा बिरबलानें अशी युक्ति लढविली कीं, एके दिवशीं प्रातःकाळी सर्व मथुरामंडलांतील खिल्लार गुराख्यांकडून हांकवून आग्र्यास राजवाड्यापुढें आणून उभें करविलें. बादशाहा राजवाड्याच्या सज्जावर येऊन बघतो तों पुढच्या मैदानांत हजारो गाई आपल्या वत्सांस चाटीत उभ्या आहेत. हा चमत्कार पाहून त्याणें आपल्या चतुर व कल्पक प्रधानास (बिरबलास) हांक मारिली व हा प्रकार काय आहे म्हणून विचारले. तेव्हां बिरबलानें लवून नम्रतेनें हातांत आणलेला कागद वाचून दाखविला. तो म्हणाला महाराज, हा गोवृंद खुदावंतांचे चरणाशीं हा अर्ज घेऊन प्राप्त झाला आहे तो असा :-

जो को हूं दंत तरण धरिताहू मारिये सबलको, हम तो नित्यही दंत तरण धरिये वेने वोचेर अदीनहो. तरक कटुक मधुर हिंदू न देत हो पैजो सब समान देवे; पुत्रमहिमैतन जावे. शहा अकबर! फिर्याद सुनो गौवा हात जोडके बिनन्ति करे. मारिये कौन अपराधसे मुवे चरन न सांडिये चरन.

भावार्थ :– जे दांतीं तृण धरितांत त्यांजवर कोणी शस्त्र धरीत नाहीं. आणि आम्ही तर नित्य तोंडांत गवत धरितों. बरें आम्ही मुसलमानांस कडू, आणि हिंदूंस गोड असें दूध देतों अशीही

---

* श्रुतींतही गोपालनाची प्रशंसा लिहून पुढील ऋचेंत गोवधाचा सर्वांशी निषेध केला आहे.

माता रूद्राणां दुहिता वसूना स्वसाऽऽदित्यानाममृतस्य नाभिः ॥

प्रणवोचं चिकितुषे जनाय मा गाम नागामदितिं वधिष्ठ ॥

तैत्तिरीयारण्यके, ६ प्रपाठके, १२ अनुवादके.

भावार्थ : गाय ही बैलाची आई, राजाची कन्या, मनुष्यांची भगिनी व अमृत देणारी अशी निरपराध पृथ्वीरूप असल्यामुळे तिचा वध करूं नका असे निक्षून सांगतो!

अन्यत्र, तैत्तीरीय संहितेंतही पाहिल्यानें हेंच सांगितलें आहे –

यजमानस्य पशून् पाहि. इ.

गोष्ट नाहीं. शिवाय, आमचे मुलगे जमिनी नांगरून बादशहास वसूल पोंचवितात. तर हे अकबरा! आमची हात जोडून हीच विनंती आहे कीं, आम्ही मेलों तरी आपले चरण सोडीत नाहीं. मग कोणत्या अपराधास्तव आम्हास आपण मारतां यांविषयी चौकशी करावी.

हा अर्ज वगैरे सर्व बनावट खटला होता हें खरें व तें अकबर बादशहा समजला नसेल असें नाहीं; परंतु अर्जांतील म्हणणें अगदी खरें आहे असें त्याचे लक्ष्यांत येऊन त्याणें तेव्हांपासून गोवधाची सक्त मनाई केली. अशी मुसलमानी बादशाहींतील हकीकत आहे. हल्लीं ज्यांच्याकडून अनेक शास्त्रांचे शोध निघत आहेत व कृषिकर्मविद्या ज्यांच्यांमध्यें पूर्णतेस पोंचली आहे, त्यांस गोवधापासून कोणती नुकसान आणि गोपालनापासून कोणता फायदा आहे हें समजूं नये अथवा समजून त्याप्रमाणें त्याजकडून व्यवस्था राहूं नये हीं मोठ्या दुःखाचीं व लज्जेची गोष्ट आहे!

परंपरेनें गोवधापासून जी नुकसान होत आली आहे तिचेंच पर्यवसान हल्लींची लोकांची अशक्तता आहे असें लोक म्हणतात. त्यांचें असें म्हणणें पडतें कीं, पन्नास वर्षांपूर्वी वृद्ध मनुष्यांस जी शक्ति असे ती हल्लींच्या तिशींतल्या ज्वान मनुष्यांमध्येंहीं आढळत नाही.! व हें म्हणणें खोटें असेंही म्हणवत नाही. लोक तर असें म्हणतात कीं, हल्लीं पूर्वींचें कांहीच राहिलें नाही; पूर्वींसारखा पाऊस पडत नाहीं; जमिनी पिकत नाहींत; आणि लोकांची बुद्धि, शक्ति, आस्था, उमेद, हौस, उत्साह वगैरेही पूर्वींसारखीं काही एक राहिलीं नसून, हल्लींची प्रजा म्हणजे कशी तरी उदरनिर्वाह करिते आणि कशी तरी वांचून संसारांतले व्यवहार हांकिते. तेव्हां ही मोठी लाजिरवाणी आणि दुःखाची गोष्ट आहे.

इंग्रज सरकार परोपकारी तर इतकें आहे कीं, त्यास दुसऱ्या ठिकाणचे दोष आढळून आल्याबरोबर ते सुधारण्याविषयीं त्याची खटपट चालते. याचीं उदाहरणें थोडी नाहींत. आफ्रिकेंतील व अमेरिकेंतील गुलामांचा व्यापार बंद करण्याकरितां इंग्रज सरकारनें किती परिश्रम केले हें जगजाहीर आहे व त्यांत त्यास यशही मिळालें. इकडील कित्येक नेटिव राजांच्या प्रजेचा कैवार घेऊन सरकारनें त्या राजांस चांगल्या समजुती दिल्या आहेत व त्यांच्या प्रजेस सुखशांति दिल्याचें श्रेय घेतलें आहे. परंतु स्वतः त्याच्या प्रजेची तर ही हलाखी व ही दशा आहे! तेव्हां ह्या प्रकारास काय म्हणावें? घरची माणसें उपाशीं ठेवून बाहेरच्या लोकांची कळकळ बाळगणाऱ्या विचित्र स्वभावाच्या उदारगृहस्थाबद्दल जें लोकमत व्हावयाचें तोच प्रकार अशा सरकाराचें संबंधानें व्हावयाचा हें उघड आहे. झांजिबार वगैरे आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील ठिकाणीं गुलामांचे व्यापार चालून पृथ्वीवरील अनेक देशांत त्या गुलामांचा खप होई. परंतु गुलामांस कोणत्या रीतींने त्यांचे यजमान वागवीत व त्यांत क्रूरपणा किती असे यांबद्दल दयाळू इंग्रज लोकांस सर्व माहिती कळल्यावर त्यांच्या मुक्ततेकरिता त्यांणीं कंकण बांधून विडा उचलिला. परंतु तसा विडा व तें निश्चयाचे कंकण आमच्या हिंदुस्थानांतील प्रजेला दुःख यातनाविनिर्मुक्त करण्याबद्दल जर सरकार घेईल तर त्यामध्यें त्याचा विशेष लौकिक आणि प्रतिष्ठा आहे. येथपर्यंत सांगितलेल्या स्थितिकडे बघितलें तर इकडील प्रजेची गुलामांसारखीच बहुशः स्थिती झाली आहे ती दूर झाली पाहिजे. त्याबद्दल सरकारनें इतकें उदासीन असू नये.

रयत दरिद्री होत चालली असून शेतकरी तर अगदीं कंगाल झाले आहेत असें सरकारचे कित्येक कामदारांस आलीकडे पूर्णपणें कळत चालले आहे. सन १८२७ च्या कायद्यांत असें कलम होतें कीं, कुणब्याच्या जरूरीचा व निर्वाहाचा जो माल अथवा जें सामान असेल तें देण्याघेण्याचे संबंधात सरकारनें किंवा सावकारानें घेऊं नये. परंतु पुढें पुनः तो कायदा बदलून, जो सांपडेल तो माल घेऊन लिलांव करून पैसा वसूल करावा असें कलम दाखल केलें. आणि आतां पुन्हां तो ठराव तोडून पहिल्या कायद्याचे अर्थाचाच दुसरा शेतकऱ्यांचा कायदा पसंत केला. यामुळें, एक

वेळ रयत बुडते आणि एक वेळ सावकार बुडतो; परंतु रयतेच्या दारिद्र्याची खरीं कारणें काय आहेत याचा शोध होऊन त्यांचें उत्पाटन झालें पाहिजे त्याशिवाय गत्यन्तर नाहीं.

या देशांतील श्रेष्ठ लोकांचा वर्ग नाहींसारखा झाला असून व्यापार, उदीम, कारखाने वगैरे ठिकाणच्या ठिकाणीं बसले आहेत. कोष्टी, साळी, कागद करणारे, तेली, घावड, लोहार वगैरे नाहींसे होऊन तत्संबंधाचे सर्व व्यापार व उद्योग परदेशीय लोकांनी आटोपिले आहेत. व त्यामुळें द्रव्याची वहाण सर्व पश्चिमेकडे चालली आहे. हें सर्व लक्ष्यांत आणून सरकारानें कांहीं उदार बुद्धि धारण करून, लोकांवर सरकार देण्याचा बोजा डोईजड न पडतां त्यांस कांही शिल्लक सांपडत जाईल अशा रीतीनें ठेविला पाहिजे. सरकार देणें फार वाढल्यामुळेंच रयत अगदीं टेंकीस आली आहे व हाच दारिद्र्य रोगवृद्धीच्या रयतेच्या उदरी गुल्म आहे. पूर्वी एके ठिकाणीं सांगितलेली, कप्तान विंगेट साहेबांनीं जमिनीची पहाणी करून ठरविलेली धारेबंदी, पुढील पैमाषींत मनस्वी वाढून शेतकऱ्यांना कांहीं कसर राहिली नाहीं. ही धारेबंदी इतकी मनस्वी वाढली कीं, जो गांव पूर्वीच्या पहाणींत पांचशें रुपयांचा ठरला होता तो पस्तीसशे रुपयांवर चढला आणि शंभर रुपयांचा गांव सातशांवर गेला अशीं उदाहरणें आहेत.* आतां यांविषयीं असें म्हणणें आहे कीं, पूर्वी ज्या पडित जमिनी होत्या त्याची आकारबंदी या नवीन पहाणींत सामील झाल्यामुळें सरकार देण्याची रकम फुगलेली दिसते. हीं कारणें कांही ठिकाणी खरीं असतील. परंतु सर्वत्र ठिकाणीं धारेबंदी वाढण्यास हींच कारणें आहेत असें नाहीं. तर सरकारास असें वाटलें कीं, दिवसेंदिवस शेतकीच्या उत्पन्नांत रयतेस विशेष नफा होत आहे. आणि यामुळें सरकारानें ह्या नवीन प्रतबंदीस आपली मंजुरी दिली. परंतु त्याचा परिणाम फार अनिष्ट झाला हे येथपर्यंत सांगितलेंच आहे व प्रत्येहीं त्याचा आपल्यास अनुभवही येत आहे.**

हे धारे इतके मनस्वी चढण्याचे दुसरे कारण असे झाले कीं, या कामांत जमीनदारांचा म्हणून कांहीं एक विचार घेतला नाहीं. पहाणीदारांना जसे वाटले तसे त्यांणी आकार दपटून दिले. जमीनदार तर बापडे घरीं स्वस्थ बसले होते. त्याचवेळीं शेरबाजारानें जमिनींच्या व मालाच्या किंमती वाढल्यामुळें पहाणीदारांनाही हे दर व धारे फारसे कठीण वाटले नाहींत. परंतु शेरबाजार तर पुढें सहा महिनेही टिकला नाहीं व मालाच्या व जमिनीच्या किंमती खर्कन उतरल्या; तेव्हां सारे जबरदस्त झाले असें चोहोंकडे अनुभवास आलें. ही गोष्ट इंग्रजी अमलांतच झाली असें नाही गायकवाड वगैरे एत्तद्देशीय संस्थानिकांच्या मुलखांतही तोच मासला झाला. खंडेराव महाराज गायकवाडांनी त्यावेळी कापसाचे दर फार वाढलेले बघून आपल्या प्रांतांतील जमिनींची दरठरोती फारच वाढविली. परंतु पुढें मल्हारराव महाराजांचे कारकीर्दींत लोकांच्या त्या दरठरोतीच्या संबंधानें तक्रारी व फिर्यादी जाऊं लागल्या की, हे धारे आमच्यानें देववत नाहीत. तेव्हा मग त्या वेळच्या कारभाऱ्यांनी सरासरी चार आणे सारा कमी केला. पण इंग्रजींत काय आहे ? सरकाराकडे या संबंधाची रयतेने बोंब नेली पण तिकडे आजपर्यंत दुर्लक्ष्यच होत आलें. 'रयतेच्या तक्रारी व अर्ज अयोग्य आहेत, जी दरठरोती झाली आहे ती अगदी बरोबर आहे' हा छापील जबाब सर्व अर्जदार रयतेस मिळत आहे. सारांश, रयतेवर जो एकदा सरकार देण्याचा हा बोजा चढला

---

*याविषयीं उदाहरण पहाणे असेल तर दिवेघाटांवर मौजे वडकी व हवेलीपैकी मौजे हडपसर जि. पुणें येथील जमावबंदीची आलीकडील आकारणी बघावी. **डॉ. विश्राम रामजी घोले यांणीं पाटस येथें मोठी शेतकी केली आहे. परंतु त्याचा परिणाम इतकाच अनुभवास आला आहे कीं इतर धंद्यांत कमाविलेला पैसा या शेतकीमध्यें घालवून नेहमींचा खर्च गळ्यांत बांधून घ्यावा लागतो; आणि ही ओरड बहुतांची आहे. शेतकी ही पैसा कमविणारी नसून गमविणारी आहे असाच समज बहुतांचा अनुभवांनी झाला आहे !

आहे तो कांही केल्या खाली उतरत नाही व त्याशिवाय रयतेच्या कंगाल स्थितीचें दुसरें कांही कारण नाही.

इंग्रजीप्रमाणेंच एत्तद्देशीय संस्थानांतून या धारेबंदीच्या संबंधानें लोकांची कुरकुर ऐकू येते. नाही असे नाही. व तिकडे ते ते संस्थानिकही इंग्रज सरकाराप्रमाणे ह्यावें तसें लक्ष्य देत नाहीत ही गोष्ट खरी. परंतु त्यामुळे तिकडील रयत इकडच्यासारखी निःसत्व झाली नाही व होणार नाही. याचे कारण हेंच की, त्यांची सरकारजमा म्हणजे कांही समुद्रपार जात नाही. ती पुनः त्यांच्यामध्येंच येत असल्यामुळें त्यांची बरकत कायम राहते. तशी गोष्ट इंग्रजीमध्यें नाही. इंग्रजीमध्ये शतशः मार्ग पडले आहेत. हे मार्ग म्हणजे पगार, पेन्शनें मोठमोठ्या आफिसांचे खर्च, कागद, कांच, बुकें, लोखंडी सामान, कापड, फौजेचें सामान, औषधें, कर्जाचें व्याज इ. होत. त्या मार्गानें रयतेकडून वसूल झालेली सरकारजमा निम्मे बाहेर जात आहे. शरीराला शतशः व्रण पडून त्यांतून शरीरांतील रक्तमांस निःसत होत असतां शरीराला पुष्टि तरी यावी कशी ? अर्थात त्याचा क्षय होत होत शेवटी देहावसानाचाच समय यावयाचा हें उघड आहे !

जेथें इंग्रजी अगोदर झाली तेथल्या लोकांची स्थिती, जेथें इंग्रजी अम्मल मागाहून झाला तेथील लोकांच्या स्थितीपेक्षां फार निकृष्ट आहे असें अनुभवास येतें. कारण, तितका द्रव्यशोष इंग्रजी नसल्याठिकाणी मागाहून सुरु झाल्यामुळें लोकांच्यांजवळील मागची द्रव्याची शिल्लक अजून पुरते आहे. पुण्यास इंग्रजी होऊन साठ वर्षे झाली व साताऱ्यास इंग्रजी अम्मल होऊन तीस वर्षे झाली. तर ह्या मानानें बघितलें असतां पुण्यापेक्षां साताऱ्याच्या लोकांची स्थिती बरी आहे. याचें कारण, पुण्यापेक्षां त्यांचा तीस वर्षांचा संचय त्यांस अजून पुरतो आहे. तो आणखी तीस वर्षांनी पुण्याच्या व नगरच्या बरोबरीला येऊन ठेपेल !

दिवसें दिवस हा देश फारच गरीबीस येऊं लागला आहे हें म्हणण्याला आतां कांही नवीन प्रमाण पाहिजे आहे असें आम्हास वाटत नाही. इंग्रजीमध्यें विद्यासंपत्ति व स्वस्थपणा वाढला ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु द्रव्यसंपत्ति घटत चालली यास काय करावें ? इंग्रजीमध्यें रेल्वे, सडका, पूल वगैरे होऊन व्यापारांच्या सोई झाल्या; परंतु व्यापारी वर्ग नाहीसा झाला याला काय उपाय ? पूर्वीचे हुंडीवाले, वाणी व लमाण वगैरे व्यापारी लोक यांचा रोजगार बुडाला आणि परकीय लोकांकडे तो सर्व रोजगार गेला. यामुळें बरकतीचें मूळ एत्तद्देशीयांस नाही सारखें झालें व सर्वत्र हायहाय चालली आहे. या पुण्यामध्यें पूर्वी, वेळेवर पैसा देऊन सवाई घेणारे अथवा दोन पैसे दरमहाप्रमाणें व्याजानें रुपये देऊन खिस्तीचा धंदा करणारे वगैरे बडे सावकार एकशें वीस होते व त्या प्रत्येकांचे घरी दहा दहा वीस वीस शिपाई, गडीमाणसें वगैरे आश्रयाला असत. प्रसंगी द्रव्याची मदत करून व्यापारास हात लावणाऱ्या अशा लोकांचा देशांत भरणा असला म्हणजे तीच देशाची संपत्ति होय. परंतु हल्ली येथें एकही खिस्तीचा धंदा करणारा सावकार राहिला नाही. सारांश, देशांतील लोकांची फारच दाणादाण झाली आहे. इंग्रजी राज्यांत शिवाय कोरडे फायदे पुष्कळ झाले व ते आम्हास सर्वांशी मान्य आहेत. परंतु देशांत संपत्ति येऊन लोक आबाद होतील अशी व्यवस्था सरकारानें आपल्या राज्यकारभारांत केली पाहिजे. या देशाचें पूर्वीचें वैभव, ऐश्वर्य, डामडौल आणि तज्जन्य सुख ही सर्व निरस्त झाली. या देशाचा वसूल इतका होऊन पुनः याला दोनशे कोट रुपये कर्ज आपले आहेच ! व त्याजबद्दल प्रतिवर्षी फार मोठी रक्कम व्याजाची म्हणून भरावी लागते आहेच ! असे दिवाळखोरीचे बुडीत खर्च करण्याची या देशास संवय नाही व तसें या देशास सामर्थ्यही नाही. हल्लीचे खर्च अवाढव्या वाढून कामाच्या नांवानें हांकाहांक आहे तीच आहे. पूर्वीचे राजे व बादशाहा पैकेपूर असत, परंतु हल्लीच्या सरकारांत पैशाचा बोभाटाच फार आहे. कामगारांस पगारही फार मोठेमोठे देऊन, हे मोठ्या पगाराचे जेवढे कामगार तेवढे त्यांचे परदेशीयच असल्यामुळें त्यांचा पैसा या देशांत म्हणून राहत नाही व यामुळें जो

या देशास तोटा येत चालला आहे तो दिवसेंदिवस जास्त जास्त वाढत आहे. पूर्वी रामशास्त्री परभुणे हे पेशवाईमध्ये मुख्य न्यायाधीश असून त्यांचें न्यायागार म्हणजे हल्लीचें हायकोर्टच असे. परंतु त्या न्यायागाराची, न्यायाची आणि खुद्द न्यायाधिशांची स्थिती कोणीकडे आणि हल्लीच्या हायकोर्टाची, त्यांतून मिळणाऱ्या न्यायांची आणि त्यांत न्यायासनी बसणाऱ्या न्यायाधीशांची गोष्ट कोणीकडे? रामशास्त्री हे आपल्यास पगार म्हणून मुळीच न घेतां फक्त चार माणसांचा सिधा घेत असत. तरी त्यांचा मान नाना फडणवीसांच्या बरोबरीनें असे. त्यांच्या न्यायाची तर प्रसिद्धि असून लोकांत तो न्यायाधिश सर्वमान्य होता. आतां हल्लीच्या हायकोर्टाची स्थिती बघितली तर दरमहा पन्नास पन्नास हजार रुपये प्रत्येक हायकोर्टास खर्च होऊन पुनः न्यायाची महर्घता आणि कालव्यय ही पक्षकारांस भोगावी लागतात! आणखी त्यांतही चमत्कार असा की, सर्व कामें इंग्रजीत चालतात; त्यामुळें दाद मागणारे वादी प्रतिवादी न्यायाधीशापुढे उगीच स्तंभासारखे उभे राहतात. त्यांस काय चालले आहे तें समजत नाही. न्यायाधीशांस त्यांचे खरोखर म्हणणें काय आहे हें समजत नाही उभयतांस वकील सांगतील तें खरें. असा आंधळ्या बहिऱ्यासारखा व्यवहार चालतो आणि तोही अतिशय नाजूक अशा न्यायाचे कामांत! बरें, ह्या न्याय मिळविण्याचे कामांत खर्चण्याची यंत्रे तरी कशी लागून राहिली असून त्या यंत्राचें काम कसें अेकसारखें चाललें असतें? वकील, ब्यारिस्टर, अटर्नी, सालिसिटर वगैरे यंत्रें पैसा ओढण्यास लागली असून त्यांस प्रत्येकी व प्रत्यही शंभर शंभर, दोन दोनशें रुपये रोजाप्रमाणें द्यावे लागतात. अशा प्रकारच्या न्यायाचे व्यवहारांत गरीब गुरीबांची दाद कशी लागावी हें दिसतच आहे. श्रीमंतीची संपत्ति तर सर्वांशांनी असल्या वादांत हरण होऊन वादाचे रकमेच्या चौपट किंवा दसपट खर्च होऊन जाते. मग वाद जिंकिला तरी न्याय झाला म्हणावा की नाही झाला म्हणावा? कारण, न्याय मागावयाचा तो अमुक पैसा किंवा मालमत्ता आपल्या स्वामित्वाची किंवा मालकीची अथवा हक्काची असून तिचें स्वामित्व किंवा मालकी अथवा हक्क आपला आपल्याला मिळावा म्हणून वाद चालला असतां, वादाच्या रकमेच्या किंवा मालमिळकतीचे किमतीच्या अैवजाच्यावर कित्येक पटीनें हे असे खर्च होऊन जातात! अेक रुपया वसूल होण्याकरितां चार रुपये खर्च यावा, म्हणजे ही काय दाद कां न्याय? म्हणावें काय? सारांश, असल्या न्यायदानानें रयतेची दुर्दशा झाली; आणि म्हणून कर्जमुक्त करण्याचा कायदा सरकारास करावा लागला. तेव्हां, हा कायदा करण्यापर्यंतच्या स्थितीस रयत येऊन पोंचली हें स्पष्टच आहे. याचप्रमाणें पोलिसापासून आणि अधिकारी साहेब लोकांच्या स्वाऱ्यांपासून रयतेवर मोठा जुलूम होत असल्याचा फार बोभाटा आहे. या लोकांस, ते स्वारीत असतां, त्यांना लागणारें सामानसुमान, बकरी, कोंबडी, लांकूडफांटी आणि गवत कडबा ही रयतेला कमी किंवा मुळीच, बिनमोलानें व यथेच्छ पुरवावी लागतात अशी लोकांची कुरकुर आहे. त्याचा तपशील करण्याचें हें स्थल नव्हे म्हणून त्याबद्दल येथें विशेष लिहीत नाही. त्याविषयी आम्ही वेगळ्या निबंधांत लिहिणार आहोंत.

पूर्वी रयतेला उदरनिर्वाहाची साधनें मिळविण्यास हात पाय हलवायाला पुष्कळ जागा व स्वातंत्र्य होतें तें हल्लीं नाहीसें झालें आहे. याचें येथपर्यंत अनेक ठिकाणी वर्णन देण्यांत आलें आहेच. चार महिने शेतीभातीच्या कामांत गेल्यावर शेतांचें उत्पन्न सावकाराचे पदरांत टाकून त्यांच्या कर्जाचे व्याजाची व सरकारदेण्याची फेड केल्यानंतर, शेतकऱ्याला आठ महिनेपर्यंत मोलमजुरी, भाडेंतोडें वगैरे करून पोटाची खळी भरण्याच्या उद्योगास लागावें लागतें. परंतु त्याबद्दलची कोण दशा आहे हें मागें (पृष्ठ ५०–५१) सांगितलेंच आहे. त्यांणीं बिचाऱ्यांनी कितीही कष्ट सोसले, मेहनत केली आणि हाडाचा मणी व रक्ताचें पाणी केलें तरी त्यांस अंगभर वस्त्र आणि पोटभर भाकर मिळत नाही! धोतर आहे तर अंगरखा नाही व पागोटे आहे तर जोडा नाही अशा स्थितीत विपत्तीत त्यांची आयुष्यें जातात. जंगल, मीठ, दारू वगैरे गरीब लोकांच्या

निर्वाहाचे मुख्य पदार्थ कायद्यांच्या तटबंदीत आणि जबरदस्त करांच्या पाहऱ्यात सरकारानें ठेविल्यामुळें तिकडे रयतेला वांकडी मान करून देखील बघतां कामा नये असा जुलूम झाला आहे. याला हल्लींचें प्रत्यक्ष उदाहरण ठाणें जिल्ह्यातील रयतेचा ३५ हजार सह्यांचा अर्ज मुंबअी सरकाराकडे झाला आहे व त्यांत जंगल आणि अबकारी या संबंधाची रयतेनें ओरड केली आहे, तेव्हां रयत फार गांजली आहे हें सिद्ध आहे. परंतु सरकारचें लोकांच्या या ओरडीकडे लक्ष्य आहे काय? त्याचें तर आजपर्यंतचें वर्तन आमच्या भक्तशिरोमणि तुकारामाचे उक्तीप्रमाणें बिनचूक व निश्चयाचें आहे : "कोणी निंदा कोणी वंदा, आम्हा स्वहिताचा धंदा"! रयतेची आपत्ति व विपत्ति सरकार मुळीच जाणत नाही. मोठा विक्राळकाळ पडो, उंदीर टोळ शेत खावोत, पीक पिको अथवा बुडो. पर्जन्य पडो अथवा न पडो, शेतकऱ्याजवळ बैल असोत किंवा नसोत, कुळ तुरुंगांत गेलेलें असो किंवा मोकळें असून अन्नान्नगत झालेले असो, परंतु अेकदां कुळाचे नांवावर सरकारची जमीन चढलेली असली म्हणजे त्याणें सरकारचा तरम सारा मुदतीप्रमाणें भरलाच पाहिजे. नाही तर सरकारची जप्ती किंवा वारंट येऊन त्याच्या असल्या नसल्या जिंदगीचा लिलांव होऊन सर्व सावकारांचे अगोदर जमीन, माल, घर, गुरें वगैरें सर्व विकली जातात व सरकार आपला सारा बसूल करितें. यामुळें रयतेचा निरुपाय होऊन ती लाचार व नादार होते. पूर्वी अशी स्थिती नव्हती. कुळाचे नांवावर शेत असतांही त्याचा बैल मेला किंवा दुसऱ्या आपत्तींनी त्याणें शेत न पेरिल्यामुळें उत्पन्न झालें नाही तर सरकार त्याला आपल्या घेण्याचा आकार माफ करीत असे. परंतु हल्लींचा प्रकार अगदीच तद्विपरीत झाला आहे. कुळाच्या खाजगी आपत्तीकडे तर लक्ष्य देणें असो, पण ईश्वरी अवकृपेनें शेताच्या उत्पन्नास धोका पोंचला असला तरी कुळानें सरकार देणें निमूटपणें भरलें पाहिजे. तेव्हा रयतेची स्थिती तरी काय व्हावी?

हा विषय फार लांबला व यांत रयतेच्या सुखदुःखाच्या अनेक गोष्टींचा उहापोह झाला. म्हणून आतां तो थोडक्यांत संपवून दुसऱ्या विषयांकडे वळावयाचें आहे. ग्रामरचना, तिचा उद्देश, तिची पूर्वीची व हल्लींची स्थिती आणि लोकांना पूर्वी व हल्ली होत असणारें सुखदुःख, सरकाराचें वर्तन व त्यास सूचना इत्यादि गोष्टी या विषयांत येथपर्यंत समाविष्ट झाल्या व त्यांजवर बरेंच विवेचन झालें. आतां शेवटी, रयत व सरकार या उभयतांनी परस्पर कसे वर्तलें पाहिजे व काय केले म्हणजे देशस्थिती सुधारेल याविषयी चार शब्द लिहून हा लेख पुरा करूं.

लोकांची दैना व हाल आणि देशाचें दारिद्र्य ही येण्यास किंवा दूर होण्यास एक सरकारच कारण असून रयत या दोषापासून अलिप्त राहते असें म्हणण्याचा आमचा भाव नाही. त्याला रयत व सरकार ही दोघेंही कारण आहेत. तर यांत सरकारनें काय करावें व रयतेनें काय करावें ह्याविषयी आमचें म्हणणें आहे तें हें. एतद्देशीयांस मोठमोठ्या पगाराचे रोजगार दिले पाहिजेत; या देशांतील लोकांचे धंदे अखंड व भरभराटीनें चालतील असें उत्तेजन व प्रोत्साहन दिलें पाहिजे. धारे कमी व कायमचे अथवा ऐन जिनसी झाले पाहिजेत; अदालतीतील न्यायांचे संबंधाचे जबरे कर कमी झाले पाहिजेत; वसूल सोलत अलली पाहिजे, म्हणजे सूटतगाई मिळाली पाहिजे; शेतकऱ्यांकरितां स्वतंत्र पेढ्या निघून त्यांतून त्यांस कर्ज मिळाले पाहिजे. (ठेवीच्या पेढ्या होणें तर असंभाव्य व मुष्किलीचें आहे, कारण, ठेव ठेवण्यास रयतेजवळ दमडीही नाही!) ह्या सर्व गोष्टी सरकारनें केल्या पाहिजेत व त्याजकडून त्या सहज होण्यासारख्या आहेत. त्यांत सरकारास आयास व श्रम पडतील असें बिलकुल नाही. आतां रयतेनें ह्या सर्व गोष्टींचे सिद्ध्यर्थ काय केलें पाहिजे तें : सरकारकडून मिळणाऱ्या मोठमोठ्या पगारांच्या व अधिकारांच्या नेमणुकी मिळविण्यास विद्वता, नीति आणि पात्रता हीं आपल्या अंगीं आणिलीं पाहिजेत; अनेक कारागिरीचे व कसबाचे धंदे आणि मोठमोठे उद्योग सुरु करून एकमत्यानें व्यापार, कारखाने वगैरे काढिले पाहिजेत व त्यांमध्यें लक्ष्य व धोरण ठेवून परदेशीय व्यापारी व कारखानदार यांशीं टक्कर

दिली पाहिजे; सरकारच्या जबर साऱ्याधाऱ्यांबद्दल सरकाराजवळ तक्रारी नेउन, आपल्या उत्पन्नाचें व सरकारदेण्याचें मान सरकारच्या कानांवर वारंवार घातले पाहिजे; आपसांतील कज्जे, भांडणें, दावे वगैरे सरकारापर्यंत नेउन दोन्ही पक्ष खर्चांत बुडून जाण्याच्या प्रसंगापासून जितकें दूर राहवेल तितकें राहिलें पाहिजे; मितव्ययी होउन होईल तितकी शिल्लक राखिली पाहिजे; आपल्या संततींत ज्ञान व विद्या हीं वाढविलीं पाहिजेत; आणि कर्तव्यतत्परता हीं नेहमीं पुढें ठेवून सर्वदा योग्य महत्वाकांक्षा धारण केली पाहिजे. इतक्या गोष्टी जर सरकार व रयत यांजकडून अनुक्रमें घडतील तर, देश दारिद्र्यग्रस्त झाला, इत्यादि ज्या चोहोंकडून आरोळ्या होत आहेत त्या सर्व बंद होतील. देशाचा फायद्यावर निर्वाह व्हावा तो हल्ली मुद्दलावरच चालला आहे हें बरोबर नाही. हल्लींच्या इंग्रजसरकारच्या शांत व चिरस्थायी कारकीर्दीत लोकांना वरील सुखे व सोयी मिळणे फारसे कठीण नाहीं. रयत सुखी व संपन्न कशी होईल याविषयी सरकारच्या अकबरी व संन्यायीं मंत्रीमडळांत हल्लीं बराच विचार चालला आहे. तो इश्वरी कृपेने लौकर सिद्ध होवो. आमची खात्री आहे कीं, हल्लींची दुःस्थितींच आता पुष्कळ दिवस कायम राहील असें नाहीं. सरकारची राजनीति आणि रयतेचें सुख ही चांगल्या रीतीनें व जास्तीतजास्त अनुभवास येत जाऊन हल्लींची अकबरी (लॉर्ड रिपनची) कारकीर्दच सदोदित आणि सुदामत राहो असें आम्ही इच्छितों.

• •

# स्थानिक स्वराज्य व्यवस्था

हल्लीं आपल्या या देशांत स्थानिक स्वराज्यव्यवस्थेच्या संबंधाने जिकडे तिकडे विचार चाललेले ऐकूं येतात. यांत सरकारचे विचार आणि लोकांचे विचार यांची मोठी गर्दी झाली असून, सर्व देशभर लोकांच्या भाषणांत व लेखांत हाच विषय सद्ध्यां प्रमुख झाल्यासारखा दिसत आहे. आणि वस्तुतः त्याचें महत्वही तसेंच आहे. वर्तमानपत्रांतून या विषयावर शतशः निबंध प्रसिद्ध होत आहेत. आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या विशेष प्रसंगींच्या भाषणांत हाच विषय येत असलेला ऐकूं येतो. कोणी, लोकांस या विषयाची माहिती स्वतंत्र पुस्तकरूपानें देत आहेत; कोणी, हा विषय प्रथमतःच काढणारे लॉर्ड रिपन साहेब यांनीं एतद्विषयक काय म्हणणीं आहेत त्यांचे तर्जुमे देश-भाषांतून उतरीत आहेत; व कोणी परोपकारार्थ गांवोगांव फिरून याजविषयीं लोकांस माहिती कळवीत हिंडत आहेत. या कामांत पुण्याच्या सार्वजनिकसभेच्या कर्तव्यतत्परतेचाही उच्चार न केल्यास कृतघ्नपणाचा दोष येईल. ह्मणून, त्या सभेनें जो भाग स्वीकारिला तो परम स्तुत्य आहे असें आम्ही येथें बोलून ठेवितों. या सभेनें सर्व महाराष्ट्रांत आपले मुखत्यार पाठवून 'स्थानिक स्वराज्य-व्यवस्थेची' माहिती लोकामध्यें प्रसृत केली हें तिणें मोठें काम केलें यांत संशय नाहीं. तसेंच, सभेच्या या मुखत्यारांस ठिकठिकाणीं सरकारी अधिकारी यांणीं हुकूम देऊन मदत केली हेंही त्यांणीं व्हाइसराय साहेबांच्या हेतूप्रमाणें आपलें कर्त्तव्य बजाविले याबद्दल आनंद वाटतो. ह्याप्रमाणें जिकडे तिकडे हा विषय लिहिला व बोलला जात असून तो कांहीं आतां पहिल्यासारखा कोणास अश्रुतपूर्व राहिला असेल असें वाटत नाहीं. बरें, असें असून, मग आज या लहानशा पुस्तकांत त्याजबद्दल तो पुनः चर्वितचर्वणाचा भाग पाहिजे कशाला? असा प्रश्न वाचकांत सहज निघेल. परंतु येथें इतकें सांगून ठेवणें अवश्य आहे कीं, विषय महत्वाप्रमाणें त्याचें आम्रेडित इष्ट आहे. या विषयावर पुष्कळांचीं भाषणें झालीं अथवा पुष्कळांचे लेख आले ह्मणून आम्हीं त्याजबद्दल कांहींच लिहूं किंवा बोलूं नये असा कांहीं शास्त्रार्थ नाहीं. हा विषय मूळ निघाल्यापासून आह्मास तद्विषयक चार ओळी लिहिण्याची इच्छा होती. ती पूर्ण करण्यास प्रस्तुतचा प्रसंग फार अनुकूल आहे असें वाटतें व या प्रसंगाचा लाभ दडवितां कामा नये. ह्मणून आम्ही आमच्या वाचकांस, आपली मोलवान वेळ व अवधान प्रस्तुत विषयाकडे देण्याविषयीं, विनंती करितों.

'स्थानिक स्वराज्य' हा शब्द आपल्या भाषेंत अभिनव आहे हें विचक्षण वाचकांस वेगळें सांगायला नको. इंग्रजींत ज्याला 'लोकल सेल्फ गव्हर्मेंट' ह्मणतात व त्याची व्याप्ति जितकी आहे, तदर्थवाचक 'स्थानिक स्वराज्य' हा नवघटित शब्द आहे. आणि ही गोष्ट सहज आहे कीं, ज्या

गोष्टीचा आपल्या देशांत बहुतकालापासून* उगम नाहीं. तद्विषयक माहिती नाहीं व जो लोकांमध्यें नवीनच येणारा त्याला त्याच्या अर्थाप्रमाणें व व्याप्तीप्रमाणें योग्य नांव देणें हें भाषाविविज्ञांचें काम आहे. अनेक शास्त्रें व कला आणि शास्त्रांगें व कलांगें यांची माहिती एतद्देशीयांस करून देते वेळीं तत्तच्छास्त्रज्ञांस आपल्या ग्रंथांत अशींच नवीं नवीं नांवें, परिभाषा आणि व्याख्या योजाव्या लागल्या. अस्तु. आतां 'स्थानिक स्वराज्य' या नुस्त्या शब्दावरून किती माहिती देतां येईल व तिची व्याप्ति किती आहे ती बघूं.

'स्थानिक स्वराज्य' हा सामासिक शब्द स्थानिक, स्व आणि राज्य या तीन शब्दांनीं घटित झाला आहे. या तीनही शब्दांची व्याप्ति निरनिराळे भाग घेऊन पहावयाची आहे. व त्यांच्या

*'बहुत कालापासून' असें ह्मणण्यांत कांहीं तरी अर्थ आहे. 'स्थानिक स्वराज्यव्यवस्थे'ची आमच्या इकडे कोणासच माहिती नाहीं असा बहुतांचा समज आहे व खुद्द आमचाही होता. परंतु शोधांतीं व गेल्या (जानेवारी) महिन्याच्या 'The Arya' (आर्य) नामक लाहोर येथें प्रसिद्ध होणाऱ्या मासिकपुस्तकांत "Self-Government in the Vedas" (वेदांतील स्वराज्यव्यवस्था) या सदराखालीं एकानें एक निबंध प्रसिद्ध केला असून, तद्विषयदर्शक वेदांतील खालीं लिहिलेलीं वाक्यें दिलीं आहेत, ऋसं. ३।३८।६ त्यांवरून तो समज बरोबर नाहीं असें होतें. हें 'आर्य' मासिकपुस्तक प्रसिद्ध श्रीमदयानन्दसरस्वती स्वामींच्या मतांचें प्रतिपादक असून तें इंग्रजींत प्रसिद्ध होत असतें. अस्तु. वरील विषय प्रतिपादक ऋचा ह्या आहेत.—

ऋग्वेद संहिता ३।३८।६

(१) वयं प्रजापतेः प्रजा अभूम.—यजुर्वेद, १८ अध्याय २९ मंत्र,
(२) त्रीणि राजाना विद्ये पुरूणि परि विश्वानी भूषथः सदांसि
अपश्यमत्र मनसा जगन्वा-न्वते रान्धर्वामपिवायुकेशान ॥ —
अष्ट. ३ अनु. २, वर्ग २४, मंत्र ६.

भावार्थ — (१) आह्मी सर्वशक्त प्रभूची प्रजा आहों. (२) राज्यकर्तृत्वाचा अधिकार तीन सभांकडे आहे. त्या तीन सभा : १. ठराव अमलांत आणणारे लोक; २. शिक्षणप्रसारक लोक; आणि ३. आचारप्रवर्त्तक लोक. या तिघांच्या ऐक्यानें व साह्यानें शत्रूंस जिंकावें आणि सुखशांतींत राहावें.

याशिवाय महाभारतांत वगैरे प्रजासंमतानें राज्यकारभार करण्याची रीति असलेली दृष्ट होते. याज्ञवल्क्य स्मृतींत ३२ विवादस्थलें काढलीं आहेत त्यांत 'संवित्व्यतिक्रम' हा विषय शहर सुधारण्याचाच (Municipality) आहे. याज्ञवल्क्य राजकर्माविषयीं असें म्हणतो.—

श्रुताऽ ध्ययनसंपन्न धर्मज्ञाः सत्यवादिन ॥
राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये समाः ॥ — मिताक्षरा.

म्हणजे, राजानें अध्ययनसंपन्न (शिकलेले), धर्मज्ञ, सत्यवादी व शत्रुमित्राविषयीं निष्पक्षपाती असे सभासद नेमावे. याप्रमाणें ऋषींच्या आज्ञा खऱ्या. परंतु राजांनीं सभेशिवाय कारभार बघूंच नये असा कांहीं त्यांजवर जोर चालत नसे. स्मृतिकारांचे वरील लेख कलियुगांतल्या धर्मशास्त्रासारखे बेवारशी होते. त्या लेखांची अम्मल बजावणी झाली किंवा नाहीं अथवा होते किंवा नाहीं हें कोणीं बघत नसे! राजांच्या मनास वाटेल तर सभेच्या मसलतीनें चालत, नाहीं तर तिला एकीकडे गुंडाळून ठेवीत. शिवाजीमहाराजांनी अष्टप्रधानांची सभा नेमून सुरळीत राज्यकारभार चालविला होता. परंतु तो संभाजीला पसंत पडला नाहीं. सारांश, राजांवर जुलमाचा प्रकार शास्त्रकारांनीं लिहिला नाहीं. वरील सर्व लेख फार जुने आहेत. आलीकडे तर त्यांचा विचार मुळींच नाहींसा झाला होता.

कमीजास्त महत्वाप्रमाणें त्यांचें आगेंमागें विवेचन करण्याचा अधिकार आमच्या सोईकरितां आम्ही मागून घेतों. आपण प्रथमतः राज्य शब्दाची व्याप्ति व कारण बघूं. कोणत्याही प्रदेशांत एक किंवा दोनच मनुष्यें असलीं तर त्याला राज्य असें म्हणता येणार नाहीं. राज्य या शब्दांतच असा साहजिक अर्थबोध होतो कीं, कांहीं तरी जनसमूहाचा भूप्रदेश. अशा प्रदेशावर स्वामित्वानें अम्मल चालविणारा तो राजा होय. जेथें एक किंवा दोनच मनुष्यें आहेत तेथें राजा आणि राज्य यांची प्राप्तिच नाहीं. ह्मणजे, ते आपण स्वतः राजे आणि त्यांच्या दृष्टीखालीं जेवढा प्रदेश तेवढें त्यांचें राज्य असें होईल. रॉबिन्सन् क्रूसो ज्या निर्जन प्रदेशावर जाऊन पडला होता तो सर्व प्रदेश त्याचें वैराण राज्य आणि तो तेथील राजा. त्याणें हवें तें करावें व हवें तिकडे फिरावें. तो आपला व आपल्या राज्याचा परम स्वतंत्र मालक होता! तेव्हां एकाकीवसतिस्थलावर राज्यत्व येत नाहीं व तेथें राजाची तर मुळीं गोष्टच नको. राजा या शब्दांत असें कांहीं अर्थगांभीर्य आहे कीं, जो राजा झाला तो इतर तद्वर्गीयांमध्यें वीर्य, बल, ज्ञान व तेज यांणीं जास्त असला पाहिजे. अर्थात् त्याच्या साम्यार्थ दुसऱ्या तद्वर्गीयांची प्राप्ति आलीच. परंतु जेथें पूर्वोक्त रॉबिन्सन् क्रूसोप्रमाणें एका अज्ञात अशा विजन प्रदेशांत एक मनुष्य गेला तर त्याला राजत्व तें कोठून येणार? व त्यांच्याशीं साम्य तरी कोणाचें बघणार? तो त्या सर्व प्रदेशाचा पूर्णपणें धनी होतो. तो वाटेल ती जमीन आपल्या ताब्यांत घेईल, वाटेल ती सोडील व वाटेल तेथें आपल्या बसण्या उठण्याची जागा करील. तो वाटेल त्या जंगलांत शिरेल, वाटेल तीं झाडें तोडील आणि त्या लांकडांचें वाटेल तें करील. त्याला कोणी पुसता सवरता असणार नाहीं. तो जें करील ती पूर्वदिशा. त्याला कोणाची भीति नाहीं, लज्जा नाहीं, शरम नाहीं, धाक नाहीं, कांहीं नाहीं. त्याला कोणी असें कर ह्मणून ह्मणणार नाहीं व कोणी नको करूं असेही ह्मणणार नाहीं. त्याला कोणी शत्रु नाहीं, मित्र नाहीं. स्नेही नाहीं, आप्त नाहीं, मंत्री नाही, उपदेशक नाहीं, कोणी नाहीं. तेव्हां असा जो भूप्रदेश तो राज्य कोठचें आणि अशा ठिकाणीं राहणारा तो राजा कोठचा? याचप्रमाणें, जेथें जनसमुदायही आहे आणि तीं सर्व मनुष्यें पुण्यवान, पापभीरु, क्षमाशील, सदसद्विचारी आणि सन्मार्गवर्ती अशीं असलीं, तर त्या प्रदेशास राज्य अशी संज्ञा जरी दिली तरी तेथें राजाची प्राप्ति मुळींच होत नाहीं. कारण, तेथें राजा असून तो करणार काय? जेथें सर्व लोक आपापल्या कर्त्तव्यांत तत्पर, व अपहार, चोऱ्या, लुटालुटी, मारामाऱ्या, दंगेधोपे, अन्याय, अविचार, जुलूम वगैरे कांहींच नाहीं तेथें राजानें काय करावयाचे? तेव्हां यावरून, जेथें राजा असेल तेथें वरील दुर्गुणांची प्राप्ति तेथील लोकसमुदायांत असली पाहिजे असें सिद्ध होतें. आणि त्या दुर्गुणांचा शास्ता असा जो कोणी तरी अधिकारी पाहिजे तो राजा होय हें या सर्व विवेचनावरून समजावयाचें.

वरील दोन्ही गोष्टी कोठेंही आढळावयाच्या नाहींत. ह्मणजे, निर्जन प्रदेशांत कोणी एकाकीं राहणार नाहीं व असा कोठेंही जनसमुदाय आढळणार नाहीं कीं, तेथें अपहार, अन्याय, अविचार व असद्वर्त्तन हीं नाहींत. या दोन्ही गोष्टी कोठें कोणास अपवादासारख्या आढळल्या तर त्या चिरकालिक नसून अत्यल्पावकाशांत त्यांचीं रूपें सर्व पालटून गेलेलीं आढळतील. रॉबिन्सनक्रूसोप्रमाणें एखादा अभागी मनुष्य दहा पांच वर्षें एखाद्या भूप्रदेशाचा एकटा मालक होऊन राहील; परंतु कांहीं कालानें त्याचें एकाकित्व निश्चयें करून सुटेल. असा कोण दुर्दैवी मनुष्य असेल कीं, आपले जातिवर्गीय सर्व लोक सोडून आपण एकटा भुतासारखा एखाद्या ओसाड मुलखांत जाऊन सुख मानून राहील? तसेंच, अपवादार्थ, कोठें रामराजासारखें सर्वदुर्गुणविवर्जित असें राज्य सांपडेल. तरी त्याची मुदतही फारच थोडी मिळेल. रामराजासारखा नांवाला राजा राहून लोक सन्मार्गवर्ती असतील. परंतु त्याच्या पुढच्याच पिढीला संभाजी बाजीराय, मल्हारराव यांच्या सारखे राज्यसूत्रधारी आढळून लोक 'यथा राजा तथा प्रजा' याप्रमाणें सांपडतील. तेंव्हां, या जगावरील दुर्गुणांचा व दुःशीलांचा कोणी तरी शास्ता व नियंता असावा असें वाटतें व तेथेंच राजाची प्राप्ति होते.

ईश्वरानें स्त्री व पुरुष ह्या दोन जाती निर्मिल्यामुळें व त्याचेठायीं वृद्धीचेंही मान फार मोठे ठेविल्यामुळें, जेथें दहा मनुष्यें आहेत तेथें अल्पकाळांतच मोठा थोरला जनसमूह दृष्टीस पडतो. ज्या घरांत एकच दंपत्य राहून त्या दोघांस तें घर फार मोठें वाटतें तेंच घर काळांतरानें कुटुंबीय मनुष्यांनीं खचून भरून ती जागा त्यांस पुरेनाशी होते. हीच गोष्ट गांवांची, शहरांची व देशांची आहे. इंग्लंडदेश, जो पूर्वी अत्यंत विरल वस्तीचा होता, तेथून हल्लीं प्रतिवर्षीं गलबताचीं गलबतें मनुष्यें भरून बाह्यप्रदेशीं वस्ती करण्याकरितां दवडावीं लागतात ! याप्रमाण, जगावरील लोक-संख्या गुणोकरणानें वाढत आहे व त्यां सर्वांना ठिकठिकाणीं कोणी तरी नियंता व शास्ता असलाच पाहिजे. लोकसमुदाय जसजसा वाढत जाणार तसतशी लोकांची दुर्गुणांकडे विशेष प्रवृत्ति होत जावयाची असें धोरण दिसतें. याचें कारण हेंच कीं, लोकांनां आपला निर्वाह कसा करावा अशी पंचाईत पडते. लोकांची जसजशी वृद्धि होत जाते तसतशी त्यांजमध्यें उद्योगवृद्धि व उत्पन्नाचें कसब हीं वाढत गेल्यास निर्वाहाची फारशी पंचाईत पडत नाहीं. परंतु सर्वच उद्योगी व कसबी लोकांस 'विनादैन्येन जीवनं' मिळतें याचा तरी कोठें नियम आहे? एका ठिकाणीं लोकवस्तीची दाटी झाली व निर्वाहाची आपत्ती पडूं लागली म्हणजे लोक दर्यागर्क व जंगलगर्क जमिनी शोधून दूरदूरच्या ओसाड प्रदेशांत जाऊन वस्ती करितात. ते आपले आप्त, इष्ट, मित्र, सगे, सोयरे वगैरे सर्व सोडून पोटाच्या मागें देशत्याग करितात. परंतु कोठें गेलें तरी या संसारां-तील दुःखे, संकटें व चिंता कोठें सुटतात ? लोक नानास्वभावाचे असल्यामुळें त्यांजमध्ये आलस्य हा एक दुष्ट रिपु फारां दिवसांपासून बिऱ्हाड देऊन राहिला असतो. त्या आलस्याचा परिणाम हाच होतो कीं, आपण हात पाय न हालवितां आपल्याला सुखानें पोटभर खायप्यायला मिळावें असें त्यांस वाटून त्यांजमध्यें अपहार, दुष्टाचा, मत्सर, परोत्कर्षासहिष्णुता, इत्यादि दुर्गुण मनस्वी वाढत जातात. व या सर्व दुर्गुणांचा परिणाम बिचाऱ्या उद्योगी लोकांवर घडतो. त्यांणीं कष्टानें व श्रमानें संपादन केलेली मालमिळकत आपल्याला सुखानें उपभोगितां येईल किंवा नाहीं ही चिंता त्यांना नेहमीं बाळगावी लागते. आणि त्या अपहारी लोकांस फुकटंफाकटी व बिनश्रमानें पैसे मिळ-विण्याची लजत लागून जिकडे द्रव्योष्मा असेल तिकडे ते धांव घेतात. सर्व मनुष्यांस आपापली मिळकत, द्रव्य, चीजवस्तू वगैरे सुरक्षित राहून आपल्या मेहनतीचें फल आपल्याला कसें मिळेल ही चिंता वाहण्याचें जर कारण नसतें तर राजत्वाची जरूरच पडली नसती. पण तसें कोठें आहे ? जेथें उद्योगी आहेत तेथें निरुद्योगी व आळशी लोक आहेतच; जेथें सुज्ञ, बुद्धिवान् व कसबी लोक आहेत तेथें अज्ञान, शंख आणि मतिमंद लोकांची समृद्धि असतेच; आणि जेथें श्रीमान्, ऐश्वर्यवान्, व अधिकारसंपन्न लोक आहेत तेथें दरिद्री, कंगाल आणि गरीब लोक असतातच; व ते दोन वर्गाचे लोक एमयेकांशी शत्रुत्वानें वागूं लागतात. श्रेष्ठ वर्गाचे लोक कनिष्ठ वर्गाशीं फारसा द्वेष व मत्सर बाळगीत नाहींत व तसा द्वेष व मत्सर बाळगण्याचें त्यांस कारणही नसतें. परंतु दुसऱ्या म्हणजे कनिष्ठ वर्गाचे लोक ज्येष्ठ वर्गाशीं मात्सर्यानें वागून त्यांस नेहमीं त्रास देत अस-तात. त्यांस श्रीमंतांचें धन लुटाडून आणण्याची प्रबल इच्छा सर्वदा असते. एकमेकांस फसविणें, एकमेकांवर जुलूम जबरदस्ती करणें, इत्यादि नानाप्रकारचे दुष्ट गुण त्यांजमध्यें रात्रंदिवस वास करीत असतात. फारशी मेहनत न पडतां लौकर आणि पुष्कळ धनप्राप्ति व्हावी अशी मनुष्याची स्वाभाविक इच्छा असते. श्रमावांचून खाण्यास मिळालें तर मनुष्य नेहमीं संतुष्ट राहील. आपले श्रम व मेहनत वांचून आपल्याला सर्व प्रकारची सुखें मिळावीं हें धोरण मनुष्यमात्राचें आहे असें दिसतें आणि यामुळें अत्यंत दुष्ट वासना, कामना, भयंकर कृत्यें व संकटें या जगांत उद्भवून उद्योगी, मेहनती व ऐपतदार लोकांची शांति, निर्भयता, शाश्वति आणि वात्सल्य हीं जाऊन ते लोक चंचल वृत्तीचे, भयभीत, सचिंत आणि निष्ठुर होतात. त्रासदायक दुष्ट लोकांचा कोणत्या प्रकारानें घात व बंदोबस्त होईल, अथवा अशा प्रकारची सुरक्षता आपल्याला कोण देईल, अशी

त्यांस चिंता पडते. आणि अशा चिंतेच्या वेळीं राजा असावा अशी इच्छा साहजिक होते. तेव्हां, अशा प्रकारानें सर्व लोकांस न्याय, रक्षण आणि तज्जन्यसुख देणारा कोणी तरी बलवान् शूर आणि वजनदार असा शास्ता व नियंता राज तेजाचा मनुष्य सर्वांवर धाक, दाब आणि भीति ठेवणारा पाहिजेच. तो सर्वांचा बंदोबस्त करून आपल्या पदरीं फौजफाटा, शिबंदी, रखवालदार वगैरे लोक बाळगितो. आणि कोणी कोणास इजा व दुःख देऊन लबाडीलाताडी, जुलूमजबरदस्ती, लूटफाट, दंगाधोपा व हाणमार करूं नये अशा प्रकारची यथास्थित व्यवस्था ठेवून कोणीकडून तरी लोकांमध्ये शांति, सुख आणि उत्साह राहील अशी तजवीज करितो.

याप्रमाणें राजा उभा राहिला म्हणजे त्याच्या अधिकाराखालीं जेवढा प्रदेश राहिल तेवढें त्याचें राज्य होतें; व त्यावर तो आपल्या शक्तीप्रमाणें अम्मल चालवितो. तो अशक्तांचें रक्षण करितो; अन्यायवर्त्तास दंड व शिक्षा करितो; परशत्रूचें निवारण करितो; प्रजेच्या संपत्तीचा व मालमत्तेचा संभाळ करितो; आणि आपली जरब व ऐश्वर्य आपल्या साम्राज्यानें वाढवितो. असा चांगला व राजनीतिकुशल राजा निवडून काढणें किंवा कसाबसा राज्यकारभार हाकीत असलेला राजा पदच्युत करणें हीं दोन्ही कामें मोठ्या जोखमीचीं आहेत. अशा गोष्टी सर्वांच्या ऐकमत्यानें होतात. ह्याप्रमाणें राजपद हें मोठें जड प्रकारण आहे. एकदां राजा अधिकारापन्न झाला म्हणजे त्याची वंशपरंपरा या राज्याधिकारास खिळली असें समजावें. येणेंप्रमाणें, एक प्रकारानें राजाची स्थापना करण्यांत प्रजेच्या स्वतंत्र्यास कमीपणा येतो यांत संशय नाहीं. मग पुढें त्या राजाचे वारस-पुत्र, बंधु, नातु, पणतु कोणी कसेही निवटले तरी त्यांचा क्रूर अथवा लुंगासुंगा अधिकारच वंद्य मानून राहवें लागतें. तेव्हां हेंही बरोबर नाहीं.

आतां, हा राज्याधिकार वंशपरंपरेनें चालविण्याचें दोन चार गोष्टींकडे धोरण ठेवून लोक कबूल करितात. कोणींही श्रमानें संपादिलेली संपत्ति त्याच्या वंशजाकडे अबाधित चालावी हा न्याय आहे, हा एक भाग लोक मनांत अणितात. म्हणजे, मूळ राज्यसंपादकास राज्यपद मिळविण्याविषयीं किती श्रम सोसावे लागले असतील व कोणकोणते पराक्रम करावे लागले असतील तो विचार करून, त्याच्या वंशजांकडचा तो अधिकार सहसा काढूं नये असें लोकांस वाटतें. लोक दुसरा विचार हा करितात कीं, एखाद्या वंशजांकडून हा अधिकार काढला तर सुखानें काढला जाणार नाहीं. कारण कोणत्याही पक्षाकडे अभिमानी लोकांचें पाठबळ असतेंच. रावणदुर्योधनासारखे परदाराभिलाषी राजे झाले तरी लोकांचा पक्ष त्यांजकडे होताच. याचें कारण असें आहे कीं, ते संपत्तिमान् व शक्तिमान् असतात. लोकांना खायाला मिळालें म्हणजे ते त्यांचे पक्षपाती होतात. मग त्यांस सदसत्पक्ष पाहण्याची गरज नसते. आणि अशा पक्षपाती व अविचारी लोकांचे मन मोडून एखाद्या राजवंशीयास पक्षभ्रष्ट करणें मोठ्या जोखमीचें आहे. ह्मणून त्या भानगडीत पडून लोकांची शांती व स्वस्थता मोडण्याचें साहस कोणी करीत नाहीं. कालांतरानें तो दुर्वर्त्तनी राजा चांगला होईल किंवा तो मरून जाऊन त्याचे मागें दुसरा न्यायी राजपुत्र राज्यभार वाहण्यास येईल या आशेवर लोक गुपचुप त्रास सोशीत काळ कंठीत असतात. बाकी वस्तुतः अन्यायवर्त्ती राजा झाला ह्मणजे त्यास पदभ्रष्ट करून लोकांना आवडेल तो राजा स्थापित करावा ही नीति आहे. तेथें परंपरा पाहूं नये. परंपरेनें राज्यपद चालविण्याची वहिवाट फार पूर्वीपासूनची आहे. सूर्यवंशीय, सोमवंशीय, मनुवंशीय, ब्रह्मवंशीय ध्रुववंशीय वगैरे बहुत क्षत्रिय कुलें परंपरेनें राज्यवैभव भोगीत आलीं आहेत. तरी, प्रसंग पडल्यास लोकांचें निर्भयपणें अनुसरण असल्याचीं ऐतिहासिक उदाहरणें बहुत आढळतात. महाभारतांतील इतिहासांत नहुष, वेण, सहस्त्रार्जुन, इत्यादि राजांस व आलीकडील इतिहासांत गोत्रहत्यारी राघोबा पेशव्यास राजकार्यधुरंधरांनीं राजपदावरून भ्रष्ट केल्याचे दाखले सांपडतात. इग्लंडांतील पहिल्या चार्लस राजाची आणि फ्रान्सच्या सोळाव्या लुईराजाची हीच दशा लोकांनीं केल्याचें त्या त्या देशच्या इतिहासांत प्रसिद्ध

आहे. लोकांनीं या पदभ्रष्ट राजांपैकीं कोणास ठार मारिलें, कोणास अधिकारच्युत केलें व कोणास बंदिखान्यांत टाकिलें; आणि दुसरे राजे तत्तत्पदारूढ करून प्रजारक्षणाचा जो मुख्य मुद्दा तो सांभाळिला. तरी, त्या नीतीप्रमाणें चालणें मोठें कठीण आहे. नानाफडणीसांनी सवाईमाधवरावांचे मागून पेशवाईचा अधिकार बाजीरावास देणें अयोग्य आहे असें ह्मटलें. पण त्यांचें कोण ऐकतो ? शिंद्यांनी बाजीरावास पुण्यास आणून त्यालाच परंपरेचा वारस ह्मणून राज्याभिषिक्त केलें ! तेव्हां असे आपसांतील द्वंद्वांचें प्रसंग न यावे ह्मणून धोरणी पुरुष ते टाळवतील तितके टाळीत असतात. व वारसाची मालिका जी परंपरेनें चालत आली असते तीच चालूं देतात.

अजून राज्याची मीमांसा पुरी झाली नाहीं. राज्यकर्त्या पुरुषाचें काम हेंच आहे कीं, त्याणें आपल्या आवश्यक निर्वाहास व डौलास, आणि आपलें राज्यकारभाराचें काम बरोबर चालण्यास जो खर्च लागतो तेवढ्यापुरता पैसा प्रजेकडून कराच्या रूपानें घेऊन त्या पैशाचा योग्य व्यय करावा. ज्याअर्थी हा पैसा लोकांकडून घेण्यांत येतो, त्याअर्थी त्याचा खर्चही सार्वजनिक उपयोगाकडेच करण्याविषयी राजपुरुषानें नेहमी खबरदारी बाळगिली पाहिजे. शिबंदी, आरमार, न्यायाधीशांच्या नेमणुका, नानाप्रकारचे शोध, कलाकौशल्यांना उत्तेजन इत्यादि सार्वजनिक कृत्यांकडे जेवढा खर्च होईल तितकाच करावा. आणि येवढ्याकरितांच प्रजा राजाला कर, पट्ट्या वगैरे देऊन त्याजपासून आपलें संरक्षण चिंतिते. याप्रमाणें सुयंत्र राज्यकारभार चालविण्यास राजाची एकट्याचीच मुखत्यारी चालूनही उपयोग नाहीं. त्यास मसलतगार व मंत्रीमंडळ विद्वान्, चतुर व अनुभवी असें असलें पाहिजे. या देशांतील एकंदर राजांच्या कारकीर्दी पाहिल्या असतां त्यांचे मसलतगार व मंत्री सर्व मोठमोठे राजकार्यधुरंधर ब्राह्मणच होते. त्यांचें आपापल्या राजांवर मोठें वजन असून तेही तदनुचारी असत. ते मंत्री आपल्या राजांस फाजीलपणा किंवा अन्याय करूं देत नसत. राजपदधारणाला पूर्वी क्षत्रियवर्गच योजिलेला असे व तेही आपल्या कर्तव्यांत तत्पर असत. महाभारतांत वर्णिलेल्या अखेर इतिहासापर्यंत हे क्षत्रिय राजे मोठमोठे व पराक्रमशाली होऊन गेले व त्यांणीं मोठ्या न्यायानें राज्ये केलीं. पुढें कितीएक क्षत्रिय राजे अन्यायाचारी व मनस्वी होऊन जाऊन राज्यभ्रष्ट व धर्मभ्रष्ट होऊन, त्यांचे ठिकाणीं शूद्र, वैश्य, म्लेंदेंछ व यवन इत्यादि राजवैभव भोगण्यास येऊन बसले !

आलीकडे दोनहजार वर्षांत राज्यरीतीच्या मर्यादा बहुतेक सुटून राजानें स्वतःला ह्मणून काय घ्यावें व प्रजारक्षणार्थ काय घ्यावें ही वांटणी अगदींच बुडून राजे स्वेच्छ झाले. लोकांवर कर, पट्ट्या वाटेल तशा बसवून तो पैसा सर्व आपला व त्यावर धनीपणाची मालकी आपली असें समजून ते खुशाल त्या पैशाचा व्यय आपल्या ख्याली खुशालींत आणि ऐषआरामांत करूं लागले. कोणीं जलमंदिरें केलीं; कोणीं महाल, वाडे बांधिले; कोणीं कीर्तिप्रसारार्थ दाने, धर्मादाय वगैरे देऊन पैशाची लूट करूं लागले. इतकेंच नाहीं प्रण ज्या कामाकरितां तो पैसा घ्यावयाचा त्या कामाकडे मुळींच खर्च होईनासा होऊन प्रजेस न्याय किंवा दंड हे चालविण्याकरितां जीं न्यायनीतिकुशल माणसें पाहिजेत तीं निखालस उपाशीं मरूं लागलीं ! ब्राह्मणभोजनें वगैरे अनुत्पादक व निरुपयोगीं धर्मकृत्यें फार बोकाळून, रयतेचा पैसा ह्मणजे आपल्या मालकीचें द्रव्य असें समजून राज्यभार वाहणारे लोक वर्तूं लागले. कर, पट्ट्या यांणी रयतेपासून वसूल केलेला पैसा म्हणजे त्यांच्या श्रमाचें उत्पन्न व तें आपल्याजवळ ठेवीदाखल सुस्थळीं ह्मणून आलें असून त्याचा हिशेब आपल्याला त्यांना द्यावा लागेल हें त्यांच्या स्वप्नी देखील वागेनासें झालें. या पैशाचा व्यय त्याच्या धन्याचेच कामाकडे केला पाहिजे हे तत्व ते अगदींच विसरले. खजिनदार किंवा भांडाराधिपति यास, आपण केवळ द्रव्यरक्षक असून त्याचा सदसत्कृत्याकडे व्यय करणें अथवा तें द्रव्य तसेंच कुलुपांत ठेवून त्याजवर पहाणी करणें यापैकीं कोणतें काम आपलें आहे याची शुद्धि राहिली नाहीं. आपल्या ताब्यांतील आपल्या पेटींत जमलेला पैसा जणूं

काय आपल्या हक्काचा व मालकीचा असें समजून त्याचा त्यांणीं वाटेल तसा धुवा उडवावा. ब्राह्मणभोजनें, मोठमोठीं दानें, रंगमहाल, जलमन्दिरें वगैरे करण्याकरितां रयतेनें आपला पैसा आपल्या हातांत दिला नाहीं; तसलीं कामें त्यांनाही करितां येतील; तीं करण्याकरितां राजा मध्यस्थी नको; फक्त सैन्यशिबंदी, न्यायमनसुबी, अपराध्यांस दंड, दुष्टांस शासन, यांची व्यवस्था करण्याकरितां खर्चण्यासाठीं लोक आपल्या जवळ पैसा देतात हा भाग राजे अगदींच विसरले. सोन्याच्या तोफा अथवा रुप्याचे दरवाजे करून बिचाऱ्या रयतेला काय करावयाचें असते ! ही सर्व राजाची मिजास आहे. परंतु, रयतेला पैसा देण्याची संवय लागून राजाला घेण्याची संवय लागली ह्मणजे त्याचीं मूलतत्त्वें व मूलोद्देश हीं दोन्हीही रयत व सरकार दोघेंही विसरतात. आणि त्याचा हिशेब घेणें हें जें रयतेचें काम तें रयत विसरते व त्याचा सद्व्यय करण्याचे काम सरकार विसरतें. द्रव्य हें मोठें भ्रामक असून तें हातांत असलें ह्मणजे त्याचें काय करावें आणि काय न करावें हें धोरण व भान न राहतां सरकारनें वाटेल तें करावें व रयतेनें तो भार सर्व निमुटपणें सोसावा अशी परंपरेच्या अज्ञानामुळें लोकांस संवयच पडून गेली आहे. राजांनीं अनेक वेश्या व नाटकशाळा ठेवून अनेक विलास व नानारंग उडवावे, विविधविषयोपभोगांत रममाण होऊन अनेक पापकृत्यें करावीं आणि त्या पापांपासून मुक्त होऊन चिरकाल ऐश्वर्य व वैभव-सुखाचा लाभ व्हावा ह्मणून लाखों गोप्रदानें, ब्राह्मणसंतर्पणें, महादानें, पात्रापात्राचा विचार न करितां इनामें, वर्षासनें, देवाचीं मंदिरें यांजकडे पैसा खर्च करावा अशी इच्छा होऊन त्याप्रमाणें गोष्टी अमलांत येत. परंतु हा सर्व प्रकार उलट होत असल्याचें त्यांच्या स्वप्नींही येऊं नये. उष्णता झाली म्हणून मिरीं खावयाचीं किंवा शीत झालें म्हणून नदींत पोहावयास जावयाचें अथवा बर्फ खावयाचें, या असमंजस कृत्यांपैकींच, पापकृत्यापासून मोचन होऊन शास्वतसुख-लाभेच्छेनें परद्रव्याचा अपहार करून त्याचा मनसोक्त व अविचारानें अपव्यय करावयाचा हें एक असमंजस कृत्य आजपर्यंतच्या सरकारांकडून आणि राजपुरुषांकडून घडत आलें आहे असें दिसतें. राजपुरुषाच्या पापाचरणांचा शेवट कधींच व्हावयाचा नाहीं असें सर्व लोक जाणतात व त्यावरूनच "राज्यांतीं नरक" अशी म्हण लोकांमध्ये चालत आली आहे.

येथपर्यंतच्या विवेचनावरून राजेलोकांच्या अविचाराचें आणि मत्तपणाचें दिग्दर्शन होईल. परंतु त्यावरून, आजपर्यंत जे भाग्यशाली राजभारवाहक पुरुष झाले ते सर्व एकाच माळेचे मणी होते असें मात्र कोणी समजतां कामा नये. रयतेच्या भाग्यानें कधीं कधीं असेही राजे होऊन गेले कीं त्यांणीं पोटच्या पोरांप्रमाणेंच प्रजेचें पालन, पोषण व रक्षण केलें. त्यांणीं प्रजेच्या द्रव्यास जरूरीपेक्षां जास्त स्पर्शच केला नाहीं. कोणी तर रयतेचा पैसा म्हणजे शिवस्व असें समजून त्याचा अंगीकारच केला नाहीं. कोणी, राज्यकारभार संभाळून आपल्या स्त्रियांकडून व अवकाश सांपडल्यास आपण स्वतः श्रमपूर्वक विणण्याटिपण्याचें काम करून जे कांहीं आठ चार आणे मिळतील तेवढ्यावरच निर्वाह करून राहावयाचें, अशा निश्चयाचे होऊन गेले. त्यांणीं प्रजाद्रव्य विषवत् मानून पूर्वपुण्यानें प्राप्त झालेल्या राजत्वाचे परमपदाचा सदुपयोग करून दाखविला. रयतेच्या पैशाचा उपभोग घेतला तर तें महापाप असून त्याचें फल नरकवास आहे व तें ऋण आपले डोकीवर जन्मजन्मांतरीं बसेल असे मानणारे कांहीं सच्छील राजपुरुष या जगावर होऊन गेले आहेत. मुसलमानांचा महम्मद पैगंबर व त्याचे पुढें पांच पिढीचे खलिफा वरील प्रकारच्या समजुतीचेच होते. हिंदुस्थानांतही कांहीं राजे असेच ईश्वराची भीति आणि प्रजेचा वचक मानून होते. त्यांपैकीं एकाची चमत्कारिक व आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट ऐकण्यांत आहे तीही येथें सांगितल्यास अप्रासंगिक होणार नाहीं.

वरील विशिष्टगुणाच्या निःस्पृह व निरभिलाषराजांपैकी एकाकडे त्याचा एक गरीब मित्र आला; कीं, आपला स्नेही मोठा राज्यकारभार हांकितो आहे, तेव्हां त्याजकडे गेलों असतां तो आपलें

दारिद्र्य-विच्छिन्न करील. परंतु ज्या उद्देशानें तो राजाकडे आला तो उद्देश त्याच्या मताप्रमाणें मुळींच सफल झाला नाहीं. तो कंगाल मित्र आपल्या राजपदधारी स्नेह्याकडे आला तेव्हां राजा दिव्याचे प्रकाशांत हिशेब तपासणीचें काम करीत बसला होता. आपला गरीब मित्र आपल्या भेटीस आल्याचें पाहून राजानें हातांतलें कलम खालीं ठेवून दिवा विझविला आणि मित्राचा हात धरून तो एकीकडे सुखदुःखाच्या गोष्टी विचारीत बसला. मित्रानें त्याजवळ आपली रडकथा सर्व गाऊन, ह्या चमत्कारिक प्रकाराबद्दल त्याणें त्याला विचारिलें कीं, तूं हें काय केलेंस? मी आलों तर माझी नीट रीतीनें भेट घ्यावयाची, तों तूं दिवा मालवून माझ्याशीं येथें अंधारांत गोष्टी करीत बसलास हें काय? राजानें सांगितलें कीं, तो दिवा माझ्या रयतेच्या पैशानें आणलेल्या तेलाचा असून, तुझी माझी जी ही भेट होऊन संभाषण चाललें आहे तें खाजगी असून रयतेच्या संबंधाचें मुळींच नाहीं. तेव्हां तिच्या तेलाचा आपल्या खाजगी कामाकडे काय ह्मणून उपयोग करावा? त्याचप्रमाणें त्याणें त्याला सांगितलें कीं, मी गरीब आहें. मजजवळ माझ्या स्वतःच्या निर्वाहापेक्षां जास्त कांहीं शिल्लक नसून मी रयतेच्या पैशास बिलकुल शिवत नाहीं. मजजवळ सुमारे एक रुपया आहे, तेवढा मी मित्रसाह्यार्थ तुला देतों. त्याच्या योगानें तुला कांहीं बरकत आली तर बघ. कंगाल स्नेह्यानें राजाजवळील रुपया घेऊन त्याचा व्यापार चालविला व त्यांत त्यास चांगली बरकत आली. त्याणें त्या एक रुपयाचा फळफळावळीचा व्यापार केला व त्यांत एका वर्षांत हजार रुपये भांडवल त्याजपाशीं जमलें. ही सर्व बरकत राजाचे एका रुपयापासून आली हें तो समजून पुनः राजाचे भेटीस आला. व एक वर्षांत घडलेलें सर्व वर्तमान त्याणें त्याजजवळ सांगितलें. राजा ह्मणाला, तुला जी ही बरकत आली त्याचें कारण, मी जो तुला प्रीतिपुरस्सर रुपया दिला तो माझ्या खऱ्या श्रमाचा होता ह्मणून त्याणें तुझें दारिद्र्यविच्छिन्न झालें. हेच मी तुला रयतेच्या खजिन्यांतून एक हजार रुपये दिले असतें तर ते चोरी करून दिल्यासारखे होऊन त्यांच्या योगानें तुला कांहींएक बरकत आली नसती ही एक गोष्ट; व मीं रयतेस तितक्या पैशांनीं नागविलें, म्हणजे मीं त्यांची चोरी केली असें होऊन मला पातक लागलें असतें तें वेगळेंच. मीं जो तुला रुपया दिला तो माझ्या निढळच्या घामाचा व न्यायाचा असल्यामुळें त्याणें तुला अल्पावकाशांत सधन केलें.

अस्तु; वरील गोष्टींतल्या राजाप्रमाणें राजे आलीकडे दोन हजार वर्षांच्या काळांत कोणी या भरतभूमीवर अवतरले असतील असें वाटत नाहीं. रयतेस पीडा करून प्रसंगीं त्यांचें घरदार, बैल-जमिनी हीं विकून त्यांजपासून पैसा पिळून काढणारे व प्रजेच्या निर्वाहाचे आवश्यक पदार्थांवर मूर्खपणासारखे भलभलते कर वगैरे बसवून तिला त्राहि त्राहि करणारे असे दुष्ट राजेच निपजत चाललेले आढळतात! लोकांपासून द्रव्य हिसकावून घेऊन आपले जामदारखाने व जवाहीरखाने भरणारे आणि आपण व आपल्या राण्या यांस पोळ्याच्या बैलासारखे आणि चौकांतल्या विश्व-योषितेसारखे नटवणारे, बागा उपवनें वगैरेंतून विलास करणारे, उंच डोंगरावरील थंडगार हवेमध्यें महिनोंमहिने राज्य कारभाराकडे दुर्लक्ष्य करून मजा मारीत राहणारे, नाच रंग तमाशे बैठका कुस्त्या शर्यती यांजमध्येंच आपला काळ घालविणारे, अशा राजांचीच दुर्दैवानें आमच्या हिंदु-स्थानांत परंपरा चालत आलेली आढळते. कित्येक धर्मपिसे, धर्मभोळे, फाजीलकडक, दुष्ट, जुलमी, त्रासदायक, मनस्वी, विषयी, वृथाभिमानी, दुराचारी, नयानयविवेकशून्य, अक्षरशत्रु, क्रूरकर्मे व केवळ पशुतुल्य असे राजे, इकडे होऊन गेले. पुढच्यानें मागच्याच बरें ह्मणावें अशा प्रकारचे शतशः राजे व अधिकारी बनून गेले व त्याचा परिणाम असा झाला कीं, कोणच्या तरी चांगल्या राजपुरुषाच्या लगामीं हा हिंदुस्थानचा राज्यकारभार लागून आपल्यास सुख कसें मिळेल हा विचार रात्रंदिवस लोकांचे मनांत घोळूं लागला व ही लोकांची काळजी लौकरच दूर होऊन पर-देशीय परंतु सन्यायवर्त्ती व समर्थ असे इंग्रज राजे या देशांत आले.

याप्रमाणें राज्य व राजा यांची व्यवस्था समजली. आतां अशा राज्यांत राजानें काय घ्यावें व त्याची व्यवस्था कशी करावी आणि तो घेतो काय व त्याची व्यवस्था काय करितो हा प्रश्न रयतेच्या मनांत कधींच आला नाहीं व तो तिणें कोणत्याही राजास कधीं विचारल्याचें कोणास माहित नाहीं. याचें कारण, राजा ह्मणजे परम दैवत, 'राजा कालस्य कारणम्,' इत्यादि मतें लोकांमध्यें इतकी दृढ झालीं होतीं कीं, त्यांचें गौणत्व कोणाच्या स्वप्नींसुद्धां आलें नाहीं. राजा म्हणजे करील तें होईल. प्रजा काय बिचारी ताटाखालचें मांजर. तिला राजानें हवी तशी दपटावी; वाटेल तसा जुलूम करून वाटेल तसा पैसा काढावा; आणि इच्छेस येईल तसा त्याचा व्यय करावा; असा क्रम आज अनंतकालापासून चाललेला आढळतो. यांत कोणी सच्छील राजांनीं त्या पैशाचा सद्व्यय केला व कोणी उधळ्या राजांनीं असद्व्यय केला. तरी असद्व्ययाकडे पैसा लावणाऱ्या अविचारी राजांची संख्या जास्त निघेल. हा दोष, लोक अशक्त व असहाय म्हणून म्हणा अथवा ते अज्ञान व कर्तव्यपराङ्मुख म्हणून म्हणा, लोकांवरच येतो. ते राजांना वाटतील तसे दाबायला सांपडत असत. आपला अधिकार, जरब, हक्क व मान आपल्या हातानें दूर करून प्रजेला स्वतंत्रतेनें व आपल्या बरोबरीनें वागूं देणारा असा उदारचरित राजपुरुष कोण असणार आहे? राजांचे उलट असे प्रयत्न असतात कीं, रयतेला आपण काय करितों व काय मौजा उडवितों तें पाहून शहाण-पणानें हेवा होऊं नये व तिला सज्ञानपणाचे डोळे येऊं देऊं नयेत. अशी सर्व राजांची रीतिच आहे. आणि म्हणूनच, आजपर्यंतच्या राजकारभारी पुरुषांनीं विद्याशाळांकडे मुळींच चित्त घातलें नाहीं. शाळा स्थापून त्यांतून रयतेस ज्ञान मिळूं लागलें म्हणजे लोक सत्यद्रष्टे व अविचारद्वेष्टे होऊन, आपल्या चालू मनसोक्त आचारविचारांस हरकत येईल या हेतूनें, पूर्वीच्या राजांचा असा बाणाच असे कीं, लोक जितके अज्ञान व पशुतुल्य राहतील तितकें राज्याला व राजपदाला दाढ्यं आहे! लोकांना जर ज्ञान प्राप्त झालें तर ते राज्याधिकारांत अनेक प्रकारानें मन घालून आपल्या स्वेच्छाचारांस अडथळा आणतील अशी राजांस भीति वाटत असे. अजूनपर्यंत ज्याप्रमाणें स्त्रियांना शिक्षण देण्याची सद्वांछा पुरुषांस होत नाहीं, म्हणजे, त्या सुशिक्षित झाल्यास आपल्या पाहिजे तसें करण्यास त्यांजकडून हरकत होईल असें पुरुषांस वाटतें, त्याचप्रमाणें राजांस, आपल्या प्रजेला ज्ञानप्राप्ति झाली असतां आपल्या स्वतंत्र वर्तनास धोका बसेल असें वाटत असते. सारांश स्त्री-पुरुष आणि राजाप्रजा या दोहोंचे परस्परांशी एकसारखेच संबंध व मतलब आहेत असें समजून राजांचा यथेच्छ क्रम आजपर्यंत एकसारखा अप्रतिबद्ध चालला होता.

परंतु, आतां हें सर्व पारडें फिरून व तो काळही बदलून राजराजेश्वरी व्हिक्टोरिया महाराणीचे निरुपद्रवी राजछत्राखाली राजा व प्रजा यांचें नातें बरोबरीचें आहे अशा प्रकारची शिक्षणपद्धति सुरू झाली. व लोकांस ज्ञान प्राप्ति होऊन ते राजकारभारी पुरुषांच्या बरोबरीनें बसण्यास व बोलण्यास पात्र होत चालले हा सुसमयच होय. इंग्रजी राज्यतत्व, रयतेस हिशेब दाखवावा, तिला विद्या शिकवावी आणि तिच्यामध्यें आपल्याविषयीं सन्मानपुरस्सर पूज्यबुद्धि राहील अशा रीतीनें तिला वागवून शांतिसुखामध्यें तिचें राहणें व्हावे, अशा सत्कृत्यांवर अवलंबून आहे. इंग्रजी राज्यास 'खाजगी व दौलत' हीं दोन सदरें मुळींच नसून 'दौलत' (सार्वजनिक पैसा) हें एकच सदर आहे. त्या दौलतीचा जमाखर्च, आपली प्रजा ही आपल्या बरोबरीची व आपल्यास पुसती आहे असें समजून, तिला दाखविण्याची इंग्रज सरकारची वहिवाट आहे. व यावरून लोकांनाही आतां राजतत्व बरेंच कळूं लागून, त्यांस राज्यकारभारी पुरुषांच्या जमाखर्चांतील चुका त्यांच्या कार-भारांत व अभिप्रायांत असलेला मतभेद आणि त्यांचें विरुद्धाचरण हीं दृष्टीस पडलीं ह्मणजे त्यांज-वर बरोबरीच्या नात्यानें प्रसिद्धपणें चरचरीत टीका करण्यास सरकारनें पूर्णपणें मुखत्यारी दिली असल्याचें समजूं लागलें आहे.

हल्लीं इंग्रज सरकारचें राज्य सर्व प्रकारें नियमबद्ध असून आपल्या इकडील पूर्वराजक्रमाप्रमाणें 'इच्छा हाच कायदा' असा धरसोडीचा व दांडगाईचा प्रकार न चालविण्याविषयीं सक्त मनाई आहे. या सरकारचे, राज्यकारभाराकडे किती खर्च करावा व सार्वजनिक कृत्यांकडे किती खर्च करावा, याविषयीं दरोबस्त नियम आहेत. आतां या जमाखर्चाचे संबंधाचा विचार करण्यांतच आपल्याला 'स्थानिक' शब्दाची व्युत्पत्ति व व्याप्ति समजणार आहे म्हणून आपण तिकडे जाऊं.

इंग्रज सरकारची जी जमाबंदी आहे तिचीं तीन खातीं आहेत: सार्वभौम, प्रांतिक आणि नागरिक. या तीन सदरांखालीं एकंदर वसूल होऊन त्यांचा तिन्ही सदरांत निरनिराळा खर्च होतो. सार्वभौम खात्यास जी जमा होते ती परचक्राचा बंदोबस्त करण्याकडे व देशांत शांतता राखण्याकडे खर्च व्हावी असा उद्देश आहे. प्रांतिक वसूल त्या त्या प्रांताचे हिताकरितां व सोईकरितां खर्च करावा असा ठराव आहे. आणि नागरिक जमा ही त्या त्या नगराचे उपयोगाकरितां खर्चावी असा बंदोबस्त आहे.

इंग्रज सरकार म्हणजे विलायतेचे व हिंदुस्थानाचे एकच राजे असून दोन्ही ठिकाणचा कारभार एकाच ठिकाणीं चालतो ही गोष्ट खरी व तीं दोन्ही राष्ट्रें संयुक्त आहेत हें जरी खरें आहे, तरी त्या दोन्ही राज्यांचा हिशेब निरनिराळा ठेविला असतो. हिंदुस्थानावर एखादें संकट गुजरलें अथवा विलायतेस कांही अरिष्ट उद्भवलें तर त्याजबद्दलची काळजी बाळगणें व बंदोबस्त करणें हीं कामें दोन्ही राज्यांस एकमेकांविषयीं सारखींच आहेत व ही गोष्ट माल्ट्यास व ईजिप्टांत विलायत सरकारला मदत करण्याकरितां हिंदुस्थानांतली फौज गेली, यावरून सिद्ध होतें. हिंदुस्थानावांचून विलायत सरकारचा निभाव लागावयाचा नाहीं व विलायत सरकारावांचून हिंदुस्थानाचा निर्वाह होणार नाहीं अशी अन्योन्यसंबंधाची अपूर्व घटना हल्लीं बनून राहिली आहे; व उभय देशांची जी सामाइक शक्ति, बल, ऐश्वर्य व अभिमान हींच देशाचीं बंदोबस्ताचीं साधनें आहेत असें सर्व लोक समजत आहेत. अस्तु.

वर जो तीन सदरांतील जमाखर्चाचा भाग सांगितला, त्या तिन्ही ठिकाणीं त्या जमाखर्चाचा बंदोबस्त त्या त्या विभागांतील श्रेष्ठ, विद्वान्, अनुभविक आणि कर्तव्यतत्पर अशा लोकांचे हातांत असावा अशी सुनीति असून, तिचें प्रकाशन उदारबुद्धीच्या युरोपिअन सरकारांकडून विलायतेस कधींच झालें आहे. परंतु तीच रीति हिंदुस्थानांतही चालू करावी असें आलीकडे येथें आलेल्या थोर विचाराच्या आणि प्रजापक्षीय श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या मनांत वागूं लागलें आहे; हें हिंदुस्थानीय प्रजेचे सुभाग्य आणि भावी उन्नतीचें प्राक्दर्शन होय, असें मानण्यास हरकत नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपणास आपण होऊन स्वातंत्र्य देणें ही कांहीं साधारण गोष्ट नसून याबद्दल सच्छील अधिकाऱ्यांचा जितका धन्यवाद गावा तितका थोडाच आहे असें म्हटलें पाहिजे.

राज्य जें उभें राहतें तें लोकांच्या संमतीशिवाय कधींच उभें राहत नाहीं. सर्वांशानें लोकमत जेथें विरुद्ध पडतें तेथें कोणतीही गोष्ट सिद्धीस जावयाची नाहीं असा साधारण नियम आहे. आतां कधीं कधीं ही लोकसंमती अनुमानिक असते व कधीं कधीं प्रत्यक्ष असते. राज्याधिकारी पुरुषांनीं कोणतीही गोष्ट अमलांत आणून तिजवर रयतेकडून कांहींच तक्रार आली नाहीं अथवा तिजला लोकांनीं मुळींच हरकत आणिली नाहीं तर ती प्रजेची अनुमानिक संमती समजून, होते आहे ही गोष्ट सर्वांस कबूल आहे असें गृहीत करण्यास प्रत्यवाय नाहीं. राजनीतिचा खरा धर्म व मार्ग हाच आहे कीं,–

देशज्ञातिकुलानां च ये धर्माःप्राक्प्रवर्तिताः ॥
तथैव ते पालनीयाः प्रज्ञा प्रक्षुभ्यतेऽन्यथा ॥ – व्यवहारमयूख.

तेव्हां लोकसंमतीशिवाय कोणतेंही कृत्य शेवटास जात नाहीं असें म्हटलें तर कोणी असें म्हणतील कीं, सती बंद केली ही प्रजेच्या अनुमतीनें केली काय? अथवा, पुनर्विवाहाचा कायदा केला तो

प्रजेच्या संमतीनें कोठें केला? परंतु असें नव्हें. हे कायदे प्रजानुमतानेंच झाले असून त्याबद्दल कोणाचाही वाद असेल असें वाटत नाहीं. या कायद्यांविषयीं कोणी आपली असंमती सांगतील; परंतु असे अविचारी व आग्रही लोक फारच थोडे सांपडतील. व असे सांपडले तरी त्यांस आपलें अविचारी मत प्रसिद्धपणें सुज्ञ लोकांस कळविण्याची लज्जा वाटून उलट त्यांचीच लोकांमध्यें छीथू होईल. तेव्हां सरकारला सदर कायदे करतेवेळीं जी लोकांच्या अनुमानिक संमतीची कल्पना होती ती बरोबर होती असेंच ह्मणावें लागतें. शिवाय हीही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, राज्य-कारभार हांकण्यास जे लोक या सरकाराकडून नेमिलेले असतात ते सुज्ञ व निवडक असल्यामुळें त्यांचेविषयीं कुरकुर करण्यास फारच थोडी जागा सांपडते व ते आपल्या मदतीस आणखी चार सभ्य, विद्वान् व माहितगार लोक घेऊन कोणतेंही काम करीत असतात. तरी येवढ्यानेंच लोकांचा संतोष होत नाहीं व त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण, सर्वांशीं परकीय लोकांचे स्वाधीन आपल्या घरचा कारभार गेल्यावर त्यांजकडून जें कांहीं कार्य होईल तें आपल्यास चोख रीतीनें आवडेलच असें कदापि होणार नाहीं. आणि ह्मणूनच राज्यकारभारांत ज्या त्या देशाचें स्वत्व असलें पाहिजे.

आतां हें स्वत्व ह्मणजे काय याचाही आपल्याला क्रमाप्रमाणें विचार करावयाचा आहेच; तो करूं. राज्याची मीमांसा वर विस्तृत रीतीनें झाली तेव्हां त्याचें पुनःकथन नकोच. स्वराज्य ह्मणजे, ज्या देशचे लोक तेच आपलें राज्य करीत असले ह्मणजे त्यास स्वराज्य म्हणावयाचें. शिवाजीनें मोंगलाकडून जो मुलूख घेतला व त्यांत जेथें मोंगलाचा भाग होता त्यास चौथाई ह्मणत. परंतु ज्या मुलखांत ह्याप्रमाणें दुसऱ्या कोणाचा भागबीग कांहीं नसून केवळ शिवाजीचाच अष्टाधिकार चालत असे त्यास स्वराज्य म्हणण्याची वहिवाट होती हें प्रसिद्ध आहे. व ही गोष्ट गांवच्या कागद-पत्रांत व सनदांत प्रसिद्ध आहे. ज्या देशचे राज्य त्या देशच्याच लोकांचे हातीं असावें ही प्रकृति असून तें परदेशीयांचे हातीं जावें ही विकृति होय. ती कांहीं अनिवार्य कारणांनीं दुर्दैवेंकरून प्राप्त झाली आहे असें समजावें. या पृथ्वीवर अनेक देश व अनेक राज्यें आहेत. परंतु तीं सर्व स्वराज्यें आहेत. एक पोलंड देश मात्र परकीय लोकांचे ताब्यांत आहे. त्याचप्रमाणें ऐर्लंड देशही विलायत सरकारास जोडला आहे. तरी, ऐरिश लोकांना राज्यकारभारांत भाग पुष्कळ आहे. लष्करांत व फौजांत त्यांस मोठाल्या अधिकाराच्या जागा देऊन पार्लमेंटांत त्यांचे सभासद घेतात. सारांश, त्यांना इंग्रज सरकार साधारणतः आपल्या बरोबरीचे समजून त्यांस कुरकुरण्यास जागा ठेवीत नाहीं. तथापि त्यांस एक प्रकारानें आपण परकीयांच्या अमलांत आहोंत हा अपमान वाटून त्यांच्या नेहमीं कुजबुजी चालल्या असतात. त्यांचे जमिनीचे संबंधानें वगैरे कांहीं वाद सुरू आहेत. परंतु ते वाद राणीसरकार व त्यांचे हुशार प्रधान मि. ग्ल्याड्स्टन् हे युक्तीयुक्तीनें तोडून टाकून आपसां-तील यादवी मोडतील अशी उमेद आहे. सारांश, स्वराज्य नसलें ह्मणजे स्वदेशीय लोकांस कित्येक गोष्टी अनिष्ट होतात. व त्यांस परकीय राज्यकर्त्यांला आपल्यावर स्वामित्व गाजवीत असलेलें देखवं सकवत नाहीं ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. परंतु टिपु, बाजीराव, मल्हारराव ह्यांच्यासारखे दिग्वि-जयी राजे झाल्यावर या देशांतील लोक परकीयांस मिठी मारणार नाहींत असें कदापि होणार नाहीं. आणि याच कारणांमुळें या देशांतील सर्व राजे जेथल्या तेथें गारद झाले! त्यांणीं रयत-परवर्शीवर नजर दिली नाहीं; रयतेस शहाणी केली नाहीं आणि कोणत्याही प्रकारें त्यांशीं ममतेनें वागून त्यांची प्रीति आपलेकडे ओढून घेतली नाहीं. उलट असले जुलमी राजे येथील लोकांस काळ किंवा यमसे भासूं लागले. त्या राजांनीं सर्व देशभर धुमाळी करून प्रांतचे प्रांत ओसाड पाडिले व लुटारू, पेंढारी वगैरे उपद्रवी लोकांस फूस मिळून ते सर्व देशभर इतस्ततः चोऱ्या, लुटा-लुटी आणि दंगे करीत फिरत होते. कोणाचा जोडा कोणाचे पायास व कोणाचें पागोटें कोणाच्या डोकीस याचा पत्ता नाहींसा होऊन स्वस्थपणें खाण्याला बसण्याइतकी देखील शांति नाहींशी

झाली होती. तेव्हां हा सर्व दोष स्वदेशीय राजांचाच असल्यामुळें, आज दोन हजार वर्षांपासून स्वराज्याचा लाभ येथील लोकांस कधीं पूर्णपणें मिळालेला दाखल्यास कोठेंच सांपडत नाहीं! आज दारा आला, उद्यां शिकंदर आला, परवां नादिरशहा आला, एरवां अबूदल्ली आला, अशी परदेशीय दांडग्या सरदारांची हिंदुस्थानावर जशी काय रव लागली असून, ज्याणें उठावें त्याणें आपला हिंदु प्रजेवर मोहरा फिरवावा असा प्रकार चालला. शिवाय येथल्यायेथें शेजारीं शेजारीं असणाऱ्या राजांनीं आपापसांत कलह करून एकमेकांचे प्राण घेण्यास उठावें. होळकरांनीं पुणें लुटावें; शिंद्यांनीं इंदूरावर पडावें; पेंढाऱ्यांनीं पंढरपूर ओरबाडावें; पंतप्रतिनिधींनी सातारा, वाई, वगैरे प्रांत धुऊन न्यावे; शिंद्यांच्या बायांनी सांगोल्यावर हात फिरवावा;* पठाणांनीं खटावावर समशेर पडतळावी; निपाणकरांनीं चिकोडी** प्रांत लुटावा; फत्तेसिंग मान्यानें खानापुरावर स्वारी करावी; याप्रमाणें 'गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ' चालून त्याखालीं बिचारी रयत चिरडून बेदाद व्हावी! तिणें अशा संकटांस त्रासून डोंगरी दऱ्यांतून व किल्ल्यांवरूनन लपत व जीव वांचवीत फिरावें अथवा त्यांतल्या त्यांत कोणी प्रबलसा सरदार बघून त्याच्या पाठीशीं दडून कालक्षेप करावा. निरनिराळ्या लुटारूंनी निरुपद्रवी लोकांस पैसा काढण्याकरितां राखेचे तोबरे, मिर्च्यांची धुरी, तापलेल्या तव्यावर उभें करणें, वगैरेसारखे नीच व जुलमाचे प्रकार करून त्यांना 'दे माय धरणी ठाय!' असें त्राहि त्राहि करून सोडावें. असा क्रम अखंड व अस्खलित ज्या देशांत चालला असतां व ज्या देशांतील लोकांमध्यें परस्पराशीं द्वंद्व, कलह व अदावती वाढून अत्यंत अनावर झालें असतां, तेथें परदेशीय राजावांचून स्थिरस्थावर व्हावयाचेंच नाहीं ही गोष्ट साहजिकच आहे. चार असामी दारू पिऊन रस्त्यावर हंबो तुंबी व शिव्यागाळी करीत आणि एकमेकांच्या अंगावर घसरून रक्तपात करीत भोंवतालच्या लोकांचें स्वास्थ्य दवडीत असले तर तेथें पोलिसानें येऊन त्या मत्त मधुपांस धरून नेलें पाहिजे. त्याशिवाय बंदोबस्त होणार नाहीं. याच न्यायानें, आपसांत लाथाळी करून रयतेला त्रासवून सोडणाऱ्या मूर्ख राजांस एका दावणींत गोंवून तिऱ्हाईत इंग्रज सरकार आज सार्वभौम बनले; तेव्हां यांत दुःख व आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नसून, पूर्वीं विक्रम, भोज, पृथ्वीराज वगैरे सार्वभौम व प्रजापालननिरत राजे होऊन त्यांच्या कारकीर्दींत लोक असे सुखानंदी होते तो सुखानंद आपल्यास मिळण्याचा काल आला आहे असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. ही स्वराज्याची आणि तें नष्ट होण्याची वासलात झाली.

आतां स्थानिक शब्दाचा अर्थ आणि व्याप्ति बघून नंतर एकंदर 'स्थानिक स्वराज्य' संबंधानें युक्तायुक्त विचार देऊं. स्थानिक ह्मणजे एका गांवास किंवा प्रांतास लागू पडणारा जो अधिकार तो वर हल्लींच्या उत्पन्नाचीं जीं तीन निरनिराळीं सदरें सांगितली आहेत त्यांतील प्रांतिक आणि नागरिक उत्पन्नाची व्यवस्था ह्मणजे खर्चवेंच करण्याचा अधिकार त्या त्या प्रांतांतील व नगरांतील लोकांकडे असणें, त्याला ह्मणतात स्थानिक अधिकार. स्थानिक अधिकार हा सार्वभौम अधिकाराहून भिन्न असून त्याची व्याप्तिही त्याच्या त्याच्या हद्दीपुरतीच आकुंचित आहे. तरी, अशा प्रकारचा स्थानिक अधिकार असणें ह्मणजे स्थानिक स्वराज्यच झालें असून, त्याची व्यवस्था सर्व प्रकारें लोकांकडे येणें हा एक आज अपूर्व योग घडून येत आहे व हा प्रसंग या देशाच्या इतिहासांतील मुख्य भागांपैकी होणार आहे असें सर्व लोक म्हणतात.

*पुण्यांत महादजी शिंदे मेल्यावर त्यांच्या बायकांनीं कांहीं पठाण व फत्तेसिंग माने यांस घेऊन दंगा केला. त्यास 'बायांचा दंगा' ह्मणतात. हा दंगा शेवटीं पेशव्यांच्या फौजेनें मोडिला.
**निपाणकर सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर हा कोल्हापूरकर राजाची मुलगी मागत होता व त्याकरितां तो नेहमीं कोल्हापूर प्रांतांत लुटालुटी करी. शेवटी या रावजींनीं जबरदस्तीनें त्या मुलीशी लग्न लाविलें!

जेथें दुर्दैवानें आणि अज्ञानानें लोकांस परावलंबनाची दुःस्थिति प्राप्त झाली आहे तेथें जितका अधिकार स्वदेशीय लोकांचे हातांत परत येईल तितका इष्टच आहे. मग तो लोकांच्या मागण्यानें येवो किंवा राज्यकर्त्या सरकारचे प्रसन्नतेमुळें आणि औदार्यानें येवो; कसाही आला तरी पाहिजेच आहे. आपणास लायखी व राज्यकर्तृत्वशिक्षण हीं यथास्थित प्राप्त होऊन आपलें 'स्वराज्य' आपल्या हातीं अंशतः तरी यावें आणि ठिकठिकाणीं व मोठमोठ्या हुद्यांवर स्वदेशीय कामगार नेमले जाऊन त्यांस मोठमोठे पगार मिळावे, असें प्रत्येक स्वदेशाभिमानी सुज्ञ पुरुषास वाटतें. व त्याप्रमाणें सरकारचेंही वर्तन नाहीं असें नाहीं. आपण अमीनीपर्यंत होतों ते हायकोर्टाचे जज्जाच्या पदापर्यंत गेलों; मामलेदार होतों ते कलेक्टर झालों; अर्जदार होतों ते कौन्सिलदार झालों; कोतवाल होतों ते पोलिसइन्स्पेक्टर बनलों; शिरस्तेदार होतों ते जूरर लोकांत आलों; इस्पितळांत असिस्टंट, अप्रेंटिस व कंपाउंडर होतों ते डाक्टराच्या व सिव्हिलसर्जनच्या पदवीस पोंचलों; आणि मेस्त्री होतों ते इंजिनिअर होत चाललों. याचप्रमाणें आपल्याला पुढें पाऊल टाकीत टाकीत गव्हर्नर व व्हाइसराय यांच्या पगारी कौन्सिलदारांच्या पट्टीला जाऊन पोहोंचावयाचें आहे. या देशांत पार्लिमेंटसुद्धां झालें पाहिजे अशी उमेद आहे. व या सर्व कृत्यांत एतद्देशीय लोकांचें पाऊल जितकें पुढें पडेल तितकें विशेष अभिनंदनीय व हितकारक आहे. इकडील द्रव्य पगारांनीं ह्मणा किंवा सामान खरेदीच्याद्वारें ह्मणा, तें परदेशांत जाणें इष्ट नाहीं. म्हणून जितकें ओढवेल व धरवेल तितकें धन ओढलें पाहिजे आणि त्याचीं द्वारें आपले हातीं राखिलीं पाहिजेत. यांत कांहीं अन्याय नाहीं व कोणाचा अपहार करावयाचा नाहीं. आतां ही शर्यत आहे. धांवण्याच्या आखाड्यावर सर्व धांवतात पण पुढें जातील त्यांस पैजेचें इनाम मिळतें. त्याप्रमाणें विद्या, अक्कल आणि उद्योग यांचें बल पैदा करून ही स्वराज्यव्यवस्थेची पैज जिंतण्याची सर्व स्वदेशकल्याणेच्छूंनीं उमेद बाळगिली पाहिजे.

जेथें पुरातनकालापासून स्वदेशीय राजेच राज्य करीत आहेत तेथेंही हल्लीं लोकसंमतीचें वजन जास्त जास्त होत आहे.* राजाची इच्छा आणि वर्तन कमी होऊन प्रजेची इच्छा आणि सूचना यांस प्राधान्य मिळू लागलें आहे. युरोपखंडांतील बहुतेक देशांत हल्लीं प्रजापक्षासच मातब्बरी असून तेथील राजे रयतेचा विचार सहसा मोडीत नाहींत. लोकांचा कारभार त्यांच्या त्यांच्याच विचारानें चालावा हें जें उत्कृष्ट राजतत्व, त्याचा अवलंब बहुतेक सुधारलेलीं राष्ट्रें करूं लागलीं आहेत व हें पाहून आपल्यासही ईर्ष्या उत्पन्न होते. आणि ती ईर्ष्या पुरविणारे राजराजेश्वरीचे हिंदुस्थानांतील प्रधान श्रीयुत लार्ड रिपन साहेबांसारखे सज्जन पुरुष असतां त्याचा लाभ दवडणारे असे आत्महितशत्रु कोण आहेत! युरोपांतील राज्यांत राजाला प्रजापक्षाचें कथन करण्यास पार्लिमेंट, काँग्रेस, असेंब्ली, असोसिएशन, कौन्सिल वगैरे लोकनियुक्त मुखत्यारांच्या मंडळ्या, ज्यांस आपल्या इकडे परिषद्, प्राड्विवाक, मंत्रीमंडल अशी जुन्या ग्रंथांतून नांवें आहेत तशा प्रकारच्या सभा, प्रत्येक राज्यांत असून, तेथील राज्यकारभारांत कधींही असंतोष, अप्रीति आणि जुलूम जबरदस्ती असल्याचें ऐकूं येत नाहीं. तिकडे चोऱ्या, अपहार, फसवणुका, खून वगैरे अपराधांचा व देण्या घेण्याच्या चौकशा करण्याचे संबंधानें फौजदारी कचेऱ्या व न्यायाधीशांच्या नेमणुका होतात व त्यासंबंधानें लोकांच्या कुरकुरी व तक्रारी ऐकण्यांत येतात; परंतु राज्यकारभाराचे संबंधानें लोकांमध्यें हालचाल होण्याचा संभव नाहीं तरी त्याच युरोपखंडांतील तुर्कस्थान वगैरेंसारख्या देशांत जेथें अशा सभा किंवा मंडळ्या नसून राजसत्ताकच राज्यें आहेत, तीं राज्यें दुर्बल होत. राजपक्षानें

*खंबायतचा दिवाण लोकांनीं काढून टाकिला; म्हैसूरचे लोक दिवाणाचा निवड करण्यांत गुंतले आहेत; व याचप्रमाणें कलकत्त्यास व्हाइसराय साहेबांनीं एतद्देशीय लोकांच्या सभेकडून कौन्सिलदार निवडून घेतला. यावरून लोकमतास मान मिळत आहे हें स्पष्ट होतें.

कारभार चालण्यांत प्रजेचा संतोष व उत्साह कायम राहात नाहीं असें अनेक अनुभवांनीं सर्वांस समजलें आहे. व यामुळें प्रसंगीं राजाला प्रजेनें असें साह्य मिळावें तसें मिळत नाहीं. ही गोष्ट स्वराज्यांतली झाली. ह्मणजे, जेथें त्याच देशचा, तद्धर्मी व तज्जातीय राजा असतो तेथें देखील प्रजापक्षास इतकें महत्व देतात तेव्हां त्यास साम्राज्यत्व येतें. मग जेथें मुळींच विधर्मी, विदेशीय व विजातीय राजा आहे तेथें केवळ राजेच्छेनेंच येवढ्या पंचवीस कोट प्रजेचा राज्यकारभार हांकला जावा व प्रजामत ह्मणून कांहींच बघूं नये, हें अत्यंत विलक्षण आणि सुराजनीतिज्ञांच्या मतानें अन्यायात्मक आहे. परदेशीय राजकारस्थानांतल्या लोकांस, ते कितीही प्रजाजनहितेच्छु असले तरी एतद्देशीय लोकांचे आचार, विचार, संप्रदाय व वहिवाटी वगैरे कांहींएक माहित नसल्यामुळें त्यांजकडून सर्वजनांस संतोषावह असा थोडाच कारभार करितां येतो हें उघड आहे. तेवढ्याकरितां हल्लीं जी स्थानिक स्वराज्यव्यवस्थेची घटवटना चालू आहे ती साध्य करून घेण्यास प्रत्येकानें झटणें आवश्य आहे.

आतां ही स्थानिक स्वराज्यव्यवस्था कशी काय चालवावयाची व यासंबंधानें सरकारचे हेतु कसे असून ही सर्व व्यवस्था चालू करण्यांत लोकांचे अभिप्राय काय आहेत याचें थोडेंसें स्पष्टीकरण करूं आणि प्रस्तुत लेख आटोपूं.

सरकारच्या वसुलाचीं जीं तीन सदरें वर सांगितलीं, त्यापैकीं दोन सदरांतला वसूल रयतेच्या स्वाधीन करून तिच्या मार्फत स्थानिक स्वराज्यव्यवस्था करविण्याचा सरकारचा इरादा आहे. या दोन्ही प्रकारच्या वसुलांची व्यवस्था आजपर्यंत मुख्यत्वेंकरून प्रांताचे कलेक्टर यांचे स्वाधीन आहे. ते आपल्या मर्जीप्रमाणें चार लोक कमिटीदार ह्मणून ठरवितात. व यांस बोलावून त्यांचे विचारें वरील वसुलाची व्यवस्था करितात. परंतु येणेंकरून त्या द्रव्याचा व्यवस्थित खर्च होत नाहीं. कलेक्टरांचे मागें कामांचा रगाडा फार असल्यामुळें त्यांस या कामांत हवी तितकी फुरसत न मिळून त्यांणीं यासंबंधांत जितकें लक्ष्य घालावयास पाहिजे तितकें लक्ष्य त्यांजकडून घातलें जात नाहीं. शिवाय, जे लोक कमिटीदार ह्मणून नेमण्यांत येतात ते तरी विद्वान, माहितगार, पोक्त विचाराचे आणि सर्वजनहितेच्छु असे असत नाहींत. कलेक्टर किंवा सरकारी अधिकारी जे ह्मणून असे कमिटीदार (पंच) नेमितात ते निःस्पृह, निष्पक्षपाती, सत्यद्रष्टे आणि निरीच्छ असे नेमीत नाहींत. याचें कारण उघडच आहे कीं, त्या पंचांवर आपलें वजन राहावें व ते आपण इच्छूं त्या गोष्टीस कबूली देणारे असे थापडवाईक असावे असें प्रत्येक अधिकाऱ्याचें धोरण असतें. वर लिहिलेल्या खर्चाची व्यवस्था लावणाऱ्या कमिट्यांची वहिवाट सन १८५६।५७ सालापासून हिंदुस्थानांत सुरू झाली. ती व्यवस्था तरी उगाच जुलमाचा रामराम अशा प्रकारची झाली नाहीं. सर्व प्रकारें यथाशास्त्र झाली. ह्मणजे, प्रथमतः जाहिरनामे लावून लोकांच्या संमती घेतल्या आणि नंतर यांच्या विचारें जे कर लागू करावयाचे ठरले ते कर लोकांवर बसविण्यांत आले. त्याचप्रमाणें कांहीं दिवसपर्यंत तर अशी वहिवाट असे कीं, नेमिलेल्या कमिटीदारांपैकीं कोणी गेला आला तर त्याचे जागीं त्याच्या बरोबरीच्या कमिटीदार बांधवांच्या विचारानें आणि मसलतीनें दुसरा कोणी योग्य गृहस्थ नेमीत. याप्रमाणें मूळ ज्या कमिट्यांची सुरुवात झाली ती शास्त्रोक्त रीतीनें झाली होती. तींत चूक काढण्यास बिलकुल जागा नव्हती. परंतु पुढें हें स्वातंत्र्य डोळ्यांत उतरून कमिट्यांचा अधिकार दिवसें दिवस सरकारी अधिकाऱ्यांकडून कमी कमी होत चालला. लोकविचारानें कमिटीदार नेमण्याचें बंद होऊन कलेक्टराचे विचारानेंच मेंबर निवडण्यास सुरुवात झाली. सरकारांत ज्या हकीकती किंवा माहित्या कळावयाच्या त्या सर्व कलेक्टरांमार्फतच कळावयाच्या असून सरकारचा त्यांजवरच भरंवसा असल्यामुळें त्यांच्या इच्छेप्रमाणें व त्यांची ज्या थोड्या बहुत लोकांशी ओळख असेल त्यांच्याच नेमणुकी होऊन जन्मभर तेच कमिटीदार नेमले जातात अथवा कोठें मुदती मुदतीनें नेमिले जातात. परंतु येणेंकरून शहरांतून जे दुसरे हजारों लोक राहतात त्यांच्या मताला

किंवा अभिप्रायाला कोणीच न विचारितां वाटेल तसे कर, पट्ट्या वगैरे जुलुमाचे व असंतोषाचे प्रकार साहजिक होतात. शिवाय, कमिटीमध्यें जर कोणी तसेच निस्पृह लोक असले तरी कलेक्टर हे वजनदार व प्रांताच्या राजासारखे अधिकारी असल्यामुळें त्यांच्या मताविरुद्ध कोणत्याही गोष्टीस धडकून मत देऊन त्यांच्या अभिप्रायांचा पाडाव करण्याचें कोणास धैर्य होत नाहीं. अशा अनेक प्रकारांनीं ह्या कमिट्या लोकमताच्या असून त्यांस सर्वांशांनी परावलंबनाचे रूप आलेलें सर्वत्र दृष्टीस पडतें. हा प्रकार अनिष्ट होय. असें सरकारच्या स्वातंत्र्यप्रिय अधिकाऱ्यांस वाटून त्यांणीं त्या कमिट्यांस मूळच्याप्रमाणें शास्त्रोक्तरूप देऊन लोकांस स्वातंत्र्य देण्याचा उपक्रम चालविला आहे. या स्वातंत्र्य दानाचा हा प्राथमिक भाग असल्यामुळें या दानास सर्वांशांनीं आपण पात्र आहों असें दाखविण्याचाही आमच्या लोकांस हा अपूर्व प्रसंग आला आहे. दात्याला, आपण जें दान करण्याचें श्रेय घेणार तें अपात्रीं दान होऊन पुण्यभाक् व्हावें, असें कधींही वाटत नाहीं. द्रव्य-स्त्रादि दानाला जसे गरीब, अनाथ, सुशील, सुशिक्षित व कुटुंबवत्सल असे याचक बघण्याची विचारी दानशूरांची इच्छा असते; तद्वत् या स्वातंत्र्यदानाला आपण सर्वांशांनीं पात्र असे याचक आहोंत असें दानशूर सरकारास वाटूं देण्यासारखें आपलें वर्तन राहिलें पाहिजे.

कमिट्यांमध्ये सरकारी अधिकाऱ्यांकडूनच कमिटीदारांच्या नेमणुका होत असल्यामुळें कमिटी-दारांचें स्वमतावलंबन जाऊन ते त्या अधिकाऱ्यांच्या धोरणाप्रमाणेंच मत देतात हें लोकस्थितीला अत्यंत अनिष्ट आहे असें सरकारनें पूर्णपणें अनुभवून, प्रांताच्या व शहरच्या वसुलाचा खर्च त्या त्या प्रांताच्या व शहरच्या लोकांचे विचारानेंच व्हावा हा जो सरकारचा हेतु आहे तो फारच इष्ट आहे, असें वर ह्मणण्यांत आलें. यावरून, आजपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांच्या धोरणानें तरी, शहरांतून व प्रांतांतून जीं कार्यें झालीं तीं दरोबस्त गैर व खोटसाळ झालीं आहेत, व सरकारनें हा नवीन स्वतंत्रतेचा अधिकार दिला ह्मणजे तीं कामें व त्या व्यवस्था कराव्या, अशा प्रकारचीं पूर्वीच्या अमदानींतलीं कृत्यें झालीं आहेत; असें ह्मणण्याचा आमचा विचार नाहीं. ते अधिकारी तरी अविचारी, दुष्टबुद्धीचे व प्रजाजनहितशत्रु होते असें नाहीं. त्यांच्या सद्विचाराप्रमाणें त्यांणीं होईल तितकें रयतेच्या अडचणींकडे व सुखाकडे लक्ष्य देऊन जें करावयाचें तें केलें आहे व करीत आहेत. परंतु कोठें कोठें या सर्वांशा एकतंत्रपणामुळे रयतेवर असावें त्यापेक्षां कराचें ओझें फार जबर चढून ती फार त्रासून जेरीस आल्याचें दिसतें. त्याचप्रमाणें तिच्या ऐपतीबाहेर अशीं मोठ-मोठ्या खर्चाचीं कामें झालीं तेंही योग्य नाही. 'ऋण काढून सण करण्या' सारखी शहरांची व प्रांतांची सुधारणा होणें इष्ट नाहीं. तेव्हां हें दुःख या नवीन व्यवस्थेनें सर्व प्रकारें दूर होईल अशी आशा आहे.

कमिट्यांचे जुलूम मनस्वी असून त्यामुळें लोक फार त्रस्त झाले आहेत हें ह्मणणें अत्युक्तीचें नाहीं. त्याचप्रमाणें 'ऋण काढून सण करण्या'सारख्या शहर सुधारणा झालेल्याही कांहीं कमी आढळत नाहींत. उदाहरणार्थ पुणें शहरच घ्या. या शहरचा पहिल्या सालचा वसूल बघितला तर अवघा १७ हजार रुपये होता तो वाढतां वाढतां आज दीड लक्षाजवळ येऊन ठेपला. तेव्हां हा इतका वसूल रयतेकडून सुखासमाधानानें आणि योग्य ह्मणूनच झाला असेल असें क्वचितच ह्मणावें लागतें. त्याचप्रमाणें लोकांपुढें आज ताजें ताजें असलेलें 'मार्केट' प्रकरण, याजविषयींही विचार केल्यास 'ऋण काढून सण करण्या'सारखाच प्रकार होत आहे असा सर्व लोकांचा अभिप्राय दिसतो. आतां कमिटींत वसूल होणारा सर्व पैसा शहरच्या व्यवस्थेकडेच खर्च होतो ही गोष्ट खरी. परंतु तो वसूल तरी कोणत्या रीतीनें आणि कोणत्या उपायांनीं होतो हें बघितलें तर वाईट वाटतें. लोकांचीं भांडीं कुंडीं आणि हंडी गाडगीं जप्त करून आणि त्यांचा लिलांव करून पैसा जमा करा-वयाचा ही वहिवाट सर्वत्र आढळते. कित्येक ठिकाणीं तर दोन दोन तीन तीन वर्षें करांच्या बाक्या वसूल करण्याचीं कामें चाललीं आहेत. लोक गरीब व निर्धन झाल्यामुळें त्यांस यत्किंचित्

करांचें ओझें देखील डोईजड होऊन ते मेटाखुटीत येतात! त्यांना कमिटीकडून नोटिसा होत असतात, वारंटें निघत असतात, अशी वसूलीची घिस घिस चाललेली बहुत ठिकाणी पाहण्यांत येते. वाई, नासिक, पेण, पनवेल इत्यादि ठिकाणीं गरीब लोकांच्या तवेपितळ्यांचे लिलांव झालेलें ऐकिले आहेत! याप्रमाणें जेथें कमिट्यांचा उपद्रव लोकांस दुःसह झाला नाहीं असा एकही गांव आढळणार नाहीं. व हा सर्व प्रकार परक्याच्या हातीं कमिटीचीं सूत्रें असल्यामुळें होतो असा सरकारचा दृढतर समज होऊन, ही कमिट्यांची सत्ता एतद्देशीय रहिवाशांकडेसच ठेवावी ह्मणजे त्यांस जुलूम जबरदस्ती वाटावयाची नाहीं, असें अधिकाऱ्यांस वाटत आहे. ही सर्व सत्ता स्वदेशीयांचे स्वाधीन करणें फारच चांगलें असून लोकांनीं आपल्याचे हवी तशी आपली व्यवस्था करावी असें स्वातंत्र्य देणें हें फार मोठ्या औदार्याचें आणि सुशीलतेचे चिन्ह होय यांत संशय नाहीं. आपलें द्रव्य आपण खर्चावें या सत्तेसच स्वराज्य ह्मणतात. याचेविरुद्ध जी व्यवस्था तें परराज्य होय. ही परराज्यसत्ता जितकी कमी होईल तितकी सुखावह आहे. जेथें शिक्षणप्रसार फार वाढून लोक चतुर, हुशार, समंजस आणि उत्कृष्ट व्यवस्थापक बनले आहेत अशा ठिकाणीं तर ही स्वराज्यसत्ता सरकारनें फार खुषीनें लोकांची लोकांस देऊन आपण एका प्रकारच्या काळजींतून दूर व्हावें हे आवश्य आहे. परंतु, जेथें लोक मूर्ख, असमर्थ आणि अव्यवस्थित असतील तेथें परराज्यसत्ताच त्यांच्या सुधारणेस कारण होणार ह्मणून तशी परराज्यसत्ता त्या अभागी लोकांवर असावी हें योग्य आहे.

स्वराज्यस्थापनाविषयीं देशाभिमानी लोकांनीं अनेक जीवापाड श्रम व मेहनत केल्याचीं उदाहरणें इतिहासांतून सांपडतात व आपल्या डोळ्यांसमोर घडत असलेलीं आपण पाहतों. परंतु बिचाऱ्या हिंदुस्थानच्या कपाळीं तें वैभव कधींकाळीं तरी होतें असें नाहीं. लोकसत्ता ही इकडे कधींच कोणास ठाऊक नसून, राजा हाच आपला मायबाप असें समजून त्याच्या आज्ञेप्रमाणें चालावे येवढें काय तें एतद्देशीय लोकांस माहित. लोकसत्ता स्थापन व्हावी ह्मणून फ्रान्स देशात एक शतकपर्यंत मोठमोठे तंटे माजले व लाखों लोक त्यापायीं मेले. मोठाली युद्धें झालीं, रणें झुंजलीं आणि शेवटीं तद्देशीयांनीं लोकसत्तेचें अपूर्व वैभव मिळविलें. आमच्या लोकांस स्वराज्याची कल्पनाच नाहीं तेव्हां लोकसत्तेचें बीज तरी कोठून उद्भवणार! हजारों वर्षांपासून दास्यांत आणि गुलामगिरींत आमचे जन्मचेजन्म गेले व त्या शोच्य स्थितींतच आम्ही विषकीटवत् राहणार असें धोरण दिसतें! बचनागांतल्या किड्यांस जशी ती वनस्पती विष अशी न वाटून मधुर बोरांतल्या किड्यांबद्दल जशी त्यांस धन्यता वाटत नाहीं, तद्वत् आह्मांस स्वराज्य आणि लोकसत्ता यांजबद्दल गौरव आणि महत्त्व वाटेनासें झालें आहे! आमचीं डोकीं कधींच वर निघालीं नाहींत, व आम्ही आमच्या देशाची राज्यव्यवस्था राजगृहीं कशी काय चालते याजबद्दल कधींच विचार केला नाहीं गाढवें ज्याप्रमाणें पाठीवर लादलेलें ओझें धनी नेईल तेथपर्यंत नेऊन टाकितात व त्यांस जसें– आपल्या पाठीवर गोणी कसली, मातीची किंवा दगडांची, व त्याचें धनी काय करणार, घर बांधणार किंवा रस्त्यांतल्या मोऱ्या बांधणार,– हें कांहींएक माहित नसतें व त्या माहितीची त्यांस जरूर नसते, तद्वत् आम्ही मनुष्यप्राणी असून पुरातन कालापासून या सर्व स्वदेशीय कारभारांत पशुतुल्य अत्यंत अडाणी व ज्ञानशून्य राहिलों! राजापुढें हात जोडून त्याचा स्तुतिपाठ गावा; त्यास अन्नदाता, स्वामी, प्रभु, बापजी अशा नानाप्रकारच्या श्रेष्ठतादर्शक नांवांनीं त्याला आळवावें; तो करील ती पूर्वदिशा समजून 'राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना?' इत्यादि पाठ म्हणावे; पावसानें भिजविलें, नवऱ्यानें मारिलें आणि राजानें लुटलें तर उपाय काय? असें ह्मणून चुरसुरे खात ठिकाणच्या ठिकाणीं जुलूम, पारतंत्र्य आणि अपमान सोसून मढ्यासारखें बसावें; ह्या गोष्टी आमच्या हाडीं खिळून राजनिष्ठा आमच्या रोमरोमांतून ओतप्रोत आणि सरबरीत भरून राहिली होती! राजपुरुषांनीं कांहीं कलें आणि कसेही नाचले तरी त्यांजकडे वर डोळा करून बघावयाचें नाहीं हें तर आमचें ब्रीद आणि आमचा सुशीलपणा, असा आमचा अभिमान आजपर्यंत चालत

आला! राजाज्ञेंवर तक्रार व कुरकुर म्हणून करूं नये; ते जसें सांगतील तसें चुंबीत मुठींत नाक धरून करावें, हें तर आमचें कुलव्रत आणि स्रष्ट्यानें आमच्या ललाटीं लिहिलेलें कर्तव्य; असें आम्ही परंपरेनें समजत आलों! राजा नवरा आणि प्रजा बायके हें पतिपत्नींचें नातें विधीनेंच निर्मून ठेविलें आहे असें आम्ही मानीत आलों! कसल्याही राजकृतीवर कालत्रयीं आमचा म्हणून प्रश्नच निघाला नाहीं! विधवेच्या संबंधानें जसें आमच्या ब्राह्मणांनीं लिहिलें कीं, तिणें सती जावें, तिचें वपन करावें. परंतु कोणी शहाण्यानें त्याजवर प्रतिवाद आणून 'असें का?' म्हणून असें कधीं विचारिलें नाहीं; व जें लिहिलें त्याप्रमाणें तें धर्मकृत्य समजून लक्षावधि लोक हजारो वर्षांपासून त्या मूर्खपणाच्या व निर्दयतेच्या कृत्यास अनुसरले; तसे राजा आणि त्याचा स्वेच्छ कारभार म्हणजे एक प्रकारचा ईश्वरनिर्मित सृष्टिक्रम आणि अत्यंत आवश्यक असा अनुसरणीय धर्ममार्गच समजून, लोक अंधपरंपरेनें त्याला धरून आजपर्यंत चालत आले! परंतु, हा काल आतां सर्व बदलून हल्लीं नव्या मध्यंतरास सुरुवात झाल्याचीं चिन्हें भासमान होऊं लागलीं आहेत. मन्वादि राजांच्या कारकीर्दीतही ज्या स्वातंत्र्याचें स्वप्न नव्हतें तें स्वातंत्र्य सध्यां सर्वत्र लोकांच्या साधारण बोलण्यांतही येत असून तें लोकांनीं अनुभवावें असें शीलवान राजपुरुष इच्छीत आहेत, व आपल्या हातानें लोकांस तद्विषयक रुचि आणि अभिमान उत्पन्न करून देत आहेत. तेंव्हां हा काल यासंबंधांत धन्य म्हणून म्हणूं नये काय? शिक्षणप्रसारानें लोकांस आतां इतकें खास वाटूं लागलें आहे कीं, आपण प्रजानन हे यजमान किंवा धनी, आणि राजे राज्याधिकारी हे सर्व आपले चाकर किंवा हुकूमबंदे नौकर होत. त्यांणीं हरएक बाबतींत आपला विचार घेतला पाहिजे व आपल्या मसलतीवांचून इकडचें पाऊल तिकडे टाकूं नये असे वागलें पाहिजे; हें लोकांस समजूं लागलें आहे. आतां त्या समाजाप्रमाणें त्या गोष्टी अमलांत येऊन खऱ्या स्वातंत्र्योपभोगाचा मात्र अवकाश राहिला आहे व तो योग श्रीमानलार्ड रिपन साहेबांच्या पूर्णानुग्रहानें लौकरच घडून येईल अशी आशा आहे.

व्हाइसराय साहेबांनी ही स्थानिक स्वराज्यव्यवस्था जी लोकांकडे देण्याचें योजिलें आहे त्याप्रमाणें ती गोष्ट अमलांत येणें किती आवश्यक आहे हें येथपर्यंतच्या विवेचनावरून वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. परंतु कित्येक लोक या सुयोगाच्या अनावश्यकतेची अभद्रवाणी काढून लोकांस बिचकवीत आहेत. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, व्हाइसराय साहेब जें हें औदार्य दाखवित आहेत व स्वातंत्र्यदान करीत आहेत या औदार्यास आणि त्या दानग्रहणास एतद्देशीय लोक सर्वांशीं अपात्र आहेत इतकेंच नव्हे, तर ह्या औदार्यदर्शनाची आणि ह्या महादानाचें पुण्य (यश) जोडण्याची महापर्वणीच अद्यापि आली नाहीं. ते आणखी असे म्हणतांत कीं, पहिल्यापासून लोक अजागळ आणि सारासार विचारशून्य असल्यामुळें अशा प्रकारचें अधिकारस्वातंत्र्य त्यास देणें म्हणजे 'खुळ्याच्या हातांत कोलीत' दिल्याप्रमाणें अनर्थावह होणार आहे. लोकांस ज्ञान नसल्यामुळें या स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचा भार वाहण्यास. जे लोकांकडून मुखत्यार निवडले गेले पाहिजेत, ती निवड नीट रीतीनें न होतां भलभलतेच मुखत्यार लोक निवडून पाठवूं लागून एकंदर फार घोंटाळा होऊन जाण्याचा संभव आहे. असें म्हणण्यांत वरील शंकाखोर लोक अशीं कारणें दाखवितात कीं, आपल्या लोकांनी आजपर्यंत आपल्या सज्ञानपणाचा प्रकाश कोठें पाडिल्याचा दाखला मुळींच नाहीं. राज्यव्यवस्थेचा भाग एकीकडे ठेवा, परंतु त्यांणीं आपल्या संसारिक आणि व्यवहारिक गोष्टींमध्यें तरी सुधारणेचा टेंभा किती कसा पाजळला आहे? ज्यांचें पोकळ धर्माभिमान पहिल्याप्रमाणें जागृदवस्थेंत आहेत; ज्यांस विधवावपन, पुनर्विवाहनिषेध, व अतिशूद्रादिकांचा विटाळ आणि तिरस्कार, हींच मान्य असून आपापसांतील वैमनस्यें आणि कलह हे ज्यांमध्यें अजून जीवंत आहेत, त्यांजकडून हें परम स्वतंत्रतेचें आणि अभेदबुद्धीचें असें सार्वजनिक काम कोठून होणार? परभू ब्रम्हणांचा द्वेष करितात, ब्राम्हण परभूंस पाण्यांत पाहतात; सोनार, दैवज्ञ,

पांच कळशे, कांसार वगैरे अन्योन्य जाती विवाहास प्रवृत्त होतात; सरकारी कामांत खाजगी दावे आणून त्रास देतात; ते सुखासमाधानानें स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचें काम निर्वेध रीतीनें करूं शकतील असें कदापि होणार नाहीं. ते आपापल्या शहराच्या वेगवेगळ्या तुकड्या पाडून सार्वजनिक कामास हरकत आणतील; देवळें, मशिदी वगैरेंचे वाद उभे करतील; आपापल्या ज्ञातीची उन्नती करण्याकडे व तींतील लोक नांवाजून पुढें आणण्याकडे जो तो ओढाताण करील; आणि ते आपासांतील द्वैतें आणि सूड उगविण्याकडे ह्या प्रसंगीं एकमेक चढ करावयास पाहतील! तेव्हां अजून लोकांस अक्कल आली आहे हें कशावरून समजावें? हिंदु, मुसलमान, पार्सी, शूद्र, अतिशूद्र वगैरेंनीं आपापल्या सारख्या अधिकाराप्रमाणें व अभेदबुद्धीनें या स्थानिक स्वराज्याचा सारखा लाभ घेतला पाहिजे. परंतु तसें संधान साधेलसें दिसत नाहीं.

आता वरील अभद्रवाणी काढणारे जें असें दुष्ट भविष्य करितात तें तरी अगदीं असंभाव्य आहे. असें नाहीं. वस्तुतः पाहिलें असतां आमच्या लोकांची अंतस्थ स्थिति अंशतः अशी आहे खरी. परंतु याजवर आम्हाला कांहींच समाधान करितां येणार नाहीं असे नाहीं. आपसांतील भांडणे व कज्जेकफावती आमच्यामध्येंच आहेत असें नाहीं. त्या सर्वत्र दृष्टीस पडतील. कोठेंही अंतःप्रवेश झाला म्हणजे हीच स्थिति दृष्टीस पडेल. त्याविषयी म्हणजे आमचा येवढा हिंदुस्थानदेशच वेगळा निपटून पडतो असें नाहीं. आमचीं भांडणें आणि कज्जेकफावती बाहेर लोकांस दिसतात आणि दुसऱ्यांचीं भांडणें आणि कज्जे यांजमध्ये आमचा अभिनिवेश नसल्यामुळें तीं आम्हास समजत नाहींत इतकेंच. बाकी, "घरोंघरीं आणि एकच परी" आहे. आमचे लोक आज वीस वर्षांपासून कमिट्यांचा अनुभव घेत आहेत व त्यांच्या पारतंत्र्यापासून आपलें नफानुकसान किती होत आहे तें त्यांस सर्व कांहीं कळत असून त्यासंबंधीं कामकाज कसें काय केलें असतां कशी काय व्यवस्था राहील हें त्यांस बहुतकरून समजू लागलें आहे. व त्यावरून त्यांस मुखत्यारी मिळाली असता ते विचारपूर्वक काम करून निभावतील असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. वरील दुष्ट भविष्याकडे लोकांनी लक्ष्य देऊन फार सावधगिरीनें आणि विचारपूर्वक या अधिकाराचा भोगवटा घेतला पाहिजे. आपल्या तर्फेचे जे मुखत्यार नेमावयाचे ते सुज्ञ, विचारी, अनुभविक, निष्पक्षपाती आणि निःस्पृह असे नेमिले म्हणजे ही सुव्यवस्था राहण्यास बिलकूल कठीण नाहीं. स्थानिक स्वराज्यव्यवस्थेचीं सूत्रें आपल्या हातांत वागवून यश संपादणें म्हणजे कांहीं मोठासा बाऊ नाहीं. मुखत्यारांची योग्य निवड झाली आणि मुखत्यारांनीं आपल्या शिरावर केवढी जबाबदारी आहे लक्ष्यांत वागविलें, म्हणजे सर्व सुयंत्र आणि बिनबोभाट कारभार चालून आपल्या ग्रामबांधवांस सौख्यलाभ आणि स्वातंत्र्योपभोग मिळेल. मुखत्यारांची निवड करण्यांत आप्त, स्वकीय, जातीवाले, श्रीमान् वगैरेंकडे अगदीं दुर्लक्ष्य झालें पाहिजे. नाहीं तर थोरांमोठ्यांच्या, आप्तस्वकीयांच्या आणि जातीवाल्यांच्या भिडा पडून गौरवार्थ योग्य नव्हेत अशांची निवड केल्यास, इष्ट हेतूची सिद्धता दूर राहून सर्व व्यूह ढांसळून अपयशाचें खापर आपल्या डोक्यावर फुटेल! याजबद्दल फार फार दूरवर धोरण आणि काळजी बाळगिली पाहिजे.

याप्रमाणें स्थानिक स्वराज्य स्थापन होऊन तेवढा अधिकार जरी निभावून आमच्या हातांत पूर्णपणें राहिला गेला, तरी तेवढ्यानें तूर्त आमचा राजकारणामध्यें चंचुप्रवेश होऊन पुढें मुसलप्रवेशाची आशा बाळण्यास कारण होणार आहे. व हा अधिकार आपण योग्य रीतीनें चालविला म्हणजे ज्या उदार व सच्चरित पुरुषांनीं आपल्याबद्दल येवढा कळवळा बाळगून आपल्या उन्नत्यर्थ श्रम आरंभिलें आहेत त्यांस एक प्रकारानें यश दिल्यासारखें होऊन आपल्याला जास्त मोठमोठे अधिकार मिळण्याची योग्यता आहे असें आपल्या प्रतिपक्ष्यांस आणि दुष्ट भविष्यवाद्यांस कळून येईल. स्थानिक स्वराज्यव्यवस्था बघणाऱ्या या चिमुकल्या राजसभेचे मुखत्यार निवडण्याचें काम आपल्याकडून चोख रीतीनें झालें,—म्हणजे ही व्यवस्था आपल्या मुखत्यारांकडून सुरळीत चालली

असें सरकारास कळून आलें,-ह्मणजे स्थानिक सरकारच्या किंवा मुख्य हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलाचे सभासद निवडून पाठविण्याचाही अधिकार आणि वैभव आपल्या लोकांकडे येईल अशी उमेद आहे. आजपर्यंत वरील दोन्ही कौन्सिलांत जी सभासदांची निवड होत आली आहे ती सर्व स्थानिक कमिश्यांप्रमाणें सरकारी कामगारांकडूनच होत आली आहे. परंतु ही आपल्या लोकांची दुर्बलता आणि मतिमांद्य होय. आपल्यामध्यें सभासद निवडण्याचें वकूब आणि अक्कल आहे कीं नाहीं याचें सरकारास आजपर्यंत कोणत्याही प्रसंगीं परीक्षण झालें नाहीं. तें परीक्षण य छोट्याशा स्थानिक स्वराज्यव्यवस्थेच्या अधिकारानें होणार आहे. यामध्यें आपण किती अंशानें टिकतों याची परीक्षा होऊन त्याजवर पुढील आशेची इमारत आहे. ह्या कसोटीस आपण उतरलो ह्मणजे आपल्या सर्व भावी आशा सफल होतील अशी खात्री आहे. आजपर्यंत आमच्या लोकांस राज्यकारभार चालवितां येत नाहीं अशी जिकडे तिकडे नौबत वाजत असून त्याला सांगली, अक्कलकोट, जथ वगैरे दक्षिणेकडील संस्थानें व त्याचप्रमाणें काठेवाडातील कांहीं संस्थानें प्रत्यक्ष उदाहरणें ह्मणून जगासमोर आलीं आहेत; व हा मोठा कमीपणा आपल्या लोकांकडे आला आहे. तो समूळ घालवून वैभवशाली होण्याचा हा सुसमय प्राप्त झाला आहे. हें सयश लोकांनीं अविचारानें, अलगर्जीपणानें, अदूरदृष्टीनें आणि उदासीनतेनें न गमावतां हुशारीनें, पोक्त विचारानें, फार लांबचा पोंच ठेवून आणि अभिमानानें कमाविलें पाहिजे.

कोणतेंही महत्कृत्य करावयाचें म्हटलें म्हणजे हुंकारमात्रेंकरून होत नाहीं. 'पी हळद कीं हो गोरी।' असें धाधावल्याप्रमाणें करून कोणतीही गोष्ट सिद्ध होत नाहीं. कोणताही महद्धेतु मनांत आणिला तर त्याजमध्यें अनेक ठेंचा लागतील, टक्के टोणपे खावे लागतील, नुकसान अपयश सोसावें लागेल, आणि नंतर ती गोष्ट किंवा तो हेतु सिद्ध होईल असा जगतीय अनुभव सर्वांस आहे. त्याविषयीं कोणी कोणास हंसण्याचे कारण नाहीं. आज तूप प्यावें आणि उद्या आरशांत रूप पहावें यांत किती उतावीळपणा आहे तसाच, कोणतेंही महत्कृत्य अल्पावकाशांत साध्य होण्याची आशा बाळगणें हें उतावीळपणाचें लक्षण होय. युद्धांत गेल्यावर अंगावर दहा पांच वार सोसले पाहिजेत; व्यापारांत पडल्यावर कांहीं पैशास खार लागला पाहिजे; पोहायला गेल्यावर गटंगळ्या खाव्या लागतीलच; परीक्षेस जाऊन एक दोन वेळ नापास झाले म्हणून काय झालें ? घोड्यावर बसावयाचे आणि त्यांत दोन चार वेळ त्याजवरून खालीं यावें लागलें तर यांत ती कोणती बेअब्रू झाली ? कोणत्याही कृत्यांत तत्काळ फल आणि यश मिळणें हें तर नशीब आहे. व असे भाग्यशाली लोक थोडेच आढळतात कीं, त्यांणीं कोणत्याही व्यवसायांत प्रवेश केला कीं, त्यांस यश, कीर्ति, लौकिक, आणि वैभव हीं मागून गचांड्याच देत असतील ! पण असलीं उदाहरणें फारच विरळ; किंबहुना नाहीं म्हटल्यास चालेल. ही साधारण कृत्यांची गोष्ट झाली. पण कायदेशीर राज्यव्यवस्था आणि अप्रतिम लोकशिक्षण यांसारखीं कामें म्हणजे शेंकडो वर्षे घडत घडत होत असतात. वरील दोन्ही गोष्टींचें वैपुल्य विलायतेमध्यें आज दृष्टीस पडतें. यांत आश्चर्य नाहीं. तेथें त्या दोन्ही गोष्टींची घडण फारां दिवसांपासून घडत आहे आणि त्या कामांत तत्तद्विषयक हजारों कारागीर मेले आहेत; तेंव्हां तीं दोन्ही कामें आज दिसतात ह्या रूपास आलीं आहेत. आमचा हतभाग्य देश सर्व लोकांस विश्रुत आहेच. बिचाऱ्याला हजारों वर्षांत वर डोकें करायला झालेंच नाहीं. ज्या ज्या कामांत म्हणून त्याणें शिरावें त्या त्या कामांत त्याजकडे अपयशाचा वांटा ! बिचाऱ्याचा सदा खोलांत पाय ! बापड्यानें परशत्रूंचे प्रहार तरी किती खाल्ले ! ज्याणें यावें त्याणें त्यास लुबाडावें ! त्याला धनीना गोसावी ! त्याचा अभिमानी कोणीच निपजूं नये ! शिवाजीसारखा कोणी निपजून आपली भवानी पडताळून त्यास जरा धीर देतो तोंच त्या अभिमान्याची आयुष्यरज्जु कट्कन तुटून त्याची सर्व आशा, उमेद आणि इच्छा जेथल्या तेथेंच विरघळून त्यांचें पाणी व्हावें ! त्यामुळें त्याची बापड्याची कंबरच खचून गेली ! जो लक्ष्मीचें विलासमंदिर होता तो अवदशेचें माहेरघर बनला.

जो विद्यादेवीचें पीठ होता तोच अविद्येचे वसतिस्थान झाला. जो सद्विचार, सदभिमान, सदभिरुचि आणि सच्छीलता यांचें क्रीडाभुवन होता तो तद्विरुद्ध गुणांनी हुदुदु घालण्याचें पटांगण झाला! जो विद्वान व पवित्र लोकांच्या अधिवासाचें रम्य कुटिज होता तो नष्ट दुष्ट व भ्रष्ट लोकांच्या असदाचाराचा भटारखाना कीं हो बनला! तेव्हा कालगति आणि दैवदुर्विलास हीं अगम्य आहेत! या देशांत कायदे, राज्य, विद्या, वैभव ह्या सर्वांचे अनुष्टुप् आणि आक्ष झालें असून या पुढें हळू हळू त्याच्या मूळच्या खुरटांस पालवी फुटावयाची आहे. कित्येक ठिकाणीं पालवी फुटून त्याच्या शाखाही वाढल्या आहेत व त्यांची गर्द छाया मिळण्याची आशा आहे. इंग्लंडांतील कायदे, राज्य, विद्या आणि वैभव हीं तेथील लोकांनी अश्रान्तश्रमांनीं शेंकडों वर्षें खपून मिळविलीं व सुधारलीं आहेत. तसा काल आपल्याला येणार नाहीं हें कोणीं सांगावें?

लोकस्वातंत्र्याचें महत्त्व कांही वेगळेंच आहे. राज्यकारभार हांकणारा राजा परंपरेनें चालत आलेला असो किंवा अमेरिकेसारखा निवडलेला नियमित मुदतीपुरता राजा असो. त्याचा मुख्य धर्म हा आहे कीं, त्याणें हरएक कामांत प्रजेचें मत घेऊन नंतर काय करणें असेल तें करावें. तेणेंकरून लोकांस आपल्याला अनुकूल काय किंवा प्रतिकूल काय याचा विचार करावयास सांपडून त्यांच्या गैरसोई आणि त्यांजवर जुलूम झाले असें होणार नाहीं जेणेंकरून लोकांचे गिल्हे व बोभाट वारतील अशा तऱ्हेनें राज्याधिकाऱ्यांनीं आपला कारभार चालवावा. लोक संतुष्ट व सधन होऊन त्यांजमध्यें ज्ञान व कला यांची दिवसानुदिवस वृद्धि होत जावी व त्यांजकडे त्यांची सत्ता येऊन ते आपला कारभार आपण स्वतः बघूं लागतील अशा प्रकारची त्यांस फुरसत देत जावी. सारांश, त्यांच्या मनाप्रमाणें कारभार ठेवावा. त्यांत राज्यकारभाऱ्याचें कांहींच नुकसान नाहीं. नुकसान नफा हा रयतेचा रयतेला बघणें आहे; त्याजबद्दलची राजाला काळजी वाहण्याचें कांहीं कारण नाहीं. आपण प्रजेचे संरक्षक आहोंत येवढें मात्र राजानें मनांत वागविलें पाहिजे. हें राज्यतत्त्व जेथें राजे विसरतात तेथें राज्याचा नाश झालाच असें समजावें. त्याला प्रजेचा असंतोष* हाच राजयक्ष्मा (क्षय) होय. पूर्वी फिरंग्यांचे (पोर्च्युगीज लोकांचे) राज्य, औरंगजेबाचें राज्य, मराठ्यांचे राज्य ही केवढ्या जोमानें वाढत जाऊन शेवटीं रसातळाला कां जाऊन पोहोंचली याचीं कारणें पाहिलीं असतां प्रजेच्या असंतोषांतच सर्व येतात. प्रजेचा संतोष जेथें दृढतर आहे तेथें कसलाही बलिष्ठ शत्रु येवो, त्याची मात्रा चालावयाची नाहीं. सर्व लोक आपले जीव देतील, परंतु शत्रूला आपल्या राज्यांत प्रवेश करूं देणार नाहींत. असा प्रजासंतोषाचा महिमा आहे. वरील येवढालीं मोठालीं राज्यें पण, ज्याप्रमाणें समुद्रावर वावटळ होऊन काहूर उठतें आणि पटापट गलबतें बुडतात त्याप्रमाणें क्रमानेंच बुडालीं तीं पुनः वर निघालीं नाहींत. याचें कारण प्रजेची संत्रस्तता होय. सत्ताधारी यांणीं सदासर्वदा लोकहिताचा विचार करावा. आणि तो विचार करण्यास उत्कृष्ट साधन लोकांचे मुखत्यार आपल्या मंत्रीमंडळांत घेऊन व त्याचप्रमाणें सार्वजनिक वकील जीं वर्तमानपत्रें त्यांचे अभिप्राय बघून काय करणें तें करीत जावें. ही उत्कृष्ट राजनीति आतां बहुतांस कळूं लागली आहे. त्याचप्रमाणें मुखत्यारांनीं व वकीलांनीं आपापलीं कामें फार चोख आणि कर्तव्याला स्मरून केलीं पाहिजेत हें सर्वदा मनांत बाळगिलें पाहिजे. अविचार आणि भलभलतीं मतें प्रकट करूं नयेत. हल्लीं गजबजलेली स्थानिक स्वराज्यव्यवस्था स्थापन झाल्यानंतर लोकांच्या कर्तृत्वावर जे क्षुद्रद्रष्टे लोक नजर देऊन बसले आहेत त्यांची खात्री झाली पाहिजे की, आमच्या लोकांमध्ये राज्यकारभार चालविण्याचें सामर्थ्य आहे. आणि असें झालें म्हणजे सरकारानें आपल्याला हें, अल्पस्वल्पच तरी पण अपूर्व, दान केल्याचें सार्थक झाल्यासारखें होईल.

---

* ही गोष्ट महाराणीचे जाहिरनाम्यांत तर स्पष्ट रीतीने लिहिलेली आहे.

आतां हें अल्पस्वल्प दानही ह्मणतां येत नाहीं. या दानाचे फल फार मोठें आहे. स्थानिक राज्याचा वसूल रुपया मागें एक आणा असून, शहरसुधारणुकीच्या करपट्ट्यासुद्धां एकदर सार्वभौम वसूलाचें अष्टमांश उत्पन्न होतें; तें सर्व म्हणजे, दोन आण्याचा कारभार अवकाशाअवकाशानें व आपण आपलें कर्तृत्व आणि गुण दाखवूं त्याप्रमाणें आपल्या हातीं येणारे आहे. तेव्हा येवढा कारभार ज्या उदार सरकारच्या कृपेनें आपल्याकडे येणार आहे त्याबद्दल आपण कृतज्ञ असूंच असूं हें वेगळें सांगणें नको. कारण, आपल्याला माहित आहेच कीं, कोणीही सत्ताधारी आपली सत्ता आपल्या हातानें कधींही दुसऱ्याच्या आणि त्यांतही जिंकलेल्या लोकाच्या स्वाधीन करूं इच्छीत नाहीं. आणि तें अपूर्व औदार्य सरकार आपल्या मित प्रजेला दाखवीत आहे तेव्हा हें उपकारास्पद नाहीं असे कोण म्हणेल ?

या देशांत इक्ष्वाकु व सोमवंशीय राजापासून हजारों राजे झाले. त्याचप्रमाणें आलीकडे विक्रम, भोज, पृथ्वीराज यांपर्यंत जे चांगले चांगले व सद्वर्तनी राजे झाले, त्या सर्वांची सत्कीर्ति प्रसिद्ध असून रावणदुर्योधनादि दुष्ट राजाच्या असद्वर्तनांनीं व अपकीर्तीनें भरलेले ही पर्वतप्राय ग्रंथ लिहिले गेले आहेत. तेव्हां सदसद्वर्तनी राजांची कीर्ति किंवा अपकीर्ति त्यांचे पश्चात् कांहीं तरी राहते व ती बघून किंवा तद्विषयक ग्रंथ वाचून पुढील राजांनीं आपला वर्तनक्रम ठेवावा हें विहित आहे. छत्रपती शिवाजी यांणें हिंदुराज्याचो पुनस्संस्थापना करून अष्टप्रधानादिकांची सुराजनीत्युक्त व्यवस्था केली हें सद्यश ग्रंथांतरीं दाखल्यास राहिलें आहे. यावरून राजकारणी पुरुषांच्या सदसद्वर्तनाचा परिणाम केवळ त्यांच्या अस्तित्वांतच लोकांवर होतो असें नसून त्यांचें अनुकरण करणारे त्यांच्या अस्तित्वांत व यांचे पश्चात् अनंतकालपर्यंत निघण्याचा संभव आहे. तेव्हां राजपुरुषांनीं अनुकरणीय राज्यकारभार चालवीत जावा हेंच आवश्य आहे.

पूर्वीपासून राजसभा ह्मणून कांहीं मंत्रीमंडळ राजपुरुषांच्या जवळ असल्याचें दाखले आहेत व तसल्या राजसभांतून प्रवेश होऊन या मंत्रीमंडलापैकीं आपण एक आहों असें ह्मणविण्याची प्रत्येकास हौस व मोठेपणा वाटत असे. आणि तसली हौस व मोठेपणा असणें आवश्य आहे. राजसभांतून व मंत्रीमंडळांतून अभिनिवेश झाला असतां चातुर्य, राजकारस्थानीपणा, दूरवरचीं धोरणें आणि कीर्तिप्रसार होण्याचें एक उत्कृष्ट साधन होतें. चांगल्या राजांच्या सभांत प्रविष्ट होण्याला विद्वत्ता, धैर्य, शहाणपणा, उद्योगिता आणि नैरालस्य हीं लागतात. त्याप्रमाणें त्या सर्व गुणांचें दर्शन करून राजसभांतून सन्निविष्ट होण्याला प्रस्तुतचा चालू 'स्थानिक स्वराज्यव्यवस्था'–प्रसंग फारच अनुकूल असून त्याचा लाभ संपादण्याविषयीं सर्वांनीं प्रयत्नीं असावें. लोकांचा योग्य रीतीनें व व्हावा तशा व्यवस्थित निवडणुकीनें प्रवेश झाला आणि त्यांच्याकडून प्रजाहिताचीं कामें घडलीं तर हा लाभ आपल्याला चिरकाल लाभेल अशी आशा आहे. तरी कित्येकांचीं अशीं दुष्ट भाकितें निघतात कीं, हा जो राजसभाप्रवेशाला साधनीभूत स्थानिकस्वराज्यव्यवस्थाप्रसंग प्रस्तुतच्या थोर व औदार्यशाली व्हाइसरायांकडून आपल्याला मिळत आहे हा, कित्येक परोत्कर्षासहिष्णू व एतद्देशीयांवर दोषैकदृष्टी लावून सूक्ष्मदर्शन करीत बसणाऱ्या तद्वर्गीयांना (युरोपियनांना) अनिष्ट वाटत असल्यामुळें व तशाच लोकांचें प्रायः राजकारस्थानांत विशेष प्राबल्य असल्यामुळें, ह्या सुप्रसंगाचा फायदा आपत्कालपर्यंत लार्ड रिपनसाहेब आपल्या प्रधानकीच्या जागीं विराजमान आहेत तोपर्यंतच काय तो आपणास मिळेल. कारण, अशाच उदार बुद्धीच्या प्रधानांची परंपरा पुढें चालेल असें या सुदैवपराङ्मुख हिंदुस्थान देशाच्या प्रारब्धीं नाहीं ! दुष्ट भविष्यें करणारांची वाणी सहसा असत्य होईल असें नाहीं. तथापि, या भविष्यावरच लक्ष्य देऊन निराश होणें चांगलें नाहीं. लार्ड रिपनसारखेच प्रजाहितैषी गव्हरनर जनरल पुढें मुळींच येणार नाहींत हें तरी कशावरून सांगावें ? बाकी भविष्याप्रमाणें झाल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. एकाची औदार्यशालिता दुसऱ्यास येत नाहीं. शिवाजीची अष्टप्रधानादिकांची सुव्यवस्था त्याचाच

पुत्र संभाजी यास पसंत न पडून त्याणें मनस्वीपणानेंच कारभार चालविला ! हें प्रत्यक्ष पितापुत्रांचें स्वभावांतर; तेंव्हा व्हाइसरायपदवीवर येणारे निरनिराळ्या स्वभावाचे लोकांच्या वर्तनांत सादृश्य राहणार नाहीं हें खरेंच आहे. परंतु आमच्या लोकांचें स्थानिक स्वराज्यव्यवस्थेंतील नैपुण्य आणि कर्तबगारी जर सरकारास दिसून आली तर हें दिलेलें दान सरकार पुनः परत घेणार नाहीं अशी पूर्ण आशा आहे.

सरकारची प्रजेच्या कल्याणाकडे नजर असावी असें जें येथपर्यंत अनेक वेळां सांगण्यांत आलें त्याला अनुसरून हल्लीं इंग्रज सरकारचें व त्याच्या सुशील प्रधानांचें वर्तन राहत असलेलें पाहून संतोष होतो. या राज्याधिकाऱ्यांची हीच सद्बुद्धी अविलय राहून रयतेचा उत्कर्ष आणि संतोष अखण्डवेंकरून या आमच्या नष्टवैभव भरतभूमोवर वास करो अशी त्या सर्वेशाची आम्ही प्रार्थना करितों.

Address to those Natives of
Maharashtra who are engaged
in the service of
the State.

# महाराष्ट्र देशांतील कामदारांशीं संभाषण

पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत
छापिलें.

इसवी सन १८५३

शके १७७४

आवृत्ति तिसरी

किंमत आणे ३

# प्रस्तावना

ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति सत्वर विकली गेली. त्याजवरून तिची योग्यता व लोकांची परिक्षा सहज लक्ष्यांत येईल व आणखी गिराइकें आलीं. सबब पहिलेपेक्षां ग्रंथ सुधारुन ही तिसरी आवृत्ति छापिली.

ह्या ग्रंथाविषयी चांगलेपणाचे दाखले.

तारीख १६ जुलाई सन १८४८ चे ज्ञानोदय पत्रांत लिहिलें आहे कीं,–

हें पुस्तक पुण्यातील ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें त्यांत कामदारांनी लांच न घ्यावा. ह्या विषयी फार चांगला बोध केला आहे, आणि अशा करण्यानें सरकारवर व लोकांवर मोठे उपकार आहेत. लांच घेणे हा मोठा दोष आहे, आणि त्याच्या योगाने लोकांत मोठे अनर्थ घडले आहेत. तरी कामदार लोक निमित्तें सांगतात व रयतेला ही पाप थोडें दिसतें त्याविषयीं विस्तारें करून लिहून ते पाप उघड करणें जरूर आहे."

"ईश्वर झाडा घेईल. त्यापासून कांहीं अदृश्य नाहीं. तो लांच घेणाऱ्यांस शिक्षा देईल. इत्यादि बोध त्या ग्रंथात वारंवार केला आहे."

"हा बोध भारी वजनदार व ठसण्याजोगा आहे. आणि कामदार लोक त्या विषयीं विचार करून सावध होतील तर फार बरें. तसेच जे अधर्मी लोक आहेत ते ही हें वाचून डोळे उघडतील."

"हे पुस्तक सरकारनें घेऊन सर्व आपले कामदारांस दिल्हे असतां कदाचित त्यातील किती एक हा बोध वाचून लांच खाणें सोडतील."

एका सुज्ञ नेटीव गृहस्थाचा अभिप्राय.

"हे पुस्तक बहुत सुंदर आहे. येणेंकरून लोकांस फार लाभ आहेत. असें आमचे लोकांत बोध करणारे थोडे आहेत. परंतु ईश्वर कृपेनें वृद्धिपावोत."

मुक्काम बेळगांव

# महाराष्ट्र देशातील कामदारांशी संभाषण

अहो कामदार लोकानों ! तुम्हा सर्वांचें हिताकरितां मी भाषण करितों. हें तुम्हीं चित्त लावून ऐकावें.–

महाराज, तुम्ही कामामुळें आमचे लोकांमध्यें वजनदार आहां. म्हणून तुमची सुधारणा झाली असतां तुमचें हातून किती एक गोष्टी स्वदेश हिताच्या होतील. परंतु तुम्हांपैकी किती एक टपके येऊन बरतर्फ होतात, याचा मला फार खेद वाटतो. म्हणून मी अगत्य वादानें व अकृत्रिमपणानें तुम्हाला उपदेश करितों, हा तुम्हीं सर्वांनी मनांत बागवावा, अशी माझी विनंती आहे.

तुम्हांपैकी ज्यांचा बदलौकीक होतों तो बहुत करून लांच खाण्यामुळें होतो ह्याजकरितां मी याच विषयापासून तुम्हांशी बोलण्याचा क्रम आरंभितो.

प्रथम तुम्हीं असें समजा, कीं लांच खाणें आणि चोरी करणें ही कर्मे समान आहेत. चोरी वाईट हें तुम्हां सर्वांत समजतें. परंतु लाच्यार चोरीच्या इतकें दूषण या देशांतील लोक अद्यापि देत नाहींत कारण कीं, लांच खाण्याची चाल मामुल पासून हिकडे चाल आली आहे. त्याजकरितां हिचा विधी अथवा निषेध कोणांस ठाऊक नाहीं. तत्रापि मी जें म्हणतों त्या विषयी तुमची आंता खात्री करितो.

ज्या पदार्थावर दुसऱ्याचे हाक आहेत, ते पदार्थ आपण गुप्तपणानें अथवा जबरीनें बळकावणें यास चोरी म्हणतात. चोरास अधिकाराचें किंवा कामाचें बळ नसतें. म्हणून तो छपून आंगबळानें किंवा शस्त्राचे सहाय्याने लोकांचे घरांतील जिन्नस उचलतों. आणि लांच घेणारा हाही तुम्हीं कमी समजूं नका. त्याचें ही कर्म तसेंच आहे. त्याचे हातीं अधिकार असतो. तेंच त्याचें शस्त्र. आणि तेंच त्याचें बळ आहे. तेणें करून दुसऱ्याने श्रमसायास्ताने किंवा हक्कानें संपादिले तें द्रव्य तो हरण करितो. त्याचे हक्क दुसऱ्याच्या मिळकतीवर नाहींत तरी तो अमलाचे बळानें, "नावा करीन असे" भय दाखवून दुसऱ्यास आपली मिळकत दुःखें करून देण्यास आवश्यकता प्राप्त करितो. आणि त्या मिळकतीच्या उपयोग शास्त्र, न्याय व मालकाची इच्छा या व्यतिरिक्त करितो. तेव्हां लांच खाणाऱ्यास आणि चोरास काय अंतर?

तुम्हांस मी आणखी सांगतों कीं लाच खाणें चोरीपेक्षा ही नीच आहे. कारण कीं, चोरास उगीच सांगावयास तरी कांहीं निमित्त असतें; व कदाचीत दरिद्रामुळें गरज पडते, व आणखी चोरी करणार नाहीं म्हणून चोराचा पूर्वी करार कोणी घेतला नसतो. परंतु लांच खाणाऱ्यास किंचित निमित्त देखील सांगावयास नाहीं अधिकाऱ्याशिवाय लांच कोणीं कोणास देत नाहीं तर अधिकारी म्हणजें काय, तें ऐका :–

रयतेने आपल्या सुखाकरितां व संरक्षणाकरितां जें सरकार कबूल केलें, त्या सरकारचीं अंगें तुम्ही आहां. तुम्हांस रयतेचा ल्हान मोठा कारभार करण्यास वेतन देऊन मुकरर केलें आहे. जर रयत लोक आपसांत तंटा बखेडा करणार नाहीं, हें उघड आहे. परंतु लोक अधिकाऱ्यावांचून नीट नांदत नाहींत व संरक्षीले जात नाहींत, याजकरितां लोक भाकरी खातात आणि तांदूळ, गहूं हे तुमचे हवाली करितात. तुम्हीं नांगर न धरितां, पावसांत न जातां, व शेतांत न खपतां, आपले घरीं चैन करितां, तीं कशावर? रयतेच्या मेहनतीचे वेतनावर आहे कीं नाहीं? तेव्हां तुम्हास रयतेच्या मेहेनतीचा उत्तमांश सरकारने दिला आहे. हा कशाकरितां कीं, तुम्हांकडे हजारों लोंकांची कामें पडतात व लबाड लोक फार असतात. ते तुम्हास अन्याय करण्याकरितां मोठे बक्षीस देण्यास तयार होतील, परंतु ते तुम्हीं घेऊं नये. म्हणून सरकार तुम्हांस मोठ मोठी वेतनें देऊन खुशाल ठेवितें. आणि लोक म्हणतात कीं, "आम्हांपेक्षा त्यांनी श्रीमंती भोगिली तर पुरवली, पण हे काम निःपक्षपाताने करोत. वास्तवीक पाहिलें तर गरीब लोकांस लंगोटी आणि कोंड्याची भाकर पुरती मिळत नाहीं, आणि तुम्ही उंच उंच वस्त्रे नेसतां. बरें, तुम्ही कधी मागावर वस्त्रें स्वहस्तें काढिली आहेत? तुम्हीं सोन्याचे दागिने घालतां. बरें कधीं तुम्ही सोन्याच्या खाणी खणावयांस गेलेत आहां? तुम्ही लांकडें जाळतां. बरें, तुम्हीं मोळ्या डोक्यावर कधीं आणल्या आहेत? तुम्ही सुंदर भाज्या खातां. बरें तुम्ही कधीं मळ्याला पाणीं घालण्याकरितां मोट हांकिली आहां? गरीब लोकांच्या मेहनती पुढें तुमची मेहनत कांहीं नाही. तत्रापि तुमच्या घरीं रुपयांच्या थैल्या, दाण्यांच्या ठिक्या आणि कापडांचे गठ्ठे येऊन पडतात. तेव्हां तुमच्या मनांत असा विवेक यावा, कीं ही संपत्ति आपच्या घरीं कोठून आली? कोणी आणिली?

लोक तुम्हांस आपले सुखाचा मोठा हिःसा अर्पण करितात, हा फक्त तुमच्याकडे अधिकार आहे तो नीट चांगले रीतीनें तुम्ही चालवावा म्हणून देतात. आपण मेहेनत करितो म्हणून सुखास पात्र आहों, असें तुम्हीं समजूं नका. तुमच्यापेक्षां आंग मेहेनत उन्हांत, थंडीत, करणारे पुष्कळ आहेत. परंतु त्यांस कांही मिळत नाही. तुमची बुद्धी युयंत्र असावी, तुम्हीं काम रीतीनें करावें, लोकांचे कल्याणाचे चिंतन करावें, लोकांचे अबादी करितां श्रम सायास करावे, तुम्हांस कोणी दुसऱ्याचा घात करण्याकरितां द्रव्य दाखवून भुरळें घालील, तर तें द्रव्य तुम्ही स्वीकारूं नये व तुमच्याकडे मोठीं जबाबदारीचीं कामें आहेत. त्यांत तुम्हीं धर्म उल्लंघन करु नये, हे तुम्हांस जरुर आहे. कारण कीं, जे तुम्हीं खातां पितां ते सर्व रयतेचे उधार घेतां. त्याची फेड कामबरोबर केल्याशिवाय व्हावयाची नाहीं. ह्याप्रमाणें तुम्हीं अधिकारी म्हणजे सर्वांचे कर्जदार आहां.

लांच खाणें हा विश्वासघात आहे. कारण, लोक व सरकार तुम्हांवर असा भरंवसा ठेवितात की, तुम्हीं आपलें काम नीट चालवाल म्हणून तुम्हांस इतर रयतेहून आबादान ठेवितात व तुमच्या वर्तणुकेची प्रतिबंध करण्याकरितां तुम्हांपासून शपथा घेतात व न घेतल्या तरी तुम्हीं काम पत्करलें म्हणजे शपथे प्रमाणेंच झालें. तुम्हीं कामावर बसलांत म्हणजे सर्व गरीब व श्रीमंत अशी उमेद बाळगतात कीं, तुम्हीं नीट वागाल. आणि अशा संपूर्ण लोकांच्या भरंवशांत जर तुम्हीं प्रतारणा कराल, तर मोठा विश्वासघात होईल.

तुम्हीं रयतेचे ऋणी आहांत, ह्याकरितां त्यांचें कर्ज फेडाल तर चांगले. गाडीचे उरीं फुटलेले घोडे आणि कृश झालेले बैल पाठीवर भार घेत चालतात. ते आणि मोळीवाले, ज्यांच्या डोक्यावर मोळ्या, पायास नारू सारखा रोग, परंतु तसेच उन्हांत तृषाक्रांत होऊन चालले असतात. असे जीव जेव्हां मी पाहतों तेव्हां मला वाटतें कीं, हे आतां असे दिसतात, परंतु हे पूर्व जन्मी मोठे प्रधान, मंत्री, मुनसफ, मुत्सद्दी, राव किंवा पंत होते. परंतु रयतेचे कर्ज त्यानीं नीट फेडलें नाहीं, म्हणून हे त्या जन्मी कष्ट भोगी आहेत. त्याकरितां तुम्ही आपल्यापेक्षा गरीब लोक ह्यांस

पाहून सावध व्हा. जर तुम्हीं ह्या जन्मी कसर केली तर पुढें कधीं तरी तुम्हांस कोणत्याही तऱ्हेने फेडले पाहिजे. ईश्वर तुम्हांस मुक्त खाऊ देणार नाहीं.

तुम्हांस वाटत असेल कीं संसार करणें आणि कामें अधिकाराचीं करणें हे मुळींच पाप आहे, तेव्हां आणखी ह्यांत पाप केलें तर चिंता नाहीं. परंतु तसें नाहीं, जर त्याच ठिकाणी चांगले वागाल तर तुम्हांस सग्दति आहे व संसारातच तुम्हांस ब्रह्मचर्य सन्यास, इत्यादिक पुण्यें समजतात, त्यांचीं फळें मिळतील पण तुम्हांस सन्मार्गी वागलें पाहिजे. भारतांत दानधर्म सांगितला आहे व नाना प्रकारची दानें सांगून शेवटी असें तात्पर्य सांगितलें आहे की, अभयदान सर्वाहून श्रेष्ठ, आणि सर्व दानाचे पुण्य अभयदानाचें कोटावें हिःशाशी देखील तुल्य नाहीं. आता पहा कीं, हे अभय-दान करण्यास तुम्हीं योग्य आहां तुम्हांस कोणी विनाकारण भिऊं नये असे करा. लोकांनी न्यायाला भ्यावे; परंतु अधिकाराला भिऊं नये.

वाईट कर्म बहुधा प्रकट होतें, परंतु न झालें तर ईश्वर सर्वाचा झाडा घेईल. त्या लोकी ईश्वर जरी पापिष्टाचें शासन करण्याकरितां हमेषा प्रगट होत नाहीं तरीं मरणानंतर न्याय कोणास चुकणार नाहीं. मनुष्याने डोळे चुकवून फळ काय ? चुकवाल तर ह्या दोषाचे आणि त्या दोषाचे दुहेरी शासन तुम्हांस परमेश्वर करील. ह्याकरितां ईश्वर भजनाहून कनिष्ट धर्म कामदारांस प्रजेचे कल्याणाखेरीज दुसरा नाहीं.

जें काम तुम्ही पत्करलें आहे, त्याची हयगय करुन पूजा अर्चा जरी तुम्हीं पुष्कळ केली, तरी त्यांत तरणोपाय नाहीं. ईश्वरास संतुष्ट करण्याचें तुमच्या मनांत असेल तर त्याणे निर्माण केलेले जीव ह्यांस संतुष्ट करा. पेशव्यांचे न्यायधीश रामशास्त्री हे माधवराव पेशवे ह्यांस काय बोलले ते ते तुम्हांस सांगतो. स्नानसंध्या करीत असून मौन धरुन श्रीमंत बसले होते, हें पाहून रामशास्त्री यांस संताप आला. आणि काशीस जाण्याचा निरोप मागितला. आणि सांगितलें कीं, "तुम्ही जरी ब्राह्मण खरे तरी राज्य पत्करलें. आता स्नानसंध्या कमी करावी. तें न करुन सर्व कारभार सोडून घरात बसतां तस्मात् तुम्ही अधर्मकरितां आतां तुमच्या राज्यात राहण्याची इच्छा चव नाहीं." तेव्हां श्रीमंतांनी स्नानसंध्येचा संक्षेप केला.

लांच खाणें चोरीहून अधिक आहे. कारण कीं, चोरास कोणी सावध राहून धरील. परंतु लांच घेणारास काय करावे ? उघडे दिवसात ही लूट होते ह्यास्तव लोक लाचार होतात.

"आमचा पगार थोडा कुटुंब मोठे, भाऊबंध, बायका, पोरे, ह्यांचा निर्वाह कसा चालतो ?" असें जर कोणी म्हणतील तर तें ठीक नाहीं. कारण कीं, एकादा व्यापारी आहे. (सगळेच कामदार नसतात.) आणि त्यांस खर्चापुरता नफा न मिळेल तर त्यानें चोरी करावी कीं काय ? नाहीं त्यास उपाय इतकाच कीं, त्याने दुसरा उद्योग करावा. आपले भाऊबंधांस, मुलांबायकांस, विद्या शिकवून त्याजकडून कांही उद्योग करवावा म्हणजे आपले ओझे कमी होईल. विचार कराल तर उद्योग पुष्कळ निघतील. परंतु लबाडीनें चार दिवस पोट भरा आणि ज्या दिवशी लबाडी प्रकट होईल त्या दिवशीं सगळीं गेली आणि अर्धी गेली, असें होईल. हा बेशरमपणा चांगला नाही.

"आमचे घरी भट भिक्षुक वगैरे येतात, त्यांस लौकिकाप्रमाणें दिलें पाहिजे. त्यास पैका कोठून आणावा असें म्हणाल तर हे योग्य नाहीं. दान धर्म ईश्वराच्या येथे मान्य व्हावा म्हणून करावयाचा. लौकिकाकरितां शुद्ध द्रव्याचा व्यय थोडा केला तरी श्रेयस्कर आहे. गरीबास दोन पैसे दिले तर धन्य काळ व त्याचें ईश्वर फळ देईल. आणि अन्याय करुन चोरीचें द्रव्य पुष्कळ मिळविलें आणि धर्म केला तर तो प्रतिबंधास मात्र कारण होईल.

तुम्हीं म्हणाल कीं, "आम्हांस लग्नें मुंजी कर्तव्य आहेत, त्यांस लौकिकाप्रमाणे खर्च न करावा तर सर्व हंसतील. आणि वेतनाची तर कांहीं शिल्लक राहात नाहीं तेव्हां आवांतर पैसा मिळविल्या खेरीज कसें चालेल ?" तर लग्नें व कार्यें श्रीमंतांचे पाठीमागें सांप्रत काळाप्रमाणें ही मोठी

व्याधि आहे खरी. परंतु मी तुम्हांस सांगतो, कीं पैसा फार खर्च करण्यात कांहीं घनत्व नाहीं व तुमचीं मुलें सुखी होतात असें ही नाही. ह्यापेक्षां मुलांस विद्या शिकवाल तर बरें होईल. तुमचे आदळांत अशी किती एक मुलें नाहींत, कीं, ज्यांचे लग्नास हजारों रुपये लागले, पण आतां ते चिंध्यां लावितात व मिळविण्याची शक्ती ही नाहीं. हे कशाने झालें? त्यांचे आईबापांनी विचार केला नाहीं. ह्याजकरितां मिळकती अन्वयें खर्च करावा, हेंच चांगलें. डामडौलात काहीं अर्थ नाहीं. तुम्ही थोडा पैसा जरी महिन्याचे काठी संचय करीत जाल, तरी तुम्हास म्हातारपणी दधात न राहून सुखी राहाल.

तुम्ही म्हणाल कीं, "पैसा खाल्ला तर आमची प्रतिष्ठा वाढते असें मुकरर नाहीं, व न खाल्ला तर अप्रतिष्ठा होतें हेंही मुकरर नाहीं, मग कां न खावा? ह्याचें उत्तर ऐका, पैसा खाल्ला तर तुमची लोकांत फजीती होते. ह्यांत संशय नाही. प्रारब्धवशांत लोकांचे मूर्खपणानें सरकारांत कदाचित न होऊ पण तुमची प्रतिष्ठा वाढविणे हें तुमचे हातीं आहे. तुमच्यातलें लांच न खाणारे यांची इज्जत वाढत नाही, असे नाही. परंतु जरी तुम्ही असें म्हणाल, तरी मी त्याविषयी समजूत घालतो. सरकार अंतर्यामीचें जाणत नाहीं. तुमच्याच सारखे सरकारचे डोळे आहेत. तुमच्यांतून एकानें लांच खाल्ली, किंवा गैरचाल केली, म्हणजे तुम्हांस काळिमा लागतें आणि सर्वांवरचा विश्वास जातो. चांगल्या वाईटाची निवड होत नाही. एक गोष्ट अशी आहे की, वाईस एक ब्राह्मणाचा मुलगा पाण्यांत पोहावयास गेला म्हणजे "बुडलो, बुडलो" म्हणून ओरडे. एके दिवशी तो वास्तवीकच बुडूं लागला. तेव्हां ओरडू लागला; पण कडेवरचे लोक रोजच्या गतीवर गेले आणि उगेच राहिले. शेवटीं तो मेला. ह्याचे तात्पर्य असे कीं, नेहमी तो खोटी गोष्ट बोलत असे. म्हणून त्याचें खरें ओरडणें ही खोटेंच झालें. आणि कडेवरचे लोकांस त्याचा निर्णय करितां आला नाहीं हा दोष कोणाचा? विचार करा. तुमचे गुण दोषांचा ईश्वराचे येथे बिनचूक निवाडा होईल. परंतु येथें माणसांमध्यें निवड व्हावी, अशी जर तुमची इच्छा असेल तर तुम्हां सर्वांस नीट वागले पाहिजें. म्हणजे भरंवसा पटून सर्वांची अब्रु वाढेल. ह्याकरितां तो तुम्हांमध्ये लाच खाणारा किंवा प्रतरणा करणारा असेल त्यास तुम्ही सर्वजण शत्रु समजा. अशा लबाडाचे हातून तुम्हां सर्वांचा नाश होतो. ह्याकरितां तशा मनुष्यास पहिल्यानें सुधार बुद्धिवाद करून पाहा, नच ऐके तर शेवटचा उपाय, शासन करणें प्राप्त.

तुम्ही म्हणाल कीं, "लोकांची घरें बुडवून पैसा मिळविला खेरीज श्रीमंत होत नाही," तर ही गोष्ट आपल्या लोकांमध्ये खरी आहे. परंतु ही उपयोगी नाहीं. असे जे श्रीमंत होतात, ते मूर्ख व दुष्ट जाणावे. श्रीमंत होण्याचे मार्ग बहुत आहेत. पहिले, राज्य वाईट होतें, म्हणून ते बहुधा वेतन कमी देऊन सर्वांकडून लांच खाववीत. म्हणून ही समजूत पडली आहे. व्यापार व रोजगार चांगले रीतीचे व श्रीमंत होण्याजोगे बहुत आहेत. परंतु ते तुम्हांस अश्रुत आहेत, विचार केला तर कळतील.

तुम्हांपैकी जे इंग्रज सरकारचे पदरी आहेत, त्यांजकडे लहान अधिकार आहेत, ह्याकरिता मोठा कामें मिळविण्याची तुम्हांस उमेद असावी. इंग्रज सरकारचें राज्य वाढत चाललें आहे. ह्याकरिता स्वदेशीय लोकांकडे मोठे अधिकार येतील, तर कल्याण होईल तुम्हीं मोठीं कामें करण्यांस लायक आहां, अशी सर्वांची खात्री करा. अजून तर तुम्हास कोणी इंग्रजापेक्षा चांगले कामदार असें म्हणतानां मी कधी कोणास ऐकिलें नाहीं. ह्यामुळें लाभदायक मिळकतीची कामें सर्व इंग्रजाकडे राहून तुमचे लोकांचे ऐश्वर्य कधी वाढणार नाहीं. ह्यास्तव पुढे मोठे आशेवर नजर ठेवून आपली वर्तणूक सुधारा. म्हणजे तुमचा दावा व हक्क मोठे अब्रुवर होईल. तुम्ही तजवीज करा कीं, आपण स्वतः व ह्या देशातील सर्व लोक ह्यांनी इंग्रजासारखे गुणी, विद्वान, माहितगार व लायक व्हावे. तुम्हीं ह्या देशाचे लोकांमध्ये पुढारी आहां म्हणून हें काम तुम्ही

डोईवर घेतलें असतां होईल. आणि फार आवश्यक ही आहे. आधी योग्य व्हा. मग मागा, म्हणजे ईश्वरही मदत करील.

तुम्हीं म्हणाल कीं, आजपर्यंत हिकडील लोकांनी राज्य राज्यं केलें की नाही? परंतु आजपर्यंत केलें त्याचे कारण असें आहे की, इंग्रजासारखे शहाणे लोक हिकडे आले नव्हते म्हणून केलें. दुष्काळात कोंडा खातात की नाही? आज रयतेस इंग्रज जितके मान्य आहेत तितके तुम्ही नाही. ह्याचे कारण ते लोक निर्मळ आहेत व डौली आणि लोभी नाहींत. ह्या गुणांनी त्यांणीं हिकडे सुलभतेने राज्य मिळविले. तुम्ही इतके करा की, आज जिल्ह्याचे ज्यडज्याचें काम जर तुमच्यांतून कोणाकडे सांगितले, तर रयत लोक कोणी खुशी होणार नाहींत. कारण कीं, अदालत न्यायाचे घर आहे. तें मोडून तुम्हांमुळे लिलावांचे घर होईल, असे सर्व लोक म्हणतात की नाही, ह्याचा विचार करा.

तुम्हांस असें वाटेल कीं, मागें नाना फडणविसारखे लांच उघड खात होते; परंतु हे कारण योग्य नाही. अमक्याने केले, म्हणून मी करितों असे म्हणणें हा मूर्खपणा आहे. पूर्वीचे राज्यांत लोकांत खाण्यापिण्याची सोय आताच्यापेक्षा बरी होती. म्हणून त्या राज्यांस चांगली म्हणतात, परंतु तेव्हां शहाणपणा, कायदा, कानू, बंदोबस्त, वगैरे नव्हती. जबरी, मारामारी, लुटालुट, नित्य घडत होती. नाना फडणनीस देखील इंग्रजांचा बंदोबस्त व कायदा चांगला म्हणून वर्णन करित होते. चांगले राज्यांत लांच अवश्य बंद झाली पाहिजे. अशी बंदी सर्वत्र चांगले राज्यांत आहे, हें शोधाअंती कळेल.

लोकांस सुख व्हावें, म्हणून सरकार आहे. सरकारनें केल्याविना लोकांस सुख होत नाहीं. व ज्यांचे हाती कायदा चालवावयाकरितां दिला आहे, त्यांनी तो नीट चालविल्यावाचून कायद्याचा उपयोग नाही व कायद्याप्रमाणे वर्तणूक होण्याकरितां लांच बंद केल्याशिवाय परिणाम नाही. जी राज्ये अडाणी लोकांचे हाती असतात व जी राज्ये नुकतीच उभी राहिली असतात त्यांत लोक शाहणें व जाणते नसून कायदा कानूचा बंदोबस्त नसतो; परंतु तो कांही कित्ता होत नाही. ज्यांनी फार दिवस राज्ये करून विचार फार केला आहे त्यांचे अनुभवावरून समजतें की, कायदा जरुर आहे व जर कायदा राज्यास नको तर मागें मन्वादिकांनी धर्मशास्त्रे कशाला लिहिली असती, ह्याचा विचार करावा.

लांच घेण्याने अन्याय होतो. किती एकांस असें वाटते कीं, खऱ्यातर्फेने लांच खाल्ली तर दोष नाही, परंतु हे बरोबर नाही. लांच कोणी संतोषाने देत नाही. तुम्ही असा विचार करा, की जर तुम्ही कामावर नसतां तर तुमच्या घरी कोणी पैसा घेऊन येतात काय? ह्याकरितां तुम्हाला अधिकारासंबंधे नेमलेल्या वेतनाशिवाय जें काहीं कोणीं देतो, ती सर्व लांच आहे. तुम्हीं अधिकारावर असून तुम्हांस द्यावयाजोगा जो पदार्थ असेल तो मात्र लांच नव्हे.

किती एक लोक कामावर बसले म्हणजे लांच घेऊ नये, असा प्रथम संकल्प करितात. मग चार लबाडलोंक येऊं लागून कोणाच्या तरी प्रकारानें फसवितात मग एकदा सवय लागली म्हणजे सुटत नाही व न्यायाची दृष्टी जाते.

पैसा मिळूं लागला म्हणजे खर्च वाढतो. मग अन्यायानें पैका मिळवावा असे वाटतें. परंतु मुळींच सावधगिरी ठेंवावी हें चांगलें, लबाडाजवळ उभे राहूं नये. कारण की, द्रव्य मिळविले तें लोक खाऊन जातात आणि पाप एकाच्या डोकीवर बसतें.

लांच घेणें हे हलकें काम आहे. कारण कीं हें काम जुलमाचें आहे व गरीब लोकांपासून अमलाच्या बळानें द्रव्य घेणें हे फार नीच काम आहें. जो लांच देतो; तो आर्जवाने तोंडावर मात्र बोलतो, परंतु उमऱ्याबाहेर त्याचें पाऊल पडलें, म्हणजे सर्व गावांत दांडोरा पिटतो. कारण कीं, ज्याचा गळा धरून पैसा घेतला त्याचें सुख त्यास वाटत नसतें. अत्यंत गरजेमुळे मात्र तो पैसा देतो.

किती एक लोक म्हणतात, की "आम्ही खुषीनें पैसा देतो. ह्याविषयी तुम्ही कांही मनांत न आणितां घ्यां." परंतु हे बोलणे व्यर्थ आहें. चोराच्या हद्दीत जो सापडतो तो आपले सुटकेकरिता त्याचे आर्जव करितो. तद्नुसार हें आहे.

तुम्हांस वाटत असेल कीं, द्रव्यवान लोक मूर्ख आहेत, त्यांजपासून यत्किंचित द्रव्य घेतलें, म्हणून त्याचें नुकसान विशेष होत नाही. तर ह्याचें उत्तर ऐका. कितीही द्रव्यवान मनुष्य असला तरी त्यावर कोणाचा हक्क नाहीं. ह्याकरिता श्रीमंत लोक मूर्ख असतील तर त्यास सुधारा. त्यांस वाटेवर आणा. परंतु त्याचा मालाचा अभिलाष करुं नका आणि जो जो श्रीमंताशी तुम्हीं निर्लोभाने वागाला; तर तों तों तुमचा लौकिक वाढेल.

चांगली कीर्ति लोकांत वास्तवीक मान मान्यतेचे कारण आहे. सत्कीर्तिस कोणी चोरीत नाहीं ती फार दिवस राहते व ती परलोकांचे साधन आहे. सत्कीर्ति तुमची स्वतंत्र संपदा आहे. तिची वाटणी कोणी भाऊ-बंद घेत नाहींत. तुमच्या नांवाबरोबर ती राहील.

मनुष्यांच्या चुका क्षमेस पात्र आहेत आणि समजून अपराध केलेले शासनास पात्र आहेत. तुमचें अंतःकरण निर्मळ असेल म्हणजे त्या निर्मळपणाखाली तुमच्या बाहत्तर खोडी झाकल्या जातील.

वाईट काम करणाऱ्याला वास्तवीक पाहिलें तर सुख ही नाहीं. त्याला दिवसास भय व रात्री उचकाच असतो. सकाळी उठला म्हणजे त्याला वाटते कीं, आज माझी अब्रू कोणी घेईल कीं काय ? हा त्याला निजध्यास असतो. त्याला स्वस्थ झोंप येत नाहीं हीं मनुष्यांमध्ये त्याची अवस्था. मग मरण समयीं त्यास केवढी वाटत असेल ! त्याला सुखें करून मरण येणार नाही. जों जों त्याला वाटतें कीं, मी ईश्वरापाशी जाईन. तों तों जसा चोर कोतवालाकडे जाण्यास भितो तशी त्याची अवस्था होते.

चांगले कामदाराच्या दोन गोष्टी तुम्हांस सांगतो. मागें पुण्यात रामशास्त्री होते. त्यांजकडे दक्षणेचा अधिकार होता. त्यांचा एक बंधू मूढ होता. तो दक्षणा घ्यावयास आला तेव्हां नाना फडणीस ह्यांनी शास्त्री बाबांकडे पाहिले. कारण कीं, तो त्यांचा बंधु तेव्हां त्यास कमी दक्षणा देणें अवघड. परंतु शास्त्री बाबा महान न्यायीं. त्यांनीं लागलेंच सांगितले कीं "याची दोन रुपयांची योग्यता आहे. त्यास अधिक देऊ नका" याचें कारण काय ? कीं, ज्या नियमाप्रमाणे दक्षणा देण्यास सांगितले त्याचे उल्लंघन न व्हावे, हा त्यांचा मनोदय. दुसरे वाशिंगटन साहेब अमेरिकेंत मोठा अधिकार होता. त्याचे हातांत एक जागा द्यावयाची आली. तेव्हां त्याचा परममित्र एक ग्रहस्थ होता. त्यानें अर्जी लिहून जागा मागण्यांकरिता गेला. तों तेथे त्याच्याहून अधिक लायकीचे उमेदवार अर्जी घेऊन आले होते. परंतु त्या गृहस्थाचें मनात असा भरंवसा होता कीं, माझें स्नेहीपणावर काम होईल. परंतु त्या साहेबानें आपले मित्रांस सांगितले की, "बाबा, तुझा माझा स्नेह आहे खरा. परंतु मी आतां अधिकारावर बसलों आहे. त्यासंमयी तुझ्या स्नेहाकरितां तुझ्याहून शाहाण्या उमेदवाराची निराशा करावी, हे मला उचित नाहीं, व ह्यात लोकांचेंही नुकसान आहे. ह्याकरितां अमका मनुष्य सर्वाहून शहाणा माझ्या नजरेस येतो, त्यास मी जागा देतों. हे ऐकून हा पुरुष न्यायीं आहे आहे असें समजून तो त्याच्या कीर्तीचे वर्णन करीत गेला. त्यानें कांही मनांत वाईट आणलेले नाही.

तुमच धर्म असा आहे कीं जीं कामें तुझ्याकडे आहेत ती निर्मळपणाने करून त्याशिवाय लोकांत ज्ञानवृद्धि वगैरे हित करण्यास झटावें. परंतु हा तुमचा धर्म तुम्हास कळण्यास तुम्हीं स्वतः प्रथम ज्ञानी व विचारशील झालें पाहिजे, म्हणजे तुमची सांप्रतची अज्ञान दृष्टीं जाऊन लोकांस सुख करण्याचा राजमार्ग तुम्हांस दृश्य होईल. सांप्रत तुम्ही स्वतः अडाणी आहां. मग तुम्हांस लोकांचा मूर्खपणा आहे अथवा नाही हे कशाने कळेल ? व तुम्हांकडून प्रयत्न कोठून होणार ? व आमचा अभिप्राय तुमच्या ध्यानांत कसा येईल ? आंधळ्यापुढे मशाल असलीं तर उपयोग पडणार नाहीं.

तुम्हीं आळस वृत्ति सोडा. इंग्रजांनी तुम्हांस जागें केल्याशिवाय तुम्ही जागे होत नाहीं, हें ठीक नाहीं, हल्लीं इंग्रज तुमच्याकडून काम बलात्कारानें करवितात व कायदा वाचवितात. जर तुम्हांकडे मुखत्यारी असेल तर तुम्ही बाहेर आग आगली, असें कळलें तर जाग्यावरून उठणार नाहीं. यास्तव तुम्ही स्वतः आटोप धरला पाहिजे. काम आणि अधिकार हीं ओझीं आहेत, लाभ नव्हेत. परंतु बहुतजण उलटें समजतात. आणि सामर्थ्य नसलें तरी काम सोडीत नाहीत. शेवटीं सरकारांतून जा म्हणतात. ह्यात काय शोभा? ह्यास्तव असा दुर्लोभ धरु नये. डोळे, कान, हात गेलें तरीं तुमची कामावरची आशा राहते. व भिडेंने व साहेबाच्या कृपेनें काम लोटितां. जर तुम्हीं काम हें श्रमदायक ओझें समजाल तर हा मूर्खपणा तुम्हीं कदापि करणार नाहीं.

लोक सांप्रत राज्याविषयी फार बोभाट करितात. न्याय बरोबर होत नाही व अन्याय होऊन लोकांची घरें बुडतात व लोक भिकारी होतात. असे गिल्हे फार आहेत परंतु ह्याचें कारण निमें तुम्हीच आहां. जर तुम्ही लोकांची काळजी कराल तर बहुतेक अनर्थ चुकतील.

अन्यायानें पैसा मिळविला असतां. त्याचा उपभोग होतो असा नियम नाहीं. मरण आज येईल किंवा उद्या येईल हें सांगवत नाही. परंतु जरी अशास्त्र सुख भोगावयास प्राणी जगला, तरी आयुष्य फार अल्प आहे. तरी ह्या अल्प भोगार्थ शाश्वत सुखाची हानि कां करावी? जे पुढला विचार करीत नाहीत त्यांची दशा फार वाईट होते. ह्याचा दाखला तुम्हीं ह्या जागांत घ्या. किती एक लोक पहिल्यानें श्रीमंत असून सर्व पैसा खर्च करितात आणि वृद्धापकालीं दुर्दशा भोगितात. जे ह्या जन्मी विचार पाहात नाहींत त्यांची तीच अवस्था आहे.

लाचेच्या दोषांची कारणे तीन आहेत. प्रथम लोकांचा मूर्खपणा हेंच कामदारास चटक लावितात. ते लांच देणे हा गुन्हा समजत नाहींत. दुसरें दुराचारी, दुर्जन व मूर्ख कामदार लांच घेतात. तिसरें साहेब लोक वगैरे अज्ञान असतात. त्यांस कोणाला अधिकारावर नेमावें कळत नाही व स्वतः कामही करतां येत नाही परंतु त्याहीमध्ये दुसरें कारण तुमच्या ठायी आहे तें प्रमुख अधिकार प्राप्त होत्सातां जे दुसऱ्यास नेंमितात. ते स्वतः जरी गैरमाहीत असले तरी त्यांचे अज्ञानाचा लाभ मानूं नये. आपण जरी अयोग्य असलों तरी योग्यता मिळविण्याचा प्रयत्न करावा. दागिन्यांसुद्धा लहान मुलें जर कोणाचे हातीं सापडलीं तर त्याच्यानें चोराचा प्रतिकार करवणार नाही. आणि जो चोरतो त्या चोराचा दोष इतर चोरांहून अधिक आहे. कारण कीं, त्याने न जाणत्यास ठकविलें. तद्वत अडाणी लोकांत अधिकार प्राप्त झाला, तरी त्यांचे कल्याणावर दृष्टी ठेवावी. अशक्त व अडाणी म्हणून लुटूं नये. तसेच यजमान मूर्ख किंवा भरवंसा ठेवणारा असला तर त्यासही फसवूं नये.

लाचेंविषयी मी तुम्हांशी पुष्कळ बोलिलो. ह्यावरून तुमचा संदेह फिटला असेलच. परंतु आणखी तात्पर्याच्या दोन गोष्टी सांगतो त्याही ऐकून घ्या.

अधिकार आला म्हणून गर्व करुं नये. लुच्चे व आर्जवी लोकांस जवळ उभे करुं नये. डौलाकरिता शिपाई प्यादे व चपराशी ह्यांस पुढे पळवूं नये. अधिकार नीट चालविण्यास जे जरूर आहेत, तितक्याच माणसांस श्रम द्यावे. लीनता धरावी. जे येतील त्यांशी आदरें करून बोलावें. अधिकाराने फुगूं नये. तुम्ही रोजगारावर आहां म्हणून उथळेपणा, डामडौल व लबाडी करुं नका. कारण कीं, रोजगार गेल्यावर एकदा सवय पडली असेल, ती सोडण्यास कठीण पडेल, आणि शिपायाशिवाय फिरण्याची लाज वाटूं लागेल. ह्याजकरिता मुळींच ही संवय केली नाही तर चाकरी सोडण्याचे व गेल्याचें दुःख वाटणार नाही. ज्या कामाबद्दल तुम्ही पगार खातां, ते काम नीट सांभाळून करा. त्याखेरीज दुसरी कामें लोकाचे कल्याणाकरितां बिनपगारी कोणी तुम्हांस सांगितली, तरी ती हौसेनें करा. केवळ द्रव्य मिळेल तर काम करुं. नाहीं तर जाग्यावरून हालणार नाही. असा हलकेपणा व भाडेकरी-पणा करू नका. बरें, तुम्ही व्यर्थ कामास थोडे फिरतां? तोच

वेळ ज्ञान संपादनाकडे लावा. वर्तमानपत्रें फार उपयोगी आहेत. तेणेंकरून तुम्हांस शहाणपणा येईल, ती व पुस्तकें चित्त लावून वाचीत जा. विद्येविषयी लाज नसावी. तुम्हां किती एकांस विद्या येत नाही व विद्येचे लक्षणही ठाऊक नाहीं. ह्यास्तव विद्वान होण्याची इच्छा असूं द्या. मागें लोक अविद्वान असतां श्रीमंत होते, मग आम्ही विद्या कशास करावी, ही समजूत वेडेपणाची आहे विद्या द्रव्याकरितांच आहे, असें नाहीं. छापखान्याचे लाभ तुम्हांस ठाऊक नाहींत. म्हणून तुम्ही त्याची हयगय व हेळणाकरितां हे तर उघड आहे. तुमचे देशांतील लोक अज्ञानी बहुत आहेत. त्यांचा श्रम जाऊन भानावर येत अशी तजवीज करा. आणि हें तुम्हीं सर्वांनीं केलें तर सांप्रत होत आहे, त्यापेक्षा सत्वर होईल, कारण कीं, तुमचे वज्जन लोकांमध्यें आहे. ते व्यर्थ किंवा वाईट कामांत खर्च करू नका. तुम्ही मोठाले गोष्टींचा विचार करा. हलकेपणांत व क्षुल्लक गोष्टीत चित्त घालणें सोडून द्या. सारांश तुम्ही आहांत त्याहून सुधरून चांगले व शाहणे व्हावे, तुम्हांस किती एक गोष्टी ठाऊक नाहींत. त्या कळाव्या आणि तुम्ही ईश्वर निर्मित प्राणी सत्य, दया, न्याय इत्यादि सग्दुणे करून सुशोभाय मान होत्सातां, तुम्हांस मृत्यू लोकीं सुख आणि सत्कीर्ति आणि पश्चात वैकुंठ प्राप्त व्हावा अशी माझी पूर्ण आशा आहे. आणि सद्नुसार श्री हरी तुम्हांस जन्माचे साफल्य करण्याकरितां सबुद्धि देवो, ही माझी सप्रेम प्रार्थना आहे.

लोकहितवादी

(चवथ्या मलपृष्ठावरील प्रासिद्धिक)

विकावयाचे ग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| ०-६ | खोटी शपथ वाहू नये, ह्याविषयी | ०-६ | भरतखंडपर्व... |
| ०-६ | शब्दा लंकार... | १ | पंचोपाख्यान... |
| ०-१ | यंत्रज्ञान... | ०-६ | साहेबलोकांशी संभाषण... |
| ०-६ | गुलिस्ताचा ८ भाग... | ०-६ | अंकलिपी... |
| ०-६ | मायन्याचे बूक | ०-६ | गायन प्रकाश... |

Address to the English Gentlemen in India either engaged in the service of Government or in the walks of Private Life.

# सरकारचे चाकर आणि सुखवस्तू हिंदुस्थानांतील साहेब लोकांशी संभाषण

ज्ञानप्रकाश छापखान्यांत

पुणें येथें

कृष्णाजी त्र्यंबक रानडे

याणी छापिलें.

सन १८५०

किंमत आणे ४

# इंग्रज लोकांशी संभाषण

अहो इंग्रज लोकानो तुम्ही या हिंदुस्थान देशांत फार लांबून आलेत आहा आणि तुमचा बाळपणा व वृद्धापकाळ या देशांत जात नाहीं व तुमचें शेतपोत घर वाडी इकडे नाहीं. तुमचें येणे फक्त रोजगाराकरिता होतें व तुम्ही किती येकजण व्यापाराकरितां व किती येकजण सरकारचे पदरीं अमलदारीची कामें मोठी मोठी, गांव खात्यांत व लष्करी खात्यांत वगैरे आहेत तीं करण्याकरिता होतें. यांजकरिता तुमच्यांतून जे अमलदाराचीं कामे करणारे आहे त्यांत कांही चांगल्या गोष्टी सुचवाव्या असें माझे मनांत आहे. येणेकरून तुमचा व या देशातील लोकांचा फायदा होईल अशी माझी आशा आहे.

तुमच्या देशांत रयतेचे अधिकार मोठे आहेत असें मला ऐकीव माहीत आहे यास्तव मी तुम्हास बोध करण्यास इच्छितो हे तुम्ही चांगले मानून मी लिहितो त्याप्रमाणे कांहीं व्यंग तुमचे वहिवाटीत असेल तें पूर्ण करून मोठा उपयोग या बोधाचा कराल ही खात्री आहे.

तुम्ही कांही देव (अमानुष सत्ताधारी) नाहींत. माणसें आहात व तुम्हामध्यें रागीट, गर्विष्ट, छळक, दीर्घद्वेषी, वंचक इतर लोकांसारखे नाहींत असे नाही. हे दुर्गुण सर्वत्रात आहेत याजकरिता तुम्हा मध्यें व्यंगे नाहीत असे म्हणवत नाहीं. सर्वांमध्यें व्यंगे आहे परंतु तीं जाणून किती येक लोक शाहणे असतात ते पूर्ण करण्याची इच्छा बाळगतात यास्तव तुम्हांसारखे सुज्ञजनास बोध सर्वदा मान्य असतो यांत काय संशय ?

ज्या मनुष्याचा संपूर्णजन्म बाल्य, तारुण्य आणि वार्धिकी या तिन्ही अवस्था ज्याच्या येका देशात गुजरल्या त्यास या देशाची पक्की माहिती नाहीं यांत संशय नाहीं हे येक तुमच्या व्यंगोक्तीचे कारण आहे. परंतु तुमच्यामध्यें कितीयेक विशेष गुण आहेत त्याचेंहि कारण माहितीच आहे. तथापि तुम्ही आपल्यास अधीक माहीतगारी करून घेतली तर तुमचे गुणांस कमी न होतां तुमच्या व्यंगोक्ती मात्र जातील हें खचीत आहे.

तुमचे गुण वरती लिहिले आहेत ते कोणचे म्हणाल तर तुम्ही इकडील देशचे लोकांपेक्षां हजार पट शाहणे, नीतीवान, मेहेनती, लीन, गरीबास दाद देण्याविषयी दक्ष, विचारी, निर्लोभी, न्यायामध्यें निर्भीड, निष्ठूर, वर्तणुकेंत प्रामाणीक, निष्कपटी इत्यादि गुण तुम्हास या देशचे लोकांपेक्षा विशेषात्कारें करून स्वाभाविक आहेत-जर तुमची घरें, दारें इकडे झालीं तर इतके निर्मळ हे गुण तुम्हामध्यें राहणार नाहींत परंतु तुमची घरें दारें, इकडे नाहीत म्हणूनच इतके गुण तुम्हामध्यें आहेत असें नाही त्या येके कारणाशिवाय गुणाची कारणें अणखी अशीं आहेत कीं तुमच्या

देशामध्यें विद्येचा प्रसार फार लहान मुलाना सक्त शिक्षा करण्याचे माग चांगले आहेत व तुमचे आईबाप सूज्ञ असून तुम्हास शाहणे करितात व इकडे आल्यावर तुम्ही लोकांच्या संमंधाने राहून तुम्हास पगार मोठे व तुमच्या हातून जर काही वाईट झाले तर तुम्हास या देशचे लोकांपेक्षा अब्रूचें भय मोठें आहे तुम्हास सर्व हसतील तुमची गैरवर्तणूक छापून जगांत प्रसिद्ध होईल या कारणाने तुमचे अंगी चांगले गुण फार आहेत.

तुमच्या व्यंगोक्ती कोणत्या म्हणाल तर त्याहि ऐकून घ्या- तुमचे लोकांस इकडील देशचे लोकांची माहिती पक्की नसत्ये व त्या कल्पनापैकी कितीयेक बहुतकरून खऱ्यापासून दूर असतात. या देशांतील लोक अर्धवट शाहणे आहेत यांत संशय नाहीं परंतु त्यांस शाहणे करावे कसे व सूज्ञ सत्तनीतीवान जसे तुम्ही आहा तसे हे लोक कशाने होतील याचे मार्ग सरकारचे लक्षांत वागतात तरी तुमचे सर्वांचे लक्षांत अद्यापि वागत नाही व जितकें लक्ष या कामावर सरकार देतें तितकें तुम्ही सर्वांनी देणे जरूर आहे. परंतु तितकें तुम्ही इकडे देता असेंहि म्हणवत नाही.

या देशांतील लोक अर्धवट शाहणे असे म्हटलें परंतु ते स्वभावाने केवळ मूर्ख असें म्हणवत नाही, ईश्वराने त्यांस बुद्धी किंबहुना तुमच्यासारखी दिल्ही आहे असे मला वाटतें. परंतु उद्योगहीनत्वामुळें ती बुद्धी जशी फुलाची कळी असते ती उमलल्या खेरीज त्यांतील मकरंद बाहेर पडत नाहीं तद्वत आहे. याजमुळें दृष्टोत्पत्तीत येत नाही–इतकेंच अर्धवट शाहणे म्हणण्याचें कारण आहे. यास्तव या लोकांची बुद्धी विशाल करणे जरूर आहे व त्यांचे बुद्धीस मालिन्य काळानुरूप आलें आहे तें दूर करणेंहि जरूर आहे सांप्रत इकडील बहुत लोकांचे विचार व बुद्धी थाऱ्यावर नाहींत व आजच्या काळी संभावित गृहस्थ किंवा विद्वान पंडीत व अडाणी नांगऱ्या कुळंबी, यामध्ये खरेपणा व विश्वासूपणा व निष्कपटपणा पाहिला तर नांगऱ्यामध्ये कदाचित अधीक आढळेल परंतु त्याहून अधीक प्रतिष्ठितांत किंवा शिखलेले व पोथ्या पढणारे लोक यांजमध्यें आढळणार नाहींत या प्रकारची नीतीची व्यवस्था या देशांत आहे.

याप्रमाणे तर सांप्रत स्थिती आहे तेव्हां यांस उपाय काय व या लोकांस उभे करण्यास युक्ती काय याचा विचार सर्वांनीच करावा परंतु तुम्ही तर अवश्य केला पाहिजे.

विद्यावृद्धीची मेहेनत सरकार तर फारच व तुम्हीहि यत्किंचीत कर्ता यांत संशय नाही. परंतु त्या मेहनतीचे दोन पर्याय आहेत. एकपक्षी मेहेनत करणारे मिशनरी लोक वगैरे यांचे धोरण असें आहे की सर्व हिंदुस्थानात क्रिस्तीयन धर्म व्हावा व हल्लींचा धर्म नाहीसा व्हावा. दुसरे पक्षीचे मेहेनत करणारे म्हणजे सरकारी शाळेचे अधिकारी वगैरे यांचे धोरण असें आहे कीं धर्म मुळींच शिखवावयाचा नाही. क्रिस्तीयन धर्म लोकास अप्रिय आहे म्हणून नको व हिंदूधर्म तुम्हास अप्रिय म्हणून नको. याजकरितां फक्त इतर विद्या वगैरे तुम्ही शिखवितां येणेकरून परिणाम होतो तो ऐका.

मिशनरी लोकांचे शाळेंत कोणी फारसा जात नाहीं, तेथे मुलें धर्मभ्रष्ट होतात असे सर्वांस वाटते, यास्तव त्या शाळा व त्याणी छापलेली बुके बहुधा बाजारांत पुड्या बांधण्यास येतात. तेव्हां ते शंभरपट मेहेनत करितात, त्यांपैकी नव्वद हिस्से वृथा जाते. व लोकांस भरवसा नाहीसा होऊन त्या शाळेंत शिखलेले किंवा शिखणारे यांचे कोणी ऐकत नाहीं व त्यास मान्यता नाही याजमुळें ते कितीही शिखलेले असले तरी कुणबी आडाणी, काबाडेय यांचे गणनेंत राहतात. सभेत किंवा चौघे प्रतिष्ठित जेथे जमतात तेथे त्याचा हिसेब मुळीच नसतो.

सरकारी शाळेतले शिखलेले यांस स्वधर्माचे ज्ञान नाही व परधर्माचे ज्ञान नाहीं, याजमुळें त्यांची नीती इतर ज्ञानाने जितकी शुद्ध असावयाची तितकी असत्ये. परंतु धर्माचे ज्ञानापासून जो सद्गुणाचा अभिमान आणि दुर्गुणाचा तिरस्कार उत्पन्न होतो आणि मरणापर्यंत सत्येकरून,

निर्धाराने वागणुक होत्ये, असे जे गुण ईश्वराचें भय सर्वदा अंतःकरणात राहिल्याने उत्पन्न होणारे, ते गुण या शाळेतील मुलांस कोठून लागतील हें सांगा?

विलायतेंत लहान मुलांची शिक्षा अशा रीतीने होत्ये कीं प्रथमतः लहानपणीच त्याचे मनांत ईश्वराचे भय व सद्गुणाकडे लाऊन देतात. नंतर कोणतीही विद्या शिखिवली तर त्या विद्येने रोजगार धंदा मात्र करितात, परंतु खरेपणा अपराध करण्याचा तिरस्कार ही समजूत त्यांचे बुद्धीचे ठायी जागृत असते, तो फायदा या लोकांस नाहीं.

यास्तव हल्ली मिशनरी लोकांच्या शाळा आहेत, त्यांचा उपयोग व्हावा इतका होत नाही, याजकरितां जरुर आहे कीं या रक्तधारित्या पाहिजेत.

जरी येक दोन च्यार माणसें स्वधर्म सोडून क्रिस्तियन झालीं, तरी सर्व देश असा होणार नाहीं, याजकरितां व्यर्थ मेहनत कां घालवावी? हिंदू लोकांत हिंदूधर्माचें ज्ञान होण्याजोगीं निर्बाध पुस्तकें तयार करुन दोनी पक्षाच्या शाळेंत शिखवावी आणि हिंदू लोकांत विचारशील, नीतिमान, करावें हें बरें–

किती येक तुम्हा लोकांस तुमच्या धर्मातील आज्ञेवरून दुसरे लोकांस आपला धर्म सांगणें हे पुण्य जसें हिंदू लोकांस ब्राह्मणभोजन वाटतें तसेंच वाटत आहे. परंतु ते इतर देशास जेथे मुळींच धर्म, कर्म, नाही, लोक अज्ञान आहेत, त्या लोकांमध्ये कदाचित परधर्म चालू होईल परंतु हिंदूस्थानासारखे देशांत दुसरा धर्म चालू होणार नाही. कारण कीं हा धर्म सनातन बहुत दिवसापासून चालत आला आहे व सर्व लोकांस विदित आहे व तो सांगण्याकरितां ब्राह्मणजाती येक पृथकच करुन ठेविली आहे व तो धर्म सरळ त्याचे विरुद्ध इतर धर्म करितात परंतु तो इतरांचा द्वेष करीत नाहीत, असे पाप या धर्माचे बळकट आहे व आणखी अनेक कारणे आहेत, तीं न लिहितां असे पाहा कीं जो इंग्रज लोकांचा धर्म घेईल त्याची सर्वस्वी हानी आहे, तेव्हां इतकें पत्करून परधर्म ज्याचे खरे खोटेपणाविषयी खात्री नाहीं तो धर्म कोण स्वीकारील?

कोणाचाही धर्म किंवा मत प्रथम चालू होते, तेव्हां थोडे दिवसांत चालू होते तितके राहतें, जसे क्रिस्तियन धर्म, मुसलमानाचा धर्म, बौध्य धर्म, हे पाहिल्याने कांही काळपर्यंत चालू झाले तितकेच राहिले, फार तर कशास परंतु हिंदुस्थानात शंकराचार्य, मध्व, रामानुजन, गुरु गोविंद, स्वामीनारायण, इत्यादिकांची मतें उत्पन्न झाली, त्याकाळीं किती येक लोकांनी स्वीकारिली तशी आतां स्वीकारुन कोणी येकही वैष्णवाचा स्मार्त व स्मार्ताचा वैष्णव होत नाही. तसेच सर्वत्र आहे. इसापयगंबर म्हणजे "क्रिस्त" कोणत्या येकाकाळी कोणत्या येका देशांत उत्पन्न होऊन त्याणे आपले मत चालू केले ते या देशांत अश्रुत इंग्रज इकडे येत तोंपर्यंत होते. आतां पुरातन धर्म सोडून येवढ्या तुमच्या सांगण्यावर कोण तुमच्या धर्माचा अंगिकार करील? तुम्ही क्रिस्ताविषयी जे चमत्कार सांगता तसें करणारें अवतार, ऋषी, शककर्ते, साधु पुष्कळ या देशांत झाले आहेत.

या सर्व कारणावरुन सर्व हिंदुस्थानाचा धर्म पालटण्याचा हेतू व्यर्थ आहे येणेकरुन लोकांमध्ये विद्या त्वरित होण्यास मात्र हरकत पडतो व स्वधर्माचे बळाने व लोकांचे मान्यतेने ज्या मार्गांनी विद्याबुद्धीचा उद्योग केला असतां सत्वर सफल होऊन लोक शाहणे होतील त्यांस मात्र अवकाश लागत आहे आणि विद्या देणारे व घेणारे यांचे मनांत मात्र परस्पर वैमनस्य उत्पन्न होतें कीं येकास वाटतें कीं हा धर्म आपला सोडील तरच शाहणा व विद्वान होईल. दुसऱ्यास असें वाटतें कीं हा माझा धर्म बुडवावयास पाहतो याजकरिता याचें सर्व सांगण्यावर विश्वास कदापि ठेऊ नये. यास्तव विद्या व शाळांचे मार्गाची सक्तधारणा झाली पाहिजे. हिंदुधर्म कायम राहून व लोकांत भय धर्म बुडण्याचें न पडतां सक्तधारणा न होईल असें नाहीं–अणखी या लोकांस विद्या कोणत्या पाहिजेत याचें मनन झाले पाहिजे विद्या म्हणजे काय हें या लोकांस ठाऊक नाही. त्यांस असें

वाटतें कीं, विद्या पैका मिळविण्यापुरती करावी पुढील काही धोरण त्यांस ठाऊक नाहीं-यास्तव ही अडाणीपणाची समजूत त्याची निघाली पाहिजे.

मुख्य हिंदू लोकांत अशा विद्या पाहिजेत कीं स्वधर्माचे अनुसंगाने निर्बाध नीती-नंतर माहिती, इतिहास, राज्यरचना, लक्ष्मीज्ञान, यंत्रज्ञान, कायदे, कानू, सरकारचे शिरस्ते, चांगले वाचणें, चांगले लिहिणें, बहु-श्रुतपणा, सारासार विचार, समज-उमजइतके होण्यापुरती जी बुकें असतील तीं शिखवावीं. सांप्रत शाळेंत गणीत फार शिखवितात याचा उपयोग काही नाही हें जसें हिंदू लोकांमध्ये न्यायशास्त्र तद्वत् इंग्रजांचे गणित आहे. रिकामी पाठ करण्याची मेहेनत फायदा काहीं नाही.

याप्रमाणे हे देशाचे सक्तधोरणे विषयी व विद्यावृद्धीविषयी न्यून आढळले तें निरुप केलें. आणखी सांगतो कीं, तुझ्यातून मोठे अंमलदार आहेत त्याणी शाळांस मदत दिल्ही पाहिजे. उगेच बाहेर फिरावयास नित्य जाता तशी महिन्यापंधरा दिवशीं शाळेंत खेप केली असतां मोठें उत्तेजन होतें. आमचे लोक सदर अमीन वगैरे त्यांस वगैरे बळेंच बरोबर न्यावें व शाळा दाखवाव्या व गावगन्ना शाळा होण्यास तुम्ही खटपट केली पाहिजे जोंपर्यंत या गोष्टीचा उपयोग इकडील लोकांस कळू लागे तोंपर्यंत तुम्ही मेहेनत केली पाहिजे-तुम्हास तात्पर्य सांगतो की तुमच्याने येक क्षणांत व येके खेपेने काम होईल तें इतर लोकांच्याने दोनशे खेपानी व्हावयाचें नाहीं कारण कीं तुम्ही अधिकारी राज्यकर्ते म्हणून तुमचे तेज व भीड व हिमायत मोठी आहे.

गांवातून पुस्तकशाळा उभ्या कराव्या चमत्कारिक पदार्थ जमविण्याचा व लोकांस दाखविण्याचा उद्योग व चमत्कारिक यंत्रे छापखाने वगैरे लोकांकडून चालू करण्याचा उद्योग व शेतें पोतें जमीनी तळीं विहीर रस्ते वगैरे नवीन पाडून लोकाचें सुखाची तृप्ती करण्याचा उद्योग इत्यादि तुम्ही केला असतां साध्य आहे. फार तर काय परंतु माझे पाहण्यांत असे आहे कीं येकाच्या मुनसफास व मामलेदारास तुम्ही सहज पुसले की, "तुम्ही वर्तमानपत्र वाचतां" हे ऐकूनच तो वर्तमानपत्र घेऊ लागला. असे हे लोक आहेत म्हणून यांस हातीं धरुन चालविले पाहिजेत.

कुणबी लोक वगैरे फार गरीबीत आहेत त्यांची अवस्था फार कठीण व त्यांस सावकारांची इजा बहुत ती बंद करण्याचा उपाय केला असतां कुणब्यांस सरकारही साहाय होईल व लोकही आश्रय खुषीने करतील. दवाखाने वगैरे धर्मकृत्यें करण्याची रीती इकडील लोकांस दाखविली असतां त्वरीत ग्रहण करतील धर्म करण्यास आमचे लोक बाहादर आहेत. त्यांस सूचना केली म्हणजे लागल्याच अशा सुधारण चालू होतील व तुम्ही उगेच लोकांस सहज म्हटलें तर लोक अत्थेने करितील.

आणखी येक तुमच्यांत मोठे व्यंग आहे तें कोणते म्हणाल तर तुमचे गैरमाहितीमुळें इकडील लोकांची कशी अब्रू व गुण व भलेपणा हा तुम्हास बहुधा माहित नसल्यामुळें तुम्ही कितीयेकजण भलत्यासच चढवितात. ज्यांची योग्यता अगदी लोकामध्यें नाहीं व जो लबाड हें प्रसिद्ध सर्वांस ठाऊक आहे त्याची योग्यता तुम्ही मोठी समजता व तो श्रेष्ठ चांगला असा तुम्हास दिसतो-याजमुळें लोकांचा भरवसा जातो आणि लोक असें म्हणतात कीं इंग्रजींत "बाबाने गुणाचे व योग्यतेचें काहीं स्वरुप नाही. "सर्व नसीब आहे." असे म्हणण्याचे कारण वेड्याचा शाहणा व शाहण्याचा वेडा असें विपरींत पडतें हेंच आहे. यास्तव याजविशीं फारच खबरदारी ठेविली पाहिजे.

दिवसेंदिवस शाळा होऊन विद्येचा प्रसार होत चाल्ला आहे याजकरितां बहुत लोक तुमच्यासारखीं कामे करणारे तयार होत चालले आहेत याजकरितां त्यांची निवड होऊन चांगले विद्वान वरती व इतर खाली असें झाल्यावाचून नशीब हा शब्द लोकांचे तोंडातून जाणार नाहीं.

माझे आढळांत असे चमत्कार आलें आहेत की येक मनुष्य दाहा साहेब लोकांजवळ उत्तम म्हणून निभतो आणि येक साहेब येतो तो त्यास येका दिवसात मूर्ख म्हणतो. आणखी मागला

साहेब ज्यास डोकोवर घेत होता त्यास पुढला फजीत करितो जर कांही अपराधावरुन असें होईल तर ठीकच आहे. परंतु कितीयेक तुमचे लोक असे प्रसिद्ध आहेत कीं ते कोठेहिं गेले व कोणत्याही कामावर आले तरी तेथे सर्वांची अवस्था अशीच करितात. असें त्याचे प्रकृतीचें मान असतें. त्यांस कांहीं शाहाणपण असे ताद्दश्य नाहीं परंतु स्वभावच तसा असतो–याजमुळें बहुधा तुमचे चाकर काळे लोक आहेत ते सर्व प्रारब्धवादी असतात. त्यांस असें वाटतें कीं उद्या कोण येईल आणि आपली काय यव्वस्था होईल हें समजत नाहीं. याजमुळें लोकांत अशी म्हण आहे की, "इंग्रजो चाकरीचा शेवट तुरुंग" अशा विलक्षण तऱ्हा होतात त्याजमुळें कामगारात काहीं स्थिती राहात नाही. ज्यास जसें फावेल तसा तो वर्ततो आणि दिवस पार पडतो. कारण कीं भरवसा पक्का नसतो याप्रमाणे अवस्था आहे कीं नाहीं याचा बारकाईने शोध ठेवा म्हणजे लक्षांत येईल. किती येकांचे असें क्वचित मत असतें कीं हे काळे लोक अगदी लबाड कृत्रिमी आहेत असें अतिशय वाईट मत इकडील लोकांचे त्यांचे मनात भरलेले असतें याजमुळें त्या मतास अनुसरुन फार विपरीत वर्तणुकेस आरंभितात असेहि क्वचित होतें. परंतु हे मत बरोबर नाही तुम्ही या लोकांचो स्थिती जाणून सावधगिरी ठेवावो आणि सुधारण्याचा प्रयत्न करावा. परंतु भलतेच करिता यामध्ये काहीच लाभ नाहीं. याणे तुमचा कीर्तीस धक्का येतो आणि लोकांमध्यें असा समज पडतो कीं तुम्ही काही न्याय केला नाहीं परंतु फक्त द्वेष केला आणि याप्रमाणे लोक म्हणतात कीं, "त्या साहेबाचे त्याचे वाकडें आलें म्हणून बर्तर्फ केला" इत्यादि कुतर्क करितात यास्तव ज्या जाग्यावर तुम्हि बसता त्या जाग्याचें योग्यच वर्तलें पाहिजे तसे तुम्ही आहाच परंतु अशी क्वचित गोष्ट घडत्ये सबब सुचविलें आहे.

त्यांत तुम्ही असें मनांत आणा कीं काळे लोकांस व तुम्हांस अंतर जर तुम्ही येकव्याने काळे माणसांस कामावरुन काढले किंवा त्यांचा छळ केला तर त्यांस कोणी उभा राहू देणार नाही. जेव्हां त्याचा परममित्र साहेब भेटेल तेव्हां काय होईल तें होऊ परंतु काळे लोकांची हिमायत तुझ्याजवळ नसत्ये. कारण कीं त्यांचा स्वकीयपणा, वगैरे सर्व पृथक असतात–तुमची येकमेकांत भीड स्वकीयपणा असतो तसा काळे लोकांत नाहीं. यास्तव ज्याच्या नाशास तुम्ही प्रवर्ताल त्याचा जन्मपर्यंत होतो सबब इतके तुम्हास सांगण्याचे कारण कीं जे कराल ते पक्की चौकशी करुन करीत जा भलतेच येकादे तुमचे मत असेल तर त्यास तुम्ही चौकशी व कारणाखेरीज अनुसरु नये.

माझे मत असें आहे की जी चाकरी देणे ती येक मोटे कुळातील सरदार किंवा उत्पन्न ज्यास आहे त्या गृहस्थास द्यावी म्हणजे ते चाकरी अब्रूस भिऊन चांगली हजार वाटेने करितील. त्यांचा येक गुण कमी असला तरी चिंता नाहीं. परंतु त्याचे खरेपणाविषयी संशय नाहीं. आणि हें उघडच आहे कीं ज्यास उत्पन्न सरकारातून आहे त्यांस चाकरी वाईट करुन सर्वस्व घालिवण्याचें भय केवढें असंल दुसरें चाकरीस लायक इंग्रजी शाळेंतील शिखलेले जे असतील त्यांस कोणतीही चाकरी दिल्हीत तरी ते फार उत्तमपणाने करितील. कारण कीं खरेपणा व भलेपणा करणें व निर्लोभ व लाच वगैरे दुष्कर्म न करणें हें त्यास मान्य असतें तसें इतरास नाहीं.

या दोहो प्रतीशिवाय लोकांस चाकरी देणे हें चांगलें नाही. तुमच्यांतून किती एकाचें असें मत आहे कीं इंग्रजी शिकून लोक उद्धत होतात व त्यांचे अंगी स्वतंत्रपणा इतका येतो की तो तुमच्याने साहवत नाही. ऐशियास हें तुमचें मत अगदी मिथ्या आहे व या मताचे तुमच्यांत लोकही थोडेच आहेत. तुम्हास या लोकांपासून खुषामतीची सवय झाली असल्यास त्याप्रमाणे हे इंग्रजी शिकलेले लोक खुषामत करुन घेणे हा हलकेपणा आहे. याजकरितां जो मनुष्य विद्वान आहे त्याचे अंगी स्वतंत्रपणा येतो व स्वतंत्रपणाचे पोटी अपमान सहन होत नाहीं याचा विचार तुम्ही केला पाहिजे. तुम्हीच पाहा की इतर देशचे लोकांपेक्षा आपले मनाविषयीं किती अभिमानी

आहा याचें कारण इतकेंच की तुम्ही शाहणे आहा. ज्यास शाहणपण व आपले हक ठाऊक नाही ते निरभिमान असतात – अर्बस्थानांत तुर्कस्थानांत लोक अडाणी आहेत तेथे दाहा माणसांस फाशी दिल्हे तर कोणी पुसणार देखील नाहीं. परंतु जर कोणी येक इंग्रजास उपद्रव करील तर तुम्ही सर्वजण त्यास मदत करुन सूड उगवाल तसेच जो खरेपणाने वागतो व जो शाहणा तुम्हास जितक्या गोष्टी कळतात तितक्या त्यासही कळतात असें असतां तुमच्यापासून तो अनादर कसा सहन करील. याजकरितां अशा मनुष्याशी तुमची वागणूक वेगळ्या रीतीची असली पाहिजे. तुम्हास असें वाटतें कीं दुसऱ्याची जशी योग्यता समजतो तशीच आम्ही यांची समजू तर हा तुमचा अविवेक आहे.

उदाहरणाकरितां येका बडे लोकाचा व साहेब लोकांचा संवाद झाला तो ऐकल्याप्रमाणे येथे लिहिला आहे.

बडेलोक – आपण हुकूम कराल तर मी जाईन.

साहेब – सर्व लोक अम्हास खुदाबन्द म्हणतात आणि तू अम्हास आपण म्हणतोस असें बरोबरीचे भाषण कां करितोस. अम्ही वरिष्ठ आहो कीं नाहीं?

बडेलोक – आपण वरिष्ठ आहा खरे परंतु अम्ही खानदानीने सारखे आहो. मला दोन गांव इनाम आहेत व तुम्ही जशी मोठी चाकरी करितां तशीच आमचे वडील मागील सरकारांत करीत होते व दोनदोनशे रुपयाच्या जागा लोकांस देत होते. त्याहून तुम्ही अधीक काय केल? त्याचा मी नातू व संभावित ग्रहस्थ आहे जसे तुम्ही आपले देशांत आहा तसेच अम्ही आपले देशांत आहो आता इकडील लोकास सरकार कलकटर, जड्ज्य, रिविन्यू, या जागा देत नाही. फार झाले तर मामलेंदार फडणीस माहालकरी यांच्या जागा अम्ही कितीहि शाहाणे असलो तरी याच मिळावयाच्या त्याचप्रमाणे मी मामलेदार आहे. यास माझा काय उपाय आहे म्हणून मला हलका मानिता की काय?

साहेब – तें कसेही असो परंतु मी तुला बरतर्फ करूं सकतो–व पुढे तुला कोठहि जागा मिळणार नाही – अशी बेअदबी मी कधीही सोसून घेणार नाही. तू आपल्या योग्यतेने वागले पाहिजे.

बडेलोक – महाराज क्षमा असावी. खुदाबन्दानी मला तू अरे असे म्हटलें तर चिंता नाहीं. परंतु मी पुढे खुदाबन्द असें म्हणत जाईन या देशांत बडेलोक आहेत असें मी कधीही म्हणणार नाहीं.

अणखी येक तुम्हास सुचवावयाजोगी गोष्ट आहे कीं–तुम्ही इकडील देशचे लोकांचा यथायोग्य मान ठेवीत जावा तुमच्यांतून कितीयेक या लोकांस जनावराप्रमाणे किंवा कस्पटाप्रमाणे मानितात परंतु हें चांगलें नाही तुमचे व इकडील देशांतील लोकांचे जितकें सौहृद असेल तितकें चांगलें त्यांत तुमचें सज्जनपणाची स्तुती होईल याचें कारण तुम्ही अणखी येक समजा कीं तुम्ही दूरदेशांतून इकडे येता तेव्हां तुमची व इकडील देशचे लोकांची ओळख किंवा नातेंपोते असत नाहीं तेव्हां इकडील लोकांस अवश्य पडतें कीं तुम्ही मोठे अधिकारावर येता तेव्हां तुम्हाकडे गेले पाहिजे आणि ओळख पाळख उत्पन्न केली पाहिजे तेव्हां असें जे तुम्हाकडे येतील त्यांचा मान विनयपूर्वक तुम्ही ठेविल्याने तुम्हास खर्च पडत नाहीं व तुमचा अपमान होत नाहीं. मग थोडक्याकरितां लोकांस रुष्ट कां करावे? तुमची अशी समजूत असेल कीं हे लोक मूर्ख आहेत आमच्या कपाळाशी नित्य येऊन कटकट करितात यांचें कोणी ऐकावे हा त्रास कोणी घ्यावा अम्ही थोर व शाहणे यावाचून अम्हास काय गरज आहे ही समजूत तुम्ही सोडून दिल्ही पाहिजे. इकडील देशांतील लोकांवाचून तुमचे कांहीं चलावायाचें नाहीं तुम्ही जरी अधिकार स्वतां आपलेकडे ठेविले तरी तुम्ही किती काम कराल सर्व काम इकडचे लोकांकडून होते. तुम्ही देखरेख कराल इतकेंच–

कितीएक साहेब लोक असे आहेत की फक्त सह्यामात्र करितात व शिरस्तेदारास सांगितात कीं जर दोष आला तर तुझ्याकडे हे प्रसिद्ध आहे. तुम्हास किती येक लोक अडाणी आढळतील व मोटे लोकांमध्ये तर फारच बेवकुफ आढळतील परंतु त्यांस शाहणे करण्याचा प्रयत्न करावा तुम्ही त्यांचा उपहास करु नये.

दुसरी येक तजवीज अशी आहे कीं मोटे लोक सरदार, जाहागीरदार, यांची मुलें शाळेंत शिकतात कीं नाहीं याची चौकशी तुम्ही अवश्य ठेवावी व सरकारातून त्यांचकडे इतकें चालवितात यास्तव एतद्विषयी तुम्ही त्यांस ताकीद करण्यांस अधिकारी आज्ञा ज्यास अनुकूल असेल त्यांजकडून चांगले पंतोजी ठेवावे. साधारण लोकांकडून मुलें शाळेंत पाठवावी तयार झालीं म्हणजे त्यांस अधिकार देण्याची तजवीज ठेवावी.

दुसरे येक तुम्हास सुचवावयाजोगें आहे कीं तुम्ही स्वतां सर्वांची भेट बोलतील तें समजून घेत जावे म्हणजे लबाडलोकांस फावत नाहीं. तुमची भेट दुर्लभ असल्याने तुमचे कामगारांचे आर्जव करावें लागतें तुम्ही समजून न घेतल्याने तुमचे कामगारांस समजून घ्यावे लागतें नाही तर तो समजवील तसेच तुम्ही समजून फैसल कराल याजकरितां गरीब व श्रीमंत यांस तुम्हांस स्वतां जाऊन तुम्हास सांगण्याची अडचण असू नये म्हणजे तुमचे कामदारांचें व शिपायांचे जें हल्ली महात्म आहे व त्याजमुळें लोकांस ज्या अडचणी आहेत त्या दूर होतील.

देशभाषा शिकणे हें तर मुख्य काम आहे त्यावाचून कितीहि तुम्ही शाहणे असलेत तरी व्यर्थ होईल व तुम्ही लोकांशी जितकी सलगी ठेऊन वागाल तितकी तुम्हास माहिती अधीक होईल व तुम्हास बातमी लागेल व तुमचे चाकरांतून चांगला कोण, मध्यम कोण व वाईट कोण, हें तुम्हास कळेल नाहीं तर घोडा गाढव यांची किंमत तुम्ही सारखी कराल मग चांगले रीतीने चालणारास धैर्य कशाने येईल जर तुम्ही निवड कराल व निवडून लोकांस वाढवाल तरच चांगले लोकांस धैर्य येईल परंतु एतद्विषयी तुमच्या हातून मोठाल्या चुक्या होतात यांत संशय नाहीं एतद्विषयी खबरदारी केली पाहिजे.

या देशांतील लोक यांची अवस्था पोरासारखी आहे थोरांत हे जमा नाहींत कारण कीं स्वतां मोटा अधिकार चालविण्याचें व विद्यावृद्धीचें काम करण्याचें वगैरे कांहीं यांचे हातून होणे कठीण व यांचे हातीं अधिकार असल्यानें अनर्थ करितील एतद्विविषयी मला तर संशय नाही. याचें कारण यांस कायद्याचा उपयोग ठाऊक नाही व कायदे कसे असावे व कोणी करावे व त्यास मान कसा द्यावा व न्याय कोणचे रीतीने करावे व न्यायांत समदृष्टी कशी असावी एतद्विषयी जें कौशल्य तुम्हामध्यें आहे तसें इतर लोकांमध्ये नाहीं व तुमचे राज्यकरण्याचे बेत व कायदे व बंदोबस्त व व्यवस्था हीं तुमची तुम्हीच करू जाणा तशी सांप्रतकाळीं इकडील लोकांस व्हावयाचीं दूर आहेत परंतु तुम्ही करता तीं पुरतीं जावत नाहींत व आगापिछा पाहिल्याशिवाय भलताच कुतर्क काढतात यास्तव सरकारने अधिकार बहुत करून तुमचे लोकांचे हातींच ठेविले आहेत हे यथान्याय आहे असें केल्यावाचून उपाय नाहीं हिंदू व मुसलमान लोक हे तुमच्या देखरेखीवांचून काय करतील याचा अंत लागत नाहीं कारण कीं त्यांच्यामध्यें अडाणीपणा फार आहे. यास्तव आमचे सरकार जे जे बेत करीत आहे ते सर्वथैव चांगले याचा मला संशय नाहीं. परंतु तुम्ही सर्वांनी त्यांचे बेतास अनुसरून ते चालू करावे–तुम्ही मनावर न घेतल्यामुळें ते तसेच राहतात व कितीयेक कामें अशीं आहेत कीं त्याविषयीं सरकार जोर करूं शकत नाहीं असे येकाद्या सरदारास सांगून त्याचे मुलाकडून विद्या करवावयाची–पुस्तकगृह–दवाखाने आदि करून लोकांकडून चालू करवावयाचे त्यास तुमचे कामगार व शिरस्तेदार वगैरे यांस तुम्ही ताकीद केली असतां ते झटून खटपट करतील हे करणें–चांगले मनुष्यास चाकरी देणें–व तुमचे हाता खालचे अंमलदाराकडून विद्येस मदत देवविणे इत्यादि जे बेत आहेत हे तुम्हीच केले पाहिजेत व तुम्ही शब्द टाकाल

तर होईल सरकार तुमचा हा उद्योग पाहावयास खुषी आहे व मदत करील परंतु तुम्ही सर्व कामे सोडून हेंच करा असें कसें सांगेन? याजकरितां सरकारचे डोळे तुम्ही मुलुखाची व्यवस्था प्रत्यक्ष तुम्ही पाहता व लोकाची स्थिती तुमचे दृष्टीस पडत्ये याजकरितां असल्या गोष्टी तुम्हीच आरंभिल्या पाहिजेत व आमचे लोकांस तुम्ही सांगून खपविले पाहिजेत.

असा उद्योग केला असतां लोकांचे कल्याण फार होईल व हल्ली लोकांस स्वस्थपणा आहे पूर्वी जे उपद्रव मोगल आले, होळकर आले, भालेरायी झाली, पेंढारीयाणी गर्दी केली, असे जे अनर्थकारक होते ते हल्लीं नाहीत लोकांची घरेंदारें आणि जीव हे स्वस्थपणात राहून बादशाहासारखे लोक आपले घरीं बसतात कोणाचा कोणावर जुलूम चालत नाहीं अशी या सरकारची तजवीज बहुत चांगली आहे व या सरकारहून चांगलें सरकार हिंदूलोकांस रामराजाचे व धर्मराजाचे अलीकडे मिळाले नसेल असे मला वाटतें. म्हणून अशा सरकारच्या अंमलात विद्यावृद्धी वगैरे सुधारणा ज्या युरोपखंडात आज तीनचारशे वर्षांत झाल्या तितक्या झाल्या पाहिजेत.

तुम्हातून शंभरात नव्वदची अशी समजूत असतें कीं, "आपण इकडे रोजगारास आलो आहो तर सरकारनें सांगितलेलें काम मुदतीपर्यंत केलें आणि पेनशिन घेऊन घरी गेलें. आपल्यास या लोकांचे उठाठेवीवाचून गरज काय न जाणो हे लोक विचित्र आहेत जर काहीं बखेडा पडला तर सरकार म्हणेल की तुम्हांस हे काम करण्यास कोणी सांगितलें. त्यापेक्षा निमुट असावे हे बरे," आठ असें म्हणणारे आहेत कीं, "जर लोकांनी परस्पर आरंभिले तर आपण रुकार द्यावा. आपण होऊन करण्याची काहीं गरज नाही व शेकडों दोन असें असतात कीं हे लोक अर्धवट शाहणे यांस शहाणपणाचा रस्ता दाखविला पाहिजे यांजकरिता ते झटून खटपट करितात. लोकास समजून सांगतात याप्रमाणे शंभरांची रीति आहे. तर असे जे दोन असतील याचप्रमाणे सर्वांनी झालें पाहिजें हे लोक विचित्र नाहीत. तुम्हीं सांगाल त्या मार्गांनी जाणारे आहेत. इतकेच की त्यांना सन्मानानें आणून समजूत करून फूस लावून पोरासारखें खेळविलें पाहिजेंत म्हणजे त्यांजकडून अनमान होणार नाहीं.

पूर्वी म्हटलें कीं इकडील लोक अधिकाराच्या उपयोगी नाहीत. परंतु तुम्ही शाळा वगैरें घालून ज्या लोकांस तयार केले आहे ते उपयोगी आहेत. किंबहुना ते तुमच्याप्रमाणे काम करितील वास्तव ते म्हणणें इकडील लोक जे अविद्वान आहेत त्यास मात्र लागू आहे. तेथे तुम्हांस आणखी येक सुचविलें पाहिजें कीं तुम्ही जों जों लोक तयार करीत आहात तों तों त्यास अधिकार देण्याचीहि तजवीज झाली पाहिजे. परंतु हे तुम्हांस सांगून उपयोग नाहीं मला खचित वाटते की सरकार याविषयीं तजवीज करील व हे लोक तयार होत चालले म्हणजे काळें लोकांमध्ये व तुम्हांमध्ये जो भेद ठेविला आहे तो मोडून टाकतील व शाहणपण उभयताचे येकसारखे झाल्यावर देशावरून व रंगावरून भेद ठेवणे हे यथान्याय नाहीं यांजकरितां इकडील लोकांनी शाहणपण लवकर मिळविले पाहिजें. परंतु हे पंगू आहेत याजपासून स्वतः घडत नाहीं यास्तव तुम्हांस मी विनवून सांगतो कीं या कामास तुम्ही म्हटले पाहिजे आणि या लोकांमध्ये जें गुण व अकल तुम्हांमध्ये आहेत तें सत्व इकडे यावें असा प्रयत्न केला पाहिजे.

तुमच्या लोकांमध्ये येक मोटी वाईट चाल अशी आहे कीं येका साहेबाने किंवा दुसरे कोणी येकाचा विषयीं वाईट मत सांगितले तर तात्काळ तुम्ही ते ग्रहण करीता. याची उदाहरणें अशी पाहाण्यात आली आहेत कीं ज्या मनुष्याविषयीं तुम्ही काही काळपर्यंत मोठा अभिमान बाळगीत होता. त्याच मनुष्याविषयीं तुम्हांस काही सांगितलें तेणेंकरून तात्काळ तो मर्जीतून उतरून पुन्हा त्याचे दर्शन घेतले नाहीं व त्यास बोलू दिल्हे नाही. यास इकडील लोकांमध्ये कानाचा हलकेपणा म्हणतात. त्यांस ही चाल बहुदा चांगली नाहीं कारण की कीतीयेक लोक गोष्ट सांगतात ती त्यास खरी वाटते म्हणून सांगतात परंतु ती खोटी असते. यांजकरिता सांगणाराकडे खोटे सांगितल्याचा

दोष नाहीं. परंतु तुम्ही ते ग्रहण चौकशीवाचून केले तर हा दोष आहे. यास्तत कानाचा हलकेपणा अगदी असू नये. पक्की चौकशी होऊन खरे ठरेल तरच त्याप्रमाणे कोणाचा नाश करावा. केवळ सांगणाराचे मनोधारणा करितां कोणचे करमास प्रवर्तु नये.

मुख्य तुम्ही आपले चाकराविषयी फार खबरदारी ठेविली पाहिजे. कारण कीं आमचे लोकांत दिवसेदिवस लबाडी फार वाढत चालली आहे. जर कोणी म्हणेल कीं माझा येक वाद आहे हा मी पंचायतीत तोडीन तर येकही भलामनुष्य मिळणार नाही. यास्तव तुम्हांकडे सर्व फिर्यादी येतात. जरी लवादाचा कायदा आहे तरी उपयोग नाहीं याचे कारण लोक नीतिवान नाहींत. तेव्हां अशा श्रेष्ट लोकांतून चांगला निवडून काढणे हे काम अवघड आहे हे लक्षात ठेवावे.

दिवसेंदिवस लोक नीतिश्रेष्ठ होत आहेत याचे कारण त्या लोकांस आवरणारा व धर्माचा मार्ग दाखविणारा कोणी नाही सरकारचे चांगले राज्य नीतीमुळे स्वस्थता आहे. मोकळीक फार आहे परंतु नीति कशी सुधारावी याचा मार्ग नाही व डोईजड कोणी असा राहिला नाहीं कीं ज्यांस सर्व लोक मानीतात. जो तो स्वतंत्र निर्भय होऊन वागतो. याजमुळें ब्राम्हणदेखील दारू पिऊ लागले म्हणून या श्रेष्ठ पडण्याचा प्रतिबंध होण्याकरिता विद्येवाचून दुसरा उपाय नाहीं व जे विद्वान सुशील असतील त्यांस मोठ्या जागा देऊन सर्व लोकांत त्यांस डोईजड करून ठेवावे म्हणजे त्यांचे गुण पाहून लोक शिखतील. स्वजातीय लोकांस मानून त्यांचे गुण लवकर येतात. तुमचे गुण चांगले असूनही लोक ग्रहण करीत नाहीत. कारण कीं तुम्हास म्लेंच्छ, यवन, असे लोक म्हणतात. व तुमच्या नीतिवंतपणाचा विचार करीत नाहीत. यांजकरितां तुमचे कामदारात इकडील देशचे जे शाहणे विद्वान, चांगले चालीचें असतील ते मुख्य झालें म्हणजें त्यांचे योगाने तुमचे गुणाचे वर्णन होईल. हल्लीचे कामदार तुमची चाकरी तुम्हास मनापासून मानून करितात असे नाही. औषधासारखी करतात घरीं आलें म्हणजे चौधात बसून म्हणतात कीं, "पोट भरत नाहीं मग काय करावें. या महाराची चाकरी करावी लागत्ये." आणि धर्म बुडविला, सती बंद केली. "हे फार वाईट आहे," साधारण लोक यानी येक दूषण दिले तर ते दोन देतात. याप्रमाणे तुम्हांस पक्केपणी जाणणारें व तुमचे राज्याची नीति चांगली हें समजणारे हे तुमचा उपहास करणार नाहींत हें तुम्ही पक्के समजा. तोंडावर आर्जव व खुषामत हात तोडून पांचवेळ सलाम करतात व दाहावेळ मायबाप म्हणतात. परंतु यांचें मन साफ नसतें. हे तुमच्यासमोर मात्र स्तुती करणारे परंतु पाठीमागें तुमच्या कुटाळ्या करणारे आहेत. यास्तव मुख्य सावधगिरी ही तुम्हास ठेविली पाहिजे कीं जे सुशिक्षित, शाळावान, ज्यास ज्ञान, विद्या, समजूत, नीती, चांगली आहे त्यांस तुम्ही जवळ करावे म्हणजे ते लोकांत प्रमुख होऊन लोकांच्या नीती सुधारतील.

याप्रमाणे मला अल्पमतीने जो सुचला तो बोध मी तुम्हास केला आहे. याप्रमाणे तुमची कितीएकांची वागणूक आहेच. परंतु अशी सर्वांची व्हावी अशी माझी इच्छा आहे. यास्तव धीटपणाने तुम्ही बोधग्राहक आहांत म्हणून सुचविलें आहे ही विनंती.

• •

# स्वदेशीय राज्यें व संस्थाने

('स्वदेशीय राज्यें व संस्थाने' हा लेख लोकहितवादी मासिक पुस्तकाच्या पहिल्या अंकातून/ वर्ष-२ रे अंक १-२– सप्टें.–ऑक्टोबर १८८३ / उतरून घेतला आहे.)

या विषयावर लिहितांना मुख्यत्वे पुढे लिहिलेल्या गोष्टींचे विवेचन करावयाचे आहे :—

(१) स्वदेशीय राजे व संस्थानिक यांच्या समजुती. (२) पैशाची उधळपट्टी. (३) त्यामुळे त्यांच्या राज्यांचा व संस्थानांचा होणारा तोटा. (४) लोकांचा व त्यांचा संबंध. (५) त्यानी आपल्या मुलुखांत कोणकोणत्या सुधारणा करून लोकप्रिय झाले पाहिजे. (६) त्यांची पूर्वीची व हल्लींची स्थिती वगैरे.

स्वदेशीय राजे व संस्थानिक यांची अशी एक सर्व साधारण समजूत आहे की, रयतेपासून जो वसूलाभ येतो तो आपल्या खाजगत पैसा आहे. त्याचा कोणीच हिशोब देणे नलगे. त्याचा खर्चवेंच करण्यास आपण मुखत्यार आहों. त्यामध्यें खाजगी व दौलत (सार्वजनिक) अशा प्रकारच्या दोन खर्चांची वांटणी मुळींच नको. खाजगी खर्च करून बाकी राहील ती शिल्लक दौलतीकडे (सार्वजनिक उपयोगाकडे) खर्च करावयाची. परंतु खाजगी खर्चास आणि उधळपट्टीस अडचण पडता कामा नये. या शिवाय त्यांची अशी एक दृढतर समजूत झाली असते की, आपले पूर्वजांनी व वाडवडिलांनी येवढे अश्रांत श्रम करून मोठमोठ्या पराक्रमांनी जे मुलूख संपादन केले, ती आपल्या मालकीची जिंदगी झाली आहे व त्याकरितां त्या जिंदगीची वाटेल तशी व्यवस्था करण्यास आपण सर्वांशी स्वतंत्र व मुखत्यार आहों. एखाद्या घराचे मालकास त्या घरांत राहणाऱ्या बिऱ्हाडकरांकडून ज्याप्रमाणे भाड्याचे उत्पन्न होते व त्या उत्पन्नाचा खर्चवेंच करण्यास ज्याप्रमाणे तो स्वतंत्र व मुखत्यार आहे त्याप्रमाणे आपल्या पूर्वजार्जित राज्यरूप गृहांत राहणाऱ्या प्रजारूप बिऱ्हाडकरांकडून वसुलीच्या रूपाने जो भाड्याचा पैसा येतो त्याचा खर्चवेंच करण्यास आपण मुखत्यार व स्वतंत्र आहोत. या करितां आपल्या ख्यालीखुशालीस जो खर्च लागेल तो प्रथम करून नंतर शिल्लक राहिल्यास सरकारी (प्रजेच्या) कामाकडे खर्च करण्यास पैसा द्यावयाचा. एरवी प्रजेचा आपल्या वसुलीवर कांही एक हक, वारसा अथवा दावा नाहीं. अशी फारां दिवसांपासून परंपरेची समजूत त्यांजमध्ये चालत आली आहे. तेव्हां या खोट्या समजुतीच्या पोटांत त्यांजकडून होऊ नयेत अशी अनेक भलभलती, अनन्वित आणि प्रजेला अहितावह अशी असत्कृत्ये होतात यांत नवल नाही.

प्रजेकडून उत्पन्न होणाऱ्या पैशाचा अनुत्पादक व अचिरजीवी अशा अनावश्यक कृत्यांकडे खर्च करणे त्याला आम्ही असत्कृत्ये म्हणूं. कोणी राजा ब्राह्मण भोजने घालितो आहे, कोणी संस्थानिक खिचडी व सदावर्ते वांटतो आहे, कोणी थोर मनुष्य श्रावणमासची दक्षिणा देतो आहे व कोणी श्रीमान् गृहस्थ उत्साह व दाने करितो आहे. हे अनुत्पादक खर्च नव्हेत काय ? पुष्कळ बैरागी, फकीर, गोसावी, वारकरी वगैरे पोसून त्यांस भांग, गांजा, तंबाखू, मालपुवा, सिधे वगैरे वाटले आणि जन्मपर्यंत त्यांनी ते खाल्ले तरी त्यापासून लोकांचे ज्ञान, धर्म, संपत्ति, सत्ता वगैरे तिळमात्र तरी वाढेल काय ? तर, ज्यांनी राजाश्रय घ्यावा त्यांनी कांही तरी लोकांचा फायदा करून दिला पाहिजे. नाही तर ते राजाश्रयास व प्रजाश्रयास अपात्र होत. खरोखर आश्रयपात्र म्हटले म्हणजे अंध, पंगू, अनाथ वगैरे लोकच होत. परंतु सर्वदा परोपजीवी होऊन राहण्याचाच धंदा करून राहणारे बाणेदार भिक्षुक हे सर्वथैव आश्रयाला अपात्र होत. त्यांजकडून त्यांच्या योग्यतेचे काम करून घेऊनच त्यांस आश्रय दिला पाहिजे. मनुष्य प्राण्याने निरूपयोगीपणाने व अक्षर शत्रु असें न राहतां उद्योगधंदा करून पोट भरिले तर देशाला किती फायदा होईल व त्याचे किती दारिद्य विछिन्न होईल ? परंतु हा विचार कोणी करीत नाहीं. वरील प्रकारचा उधळपट्टीचा खर्च करणारास आळशी व पोटबाबू लोक धर्मराज्य, धर्मात्मे व उदार अशी मोठमोठी विशेषणे देऊन आळवितील. परंतु त्या आळविण्यांत काय अर्थ आहे ? वस्तुतः असा खर्च करणाऱ्या उधळ्या व अविचारी लोकांस धर्मात्मे, उदार व धर्मराज्य असे म्हणणे किती अंशानी बरोबर आहे याचा विचार, ज्याला यत्किंचित अर्थशास्त्राचे ज्ञान आहे अथवा देशस्थितीच्या संबंधाने थोडीशी तरी चौकस-बुद्धि आहे, तो तेव्हांच करून म्हणेल कीं हा निव्वळ पैसा मारणे किंवा नाहींसा करणे असून देशाला दारिद्र्यात व निकृष्टावस्थेस पोंचविणे आहे. आणि खरोखर पाहिले असतां त्या उभयतांचेही म्हणणे खोटे कसें म्हणावे ? असल्या उधळेपणांत ज्यांना भक्ष्य मिळतो त्याजकडून त्या उधळपट्टीची तारीफ केल्यावांचून कधीही राहणार नाहीं. याचे कारण उघड आहे कीं, या देशांत धर्माभिमान, देशाभिमान व राज्याभिमान यापेक्षां उदरभरणाभिमान फार मोठा व दांडगा आहे. त्याणे सर्वांस अगदी स्ववश केले आहे. त्यापुढे सत्य, दया व शांति यांचा कांही एक उजेड पडत नाही. ज्यांचेकडून पोटास मिळेल व तेही बिनश्रमात व केवळ स्तुतिस्तौ त्याने मिळेल. त्याजबद्दलची मिथ्यास्तुती, निष्कारण तारीफ आणि व्यर्थ बडेजाव करावयाची अशी फुकऱ्या लोकांस सवयच पडून गेलेली असते. या सवयीचे पोटांत मग काहीही अनर्थ आपल्या देशावर किंवा जातीवर ओढवला तरी त्याजबद्दल कोणी क्षितिच बाळगीत नाहीत ! अधर्माला धर्म, असत्याला सत्य आणि अपथाला सत्पथ म्हणून खुशाल जे निंद्य, त्याज्य व द्वेष्य त्याचा अंगिकार करून पोटे जाळण्याची आळशी व पोटार्थी लोकांस संवयच असते व तिजवांचून त्यांचा निर्वाहही चालावयाचा नाही तेव्हा अशा मिथ्यास्तुतीस आणि असत्य प्रशंसेस भुलून जे राजे, संस्थानिक व श्रीमान् लोक आपल्या पैशाचा उधळपट्टीने खर्च करितात ते निखालस तो पैसा ठार मारितात किंवा एखाद्या विहिरींत किंवा तळ्यांत तितका पैसा टाकून देतात असे म्हणावे लागते. हा द्रव्यव्ययाचा विचार झाला. म्हणजे, जवळ पैसा असला तर तो सन्मार्गी व चांगल्या कृत्यांत खर्च करावा. असन्मार्गी व असत्कृत्यांत त्याची उधळपट्टी करू नये, असे सांगणे झाले. परंतु सद्सत्कृत्यांत तरी असा पैसा खर्च करण्याची मुखत्यारी आणि स्वातंत्र्य राजे लोकांस व संस्थानिकास आले कोठून ? पैसा अमूक रितीने खर्चिला असतां त्याचा सद्व्यय होतो व अमुक तऱ्हेने उडविला असतां त्याचा असद्व्यय होतो हे आम्ही आपल्या सद्सद्बुद्धीप्रमाणे सांगितले. परंतु ज्यांच्या जवळ ज्याच्या स्वतःचा पैसा व जिंदगी आहे तिचा वाटेल त्या रितीने खर्च करण्यास तो मुखत्यार आहे. त्याला अडथळा व प्रतिबंध करण्याचा कोणास अधिकार नाही. पण ज्याचा स्वतःचा पैसा नाही व ज्याला विश्वासुक म्हणून किंवा सबल व सशक्त म्हणून पैशाचा रक्षणकर्ता नेमिले, त्याणेच उलट त्या सर्व

पैशाचा आपण धनी व मालक म्हणून वाटेल तसा खर्चवेंच करावा हे अत्यंत नीचपणाचे आणि अधमतेचे काम आहे. स्वतःच्या मालकीचा पैसा मालक कोणत्याही तऱ्हेने उडवो, तो दुर्व्यसनांत त्याचा खर्च करो, आळशी व फुकट्ये लोकास पोसविण्यांत नाहींसा करो अथवा त्याची गाठोडी बांधून नदींत किंवा समुद्रांत फेकून देवो, त्याजबद्दल त्याला कोणीही प्रतिबंध करण्यास समर्थ नाहीं. परंतु ज्याला रक्षणकर्ता नेमिला, त्याणेंच त्या पैशावर दरोडा मारून त्याचा वाटेल त्या रितीने चैनबाजींत व विषयानंदांत खर्च करावा यास अडथळा व प्रतिबंध करण्याला प्रत्येक मनुष्य अधिकारी आहे.

राजे व संस्थानिक हे अशा प्रकारचे द्रव्य संभाळणारे व जीविताचे रक्षण करणारे रयतेचे नौकर आहेत हे त्यांणी पक्के समजून असावे. त्यांच्या पूर्वजांनी मोठमोठे पराक्रम करून व रयतेचे तिच्या शत्रूपासून रक्षण करून मुलूख काबीज केले, म्हणून ती कांही त्याची खाजगी मिळकत होत नाही. हे त्याणी पक्के लक्षात वागवावे. ज्या मुलूखांत हल्लींच्या राजांचे व संस्थानिकांचे पूर्वज नांदत असल्यामुळे हल्ली त्यांजकडे राज्यसूत्रे आली असतील, त्यांविषयी असे समजावयाचे की, त्या मुलूखांतील रयत अशक्त, असमर्थ व नाईलाज झाल्यामुळे तिणे आपल्या उत्पन्नाचा कांही अंश त्यांचे स्वाधीन करून त्याचे योगाने त्याणी आपला खाजगी खर्च व रक्षणाला लागणाऱ्या इतर सर्व व्यवस्था बघाव्या अशा हेतूने त्या राजांना साह्य व मदत करून ते समर्थ, बलवान् व सुरक्षित असे समजून, त्यांस राज्यपद दिले. यांपेक्षां त्याणी त्यांजकडे दुसरा कोणताही अधिकार ठेविला नाही. श्रीमंतांनी आपली जिंदगी, सामानसुमान, चीजवस्तु व कापड रोकड चोरांनी, लुटारूंनी अथवा भामट्यांनी चोरून लुटून अथवा ताव मारून किंवा फसवून नेऊ नये म्हणून दारावर सशक्त, उग्र, दांडगे व शूर असे दोन पूरभय्ये पक्के कांही पगार कबूल करून पाहऱ्याकरितां व रक्षणाकरितां ठेविले तर त्याणी पाहरा व रक्षण करावे, कां आपल्यास द्वारपाल नेमिले म्हणून मालकाच्या घरांतील सर्व जिंदगीवर स्वामित्व ठेवून तिची वाटेल तशी व्यवस्था लावावी? त्याणी मालकाने दिलेल्या मुशाहिऱ्यावर संतुष्ट राहून आपले कर्तव्यकर्म करावे कां असा अधमपणा करून धन्याच्या सर्वस्वाचाच अपहार करण्याची दुष्टबुद्धी धरावी? हीच गोष्ट राजेसंस्थानिक आणि त्यांची रयत यांची आहे. रयत ही मालकीण असून राजेसंस्थानिक हे तिचे बंदे नोकर आहेत, हे तत्व सर्वांनी ध्यानांत धरिले पाहिजे. सर्व प्रांतांत व मुलखांत प्रजेचेच स्वामित्व आणि तिचेच हक्क आहेत. आणि ती आपले संरक्षण होऊन आपल्या जिंदगीचे व मालमत्तेचे रक्षण व्हावे म्हणून बंदोबस्ताकरितां आपल्या प्राप्तीतील काही अंश खर्चून कोणी तरी शूर, प्रामाणिक आणि आस्थेवाईक असा मनुष्य संरक्षक नेमते. तो संरक्षक जो तो हा राजा होय. त्याणे आपल्या साह्यात फौजफांटा, आरमार वगैरेंची योजना करावी व तितक्या पुरता रयत त्या राजाला पैसाही पुरविते. परंतु त्या पैशाचा करावा तसा तो उपयोग न करिता उन्मत्तपणाने व आपला अधिकार संबंध विसरून वर सांगितल्याप्रमाणे आपल्या ऐषआरामाकडे आणि चैनबाजीकडेसच त्याचा धुव्वा उडवितो. अशी उदाहरणे एतद्देशीय राजांमध्ये आणि संस्थानिकांमध्ये विपुल आढळतील!

रयतेचे संरक्षण व बंदोबस्त करण्याचे दोन तीन मार्ग आहेत व एवढ्याकरितांच आपल्या उत्पन्नांतून राजाला कराच्या रूपाने पैशाचा पुरवठा करिते. ते दोनतीन मार्ग हे :- (१) रयत जरी झाली तरी तिजमध्यें कामक्रोधादि षड्विकारांनी आणि दुष्ट मनोधर्मांनी आपापसांत दुष्टावे, अपहार, चौर्य, व्यभिचार, फसवाफसवी वगैरे चालून लोकांची शांति आणि सौख्य यांस व्यत्यय येतो. त्याच्या बंदोबस्ताकरितां पोलीस, न्यायाधीश, मॅजिस्ट्रेट कचेऱ्या, तुरुंग वगैरेंच्या योजना आणि तजविजी करून दुष्ट लोकांस शिक्षा आणि शासन केले पाहिजे. (२) लोकांमध्ये विद्या, शिक्षण, कलाकौशल्य व हरएक प्रकारचे कसब ही वाढून त्यांस ज्ञानसंपन्न व उद्योगी करण्याकरितां शाळा, पाठशाळा, पुस्तकालये, कारखाने, यंत्रालये वगैरेंची योजना करून, त्यांजमध्ये परस्पर ऐक्य,

प्रेम, बंधुप्रीती व देशाभिमान उत्पन्न केला पाहिजे. आणि (३) या वर सांगितलेल्या सर्व व्यवस्था व गोष्टी सुयंत्र व अप्रतिबद्ध चालून त्यांस बाह्योपाधींची पीडा होऊ नये म्हणून फौजफाटा, शिबंदी वगैरेंची व्यवस्था ठेविली पाहिजे. ह्या तीन मार्गांच्या व्यवस्थेकरितांच राजाकडे प्रजेचा कारभार येत असतो व या तीन मार्गांकडेसच त्याणे त्या कारभाराचा विनियोग केला पाहिजे, हे त्याचे प्रजेच्या नोकराप्रमाणे कर्तव्य आहे. ह्या तीन प्रकारच्या बंदोबस्तांची गरज नसती तर लोकांना राजाची जरूर नसती व त्यांणी स्वकष्टार्जित पैशांतून छदामदेखील राजाच्या नांवे खर्ची घातला नसता. आपली मुले लेकरे व बायकापोरे रानावनांत व उन्हातान्हांत खपून जे उत्पन्न करावयाचे त्यांतला कांही अंश उगाच एखाद्या मनुष्यास त्याच्या चैनबाजीकरितां आत्मसंतोषाने कोण उचलून देईल हे उघडच दिसते आहे. सारांश, कोणी तरी शहाणा, समंजस, हुशार व कर्तबगार असा मनुष्य बघून त्याजकडून ही बंदोबस्ताची कामे करवून घेण्याकरितां रयत आपल्या प्राप्तीतला अंश ज्यास देते तोच हा राजा. राजा म्हणजे प्रजेचे रंजन करणारा, असा त्याचा शब्दार्थच आहे. तेव्हां जो राजा प्रजेच्या करभाराने श्रीमंत होऊन त्याचा अपव्यय करील तो प्रजेला रंजविणारा तरी कसा होईल आणि त्यांत त्याच्या राजपदाची व 'राजा' या नावाची तरी सार्थकता काय झाली म्हणून समजावी?

सारांश राजे लोकांनी म्हणजे सर्व प्रकारची श्रीमंताची सुखे भोगावी आणि मनःपूर्त चैनबाजी उडवावी एवढ्याकरिता काही त्यांची योजना नाही. गरीब व मेहनती लोकांनी मेहनत करावी, काबाडकष्ट भोगावे, पत्रदूर रगव्यावर दिवस लोटावे, अंबील्पाला खाऊन निर्वाह करावा, मरेपर्यंत श्रम व दुःखे भोगावी व राजाला करपट्ट्या व हक्कदस्तुऱ्या द्याव्या; आणि राजांनी खुशाल विलासमंदीरात झोपाळ्यावर बसून व नाना प्रकारचे सुखोपभोग भोगून निष्काळजीपणे दिवस काढावे, हा का न्याय आणि हा का राजधर्म! तेव्हां ह्या गोष्टी लक्षात आणून राजांनी व संस्थानिकांनी वागले पाहिजे, आपल्या प्रजेमध्ये असतोष, अस्वास्थ, अशांति, औदासिन्य, अचिरस्थायिता व अमार्गगामित्व ही न राहता सर्वत्र संतोष, स्वस्थता, शांतता, उत्साह, गांभिर्य, सदाचार आणि सद्वर्तन ही कायम राहतील. आणि न्यायशासन, दाद, हुकूम, वचक, दरारा, भिती व आदर ही व्यवस्थेने चालतील. अशा प्रकारची राज्यपद्धति ठेवली पाहिजे. ती वर लिहिल्या प्रकारच्या मनसोक्त आचाराने आणि चैनबाजीने राहणार नाही. सर्वत्र हीच स्थिती आढळेल की राजाचे एकदा आसन बसले म्हणजे तो आपली पूर्वस्थिती सर्व विसरून जाऊन त्याला नाना प्रकारचे ढंग व छंदफंद आठवतात ज्या कामाकरिता त्याला नेमिले असते, ते काम तो विसरून जाऊन त्याला स्वतःच्या नादापुढे आणि ऐषआरामापुढे काही दिसत नाही व ते काम पहाण्यास त्याला फुरसत होत नाही. त्याच्याभोवती आर्जवी व स्तुतीपाठक लोकांचे कडाळें जमून त्यांच्या लाघवी भाषणाने तो मोहून जाऊन सर्वदा उधळेपणा, बेपर्वाई यामध्येच आपल्या जीविताचे सार्थक मानितो. खेळकुस्त्या, नाच-तमासे, गाणे-बजावणे, रंगमहाल, आरसेमहाल, शिकारी वगैरेमध्येच ह्याचा वेळ जाऊन त्या मौजातच ह्याचा सर्व पैसा येतो. तरी त्यास तो न पुरता त्याचा सदा हात ओढीत असतो. मग तो नवे नवे कर, पट्ट्या, नजराणे वगैरे बाबींनी रयतेकडून पैसा काढतो. अशा प्रकारचा पैसा उकळण्यात मग त्याजकडून न्यायाचे अन्याय, खऱ्याचे खोटे, जुलूम जबरदस्ती व घरसोडगिरी वगैरे फार चालून लोक रंजीस येतात. कोणाला जागा किंवा नेमणूका देणे झाल्या तर त्याबद्दल तो नजर मागतो. नजर देणारा नालायक असला तरी त्यास तो लोभाने लायख ठरवितो व त्या नालायख कामदाराने लोकास लुटले तरी त्याजकडून घेतलेल्या नजराण्याने ओशाला असल्यामुळे त्याबद्दलची दाद घेण्यास तो उदासीन व बेपर्वा असतो. असे अनेक प्रकारचे उपद्रव चालू होतात. त्याचे आप्त स्वकिय, आश्रित, खुषमस्कऱ्ये वगैरे मंडल जे त्यांचे भोवती असते ते त्याचा पैसा त्याला भुलवून ओढीत असतेच, अशी पैशाला ओढ लागली म्हणजे राजाचे खजिन्यात तूट

येते. आणि तूट आली म्हणजे वर लिहिल्या प्रकारची नवीन पैसा उकळणी चालते. तेव्हां नव्या नव्या बाबी आणि नवे नवे हक्क तो लोकावर बसविण्यास शिकतो. आपल्या राज्यात पूर्वीपासून स्ट्यांप नसला तरी, शेजारी इंग्रज सरकार स्ट्यांपचा कर घेतात व त्यात त्यास मोठी किफायत होते हे बघून तो त्यांचे अनुकरण करू लागतो. ह्याप्रमाणे रयतेपासून पैसा पिळून काढण्याची कसबे शेजारच्या इंग्रज सरकारकडून तो शिकतो. परंतु रयतेला सुखावह कोणत्या गोष्टी ते सरकार करीते, त्यांचे अनुकरण तो करीत नाही. व त्या गोष्टी तो शिकत नाही. इंग्रज सरकार रयतेचा पैसा उधळीत नाही. उत्साह, महोत्सव, चैनबाजी वगैरेमध्ये ते पैसा खर्चीत नाही. सरकारी कामास लागेल तितका पैसा मात्र ते खर्चिते व जो खर्च होतो त्याचा रयतेस हिशेब दाखविते. शाळा, पुस्तकालय, दवाखाने, शास्त्र व कला यांचे शोध रयतेमध्ये माहीतगारी आणि ज्ञानप्रसार, कायदे, व्यवस्थित व नियमित राज्यकारभार, नवीन ग्रंथ बुद्धी वगैरेकडे ते लक्ष देते. आणि ज्या कामात जो पैसा खर्चिते तिकडे बघत नाही. आणि त्याची बरोबरी करण्याकरिता अथवा ते करीतांत म्हणून आपणही चढाओढीने करपट्ट्या व हक्कबाजी रयतेच्या बोडक्यावर लादितो. परंतु त्या वसूल झालेल्या पैशाचा विनियोग मुलाचे लग्न झाले त्याजकडे दोन लाख, मुलीचा विवाह झाला तिकडे दीड लाख, गणपतिचा उत्सव केला त्याला पन्नास हजार, नजरबाग बांधली तिला दहा लाख, रामनिवास नावाचे आरामस्थल बांधले तिकडे वीस लाख, अशा कामाकडे व मिजासीकडे व्हावयाचा आणि शेवटी असे खर्च करीता करीता राज्यावर किंवा संस्थानावर कर्ज फार वाढले म्हणजे आपल्यापेक्षा मोठ्या राजाकडून किंवा सार्वभौम सरकारकडून जबरदस्तीने व्याजाने कर्ज काढावे किंवा त्यांचे हवाली राज्य अथवा संस्थान करून आपण अधिकारच्युत व्हावे इतक्या थरावर गोष्टी येतात. तेव्हां हे प्रकार चांगले कां?

संस्थानिकांनी आणि राजे लोकांनी आता ही पूर्वीची अनागोंदी विसरली पाहिजे. स्तुतीपाठक, खुषमस्कऱ्ये व आतप्स्वकिय दूर सारले पाहिजेत. चैनबाजी व विलास यांजकडे दुर्लक्ष केले पाहिजे आणि राजा प्रजेचे नाते वर लिहिले आहे ते ओळखून त्याप्रमाणे वर्तन ठेविले पाहिजे. आजपर्यंत प्रजेला डोळे नव्हते. तिला ज्ञान नव्हते. व तिला राज्यवर्तनात लक्ष देण्याइतकी समजूत नव्हती. म्हणून सर्वांची अनागोंदी आणि बेबंदपाच्छाई चालली. परंतु आता लोकास डोळे आले आहेत. ते शेजारी इंग्रज सरकारची शहरी व कारभार बघून शहाणे झाले आहेत व त्यांना राजाप्रजेचा संबंध आणि राज्यधर्म ही पूर्णपणे समजू लागली आहेत. इंग्रजीत द्रव्याची जरी विशेष वृद्धी होत असलेली दिसत नाही तरी ज्ञान आणि गुणदोष विवेचकबुद्धी यांचा वृद्धी इंग्रजांच्या सहवासाने त्यांच्या शांत कारभारातील ग्रंथवृद्धीने, शाला खात्याने, कायद्याने व न्याय पद्धतीने होत असलेली दिसते हे निःसंशय आहे. इंग्रजी राज्याचे धोरण असे दिसते की प्रजेने आपल्या अकलेने आणि ज्ञान संपन्नतेने पुढे पाऊल टाकीत जावे. असा इंग्रज सरकारचा उदार हेतू आहे. म्हणूनच त्यांचे राज्य इकडे स्थापन झाल्यापासून प्रति दहा वर्षांनी प्रजा अधिकाधिक शहाणी व ज्ञानवान होत चालली आहे असे दिसते. परंतु एतद्देशीय राजे व संस्थानिक यांच्या राज्याचे धोरण आणि त्यांचा हेतू बघितला तर असे आढळेल की त्यांच्या २१ पिढ्या ५०० वर्षे सारख्या राज्य करीत असल्यातरी त्यांच्या प्रजेचे म्हणून अकलेत किंवा ज्ञानवत्तेत पुढे पाऊल पडले आहे असे दिसावयाचे नाही, तर उलट प्रजा अधिकाधिक अज्ञानांधकारात बुडत असलेली दिसते. तेव्हां अशा रितीने राज्य वंभव सुखाचा निभाव लागणे कठीण आहे. तर सर्व लहान मोठ्या राजांनी व संस्थानिकांनी असे पक्के समजले पाहिजे की आम्ही वारशाने म्हणा किंवा पूर्व-सुकृताने म्हणा हे राजपद पावलो आहोत खरे. परंतु आम्हाला आमच्या सद्सत्कृत्याचा जाब इहपरम अशा दोन्ही ठिकाणी दिला पाहिजे. प्रजेजवळून जो वसुल व करभार येतो त्याचा विनियोग कसा काय करितो याचा हिशेब रयतेला दाखविला पाहिजे आणि प्रजेच्या संबंधाने आपण काय न्यायान्याय, कपटाकपट आणि

सद्वर्तन केले याचा झाडा ईश्वराजवळ दिला पाहिजे. याकरिता सर्व राजे व सर्व संस्थानिक यांणी खाजगी खर्च किती करावयाचा आणि दौलतीपलिकडे (प्रजाकार्याकडे) किती खर्च व्हावयाचा याच्या इयत्ता व नियम ठरविले पाहिजेत. येईल ती जमा, होईल तो खर्च आणि राहील ती शिल्लक हा बिनहिशोबी आणि मुका मुकाकारभार चालविण्याचे पूर्वीचे साधे भोळे दिवस जाऊन हल्ली हिशोबी कामात चोख, वर्तनात सरळ आणि राज्य कारभारात सच्चा असा राजाच प्रजेला आवडेल व प्रजा त्यासच अनुकूल राहील. नाही तर केव्हांच भंबेरी उडून जाईल याचा नियम नाही. रयतेचा पैसा आपल्या निर्वाहापुरता घेऊन बाकीचा तिच्याच सुखशांतीकडे आणि तिच्यामध्ये विद्या ज्ञान, उद्योग, व्यापार आणि सन्मान वाढविण्याकडे खर्च करावयाचा हे धोरण ठेविले पाहिजे. रयतेकडून जो एवढा पैसा येतो तो तिच्याच सुखशांत्यर्थ व त्यातून आपल्या नौकरीपुरता आपण मुशाहिरा घेऊन बाकीच्या पैशाचा विनियोग तिच्या कामाकडेसच आणि तिच्या कामास जितका पैसा लागेल तितकाच वसुल करावा ह्याबद्दलच व्यवस्था पाहण्याचे राजाचे मुख्य कर्तव्य आहे. आणि अशी व्यवस्था व टापटीप ठेवणारा जो राजा तोच प्रजेला प्रिय व सत्पात्र वाटतो. परंतु असे राजे किती सापडतील? राज्य मिळविणारे होते ते पासोड्या पाचम्या बांधून व खांद्यावर भाले टाकून फिरत होते. त्यांनी भाकर झुणका खाऊन दिवस काढले आणि राज्ये कमाविली त्यांचे ऐषआराम आणि डामडौल हल्लीच्या ऐत्या पिठावर रेघा ओढणाऱ्या ऐदी राजाप्रमाणे बिलकूल नसून तसे डामडौल करण्यास त्यांना वेळही नव्हता. परंतु आताचे राजे व संस्थानिक सर्व रिकामे असून त्यांना बाह्यभिती नाहीशी झाल्यामुळे स्वस्थपणे राजवाड्यात व महालात बसून छंदफंद, विलाससुखे आणि चैनबाजी भोगण्याच्या गोष्टी आठवू लागल्या. पण हीच काही राजकुलात जन्म घेण्याची सार्थकता नाही असे त्याणी समजले पाहिजे. बाह्यभिती नाही, तेव्हा घरात काय कमीजास्त आहे त्याबद्दलची व्यवस्था बघितली पाहिजे. मितव्ययी आणि प्रजाजनसंतोषप्रद कारभार या गुणांनी युक्त असणे हेच हल्लीच्या राजाचे भूषण आहे. पण हे भूषण कोणामध्ये आहे? तीन कोटींचे राज्य हाकणाऱ्या बड्या राज्यापासून तो दोन गावांची जाहगिरी खाणाऱ्या जाहगिरदारापर्यंत सर्वांची एकसारखीच असंतोषवह स्थिती असते. जो तो राजा संस्थानिक व जहागिरदार सदैव अशा चिंतेत व विवेचनात असलेला आढळेल कीं, यंदा जास्त वसूल कसा होईल? घरात मुलामुलींच्या विवाहाची दोन कार्ये व्हावयाची आहेत, त्याला लाख पन्नास हजार अथवा दहा-पांच हजार रुपयांचा खर्च होणार आहे. तेव्हा ते रुपये काढावे कसे? परंतु त्याच्या मनात हा विचार कधीच येत नाही की, आपण परंपरेने आज शेदीडशे वर्षांपासून या लोकांकडून वसुल घेत आलो. त्याचा मनास वाटेल तसा खर्चवेच केला व त्यांणी त्याचा हिशेबही मागितला नाही. तेव्हा आता ही वहिवाट बंद करून व्यवस्थेने त्यांच्या पैशाचे त्यांना सुख देऊ. त्यांच्या कधी स्वप्नात तरी अशी गोष्ट व असा विचार येतो काय की, आज या शे-दीडशे वर्षांत रयतेपासून जे लाखो किंवा हजारो रुपये घेतले व त्यांचे मोठमोठाले टोलेजंग वाडे, हवेल्या, मंदिरे, विलासस्थाने आणि बागा वगैरे बांधिली त्याचा रयतेच्या सुखाकडे कितीसा उपयोग झाला असेल, व तिला त्यांजपासून काय लाभ झाला असेल? त्यांना कधी अशी कल्पना तरी होत असेल काय की, आम्ही जे आजपर्यंत लक्षावधी किंवा सहस्त्रावधी रुपयांच्या किमतीचे शेले दुपट्टे पांघरून फाडिले अथवा जडजवाहिराचे अलंकार व दागिने ज्यांच्या पैशानी घेऊन वापरिले त्यांचा त्यांना योग्य मोबदला आमच्या पूर्वजांकडून किंवा सध्या आम्हाकडून काय मिळत आहे? रामाय तस्मैनमः! हे विचार या गोष्टी आणि या कल्पना त्यांच्या मानसी कधीच यावयाच्या नाहीत व त्या मनात आणण्याकरिता त्यांचे जन्मही नाही असेच ते समजतात. ज्याचे त्याचे लक्ष स्वतःच्या ऐषआरामाकडे आणि चैनबाजीकडे असते. परंतु जिच्या पैशावर या मौजा व गमजा चालतात त्या बिचाऱ्या प्रजेचे त्यांना स्मरणही नसते.

वरील स्थिती सर्व लहान-थोर राजे, संस्थानिक व जहागिरदार यांची एकसारखी आहे. सर्वत्र असंतोषावह कारभार आणि शोचनीय लोकस्थिती दृष्टीस पडते. मोठ्या राजे संस्थानिकात आज निजाम, शिंदे, गायकवाड व होळकर हेच काय ते आहेत परंतु त्यांचे राज्यात कितीसे लोक सुखाकडे लक्ष दिलेले आढळेल ? त्यांचे मुलखात तर असे आढळेल की, त्याणी रयतेच्या सुखाकरिता काही एक केले नाही. आजपर्यंत लोकांकडून जो वसूल आला तो सर्व ते आपल्या छंदाफंदातच पुरवीत असत. वर जे रयतेच्या संरक्षणाचे व बंदोबस्ताचे तीन मार्ग सांगितले त्यापैकी पहिल्या दोन मार्गाकडेसच सर्व राजे व संस्थानिकांस लक्ष दिले पाहिजे. म्हणजे आपल्या मुलखातील न्यायमनसुबीचा बंदोबस्त आणि विद्यावृत्ती, शेती व कारागिरी, कारखाने व व्यापार यांचा प्रसार यापेक्षा जास्त गोष्टीकडे लक्ष देण्याचे आता मुळीच कारण नाही. त्यांना परशत्रू अथवा परोपद्रव यांची सार्वभौम इंग्रज सरकारामुळे मुळीच भिती राहिली नसून त्या संबंधाचा सर्व बंदोबस्त करण्याचा पतकर इंग्रज सरकारने आपलेकडेसच घेतला आहे. तेव्हां राजे व संस्थानिक यांणी वरील अविशिष्ट दोन मार्गाच्या व्यवस्थेकडेच लक्ष दिले पाहिजे व येणे करून एक प्रकारे त्यांजवरचा बोजा व काळजी दूर झाल्यामुळे त्याना लोकांच्या इतर अंतःसुखाकडेच लक्ष देण्यास चांगली फुरसद होण्याजोगी आहे. रयतेची आजादी कोणत्या गोष्टीने होईल त्या गोष्टीच्या योजनेकडे आता एतद्देशीय राजांनी व संस्थानिकांनी आपला काळ व कल्पनासामर्थ्य खर्चिले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रजा अज्ञानी आहे तिला ज्ञानवान केले पाहिजे. एतद्देशीय संस्थानातून व मुलखातून फिरून पाहिले असता तेथील लोक इंग्रजी मुलखातल्या लोकांपेक्षा अज्ञानी, गैरमाहित आणि औदुंबरकिटकवत आढळतात. त्यांना छापखाना कलाकौशल्याचे कारखाने व बाह्य प्रदेशाचे ज्ञान वगैरे काही एक नसून अजागलवत् शून्यज्ञानी असतात. यांचे उदाहरणार्थ फार लांब जाणे कशाला ? गुजराथेतील गायकवाड संस्थान हे याविषयी उत्कृष्ट उदाहरण आहे. शेजारी अहमदाबाद, खेडा, भडोच, नडीयाद सुरत वगैरे इंग्रजीतल्या जिल्ह्यातून दहा-वीस छापखाने व दहा-पांच वर्तमानपत्रे आहेत. परंतु बडोद्यात कडीपट्टणास किंवा नौसारीस त्या छापखान्याचे किंवा वर्तमानपत्राचे नांव तरी आहे काय ? तसेच मद्रास, सोलापूर वगैरे शेजारी वाटेल तितके छापखाने व वर्तमानपत्रे आहेत. परंतु हैद्राबादेस त्याचा गंधही नाही. इंदूर, ग्वाल्हेर, उदेपूर, जयपूर, जोतपूर या सर्व ठिकाणी हाच नमुना आहे. त्याच्या शेजारी आग्रा, नागपूर, सिंध वगैरे इंग्रजीतल्या शहरात व प्रांतात छापखाने व वर्तमानपत्रे बेधडकपणे चालतात. पण देशी राज्यात त्याच्या नावाचा देखील विटाळ होतो. तेव्हां इंग्रजीप्रमाणे लोकांना स्वातंत्र्य आणि मोकळीक याचे देशी राज्यातूनआणि संस्थानातून नांव तरी कशाला ? याचप्रमाणे सडका, पूल, रस्ते या सर्व प्रकारांनी मांडलिक राजाचे मुलूख गैरव्यवस्थेचे आणि गैरसोयीचे आहेत. सारांश, इंग्रजी मुलूखात अशी सुधारणा वाढत चालली आहे व रयत शहाणी होत चालली आहे तशी देशी राज्यात व संस्थानात झाली पाहिजे आणि या सर्व सुव्यवस्थेकरिता राजे व संस्थानिक यांनी इंग्रजीतले कामदार न्यावे लागतात.

कोणी म्हणतात इंग्रजांनी सर्व सृष्टी नवी निर्माण केली. वस्तुतः पाहिले असता हे म्हणणे काही अयथार्थ दिसत नाही. सर्व प्रकारच्या विद्या, कला कौशल्य, न्याय, तर्क, मीमांसा, शोध, युक्त्या वगैरे सर्व मानवी बुद्धीचा विकास दाखविणारे गुण इंग्रजीमुळेच या नरश्री व नष्टमंगल देशात लोकांना आठवून आले. एरवी येतांना त्यांच्या योगाने व्हाव्या त्या सुधारणा आणि लोकसुखाची साधने एतद्देशीय राजांनी त्यांना गुरूस्थानी मानून त्यांचा कित्ता गिरवावा हे योग्य आहे. इंग्रजांनी कितीही सुधारणा केल्या आणि कितीही लोकांच्या सुखवृद्धीकडे लक्ष दिले तरी एतद्देशीय राजे व संस्थानिक यांनी जर तशा सुधारणा केल्या आणि तसे लक्ष दिले तर त्यांच्या प्रजेस विशेष सुख व आनंद होईल, यात संशय नाही. इंग्रज सरकार परकीय असल्यामुळे किती एक

आवश्य करण्यासारख्या सुधारणा त्याच्याने करवत नाहींत. त्या करण्याचे श्रेय आमच्या राजेरजवाड्यांनी आणि संस्थानिकांनी घेतल्यास त्यात त्यास मोठे भूषण आहे. इंग्रज सरकारला लोकांविरुद्ध व धर्माविरुद्ध एखादे योग्य कृत्य करण्याचा मोठा अंदेशा वाटतो. त्याने सती, दूधपिती (कन्याहत्या), जलसमाधी, बगाडे इत्यादी इकडील अज्ञान लोकांच्या वेड्या वेड्या व भयंकर चाली व अनर्थ मोडले. तरी किती एक जुलूम आणि अडाणीपणाची कृत्ये अद्यापि तशी अप्रतिबद्ध चालली आहेत. हे जुलूम व ही अडाणीपणाची कृत्ये म्हणजे विधवावपन, विधवाविवाह प्रतिबंध आणि बालविवाह वगैरे होत. ही बंद करण्याचा सरकारचा यत्न परकीयपणामुळे सिद्धीस जात नाही. परंतु देशी राजाचेही तिकडे लागावे तसे लक्ष लागत नाही ही शोचनीय गोष्ट आहे. इतकेच नव्हे, तर उलट त्या गोष्टी कायम ठेवण्याकडेच कित्येक हट्टाग्रही व बदसल्लागारमंत्र्याच्या धोरणाने वागणाऱ्या असंमजस राजांचा ओढा असलेला दिसतो. ही तर त्याहूनही विशेष शोचनीय गोष्ट आहे.

कै. वा. खंडेराव महाराज गायकवाड यांच्या हट्टाचे आणि दुराग्रहाचे कृत्य सुप्रसिद्धच आहे. सीताराम जोशी नासिककर या नावाचा एक मनुष्य खंडेराव महाराजांचे कारकीर्दीत बडोद्यास दानाध्यक्ष होता. त्याने महाराजांस बडोद्यामध्ये संकेशा विधवांचा फार जमाव जमत चालला आहे हे बरे नाही. त्यांचे शास्त्रोक्त रीतीने वपन झाले पाहिजे. या देशी राज्यात असा खुशीचा व्यवहार उपयोगी नाही. वगैरे गोष्टी सांगून त्यांचे मन कलुशित केले. हे ऐकिल्यावर मग महाराजांचा क्रोध काय विचारावयाचा? विधवा बायकांची आणि हयात डोकीवर केस ठेवण्याची खुशी? काय विशाद आहे? झाला लागलाच एकसंध हुकूम की, सर्व सकेशा विधवांच्या केशकलापावरून नापिताने आपली पोलादी फणी फिरवावी! मग त्या हुकूमाप्रमाणे गोष्ट अमलात येण्यास काय उशीर! राजा बोले आणि दल हाले! बिचाऱ्या बायकांच्या केसांचे पर्वत पडले! येणेप्रमाणे खंडेराव महाराजांनी मोठा जुलूम केला. ही गोष्ट पुढे इंग्रज सरकारास कळल्यावर ते महाराजांवर फारच खपा झाले होते. तेव्हां अशा प्रकारच्या असंमजसपणाच्या गोष्टी एतद्देशीय राजे व संस्थानिकांकडून त्यांच्या सार्वभौम सरकारच्या मर्जीविरुद्ध होणे अनिष्ट असून सुधारलेल्या राष्ट्र पद्धतीच्या अगदीच विरूद्ध आहे. याविषयी सर्वांनी जपले पाहिजे. बदसल्लागार मंडळीच्या विचाराने चालता कामा नये. सारांश, आमच्या देशी राजांस चांगल्या विचारी आणि पोक्तबुद्धीच्या मंत्र्यांची मोठी उणीव आहे. ती त्यांणी आपल्या निवडणूकीने दूर केली म्हणजे झाले. आपल्या देशस्थितीकडे पाहिले तर पृथ्वीत हिंदुस्तानसारख्या व्यापार कोणत्याही देशात चालत नाही. सर्व प्रकारची धान्ये, धातू, कापूस वगैरे या देशातून परदेशात जातात. व तेथून त्यावर कारागिरी होऊन तो माल इकडे येतो. परंतु हा व्यवहार एतद्देशीय लोकांचे हातांनी बिलकूल होत नाही. याचे कारणाचा राजे व संस्थानिकांसारख्यांनी काहीच विचार करू नये काय? स्वदेशीय लोकांनी पावसापाण्याचे खपून पिकवावे आणि परदेशीय व्यापाऱ्यांनी येऊन तो माल खरेदी करून आपल्या देशात पाठवावा. एरंडी, तीळ, जवस, ताग, अंबाडी, हळद आणि मोहरी वगैरे सर्व तिकडे पाठवावी आणि मग तिकडून येईल ते तेल दोऱ्या रंग वगैरे इकडे त्याजपासून खरेदी करावे. याप्रमाणे इकडील सर्व उद्योग जाता जाता हल्लीच्या दारिद्र्यावस्थेत येऊन पोहोचला. ही या देशाची गति. आणि जपान, अमेरिका वगैरे देश हा सर्व गौडबंगाली थाट समजून शंभर शंभर वर्षांत अगदी भिकाऱ्याचे ऐश्वर्यवान होऊन गेले. हा प्रकार काय आहे? दुसरे देश आपल्या उद्योगाने स्वतंत्र व कर्तबगार व्हावे आणि आमचा देश सर्वस्वी परावलंबी होऊन त्याचे पाऊल दिवसानुदिवस भिकारपणाच्या खोल डबक्यात पडावे व त्याला एकसारखे अचके बसावे हे काय म्हणून? देशाच्या ह्या दुर्दशेकडे किती राजांचे लक्ष गेले आहे? आमच्या देशाने दुसऱ्याचे पोषण करून आपण उपाशी मरावे व सर्व धंदे, परकीय लोकांचे स्वाधीन करून

आपण त्यांच्या तोंडाकडे व कौशल्याकडे टकमक बघत बसावे असे आमचे दुर्भाग्य आहे काय? हा सर्व एतद्देशीय राजे व संस्थानिकांचा उदासीनपणा होय.

विद्यावृद्धीच्या संबंधाने तर राजे लोकास आपल्या मुलखात योग्य तजविजी आणि व्यवस्था ठेविता येण्यासारख्या बहुत आहेत. दिवसेंदिवस सर्व विद्या वाढत चालल्या असून त्यांच्या संबंधाने जास्त जास्त शोध निघत आहेत. वैद्यक, ज्योतिष, शिल्प वगैरेंची वृद्धी किती झाली आहे. याजबद्दलचे वेगळे विवेचन करणे नकोच आहे. परंतु त्यांजकडे देशी राजांनी कधी तरी लक्ष्य दिले आहे असे दिसत नाही. राजवाड्यातून व संस्थानातून हजारो रुपयांची वेतने देऊन हकीम ठेविलेले आढळतात. परंतु आर्यवैद्यकाला आणि वैद्यांना उत्तेजन देऊन आपल्या पूर्वीच्या वैद्यशास्त्राला उर्जितावस्थेत आणण्याचा कोणाही भाग्यशाली राजाने प्रयत्न केला नाही. त्याचप्रमाणे हल्ली ज्योतिषाचे संबंधाने फार अनैक्य वाढले आहे. याविषयी ऐकमत्य करून उपातिः शास्त्राला चाल न देण्याचा कोणीच संपन्न राजे किंवा संस्थानिक मनात आणीत नाहीत. हल्ली चार पंचांगे चालतात. मारवाडी पंचांग, छत्रे किंवा पटवर्धनी पंचांग, वासुदेव पंचांग आणि गावठी पंचांग या चौघांचेही निरनिराळे पंथ आणि निरनिराळी मते आहेत. तेव्हां असे कां असावे? ज्योतिषशास्त्र म्हणजे दृष्टीगोचर सिद्धांतविषय आहे. ह्याबद्दल वाद व मतभेद कां असावा हे समजत नाही व तो वाद आणि मतभेद मोडण्याविषयी राजेराजवाड्यासारखे कोणीही श्रीमान लोक पुढे होत नाहीत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. आपल्या प्रजेच्या सुखदुःखाच्या व हिताच्या गोष्टीची तजवीज त्याणी निदान आपापल्या राज्यात तरी लावावी. परंतु तसा भाग कोठेच दिसत नाही. सर्वत्र ग्यानि व ग्लानि दिसते. उत्साह व पाणीदारपणा, आवेश, अभिमान, चाड, महत्वाकांक्षा वगैरे कोठेच कोणामध्ये वसत नाही ही मोठी लज्जेची गोष्ट आहे.

वर लिहिल्याप्रमाणे सर्व प्रकारे आमच्या राजे व संस्थानिकांकडे फार कमीपणा येतो व तसा सर्वत्र अनुभवही आहे. अलिकडे बहुतेक ठिकाणी नवीन तरुण राजपुत्र राज्याधिष्ठित झाले असून त्याजवर इंग्रज सरकारचे लक्ष असल्यामुळे त्यांचे विद्याभ्यास आणि शिक्षणक्रम इंग्रजी रीतीप्रमाणे होऊन त्यास सुधारणेचे वारे लाभलेले आहे. व त्याचा योग्य परिणाम होऊन ते ते राजपुत्र आपापल्या मुलुखात वर सांगितल्याप्रमाणे इंग्रजी तऱ्हेच्या सुधारणा सोयी आणि शिक्षणक्रम सुरू करून आपल्या मुलूखाची इंग्रजी मुलखाशी बरोबरी करतील, अशी आशा व उमेद आहे. आता आजपर्यंत अशा प्रकारची सुधारणा किंवा योजना का झाली नाही व तशी होण्याला काय हरकत होती, याचा विचार करून पाहिले तर त्यात फारसे आश्चर्य नाही. राजे लोक हे स्वभावतः भोळे, निष्कपटी व परंपरेचे श्रीमंत असतात. त्यामुळे त्यास जगतीय अनुभव कमी असून त्यांचे भोवतालचे जे लफंगे, आर्जवी, ढोंगी हलकट वगैरे लोक असतात. ते त्यास फसवितात. हे दुष्ट लोक आपल्या राजास वाटेल तशा थापा येऊन व थापा मारून पैशाचा वाटेल तसा धुव्वा उडवितात व त्यास नाना प्रकारचे छंदफंद लावून ते पैशाचा चूर करून टाकतात. यामुळे रयतेकडून वसूल आलेला पैसा तिच्याच कामाकडे लावायचा तो मुळीच न लागता राजे लोक त्या मूर्ख व आपस्वार्थी लोकांच्या नादी लागून आपल्या मालकीनेच त्यांचा अपव्यय करीतात. तेव्हां अर्थात रयतेच्या सोयी व सुधारणा तशाच पडून राहतात. तिच्या त्या भोळ्या व दुष्ट परीजनसमाकुळ राजाचे दरबारात दादही न लागून तिच्याबद्दल कोणीच काळजी बाळगीत नाही. राज्यात जे कामदार असतात तेही असेच राजाचे स्तुतीपाठक व आर्जवी किंवा अक्षरशत्रु असे आप्तस्वकीय लोकच असल्यामुळे राज्यात सुधारणेचे पाऊल शिरकण्यासही बाव नसते. विद्यादेवी तर कधीच हद्दपार केली असल्यामुळे मौर्ख्य व अज्ञान या झोटिंगांचेच सर्वत्र प्राबल्य असते. बरोबर आहे, लोक विद्वान व ज्ञानी झाले म्हणजे वरील कामदारास आणि खुषमस्कऱ्यास यथेच्छाचार करण्यास कसे सापडेल? यासाठीच पहिल्यापासून रयतेने अज्ञान व मूर्ख राहावे व अशी योजना केली असते व

असे लोक मूर्ख व अज्ञानी राहीले म्हणजे त्यांच्या त्या मौर्ख्याचा व अज्ञानाचा त्या लोकांस चांगला फायदा मिळतो. परंतु हे चांगले नाही असे राजांस आपापसाच समजू लागले आहे. या नवीन राजसंततीने ही पूर्वीची वेडे व खुळे आपल्या राज्यातून काढून सर्वत्र सद्विधाप्रसार लोक सौख्य याजकडे लक्ष दिले पाहिजे. विद्या संस्काराने आपले मन जसे प्रफुल्लित झाले आहे तसेच आपल्या रयतेचेही करण्याकडे धोरण ठेविले पाहिजे. छापखाने, कारखाने, कलाकौशल्याच्या शाळा, देशी कारागिरीस उत्तेजन, रयतेचे पुत्रवत पालन रयत आपली धनीन व आपण तिचे चाकर हा सेव्यसेवक भाव, लोकस्वातंत्र्य आणि रयतेचा दिलखुलास राहील, अशी राज्यनीती वगैरे गोष्टी-कडे त्याणी नेहमी आपला कल ठेविला पाहिजे. आपले राज्यात संभावित व थोर लोक कोण कोण किती आहे त्यांच्या यादी करून व त्यांस किताबे वगैरे देऊन त्यांचा सन्मान राखण्याची योजना इंग्रजीत जशी आहे तिचे अनुकरण देशी राजांनी केले पाहिजे. त्याचप्रमाणे विद्वान लोक कोणते आहेत त्याची पारख होऊन त्यांना थोर थोर अधिकारावर चढविण्याची व्यवस्था केली पाहिजे. आपल्या मुलूखात इंग्रजीतल्याप्रमाणे शाळाखाते काढून मुले तयार केली पाहिजेत. कायद्यांनी सर्व राज्यकारभार इंग्रजीप्रमाणे बांधला जाऊन सुयंत्रता व व्यवस्थितपणा आणिला पाहिजे. आणि सर्व कामात आपणच लक्ष घालून आपल्याला त्रास व कारभाराची फरफर न करिता ज्या त्या कामांतील वाकबगार लोकांकडून त्या त्या कामकाजांचा चोखपणा ठेवला पाहिजे. कित्येक ठिकाणी अशी गोष्ट पाहाण्यात येते की राजे व संस्थानिक आपले वकूब व राज्य कर्तृत्व ही दाखविण्याकरिता प्रत्येक कामात दुसऱ्यावर न विश्वसंता सर्व कामे आपणच स्वतः बघतात. परंतु येणेकरून सुख होत नाही. सर्वच कारभाराची हौस व हव्यास एकट्यानेच धरिला तर तो कारभार निर्दोष व संतोषवह होत नाही आणि या धोरणावरच राणी सरकारचे येवढे विस्तीर्ण राज्य तिच्या मंत्रीमंडळाकडून चालते. हे सर्वांनी लक्षात ठेविले पाहिजे. सारांश आपले राज्य चिरसुखी कोणत्या उपायांनी होईल याचे चिंतन नेहमी मनात चालवावे.

वर सांगितल्याप्रमाणे मुर्खजनांच्या सहवासांतही कोणी कोणी बुद्धिमान व विचारी राजे निघून त्यांनी त्यांचे गौडबंगाल ओळखून त्यांजपासून ते अलग राहिले. व त्यांच्याने करवले तितके सुव्यवस्थेने राज्य केले अशी कित्येक उदाहरणे इतिहासात सापडतील. परंतु तो शहाण्या राजांची परंपरा तशीच पुढे चालावी असा सृष्टीक्रम कोठेच आढळत नाही. सर्वकाल सूज्ञ, समंजस व शहाणे असेच लोक निपजावे असा ज्याप्रमाणे ईश्वरी संकेत नाही त्याप्रमाणे राजकुलातही सर्वदा उत्तम व राजधर्माने वागणारीच संतति व्हावी असा काही ईश्वराचा हेतू नाही. परंतु राजदरबाराची खरी व्यवस्था अशी असते कीं वेडे राजे झाले तरी त्याजवर मंत्रिमंडळाचे पांघरूण असून त्यांच्या वेडे-पणाचा दुर्लौकीक होत नाही. राजांचे मंत्रिमंडळ त्यांचा बोज राखून सर्व राज्यकारभार व्यवस्थेने आणि सुयंत्रतेने निभाविते व प्रजा निरुपद्रवी आणि संतुष्ट ठेविते. परंतु तशी मंत्रिमंडळाची व्यवस्था आपल्या या देशात नसल्यामुळे तेथील राजवंशात एक दोन पिढ्यामध्ये पराक्रमी राजे झाले की त्यांचे मागून एक कुलंगार निघून मागच्या कारकीर्दीवर व लौकिकावर पाणी घालतो अशा प्रकारचे दुष्ट व दुर्मती राजेवेण दुर्योधन, अलमगीर, संभाजी, बाजीराव, टिपुसुलतान, दौलतराव मल्हारराव वगैरे हिंदुस्थानच्या इतिहासात प्रसिद्ध असून त्यांचा दुर्लौकीक योग्य मंत्री नसल्यामुळे सर्व जगभर झाला आहे. कलुषा, डेंगळे, नेने, अशी प्रधानमंडळी आणि मसलती लोक मिळाल्यावर राजाना दुष्कीर्तिशिवाय दुसरे कोणते फळ मिळावयाचे आहे आणि हिंदु-स्तानांत तर अशा राजांची माला विशेष करून दिसते ! आता हि अशी राजमालाच हिंदुस्थानच्या नशिबी का यावी यांचे कारण पाहिले तर लोकांमध्ये विद्याभाव आणि ज्ञानशून्यता हीच त्या राज-कारणाची जनक होत असे दिसते. लोकांस अक्कल व शहाणपणा असला म्हणजे ते असल्या वेड्या बावळ्या व मनस्वी राजांचे ढंग व चार काही एक न चालू देता आपल्या राज्याचे वैभव आणि

किर्ती कायम राखितात. परंतु पहिल्यापासूनच हिंदुस्थानची प्रजा परावलंबी व मेणतुल्या असल्यामुळे दुष्ट लोकांच्या स्वार्थसाधनाला चांगले फावत आलेआहे. तसा काळ आजही जे ज्ञानशून्य व बेअकलीचे राजे कोठे असतील त्यांच्या दरबारात असेल. परंतु त्यांनी आता लौकरच उमजून आपले वर्तन सुधारले पाहिजे. नीच व कार्यसाधू लोकांच्या मोहपाशातून आपणास मोकळे करून व सुधारलेल्या राष्ट्रांचे स्थितीकाल वर्तमान बघून त्याप्रमाणे आपला राज्यकारभार चालविला पाहिजे. इंग्रज सरकारच्या कृपेने सर्व प्रकारच्या सौरक्षाची तर आता मुळीच वाण नाही व ह्या प्रीत्यर्थ पूर्वीप्रमाणे आपल्या खजिन्यांतून राजे व संस्थानिक यांस अवाढव्य खर्च करावा लागत असे तोही हल्ली करावा लागत नाही. तेव्हां लोक सुधारणेस व तत्प्रीत्यर्थ लागणाऱ्या खर्चास तो वाचणारा पैसा जास्त उपयोगी पडला पाहिजे. परंतु त्याप्रमाणे राजे लोक वर्तन करून जगास आपले राज्यकर्तृत्व कौशल्य दाखवतील तो सुदीन समजला जाईल. उधळेपणाचे व चैनबाजीचे खर्च न करता रयतेचा पैसा रयतेच्या उपयोगार्थ व हितार्थच खर्च झाला पाहिजे तर एतद्देशीय राजे व संस्थानिक यांस आपले वैभव, अधिकार, लोकप्रिती आणि सर्वभौम कृपा रक्षण करून आपल्या जन्माचे व जीविताचे सार्थक झाले असे मानणे व जगास दाखविणे असेल तर उपरिनिर्दिष्ट व्यवस्था व विचार अमलांत राखणेही अत्यंत लाजिरवाणे आहे हे सर्वांनी समजले पाहिजे आणि असे समजून वर्तन ठेविले पाहिजे तर निभाव लागणार आहे.

शेवटी राजाप्रजेच्या संबंधाविषयी प्रसिद्धीविषयी प्रसिद्ध धर्मशास्त्राचे काय म्हणणे आहे त्या विषयी चार शब्द लिहून हा निबंध पूरा करू इच्छितो.

राजास स्वकष्टचिंतीत द्रव्याचा भाग का द्यावा याविषयी मनूने पुष्कळ लिहिले आहे. त्यात ईश्वराने प्रथमतः राजा उत्पन्न केला याविषयी प्रथमतः तो म्हणतो :-

अराजके हि लोके ऽस्मिन सर्वतो विद्रुते भयात्।

रक्षार्थमस्य सर्वस्य राजानमसृजत्प्रभुः ॥ २ ॥ -७

"राजावाचून प्रजा भय पावली म्हणून सर्वांचे रक्षणाकरिता ईश्वराने राजा केला" राजाने कर किती घ्यावा याविषयी मनु म्हणतो :

पंचाशभाग आदयो राज्ञा पशुहिरण्ययोः।

ध्यान्यानामष्टमो भागः षष्टो द्वादश एव वा ॥ १३० ॥-७

"राजाने पशु व हिरण्य यांच्या लाभापैकी पन्नासावा हिस्सा आणि धान्याचा आठवा किंवा सहावा हिस्सा जमीन पाहून घ्यावा. पुढे मनु आणखी असे लिहितो :-

नोच्छिधादात्मनो मलं परेषां चतितृष्णया ॥ १३९ ॥-७

"अतिलोभाने राजाने जास्त कर घेऊन आपला नाश करून घेऊ नये."

पुढे लिहिल्याप्रमाणे त्याने राजधर्म वर्णिला आहे :

सर्वो दण्डजितो लोको दुर्लभो हि शुचिर्नरः।

दण्डस्य हि भयात्सर्व जगतो जगम्दोगाय कल्पते ॥ २३ ॥-७

"दंडाचे भयाने सर्व सन्मार्गी चालतात, दंडाचे भयवाचून नीतीने चालणारा हा क्वचित आहे दंड म्हणजे शासन त्याच्याच भयाने जगतात सर्व लोक सुखी राहतात. म्हणून राजाने प्रजेला दंड (शासन) करावा" परंतु-

अधर्मदंडनं लोके यशोन्यं कीर्तिनाशनम्।

अस्वर्ग्यंच परमाऽपि तस्माततत्परिवर्जयेत ॥ १२७ ॥-८

"अन्यायाने दंड केला तर दुष्किर्ती होते व परलोकी दुर्गति प्राप्त होणे यास्तव तसा दंड करू नये."

शेवटी पुढील श्लोकद्वयात सांगितलेल्या वंद्यगुणांनी मंडित असणाऱ्या राजासच राजत्व शोभते असे संस्कृत ग्रंथकाराचे म्हणणे आहे.

भृशं सुक्षिश्च द्रविणाऽऽगमश्च प्रजानुरोगोऽल्यकरग्रहाच्च ।
अरोगता चास्ति जनस्य यत्र धनस्य राज्ञो विषयेऽस्य नित्यम ॥
यथैवाऽऽत्मा परहत द्रद द्रष्टव्यः सुखमिश्चता ॥
सुखदुःखानि तुल्यानि यथाऽऽत्मनि तथाऽपरे ॥ दक्ष

● ●

# जातिभेद

या विषयावर मुंबई येथील आर्यसमाजांत.

तारीख २६ आगष्ट १८७७ रोजी,

दिलेल्या व्याख्यानाचें टिपण.

ठाणें येथें

"सूर्योदय"–छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १७९९ माहे अक्टोबर १८७७.

किंमत ३ आणे.

# जातिभेद

हा देश फार प्राचीनकाळापासून वसलेला आहे. येथें प्राचीन इतिहास, कथा व चरित्रें बहुत प्रसिद्ध आहेत. या देशांत चार प्रकारचे काल गेले आहेत. एक कृषि काल, दुसरा वीर काल, तिसरा विचार काल व चौथा भ्रमकाल असें दिसतें. कृषिकालांत लोक शेतीभाती करून धान्य, धन, पशु इत्यादि संपत्तींनीं सुखी होते. वीरकालीं परशुराम, रामचंद्र, अर्जुन यां सारखे पराक्रमी पुरुष होऊन त्यांनी दूर दूर पर्यंत देश जिंकून ब्राह्मण, क्षत्रीय, यांची वसाहत केली. विचारकाळीं षड्दर्शन, गणित, वैद्यक, व्याकरण इत्यादि ग्रंथ उत्पन्न झाले. पुढें विचार नष्ट होऊन भ्रम उत्पन्न झाला. तो भ्रम अद्याप चालत आहे. या भ्रमाचे काळांत बुद्धी नष्ट होऊन मिथ्यालाप व स्वार्थी अशीं शास्त्रें, पुराणें, व तंत्रें उत्पन्न झालीं. आपसांतील कलह वाढले. जाती चार होत्या, त्या चार हजार झाल्या! नवीन शोध किंवा विद्या कांहीं करण्याची जरूर नाहीं, सर्व कर्त्तव्य पूर्ण झालें अशी कल्पना लोकांचे मनांत येऊं लागली. आणि परदेशांत काय चाललें आहे याची माहिती व उद्योग करणें सोडून देऊन सर्व लोक स्वस्थ बसले. या काळांत खिश्चियन धर्म उत्पन्न झाला. मुसलमानांचे पैगंबर उत्पन्न होऊन त्यांणीं इसलाम (मुसलमानी धर्म) जाहीर केला. त्या लोकांनीं इराण, काबूल वगैरे घेऊन पुढे हिंदुस्थानवर स्वारी केली. तरी त्यांचा धर्म काय किंवा त्यांचा येण्याचा हेतु काय किंवा त्यांचा उद्भव कोठून हें हिंदु लोकांस ठाऊक नाहीं. तसेंच फिरंगी लोक यांणीं गोंवें व कोंकण प्रांत सर करून मोठाले किल्ले बांधिले. तरी हिंदु लोक या सर्व प्रकरणाविषयीं गैर माहित होते. दाढीस आग लागल्यावर विझविण्याची तजवीज करितात तों तोंड, नाक, डोळे, जळूनही गेले!! याचें कारण केवळ बुद्धिहीनता दिसते. बुद्धीचा काळ या देशांत हजार पंधराशें वर्षांपासून पडला आहे; त्यामुळें तर्क व बुद्धि क्षीण होऊन हल्लींच्या काळांत जशीं माणसाचीं शरीरें क्षीण झालीं आहेत, त्या प्रमाणें हजार वर्षांचे बुद्धीचे दुष्काळानें बुद्धि क्षीण झाली आहे. त्याच्या योगानें असें ठरलें कीं, कोणीं कांहीं प्रश्न करूं नये. वडील सांगत आले तें मानावें; तक्रार करूं नये; परदेशची गोष्ट बोलूं नये; दूरची गोष्ट कोणी बोलला तर म्हणतात कीं, लष्कराच्या भाकऱ्या करण्याची तजवीज तुला कशाला? जातीविषयीं संभाषण, पुनर्विवाहा विषयीं संभाषण किंवा विचार, जुन्या मताच्या लोकांत निघतां कामा नये. आणि त्यांस वाटतें तें कांहीं अंशी साहजिक आहे. हजारों वर्षांपासून भवतिं न भवतीची संवय गेली. तिचा पुनरुद्भव पाहिला म्हणजे लोकांस सखेदाश्चर्य वाटतें. ते म्हणतात, हें काय? हा काळ विलक्षण आला! असला प्रश्न आम्हीं कधीं ऐकिला नव्हता! आजपर्यंत असें कोणी तरी बोलला आहे काय?

स्वदेशीय राजधानींत जाऊन असा प्रश्न काढण्याची मगदूर कोणाची आहे काय? सर्व पंडित, सर्व कारभारी आडवे पडून धिःकार करतील, याजकरितां असले प्रश्न काढून आपण हल्लीं त्यांचा विचार करितों, हें एक आपलें महद्‌भाग्य समजलें पाहिजे. पंडित दयानंदा सारिखे महा पुरुषांस इंग्रजी राज्यांत वस्ती करावी लागते. पूर्वी स्वामी नारायण प्रगट झाले होते तेव्हां अमदाबादेंत त्यांजवर नीलकंठचे आखाडेवाले गोंसावी व ब्राह्मण यांणीं हल्ला केला, व त्यास पळून इग्रजांचें गांव त्यावेळेस खेडा हें होतें, तेथें पेशवाई बुडे तोंपर्यंत राहावें लागलें! कोणत्याहि प्रकारचा प्रश्न किंवा विचार करण्यास अवकाश नाहीं; अशीं लोकांचीं मनें आकुंचित होऊन गेलीं, ती आतां कांहीं उघडत चाललीं आहेत.

ज्ञातीचा विचार करण्याकरितां तीन गोष्टी आपल्यास अवश्य पाहिल्या पाहिजेत. (१) ज्ञातीचा इतिहास म्हणजे पूर्वापार ग्रंथांत त्याविषयीं काय आढळतें. (२) हल्लीं त्यांची स्थिति कशी आहे; व (३) त्यांत कांही न्यूनता असल्यास त्यास उपाय काय असावा? आतां याविषयीं विचार करूं. [ज्ञाति जरी धर्मसंबंधीं अधिकारांत न्यूनाधिक्य करते, तरी ती व्यावहारिक व लौकिक प्रकरणांतहि उंच नीच पदवी दाखविते. याजकरितां मी असें कोणास म्हणत नाहीं कीं, तुमची प्रतिष्ठा, व पूर्वजांचा मान सोडून एकदम तुम्ही हलक्या प्रतींत जा. आणि असें म्हणणें हें केवळ वेडगळपणाचें काम आहे. एखाद्यास जरी ही गोष्ट कबूल झाली, तरी सर्वांस मान्य होणार नाहीं. मी ब्राह्मण असल्यामुळें मला जे काय लाभ व फायदे आहेत, ते मी उगीच सोडणार नाहीं, आणि खालचे प्रतींत जाऊन आसन स्वीकारणार नाहीं यास्तव ज्यांस जात्यभिमान असेल त्याणीं आपली पदवी सोडावी असें माझें म्हणणें नाहीं. परंतु माझें म्हणणें असें आहे कीं, या गोष्टी विचार करण्यालायक आहेत. व याचे दाखलें प्राचीन काळापासून काय आहेत ते पाहिले पाहिजेत. व आपण हे अभिमान कोठपर्यंत ठेवावे, ही गोष्टही विचार करण्यालायक आहें, तें कां? हें मी पुढें अनुक्रमानें सांगेन.]

आतां, जातीचा इतिहास पाहतां मूळ ग्रंथ वेद, यांत पाहिलें तर चार जातींचें वर्णन सांपडतें; तें असें कीं, ब्राह्मण हे मुखस्थानीं, क्षत्रीय हे बाहुस्थानीं, वैश्य जानूचे ठिकाणीं आणि शूद्र पायांचें ठिकाणीं, याप्रमाणें लाक्षणिक वर्णन आहें; तें वेदाच्या पांच संहितेंत सारखें आहे. त्याचा उल्लेख भारतांतही आहे :—

॥ ब्रह्मवक्त्रं भुजौक्षत्रं कृत्स्नमुरूदरविशः ॥
॥ पादौयस्याश्रिताः शूद्रास्तस्मै वर्णात्मने नमः ॥

धर्म चार वर्णांचे आश्रयानें राहतो; आणि तो वृषभ आहे; आणि त्याचे चार पाय हेच चार वर्ण. त्यांपैकीं कलियुगांत तीन मोडले आणि तो लंगडत हिंडत होता असें भारती वर्णन आहे. याचें तात्पर्य इतकेंच की, ब्राह्मसंपत्ति, क्षात्रसंपत्ति आणि वैश्यसंपत्ति ह्या नष्ट होऊन केवळ शूद्राची वृत्ति म्हणजे गुलामगिरी अथवा दास्यत्व तें मात्र या भरतखंडात राहिलें असें त्या रूपकाचें तात्पर्य दिसतें, व विचारी लोकांस हें मान्यही होईल. विद्यावृद्धि, राज्यसंरक्षण आणि देशावरचा व्यापार हीं तिन्हीं जाऊन दास्य स्थितींत लोक आहेत हें निर्विवाद आहे. हें रूपक, लिहिणारास त्याकाळींच ही गोष्ट समजली असावी. पूर्वी हे तीन वर्ण म्हणजे, आर्य किंवा द्विज, यांच्या अशा प्रतिज्ञा होत्या कीं, वादास ब्राह्मणांनीं नाहीं म्हणूं नये, क्षत्रियांनीं युद्धास नाहीं म्हणूं नये, व वैश्यांनीं व्यापारास नाहीं म्हणू नये. याजकरितां पूर्वी दिग्विजय होत असत. शंकराचार्यांनीं दिग्विजय केला पण गांवोगांवचे लोकांनीं त्यांशीं वाद करून अजिंकपत्रे (यथा) लिहून दिलीं. म्हणून दिग्विजय झाला. हल्लीं पाहाल तर ब्राह्मण म्हणतील आम्ही वाद करीत नाहीं, हरले तरी म्हणतील आम्ही जिंकलो; अशा स्थितींत कोणी दिग्विजय करण्यास समर्थ नाहीं. क्षत्रियांमध्येंही असा अभिमान होता कीं,

युद्धांतून परत फिरावयाचें नाहीं; जो फिरेल तो क्षत्रीय नाहीं; त्यास लोक बहिष्कृत करीत. म्हणून श्रीकृष्णांनी उपदेश करून अर्जुनास लढावयास सांगितले :—

॥ धर्म्याद्धियुद्धाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ॥ गीता

शिकंदरानें हिंदुस्थानावर स्वारी केली, तेव्हां एक क्षत्रीय राजा धरून आणला, आणि त्यास विचारलें कीं, तूं मागशील तें मी देतो. तेव्हां त्याणें उत्तर दिलें कीं, मला अग्नि सिद्ध करून द्या; त्यांत मी उडी टाकितों, माझा पराभव झाला, आतां मी आपले जातींत जाऊं शकत नाहीं. असो. आतां हे सर्व अभिमान जाऊन सत्य व ऐक्य हीं दोन्ही नष्ट झालीं आहेत!

पूर्वीं जातीला वर्ण अशी संज्ञा होती, तेव्हां मूळ रंगावरून जातीची कल्पना निघाली असावी असें दिसतें. ज्याप्रमाणें, आतां हिंदु म्हणजे काळे हें नांव मोंगलांनी ठेविलें, व इंग्रजींत काळी व गोरी पलटण हें भेद प्रसिद्ध आहेत, याचप्रमाणें जात मुळीं वर्णभेदानें भेद उत्पन्न झाला असावा असा तर्क होतो. पुढें, बापावरून जाति स्थापित होत असे, आईवर धोरण नव्हतें. याचें उदाहरण व्यास, वसिष्ट इत्यादिक ऋषी आहेत. छांदोग्य उपनिषदांत जाबाल्याची कथा लिहिली आहे; त्याणें आपले आईस विचारलें कीं, माझा बाप कोण? तेव्हां तिणें सांगितलें कीं, तुझा बाप कोण हें मला ठाऊक नाहीं; परंतु माझे नावावर प्रसिद्ध हो, आणि पूर्वीं आईचे नांवावर मोठाले पुरुष प्रसिद्ध होत असत. जसें कौंतेय, राधेय, गांगेय, इत्यादि. तेव्हां तें ऐकून तो आपले गुरूजवळ जाऊन त्यास जशी होती तशी हकीकत सांगितली. तेव्हां गुरु म्हणाला की, तूं सत्यवक्ता दिसतोय याजवरून तूं ब्राह्मण आहेस. असा माझा निश्चय होतो. सबब ब्राह्मणांत तूं पढत जा. या प्रमाणें गुणांवरून व कर्मावरूनही पूर्वीं ज्ञातीचा निर्णय होत असे. पुढें असें ठरलें कीं, आई व बाप हे एक जातीचें असावें, व तीं आईबापें ब्राह्मण, क्षत्रीय अगर वैश्य असतील त्या त्या प्रमाणें त्यांचें आपत्य ब्राह्मण, क्षत्रीय अगर वैश्य मानलें जाईल असा जातिभेद झाला. त्यांत पुढें असा निर्बंध झाला की, माहिती असे त्यास मात्र जातींत घेतात; ज्याची माहिती नसेल, तो जरी सांगत असेल तरी त्यास जातींत घेत नसत, याचें नांव ज्ञात. आतां कायस्थ लोक काशीकडे आहेत, हैदराबादेस आहेत, गुजराथेंत आहेत. परंतु एकमेकांस स्वजात समजत नाहींत. तसेंच, हिंदुस्थानांतील, दक्षिणेंतील व गुजराथेंतील ब्राह्मण आपणास वेगळे मानतात. याचप्रमाणें मूळचे ब्राह्मण म्हणजे ऋषीकुल; तेच दशविध झाले; व त्यांचें शतविध होऊन आतां तर सहस्त्रविध झालें! मथुरेचें चोबे व गयेचें गयावळ हे दशविधाबाहेर गणतात. त्यांस कंसनिर्मित व गयावळांस ब्रह्मनिर्मित असें अनुक्रमें म्हणतात.

॥ सर्वे विप्राः कान्यकुब्जामाथुरं मागधं विना॥

पराक्रमी शककर्ते पूर्वीं झालें, त्यांणीं नवीन ब्राह्मण केले, असे दाखले पुष्कळ आढळतात. सह्याद्रीखंड हल्लीं छापून प्रसिद्ध झालें आहे. त्याजवरून चित्पावन ब्राह्मण हे परशरामनिर्मित असें दिसतें. गिरनारे ब्राह्मण कृष्णनिर्मित, तसेच भाटेले ब्राह्मण हे रामचंद्रनिर्मित असे अनेक दाखले या देशांत आहेत. पुनःपुना नदीवर गयेचे वाटेवर शाकलद्वीपी ब्राह्मण आहेत, ते अन्य देशांतील असतील असें वाटतें. परंतु मुळीं ब्राह्मण काश्मीरकडे असून पुढें गंगातीरीं ब्रह्मवर्ती आले. नंतर दक्षिणेकडे उतरले. तेव्हां देशावरून त्यांचीं नांवें दहा पडलीं. पुढें नवे नवे ठराव झाले ते कोणीं मानिले नाहींत, व कोणीं मानिले, पुढे विरोध उत्पन्न होऊन प्रत्येक जातीनें आपल्यास उंच म्हणावें, दुसऱ्याची निंदा करावी असें झालें. परंतु जे आचार चालत आले ते कोठें राहिलें, व कोठें बुडाले. सारस्वत ब्राह्मण अद्याप क्षत्रियांचे घरीं जेवतात. परंतु ही चाल आतां जरी कोणास अनाचारासारखी दिसते तरी, हा पूर्वीं आचार होता; द्रौपदी ब्राह्मणांस वाढीत असे. दुर्वासादिक ऋषि व बकदालभ्यासारखे ब्रह्मनिष्ठ क्षत्रियांचे घरीं जेवीत होतें. ह्या ऋषींचे वंशज आम्ही असून आमचें सोवळें फार वाढलें म्हणून तो आचार आम्हीं टाकिला. परंतु त्यांत ज्या

ज्ञाती सामील झाल्या नाहींत. त्या यापूर्वीचे आचारास धरून राहिल्या. पंचगौड ब्राह्मण हे मत्स्य-मांसाचा आहार करितात, ही पूर्वीची चाल त्यांमध्यें राहिली. बौद्धमतास विरुद्ध न वाटावें म्हणून तें न खाण्याचा ठराव ब्राह्मणांनीं केला, तो गुजराथेंत पूर्णपणें चालतो; दक्षिणेंत अर्धा चालतो. म्हणजे यज्ञामध्यें मात्र खातात. आतां कोंकणात गोवर्धन ब्राह्मण आहेत, त्यांस गोलक असें म्हणतात. परंतु इतकी त्यांची प्रजा वाढली, ही विधवेचेंच केवळ संतान नव्हें, तर जेव्हां पुनर्विवाहाचा निषेध झाला, तेव्हां ज्यांनीं तो मान्य केला, त्यांमध्यें विधवाविवाह बंद झाला, व ज्यांणीं मान्य केला नाहीं त्यांनीं विधवाविवाह पूर्वीप्रमाणेंच सुरू ठेविला, व त्यामुळें त्यांचे संततीस दुसरे ब्राह्मण गोळक म्हणूं लागले. याप्रमाणें ही ज्ञाति तडापासून झाली. अखेर तेही तो आचार सोडून जात वाढली. तेव्हांपासून ते आपल्यांत लग्नें करितात. परंतु तडाचा बट्टा लागला तो कायम आहे. गुजराथी ब्राह्मण शूद्राचें पाणी घेतात, ती मूळची चाल इतर लोकांनीं सोडिली, तेव्हा ज्यांणीं सोडली नाहीं ते नीच ठरले. बाजारचीं पक्वान्नें खाण्याची चाल पुरातन आहे ती मोडली. तेव्हां जे त्या चालीस धरून राहिलें ते नीच ठरले. मुळीं स्वयंपाक करण्याचें काम ब्राह्मणांकडे नव्हतें. तें सुपकार म्हणून नीच जातीच्या लोकांचें होतें तें बहुतकरून शूद्र असतील. पुढे ब्राह्मणांनीच स्वयंपाक करावा असें ठरलें. तेव्हां सर्व ज्ञातीचें हेच सुपकार झाले. सर्व ज्ञातीस त्यांचे हातचा स्वयंपाक चालतो म्हणून तें काम जेथें तेथें त्यांचे गळ्यांत पडलें आहे.

आतां वेदांमध्यें चार वर्णांचीं नांवें सांपडतात. परंतु वेदाचे मंत्राचे ऋषी आहेत, त्यांमध्यें कवषऐलुष हा शूद्र आढळतो. दुसरे क्षत्रीयही आहेत. ऐतरेय ब्राम्हणांमध्यें कवषऐलुष याची कथा लिहिली आहे, त्यांत सरस्वती कांठीं कांहीं ऋषी यज्ञ करीत असतां त्यांत हा नीच दासीपुत्र गेला, म्हणून त्याचा धिःकार केला, पुढें तोच ऋषी होऊन छंदाचा ऋषी झाला! त्याचे नांवावर बहुत सूक्तें आहेत. तेव्हां छंदऋषीचे आपण तर्पण करितों, त्यांतही हा शूद्र येतो हें स्पष्ट आहे. माध्यंदिन शाखेंत सर्व लोकांस वेदवाणी सांगावी असें लिहिलें आहे.

॥ यथेमांवाचं कल्याणीं मा वदाय जनेभ्यः ॥

माध्यंदिनशाखेंतील हा मंत्र पाहावा, म्हणजे खात्री होईल. आतां सूत्रांकडे पाहिलें तर त्यांत मुंज वगैरे त्रिवर्णाची कर्मे एकाच प्रयोगांत लिहिलीं आहेत. व शूद्रासही मधुपर्क लिहिला आहे–'सव्यं शूद्राय' हें सूत्र पाहा. आतां आपस्तंभसूत्रांत जसें उंचें कर्म करील तसा उंच होईल, नीच कर्म करील तसा नीच होईल असें स्पष्ट लिहिलें आहे. मनूमध्यें असें लिहिलें आहे कीं, ब्राह्मणाचा शूद्र होतो व शूद्राचा ब्राह्मण होतो.—

॥ शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रतां ॥

भारतांत या ज्ञाती प्रकरणीं पुष्कळ विवाद आहे. तो व्यामोहविद्रावण ग्रंथ मथुरेचे रंगाचार्य रामानुज यांणी लिहिला, त्यांत एकें ठिकाणीं सर्व लिहिलें आहे. जयपूरचे रामसिंग राजांनीं शैव मत ग्रहण केल्यावरून सर्व वैष्णवांनीं त्यांचें खंडन लिहिलें. गोंसावी महाराज यांणीं सत्सिद्धांत–मार्तंड लिहिला. असे नऊ दहा ग्रंथ या प्रकरणीं झाले. परंतु हे सर्व वाद व्यर्थ आहेत, त्यांचा अंत पार लागावयाचा नाहीं. प्रस्थानिक (म्ह. मतसंस्थापक) ग्रंथ बहुत झालें आहेत, त्यांत परस्पर निंदा व तटे फार आहेत. त्यांचें ऐक्य करणें म्हणजे वाळूची दोरी करणें याप्रमाणें आहे. आतां या मथुरेचें ग्रंथांतील थोडीं वाक्यें वाचितों :—

वनपर्वांत अजगरोपाख्यानांत —

सत्यं दानं क्षमा शीलमानृंशस्यं तपो घृणा ॥
दृश्यन्ते यत्र राजेन्द्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥
शूद्रयोनौ हि जातस्य सद्गुणानुपतिष्ठतः ॥

वैश्यत्वं लभते ब्रह्मन् क्षत्रियत्वं तथैवच ॥
आर्जवेव वर्तमानस्य ब्राह्मण्यमभिजायते ॥

याजवर नीलकंठाची टीका

गुणकृत एव वर्णविभागेन जातिकृत इति भावः ॥

॥ धर्मव्याधं प्रति कौशिकः—

॥ ब्राह्मणः पतनीयेषु वर्त्तमानो विकर्मसु ॥ दाम्भिको दुष्कृतः—
प्रज्ञः शूद्रेणसदृशो भवेत् ॥ यस्तु शूद्रोदमे सत्ये धर्मे च सततं स्थितः ॥
॥ तंब्राह्मणमहं मन्ये वृत्तेनहि भवेद्विजः ॥

भविष्यपुराणे षष्ठीकल्पे —

॥ हरिणीगर्भसंभूतो ऋष्यश्रृंगो महामुनि ॥ श्वपाकी गर्भसंभूतो
पिताव्यासस्य सचमः ॥ गणिकागर्भसंभूतो वसिष्ठश्च महामुनिः ॥
॥ क्षत्रियागर्भसंभूतो विश्वामित्रो महामुनिः ॥ तपसा ब्राह्मणो
जातः संस्कारस्तत्र कारणं ॥

वनपर्वांत सांकर्य — विवरणांत भृगुप्रश्नाचें उत्तर :--

॥ न विशेषोऽस्तिवर्णानां सर्वं ब्रह्ममयं जगत् ॥ ब्रह्मणा पूर्व-
सृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतं ॥ जातो व्यासस्तुकैवर्त्यांश्वपाक्य-
स्तु पराशरः ॥ बहवोऽन्येपि विप्रत्वं प्राप्ताये पूर्वमद्विजाः ॥

हिरे पारखणारे स्वच्छ हिऱ्यांस ब्राह्मण म्हणतात; तांबुस असला तर क्षत्रीय म्हणतात; पिवळा असला तर वैश्य, व काळसर असला तर शूद्र म्हणतात. त्याचप्रमाणें नर्मदेंतील बाणांच्या जाती आहेत. सदरहु वाक्यांचा सारांश इतकाच दिसतो कीं, ब्रह्मदेवापासून सृष्टि झाली, तीत वर्णभेद कोठून आला तर कर्माने आला. वर्णभेद आईबापांवर नसून केवळ कर्मावर आहे, असें सर्व महर्षी पूर्वीपासून बोलत आले आहेत. याप्रमाणें कर्मकांडाचें मत आहे. हिंदु धर्मात तीन कांडें आहेत. कर्म, उपासना आणि ज्ञान; त्यांत उपासनेंत वाम व दक्षिण असे दोन पंथ आहेत; वाममार्ग्यांनीं जाती अगदी सोडून दिली आहे. ते सर्व ज्ञातीचें अन्न खातात. परंतु लोकभयास्तव गुप्तरीतीनें ते आपला आचार करितात. आतां दक्षिणमार्गी भक्त आहेत; ते म्हणतात, ज्ञाती ही मोक्षास कारण नाही. भक्त आहेत तेच उंचे, यास भागवत प्रमाण :--

॥ विप्राद्विषड्गुणयुतादरविंदनाभपादारविंदविमुखा श्वपचं वरिष्ठं ॥

मोठा विद्वान ब्राह्मण असून त्यास भक्ति नसेल तर तो चांडाळापेक्षांही नीच.

॥ न शूद्राभगवद्भक्तो विप्राभागवताः स्मृताः ॥
॥ सर्व वर्णेषु ते शूद्रा ये अभक्ता जनार्दने ॥

पंढरपूरचे वारकरी हे जात्याभिमान सोडून ज्याचे गळ्यांत माळ त्यास मानितात; त्याचे पायां पडतात, आणि परस्पर आनंदात असतात. प्रवरासंगमाचा गोधाजी पाटील म्हणून वारकरी होता, त्याचे कीर्तनांत ब्राह्मणांस सन्मानार्थ फुले वगैरे तो देऊं देत नसे; तो शिंद्याचे दरबारी गेला होता, तेव्हां याजबद्दल तक्रार झाली, आणि शिंदे त्यास काशी क्षेत्रीं पाठवीत असतां तो गेला नाही; पंढरीस काशी आहे असें म्हणून तो परत आला! बैरागी वैष्णव हे अनेक जातीचे असून भक्तसंबंधानें ते एकत्र जेवितात हें प्रसिद्ध आहे. ते म्हणतात. आम्ही सर्व अच्युत गोत्री आहों, जगन्नाथाचा महाप्रसाद सर्व, जातीचें प्रकरण एकीकडे ठेवून खातात, तेथें बारा महिने मुंजी व लग्ने होतात. पांडवांचे तर्फेनें कृष्ण वकिली करण्यास दुर्योधनाकडे गेले, तेव्हां विदुर हा शूद्र असून त्याचे घरी भक्तिसंबंधाने राहिले. त्याजवर मोरोपतांनीं लिहिलें कीं, "प्रभु विदुराच्या घरीं जेविलाचि कण्या" इ. याप्रमाणें भक्त जे झाले, त्यांत अनेक जातींचे लोक होते, व त्यांणीं जातिधर्मास

फारसा मान दिला नाही; यास्तव ब्राह्मणांनी त्यांचे हाल केले. तुकारामाची गाथा छापिली आहे. त्याचे शेवटीं रामेश्वरभटाचे अभंग आहेत, त्यावरून असें दिसतें. पैठणकर एकनाथाचे याचप्रमाणें अनेक वेळ हाल केले तरी भक्तमंडळी जातीचे निर्बंधास फारशी मानीत नाहीं. तसेंच ज्ञानमार्गी यांचें मत आहे. ते समदर्शी व सर्व ठिकाणीं ईश्वर आहे असें मानतात; संन्यास घेतात तेव्हां शिखासूत्रांचा त्याग करून कर्ममार्ग अगदीं सोडून देतात, तरी ते इतर ब्राह्मणांपेक्षा उंच होतात हें सर्वांस कबूल आहेच. एक दादुपंथी मला भेटला, त्यास मीं विचारिलें कीं, बोवा, तुमची जात कोण? त्याणें उत्तर दिलें कीं, "ये सब पंचतत्त्वका मेळा है; इसमें जात और भात क्या पुछत है?" विचारसागर लिहिणारा निश्चलदास हा दादुपंथी होता. जैन हे नास्तिक आहेत व जातीविषयीं त्यांणीं अभिमान सोडला आहे. तत्रापि कर्मकांड हें मोक्षाचे उपयोगी नाहीं असें सर्वमान्य आहे--

क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ॥
मामुपाश्रित्य कौन्तेय येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥ गीता ॥

अशी वाक्यें प्रसिद्ध आहेत.

आतां हे इतके जातिभेद कशानें वाढले? व असा विचार केला तर मूळचे चार वर्ण, त्याचे चार हजार कां झाले? तर, यांतून कांहीं देशांतरानें झाले; कांहीं भक्ष्यभेदानें झाले; कांहीं अभिमानानें, व कांहीं भाषाभेदानें असे अनेक कारणानी झाले, असें दिसतें. काहीं तट पडल्यामुळें झालें. वडनगरचे नागर आहेत. वडनगरापासून पांच कोसांवर विसनगर आहे, त्या गांवचे नागर पृथक् झाले. इतके नजीक नजीक भेद कां पडले? याचें कारण समजत नाहीं; परंतु कांहीं तडाचे किंवा अटीचे कारणानें पडले असतील. आतां जातींत मोठ्या हरकती चार आहेत. १. एक पंक्ति २. दुसरी जेवण. ३. कन्या ४. प्रेतवहन. हीं चार कलमें ज्ञातीचे लोकांत होतात. त्यांत दुसरी ज्ञात पडत नाहीं. खेड्यास एक वकील व अहमदाबादेस एक मनसुखराम यांची आहेत. ते धर्मानें ख्रिश्चियन आहेत. ते कोडतांत बैबलावर शपथ घेतात, तरी जातींत आहेत! ते सांगतात कीं आम्ही ख्रिश्चियनांचे खात नाहीं. तेव्हां लोक म्हणतात कीं, जर ते खात नाहींत तर बाटले कशानें? कोणाला ज्ञाती बाहेर टाकला म्हणजे हे त्याशीं व्यवहार बंद करतात. पूर्वी ज्याला जाती बाहेर टाकलें, त्याचे अनेक प्रकारचे हाल करीत गांवचा न्हावी त्याची हजामत करावयाचा नाहीं, गांवचा उपाध्याय त्याचे घरीं यावयाचा नाहीं व कोठें सभेंत त्याला बसू देत नसत! असे अनेक प्रकारचे हाल करीत. तितके आतां नाहींत, तरी अद्याप पुष्कळ रीतीनें त्याचे हाल करितात. त्याची मुलगी नवऱ्याचे घरून त्याचे घरीं येऊं देत नसत. अज्ञानामुळें लोक अद्यापि असे दुष्ट झाले आहेत कीं, हा त्यांचा व्यापारच होऊन गेला आहे! आणि दुसरे लोक अज्ञानी व भोळे व वरिष्ट सांगतील तसे चालतात. त्यांत अब्रूदार मनुष्यास फार अडचणी पडतात. जातीसंबंधानें तंटे या देशांत बहुत चालू आहेत. गुजराथेंत बहिष्कृत करण्याचा चार पद्धती आहेत. प्रथम ज्ञाति बाहेर टाकतात. नंतर चवऱ्यांयशीं बाहेर, नंतर मंदिराबाहेर म्हणजे दर्शन बंद करितात; नंतर महाजन बंद म्हणजे त्याशीं कोणी व्यापार करीत नाहीं, अशा यातना देतात. मग नेमिष्ट व धर्मिष्ट घरांतील वृद्ध बायका त्रासतात. कोणाचा नेम असा असतो कीं, दर्शन केल्यावांचून जेवावयाचें नाहीं. त्या उपास करितात, व तेणेंकरून बहुत त्रास होतो. नागपूरचे जानोजी राजे हे आपल्यास क्षत्रीय म्हणवितात. याजबद्दल सर्व ब्राह्मण त्यांशी द्रोह करितात. हिंगणघाटांत कलंकी ब्राह्मण आहेत त्यांजकडे अर्धे गांव मिळते, अर्धे मिळत नाहीं. या कोंकणप्रांती परभु आपल्यास क्षत्रीय म्हणवितात; त्यांचे घरीं वैदिक कर्म करण्याविषयीं ब्राह्मण संमती देत नाहींत. याजकरितां त्यांणी टकले आबा गुरूजी यांस नवीन उपाध्ये केले, व पूर्वीचे

घरीं असले. सोनार म्हणतात आम्ही वैदिक कर्म करूं! त्यांचा कलह चालू आहे. आता मोठाले आचार्य आहेत, त्यांचे लोक पायां पडतात. परंतु त्यांचें अन्न घेतलें कीं बाटतात. स्वामीनारायण हे सरवरीये ब्राम्हण आहेत. त्यांस गुरू करितील; परंतु त्यांचें कोणी खाणार नाहीं. जयपुरास मानसिंग राजे यांणीं सहा ज्ञातीचे ब्राह्मण एकत्र केले व ते क्षत्रियांचे घरीं जेवितात. ते छज्ञात म्हणून पुष्करास वगैरे प्रसिद्ध आहेत. परंतु यांत जे मिळाले नाहींत, ते त्यांशीं कलह करतात. प्रत्येक ज्ञातीची ही रीति आहे कीं आपल्यास उंच म्हणावें व दुसऱ्यास नीच म्हणावें. पूर्वी शिवाजी महाराज यांणीं आपल्यास राज्याभिषेक व्हावा असें ठरविलें, तेव्हां सर्व ब्राह्मण नाकबूल झाले. ते म्हणूं लागले कीं, तुम्ही शूद्र, तुमची मुंज झाली नाही. आतां वैदिक राज्याभिषेक कसा होईल? तेव्हां गागाभट यांस काशीहून आणलें; त्यांणीं असें सांगितलें कीं, "कर्मावरून जाति होते, आईबापांवरून होणें हा गौण पक्ष, ज्यास कोणताही गुण नसेल त्याणें आईबापाचे नांव सांगावें. ज्यास गुण आहेत त्यास आईबापाचें कारण नाही. याणें मोंगलांशीं लढून स्वराज्य स्थापन केलें हें क्षत्रीयांचे कर्म; तेव्हां यास क्षत्रीय म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मुंज आपत्काळामुळें झाली नाहीं; याजकरितां मुंज करून राज्याभिषेक करावा." मग हें सर्वांस मान्य झालें. आणि त्याप्रमाणें बावन्नावे वर्षी उपनयन करून राज्याभिषेक केला! नवी मुद्रा, व नवें नाणें पाडून शक चालू केला. अष्टप्रधान नेमले. व क्षत्रीयकुलावतंस छत्रपती असा किताब दिला. आलीकडे काश्मीरचे राजे रणधीरसिंग यांणीं काशीहून शास्त्रार्थ नेऊन आपले देशांत बाटलेले तमाम लोक हिंदु करून स्वस्व ज्ञातींत दाखल केले. त्यांणीं काशीकर पंडितांस सांगितलें कीं, आमचे देशांत अल्पकारणावरून हिंदु मुसलमान होतात. आणि हिंदु तुटत चालले; व मुसलमान वाढत चालले; म्हणजे क्षत्रीय राज्यास अनिष्ट होण्याचा रंग आहे; याजकरितां बाटला तो पुन्हां घेण्याविषयीं शास्त्रार्थ पाहिजे. त्याजवरून बाळशास्त्री रानडे आदिकरून पंडितांनीं पांच पिढ्यांपर्यंत बाटलेला मनुष्य, व्रात्य व संस्कारहीन समजून प्रायश्चित्त देऊन घ्यावा, असे लिहून दिलें. त्याप्रमाणें चालू आहे. हिंदुधर्मात कोणतेहा पापास प्रायश्चित्त नाहीं असें नाहीं. परंतु ब्राह्मणांचें दरिद्र वाढल्यामुळें व त्यांमध्यें एकवाक्यता नसल्यामुळें एके गांवांत प्रायश्चित्त झालें तरी दुसरे गांवचें भिकार पाठीस लागतें. याप्रमाणेंच वे. शा. सं. गणेशशास्त्री सरसुभे यांची विलायतेहून आल्यावर स्थिती झाली! शंकराचार्यांनी त्यांस पावन केलें, तरी इंदूरकर भांडावयास उठले! इंदूरकरांचा तंटा मिटला, तरी काशीकर भांडावयास उठले! दरगांवीं तक्रार!! त्यांत मतलब पाहिला तर पोटाचा, दुसरा अर्थ कांहीं नाहीं. असें होतां होतां कितीएक लोक प्रायश्चित्ताचे भरीस पडतच नाहींत. कारण कीं घेतलें तरी सारखें, व न घेतलें तरी सारखेंच. गुजराथेंत ब्राह्मण कुळंब्याचें पाणी घेतात, कुळंबी रजपुताचें घेतात, रजपुतांचे स्वयंपाकांतहीं मुसलमान असतात, मराठे मुसलमानांचें पाणी पितात, व मुसलमानांकडे थेड असतात. अशी परंपरा लागली आहे. त्यांत आचार पाहिले तर वेगळाले ठिकाणीं वेगळाले असतात. कानडेब्राह्मण व गौडब्राह्मण हे रेशमास सोंवळें मानीत नाहींत; पिठांत पाणी पडलें तर ओंवळें समजतात, हिंदुस्थानांत मीठ पडलें व अग्निस्पर्श झाला तर मात्र खरकटें समजतात. दक्षिणेंत पोहे, चुरमुरे मुसलमानांनीं केले तरी खातात. हा महाप्रसाद जगंनाथाचे भाताप्रमाणें सर्वत्र चालतो. याजकरितां युधिष्ठिरांनीं सांगितलें कीं :—

धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पंथाः॥

धर्माचा शोध करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं, आपले गांवचे मुख्य मुख्य लोक चालतील तसें चालावें. अशी सांप्रतची स्थिति आहे. [आतां या ज्ञातीपासून हरकती कोणत्या हें पाहिलें तर असें दिसतें कीं, जितकें सार्वजनिक काम तें सर्व त्याचे विरुद्ध आहे. मनुष्य जितका लोकांपासून वेगळा असेल तितकी ज्ञाति अधिक संरक्षण होते. मनुष्य अगदीं निरुपयोगी बिळांतील

उंदरासारखा होतो. तो मोठा कर्मनिष्ठ मानला जातो. रेल्वेंत जाणें आलें कीं, जातिधर्म बिघडला! परदेशांत जाणें आलें कीं जात गेली! कोडतांत, बाजारांत किंवा जहाजावर गेला कीं, ज्ञाति आडवी आली! लष्करांतही ज्ञाति बरोबर राहात नाहीं, तर, चोरट्यासारखा घरीं सर्व लोकांपासून वेगळा राहील, तेव्हांच ज्ञाति शुद्ध राहते. म्हणून सार्वजनिक संबंधासही विरुद्ध आहे. दुसरे अनेक तंटे, तक्रारी व परस्पर निंदा, हीं ज्ञातींपासून होतात. आणि लोक अगदीं विभक्त स्थितींत येतात. आतां यास उपाय काय? याविषयीं मला असें वाटतें कीं, शरीरास जसें मुख तसेच पाय, तसेच बाहु, तसेंच पोट, त्यांतील एकही गेल्यानें शरीर पडेल, परंतु मुख श्रेष्ठ आहे याचें कारण सर्व शोभा तेथें आहे. तसेंच फार बुद्धी असली तर ब्राह्मण होईल; कारण कीं, त्याचें काम बुद्धीचें आहे. वैद्यक, ज्योतिष, शिल्प इत्यादी विद्या निर्माण करण्यास अनुभव व तर्क लागतो; तें बुद्धीविना होणार नाहीं. क्षत्रियांस बल, धैर्य व सत्य ही अवश्य; परंतु बुद्धि कमी असली तरी चालेल; कारण त्याचें अंगमेहनतीचें काम आहे. यास्तव बुद्धितारतम्यानें उंच नीच ठरविलें; म्हणून कोणी निंदेस योग्य नाहीं, असें समजून सर्व आपले अवयव समजून दुराग्रहानें निंदा करूं नये. सर्वांनीं ऐक्य करून चालावें. कोणी उंच होऊं पहात असतील तर त्यांस आडवें येऊं नये. आपण पुढें चाललों म्हणजे अंतर आहे तितकेंच राहील. दुसऱ्यास वाढूं न देणें आणि आपण पुढें न चालणे, हें मोठें नीचपणाचें काम आहे. जे कोणी उंचपणा मिळवावयास पाहतील, त्यांस सुखें करून मिळवूं द्यावा. बुद्धिवान जे असतात, ते मागें हटत नाहींत. हें या देशांत जे मोठे पुरुषार्थी राजे व साधु झाले, त्यांचे चरित्रांवरून दिसतें. महादजी शिंदे, व मल्हारराव होळकर यांस तुम्ही मोठे होऊं नका असें कोणाच्यानें म्हणवलें नाहीं. उलटे त्यांजजवळ हजारों ब्राह्मण हात जोडून बसूं लागले. तसेंच कबीर, व तुकाराम, यांना कोणीं मागें टाकलें? हजारों ब्राह्मण त्यांचे समाधीजवळ नाकें घांसतात. पुरुषार्थी व बुद्धिवान प्राण्यांचा संग्रह जितका होईल तितका करावा. त्यांस आडवें आलें असतां आपला मात्र नाश होतो.] दुसरे जातीविषयीं रूढींतील निर्मूळ प्रकार चालतात ते सोडावे आणि शास्त्र प्रमाण धरून त्यांत जितका भेद करण्यास सांगितला आहे, तितका मात्र मानावा. फाजील भेद झाले आहेत, हे केवळ अज्ञान व मदोन्मत्तपणानें झाले आहेत. त्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. रूढी मूर्खांपासून उत्पन्न होते व शास्त्र शहाणे करितात. तेंच वास्त प्रमाण आहे. म्हणून सर्वांनीं शास्त्राची मर्यादा धरावी. ही गोष्ट कोणासही अमान्य वाटण्याचें कारण नाहीं. सर्व सभ्य व सर्व शिष्ट, ही गोष्ट मान्य करतील असें वाटतें. विनाकारण पाखंड प्रवृत्ति झाली आहे, ती टाकावी, व शास्त्राची मर्यादा धरावी. आतां शास्त्र म्हणजे वेद किंवा स्मृति किंवा पुराणें किंवा तंत्रें याचा विचार केला म्हणजे समजेल. [परंतु, वेद हेच मूळशास्त्र व त्यास अनुकूल असतील त्या स्मृती ग्राह्य असाव्या असें वाटतें. पुराणें, व तंत्रें हीं कांही शास्त्रें नव्हते.] त्यांत मिथ्या गोष्टी व स्वार्थी वचनें बहुत आहेत. जैमिनीनें मीमांसाशास्त्रात असें स्पष्ट लिहिलें आहे कीं,–"हेतुदर्शनाच्च" याचा अर्थ असा आहे कीं, ज्या वचनांत स्वार्थ दिसतो ते वचन धर्म' नव्हे. म्हणून स्वार्थी वचनें टाकून यथार्थ शास्त्र जें असेल तें घ्यावें, असें वाटतें. परंतु शास्त्र कोणतें? हा विषय पृथक् आहे. वेद हें मूळ शास्त्र, याविषयीं कोणाचाही वाद नाहीं. यास्तव तेच मूळ धरून त्यास अनुकूल व अविरुद्ध अशीं दुसरीं शास्त्रें असतील तीं घ्यावीं. विरुद्ध असताल ती घेऊं नयेत. व्रतरत्नाकरांत सर्व व्रतें करण्याचा अधिकार म्लेंछांसही सांगितला आहे.

"क्वचित्म्लेंछानामप्यधिकारः"

स्मार्तैः प्रमुदितैर्हृष्टैर्ब्राह्मणक्षत्रियैर्नृभि ॥

वैश्यैः शूद्रैर्भक्तियुक्तैर्म्लेछैरन्यैश्च मानवैः ॥ देवीपुराणे ॥

पुराणें हीं प्रस्थानिक ग्रंथ आहेत, त्यांत परस्पर निंदा व स्वार्थ हीं पुष्कळ आहेत. ते केवळ कर्मणुकीकरितां म्हणा किंवा आपले उपासनेच्या देवांचें महात्म्य सांगण्याकरितां झाले आहेत.

त्याशीं व सच्छास्त्रांशीं विरुद्ध फार आहे. भास्कराचार्यांनी सिद्धांतशिरोमणी केला तेव्हां पुराणांतील मतें अशुद्ध आहेत असें स्पष्ट लिहिलें आहे. तेव्हां पुराणें हीं शास्त्रें होऊं सकणार (यथा) नाहींत. वेदांवांचून दुसरें शास्त्र नाहीं हेंच मत सर्वमान्य आहे. त्यास अनुकूल असेल तर, दुसरें वाक्य घ्यावयाचें, विरुद्ध असलें तर घ्यावयाचें नाहीं असा सिद्धांत सर्वत्र ठरलेला आहे. आतां वेदांत काय आहे, हे सर्वांनीं तपासून त्याप्रमाणें चालवें. पुराणांस धरण्याचा विचार कोणी करील तर त्यास अडचणी येतील. मुद्रा लावलेला ब्राह्मण पाहिला तर स्नान करावें! दुसरें वाक्य शिवपुराणांत सांपडेल कीं, भस्म न लावणारा नरकांत जातो. एखादें वाक्य असें सांपडेल कीं विष्णू शिवाय देव नाहीं; कोठें असें सांपडेल कीं, शिवासारखा थोर नाहीं. अशा भ्रामक वाक्यांपासून अज्ञान पोरासारखी स्थिति होऊन कांहींच सिद्धांत व्हावयाचा नाहीं. हल्लीं पुराणाचीं मतें आपण या देशांत पाहतों, म्हणजे शैव आणि वैष्णवाची निंदा, अनेक देवांची उपासना; वेदविरुद्ध अनेक पूजा, व्रतें, उद्यापनें व उपवास या घोटाळ्यांत पडून ज्ञानहीन मुलासारखी स्थिति झाली आहे तीच कायम राहील. पुराणांत असा कोणताही देव नाहीं कीं, ज्यास परमेश्वर ठरविला नाही, आणि तितक्यांची निंदा त्यांत आहेच. शिवाची निंदा, विष्णूची निंदा, इंद्राची निंदा, ब्रह्मदेवाची निंदा, चंद्राची निंदा; कोणीं खोटें बोलला, कोणी व्यभिचार केला, कोणीं परस्त्रीशीं रत झाला, असा भ्रामक बाजार उभा केला आहे; त्यांत विचारवंत प्राण्यास कोठेंही मुक्कामाचें स्थळ आढळणार नाहीं. याजकरितां सर्व शास्त्रांचा बाप वेद; तेथेच जावें हें नीट. स्वार्थी लोकांनीं सांगतांना वेदाचा अर्थ सांगतों ह्मणून बोलण्यास आरंभ केला. आणि देतांना खोटे रुपये पदरी घातले, ते आंधळ्यांनीं ओळखिले नाहींत. परंतु आतां जे डोळस असतील त्यांणीं ओळखून वेदाचा अर्थ व मतलब काय याचा विचार करावा ह्मणजे यथार्थ धर्म ध्यानांत येईल.

सांप्रतकाळास व प्राचीनकाळास बहुत अंतर पडलें आहे. पूर्वीचीं नांवेंच पाहा!—कय्यट, पैल, कपिल, पाणिनी, बौधायन, कणाद इत्यादि; हल्लीं अशीं नांवें मुळींच प्रचारांत नाहींत. पुराणांत देवादिकांचीं वर्णनें आहेत, त्याजवरून पडलेलीं नांवें आतां देतात—भवानीपंत, खंडोपंत, मोरोपंत इत्यादि.

पुरुषार्थानें उंच होण्याचा हेतु सोडून प्रस्तुत जिकडे पहावें तिकडे उंच होण्याचे तीन प्रकार लोकांनीं घेतलें आहेत:— कोणी म्हणतो, आम्ही वेदमंत्रांनीं कर्म करूं, कोणी ह्मणतो आम्ही यज्ञोपवीतें घालूं व कोणी म्हणतो आम्ही विधवेचें वपन करून तीस दुसरें लग्न करूं देणार नाहीं! ह्या तीन गोष्टींत कायतो उच्चपणा आला आहे!! आणि त्याजबद्दल मोठ्या वाटाघाटी व तंटे होतात. ह्या प्रमाणें लोकांस मोठें राज्यकरण (यथा) कायतें हेंच राहिलें आहे! अशा अल्प प्रकरणांत मोठालें शहाणें पडून आपला अमोल्य वेळ घालवितात ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे? ब्राह्मण म्हणतात, आमचा ब्राह्मणी राजा असता तर सर्वांची खोड काढली असती; व परभू म्हणतात, आमचा परभू राजा असता तर ब्राह्मणांची खोड जिरविली असती. परंतु अशा कृतीनें कोणीही उच्च न होतां उलटें नीच होत चाललें आहेत. त्याची मर्यादा येथपर्यंत येऊन पोहोंचली कीं, परकी राजा असला तर लोक खुषी होतात. परंतु स्वदेशीय असला तर त्यास कोणती तरी जात असेलच. मग बाकीचें लोक कुरकुर केल्यावांचून राहणार नाहींत. यास्तव लोकांनीं असें पक्कें समजावें कीं, उच्च होण्याचीं साधनें हीं नाहींत. विद्या, परोपकार, पुरुषार्थ व न्याय इत्यादि सद्‌गुणांनीं युक्त जो मनुष्य तोच उच्च अथवा थोर. घरांत अधिक बोडक्या केल्या किंवा गळ्यांत यज्ञोपवीतांचीं चव्हाटें घातलीं अथवा ज्यांचा अर्थ समजत नाहीं अशा वेदमंत्रांनीं कर्में केलीं तर तितक्यानें उच्चपणा कोठून येईल?

गांवोगाव हे ज्ञातींचे तंटे फार माजतात. लोक मुख्य गोष्ट व कर्तव्य काय तें हेंच, असें समजतात. यामुळें दुष्टपणा व द्वेष इतका दृढ झाला आहे कीं, तो वंशपरंपरा चालत जात असतो!

याज्ञवल्क्य आणि वैशंपायन यांचा पूर्वी कधीं काळीं कलह झाला असेल परंतु त्याजबद्दल यजुर्वेदी व ऋग्वेदी ब्राह्मण अद्याप तंटे करतात. हसन व हुसेन कधीं काळीं मारले गेले. त्यास हजारों वर्षें झालीं. परंतु त्यांचे दुःख आज मानून मुसलमान लोक रडत बसतात! अशा वेड्या चाली पडल्या आहेत. त्यांत अर्थ पाहिला तर कांहींच नाहीं. लोकांचा दुरभिमान मात्र आहे. हे दुरभिमान ऐक्यतेचे नाशक होत. ह्या दुरभिमानानें ब्राह्मण बुडाले आणि दुसरे कारण असें झालें कीं, मनुष्यास शाहाणपणा येण्याचे मार्ग दोन आहेत. विद्या किंवा व्यवहार. परंतु, यांतील एकही ब्राह्मणांस प्राप्त नाहीं. कारण कीं, विद्या घोकण्याची, ती आहे नाहीं सारखीच. व्यवहार तर मुळींच शून्य. तेव्हां ते शहाणें कसे व्हावे !! क्षत्रिय, रजपूत वगैरे लोकांमध्ये अफू खाण्याची चाल पडली, तेव्हांपासून त्यांचें क्षात्र जाऊन ते अतिनिंद्य स्थितींत आले व परस्वाधीन झाले. आज हजार पंधराशें वर्षांपासून लोकांस सुशिक्षित करणारे राजे या देशांत नाहींसे झाले. त्यामुळें येथील प्रजा केवळ पिशाच्याच्या अमलांत नांदू लागली, व कोणास म्हणून सुलक्षण लागलें नाहीं. मन मानेल ते विचार आले. त्यास काय उपाय करावा ह्याचा कोणासच कांहीं विचार सुचत नाहीं ; वैश्य हे असत्यानें बुडाले. कोणताही व्यापार सत्याशिवाय चालत नाहीं. ते लबाड्या करूं लागले व देशावरचरची खबर पाहीनात असे झाले, तेव्हां त्यांची पत व साहस आणि व्यवहारोपयोगी ज्ञान हीं नाहींशीं झाली. अशी त्रिवर्णाच्या सद्गुणांची हानि झाली.

मुलगी लग्नाची झाली या निमित्तानें हजारो ब्राह्मण भिक्षा मागत फिरणारे आढळतात व ह्यामुळें, अमुक द्रव्य पाहिजे तेव्हां लग्न होणार अशी वाईट रीति चालू झाली. हें लोक पाहतात, परंतु त्याला उपाय करीत नाहींत व त्याविषयीं कोणास कळवळा किंवा दया येत नाहीं. जे आपलें घर विसरले त्यांस दुसऱ्याचे घरची स्थिती कशी कळेल ? हें स्पष्ट आहे. आपले देशांत काय दुर्दशा आहे तें मनांत आणीत नाहींत; आपलें शास्त्रांत काय आहे तें मनांत आणीत नाहींत; असें अज्ञान लोक परकीयांची दया किंवा दुसऱ्या देशाचा विचार काय करतील ?

अल्पवयीं लग्नें करू लागल्यापासून बल, तेज, विद्या, साहस व आयुष्य, ह्या सर्वांचा नाश झाला. परंतु हीं सर्व नाशाचीं कारणें तपासावयास ठिकठिकाणीं लोक बसले पाहिजेत व त्याची चर्चा झाली पाहिजे; जाती संबंधीं वैर सोडून एकोप्यानें वागलें पाहिजे; ईश्वरभजनाचा मार्ग जसा ज्यास आवडेल तसा तो करील, व्यवहाराशीं त्याचा संबंध नाहीं; असें समजून सर्वांनीं यथान्याय वर्त्तावें. आपल्या थोरपणापासून दुसऱ्यास उपद्रव न झाला तरी त्याचा कोणी त्रास करणार नाहीं ह्याविषयीं आणि आपला थोरपणा सत्याचे पायावर स्थापन होईल तितका करण्याचा यत्न करावा. तसेच बुद्धिमान लोक कोणत्याही जातीतील असोत त्यांसच उच्च मानावे. जशी उत्तम जमीन कामास लाविल्यापासून आपणास लाभ आहेत, त्याचप्रमाणें उत्तम बुद्धीच्या मनुष्याचा उपयोग जितका होईल तितका करून घ्यावा. व हेंच परिणामीं सर्वांस श्रेयस्कर व हितप्रद आहे.

लोकहितवादी

• •

# भिक्षुक

या हिंदूस्थानांत अन्न बहुत पिकतें. यामुळें आतिथ्याचा सांप्रदाय फार चालत आहे. आतिथ्याचा धर्म श्रेष्ठ आहे असें वेदांतही सांगितले आहे. कोंकण, देश, गुजराथ, कर्नाटक वगैरे सर्व प्रांतात जे संभावित गृहस्थ आहेत त्यांस असें वाटतें कीं, आपले घरीं कोणी पाहुणा अथवा अन्नार्थी आला आणि त्याची सरबराई आपलेकडून न झाली तर आपल्यास मोठी लज्जेची गोष्ट आहे. ही समजूत अगदीं गरीब ब्राह्मण, कुळंबी व कोळयापर्यंत देखोल आहे. आल्या गेल्याचा समाचार होतो तो सद्गृहस्थ असें समजतात. ही रीत फार चांगली आहे असें कोणीही म्हणेल, परंतु यांत तरी विवेक पाहिजे. या चालीवरून अनेक ढोंगे लोकांत उत्पन्न झाली आहेत. लग्न जाहले म्हणजे पंचवीस गांवास बोलावणे पाठवून हजारों लोक जमा करून त्यांस जेवण देतात; तसेच कोणी मेले तर त्याचा मोठा समारंभ करून हजारो लोकांस जेवण देतात. ह्या चाली कोणी चांगल्या म्हणणार नाहीं. जो अडचणींत असेल किंवा जो पांथस्थ असल्यामुळे गैरमाहिती असेल, किंवा स्नेही असेल त्याचे यथायोग्य आतिथ्य करणें हा सद्गुण आहे. परंतु गर्व व ढोंग दाखविण्याकरितां मनस्वी खर्च करणे हें कांहीं योग्य नाही. आतां भिक्षेस सत्पात्र कोण याचा विचार केला तर असें दिसतें, कीं प्रथमतः अंध, पंगु, दरिद्री, रोगी व अशक्त हे तिचे योग्य अधिकारी आहेत. कारण ते आपले बंधु होत आणि त्यांजवर वखत पडला तर त्यास सांभाळण्याचे आपले काम आहे. त्यांत जातिभेद व देशभेद हे कांहो विचाराबयाचे नाहींत. तसेंच आणखी शिकविल्याशिवाय माणसें चांगली होत नाहींत. व्यवहारिक विद्या, निति आणि पारमार्थिक ज्ञान मिळाल्यावांचून ती पशू सारखी राहतात. याजकरितां जे लोक विद्यावृद्धीचे व पारमार्थिक ज्ञानाचे उपदेश करून मनुष्यास उत्तम स्थितिंत आणावयाचे कामांत पडले आहेत त्यांस दान देणें अवश्य आहे. हा दुसरा वर्ग. याशिवाय तिसरा वर्ग धर्मास पात्र दिसत नाही.

पुरातन भिक्षुक या देशांत ब्राह्मण आहेत. त्यांसच पूर्वी ऋषी म्हणत असत. त्यांचे काम स्वाध्यायाचे म्हणजे विद्या शिकविणे व वाढविणे पारमार्थिक ज्ञानाचा उपदेश करून लोकांस पवित्र नितिमंत व ईश्वराचे भय बाळगणारे करणे हे होते. पुढे ऋषित्व जाऊन माणसें झाली. पूर्वीचे धर्म सुटले. ब्राह्मण अरण्ये सोडून गृहस्थ झाले. हल्ली पंडित, शास्त्री, वैदिक, श्रौती, याज्ञिक, पुराणिक, वैद्य, जोशी, हरदास असे पृथक धंद्यावरून त्यांचे पृथक वर्ग झाले आहेत. त्यांत आणखी नवीन पोट भरण्याच्या युक्ती निघाल्या आहेत, त्या अशा कीं, कोणी क्षेत्र उपाध्ये, कोणी तीर्थवासी, कोणी पुजारी, कोणी महानदीस प्रदक्षिणा करणारे, कोणी कावडे, कोणी यात्रेकरू म्हणवितात.

आणि या निमित्तांनी पोट भरतात. तसेंच कोणी दिक्षीत, कोणी सोमयाजी, कोणी गयाबळ, कोणी प्रयागबळ, कोणी चोबे, कोणी बडवे, कोणी दातरी, कोणी साधुसंत, कोणी बोवा, कोणी संन्यासी, कोणी ब्रह्मचारी, कोणी मंत्रशास्त्री अशा नावांनी पोट भरतात. निरनिराळे जातींचे लोकांस उपाध्यायिक वृत्तीने निरनिराळे ब्राह्मण वाटले गेले आहेत. जसे भाट्यांचे उपाध्ये पोकरणे, क्षत्रियांचे व भणसाली यांचे सारस्वत, खडायता वाणी यांचे खडायते ब्राह्मण वगैरे.

प्राचीनकाळीं ब्राह्मणांनी भिक्षा फुकट घेतली असें म्हणवत नाही. कारण कीं त्यांणीं अनेक शास्त्रे, तर्कशास्त्रे, छंद, गणित, ज्योतिष, आयुर्वेद, व्याकरण इत्यादि विद्यांवर परिश्रम करून त्या बऱ्याच वाढविल्या. पुढें तें काम सोडून स्वार्थी जाहले आणि अनेक प्रकारचीं ढोंगे करून पोट भरूं लागले. त्याचप्रमाणे ते निंदेसही पात्र झाले. त्याचा मानही घटला ही निकृष्ट स्थिती त्यांची स्वकृतिची असोन कलियुगाचें निमित्य सांगतात. विचार करतील तर कलीचें मूळ त्यांजवळ आहे असें दिसेल.

सर्व देशांत धर्माधिकारी यांची आपले महत्व वाढविण्याकरितां लोकोत्तर गोष्टी करण्याचे सामर्थ्य आपल्यास आहे असे प्रसिद्ध करण्याची चाल आहे. असें केल्याशिवाय लोक चांगले कबज्यांत येत नाहींत हे त्यास ठाऊक होतें. त्याचप्रमाणें ब्राह्मणांनी या देशांतही आपले विलक्षण सामर्थ्य प्रसिद्ध करण्याकरितां मोठाले ग्रंथ लिहून त्यांत शाप व आशिर्वाद दिल्याने मोठाले परिणाम जाहले असें सांगून भोळे व अज्ञानी लोकांवर आपला अंमल बसविला. ब्राह्मणांचे आशिर्वादाने हजारो लोकांस संतत्ती संपतो मिळाली व त्यांचे शापाने हजारों राजे परिक्षित, सगर दशरथ इत्यादी दुःखांत पडले अशा कथा प्रसिद्ध केल्या. विद्येची व श्रेष्ठत्वाची खरी शिफारस नाहीशी झाली. तेव्हां ही युक्ती चालविली. मूळचे ब्राह्मण विशेष तप करणारे नव्हते. परंतु आनंदी असून विशेष कुशल व विचारशील होते.

यापुढें बौद्ध मत प्रकट झाले. तेव्हां पासून शरीर दंडणाचे तप व दया धर्म फार वाढले. उपवास करणें, साधु होऊन देश फिरणे, उपभोगाचा त्याग करणे, हिंसा न करणे हे धर्म त्यांणी श्रेष्ठ गणले होते. त्याचे योगाने त्यागीपणा, उदासीनपणा, संन्यास, अहिंसा, कर्मत्याग, विरक्तपणा हे धर्म ब्राह्मणांत शिरले असें दिसते. याची कारकीर्द फार मोठी झाली व बहुत ग्रंथ लिहिले गेले, व चीन, ब्रह्मदेश, लंका इत्यादी ठिकाणी त्यांचे प्रचारक जाऊन धर्म प्रसिद्ध केला. त्याची मेहनत ब्राह्मणांपेक्षांही अधिक आहे. ब्राम्हणांनी आपला वैदिक धर्म व वर्णभेद भरतखंडात चोहोंकडे स्थापिला, परंतु जैनमताचे लोकांनी भरतखंडाचे बाहेर दूरवर आपला धर्म स्थापन केला. ब्राह्मणांचे विरुद्ध स्त्रियांसही ते संन्यास देत व भिक्षुक लोकांकरितां मठ बांधण्याची चाल त्याणी पाडिली. डोंगरांतील लेणी ही त्यांचे साधूंची स्थाने अद्याप आहेत. त्याजवरून त्यांच्या अनुयायी लोकांच्या संपत्तीचे व भक्तीचे अनुमान होते. जती, साधु व साधवी हे त्या मताचे संन्यासी. या देशांत पुष्कळ आढळतात. आतां या साधूंनी अमुक काम करावें याविषयीं लोकांमध्ये आग्रह नाहीं. वेष धारण केला म्हणजे तो भिक्षेस पात्र झाला असे लोक समजतात. ज्याप्रमाणे हिंदू लोक ब्राह्मणांविषयी काही योग्यता किंवा कर्म पाहत नाहींत, केवळ जन्मतः ब्राह्मण असला कीं त्यास भिक्षेची सनद मिळाली, याचप्रमाणें श्रावक लोकांमध्ये आहे. मतस्थापक जे पुरुष झाले त्यांची आतुरता व मेहनत व उद्योग जाऊन पुढें त्यांचे जागीं वेडगळपणा आला अनेक मुर्खपणाचे नियम अंगिकारिले आणि गावांच्या गावांत राहण्याची इच्छा धरून पराक्रमहीन व बुद्धीहीन झाले. आपले वेदांत व शास्त्रांत काय आहे हे न जाणता केवळ ग्रंथपाठ करून विद्वान म्हणवितात. याप्रमाणे जे आपले घर विसरले ते दुसऱ्याचे घराचा ठिकाण कोठून लावणार? यांजमुळे मुसलमान आदिकरून लोकांच्या मोठ्या चढाया झाल्या तरी हिंदू लोक निद्रावस्थेंत राहिले, ती निद्रा अद्यापही गेली नाही, परदेशांत जावयाचें नाहीं. परकीय भाषा शिकावयाची नाही असे

मोठाले नियम या निद्रेचे संरक्षणाकरितां केले आहेत. आपले शास्त्रांचा अर्थ पाहावयाचा नाहीं त्याजमुळे त्यांचा लोकांवर भार मात्र राहून उपयोग नाहींसा झाला. सर्व साधूंस व ब्राह्मणांस गृहस्थश्रमाची अपेक्षा आहे. त्यावांचून त्यांचे पोट भरत नाहीं. साधु कांहीं पिकवीत नाहींत दुसऱ्यांनी पिकवावें तेव्हां त्यांनी खावे. परंतु पिकविणारे हे हलके पदवीचे आणि आपण त्यागी म्हणून श्रेष्ठ पदवीचे व मेहनत करणारे लोकांनी आपणांस फुकट पाळावे अशी त्यांणी लोकांच्यात समजूत घालून दिली आहे.

यानंतर जोगी म्हणून एक मत उत्पन्न झाले. त्याचाही बाणा असा असे कीं, आम्हांमध्ये अद्भुत सामर्थ्य आहे. ईश्वर आपले आज्ञेत आहे असें त्याणी प्रसिद्ध केले. यामध्ये नवनाथ व चौऱ्यायशीं सिद्ध झाले असे म्हणतात. गोरखनाथ, अदिनाथ वगैरे यांपैकी आहेत. त्यांणी गोपीचंद राजाचे येथे मोठा अंमल बसविला ते प्रसिद्ध आहे. गोंधळी, नाटकी, तमासगीर वगैरे त्यांची कथा सांगतात. हे योगी आपल्यांस शिवाचा वंश म्हणवितात व गळ्यांत सैली म्हणून काळे यज्ञोपवीत घालतात व एक वाजिवण्याची पुंगी जवळ बाळगितात.

किती एक कान फाडून त्यांत कुंडले घालतात. ही क्रीया जेव्हां लहान मुलांवर करितात. तेव्हां किती एक चेले पळून जातात व किती एक सहा सहा महिने अजारी पडतात. या लोकांस मद्यमांसाचा आहार करण्यास हरकत नाही. ते म्हणतात कीं, आम्ही केवळ ब्रह्म झालो. आतां पाप व पुण्य दोन्हीही आम्हांस स्पर्श करीत नाहींत. शक्ती उपासक शाक्त यांचा आचार या जोगी लोकांशी मिळतो. त्यांत कोणी अघोरी म्हणवितात. ते माणसांचे मांस खातात अशी प्रसिद्धी आहे व शाक्त पुरलेली प्रेते अनुष्ठानाकरितां काढतात असेंही म्हणतात, याजकरितां प्रेत दहन करण्यास लोक जातात, ते, तें पुरतें जळाल्याशिवाय परत येत नाहींत. व बाळंतीण पुरली तर महिनाभर तेथे चौकी ठेवितात. अमदाबादेस अघोरी यांची दोन तीन स्थळे आहेत, तेथे आतां अघोरी नाहींत. परंतु प्राचिनकाळी तेथे होते असें म्हणतात. तसेंच गिरनारचे डोंगरावर अघोरी लोक होते असें म्हणतात, व अबूचे डोंगरावरही ते पूर्वी राहत होते असे म्हणतात. जे कान फाडीत नाहींत ते अवघड असें म्हणवितात. किती एक वाईट भक्ष खातात. कोणी आपले मूत्र आपण प्राशन करितत. कोणी प्रेताचे मांस खातात. त्यांस विधीनिषेध नाही असे ढोंग करितात. शाक्त, सरभंगी, परमहंस, कौल अवघड, अघोरी, वेदांती यांची मते जवळ जवळ आहेत. धर्मशास्त्र मानावयाचे नाही हा त्यांचा मुद्दा आहे. काठेवाडांत गोरखमठी म्हणून जुनागडाजवळ एक संस्थान आहे. तेथे ही नाथ मंडळी बरीच दृष्टीस पडते. तसे जोतपुरास यांचे संस्थान आहे. राजा मानसिंग यास असें वाटलें की, नाथांच्या आशिर्वादाने मला राज्य मिळाले त्याजवरून त्याणे त्यांस आपले गुरू केले होते. अशी ठिकठिकाणी त्यांची ठिकाणे आहे. अमदाबादेंत बाजारांतच एक माणिकनाथाचे संस्थान आहे. त्याच्या सिद्धाईच्या गोष्टीही बहुत आहेत. जों जों ज्ञान वाढून मनुष्ये शहाणीं होत चालली आहेत तों तों या भ्रमांचा नाश होत चालला आहे. याचप्रमाणे पिशाच्यांशी भ्रांति दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. अवसर आणणारे पंचाक्षरी, भुताळे, डांकिणी, गुरव कौल लावणारे, देवस्की करणारे ही सर्व मंडळी कमी होत चालली आहे. खंडोबाचा अवसर, वेताळाचा अवसर, बिराचा सिंचार, देवीचा अंवसर असे दाखविणारे अद्याप आहेत. परंतु यांतील नऊ हिसे लोक कमी झाले. योग्यामध्यें राजयोगी व हटयोगी असे भेद आहेत. इंग्रजींत ही प्रकर्णे कमी झाली. परंतु संस्थानांतुन ही मंडळी अद्याप आहे.

सयाजी महाराजां जवळ लाडबा भगत होता व त्यांचे पुत्र खंडेराव गायकवाड यांचे जवळ फकीर जमले होते व मल्हारराचाजवळ दादा अंबीकरांसारखे अनुष्ठानि रोज आंगारा देण्यास येत हें बहुतांनी पाहिलेंच असेल. महादजी शिंदे यांचे गुरू बीडचे फकीर व सातारकर महाराजांचे

गुरू रामदास व गणेशदेव माहुलीकर होते. पेशव्यांचे गुरू चिंचवडकर देव होते. अशी दर एक राजांजवळ ही खुळे आहेत. सयाजीमहाराजांजवळ लाडबा भगत ज्यास लाख रुपयांची जाहागीर होती तो तळेगावांचा गोंडी होता. त्यांचे महात्म फार वाढले होते. त्याणे मंत्रून लेखणी द्यावी तेव्हां गायकवाडांनी सही करावी. कोल्हापूरकर राजे यांचे गुरुबाबामहाराज, बाजिरावाचे गुरू ठाकुरदासबुवा व शिंद्याचे गुरू गोविंदबोवा होते. असा तपास केला असतां सर्व ठिकाणी सापडतील.

यानंतर चवथे भिक्षुक उत्पन्न झाले ते जंगम आहेत. हे लिंगायत लोकांचे गुरू. त्यांची अष्ट लिंगे आहेत. त्यांत हे जंगम लिंग मोठे दैवत म्हणून त्यास बेल वाहतात. त्याचे पाय धुऊन पाणी पितात. लिंगायत यांचा मत प्रवर्तक बसवाप्पा म्हणून ७०० वर्षापूर्वी बारशी येथे झाला. तो मोठा शैव होता व नित्य एक शिवालय बांधून त्याचा उत्सर्ग करी तेव्हां अन्न खात असे. यास नंदीचा अवतार म्हणतात. यांचे नांवाचे बसव पुराण म्हणून आहे. ते लिंगाईत वाचीत असतात. व त्यांचे याशिवायही आगम नांवाचे दुसरे ग्रंथ आहेत. एका काळीं शैव मत या देशांत मोठे प्रबळ होते त्याकाळी काशी, सोमनाथ व उज्जनी वगैरे शिवपुऱ्या स्थापन जाहल्या. या त्याठिकाणच्चीं देवळे पाहिली तर इतकी कोणी बांधली असावी असे वाटते. जसे जैन मताचे पालिठाणें हें मोठें क्षेत्र आहे. त्याचप्रमाणे कोट्यावधी रुपयांची देवळे आहेत व अबूवरची देवळे जशी अद्वितीय अति खर्चाची आहेत त्याप्रमाणेंच या शिवपुऱ्यांतून शिवालये आहेत. त्यांची संख्या करण्यास कोणी समर्थ नाही. जंगम म्हणतात की, शिवलिंग धारण केले म्हणजे त्यास यमाची बाधा होत नाही, ते मृतात शिव झाला असे म्हणतात. व मृताचा उत्साह करितात, सुतक वगैरे क्रिया कर्मे कांहीं करीत नाहींत. स्त्रियांत ही लिंग धारण भस्म धारण, त्यांच्यामध्ये आहे. त्यामुळे त्यांस विटाळ कधीच होत नाहीं व इतर हिंदूनी यांचे अन्न पाहिले तर ते विटाळते. त्यांची वस्ती, वैराग, बारशी, सोलापूर, बागलकोट या प्रांती बहुत आहे. शंभूमहादेवाकडे जंगम पुष्कळ आहेत व ते डमरू वाजवून ते भीक मागतात व शिवाची गाणी म्हणतात, या देशांत जंगम आहेत ते शिवाची भूषणे धारण करून भीक मागतात.

पांचवा भिक्षुकांचा वर्ग गोसावी हा आहे. गोसावी या हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत. ठिकठिकाणीं यांचे मठ आहेत. मोठा मठ असतो. त्यास आखाडा म्हणतात. प्रयाग, हरिद्वार, काशी ही त्यांची मुख्य क्षेत्रे आहेत. हा वर्ग मुळी शंकराचार्यांनी उत्पन्न केला असे म्हणतात धर्मशास्त्रांत शुद्रादिकांस संन्यास लिहीला नाही. पण शंकराचार्यांनी त्याग धर्म वाढविण्याकरितां दशनाम गोसावी केले. अशी कथा आहे. ह्यांतील कितीएक व्यापार करितात. कितीएक घर करून आहेत. परंतु मुले झाली तरी त्यांस विरजाहोमपूजा करून दीक्षा देऊन चेला करितात. शिखासूत्र ठेवित नाहीत. कितीएक भिक्षा मागतात. यांजमध्ये मोठे भंडारे (मेजवान्या) करितात. मेल्यास पुरतात. हे शैव आहेत परंतु अहंब्रह्म म्हणविणारे असल्यामुळे मद्य मांस खाण्याचा निषेध बाळगीत नाहींत, कारण कीं यांनीं कांहीं केले तरी पाप लागत नाहीं असे यांचे मत आहे. त्यांच्यामध्ये सात आखाडे आहेत. (त्यास दिगंबरी, निर्वणी, निरंजनी इत्यादी नावे आहेत.) यांच्यामध्ये तंटा पडला तर महंत आणून त्याचा अभिप्राय घेतात. त्याहून मोठे काम असेल तर दशनामी संस्थान करितात. कितीएक गोसावी संस्थानी आहेत. अमदाबादेपलीकडे पारसनाथ म्हणून गाव आहे तेथे बाबा आहे त्याचे येथे हत्ती आहेत. बुद्धगयेस जो महंत आहे त्यासही लाख रुपयाचे उत्पन्न आहे. भाले निशाणे चालविणारे गोसावी बहुत आहेत. ते पूर्वी लढाया करीत व गांव लुटीत. गोसावी यांची झुंड आली तेव्हां त्यांस अमुक रुपये दिले असा तपशील हरएक गांवचे जुन्या हिशेबांत आढळतो. स्वराज्ये जेव्हां दुर्बळ होतीं तेव्हां यांच्या झुंडी देशभर फिरत. पेंढारी व गोसावी यांच्या झुंडीत अंतर इतकेच कीं पेंढारी जितके सांपडेल तितके सर्व लुटून घेत आणि

गोसावी एक दिवसाचे अन्न घेऊन जात. बाजिरावाजवळ गोसाव्यांची मोठी फौज होती त्याजवर मनोहरगिरी बोवा सरदार होता. त्यापैकीं खडकीचे लढायीत बरेच पडले याप्रमाणे बहुत राज्यांत यांच्या फौजा असत. ते बहुतकरून तप करितात, कोणी मौनी होतात, कोणी पंचाग्नी सेवन व कोणी धुम्रपान करितात. यांची व वैष्णवांची आदावत फार आहे. नित्य एक वैष्णव मारावा तेव्हां अन्न खावे. असेही दुष्ट प्राणी या लोकांमध्ये झाले आहेत. भैरवगिरी म्हणून एक गोसावी द्वारकेचा रस्ता धरून बसला होता व जो जो बैरागी द्वारकेस जाताना सापडेल त्याला मारून टाकीत असे. जर एखादे दिवशी मनुष्य मिळाला नाही तर काठीचा बैरागी करून त्यास मारावा आणि नंतर जेवावे असा त्यांचा नेम असे. अशा कारणाने द्वारकेची यात्रा कितीएक दिवस बंद पडली होती. इंग्रजी झाल्यावर द्वारकेचा रस्ता चालू झाला. ज्या ठिकाणी मद्य मांसाचा नैवेद्य होतो त्या देवाचे वैष्णव दर्शन करीत नाहीत. परंतु गोसावी करतात. हिंगळाज, अंबाजी, तुळजा भवानी या ठिकाणी वैष्णव जात नाहींत. या लोकांनी चार मेळे स्थापन केले आहेत. एक हरिद्वार, दुसरा प्रयाग, तिसरा उज्जनी, चौथा त्रिंबक या ठिकाणी अगोदर स्नान गोसाव्यांनी किंवा बैराग्यांनी करावे ह्याबद्दल मोठे तंटे पडतात. सन १८०२ साली हरिद्वारास मोठा बंदोबस्त नव्हता व शिंदेशाईत बाजिरावी झाली तेव्हा अशा प्रकारचा तंटा उत्पन्न झाला होता तेव्हां सरकारी कारभारी होते त्यांनी सांगितले कीं, "आमच्याने तंटा तुटत नाहीं तुम्ही आपसांत तोडून घ्यावा जे मोठे म्हणवितात ते आपणाला मोठेपणा दाखवितील." त्यांजवरून बैरागी व गोसावी बाहेर पडले आणि लढाई झाली त्यांत सतरा हजार वैष्णव ठार झाले आणि गोसावी विजयी होऊन त्यांणी अगोदर स्नान केले. तेव्हांपासून वैष्णवांनी तो मेळा टाकून दिला. उज्जनीस याचप्रमाणे झाले. व वैष्णवांनी तो मेळाही टाकला. त्रिंबकास गेले सिंहस्थी नागव्यांनी नदीत जाऊन स्नान करावे याजबद्दल तक्रार दिलीं होती. परंतु गोसावी जबरदस्त याजमुळे हे सर्व मेळे निर्विघ्नपणे शेवटास जातात. नाहीतर हे अज्ञानी लोक अनर्थ केल्यावांचून राहावयाचे नाहींत.

गोसाव्याचे पुढे चार संप्रदायाचे वैष्णव झाले. त्यांत सांप्रदाय चार प्रवर्तक रामानुज, मध्व, विष्णु स्वामी, व निंबार्क हे चार पंथ म्हणवितात. त्यांचे पोटीं पावन द्वारे आहेत. जसे गोसाव्यास गुरूमाळा सांगणे अवश्य आहे त्याप्रमाणे बैराग्यास सांप्रदाय व द्वाररक्षक असले पाहिजे. रामानुज संप्रदाय फार मोठा आहे. यांचा प्रणित तोताद्री पंथी झाला. त्यास रामानंद वगैरे शिष्य मोठे पराक्रमी झाले. त्यांणी हिंदुस्थानभर त्याचा सांप्रदाय प्रसिद्ध केला आहे या सांप्रदायात तिलक पृथक आहेत. विष्णूच्या पायासारिखें उभे लावून त्यामध्ये तांबडी किंवा पिवळी रेघ लक्ष्मीचे चिन्ह म्हणून लावतात याजमुळे रामानुजी यांस श्री संप्रदायी असेंही नांव आहे त्यांत अजून दोन पक्ष आहेत. वेगळे व वढघळे. एक पक्षांत पशु यज्ञ व विकेशवपन होत नाही. दुसऱ्यांत होते. गुजराथेंत स्वामी नारायण झाले त्यास रामानुज स्वामींच्या पोटांतले म्हणवितात. परंतु त्यांचा टिळक व मुद्रा वेगळी आहे. दुसरा मध्य संप्रदाय कर्नाटकांत फार आहे त्यास वीर म्हणतात ते स्मार्तास सारीखें शुद्र मानतात. त्यांच्या तिळकांत काळी रेघ असते. तिसरे विष्णू स्वामी यांचे संप्रदाय गोताडी महाराज हे विष्णू स्वामींचे पोटांत आहेत, ते श्रीचें चिन्ह धारण करीत नाहीत. चौथे निंबार्क स्वामींचा सांप्रदाय जयपुराकडे फार आहे त्यांस नेमार्क पंथी असेही म्हणतात. रामानुज संप्रदायास रामावत असेही म्हणतात. याशिवाय बंगाल्यांत एक नित्यानंद महा प्रभुजी म्हणून आचार्य झाला त्याचें मत तिकडे चालत आहे. हे चारी संप्रदायी लोक वैष्णव म्हणवितात. त्यांचे मतांत थोडा फेरफार आहे. सर्वांचे मत वेदांत्यांचे व गोसावी यांचे विरुद्ध आहे. ते म्हणतात, "अहं ब्रम्ह"–"शिवकेवलोहं" हे मिथ्या आहे. ईश्वर धर्म व जीव दास आहे. त्याणें ईश्वराची भक्ती करावी व ईश्वर सगुण आहे. हे लोक मद्यमांस खात नाहींत. तिळक माळा धारण करितात. कोणी खाकी म्हणवितात. कोणी लाकडाचे पाटबंद (लंगोटी व करगोटा) लावितात,

मृताचे दहन करितात. परंतु क्रियाकर्म करीत नाहीत. ते म्हणतात की, भक्तांस यमाचे भय नाही. यास्तव ब्राम्हणी फिरकत नाहीत. स्वामी नारायणाचे पंथांतील लोकांस सत्संगी म्हणतात. कुबेर भक्ताचे पंथांतील लोकांस हरिजन म्हणतात. या लोकांस भ्रमण हे मोठे कर्म आहे. त्याजकरितां त्यांणी चार धाम नेमिले आहेत. बदरीनाथ, जगनांथ, द्वारकानाथ, रामनाथ याठिकाणी चार तप्त मुद्रा घेऊन येईल त्यास विशेष पवित्र मानतात. कोठे शंकराच्या मुद्रा देतात. कोठे किरिट कुंडलाच्या देतात. अयोध्येस धनुष्यबाणाची मुद्रा देतात अशा पृथक पृथक मुद्रा आहेत दक्षिणा म्हणोन डाग घेतात अशी स्थळे पुष्कळ आहेत यांचे कारण की, आपले सेवक पुन्हा बदलून दुसरीकडे जाऊन येत त्याचप्रमाणे कारागीर वगैरे निरंतरचे चिन्ह करण्याचे कारण आहे. मुसलमानांमध्ये सुंता करण्याचा प्राचीन संप्रदाय आहे तसेच तेही आहेत. हिंदू लोकांमध्ये नाक, कान टोचण्याची रीत आहे तीही याचप्रकारची होय.

याशिवाय १२ व्रते व ३६ पाखंडे आहेत. त्यांत नानक पंथ, कबीर पंथ, उदासी पंथ, दादु पंथ, मलुकदासी वारकरी, रामभाव राव, रामस्नेही बिजमार्गी वगैरे अनेक पंथ व त्यांतील साधू बहुत आहेत वेद विरुद्ध धर्माचे नाव पाखंड आहे. जैनवेद यांस पाखांडी म्हणावें असे गणले जाते. कारण की ते वेद विरुद्ध व मूर्तीपूजा विरुद्ध आहे. हा ब्राह्मणी रीतीचा अर्थ. परंतु साधारण रीतीने ज्या मतांत ईश्वरास मानीत नाहीत त्यांस पाखंड म्हणतात; व शिवाय या लोकांस पाखंडी म्हणण्याची चाल आहे. शंकर मतास वैष्णव लोक पाखंड म्हणतात. व स्मार्त वैष्णवास पाखंड म्हणतात. परंतु यांत काही तात्पर्य नाही. याशिवाय खंडोबाचे वाघे, मुरळी, भाविणी, तुळजापुरचे भुते असे गांवोगावी भिक्षुक बहुत असतात. याशिवाय मथुरेचे चोबे, गयावळ, बडवे, लाला भगताचे इत्यादी अनेक बाहाण्यानें फिरणारे भिक्षुक अनेक आहेत. कोणी वासुदेव, कोणी राऊळ, कोणी ठाकूर, कोणी भगत वगैरे अशी मंडळी बरीच आहेत, शिवपुजा करणारे गुरव किंवा जंगम हे शिवालयाची वृत्ति घेतात. उदासी कबीर पंथ हे मूर्ति पूजीत नाहीत. तसेच श्रावक लोकांमध्ये पुंडिये हे मूर्तिची पूजा करीत नाहीत. 'भिक्षुकास काशी, ब्राह्मणांस बडोदे व मजुरास मुंबई' अशी म्हण आहे. याचे कारण काशींस गोसाव्यांच्या आखाड्यांत शंभर रुपये दिले तर जन्मपर्यंत ठेवण्याचा करार करितात. शिवाय अन्नसत्रे बहुत आहेत. मुक्त जेवणांची अन्नछत्रे, ब्राह्मणांकरिता व सर्व जातीं करिता सदावर्ते आदि या देशांत आहेत.

या देशांत मुसलमान आल्यापासून दुसरे भिक्षुक फकीर म्हणून आहेत. त्यांची पिरांची ठिकाणे व तक्ये पुष्कळ आहेत. अमदाबादचे पिरास चाळीस हजारांची जाहागीर आहे जसे काशी द्वारका प्रयागचे उपाध्ये यात्रेकऱ्यांस सामोरे येतात तसेच तेथील सय्यद प्रसाद घेऊन येतात. फकीरांमध्ये पांच प्रकार आहेत. जलाली, मदारी, बानवा व सुफी व त्यांचे मत वेदांत्यांसारखे आहे. त्यांस ते षरिकत, मार्फत व हकीकत असे म्हणतात. यांचे सरदारास सय्यद म्हणतात. हे जप तप करितात, माळा घालितात. भस्म लावतात, ब्रह्मचर्य करितात, कोणी घरबारीही आहेत.

उत्साहांत ललित करितात; त्यांत जे नानापंथ व जी पाखंडे झाली आहेत ती सर्व वेषरूपाने दाखवितात. चांगले ललित करणारे, फकीर, गोसावी, ब्राह्मण, नाथ वगैरेंची रूपे दाखवून त्यांची चांगली बतावणी करून दाखवितात आणि कोणताही पंथ असो सर्व ईश्वराची प्रसन्नता करून घेण्यास झटतात अशी सूचना करितात.

हे पंथ व मतें प्रवृत्त करणारे जे महापुरुष झाले त्यांणी हजारो लोकांस आपलेकडे वळविले. हा एक मोठा चमत्कार आहे. स्वामी नारायण यांणी १८२० पासून १८२९ पर्यंत पांच लाख लोक आपले आज्ञेंत आणिले. असेच पूर्वीचे आचार्य पराक्रमी झाले. ईश्वराची निःशीम भक्ती, उत्कंठा, सुभाषित व ज्ञान पाहून हजारों लोक त्यांस वश झाले. ही एक त्यांचे चरित्रांत मोठी

गोष्ट आहे. जे लोक धर्म सुधारणा करण्यास इच्छितात. त्यामध्ये असा कोणी महापुरुष प्राप्त होईल. तेव्हा ती सुधारणा चालेल व लोक अनुकूल होतील.

या देशांत मोठमोठे दान धर्म करणारे पुरुष कर्ण सदृश्य झाले. जशी अहिल्याबाई, गोपाळराव मैसाळ, हरिभक्त चंदुलाल इत्यादी यांणी भिक्षा दिली व भिक्षुकांचा उपद्रव फार सोसला. परंतु तेणेंकरून संकटे दरिद्र वाढले व भिक्षुकांची संख्या जास्त झाली. जो साधू व जो फकीर झाला तो त्यांची संख्या वाढवून मेला. असा क्रम बहुतकाळापासून चालत आला आहे. याजमुळे देशातील एक दशांश लोक भिक्षुक आहेत. व भिक्षा मागणे ही लज्जेची गोष्ट न समजतां उलटी मानाची समजतात. कोणी अयाचितवृत्ती म्हणजे सांगावयाचे नाही असा नेम करून असतात. कोणी शुल्कवृत्ति धरीतात. म्हणजे ब्राह्मणांपासून मात्र दान घेतांत. असे अनेक तऱ्हेचे भिक्षुक आहेत व लोकांकडून त्यांस जों जों उत्तेजन मिळते तों तों ते अधिक निरुपयोगी व ढोंगी होतात. फुकट निर्वाह झाल्यावर मेहनत कशाकरिता करावी! म्हणून भांग, अफु, गांजा फुकून काळ काढितात. विद्या करीत नाहीत व लोकही त्यांस विद्या करण्यास जरूर पाडीत नाहीत या प्रकारांनी सरकारांनी वैदिकास उत्तेजन दिले म्हणून वैदिक पुष्कळ झाले व काशी सारख्या क्षेत्रीं मुलास बापानें शीक म्हटले तरी मुलगा अन्नसत्रांत जाईन असे उत्तर देतो. यामुळे हा धर्म फुकट खातो खरे म्हटले म्हणजे सर्व धर्म व दान बीजरूपाने फलद्रूप झाले पाहिजे. आणि उद्योग बुद्धी झाली पाहिजे असा कोणी पुरुष अद्याप झालेला आढळत नाही की, जो मेला व त्याचे पाठी शंभर मनुष्ये उद्योगी व धंदाधारी होऊन त्याचे मदतीने सुखात नांदत आहेत. खंडेराव महाराज मरण पावले त्यादिवशी मोठी झुंबड फकिरांची होती. ते म्हणत की, आम्हांस आता भाकर कोण देईल? भिक्षा मागण्याची सवय लोकांस लावून आपण मेले व फकीर लोक उघडे पडले. असे राजे व सरदार पुष्कळ झाले. यावरून हे ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, आपण मेलो तरी काही संस्था आपल्या सारखी ज्ञानवान व उद्योगी आपण मागे ठेवावी. असा क्रम जर चालेल तर प्रजेतील दरिद्र नाहींसें होईल व भिक्षुक वृत्ती जी कमी होते हल्ली बहुत विस्तार पावली आहे तिचा लोप होऊन प्रजा उद्योगी होईल. परंतु हे कृत्य सरकारानें करू पाहिले तरी व्हावयाजोगे नाही. सर्वांनी या कामाकडे लक्ष देऊन राहिले पाहिजे. सर्व म्हणतात की, अन्नदान मोठे आहे परंतु पुढील ते विसरतात.

॥ अन्न दानात्परंनास्तिविद्यादानं ततः पर ॥

॥ अन्नेनक्षणिकातृप्तियांवज्जीवतु-विद्यया ॥

दाते लोक मुळी विरळा आहेत आणि त्यांणी आपली संपत्ती आणि दानभक्ती दरिद्र वृद्धीकडे लाविली तर दरिद्री वाढून आपणही कधी तरी त्याच माळेंत बसतील. याजकरिता धनाचा विचार गर्भ बीजाप्रमाणे वृद्धीकरितां झाला पाहिजे. हे एक सार ध्यानांत ठेवण्याजोगे आहे.

लोकहितवादी

## परिशिष्ट

### श्रावक लोकांची माहिती

श्रावक लोकांचे ग्रंथ बहुत आहेत. त्यांत कल्पसूत्र व भगवती सूत्र हे लोक वाचितात. क्रिया-कर्म हे यांच्या मध्ये मुळीच नाही ईश्वरही हे मानीत नाहीत. ते तप, सद्गुण व पुनर्जन्म ही मानतात. कैवल्य स्थिति म्हणजे (सुखाची स्थिती) ही सर्व सुखांची परमावधी आहे. व अहिंसा हा परमधर्म आहे. कर्मत्याग करून फल देतें व सृष्टी स्वभावाने व पदार्थयोगाने झाली असे हे मानितात. या मताचे जे सत्पुरुष झाले त्यांची मूर्ति करून त्यांचे भजन करितात व त्यांची

ही कर्मत्याग हा श्रेष्ठ मानिला आहे त्यांचे सत्पुरुष चोवीस झाले. त्यांस अर्हंत किंवा तीर्थंकर म्हणतात. त्यांच्या मूर्ति असतात. त्यांस ओळखण्याकरितां त्यांजवर लिह्रीलेली असतात.

### १. यांचे सत्पुरुष झाले त्यांची नांवे

| नांव | लांछन | निर्वाणस्थान |
|---|---|---|
| (१) ऋषभ देव किंवा ऋषभ आदिश्वर | वृषभ | पालीठाणे |
| (२) अजितनाथ | गज | संमतशिखर |
| (३) शांभवनाथ | अश्व | ,, |
| (४) अभिनंदननाथ | वानर | ,, |
| (५) सुमतिनाथ | क्रौंच | ,, |
| (६) पदनप्रभा | कमल | ,, |
| (७) सुपाश्र्व | स्वस्तिक | ,, |
| (८) चंद्रप्रभा | शशि | ,, |
| (९) पुष्पदंत | मकर | ,, |
| (१०) शीतलनाथ | श्रीवत्स | ,, |
| (११) श्रीअंशनाथ | गेंडा | ,, |
| (१२) वसुपूज्यस्वामी | महिष | चंपापुरं |
| (१३) विमलनाथ | शूकर | संमतशिखर |
| (१४) अनंतजित | श्येन | ,, |
| (१५) धर्म | वज्र | ,, |
| (१६) शांतिनाथ | मृग | ,, |
| (१७) कुंथनाथ | छाग | ,, |
| (१८) अरंनाथ | नद्यावर्त्त | ,, |
| (१९) मल्लीनाथ | घंट | ,, |
| (२०) मुनिसुव्रत | कूर्म | ,, |
| (२१) नेमीनाथ | नीलोत्पल | ,, |
| (२२) अरिष्टनेमी | शंख | ,, |
| (२३) पार्श्वनाथ | शेषफणी | ,, |
| (२४) महावीर अथवा वर्धमान | सिंह | संमतशिखर |

यांचे भजनांत नव ओंकार आहेत म्हणून सर्व श्रावकांस नवकार असे म्हणतात. 'ओं नमः ते हं' हे वाक्य त्यातीलच आहे. हिंदू आपले मुलांस पढवितात. यांचे ग्रंथ मागधी भाषेत आहेत.

### २. नाथ किंवा जोगी यांची माहिती

नवनाथ

| नाथांची नावे | रूपे |
|---|---|
| (१) आदिनाथ यास अवधडनाथही म्हणतात | वायुरूप |
| (२) उदयनाथ | पृथ्वीरूप |
| (३) सत्यनाथ | नलरूप |
| (४) संतोषनाथ | अग्निरूप |
| (५) अचंबेनाथ | पर्वतरूप |

| नाथांची नावे | रूपे |
|---|---|
| (६) गजवक्त्रखंडनाथ | गणपतिरूप |
| (७) सत्सौरंगीनाथ | वनस्पतीरूप |
| (८) मच्छेंद्रनाथ | आकाशरूप |
| (९) गोरखनाथ | ज्योतिरूप |

हे भैरवाचे उपासक व योगी म्हणवितात शिवाचे वंशजही म्हणवितात. मूळ योगेश्वर शिव झाले, त्यांचे हे चेले म्हणवितात. योगेश्वर यांची नावें लिहून पुढे असे लिहीले आहे कीं,—

इत्यादयो महा सिद्धा हटयोगप्रभावतः ॥
खंडायित्वा कालदंडं ब्रह्मांडे विचरंतिते ॥१॥

दत्तात्रय हे योगी होते असे प्रसिद्ध आहे. याज्ञवल्क्य योगेश्वर म्हणतात. परस्पर नाथ पंथी लोक 'गुरू' आहे म्हणून नमस्कार करितात. नवनाथांशिवाय चवऱ्यांयशी सिद्ध झाले. यांची ठिकाणे बहुत स्थली आहेत.

### ३. लोकांची प्रीती आपले गुरूवर किती असते याचे दाखले

(१) कोल्हापुरकर राजे यांचे मूळ पुरुष शिवाजी, तुळभुल्यांमध्ये छपून राहिला होता. तो गळ्यांत कवड्यांच्या माळा घालीत असे. त्यानंतर राज्यावर आला. म्हणून राज्य हे प्रसाद समजून पुढील वंशज कवड्यांची माळ घालितात.

(२) सातारचे राजे यांचे भेटीस चांफळकर स्वामी आले. महाराज त्यांचे बिन्हाडी नित्य जाऊन पोतेरें घालीत. ते उभे राहिले म्हणजे झोळी घेऊन पाठीमागे महाराज उभे राहत.

### ४. लिंगायतांची माहिती

त्यांचे ग्रंथ पंचतंत्रागम, शंकर-संहिता, पाशुयतागम, परमेश्वरायपुराण, वीरागम वगैरे आहेत. त्यांचा मुख्यमंत्र नंदी किंवा वृषभ गायत्री हा आहे. या लोकांत अष्टलिंगे मानतात. ती खाली लिहिल्याप्रमाणे आहेत.

(१) इष्टलिंग हे गळ्यात बांधतात. (२) भावलिंग. (३) आत्मलिंग. (४) जंगमलिंग. (५) प्रसादलिंग. (६) गुरूलिंग. (७) आचारलिंग. (८) स्थिरलिंग.

यांचे प्राकृत ग्रंथातील ओव्या

वीरागमाचे वचन प्रसिद्ध ॥ जंगमानें दिलेला जो प्रसाद ॥
तो ईश्वराचे ठायीं नैवेद्य ॥ योजना करावी ॥ १ ॥
मात जंगम लिंगाचा प्रसाद जाण ॥ आणि पादोदकाचे स्नान ॥
जो माझा धर्म विशेष प्रमाण ॥ तुजकारण सांगितला ॥ २ ॥
लिंगापेक्षा जंगम प्रसिद्ध ॥ मोठेपणा अर्थात सिद्ध ॥
लिंग जंगमाचा भेद ॥ आगमीं सांगितला ॥ ३ ॥
आदि जंगम मूर्ति पाही ॥ त्याचे चरण माझे मस्तकाचे ठायीं ॥
ठेवावे आणि त्याचे पादोदकही ॥ मजसमर्पण करावें ॥ ४ ॥
आणि तयाचे चरणतीर्थ ॥ ते माझें लिंगाशी अभिषेकाय ॥
धरुनि शुद्ध भावार्थ ॥ योजना करावी ॥ ५ ॥

हे भस्म धारण करितात, मृतांस पुरतात, क्रिया वगैरे कांही करीत नाहीत. श्रीशैल्य, अलंमाप्रभु, विश्वेश्वर वगैरे शिवाला मानितात. विष्णूस नमस्कार करीत नाहींत.

## ५. गोंसाव्यांची माहिती

श्री शंकराचार्य यांणी शिष्यांस संन्यास देऊन त्यांस नांवे दिली. त्यांस दशनामसंन्यासी किंवा गोंसावी म्हणतात. ती नांवे–

| मठाची स्थापना कोंणी केली त्याचें नांव | संन्यांसी यांची नांवे | ब्रह्मचारी यांची नावे |
|---|---|---|
| (१) श्री जगन्नाथास पूर्वेचा मठ, गोवर्धन या नांवाचा, पद्माचर्यांनी स्थापन केला. | (१) वन<br>(२) अरण्य | (१) प्रकार |
| (२) श्री द्वारकेस पच्छिमेस शारदामट, स्वरूपाचार्य यांणी स्थापन केला. | (३) तीर्थ<br>(४) आश्रम | (२) स्वर्ग |
| (३) उत्तरेस बद्रिकाश्रमी ज्योतिर्मठ, त्रोटकाचार्य यांणी स्थापन केला. | (५) गिरी<br>(६) पर्वत<br>(७) सागर | (३) आस |
| (४) दक्षिणेस शृंगेरीमठ, पृथ्वीधराचार्य यांणी स्थापन केला. | (८) भारती<br>(९) पुरी<br>(१०) सारस्वती | (४) चैतन्य |

यांचे निरंजनी, निर्वाणी, निरालंबी, दिगंबरी वगैरे सात आखाडे आहेत. हे रुद्राक्षमाळा व व भस्मधारण करितात. कोणी घरदारी असून संसार करितात.

## ६. वैष्णवी संप्रदाय

शंकराचार्यांनी 'अहंब्रह्मास्मि' 'केवलोहम्' 'शिवोहम्' असे मत प्रगट केले, ते कित्येकांस न आवडून त्यांणी भक्ती मार्ग केला; ते देवास सगुण मानितात, व मूर्तिची पूजा करितात. शालिग्राम, गोपीचंदन, मुद्रा व माला यांस फार प्रिय आहेत. त्यांना ते दास मानितात. जीवाचा धर्म सेवा करण्याचा आहे असे समजतात. त्यांतील मुख्य आचार्य आहेत ते येणे प्रमाणे –

मध्व–यांचे मतास द्वैतमत असे म्हणतात. हे कपाळी काळी मुद्रा लावितात.

रामानुज–यात तेंगले आणि वडगले असे दोन पंथ आहेत. काळी किंवा तांबडी रेघ कपाळीं लावितात. हे श्री सांप्रदायी विशिष्टाद्वैती असेही म्हणवितात.

निंबाआर्क – यांचे मतास द्वैताद्वैत म्हणतात व शिष्यांस नीमावंत म्हणतात.

विष्णुस्वामी– यांत चैतन्य, गोस्वामी व नित्यानंद झाले. यांस पौष्टीक मार्गी किंवा शुद्ध द्वैती म्हणतात.

यांत रामानुजांचा सांप्रदाय मोठा आहे, व हा हिंदुस्थान कर्नाटकांत बहुत प्रसिद्ध आहे. या चार सांप्रदायांत बावनद्वारिं जे मोठे भक्त झाले त्यांच्या शाखा आहेत, ह्या भक्तांची नावे खाली लिहिल्याप्रमाणे आहेत.

* (१) आनंतानंदजी, (२) कबीरजी, (३) शुकानंदजी, (४) नंदजी, (५) भावानंदजी, (६) सुरसुरानंदजी, (७) पीपाजी, (८) कालजी, (९) आलनंदजी, (१०) खोजीजी, (११) जगाजी, (१२) वारमत्यागीजी, (१३) दिवाकरजी, (१४) राघवचैतन्यजी, (१५) भगवानारायणजी, (१६) देवकरारजी, (१७) रामजी, (१८) शमरंगाजी, (१९) कूबाजी, (२०) पूर्णवैराटजी, (२१)            (२२) टीटाजी, (२३) हद्रिजी, (२४) सोमजी, (२५) काळुजी, (२६)            (२७) ग्यानीजी, (२८) नाभाजी, (२९) राधावल्लभजी,

* मूळप्रतीत काही नावे स्पष्ट नाहीत. ती आकडे देऊन सोडली आहेत.

(३०) (३१) विठ्ठलजी, (३२) जोगानंदजी, (३३) अलखदेवजी, (३४) (३५) रामराळवजी, (३६) माधवकानीजी, (३७) तपुरंगजी, (३८) विजळतातजी, (३९) आत्मारामजी, (४०) दासकमातजी, (४१) (४२) समरामतमजी, (४३) वनबंकीजी, (४४) चुरनागाजी, (४५) देवजी, (४६) नित्यानंदजी, (४७) चतुरमुनजी, (४८) चैतन्यजी, (४९) रामजी, (५०) थंबनजा, (५१) तनमुळीदाजी, (५२) अनंतानंदजी.

हे चार सांप्रदयाचे लोक अनेक प्रकारच्या माळा नानाप्रकारच्या विष्णू पादाकृती लावतात. त्यात कितीएक त्यागी व कितीएक घरदारी आहेत यांस विद्येची सवयच नाही. ते ठाकूरजीची पूजा करितात. भांग गांजात ते मग्न असतात त्यांस त्यांचे गुरू मंत्र सांगतात. ते मंत्र चोवीस आहेत, हे म्हणतात की, आमचे अच्युत गोत्र व शुद्रवर्ण आहे. आमच्या अनंत शाखा आहेत. असे हे म्हणतात. याच्यांत सर्व जातींचा समावेश होतो. हे चार धाम फिरतात, व तप्त मुद्राही घेतात. यांच्यांत चार धाम फिरतो तो महंत होतो.

यांचे मंत्र व गायत्री खाली लिहिल्याप्रमाणे आहेत.

**(१) राम मंत्र व गायत्री**

॥ ओं क्ली श्री न्हीं रामायनमः ॥ ओंदाशरथायविद्महे ॥
॥ सीतावल्लभायश्री ॥ ओं तन्नोरामः प्रन्नोदयात् ॥

**(२) नारायण मंत्र व गायत्री**

॥ ओं नमोनारायणाय ॥ ओंनारायणाय विद्महे ॥
॥ ओं वासुदेवायश्री ॥ ओं तन्नो विष्णूः प्रचोदयात् ॥

**(३) रुद्र मंत्र व गायत्री**

॥ ओं न्ही श्री भगवते रुद्रायनमः ॥ जों तत्पुरुषाय विद्महे ॥
॥ ओं महादेवायधीमहि ॥ ओं तन्नो रुद्रः प्रचोदयात् ॥

**(४) लक्ष्मी मंत्र व गायत्री**

॥ ओं न्हीं महा लक्ष्म्यैनमः ॥ ओं लक्ष्मीर्भू र्भुवः ॥
॥ लक्ष्मीर्भूर्भुव कीलकं ॥ ओं तन्नो महा लक्ष्मीः प्रचोदयात् ॥

**(५) नृसिंह मंत्र व गायत्री**

॥ ओं नृ नृ नृ नृसिंहायनमः ॥ ओं उप नृसिंहाय विद्महे ॥
॥ पौष्टिकमार्गी धीमही ॥ ओं तन्नो नृसिंहः प्रचोदयात् ॥

**(६) लक्ष्मण मंत्र व गायत्री**

॥ ओं श्री न्ही क्लील लक्ष्मेणायनमः ॥ ओं दाशरथाय विद्महे ॥
॥ ओं अलवेलायधीमहि ॥ ओं तन्नो लक्ष्मणः प्रचोदयात् ॥

**(७) कृष्ण मंत्र व गायत्री**

॥ ओं श्रीकृष्णायनमः ॥ ओं देवकीनंदनाय विद्महे ॥
॥ ओं वासुदेवायधीमहि ॥ ओं तन्नो कृष्णः प्रचोदयात् ॥

**(८) गोपाल मंत्र व गायत्री**

॥ ओं गोपालायगोचराय वंश शब्दायनगोनमः ॥ ओं गोपीज भायविद्महे ॥
॥ वासुदेवायधीमहि ॥ ओ तन्नो गोपालः प्रचोदयात् ॥

**(९) परशुराम मंत्र व गायत्री**

॥ ओं पें क्लीं न्हीं महावीरायनमः स्वाहो ॥ ओं जमदग्न्याय विद्महे ॥
॥ ओं महावीरायधीमहि ॥ ओं तन्नो परशुरामः प्रचोदयात् ॥

(१०) तुलसी मंत्र व गायत्री

॥ ओं तुलस्यै पापनाशिन्यैनमः फट् ॥ ओं तुलसीयायविद्महे ॥

॥ त्रिपुरारियायधीमहि ॥ तन्नो तुलसी प्रचोदयात् ॥

(११) हनुमान मंत्र व गायत्री

॥ ओं श्रीं हं शत्रुसैन्य नाशनाय ॥ वायुपुत्रायममरक्षकुरुस्वाह ॥

॥ ओं अंजनीसुताय विद्महे ॥ वायुपुत्रायधीमहि ॥

॥ तन्नोहनुमान प्रचोदयात् ॥

(१२) गरुडमंत्र व गायत्री

॥ ओ ग्रां ग्रीं ग्रूं ग्रें ग्रौ गः ॥ ओं तत्पुरुषाय विद्महे ॥

॥ स्वर्गपक्षायवधीमहि ॥ तन्नोगरूडः प्रचोदयात् ॥

(१३) अग्निमंत्र व गायत्री

॥ ओं पें ऱ्हां ऱ्हीं श्रीं अग्नेयेनमः फटस्वाह ॥ ओं महाज्वालायविद्महे ॥

॥ अग्निमग्नोयधीमही ॥ तन्नो अग्निः प्रचोदयात् ॥

(१४) पृथ्वीमंत्र व गायत्री

॥ ओं श्रीं प्री वृद्ध पृथिव्यैसहस्त्रमूर्तयेनमः ॥ ओं पृथ्वीं देव्योविद्महे ॥

॥ ओं सहस्त्रमूर्तेधीमही ॥ ओं तन्नोपृथ्वी प्रचोदयात् ॥

(१५) जल मंत्र व गायत्री

॥ ओं ऐ जंपपितयेनमः ॥ ओं जलबिंबायविद्महे ॥

॥ ओं नीलपुरुषायधीमहि ॥ ओं तन्नो अंबु प्रचोदयात ॥

(१६) आकाश मंत्र व गायत्री

॥ श्री गां गीं गूं गगनदेवाय ममशत्रून् नाशयस्वाहा ॥ ओं आकाशायविद्महे ॥

॥ ओं नयायधिमहि ॥ ओं तन्नोगगन प्रचोदयात् ॥

(१७) सूर्य मंत्र व गायत्री

॥ ओं ह्रीं ह्रीं ऱ्हीं सूर्यायनमः ॥ ओं भास्करायविद्महे ॥

॥ ओं दिवाकरायधीमही ॥ ओं तन्नो सूर्यः प्रचोदयात् ॥

(१८) चंद्रमंत्र व गायत्री

॥ ओं ह्रां ऱ्हीं श्रीं चंद्रमसेनमः ॥ ओं वीरपुत्रायविद्महे ॥

॥ ओं अमृतायधीमहि ॥ ओं तन्नों चंद्रः प्रचोदयात् ॥

(१९) गुरुमंत्र व गायत्री

॥ ओं गुं गुरुचरणेभ्योनमः ॥ ओं प्रवर्सायविद्महे ॥

॥ ओं गुरुवक्तायधीमहि ॥ तन्नो गुरुः प्रचोदयात् ॥

(२०) पवनमंत्र व गायत्री

॥ ओं वां वीं वूं वैं वौं वः वायुमूर्त्तयेनयः स्वाहा ॥ ओं पवन पुरुषायविद्महे ॥

॥ ओं सहस्त्रमुर्त्यैधीमहि ॥ ओं तन्नोपवनः प्रचोदयात् ॥

(२१) हंसमंत्र व गायत्री

॥ भों सोऽहं तत्वमार्स अहंब्रह्माऽस्मि सोऽहं ॥ ओं परमहंसायविद्महे ॥

॥ ओं महाहंसायधीमहि ॥ ओं तन्नोहंसः प्रचोदयात् ॥

(२२) गौरीमंत्र व गायत्री

॥ ओं ऐं ऱ्हीं श्रीं क्लीं गौर्येनमः ॥ ओं सुभगायै विद्महे ॥

॥ ओं काममालिन्यैधीमहि ॥ ओं तन्नो गौरी प्रचोदयात् ॥

(२३) देवीमंत्र व गायत्री

॥ ओं ऐं ऱ्हीं श्री दुंदुर्गायैनमः ॥ ओं देवीमायै विद्महे ॥

॥ ओं महाशक्त्यैधीमहि ॥ ओं तन्नो देवी प्रचोदयात् ॥

(२४) कत्रस्याम व गायत्री

॥ ओं ऱ्हीं श्रीं क्लीं नमः सोऽहं ॥ ओं कत्रस्कंधाय विद्महे ॥

॥ ओं कत्रश्यामायधीमहि ॥ ओं तन्नो कत्रस्यामः प्रचोदयात् ॥

इंग्लंडांत ब्रिस्टल या गांवी जार्ज म्युलर याची बेवारस मुलांस व मुलींस शिकविण्याची मोठी शाळा आहे. तींत पंधराशे मुले आहेत व त्यांचा खर्च दोन तीन लाख रुपये आहे. परंतु त्यांची वृत्ती अयाचिताची आहे. तो कोणापाशी पैसा मागत नाही आणि खर्चास पाहिजे तेव्हा ईश्वराची प्रार्थना करितो आणि त्यास ईश्वर कोणाचे तरी हातून पैसा देववितो असे म्हणतात. याच गांवी मिस् कारपेंटरची बेवारस मुलांची शाळा आहे. इंग्लंड देश श्रीमंत असल्यामुळे कोणी धर्मात्मे पैसे देतात. त्यामुळे तिचा खर्च चालतो. या देशांत सर्व धर्म सत्याने अयाचित आहेत (म्हणजे यांचा लोकांवर जुलुम नाही.) तरी मोठ्या खर्चाचे कारखाने लोकांचे खुषीने चालतात. उदाहरण –श्री. नाथजी व्यंकटेश-रपति गोसावी महाराज व स्वामी नारायण लाला भगत व वेद इत्यादी देवस्थाने मोठी आहेत. परंतु यांच्या खर्चापासून काही उपयोग नसून लोकांची सुधारणा न होतां उलट दुर्गुण वाढतात व भिक्षा मागणारे लोकांची संख्या वाढते. परंतु लोकांची समजूत अशी आहे की देवास दिले म्हणजे कल्याण होते. लोकांचे सुधारणेकडे त्यांचे लक्ष नाही. ही देवस्थाने जर उपयोगी होतील व ज्ञानवृद्धीची साधने होतील तर कोट्यावधी खर्चाची संपत्ती उपयोगी पडेल. परंतु तसे होण्यास बहुत काळ लागेल. तूर्त लोकांचा असा कल दिसत नाही.

## "लोकहितवादी" कृतग्रंथांची यादी

(ज्यास पाहिजेत त्यांणे या छापखान्यांत मागावे.)

(१) लाचेविषयी निबंध, (२) होळीविषयी निबंध, (३) भरतखंडपर्व, (४) निबंधसंग्रह, (५) लक्ष्मीज्ञान, (६) यंत्रज्ञान, (७) अलंकारशास्त्र, (८) पंदनामा फारशी पुस्तकाचा मराठी तर्जुमा, (९) गुलिस्थानाचा ८ वा अध्याय, (१०) निगमप्रकाश, (११) आगमप्रकाश, (१२) प्राचीविद्येविषयी संभाषण, (१३) कलीविषयी संभाषण, (१४) भिक्षुकांविषयी संभाषण, (१५) ऐतिहासिक गोष्टी, (१६) साहेबलोकांशी संभाषण, (१७) ज्ञातीविषयी संभाषण, (१८) स्वाध्याय, छापत आहे, (१९) समाधान, छापत आहे, (२०) पाणपताची लढाई.

## बोधपत्र

(ठाणे येथे सूर्योदय छापखान्यांत छापले. १८७८)

स्वदेश बांधव-दादा, बाबा, भाई व ताई या सर्वांस, प्रेमपूर्वक विनंती -

तुम्हांस चार गोष्टी सांगावयाच्या आहेत त्यांजवर लक्ष्य देऊन त्या चांगल्या वाटल्यास त्या तुम्ही आपल्या जीवाशीं धरा. त्या कोणत्या म्हणाल तर, प्रथम सत्याचा स्वीकार करा. कायिक, वाचिक व मानसिक या व्यवहारांमध्ये सत्य कदापि सोडूं नका. खोटी साक्ष देऊं नका. असत्या-वांचून हा संसार चालत नाहीं ही पापी समजूत अगदीं सोडून द्या. सर्वदा मनांत ईश्वराचे भय धरा. कारण कीं, ईश्वरास जो भितो त्यास दुसरे कोणास भ्यावयास नको. दुर्व्यसन सोडून द्या, एवढेंच नाहीं; पण दुसऱ्यास जीं दुर्व्यसनें असतील ती आपल्यास आहेत असें समजून त्याला बोध करून त्या पापांपासून त्यास सोडवा. तोंडांतून वाईट शब्द काढून जिव्हा विटाळूं नका. राजाज्ञा शिरसावंद्य करा; तसाच आईबापांचा सन्मान करून पुत्रपणाचे भूषण करा. मुलांस सत्संगति, विद्या व सद्गुण लावण्याकरितां प्रयत्न करा. सहसा कर्ज करूं नका. मळीणपणा टाकून जितकी होईल तितकी स्वच्छता राखीत जा. शुचिर्भूतपणा हाच आरोग्याचे मोठे कारण आहे. शरीरप्रकृति निरोग राहण्याकरितां सुग्रास अन्न खा, व्यायाम करा, ब्रह्मचर्य पाळीत जा म्हणजे आयुष्याची वृद्धी होऊन संसारिक सर्व कामे सिद्धिस जातील. अल्पवयांत मुलांची लग्ने होतात त्यामुळे लोकांची आयुष्यें, शरीर प्रकृति आणि सामर्थ्य अगदीं क्षीण होऊन प्रजा निस्तेज झाली! बल, धैर्य व साहस नाहींसे झाले! दुर्गुणांनी तुम्हांजवळ येऊं नये म्हणून सत्संग व उद्योग धरा. रिकामा काळ गेला तो पुन्हां येत नाहीं याकरितां आयुष्याचा सद्व्यय करा. आळस सोडून द्या, परोपकार होईल तितका आचरा व विद्येचा आणि ज्ञानाचा विस्तार होईल ती गोष्ट झटून करा. ढोंग व डौल करुन वावगा खर्च करूं नका. मुलांस पोसण्यास व त्यांजकडून विद्याभ्यास करविण्यास सामर्थ्य आहे किंवा नाहीं याचा विचार केल्यावांचून त्यांचे लग्न करूं नका. ज्या देशांत तुम्ही जन्म घेतला त्या देशांतील लोकांचा अभिमान धरुन त्यांचे कल्याण होईल असें करा. सर्व मनुष्यांशीं बंधुत्वाने वागा. पुस्तकांची वृद्धी करावी व वाचणारे ज्यास्ती होतील असें करावे. उद्योगी लोकांस उत्तेजन देऊन भिकाऱ्यांची संख्या कमी होईल ते करावे; कारण, त्यांतच देशाचे हित आहे. भिकाऱ्यांपासून देशास लज्जा व दरिद्र आहे. कोणाचे वैर व विनाकारण निंदा करूं नका; चांगले कामांत ऐक्य करा. व्यापार व शेती वाढवा. कलाकौशल्याची व बुद्धिवानांची राखण करावी; कारण कीं, अन्न पिकेल आणि नफा होईल तर सर्वांस खाण्यास मिळेल. झोंप

आल्याशिवाय निजूं नका व भूक लागल्याखेरीज खाऊं नका. यंत्रांचा उपयोग होऊन मेहनत सुलभ होईल तितकी करा. सर्व कामांत ईश्वरावर भार ठेवा. वादविवाद पडेल तर तो चार स्नेही व प्रामाणिक यांस समजवून ते निर्णय सांगतील तो माना. अदालतींत (कोडतांत) खर्च व क्लेश भोगण्याची इच्छा धरूं नये. सत्यास लाजूं नये. व असत्याचे भय धरूं नये. चाकरीपेक्षां स्वतंत्र धंदा सुखकर आहे. मेहनतीस कंटाळूं नये. ग्रंथ वाचण्याची संवय होईल तितकी करावी. देशाटन केल्याने शहाणपणा येतो. इतिहास वाचीत जावे. गप्पा मारण्यांत काळ काढूं नये. सत्याचा शोध करावा. मंत्र, तंत्र, नवस, किमया, भूत, मुहूर्त, प्रश्न, शकुन ह्या सर्व भ्रांती आहेत. क्षमा व शांती धरावी. कोणाचा विश्वासघात करूं नये. भांग, दारू, जुगार व व्यभिचार या व्यसनांच्या लोकांपाशीं उभे देखील राहूं नये. स्वदेशांतील कारागिरांस उत्तेजन यावे म्हणून देशी पदार्थांवर निर्वाह जितका होईल तितका करावा. विद्याभ्यास पूर्ण झाल्याखेरीज मुलाचे लग्न करूं नये. पाणी स्वच्छ पाहून वस्त्राने गाळून प्यावें. हवा स्वच्छ पाहून त्याचा मिळेल तितका लाभ मिळवावा. मुलींस विद्या शिकवावी. घर साफ ठेवावें. जमिनीची उस्तवारी मेहनतीने करावी. म्हणजे ज्यास्ती पीक होऊन फायदा होतो. गुरें, ढोरे व बैल वगैरे जनावरे आणि चाकर ममतेने पाळावे. जो व्यवहार लेखानें करण्याचा तो मोघम आणि तोंडजाबी करूं नये. मनस्वी मोठें घर बांधू नये. व्यवहारांत कुशल असावें. दुसऱ्याचें मित्रत्व संपादन होईल तितकें करीत जावें. आर्जवी व गरजवंत पुष्कळ लोक असतात, म्हणून कोणाशींही उर्मटपणा करूं नये. अतिशय सोंवळें किंवा धर्माभिमानानें द्वेष करणे हें मुर्खपणाचे चिन्ह आहे. मनुष्याची योग्यता लक्ष्यांत ठेवावी. आपल्यास ठाऊक नसेल ते समजून घ्यावें. आपल्या सर्व समजतें असा व्यर्थ गर्व करूं नये. खोटें बोलूं नये. सर्वदा आपल्यास लहान समजावे; यापासून बहुत फायदे आहेत. प्रामाणिकपणाने चालावें. कोणावर जुलूम अन्याय व पक्षपात कोणी करीत असेल तर त्यास यथासामर्थ्य प्रतिकूल व्हावें. पुरातन गोष्टींचा शोध करावा. लवनमंजनपूर्वक सर्वांशी वागावें, तेणेंकरून आपणास सहज थोरपणा मिळतो. मुशाफरास मदत करावी. वाट चुकला असेल त्यास वाट दाखवावी. रोग्यास औषध देण्याची तजवीज करावी. दुःखी जनाची वास्तपुस करावी. मेहनतीचा कंटाळा करूं नये. मेहनतीनें शरीरास फार फायदा आहे. रीत भात व लौकिकी चाली शिकाव्या, कारण त्याविषयींचे अज्ञान फजितीस कारण आहे. लिहिण्याची पद्धति, भाषणाची पद्धती आणि हिशेब वगैरे शिकावें. स्त्रियांचा गौरव करावा. फाजील खर्च करूं नये; कारण या चालीने बहुत राजे, इनामदार व जाहगीरदारं, हे खराब होऊन ऋणस्वरूपी झाले आहेत. दारूचा अंगिकार करून कुळंबी माळी, कोळी वगैरे अगदीं दरिद्री होऊन मृत्युस्थानीं पडले! व त्यांस उद्योगधंदा सुचत नाहींसा होऊन अगदीं भिकारी झाले आहेत! त्याच प्रकारची भांग व आफु आहे. साधेपणाने राहावें हें चांगलें. डौलाने आपला खर्च होऊन दुसरे वाईट म्हणतात हे ध्यानांत ठेवावें. गुप्त गोष्ट प्रसिद्धिस आणूं नये. पुरुषार्थ करण्याचे प्रयत्नी असावें. पहिला पुरुषार्थ विद्या, दुसरा पुरुषार्थ धर्म, तिसरा पुरुषार्थ द्रव्य, आणि चौथा पुरुषार्थ परोपकार व सत्कीर्ति. कितीही संकटें आलीं तरी दुराचार करूं नये. सर्वांशी सौजन्यानें वागावें. पवित्रपणा संभाळावा. ईश्वराचे भक्तींत साठ घटिकेंतून नित्य घटका दोन घटका तरी लावाव्या. स्वार्थाकरिता परमार्थ बुडवूं नये. अतिशय स्वार्थी तत्पर असूं नये. कोणास लहान मोठा अधिकार मिळाला तर सरकाराने नेमले पगारावर निर्वाह करावा. व कोणापासून लांच नजर वगैरे घेऊं नये. निस्पृहपणाने व निःपक्षपाताने वागावे. आपल्यास दुःख किंवा सुख होते त्याचप्रमाणे दुसऱ्यासही होते हे ध्यानांत ठेवावे. कोणी आपणावर उपकार केला असेल तर दुसरा त्याजवर उपकार करून त्यास ओशाळा करावे. तुम्ही सावकारी कराल तर खोटे माप ठेवूं नका गरजवंताची गरज पाहून त्यास मनस्वी व्याज मनोती, शिरपाव वगैरे घेऊन पेचांत घालूं नये. खोटा माल खरा म्हणून विकूं नये. प्रसंग पाहून थोडे किंवा फार बोलावे, परंतु गैरशिस्त

कदापि बोलू नये. उगीच बसण्याचा प्रसंग आला तर उगीच बसावे परंतु दुसरे नाव ठेवतील असे भाषण करू नये बायकांची व थोरांची सहज निंदा करण्याची हलके लोकांची चाल आहे, परंतु ती चाल वर्जावी हे फार उपयोगाचे आहे. एकाहून अधिक बायका केल्या असतां आपली विटंबना होते; व एक करणें तीही बाळगण्याचे शक्तीचा विचार करून करावी. या लोकीं आईबापांसारखें दुसरें कोणी पूज्य नाहीं असें समजून त्यांची अमर्यादा करूं नये. त्यांचे वृद्धापकाळीं, त्यांस सहाय होईल तितकें करावें. आपले बंधूंशीं प्रीतीनें वागावें. द्रव्य कितीही गोळा केलें तरी तें चिरकाळ राहात नाहीं हें ध्यानांत ठेवावें. पुत्रापेक्षां धर्म चांगला असें समजून ज्यांस संतती नसेल त्यांनी खेद न करितां धर्माचा आश्रय करावा. सत्पात्रीं व काळ देश वर्तमान पाहून धर्म करावा; व तोही लोकांचे निरंतर सौख्य वृद्धींगत होईल अशा प्रकारचाच असावा. कोणाचे कर्ज घेतले असेल ते फेडण्याची मनापासून इच्छा धरावी. कारण, तें न फेडलें तरी ईश्वर आपणाकडून फेडविल्यावांचून राहणार नाहीं. कर्ज घेऊन तें न दिलें तर ती एक प्रकारची चोरी आहे. उद्योग करण्यास राहूं नये; उद्योग ही लक्ष्मी आहे. वाटेंत कोणाचीही जिंनस अथवा पैसा वगैरे माल सांपडला तर तो ज्याचा त्यास मिळेल अशी तजवीज त्वरित करावी. सहसा कोणाचा उपकार घेऊं नये. कोणाचे बागेंत किंवा शेतांत माल पाहिला तर तो बळजोरीनें घेऊं नये. सर्वदा असें लक्ष्यांत वागवावें की, कोणताही पदार्थ मेहनती वांचून उत्पन्न होत नाहीं; याजकरितां ज्यानें मेहनत केली असेल तो त्याचा स्वामी असल्यामुळे त्याचेच पदरीं तो पडावा. त्याहून अन्य कोणी तो हरण करतील तर ते चोर, सत्य बुडविणारे व ईश्वराचे अपराधी समजावे. धन्यापासून त्याचे पदार्थ, संपत्तीने क्रयविक्रय व दानादिकें करून मात्र घेण्यास इतरांची सत्ता आहे. विनाकारण तंटें व तक्रारी करण्यांत बहुत अनर्थ होतात, या करितां त्या कामांत पडूं नये. उदार बुध्दि असावी; क्षुल्लक बुध्दि हें दुर्जनाचे लक्षण आहे. संसार तीन प्रकारचे आहेत : अल्प, मध्यम आणि उत्तम. अल्प संसारी स्वार्थ मात्र करितात व आपले पोट भरून पोरें बाळें पोसितात या पलीकडे त्यांस काहीं दिसत नाहीं; मध्यम संसारी हे कीर्तीवर लक्ष्य देतात; आणि उत्तम संसारी हे परोपकारीं निमग्न असतात. यास्तव उत्तम संसाराकडे वळवेल तितकें यथासामर्थ्य वळावें.

लोकहितवादी

• •

# यंत्रज्ञान

फारसी "पंन्दनाम्या"चे भाषांतर करणाऱ्याने
इंग्रजी ग्रंथातून निवडून मराठी भाषेत केलें.

आणि

ज्ञानप्रकाश छापखान्यांत पुणें
येथे छापून प्रसिद्ध केलें.

शके १७७१

सन् १८५०

किंमत १। रुपये

## अनुक्रमणिका


| पदार्थ | | पृष्ठ |
|---|---|---|
| (१) सामान्य पदार्थ गुणज्ञान | ... | १ |
| १ प्रकर्ण | ... | |
| २ प्रकर्ण | ... | |
| (२) उस्थितीज्ञान | ... | १२ |
| १ प्रकर्ण | ... | |
| (३) पदार्थशक्तीज्ञान | ... | १५ |
| १ प्रकर्ण | ... | ० |
| २ प्रकर्ण | ... | १९ |
| ३ प्रकर्ण | ... | २३ |
| ४ प्रकर्ण | ... | २६ |
| ५ प्रकर्ण | ... | २७ |
| ६ प्रकर्ण | ... | २८ |
| (४) चलनज्ञान | ... | ३० |
| १ प्रकर्ण | ... | |
| २ प्रकर्ण | ... | ३३ |
| (५) जलमयपदार्थज्ञान | ... | ३६ |
| १ प्रकर्ण | ... | |
| २ प्रकर्ण | ... | ४० |
| ३ प्रकर्ण | ... | ४३ |
| (६) बायूमयपदार्थज्ञान | ... | ४४ |
| १ प्रकर्ण | ... | |
| (७) कर्णज्ञान | ... | ४७ |
| १ प्रकर्ण | ... | |
| (८) नेत्रज्ञान | ... | ४९ |
| १ प्रकर्ण | ... | |
| २ प्रकर्ण | ... | ६५ |
| (९) ऊष्णज्ञान | ... | ८७ |
| (१०) तेजज्ञान | ... | १०१ |
| (११) लोहचुंबकज्ञान | ... | ११० |
| (१२) नक्षत्रज्ञान | ... | ११५ |
| (१३) पदार्थतत्त्वज्ञान | ... | १२७ |

## विल्हेवारी


| | | पृष्ठ | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| | | अ | | | |
| उतरतीजागा | ... | २६ | उजडाचे अवयव | ... | ७३ |
| अकर्षणशक्ती | ... | ३३ | ऊष्ण | ... | ८७ |
| आरशाचे प्रकार | ... | ६० | ऊष्णाची कारणें | ... | ८९ |
| ऐकण्याचे कारण | ... | ४७ | ऊष्ण जनावराचे | ... | ९३ |
| उजेड | ... | ४९ | ऊष्णदर्शकयंत्र | ... | ९५ |
| | | क | | | |
| कीर्णाचा डोळा अनुमानावा | ... | ६१ | कीर्णाचा डोळा खरा | ... | ६३ |
| | | ग | | | |
| गतीचे प्रकार | ... | ३० | ग्रहण | ... | १२४ |
| गायन | ... | ४८ | | | |
| | | च | | | |
| चुंबकशक्ती | ... | ४-१३१ | चाती | ... | २३ |
| चाक | ... | १९ | चाळिशी | ... | ८५ |
| छ | | | ज | | |
| छेद | ... | ६५ | जडपदार्थाची व्याख्या | ... | १ |
| | | ड | | | |
| डोळ्याची भ्रांती | ... | ५७-८० | डोळ्याची रचना | ... | ८१ |
| | | त | | | |
| तेज | ... | १०२ | तेजकपदार्थ | ... | १०२ |
| द | | | ध | | |
| दृष्टीचे काटण | ... | ५५ | धक्का यंत्र | ... | १०५ |
| | | न | | | |
| नक्षत्रगती | ... | ३५-१२० | ... ... | ... | |
| | | प | | | |
| पाहार | ... | १५ | पदार्थाचे वजन | ... | ४१ |
| पलायनशक्ती | ... | ३३ | पृथ्वीवरचे पाणी | ... | ४३ |
| पृथ्वीची गती | ... | ३४-१२२ | पाण्याचा उपयोग | ... | ४४ |
| पातळपणाचे कारण | ... | ३७ | पिशाच्य | ... | ७० |
| पाणी उडण्याचा जोर | ... | ३९ | पंचमहाभूतें | ... | १३० |
| | | म | | | |
| मळसूत्र | ... | २८ | मेघ | ... | ४३-९७ |

पृष्ठ

र

रंग ... ७७

व

वायूचे ओझे माणसावर ... ४५
वायूचे वजन ... ४६

श

श्वेतवर्ण ... ७४-७९

पृष्ठ

ल

लंब ... ३५
लोखंड ... ११३

व

वीज ... १०६
वियोग ... १२९

ह

हवेचे कारण ... ९१
होका ... १११

# प्रस्तावना

मनुष्य हा एक बुद्धिमान प्राणी परमेश्वरानें या पृथ्वीवर निर्माण केला आहे. म्हणून त्याणे ज्ञानाची प्राप्ती करून असें पाहावें. कीं, आपली योग्यता किती आहे ? व आपल्यास उत्पन्न कशा करिता केलें आहे ? व आपल्या पासून काय उपयोग घडावा ? याचा विचार केला म्हणजे असे दिसेल कीं, आपले हातून जनावर उपकार व्हावा. हें एक जन्माचे मुख्य साफल्य आहे. आणि असा उपकार होण्यास ज्ञान मुख्य पाहिजे. यास्तव ज्ञान संपादन हे मुख्य कर्तव्य आहे.

ज्ञान म्हणजे ईश्वरानें चरित्र केलें आहे. त्याचा शोध करून ईश्वराचे गुणाचा अनुभव घेणें आणि त्या ज्ञानेकरून दोन फळें आहेत. एक ईश्वरावर श्रद्धा दृढ होते. आणि आपल्या सुखाची अभिवृद्धी करिता येते आणि लोकावर उपकार होतात.

मनुष्याचा स्वभाविक नियम असा आहे कीं, मेहेनत केल्या शिवाय निर्वाह चालत नाही. त्यांत हीं मेहेनत अंगाने करीन म्हटलें. तरी परिणाम चांगला नाही. म्हणून मनुष्या मध्ये यंत्रें उत्पन्न जाहाली. यंत्र म्हणजे जे ईश्वराने पदार्थाच्या ठायी नियम केले आहेत. ते शोधून त्याची साधणूक करून त्याजवर रचना करावयाची आणि त्या रचने करून जे आपले हाताने काम करावयाचे ते करावें. म्हणजे अर्थातच आपली मेहेनत कमी होते. जसें लोखंड खाणीत असतें. तें काढून त्यांस घासलें. म्हणजे धार येते. हें जाणून तसें लोखंड सिद्ध करून त्यास दांडा घालून कुऱ्हाड करावयाची आणि तिणे जें हताने कधी व्हावयाचें नाही. तें कार्य सिद्धीस न्यावयाचे, तसें कुलूप हें एक यंत्र आहे. सुयी हे यंत्र आहे. यंत्रा वाचून मनुष्याचे क्षणभर चालत नाही. जसा मनुष्यास आपला हात उपयोगी आहेत. तद्वत यंत्रें आहेत.

असे हे उपयोगी पदार्थ होतात. कसे ? व याचे नियम होण्याचे काय आहेत ? हें सांगण्याकरिता यंत्रज्ञान प्रवृत्त आहे.

यंत्रज्ञाना पासून संसारात व रोजगारांत नफा आहे. व जे श्रीमंत आहेत. जांस रोजगाराची गरज नाही. त्यास त्यातील चमत्कार पाहून आनंद प्राप्त होतो. म्हणून निर्मळ आनंदाचे द्वार आहे. हा आनंद विषयानंदा सारखा मळीण नाही. परंतु फार उत्कृष्ठ आणि निर्मळ आहे.

यंत्रज्ञान फार मोठें आहे. त्यातील एका एका प्रकर्णाचा स्वतंत्र मोठा ग्रंथ होईल. परंतु तो विस्तार सोडून दर एक प्रकर्णाचे तात्पर्य मनात भरावें. अशी योजना या ग्रंथात केली आहे. याचा इतकाच उपयोग होईल. कीं, त्या विद्येत वाचणाराचे तोंड शिरून पुढें आणखी पाहाण्याची इच्छा उत्पन्न होईल. आणि इतकेच व्हावें. अशी आमची इच्छा आहे.

मनुष्यानी अनेक प्रकारचे ज्ञान संपादन केलें आहे. त्याचे पर्याय सात कल्पीले आहेत. ते ज्ञान सप्तक खाली लिहितो.

### धर्मज्ञान १

यामध्ये कायदा, आचार, नीती, वगैरे सर्व वागणूके विषयी जे नियम आहेत. ते सर्व वर्णिले आहेत. त्या पृथक् पृथक् विद्या आहेत.

### गणितज्ञान २

या विद्येमध्ये अंकाचा आणि परिमाणाचा विचार आहे. इचा पोटांत अंकगणीत, बीजगणीत, भूमिती, त्रिकोण मिती, इत्यादि येतात.

### जडपदार्थज्ञान ३

ईश्वराने दोन प्रकाराच्या वस्तू निर्माण केल्या आहेत. एक जड आणि दुसरें चैतन्य म्हणजे मन, आत्मा, इत्यादि. जे दिसावयाचे नाहीत. परंतू त्याचे अस्तित्वाची प्रचीती आहे. आणि जड

म्हणजे जे पदार्थ दिसतात. ऐकता येतात. वाचपता येतात. स्पर्शतात चाखता येतात. ते जड म्हणावे त्याचे ज्ञान या विद्येत आहे.

या विद्येचे दोन भाग आहेत. यंत्रज्ञान आणि पदार्थज्ञान, पदार्थज्ञान म्हणजे पदार्थ कसे आहेत, व त्याच्या रचना कशा आहेत. वनस्पत्याचा जाती व पाषाणाच्या जाती याचे उत्पत्तीचे प्रदेश इत्यादी व्यवस्था ईश्वराने केल्या आहेत. तशा वर्णावयाचा पदार्थाच्या प्रकृतिचे निरूपण करावयाचे याचे नाव पदार्थज्ञान, दुसरें, यंत्रज्ञान म्हणजे पदार्थाच्या विकृतीचे निरूपण आहे. या दोन भागाचे पोटांत बहूत विद्या आहेत. परंतू सर्व तस्समंधी आहेत.

## मानसज्ञान ४

यामध्ये मनुष्याचे मनाची स्थिती, शक्ती, रीती, व चमत्कार याचे निरूपण आहे. व तर्क, न्याय, इत्यादि शास्त्रें यातच आहेत.

## शब्दज्ञान ५

यामध्ये सर्व शब्द विषयक विद्या आहेत. ह्मणजे, व्याकर्ण, आलंकार, गायन, देश भाषा, इत्यादिक.

## काळज्ञान ६

यामध्ये इतिहास, कालगणना, प्रवास, प्राचीन पदार्थ वर्णन इत्यादि आहेत.

## राज्यज्ञान ७

यांत राजधर्म, राष्ट्रधर्म, लक्ष्मीज्ञान, इत्यादि आहेत. एकूण या सात विद्येची ज्ञान माळा आहे. या खेरीज बाकी राहिल्या त्या कळा जाणाव्या.

# यंत्रज्ञान

## सामान्यपदार्थगुणज्ञान

### प्रकर्ण १

जडपदार्थ म्हणजे जे पदार्थ चैतन्य नव्हते. आणि जे अतींद्रिय नाहीत. परंतु इंद्रियास गोचर आहेत. असें की शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध, येणेकरून इंद्रिय द्वाराने जाचे ज्ञान होतें. जसे शरीरें हीं जड पदार्थ आहेत. जीव चैतन्य आहे. व बुद्धींद्रियाने मात्र त्याचे ज्ञान आहे.

जड पदार्थ मुख्यत्वें करून साधारण पाहणारास पृथ्वी, पाणी, अग्नी, इत्यादिकाचे घडलेले दिसतात.

या जड पदार्थांची स्थिती काही येक नियमे करून प्रतिबंध आहे. त्या नियमाचा शोध करून जे केलेले, ते जड पदार्थ ज्ञान त्यांची प्रथम शाखा सामान्य पदार्थ गुणज्ञान आहे. त्याचे सहा कायदे म्हणजे गूण सर्व पदार्थामध्ये आहेत. त्याचे निरूपण केले आहे.

### प्रकर्ण २

सर्व जड पदार्थांचे कायदे साहा आहेत. प्रथम अकार, दुसरा अप्रवेशकपणा, तिसरा छेदकपणा, चौथा छिद्रकपणा, पाचवा अकर्षितपणा, सहावा स्थीरपणा, याशिवाय जड पदार्थांचे गूण अनेक आहेत. ते असे कीं रंग, ऊष्णता, मृदूपणा, इत्यादी परंतु हे कायदे नव्हेत. याचे कारण असे आहे. कीं गूण फिरतात. परंतु कायदे फिरत नाहीत. जसें काळा पदार्थ पांढरा होईल. परंतु त्याचा अकार जाणार नाही.

पहिला कायदा अकार आहे. त्याचा अर्थ असा आहे. कीं सर्व पदार्थ कोठेही असले. तरी ते जागा अटिवतात. अंतराळी असले. तरी अकाश अटिवतात. म्हणून त्यास अकार आहे. असे समजते.

दुसरा कायदा अप्रवेशकपणा म्हणजे येक पदार्थ जागा धरून असतो. तो तेथून काहाडल्याशिवाय दुसरा पदार्थ तेथे राहात नाही. कोणी समजतील. कीं लाकडांत खिळा असतो. परंतु त्याणी असे पाहावे. की जेथें खिळा आहे. तेथे लाकूड नसतें. लाकूड हटून आपली जागा रिकामी करून खिळ्यास देते. म्हणून तेथे खिळा राहतो. तसेच पाण्यात पदार्थ पडतात. त्याचे आहे. तात्पर्य येक पदार्थ आहे. तेथे दुसरा नाही. असे आहे. याजकरिता पदार्थांचा अप्रवेशकपणा हा कायदा धरला आहे.

तीसरा कायदा छेदकपणा म्हणजे पदार्थाचे तुकडे होतात. आणि कितीही बारीक तुकडे असले, तरी त्याचे पलीकडे तुकडे होतील. असे वाटते. शास्त्रकारानीं असे मानिले. आहे. कीं पदार्थाचे तुकडे शेवटी परिमाणू पर्यंत होतात. नंतर पुढे तुकडे होत नाहित. अशी मर्यादा केली आहे. परंतू तुकडे किती बारीक होतात. व असतात त्याचा विचार पाहिला तर असें वाटते. कीं भगवंताची शक्ती अतर्क्य आहे. कारण कीं कितीयेक जीव पाण्यातील वगैरे इतके बारीक आहेत. कीं ते लघुदर्शक अर्शी लावल्या खेरीज दृष्टीस पडत नाहीत. आणि त्याचे शरीरात पाहिले. तर मोठाल्या जनावरा सारखे भाग पोट, पाठ, पाय, वगैरे असतात. व नाडी असतात. त्यातून त्याचे रक्त वगैरे फिरत असतें. दुसरें उदाहरण कोळिष्टकाचे सूत पाहा किती बारीक असते. व सोन्याचा वर्ख किती बारीक असतो. जर करितात. त्याजवर सोन्याचा मुलामा असतो. तो किती पातळ असेल. त्याची कल्पना होत नाही. याजकरिता सर्व पदार्थाचा हा कायदा आहे. कीं त्याचे विभाग व्हावे.

चौथा कायदा छिद्रकपणा म्हणजे सर्व जड पदार्थाचे पोटात छिद्रें आहेत. कारण कीं सर्व पदार्थ परिमाणूचा राशी आहेत. आणि ते परिमाणू येकामेकास लागून नाही, त्याचे दरम्यान जे आकाश आहे तें छिद्र. काही पदार्थाची छिद्रें दिसतात. काही पदार्थाची दिसत नाही. परंतू जर पारा लाकडाचे नळीत किंवा कातड्याचे पिशवीत घालून आवळला तरी बाहेर पडतो. त्याजवरून छिद्रें लाकडास आहेत. असे सिद्ध होते, परंतू दिसत नाही. छिद्रें नसतील तर पारा बाहेर पडणार नाही. आणखी लाकडास तेल लावले तरी तसूभर आंत जातें. याजवरून त्यास छिद्रें आहेत, असे समजते. यावरून कोणी म्हणतील. की सर्व पदार्थ परिमाणूचा राशी आहेत, तर वाळू सारखे गळून कां पडत नाही; परंतू पदार्थाचा अंतर्यामी चुंबकपणा म्हणून येक गूण आहे. तेणेकरून ते परिमाणू येकामेकाशी चिकटून असतात. चुंबकपणाचा गूण दृष्टोत्पत्तीस येतो. असा की येक सोन्याचा तुकडा दुसरे सोन्याचे तुकड्यावर ठेऊन ठोकला. तरी येक जीव होऊन जातो. व धातूचे अनेक तुकडे येकी जागी करून अटिवले. तर येक गोळा होतो. याचा अर्थ असा आहे. कीं ऊष्णाचे योगाने चुंबन शक्ती प्रघट होत्ये. पदार्थामध्ये छिद्रें आहेत. याजमुळे पदार्थ लहान मोठे होतात. जसे वायु पिशवीत भरला, आणि त्यास दाबले तर लहान पिशवी होते. पुन्हा सोडली तर मोठी होते, याचे कारण असे आहे. कीं त्याचे परिमाणू दाबण्याने जवळ जवळ येतात. व छिद्रें बारीक होतात. तसेच लाकूड ठोकले. तर दबते, सोने अटून पातळ होतें. पुन्हा घट्ट होतें. याचे कारण असे आहे. कीं पदार्थाचे पोटांत उष्ण आहे. ते जीतके वाढविलें. तितके ते पदार्थ मोठे होतात. तसेच पाणी जीतके कमी केले तितके ल्हान होतात. जसे भिजवलेला पदार्थ मोठा दिसतो. वाळलेला पदार्थ लहान दिसतो, याचे कारण असे. की पाणी त्याचे पोटात असतें. तेव्हा तें छिद्रें मोठी करतें. आणि पाणी गेले. म्हणजे. छिद्रें लहान होतात. पृथ्वीचे पोटांत ऊष्ण आणि पाणी पुष्कळ आहे. म्हणून येवढे मोठे स्वरूप पृथ्वीचे आहे. हें जर त्यातील जाईल. तरि चेंडू येवढी पृथ्वी होईल. पदार्थाचे पोटांत ऊष्ण आहे. तेंही प्रघट होते. जसे सोनें ठोकता ठोकता ऊन होते. हवेचा पोटांत ऊष्ण आहे. यास प्रमाण, जर येक नळी केली. आणि त्यांत हवा भरून दाबली. आणी नळीचा तळास काही कापूस ठेवला. तर तो तात्काळ पेटतो. तसेच चकमक झाडली. म्हणजे ऊष्ण प्रदिप्त होते. पदार्थाचे वजनही छिद्रामुळे असते. जा पदार्थाची छिद्रें पातळ तो पदार्थ हलका जसा कापूस आणि छिद्रें घट्ट तो पदार्थ वजनदार असतो. जसे शिसे यास्तव पदार्थ छिद्रमय आहेत. हा कायदा ठरला.

पाचवा कायदा अकर्षितपणा हा गूण सर्व पदार्थात आहे. प्रत्येक पदार्थ निराधार जाहला म्हणजे पृथ्वीवर पडतो. वजनदार पदार्थ लौकर पडतो. म्हणून वजन हे काही कारण नाही. पदार्थाचीच प्रकृती अशी पडावया जोगी आहे. पूर्वी चुंबकपणा जो सांगितला. त्यातलाच हा

पर्याय आहे. कारण कीं चुंबकपणा लहान लहान पदार्थामध्ये प्रगट होतो. आणि आकर्षित पणा मोटाले पदार्थामध्ये प्रगट होतो. आणि या गुणाने पृथ्वीवर जेजे पदार्थ आहेत. ते तिचे पृष्ठ-भागावर चिकटून राहतात. ईकडे तीकडे उडत नाही. आणि पृथ्वी गोलाकार आहे. याजमुळे तिजवर लोक उलटे टांगलेले चालतात. परंतू पडत नाही. आणि जसजसे पदार्थ जवळ जवळ असतात. तसतसे अकर्षित अधीक जोराने होतात. जर वरतो धोंडा टाकला आणि तो कितीयेक उंचीवर गेला. तर तेथून काही अंतरावर हलकेपणाने सावकास येतो तेथून खाली कितीयेक अंतरावर लौकर येतो. आणि पृथ्वी जवळ जवळ जेव्हा येतो. तेव्हा त्यास फारच ओढ लागून त्वरेने पतन होतो. आकाशांत सूर्य चंद्र इत्यादि ग्रह व तारा फिरतात. या सर्व अकर्षणाचा कायद्यावर आहेत. या कायद्याचे उदाहरणार्थ खाली थोड्या गोष्टी लिहितो.

दोन लाकडाचे तुकडे पाण्यावर टाकले तर ते दोन्ही जुळतात.

तारवें समुद्रात फुटून तुकडे होतात. ते सर्व तुकडे येका राशीत जमतात.

पर्वतावरून शंकू खाली सोडला. तर पर्वताचे अकर्षण शक्तीने शंकू वाकडा होतो.

गौंडी लोकांस शंकू लागतो. याचे कारण असे आहे. की शंकू पृथ्वीचे अकर्षण शक्तीने उजू राहतो. त्या प्रमाणे भिंती घालतात. त्या वाकड्या होत नाहीत.

याजवरून सहज समजले. की अकर्षण शक्ती आहे. म्हणून पदार्थास वजन आहे. जर येक पदार्थ या सृष्टीत असता तर कधी त्यास वजन नसते. कोणी म्हणतील कीं धुरास वजन कोठे आहे. परंतु त्यास देखील अकर्षण शक्तीने वजन आहे. परंतू तो वाऱ्या पेक्षा हलका पदार्थ आहे. म्हणून वर चढतो. जसे पाण्यातून लाकूड वर येतें. याचे कारण पाणी जड आहे. आणि लाकूड हलके आहे. आणि हलके पदार्थ व जड पदार्थ दोन्ही सारखे अवकाशात भूमीवर पडात्रे. कारण कीं भूमीचा अकर्षणाचा जोर हलक्यावर व जडावर सारखाच आहे. परंतू हलके पदार्थास हवा अडिवतें. व जड पदार्थास हवा अडवीत नाही. याजकरिता खाली जड लौकर पडतो. जसे दोन गाड्या आहेत. त्यापैकी येकीवर येक पल्ला ओझें दुसरीवर दोन पल्ले ओझें आहे. तर थोडे ओझाची गाडी लौकर चालेल. परंतु फार ओझाचे गाडीस हलके गाडी पेक्षा दुप्पट जनावरें लावली तर दोन्ही सारख्याच चालतील. तसें पृथ्वीचे अकर्षण सारखे आहे. परंतु हलक्या पदार्थास वारा अडिवतो. याजमुळे उशीराने पडतो. परंतु जर येक भांडें निर्वात केलें म्हणजे त्यांत हवा राहु दिल्ही नाही. आणि त्यांत पीस व पैसा एकदाच टाकला तर दोन्ही सारखे अवकाशाने खाली पडतात. या प्रमाणे हा पाचवा कायदा आहे.

सहावा कायदा स्थीरपणा याचा अर्थ असा आहे. कीं जो पदार्थ ज्या अवस्थेत टाकिला. त्या अवस्थेत तो नहेमी राहील. त्यास हलिवल्या वाचून हलणार नाही. हा गूण सर्व पदार्थांचा आहे. जर पदार्थ भूमीवर पडला आहे. आणि तो कोणी हलविला नाही. तर तसाच राहील. आणि वरती दगड फेकला त्यास कोणी खाली आणिला नाही. तर वरतीच जात राहील. परंतु वरती जात आहेत असे पदार्थ साधारणता अढळत नाही. याचे कारण, असें आहे. कीं सपाटजागा असली त्याजवर निंबु टाकलें तर लांब पर्यंत जाईल. आणि खरबुडित जागा असून त्याजवर निंबु टाकलें. तर लौकर थांबेल कारण कीं त्यास अटकाव पडतो. तद्वत वरती दगड टाकला तो सर्वकाळ वरती जात असावा. हा त्याचा गूण परंतु पृथ्वीची अकर्षण शक्ती आणि हवा तोडीत तो जातो याजमुळें त्या दगडाचे बळ कमी होऊन पडतो. जर त्यास काही अटकाव नसेल तर सर्व काळ फिरेल यात संशय नाही. ज्या अवस्थेत पदार्थ असतो त्या अवस्थेत तो आपल्यास राखितो. त्यान्चि उधाहरणे लिहितो.

एक गंजीफ घेऊन त्याजवर पावली ठेवावी. आणि ती गंजीफ आपले बोटावर ठेवावी. आणि गंजीफेस टिचकी मारून उडऊन द्यावी. गंजीफ उडून जाते. आणि पावली खालीच राहते. याजवरून पावलीची इछा आपल्या अवस्थेत राहण्याची सिद्ध होते.

गाडी उभी राहिली असता एकदा जर घोडें निघाले. तर आतील बसणाऱ्यास मागे पडलेसे वाटते. कारण की त्याची शरीरें स्थीर असतात. त्यास आपली अवस्था सोडावी असें वाटत नाही. तसेच एकदम घोडें उभे राहिले तर वर बसणाराचा पुढे झोक जातो. कारण की त्याचे शरीरास पूर्वी चलन प्राप्त होतें. त्यास अटकाव पडला म्हणजे त्याची इछा पुढे जाण्याची असते. ती बंद होते. तसेच पाण्याचे भांडे भरलेले जर फेकलें तर त्यातील पाणी मागें पडतें. आणि चालत असता एकदम धरले तर त्यातील पाणी पुढें पडते.

घोडें पळवीत असता चेंडू फेकून घेतला तर आपले हातावरच पुन्हा येतो.

आणि जमीन साफ करून मध्येच एक खळगी करावी. आणि तिकडून निंबू फेकावे. म्हणजे तें खळगिचे काठावर ठेऊन तेथून निराधार उडून पलिकडचे काठावर जाते. याचे कारण तेच आहे. अशीच जनावरें ही उडविताना पहिल्याने पळवितात. म्हणजे त्याचे शरीरांत पळण्याची शक्ती येते. आणि खळगी उडून पारजातात.

गाडी पळत असताना मनुष्याच्या शरीरास पळण्याचा गुण येतो. त्यात उतरूलागलें तर फार सावधगिरी पाहिजे. तसेच घोडें पळत असता अकस्मात उभेकेले. तर मनुष्य घोड्याचे डोक्यावरून उडून पुढें पडतें.

दगडास दोरी बांधून चकर फिरवीत असतानां दगडाची इछा उडून जाण्याची होते. आणि याजकरिता हातातील दोरी निसटून जाण्याचा यत्न करिते.

सशाची पारध कर्ण्यास जे जातात. ते पाहतात, कीं कुत्रा जर सशाचा पाठीस लागला. तर ससा समोर पळत नाही. परंतु सर्पा उलटा सुलटा फिरतो. तेणेकरून कुत्रा पळत असता त्यास ससा उलटा फिरला म्हणजे त्याचे शरीर पुढे जाण्यास करिते. आणि पुन्हा संभाळून वाकडे फिरावे लागते इतक्यात ससा दूर जाऊन पार पडतो.

गाडीउजू रस्त्याने जलद जात असता वाकडी फिरविणे जाहाली तर संभाळावे लागते. कारण की गाडी व आंतील माणसे यांस समूर जाण्याची शक्ती प्राप्त होते. आणि घोडा अकस्मात उलटा फिरतो. आणि चाके फिरतात. तेव्हा एखादे वेळेस आंतील माणसे बाहेर पडून गाडी उलटी होते.

या प्रमाणे जड पदार्थ ज्ञानाचा चमत्कार आहे. की साधारण गोष्टीची ही कारणें समजतात.

---

## उस्थितीज्ञान

### प्रकर्ण १

सर्व पदार्थास एक मध्य म्हणून असतो. तो असा की जर तो मध्य सावरला. तर सर्व पदार्थ संभाळला जातो. बोटावर काठी अडवी जर ठेविली तर येके ठिकाणी काठी सावरली जात्ये. याचे कारण की तिचा मध्य बोटावर येतो. त्या मध्याचा ठिकाणी सर्व भार असतो. आणि दोहो बाजूस सारखे वज्जन असतें. तसेच गोलाकार जे पदार्थ आहेत. त्याचें मध्येही मध्य असतो. आणि

मध्यापासून जी भूमी पर्यंत उभु रेषा असते. तिचे नाव मध्यरेषा ती जड पदार्थांचे बुडात पडली तर तो पदार्थ सावरेल. जसे.

हा त्रिकोण पदार्थ आहे. याचा मध्य क आहे त्या क पासूनजी उजूरेष, क पासून ख पर्यंत आहे. तीं त्या पदार्थाचे तळाचे आंत म्हणून तो पदार्थ पड्ड सकत नाही. पदार्थ पडणे व भांडे लवंडणें हे सर्व या रेषेवर आहे. दुसरे वरचा सारखा वाकडा पदार्थ आहे. आणि त्याचा मध्य क पासून ख पर्यंत रेषा त्या पदार्थाचा तळ लहान म्हणून बाहेर पडली.




याजकरिता तो पदार्थ जमिनीवर उभा राहणार नाही. ज्या गाड्या वरती मोठ्या असतात. व त्यांचे तळ लहान असतात. त्या गाड्या लौकर पालथ्या पडतात. कारण कीं त्याचामध्य वरती असतो. आणि तेथून रेषा चाकाच्या बाहेर पडत्ये. सबब उंच गाडींत खाली ओझें ठेवितात. व जी नाव वाऱ्याने हिसके खात असत्ये. त्यात जे लोक असतात. ते उठले तर नाव लौकर उलटी होते. याजकरिता उलटी न व्हावी म्हणून लोकानीं नावेत निजले म्हणजे भय कमी होते. आणि मध्यरेषा तिचे तळांत पडते. याजकरिता जे पदार्थ लौकर पड्ड नये असे करावयाचे असतील. त्याचे तळ मोठें करावें. आणि जडपणा त्याचे तळाशी असावा.

याजकरिता गारूडी वगैरे हतावर उंचकाठी धरतात. तिचे खालची बोटे वरचेवर नाचवावी लागतात.

हमाल पाठीवर ओझे घेतात. ते पुढें वाकून चालतात. याचे कारण ते रेषा आपले पायामध्ये आणतात.

जे खांद्यावर ओझें घेतात. ते एका कलावर चालतात.

एका पायावर उभे राहतात. तेही एका अंगावर असतात. आणि रेषा पायांत पाडतात.

माणसें चालत असतानां झोकावर चालतात. याचे कारण एक पाय उचला म्हणजे झोक संभाळावा लागतो.

जे कोल्हाटी दोरीवर चालतात. त्यांचे पायाखाली अधार फार लहान असतो. याजकरिता मध्य रेषा म्हणजे. झोक संभाळवत नाही. म्हणून बहुधा ते एक लांब काठी दोहीं टोकास शिशाच्या गोळ्या करून हतात घेतात. आणि ती वरचेवर चालऊन रेषा दोरीत पाडतात. आणि सावरतात.

जेव्हा माणुस पडत असतो. तेव्हा दोन्ही हात बहुधा लांब पसरतो. येणेकरून सावरायाचा यत्न करितो.

याप्रमाणे झाडें उभी असतात. याचे कारण असे आहे. कीं इश्वर सत्तेचा झोक तळात पडतो. याजमुळे ती उभी कायम असता वारा सुटला. म्हणजे झाडास मागे पुढे हलवून त्याचा झोक तळा बाहेर पाडितो. म्हणजे झाड तात्काळ पडते.

---

## पदार्थशक्तिज्ञान

### प्रकर्ण १

जड पदार्थामध्ये सहा शक्ती आहेत. या सहा शक्तयापासून सर्व यंत्रें निर्माण होतात. व प्रचंड पराक्रम करिता येतात.

या सहा शक्तीचा निधान येणेप्रमाणे पहार, चाक, कणा, चाती, उतरतीजागा, खुंटी, मळसूत्र, इतकी आहेत.

यंत्रामध्ये पाहारीचा उपयोग फार आहे. पहार म्हणजे लाकडाचा तुकडा किंवा लोखंडाचा दांडा, त्या मध्ये तीन योजना असतात. एक वजन उचलावयाचे दुसरे पाहारीखाली नेट असतें तें तिसरे उचलणारा याचा नक्षा खाली लिहिला आहे. क·ख·ही पाहार आहे. ग हे नेट आहे. घ हें ओझें आहे. च हे उचलणाराचे बळ आहे. क, ख, पाहार आहे. ग नेट आहे. च उचलणाऱ्याची शक्ती घ वजन आहे.







पहिल्या प्रकारची पाहार उपयोगी आहे. दुसरे प्रकारची पहार निरउपयोगी आहे. याचे कारण असे आहे कीं पाहारीचा नियम उचलणाराचे जितके बळ असेल, त्यास त्या बळापासून जितके लांब नेट असेल. त्याणे गुणावे. आणि त्याची बेरीज येयील ती आणि वजनापासून नेटापर्यंत जें अंतर असेल. तें आणि वजनाचा गुणाकार करून या दोन्ही बेरजा मिळाल्यातर दोन्ही वजने बरोबर येतात. याचा हिशेब येणेप्रमाणे आहे.

पहिल्या जातीचे पाहारीत असे समजा कीं, क पासून ग पर्यंत १८ इंच लांबी आहे. आणि क चे खाली वजन च पाचशेर आहे. तर पाचांनी अठरास गुणलें. ती बेरीज ९० जाहाली. आणि ग पासून ख पर्यंत १० इंच आहेत. व ख खाली वजन घ न उ शेर आहेत. तर त्याचा गुणाकार ९० होतो. यास्तव या यंत्राने पाच शेर वजनाशी ९ शेर वजन भरते. यास्तव उचलणाऱ्या पासून नेट जितके दूर असेल. तितका फायदा आहे.

दुसरें जातीच्या पाहारीत फायदा नाही. कारण की नेट शेवटी आहे. याजमुळे. वजनाचा जोर सगळ्या पाहारिवर पडतो. म्हणून लहान वजनाने मोठे वजन उचल्ले जात नाही.

फायदा म्हणजे जा यंत्रात लहान बळानें किंवा वजनाने मोठें वजन उचलेल. त्याचे नाव फायदा तो दुसऱ्या प्रकारचे पाहारीत नाही.

मोठे धोंडे उचलण्यास पहारी लावतात. आणि त्याचे खाली दगड नेटास लावतात. याचे कारण मोठा धोंडा जो मनुष्यास उचलावयाचा नाही. तो या यंत्राने उचल्ला जातो. जसे







चिमटे, कात्र्या, गावी, वगैरे सोनाराची हत्यारेंही पाहारीची जात आहे. त्यामध्ये खिळा असतो. तेंच त्याचें नेट जाणावे. नावेची वल्हीं, अडकित्ये ही पाहारीची जात आहे. मनुष्याचा हात हा दुसरें जातिची पाहार आहे. यास्तव हताने उचलण्यात फायदा कमी आहे. याचे कारण हतात वजन वीस शेर आहे. त्याची संज्ञा घ आहे. ग हें नेट आहे. ह्म. कोपर हेच नेट आहे. व च ही शीर आहे. ती उचलण्यास लागले. हो फार अखुड आहे. की क पासून ग पर्यंत

जितकें अंतर आहे. त्याची आठपट कमी ती शीर आहे. याजकरिता आठानी विसास गुणले तर १६० होतात. जर हात २० शेर वजन उचलील तर १६० शेराचा जोर पडतो अशी घडणी हताची आहे. परंतु त्याचा दुसरा उपयोग एक मोठा आहे. की अशी घडणी आहे म्हणुनच हात त्वरेने उचलतो. नाही तर फार ताठ राहता याजकरिता ईश्वराने अशी योजना केली आहे.

तागडी ही येक जात पाहारेची आहे. तागडीचा उपयोग दोहीकडील दोन वजने सारखी आहेत किंवा नाहो हें पाहाण्यास पडतो. याजकरिता दांडीस जो उचलावयाची दोरी असते. ती मध्यावर पाहिजे. नाहीतर मनेश्री फरक पडेल. कोठे कोठे काटा दुसरे प्रकारचा करितात. तो असाकीं एका अंगापेक्षा दुसरे अंगास दांडी तिप्पट लांब आहे. याजकरिता वजन असे काढतात. जर




लांब अंगास १ शेर लावला तर इकडे तीन शेर वजन जाहाले असे समजावे. याप्रमाणे वजन कर्ण्याचा ही काटा होतो. व गुणाकाराने लागलेच वजन कळते.

पहारा दोन तोन च्यार एकत्र करून ही काटे वगैरे यंत्रे बहुत प्रकारची होतात. व त्याणे मोठाले जिन्नस तोलता येतात. या प्रमाणे पहारीचा उपयोग आहे.

## प्रकर्ण २

दुसरी शक्ती चाक व कणा आहे. याचा उपयोग यंत्रामध्ये फार आहे. चाक कण्यावर बसविले असते. व दोन्हीं आपले व्यासाभोवती फिरतात. यामध्ये दोन योजना असतात. एक उचलणारा व दुसरें उचलावयाचे वजन उचलणारा चाक धरितो. उचलावयाचे पदार्थ त्याचे कण्यास लावतो. तो येणेप्रमाणे




क हे चाक याला दोरी बांधून ओढणारा ओढतो. व त्याचे कण्याला उचलावयाचे वजन दोरीने बांधलें आहे. ते घ चाक व कणा याची लांबी उंची जशी असेल तितका फायदा उत्पन्न होईल. इकडे लहान शक्ती जरी चाकास असली तरी मोठें वजन तिकडे उचलेल.

जसा पहारीचा हिशेब आहे. तसाच चाकाचा आहे. चाकही एक पहारीची जात आहे. ती येणेप्रमाणें

घ हे वजन ९ शेर आहे. आणि क व ग याची लांबी २० इंच आहे. तर दोहोचा गुणाकार १८० व च चे वजन ३० शेर उचलावयाचे आहे व ग आणि ख याची लांबी ६ इंच आहे. तर त्याचा गुणाकार १८० होतो. यामध्ये क-ख ही पाहार आहे. असे समजावे. व ग हे त्याचे नेट आहे. घ उचलणारा च उचलावयाचे तेव्हा या चाकावर ९ शेर व ३० शेर ही दोन्ही वजनें सारखीं होतील व पहारीपेक्षा दुसरा फायदा चाकाचा असा आहे. कीं कितीही खोल उचलावयाचा पदार्थ असला तर त्यास वर उचलून आणता येतो. राहट ही एक चाकाची जात आहे. व कितीयेक ठिकाणी राहाट येणेप्रमाणे करतात.



क-ख हे फिरवावयाचे दांडे आहेत. याणे येक घागर भरून येते. तो दुसरा रिकामी होते. याप्रमाणे पाणी काढतात.




बंदरावर तारवें रिकामी कण्याकरिता राहाट करितात. तें चाकच आहे. अशी नानाप्रकारची चाकें उपयोगार्थाकडे आहेत. या शिवाय आणखी यंत्र सुलभ कर्ण्याकरिता दोन तीन चाके एकत्र करून एकाचा धक्का दुसऱ्यास बसावा असे करतात. व चाकाचे बाजूस दाते करतात. या सर्व योजना फायदा अधीक होण्याकरित करितात.

याप्रमाणे प्रकार आहेत. त्याणे फारच जलद काम होते. व एक चाक फिरते तो दुसऱ्या चाकाच्या पाच सहा फेऱ्या जितके दात असतील. तितक्या होताव. त्याचा धक्का आणखी पलिकडच्यास बसला म्हणजे त्याहून विशेष अशी जलदी जितकी पाहिजे तितकी यंत्रकार करितात.



धड्याळांत चाके फार असतात. मुख्य सर्वास फिरवणारे चाक कमाण आहे. ती एका पितळेच्या पेटीत गुंडाळून ठेवितात. आणि तिचे एटोकास साखळी



बांधितात. ती दुसरे पलीकडे एक कणा त्रिकोनी करतात. त्यास जडऊन देतात. म्हणजे जो जो कमाण उलगडते. तो तो साखळी कण्यावर गुंडाळते. आणि चाके फिरू लागतात. ती येणेप्रमाणे




क साखळी गुंडाळलेली ग कमाण भरलेली पेटी ख कणा अशी धड्याळांत योजना असते. हे ही चाकच समजावे.

## प्रकर्ण ३

तिसरी शक्ती चाती आहे. हिचा उपयोग यंत्रामध्ये बहुत आहे. चाती म्हणजे लाकडाचे किंवा धातूचे चाक कण्यावर फिरणारे करून त्या चाकाचे परिधावर दोरी बसावयाजोगी खोल जागा करून दोरी त्याजवरून टाकून एका अंगाने ओझे उचलावे व दुसऱ्या अंगाने दोरी ओढावी म्हणजे फायदा होतो. परंतु १ जर चाती फिरणारी नसेल. तर होत नाही. जशी ग न फिरणारी चाती त्याजवरून दोहीकडून दोरी टाकली तर क ओझे ख ओढणारा या दोघाचे बळ सारखे पाहिजे. कारण की दोहीकडील दोऱ्याची लांबी सारखी आहे. तत्रापी इतका फायदा आहे. की खाली ओढण्याने ओझे वरती चढते. नाहीतर ओझे वरती ओढल्याशिवाय चढणार नाही. परंतु चातीच्या योगाने इतका चमत्कार आहे. की खाली ओढून वरती ओढल्याचे कार्य होते.




एका चातीस दोरी बांधून त्या दोरीवर बसण्याची जागा केली. त्याजवर माणूस बसून दुसरे दोरीचे शेवट आपले हातात घेऊन जर ओढील. आणि आपले शरीराचे निमें वजन ओढण्याचे

बळ लावील. तर आपले शरीर वरती नेउ सकतो. किंवा खाली नेउ सकतो. हा एक फायदा आहे. जसे याचे कारण असे आहे की त्या मनुष्याचे शरीराचे ओझे दोहो दोरिवर निमेनिम









बसते. व दोन्ही दोऱ्या त्याचे शरीरास लागून असतात. यास्तव आपल्या शरीरास उचलतो. आणि शरीराचे निमे वजन उचलण्याचा प्रयत्न करण्यात सगळें शरीर उचलतो.

दोन चात्या एकत्र करून योजल्या तर निमे वजनाबरोबर ओझे समतोल होतें. जसे ग एक चाती व घ दुसरी चाती आणि क वीस शेर वजन व ख दाहा शेर वजन तर दोन्ही वजनें सारखी तोलतात. याचे कारण क वीस शेर आहेत. त्याचा भार दोन दोऱ्यावर आहे. याजमुळे एक एक दोरीवर दाहाशेर आलें. आणि ख दाहाशेर आहेत. याजकरिता ते दोन्ही बरोबर भरतात.

जर चात्या चार लावल्या तर चौथाई वजनाबरोबर वजन समतोल होईल. जसे

क ओढणारा ख वजन चाळीस शेर आहे तर क च्या ठिकाणी दाहाशेर असेल तर सारखे भरेल. याप्रमाणे योजना नाना प्रकारच्या करितात. व त्याचे उपयोग बहुत आहेत. इमारती बांधताना दगड उचलून वर नेण्यास चात्या लागतात. व तारवें रिकामी करण्यास लागतात. व तारवेची शीडें उभी करण्यास वगैरे जरूर पाहिजेत.

## प्रकर्ण ४

उतरती जागा याचा फायदा असा आहे की वजनास ती संभाळून धरिते आणि ओढण्यास वजन कमी पुरतें. जसें जमीनीची उंची आहे. त्याचे जितके पट लांबी असेल. तितकेपट वजन कमी पुरतें. वरचे उदाहरणांत ग–घ याची च्यार हात उंची आहे व ग–च याची लांबी ८ हात आहे. तर क हें वजन १० शेर असेल. तर ख हें वजन वीस शेर असून तोलून धरील जर उंचीचे तिप्पट लांबी असेल तर तीस शेरास तोलून धरील. याप्रमाणे याचा उपयोग आहे.




याचा उपयोग वखारीत होतो. जेव्हा मोठालीं पिंपे वगैरे आत ढकलावयाची असतात. तेव्हा उतरती जमीन करतात. म्हणजे वरचे हिशेबाने थोडका जोर लावून मोठे ओझें ओढून नेण्यास येते.

सारखे जमीनीवर घोडा गाडी ओढीत असला. तर जें बळ त्यास लागतें. त्याहून जर ती जमीन चढती असेल. तर अधीक बळ लावलें पाहिजे. कारण कीं उतरत्या जमीनीवरून खाली जाण्याचा

स्वभाव जड पदार्थाचा आहे. याजकरिता खाली जाणे संभाळून वरती ओढावयास अधीक बळ पडते.

जिने व घाट या प्रकर्णातील आहेत. लांबीपेक्षा उंची जितकी कमी असेल. तितका जिना चांगला. व घाट चढ्डतेसमयी मेहेनत फार पडते. याचे कारण असे आहे कीं शरीराचा स्वभाव खाली घसरण्याचा असतो. आणि तो संभाळून चालण्याची मेहेनत करावी लागते. हें शिवाय व उतरताना शरीराचा स्वभाव खाली पडण्याचा असतो. याजकरिता सुलभ जाते. चालण्याची मात्र मेहेनत पडते. शिवाय खाली घसरून जाण्याचा जोर शरीरात येतो. तो संभाळावा लागतो.

### प्रकर्ण ५



खुंटी ही एक मोठी शक्ती आहे. जसे,

खुंटी ही दोन उतरत्या जागा आहेत. व त्याचे फायद्याचा अकार मागले हिशेबा प्रमाणेच आहे खुटीचा उपयोग बहुत पडतो. जी सर्व टोकीची हत्यारें व धारेची हत्यारें तरवारी, कुऱ्हाड, कुदळी, वगैरे खिळे, कानस, करवत हे सर्व खुंटीच्या शक्तीचे प्रातुर्भाव आहेत.

### प्रकर्ण ६

मळसूत्र ही सहावी शक्ती आहे. याचा उपयोग यंत्रामध्ये फार आहे. मळसूत्राची दोन आंगे आहेत. एक मळसूत्र, व त्यास फिरविण्याची एक पहार असते. जसे. क ही पहार ख हें मळसूत्र




आहे. याचे शक्तीचा अकार करण्याची रिती अशी आहे. कीं पहारेचा जितका परीघ असेल. त्यास व मळसूत्रावर जीं सूत्रें असतात. त्याचे मध्य अंतर असतें. तें जितके पट कमी होईल. तितके बळ उत्पन्न होते. वरचे यंत्राची पहार ८ इंच आहे. तेव्हा त्याचे सहा पटीहून अधीकच परिघ होईल. तो सरासरी ५० इंच धरला आणि सूत्रें एक इंचात चार आहेत. म्हणजे दरयेक अंतर पाव इंचाचे आहे. तेव्हा ५० याची चौपट केली तर २०० होतात. इतके पट जोर होईल. जरकरिता इंचाचे दाहव्या अंशा इतके अंतर असेल. तर पाचशे पट जोर होईल. म्हणजे, जर एक शेर ओझाचे जोराने वरची पहार फिरवली तर मळसूत्राचे खाली जो तक्ता असतो. त्याचे खाली जो जिन्नस ठेवावा. त्याजवर पाचशे शेराचा जोर पडेल. या प्रमाणे मळसूत्रे करून बुकें बांधण्यास व उसाचा रस काढण्यास व रक्तास वगैरे सर्व यंत्रामध्ये प्रमुख ही शक्ती आहे.

---

## चलनज्ञान

### प्रकर्ण १

चलन ज्ञानांत जे भरीव व जड पदार्थ आहेत. त्यांचे गती विषई विचार केला आहे. गतीचे तीन प्रकार आहेत. एक, सारखी गती दुसरी, चढती गती. तीसरी, उतरती गती.

सारखी गती म्हणजे, जितका एक क्षणात पदार्थ जातो. तितकाच दुसरे क्षणात जातो. असे कितिही क्षणात त्याच मानाने जातो तर ती सारखी गती.

चढती गती म्हणजे एका क्षणात जितका पदार्थ जातो. त्याहून दुसरे क्षणात अधीक याप्रमाणे कितीही क्षणात नियमाने वाढत जातो. ती चढती गती.

उतरती गती म्हणजे त्याच रितीने कमी जातो ती.

गतीचे नियम बांधण्यास तीन गोष्टीचा विचार करावा लागतो. एक, आकाश दुसरा, अवकाश तिसरी, शक्ती म्हणजे पदार्थ चालता जाहला. व किती शक्ती त्याचे अंगात होती, आणि किती दूर गेला. व त्यास किती वेळ लागला.

सारखे गतीत याचा हिशेब असा करितात. कीं शक्ती व अवकाश याचा गुणाकार करावा. म्हणजे त्याबरोबर आकाश आहे. उदाहरण

एक पदार्थ दर क्षणांत वीस हात जातो. इतकी शक्ती आहे. तर पाच क्षणामध्ये किती गेला. २० व ५ याचा गुणाकार १०० होत गेला.

चढती गतिचा हिशेब असा आहे. कीं क्षणांत जितका जात असेल. ती शक्ती व जितके क्षण लागले. असतील त्याचा वर्ग करून शक्तीस गुणावे. जसे, पृथ्वीवर एक क्षणांत १६ फूट व एक इंचावरून पदार्थ येतो. तेव्हा जा पदार्थास ५ क्षण पडावयास लागेल. तर तो किति उंचावरून आला. आता १६ स एकांने गुणलें तो गुणाकार १६ जाहाला. त्यास पाचाचा वर्ग २५ यानी गुणून गुणाकार ४०० जाहाला इतके फूट उंचावरून पडला असे जाणावे.

एका कड्यावरून ३॥ क्षणात दगड खालीं आला तर त्या कड्याची उंची इतकी आहे की, १६ यास ३॥ यानी गुणून गुणाकार ५६ यास पुन्हा ३॥ यानी गुणून गुणाकार १९६ जाहाला. इतके फूट उंच आहे.

गतीत पदार्थ असला म्हणजे त्याचे अंगात जोर असतो त्याचा आकार त्याचे वजनाचा आणि शक्तीचा गुणाकार करावा त्याप्रमाणे आहे.

चोर तोळ्याचा गोळा आणि १२ फूट दर क्षणात जातो. तर त्याचा जोर ४८ अंश आहे. व ३ तोळ्याचा गोळा १६ फूट दर क्षणात जातो. तरि त्याचा जोर ४८ अंश आहे. जर हे दोन्ही गोळे सारखे जोराचे एकमेकास येऊन थडकले. तर दोघांचा पुढे जाण्याचा जोर नाश होऊन स्वस्थ रहातील. परंतु जर मृदू असतील, तर दिशा सोडून वाकडे जातील.

सर्व पदार्थास उजू जाण्याचा गूण आहे. जर पदार्थ फेकला. तर उजू जाईल. जेव्हा त्यास काही तरी दुसरा अटकाव येईल. तेव्हा तो वाकडा होईल. व एक पदार्थास जोराने फेकला. आणि जो स्थीर पदार्थ आहे. त्यास जर त्याचा स्पर्श जाहला, तर त्याचा जोर त्या स्थीर पदार्थास प्राप्त होतो.




दोन शक्ती एकत्र जाहल्या असता दुप्पट जोर होतो.

जर करता तारु वाऱ्याचे जोराचे ख पासून ग पर्यंत एक घटकेत जाते. व ख पासून क पर्यंत एक घटकेत पाण्याचे जोराने जातें. जर करिता भरती व वारा येकदाच लागले. तर तेच तारु एक घटकेत दोहो गतीचा बेरजेइतके जाईल. म्हणजे ख पासून घ पर्यंत जाईल.

## प्रकर्ण २

आणखी पदार्थास दोन शक्ती आहेत. एक पलायन कर्ण्याची व दुसरी अकर्षण करण्याची शक्ती. पलायन शक्तीने पदार्थाचे मध्यापासून पदार्थ पळून जातो व अकर्षण शक्तीने पदार्थास मध्याकडे आणून धरितो.

पलायन शक्ती ही स्थीरपणाचा गुण पदार्थास असतो. याचा गुणापासून निर्माण होते. जसें हतात गोफण घेऊन दगड फिरवू लागले म्हणजे दगडास निघून उजू रस्त्याने जाण्याची इच्छा होते. म्हणून तो हतातली गोफण उडवावयास पाहातो. व पाण्याचे भांडे दोरीस बांधून फिरवलें तर पाणी सांडत नाही. याचे कारण तेच आहे. दाणे दळण्याच्या मोठ्या चाक्या व कापड विणण्याची यंत्रें व उभे राहून घोडा फिरवावयास व काचेचो भांडी करण्याचे यंत्रात पलायन शक्तीचा फार विचार करावा लागतो.

पृथ्वीचा कणा दर येक तासांत एक हजार मैल म्हणजे अर्ध कोश फिरते याजकरिता तिला पलायन शक्ती मोठी आहे. पृथ्वीचा कणा म्हणजे मध्यरेषा आहे. त्या प्रदेशी काही पदार्थ वजन भरावे. व पृथ्वीच्या ध्रुवाकडे कमी भरावे. परंतु जास्ती भरतें याचे कारण पृथ्वीचा अकार गोलाकार आहे. यास्तव पृथ्वीची अकर्षण शक्ती ध्रुवाकडे अधीक होते. ती पलायन शक्तीचा उपमद करून वजन अधीक भरविते. यास हाल्ली असे प्रमाण आहे. कीं जर इकडील देशातला जिन्नस वजन करून ध्रुवाकडले देशात नेला तर काही अंश अधीक भरतो. या प्रकर्णी हिशेब केला असता सर्व कारणें बरोबर सापडतील. व न्युटन इत्यादि गणीतकर्ते महान ज्ञाते जाहाले. त्याणी ताळे घालून दिल्हे आहेत.

वरती दुसरी अकर्षण शक्ती सांगितली तिचा दाखला असा आहे कीं, जे आकाशांत नक्षत्रें वगैरे फिरतात. ती सर्व तिचा योगाने फिरतात. असे कीं, जो मोठा तारा आहे. तो ल्हान ताऱ्यास अकर्षण करितो आणि लहान तारा सभोवता फिरतां फिरतां त्यास पलायन शक्ती येते. तेव्हा लहान ताऱ्यास दोन ओढण्या लागतात. एका अंगाने एक दूर नेण्यास पाहातो. दुसऱ्या अंगाने अकर्षण होते. यास्तव तो इकडे ही जात नाही व तिकडे ही जात नाही. परंतु आपले मार्गाचे ठायी सारखे गमन या दोहो शक्ती करून निर्वेध करितो. परमेश्वराने नक्षत्राच्या योजना अशा चमत्कारीक केल्या आहेत. कीं दोन्हींपैकी एकही शक्ती त्याजवर अधीक उणी न होता ते सारखे गमन करितात. हे एक परमेश्वराचे अतिउत्तम यंत्रच होय.

लंब म्हणजे दोरीस खाली वजन बांधून टांगले असले म्हणजे त्यास लंब म्हणावे. त्याचे फेरे होण्याचे उपयोगाचे नियम पुष्कळ आहेत. मोठे घड्याळास लंब असतात. व लहान घड्याळास लंबाचेबद्दल पंखा असतो. तेणे करून त्याची गती सारखी ठेविली असत्ये. जर हवेत शितोष्ण अधीक होईल तर धातू विकसीत होऊन लंबाचे गतीत फेर पडतो.

---

# जलमयपदार्थज्ञान

## प्रकर्ण १

जलमय पदार्थाचे दोन प्रकार आहेत. एक पाणी व दुसरा पारा इत्यादि दाबले असता लहान होत नाही. व वायु वाफ वगैरे दाबले असता लहान होतात. या दोहोची वेगळाली ज्ञानें आहेत.

जलमय पदार्थ ज्ञान म्हणजे पाणी पारा इत्यादि पदार्थ संयुक्त योजिले असता प्रबळ होऊन यंत्रे चालविण्याचे वगैरे बहूत उपयोगी पडतात हे सर्व त्याचे गूण जाणणे.

पाणि दाबले जाते किंवा हे पाहाण्याकरिता सोन्याची गोटी करून त्यांत पाणी भरले. आणि तोंड बंद करून ठोकले. तेव्हा सोन्यावर पाण्याचा दाब आला. कारण कीं, सोन्याचे अंगातून पाण्याचे अणू रेणू बाहेर पडले. परंतु अलिमे खंडात पाणी दाबून पाहिले. त्याजवरून असे कळले आहे. कीं पाणी काहींसें दाबले जाते. पाण्याचे अणू रेंणू मध्ये देखील छिद्रें आहेत. परंतु ती अतिशय बारीक सबब दिसत नाहीत. परंतू आहेत. हें सिद्ध अशावरून होते कीं त्यांत जर मीठ टाकले तर पाणी वाढत नाही. कारण की तें मीठ वितळून त्या छिद्राचे ठायी राहाते. जर मीठ छिद्रांत राहील. त्याहून ज्यास्ती टाकले तर मात्र पाणी चढेल.

दाट आणि पातळ पदार्थास अंतर इतके आहे. कीं दाट पदार्थाचे अणू रेणू घट आहेत. आणि पातळ पदार्थाचे विरळ असून त्यांस चुंबन शक्ती कमी आहे. म्हणून ते एकामेकास चिकटून रहात नाहीत. परंतू जिकडे हलिवलें तिकडे ढळतात. पाहा कीं, लाकडाचे मेज करितात. त्यास च्यार पाय करितात. त्याजवर ते सावरतें. तसे पाण्याचे काही सावरत नाही. कारण कीं पाण्याचे अणू रेणू स्वतंत्रपणाने पडावयास इछितात. या साठीं पाण्याची रास होत नाही. जरी समुद्रांत वारा लाटा आणितो. तरि त्याचा नाश लागलाच होतो.

पाण्याचे अणू रेणू मध्ये फूट फार याजकरिता पृथ्वीचे अकर्षण त्याचाने सहन होत नाही. परंतू लागलेच सपाट होऊन धनुष्याकृती पाण्याचा पृष्ठभाग होतो. याचे कारण पृथ्वी वर्तुळ आहे. ती वर्तुळाकृती अकर्षण करिते. असाच धनुष्याकृती समुद्र आहे.

पाण्यात पाण्याइतकाच वजन पदार्थ टाकला. तर पाण्याशी मिळतो. व पाण्याहून हलका पदार्थ टाकला. तर वरती येतो. कारण कीं जरी तेलास पाण्याचे तळाशी ओतले. तर त्याजवरचे पाणी जें आहे. तें अकर्षले जाते आणि तेल त्यास अडऊन धरिण्यास सामर्थ्यवान नाही. ह्मणून तेलावून ते शिरून आपले जातीसी मिळते आणि तेलास वर टाकते.

पाण्याचे अकर्षण चोहोकडून होतें. वरती खाली बाजूस सर्व दिशेस त्याचा झोक असतो. याजकरिता पाणी स्वस्थ राहते. परंतू जर त्यास धका लावला तर तें हलू लागतें. कारण की त्याचे पहिले तणावे बिघडतात.

जाठिकाणी भरलें असते त्याचे खाली जोर विशेष उत्पन्न होतो. कारण की, खालचे पाण्यावर वरचे पाण्याचा जोर पडतो. म्हणून पाण्याचे घटास जर वरती छिद्र असेल. तर पाणी कमी जोराने वाहील व मध्यावर असेल. तर त्यातून जोराने वाहील. तळाशी असेल. तर फारच जोराने वाहील जसे.







पाण्याचा जोर खाली आहे. याजमुळे वरती जोर उत्पन्न होतो. जसे क हें भांडें आहे. त्यास ख ही नळी आहे. क हे भांडे पाण्यानें भरलें तर ख या नळीत पाणी सारखे चढेल. जितके भांड्यात पाणी चढेल. तितके नळीत चढेल. व जर भांड्यात चढेल तर नळीत चढण्याविषयी जोर होतो.

## प्रकर्ण २

सर्व पदार्थाचे वजन चांगले रितीने समजावे. याजकरिता अशी रिती काढली आहे. सर्व पदार्थ पाण्यांत तोलून पहातात ते असे की

एक परड्यात वजन आहे. त्याजवरोवर वजन केलेला पदार्थ दुसरे परड्यात आहे. आणि ते परडें पाण्यांत बुडिवले आहे.



हवेत वजन भरते त्या पेक्षा पाण्यात वजन कमी भरते. कारण कीं पाण्याचा वरती जोर असतो. त्यास हा अटकाव पदार्थ करितो. सबब त्या जोरावर वजन तोललें जाते. व जर एक सोन्याचा तुकडा तसूभर लांब रुंद व उंच असेल. आणि तो बाहेर वीस तोळे भरला. आणि पाण्यांत १९ तोळे भरला. तर अनुमान होते कीं जा ठिकाणी पाण्यांत तुकडा होता त्या ठिकाणचे पाणी त्याचा शरीराइतकें दूर गेलें आणि जर तितके उंच लांब पाण्याचा तुकडा शेजारचे परड्यात टाकला. तर वजन बरोबर होईल. याजकरिता जितके पाणी दूर जाहलें. त्या पाण्याचे वजनाइतके या पदार्थाचे वजन जाते. तेव्हा पाण्यापेक्षा सोने १९ पट ज्यास्ती दाट व वजन आहे. असे ठरले. या प्रमाणेच हलके व जड पदार्थ वजन करून त्याचे पाणी किती तोळे वजन हे काढलें आहें. तें येणेप्रमाणे.

| | पट | | पट |
|---|---|---|---|
| सोनें | १९॥ | पारा | १३॥ |
| सिसें | ११। | रक्त माणसाचे | १० |
| तांबें | ९ | दूध गाईचे | १० |
| लोखंड व कथील | ७॥ | पाणी | १० |
| हिरा | ३॥ | तेल | ९ |
| | | वायु | १। |

दाहा तोळें बरोबर पाणी घेतलें आणि त्याचाच लांबी उंची इतके दुसरे पदार्थ बरचे घेतले. तर वरती लिहिलेले तोळे भरतात.

एक तसू भर जाग्यावर हवेचा भार साडेसात शेर असतो. कारण कीं आपले वर हवा उंच वीस कोस पर्यंत आहे. याजमुळे पाणी बद्दलेले असतें यास प्रमाण असे आहे कीं, जर पाणी शिशीत असेल. आणि तेथून वारा सर्व काढून घेतला. तर शिशीतले पाणी थोडकेंसें फुगतें.

पाण्याचा खजीना जितका उंच तितके उंच पाणी चढतें याजमुळे नळ व हौद बांधताना नीच जमिनीवर पाणी आणण्यास खजीने बांधतात.

## प्रकर्ण ३

पृथ्वीवर पाणी आहे. हें नानातऱ्हेनी दृष्टोत्पत्तीस येतें. त्यापाऊस नद्या ओढे उत्पन्न होतात. सूर्याचे उष्णाने पाण्याचे अणु रेणु दूर दूर होतात. आणि पाण्यास हवेचे माप येऊन वरती चढते. आणि त्याचे मेघ होतात. ते जड जहाले म्हणजे खाली पडतात पडताना हवेतील पाण्याचे थेंब एक-मेकाशी लागून थेंब उत्पन्न होतात. जर अशी ही व्यवस्था न होईल. व पृथ्वीतील पाणी नेहेमी पृथ्वीत राहील तर वृक्ष उगवणार नाहीत. व मेघ जर नेहेमी हवेचे मापाने रहातील तरी उप-योग नाही व अकर्षण अधीक होऊन थेंबापेक्षा मोठाला जलाची रुपें जहाली तरी नाश करितील. परंतु परमेश्वराची युक्ती व योजना अनुपम्य आहे.

पाणी जमीनीवर पडले. म्हणजे भूमीच्या छिद्रानी तिच्या अंतर्यामी जाते. आणि जमून वाहू लागतें. व जर खाली जमीन फार घट्ट लागली. कीं तिचातून प्रवेश होत नाही. म्हणजे पाण्याचा संग्रह तेथे जमतो. आणि त्यापासून झरे वगैरे होतात. या प्रमाणे व्यवस्था पाण्याचा अनेक आहेत.

पाणी यंत्रें करण्यात फार उपयोगी पडते. व पाण्याचा ओघ जेथे असतो. तेथे काही उपाय करून त्याचा जोर काही यंत्रास लावावयास येतो व पाण्याची वाफ यंत्रास लाऊन मोठा जोर उत्पन्न होतो त्याणे भूमीवर व समुद्रावर गाड्या चालतात.

---

# वायुमयपदार्थज्ञान

## प्रकर्ण १

वायुचे वेष्टण पृथ्वीस आहे. आणि वायुचा गुण असा आहे कीं, तो दाबला असता लहान होतो. व वरचा जोर काढला म्हणजे मोठा होतो. हाली पृथ्वी जवळचा वायु त्याचे वरील वायूचे जोराने दबला आहे. यास प्रमाण, वायूने भरलेला फुगा भांड्यात ठेऊन त्या भांड्यातील वायू काढला असतां फुगा आणखी फुगतो. आणि वायूस वजन आहे. भांडे वजन केले. त्यापेक्षा वायू काढलेले भांडे वजन केले तर कमी भरते. व पुढे यंत्र काढले आहे. ते येणे प्रमाणे.




खालचे भांडें पाण्याने भरले आहे. त्यांत घ ही नळी ग हा दट्या आहे. उघडे तोंडाकडून नळी पाण्यांत बुडविली आहे. व वरचा दट्या वरती ओढून घेतला. म्हणजे हवा नळीत रहात नाही. आणि हवा पाण्याचे तोंड क ख याजवर असते. ती दाबते सबब नळीत पाणी चढते. व या यंत्राने पर्वताची उंची मोजतात किंवा हेच यंत्र पाऱ्याचे करितात. म्हणजे नळी काचेची असते. त्यात पारा किती चढला. व उतरला हे दिसते व त्याज-वरून वायूचे ओझें त्याजवर किती आहे. हे समजते. जितके कमी होईल तितके उंची जाहली असे ठरते. व त्याजवरून हवेची स्थितीही समजते.

मनुष्याचे अंगावर सरासरी पस्तीस मणाचे ओझे वायूचे आहे. परंतु ते अगदी लागत नाही कारण कीं खाली वरती सर्वत्र तेच आहे. जरकरिता काही जे वाऱ्यापेक्षा हलके असेल. ते जड पदार्थांत भरून सोडले तर वरती उडत जाईल. जसे पाण्यापेक्षा पदार्थ हलके असतात. ते वरती येतात. याचप्रमाणे हवेत उडण्याची वहाने करितात.

ऊष्णाने हवा पातळ होते. व याच कारणापासून वावटळ सुटते वावटळी पासून यंत्रें चालू होतात. जाती फिरतात. तारवें चालतात. व वारा फार हलू लागला म्हणजे झाडें देखील उपटितो. याजवरून हा जरी पदार्थ पातळ आहे. तरि त्यास बळ पुष्कळ येते. असे दिसते.



वायू खाली जड आहे. त्यावरती पातळ आहे. त्यावरचा त्याहून पातळ आहे. जसे

यास्तव किती उंच आहे. याचा पक्का नियम होत आहे. म्हणून कोणी म्हणतात, कीं ५० कोस आहे. कोणी म्हणतात दाहा कोसच आहे.

मनुष्याचे पोटात व सर्व आंगात वायू भरला आहे. तो बाहेरचे वायूचे ओझ्याने दबला आहे. जर बाहेरचे ओझें निघेल तर मनुष्याचे आंग फुटून जाईल. तुंबडी लाविली असता आंग सुजते. याचे हेच कारण आहे.

पाण्याची वाफ हा एक वायूच आहे. त्यापासून मोठाले पराक्रम होतात. व पाण्याची तापून वाफ होते. पुन्हा त्याचे पाणी होते. अशी यंत्रे करून त्याचे जोरावर गाड्या. नावा चालिवता येतात.

---

## कर्णज्ञान

### प्रकर्ण १

कानात एक बारीक पडदा आहे. तो जसे डफावर कातडे असते तसे आहे. त्यास कोणी शब्द केला म्हणजे तेणे करून वायूचे परिमाणूचा न होऊन स्पर्श करितात. आणि त्या पडद्यापासून शिरा ज्ञानेंद्रिया पर्यंत आहेत तेणेकरून शब्द ज्ञान होते. जर एका भांड्यातून वायू काढला. आणि त्यांत घंटा वाजविली. तर वाजतनाही याजवरून समजते कीं वायूचे समवेत शब्द चालतो. आणि वायू शिवाय पाणीही शब्दास चालिवते. कारण कीं पाण्याखाली जर दगडावर दगड वाजविला. तर वरती ऐकू येतो. व पाण्यात कान बुडऊन ठेविला. तर ही ऐकू येतो. व तुळईचे एका टोकावर ठोका मारला. आणि तो जरि हवेत ऐकू न आला तरी दुसरे टोकाशी कान दिल्हा तर ऐकू येतो. तेव्हा त्या काष्टातून शब्द प्रवेश करितो. असे दिसते. सामान्यतः क्षणांत ११३० पावले शब्द वाऱ्यात चालतो. परंतू वारा उन्ह ओलसरपणा येणेकरून कमी जास्ती होतो. यास्तव तोफेचा विस्तव आदि दिसतो. आणि शब्द मग ऐकण्यास येतो. वीज अगोदर दिसते. मग अवाज ऐकावयास येतो. आणि जसे उजडाचे अरशावरून वगैरे प्रतिबिंब पडतें. तद्वत शब्दाचेही प्रतिध्वनी निघते. म्हणजे एखाद्या पदार्थाशी थडकून माघारा परत येतो. एक वेळच नाही. परंतू डोंगरातून पुष्कळ वेळ प्रतिध्वन्या एका शब्दाच्याच होतात.

गायनांत शब्दाची सुखकर रचना लिहिली आहे. व वाद्याचा तारानी हवेचे परिमाणू चलन करावयाची रिती सांगितली आहे. व तार मागें पुढें गेल्याने कसे कसे अवाज व कोणते नियमाने होतात. हे सांगितले आहे. परंतू हे नियम येथे लिहिण्यास जागा नाही. सबब संक्षेपे करून लिहिले आहे.

---

## नेत्रज्ञान

### प्रकर्ण १

सर्व पदार्थांच्या तीन जाती केल्या आहेत. (१) तेजस्वी, (२) निस्तेज, (३) पारदर्शक. सूर्य अग्नी इत्यादि पदार्थ तेजस्वी आहेत. काष्ठ धातू इत्यादि निस्तेज आहेत. जरी धातू घासून लक-लकतात. तत्रापी दुसरे पदार्थाचें तेज त्याजवर पडते. म्हणून चकाकतात. अंधेरांत त्या चकाकत नाही. यास्तव असे व मळीण पदार्थ सर्व निस्तेज आहेत. व पाणी भिंग वगैरे हे पारदर्शक पदार्थ आहेत. कारण कीं, त्याजवर उजेड पडला. म्हणजे त्याचपासून प्रवेश करून पलीकडे जातो.

ज्ञाते यांच्याने उजेड काय आहे. याचा ठराव अद्याप जहाला नाही. कोणी म्हणतात. कीं, तेजस्वी पदार्थापासून परिमाणू उडून बाहेर पडतात. तोच उजेड दुसरे असे म्हणतात. कीं उजड सर्वत्र आहे. परंतू काही पदार्थ त्यास प्रगट करितात. त्यासच तेजस्वी म्हणावें. तिसरें असें म्हणतात कीं, अतीशय पातळ पदार्थ हा एक आहे.

इतर जड पदर्थाचे चलन वलन ज्या नियमाने होते. त्याच नियमाने उजडाचे होते. परंतू यास अकर्षण शक्तीचा संबंध नाही. व याचा बहूत शोध केला. परंतू उजडास काही वजन आहे. असें सिद्ध होत नाही. यास्तव कोणी ज्ञाते असे म्हणतात. कीं, याची जड पदार्थांत संख्याच नाही.

उजडाची गती अतीशय त्वरेने होते. त्याचे अनुमान सरासरी क्षणांत एक लक्ष कोस चालतो. सूर्यापासून जमीनीवर उजड येण्यास सहाशे क्षण* लागतात. काही काही जीं दूरची नक्षत्रे आहेत. त्यांचा उजड खाली येण्यास तीन तीन वर्षें लागतात.

उजड सूर्यापासून निघतो व जे पदार्थ जळत असतात. त्या पासूनही निघतो. मेघाचे ताडन मेघावर होते. तेव्हा उजड निघतो. व काजवे रेशीम इत्यादि पदार्था पासूनही निघतो.

उजडाचा नियम असा आहे. कीं तेजस्वी पदार्थापासून उजू रेषानी तो निघतो. त्या रेषास कीर्ण अशी संज्ञा आहे. त्या रेषामध्ये जेव्हा काही निस्तेज पदार्थ येतो. तेव्हा त्या त्यामध्ये गुप्त होतात. कारण कीं पलीकडे जाववत नाही. व पदार्थास सोडून वाकड्या होऊन जात नाही कारण कीं, उजडाचा धर्म समूर जाण्याचा आहे. याजमुळें तितका उजडाचा छेद होतो. आणि सावली पडते. सावली म्हणजे उजडाचा अभाव आहे.




तेजस्वी पदार्थ मोठा आहे. आणि निस्तेज पदार्थ लहान असेल. तर त्याची सावली पडून पुढें उजड पडतो. जसे–

निस्तेज पदार्थाची सावली पडून ग पुढे उजड पडेल. आणि




ग हा दिवा आहे. याची सावली क इतका दूर मनुष्य उभा राहीला तर जितकी पडेल. त्याहून अधीक ख जवळ राहिला. तर पडेल. या प्रमाणे अधीक होत जाईल.

निस्तेज पदार्थ उजेडास हरकत करितो. तो सर्व प्राशन करितो असे नाही. परंतू काही प्राशन करितो. व काही जसा भिंतीवर दगड टाकला. म्हणजे तो उलटून माघारा फिरतो. तसा उजेड माघारा फिरतो. उजड पडण्याचा व माघारा फिरण्याचा कोन एकसारखा असतो. जसे–




कख हा आरसा आहे. त्याजवर घ या पदार्थापासून उजेड पडला आहे. तो ग जवळ पडला. आणि तेथून उलटून च कडे गेला. दोहो कोनाचे अंतर लहान बिंदूनी दाखविले आहे. तें सारखें आहे.

तेजस्वी पदार्थापासून उजेड पहाणाराचे डोळ्यावर येऊन पडतो. आणि पदार्थ दिसतो. परंतू निस्तेज पदार्थ याजवर उजेड पडलेला असला म्हणजे तेथून उलटून तो उजेड येऊन डोळ्यास लागतो. तेव्हा तो पदार्थ दिसतो. जा पदार्थाचे अंगात उजेड नाही. व त्याजवर दुसऱ्या तेजस्वी पदार्थाचा उजेड पडला नाही. तो पदार्थ व्यक्त नाही.

उजेडाने पदार्थ दृष्टि गोचर होतात. याचें कारण असें आहे कीं, उजेडाची कीर्णे पदार्थापासून निघतात. ती बुबुळातून आंत जातात. आणि बुबूळाचे पाठीमागें पडदा आहे. त्याजवर पडून तेथे

---

* क्षण म्हणजे ६० क्षण = १ मिनीट, ६० मिनीट = १ तास

त्या पदार्थाचा रंग आकृती व उंची लांबी मात्र निश्चत नाही. परंतू बाकी सर्व हूबहू प्रतिमा उत्पन्न करितात. जसे–

खिडकी बंद केली आणि एक बारिकसे भोक तिला करून तें उघडें ठेविलें. आणि त्यातून उजेड येऊ दिल्हा. तर तो उजेड समूरचे भिंतीवर पडून तेथे बाहेरचा पदार्थाची प्रतिमा रंग सहीत हू बहू उत्पन्न होते. खिडकी बाहेर बाग असली. तर बागेची प्रतिमा उठेल. परंतू ती उलटी मात्र असते. ही प्रतिमा उठण्याचे कारण असें आहे कीं, बाहेर झाड आहे. त्याजवर उजेड पडून तेथून तीं कीर्णें उडोन त्या भोकावाटे येऊन भिंतीवर पडली त्याजबरोबर ते त्या पदार्थाचा रंग व आकृती आणितात. जसे–

**घ** हें भिंतींत भोक आहे. त्यातून कीर्ण जातात. **क** हा बंगला आहे. **ग** हा ओटा आहे. **ख** हे झाड आहे. याच्या प्रतिमा **च छ ज** या भिंतीवर उठतात त्यात कीर्णांचा सामान्य नियम असा आहे. कीं, कीर्णें नेहेमी उजू चालतात. यास्तव जी कीर्णें बंगल्यावर पडून तेथून तिर्कस उलटतात. ती त्या भोकातून प्रवेश करून भोकाखाली समूरचे भिंतीवर पडतात. ती




अशीकीं, वरचा अंगची आहेत. ती खाली पडतात. व तळाकडील वर पडतात. याजमुळें बंगला उलटा फिरलेला भिंतीवरचे प्रतिमेत खालच्या अंगास उठलेला दिसतो. व झाड घ या पासून उलटलेली कीर्णें भोकातून जाऊन वरच्या अंगास भिंतीवर पडतात. तेथे झाडाची प्रतिमा उठते. ती उलटी असते. व **ग** हा ओटा आहे. तो भोकासमोर आहे. सबब त्याची कीर्णें समोरा समोर भोकात जातात. आणि त्याची प्रतिमा समूरचे भिंतीवर लहान जशीची तशी उजू उठते. चमत्कार इतका आहे. कीं, भोकातून सर्व कीर्णें तिनी पदार्थावरील शिरतात. आणि एकामेकात मिसळतात तत्रापी पुनरपी पृथक पृथक आपले रस्त्याने उजवेकडील डावे अंगास व डावेकडील उजवे अंगास व समूरची समूर अशी आपलाले पदार्थाचे रंग घेऊन प्रतिमा उत्पन्न करितात. हें कोणीही करून पाहिले. तरी दिसेल. व याजकरिता यंत्रेही केलेली आहेत. त्यातून पाहिले म्हणजे अनुभवास येतें. याचप्रमाणे डोळ्याची व्यवस्था आहे. डोळ्यातील बुबुळ हेच भोक त्यातून बाहेरचा उजड शिरतो. आणि बाहेरच्या पदार्थाच्या प्रतिमा रंगसहीत बुबूळाचे पाठीमागें शुभ्र पडदा आहे. त्याजवर उठतात. आणि त्याचे ज्ञान होतें.

पदार्थ जितका दूर किंवा जवळ असेल. त्या प्रमाणे लहान मोठा दिसतो. हे सर्वास ठाऊक आहे. याचे कारण असे आहे कीं. दूरच्या पदार्थाची कीर्णें लहान प्रतिमा उत्पन्न करितात. म्हणून जरी दोन्ही पदार्थ सारखे लांबी उंचीचे असेल. भास लहान मोठे अंतरावरून वेगळाला होतो. जसे–



जवळच्या झाडा पासून जी कीर्णें येतात. ती भोकातून

प्रवेश करताना दृष्टी कोन म्हणजे त्या कोनात पदार्थ असला तर दृष्टीस पडतो. म्हणून त्या कोनाचे नाव दृष्टी कोन आहे. तो मोठा कोन आहे. व दूरचे झाडाची कीर्णे शेंड्यापासून व तळापासून जो येतात. ती लहान कोन करितात. सबब त्याची प्रतिमा लहान उत्पन्न होतें. अवयव बिघडत नाही. परंतू प्रतिमा उत्पन्न लहान होते. म्हणून तो पदार्थ जरी मोठा असला, तरी लहान दिसतो. हें यंत्रातून पाहिलें म्हणजे किंवा अंतरावरचे पदार्थ दूर किंवा उंचावर उभे राहून पाहिले म्हणजे दिसतें.

चित्रें काढतात. म्हणजे काय कीं, जसे पदार्थ नेत्रावर प्रतिमा उत्पन्न करितात. त्या प्रमाणे काढतात. तें त्या पदार्थाचे मूळ स्वरूप आहे. असे नाही. परंतू जसे ते आपल्यास दिसतात. तसतशी चित्रे काढतात.

जे पदार्थ फिरत असतात. त्याचें अंतर माहित असल्या शिवाय त्याची जलदी दृष्टीस पडत नाही. जसें.

क आणि ख हे दोन मनुष्य टिंबं दिल्ही आहेत. त्या मार्गाने निघाले. आणि ग घ या ठिकाणी सारखे वेळात आले. तर क चा मार्ग लांब आहे. सबब जलद चालला असेल. आणि ख चा मार्ग लहान आहे. सबब तो हळूहळू चालला असेल. तेव्हा त्या दोघांस पाहणारा च माणूस हा कोपऱ्यावर उभा आहे. त्यांस दोघे सारखे चालतात. असे दिसले. कारण की, वर्तुळाचे अंश दोघांचे सारखे आहेत. वर्तुळें मात्र लहान मोठी आहेत. असें दिसलें म्हणून ते दोघे सारखे चालले असे होत नाही. यास्तव डोळ्यानी लांबी उंची व जलदी हें बरोबर कळत नाही. या दोन्ही गोष्टीविषई माहितगारी नसेल, व डोळ्यावरच भरवसा ठेविला तर माणूस फसेल. यांत संशय नाही.




याजवरून दृष्टीच्या चुक्या नीट करण्यास माहितगारी पाहिजे. मागें एक मुलगा अंधळा अगदी लहानपणापासून होता. त्याचे डोळे चौदावे वर्षी आले. तेव्हा एकदाच त्यास जगव्यक्त जहाले. आणि कोणचा पदार्थ केवढा व किती लांब आहे. याचे धोरण न राहून त्याजला असा भास होऊ लागला. कीं, हे सर्व पदार्थ माझ्या डोळ्यास लागतात. म्हणून तो चाचपून पाही. तो हतास लागेनात असे त्याणे काही दिवस अनुभव घेतला. तेव्हा त्यास इतर माणसाप्रमाणे काय कोठे आहे. याची खात्री होऊन भ्रांती गेली.

कोणास वाटेल कीं, डोळे दोन आहेत. म्हणून प्रत्येक पदार्थाची प्रतिमा निरनिराळी डोळ्यांत उत्पन्न होते. याजकरिता एक पदार्थाचे दोन पदार्थ दिसावे. परंतू दिसत नाहीत. याचे कारण असे आहे. कीं, एक वेळा व एक सारखे पदार्थ दृष्टीस पडतात. आणि त्याच्या जरी दोन प्रतिमा दोहोकडे उठतात. तरी त्याची अशी ऐक्यता होते. कीं, ज्ञानेंद्रिय जे मन त्यास एकच पदार्थ दिसतो. परंतू कोणास डोळ्यास उपद्रव होऊन एकच डोळ्यात प्रतिमा उत्पन्न एकवेळ व्हावयाची बंद होते. त्यास एकाचे दोन दिसतात.

अरशांत पाहिलें असता. उलटी प्रतिमा दिसत नाही. याचे कारण असे आहे. कीं, जसा पूर्वी भोकाचा दृष्टांत सांगितला. त्यातून उजवे कडील डाव्या अंगास उलटी सुलटी कीर्णे जातात. तशी अरशांत जात नाही. परंतु आपल्यावर्ची कीर्णे अरशावर पडतात. व तेथून उलटतात. तीं उजूच डोळयापुढे येतात. यास्तव जसे अरशाचे पाठीमागें आपण उभे राहून पलिकडच्या अंगास दुसऱ्यास उजू प्रतिबिंब दिसेल. तसेच उजू आपले आपल्यास दिसते. जसे.

च अरसा आहे. यांत क ख हा माणूस पाहत आहे. त्याची कीर्णे च या ठिकाणी क पासून आली ती ख जवळ



उलटून पडली. म्हणजे घ पासून आल्याप्रमाणे व ख पासून कीर्णेच जवळ जाऊन उलटून क पाशी आली. ती ग पासून आल्या प्रमाणे तेव्हा घ व ग हें ठिकाण अरशा पाठीमागें आहे. तेथील पदार्थ जसा क ख या मागसास उजू दिसेल तद्वत त्यास आपलाली प्रतिमा उजू दिसते.

जर कोणी अरशाचे उजवे किंवा डावे बाजूस फार अंतरावर उभा राहिला, तर त्यास आपली प्रतिमा दिसत नाही. कारण कीं या पासुन जो कीर्णे अरशावर पडली. ती सारख्या कोनाने पुर्वी सांगितल्या प्रमाणे उलटली. आणि तीं याच्या डोळ्याच्या पलीकडे पडली म्हणून दिसत नाही. कीर्ण पतनाचा व प्रतिबिंबाचा कोन नेहेमी सारखे अंशाचा असतो. हा एक नियम आहे.

नेत्रज्ञानांत अरशाच्या तीन जाती गुणावरून केलेल्या आहेत. एक सपाट–दुसरा बाकदार–तिसरा पोटदार.

(१) सपाट अरसा प्रतिमा अरशाचे पाठीमागे असल्याप्रमाणे उत्पन्न करितो. व कीर्णे उलटून येतात. त्याची दिशा बदली नाही. व जी पाठीमागे प्रतिमा करण्याची ती पुढे असते. म्हणून दरयेक बिंदूपासून कीर्ण पडतें. त्या कीर्णाचा समूदाय होऊन सर्व बिंदूचा एक समूच्चय होऊन प्रतिमेसारखी दृष्टोस पडते.

(२) बाकदार अरसा याजवर जी कीर्णे पडतात. ती उडवितो. असा त्याचा गूण आहे. आणि तेणेकरून प्रतिमा लहान करितो.

(३) पोटदार अरसा कीर्णे एक ठिकाणी जमा करितो. आणि कधी कधी योजनानुसार प्रतिमा मोठी उत्पन्न करितो.




घ ग च ही तीन कीर्णे समांतर रेघा अरशावर पडल्या आहेत. त्या पैकी ग हा मध्य बिंदूशी लंब रेषेत आहे. परंतु घ व च या लंब नाहीत. कारण कीं, जी रेषा मध्य बिंदू समोर नाही. ती लंब असण्यास टिंबाच्या खुणा केल्या आहेत. तशी कीर्णे पडली पाहिजेत. जर अरसा सपाट असला. तर हीच कीर्णे त्याजवर उजू लंब पडतील. लंब म्हणजे जी रेषा वाढिवल्याने मध्य बिंदूत स्पर्श करिते. ती-मधलें कीर्ण ग हे त्याच रेषेत उलटलें व बाजूची कीर्णे मात्र छ व ज कडे उलटतील. तेव्हा छ पासून कीर्णे अरशात शिरली. असती तर य जवळ जाती तेव्हा य जवळ पदार्थ ठेविल्याने जसा दृष्टीस पडतो. तद्वत बाहेर दृष्टीस पडेल. य हा बिंदू कीर्णाचे जमण्याचे ठिकाण आहे. व ते मध्यही नाही आणि वर्तुळचा. रेषाही नाही. दोहो मध्ये आहे. सबब प्रतिमा लहान दिसते.

पोटदार आरसा असा आहे




क ख आणि ग ही कीर्णे त्याजवर पडली आहेत. त्या पैकी मधले कीर्ण परत त्याच रेषेत येते. परंतू क ग उलटून येतात. तोच जवळ मिळतात. याजकरिताच हा कीर्णाचा डोळा आहे. अशी कितीही कीर्णे जरी असल्या अरशावर पडलीं तरी ती सर्व कीर्णाच्या डोळ्याशी मिळतात. मागें बाकदार अरशाचे वर्णनात कीर्ण जमण्याचे ठिकाण लिहिले. आहे. ते अनुमानाचे आहे. तेथे ते दाखविले. मात्र परंतू त्याची कीर्णे बाहेर जातात. एकत्र मिळत नाही. तसे पोटदार अरशाचे नाही. यामध्ये सर्व कीर्णे एकत्र ठिकाणी मिळतात. याजकरिता हा कीर्णाचा डोळा खरा आहे.

## वाकडी किंवा उतरती किर्णे

जर पोटदार भिंगावर वाकडी कीर्णे पडली तर डोळा जवळ पडतो. म्हणजे समांतर रेषानी कीर्णे पडली असताना जितका दूर डोळा असतो. त्याहून जवळ पडतो जसे




जर चढती कीर्णे पडली. तर डोळा दूर पडतो जसे.




जर कथलाचे भिंग पोटदार चकचकीत केलें. आणि सूर्याकडे उन्हात धरलें. तर त्याजवर कीर्णे पडून एके ठिकाणी डोळा पडेल. त्यांत कागद ठेवला. तर तात्काळ पेटेल. कारण कीं, कीर्णे एकेजागी जमा केली. म्हणजे उष्ण उत्पन्न होते. यास्तव क पोटदार भिंगास आग लावणारी भिंगे किंवा सूर्यकांती अरसा म्हणतात. आणि बाकदारास सोमकांत म्हणतात.

जा ठिकाणी कीर्णाचा डोळा पडतो. त्या ठिकाणी दिवा ठेवला तर त्याची कीर्णे जी समांतर पडतात. ती समांतरच उलटतात. व वाकडी पडतात तीहीं समांतर उलटतात. जसं




ग हा कीर्णाचा डोळा आहे. त्याची कीर्णे न जवळ जाऊन न प या रेषेत परत येतात. परंतु गच हें कीर्ण क च या रेषेत समांतर उलटते. हें पूर्वीच्या रितीचें उलटें आहे. पूर्वी समांतर कीर्णे पडली. तर वाकडी उलटून एकेठिकाणी जमतात. म्हणून लिहिलें. त्याचें विपरीत यात आहे. म्हणजे यात कीर्णाच्या डोळ्यापासून कीर्णे पडली. तीं समांतर रेषानी परत चालतात. आणि समांतर रेषानी कीर्णे पडतात. ती उलटून वाकडी चालतात. आणि डोळा पडतो. हा एक मोठा या विद्येत नियम आहे.

### प्रकर्ण २

पारदर्शक जे पदार्थ आहेत. त्यातून कीर्णें प्रवेश करून पलीकडे जातात. त्या जाण्याने त्याची स्थिती बदलते. याचे नाव छेद अशी संज्ञा आहे. जे पदार्थ अपारदर्शक आहेत. म्हणजे मळीण आहेत. त्याजवर उजेड पडला. तर उलटून परत येतो. आणि जे पदार्थ पारदर्शक आहेत. त्याजवर पडला. म्हणजे पलीकडे जातो. परंतु जेव्हा एक पदार्थ पातळ असतो. त्यातून उजेड पार जाऊन दाट पदार्थात शिरतो. त्या काळी त्या कीर्णाची रेषा वाकडी होते. याचे कारण पक्के समजत नाही. परंतु उजड म्हणजे परिमाणूमय आहे. त्यास दाट पदार्थ अकर्षण करितो. असे अनुमान आहे.

आता दोन पारदर्शक पदार्थ प्रथम हवा आणि पाणी घ्या. जेव्हा कीर्ण हवेतून पाण्यात शिरतें. तेव्हा पाणी त्याचे अकर्षण करिते. परंतु जर कीर्ण लंब रेषेत पडलें. तर पाण्याचे अकर्षण ही त्याच दिशेत असतें. म्हणून वाकडे न होतां लंब रेषेतच चालेल. जसे.




परंतु तिर्कस गघ असें पडेल. तर वरचा नकाशात निंमे हवा आहे. व निंमें खाली पाणी आहे. आणि ग पासून कीर्ण आलें. तें पाण्यातून नीट घ जवळ जावे. तें न जातां पाण्यातून जाताना वाकडे होतें. आणि न पाशी येते. पाण्याच्या जोराने क कीर्ण

ओढले जाते. परंतु लंब रेषेत येत नाही. कारण कीं, कीर्ण पडतें तेव्हा त्याचा आपल्या रस्त्याने घ कडे जाण्याचा वेग असतो. परंतु त्याची दोहोंकडे ओढाताणी होऊन मधले मार्गानें न जवळ जाते. यास्तव तें वक्रगती होतें.

दुसरा चमत्कार असा आहे. कीं, एका वाटीत रुपया टकावा. आणि वाटी इतकी दूर ठेवावी. कीं, डोळ्याच्या व रुपयाच्या मध्ये वाटीचा काठ यावा. नंतर रुपया रुपया दिसत नसता ती वाटी पाण्याने भरावी. म्हणजे रुपया दिसू लागतो. जसे




याचे कारण असे आहे. की पहिल्याने रुपयापासून जीं कीर्णे निघतात. ती डोळा चुकऊन पलीकडून जात असतात. याजमुळे रुपयावर दृष्ट पोहोचत नाही. परंतु पाणी भरलें. म्हणजे रुपयाची कीर्णे वक्री होतात. आणि पूर्वी जा मार्गाने जात होती तो मार्ग सोडून वाकडी होतात. ती डोळ्यावर येऊन पडतात. म्हणून रुपया दिसू लागतो. पण ज्या ठिकाणी रुपया असतो तेथे दिसत नाही. त्यापेक्षा उंचावर दिसतो. याचे कारण असे आहे कीं, ज्या मार्गाने कीर्णे येतात त्या मार्गात तो पदार्थ दिसतो. यास्तव कीर्णे पाण्यानें वाकडी होतात. तेथे क जवळ रुपया दिसेल.

या प्रमाणे नावेची वल्हीं पाण्यांत असताना वाकडी आहेत. अशी भासतात. याचे कारण तरी हेच आहे. कीं, कीर्णे वक्री होतात. तसेच स्वच्छ पाण्याचा तळ पाहिला. म्हणजे तो जितका खोल असतो. तितका दिसत नाही. उथळ दिसतो. या प्रमाणे पाण्यांत जी मुलें अंघोळीस जातात. ती फसतात. असेही जहालेले आहे. सदरहू कारणाने अकाशातील नक्षत्रें ही आपल्यास बरोबर दिसत नाही. कारण कीं, त्याच्यापासून कीर्णे येतात. तीं वायुचक्रातून आपल्या डोळ्याजवळ येताना वक्री होतात. यास्तव ती जा वाटेने वाकडी होतात. त्या वाकड्या मार्गातच सूर्य चंद्रादिक दिसतात. परंतु जा काळीं समूर डोकीवर नक्षत्र असतें. तेव्हा मात्र त्याचे कीर्ण उजू पडेल. आणि जा ठिकाणी नक्षत्र आहे. तेथेच दृष्टीस पडेल. परंतु इतर ठिकाणी जेथे आपण तारे पहातो. तेथेच ते असतील. असे प्रमाण नाही. दुसरे एक कारण असें आहे कीं, त्याजवरून जरी डोकीवर तारा असला. तरी बरोबर दिसतो किंवा नाही. याचा देखील संशय आहे. तें असें कीं, सूर्यापासून कीर्ण पृथ्वीवर यावयास ८ मिनिट लागतात. तेव्हा आठ मिनिटानीं सूर्य त्या कीर्णाचे ठिकाणी दिसतो. परंतु वास्तवीक पाहिलें. तर आठ मिनिटांत सूर्य कीर्ण त्या पासून निघाले. त्या जाग्या पासुन किती दूर गेला. असेल. तरि आपण त्या पूर्वीच्या जाग्यांतच पहातो. ही एक अडचण आहे. पदार्थ जसे दिसतात. तसे सांगणें सोपे आहे. परंतु जसे आहेत तसें सांगणें अवघड आहे.

कीर्णे वक्री होतात. त्यामुळें दिवसही लांब होतो. कारण सूर्य जरी मावळला. आणि धारेखाली गेला. तरी त्याची कीर्णे वाकडी होऊन पृथ्वीवर सूर्य दिसेल. जसा वाटीतला रुपया उंच जहालेला दिसतो. तसा सूर्य ही मावळला असता वर दिसेल. तसेच सूर्योदयाचा समयीं सूर्य धारेखाली आहे. तोच वर आलेला दिसतो. कारण की हवेंत त्याची कीर्णे वाकडी होतात. आणि पृथ्वीवरचे माणसाचे नजरेस सूर्य पडतो. हवा आणि कीर्णे याची विलक्षण योजना समयोचित जहाली. तर दोन सूर्य तीन सूर्य किंवा पूर्वेस आणि पश्चमेस सूर्य एकदाच किंवा रंग फिरलेलें दृष्टीस पडतील. परंतु ही सर्व दृष्टीची भ्रांती आहे. वास्तवीक नव्हे.

एक डोंगरावर सूर्योदयी जो माणूस जाईल. त्यास कीर्णाची विलक्षण योजना होऊन त्या माणसाची प्रतिमा समूर उत्पन्न होईल. तेव्हा जास त्यास असा अनुभव येऊन लोकामध्ये त्याणी गप उठविली. कीं त्या डोंगरावर एक मोठा पिशाच्च आहे. असें काही दिवस चालले. तेव्हा कोणे येके काळी एक साहेबास नेत्रज्ञान विद्या येत हाती तो आला तेव्हा लोकानी सांगितलें की

येथे सकाळी राक्षस दिसतो. त्याणे पुसले कीं, दिवस वरती अल्यावर दिसतो? तर नाही म्हणून सांगितलें. तेव्हा त्याणे अनुमान करून नेत्राचा व कीर्णाचा विलक्षण योग होऊन भ्रांती होते. असे ठरविले. आणि तेथे किती येक माणसें सहित गेला. तो सुर्योदयाचे समयी प्रतिमा दिसू लागल्या. तेव्हा त्याणे आपला हात वरतो केला. तो त्या प्रतिमेने ही केला. असे कीतीयेक त्याणे परिचय घेऊन सर्वास ही गप लबाड अशी खातरी केली. आणि आसपासची झाडें तोडून उच्च नीच जागा केली. नंतर ती प्रतिमा दिसेनाशी जहाली. अशा अनेक नेत्र भ्रांती रोगाने अथवा अनेक कारणाने होतात. परंतू त्याचा खरेखोट्याचा विचार करावा व त्या दूर व्हाव्या हाच हेतू या विद्येचा आहे. अस्तु

कीर्णे तावदानी भिंगातून जातात. तेव्हा ती दुहेरी वक्री होतात. प्रथम भिंगात शिरतात, तेव्हा वाकडी होतात. त्यातुन पुन्हा बाहेर पडतात. तो पूर्वी नियम सांगितला आहे. कीं, दरम्यानचे पदार्थ घट किंवा पातळ असले ह्मणजे कीर्णे वाकडी होतात.




त्या प्रमाणे भिंगातून हवेत येतात. तेव्हा पुन्हा वाकडी होतात. पण हे दोन बाक उलटे बसतात. असे कीं,

पहिल्यानी भिंगात कीर्ण वाकले पुन्हा हवेत उंच जहाले. सरासरी क ख पुनरपी एकाच रेषेत सारखा दोन्ही अक्षराकडे कीर्णे जहालीं.

पूर्वी भिंगाच्या तीन जाती सांगितल्या. त्या जातीची भिंगे अशी करतात. जसे—




(१) पहिला सपाट बाकदार एका बाजूस सपाट दूसरे बाजूस बाक आहे.

(२) सपाट पोटदार

(३) तिसरा दुबाजू बाकदार

(४) चौथा दुबाजू पोटदार

(५) पाचवा चंद्राकार ह्मणजे एका अंगास पोटदार व दुसरे अंगास बाकदार आहेत. यांचा गूण असा आहे कीं, तें कीर्ण जमा करून कीर्णांचा डोळा पाडतात. जे पोटदार आहेत ते कीर्णे फाकिवतात.

त्रिकोण भिंगातून कीर्ण जाताना त्याची विलक्षण गती होते. पूर्वी तावदानी भिंगातून कीर्ण प्रवेश होताना बाक येऊन पुन्हा साफ होते. ह्मणून सांगितले. तसें त्रिकोणाचे नाही. कारण कीं, त्रिकोणाच्या दोन बाजूस समांतर रेषा नाहीत. याजकरिता त्रिकोणांत कीर्ण शिरलें म्हणजे पहिल्याने एक बाक बसतो. पुन्हा बाहेर पडताना आणखी बाक दुसरा पहिल्या बाकावरच बसतो. जसे




क ग हें कीर्ण ग घ येथे त्रिकोन भिंगांत वाकडें जहाले. नंतर बाहेर निघालें तें घ ख पर्यंत हवेत वाकडे जहाले.

जर खिडकी लावली आणि एका भोकातून कीर्ण पडू देऊन एका त्रिकोन भिंगावर पडेल. तर तो कीर्णें फाकून एक प्रतिमा उत्पन्न होईल. जसें




सदरहू प्रतिमा उत्पन्न क या कीर्णापासून ख या भिंतीवर सात रंगाची प्रतिमा उत्पन्न जहाली. ते

रंग, जें पावसाचे धनुष्य पडतें त्यामध्ये जे असतात. ते रंग यामध्ये अनुक्रमाने असतात. काचेतून कीर्ण गेलें असता इतके रंग कसे होतात. हा चमत्कार आहे. परंतू हे रंग भिंगामुळे येत नाही. तर सूर्याचे किर्णांमध्ये हे सातरंग मूळचे आहेत. परंतू ते मिश्र जहाल्याने श्वेत वर्ण उत्पन्न होतो. तीच कीर्णे भिंगाच्या योगाने विभागित होऊन एक एक रंगाची कीर्णे एक एक अंगास होऊन वरती लिहिल्या प्रमाणे रंग एकाखाली एक उत्पन्न होतात.

श्वेत वर्ण हा वर्ण नव्हे. परंतू सात रंग एकत्र केले ह्मणजे त्याचा रंग जाऊन पांढरा वर्ण दिसू लागतो. हा शोध प्रथम न्युटण साहेब याणे केला. आणि सूर्याचे पांढरे कीर्णांचा छेद केला तो रांगेने खाली लिहिलेले रंग निघाले.

(१) लाल (२) निंबोळी (३) पिवळा (४) हिरवा (५) निळा (६) पारवा (७) शाम

श्वेत

हे रंग रांगेनेच उत्पन्न होतात. याचे कारण असे आहे. कीं, त्या कीर्णांत प्रत्येक रंगाचा जो अंश असतो. त्या रंगा प्रमाणे लौकर किंवा उशीराने वाकतो असा गूण असेल. ह्मणून शामकीर्णे एका अंगास पडतें याचे पाठीमागून पारवी असा त्याचा अनुक्रम लागतो. या अनुक्रमाने हे सात रंग मांडले ह्मणजे पांढरे दिसू लागतात. यास प्रमाण एका कागदावर या रंगाचे असे पटे ओढून तो कागद जलदीने भिंगरीवर फिरवावा. ह्मणजे तेच रंग पांढरे दिसू लागतात आणखी दुसरें प्रमाण असे आहे. कीं, सदरहू सात रंगाची प्रतिमा उत्पन्न होते. म्हणून वरती लिहिले आहे. तीच प्रतिमा एका पूर्वी सांगितलेल्या भिंगा पैकी दुबाजू बाकदार भिंग अडवें करून त्यातून ती प्रतिमेची कीर्णे जाउ द्यावी. ह्मणजे ती कीर्णे त्या भिंगाचे गुणाप्रमाणे पुन्हा सर्व एकत्र होतात. आणि पुन्हा तेच रंग पांढरे होतात. जसे




प्रथम त्रिकोण भिंगाने कीर्णांचा विभाग सात प्रकारचे रंगाचा केला. पुन्हा ते सर्व भाग ख या भिंगावर पडेल. ते त्यातून सर्व जाऊन ग या ठिकाणी एकत्र होऊन पडेल. ते पुन्हा जसे कीर्ण त्रिकोणात जाण्याचे पूर्वी होतें. तसे जहाले. कीर्णांचे तुकडे जहाले. पुन्हा जोड जहाला.

त्रिकोण भिंगातून कीर्णे गेली. ह्मणजे त्याचे विभाग होतात. तद्वत आणखी दुसरे पदार्थातून जाताना वक्री होतील. तर रंग उठतील. कारण कीं एकऐक रंगास बाक कमी ज्यास्त बसतो. त्या प्रमाणे तिकडे जाऊन ते रंग पोंचतात. या प्रमाणेच सूर्याची कीर्णे पाऊस पडत असताना विभागित होतात. पाऊसातून प्रवेश करताना दरएक पाण्याचा थेंब हा त्रिकोन भिंगच आहे. त्यातून ती जाऊन सात प्रकाराने विभागतात. आणि धनुष्य उत्पन्न होते.

पदार्थापासून उजड उलटून येईल. तो आपल्या डोळ्यास लागेल. त्या कीर्णांचा जो रंग असेल तोच रंग त्या पदार्थाचा दिसेल. आणि एक एक पदार्थाचा गूण असा आहे. कीं एक एक रंगाची कीर्णे ते ओढून घेतात. ह्मणजे तोच रंग त्या पदार्थास येतो. गवत हिरवें दिसतें याचे कारण सूर्य कीर्णातील हिरवा रंगाचा कीर्ण मात्र ते प्राशन करित नाही. बाकीचे सर्व रंगाची कीर्णे तें प्राशन करितें. हिर्वी कीर्णे मात्र त्याचे अंगावर रहातात. ती उलटून पाहाणाऱ्याचे दृष्टीस पडतात. सबब गवताचा हिरवा रंग दिसतो. याचप्रमाणे फुलें व आकाश यामध्ये प्रत्येकाचा गूण प्रत्येक रंगाची कीर्णे उलटून फिरवण्याचा आहे. त्या त्या रंगाची तीं दिसतात. गुलाबाचें फूल तांबडी कीर्णे खेरीज करून सर्व मिळून जातें. व तांबडी कीर्णे मात्र उलटतात. ती पहाणाऱ्याचे

डोळ्यास लागतात. ह्मणून गुलाबाचा रंग तांबडा दिसतो. या प्रमाणे सर्व फुलाची रीत आहे. परंतु कोणी असें समजू नये कीं, रंग दिसतात हेच रंग त्या पदार्थाचे आहेत. कारण कीं, त्या रंगाचे ते पदार्थ आपल्यास दिसतात. त्यावेळेस जरूर आहे. कीं, त्या पदार्थावर उजड पाहिजे. आणि सूर्याचा किंवा दुसरे कोणी कडूनही उत्पन्न जहालेला. उजड याचे गुण सारखेच आहेत. तो उजड पडून पदार्थाचे रंग व्यक्त होतात. अंधेर असला ह्मणजे कोणास रंग दिसत नाही. सर्व पदार्थाचा रंग अंधेरात काळा असतो. ह्मणजे बेरंग असतात. उजडाशिवाय रंग नाही. उजडात रंग आहेत. तेव्हा अंधेरात जरी बेरंग पदार्थ असला. तरी तो उजडांत व्यक्त होतो. कोणच्या तरी रंगाचा दिसू लागतो. आता काही पदार्थ पांढरे दिसतात. याचे कारण असे आहे. कीं, ते पदार्थ सूर्य कीर्णातील कोणचाही रंग खात नाही. परंतु सर्व रंगाची कीर्णे परत उलटवितात. ती डोळ्यास लागतात. म्हणून पांढरे असे दिसतात. व जे पदार्थ काळे दिसतात. याचे कारण असे आहे. कीं, ते पदार्थ सर्व कीर्ण खातात. म्हणून त्या पदार्थापासून कोणचेच कीर्ण डोळ्याकडे येत नाही. सबब ते पदार्थ अंधेरात असल्याप्रमाणे काळा दिसतो. याचप्रमाणे त्याचा जसा जसा गूण असतो. तद्वत फार पांढरा किंवा कमी पांढरा पदार्थ आणि फार काळा किंवा कमी काळा दिसतो. गुलाबाचे फूल फिकें दिसू लागतें. याचे कारण ते पांढरें रंगाकडे जातें. म्हणजे सूर्याचा उजड ते न खाता परत पहिल्यापेक्षा फार फिरवण्यास लागतें म्हणजे श्वेतवर्ण दिसू लागतो. फीक्या पदार्थाची रीत अशीच आहे. व हिरवी पानें काळसर रंगाची असतात. याचे कारण हेच आहे. परंतू निळा रंग दिव्याचे उजडापाशी नेला किंवा पिवळा नेला म्हणजे याचा रंग बदलतो. आणि निळा पांढरा दिसू लागतो. याचे कारण मेणबत्तीचा उजड सूर्याचे उजडा सारखा स्वच्छ नाही. जर त्रिकोण भिंगातून त्या उजडाची वाटणी केली. तर पिवळा रंग फार दिसतो. आणि निळा पदार्थ याजवर पिवळा फार पडला म्हणजे हिरवा होतो. कारण की, नीळ आणि पीत हे एकत्र जहाले. म्हणजे हिरवें होतें यास्तव दिव्याचे उजडांत नीळें हिरवें दिसतें.

सूर्य तांबडा दिसतो याचे कारण असे आहे. कीं, तांबडी रंगाची कीर्णे सूर्याची जलद हवेतून चालतात. हवेमध्ये धुके पडले ह्मणजे दुसरे रंगाची कीर्णे लौकर चालत नाही. तांबडे रंगाची कीर्णे त्वरीत खाली येतात. सबब सूर्य तांबडा दिसतो. वास्तवीक तो सूर्याचा रंग नाही. परंतू तो आपले नेत्राचा विकार आहे. तसे सूर्य उदय व अस्तमान काळीं सूर्य तांबडा दिसतो. याचे कारण तेच आहे. हवा त्यावेळेस जड होते. आणि रक्तवर्ण कर्णे येतात. त्यापासून तोच वर्ण दिसतो. आकाश निळया रंगाचे दिसते. याचे कारण असे आहे कीं, हवा निळया रंगाची कीर्णे फिरवते. हे एक असेल. किंवा दुसरे असे आहे कीं, सूर्यापासून जितक्या रंगाची कीर्णे निघतात. तितक्या रंगाची डोळ्यास पोहोचत नाही. परंतू निळया रंगाची मात्र पोहोचतात. सूर्याकडे मात्र पाहिलें तर सर्व रंगाची कीर्णे डोळ्यास लागतात. तेव्हा आकाश ही पांढरें दिसतें. जर हवेत कोणच्याही कार्णे फिरली नाही तर, आकाश काळें अंधेराच्या रंगाचे दिसेल. परंतू ईश्वराने असें केलें नाही. हें चांगले आहे. नाहीतर खाली पांढरे पदार्थ व वरतां आकाश काळें हे पाहून डोळ्यास विकृती होत्या.

कितीएक पदार्थ आपलाले रंग सोडितात. जसे. हिरवीं पाने उन्हाळयात वाळतात. आणि पिकतात. पहिला रंग जाऊन दुसरा रंग येतो. तसेच इंग्रजी शाई कापडावर पडली ह्मणजे पिवळा रंग होतो. याचे कारण असे आहे. कीं, त्या पदार्थाचा इतर पदार्थाशी संयोग होऊन त्याचा पहिल्याप्रमाणे कीर्ण फिरवण्याचा गूण जातो. आणि दुसरे रंगाची कीर्णे फिरऊ लागतात. ह्मणून तसे रंग दिसतात.

## प्रकर्ण ३

मनुष्याच्या व इतर जनावराचा डोळा वर्तुळाकार आहे.

पहिला पापदरा **क** हा आहे. त्यास पुढले अगास बाक आहे. तें अंग डोळ्याचे उघडें दिसतें. बाकी सर्व आच्छादित आहे. हा पापदरा पारदर्शक भिंगासारखा आहे. व वाळला असता शिंगासारखा कठीण होतो.




सदरहू पापदऱ्याचे मागें अस्तर आहे. तें **स** व त्या अस्तरांत मध्ये **स** भोक आहे. तेच बुबूळ त्यातून कीर्णे डोळ्यात जातात. बुबूळा सभोवती रंगीत चौरी आहे. ती मागे पुढे वरचेवर होऊन बुबूळास वाटोळे नेहेमी राखते. ती **ग** डोळ्याची घडणी अशी चमत्कारीक केली आहे. कीं, त्यास जसा प्रसंग प्राप्त होईल. तसतसे त्याचे चलन वळण होऊन रक्षण होते. उजड कमी असला ह्मणजे डोळ्याचे बुबूळ मोठें होतें. आणि कीर्णे डोळ्यात पुष्कळ येऊ देते. आणि फार उजड असला ह्मणजे तें लहान होतें. आणि थोडी कीर्णे आंत येऊ देतें. कारण कीं, जर फार कीर्णे आत येतील. तर डोळ्यास इजा होईल. जेव्हा मनुष्य अंधेरात असतें. आणि एकदाच उजडांत येतें. तेव्हा डोळे दुखतात. याचे कारण असे कीं. बुबूळ पसरलेलें असतें. आणि ते लहान जहाले नाहा तोच कीर्णे आंत शिरतात. आणि उजडातून अंधेरांत कोणी जाईल तर अगदी काळोख प्रथम दिसतो. याचे कारण फार उजडांत डोळ्याचे बुबूळ लहान जहालेलें असतें. त्यांत अंधेरात पहाण्यास जितकी कीर्णे आंत गेली पाहिजेत. तितकी जात नाहीत. परंतु क्षणभर गेला ह्मणजे ते बुबूळ पसरतें. व त्यांत कीर्णे जाऊन नजर साफ होते.

पूर्वी डोळ्याचे अस्तर लिहिले आहे. त्याचे आंत काळा रस भरलेला असतो. तो वाकडी कीर्णे जी येतात. तीं खातो. आणि त्याचे साधन प्रतिमा साफ उठण्याविशी आहे. डोळ्याचे बुबूळ जेव्हां लहान असतें. तेव्हा जी कीर्णे त्यात येतात. त्याचे दसपट पसरलेले असल्यावर येतात. मांजर व दुसरी जनावरें रात्री पहातात. याचे डोळ्याचे पसरणे व लहान होणें दसपटीहून अधीक आहे. कदांचीत शंभर पट असेल व इतके पसरण्यास बुबूळास सामर्थ्य आहे.

सदरहू अस्तराचे आंत तीन रस आहेत. पहिला पाण्यासारखा **घ** दुसरा **च** हा फर चकचकीत आहे. व दुबाजू बाकदार भिंगासारखे आहे. व त्यातून कीर्णे फाकतात. तशी कुतीच्या आरशांत साफ फाकत नाहीत. इतकी त्या डोळ्याच्या भिंगाची सफई आहे. त्याचे मागें **छ** हा रस काचेचे रसासारखा भरलेला आहे. व त्याचे पाठीमागें **न** हा पडदा शुभ्र आहे. तो दृष्टीचे कारण आहे. त्याजवर प्रतिमा उठते. आणि त्या पडद्याचे मूळ मस्तकांत बुद्धीचे स्थानी आहे. तेथून शीर उत्पन्न जहाली आहे. ती डोळ्यांत येऊन पडद्यासारखी पसरली आहे. तिजवर डोळ्यांत कीर्णे येऊन ती त्या भिंगासारखे रस आहेत. त्यातून वक्र गती होत्साता त्या पडद्यावर जमून प्रतिमा उत्पन्न करितात. तो जहाली ह्मणजे तात्काळ ज्ञान होते.

तिर्वे डोळे ज्याचे असतात. त्याचे डोळ्यास इतकेच असतें कीं, मधला रस फार बाकदार असतो. त्याजमुळें बाहेरची कीर्णे लौकर फाकवितो. आणि प्रतिमेच्या पडद्यावर पोहोचण्याचे पूर्वी ती जमतात. आणि मध्येच प्रतिमा उत्पन्न होते. त्याजमुळे भ्रांतिवट पदार्थ दिसतो. परंतु डोळ्याजवळ आणून पाहिले. ह्मणजे ती कीर्णे पडद्यावर पोहोचून साफ पदार्थ दिसतो. किंवा पोटदार आरशी लावावी ह्मणजे ही साफ दिसते. कारण कीं, डोळ्यातील बाकदार रस बाहेर पोटदार आरशी त्याच्या विपरीत गुणाची लावली ह्मणजे साफ जहाल्या प्रमाणेच आहे.

डोळ्यातील रस ज्याचा बाकदार नसून सपाट असतो. त्यास आरशी बाकदार पाहिजे. वृद्ध माणसें याच्या डोळ्यातील रस झिजतात. ह्मणून ते बाकदार आरशा लावितात. किंवा पदार्थ डोळ्यापासून दूर धरून पहातात. दोहींचे फळ एकच आहे.

लहान पणांत डोळे साफ असतात. याचे कारण असें आहे कीं, डोळ्यातील रस हे बाकदार करून दुरचे पदार्थ पहाणे अशी शक्ती त्या रसा मध्ये आहे. तीं शक्ती वृद्धापकाळी कमी होते.

याप्रमाणे नेत्रज्ञानाचा चमत्कार आहे. मनुष्यास डोळे आहेत. म्हणून बहूत सुख आहे. व डोळे हे बुद्धी रथाची चक्रें आहेत. सर्व इंद्रियांत विस्तीर्ण ज्ञान कर्णारी दृष्टी आहे. स्पर्शेन्द्रियांचे परिमीत असें कीं, हात लागेल त्याचेच ज्ञान होईल. परंतु दृष्टीचे तसे नाही. हें फार दूरवर जातें. आणि जशी काय स्पर्श करूनच येतें. सर्व जग हें डोळ्यामुळें आनंद कारक दिसतें. यास्तव श्री हरीने हे सुखाचे नेत्र चमत्कारीक घडून आपल्यास दिल्हे आहेत. त्याचा आपण नित्य उपयोग करितो. हें न विसरता हरदम भगवंताचे कृपेचे स्मरण करीत जावें. आणि त्यास आठवावा. सर्व विद्येचे प्रमेय हेच आहे. कीं, शोध करून ईश्वराचे गूण आणि पराक्रम व द्वीतीय कारागिरी हें दृष्टोत्पत्तीत आणून जागावे. आणि त्याचा अंत करणार कोणी नाही. कारण कीं, ईश्वराचे गूण, समुद्र हा मनुष्याची बुद्धी त्यांत येवढी कसे रहातील. तत्रापी मावतील. तितके घेउँन ग्रहण करावे. ही एक ईश्वराची भक्ती विद्वान लोकासच मात्र घडतें. यास्तव सर्वही विद्वान होत्साता आपली आपली मनें ईश्वराचे गुणानु शोधनाने भरावी हें मनुष्य जन्माचे सार्थक आहे.

---

## ऊष्णज्ञान

उष्णाचा उपयोग पृथ्वीवर अतीशय आहे. त्याजमुळें वायूचे चलन पाण्याचा पातळ पणा वनस्पतीची उत्पत्ती आणि जिवाचें रक्षण आहे. जर ऊष्ण नाहीसें होईल. तर तत्क्षणी या सर्व गोष्टी उलट्या होतील. यास्तव परमेश्वरानें हे ऊष्ण हा परम चमत्कारीक पदार्थ निर्माण केला आहे.

ऊष्ण हें काही डोळ्यानी दिसत नाही. परंतू त्याचे अस्तीत्वाचे ज्ञान होण्याचे दोन रस्ते आहेत. एक शरीराला ऊष्ण लागतें. तेव्हा समजतें. व दुसरे ऊष्णापासून चमत्कार होतात. ते दिसतात. परंतू हें ऊष्ण काय आहे ? असा जर कोणी प्रश्न केला. तर, त्यांचे उत्तर पक्कें कोंणास देता येणार नाही. ऊष्णाचा परिचय नित्य सर्वांस आहे. परंतू त्याचे कारण समजत नाही. आज पर्यंत इतकी युगें गेलीं. परंतू ये विषयी अद्याप ठिकाण नाही. जितका पहिल्या युगांतला मनुष्य ज्ञानी होता. तितकाच याविषयी आताचा मनुष्य ज्ञानी आहे. अस्तू. तत्रापी शाहण्यानी काही कारण जाणायाच्या युक्ती बसविल्या आहेत. ऊष्णाचे सिद्धांत करणाऱ्याचे दोन पक्ष आहेत. एक पक्षाचे म्हणतात. कीं, ऊष्ण हा अतीशय चपल आणि पातळ पदार्थ आहे. तो सर्व पदार्थास चपापून आहे. आणि कधी कधी तो बाहेर जातो. कधी कधी आंत येतो. अशी त्याची शक्ती आहे.

दुसरें पक्षकार असे म्हणतात. कीं, ऊष्ण ही काही एक वस्तू नाही. परंतू पदार्थाचे अणू रेणूचे चलन किंवा घर्षण जहाले म्हणजे ऊष्ण हे उत्पन्न होतें परंतू ऊष्ण म्हणून काही वेगळा नाही.

एका विद्वानानें ऊष्ण दर्शक यंत्र एका शिशीतील वारा सर्व कांढून निवांत केलें. आणि त्यांत ठेविलें. परंतू तेथेही पारा खाली वर गेला. आणि दुसरे एकानें असें सिद्ध केलें कीं, तापलेले पदार्थ जड होतात. याचे कारण ऊष्ण हा पदार्थ त्याजमध्ये शिरतो. आणि तीसऱ्याने असे सिद्ध केलें. कीं, ऊष्णाने पदार्थ मोठा होतो. आणि पदार्थ ऊष्ण करू लागलें. म्हणजे काही पदार्थ लौकर ऊष्ण होतात. व काही उशीराने होतात. व बर्फाचे पाणी होतें. आणि पाण्याची वाफ होतें. या सर्व गोष्टी वरून कदाचित् पहिला पक्ष सिद्ध होतो. कीं ऊष्ण हा चंचळ पदार्थ आहे.

ऊष्ण प्रघटीत होण्याची कारणे इतकी आहेत.

(१) आवळणे (२) घासणे (३) हपटणें (४) संयोग (५) उजेड (६) जळणें (७) सूर्य.

जनावराची शरीरें याचा तपशील खाली लिहिला आहे.

(१) सोनार लोहार वगैरे धातूस टाकितात. तेव्हा धातूचे अणू रेणू आवळतात. आणि ऊष्ण बाहेर टाकितात. दुसरें एक पिचनळी सारखी काचेची नळी करितात. परंतु त्यास दुसरे आंगास भोक नसतें. आणि त्यांत दस्त्या दाबला म्हणजे हवा अवळून जातें आणि कापूस ठेवला तर, पेटतो. विलायती सनकाड्या घासल्या म्हणजे पेटतात.

(२) रानांत वणवे लागतात. याचे कारण असें आहे कीं. झाडाचा फांदिवर फांदी येते. आणि ती वाऱ्याने घासते म्हणजे घर्षणाने अग्नी उत्पन्न होतो. अग्नीहोत्री लाकडे घासून अग्नी काढितात. व बेटातून जंगली लोक आहेत. त्यांची युक्त अशीच असते. थंडीचे दिवसांत-हात चोळलें म्हणजे ऊष्ण होतें. आणि व्हेल या नावाचे-मासे मोठे मोठे समुद्रांत आहेत. ते धरितात. तेव्हा धरणाऱ्या जवळ लाकूड असतें. त्या लाकडांस तो मासा धरून ओढतो. तेव्हा नावेस आग लागते. याजवरून घर्षणाने ऊष्ण होतें. हे सिध्य आहे.

(३) चकमक व चापाची बंदूक व घोडे चालताना नाल हपटून विस्तव पडतो. ही उदाहरणें आहेत.

(४) गंधकाचे पाणी म्हणून रसायण शास्त्रांत लिहिलें आहे. ते पाण्यात ओंतलें तर पाणी कढत होतें. चुन्याच्या कळ्यावर पाणी टाकलें तर ऊन्ह होतें. आणि गंधकाचे पाणी व सोऱ्याचे पाणी हें एकत्र करावे. आणि त्यांत तेल ओतावे. म्हणजे एकदम आग लागते.

(५) सूर्य हा एक मोठा ऊष्ण देणारा आहे. व त्याचे कीर्ण ऊष्ण कारक आहे. सूर्य अत्यंत ऊष्ण पदार्थ तप्त धातू प्रमाणे आहे. असें वाटतें. परंतु त्याचा पक्का शोध सांगू सकत नाही. हिवाळ्यांत उष्ण कमी याजमुळें सर्व झाडें वगैरे मरतात. व रानें वाळतात. फुलें येत नाही. आणि तींच वसंतकाळ आला म्हणजे त्या ऊष्णाच्या योगाने पुन्हा जिवंत होतात.

भुगोलावरचे सर्व देश सारखे सूर्याकडे नाहीत. काहीस सूर्य समूर आहे व काहीस दूर आहे. व काहीस जवळ आहे. तदनुसार त्या त्या देशाची व्यवस्था आहे. ध्रुवाकडील देशांत सूर्य फार दूर यास्तव तीकडे नेहमी थंडी पीक नाही. माणसें अशक्त असतात. याच प्रमाणे जे पृथ्वीवर प्रदेश उंचस्थानी असतात. व नीच स्थानी असतात. तसतशी त्या ठिकाणी हवा असते. आकाशांत ऊष्ण सारखे नाही. परंतू अनुक्रमे करून आहे. जितके पृथ्वीवर आहे. तितके वरती नाही. याजमुळे डोंगरावर बर्फ असतात. आन्डीस पर्वतावर किटो गाव आहे. तो भूमध्य रेषे खाली आहे. तेथे अत्यंत ऊष्ण असावे. परंतू उंच आहे. सबब तेथे थंडी आहे. हिवाळा व उन्हाळा होतो. याचे कारण सूर्याचे चलन आहे. उत्तरायण दक्षणायन होते. त्याजमुळें सूर्य जवळ येतो. आणि दूर जातो. तसें तसें पृथ्वीवर ऊष्ण कमी होतें भुगोलावर कटिबंध आहेत. ते पाहवे म्हणजे समजेल.

सूर्याचे उष्णाने मनुष्याचा रंग फिरतो. अफ्रिकेत ऊष्ण अत्यंत म्हणून इश्वराने तेथील लोकांची कातडी काळी केली आहेत. कारण कीं, कृष्ण वर्णामध्ये ऊष्ण लागत नाही. यास प्रमाण, ऊष्ण देशामध्ये जे जातात. त्याणी हात उघडे टाकले तर फोड येतात. व पाढरें कापड घातले तरी येतात. परंतू काळें कापड घातलें तर येत नाही. याजवरून कृष्ण वर्ण उन्हापासून रक्षण होण्यास चांगला तदनुसार ऊष्ण देशचे लोक काळे आहेत. व इंग्रज वगैरे थंड देशचे लोक पाढरे आहेत.

(६) जनावराच्या शरीरांत ऊष्ण आहे पक्षी व मासे याचे मध्ये मनुष्या पेक्षा ऊष्ण फार आहे. व मनुष्याचे अंगात ऊष्ण आहे. तो पर्यंत जीव असतो. ऊष्ण जाते. तेव्हा जीव ही जातो. मध्यम हवेतील माणसें व जनावरें कोठे ही जगतात. परंतु अतीशय थंडीत किंवा ऊष्णात राहणारी विपरीत स्थितीस जगत नाही. जसें अफ्रिकेतील शिपी यांस ग्रीनलंड बेटांत ध्रुवाकडे नेला तर मरेल. व ग्रीनलंडचा मनुष्य अफ्रिकेत आणला तर ही मरेल. तसेच इतर जनावराचे आहे. परंतु

इंग्लंडा सारखे मध्यम हवेतील जे देश आहेत. तेथील लोक व जनावरें सर्वत्र जगतात. मनुष्यास ऊष्ण सोसावयास मोठी शक्ती आहे. एक मनुष्य, दोनशेसाठ अंश एकाखोलीत ऊष्ण केलें, तेथे तो गेला. आणि पावघटका राहिला परंतू त्याचे प्रकृतीस काही जहालें नाही.

मेल्यावर ऊष्ण जातें. याचें कारण पुष्कळ वैद्यानी शोधिले. परंतू पक्का ठिकाण कोणास लागला नाही. अलीकडे एका वैद्याने सन् १८३९ सांत अशी स्थापना केली. आहे. कीं, जिवंतपणी शिरा हलतात. त्यापासून ऊष्ण उत्पन्न होतें. मेल्यावर त्या बंद होतात. म्हणून ऊष्ण जातें.

ऊष्णाचा गूण असा आहे. कीं, तें पदार्थाचे अनुरेणू ढिलें करितें. आणि पदार्थास फुगवितें. गाडीच्या चाकांस लोखंडी यंत्रे बसवितात. ते तापऊन बसवितात. कारण ते तापलयाने मोठे होतात. व थंड जहाले म्हणजे अवळतात.




याप्रमाणे लोखंडाचा साच्या करावा. आणि एकामेकांत हे दोन्ही भाग सारखे बसतात. असे असावे. नंतर क हा बत्ता तापवावा. म्हणजे ख यांत तोच जात नाही.

एक नळीची शिशी घेऊन त्यांत पाणी भरावें. आणि दुसरें भांड्यांत पाणी भरून त्यात उलटी घालावी. आणि ऊष्ण काहोतरी ठेवावें. हात ठेवावे. म्हणजे त्यांतील हवा पातळ होऊन पाणी खाली दाबू लागतें.






दर एक पदार्थास पातळ होण्याकरिता ऊष्णाचे अंश कमी जास्ती लागतात. जसे शिसें आणि सानें यांस वेगळे वेगळे अंश आहे.

ऊष्णाने पदार्थ पातळ होतात. हेच मान ऊष्णाचे अंश समजण्याकरिता घेतले आहे. व त्या यंत्राचे नाव ऊष्ण दर्शक त्यात दुसरे पदार्थ घालतात. परंतू बहुधा पाराच असतो. एक. काचेचें शिशोतील वारा काढून त्यांत पारा भरतात. आणि ती नळी एका पत्र्यावर अंशाच्या खुणा करून त्याजवर बसवितात. मग पारा ऊष्ण लागलें म्हणजे पातळ होऊन वाढतो. थंडी लागली म्हणजे खाली पडतो. पहिल्यापासून १० पर्यंत अतीशय थंडीची खूण आहे. तेथून पुढे ही खुण पारा घोटण्याची आहे. तेथून ३२ ही खुण पाणी घोटण्याची आहे. याचा अनुक्रमाने पुढें उष्णाचे अंश समजण्याकरिता लिहिले आहेत हीं यंत्रें २१२ अंशाची आहेत. काही एक १०० अंशाची हीं असतात. ३२ अंशावर पाणी घोटतें. परंतू पाण्याचा विलक्षण प्रकार आहे. तो असा कीं, पाणी घट्ट होते समयीं पाणी फुगतें आणि जर शिशीत असलें तर शिशी फुटून जाते. व डोंगराचे पोटांत जर पाण्याचे बर्फ जहालें. तर डोंगराचे डोंगर कोसळतात. जसे, तुरटीचें फूल फुगतें. तद्वत पाणी आटते वेळेस फुगते.

चुंबन शक्तीने पदार्थाचे अणू रेणू अवळून चिकटलेले असतात. ते पृथक पृथक ऊष्णाने होतात. यास्तव ऊष्ण लागलें म्हणजे पदार्थ फुगतात. बर्फ ३२ अंश ऊष्णाने विरघळतो. शिसें ६१२ सोने २०१६ लोखंड २७८६ प्लाटिन धातू व चुना वगैरे पदार्थ याहून आणखी ऊष्ण लागतें. पाण्यापासून वगैरे ऊष्ण लागून वाफ होते.

ती वाफ ऊष्ण दूर करून जर दाबली तर पाणी होतें. परंतु याप्रमाणे वायू वगैरे जे स्वभावतः उडणारे पदार्थ आहेत. त्यास दाबले तर पाणी होत नाही. पृथ्वी पासून हवा नेहेमी सर्वकाळ वरती जात आहेत. समुद्र व जनावरे, झाडें, तळीं, नद्या, या सर्व ठिकाणीहून वाफा वर जात आहेत. त्याच कोसावर चढल्या नंतर मेघ होतात. आणि तेथे पुन्हा त्याची दाबणी होऊन पर्जन्य रुपाने खाली पडतात. ऊष्ण दर्शक यंत्रांत २१२ अंश अधणाचे घातले आहेत. परंतु निर्जीव शहरात २॥ अंश कमी ऊष्ण असून आधण येते. कारण कीं, ते शहर समुद्रापासून १२०० फूट उंचस्थानी आहे. व किटो येथे १८ अंश कमी ऊष्णाने पाणी याची वाफ होते. कारण कीं, ९०० फुट ते शहर उंच आहे.

गुह्य ऊष्ण पदार्थात असतें. म्हणजे प्रघट ऊष्ण वेगळें आणि गुप्त वेगळें आहे. ते असताना ऊष्ण दर्शक यंत्रें करून समजत नाही. जसें, वायू दाबला. तर, आग लागते. सैल केला. तर, पुन्हा थंड होतो. चकमकीने आग लागते. पण चकमक हतास थंड लागते. चुन्याच्या कळ्या हतास थड लागतात. परंतु त्यांतून ऊष्ण पाणी लागताच निघते. पाणी यांस आधण येऊन वाफ होते. त्यास ऊष्ण पुष्कळ लागतें. परंतु वाफ थंड असते. याचे कारण ऊष्ण त्यांत आहे. परंतु तें गुप्त आहे तेंच वाफेचे पाणी करतें ते वेळेस प्रगट होते.

ऊष्ण, पदार्थांत दोन रितीने शिरते. एक स्पर्श व दुसरें कीर्ण द्वारा जसें तापलेले पदार्थांवर आपण हात ठेवला. तर, ऊष्ण लागतें. तो स्पर्श जाणावा. आणि विस्तवाजवळ दूर हात ठेवला. तर ऊष्ण लागतें. तें असें की, ऊष्णाची कीर्णे येऊन लागतात. सूर्याचे ऊष्ण आपल्यास असेच मिळतें.




विस्तवांत पळी घातली. तर, पहिल्याने तोंड तापते. नंतर चढत चढत अग्रापर्यंत तापतें. परंतु असे ऊष्ण चालविण्याची शक्ती पदार्थांची पृथक पृथक असते. जसे, सोनें ऊष्णास लोखंड व कथील या पेक्षा तिप्पट जलद चालविते. व शिशापेक्षा साहापट व मातीपेक्षा ९० पट. वायूमय पदार्थ व पाणी हे ऊष्णास फार सावकास चालवितात. पाणी अग्नीवर ठेविलें. तर पहिल्याने तळाकडे पाण्याचे अणू रेणू तापतात. ते ऊष्ण लागून हलके होतात. म्हणून ते वर येतात. आणि थंड असतात. ते जड असतात. म्हणून ते वरून खाली जातात. असें होता होता सर्व पाणी तापतें.

जर पाण्याचे भांडें लांब नळीसारखे असलें. तर, एका टोकाकडे बर्फ असता दुसरें टोकाकडें पाण्यास आधण येईल. असे ही होतें.

जसे उजडाची कीर्णे एकत्र जमा करण्यास सापडतात. व जीतकी दूर असतात. तीतकीं कमी होत नाहीत. तद्वत ऊष्णाचे आहे. व त्याचें प्रतिबींब ही पडते.




क हे कथलाचे भांडें ऊन पाण्यानें भरलें आहे. व ग हे ऊष्णदर्शक यंत्र हें भिंग याजवरून असें सिद्ध होतें कीं, लकलकीत जर भांडें असलें. तर, ऊष्ण त्यातून बाहेर लौकर जात नाही. व त्याच भांड्याची एक बाजू मळकट शिशाची असली. तर, त्यातून लौकर ऊष्ण बाहेर जातें. व एक कागद चिकटविलेली बाजू त्यातून अधीक व एक काजळ लावलेली बाजू त्यातून फारच याजवरून आणखी असे सिद्ध आहे, लकलकीत भांड्यांत ऊष्ण पदार्थ अधीक वेळ राहील. व मळकट भांड्यांत लौकर निवेल. भिंगांत

सूर्याची कीर्णें जमून बाहेर डोळा पाडतात. तेव्हा सूर्याचा उजेड व ऊष्ण ही दोन्ही त्यांत असतात. तेव्हा उजेडासारखें ऊष्ण ही बाकतें. असें दिसतें.

जर मोठी भिंगें लावली तर अत्यंत ऊष्ण ऊत्पन्न होतें. चार फूट भिंग आसलें. आणि त्याचे डोळ्यांत पावली, अधेली, ठेविली. तर, तात्काळ रस होतो. पाच सात मिनिटें लागतात.

ऊष्ण आणि उजेड हे बहुधा एकत्र असतात. परंतु पृथक आहेत. कधी कधी उजेड नसता ऊष्ण असतें. कधी कधी उष्ण नसता उजेड असतो. याजवरून हे पृथक पदार्थ जाणावें.

---

## तेजज्ञान

तेजज्ञान यामध्ये विद्युल्लता म्हणजे वीज जा पदार्थापासून उत्पन्न होते. व वीज म्हणजे काय? व वीज हा पदार्थ इतर ठिकाणी उत्पन्न होतो किंवा नाही? व त्याची यंत्रे कशी या विषयी विचार आहे.

तेज म्हणजे विजेमध्ये जो पदार्थ दृष्टीस पडतो तो, हें तेज पदार्थात आहे. जसे, ऊष्ण आहे. तद्वतच हें आहे. त्याचा शोध बहुत विद्वानानी करून त्याचे निदान व यंत्रें सिद्ध केली आहेत.

तेज प्रगट होण्याची अशी रिती आहे. कीं, कोणत्या एका पदार्थास घेऊन घर्षण केलें. म्हणजे तें उत्पन्न होतें. याविषयी पदार्थाच्या दोन जाती आहेत. काही पदार्थ तेजक आहेत. व काही अतेजक आहेत. तेजक म्हणजे जामध्ये त्वरित तेज उत्पन्न होतें. ते पदार्थ आणि अतेजक म्हणजे त्यामध्ये जरी तेज आहे. तरी प्रवट होत नाही.

तेजका पैकी पदार्थ आहेत. ते येणे प्रमाणें बिल्लोर, रत्नें, राळ, गंधक, लाख, रेशीम, स्फटीक, कापूस, लोहोकर, शिसें, कागद, वायू, तेल, तांबे, पेटीची साखर, वाळलेली लाकडें इत्यादि पदार्थ त्वरित तेज प्रवट करितात.

जे पदार्थ तेजक आहेत. त्या पदार्थातून तेज चालत नाही. म्हणून तेच अप्रवेशक आहेत. आणि जे अतेजक आहेत. ते प्रवेशक आहेत. कारण कीं त्या पदार्थातून तेज चालतें.

एक बिल्लोराची नळी किंवा लाखेचा तुकडा घेऊन त्वरेने लोहोकरीचे कापडावर किंवा अंगरख्यावर घासावा म्हणजे त्यामध्ये तेज प्रवट होतें. आणि त्याजवळ कागदाचा तुकडा किंवा सोन्याचा वर्ख किंवा केस वगैरे बारिक पदार्थ नेला. तर, तो आकर्षण होतो. म्हणजे तो उडून त्या लाखेस चिकटतो. आणि पुन्हा तेथून उडून मागे पडतो. आणि त्यास दुसरा पदार्थाचा स्पर्श जहाला. तर, पुन्हा आकर्षण होत नाही.

जर अंधेरात बिल्लोर किंवा हिरा घासला तर, त्यातून ठिणग्या पडतात. त्याचा रंग निळा असतो. आणि आशा तेजस्वी पदार्थास बोट लावलें तर, तेज बोटांत शिरतें. आणि बोचल्यासारखें वाटतें या प्रमाणे निळाची अंगठी घासली तर, बारिक कपटा किंवा दुसरा पदार्थ उचलून घेईल..

वायूमध्ये तेज आहेच, तेंच, पदार्थ घासला म्हणजे तो पदार्थ वायूतील आकर्षण करून घेतो. आणि त्याचे पोटात रहाण्या पेक्षा अधीक त्याच्यांत जमलें म्हणजे जवळ जो पदार्थ असेल त्याजकडे तें जातें.

जर एक धातूची गोटी घासली. आणि ती तेजोमय होईना तर रेशमाच्या दोऱ्याने हवेत टांगावी. म्हणजे रेशीम हें तेजस्वी पदार्थ आहे. म्हणून अप्रवेशक आहे. याजकरिता गोटीत जें तेंजउत्पन्न होतें तें रेशिमाच्या दोरीने बाहेर जात नाही. परंतु तिच्या अंगात रहातें. नंतर रेशिमाने किंवा लोहोकरीने

घासावा म्हणजे तिच्यांत तेज उत्पन्न होतें. आणि ती गोटी बारीक पदार्थास अकर्षण करितें. परत टाकितें. परंतु हीच गोटी जर लोखंडाच्या तारेने बांधली तर उपयोग नाही. कारण कीं, त्या तारेतून तेज निघून जातें. आणि रेशिमाने निघत नाही. वायू पुष्कळ असला. म्हणजें अप्रवेशक आहे. आणि रेशीमही अप्रवेशक आहे. याजमुळें त्या गोटीतील तेज संबंध राहातें आणि त्यांत पुष्कळ जमविता येतें. तेजाचा गूण असा आहे. कीं, जेव्हा एकाध्या पदार्थात तें पुष्कळ उत्पन्न करावें. तेव्हा त्यास ज्या पदार्थाचा स्पर्श होईल. त्यास तें तेज जातें. जरी हवा अप्रवेशक आहे. तरी. फार तेज जमलें. म्हणजे ठिणग्या उडतात.

दरएकं पदार्थाचे पोटांत तेज असण्याचे परिमित आहें. त्यातून अधीक तेज त्यामध्ये जहालें. म्हणजें त्या पदार्थास अती तेजकपणा जाहाला, असे म्हणावें. आणि त्यातून कमी असलें म्हणजे न्यून तेजक म्हणावें. आणि जर दोन पदार्थ प्रत्येक न्यून तेजक असलें. तरी, ते आकर्षण करीत नाही. परंतु एका मेकास पलीकडे करितात. आणि अती तेजक व न्यून तेजक एक जागीं जाहालें तर. आकर्षण करितात. आणि एक अतितेजक असला. व दुसरा मुळीच तेजक नसला. तरीं, आकर्षण करितात. यास्तव पदार्थात तेज फार जाहालें. म्हणजे दुसरे पदार्थ जे जवळ येतील. त्यात जाऊन आपले परिमितावर येईतो पर्यंत आकर्षण करितो.

तेजाचीं यंत्रें पुष्कळ आहेत. त्या पैकी एक धक्का म्हणून यंत्र आहे. तें बिल्लोरी शिसा व त्याचे तोंडास कथील बसऊन त्यांत तेज पुष्कळ जमऊन ठेवावें. म्हणजे त्यापासून चमत्कार करिता येतात. एक धातूची तार घेऊन त्या शिशास लावली. म्हणजे मनुष्यास, शिशात तेज असेंल तसा धक्का बसतो. व याचे कारण तारेतुन तेजाचा प्रवेश होऊन मनुष्याचे आंगांत शिरतें. आणि या प्रमाणें कितीही मनुष्यें असलीं तरी, धक्का बसतो. परंतु माणसें मात्र एकास एक लागून असली पाहिजेत. तेज फार असलें तर, लहानसा जीव धक्क्याने मरून जातो. व माणूस ही मरेल. व दगड किंवा लाकडांस लावलें तर त्याचे तुकडे होतात. व तेजामध्ये ऊष्णही फार असतें. याजमुळे लौकर पेटणारे पदार्थास स्पर्श जहाला. तर, आग लागेल.

भूमींत व आकाशांत तेज आहे. जमीनीतून ठिणग्या उडतात. तें तेजच आहें. व आकाशांत गडगडाट व विजा चमकतात. त्या तेजापासून आहेत. मेघाचे घर्षण होतें. आणि तेज उत्पन्न होऊन त्यातून पडतें. ती वीज जाणावी. जसे, तेज धातूतून जातें. तशीच वीजही जातें. याजकरिता विजा व गडगडाट होत असला म्हणजे झाडाखाली उभे राहू नये वीज झाडाचे लाकडावर अवश्य पडते. यास्तव मोठाल्या इमारतीवर धातूच्या तारा लाऊन ठेवितात. म्हणजे त्या तारेतून वीज उतरून भुईत जाते.

काही जनावरें ही तेजवान असतात. दक्षण अमेरिकेत एक विरळ्याची जात आहे. ते पाण्यात असतात. त्याचे आंगावरून जनावर गेलें तर, त्यास धक्का बसून बुडतात. व मासे धरणारे भोई हेही धक्के खातात. आणि पाण्यात काठी टाकली. आणि ती त्या विरळ्यास लागली तर, त्याचे आंगातून तेज त्या काठीत येऊन माणसास धक्का बसतो.

तेज जसें घर्षणाने उत्पन्न होते. तसेच आणखी एक रितीने उत्पन्न करिता येतें. ती रिती अशी कीं, एका पदार्थाचा दुसरें पदार्थाशी संयोग जहाला, म्हणजे तेज उत्पन्न होतें असे काही पदार्थ अढळात आले आहेत. यास साधारण प्रमाण असें आहे कीं, एक जस्ताची चाती व एक तांब्याची चाती जिभे वरती व खाली ठेवावी. आणि जस्ताबद्दल रुपें असलें तरी चालतें. आणि दोन दोन चात्या असल्या तर, फारच चांगले, आणि त्या जिभेच्या वरती व खाली ठेऊन त्यास जरा पुढें करून एकामेकास स्पर्श होई असें करावें. म्हणजे स्पर्श



होताच विलक्षण रुची उत्पन्न होते. आणि चटका बसतो, व किती एकास ठिणगी उडाल्या सारखेही वाटतें.

तेज उत्पन्न करण्याची रिती अशी आहे कीं,




क ही बिल्लोरी लाट आहे. ख हा फिरवण्याचा दांडा आहे. ग ही दुसरी एक लाट आहे. तिच्याशी थोरली लाट फिरविली म्हणजे घासते. घ ही धातूची नळी आहे. च ही साखळी आहे. या यंत्राने तेज पुष्कळ होतें आणि बहुत चमत्कार दृष्टीस पडतात. धक्क्यांत तेज भरावयाचे असलें. तर, या यंत्राने भरावयास येतें.

या यंत्राचा स्पर्श मेंलेल्या जनावरास जहाला. तर, त्याचे शरीर हलतें.

दुसरें यंत्र आहे. त्याची कृती अशी आहे. कीं, जस्ताचे तुकडे पैशाएवढे पंचवीस, तीस, घ्यावे. आणि तितकेच कापडाचे किंवा कागदाचे मीठ व पाणी यांत भिजऊन घ्यावे. आणि प्रथम जस्ताचा तुकडा त्याजवर कागद त्याजवर जस्ताचा तुकडा त्याजवर तांब्याचा तुकडा या प्रमाणे रचावे. आणि बाजूस बिल्लोराच्या नळ्या उभ्या कराव्या. दुसरी रिती अशी आहे. कीं, एका बिल्लोरी ताटात जस्ताचा तुकडा एका आंगास लावावा. पुढें तांब्याचा, मधली जागा काहीतरी अंबट पदार्थाने भरावी नंतर पुन्हा जस्त पुन्हा अंबट पुन्हा तांबें असे उभें करावें. जसे चित्रात आहे.




या प्रमाणे तयार करावें. नंतर हात ओले करून दोहोकडे मृदंगासारखें लावावे म्हणजे धक्के बसू लागतात. या प्रमाणे आणखी चमत्कार होऊ लागतात.

याप्रमाणे साधारण दोन धातू एके जागी ठेविल्याने असा चमत्कार होतो. व आणखी असे आहे, कीं, या यंत्राने पदार्थाची तत्वें काढता येतात. पाण्याचे दोन भाग वायू रूपी होतात. व तांबे उत्पन्न होतें. त्याचे कारण हेच आहे. कीं, अग्नीतत्व दुसऱ्या पदार्थाशी संयोग करितें. म्हणजे तांबें उत्पन्न होतें. याजकरिता शुद्ध धातू वरचे शिके फार दिवस टिकतात. व मिश्र धातू वरच्यास तांब लागून जाते. जिभेवर दोन धातूच्या तुकड्यानी तेज उत्पन्न होतें. याचे तरी कारण हेच आहे. कीं, जिभेतील पाण्याचा भेद होऊन त्याची तत्वें वेगळाली होतात.

या प्रकर्णी आणखी पुष्कळ चमत्कार आहेत. ते येथे लिहिले जात नाही. व प्रत्यक्ष पहिल्या शिवाय पक्की खातरी व समजूत होणार नाही. यास्तव संक्षेप करितो.

---

# लोहोचुंबकज्ञान

लोहोचुंबक दोन जातीचा आहे. एक स्वभावीक आहे. तो लोखंडाचे खाणीत सापडतो. व दुसरा कृतीचा आहे. तो, लोखंडाचा तुकडा घेऊन लोहोचुंबकांस लाऊन ठेवावा, म्हणजे त्यास तो गूण येतो. व लोखंड किंवा पोलाद उत्तर दिशेस ठोकावें किंवा तापऊन विझवावें. म्हणजे त्यास तो गूण येतों. परंतू तो फार दिवस ठरत नाही.

लोहोचुंबक याचा गूण असा आहे. कीं, लोखंडाचा कीस करून कागदावर ठेवावा. व त्याज-वर लोहोचुंबक ठेवावा. म्हणजे ते तुकडे त्यास जडतात. परंतू लोहोचुंबकाचे दोन टोकास फारच जडतात. तीं टोकें नेहेमी दक्षणेस व उत्तरेस असतात. जर, लोहोचुंबकाची लहान सुयी केली. आणि तिला एका काट्यावर अडवी ठेविली. तर तिचे एक टोक दक्षणेस व दुसरे उत्तरेस राहील. व जर दिशा बदली तर ती सुयी फिरते. आणि पुन्हा दक्षण उत्तर होतें. या यंत्रास होका म्हणतात. तो तारवावर बसून दूर देशांत समुद्रांत जाणारे लोकांस उत्तर दिशा कळण्याकरिता अवश्य पाहिजे. हें यंत्र करण्याची रिती ठाऊक जाहाल्या पासून समुद्रांत लोक फिरु लागले. पूर्वी ठाऊक नवते. जसे जमिनीवरचा लोकाचे घड्याळ तसे समुद्रांत फिरणाऱ्या लोकाचा होका आहे. किंबहुना अधीक आहे. कारण कीं, त्याशिवाय त्याचे जाणेच होणार नाही.

लोहचुंबकाचा गूण दुसरा, असा आहे. कीं, तो जा लोखंडास लागून काही दिवस असतो. त्या लोखंडास आपले गूण देतो परंतू त्याचे गूण दिल्याने भ्रष्ट होत नाही.

तिसरा गूण असा आहे. कीं, मध्य भागी पदार्थ असता ही तो लोखंडास अकर्षण करितो. जर घड्याळा खाली लोहचुंबक ठेविला. तर, घड्याळ चालावयाचे बंद होतें. कारण कीं, त्याचे आंतील लोखंडी चक्रास तो आकर्षण करून धरितो.

लोहचुंबकास दक्षण उत्तर दोन टोकें असतात. त्यामध्ये इतका नियम आहे. कीं, जे दक्षणेचे टोक तें उत्तरेस केलें तर लागलेंच सुयी फिरून तें दक्षणेस होतें. आणि उत्तरेचेच उत्तरेस राहातें. याजवरून असुक टोक उत्तरेचे व असुक दक्षणेचे हें समजतें. आणखी दोन सुया करून त्याची दोन विपरीत टोकें म्हणजे एकीचे दक्षण व दुसरीचे उत्तर अशी जर एकीमेकीस लावली तर ती जडून राहतात. व एकीचे दक्षण व दुसरीचे दक्षण टोक जर लावले. तर ती आकर्षण करित नाहीत. आणि उडून पलीकडे पडतात.

लोहचुंबकाने लोखंडच आकर्षण होतें. असे नाही. आणखी काही पदार्थ आकर्षण होतात. जस्त, शिसें, माणीक, तांबे इत्यादि पदार्थांत लोखंड आहे. याजकरिता तेही आकर्षण होतात. लोखंडाशिवाय दुसरे पदार्थ आकर्षण होऊ नये. असें आहे. याजकरिता जे पदार्थ आकर्षण होतात. त्या संर्वात काही तरी लोखंडाचा अंश आहे. असें सिद्ध होतें. व पृथ्वीचें आंगात उत्तरेस व दक्षणेस मनेश्वी लोखंड आहे. याजमुळे होक्यातील सुयी ताठून दक्षणोत्तर असते. जर सुयी पाण्यावर कशास तरी बांधून टाकिली. तर तीही आपली दिशा राखतें. याजवरून असे दिसते. की पृथ्वी लोहचुंबकं रूप आहे. व दक्षण ध्रुवाकडे व उत्तर ध्रुवाकडे आकर्षणाची शक्ती आहे.

कोणी असे म्हणतात. कीं, लोहचुंबकामध्ये आकर्षण करणारा उत्तर दक्षण वायू आहे. आणि त्या वायूची विपरीत गाठ पडली. तर, मित्रता आहे. व एका जातीच्या वायूस तोच जातीचा वायू दूर ढकलतो. याजवरून पृथ्वीचे उत्तरेस व दक्षणेस विपरीत वायू आहे. म्हणजे दक्षण ध्रुवाकडे उत्तर वायू आहे व उत्तर ध्रुवाकडे दक्षण वायू आहे. म्हणून सुयीची त्याची मित्रता होऊन उत्त-रेचे टोक उत्तरेस राहातें. आणि दक्षणेचे दक्षणेस असतें.

होक्याचे यंत्रांत केव्हा केव्हा असें होतें. कीं, लोहचुंबकाची सुयी किंचित दिशा सोडून वाकडी होते. लंडन शहरांत संन् १६६० इसवींत सुई इशान्येस जाहली होती ती संन् १८१८ त वायव्येस सरली. हाली पुन्हा इशान्येस जात आहे. तसेच सुयीचा झोक कधी कधी उर्ध्व किंवा अधः होतो. व उत्तर अमेरिकेत अगदी सुयी उभी होते.

लोहचुंबकाचा गूण तेजापासून आहे. असे कोणी म्हणतात. व मोठें ओझें उचलावयाजोगें लोहचुंबक तेजाचे योगाने करिता येतात. व तारवावर वीज पडते तेव्हा होका बिघडतो. याजवरून अनुमान करितात. परंतू पक्के समजत नाही.

लोहचुंबकापासून बहूत यंत्रे होतात. व चमत्कार होतात. त्याविषयी प्रकर्ण पुष्कळ आहे. परंतू येथे संक्षेप केला आहे.

---

## नक्षत्रज्ञान

आकाशांत नक्षत्रें दिसतात. यास बहूत काळापासून पाहून अनुभव घेऊन ज्योतिषानी त्याच्या चार जाती ठरविल्या आहेत. तारा, ग्रह, उपग्रह, धूम्रकेतू.

(१) तारा म्हणजे जी नक्षत्रें आपलीं अंतरें एकामेकापासून बदलत नाही. परंतू सर्वकाळ त्याच ठिकाणी असून दुसऱ्या ताऱ्यापासून जे अंतर असतें. तें कधी कमी होत नाही. या प्रकारच्या तारा दीढ लाख लिहून ठेविलेल्या आहेत. परंतू दोन हजार, डोळ्यानीं दिसतात. व दीर्घ दर्शी यंत्राने पाहिल्या. तर, सुमारे दाहा लक्ष तारा दिसतात. त्यांचा उजेड कमी असतो. तो त्याचें शरीर लहान किंवा अंतर फार याजमुळें आहे. याचा संशय आहे. तत्रापि एका एकाचे अंतर इतकें सिद्ध होतें. याचा उजेड तितक्या अंतरावरून खाली एण्यास कोणांस तीन वर्षे–दाहा वर्षे पाहिजेत. याजकरिता त्यांचीं अंतरें अर्व आणि कोट्यान कोटी कोंस आहेत. व त्याजवर जशा पृथ्वीवर प्रजा आहेत. तशा प्रजा नसतील. असे म्हणवत नाही. यास्तव परमेश्वर अनंतकोटी ब्रह्मांड नायक आहे. तारांची नावे, त्याचे जमाव जसे दिसतात. त्या त्या पदार्थाप्रमाणे ठेविली आहेत. जसे, विंचू माचा म्हणजे कृत्तिका व मृग जसे.




असे अनेक समुदाय आहेत. त्यांची अनेक नावें आहेत. कितीएक काही दिवस दिसतात. आणि मग नाहिसे होतात. याची काय गती व काय प्रमाण असेल. त्याचा ठिकाण नाही.

(२) ग्रह म्हणजे जी नक्षत्रें आकाशांत नियमाप्रमाणे फिरतात. त्यास म्हणावें. याप्रमाणे ग्रह, सुर्य–बुध–शुक्र – पृथ्वी – मंगळ – गुरु – शनी – आणखी पाच नवीन ग्रह आहेत. ते व बुध–शनी एकूण सात ग्रह डोळयानी दिसत नाही. ते प्रयत्नाने दिसतात. आणि पाच मात्र स्वाभाविक दिसतात.

(३) उपग्रह म्हणजे ते कोणी एका ग्रहाबरोबर फिरतात. ते पृथ्वी बरोबर चंद्र फिरतो. हा १ गुरु याचे बरोबर ४ आहेत. शनी बरोबर ९ आहेत. व नव्याबरोबर ६ आहेत. एकूण २० उपग्रह–ग्रह व उपग्रह मिळोन ३२ नक्षत्रें आहेत. इतक्याचा गती मात्र ज्योतीष शास्त्रांत ठरविल्या आहेत.

सूर्य मध्ये असून सभोवती हे ग्रह फिरतात. किंवा पृथ्वीमध्ये असून फिरतात. एविषयी प्राचीन काळापासून बहूत सिद्धांत आहेत. परंतू सांप्रत काळी ज्योतिषानी पक्का विचार करून सूर्य मध्ये आहे असें ठरविलें आहें.




सूर्यासभोवते हे ग्रह आहेत.

याचीं अंतरें सूर्यापासून मैल.

| | | |
|---|---|---|
| बुध | ... | ३७०००००० |
| शुक्र | ... | ६९०००००० |
| पृथ्वी | ... | ९५०००००० |
| मंगळ | ... | १४४५००००० |
| नविनल | ... | ... ... ... |
| गुरु | ... | ४९३०००००० |
| शनी | ... | ९०४०००००० |

याची शरीरें रुंद आहेत. त्यांचे मैल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सूर्य | .. .. | ८०००००० | मंगळ .. .. | ४१०० |
| बूध | .. .. | ३१७४ | गुरु .. .. | ८६००० |
| शुक्र | .. .. | ७७२४ | शनी .. .. | ७९००० |
| पृथ्वी | .. .. | ७९१२ | नवीनाची लिहिली नाहीत. | |

याची स्वरूपे व एक प्रदक्षणा होण्याचा काळ वेगळा वेगळा आहे. व त्याची गणितें पुष्कळ आहेत.

(४) धूम्रकेतू ही नक्षत्रें आहेत. त्याचे मार्ग व प्रदक्षणेचा काळ अनिश्चित आहे. याजमुळे त्याचे गणीत होत नाही.

जसा सूर्या सभोवताली ग्रह समुदाय आहे. व त्याचे नियम मनुष्यास माहीत होऊन गणीत करिता येतें. त्याचप्रमाणे वरती आणखी तारामध्ये एका भोवती आणखी तारा फिरणाऱ्या अशा अनेक असतील. व त्यांची गणितें व्हावी. परंतू त्याचा ठिकाण अद्याप लागत नाही. व त्याच्या असख्यतेंवें करून कधी लागणार नाही. मनुष्याची शक्ती व बुद्धी, इश्वराची कृत्यें जाणावयास फार थोडी आहे. याजवरून समजावें.

सूर्याभोवती ग्रह फिरतात. याचे नियम असे आहेत. कीं,

चलनशक्ती ज्ञानावरून असे सिद्ध होतें. कीं, जो पदार्थ एकदा चालू जाहला. त्यास हरकत पडली नाही. तर सर्व काळ चालू राहील. आणि जो मोठा पदार्थ आहे. तो लाहान पदार्थाचे आकर्षण करितो.

सदरहू नियमाप्रमाणे सूर्य सर्वांहून मोठा ग्रह आहे. तो बाकीचा लाहन ग्रहाचे आकर्षण करितो. आणि ईश्वराने ग्रह उत्पन्न करून त्यास चलन दिल्हें आहें. तेव्हा चालू झाले. त्यांस अडथळा काही नाही. म्हणून त्याणी समूर जावें. परंतू सूर्याचे आकर्षण एका आंगानें होतें. याजमुळें वर्तुळाकार गती होते. त्याचा नकाशा पूर्वी लिहिलाच आहे.

आपण प्रथ्वीवर राहतो. व प्रथ्वी हा एक सूर्यासभोवती फिरणारा ग्रह आहे. यास्तव येथील मात्र ज्ञान आपल्यास आहे. इतर ग्रहापासून सूर्य केवढा दिसतो. व त्याची ऊष्णता तेथे किती व तेथील पर्जन्यादिक व्यवस्था कशा या आपल्यास माहीत नाहीत. याजकरिता पृथ्वीवर कसें चरित्र दिसतें ते लिहितो.

सूर्यासभोवती पृथ्वी फिरते. त्या मार्गाचे बारा हिसे केले आहेत. त्यांची नावें व राशी

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मेष | २१ | मार्च | उन्हाळा | ६ महिने उत्तरायण |
| वृषभ | १९ | अप्रील | | |
| मिथुन | २० | मे | | |
| कर्क | २१ | जून | पावसाळा अंवल | |
| सिव्ह | २२ | जुलई | | |
| कन्या | २२ | अगष्ट | | |
| तूळ | २३ | सप्तेंबर | पावसाळा अखेर | ६ महिने दक्षणायन |
| वृश्चिक | २३ | अगटोबर | | |
| धन | २२ | नवेंबर | | |
| मकर | २१ | डिजंबर | हिवाळा | |
| कुंभ | २० | जानेवारी | | |
| मीन | १९ | फेब्र्यूआरी | | |

पृथ्वीचा वाटोळा गोळा आहे. तो पाणी व माती याणे घडलेला आहे. व आणखी अनेक जीव जंतू वनस्पती तिजवर आहेत. प्राचीन काळी पृथ्वी वाटोळी हें माहीत नवते. परंतू आलीकडे ज्योतिषाचे शोध समुद्रांत फिरणें फार होऊन मिळालें. त्याजमुळें पुरता पत्ता लागला. पृथ्वीचा दोन गती आहेत. एक आपल्या भोवती फिरत असते. आणि तशीच फिरत फिरत सूर्याभोवती जात आहे. आपल्या भोवती प्रदक्षणा चोवीस तासांत होते. आणि सूर्याभोवती ३६५ दिवसांत होते. यापासून दिवस रात्र व अयन क्रांती व रुतू हें सूर्याचे ऊष्ण व तेज जसें असेल. तद्वत प्राप्त होतात. सूर्य साडेनऊ कोट मैल (म्हणजे अर्ध कोस) दूर आहे. तेव्हा पृथ्वी एक तासांत ६८ हजार मैल चालत आहे. गेल्या तासापासून एक तास सरें तो पर्यंत इतके दूर आम्ही सर्व तिच्या बरोबर नावेत बसल्याप्रमाणे चालके अहो.

समुद्राच्या भरत्या ओहोट्या व क्षारपणा याची सर्वांची कारणे आहेत. परंतू येथे लिहिणें जरूर नाही.

पृथ्वीवर अनेक देशांत अनेक हवा आहे. व अनेक पिकें वगैरे विचित्र रचना आहेत. व उन्हाळ्यांत सूर्याचे ऊष्णानें पाणी वर चढतें व पावसाळ्यांत खाली वर्षाव होतो. व सूर्य जाताच चंद्र उगवतो. इत्यादि कारभार हाताने व नियमाने होतो. त्यांत चूक पडत नाही. तेव्हा ईश्वरानें हें केवढें यंत्र चालू केलें आहे. व जरी इतकें ज्योतिष शास्त्र आहे. व इतका प्रयत्न जाहला. आहे. तरी, त्या अंतराचा अर्बांश व खर्वांस देखील कळा नाही. जसें समुद्राच्या तिरी एक वाळूचा रजःकर्ण घेतला. तर, असें वाटते. कीं, या कणाप्रमाणें या समुद्रांत आणखी किती असतील. बरे ? तद्वत सूर्य व त्याचे ग्रह फिरणारे असे ३२ नक्षत्राचा ठिकाण काहीसा लागला. परंतू असे ग्रह आणखी मध्ये एक मोठा ग्रह राहून त्याचे भोवताले फिरणारें तारे किति एक असतील. व त्या सर्वांचा शक्तिदायक मूळ ग्रह कोण असेल. किंवा आपला सूर्य देखील त्याचे उपग्रह असतील. कीं काय ? याचा आदि अंत अद्यापी नाही. केवढी परमेश्वराची शक्ती असेल ती पाहा ?



वर लिहिल्याप्रमाणे पृथ्वी फिरून तिजवर अंधेर पडतो. जें आंग सूर्याकडे त्याजवर उजेड आणि जे फिरलेलें असतें. त्याजवर रात्र असते.

सूर्यामुळें मनुष्य चंद्राची क्षय वृद्धी प्रती सूर्य ग्रहणें असे चमत्कार पृथ्वीवर होतात. त्यातून ग्रहणाचा पर्याय लिहितो.

सूर्य ग्रहण पडतें. तेव्हा सूर्याचे व पृथ्वी मध्ये चंद्र एका रेषेत येतो. तेणे करून तितक्या पृथ्वीचे भागावर काळोख पडतो. जसे–




चंद्र ग्रहणांत पृथ्वी मध्ये येते. जसें–




आणि चंद्र सावलींत सापडतो. याजमुळें काळा दिसतो. चंद्र स्वता का तसाच आहे परंतु सूर्याचे किर्णानी तो चमकतो.

गणितामध्ये मानें आहेत. म्हणजे सौरमान चंद्रमान ब्रहस्पती मान इत्यादी, सूर्यमान म्हणजे २४ तासाचा दिवस १ चंद्रमान म्हणजे चंद्र एका राशीत जाईपर्यंत एक रात्र व एक दिवस होतो. बृहस्पतीमान म्हणजे एक वर्षांत अर्धीरात्र व अर्धा दिवस व त्या ग्रहावर जे लोक असतील. त्यास असेच होत असेल.

ग्रहण पूर्णिमे अमावास्ये शिवाय होत नाही. कारण कीं त्याच दिवशी समूर रेषेत एण्याचा ग्रहाचा समय आहे. इतर दिवशी वाकडे तिकडे असतात.

एक वर्षांत ग्रहणें ७ कदाचित होतील. व च्यार बहुधा घडतात. दोन तर, होतातच. सावली मध्ये जेव्हा चंद्र जातो तेव्हा पूर्ण खग्रास होतो. थोडा गेला असला. तर, अपूर्ण होतें. व दूर असल्यास अंगठी सारखे होतें. जसे–



सूर्याचे व आपले मधून दुसरे ग्रह जातात. परंतु सूर्यावर सावली पडावया जोगें त्यांचे शरीर नाही सबब दिसत नाही. ग्रहणात सूर्याचा व चंद्राचा उजेड कमी होतो. असें नाही. परंतु आपले डोळ्यानी त्याचा उजेड दिसत नाही. विकार सावलीचा आहे.

ध्रुव म्हणून एक एक तारा आहे. तो आकशचा कणा आहे. व लंका ही भूमध्य रेषा मानली आहे. तेथून तो ध्रुव भुईबरोबर दिसतो. तेथून आलिकडे आलीकडे आले म्हणजे तो तारा चढलेला दिसतो. त्याचे अंतराचे गणीत करून देशाची लांबी रुंदी समजतें. व समुद्रांत त्याचे आधाराने जातात.

---

## पदार्थतत्वज्ञान

ही विद्या मूळ किमया पासून उत्पन्न जाहली. रसायणें अंजनें परीस घुटका इत्यादी किमयातील. सिद्धीचा शोध करिता करिता बहूत पदार्थाचा संयोग होऊन काय होतें. हें समजेल. नंतर किमया लबाड आहे. असें समजून या तत्वज्ञानाचा अभ्यास वृद्धिंगत होत चालला.

तत्वज्ञान म्हणजे पदार्थांची तत्वें कोणती हें कळण्याची विद्या आहे. पदार्थ ईश्वराने तीन स्थितीत निर्माण केले आहेत. (१) घट्ट (२) पातळ (३) वायुमय, आणी त्यात दोन भेद, (१) तत्वपदार्थ (२) मिश्र पदार्थ, पदार्थाची तत्वें थोडीं आहेत. बहूत करून जे पदार्थ दिसतात. हे मिश्र

आहेत. ह्मणजे दोन किंवा अधीक तत्वें एकत्र होऊन तो पदार्थ उत्पन्न जाहाला. आणि तत्व म्हणजे त्या पदार्थाची उत्पत्ती संयोगापासून नाही. परंतू स्वयंभू तो पदार्थ असतो. याप्रमाणें गंधक त्याचे काही जरी केलें. तरी त्यापासून दुसरा पदार्थ निघत नाही. आणि खारें पाणी हा मिश्र पदार्थ आहे. कारण कीं, त्यास जर अटिवलें. तर त्यातुन काही पाणी वेगळें होईल. व काहीं मीठ होईल.

आणखी संयोग होत्साता विलक्षण फळ उत्पन्न होतें. म्हणजे चुन्याच्या कळीवर पाणी ओतलें. तर ऊष्ण होतें. तेलांत सोन्याचे पाण्याचा थेंब टाकताच आग लागते. दुसरें एक सुवर्ण भेदक पाणी आहे. त्यांत सोनें टाकलें. म्हणजे त्याची पूड होते. व गलासें कशी होतात. याचा शोध पदार्थ तत्वज्ञानांत आहे. या प्रकारचे बहूत रोजगार आहेत. जसें, परीट, रंगारी, सोनार, ओतारी, वगैरे या ज्ञानावर आपला धंदा करितात. परीट डाग कोणत्या पदार्थाचे संयोगानें जाईल हें पाहातो. ओतारी कोणत्या दोन धातू एकत्र केल्या म्हणजे पितळ होईल. हें पाहातो. यास्तव हे रोजगार या ज्ञानावर चालतात. असें जाणावें.

या विद्येत किती एक संज्ञा शब्द आहेत. त्याचा अर्थ–संयोग म्हणजे दोन पदार्थ एकत्र केलें असता एकामेकातील तत्वाची ऐक्यता जाहाली. म्हणजे संयोग जाहाला असें म्हणावें. आणि पदार्थाची तत्वें वेगळाली जाहाली म्हणजे वियोग म्हणावें. उदाहरण. जस्ताचे भांड्यांत आंबट घातलें. म्हणजें, काळें पडतें. हा संयोग, लाकूड जाळलें. म्हणजे राख होते. दिवा जळतो. हा वियोग आणि वाळू व पाणी एकेजागी केलें. आणि हलऊन पुन्हा ठेविलें. म्हणजे वाळू एकीकडे होते. व पाणी एकीकडे होतें. तेव्हा त्याचा वियोग ही जाहला नाही व संयोग ही जाहला नाही. असें समजावें.

हे संयोग ईश्वरी कृतीत नेहेमी होत आहेत. व वियोग ही होत आहेत. मनुष्यच पहा, की नेहेमी वायूचा श्वासोश्वास करीत असतें. व पोटांत अन्न जातें. त्याचे रक्तादिक पदार्थ होत असतात. तेव्हा सर्व पदार्थ जीतके आहेत. तितक्यामध्ये हे नित्य संयोग वियोग चालू असतात. सबब त्याचा शोध काढणें हा या विद्येचा गूण आहे.

असे शोध आलीकडे सापडले आहेत. कीं, चिंध्याची साखर होते. व हडांचें अन्न करिता येतें. व लाकडाच्या किसाची भाकर करिता येते. व हिरा हा कोळसा असें दाखविता येतें. आग घेणारे पदार्थापासून पाणी होतें. असें दृष्टोस पडतें. व वायूपासून पाणी होतें. असे चमत्कार या विद्येत आहेत.

सर्व पृथ्वीवर मूळची तत्वें अजमासे ५४ आहेत. तितक्या पासून सर्व विचित्र पदार्थ उत्पन्न जाहले आहेत. प्राचीन काळी जेव्हा या विद्येचा शोध कमी होता. तेव्हा असें मानीत होते. कीं, पाच तत्वें आहेत. पृथ्वी, पाणी, वायू, तेज, अवकाश या पासून सर्व पदार्थ आहेत. परंतू हाली ही तत्वें मिश्र पदार्थ आहेत असें सिद्ध होतें. तत्वाच्या जाती एणे प्रमाणे आहेत.

धातूमयतत्वें ४१ अधातूमयतत्वें १३

५४

धातूमय तत्वांत सोनें, रुपें, पारा, शिसे, लोखंड, इत्यादी आहेत.

अधातूमय तत्वांत उजेड, ऊष्ण, तेज, ही बिन् वजनी तीन आहेत. व अग्नीतत्व, वायूतत्व, पृथ्वीतत्व, जलतत्व इत्यादी वजनी आहेत.

पदार्थ दोन तऱ्हेनी आकर्षण होतात. एक चुंबनशक्ती ते स्वभावीक आकर्षण आहे. आणि संयोग आकर्षण म्हणजे मिश्र होऊन संयोग होतो. तो एक कागदाचा तुकडा घेतला तर त्याचे पोटी अनंत तुकडे आहेत. ते फाडला म्हणजे पूर्ण करी तोपर्यंत दृष्टीस पडतात. परंतु तेच तुकडे त्यामध्ये असतात. परंतु ते एकमेकास चिकटलेले असतात. एका पदार्थाचे स्वजातीय तुकडे एकत्र

असलें म्हणजे स्वाभाविक आकर्षण होतात. आणि दोन पृथक जातीचे तुकडे एकत्र मिळाले म्हणजे तो संयोग म्हणावा. जसे पितळ केली म्हणजे त्यांत जस्त व तांबें एकत्र होऊन तसा पदार्थ होतो. किंवा सोऱ्याचे पाण्याचा थेंब एक तांब्याचे पैशावर टाकावा. म्हणजे पैसा विरघळून त्याचा व त्या पाण्याचा संयोग होऊन नवाच पदार्थ उत्पन्न होतो.

पाण्यात दोन वायू आहेत. एक जल तत्व व एक अग्नीतत्व यंत्रात पाणी ठेऊन त्याची भट्टी केली म्हणजे दोन वायू पृथक होतात. ते पुन्हा एकत्र केले म्हणजे पाणी उत्पन्न होतें.

वायूमध्ये तीन तत्वें आहेत. त्याचाहि वियोग करिता येतो.

पाण्यातून जे जलतत्व निघतें. तें आगदी हलकें असतें. ते पिशवीत भरून जर सोडलें. तर पिशवी वर पतंगा सारखी चढते. त्याजवर माणसें बसून ही आकाशात चार पाच मैलावर म्हणजे दोन अडीच कोसावर मेघ मंडळापर्यंत जातात.

माणसाचे पोटांत वायू गेला म्हणजे त्यातील अग्नी तत्व पोटांत जाऊन रक्त पांढरें असतें. त्याशि मिश्र होऊन रक्तवर्ण करितें. आणि वाईट हवा बाहेर निघते. याजकरिता जेथें माणसें फार जमतात. तेथें हवा वाईट होते. आणि मनुष्याचा प्राण देखील जातो. जितकीं उघड्या वरील हवा असेल. तितकी निर्मळ असते.

पदार्थ-ज्ञानाचा बहूत विस्तार आहे. व त्याचे पुरतें ज्ञान होण्यास त्या तत्त्वाचा यंत्रे करून प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे. ही विद्या अतिउत्कृष्ट व ईश्वराची अचींत्य शक्ती दाखविणारी आहे. याचा अभ्यास फार लक्ष देऊन केल्या शिवाय त्यातील अवघड गोष्टी ध्यानांत येणार नाही. तत्रापी येथे लिहिलें आहे. याजवरून त्या विद्येचें तात्पर्य काय आहे. हें समजेल.

या प्रमाणे हा ग्रंथ आम्ही समाप्तीस आणला. यात जे चमत्कारीक अनुभव लिहिलें आहेत. त्याजवरून परमेश्वराची शक्ती अचींत्य आहे. व पराक्रम अगम्य आहे. असे समजेल आणि कितीही यंत्रे मनुष्यानी उत्पन्न केली. तरी ती इश्वराने एक केस उत्पन्न केला आहे. त्याचे जे यंत्र लावले आहे. त्याची योग्यता पाहाणार नाही. सृष्टींत सर्व ईश्वराची प्रचीती येतें आणि आपले एक मनुष्याचे शरीर हें केवढें चमत्कारीक यंत्र केलें आहें. व अनेक रंगाचे फुलाची झाडें रानात ईश्वराने उगवली आहेत. त्याची विचित्रता करण्या करिता किती तत्त्वे व यंत्रे ईश्वरी संकेताने चालु जाहली आहेत. अशी नारायणाची शक्ती पाहून त्यास शरण जावे. इतकीच माणसाची योग्यता आहे.

माणसाचे सूख वृद्धिंगत कल्पनेने कल्पना तर्क काढून यंत्रे करून होते. यांत संशय नाही. जर, जातें नसतें तर, पीठ दळावयाचे संकट पडलें असतें व विस्तव, पेटवण्याचा ठाऊक नसता तर शिजवावयाचे संकट पडतें. याच न्यायाने इतर कर्मांची यंत्रे म्हणजे विणण्याची ओझी ओढ-ण्याची वगैरे सिद्ध केली, असतां मनुष्यास मेहेनत कमी पडते. व पदार्थ वृद्धिंगत होऊन सूख अधिक होतें. व ज्ञान ही वृद्धिंगत होते. जर तारवें नसती तर पृथ्वी विषयी व ग्रहाविषयी ज्ञान प्राचीन काळच्या लोकाचे होतें तसेच राहिले असतें. व चूक कधी आढळतीना परंतू यंत्र सिद्धीने जनाचा बहूत लाभ जाहला. आहे. यास्तव यंत्र सिद्धी विषयी यंत्रज्ञान ग्रंथ बहूत उत्तम व इकडील देशचे लोक पाहणे जरूर आहेत म्हणून हीं लाहन लाहन पुस्तके पाहून तेणेकरून मोठी पाहाण्याची चमत्काराचे अनुभव घेण्याची इच्छा या ग्रंथद्वारे वाढो अशी आमची इच्छा आहे.

---

# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ |
|---|---|---|---|
| अकार | आकार | १ | १६ |
| उधाहरणे | उदाहरणे | ९ | १३ |
| सर्पा | सर्पाकृती | ११ | १० |
| सत्तेचा | सत्तेने | १५ | १ |
| एटोकास | एकटोकास | २२ | १३ |
| फिरते | फिरतो | २४ | ९ |
| अलिमे खंडात | अलिकडे लोखंडात | ३७ | ३ |
| धरियास | धरिण्यास | ३८ | १० |
| वायू १ \|.... | वायू एकाचा ८०० वा अंश | ४१ | १६ |
| दाहातोळे | एक तोळा | ४१ | १७ |
| बदल्लेले | दबलेले | ४२ | ५ |
| त्या | त्यापासून | ४३ | १ |
| माप | रूप | ४३ | ३ |
| थेंब | कण | ४३ | ५ |
| मापाने | रुपाने | ४३ | ८ |
| मोठाला | मोठाली | ४३ | ९ |
| आहे | नाही | ४६ | १० |
| केस | कोस | ४६ | १३ |
| त्याच्च पासून | त्यातून | ४९ | ८ |
| लाकडी | वाकडी | ६८ | ५ |
| द्वितीय | अद्वितीय | ८६ | ५ |
| करणार कोणीनाही | लागणार नाही | ८६ | ६ |
| त्यांत एवढी कसे राहातील | अधोली एवढी त्यांत कसा राहील. | ८६ | ७ |
| चपापून | व्यापून | ८८ | ३ |
| शिंपी | सिद्धी | ९३ | ३ |

| अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ | ओळ |
|---|---|---|---|
| क | ख | ९४ | ६ |
| ख | क | ९४ | ७ |
| पदार्थ | पदार्थास | ९६ | १४ |
| निर्जित्र | जिनिवा | ९७ | ७ |
| गुह्य | गुप्त | ९७ | १२ |
| तांबे | तांब | ११० | ६–८ |
| नवीनल .... | न विनाची लिहिली नाहीत | ११८ | ८ |
| नावे व राशी | नावे व दिवस | १२१ | ४ |
| हताने | बेताने | १२३ | ३ |
| व गलासे | ही आश्चिर्ये | १२८ | १२ |
| या प्रकारचे | या ज्ञानावर | १२८ | १३ |
| वाहाणार | पावणार | १३४ | २ |

● ●

# शब्दालंकार

हे लहानसें पुस्तक ज्याणें

१ कामदारलोकांशीं संभाषण. २ लक्ष्मीज्ञान. ३ फारसी

पन्दनाम्याचें महाराष्ट्रभाषेंत भाषांतर. ४ यंत्रज्ञान.

५ फारसी गुलिस्तानाचा आठव्या अध्यायाचें भाषांतर.

६ होळीचे दुराचार निषेध निबंध, इत्यादि

ग्रंथ केले त्याणें

इंग्रजी अलंकारशास्त्राचे अनुलक्षानें

महाराष्ट्रदेशांतील लोकांचे

उपयोगार्थ

केलें

ते कृष्णाजी त्रिंबक रानडे यांणीं

पुण्याचे ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

सन १८५१ किं. ०-६

शक १७७३

# प्रस्तावना

शब्दालंकार हा विषय अलंकारशास्त्राचा एक भाग आहे. जे मराठी पुस्तकें वाचतात त्यांस या विषयाचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे, आणि या ग्रंथाचा उपयोग शाळांस फार आहे. या ग्रंथाचे भागाचें फेरिस्त येणेप्रमाणें.


| | नाव | पृष्ठ | | नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रकरण ... ... | १ | ८ | अनुक्रम ... ... | १४ |
| २ | प्रकरण ... ... | १ | ९ | अध्याहार ... ... | १५ |
| ३ | प्रकरण ... ... | ३ | १० | विस्तार ... ... | १६ |
| १ | उत्प्रेक्षा ... ... | ३ | ११ | सजीवारोपण ... ... | १७ |
| २ | उपमा ... ... | ६ | १२ | उपलक्षण ... ... | १८ |
| ३ | रूपक ... ... | ८ | १३ | संबोधन ... ... | १८ |
| ४ | अन्योक्ति ... ... | ११ | १४ | उद्गार ... ... | १९ |
| ५ | अत्युक्ति ... ... | १२ | १५ | मायना ... ... | १९ |
| ६ | पृच्छा ... ... | १३ | १६ | प्रत्यक्षोक्ति ... ... | १९ |
| ७ | विरोध ... ... | १३ | ४ | प्रकरण ... ... | २० |

# शब्दालंकार

## प्रकरण १

भाषणाचा शुद्धाशुद्ध विचार करणारे यांनीं भाषा शुद्ध, स्पष्ट, आणि निःसंशय अर्थानें, लिहिण्याविषयीं अनेक नियम सांगितले आहेत; आणि त्यांनीं भाषेचा शोध करून त्यांस शब्दाचे प्रयोग करण्याच्या रीती आढळल्या त्यांस भिन्न भिन्न नावें योजिलीं आहेत; ह्या नावांमध्यें शब्दालंकार असें एक नाव आहे, त्याचें व्याख्यान या पुस्तकांत केलें आहे.

---

## प्रकरण २

बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कांहीं एका पदार्थाचें वर्णन करावयाचें असतां, त्या पदार्थाच्या साम्यतेचा दुसरा पदार्थ उदाहरणास घेऊन, त्याचे वर्णन केलें म्हणजे त्या वर्णनीय पदार्थाचा फार गौरव होऊन ऐकणाराच्या किंवा वाचणाराच्या अंतःकरणांत तें वर्णन फार ठसतें. अशा प्रकारच्या शब्द प्रयोगास शब्दालंकार म्हणतात. अलंकार रहित साध्या शब्दांनी वर्णन केलें असतां, अंतःकरणांत ठसत नाहीं; याचे प्रमाणार्थ खालीं दोहों जातींचीं भाषणें लिहिलीं आहेत.

| साधीं वाक्यें | अलंकृत वाक्यें |
|---|---|
| (१) त्याला दया फार आहे. | तो दयेचा सागर आहे. |
| (२) तो फार उदार आहे. | तो कर्ण आहे. |
| (३) त्याच्या पवित्रकाचे हिरे फार चांगले आहेत. | त्याच्या पवित्रकाचे हिरे नक्षत्रें आहेत. |
| (४) बाजीरावापासून पेशव्यांचें घराणें पराक्रमहीन झालें. | बाजीरावापासून पेशव्यांचें घराणें मावळलें. |
| (५) हा घोडा टाकला म्हणजे फार जलद जातो. | हा घोडा टाकला म्हणजे केवळ वारा आहे. |
| (६) त्याणें सामोपचाराचें भाषण केलें. | त्याणें साखर पसरलि. |
| (७) दुखणें लवकर येतें पण हळूहळू जातें. | दुखणें हत्तीच्या पायांनीं येतें आणि मुंगीच्या पायांनीं जातें. |
| (८) ते लोक चोहोंकडे चार गेलें. | आंवळ्यांची मोट फुटली. |

शब्दालंकारयुक्त भाषणें मनुष्यांस शिकावीं लागत नाहींत. जशी जशी मनाची स्थिति असेल तशी तशी ती स्वभावानें उत्पन्न होतात. विद्वान्, मूर्ख, मूल, वृद्ध आदिकरून सर्वांस अशीं भाषणें बोलावयाचीं ठाऊक असतात. कदाचित् विद्वानापेक्षां आडाणीं माणसें शब्दालंकार करण्यांत फार प्रवीण असतात. आणि साध्या भाषणापेक्षां कवितेंत अलंकार फार असतात.

### उदाहरण अभंग

संतनिंदा ज्याचे घरीं ॥ घर नव्हे ती यमपुरी ॥
तुका म्हणे विंचू नांगी ॥ तैसा दुर्जन सर्वांगीं ॥
कावळ्याच्या गळां मुक्ताफळ माळा ॥ तरी काय त्याला भूषण तें ॥
तुका म्हणे ऐसें अभाविकजन ॥ त्यांशीं वाया शीण करूं नये ॥

मनास विकार किंवा निमग्नपणा, किंवा हे शोक, जस जसे असतील तसतशीं अलंकारयुक्त भाषणें निघतात; यास्तव रागानें बोलणारा किंवा जीव लावून बोलणारा किंवा काळजीनें भाषण करणारा, हे अलंकारांचे प्रयोग फार करितात.

---

## प्रकरण ३

शब्दालंकाराचे प्रकार बहुत आहेत ते अनुक्रमानें सांगतों.

(१) उत्प्रेक्षा हा एक अलंकार उत्प्रेक्षा आहे. हा नेहमी भाषणांत येतो; याची योजना अशी आहे कीं ज्या गोष्टी विषयीं वर्णन करावयाचें असतें त्याचे गुण दुसऱ्या ज्या पदार्थांत असतात; त्या पदार्थाचें नाव घेऊन वर्णन करावयाचा पदार्थ तो हाच असें भाषण करणें, येणेंकरून साध्या रीतीनें बोलण्याहून अधीक चमत्कार, ऐकणाऱ्यास वाटतो. ज्या पदार्थाचें वर्णन करावयाचें तो, आणि जो दृष्टांतास घ्यावयाचा तो हे दोनही पदार्थ वस्तुतः पाहिले तर भिन्न असतात; परंतु या पदार्थांचें गुण त्याजवर आहेत, इतकी गोष्ट बोलणारा मनांत अणून हाच तो पदार्थ, असें बोलतो हें वास्तविक पाहिलें तर मिथ्या आहे; परंतु भाषणास शोभा फार येते. जसें, "हा शिपाई घरांत असतां चोरटे आंत येण्याची प्राप्ति काय " या साध्या भाषणापेक्षां असें जर कोणी बोलला, तर चमत्कार होतो. "हा वाघ घरांत असतां चोराचें पाउल शिरकेल काय?" जे गुण शिपायाच्या अंगीं आहेत ते वाघाच्या अंगीं आहेत म्हणून बोलणाऱ्यानें त्या शिपायास वाघाची उपमा द्यावयाची सोडून त्यासच वाघ असें कल्पिलें. परंतु तो वाघ नव्हे हें उघड आहे. यांत असें दर्शिविलें कीं, बोलणाऱ्याच्या मनांत तो वाघासारिखा आहे हें खरें, परंतु त्यास वाघाचें आणि त्याचें साम्य इतकें जवळ वाटत होतें कीं त्याणें त्यास अभेदें करून तोच असें म्हटलें; आणि बोलणाऱ्याचे मनांत असा भाव होता कीं, मला जसा हा शिपाई दिसत आहे, तसा हा जर करितां, "वाघासारखा आहे." असें म्हटलें तर ऐकणाऱ्यास तसा दिसणार नाहीं; यास्तव त्याचें पूर्ण वर्णन करण्याकरितां आणि ऐकणाऱ्यास पक्केपणें समजण्या करितां बोलणारा समजतो कीं यास वाघ म्हणावा हें उत्तम. याचीं आणखीं उदाहरणें अशीं आहेत कीं ज्या मनुष्याचे संगतीनें आपला नाश होणार, त्याविषयीं आपण म्हणतों कीं, "या फुटक्या नावेंत बसावें कोणी?" आणि एखादा खुनशी माणूस असतो त्याविषयीं आपण म्हणतों कीं, "हा सर्प आहे कधीं विसरणार नाहीं." आणि चार भाऊ चांगले आहेत आणि पांचवा वाईट असला म्हणजे म्हणतों कीं, " ही तुळशींत भांग कोठून उगवली." वास्तवीक पदार्थाचें नाव गांव सोडून दुसरा पदार्थ पुढें करून त्याचे अनुसंधानानें भाषण केलें म्हणजे ती उत्प्रेक्षा म्हणावी. आपल्यास कोणी सहाय्य केलें असतां त्याला असें

म्हणतों कीं, "तुम्ही आमचे सारथी आहा" कोणीं रक्षण पोषण केलें असतां त्याला म्हणतों कीं, "तुम्ही आमचे मायबाप आहां" "विशेष राग येण्याचें भाषण करूं नकां." या भावें म्हणतों कीं, "अहो विस्तवावर तेल ओतूं नकां." "रोज दिवाळी" "माळेचे मणी" इत्यादी सर्व उत्प्रेक्षा आहेत.

ज्ञानेश्वर म्हणतात. दुष्ट असा असतो कीं (अध्याय १६ ओंवी ४२)

आणी मन सर्पाची फुटी ॥ डोळे नारांच्याची सुटी ॥
बोलणें ती वृष्टि ॥ इंगळाची ॥ १ ॥

तुकाराम म्हणतात कीं—

परद्रव्य परनारी। अभिलाषूनिनाक घरी ॥ जळो तयाचा आचार। वायां भार वाहे खर ॥१॥
सोंवळ्याची स्थिति। क्रोधें चिटाळला चित्तीं ॥ तुका म्हणें सोंग। दावा बाहेरील रंग ॥१॥

यावरील उदाहरणांत "इंगळाची वृष्टि." आणि "भार वाहे खर" हे अलंकार आहेत. बोलण्यांत बहुत करून उत्प्रेक्षा संक्षिप्त असते. परंतु लिहिण्यांत ऐखादे वेळेस ती विस्तीर्ण करितात. म्हणजे एखादा कवी असें म्हणतो कीं, राज्य हा एक रथ आहे. राजा हा आंत बसणारा त्याचा प्रधान तोच सारथि. चाकें हेंच सैन्य. घोडा हाच सेनापति, इत्यादि लांबच वर्णन करितात.

(२) उपमा हा एक अलंकार उपमा आहे. उत्प्रेक्षेस आणि उपमेस इतकेंच अंतर आहे कीं उत्प्रेक्षेंत उपमा दाखवीत नाहीं. अमुक पदार्थ अमक्या सारिखा आहे; असें न बोलतां अमुक पदार्थ अमकाच आहे असें बोलतो. आणि उपमा इतकी पुढें जात नाहीं. उत्प्रेक्षा असत् आहे. आणि उपमा सत् आहे कारण कीं ती सादृश्य भाव स्पष्ट करून दाखविते. उपमेनें बोलण्यांत फार रस येतो. दृष्टांतास पदार्थ जो घेतला असतो तो जितका योग्य असेल तितका चमत्कार विशेष होऊन ऐकणाऱ्याचें मन तृप्त होतें, जसें "राजपुत्राचें मुख पूर्ण चंद्रासारखें होतें." आणि "त्याचे अंगावरील दागिने नक्षत्रांसारिखे शोभत होते." "हा उंस साखरे सारिखा गोड आहे." "या घोड्याची मान मोरासारखी आहे." एका कवीचा श्लोक आहे कीं.

भल्याच्या संगानें अवगुण गुणाचा गुण दिसे ॥
कुसंगा संगानें सुगुण गुणतो लोपतसे ॥
जसें खारें पाणी पिउनि घन जे गोड करिती ॥
फणी दुग्धालागीं पिउनि गरलाते चिव मिती ॥ १ ॥

दुसरा कवी म्हणतो

समर्थाश्रया केलिया जाण पाही ॥ विना प्राक्तनें प्राप्त होणार नाहीं ॥
जसा वासुकी शोभतो शीव कंठी ॥ परि वायु भक्षुनिया काळ कंठी ॥ १ ॥

तुकारामाचा अभंग

वृंदावनफळें ॥ घोळीशी शर्करा ॥ भीतरील धारा न मोडेची ॥ १ ॥
तैसें दुर्जनाचे ॥ न जाती दुर्गुण ॥ स्वभाव कठीण ॥ म्हणोनियां ॥ २ ॥
(दुसरा अभंग) शृंगारिला ज्ञानेंविण ॥ जैसा गाढवावरी जीन ॥ ३ ॥
(तिसरा अभंग) अहोसर्वांगी निर्मळ ॥ चित्त जैसें गंगाजळ ॥ ४ ॥

साधुची स्तुति ज्ञानेश्वर करितात अध्याय १२

तो सर्व भूतांचे ठायीं। द्वेषोतें नेणेचि कांही ॥ आप पर नाहीं। चैतन्य जैसा ॥ १ ॥
उत्तमातें धरिजे। अधमा तें आव्हेरिजे ॥ हें कांहींच नेणें। वसुधाजेंवी ॥ २ ॥
गाईची तृषा हरूं। व्याघ्रा विषहोउनिमारूं ॥ ऐसें नेणेंचि कोकरू। तोय जैसें ॥ ३ ॥

साधारण भाषणांत व लिहिण्यांत व कवितेंत उपमा बहुत येतात, व ग्रंथ वाचणारे आहेत त्यांस नेहमी सुंदर उपमा आढळतात विषासारखें कडु, ध्रुवासारखें अचळ, पर्वतासारिखें प्रचंड, आईसारिखी ममता, विद्येसारिखें भूषण, इत्यादि उपमा जाणाव्या.

(३) रूपक म्हणून एक रूपकभाषणांत अलंकार आहे. त्यामध्यें एकाचें वर्णन करावयाचे असतां, त्याचें नाव न घेतां दुसऱ्या पदार्थाचे वर्णन करितात. उत्प्रेक्षा आणि रूपक यांस असे अंतर आहे कीं, उत्प्रेक्षेंत मूळच्या पदार्थाचें नाव घेऊन तो अमुक असें सांगतो. आणि रूपकांत मूळच्या पदार्थाचें नाव अगदींच घेत नाहीं, आणि दुसऱ्याचे रूपानें त्याचें वर्णन करितो. या प्रकारचे वर्णनाचा अर्थ दिसतो एक आणि असतो एक. अजामीळ अख्यान, गजेंद्रमोक्ष अख्यान, व्रतकथा इत्यादि रूपकें पुराणांत बहुत आहेत. त्याचा हेतु बोध आहे. आणि जर एखाद्या मनुष्याकडून त्याची चूक त्याचे तोंडानें कबूल करवावयाची असेल तर रूपक मोठें उपयोगी पडतें. रूमचे राजधानीचे इतिहासांत एक गोष्ट आहे कीं, "मोठे मोठे सरदारांच्या नेमणुकी वगैरे खर्चाबद्दल लोकांवर कर फार बसले म्हणून सर्व शहरचे लोक रुसून गांवाबाहेर जाऊन बसले; तेव्हां एका गृहस्थानें त्यांजकडे जाऊन त्यास रूपक सांगितलें कीं, हात पाय नाक डोळे वगैरे अवयव पोटावर रुसले. आणि म्हणाले कीं, आम्ही मेहनत करून यास खावयास घालतो. आणि हें पोट कांहीं उद्योग करीत नाहीं; तेव्हां ते सर्व रुसून पोटाकरितां मिळवण्याची तजवीज करीनांत. दोन दिवस गेले तों हातपायांची शक्ति गेली आणि डोळे आंत ओढले; तेव्हां त्यांनी विचार केला कीं, पोटास खावयास घातल्या खेरीज आपला निभाव नाहीं. असे म्हणून पुनः पूर्ववत् उद्योगास लागले." ही गोष्ट ऐकून ते सर्व लोक फजित होऊन माघारे आले. आतां या रूपकांत पोट तें सरदार. हात पाय हे लोक, असा वास्तविक अर्थ आहे; परंतु बाह्यात्कारीं ही गोष्ट तिऱ्हाइताची आहे. यास रूपक म्हणावें. ईसबनीति पंचोपाख्यान हीं सर्व रूपकें आहेत. एका राजास जुलूम करूं नये. म्हणून बोध करावयाचा होता; तेव्हां त्याचे प्रधानानें अशी युक्ति केली कीं, पक्ष्यांची भाषा आपल्यास समजते अशी गप्प उठविली ऐके दिवशीं राजा शिकारीस गेला; तेव्हां एका पडलेल्या घरावर झाड उगवलें होतें तेथें दोन भालू ओरडत होत्या तेव्हां राजानें प्रधानास सांगितलें कीं तूं भालू काय म्हणतात तें ऐकून ये. नंतर तो झाडापाशीं जाउन कान देऊन सोंग करून उभा राहिला. आणि त्या उठून गेल्यावर परत आला नंतर राजानें विचारिलें कीं काय बोलल्या ? तेव्हां प्रधान भीतभीत बोलला की, मला समजलें परंतु मी कसें सांगावें ? तेव्हा राजानें आग्रह केला. आणि स्वस्थपणानें सांगावें अशी आज्ञा केली तेव्हां प्रधान म्हणतो कीं, राजा एक भालू पक्षी दुसऱ्या पक्ष्याचे येथें येऊन त्यास म्हणत होता कीं माझ्या मुलास तूं मुलगी देणार. तेव्हां मला पंनास गांव ओसाड आंदण देशील तर मी मुलगी करीन; तेव्हां दुसरा पक्षी म्हणाला. अरे त्याची काळजी अगदीं करूं नको. या देशचे राजास आयुष्य मात्र असावें. पन्नासांच्या ठिकाणी शंभर दोनशे गांव देईन. हें भाषण राजाचे अंतःकरणांत खोंचून त्यानें जुलूम सोडून दिला.

अविश्वासू आणि मित्रा याच्या संगतीनें घात होतो हा बोध करण्याकरितां एकानें गोष्ट सांगितली कीं. एका कोल्ह्याचे स्त्रीनें वाघाचे घरांत राहण्याचा आग्रह नवऱ्यास केला. तेव्हां तो तेथें येऊन राहिला. नंतर संध्याकाळीं वाघाची येण्याची वेळ झाली तेव्हां आपण बाहेर येऊन बसला. आणि स्त्रीस सांगितलें कीं, मला तूं वाघाचे मांसाविषयीं पूस. वाघ येत आहे तों आंतून कोल्ह्यास ती पुसते कीं महाराज मला वाघाचें मांस पाहिजे. तेव्हां त्यानें जबाब दिल्हा कीं, एकाचें पुरें असलें तर तयार आहे. हें ऐकून वाघ पळाला. तों वानर त्याचा मित्र पलीकडचे झाडावर होता तो त्यास म्हणाला कीं, अरे वाघा उभा राहा. हें सर्व थोतांड आहे; परंतु तो उभा राहीना. आणि तसाच पुढें गेला; तेव्हां वानरानें त्याचे पाठीस लागून जाऊन त्यास उभा करून समजून सांगितलें तेव्हां त्यानें असे सांगितलें कीं, "वानरा तू माझ्या बरोबर चल" तेव्हां वानरानें कबूल केलें, तथापि वाघ म्हणाला "तुझ्या आणि माझ्या शेंपटांस गांठ देऊं, म्हणजे माझ्या जिवाची खात्री होईल." तेंही वानरानें कबूल केलें, नंतर ते दोघे एकामेकांशीं बांधलेले घराजवळ आले तों कोल्हा वानरास म्हणाला 'अरे वानरा तुला दाहा वाघ आण म्हणून सांगितलें, परंतु तूं एवढ्या संध्याकाळीं एकच

घेऊन आलास!' हें ऐकून वाघाच्या मनांत आलें कीं हा वानर कपटी आहे. मला फसवितो; असें जाणून तो पळाला. तेव्हां वानर बिचारा पाठीमागें आपटून आपटून मेला.

या प्रकारच्या सर्व गोष्टी रूपकें जाणावीं. प्रीति दाखविण्याकरितां एक गोष्ट अशी आहे कीं, एक दांपत्य डोहांत बुडत होतें, तेव्हां कडेच्या लोकांनीं त्यास काढावयाकरितां पानबुडे पाठविले. तों एक पानबुड्या येऊन त्या दांपत्यांतून नवऱ्याचा हात धरूं लागला, तों त्यानें आपले बाईकोकडे हात दाखऊन म्हणाला कीं, तिला काढ. आणि प्रसंग असा होता कीं नवरा अगदीं बुडत होता; तेव्हां याची प्रीति म्हणावी इत्यादि सर्व गोष्टी रूपकें जाणावीं.

## अन्योक्ति

(४) अन्योक्ति म्हणून एक अलंकार आहे. त्यामध्यें चांगले शब्द बोलून अर्थ अगदीं उलटा निघतो. जसें, "तुम्ही शाहाणेच आहां." "तुम्ही थोरच आहां." "तुम्ही भले माणूस आहा." इत्यादिकांचा उलटा अर्थ होतो, म्हणजे शाहाण्याचा वेडा. थोराचा हलका. भल्याचा लबाड. असा विपरीत अर्थ होतो, निंदा करण्यांत अन्योक्तिचा फार उपयोग पडतो. अन्योक्ती कधी कधी बोलणारा आपल्यावर घेतो. जो दुसऱ्यावर दोष ठेवावयाचा तो आपल्यावर घेतो; आणि तेणेकरून दुसऱ्याची फजीती करितो. जसें, "तुमचें इतकें काम करून मीच लबाड." म्हणजे तुम्ही लबाड, आणि अन्योक्तीचा आणखी असा प्रकार आहे कीं, बोलणारा कबूल करून नाकबूल केल्याचा अर्थ दर्शवितो. जसें "होय खरी गोष्ट." "तुम्ही चांगलें केलें" म्हणजे ही गोष्ट खोटी. तुम्ही वाईट केलें असा अर्थ होतो. बोलणाऱ्याचे स्वरुपावरून आकृतीवरून डोळ्यावरून अन्योक्ति तेव्हांच लक्षांत येते.

## अत्युक्ति

(५) अत्युक्ति म्हणून एक अलंकार आहे, येणेंकरून बोलणारा आपली गोष्ट वाढऊन दाखवितो, किंवा लहान करून दाखवितो. जसें, लांब कागद असला तर म्हणतात कीं, "ही बखर कोण वाचील" कोणी वाईट करीत असला तर म्हणतात कीं, "याने प्रलय मांडला आहे" कोणी काम लवकर केलें म्हणजे म्हणतात कीं, "त्यानें हें काम क्षणांत केलें" थोडें पाणी असलें म्हणजे म्हणतात कीं, "या तळ्यांत थेंबभर पाणी नाहीं." तळ्यांत जरी पांच हजार थेंब असले तरी थेंब भर नाही असें म्हणतात. तेव्हां थेंब या शब्दें करून विपुळतेचा अभाव उत्कर्षेकरून वर्णिला इतकाच त्या भाषणाचा अर्थ होतो. हा अलंकार प्राचीन व अर्वाचीन काव्यांत बहुत ठिकाणी आहे. रामायणांत लंका सुवर्णाची वर्णिली आहे. त्याचा अर्थ तेथील घरें दारें सोन्याचीं होतीं असा नाही. परंतु तेथें द्रव्य फार होतें इतकाच बोध आहे.

## पृछा

(६) पृछा हा एक अलंकार आहे. येणेंकरून बोलणारा प्रश्न करितो, परंतु तेणेंकरून निश्चय सुचवितो. अक्षरांचा अर्थ पाहिला तर संशय असावा आणि अलंकाराचा हेतु तर दृढ निश्चय असतो. साध्या शब्दांनीं निश्चय बोलणें यापेक्षां या अलंकाराचा गुण इतका जास्त आहे कीं, त्यामध्यें असा अर्थ उत्पन्न होतो कीं, कोणीही त्या गोष्टीची चौकशी केली तर चिंता नाहीं. आणि ती गोष्ट अशी आहे हें सांगण्यांत कांहीं कपट नाहीं. हें दर्शविलें जातें. जसें, "या गोष्टीचा पुरावा नाहीं काय ?" म्हणजे या गोष्टीचा पुरावा आहे यांत तिळमात्र संशय नाहीं, आणि कोणीही हें शोधून पाहिलें तर हेंच सत्य आढळेल. इतका अर्थ या अलंकारानें दर्शिवला जातो.

कवि म्हणतो-

उडदामाजी काळें गोरें ॥ काय निवडावें निवडणारें ॥
कुजली याचीं वृक्ष फळें ॥ मधुर कोठुनि असतील ॥ १ ॥

या प्रश्नें असें सुचविलें आहे कीं, कुजलीयाचीं फळें कदापि मधुर असावयाचीं नाहींत. आणि ही गोष्ट इतकी उघड आहे को, याची परीक्षा पहावयास नको.

## विरोध

(७) विरोध हा एक अलंकार आहे. येणेंकरून बोलावयाच्या पदार्थाचे शेजारीं विपरीत पदार्थाचें प्रदर्शन करून तेणेकरून पहिल्याची सबलता करितात. अशा रीतीस विरोधालंकार म्हणतात. उदाहरण. "त्या घरांत माशी नाहीं, मग माणूस कोठून असणार." यांत माणसाहून कमी पदार्थ माशी ती बोलून त्यानंतर माणसाचें नांव घेतलें, येणेंकरून माणूस नाहीं, या अर्थाचें दढीकरण, साध्या शब्दांनीं फक्त माणूस नाहीं असें बोलण्यापेक्षां, अधीक जालें. दुसरें उदाहरण, असें आहे कीं, "अहो जेथून धावणें यावयाचें तेथून दरवडा आला, हें म्हणणें शोभत नाहीं." धावणें म्हणजे चोर आले असतां त्यास धरावयास व मिळकत संरक्षण करावयास राजाचे दूत तांतडीनें धावत येतात ते. तेव्हां दरवड्याचा विरुद्ध पर्याय आहे. हा प्रथम दाखऊन नंतर दरवड्याचें नांव घेतलें येणेंकरून विशेष दढता त्या भाषणास आली. हा विरोध जसा बोलण्यांत आहे. तसा दृष्टि वगैरे इंद्रियांचे ठिकाणीं आहे. जसें, गरीबी माहीत असल्याशिवाय श्रीमंतीची चव नाहीं. लहान पदार्थ पूर्वी पाहिल्याशिवाय मोठ्याची किंमत समजत नाही यास्तव जवाहीर विकणारे लोक प्रथम वाईट रत्न दाखवितात नंतर उत्तम रत्न दाखवितात तेणेंकरून त्याचा चांगलेपणा विशेषेंकरून नजरेंत भरतो.

## अनुक्रम

(८) अनुक्रम म्हणून एक अलंकार आहे. यामध्यें दोन चार किंवा अधीक पर्यायांचे अनुक्रमानें चढण, किंवा उतरण, करून बोलतात; परंतु त्या सर्व पर्यायांचे धोरण मुख्य गोष्टीकडे असतें. जसे घाशीराम कोतवाला विषयीं बोलतात कीं "अहो हा शहरचा कोतवाल, याणें कोणास मृत्यूची शिक्षा देऊं नये. त्यांत त्याणे तर ब्राह्मणास मारिलें, तेंही कोंडून, आणखी निरपराध, तस्मात् फारच वाईट केलें." बाजीरावाविषयी म्हणतात. कीं "त्याचे मंत्री वाईट होते. आणखी सरदार सर्व नाखुषी, स्वतः मूर्ख, तेव्हां राज्य कशास राहील?" दागिन्या विषयीं म्हणतांत कीं, "सोन्याचा दागिना, त्याजवर उजळा, त्यावर हिरे, तेव्हां मग काय शोभा पाहावी." विद्वानाविषयीं म्हणतात कीं; "या सारिखा गांवांत नाहीं व प्रांतांत नाहीं, व देशांत ही नाहीं." यास अनुक्रम म्हणावा. यापासून बोलण्यांत फार चमत्कार आहे. कवितेंत हें अलंकार पुष्कळ येतात. कोठें दुर्योधनाविषयीं म्हटलें आहे कीं, "स्त्रीचा छळ करू नये, त्यांत बंधूची स्त्री, त्यांत सभेंत, तेव्हां त्यानें फारच अनुचित केलें." दुःखाचें वर्णन कोणी करितो कीं, "अरे बाबा मी वृद्ध झालों, मला उठावयाची शक्ति नाहीं, तशांत जवळ काय होतें तें चोरानें नेलें, घर जळालें, एक बंधु होता तो ही मेला. मुलगा एकच होता तोही वारला, माझे दुःखास पारावार नाहीं." यामध्यें एकाहून एक अधीक अनर्थ सांगितले आहेत. शेवटीं सर्वांहून अधीक तो सांगितला. अशा बोलण्यास अनुक्रम म्हणावा. मुख्य गोष्ट सांगावयाची असती ती एकदांच न सांगतां दोन चार पायऱ्यांनीं ती पुढें दाखवितात. यांचें नाव अनुक्रम.

## अध्याहार

(९) अध्याहार हा एक अलंकार घरगुती बोलण्यांत वगैरे पुष्कळ येतो. याचा प्रकारअसा आहे कीं, कितीएक शब्द टाकून देतात परंतु त्याचा अर्थ समजतो. जसें, दोघे खोलींत बोलत होते, आणि सेवकास सांगितलें कीं, "कवाड" लाव, याचा लोप झाला. "कोण" म्हणजे इतक्या-वरून कोण आहे, कोण आला; हे अर्थ निघतात. "अरे तेल" म्हणजे दिवा जात आहे. तेल आण; परंतु तितके शब्द बोलणारा बोलत नाहीं.

## विस्तार

(१०) विस्तार या अलंकारांत एकाविषयीं बोलावयाचे असतां त्यासंबंधी पाल्हाळ करून सांगतो. अध्याहाराशीं विस्तार हा विपरीत आहे. अध्याहारांत त्वरा आहे; विस्तारांत सावकारी आहे. विस्ताराच्याही बोलण्यांत फार चमत्कार आहे. जसें, "मी आपल्या डोळ्यानीं त्यास पाहिला." फक्त पाहिला असें म्हटलें तरीं होईल; परंतु डोळ्यांनीं हे शब्द विस्ताराचे घातले आहेत. येणेंकरून बोलणाऱ्याचे मनात जी गोष्ट फार असते. तिचा उद्‌गार तो बहुत शब्दांनीं करितो. "ईश्वरानें सर्व जग निर्माण केलें" यात सर्व आलें. परंतु विस्ताराने बोलणारा त्यास आणखी तपशील लावतो कीं, "ईश्वराने जग निर्माण केलें, सूर्य, चंद्र, पृथ्वी, हीं त्याणेंच केलीं, मनुष्यास बुद्धि त्याणेंच दिल्ही, नाना प्रकारचे जीव जंतू त्याणेंच केले." इत्यादी हा विस्तार झाला. एक शब्दांत जो अर्थ निघतो, तोच पन्नास शब्दांत काढणें यास विस्तार जाणावा. याचें तात्पर्य असें आहे कीं, बोलणारा विस्तार करितो आणि तो आपली उत्कंठा दाखवितो; व वारंवार तीच गोष्ट शब्द फिरवून सांगतो, जसें, ईश्वराची प्रार्थना करितात कीं हे भगवान्, तुझी दया व्हावी, आणि या गरीबाची विनंती परिसावी, तूं या दीनाकडे पाहा. या अनाथाकडे दृष्टि फिरीव. इत्यादि विस्तारेंकरून प्रार्थना व धांवा करितात.

## सजीवारोपण

(११) सजीवारोपण हा एक अलंकार आहे. याजमध्यें निर्जीव पदार्थ व सजीव पदार्थाच्या लक्षणानें वर्णितात. जसें, "सर्व व्यापारांत धर्म आपला सोबती असावा." "वेद पुरुष त्यास प्रसन्न आहे." शेतकऱ्याविषयीं आपण म्हणतों कीं "यंदा जमीनीनें त्यास हात दिला." या तीन्ही वाक्यांत निर्जीव पदार्थ सजीव मानून वर्णन केलें आहे. धर्म यास सोबती माणूस म्हणजे त्याचे आश्रयानें जावयाचें अशी कल्पना केली आहे. वेद हें सर्वांहून मुख्य धर्मपुस्तक आहे. त्यास पुरुष मानून त्याची प्रसन्नता वर्णन केली येणेंकरून वेद जाणतो इतकाच अर्थ जाहाला. तिसऱ्यांत जमीनीचा हात असें लिहिलें तेणेंकरून असें सुचविलें कीं, जमीन ही कोणी जीवंत माणूस आहे. तिनें आपल्या सेवकास पडत असतां हात धरून उठविला, असें कल्पून तें भाषण जाहालें आहे. तशींच दुसरीं वाक्यें आहेत. "गंगामाता आपले बाळकांस निर्मळ करिते." "सर्वत्र आपल्यास सत्य रक्षक होय." "मराठी राज्याचे शिंदे, होळकर, हे डावे उजवे हात होते." व पेशवे केवळ शिर होय. "लक्ष्मी येऊं लागली म्हणजे कुटुंब सहवर्तमान येते." "एकादशीच्या घरीं शिवरात्र आली." "या कामानें आमचा छळ केला." "विद्येसारखा मित्र नाहीं." इत्यादि वाक्यांवरून निर्जीवांस सजीव कल्पिले आहेत हें लक्षांत येईल. व याप्रमाणें कल्पना पुराणांत व इतर कवितेंत अनेक ठिकाणी आहेत त्यांचा विचार केला म्हणजे लक्षांत येतें असें बोलण्याचें व लिहिण्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं, बोलण्यांस तेणेंकरून जीव आणि जोर येतो.

## उपलक्षण

(१२) उपलक्षण म्हणून एक अलंकार आहे. तेणेकरून ज्या पदार्थाविषयीं बोलावयाचें असतें त्याचा अंश घेऊन सर्वांचा अर्थ दाखवितात, किंवा ज्या पदार्थांत दुसरा पदार्थ मावलेला असतो त्याचें नाव घेऊन त्याचे आंतल्याचा अर्थ सुचवितात, जसें, "त्याला श्री काढतां येत नाहीं;" म्हणजे कांहीं लिहितां येत नाहीं. हा विस्तीर्ण अर्थ सुचविला. आणि "ती समयी चालली म्हणजे समयीमध्यें ज्योति आहे ती चालली. असा अर्थ होतो. "त्याचें घर बसलें." म्हणजे घरांतील कुटुंबांचीं माणसें नाहींशीं जाहलीं. "त्यास तरवारी मृत्यू आला." म्हणजे लढाईंत मेला. तरवार ही लढाईंतील एक अल्पभाग आहे. तेणेंकरून सर्वांचा निवेश झाला.

## संबोधन

(१३) संबोधन हा एक अलंकार आहे. येणेंकरून जो मनुष्य मेला आहे किंवा जो जवळ नाहीं त्यास हाक मारली असती, जसें, सीता रावणानें नेली, आणि राम वनांत फिरून "हे सीते कोठे गेलीस अशा हांका मारीत होता. येणेंकरून अंतःकरण अतिशयित खवळलें असतें, आणि तेणेंकरून विस्मृति होऊन अशी हाक मारितात. याचें उदाहरण. कोणी मेला म्हणजे त्याचें नाव घेऊन हाका मारितात. हें आहे येणेंकरून अत्यंत ममता प्रगट होते.

(१४) उद्गार हा एक अलंकार आहे तेणेंकरून आश्चर्य, क्रोध, आनंद, किंवा दुःख, हे मनाचे विषय दर्शिवले जातात. हें संबोधनच आहे, परंतु त्याचें उत्तर कोणी करावें. असें बोलणाराचे मनांत नसतें, उद्गारानें बोलणारा इतकें दाखवितो कीं, त्या गोष्टीविषयीं अत्यंत आश्चर्य होत आहे ! "हे सागरा काय तुझी विस्ती विस्तीर्णता ! आणि तूं ईश्वराची सत्ता सुचवितोस इत्यादि.

## मायना

(१५) मायना हा एक अलंकार आहे. येणेंकरून कोणी एका पुरुषाचा गुण पाहून त्या गुणाचें दर्शक विशेषण त्यांचे नावामागें लिहितात. जसें, "राजश्री नारोपंत" "सकळ गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राम भाऊ" श्रीमंत, राव, पंत इत्यादि सर्व मायने आहेत. बहुत दिवसाचे वहिवाटीवरून हे मायने ज्या पुरुषामध्यें गुण नाहींत त्यासही लिहितात. हे अलंकारार्थ आहे. वस्तुशः वास्तविक अर्थ त्याचा नसतो.

## प्रत्यक्षोक्ति

(१६) प्रत्यक्षोक्ति हा एक अलंकार आहे. तेणेंकरून बोलणारा बोलतां बोलतां तृतीय पुरुष सोडून ज्या विषयीं बोलत असतो त्याचें बोलणें बोलतो, जसें. "पानपतचे लढाईत मुसलमानाचा वरचढ होतो, असें भाऊसाहेबानें पाहून तात्काळ हत्तीवरून खालीं उतरले. आणरे पट्टे आज हिंदुचें निशाण बुडत आहे. आणि हें अपेश माझे कपाळीं आहे. यास्तव मी आपली पराकाष्टा करीन यानंतर परमेश्वर समर्थ आहे." यांत बोलणाऱ्यानें असें दाखविलें कीं, आपण जसा लढाईंत उभा आहे. आणि हुकूम करीत आहे. वास्तवीक पाहिलें तर हा कोणीकडे, आणि गोष्ट झाली कधीं, आणि कोणीकडे, परंतु हें एक लाघव आहे. या रीतीचीं भाषणें कथेंत पुष्कळ येतात.

---

## प्रकरण ४

याप्रमाणें भाषणाचे सोळा अळंकार तपशील वरतीं लिहिले आहेत. येणेंकरून अलंकारशास्त्रात काय विचार केला आहे त्याचा मासला ध्यानांत येईल. आणि हें शास्त्र कवींनीं केलेल्या ग्रंथाचा आणि इतर भाषणाचा यथार्थ समजण्यास किती जरूर आहे हेंही लक्षांत येईल. या शास्त्राचे ज्ञानावांचून अर्थाचे अनर्थ वाचणारे करूं शकतील कीं नाहीं याचा विचार करणें योग्य आहे. आणि या शास्त्राची शिक्षा असल्यावांचून भाषणाचा अर्थ खरा समजावयाचा नाहीं हें पक्कें जाणून याचा अभ्यास करावा हे विनंती.

# खोटी शपत वाहूं नये आणि खोटी साक्ष देऊं नये

याविषयीं

# लोकांशीं संभाषण

---

हें पुस्तक "भरतखंडपर्व" कर्त्यांनें हिंदुस्थानांतील

लोकांचे हिताकरितां रचिलें आहे आणि तें

पुणें येथें

ज्ञानप्रकाशछापखान्यांत

छापिलें

सन १८५१

शके १७७३

किंमत रुपयास प्रती तीन

# खोटी शपथ

अहो लोकानों, अहो माझ्या स्वदेशीय मित्रानो, मी तुमचे अत्यंत हिताकरितां एक चांगली गोष्ट सांगतों. ती तुम्ही पुर्तेपणी लक्ष देऊन ऐका. तुमचें सर्वांचें कल्याण व्हावें एवढीच माझी इच्छा आहे. म्हणून मी तुम्हास बोध करित आहे तरि याचा तुम्ही आपले मनाशीं विचार करून पाहिलात म्हणजे हा फार उपयोगी आहे. असें कळल्यावाचून राहणार नाहीं आणि मी म्हणतों ही गोष्ट खरी बाजवीं व यथार्थ आहे अशी तुमची पक्की खातरी होईल.

तुम्हा लोकामध्यें एक मोठा दुर्गण आहे तो पाहून मला फार दुःख वाटतें आणि त्यापासून तुमचा मोठा घात होतो हें मी बहुत वेळ पाहिलें आहे. मला असें वाटतें कीं तुम्हास ही गोष्ट समजाऊन दिल्ही असतां तुम्ही सावध व्हाल. तुमचे दुर्गुणाचे उद्घाटण करणे हें ही मला दुःख कारक आहे. परंतु जर हें मी न करावें तर तुमचा दुर्गुण तुम्हास कळणार नाहीं आणि तुमच्या हिताची गोष्ट मला समजला आणि ती तुम्हास मी न कळविली तर मग मी तुमचा मित्र कशाचा? यास्तव मी आतां तुम्हास तुमचा घातक शत्रु तुमच्या प्रपंचांत व्यवहारांत व परमार्थांत नेहेमी दगा करितो तो दाखवून देतो आणि हा स्पष्ट दाखविण्याकरिता जरी मी यद्यपि लाऊन बोललों तरी तें क्षमा करा मी तुमचा शुभचिंतक व तुमच्यांतीलच मी आहें. आणि माझा मनोरथ इतकाच कीं मी तुम्हास सांगतों हा दुर्गुण तुम्ही सोडून द्यावा आणि सुखी व्हावें आणि हा माझा मनोरथ ध्यानांत धरून जें मी बोलतों हें गंभीर पणानें ऐकून घ्या. आणि हें खरें किंवा कसें याचा विचार आपल्या मनात करा म्हणजे सहज लक्षांत येईल.

अस्तु तो दुर्गुण कोणता म्हणाल तर त्याचें नाव खोटी शपत. तुम्ही खोट्या शपता मनस्वी घेतां आणि ईश्वराचें कांहीं भय धरीत नाहीं हें मोठें पाप आहे. खोटी शपत हा केवढा अपराध आहे. आणि या पापापासून काय अनर्थ होतात हें लक्षांत न आणितां बहुत लोक निर्भयपणानें खोटी शपत घेतात हा अपराध या देशांत फार चालू आहे. असें मी जाणतों असेच नाहीं परंतु देशांतरीं व द्वीपांतरीं तुम्हा लोकांची बे अबरु फार प्रसिद्ध जाहली आहे. या गोष्टीचा तुम्ही विचार करीत नाहीं म्हणून तुम्हास लोक बाहेर काय म्हणतात. हें कळत नाहीं परंतु खोटी शपत घेण्याविशीं तुम्हास अगदीं काळीज नाहीं म्हणून चोहोंकडे नगारा झाला आहे. येविषयीं तुमची खातरी करण्यास मजवळ साधनें पुष्कळ आहेत त्यांतील एक आतां सांगतों म्हणजे बाकीची सांगावयास नको. शितावरून हांड्याची परीक्षा होईल.

एके बाईनें हिंदुस्थानच्या माहीत गारींचें पुस्तक* सन १८३३ सालीं लंडन शहरांत इंग्रजी भाषेंत छापिलें त्याचें प्रथम भागांत पान ८७ यांत असें लिहिलें आहे कीं,

"फौजदारी मोकदम्यांत कैदीनें गुन्हा केला आहे किंवा नाहीं हें ठरविण्यास हिंदुस्थानांत महत्प्रयास आहेत. याचें कारण कैदीस खोटी साक्ष देणारे लोक सहज मिळतात. खोटी साक्ष देणें हें पाप किंवा अधर्म हिंदु लोकांस वाटत नाहीं. या बदल शासन होईल हें त्यांस भय नाहीं. परंतु लोकांमध्यें स्तुति होईल असें त्यांस वाटतें मोठे पदवीचे लोक खोटी शपत करण्यास सांगतात आणि जो खोटी शपत करील त्यास शाबासकी देतात. त्याचे मनास कांहीं वाईट वाटत नाहीं. खोटे साक्षीदार पाहिजे तितके पाहिजे त्या प्रकरणांत एक एक आणा दिल्हा तर मिळतील अशी हिंदुस्थान देशचे लोकांची स्थिति सर विलीयम ज्योंन्स साहेब** लिहितो".

हें जें या साहेबानें लिहिलें आहे हें खरें किंवा खोटें याचा तुम्ही आपले मनांत विचार करून पाहा म्हणजे लक्षांत येईल. मला तर ठाऊक आहे कीं ज्याच्या योग्यता व विद्याही मोठ्या आहेत तेही खोटी शपत वाहण्यास प्रसंगीं कचरत नाहींत मग आडाणी लोकांचें काय बोलावयाचें आहे. सारांश या अपराधाची या देशांत मोठी प्रवृत्ति आहे तेव्हां या पापापासून तुमचे खुद व सर्व देशाचें व सर्व मनुष्यमात्राचें घात कसे होतात हेच आतां मी तुम्हास सांगतों.

प्रथम शपत म्हणजे काय ते ऐका. मनुष्याचा मुख्य धर्म असा आहे कीं सत्य भाषण करावें हाल्लीं जे पृथ्वीवर मनुष्यजातीमध्यें धर्म आहेत ते सर्व कबूल करितात कीं सत्यावांचून मनुष्यास सद्गति नाहीं. तत्रापि कितीएक दुरात्मे सत्य सोडतात यास्तव जेव्हां मोठा प्रसंग पडतो तेव्हां जी वस्तु अति पवित्र आणि अतिमान्य व जिचें नाव घेतलें म्हणजे लोकांस भय वाटावें अशा वस्तुचा नामोच्चार करून बोलणें याचें नाव शपत. हा संस्कार करितात. राजास न्याय करण्याचे कामांत वगैरे खरे बोलणें ऐकून घेण्याचें कारण फार पडतें म्हणून राज दरबारांत व न्याय सभेंत साक्षीदाराची साक्षि शपथ देऊन घेतात.

पूर्वीं शपथा अनेक प्रकारच्या होत्या. शूद्रास दाण्याची किंवा जमीनीची शपथ देत. ब्राह्मणास गाईची किंवा तुळशीची शफत देत. अथवा गंगा व गीता याची शपथ देत. परंतु हाल्लीं जी शपत देतात ती फारच मोठी आहे सन १८४० चा कायदा ५ यात शपथेचा उच्चार असा लिहिला आहे.

"मी परमेश्वर स्मरण करून आपले धर्मप्रमाणें अशी प्रतिज्ञा करितों कीं जी साक्ष मी देतों ती खरी होईल व जें मला माहीत आहे तें सर्व मी सांगेन व खोटी साक्ष देणार नाहीं."

याप्रमाणें प्रतिज्ञा करून आतां साक्ष घेतात तेव्हां परमेश्वराहून पूज्य व मान्य दुसरा कोणीच नाहीं त्यास साक्षीदार करून खरें बोलेन अशी प्रतिज्ञा करणें याहून मोठा प्रसंग राहिला नाहीं. आणि अशा समयीं राजाची व लोकांशीं प्रतरणा करून दुसऱ्याचा घात इछून स्वधर्मास व राजदंडास तुछ मानून परमेश्वराचा अपमान करून खोटें बोलणें हा केवढा दोष आहे याचें मी काय वर्णन करावें? या दुष्कर्मास खोटी शपत म्हणतात

पूर्वीं शपथेचा उच्चार लिहिला आहे त्यांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ पुरतेपणीं तुम्ही मनांत आणिला तर तुमचे ध्यानांत येईल कीं हा मोठा संस्कार आहे व स्वधर्म रक्षण होऊन परमेश्वराचा कोप न व्हावा व लोकांमध्यें असत्याची प्रवृत्ति होऊन अनर्थ न व्हावे असें ज्यास कर्तव्य असेल त्याणें शपथ मानली पाहिजे नाहीं तर धर्म बुडतो. ईश्वर कोप होतो हें खचित आहे आणि कदाचित

* इष्ट इनडिया स्केच् बुक बाय् अ लेडी. हें इंग्रजी नाव.

**हा कलकत्त्याचा जड्ज होता व यासारखा माहीतगार साहेब लोक आजपर्यंत झाला नाहीं याजकरितां त्याचे मताची योग्यता इंग्रज लोकांत मोठी आहे.

राख होईल हेंही खचित परंतु हें न झालें तरीं लोकामध्ये बेंअबरु तरी होईल. या जन्मामध्यें थोडे दिवस घालवण्याचे असतात परंतु पुढें धर्माशिवाय कोण तारणारा आहे व परमेश्वर सर्वत्र रक्षण करितो त्यास क्रोध आगला तर जग येथें अथवा पुढें आपली गति काय होईल हें मोठें भय आहे हें जग क्षणभंगुर आहे व धर्माकरितां महान्, साधु, ऋषी, योगी, भक्त, यांणी या जगांतील ऐश्वर्यास तुछ मानलें आहे. त्या धर्माची तुम्ही हेळणा यत्किंचित् लाभ किंवा भीड अशा क्षुल्लक कारणावरून करणें हा मोठा अनुचार व मोठा तोटा करून घेणें आहे. जो धर्म आपल्यास मोक्षास नेणारा ज्या ईश्वराच्या कृपेंत आपण बसलों आहों त्याची वंचना करणे याहून मोठें नुकसान नाहीं.

ईश्वर सर्व शक्तिमान् न्यायी आणि सर्व ठिकाणी पाहाणारा आहे त्याचा अवमान खोटी शपत केल्यानें घडतो. तो असा कीं जेव्हां तुम्ही शपत घेतां तेव्हा तुम्ही ईश्वराचें नाव घेऊन ईश्वरास साक्ष ठेवितां आणि तुम्हास माहीत आहे कीं ईश्वरास असत्य कधींही मान्य होणार नाहीं असें असून त्यास साक्ष ठेऊन जर तुम्ही असत्य भाषण कराल तर असा अर्थ होतो कीं तुम्ही दांडगाईनें असें मनांत आणितां कीं ईश्वर आमचें काय करणार आहे. ईश्वर कोठे पाहावयास आला आहे. सरकारी कायदा आहे म्हणून मात्र चालीप्रमाणें शपत घेतों परंतु ईश्वराचे नावापासून कांहीं भय नाहीं असें तुम्हास वाटतें असें उघड होतें किंवा तुम्ही जसे खोटे आहां तसाच ईश्वर तुम्हास असत्य बोलण्यास साहाय्य होईल असें तुम्हास वाटतें असा अर्थ होतो तेव्हां खोटी शपत वाहिली म्हणजे ईश्वराची सत्यता, न्याय, सर्वसाक्षित, सर्वशक्ति. हें सर्व नाकबूल केलेंसें होतें तेव्हां जे शपत करून खोटी साक्ष देतात ते मोठे नास्तिक होतात. ईश्वराचे नावास वायफळ मानून ईश्वरास असत्य अवडलें असें समजून त्याचा धिक्कार करील त्यास तो शासन मोठें देईल यांत संशय नाहीं आणि त्यास तुम्ही या परीक्षेच्या ठिकाणी म्हणजे मनुष्य जन्मामध्यें असा तुछ मानाल तर त्यास केवढं शासन करिता येईल याचा विचार त्याचे कृतीवरून पाहा हें सर्व ब्रह्मांड त्याणें केलें आहे अशीं अनंत ब्रह्मांडे त्याचे इछेनें होतात जातात. तेव्हां जे खोटी शपथ वाहणारे दुष्ट दुरात्मे महा नास्तिक आहेत त्याचे पापानें तो कोपेल यांत संशय नाहीं. जरी तुम्ही बहुत वर्षेपर्यंत त्याचे प्रसंन्नतेकरितां यज्ञ, होम, हवन, तप, पूजा, केल्या असतील तरी त्या या महत्पापानें व्यर्थ होतील. ईश्वराचे प्रसंन्नतेचे मुख्य चिन्ह हेंच आहे कीं त्यास राग येईल असें कर्म करण्यास भीती ज्याचे अंतःकरणांत उत्पन्न झाली नाहीं त्याजवर ईश्वर अनुग्रह झाला नाहीं हेंच खरें. जर मनुष्य सामान्य शक्तिमान असला आणि त्याची निंदा किंवा उपहास केला तर त्यास राग येतो व बहुत वर्षाची संपादन केलेली दया एका शब्दानें जाते. आणि लोखंडाचे बाणापेक्षां शब्दाचे बाण वाईट असें लोक म्हणतात तसेंच एक वेळ समजून उमजून जर ईश्वराचा अपमान केला तर तो बहुत पूजा व्यर्थ घालवील यांत संशय नाहीं. याजवर तुम्हास एक गोष्ट सांगतों. पूर्वीं पेशव्यांचे अंमलांत लोक भोळे होते तेव्हां अशी चाल होती कीं कोणी अगळीक जुलूम करूं लागला तर त्यास श्रीमंतांची द्वाही घालीत म्हणजे श्रीमंताच्या नावास भिऊन त्याचे कानावर मजकूर घातल्याखेरीज कोणी कांहीं ज्यास्ती जुलूम करूं नये कारण की श्रीमंतास द्वाहीचा अपमान झाल्याचें कळलें तर शासन होत असे. एकदां मोरोबा फडणीस हा पुण्यांत वाडा बांधित असतां त्यास एका शेजाऱ्याचे घराची अडचण झाली म्हणून तो तें घर पाडूं लागला तेव्हां त्या गरिबानें त्यास श्रीमंतांची द्वाही दिल्ही तीही त्याणें न ऐकिली आणि पाडावयाचें काम चालविलें नंतर श्रीमंताकडे फिर्याद गेली तेव्हां मोरोबा जरी माधवराव थोरले पेशवे यांचा मित्र व मुछदी होता तरी त्याजवर इतराजी झाली. तेव्हां मनुष्यास असा अपमान झाला तर राग येतो मग ईश्वरास येईल हें काय सांगावें याचा विचार करा.

खोटी शपथ केल्यापासून ईश्वराचा अपमान होतो हें एक पाप सांगितलें. आतां दुसरें पाप सांगतों. खोटी शपथ घेऊन खोटी साक्ष दिल्ही म्हणजे राज्याचा व राजाचे नियमाचा म्हणजे कायद्याचा अपमान होतो हेंही मोठें पाप आहे. राज्याची प्रतिष्ठा बापासारखी प्रजेनें करावी हा

प्रजेचा धर्म व त्याणें जें लोक संरक्षणाकरितां कायदे केले ते सर्वांनी मान्य करावे हे योग्य. कोणी मान्य न केले तर तो शासन करितो परंतु त्याशीं प्रतरणा करून न्यायसभेंत शफथ घेणें आणि खोटें बोलणें आणि राजदंड चुकविणें हा मोठा अपराध आहे. आणि राजाची मोठी अमर्यादा होती राजा प्रजेच्या कल्याणाकरितां नेहमी प्रवर्तला असतो त्याचा अपमान करणें हा अपमान जसा यज्ञकंकण बांधून ब्राह्मण बसला असतां त्याला लाथ मारिली तर मोठा अधर्म तसाच राजाचा न्याय चुकविणें हें अधर्मयुक्त कर्म आहे.

खोट्या शपथे पासून तिसरें पाप कोंणतें होतें तें ऐक विश्वासघात केल्याचा दोष घडतो. जेव्हां साक्षीदार म्हणून तुम्हास राजा किंवा त्याचा नेमलेला अधिकारी आपले सभेंत बोलावून आणतो. आणि तुम्ही खरे बोलावे म्हणून ईश्वराची शपत देतो त्यावेळेस त्याचा विश्वास तुम्हावर असा असतो कीं तुम्ही खरें बोलाल आणि याचप्रमाणें सर्व लोकांचा भरंवसा तुमच्यावर असतो. कारण कीं तुमच्या साक्षीवरून न्याय व्हावयाचा असतो. घर, दार, जिंदगी घ्यावयाची किंवा द्यावयाची असते. अबरु जावयाची किंवा मिळण्याची असते. फार तर काय परंतु जीव देखील घ्यावयाचा असतो याजकरितां सर्वांची नजर साक्षीदारावर असते आणि सर्वांचा विश्वास असतो कीं साक्षीदार आतां शपथेवर आहे त्यापेक्षां अन्यथा बोलणारच नाहीं. आणि वास्तविक न्याय होईल असा मोठा आणिबाणीचा तो समय असतो त्या समयीं खोटें बोललें तर मोठा विश्वासघात घडतो आणि आपण एका ईश्वरानें उत्पन्न केलेले किंवा एका राजाखालीं नांदणारे किंवा एका देशांत राहणारे आहों सबब आपला भाऊपणा आहे आणि सत्यानें सर्वांशीं वागावें हाच आपला येथें धर्म आहे त्यांत दगा केला तर मोठा अपराध होतो आणि राजानें व प्रजेनें तुम्हास शपत देण्याहून कोणते ओंझें घालावें विश्वास ठेवावयास याहून मोठें साधन राहिलें नाहीं हा अगदीं परमावधीचा उपाय याजकरितां तुम्हावर फारच भरंवसा लोक ठेवितात. कीं खरें बोलाल जर त्यांत अपराध केला तर विश्वासघात झाला यांत संशय नाहीं आणि तो विश्वासघातही सामान्य ठिकाणी झालेला नव्हे परंतु महत्त्वाचे प्रसंगी महान् विश्वासघात झाला. विश्वासघाताचे पाप लोकांस बहुतकरून माहितच आहे. असें म्हणतात कीं विश्वासघात की यास कोठेंही मुक्ति नाहीं.

चौथें पाप असें आहे कीं, मनुष्यमात्राचें आपल्यावर ऋण आलेनें ऋण सत्यावांचून फिटत नाहीं असें शास्त्र आहे याजकरितां आपले आपले कारभार सत्यानेच करावे म्हणजे मनुष्य ऋणातून क्षणी मुक्त होते. तें ऋण तसेंच राहतें.

पांचवें पाप असें आहे कीं सत्य भाषण करावें ही ईश्वराची आज्ञा म्हणजेच धर्म आहे त्याचे विपरीत हें कर्म घडतें आणि नीतीस बाध येतो. पृथ्वीवर मनुष्यें आहेत त्यामध्यें जे जे धर्म हल्ली चालत आहेत त्या सर्व धर्माचें संमत खरें बोलण्याविषयीं एकच पडते. यास्तव सत्यभाषणासारखा निर्विवाद धर्म नाहीं आणि हिंदुधर्मांत तर हा धर्म मुख्य सांगितला आहे ब्राह्मणास मुंजीचे वेळेस वारंवार उपदेश खरें बोलण्याचा आहे आणि खोटें बोलणारे किंवा त्याहूनही अधिक खोटी शपत करणारे यांची गणना हिंदूंत होणार नाहीं असें हें पाप आहे.

साहावें पाप असें आहे कीं शपत करून साक्ष दिल्ही म्हणजे अन्याय तुमच्या हातून घडतो. तुमची साक्ष उगीच कोणी घेत नाहीं. साक्षीचें कांहीं तरी प्रयोजन असतें. राजा तुमची साक्ष कांही एक त्यास जडभारी काम पडतें तें बरोबर समजत नाहीं म्हणून तुम्हास धर्माचें व ईश्वराचें भय घालून घेतो आणि अशा वेळेस राजाचे डोळे तुम्ही बांधून त्याजकडून अनर्थ करविलात तर तो दोष तुमचेच मस्तकावर बसेल. रयतेचा धर्म असा आहे कीं राजाकडून सत्य न्याय व्हावा म्हणून होईल तितकी त्यास मदत करावी. तो कांहीं अंतःसाक्ष नसतो. तुमच्यांतीलच तो एक आहे परंतु त्याला तुम्ही सर्वांनी न्यायाचे कामावर बसविला आहे. तेव्हां तें काम त्यानें तुम्हीच

सिद्धीस नेलें पाहिजे. तुम्ही आपला धर्म सोडून दिल्हा तर अन्यायाचें पाप तुम्हावर येईल आणि तुम्ही आपला धर्म बुडवून त्याना बुडविलात म्हणून तुम्हावर पाप दुपट येईल.

सातवें पाप असें आहे कीं खोट्या साक्षीनें लोकांस दुःख होतें व त्रास होतो. तुम्ही खोटी साक्ष देतां तेव्हां तुम्हास गोड वाटतें कांकीं तुमचे आंगावर जोखीम नसते परंतु आपल्यावरून जग वोळखावे. पाहा कीं, जर तुमच्यावर खून केल्याचा आळ आला आणि चार साक्षिदारांनी साक्षी खोट्या दिल्ह्या आणि त्यावरून तुम्हास फांशीं द्यावें असें ठरेलें तर मग त्यावेळेस तुम्हांस फार कडू लागेल आणि मग तुम्हास असें वाटेल कीं हे दुष्ट जर खरें बोलले असते तर माझा प्राण न जाता. मग तुम्हास खोटे साक्षीचें पाप दिसूं लागेल परंतु हें तुमचे आंगावर येत नाहीं तों पर्यंत तुम्हास थट्टा वाटती. परंतु आत्मवत् सर्वभूतानी. असें वचन आहे. जसें आपल्यास वाटतें तसेंच दुसऱ्यास वाटतें तुम्ही खोटी साक्ष देतां तेव्हां ज्यास उपद्रव होतो तो असाच तुम्हास म्हणत असतो. आणि तुमचें असत्य मनांत आणून क्षण क्षणी श्रमी होत असतो.

आठवें पाप असें आहे कीं एकानें दुष्कर्म केलें म्हणजे त्याचें पाहून दुसरे तसेंच करूं लागतात. बापाचे गुण लेंकांस लागतात. धन्याचे गुण त्याचे चाकरास लागतात एकानें वाईट केलें म्हणजे त्याचा शेजारी करितो अशी प्रवृत्ति वाढते. यास्तव प्रवृत्ति बंद होण्याकरितां शासनें करतात. जर अपराध होऊन एकटाच राहील तर लोक क्षमा करतील परंतु मनुष्यमात्राचा स्वभाव असा आहे कीं शेजाऱ्याचें पाहून आपण करावें याजकरितां अपराध्यास शासन करावें लागतें. यास्तव ही प्रवृत्ति बंद होण्याकरितां प्रत्येकानें दुष्ट कर्माचा त्याग करावा व जो कोणी करील त्यास धरण्या-करितां सर्वांनी जपून त्यास शासन करवावें नाहीं तर हें सर्व त्या प्रवृत्तीचे भागीदार होतील जे अपराध करितात ते दोषी आहेतच आणि जे लोकानी अपराध केलेला पाहतात तेही दोषी. जर लोकांचें कल्याण व्हावें जगांत अपराध होऊं नये असें इच्छित असाल तर रयतेचा धर्म चांगले-पणानें तुम्हास आचरला पाहिजे. आणि राजाचे न्याय करण्याचें जें सत्कार्य आणि धर्मकार्य त्यास सर्वांनी आश्रय देऊन संपूर्ण केलें पाहिजे. लोकांमध्यें वस्ति आहे त्यापेक्षां जे जे आपले धर्म आहेत ते सर्व केले पाहिजेत.

नववें पाप असें आहे कीं खोटे शफथेनें आणि खोटे साक्षीनें दया धर्म बुडतो. तो असा कीं गरीबाची दया करावी अशी ईश्वराची आज्ञा आहे म्हणजे स्वधर्माची आज्ञा आहे. त्यास जर तुम्ही खोटी शपथ कराल तर दया टाकली असें होईल. जो खोटी शपथ देतो तो कारणाखेरीज देत नाही एक पक्ष गरीब असतो दुसरा पक्ष सबळ असतो सबब गरीबाचा पक्ष टाकून लोभानें खोटे साक्षीस प्रवृत्त होतां गरीबाचा पक्ष धरणें हीच गरीबाची दया त्यानें जें कांहीं आहे तें जाऊन देणें हीच गरीबाची मुख्य करुणा आहे. याजकरितां जर तुम्ही गरीबास बुडवून त्याचें घेऊन दुसऱ्यास द्याल तर ती दया नव्हे. तें पापच आहे. जें आहे तें अधीं रक्षण करून मग त्यास वरती जें द्याल तीं दया. आणि खोटे साक्षीनें निर्दयपणा होतो आणि पक्षपात आणि नीचपणा होतो. द्रव्याकरितां अन्याय केला म्हणजे तो मनुष्य माणसांत नव्हे. तो जनावरांतही नाहीं. त्याहून तो नीच ज्याचा जीव आणि मन द्रव्याकडे आणि जो अर्थाकरितां दुष्ट कर्म आणि अन्याय करितो त्याची योग्यता फार हलकी आहे व त्याची अबरु फार कमी. जो सर्व अर्थ एकाकडे ठेऊन न्यायावर आणि सदा-चरणावर दृष्टि देतो त्याची मोठी कीर्ती होती. अशी मनोमन साक्ष आहे. दुष्ट वासना व दुष्ट संगति जरी मनास भ्रष्ट करितात तत्रापि मन साक्ष देतें. आणि हें खरें आहे कीं जरी ईश्वर आपला न्याय यालोकीं सर्वदा सर्वत्र प्रगट करीत नाहीं तत्रापि मनुष्यानी पक्कें समजावें कीं असा दिवस येईल कीं ज्या दिवशीं ईश्वराचा न्याय बिनचुक त्याचे समक्ष होईल आणि तेथें साक्षीचा तोटा पडणार नाहीं आणि खोटी शपथ चालणार नाहीं. खऱ्याची योग्यता वाढेल. आणि खोट्याची

योग्यता जरी पृथ्वीवर लीलेकरितां वाढविली असली तरी त्या दिवशी ती योग्यता जाईल. आणि पाण्याचें पाणी आणि दुधाचें दुध असा न्याय होईल. त्या दिवसावर लक्ष याजन्मी द्यावें.

दाहावें पाप असें आहे कीं देशाचें अकल्याण होतें आणि लोकांमध्यें वैपरीत्यें आणि द्वेष वाढून भाऊपणा फुटून जातो असें झालें म्हणजे लोकांचो चोहोंकडून खराबी होते. हें कसें होतें म्हणाल तर ऐका. जर एकमेकांच्या खरेपणाविषयी धडा असेल तर लोकांमध्यें विश्वास आणि पत वाढेल जर कोणास कोण खोटें बोलेल आणि कोण खरें बोलेल येविशीं भरंवसा नसला तर व्यापार बंद होईल लबाड लोक माजतील खरे बुडतील आणि लोकामध्यें एकमत किंवा प्रतिष्ठा राहणार नाहीं. खरेपणा हा ही लोकांत एकमत करण्यास मोठें कारण आहे सत्य हें लोकांस मोठा आळा आहे तो जर सुटला तर चोहोकडे लोक फुटतील. आणि जो खरा आहे किंवा ज्याचा पक्ष खरा आहे त्यास अशी हिमत राहणार नाहीं कीं मी खरा आहे मला साक्षीदार मिळतील माझे तर्फेचे सर्व बोलतील. राजास माझा न्याय वास्तवीक केलाच पाहिजे नाही तर सर्व लोक माझे पाठीवर होतील अशी खातरजमा लोकांमध्यें खरेपणा विशेष असल्यावांचून कोठून राहील. लोक लबाड खोटें बोलणारे आहेत असें सर्वांस माहीत असेल तर कोणासही धैर्य राहणार नाहीं ज्यास राजदरबारांत जाण्याचे कारण पडेल तो मोठे भयानें व काळजीनें जाईल. याप्रमाणें सांप्रत हिंदु लोकांची स्थिति आहे कीं नाहीं याचा विचार करा.

याप्रमाणें दशविधा पातकें वर्णन केलीं आहेत. याजवरून केवढा अनर्थ खोट्या शपथेपासून होतो हें लक्षांत येईल. हीं पापें मनांत नेहेमी वागऊन ईश्वराचें भय धरीत जा. तुम्हास खोटी शपथ वाहताना अशी दुर्वासना होईल कीं आपलें खोटे शपथेवरून थोराचें रक्षण जाहलें गरीबाचें मात्र घर बुडालें परंतु हें स्मरण ठेवा कीं ईश्वराचे घरीं गरीब आणि थोर यांचा भेद नाहीं. हा भेद या पृथ्वीवरती मात्र क्षणभंगुर माणसाचे कृतीचा आहे. जरी श्रीमंताची मर्जी लबाडीनें साधलीत तरी ईश्वराचे अवकृपेपुढें तिचा कांहीं उपयोग नाही याजकरितां श्रीमंताचे द्रव्यानें किंवा भिडेनें स्वधर्मास बुडविणें हें ठीक नाहीं. असें केलें तर तुम्ही आपला स्वभाव नीच आहे म्हणून मात्र जाहीरनामा लावाल आणि जशा द्रव्यादिकाचे आशेनें स्त्रिया आपले पत्नी धर्मातें टाकतात. त्या जशा अपकीर्तिनें पावतात. तसें तुम्ही हलके आणि नीच बुद्धीचे प्राणी आहां असें सर्वांस कळून येईल. नंतर ते कांहीं तुमच्या तोंडावर न बोलोत परंतु तुमच्या मागें किंवा मनांत वाईट म्हणतील. याजकरितां परस्पराची तुम्ही ममता धरा. आणि जरी कोणी गरीब असला तरी त्याचा सत्पक्ष व खरें काम जाणून त्याचे तर्फेची साक्ष द्या म्हणजे भाऊपणा आणि सत्य जगांत वाढेल. गरीबाचा गरीबीच्या सबबेनें त्याग केला तर ईश्वरास फार राग येतो. कारण कीं जसें आईस एक गरीब किंवा वेडसर मुलगा असतो त्यास कोणी वेडसर म्हटलें असतां तिला ममतेमुळें फार राग येतो. कारण कीं तिचा चांगला आणि वेडा मुलगा हे दोन्ही तिला सारखेच तसेच ईश्वराचे नजरेंत गरीब श्रीमंत सारखे आहेत. परंतु मनुष्याची जगामध्यें परीक्षा व्हावी आणि धर्मास भुलतो कोण द्रव्यास वश्य होऊन सत्य सोडतो कोण इत्यादि पाहण्याकरितां हा भेद ईश्वरानें निर्माण केला आहे तरी या परीक्षेंत उतरून उत्तम पदास योग्य व्हावें हें चांगलें. लोभानें जीभ व मन विटाळू नये. ईश्वरानें बुद्धिमान प्राणी तुम्हास निर्माण केलें आहे हें सत्कर्माकडे तुम्ही बुद्धि लावावी म्हणून यास प्रमाण भागवत एकादश स्कंद नवम अध्यायीं श्लोक २७

सृष्ट्वापुराणी विविधान्यज आत्मशक्त्या वृक्षान् सरीसृपपशून् खगदंशमत्स्यान् ॥
तैस्तैरतुष्ट हृदयःपुरुषंविधाय ब्रह्मावलोकधिषणं मुदमापदेवः ॥१॥

याजकरितां आपले बुद्धिस बाटवून दात्यास राग आणूं नका.

जेव्हां तुम्ही शपथ घेतां तेव्हां असें मनांत आणा कीं मी आतां ईश्वरा समोर उभा आहें आणि मरणानंतर माझा न्याय करणार तोच हा प्रभु येथें साक्षीस उभा आहे आणि त्यास हाक

मारून मी येथें साक्ष देतों आहें. मी येथें प्रतारणा करीन तर या मनुष्यराजाची दृष्टि कदाचित चुकवीन परंतु या सर्व साक्षीराजाची दृष्टि मी कशी चुकवीन आज जर मी खोटें बोलेन तर माझे शिक्षेचें वारंट चित्रगुप्त लिहून ठेवितील आणि इतकेंही भय सोडून जर मी आज खोटें बोललों तर केवढा नाश होईल आणि असत्याचें प्रवृत्तीचा अधिकारी होत्साता मी महापापी होईन आज मला चार दुष्ट हें सांगतात आहेत हें मात्र माझ्या असत्याची स्तुति करीतील. परंतु पुढें मला कोण सोडवील. एक मला सोडविणार धर्म तो मी आज टाकिला तर मला परलोकीं मित्र कोण होईल. यास्तव मी जें खरें आहे तेंच बोलेन. नंतर राजाचा धर्म राजा करील. परंतु मी सत्याचा मार्ग सोडणार नाहीं असा मनांत विचार आणावा.

खोट्या शपथेपासून यत्किंचित् कल्याण वाटेल परंतु एकंदर पाहिलें तर अकल्याण फार होतें कोणाची अबरु किंवा घर दार किंवा जीवसुखी आणि सुरक्षित नाहींसा होतो आणि सांप्रत तसेंच आहे कीं कोण खोटी साक्ष देईल याचा भरंवसा नाहीं याजमुळें द्रव्यवान आहे तोच खरा सर्व त्याचेच तर्फेचे होतात. गरीब खरा असला तरी खोटा होतो. याजमुळें जुलूम होतो. जर गरीब जुलूम म्हणून ओरडला तर श्रीमंत आहेत ते साक्षीदार उभे करून त्यास लबाड करितात. याप्रमाणें खोटेपणा आणि अन्याय यास मनुष्यामध्यें स्वस्थ नांदावयाची सनद तुम्ही दिल्ही आहे असें दिसतें.

असत्य भाषणाहून खोटी शपथेचें फार पाप आहे कारण, कीं साधारण भाषणावर मनुष्याचा विश्वास दृढतर नसतो. आणि शपथ दिल्ह्यामुळें विश्वास दृढतर नसतां आणि शपथ दिल्ह्यामुळें विश्वास दृढ होतो असे विश्वासाचे ठिकाणी लबाडी केली तर सर्व तुमचे पुण्य दर एक खोटें शब्दास जळून जाईल. यांत संशय नाहीं.

यास्तव खोटी शपथ करण्याकरितां लोभ किंवा मित्राची भीड किंवा दुसरी कांहीं गोष्ट तुमचे मनास अपश करील तर सावध राहा. ईश्वराचा न्याय जवळ आहे हें वारंवार स्मरण करा.

तुम्हास असें वाटत असेल कीं जगामध्यें अन्याय पुष्कळ होत आहेत. परंतु तुम्ही विचार केला तर असें जाणाल कीं त्या अन्यायाचे बहुत करून करणारे तुम्हीच आहां. जरी धर्मराजा न्याय करावयासि आला तरी जों पर्यंत तुम्ही खोटे साक्ष देणारे लोक आहां तोपर्यंत त्याच्यानें न्याय होणार नाहीं. सर्व न्यायाचा पाया साक्षी आहे तोच पाया जर मजबुद नसला तर इमारत पक्की होणार नाहीं. राजास अपराधी सांपडणार नाहींत मग तो शासन कसें देऊं शकेल? जर तुम्ही बहुतेक लोक खरें बोलणारे असलां तरी राजाचा न्याय चांगला चालेल परंतु सर्व लबाड बोलणारे असले तरी न्याय होणार नाहीं. इतर देशांतील लोकांमध्यें जे संभावित विद्वान आहेत त्यांची साक्ष खरी समजतात. कारण कीं ते कधीं खोटें बोलत नाहींत. असें प्रसिद्ध असतें परंतु या देशांत बाळ वृद्ध लाहान थोर अडाणी विद्वान हलका आणि पदवीचा हे सर्व एक सारखे खराब नीतीचे लोक आहेत. याजकरितां अपराधी यास भिकारी असल्या शिवाय भय नाहीं व खोटे साक्षीदारास कोणी हा मनुष्य वाईट असें देखील म्हणत नाहीं. उलटी त्याचे कसबाची स्तुती करतां. याजमुळें पाप वाढतें. आणि लोक खराब होतात गुन्हेगारास गुन्हा सोडावा असें वाटत नाहीं वास्तविक पाहिलें तर खोटी साक्ष देणाराचा तुम्ही फार त्रास करीत जावा. व त्यास सत्वर शासन करवावें. कारण कीं तो मनुष्य सर्वांचे घरास चूड लावणारा आहे. एकावर जुलूम झाला तर सर्वांनी त्याचें दुःख मानावें आणि जुलूम करणारे सोधून काढावे. पाहा कीं जनावरामध्यें मोहोळाचे माशीस एकीस धक्का लागला तर सर्व माशा उठतात परंतु तुम्ही विचारशील माणसें असोन तुमचे शत्रु तुम्हीच होतां.

लोकांमध्यें एक मोठी गैरसमजूत आहे ती अशी कीं जे लोक ढोंगी आणि आचारसंपन्न आहेत ते खटपटीच्या कर्मांची बहुत डौल घालतात परंतु जे नीतीनें आणि सदाचरणानें पवित्र नाहींत

आणि ज्यास विचार नाहीं असें असतां त्यास लोक चांगले म्हणतात आणि जे खोटी साक्ष दे वगैरे महान् अपराध करतात कीं जेणेंकडून सर्व लोकांस सुख होतें त्याची कर्मे कोणी पाहात नाहीं बहुत करून लोक आचारानें पाहून चांगला किंवा वाईट मनुष्य हे ठरवितात परंतु येणेकरून असें झालें आहे कीं ब्राह्मणवेषानें अति क्षुद्राचा संग्रह झाला आहे आणि क्षुद्र स्वरूपानें ब्राह्मणाचा समावेश झाला आहे यांजकरितां लोकांनीं विचार करून खरे अपराधी लोक आहेत त्यास जाणून त्यास नीच मानावे.

खरेपणावाचून माणसाचे सर्व व्यापार विसंगत होतात. विश्वास उठून गेला म्हणजे लोक कोणी कोणास मानीत नाहीं भाउपणा ठेवीत नाहींत कोणाचे कोणी पाठीवर उभा राहत नाहीं एकमेकाच्या उपयोगी पडत नाहींत याजकरितां प्रमाणिकपणा सारखा दुसरा गुण नाहीं ईश्वरी कृत्यें आहेत ती सर्व सत्यानें चालतात. म्हणूनच आपण जगतों जर पाउस प्रमाणानें पडेना सूर्य प्रमाणानें उगवेना असें झालें तर आपली अवस्था काय होईल. आपला श्वासोश्वास हा देखील प्रमाणानें चालला आहे जर त्याचे प्रमाण चुकलें तर मृत्यु होईल. वृद्ध चाणाख्य म्हणतो.

सत्येन धार्यते पृथ्वी सत्येन तपते रविः ॥
सत्येनवातिवायुश्चसर्वंसत्येप्रतिष्ठितं ॥१९।अ९

पृथ्वी सूर्य वायु ही आपली सत्य वर्तणूक सोडतील त्या दिवशीं प्रलय होईल तसाच जर माणसांनी आपल्यामध्यें सत्य सोडलें तर माणसाचे व्यापारामध्यें प्रलयच होईल. याजकरितां वर्तणुकीचा नेम भागवतांत सांगितला आहे तो असाकीं.

सत्यपूतं वंदेद्वाक्यं मनपूतंसमाचरेत् ॥

मन हे ईश्वराने मनुष्यास सदैव गुरु करून दिल्हा आहे. त्यास विचारून चालावें म्हणजे अधर्म घडत नाहीं सत्यसारखा धर्म नाहीं मनूनें धर्मशास्त्रात सांगितलें त्यांत तो असें लिहितो कीं.

सत्येन पूयते साक्षीः धर्मः सत्येन वर्धते॥
तस्मात् सत्यंहि वक्तव्यं सर्व वर्णेषु साक्षिभिः॥अ.८ श्लोक ८३

कात्यायन ऋषी धर्मशास्त्र सांगतो त्यांत असें लिहितो

येन कार्यस्यस्वलोभेन निर्दिष्टाः कूटसाक्षिणः॥
गृहीत्वा तस्य सर्वस्वं कुर्यानिर्विष्र यंततः॥

कार्य करून घेण्याकरितां खोटे साक्षीदार उभे करितो त्याचे सर्वस्व घेऊन त्यास भिकारी करून घालवावा हें शासन त्यास करावें असें शास्त्र आहे याजकरितां जे खोटे साक्षी देतात व जे उभे करितात व जे शिखवितात व जे त्याची स्तुति करतात व खोटी साक्षी होत आहे हें स्वस्थ पाहतात हे सर्व सारखे अपराधी आहेत. खोटे साक्षीदारास शासन करण्याविषयीं मनु धर्मशास्त्रात लिहितो कीं.

नग्नो मुंडःकपालेनभिक्षार्थीक्षुत्पिपासितः
अंधःशत्रुकुलंगछेद्यः साक्षमनृतंवदेत् ॥ अ. ८ श्लोक ९३ ॥

खोटे साक्षिदाराचें वस्त्र व अन्न घेऊन हजामत करून डोळे नाहीसे करून हातांत करवंटी देऊन भिक्षा मागावयास लावावी परंतु जेथें त्याचे मित्र असतील तेथें भिक्षा देखील मागू देऊं नये. जेथें त्याचे शत्रु असतील तेथें मागू द्यावी अशी त्याची अवस्था करावी.

तोच धर्मशास्त्र लिहिणारा खोटे साक्षीचें पापाची योग्यता सांगतो ती ऐका.

यावतो बांधवान् यस्मिन् हंतिसाक्ष्ये नृतंवदन् ॥
तावत संख्ययातस्मिन् श्रुणुसौम्यानिपूर्वशः ॥ १
शतमश्वानृतेहंतिसहस्त्रंपुरुषानृते ॥
सर्वभूम्यनृते हंतिमास्मभूम्यनृतं वदीः ॥ २ ॥

एतान् दोषानवेक्ष्यत्वंसर्वानिनृतभाषणे ॥
यथाश्रुतं यथादृष्टं सर्वमेवांजसावद ॥३॥

अर्थ साक्षींत खोटें बोललें असतां किती दोष लागतो हें ऐका. घोड्याविषयीं जर खोटी साक्ष दिल्ही तर शंभर भाऊ मारल्याचा दोष आहे आणि मनुष्याबद्दल जर खोटी साक्ष दिल्हीतर हजार आपले भाऊ मारल्यासारखें आहे आणि जर भूमिविषयीं खोटी साक्ष दिली तर सर्व आपले भाऊ मारले असे होतें याजकरितां हे दोष लागतात हें मनांत वागऊन खोटी साक्ष देऊं नये. जसें पाहिलें आणि जसें ऐकिलें असेल तसेंच सत्य सांगावें. नाहीं तर

साक्षी दृष्टश्रुतादन्यद्विब्रुवन्नार्यसंसदि॥
अवांतर कमभ्येति प्रेत्यस्वर्गाच्चहीयते ॥ ७५

म्हणजे पाहिलेली किंवा ऐकिलेली गोष्ट असेल ती सोडून अन्य प्रकारची खोटी साक्षी जो कोणी राजसभेंत किंवा न्यायसभेंत देतो तो चिरकाळ नरकांत राहतो आणि स्वर्गास कधीही जात नाहीं.

याजकरितां कोणी कसाही असो जर तो तुम्हास या दुष्टकर्माविषयीं भीड घालील अथवा लोभ दाखवील तर तो ऐकूं नका. जरी तुमचा परम मित्र कोणी असला आणि त्याच्या उपयोगी तुम्ही सन्मार्गानें पडाल तर योग्य आहे परंतु खोटी साक्ष देऊन उपयोगी कोणाच्याही पडूं नये. कारण कीं जर कोणी तुमचा मित्र असला आणि त्याजकरितां तुम्ही खोटी साक्ष द्याल तर तुम्ही आपलें व याचें वाईट केलें असें होईल. कारण कीं तुम्हा बरोबर त्या तुमच्या मित्रास ही नरकांत पडावें लागेल याजकरितां जर तुम्हास मैत्रिकीचा धर्म करावयाचा असेल तर त्या विषयीं सत्य साक्षी द्या. लबाडी करून दुसऱ्याचा गुन्हा छपविणें हें मैत्रिकीचें काम नव्हे. हें शत्रुत्व झालें जर तुमचा जातीचा अपराध कोणी केला असेल आणि तो तुम्ही क्षमा कराल तर अधिकार आहे. परंतु न्यायसभेंत खोटी साक्ष देण्यास तुम्हास कोणताही कारणावरून अधिकार येत नाहीं यास्तव तुम्ही आपल्या मित्राविषयीं किंवा स्वतां आपल्याविषयीं जी गोष्ट खरी असेल तीच सांगा जो कोणी खोटी साक्ष देण्यास सांगेल तो शत्रु समजा आणि त्याचें ऐकूं नका.

राजापुढें खोटी शपत करून साक्ष देण्याशिवाय आणखी दोन खोटी शपत करण्याच्या रीति लोकांमध्यें आहेत त्या अशा कीं एक व्यापारी उदमी लोक हे देवाचें नाव घेऊन किमतीविषयीं वगैरे शपत वाहतात. हें फार वाईट आहे आणि दुसरे लग्नामध्यें स्त्रीपुरुष अशी शपत करतात कीं, आम्ही एकमेकास अंतर देणार नाहीं आणि व्यभिचार करणार नाहीं असें असोन जे कोणी पापांत पडतात ते खोटे शपतेचे दोषी होऊन नरकांत जातील यांत संशय नाहीं.

कोणी लोक जे विचारानें व युक्तीनें धर्मशास्त्राचे अर्थ करीत नाहीत आणि सर्व कालाचे ठायीं धर्मशास्त्रास अचल मानतात ते अर्थाचे अनर्थ करून लोकांमध्यें दुर्नीतीचे वर्धन करितात आणि धर्मशास्त्रांत खोटे साक्षीचा सर्वत्र निषेध आहे तो पुरावा एकीकडे ठेऊन त्यांत कोठें असें वाक्य आहे कीं जेथें खरे साक्षीनें मोठा अन्याय व अनर्थ होईल असें स्पष्ट आहे तेथें खोटे साक्षीविषयीं मोकळीक आहे परंतु त्याची उपपत्ति अशी आहे कीं धर्मशास्त्रांत जे नियम व शासने लिहिलीं आहेत तीं राजानें कालानुरोधें करून कमी अधिक करावी असें लिहिलें आहे. त्याजवरून हल्लींच्या काळीं लोकांनी पडते फळाची परवानगी घेऊन खोट्या साक्षीस प्रवृत्त फार झाले त्यांत ब्राह्मण लोक तर इतर वर्णापेक्षां खोटे साक्षीस धारिष्ट मोठें करितात त्याची अशी खोटी समजूत आहे कीं तुळशी वाहिल्याने पाप जातें या समजुतीपासून फारच मोठा अनर्थ झाला आहे आणि सर्व लोक खोटी साक्ष निर्भयपणाने देऊं लागले यास्तव हल्लीं राजानें असें ठरविलें आहे कीं कोणत्याही कारणावरून कोणी खोटी साक्ष देऊ नये व खोटी शपत करूं नये आणि हें धर्मशास्त्राप्रमाणेच आहे. आणि हा राजनियम सदाचरण स्थापनाविषयीं फार अनुकूल आहे यास्तव आपण राजाचे उपकार

मानून खोट्या शपतेचें मोकळिकेचें वाक्य शास्त्रांत नाहीं असें समजलें पाहिजे यास्तव खोटी साक्ष हर एक कारणानें देतात ते खोटे साक्षीचे शासनास यथान्याय पात्र आहेत. तसेच जे सरकारी काम घेण्यापूर्वी चांगले वर्तणुकीची शपत करून नंतर अपराध करतात तेही महादोषी खोटी शपत करणारे समजावे. त्यास पूर्वोक्त सर्व पातकें लागू आहेत.

खोट्या शपतेपासून राजाचे शासन होतें हा एक मोठा धाक आहे आणि लोकांत अपकीर्ति आणि याहून जे इतर अनर्थ आरंभीं व परिणामी घडतात ते सविस्तर पूर्वी वर्णन केले आहेत आतां सर्वांचा सारांश सांगतो.

खोटी शपत वाहण्याचें अगदी सोडून द्या. म्हणजे लोक जिकडे तिकडे अबादान होतील. एकामेकावर विश्वास पटेल धर्म व सदाचरण व ईश्वर भय जागृत राहील. व्यवहारास ग्लानी येणार नाहीं. सत्याचा झेंडा उभा राहील. न्यायाचा दरवाजा उघडेल. उदीम चोहोंकडे वाढेल. गुन्हेगार पळून जातील आणि नवे होणार नाहींत आणि लोकांमध्ये सुखाची समृद्धि होईल. पापास ओहोट लागेल. लोकामध्यें एकोपा होईल. इतकीं फळें जर एक तुम्ही बहुत दिवसांची दुष्ट खोड टाकून दिल्हीत तर येतील हें खचीत समजा आणि आतां हा उपदेश ऐकण्याचा मी फार श्रम तुम्हास देत नाहीं जितके सांगावयाचें सुचलें तितकें सर्व सांगितलें आणि हे चांगलें व खरें आहे कीं नाहीं याचा विचार तुम्ही करून खोटी साक्ष देणार नाहीं असा निश्चय केलात म्हणजे या ग्रंथाचे सार्थक झालें.

लोकांनी असत्याचा अव्हेर करावा आणि सत्याचा एकमेकांस अव्हेर करावा हा माझा हेतु आहे आणि तुम्ही लोक खरें बोलणारें आहां अशी शुभ्र सत्कीर्ति होऊन या देशाचा डाग निघून जावा आणि खोटी शपत वाहणें तुम्ही अगदीं सोडून द्यावे आणि ईश्वरी अनुग्रह होऊन तुम्हास ही सद्‌बुद्धि प्राप्त व्हावी हेच माझें मागणें आहे.

लोकहितवादी

• •

# पुष्पवन

म्हणजे फारसी भाषेंत गुलिस्तान म्हणून सादि

कवीचा ग्रंथ आहे त्याच्या शेवटच्या अध्यायाचें

मराठी भाषांतर–"यंत्रज्ञान" वगैरे ग्रंथ

करणाऱ्याने केलें. आणि

कृष्णाजी त्र्यंबक रानडे याणी

पुणें येथे

ज्ञानप्रकाश छापखान्यांत

छापिलें.

सन १८५१

किंमत ÷ ५ आणे

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| प्रस्तावना | १ |
| माहिती | ३ |
| ग्रंथसुरु | ११ |
| शुद्धीपत्र | ५८ |


# प्रस्तावना

फारसी भाषाही सांप्रत हिंदुस्थानचे ईशान्येस काबुलखंदाराकडे इराणदेश म्हणून आहे तेथें ते लोक आहेत त्याचें नाव फारस किंवा मोंगल त्यांची भाषा ती फारसी त्या भाषेंत मोठे मोठे विद्वानांनीं उत्कृष्ट ग्रंथ केले आहेत व ती भाषाही मधुरपणामुळें व शब्दसंग्रहामुळें मोठी प्रख्यात आहे सदरहू देशांत षीराज म्हणून एक मोठे शहर आहे तेथें "सादी" या नावें मोठा कवी सत्पुरुष परमार्थी होता त्याणें ग्रंथ केले त्यांतील गुलिस्तान म्हणजे पुष्पवान हा ग्रंथ बहुत प्रख्यात आहे असा दुसरा कोणचाही ग्रथ प्रख्यात नाहीं व हिंदुस्थानांतही मुसलमान लोक इत्यादि मुलांस प्रथम पन्दनामा व गुलिस्तान सिकवितात कारण कीं त्यांत नीतिबोध फार आहे. गुलिस्तान हा ग्रंथ मोठा आहे त्याचे आठ अध्याय आहेत त्यांतील शेवटला अध्याय विशेषें करून चमत्कारिक आहे यास्तव त्याचें भाषांतर मराठींत केलें आहे. जे चिकित्सक व फारसी शिकणारे आहेत त्यास याचा फार उपयोग पडेल व ज्या ग्रंथांत यादेशचे व इराणचे मुसलमान लोक म्हणतात कीं ज्यास सर्व शहाणपण आहे त्यास या ग्रंथाचा मासलाही समजेल. म्लेंछाचा उपदेश हिंदुचे उपदेशाहून भिन्न आहे. तेंही समजेल. मूळच्या ग्रंथाची भाषा उत्कृष्ट आहे म्हणून त्याचा रस तरजम्यांत येणार नाहीं परंतु अर्थ ध्यानांत येईल व शाहाणपणाच्या गोष्टी कळतील. हा तरजुमा करणाराचा हेतु इतकाच आहे कीं आपल्यापासून स्वदेशीय लोकांस जर कांहीं तरी उपयोग होईल तर श्रमाचें सार्थक होईल.

# पुष्पवन

## माहिती

म्लेंछ, यवन, मुसलमान, हे शब्द या देशांत प्रसिद्ध आहेत परंतु समग्र अर्थ त्याचा कोणास माहीत नाहीं याजकरितां येथें संक्षेपें करून लिहितों.

प्राचीन काळीं श्री रामचंद्र व पांडव राज्य करीत होते तेव्हां हिंदु लोक मात्र भूतळावर शाहाणे होते इतर सर्व अज्ञान होते म्हणून हिंदुलोकांनीं सर्व इतर देशांतील लोकांस म्लेंछ असें नाव ठेविलें त्याचा अर्थ मूर्ख आणि धर्मज्ञानरहित लोक असा आहे. पुढें ते मूर्ख लोक काळें करून शाहाणे होऊन त्यांणी राज्य स्थापन स्वतंत्र केलें आणि यावनदेश म्हणून फारसी भाषेंत प्रसिद्ध आहे व संस्कृत भाषेंतही प्रसिद्ध आहे त्यास इंग्रेजींत ग्रीस देश म्हणतात त्यादेशचे लोक म्हणजे यवन हे लोक हिंदुस्थानचे लोकांस प्राचीन काळापासून माहीत आहेत. काळयवन तो त्या देशचा होता व शिकंदर याणें दोन हजार वर्षापूर्वी काष्मीरापर्यंत अंमल बसविला होता तो यवन होता व आणखी असें दिसतें कीं ज्योतिषा प्रकरणीं ग्रंथ यवनांपासून हिंदु लोकांनीं पुष्कळ घेऊन संस्कृत भाषेंत तरजमे करून ठेविले आहेत त्यामध्ये संज्ञाशब्द अद्यापि फारसि आहेत असे ग्रंथ घेतलेले ते ताजक म्हणून ज्योतिषाचा भाग प्रसिद्ध आहे. रमल ही रीति त्यांची आहे याप्रमाणें यावन देशांतील लोकांची हिंदुस्थानात रहदारी होती असें सिद्ध आहे.

अणखीं असा ठिकाण लागतो कीं हिंदुलोकांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अशा चार जाती आहेत त्यापैकीं किती एक क्षत्रिय भ्रष्ट होत्साते हिंदुस्थानाबाहेरचे मुलखांत राहावयास गेले त्यांणीं अष्टदेश वसिवले ते यवन फारस इत्यादिक आहेत परंतु यावनाचा धर्म ५३४ शके शालिवाहन पर्यंत कांहीसा हिंदुसारखाच होता त्यावर्षी महंमद या नावचा एक आरब होता त्याणें कुराण या नावचें एक पुस्तक लिहिलें आणि तें मला ईश्वरानें दिल्हें आहें या धर्माप्रमाणे सर्वांनीं चालावें न चालतील त्यांचें पारिपत्य करावें असें प्रत्यक्ष साक्षात्कार झाला असें वर्तमान लोकांत उठऊन पहिला धर्म बुडवून नवीन धर्म स्थापन केला. त्याचें नाव इमान असें आरबि भाषेंत म्हणतात. आणि इमान धर्माप्रमाणे चालणारे त्यांस मुसलमान हा शब्द आहे हा शब्द देशवाचक नाहीं धर्म वाचक आहे. म्हणजे आरबस्थानचा आरब असो अथवा तुर्कस्थानचा तुर्क किंवा इराणचा इराणी असो तत्रापि इमान जो कबुल करील तो मुसलमान म्हणावा. महंमद याणें नवीन धर्मस्थापनेचा उद्योग केला तेव्हां त्यास शत्रु बहुत झाले ते त्याणें मारून आपण अखेरीस आरबस्थानचे मकाशहर आहे

तेथें राज्य करूं लागला. त्याचे पुढें जे बादशाह झाले त्यांणी तोच उद्योग केला याजमुळें सात-आठ देशांत सर्व लोक मुसलमान झाले.

हिंदुस्थानांत मोंगल लोक मुसलमान पहिल्यानें आले त्यांणी येथें राज्य बळकावून पांच साहाशें वर्षे अंमल केला. आणि जे आले ते येथेंच राहिले. परत गेले नाहींत यास्तव इकडे मुसलमान आहेत. मोंगल म्हणजे हिंदुस्थानचे ईशान्येस देश इराणचा भाग आहे तेथील लोक.

म्लेंछ हा शब्द जितके लोक हिंदु धर्मातील नाहींत. तितक्यांस लागू पडेल म्हणजे म्लेंछ हा देशवाचक शब्द नाहीं परंतु त्याचा अर्थ इतकाच कीं जो मनुष्य हिंदुधर्माप्रमाणें चालत नाहीं तो म्लेंच्छ तो कोणचेही देशांतील असो याप्रमाणें इंग्रेज, फरासीस, तुर्क, आरब, इराणी, मोंगल इत्यादि जे सर्व म्लेंछ आहेत. व यवन हा शब्द देशवाचक आहे. सांप्रत यावन देशचा यवन हिंदुस्थानांत नाहीं व हाल्लीं यवनलोक हे मुसलमान नाहींत परंतु क्रिस्तियन आहेत व यावन भाषाही आतां कोणी बोलत नाहींत. तेथें दुसरी भाषा बोलतात. आतां मुसलमान मात्र हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत परंतु ते धर्मेकरून मुसलमान देशें करून कोणी आरब आहेत कोणी इराणी आहेत कोणी तुर्क आहेत व कोणी हिंदुस्थानांत पिढ्या दर पिढ्या राहिलेले मुसलमान हे जे गांवोगांव आहेत ते मूळचे मोंगल आहेत.

हिंदुस्थानांत पहिल्या दाहा भाषा प्राकृत चालत होत्या त्या दाहा भाषा संस्कृत लोकांनीं टाकून उत्पन्न केल्या ही सर्वत्र चाल आहे कीं भाषा इतर पदार्थासारिखी जरायुक्त होऊन तिचा त्याग लोक करितात याप्रमाणें त्याग केलेल्या भाषा हालीं लाटीन, ग्रीक, संस्कृत वगैरे आहेत त्या प्राचीन काळीं बोलत होते पुढें त्या बंद झाल्या तेव्हां संस्कृत बंद होऊन सरासरी चार हजार वर्षे झालीं असावीं नंतर प्राकृत भाषा झाल्या त्यांतील एक देवनगरी म्हणजे परदेशी लोक बोलतात ती. बाळबोध अक्षरांनी लिहितात व त्यांत संस्कृत शब्द फार मिसळ आहेत ती भाषा मोंगल आल्यावर बिघडून त्यांत फारसी व आरबी शब्द मिसळले उदाहरण.

भगवानजीकी कृपा है तो सुख पावेगा. यांत संस्कृत शब्द आहेत. ही भाषा हिंदी पहिली हिंदु लोकांची आहे.

नंतर मुसलमान लोकांच्या योगानें त्या भाषेची उर्दुभाषा झाली म्हणजे

अल्लाकी फजल है तो पादमानी मयसर होगी.

यांत फारशी शब्द पडले ही भाषा हाल्लीं जे मुसलमान लोक हिंदुस्थानांत आहेत ती बोलतात म्हणून या भाषेस सामान्य लोक मुसलमानी भाषा म्हणतात परंतु पहिल्यानें सांगीतलेली हिंदी भाषा जी आहे ती व बीजभाषा त्यासारिखी आहे त्यांत हिंदुस्थानांत पुराणे सांगतात व ब्राह्मण देवपूजेंतही बोलतात ती हिंदु लोकांचीच आहे.

याप्रमाणें हिंदुस्थानचे व इतर देशचे इतिहास पाहिल्यावरून माहीतगारी निघते व आणखी पुष्कळ हिकडील लोकांस ठाऊक नाहींत अशा आहेत जरी याच देशांत या गोष्टी घडल्या आहेत तरी त्याची शुद्ध लोकांस नाहीं याचें कारण अज्ञान फार जाहालें आहें व विद्या फार कमी जाहाली. ज्या प्राचीन काळीं हिंदु लोक विद्येवर चित्त देत होते तेव्हां असे वेडे नव्हते. त्यांणी त्या समयीं जितका शोध लागेल तितका काढला आहे. व त्यांस सर्व माहिती होती आलीकडे दोन तीन हजार वर्षे या देशांतील लोकांस ईश्वर इच्छेनें गाढ निद्रा लागून सर्व विसरले व त्याचा कारभार त्यांस आटोपेना जसा वृद्ध मनुष्यास हात द्यावा लागतो तद्वत या लोकांस सर्व विद्या शिकवून तयार केले पाहिजेत तेव्हां हे भानावर येतील व भ्रांती जातील.

# गुलिस्तान

## अध्याय ८

## वागण्याचे रीतीविषयी

(१) द्रव्याचा उपयोग इतकाच कीं आयुष्यांत सुख व्हावें. परंतु द्रव्य मिळवावें इतकाच उपयोग आयुष्याचा नाहीं. एका शाहण्यास प्रश्न केला कीं सद्भाग्य पुरुष कोण? आणि दुर्भाग्य पुरुष कोण? त्याणें उत्तर दिल्हें कीं ज्याणें भोगलें आणि पेरलें. आणि त्यास दुर्भाग्य म्हणावा कीं जो मृत्यु पावला आणि जागच्या जागीं ठेवलें. ज्या मूर्खानें आपलें आयुष्य मिळविण्यांत घालविलें आणि सार्थक कांहीं केलें नाहीं. व धर्म केला नाहीं त्या तुछ माणसास बरा आणि भला म्हणू नका.

(२) एका कृपण राजास एका साधुनें उपदेश केला कीं अरे जसें ईश्वरानें तुला दिल्हेंत तसेंच तूं दुसऱ्यास दे. परंतु त्यास तो बोध ठसला नाहीं. आणि अंती त्याची अवस्था वाईट झाली. द्रव्यापासून कोणाचें कल्याण केलें नाहीं आणि आपले जन्माचें सार्थक गमावून बसला आणि परलोकास मुकला. याजकरितां जर या जगांतील द्रव्यापासून तुझा उपयोग व्हावा असें मनांत असलें तर जसें ईश्वरानें तुला दिल्हें आहे तसेंच तुझे सारखे इतर प्राणी असतील त्यांजवर कृपा कर. आरबी लोकांमध्यें म्हण आहे कीं उपकार करीत जा परंतु उपकार केल्याची अहंता मानू नको. म्हणजे त्या उपकाराचें फळ तुला होईल. उपकाराचें पुण्य असें आहे कीं त्याचें झाड आकाशा इतकें उंच वाढतें परंतु जर तुझ्या मनांत त्या झाडाचें फळ भक्षावयाचें असेल तर त्याला छेदूं नको. ईश्वरानें तुझ्यावर कृपा केली आणि सद्बुद्धि दिल्ही यास्तव ईश्वराची स्तुती कर. तुला राजाजवळ चाकरी मोठी असली तर बढाई करूं नको. पण ईश्वराची स्तुती कर कीं त्याणें तुला राजाश्रय करून दिल्हा आहे.

(३) दोन प्रकारचे मनुष्य मेहेनत व्यर्थ करितात व कष्ट फुकट भोगितात. एक, ज्याणें द्रव्य संपादन केलें परंतु भोगिलें नाहीं. दुसरा, शास्त्र विद्याध्ययन केलें परंतु तशी वर्तणूक केली नाहीं. जरी कितीही विद्या शिकलेत व शिकवलीत परंतु जर ज्ञानरूप वागणूक नसेल तर व्यर्थ आहे. बैलावर पुस्तकाचा भार घातला म्हणून कांहीं तो विद्वान् होईल कीं काय? त्यास गोणी आणि पुस्तकें सारखी आहेत तद्वत् क्रियाभ्रष्ट विद्वान् आहे.

(४) विद्या व ज्ञान यांचा उपयोग इतका आहे कीं तेणें करून परमार्थ साधन प्राप्त होतें आणि परलोकची तयारी करणें हाच विद्येचा उपयोग आहे. केवळ प्रपंचात रोजगार धंदा मिळावा हा उपयोग विद्येचा नाहीं ज्याणें विद्या पुष्कळ केली आणि तिचा जो उपयोग करावयाचा तो न करितां द्रव्य संपादन इत्यादि इह लौकिक कार्येमात्र केलीं तो जसा घर बांधून आपले हातानें अग्नी लाऊन देतो त्याप्रमाणें आहे.

(५) ज्याणें ज्ञान संपादन केलें आणि जो त्याप्रमाणें वागत नाहीं त्याची साम्यता आंधळ्या मशालजीची आहे. दुसऱ्यास उजेड दाखवितो परंतु स्वतां अंधेरांतच चाचपीत फिरतो ज्याणें जन्मास येउन कांहीं परलोकाचें साधन केलें नाहीं तो जसा पैक्याची थैली पाण्यांत ओतणारा व कांहीं विकत न घेणारा असतो तसा समजावा.

(६) शाहाणे लोकांकडून राज्यास व देशास शोभा असते. पवित्र लोकांकडून धर्मास शोभा असते. शाहणे आहेत त्यांस राजाची गरज लागत नाहीं परंतु राजास शाहण्याची गरज फार आहे अहो राजानो माझा उपदेश ऐका? या माझ्या उपदेशासारिखी गोष्ट हिताची कोणी सांगणार नाहीं ती कोणती म्हणाल तर ऐका शाहाणे लोकांकडे राज्याचा कारभार सांगावा जरी ते कारभार करण्यास झटणार नाहीं व हें त्याचें कामही नव्हे तत्रापि त्यांस अवश्य आणून संग्रह करावा.

(७) तीन वस्तु तीन वस्तुशिवाय शाश्वत नाहींत. द्रव्य व्यापारावांचून व विद्या पढण्यावांचून व देश राजावांचून.

(८) दुष्टाची दया केली म्हणजे चांगल्याचें वाईट केलें असें आहे. आणि उपद्रव कर्त्याची क्षमा केली म्हणजे गरीबास त्रास दिल्यासारखें आहे. दुष्टाचा जरी कितीही प्रतिपाळ केला तरी तो पाप दृष्टीनें अवलोकन करण्यास राहणार नाहीं.

(९) राजाचे मैत्रीवर भरवसा किमपि ठेवूं नये व लाहान स्त्रियांचे कंठ चांगले म्हणून गर्व करूं नका कारण किती एका निमिष्यांत जाईल हे तारुण्यांत बदलेल. ज्याचे पुष्कळ स्नेही आहेत त्यासी स्नेह करूं नये आणि केला तर तो सुटेल हें अगोधरच समज.

(१०) जी आपले पोटांत नाजूक गोष्ट असेल ती स्नेह्यास ही सांगू नये. कारणकीं नजाणो एखादे समयीं तोच शत्रु होईल. व जितका तुझ्यानें नाश करवेल तितका आपले शत्रूचा करूं नको कारणकीं एकाधे समयीं तो स्नेही होईल. आणि जी गोष्ट गुह्य ठेवावयाची असेल ती कोणास सांगू नये. कारण कीं आपल्यापेक्षां सावधगिरी करणार दुसरा नाहीं दुसऱ्यास सांगावें आणि त्यास म्हणावें कीं ही गोष्ट तूं कोणास सांगू नको. त्यापेक्षां आपणच बोललें नाहीं तर चांगलें. आपले पोटांत कांही गोष्ट आहे ती बाहेर पडूं देऊं नये. कांकीं बाहेर एकदां निघाली तर गुप्त-राहणार नाहीं. आणि एकांतीं ही असी गोष्ट बोलू नये कीं तीच गोष्ट चौघांत निघाली असतां पसंत पडणार नाहीं.

(११) जो शत्रु आर्जव करितो व स्नेहभाव दाखवितो त्याचे मनांतील इतकाच भाव असतो कीं नाश करायाचे कोणतेही तऱ्हेनें सामर्थ्य यावें आणि एकाद्याचे मैत्रीवरही भरंवसा ठेववत नाहीं मग शत्रुचे मैत्रीवर भरंवसा कसा ठेवावा. जो शत्रुस यत् किंचित् असें जाणतो तो विस्तवाची फुणगी राखतो त्याप्रमाणें आहे. आज तुला सामर्थ्य आहे तों विझीव उद्यां विस्तव पेटला तर सर्व गांव जाळील. तुला शत्रु मारावयाचें सामर्थ्य असलें तर त्यास धनुष्य उचलू देऊं नको. अगोधर तीर सोड.

(१२) दोन शत्रु असतील आणि त्याचे दरम्यान बोलावयाचा प्रसंग येईल तर असें बोलकीं दोघे मैत्र झाले असतां तुझ्यावर शब्द येणार नाहीं. दोघांमध्यें कलह झाला म्हणजे तोच अग्नि आहे. त्यांत तेल ओतणारा चाहाड मनुष्य आहे त्या दोघांची मैत्री झाली म्हणजे जो चाहाड असतो त्यास लज्या प्राप्त होते यास्तव दोघांमध्यें कलह लावणें आणि शेवटीं आपल्यास त्यांत जाळणें हे शाहाण्याचें काम नाहीं. मित्रासीही बोलत असतां सावध राहा, तुझ्यापाठी मागें एकदा तुझा शत्रु उभा असेल. पडद्याचे आंत बोलत असला तर बाहेर कोण आहे याचा अधीं विचार कर.

(१३) आपल्या मैत्राचे जे शत्रु आहेत, त्याशीं जो स्नेह करितो त्याचे मनांत त्या मैत्रीचें कांहीं तरीं वाईट करावें असें असतें, म्हणून आपला मित्र जर आपले शत्रुसीं स्नेह करणारा असेल तर त्याची मैत्री सोडून द्यावी.

(१४) तुजकडे जेव्हां मोठें काम होईल तेव्हां लोकांस उपद्रव करूं नको. आणि केल्याशिवाय तें काम निभावण्याची तजवीज कर. जो मनुष्य आपल्यासीं नीट बोलेल त्याशीं कडू बोलू नको. आणि ज्याच्या मनांत स्नेह करावयाचा असेल त्याशीं शत्रुत्व करूं नको.

(१५) जों पर्यंत पैका जाऊन काम होईल तोंपर्यंत जीवास दुःख देऊं नकों, सर्व उपाय राहातील तेव्हां मग तरवार उपसणें योग्यच आहे.

(१६) शत्रू कसाही असो, त्याची दया करूं नये. कारणकीं त्याचा ज्यावेळेस हात चालेल त्या वेळेस कधीं नाश करण्यास कमी करणार नाहीं, आणि शत्रु अशक्त आहे म्हणून आपल्यास शाबासकी देऊं नको. कारण कीं तो अशक्ताचा सशक्त होईल. ज्याणें दुष्टास मारलें त्याणें लोकांस

त्याचे उपद्रवापासून सोडिवलें आणि त्याला ईश्वराचे दंडापासून सोडिवलें. दया करणें योग्य आहे, परंतु तसें करण्यांत लोकांस उपद्रव देऊं नये, ज्याणें सापावर दया केली त्याणें मनुष्याचा प्राण घेतला असें समज.

(१७) शत्रुचे बुद्धिवादानें चालूं नये, परंतु त्याची बुद्धि ऐकावी, आणि तो सांगेल तें सोडून दुसरा मार्ग धरावा, आणि निर्भय आहे असें जाणावें, शत्रूनें सांगितलें कीं असे हें कर तर तेथें घात आहे असें समज, आणि त्याणें उजवीकडे जाण्यास सांगितलें तर डावेकडे जा म्हणजे निर्भय आहे.

(१८) अतिशय क्रोधापासून विस्मृति प्राप्त होत आहे. असले वर कृपा केली तर आपला वक्र कमी होतो यास्तव इतका दार्ढ्र्यपणा करू नको कीं लोकांस त्रास होईल आणि इतका सालसपणा करू नको कीं लोक धिट होतील कांहीं दार्ढ्र्यपणा कांहीं नरमपणा केला म्हणजे चांगलें जसें दुःख झालें म्हणजे वैद्य शस्त्र लावतो आणि वर मलम भरतो तसें जो शाहाणा आहे तो फार तीक्ष्णता दाखवीत नाहीं आणि फार थंडेपणाकरून आपली प्रतिष्ठा कमी करीत नाहीं. तेणेंकरून आपली प्रतिष्ठा कमी होऊ देत नाही. आणि हलकेपणा करीत नाहीं. एक मेंढक्याचा मुलगा आपले बापास पुसता झाला म्हातान्या तूं फार पाहिलेंस आहे तर मला एक चांगली बुद्धि सांग हें ऐकून सांगता झाला. बाबा भलेपणा इतका कामाचा नाही. कीं लांडगे धिट होऊन उपद्रव करितील.

(१९) दोन पुरुष देशांत आणि धर्मांत कंटक आहेत एक राजा निर्दय आणि दुसरा साधुवेष आणि ज्ञान नाहीं देशांत असा राजा नसो कीं जो ईश्वराची सेवा करीत नाहीं.

(२०) राजानें शत्रुस पराकाष्टेचा त्रास देउं नये. कारण की मैत्रही भितात आणि राग आला म्हणजे स्वतां आपल्यास त्रास होतो नंतर दुसऱ्याचें काय होईल तें होऊ. मनुष्य मातीचा घडलेला आहे, त्यास हें योग्य नाहीं कीं गर्व, उन्मत्तपणा, आणि दांडगेपणा करावा. असा उन्मत्तपणा केला तर लोक म्हणतील कीं हा मातीचा घडलेला नाहीं विस्तवाचा घडलेला आहे, एका शहरांत एक विद्वान ग्रहस्त गेला तेथें एका सत्पुरुषाची त्याची गांठ पडली, आणि विनंती केली कीं, माझे अज्ञान दूर कर, त्याणें सांगितलें तुझें शरीर ही माती आहे, याचा विचार कर नाहींतर तू आपली सर्व विद्या मातीत घालशील.

(२१) दुष्ट स्वभावी मनुष्य आपले वैरियाचे बंदिशाळेंत राहतो, कारण कीं तो जेथें जातो तेथें त्यास सर्व मारावयास उठतात, दुःस्वभावी मनुष्य पृथ्वी सोडून आकाशांत गेला; तरी त्यास अनर्थच प्राप्त होईल, कारण की त्याचा दुस्वभाव त्याबरोबरच आहे.

(२२) दुसऱ्याचे लष्करांत फाटफुट झाली म्हणजे आपण स्वस्थ राहावें, ते एकत्र असले म्हणजे आपली फाटफुट होईल, म्हणून भय बाळगावें, आपले शत्रु भांडत असले म्हणजे आपल्यास कांहीं फिकीर नाहीं, आणि ते एकत्र जमावानें असले तर आपला तयारी ठेवावी.

(२३) शत्रूचा कांहीं उपाय चालेनासा झाला म्हणजे तो स्नेह करितो, आणि जे शत्रुपणानें जें साध्य झालें नाहीं तें स्नेहानें साध्य करितो.

(२४) सापाची फडी शत्रूच्या हातानें ठेंच म्हणजे दोहोंतून एक तरी लाभ होईल सर्प तरी मरेल नाहींतर शत्रूतरी मरेल लढाईचे दिवशीं गरीब जरी शत्रु असेल तरी त्यापासून निर्भय राहूं नको, कारण कीं जर त्याणें जिवाची आशा सांडली; तर दुबळा वाघासही मारील.

(२५) ज्या वर्तमानें, दुसऱ्याचे चित्तास दुःख होईल, असें असेल तें त्याला सांगू नको, दुसऱ्या लोकांनी सांगितलें म्हणजे तूं बोल, तेथपर्यंत बोलू नको. कोकिळा ओरडली म्हणजे वसंत आला असें जाणतात, आणि घुबड ओरडला म्हणजे विघ्न आहे असे जाणतात, तसें दुष्टानें दुष्टवार्ता सांगावी. आपण चांगली सांगावी.

(२६) राजास कोणाचें व्यंग कळवूं नये. जर तुला पक्कें ठाऊक असेल कीं मी सांगेन तें खरें होईल तर सांग, नाहींतर तूं आपला घात करशील. भाषण करणें तें तेव्हां कर कीं तुझें कोणी ऐकेल. नाहीं तर बोलण्यासारिखा उत्कृष्ट पदार्थ ईश्वरानें दिल्हा आणि तो व्यर्थ घालविला असें होईल.

(२७) जो अहंभावी मनुष्यास बुद्धिवाद सांगतो त्यास आदि दुसरा बुद्धिवाद सांगावयास पाहिजे.

(२८) शत्रूच्या फांशांत सांपडूं नको. आणि खुषामत करणाराची गोष्ट ऐकूं नको कारण कीं त्याची मसलत असी आहे कीं आवळा द्यावा आणि भोंपळा काढावा आणि जर त्याचा आवळा फुकट गेला तर तुला तो हजारों शिव्या देईल.

(२९) फार बोलणारा आहे त्यास जर कोणी खोड ठेविली नाहीं तर तो भल भलतेंच बकतो. यास्तव मी चांगाला बोलणार आहे म्हणून गर्व करूं नको. आणि मूर्खांनी तुझी स्तुती केली तर किंवा तुझें तुलाच चांगलें दिसेल तरी तसेंच आहे म्हणून समजूं नको.

(३०) ज्याची त्यास अक्कल हुशारी चांगली दिसते व आपलीं मुलें आपल्यास गोजिरवाणी वाटतात. एका स्मार्ताचा आणि वैष्णवाचा तंटा पडला तेव्हा मी तेथें होतों आणि हसूं लागलों तेव्हां रागानें स्मार्त म्हणू लागला कीं हें जर खोटें असलें तरी मी स्मार्त नव्हे व वैष्णव म्हणू लागला कीं गीतेची शफत वाहतों हें खरें आहे नाहीं तर मी वैष्णव नव्हे तस्मात जो तो आपल्यास मूर्ख असें समजत नाहीं.

(३१) दाहा माणसें एका पंक्तींत जेवितील पण दोन कुतरे एक मुर्दा खाणार नाहींत तात्पर्य लोभी जो आहे त्याणें सर्व समुद्र प्याला तरी तो तान्हेलाच राहील आणि जो तृप्त आहे तो एका पावशेरांत तृप्त राहतो. पोटास एक भाकर मिळाली म्हणजे भरतें पण लोभी डोळे सर्व पृथ्वीचे द्रव्यानेंही तृप्ति पावत नाहींत. एका मनुष्याचा बाप मरते समयीं एवढें सांगून गेला कीं विषय हा अग्नि आहे त्यापासून दूर रहावें आणि नरक टाळ कारण कीं नरकांतील दुःख तुझ्यानें सोसवणार नाहीं यास्तव आज विषय त्यागापासून दुःख होईल तें सोस आणि दुःसह दुःख टाळ.

(३२) जो हातीं असतां चांगलें करीत नाहीं. त्याचे हातची शक्ति गेली म्हणजे फार कठीण आहे. मनुष्यास इजा देण्यासारिखें दुसरें दुःखास कारण नाहीं. कांकीं त्यास प्रसंगीं कोणी उपयोगी पडत नाहीं.

(३३) प्राण एका श्वासावर आहे आणि मनुष्याची उत्पत्तीचे मागें पुढें पाहिलें तर कांहीं नाहीं जे प्रपंचा करितां धर्माची हानि करितात ते गर्दभ आहेत ते जवाहीर फुकट विकतात ईश्वरानें पाप करण्याकरिता मनुष्यास निर्माण केलें नाहीं यास्तव तुम्ही बुद्धि धरून पुण्यमार्ग सोडूं नका ईश्वरानें तुम्हास उत्पन्न केलें आणि तुम्ही पाप करावयास आरंभितां हे योग्य नाहीं.

(३४) पुण्यवान् आहेत त्यांजवर यमाची शक्ति चालत नाहीं आणि राजाची शक्ति गरीबावर चालत नाहीं. परंतु जो संध्या करीत नाहीं त्यास उसनें कांहीं देऊं नका. कारण कीं जो देवाच्या आज्ञा मोजीत नाहीं. तो तुझ्या देण्याघेण्यास काय मोजील. एका देशांत एक चिनी भांडे करावयास चाळीस वर्षे लागतात आणि दुसरे ठिकाणी एका दिवसांत शंभर करितात परंतु तेथें त्याची किंमत नाहीं. पक्ष्याचे पिलूं आंड्याबाहेर येतांच खाण्यास लागतें मनुष्याचे पोरास कांहीं कळत नाहीं. परंतु पाहा कीं जे आरंभीं शहाणें ते पुढें तरबेज होत नाहीं. आणि जे आरंभी अशक्त ते हळूहळू फार योग्येतेस चढते. कांच सर्व ठिकाणी आहे म्हणून त्याची कोणी किंमत देत नाहीं आणि माणीक मिळावयास प्रयत्न पडतात यास्तव त्याची किंमत फार देतात.

(३५) सावकाशीने व सावधगिरीनें करील त्याचें काम होतें आणि जलदीनें करील त्याचें बुडतें एकदां असें झालें कीं एक जलदी चालत होता दुसरा सावकास जात होता परंतु सावकास जाणारा

अखेरीस जलद चालणाऱ्या पुढें गेला. घोडा पळत उडत जात होता तो थकला. आणि सावकास जाणारा उंट निभावला.

(३६) मूर्ख आहे त्याणें उगीच बसावें यासारखें गोष्ट नाहीं ही जर तो समजेल तर त्यास कोणी मूर्ख म्हणणार नाहींत आपल्यामध्यें गूण आणि शाहाणपण नाहीं तेव्हा हेंच बरें कीं जिभेस खीळ घालावी कारण कीं भाषणानें मनुष्याचे दोष प्रगट होतात आणि नारळांत खोबरें नाहीं असें समजलें म्हणजे करवंटीस कोणी पुसत नाहीं. एक मुर्ख गाढवास विद्या शिकवितां शिकवितां त्याणें आपलें आयुष्य घालविलें एक शाहाणा हें पाहून म्हणाला अरे मूर्खा हा काय उद्योग करितोस तुला मूर्खमात्र अशानें म्हणतात जनावरास भाषण तूं किती शिकविलेंस तरी येणार नाहीं परंतु त्यापासून उगीच बसण्याची विद्या शीक विचार केल्यावांचून जो उत्तर देतो त्याचें उत्तर चांगले बहुधा असणार नाहीं बोलणें तर चांगले माणसा सारखें बोल नाहीं तर जनावरासारखा उगीच बैस.

(३७) दुसऱ्यानीं तुला शाहाणा म्हणावा म्हणून जेव्हां तूं आपल्याहून शाहाण्याशीं वाद घालतोस तेव्हां तुला मूर्खमात्र म्हणतात जेव्हां तुझ्याहून चांगले कोणी बोलत असेल आणि तुला कळत असलें तरी त्यांत तोंड मध्यें घालू नये.

(३८) जो दुष्टाची संगति करितो त्याची अवस्था चांगली नाहीं. देवानीं राक्षसासी संगत केली तर त्यांचे दुर्गुण व कपट त्यांस लागतील आणि दुष्टापासून तुला सद्गुण प्राप्त होणार नाहींत जसें लांडगा कांतडी फाडणारा तो त्यास कशी कामवील.

(३९) दुसऱ्याचें व्यंग प्रगट करूं नये. कारण कीं त्यात त्याची अप्रतिष्ठा होते व तुझी अबरू जाते.

(४०) ज्याणें विद्या संपादिली आणि त्याप्रमाणें वर्तला नाहीं तो त्या शेतकऱ्या सारखा आहे. ज्याणें नागरलें आणि पेरलें नाहीं.

(४१) ज्याचें चित्त ठिकाणी नाहीं त्याच्यानें ईश्वराची सेवा घडत नाहीं जसें बदामाचा मोखा शिवाय उपयोग नाहीं.

(४२) भांडावयास सिद्ध पुष्कळ असतात. पण ते सर्व कामांत हुशार नसतात वरून चांगले दिसतात पण आंत पुष्कळ वाईट असतात.

(४३) जर सर्व रात्री चांदण्याच्या झाल्या तर चांदण्यास कोण पुसतो जर सर्व दगड माणकें झालीं तर दगड आणि रत्ने सारखींच होतील.

(४४) जो दर्शीत चांगला दिसतो तो स्वभावानें बहुधा चांगला नसतो. यास्तव लक्ष अंतरी ठेवावें बाह्यत्कारी ठेऊं नये. एक दिवसांत मनुष्याचें ज्ञान किती आहे याचा विचार केला तर समजेल परंतु मनुष्याचे पोटांतील दुष्टभाव आहे तो वर्षाची वर्षे समजत नाहीं यास्तव समजेल म्हणून खातरजमेनें राहूं नये. व खुशाली मानू नये.

(४५) थोराशीं कलह करणें म्हणजे आपला नाश करणें आपल्यास थोर समजतो तो काणा म्हणावा ज्यास एक पदार्थाचे दोन दिसतात. जो मेंढ्याशीं टकर करील त्याचें डोकें लौकरच फुटेल.

(४६) वाघावर चापट मारणें आणि तरवारीवर मूठ मारणें हें शाहण्याचें काम नव्हे. वरिष्ठाशीं लढाई करू नको व उलटून गोष्ट सांगू नको. तो लढाईस उभा राहील तर पळून जा हें चांगले.

(४७) दुर्बळानें बळवानाशीं धिट्टपणा केला तर आपले मरणारे शत्रूस आपणच साह्य जाहाल्या-सारखें आहे. जो घराबाहेर पडला नाहीं त्याणें शिपायाबरोबर लढाईचे मैदानांत काय जावें. आणि बुजा आंगानें चिलखत ज्याचे आंगांत आहे त्याशी लढाईस काय जावें.

(४८) जो दुसऱ्याचें शाहाणपण ऐकत नाहीं तो निंदेस पात्र होतो. ज्याला दुसऱ्याचा बुद्धि-वाद ठसत नाहीं त्याला लोक नाव ठेवूं लागले म्हणजे त्यास उगीच मान खालीं घालून बसावें लागतें.

(४९) मूर्ख लोक जे आहेत ते शाहण्यास पाहूं सकत नाहीं जसे कुत्रे घरांतले असतात ते षीकारी कुतऱ्यास पाहून गलबा करितात पण पुढें येवत नाहीं.

(५०) नादान मनुष्य विद्येंत दुसऱ्याची बरोबरी झाली नाहीं ह्मणजे त्याशीं दुष्टपणानें भांडावयास उठतो दुष्ट आहे तो पाठीमागें बडबड पुष्कळ करितो कारण कीं समोर गांठ पडली ह्मणजे त्याची बोलकी जीभ मुकी होत असती.

(५१) जर पोटाची काळजी नसती तर पक्षी जाळ्यांत सांपडतेना आणि पारधी जाळींही पसरतेना. पोट हें हातापायांची विडी आहे पोटाचे पाठीस लागला त्याच्यानें देवाचीही भक्ति घडत नाहीं.

(५२) वैद्य आहेत ते थोडें खातात ग्रहस्थ बेतानें. तपस्वी, सन्यासी, किंचित्. तरणे सरे तों पावेतों. व म्हातारे जिरे तों पावेतों व भट्ट दमलागे तों खातात. आणि पोटांत रिकामी जागा ठेवीत नाहींत. पोटावर लक्ष देणारा आहे त्यास दोन दिवस झोंप येत नाहीं एक दिवस फार खाल्लें ह्मणून दुसरें दिवसी काहींच नाहीं ह्मणून.

(५३) स्त्रीपाशीं मसलत घेणें नाश आहे. दगेखोराशीं दया करणें हा अपराध आहे.

(५४) ज्याचे हातीं शत्रू सांपडला आणि त्याचा नाश न केला तर आपला शत्रु आपण होतो. आपले हातांत बरची आणि सार त्याचे खालीं सांपडला असतां मारण्यास उशीर शाहाणा करीत नाहीं. वाघाची दया केली ह्मणजे बकऱ्यास मरण होतें. कोणाचा अभिप्राय असा आहे कीं जे कैदेंत सांपडले आणि हातीं आले त्यांस मारण्याचा विचार करावा कारण कीं आपले हातीं आहे तो मारूं सकतो आणि सोडूं सकतो परंतु एकदां मारला असतां पुन्हा तजवीज करणें हातीं नाहीं. जीवंतास मारूं सकतात पण मेल्यास कोण उठवील यास्तव ज्याचे हातीं तीर आहे त्याणें विचार करावा कीं सोडला असतां पुन्हा माघारा येणार नाहीं.

(५५) मूर्खासीं आणि शाहण्याशीं संग्राम झाला ह्मणजे शाहाण्यानें प्रतिष्ठेची आशा धरूं नये. व मूर्ख तोंडाळपणानें शाहण्याचा पराजय करील हें आश्चर्य नाहीं. कारण कीं दगडानें मोती छेदतात कोकिळा आणि कावळा एका पिंजऱ्यांत ठेविलीं तर कोकिळा बोलणार नाहीं. याचें आश्चर्य काय. गुणवानास बेकूब उपद्रव करूं लागला तर गुणवानानें दुःख मानूं नये. व राग येऊं देऊं नये. कारण कीं एका धोंड्यानें सोन्याचें भांडें फोडलें तरी दगडाची किंमत चढत नाहीं आणि सोन्याची उतरत नाहीं.

(५६) शाहणा बेकुबाचे सभेंत बोलत नाहीं आणि बोलला तरी त्यांत प्रतिष्ठा होत नाहीं. परंतु याचें आश्चर्य नाहीं. ढोल वाजत असला ह्मणजे सारंगी ऐकूं येत नाहीं. आणि अंबराचा सुवास लसणीचे घाणीत येत नाहीं. मूर्ख शाहाण्यास थकविलें ह्मणून चढून बोलतो पण त्याला असें समजत नाहीं कीं गोंधळी गोंधळ घालितात त्यांत सुस्वर गाणाराचें काय चालेल. जवाहीर चिखलांत पडलें तरी त्याची किंमत कायम राहते. आणि धूळ उडून अस्मानांत जाते पण तिची किंमत चढली असें होत नाहीं. बुद्धि नसला आणि विद्या सांगितली तर उपयोग काय. विद्या सांगितली नाहीं आणि बुद्धि आहे तरी उपयोग नाहीं. कोळसा मोठ्या पदवीचा आहे आणि विस्तव थोर पदार्थ आहे परंतु त्यांत गूण नाहीं ह्मणून किंमत नाहीं. साखरेची पदवी उसावरून नाहीं. परंतु स्वतां गुणावरून आहे. व कस्तुरी आली आपणच समजते गंधीयास सांगावयास नको कीं वास चांगला आहे. "चांगली कस्तुरी आहे." शाहाणा जो आहे तो वैद्याचे पेटीप्रमाणें आहे त्यांत नाद कांहीं नाहीं पण गुण मोटा आणि मुख तासे मर्फ्याच्या ढोलाप्रमाणें नाद मोटा आंत कांहीं नाहीं. शाहाणा मूर्खामध्यें कसा दिसतो कीं जसी सुंदर स्त्री आंधळ्याचे समाजांत आणि गीता यवनाचे घरांत तसें आहे. अशो क्षेत्री व्यास होते पण तें क्षेत्र पवित्र झालें नाहीं तसे

शाहणे याणीं मूर्खास किती सांगितलें तरीं व्यर्थ पण आपले जवळ असल्यास आपला गुण दाखीव कारण कीं सूर्याचे पोटीं शनी आणि केवड्याला काटे आहेतच.

(५७) सद्बुद्धीस इंद्रियें जिंकितात आणि सोदी बायको नवऱ्यास गरीब करिते ज्या घरांत बायको मोठ्यानें बोलते त्यांत सुख कोठून राहील.

(५८) अधिकार नाहीं आणि शाहणपण आहे तर तें कपट कृत्रिम होतें आणि अधिकार आहे अकल नाहीं तर मूर्खपणा व वेडेपणा होतो. यास्तव अर्धी शाहाणपण अकलहुशारी मग राज्य नाहीं तर संपदा आणि राज्य आपलाच नाश करितील.

(५९) अज्ञानी ग्रहस्थ ज्याणें दान धर्म केला आणि भोगलें तो शान्यापेक्षा बरा ज्याणें द्रव्य जमविलें आणि हालानें मेला. बाहेर दाखविण्याकरितां साधेपणा धरणें तो लुच्चेगिरीपेक्षा वाईट. आणि त्यांत दोष फार. जो संन्यासी ढोंग करून देवळांत बसतो त्या मूर्खास काळे भिंगांत काय दिसेल. थोडें थोडें जमा झालें म्हणजे फार होतें आणि एक एक दाण्याची रास होते राशीचे ढीग होतात. थेंब थेंब पाणी पडतां पडतां नदी होते.

(६०) विद्वान याणें नीच मांगसाकडून आपली अप्रतिष्ठा झाली तर क्षमा करूं नये कारण त्यांत दोघांचाही नाश आहे. एकाची प्रतिष्ठा कमी होते. दुसऱ्याची दांडगाई कायम होते मूर्खाशी विनोद आणि स्नेह करणें हें त्याचा गर्व आणि दांडगाई वृद्धि होण्याचें कारण आहें.

(६१) पाप कोणाकडूनही घडलें तरीं वाईट आहे आणि विद्वानापासून जाहालें तर फारच वाईट कारण कीं पापांचें हत्यार ज्ञान आणि विद्या आहे आणि ज्याजवळ हत्यार आहे आणि त्यास कोणी कैद केला तर मोठी लज्जेची गोष्ट आहे जो अज्ञान आहे त्याणें बदचाल गैरवाजवी गोष्टी बहुत केली आणि विद्वानानें यत्किंचित् केली तरी त्यापेक्षां तो बरा कारण कीं आंधळा होता व रस्ता चुकला हें बरें पण डोळे दोन्ही धड होते आणि विहिरींत गचावला तर हें वाईट आहे.

(६२) ज्याणें कोणास भाकर दिल्ही नाहीं त्याची कीर्ती होणार नाहीं. एक सत्पुरुष राज्यावर बसला असतां दुष्काळ पडला तेव्हां त्याणें असा नेम केला कीं अर्धपोटी जेवावयाचें म्हणजे दुसरे याचें दुःख समजेल. असा उपाय हा केला. बाग राखतो त्यास फळाची गोडी ठाऊक होती पण यजमानास कांहींच नाहीं. जो मुळापासून सुखी आणि गर्भश्रीमंत त्यास दुसऱ्याची गरीबी कळत नाहीं. ज्याणें गरीबी स्वतां भोगिली आहे त्यास दुसऱ्याची गरिबी समजेल. यास्तव तूं मोठ्या चांगल्या घोड्यावर बसून जात असलास तर पाहा मागें गरीब गाढव ओझें घेऊन चालतें त्याची व्यवस्था काय आहे आणि गरीबाचे घरीं धुंदुर्मास पुसूं नको कारणकीं त्यांना एक दिवस खावयासही मिळत नाहीं.

(६३) त्रासलेले भिकारी यांस दुष्काळांत व गरीबीचे दिवसांत तुम्हीं कसे आहां असें पुसूं नये परंतु जर तुझ्यानें त्याची जखम भरवत असेल आणि कांहीं देववत असेल तर पूस चिंता नाहीं गाढव ओझें घेऊन चिखलांत फसलेलें पाहिलें तर त्याची दया अंतःकरणांत वागवावी. पण जवळ जाऊं नये आणि जवळ गेलें तर कंमर बांधावी आणि शेपूट धरून त्यास उठवावें तर शोभा आहे.

(६४) दोन गोष्टी होतील असें बुद्धीस वाटत नाहीं एक ईश्वरानें जें दिल्हें आहे त्याहून अधीक मिळविणें आणि नेमणुकीचे अधीं मरणें. हजारों वेळ आक्रोश केला आणि हैराण जाहाले आणि देवाची स्तुती केली किंवा निंदा केली तरीं जें नियमित जाहाले ते फिरणार नाहीं. ईश्वरानें वायु उत्पन्न केला तो जेव्हां सुटतो तेव्हां म्हातारीचें जुनें घर पडकें घर पडले म्हणून काय त्यास काळजी आहे.

(६५) ज्याला ईश्वरानें लक्ष्मी दिल्ही त्याणें स्वस्थ बसावें त्यास भय नाहीं आणि ज्यास यमाचें बोलावणें येईल त्याणें जावें. कारण कीं मग उपाय नाहीं. मेहेनत करा न करा ईश्वर देणें तें

देईल आणि जरी वाघाच्या दाढेंत सांपडला तरीं तो जोपर्यंत आयुष्य सरलें नाहीं तों पर्यंत खाणार नाहीं.

(६६) जे आपल्या कपाळीं नाहीं तें हातीं येणार नाहीं. आणि जे आपलें आहे तें कोठेही असलें तरी येईल. राहू केतूनें काय प्रयत्न केला परंतु अमृत मिळालें नाहींच.

(६७) पारधी यास ज्या दिवशीं लाभकाळ नसतो त्यादिवशीं जाळ्यांत मासे सांपडत नाहीं आणि माशाचे मरण जवळ नसलें तर ते मृत्यु पावत नाहींत. आशाळू माणूस व्यर्थ इकडे तिकडे फिरतो देशाचे पाठीमागें आपण आपले पाठीमागें नसीब.

(६८) दुष्ट व श्रीमंत मातीचा आहे पण वर सोन्याचा मुलामा आहे. आणि भिकारी व सुष्ट मातीचा आहे वर मुलामा मातीचाच आहे. यास धर्माचा प्रसाद त्यास दुर्योधनाचा वर. चांगले मनुष्य विपत्तींतही सुखी आहेत. व दुष्ट मनुष्य संपत्तींत असूनही दुःखी. ज्याला सुख आणि प्रतिष्ठा आहे तो गरीबाची काळजी वागवीत नाहीं. त्यास इतकें सांगावें कीं या लोकांतील सुख आणि थोरपणा परलोकीं तुला मिळणार नाहीं.

(६९) मत्सर करणारा पुरुष ईश्वराचे उदारपणास शब्द ठेवितो. व चांगले मनुष्याशी दुष्ट-पणा करितो. एका दुष्टमाणसास एकाने पाहिलें तों एका श्रीमंतास शिव्यागाळी करीत चालला आहे तो त्यास म्हणाला अरे तूं भिकारी आहेस म्हणून ज्यास ईश्वरानें श्रीमंती दिल्ही आहे त्याणी काय तुझा अपराध केला. अरे तुम्ही कोणी एक दुष्ट माणसाचें वाईट चिंतू नका. कारण तो आपला आपण वाईट चिंतणार आहे त्यापेक्षां ज्या मनुष्याचे पाठीमागे शत्रु नाश करावयास लागला आहे तसल्या माणसास आपण शत्रु काय व्हावें.

(७०) ज्या शिष्यास शिकण्याची इच्छा नाहीं तो निर्धन स्त्रीव्यसनी पुरुषासारखा आहे आणि मुसाफर आहे त्यास रस्ता माहोत नाहीं तर पक्षी भग्नपक्षासारखा आहे व विद्वान आणि अविद्वाना-सारखी कृती तो निर्फळ वृक्षासारखा आहे. आणि अज्ञान संन्यासी निद्वार गृहासारखा आहे.

(७१) श्रीव्यासानी लिहिली आणि ईश्वरानें सांगीतली याचें कारण असें आहे कीं याप्रमाणें कोणी वर्तुन चांगलेपणा धरील रोज लिहिलेले श्लोक वाचावे आणि पोथी चांगली रंगीत चित्रित करावी म्हणून नाहीं. अज्ञान तपस्वी पायानें चालणारा सारखा आहे आणि विद्वान गैरवर्तणु-कीच्या घोड्यावर निजल्यासारखा आहे. आणि मूर्ख मनुष्यानें ईश्वराची स्तुती एकदां केली आणि तपस्वी याणें ढोंग किती एक वर्षे केलें तरीं बराबर नाहीं. चोपदार भला आणि कृपाळू बरा पण राजा दुष्ट वाईट.

(७२) विद्वान अकर्मी निर्मध मोहोळा सारखा आहे. मधमाशीजवळ मध नाहीं तर तिणें इतकीच कृपा करावी कीं कोणास चाऊं तरीं नये.

(७३) ज्या मनुष्यास धीर नाहीं तर स्त्री आहे. संत देशांवर नजर ठेवितो. तो दरवडेखोर आहे. अरे तूं लोकांस दाखविण्याकरितां हा वीणा व ह्या चिपळ्या घेतल्या आहेस पण तुझें कर्म अंतःकरणांत ठिक नाहीं तेव्हां काय उपयोगी येईल हें ढोंग. संसार टाक मग विणाचिपळ्या असोत नसोत.

(७४) दोन मनुष्याचे हृदयांतील दुःख जात नाहीं व त्याचा हात वरती होत नाहीं एक ज्या सावकाराचें तारूं बुडालें व ज्याचा मुलगा लुचा निघाला. थोर मनुष्याच्या शिरपावापेक्षां आपली घोंगडी चांगली. आणि ताटांतील दुसऱ्याच्या येथील जेवणापेक्षां आपले घरची पत्रावळ बरी. आणि आपले मेहेनतीची आंबील बरी पण पक्कानें थोराचे आर्जवानें खाणें नको.

(७५) दोन गोष्टी केल्या असतां बुद्धीस विपर्यास आहे आणि शाहण्याच्या मत्ताचा अप-मान आहे. एक ज्यावर विश्वास नाही. त्याचे औषध खाणें आणि सोबती नसतां गैर माहीत रस्त्यांत चालणें.

(७६) एका विद्वानास पुसलें कीं तुला इतकी विद्या आणि थोरपणा कशानें प्राप्त झाला त्याणे उत्तर केले कीं जें मला कळलें नाहीं तें पुसून घेण्यास मी लाज बाळगिली नाहीं. चांगला वैद्य मिळेल तेव्हां प्रकृत नीट होण्याची आशा. तसें जी गोष्ट ठाऊक नाहीं ती विचार करण्यास लाज न धरितां आळस करणार नाहींस तरच तुला शाहणे होण्याची उमेद.

(७७) जें आपल्यास कधीं तरी कळेल असें आहे तें पुसण्याची काळजी करूं नये. कारण त्यांत अप्रतिष्ठा आहे. एका मनुष्यानें एका वैद्यास चमत्कार दाखविला तो त्यास ज्याणें शिकविला तो त्यास शिकविणार होता. तेव्हां त्याणें त्यादिवशीं त्यास पुसिलें नाहीं पुढें तो त्यास प्राप्त जाहला तेव्हां आपल्या आपणच समजेल.

(७८) शाहणपणाची गोष्ट असी आहे कीं संसार तरी करून संपत्ती संपादन करावी नांहीं-तर परमेश्वराचें तरी साधन करावें ऐकणाराची प्रसन्न मर्जी असेल तरच कांहीं बोलणें तें बोलावें आणि बोलणें तें तरी त्याची मर्जी पाहून बोलावें भलतेंच बोलणें काढलें तें कोणी ऐकेना तर उपयोग नाहीं सबब प्रसंगानुसार भाषण समयोचित करावें.

(७९) ज्याणें वाईट मनुष्याची संगत धरिली आणि त्याचा वाईट स्वभाव न धरिला तरी त्यास लोक नांवें ठेवितील जसा कोणी भांग खाणाराचे अड्यांत गेला त्यास भजन करावयास गेला असें कोणी म्हणणार नाहीं परंतु भांग खावयास गेला असें म्हणतील. नादान मनुष्याची सोबत केली म्हणजे आपण निंदेस पात्र जाहाला. एक समर्थास एका गृहस्थानें पुसिलें कीं मला एक बुद्धिवाद सांग. त्याणें सांगितलें कीं मूर्खाची संगत धरूं नको. मोठा शाहाणा असलास तरीं मूर्ख होशील आणि मूर्ख असलास तर फार मूर्ख होशील.

(८०) गरीब घोडे असे आहेत कीं त्यांचा कान लहान मुलानें धरिला तरी दोनशे कोस जाईल मान हालिवणार नाहीं व पुढें रस्ता दऱ्याचा आहे तेथें प्राण जावयाचा आणि मुलगा वेडेपणानें तिकडे जाईल तर लगाम हिसकाऊन निघुन जाईल तद्वत मनुष्यानें दुर्घट प्रसंगी विनोद करूं नये. आणि म्हणतात कीं दुसमान कृपेनें मित्र होत नाहीं पण अधीक शत्रुत्व करितो. जो कोणी तुझ्याशीं कृपाळूपणानें वागेल त्याशीं तूंही तसाच वाग. आणि तो जर वांकडे पाहील तर त्याचें दर्शन घेउं नको. व दुष्टाशीं चांगलें भाषण करूं नको. जसें ताम लागलेलें लोखंड कानसल्या शिवाय उजळ होत नाहीं.

(८१) आपली अक्कल हुशारी दाखवावी म्हणून दुसऱ्याचे बोलण्यांत तोंड जो घालतो त्याचा मूर्खपणामात्र निश्चय करून दिसतो व थोर म्हणतात कीं तुला कोणी पुसेल तों पावेतों भाषण करूं नको. कारण कीं खरें जरीं पुसल्याखेरीज बोललें तरी कोणी तुला चांगलें म्हणणार नाहीं.

(८२) एक वेळ एकास लज्जा स्थानीं दुखापत झाली होती. त्याचा यजमान त्यास पुसे कीं तुझा रोग कसा आहे परंतु कोठे आहे हें कधीं त्याणें पुसलें नाहीं कारण कीं तो समजत असें बोलावें कोणचे न बोलावें कोणचें आणि जो बोलण्यांत प्रश्न करण्यांत विचार करितो तो उत्तर ऐकोन फजीत होत नाहीं. भाषण यथार्थ आहे असें तुला ठाऊक नसेल तर तोंडच उघडूं नको. कारण कीं खरे बोलून कैद जालास तर पुरवेल पण खोटें बोलून सुटणें नको.

(८३) खोटें बोलणे असें आहे कीं जशी जखम बरी जाहली तरी वण राहतो. एकदां खोटें बोलण्याची सवय पडली म्हणजे खरें बोललें तरी खोटेंच म्हणतात. देवानें सांगीतलें आहे कीं खोट्याची शिक्षा ज्याची त्यालाच होईल. येकाचा खरें बोलण्याचा स्वभाव होता त्याणे खोटें केलें तेंही खरें झालें व येकाने खोटें बोलण्याचा प्रघात घातला त्याणे खरें केलें तेंहीं खोटें झालें.

(८४) ईश्वराने सृष्टी निर्माण केली त्यांत सर्वांहून शुध्द माणूस आहे आणि श्वान सर्वांहून अशुध्द आहे परंतु ज्ञाते म्हणतात कीं सत्यपणाने वागणारा कुत्रा असत्यपणाने वागणारे मनुष्यापेक्षा उत्तम. तात्पर्य खराब मनुष्याचे वाटेस जाऊ नये. जसे दगडाच्या चिऱ्यावर कितीही काड्या

मारल्या तरी नौबतीचा अवाज निघणार नाहीं तसें जन्मपर्यंत हलक्या मनुष्याचें आर्जव केलें तरी तो येकादे दिवसी थोडक्या गोष्टीकरितां प्राण घेण्यास उभा राहील.

(८५) इंद्रियसुखांत जो निमग्न असतो त्यास विद्या होत नाहीं आणि ज्यास विद्या नाहीं त्यास थोरपणा नाहीं जो बैल बहुत खाणारा आहे त्याजवर दया करू नये कारण कीं जो बहुत खाणारा तो बहुत मूर्ख–जर तुला ताजें व्हावयाचें असेल हत्तीसारखें तर गाढवासारखी मेहेनत करावी लागेल.

(८६) ग्रंथीं लिहिलें आहे कीं मनुष्यास देवाने श्रीमंती दिल्ही तर देवाची आठवण राहात नाहीं आणि गरीबी दिल्ही तर काळजी करीत राहतो तेंव्हां देवाची भक्ती केंव्हां कशी व्हावी. खाण्यास मिळालें म्हणजे गर्व आणि आळस आणि खाण्यास मिळालें नाहीं म्हणजे दुःख आणि काळजी या दोनीं अवस्थेंत ही व्यवस्था तस्मात ईश्वराचें स्मरण केंव्हां होईल न जाणो.

(८७) ईश्वरइच्छेने राजाही सिंव्हासनाखालीं येतो आणि वाघाचे तोंडांत सापडला तरी निभतो तस्मात त्या भगवंताचें स्मरण होईल तोच सुदिन प्राण जात असला तरी चिंता नाहीं.

(८८) ईश्वराने अवकृपा केली तर ऋषीही भ्रष्ट होतील आणि त्याचे कृपेने राक्षसही देव होतील. जर ईश्वराने परलोकीं पुसलें कीं काय केलेंस तर चांगलें उत्तर ऋषींच्यानेही देववणार नाहीं तस्मात हे भगवंता कृपाचकर तर पाप्याचा परिणाम नीट आणि त्याची तीच आशा आहे.

(८९) जो कोणी संसारांत पुण्य करीत नाहीं तो परलोकीं दुःख पावतो. याविषयीं वचन आहे कीं–ईश्वर परलोकीं शासन करील–आणि दुःखांत घालील. थोरांचें सांगणें दुःखकारक आहे तेंव्हां त्याप्रमाणे कोणी चालत नाही–शाहणे जे आहेत ते आपले पूर्वी लोक झाले त्यांचे वर्तणुकीच्या गोष्टी कथा ऐकून शाहणे होतात आणि जे शाहणे आहेत ते चांगले रीतीने वागतात कीं आपल्ये पुढे जे होतील तेही त्याप्रमाणेंच आपल्ये उदाहरणाने शाहणे व्हावे. जाळ्यांत येक पक्षी सापडला म्हणजे तिकडे दुसरा येत नाहीं अशी दुसऱ्याची व्यवस्था पाहून येक शाहणा होतो यास्तव आपलें उदाहरण दुसऱ्यास देउ नको.

(९०) ज्याला कान नाहीं तो काय ऐकेल आणि ज्याजवर फास टाकला तो काय पळून जाईल. आंधेरी रात्र ईश्वराची कृपा झाली तर दिवस होतो. दौलत मेहेनतीने येत नाहीं पण ईश्वर कृपा करितो तेंव्हां येते. यास्तव हे भगवान मी कोणास हाक मारु तुझ्याशिवाय माझें ऐकणार कोण आहे तू ज्यास साह्य करशील तोच रस्त्याने जाईल आणि तू सोडलास तर मग कोण हात धरणार आहे.

(९१) चांगल्ये चालीचा भिकारी बरा पण वाईट चालीचा राजा वाईट–प्रथम दुःख मग सुख पत्करलें परंतु आदी सुख आणि अंती दुख नसावें.

(९२) आकाशांतुन पर्जन्य पडून जमीन सुखी होत्ये आणि त्याबदल आकाशास काय उपयोग मातो मात्र उडोन वर जात्ये जें विहिरींत तें पोहोण्यांत. माझी चाल वाईट आहे असें जरी तुला कळलें तरी तू आपली चांगली चाल सोडू नको. ईश्वरही अपराध पाहून क्षमा करितो पण शेजारी न पाहतां दुर्वार्ता उठवितो. हे भगवन रक्षण कर्ता तू आहेस जर गोष्टी मनुष्यास कळल्या तर कोणी सुख पावलानस्ता येकाचे कामांत दुसरा बळेंच हात घालता पण समजत नाहीं म्हणून बरें.

(९३) खाणींत खणलें म्हणजे सोनें निघतें पण कृपणाचा प्राण गेल्यावेरीज मिळणार नाहीं–कृपण म्हणतो कीं खाऊ नये पण जपून ठेवावें कारण कीं भोगल्यापेक्षां आशा राखल्याचें सुख विशेष–त्याचा शेवट असा होतो कीं शत्रूच्या इच्छेप्रमाणे येकेदिवसी द्रव्य भूमींत राहतें.

(९४) जे आपल्येपेक्षां लाहानावर कृपा करीत नाहींत ते आपल्याहून वरिष्ठाचे हातून दुःख पावतात–जोरदार आहे तो गरीबास मारितो असें सर्वत्र घडत नाहीं यास्तव गरीबास दुःख देउ नको–कां कीं तुझ्याहून जे जोरावर आहेत ते तुझें असेंच करतील.

(९५) शाहणे काय करितात जेथे भांडण होत असेल तेथून पळून जातात. जेथं स्वस्थपणा पाहिला तेथे मुकाम करितात कारण तेथे राहिल्यांत जीवाचें रक्षण आहे आणि तेथून पळालें नाहींतर भय आहे.

(९६) खेळणारास बारा पाहिजेत परंतु तिरपगडा पडतां मैदानापेक्षां कुरण चांगलें परंतु घोड्याचा लगाम घोड्याचे स्वाधीन कोठे आहे.

(९७) संत देवाची प्रार्थना करितात कीं हे भगवंत दुष्टांवर कृपाकर कारण कीं चांगले जे आहेत त्यांजवर तुझी कृपा आगोदर आहेच कारण कीं त्यांस तू सद्‌गुण दिल्हे आहेस मागावयास नको.

(९८) जमशिद राजाने प्रथमतः पोषाख घालावयाची तऱ्हा काढली आणि डावे हातांत अंगठी घातली–कोणी पुसलें कीं उजवा हात पवित्र असून डावे हातांत अंगठीची शोभा काय त्याणे सांगीतलें कीं उजवा मुळींच पवित्र आहे त्यास नवीन शोभा नलगे–व एका राजानें सांगीतलें कीं चिनी कारागिराकडून हें तंबूवर लिहावें कीं दुष्टास शहाणे मनुष्यानें सुष्ट करावें सुष्टास सुष्ट काय करावयाचें आहे.

(९९) येका शाहण्यास पुसलें कीं तू अंगठी डावे हातांत घालतास याचें कारण काय. त्याणे सांगितलें कीं तुला ठाऊक नाहीं बहुधा जो चांगला असतो त्यास कोणी विचारीत नाहीं अशी चाल आहे–ज्याणे उत्पन्न केलें तो गुण देतो किंवा दौलत देतो–तेणेकरून दुःख आणि येणेकरून सुख.

(१००) राजास मसलत देणे त्याणे पथ्य करावें ज्यास आपल्ये जीवाची इच्छा नाहीं आणि द्रव्याची आस्था नाहीं–जो साधू आहे त्यास द्रव्य दिल्हें काय आणि तरवारीने मारलें काय कोणाचीच तो पर्वा बाळगीत नाहीं.

(१०१) राजा दुष्टाचा नाश करण्याकरितां व कोतवाल गुन्हेगाराचे पारिपत्याकरितां व काजी भांडतात त्यांस समजून सांगण्याकरितां पण जो शाहणा असेल त्याणे काजीकडे कधी जाऊ नये. जें वाजवी द्यावयाचें असेल तें घरांतले घरांत दिल्हें तर बरें मग दुःखाने द्यावें त्यांत काय हशील जर पट्टीचा पैसा वेळेस पोचोविला तर भातेकरी कशास तगादा करतील.

(१०२) सर्वलोकांची जी कज्जा करितां करितां सुखते पण काजीचे जिभेस पाणी सुटतें. काजीला येक खिरा लाच दिल्हा म्हणजे दाहा काकड्यांचा दावा शाबूद करितो.

(१०३) कसबीण म्हातारी झाली म्हणजे मी पाप करणार नाहीं म्हणून शपत वाहते व पश्चात्ताप करिते. व फौजदार कामावरून हाकून दिल्हा म्हणजे मी कोणास इजा देणार नाहीं म्हणतो पण सामर्थ्य गेल्यावर या बोलण्याचा उपयोग काय. यास्तव जोंपावेतो वृद्धापकाळ झाला नाहीं तोंच देवाचें भजन करावें स्वस्थ बसून म्हातारपण झाल्यावर मग स्वस्थ बसेल तर काय आश्चर्य फिरवतच नाहीं.

(१०४) येका शाहण्यास प्रश्न केला कीं मोटाले उंच फलयुक्त वृक्ष ईश्वराने उत्पन्न केले आहेत परंतु सुरू कांहीं फळ देत नाहीं असें असतां त्यास मुक्त म्हणण्याची गरज काय–त्याचें उत्तर सांगीतलें कीं सर्व वृक्षांस हंगाम आहेत त्या काळीं ते फळ देतात आणि नंतर विशोभीत दिसतात. व सुरू बारा महिने सारखा यास्तव त्यास मुक्तवृक्ष म्हणतात. कितीयेक राजे पृथ्वीवर होऊन गेले तरी नद्या वाहतात त्या वाहतच राहतील यास्तव जर तुला सामर्थ्य असलें तर उदारपणा धर नाहींतर सुरु सारखा मुक्त राहा नेहेमी आनंदांत. मनुष्यास मरणकाळीं दोन प्रकारचीं दुःखें होतात तीं अशीं कीं येक संपत्ती मिळविली आणि भोगिली नाहीं. व दुसरें असें कीं ज्ञान शिकला आणि वर्तणूक तशी केली नाहीं. जर कृपण असेल आणि विद्वान असला तरी त्यास दूषण लावितात मोठा मूर्ख असला आणि उदार धार्मिक असेल तर त्याचीं सर्व दुषणें लपतात.

## शुद्धीपत्र

| पृष्ठ. | ओळ. | अशुत्ध. | शुत्ध. |
|---|---|---|---|
| १ | ११ | पुष्पवान. | पुष्पवन. |
| २ | ६ | ज्यास. | यांत. |
| २ | ९ | आहे. | आहे कीं काय |
| ९ | ३ | ती. | ते. |
| ९ | ५ | ब्रीज. | ब्रीज. |
| ३८ | ५ | फारचा. | फारच. |
| ४३ | २ | लिहिली. | गीतालिहिली |
| ५६ | ७ | जी. | जीभ. |

● ●

# सुभाषित

अथवा

# बोधवचनें

( लोकहितवादिसंग्रहित )

लोकांस
ज्ञान, बोध, चातुर्य व साहित्य यांच्या
प्राप्तीकरितां
मालकासाठीं
ठाणें येथें
'सूर्योदय' छापखान्यांत छापिलें.

भाद्रपदमास, शके १८००
सन १८७८.

किंमत ८ आणे

# प्रस्तावना

मनुष्य अनेक प्रकारचे उद्योग करितो, संपत्ति मिळवितो आणि कीर्त्ति संपादितो संपत्ति मिळणें आणि कीर्त्ति संपादणें ह्यात विद्वत्ता हें एक विशेष भूषण आहे. विद्वत्ता असल्यावांचून आयुष्यक्रम सुखप्रद नव्हे. अनेक प्रकारच्या भ्रांती, खोटे अभिमान व द्वेष या सर्वांचें जेणेंकरून निरसन होतें त्या संस्काराचें नांव विद्या आहे. जेणेंकरून भ्रांती वाढतील त्या सर्व अविद्या समजाव्या. आश्चर्य-जनक गोष्टींपासून अज्ञानी लोकांचें मनोरंजन होतें; यास्तव अशा गोष्टी लिहून लोकांत बहुत भ्रम उत्पन्न झाले आहेत. भुत प्रेत, मुहूर्त्त शकुन, मंत्र तंत्र, किमया, योगसाधन, देवऋषि, पंचाक्षरी, सालहोत्र, स्वरोदय, शिंका, पल्लीपतन, जातक, नवस, ग्रामण्य, प्रायश्चित्त, जारणमारण, सिद्धि-साधन, इत्यादि अनेक भ्रांती चालू आहेत; त्या नाहीशा व्हाव्या हें विद्येचें सार्थक आहे. विद्येनें मन निर्मळ व भ्रांतिरहित व्हावें या हेतूनें सर्व विद्योपक्रम आहे. अशा विद्येनें मनुष्याचें मन शुद्ध व्हावें व या हेतूनेंच त्या विद्या शिकाव्या. या विद्या शिकण्याचीं अनेक साधनें आहेत. त्यांत सुभाषित हेंही एक साधन आहे. प्रपंचांतील अनेक काळज्यांनीं मनुष्य त्रस्त होऊन कधीं कधीं कोत्या धैर्यानें व विचारानें त्यास आपण केलेल्या श्रमांप्रमाणें आपणास सौख्यप्राप्ति नाहीं असें वाटतें व मन उदास होतें. अशा समयीं त्यास तशा विषादांतुन अथवा औदासिन्यातून एक बाजूस काढून क्षणेक, व विचारी असल्यास सर्वकाल, आनंदवृत्तीत ठेवण्यास बोधपर ग्रंथांची आवश्यकता आहे.

संस्कृतांत, अशा उदासी जनांसही आनंदित करणारे बोधपर ग्रंथ 'सुभाषित' या नावाखालीं पुष्कळ व सर्वमान्य आहेत. परंतु संस्कृत भाषेचें ज्ञान म्हणजे सर्व स्त्रीपुरुषांस, मुलां बाळांसही असतें असा प्रकार नसल्यामुळें संस्कृत न जाणणाऱ्या प्राकृतांकरितां प्रकृत पुस्तकाची रचना केली आहे.

सन १८४३ पासून अनेक ग्रंथवाचनक्रमांत जेथें जेथें नीतिबोधक चमत्कारिक, शहाणपणाचीं, सभाचातुर्याचीं, साहित्योपयोगी (अलंकारिक आणि व्यवहारांत व परमार्थांत सन्मार्गदर्शक) अशीं वाक्यें आढळली तीं तीं वेळोंवेळीं व ठिकठिकाणीं टिपणें करून ठेविलीं होतीं. त्यांपैकीं कित्येक वाक्यें सन १८५१ या वर्षी पुणें येथील 'ज्ञानप्रकाशां'त प्रकृत पुस्तकासारख्या एका लहानशा पुस्तकांत छापण्यास आरंभ केला होता. परंतु त्याचीं थोडीं पृष्ठें छापलीं गेलीं तोंच पुढें स्थलांतर व इतर कांहीं अल्प स्वल्प हरकतींनीं प्रकृत ग्रंथोद्देश तसाच अपूर्ण राहिला. हल्लीं ईश्वरकृपें त्या उद्देशसिद्धीचा योग्य काळ आला असल्यामुळें प्रकृत ग्रंथ सर्व विचारी जनांच्या रंजनार्थ प्रसिद्ध केला आहे.

प्रकृत ग्रंथांत प्रसिद्ध 'सुभाषितरत्नाकरां'तील कित्येक बोधपर अशीं वाक्यें उतरून घेतलीं आहेत. आंमचें संस्कृत सुभाषित फार प्रसिद्ध व सर्वमान्य आहे हें आम्हीं वर म्हटलें आहेच. परंतु त्यांत शृंगारिक विषय, थट्टा मस्कऱ्या, उपहास व अतिशयोक्ती यांचा विशेष भरणा असल्या-मुळें लहान मुलांच्या व मुलींच्या हातांत देण्यास ते कित्येक ग्रंथ योग्य नाहींत. म्हणून आम्हीं प्रकृत पुस्तकांत तशा गोष्टी अगदीं गाळून टाकून साधारण सर्व कुलस्त्रिया व मुलें यांसही वाचण्यास योग्य अशा बालबोध व सुबोध करणाऱ्या वाक्यांचाच संग्रह केला आहे, हें विचक्षण वाचकांस कळून येईलच.

ह्या पुस्तकांत शेवटच्या 'राजनीती' सुद्धां एकंदर १०० प्रकरणें आहेत. 'उपद्रव' हें प्रकरण दोन ठिकाणीं पडलें आहे तरी त्यांतील वचनें भिन्न आहेत. यांतील प्रकरणें गुणावगुणांप्रमाणेंच बहुतकरून दाखविलीं आहेत. म्हणजे, 'सज्जन', 'दुर्जन'; 'उद्योगी', आळशी'; 'शत्रू', 'मित्र'; अशीं लिहिलीं आहेत. शेवटचें 'राजनीति' हें प्रकरण परिशिष्टासारखें असून, त्याचें नांव जरी 'राजनीति' ठेविलें आहे, तरी ती 'नीति', सर्व साधारण जनांसही प्रकृत ग्रंथोद्देशानुरूप नीतिदर्शक, बोधक आणि रंजक होण्यासारखीच आहे.

ह्याप्रमाणें हेत्वनुरूप प्रकृत पुस्तकांत समजून घेण्यासारख्या पुष्कळ उपयोगी गोष्टी असून त्यांपासून सर्व स्त्री पुरुषांस योग्य लाभ होईल ही पूर्ण आशा आहे.

पुणें, भाद्रपद व. ४, शके १८००. लोकहितवादी

---

## अनुक्रमणिका


| प्रकरणानुक्रम | | पृष्ठ | प्रकरणानुक्रम | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|---|
| १. ईश्वर | ... | १ | २०. शत्रु | ... | १८ |
| २. शास्त्र | ... | " | २१. मित्र | ... | १९ |
| ३. मोक्ष | ... | " | २२. लोकप्रीति | ... | २३ |
| ४. ज्ञान | ... | " | २३. मान | ... | " |
| ५. अज्ञान | ... | २ | २४. उपद्रव | ... | " |
| ६. शिक्षा | ... | " | " " | ... | २५ |
| ७. क्षमा | ... | ३ | २५. उपकार | ... | २३ |
| ८. विचार | ... | " | २६. कृतघ्नता | ... | २५ |
| ९. विद्या | ... | ४ | २७. सूड | ... | २६ |
| १०. लबाड (असत्यवादी) | ... | ५ | २८. दुर्जन | ... | " |
| ११. सत्य | ... | ६ | २९. सज्जन | ... | २९ |
| १२. मूर्खपणा | ... | " | ३०. उद्योग | ... | ३७ |
| १३. शहाणपणा | ... | ९ | ३१. आळशी | ... | ३८ |
| १४. फजिती | ... | ११ | ३२. खुशामत—स्तुती | ... | " |
| १५. लौकिक | ... | " | ३३. निंदा | ... | ३९ |
| १६. बोध | ... | १२ | ३४. सुख | ... | ४० |
| १७. नीति | ... | १७ | ३५. दुःख | ... | ४१ |
| १८. मत्सर | ... | १८ | ३६. धर्म | ... | ४२ |
| १९. राग | ... | " | ३७. नास्तिक | ... | ४३ |

| प्रकरणानुक्रम | पृष्ठ | प्रकरणानुक्रम | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ३८. वाद ... | ४४ | ७०. हेतु--मसलत ... | ७० |
| ३९. भय ... | ” | ७१. आशा--लोभ ... | ७१ |
| ४०. मित्रा ... | ४५ | ७२. भिक्षुक ... | ७३ |
| ४१. शूर ... | ४६ | ७३. संतोष ... | ७५ |
| ४२. धीर ... | ” | ७४. सृष्टिनियम ... | ७६ |
| ४३. कद्रु ... | ४७ | ७५. स्वभाव ... | ” |
| ४४. उदार ... | ” | ७६. संसार ... | ७७ |
| ४५. चैनी ... | ४८ | ७७. स्त्री ... | ७९ |
| ४६. कर्ज ... | ४९ | ७८. पुत्र ... | ८२ |
| ४७. भाषण ... | ” | ७९. भूषण ... | ८३ |
| ४८. मौन ... | ५१ | ८०. रीतभात ... | ” |
| ४९. चोर ... | ” | ८१. ह्मातारपण ... | ८४ |
| ५०. दुष्ट मनुष्य ... | ५२ | ८२. राज्य–राजा ... | ८५ |
| ५१. पाप ... | ” | ८३. सेवक ... | ८८ |
| ५२. चांगलें ... | ” | ८४. स्वातंत्र्य ... | ” |
| ५३. कर्मे ... | ५३ | ८५. प्रवास ... | ८९ |
| ५४. प्रारब्ध ... | ५४ | ८६. गोप्य ... | ९० |
| ५५. दारिद्य ... | ५५ | ८७. गुण ... | ” |
| ५६. द्रव्य ... | ५६ | ८८. वैद्य ... | ९३ |
| ५७. काळ ... | ५९ | ८९. कवी ... | ९४ |
| ५८. आयुष्य ... | ६० | ९०. ज्योतिषी–गणिती ... | ९५ |
| ५९. मृत्यु ... | ६१ | ९१. दुर्गुण ... | ९६ |
| ६०. प्रश्न ... | ६२ | ९२. मद्यपान ... | ” |
| ६१. परीक्षा ... | ६३ | ९३. हट्ट ... | ९७ |
| ६२. स्थिति ... | ” | ९४. अपराध ... | ” |
| ६३. चाली ... | ” | ९५. गर्व ... | ९८ |
| ६४. प्रीति वगैरे मनोविकार ... | ६५ | ९६. रोग ... | ९९ |
| ६५. मदन ... | ६६ | ९७. शुचिर्भूतता–स्वच्छता ... | १०० |
| ६६. क्षुधा ... | ६७ | ९८. अध्ययन व वाचन ... | १०१ |
| ६७. स्मरण ... | ” | ९९. स्फुट ... | ” |
| ६८. मत व रुचि ... | ६८ | १००. राजनीति ... | १११ |
| ६९. वचन .. | ७० | | |

# सूचीपत्र


| वर्णानुक्रम विषय. | पृष्ठ |
|---|---|
| अध्ययन व वाचन ... | १०१ |
| अपराध ... | ९७ |
| अज्ञान ... | २ |
| आशा-लोभ ... | ७१ |
| आयुष्य ... | ६० |
| आळशी ... | ३८ |
| ईश्वर ... | १ |
| उदार ... | ४७ |
| उद्योगी ... | ३७ |
| उपकार ... | २३ |
| उपद्रव ... | २३ |
| ,, ... | २५ |
| कद्रु ... | ४७ |
| कर्ज ... | ४९ |
| कर्म ... | ५३ |
| कवी ... | ९४ |
| काळ ... | ५९ |
| कृतघ्नता ... | २५ |
| खुषामत-स्तुति ... | ३८ |
| गर्व ... | ९८ |
| गुण ... | ९० |
| गौप्य ... | ९० |
| चांगलें ... | ५२ |
| चाली ... | ६३ |
| चैनी ... | ४८ |
| चोर ... | ५१ |
| ज्योतिषी-गणिती ... | ९५ |
| दारिद्य ... | ५५ |
| दुर्गुण ... | ९६ |
| द्रव्य ... | ५६ |
| दुःख ... | ४१ |
| दुर्जन ... | २६ |
| दुष्ट मनुष्य ... | ५२ |
| धर्म ... | ४२ |
| धीर ... | ४६ |
| नास्तिक ... | ४३ |
| निंदा ... | ३९ |
| नीति ... | १७ |
| परीक्षा ... | ६३ |
| पाप ... | ५२ |
| पुत्र ... | ८२ |
| प्रवास ... | ८९ |
| प्रश्न ... | ६२ |

| वर्णानुक्रम विषय | पृष्ठ |
|---|---|
| प्रारब्ध ... | ५४ |
| प्रीति वगैरे मनोविकार ... | ६५ |
| फजिती ... | ११ |
| बोध ... | १२ |
| भय ... | ४४ |
| भाषण ... | ४९ |
| मित्रा ... | ४५ |
| भिक्षुक | ७३ |
| भूषण ... | ८३ |
| मदन ... | ६६ |
| मद्यपान ... | ९६ |
| मत व रुचि ... | ८ |
| मत्सर ... | १८ |
| मान ... | २३ |
| मित्र ... | १९ |
| मूर्खपणा ... | ६ |
| मृत्यु ... | ६१ |
| मोक्ष ... | १ |
| मौन ... | ५१ |
| म्हातारपण ... | ८४ |
| राग ... | १८ |
| राज्य-राजा ... | ८५ |
| राजनीति ... | १११ |
| रीतभात ... | ८३ |
| रोग ... | ९९ |
| लबाड-असत्यवादी ... | ९ |
| लोकप्रीति ... | २३ |
| लौकिक ... | ११ |
| वचन ... | ७० |
| वाद ... | ४४ |
| विचार ... | ३ |
| विद्या ... | ४ |
| वैद्य ... | ९३ |
| शत्रु ... | १८ |
| शहाणपणा ... | ९ |
| शास्त्र ... | १ |
| शिक्षा ... | २ |
| शुचिर्भूतता-स्वच्छता ... | १०० |
| शूर ... | ४६ |
| संतोष ... | ७५ |
| संसार ... | ७७ |
| सज्जन ... | २९ |
| सत्य ... | ६ |

# सूचीपत्र


| वर्णानुक्रम विषय | | पृष्ठ | वर्णानुक्रम विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| स्थिति | ... | ६३ | स्वातंत्र्य | ... | ८८ |
| सुख | ... | ४० | स्त्री | ... | ७९ |
| सूड | ... | २६ | हट्ट | ... | ९७ |
| सृष्टिनियम | ... | ७६ | हेतु–मसलत | ... | ७० |
| सेवक | ... | ८८ | क्षमा | ... | ३ |
| स्फुट | ... | १०१ | क्षुधा | ... | ६७ |
| स्मरण | ... | ६७ | ज्ञान | ... | १ |
| स्वभाव | ... | ७६ | | | |


# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध | पृष्ठ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १० | भवगद्भक्तांची | भगवद्भक्तांची | ८७ | २२ | (भोगवान् | (भोगवान्) |
| ११ | १७ | काणि | आणि | | | असतात); | असतात; |
| १३ | १३ | रात्री | रात्रीं | ८८ | २५ | अपल्यावर | आपल्यावर |
| १७ | १४ | जगूंनमे! | जगूंनये! | ८८ | २५ | वर्त्तर्णूक | वर्त्तणूक |
| १७ | २० | सदाचण | सदाचरण | ८९ | २२ | ऐवढाच | एवढाच |
| १८ | २४ | खुख | मुख | ९० | १८ | तिन्हींपैकीं | तिन्हींपैकींच |
| २१ | १८ | भांड्यावर | भांड्याचे | | | कांहींच | कांहीं |
| २१ | २५ | सांवन | सांत्वन | ९४ | २४ | सुंगंध | सुगंध |
| २५ | ५ | स्वाभाविव | स्वाभाविक | ९५ | १ | स्‌ति | स्तुति |
| २७ | ११ | दुसयाचें | दुसऱ्याचें | ९५ | १२ | एकामनुष्या | एका मनुष्या |
| २८ | ४ | मदोमत्त | मदोन्मत्त | | | वरून | वरून |
| ३० | १५ | म नखंडना | मानखंडना | ९५ | १६ | होतील? | होतील! |
| ५१ | २७ | तोच | तो | ९७ | २२ | लोकांनीं | लोकांना |
| ७४ | २३ | परक्याबळळ | परक्याजवळ | ९८ | ४ | लोंकांत | लोकांत |
| ७७ | २६ | अहि, | आहे, | ९८ | १७ | घालवितें | घालविते |
| ७८ | २५ | मानणार | मानणारे | १०४ | ६ | अणि | आणि |
| ७८ | १२ | काय! | काय? | १०४ | १० | शेवटीं | शेवटीं |
| ७९ | ६ | त्यांची | त्याची | | | आईबापास | आईबाप |
| ८२ | ९ | तर | तरी | १०४ | २३ | अश्रित | आश्रित |
| ८४ | १० | लाकेच | लोकच | १०४ | २५ | तरूण | तरुण |
| | | | | १०४ | २६ | इतक्यांचे | इतक्यां |

# सुभाषित अथवा बोध वचनें

### ईश्वर

ईश्वराचा उपकार कधींही फिटत नाहीं. कारण कीं, आपला श्वासोच्छ्वास केवळ त्याचेच रक्षणानें चालला आहे! तेव्हां त्याचे स्तुतिदर्शक किती शब्द बोलावे?

ईश्वरानें मनुष्यास मन, विचार, आणि बुद्धि हीं रस्ते दाखविण्याकरितां दिलीं आहेत.

जसा ईश्वर संहारकर्ता आहे तसा तो त्राता ही आहे.

### शास्त्र

मनुष्याचें मन फार व्यंग आहे याजकरितां त्यांस शास्त्र पाहिजे.

शास्त्र हें ईश्वराचें दर्पण आहे. ईश्वराचे गुण व कोणत्या आधारानें आपण कसें वर्तावें या विषयीं ज्यांनीं ज्यांनीं शोध केले आणि ग्रंथ लिहिले त्याचें नांव शास्त्र.

आपलें शास्त्र आपल्यास माहित असावें. कारण कीं, सर्व विद्येंत ती विद्या मुख्य आहे. व आपला सर्व व्यवहार शास्त्रज्ञानाखेरीज चालत नाहीं.

शास्त्र अथवा कायदे लोकांस उपद्रव देण्याकरितां करीत नाहींत; परंतु संरक्षणाकरितां करितात.

### मोक्ष

सच्छास्त्रावांचून सद्‌गुण नाहींत, सद्‌गुणावांचून भलेपणा नाहीं, आणि भलेपणावांचून मोक्ष नाहीं.

### ज्ञान

ज्ञान आपल्या वर्तनांत दाखवितां आलें नाहीं आणि पैसा सद्व्ययांत गेला नाहीं तर त्याचा काय उपयोग?

ईश्वरानें ज्ञानाचा रस्ता सुलभ केला आहे; परंतु तो मूर्खास दुर्लभ आहे.

जितकें शिकावें तितकें ज्ञान वाढतें व बुद्धि विशाळ होतें.

कितीही ज्ञान असलें तरी गर्वानें तें व्यर्थ होतें.

सर्व संपत्तीहून ज्ञानसंपत्ति ही मोठी आहे. इतर संपत्ति चोरली जाते, परंतु ज्ञानसंपत्ति चोरली जात नाहीं. हिचा खर्च केला तर अधिक वाढते. आणि हिची वांटणी कोणी मागत नाहीं.

सर्वांहून ज्ञान थोर आहे; आणि ज्ञानाशिवाय स्वर्गाचा रस्ता खुला नाहीं.

## अज्ञान

या जगामध्यें योग्यतेवांचून लोक योग्य म्हणून मानले जातात हें या दुनयेचें मोठें अज्ञान आहे किंवा लोकांचें हें मूर्खपण होय.

अज्ञानानें भय आणि अतिप्रीति उत्पन्न होते. ज्यास ज्ञान असेल त्यास भय व अतिप्रीति उत्पन्न होणार नाहीं.

दुनया अज्ञान आहे. तींत निश्चयात्मक कांहींच नाहीं. ही सर्व कपटानें परिपूरित असून क्षणभंगुर आहे. ज्याचे जवळ द्रव्य आहे त्यानें मजजवळ द्रव्य आहे असें म्हणूंही नये. कारण कीं, ते केव्हां जाईल याचा नियम नाहीं. आणि असेंच सर्व पदार्थांचें आहे!

लोक अज्ञान झाल्यावांचून राज्य आणि धर्म बुडत नाहीं.

लौकिक करण्याकरितां डौल आणि खर्च करितात ते अज्ञान आणि हलके असतात.

## शिक्षा

लहान पणीं मुलास जशी शिक्षा लावावी त्याच मानानें तो मोठेपणीं वर्तन करितो.

सुशिक्षा सद्गुणाचें कारण आहे. परंतु ईश्वरप्रेरित सद्गुण शिक्षेशिवायही दृष्टोत्पत्तीस येतो!

लहानपणीं जशी शिक्षा असेल तसा अंकुर निवडेल. सद्गुण आणि दुर्गुण हे शिक्षेवर आहेत.

## क्षमा

मनुष्याचा स्वभावतः अलंकार रूप होय; रूपाचा अलंकार सद्गुण; सद्गुणाचा अलंकार ज्ञान; आणि ज्ञानाचा अलंकार क्षमा होय!

क्षमारूप शस्त्र हातांत असल्यावर दुष्ट लोक काय करणार आहेत? गवत नाहीं अशा जाग्यावर विस्तव पडला तर आपापच विझेल!

अशक्तांनां क्षमा हेंच बल आहे आणि सशक्तांस क्षमा हें भूषण आहे. तसेंच क्षमेनें सर्व वश होतात.

रुसलेले, फुगलेले, दुष्ट, क्रूर, हे सर्व क्षमेनें निर्वीर्य होतात!

क्षमे सारखा दुसरा सद्गुण नाहीं.

भगवद्भक्तांची मुख्य खूण क्षमा हीच आहे.

मनुष्यानें साधारण अन्याय केला तर खासगी रीतीनें लोक त्यास क्षमा करितात. परंतु अधिकराचे बळानें जर त्याणें अन्याय केला तर त्यास क्षमा करीत नाहींत.

ज्यास सूड उगविण्याची ताकद नसते तो बहुधा क्षमा करितो!

क्रोधापेक्षां क्षमा बरी आणि मत्सरापेक्षां गंभीरपणा बरा.

क्षमा करावी हें लक्षण महात्म्याचें आहे.

क्षमा कर्तृत्व शिकविणें ही मुख्य विद्या बाल्यपणापासून शिकविण्याची आहे.

आपला स्वतांचा अपराध केला असेल तर तोच मात्र क्षमेस योग्य आहे. परंतु दुसऱ्याचा अपराध केला असून त्याची क्षमा करणें, ती क्षमा नसून पाप आहे!

गुन्ह्यांची क्षमा करणें हें मोठें निर्दयपणाचें काम आहे!

## विचार

कांही वस्तु एकदम मागावयाची असेल तर त्याबद्दल फार विचार करावा लागतो. तसेंच, एकवेळ जी संधि आली तशी पुन्हां येणार नाहीं म्हणून तिचा फायदा करून घेण्याचाही विचार आवश्य करावा लागतो.

पलीकडे जाऊं परंतु माघारे कसे येऊं याचा विचार पहिल्यानें करावा.

विचारानें जें कळतें त्या प्रमाणें लोक वागत नाहींत; पण ते केवळ मोठेपणासच धरून बसतात. मोठ्यांस ओळखण्यास विचार नको. आणि म्हणूनच राजे, सेनापती इत्यादि अधिकारी थोर मानले जातात, परंतु गरीब चांगले जरी असले तरी त्यांस कोणी पुसत नाहीं. कारण त्यांचा चांगलेपणा शोधावयास विचार पाहिजे.

जे फार बोलतात ते थोडा विचार करितात असें समजावें.

सारासार विचार कळणें हेंच ज्ञानाचें लक्षण आहे.

ज्यांचे मनांत प्रौढ कल्पना (सुविचार) आहेत ते कधीं ही एकटे नसतात. म्हणजे त्यांचें मन हेंच त्यांस सोबती असतें. यास्तव जे विचारशील आहेत ते एकटेंच बसण्यास चाहतात!

जुनें टाकून नवें घ्यावयाचा विचार करावा.

## विद्या

गणित, वैद्यक, यंत्रज्ञान, गायन, सुतारकी वगैरे विद्या पोट भरावयाच्या असून लोकांच्या उपयोगाच्या आहेत.

काल्पनिक व तर्कशास्त्रें हीं उपयोगाचीं आहेत; परंतु पोट भरण्याचीं नाहींत.

जे निर्लोभानें विद्या शिकतात त्यांसच विद्या होते. व जे लोभानें शिकतात त्यांस पोटापुरती मात्र होते.

किमया, शकून, साळोत्री (घोड्याची पारख करण्याची विद्या), सामुद्रिक ज्ञान, ग्रह पाहून पत्रिका लिहिणें, देवऋषीपणा व पंचाक्षरीपणा या विद्या पोट भरण्याच्या आहेत खऱ्या, परंतु त्या लोकांस उपयोगाच्या नाहींत. हें, त्याविषयीं ज्यांनीं छांदसपणाशिवाय विचार करून अनुभव घेतला आहे त्यांस खचित वाटेल.

ज्या मनुष्यास विद्या नाहीं तो पशुवत् समजावा.

विद्वान् आणि सद्गुणी मनुष्यावर सर्व लोक प्रीति करितात.

जेथें मुळींच विद्वान् नाहींत तेथें किंचित् विद्वानाचीच विद्वान् म्हणून प्रतिष्ठा होते. जसें, जेथें वृक्ष नाहीं तेथें यःकश्चित् एरंडाच्या झुडुपासच वृक्ष म्हणतात!

विद्येचा उपयोग सदाचरण आहे; परंतु विद्वान्पणाचा उपयोग त्याबद्दल डौल वागविणें हा नव्हे.

विद्या हें मनुष्याचें गुप्त धन आहे; विद्येनें सर्व सुखोपभोग प्राप्त होतात; विद्येनें कीर्ति वाढते; विद्या ही आप्तासारखा असून परदेशांत परम मित्र आहे; आणि मोठमोठ्या राजांसही ती पूज्य आहे. त्याअर्थी विद्येवांचून असणारा मनुष्य पशुवत् होय!

मोठ्या कुळांत जन्मलेला असून अविद्वान् असला तर त्याचा कुलीनपणा व्यर्थ आहे. नीच कुलोत्पन्न असूनही विद्वान् असला तर तो सर्वांस पूज्य होतो!

विद्या ही आईप्रमाणें मनुष्याचें रक्षण करित्ये, बापाप्रमाणें सदसन्मार्ग दाखविते, प्रिय पत्नी-प्रमाणें अंतःकरण रमवून खेद दूर करत्ये, संपत्तीची वृद्धि करते आणि जगावर कीर्ति पसरित्ये. तेव्हां विद्येनें काय काय मिळत नाहीं? सर्व काहीं मिळतें!

बहिऱ्यास सतार वाजविणें, अंधळ्यास सुंदर स्त्री आणि प्रेतास सुवासिक फुलांची माळ हीं जशीं सर्व व्यर्थ आहेत तशी मूर्खास विद्या ही व्यर्थ होते!

विद्येवांचून जगांत राहाणें शेळीच्या शेंपटीप्रमाणें व्यर्थ आहे : शेळीचें शेंपूट तिच्या गुह्य गोपनास उपयोगी नाहीं व त्यानें तिच्या अंगावरील माशाही वारल्या जात नाहींत!

विद्या म्हणजे जिच्या वृद्धीनें लोक सुखी होतात, दुर्व्यसनें जातात, बुद्धि वाढते आणि ईश्वर कळतो.

## लबाड (असत्यवादी)

जर चाहाडाची गोष्ट कोणी ऐकणार नाहीं तर लबाड लोकच ह्या पृथ्वीवरून नाहींसे होतील!

जो आपण होऊन, मी लबाड आहें असें दाखवितो, तो लबाड नव्हे. कारण कीं, आपला लबाडपणा छपविणें हाच लबाडाचा मुख्य धर्म आहे.

लबाडांचे शब्द मधुर आणि जिव्हा गोड असते, परंतु त्यांचें हृदय विषानें भरलेलें असतें!

लबाड लोक थोरपणाचें ढोंग घालितात, परंतु अंतःकरणांत ते नीच असतात. याजवरून दिसतें कीं, नीचपणा थोरपणास शरण जातो.

लबाडाच्या कल्पना, भाषण आणि कृत्यें हीं भिन्न भिन्न असतात; परंतु चांगले मनुष्यांचा असा प्रकार नसतो.

लबाड मनुष्य उपकार करण्यांतही नफा पाहतात!

मेंढा, टोणगा, मांजर आणि लबाड मनुष्य यांचा जों जों विश्वास धरावा तों तों ते आपले गळीं पडतात!

लबाड मनुष्यांस विद्या असली तरी ती सर्पाचे मस्तकावर रत्न असल्याप्रमाणें आहे.

असत्य बोलणाऱ्याशीं कधीं मैत्री करूं नये; त्याच्या स्नेहापासून पुण्य नाहीं व पृथ्वीवर कीर्तिही नाहीं. त्याचप्रमाणें त्यांपासून कधींही कल्याण नसून त्यांचा एकंदर स्नेह विषाप्रमाणें आहे.

खोटें हें अविश्वासाचें मुख्य कारण, दुष्ट इच्छांचें घर, सर्व दुःखाचें कारण, दुसऱ्याची हांजी हांजी करण्यास लावणारें आणि शहाण्याकडून छी थू करविणारें आहे.

## सत्य

सत्यवादी जे असतात ते आपला अपराध कबूल करितात, आणि पुन्हां कधीं करीत नाहींत.

सत्यच अखेरीस तरतें.

जो मनुष्य सत्यवादी व विश्वासु पुरुषाचा घात करावयास इच्छितो त्याचा भार पृथ्वी सहन करीत नाहीं!

सत्यामागून कीर्ति मिळवावी. कारण कीं, मनुष्यास इहलोकापेक्षा परलोकची काळजी अगोदर असावी.

सत्यानें जी कीर्ति मिळेल तीच कायम आणि सुखावह आहे.

## मूर्खपणा

ज्याला बसण्याचें कळेल त्याला उठा कोण म्हणेल? हें, तारतम्य जाणणारे लोकांचें उदाहरण होय.

जो धनाची किंवा धर्माची आशा करीत नाहीं, त्याचप्रमाणें जो परलोकींचे सुखाची किंवा मोक्षाची आशा करीत नाहीं तो अजागळ समजावा.

समारंभ आणि प्रयोजनें यांस धर्म समजणें हें मूर्खपण आहे.

पुढील गोष्ट जे निश्चयात्मक सांगतात ते मूर्ख असतात.

मूर्खास बोध केला तर त्यास राग येतो.

थोराचा हलकेपणा हलक्याचे हलकेपणापेक्षां अधिक आहे. कारण हलक्यास हलका आणि अविद्वान् म्हणतील त्यास त्याचा उपाय नाहीं. पण थोरास शहाणपण शिकावयास अनुकूल असून तें तो शिकला नाहीं तर लोक त्यास फारच मूर्ख म्हणतात.

मूर्खा इतका गरीब कोणी नाहीं!

अधिकारी हा माझा स्नेही असें म्हणतो तो मूर्ख.

अविचारी लोकांकडून निंदा आणि स्तुति ऐकल्यास फार सावधगिरी करावी.

मनुष्यांत दुसरा गुण नसेल तर नुस्ता विनोद हा गुण मूर्खपणाचा दिसतो.

जो दुसऱ्याचे बुद्धीनें चालतो आणि स्वतां कांहीं समजत नाहीं तो मूर्ख होय.

अनेक वाईट गोष्टी आहेत त्या अकलेनें चांगल्या होतात. आणि अनेक चांगल्या आहेत त्या बेवकुबीनें वाईट होतात.

मूर्ख शहाण्याचे संगतींत शहाणा होतो. जसें, कांच सोन्याचे कोंदणांत बसविली तर रत्न दिसते! आणि त्याचप्रमाणें भयंकर पर्वतांच्या रानांत निर्मनुष्य जागीं वनपशूंच्या जमावांत राहणें बरें परंतु प्रत्यक्ष अमरावतींत राहून मूर्ख लोकांचा सहवास नको!

ज्याला स्वतां शहाणपण नाहीं त्याला शास्त्र काय करील? अंधळ्यास आरसा काय करील?

मूर्खापासून मूर्खास आनंद वाटतो; परंतु विद्वानास पाहिल्यावर त्याच्या तळची आग मस्तकीं जाते!

पशुपक्ष्यांस मोत्यें काय उपयोगीं? गाढवांनां मिष्टान्न काय कामाचें? अंधळ्यास दिवा काय कामाचा? बहिऱ्यास गायन वादन कितीक उपयोगीं होईल? आणि त्याचप्रमाणें मूर्खास धर्मोपदेश काय रुचेल?

ज्याच्या शरीरांत मुळींच बळ किंवा शक्ति नाहीं त्यास लोकांची मदत होऊन काय फळ होणार?

घराला आग लागली तर पाण्यानें विझविण्याला मार्ग आहे; सूर्याचें कडक ऊन छत्रीनें निवारण होतें; उन्मत्त हत्ती तीक्ष्ण अंकुशानें आकळला जातो; गाई वगैरे जनावरें मारकीं झालीं तर तीं कांठीनें ऐकतील; आणि ह्याचप्रमाणें अनेक प्रकारच्या औषधांनीं अनेक प्रकारचे रोग हटतील. ह्याप्रमाणें युक्तीनें सर्व अरिष्टांस उपाय व औषधें आहेत; परंतु स्वभावतः मूर्ख मनुष्यास सुधारण्यास कोणतेंही औषध नाहीं!

मूर्ख मनुष्यास उपदेश करणें म्हणजे त्याचा अधिक संताप करणें होय. जसें, सर्पाला दूध पाजणें म्हणजे विष वाढविणें आहे!

अरण्यांत पुष्कळ विलाप केला, प्रेतास मोठाल्या सुगंधिक तेलांनीं न्हाऊं घातलें, कोरड्या जमिनी-वर कमळासारखीं फुलें लाविलीं, माळजमिनीवर यथेच्छ पाऊस पडला अथवा कुत्र्याचे शेंपूट वर्षोनवर्ष नळकंड्यांत नीट होण्याकरितां घालून ठेविलें, किंवा बहिऱ्याच्या कानांत गोष्टी सांगितल्या, तर या सर्व गोष्टींत जितके श्रम व्यर्थ आहेत तितकेच स्वभावतः मूर्खास शहाणे करण्याविषयींचे श्रम व्यर्थ आहेत!

ऋण काढून सण करितात ते मूर्ख समजावे हें खर्चिक पणाचें फल आहे.

आपल्या दुराशा जो जिंकीत नाहीं तो मूर्ख होय.

मूर्ख लोक विनाकारण कज्जा काढितात.

मनुष्यास बुद्धि आणि पराक्रम हीं दोन्हीं असून तो जर मूर्खाची संगत धरील तर त्या दोहोंचाही उपयोग होत नाहीं.

मूर्खाचें नम्र भाषण दुश्चिन्ह आहे. जसें, धनुष्याचें वांकणें म्हणजे शराघाताचें दर्शक होय!

मूर्खाचें चिन्ह हेंच आहे कीं, जें कांहीं ते आचरण करितात त्यास लोक शहाणपणच म्हणतात, असें ते समजतात. व त्यांचे ध्यानांत असें येतच नाहीं कीं, यास लोक मूर्खपणा म्हणतील.

धनलोभ्यांस भिक्षेकरी शत्रु, चोरांनां चांदणीरात्र शत्रु, जारिणी स्त्रियेला तिचा नवरा शत्रु आणि मूर्ख मनुष्यास त्यास बोध करणारा हा शत्रु असें वाटतें!

## शहाणपणा

द्रव्याहून शहाणपण चांगलें; परंतु गरीबाच्या शहाणपणास कोणी पुसत नाहीं.

लोक मोठेपणास आले म्हणजे नवीं नांवें आणि नवे डौल करितात. पण जे शहाणे आहेत ते कितीही थोरपणा आला तरी पहिले पद्धतीनेंच चालतात.

जो मनुष्य लोकांस शिकवावयास लागतो आणि आपलें शहाणपण दाखवितो त्यास लोक नीट पाहात नाहींत. पण लोकांचें शहाणपण ऐकून आपलें शहाणपण वृद्धिंगत करितो तो हुशार.

शहाणे म्हणून जे म्हणवितात त्यांचे हातून सर्वदा चांगलीं कामें होतातच असें नाहीं. परंतु एक दोन कामांवरून प्रख्याति झाली म्हणजे ते शहाण्यांत मोडूं लागतात. तसेंच मूर्ख जे म्हणवितात ते सर्वदा मूर्खपणाचींच कामें करितात असें नाहीं. परंतु त्याचीं एक दोन कामें वाईट होऊन प्रख्याति झाली म्हणजे ते मूर्खांत गणले जातात, आणि मग जो मूर्खपणाचा शिक्का त्यांजवर पडतो, तो निघत नाहीं.

शहाण्याला बला दूर असते. म्हणजे शहाणा संकट टाळितो.

बेवकुबाचा माल आणि अक्कलवंताचा खुराक! वेड्या लोकांवर शहाणे लोक निर्वाह करितात!!

वास्तविक जे पंडित आहेत ते आपले बुद्धीनें आणि ज्ञानचक्षूनें चांगलें वाईट यांजमध्यें निर्णय करून स्वबुद्धानें चालतात. त्यांत जरी त्यांची त्यांच्या आज्या व बापां प्रमाणें सहजवृत्त्या वर्त्तणूक झाली तर होवो. परंतु स्वबुद्धिविपर्यास करून दुसऱ्यांचेप्रमाणें करूं नये असें मत भागवतांतही आहे :—

"निर्मळ जागा पाहून पाऊल टाकावें, वस्त्रानें गाळून पाणी प्यावें, खरें असेल तेंच बोलावें आणि शुद्ध असेल तें आचरण करावें."

फार शहाणे लोकही लोकांचे रीतीनें चालतात. कारण कीं, नाहीं तर एक जणच बहुतांचा शत्रु होईल.

शहाणा मनुष्य आपल्या स्त्रीची वर्तणूक, आपला मान, अपमान व आपलें वय इत्यादि प्रगट करीत नाहीं.

शहाणा मनुष्य दुसऱ्याची बुद्धि ऐकतो, पण त्यानें ती आपले हिताकरितां सांगितली किंवा कसें याचा विचार करितो.

जो मनुष्य शहाणा आहे तो दुसरे मनुष्याचा स्वभाव ओळखतो. तो त्याचे गुण पाहत नाहीं. कारण कीं, सर्व गुण असले तरी स्वभाव जात नाहीं!

अर्धे शहाणे जे असतात ते पक्क्या शहाण्याची मसलत घेत नाहींत.

वयानें जो मोठा तो वृद्ध. परंतु जो शहाणपणानें अधिक तो त्याहूनही वृद्ध समजावा.

सावध जे असतात त्यांस संकट भितें आणि तें आलें तरी त्याचें त्यांजपुढें कांहीं चालत नाहीं.

जे सावध नाहींत त्यांस शुद्धींत मृत्यु आला तरी उपयोग काय?

जो आपल्यास जाणतो तोच शहाणा.

जो शहाणपण नसतां आपले शहाणपणावर फार भरंवसा ठेवितो तो लवकर ठकला जातो. कारण कीं, मी ठकेन हे त्यास भानच नसतें.

जर शहाणपणा कोणी विकत देईल तर त्यास कोणी किंमत देणार नाहीं. कारण कीं, ज्याचें त्यास आपलें शहाणपणच पुरें आहे असें वाटतें.

संकटांतून धैर्यानें पार पडेल तो शहाणा.

इतका कोणी मूर्ख नाहीं कीं, तो कोणत्याही प्रसंगीं दुसऱ्याच्या उपयोगी पडत नाहीं. आणि इतका शहाणा कोणी नाहीं कीं, जो कधीं विपरीत करीत नाहीं आणि फसत नाहीं!

यजमानाचे शहाणपणानें चाकर शहाणा होतो पण रागानें होत नाहीं.

संशय घालविण्यास सदसद्बुद्धिच पाहिजे.

भलेपणानें वागण्यासारखी हुषारी कोणती नाहीं.

अडाणी लोक चालीचे दास असतात. परंतु शहाणे विचारानें चालतात.

पढविलें तर जनावरें ही शिकतात. पण संज्ञेनें समजणें हें शहाणपण आहे!

शहाणीं मनुष्यें हरएक प्रसंगीं पार पडतात. राजाजवळ हे राजाप्रमाणें व गरीबाजवळ गरीबासारखे वागतात. त्यांचा द्वेष करणारा कोणीच नसतो.

देशावर फिरल्यावांचून, चांगले मनुष्याचा समागम केल्यावांचून, अनेक शास्त्रें पाहिल्यावांचून आणि दरबारांत फिरल्यावांचून शहाणपण येत नाहीं.

कोण जाणें उद्यां काय होईल, म्हणून शहाणा जो आहे तो उद्यां करावयाचीं कामें आजच करितो !

## फजिती

लोकांनीं सांगितलेलें सर्व जो ऐकतो त्याची फजिती होते.

भिक्षा आणि याचना यासारखी दुसरी लज्जा नाहीं.

जें वास्तविक नाहीं तें दाखविण्यांत थट्टा होते.

## लौकिक

लौकिक स्थिर नाहीं.

कितीएक कीर्त्तीच्या गोष्टी प्रारब्धानें घडून येतात.

ज्याला आपली पत राखावयाची असेल त्यानें आपला नाद फुटूं देऊं नये. तसेंच ज्याला लोकांत इभ्रत राखण्याची असेल त्यानें आपलें शहाणपण किती आहे हे फुटूं देऊं नये. कारण कीं, ज्या नदीचा अंत नाही ती भयंकर वाटते. तसेंच ज्याची किती अकल आहे हें कळत नाहीं त्याचा लोकांत दबदबा मोठा असतो.

लौकिक राखणे व स्वस्थपणा भोगणें हें एककालीं घडत नाहीं. कारण कीं, लौकिक हा विस्तवासारखा आहे. तो पेटविणें कठीण पण भडकविणें सोपें. आणि तसेंच त्याजवर जळण घातलें तरच तो राहील.

वकिली करणें, किल्ला घेणे, राज्य करणें इत्यादि गोष्टींची फार कीर्ति होते. विश्वासानें चालणें, न्यायानें वागणें आणि सदाचरण करणें हीं थोडीं आहेत तथापि तीं कीर्त्तीस येत नाहींत.

मोठे कामांत योग्यता आहे. राजे मोठालीं कामें करितात परंतु नीतीनें चालत नाहींत; आणि गरीब जे असतात ते धर्मप्रमाणें चालतात. तेव्हां योग्य कोणाला म्हणावे ?

योग्यता द्रव्यानें येत नाहीं परंतु वर्त्तणुकीनें आणि विद्येनें येते.

ज्याची ह्या जगांत कांहीं कीर्ति नाहीं तो जिवंत असून मेल्या दाखल समजावा.

अब्रू गेली तर जीवाचा कांहीं उपयोग नाहीं. शरीर क्षणांत जाईल परंतु नांवाची कीर्ति युगायुगांत तरी राहील.

घाव बरे होतात आणि शिव्या विसरतात. पण दुसऱ्याचा विश्वास घात केला तर तो मात्र माघारा घेत नाहीं. त्याचप्रमाणें एकदां पत गेली ती पुन्हां येत नाहीं !

## बोध

नवऱ्यामध्यें प्रीति असावी; बापामध्यें सुशिक्षा असावी; श्रीमंतांमध्यें नम्रता असावी; आणि गरीबामध्यें उद्योगीपणा असावा.

विचार करावयास बसलें पाहिजे व गरीबी दाखवावयास उभें राहिलें पाहिजे. यास्तवच न्यायाधीशानें बसावें आणि वकिलांनी उभें राहावें.

मोठें सुख होतें आणि त्याचे पोटीं लहान दुःख असेल तर ते सोसावें.

एकाचे चांगले आचरणानें बहुत लोक चांगले होतात; तसेंच वाईटाचेंही आहे. यास्तव प्रत्येकानें फार सावधपणानें वागावें व दुष्टपणा सोडावा.

पापक्रियांचा समागम सोडावा, आणि धर्मक्रियांच्या समागमास राहावें.

विषय सुखाचा लंपटपणा सोडावा.

स्वच्छता राखावी.

पंचम वर्षापासून विद्याभ्यासास आरंभ करावा. कारण कीं, विद्या हें धन आणि सन्मानाचें मूल आहे.

खोट्या गप्पा उठविणारे जे असतील त्यांस जबाब देऊं नये म्हणजे तेच दमतात.

केवळ नादावरच भुलूं नये. तर प्रथमतः त्या नादाचें कारण पाहावें.

लहान पदार्थासही तुच्छ मानूं नये. कारण कीं, कितीएक तुकडे एके जागीं होऊन त्या दोरीनें हत्ती देखील बांधला जातो !

आपल्यास नीट दिसेल तसें करावें. आपले सद्बुद्धीपेक्षां आपणास दुसरा कोणी गुरु नाहीं.

पृथ्वीवर राहणें हें रात्रीं पांथस्थ वस्ति करतो त्याप्रमाणें आहे. सबब दुःखास दुःख मानूं नये.

ज्याचे भाषणापासून सत्य गोष्टी समजतात त्यांशींच बोलावें.

अपराध क्षमा करावे.

ज्याला थट्टा सोसत नाहीं त्यानें मुळींच थट्टा करूं नये.

जोंपर्यंत आपणास एखादी वस्तु देण्याचें सामर्थ्य असतें तोंपर्यंत आपण भाऊबंदांस व गरिबांस मदत करीत असावें. कारण कीं, प्रारब्ध हें चमत्कारिक आहे : जे आपल्याजवळ आज मागतात त्यांजवळच कांहीं काळानें आपल्यास मागण्याचा प्रसंग पडेल !

आपल्या विनोदावर आपणच हसूं नये तर दुसऱ्यास हंसवावें.

जें करणें तें विचारानें करावें, घाईनें कोणती ही गोष्ट करूं नये.

जें स्वतांच्यानें होईल तें दुसऱ्यास सांगूं नये.

जें करणें तें, लोकांत प्रसिद्ध झाल्यास चिंता नाहीं, असें जें असेल तें करावें. हेंच नीतीचें सार आहे.

निर्दयाचे हातीं सांपडल्यावर त्याचे बोलण्यावर विश्वास ठेवूं नये. तेथें जितका होईल तितका सामर्थ्याचाच उपयोग करावा.

स्नेहांत यत्किंचित् अंतर पडलें तरी त्याचा त्याग करूं नये. जसें शरीरास क्षतें पडलीं म्हणून तें टाकूं नये.

मूर्खांशी बोलूं नये. कारण त्यांची समजूत पडावयाची नाहीं.

विचारपूर्वक चालावें; आपल्यास कठीण वाटेल ती गोष्ट आपल्याहून बुद्धिवान् असतील त्यांस विचारून घ्यावी.

आपल्याहून अधिकारानें, द्रव्यानें, विद्येनें आणि बुद्धीनें जे ज्यास्त असतील त्यांस लवून चालावें.

आपली अब्रु आपले लोकांत रक्षावी.

योग्य असेल तें करावें आणि सत्य बोलावें; म्हणजे लज्जा प्राप्त होत नाहीं.

आपल्यास लोक काय म्हणतात आणि आपले विषयीं ते काय बोलतात याचा विचार आणि चौकशी जो करितो तो सुख पावत नाहीं. यास्तव आपले शहाणपणानें आणि नीतीनें चालावें, म्हणजे झालें. कोण काय म्हणतो याची विशेष काळजी ठेवूं नये हेंच बरें. कारण कीं, सर्वांचे मर्जीप्रमाणें कोणी वागूं शकत नाहीं !

बाह्यडौलानें मनुष्याची योग्यता समजत नाहीं.

बहुत ज्ञान मिळवावें पण दाखवूं नये. भांडवल जमा करावें परंतु खर्च करूं नये. पण लोक या नेमास उलटे चालतात.

ज्यास कांहीं न्यून किंवा कांहीं खोडी आहे त्याचा उपहास करूं नये.

काळाप्रमाणें वर्त्तावें परंतु सुनीति सोडूं नये.

दुसऱ्याची गुह्य गोष्ट आपण फोडूं नये हेंच बरें. जें आपल्याच्यानें गुप्त राखवत नाहीं तें दुसरा तरी कसा राखील?

मनाची सुधारणा करते समयीं शरीराची सुधारणा विसरूं नये.

ज्या ठिकाणीं स्नेही, विद्या, मान, शासन, वैद्य, सावकार आणि नद्या नाहींत, त्या ठिकाणीं सहसा राहूं नये.

आग्रहानें फार खराबी होते; म्हणून आग्रह धरला नाहीं तर किती नफा होईल याचा विचार करावा.

आपले पेक्षां जे जबरदस्त असतील त्यांस उसनें देऊं नये; दिलें तर तें गमावलें असेंच समजावें.

आपलें न्यून कोणास सांगूं नये, आणि जर तें बाहेर समजलें तर मग छपवूं नये हें चांगलें!

जो तो आपलें महत्त्व रक्षावयाकरितांच लोकांचे घातास प्रवर्त्तक होतो. अशा पुरुषास स्वार्थी आणि मूर्ख जाणावें.

ज्यास ईश्वराचा राग नको असेल त्यानें स्वतः राग सोडावा.

ज्यास ईश्वराची दया पाहिजे असेल त्यानें आपण दया करावी.

शरीरद्वारां पाप होऊं नये; तद्वत् मानसिकही करूं नये.

इष्टकाळ आला म्हणून अनिष्टकाळाचें स्मरण सोडूं नये.

सर्वांशीं प्रेम राखावें.

आपले सारखे दुसऱ्यास समजावें.

गर्वानें दरिद्र्यांकडे व लहानांकडे तुच्छपणानें पाहूं नये.

सद्गुणांविषयीं दुसऱ्याचा हेवा करावा.

दुसऱ्यांस शिक्षा लावणें ती चांगल्या शब्दांनीं लावावी.

ज्याचे तोंडांत वाईट शब्द तो मूर्ख व अज्ञानी जाणावा.

मौन असावें पण रडकेपणा असूं नये. सलज्ज असावें पण नखरेबाज असूं नये. भय असावें पण अज्ञान असूं नये.

आपली मिळकत पाहून खर्च करावा, घर चालीचें बांधावें आणि दिवाळखोरी करूं नये.

जसें हंगामीं पेरावें तसें तरुणपणीं सत्कर्मानें द्रव्य मिळवावें. या जन्मांत हरवक्त ईश्वरसेवा करावी. कारण हंगाम पुनरपि येणार नाहीं.

सुखानें धुंद होऊं नये.

दुर्भाग्यानें घेरलें म्हणजे मनाचें सांत्वन आणि नेहमीं शास्त्र-विचार करावा हेंच बरें.

राजानें नियम केले असतील ते मानावे.

भल्याचा संग करावा; परंतु कोणाचीही निंदा करूं नये.

देवाविषयीं अपमानानें बोलूं नये.

आपले जातीचे, गोताचे, गांवचे, देशचे, आणि संपूर्ण जगांतील लोक, यांशीं स्नेह करावा.

शंभर उपद्रव सोसूनही भांडूं नये, भांडलें तर त्यांत जय मिळवावा.

थोरांचा उपदेश ऐकावा.

सर्वांचा सारखा मान राखणें हें चांगलें नाहीं.

शस्त्र धारण करणारा, तीक्ष्ण नखें आहेत असा, वाईट शिंगें ज्यास आहेत तो, नदी, आणि दुष्ट राजा यांचा विश्वास कदापि धरूं नये.

शहाण्या मनुष्यानें मंडळीचें प्रमुखत्व पतकरूं नये; कारण कीं, त्या गोष्टीचा परिणाम चांगला झाला तर सगळे हिस्सेदार होतात, आणि वाईट झाला तर मंडळी एकीकडे राहून प्रमुखासच तें सोसावें लागतें!

दुसऱ्यास पांगळा पाहिला तर त्यास हंसूं नये. तर उलटा ईश्वराचा उपकार जाणावा कीं, त्यानें आपल्यास पांगळें केलें नाहीं.

खर्च बेताबेतानें कर म्हणजे तुला गरीबी कधींही येणार नाहीं. जर लौकिक पाहून खर्च करशील तर कधींही श्रीमंत होणार नाहींस.

मेहनतीनें खावें पण भीक मागूं नये.

आपलें कोणीं वाईट केलें तरी त्याचें वाईट करूं नका परंतु चांगलेंच करा.

सर्व लोक सुखी असले तर आपण सुखी असा भाव ठेवावा.

चांगले ग्रंथ वाचावे; तेणेंकरून बुद्धि वाढते व हित होतें.

जें आपण शिकावें तें दुसऱ्यास प्राप्त व्हावें म्हणून प्रयत्न करावा.

पाप कोणतें व पुण्य कोणतें याची समजूत करून घ्यावी.

बरोबरीच्यांशीं आढ्यतेनें बोलूं नये.

दानधर्मास अडथळा करूं नये.

मनांतील गुप्त गोष्ट उघड करूं नये.

धीर सोडूं नये.

ज्याप्रमाणें लोकांस सांगतो त्याप्रमाणें तो वागत असला तर त्यास गुरुप्रमाणें मानावें.

दुसऱ्यास रक्षण्याकरितां जो मरणास देखील सिद्ध होतो, तो दुसरा बापच म्हणावा.

क्रोध करूं नये; कारण कीं, तो आपल्यास आणि इतरांस दुःखकारक होय.

अयोग्य पुरुषास बोध उपयोगीं नाहीं. जसें कावळ्यास बोलावयास शिकविलें तरी तो राघू सारखें बोलणार नाहीं!

ज्याशीं संबंध किंवा व्यापार करणें असेल त्याची प्रकृति, त्याचे हेतु आणि त्याचे स्नेही, हें सर्व अगोदर समजून घ्यावें.

विद्या शिकण्यास व मनाची सुधारणा करावयास कदापि अंतर करूं नये.

निश्चय करावा पण हट्ट धरूं नये. शौर्य करावें पण दुष्टपणा करूं नये. शहाणपण असावें पण कपट असूं नये. हुषारी असावी पण लबाडी असूं नये.

जगावें म्हणून खावें, प्यावें; परंतु खावें प्यावें म्हणून जगूं नये!

ज्यास विद्या, पराक्रम, धन व धर्म हीं नाहींत त्याचा जन्म वृथा समजावा.

सर्व काळ लोकांचे उपयोगीं पडावें, आणि सर्वांवर सारखी प्रीति करावी.

### नीति

सद्‌गुण आणि सदाचरण हेंच सुखाचें कारण असून दुर्भाग्याचें नाश करणारें त्यासारखें दुसरें नाहीं.

ईश्वराचें भय सर्व नीतीचें मूळ आहे.

भांडणांत आपण आपल्यास जिंकावें तें बरें. कारण शत्रूस जिंकण्यापेक्षांही विनय मोठा आहे!

शरीरांत जें न्यून असतें तें नीतीस चांगलें. जसा मुका लबाड बोलत नाहीं!

सत्य धर्म, स्वतंत्रता आणि साधारण सुख हीं चांगल्या लोकांचीं चिन्हें आहेत.

श्रीमंत लोकांचें आणि गरीब लोकांचें पुण्य सारखेंच आहे. श्रीमंतास श्रीमंती असल्यानें विशेष सुख होतें इतकेंच. परंतु त्याचें द्रव्य पुण्यमार्गास बहुधा जात नाहीं. एका श्रीमंतास धर्मादायाचे कामांत विनंती केल्यामुळे त्यानें दोनशें रुपये दिले आणि गरीबानेंहीं दोन रुपये दिले तर दोघांसही सारखेंच पुण्य मिळतें.

## मत्सर

लोक बरोबरीच्यांचा मत्सर करितात.

सर्व लोक स्नेही असतील तर बेरं, परंतु एक दुस्मान नसावा. कारण कीं, वाईट करण्यास संधी फार आहेत आणि चांगलें करण्याच्या संधी थोड्या आहेत. स्नेहाहून द्वेष हा विकार दृढतर आहे.

मत्सर करणारा, आपलें नाक कापील पण दुसऱ्यास अपशकून करील !

जे मत्सर करितात ते ज्याचा करितात त्यास थोर असें मानितात.

## राग

रागाचें सांत्वन मनांत करावें परंतु त्याचें दिग्दर्शन मुळींच करूं नये.

रागानें आपल्यासही त्रास होतो. यास्तव दुसऱ्याचे चुकीचें आपल्यास शासन होतें.

रागांत भाषण करूं नये हें चांगलें; कारण पुढें रागाचा अति पश्चात्ताप होतो.

दुर्बुद्धि उत्पन्न झाली म्हणजे पहिल्यानेंच तिचा नाश करावा हें बरें. कारण कीं, एका आगंतुकास जेवण दिलें तर ते फार जमतात !

## शत्रु

रागाइतका मोठा शत्रु कोणी नाहीं. यास्तव त्यास जो जिंकील त्यानें सर्वांहून जबरदस्त शत्रूस जिंकिलें असें होईल.

मोठें शूरत्व हेंच आहे कीं, शत्रूस जिंकावें आणि त्यास सुख द्यावें.

शत्रूशीं मैत्री होत नाहीं; कारण कीं, पाणी उष्ण असलें तरी अग्नीस विझवितें.

जो शत्रूवर भरंवसा ठेवितो आणि दुष्ट स्त्रीवर संसार टाकितो त्याचा अंत लौकरच होतो.

साप व शत्रु यांजवर आपण हात टाकला असतां कांहीं भीति होणार नाहीं, असें पक्कें समजल्याखेरीज त्यांचेवर हात टाकूं नये. नाहीं तर त्यापासून भलतीच गोष्ट उत्पन्न होण्याचा संभव असतो.

## मित्र

भल्याचा स्नेह सोन्याचे दागिन्याप्रमाणें आहे. तो लवकर मोडत नाहीं व मोडला तरी नीट होतो. परंतु लबाडाचा स्नेह मातीचे भांड्याप्रमाणें आहे. तो लवकर मोडतो व मोडला तर नीटही होत नाहीं.

स्नेह तोडणें तो मुकाट्यानें तोडावा; त्याचा बभ्रा करूं नये.

जशी संगत लागेल तसे गुण लागतील.

जे फार आदरातिथ्य करितात त्यांची संगत धरणें बहुधा योग्य नाहीं. कारण कीं, त्याजवळ बसणें हें त्रास करून घेणें आहे; परंतु त्याजपासून कांहीं काम होत नाहीं.

स्नेहाचीं लक्षणें पांच आहेत : दुरून स्नेही पाहिला म्हणजे तिकडे लक्ष्य लावणें; तो जवळ आला म्हणजे हंसणें, बसला म्हणजे त्यास कुशल प्रश्न करणें; गेला म्हणजे त्याची स्तुति करणें; आणि असेल तेव्हां त्याशीं प्रीतीकरून भाषण करणें.

एकोपा आणि स्नेहभाव यासारखी कुटुंबास शोभा नाहीं.

भक्ष्य आणि भक्षक यांची कधीं मैत्री होत नाहीं.

तरुणाची मैत्री प्रीतीकरितां असते, पण वृद्धाची मैत्री कामाकरितां असते. कारण कीं, मैत्री, प्रीति, दया, इत्यादि गुण हे तरुणाचे होत आणि स्वहित इत्यादि वृद्धाचे गुण आहेत.

खरा स्नेही असावा; चहाडीनें स्नेह तुटतो.

दुसऱ्याची चूक त्यास सांगणारे स्नेही थोडे आहेत, आणि मान्य करणारे ही थोडेच आहेत.

मित्रास आपले मनांतील गुह्य गोष्ट असेल ती सांगणें यास मोठी मैत्री नको. परंतु त्याची खोड त्यास सांगणें यास मोठी मैत्री पाहिजे.

स्नेह्याचा न्याय करणें अवघड, परंतु शत्रूचा न्याय करणें सोपें.

हरणांचा हरणांशीं, गाईंचा गाईंशीं, घोड्यांचा घोड्यांशीं, त्याचप्रमाणें कावळ्यांचा कावळ्यांशी, मूर्खांचा मूर्खांशीं आणि शहाण्यांचा शहाण्यांशीं ह्याप्रमाणें जसें ज्याचें शील व व्यसन असेल तशा वर्गांशीं त्याची मैत्री जमते.

स्नेहांत अंतर केलें तर मोठें शत्रुत्व होतें.

जशा स्त्रिया सोदे लोकांचे संगतींत असतात तसे कांहीं कांहीं लोक स्नेहाचे संगतींत असतात. आणि जों पर्यंत स्नेही त्यांस खुष करितात तों पर्यंत मात्र ते स्नेह करितात; परंतु खुष करीनासे झाले म्हणजे लागलीच त्यांस सोडून दुसरे स्नेहाकडे जातात. तात्पर्य, ते आपले स्नेहांत कायम नसतात.

दुष्टाची मैत्री आणि संगत हीं होत नाहींत. कारण तो कोळशासारखा आहे. त्यास तापलेला हातीं धरला तर हात भाजेल आणि निवालेला धरला तर हाताला काळें लागेल!

आपले स्नेही यांचे आपण अपराध केल्यानें आपल्यास ज्ञान होतें; तसेंच त्यांचे बोधानेंही होतें.

चांगली सोबत असल्यानें मनुष्यास थोरपणा येतो.

दुष्ट मनुष्य कोणाचा स्नेह करीत नाहीं. आणि केला तरी तो कपटी असतो.

गर्विष्ठ लोक, जे आपल्याहून भारी असतात त्यांशीं स्नेह करीत नाहींत.

जसे स्नेही असतील तसें आपलें नशीब खुलतें!

लवकर मित्र होतो आणि सावकाश शत्रु होतो त्याजपासून भय फार.

जी मैत्री आपल्या आपण पडते ती निभते.

जो स्नेही खुषामत करितो तो आणि जो शत्रु घाला घालतो तो ह्या दोघांचें भय धरावें.

कोणी कोणाचा मित्र किंवा शत्रु स्वभावानें होतो असें नाहीं; परंतु प्रसंगानुसार होतो.

प्रसंगी जो मित्र उपयोगीं पडतो तोच मित्र खरा.

साधुसंगतीशिवाय मोक्षमार्ग सांपडणें कठीण.

कारणामुळें स्नेह झाला तो खरा नाहीं; जसें प्रधान प्रधानकीवर आहे म्हणून त्याचे स्नेही बहुत असतात. पण तें काम त्याजकडून गेल्यावर ते त्याचे भरभराटींतील स्नेही राहतील असे फार थोडे असतात.

अति स्नेह अपमानास कारण आहे : चंदनाच्या रानांत राहणारे भील कोळी चंदनाचीच लांकडें जाळतात!

सत्य भाषण हें मुख्य स्नेहाचें सार आहे; त्याचे खालीं शहाणपण. त्याचे खालीं विनोद आणि त्याचे खालीं थट्टा.

ज्याला मित्रपणा राखावयाचा असेल त्यानें अत्यंत निकडपडे तोंपावेतों आणि कदाचित् निकड पडली तत्रापि, मित्राजवळ जिव्हा विटाळूं नये.

बरोबरीच्याशीं अति स्नेह करणें यानें मान कमी होतो, पण कनिष्ठांशीं अति स्नेह केला तरी त्याच्यानें अपमान होणार नाहीं.

नम्र भाषणानें शत्रूंचे मित्र होतात.

सुखाचें सोबती पुष्कळ मिळतात; पण तशांची सोबत धरूं नये.

सत्पुरुषाचा राग पुरवला, परंतु दुष्ट लोकांचा स्नेह देखील उपयोगी नाहीं.

तोंडावर गोड बोलून मागें घात करणारा असा मित्र सर्वदा टाकावा. कारण तो विषाच्या भांड्यावर तोंडावर मात्र दूध घातल्यासारखा होय.

निष्कपटी, दानशील, शूर, सुखदुःखांत सारखी प्रीति करणारा, सरळ स्वभावाचा, सर्व कुटुंबावर प्रीति करणारा आणि सत्यवक्ता हे मित्रत्व साधनाचे मुख्य गुण आहेत.

खऱ्या मित्रावर जो स्वाभाविक विश्वास आणि प्रीति असते तसा विश्वास आणि तशी प्रीति आईवर, बायकोवर अथवा सख्ख्या भावावरही नसते.

शोकाचें सांत्वन करणारा, भयापासून रक्षण करण्याविषयीं मनापासून श्रम करणारा व प्रीति आणि विश्वास यांचें केवळ भांडें असा एक ईश्वरानें खरा मित्रच निर्माण केला आहे.

दोन मित्रांपैकीं एक श्रीमंत झाला म्हणजे त्यामुळें दुसऱ्या गरीब मित्रासही शोभा येऊन आनंद होतो; जसें, सूर्य उगवला म्हणजे फुलें प्रफुल्लित होऊन शोभूं लागतात!

गुप्त गोष्ट फोडणारा, हें दे तें दे अशी याञ्चा करणारा, निष्ठुर, अस्थिरबुद्धीचा, रागिष्ट, जुगार, खेळणारा आणि खोटें बोलणारा असा मित्र सर्वथैव टाकावा. हीं मित्राशीं दूषणें होत.

चांगल्याशीं स्नेह असला तर त्याचे गुण आपणांत येतात. जसा कांचेचा खडा सोन्याचे कोंदणांत हिऱ्यासारखा शोभतो!

एकाच पोपटाचीं दोन पिलें, एक हीन जातीच्या कसयाचे घरीं ठेविलें आणि दुसरें एखादे महापंडिताचे घरीं ठेविलें; तर त्या उभयतांत जो मोठा गुणभेद दिसतो तो केवळ त्यांच्या चांगल्या वाईट संगतीने घडतो!

हलकट लोकांबरोबर क्षणभर देखील राहूं नये किंवा जाऊं नये कलालाच्या हातांत दूध असलें तरी लोक तें मद्य आहे असें समजतात!

वीण्याच्या आश्रयाला असणारा भोपळा अनेक सत्कृत्यांत उपयोगी पडून त्याचें महत्व असतें; पण तोच भोपळा सरभंगी वगैरे नीच लोकांपाशीं अनेक नीच पदार्थांचें भांडें होतो!

मोठ्यांच्या सहवासाला असल्यावर कोणाला मोठेपणा येणार नाहीं! कमळाच्या पानावरील पाण्याचा थेंब मोत्यासारखा शोभतो! व समुद्रांतील शिंपींतील अल्प जलबिंदु मोती होऊन मोठ्या किमतीला येतो! खरा मित्र भार घालीत नाहीं.

नवऱ्याचा स्वभाव जसा चांगला किंवा वाईट असेल तसा त्याच्या नेहमींच्या सहवासानें त्याच्या स्त्रियेचाही स्वभाव होतो. शेरावरील गुळवेल शेराचे वाईट गुणच नेहमींच्या सहवासानें स्वीकारते!

राजाजवळ खुशामती असतात, सोद्यांजवळ सोदे व्यापारी त्यांस भागीदार असतात, आणि गृहस्थास ओळखी असतात; पण मित्र म्हणून भले माणसाशिवाय दुसऱ्यास नसतो!

आपलें कुळ हलकें असलें तरी त्याचा आश्रय धरून असावें हें बरेंच तेणेंकरूनच कल्याण आहे : तांदळावरील तूस काढून टाकल्यावर तांदूळ पाण्यावर तरूं शकत नाहींत, तर पाण्यांत बुडून जातात. आणि ते जेव्हां त्या यःकश्चित् तुसाचाच आश्रय करून असतात तेव्हां ते तरतात!

## लोकप्रीति

चांगलें सांगणारे लोकांस आवडत नाहींत!

## मान

वरिष्ठास जिंकण्याचा असा मार्ग आहे कीं, गरिबाचा देखील सत्कार करावा.

परस्वाधीन झाल्यावर कोणाचा मान राहत नाहीं.

दुसऱ्याचें ऐकावें आणि त्यांत आपली ही थोडी बुद्धि घालावी. तेणेंकरून दुसऱ्याचें ऐकिलेंसेंही होतें आणि असें केलें असतां त्याठिकाणीं आपला मान राहतो.

ज्या देशांत अथवा ज्या जनसमुदायांत आपला मान राहत नाहीं तेथें कधींही राहूं नये अथवा जाऊं नये.

शूर पुरुष, विद्वान् आणि रूपवान् स्त्रिया ह्या जेथें जेथें जातील तेथें तेथें त्यांचा आदरच व्हावयाचा!

## उपद्रव

दुसऱ्यास उपद्रव केला तर ते दगडावर लिहितात आणि उपकार केला तर ते वाळूवर लिहितात.

जाणत्या मनुष्यावर एक उपकार केला तर तो शंभर मानतो.

दुसऱ्यावर उपकार केले ते मोठे वाटतात, पण आपल्यावर दुसऱ्यानें केले ते लहान वाटतात.

सदाचरण हें सुखास, डौलास व थोरपणास शत्रु आहे. कारण कीं, जे सदाचारी आहेत ते आपल्या इच्छा वाढूं देत नाहींत, त्या जर प्राप्त झाल्या तर सुखानें अनुभवितात. आणि त्या जरी प्राप्त झाल्या नाहींत तरी ते त्याजबद्दल दुःखही मानीत नाहींत.

## उपकार

योग्यता पाहून उपकार करावा.

फार उपकार केले तर लोक स्मरण ठेवीत नाहींत. पण एक पक्का केला तर स्मरण ठेवितात.

फार दिलें तर तो धर्म नाहीं, पण वेळेवर दिलें तर तो धर्म आहे.

कधीं कधीं स्वहित परहिताचें कारण आहे.

कान हे कुंडलें, भिकबाळ्या वगैरे अलंकारांनीं सुशोभित करण्याकरितां ईश्वरानें दिले नाहींत, तर सच्छास्त्राचें श्रवण करण्यास दिले आहेत; हात सलकडीं, पोहोच्या वगैरे घालण्याकरितां दिले नसून अनाथांस दान करण्याकरितां दिले आहेत; आणि तसेंच, हें शरीरही चंदनीअत्तर वगैरे सुवासिक तेलें लावण्याकरितां दिलें नसून परोपकाराकडे लावण्याकरितां दिलें आहे!

ज्याला दुसऱ्यावर उपकार करण्याची बुद्धि नाहीं त्यास धिक्कार असो. त्यापेक्षां पशु तरी जास्त मानावे; कीं, ते जिवंत असतां दुसऱ्याच्या पुष्कळ उपयोगीं पडतातच, परंतु मेल्यावरही आपल्या अस्थि आणि चर्म हीं परोपकारार्थ देतात!

वृक्षांस फळें आलीं म्हणजे तीं लोकांनीं घ्यावीं म्हणून ते लवून असतात, पावसाळ्यांतले नवे पाण्यानें भरलेले ढग सर्व पृथ्वीवर उपकार करण्याकरितां खालीं खालीं येतात आणि तसेच, सद्बुद्धीचे जे लोक आहेत त्यांस द्रव्य मिळाल्यावर ते परोपकाराविषयीं फार लीन होतात.

कोरडा फुसफुसीत जरी कापूस आहे तरी तो आपल्या तंतुमय शरीरानें परोपकारार्थ सर्व जगांस आच्छादितो!

नारळासारखे निर्जीव पदार्थही, लोकांनीं त्यांच्या लहानपणीं त्यांजवर केलेले उपकार विसरत नाहींत : पहा—नारळाचा लहान रोपटं असतां त्यास लोकांनीं कसें तरी खारें गोडें व घाणेरें पाणी घालून वाढविलें; ते उपकार स्मरून हा नारळाचा वृक्ष आपल्या मोठेपणी उपकारकर्त्यांस थोडेंच पण मधुर असें पाणी देण्याकरितां आपल्या डोक्यावर घेऊन असतो!

परोपकार न करणाऱ्या मनुष्यापेक्षां गवत तरी उत्तम समजावयाचें की तें परोपजीवनार्थ उपयोगीं पडतें!

फुलें इच्छा करीत नसतांही सूर्य उगवून त्यांस प्रफुल्लित करतो. तसेंच पर्जन्याची कोणी प्रार्थनाही करीत नसतां तो स्वेच्छेनें परोपकारार्थ पृथ्वीवर येतो. तेव्हां उपकार करण्याची ज्यांस स्वाभाविक बुद्धी आहे त्यांची विनंति करणें नको!

## कृतघ्नता

कृतघ्न आणि कृतज्ञ यांची अवस्था पहा—एकाचे चित्तास असें वाटतें की, मीं लोकांस फसविलें, मीं आपलें इमान बुडविलें आणि मी काळजी करितों—दुसऱ्यास असें वाटतें कीं मीं कांहीं दुसऱ्याचें वाईट केलें नाहीं. असें म्हणून तो आनंदानें असतो. आणि उपकार फेडावयाची इच्छा करून जर ताकद असली तर सुखानें फेडितो; असा तो सुखी आहे.

आपली कृतघ्नता मोठी दिसत नाहीं पण दुसऱ्याची मोठी दिसते.

समुद्रावर वाटेल तितका पाऊस पडला तरी त्यापासून काय फल होणार? तसेंच. मूर्खावर उपकार केला असतां त्यापासून काय प्रत्युपकार होणार आहे?

## उपद्रव

थोड्या नफ्याकरितां दुसऱ्यास त्रास देऊं नये.

दुसऱ्यास असमर्थ म्हणून छळूं नको; कारण कीं, असमर्थाचे समर्थ क्षणांत होतात.

कोणास उपद्रव करूंनये.

मनुष्य दुसऱ्यास झालेले उपद्रव आणि आपल्यास झालेले उपद्रव सारखे मानीत नाहीं.

ज्या गोष्टींचा पक्का विचार केला आहे, ज्या अन्नाचें पाचन झालें आहे, ज्या स्त्रीस आज्ञेंत वागविली आहे, ज्या राजाजवळ चांगले प्रधान आहेत, आणि ज्या पुत्रास चांगली शिक्षा लावली आहे, अशा ह्या सर्व गोष्टी ज्या ठिकाणीं अनुकूल आहेत त्या ठिकाणीं अपकार घडूं शकत नाहीं.

ज्यास उपद्रव करून ज्याचें नुकसान करावयाचें असेल तो त्याशीं पहिल्यानें प्रीतीनेंच वागतो. मासे धरण्यास कोळी लोक गळाला मांस बांधतात किंवा पारध करणारे आणि, पक्षी धरणारे सुंदर रीतीनें गातात किंवा दाणे वगैरे पसरतात!

जे दुसऱ्यास उपद्रव करितात त्यांची पूस तपास मनुष्य सावकाश करितो पण आपल्यास जे उपद्रव करितात त्यांची तावडतोब करितो.

जो उपद्रव करणार म्हणून अगोदर कळवितो तो उपद्रव करीत नाहीं. तसेंच जो मी आपलाच आहें असें म्हणतो तो कांहीं करीत नाहीं.

दुसऱ्यास उपद्रव करूं नये म्हणजे तुम्हास ही कोणी उपद्रव करणार नाहीं.

ज्याजवर फिर्याद करवत नाहीं त्याजकडून उपद्रव झाला तर फार कठिण!

उपद्रव करणें सोपें, परंतु तो सोसणे अवघड आहे.

## सूड

ज्याने आपल्यास उपद्रव दिला त्याचा सूड उगवूं नये.

मध्यम प्रकारचा सूड घेणें असल्यास अपराधाकडे लक्ष्यच देऊं नये उत्तम प्रकारचा सूड घेणें असल्यास असें करावें कीं, जो मनुष्य अपराधीं असेल त्यानें पुन्हां अपराधच करूं नये; आणि केला तर त्याचें नुकसान होईल अशी तजवीज करावी.

## दुर्जन

दिसण्यांत गोरागोमटा आणि गोड बोलणारा परंतु अंतःकरणी कपटी असा मनुष्य चांगला नसून दुर्जन होय!

आपल्या भाषणप्रमादानें दुसऱ्याचें खंडन करणारा मनुष्य, आणि आपल्या तोंडानें चांगल्या धान्याचा चूर करून टाकणारें मुसळ हे दोंन्हीं बरोबर आहेत!

दुष्ट मनुष्याचें द्रव्य कधीं देवाधर्मांत खर्च व्हावयाचें नाहीं आणि गरीबास मिळावयाचे नाहीं, तर राजे चोर यांची मात्र धन होते.

दुष्ट लोक वाईट कृत्यें करतात परंतु तीं चांगल्या लोकांस भोंवतात : रावणानें रामाची सीता चोरून नेली आणि बिचाऱ्या समुद्रास आपल्या डोक्यावर दगडांचा पूल सोसावा लागला!

ज्या कुळांत उत्पन्न झाला त्याचाच निःपात करणारा दुष्ट मनुष्य हा, जेथें उत्पन्न होतात त्याचीच माती करून टाकणाऱ्या वाळवीच्या किड्यांप्रमाणें होय!

चांगले आणि दुष्ट यांचा क्रोधाग्नि एकमेकांशीं विरुद्ध आहे. चांगल्या मनुष्याचा क्रोधाग्नि स्नेहानें (तेलानें!) शांत होतो आणि दुसऱ्याचा वारीत असतां (पाण्यानें!) अधिक भडकतो!

दुष्ट लोक दुसऱ्याशीं भांडण्यास दहां तोंडांचे रावण असतात, दुसऱ्याचें व्यंग पाहण्यांत हजार डोळ्यांचे इंद्र आहेत आणि चांगल्या मनुष्याचें द्रव्य हरण करण्यास सहस्रार्जुनासारखे हजार हातांचे आहेत!

दुष्ट मनुष्य गोड बोलत असला तरी त्याचा विश्वास धरूं नये. कारण त्याच्या जिभेवर साखर आहे परंतु हृदयांत विष असतें.

स्वच्छ पाण्यानें जरी तळें तुडुंबलें असलें तरी कावळे मोरींतीलच पाणी पितात; तद्वत् सुंदर व आपल्यावर प्रीति करणारी अशी जरी स्त्री असली तरी नीच मनुष्य परस्त्रियांवरच लंपट असतो!

दुर्जनाच्या संगाला असलें म्हणजे पावलों पावलीं अपमान व फजिती आहे : एवढा अग्नि, पण तो लोखंडांत गेला कीं, त्याजवर घणांचे घाव बसूं लागतात!

प्रथमतः नीचाला नमावें आणि मग चांगल्या लोकांस नमस्कार करावा : जसें, आपण पाणी करितां अगोदर शौचाहून येतों आणि मग तोंड धुतों!

जसें कुत्र्याचें शेंपुट नळकंड्यांत घातलें तरी सरळ होत नाहीं : तसेंच, नीचास किती जरी बोध केला तरी तो आपला दुष्टपणा टाकणार नाहीं!

दुष्ट जे आहेत ते आपला प्राण देतील पण दुसऱ्याचें हित म्हणून होऊं देणार नाहींत : सुग्रास अन्नांत माशी आपला जीव देते आणि जेवणाराचे पोटांत जाऊन त्यास ओकविते!

विद्या, धन आणि शक्ति हीं दुष्ट व सुष्ट लोक अगदीं निरनिराळ्या उपयोगास लावतात :— दुष्ट लोक विद्वान् झाले म्हणजे लोकांशीं विवाद करतात, धनवान् झाले म्हणजे मदोन्मत्त होतात आणि शक्तिमान् झाले म्हणजे दुसऱ्याला उपद्रव देतात; परंतु सज्जन जे आहेत ते ती विद्या, तें धन आणि ती शक्ति अनुक्रमें ज्ञानसंपादन, दान आणि दुर्बळाचे रक्षण ह्यांकडे लावतात!

बारीक तोंडाचा, चांगल्या रंगाचा आणि राजमार्गांत पडलेला असा कांटा मोठ्याच्या पायास जरी लागला तरी आग करून देतो तद्वत् दिसण्यांत गोरागोमटा, चांगल्या मार्गास लागलेला आणि सुज्ञ मनुष्याचा जरी सहवास असला तरी त्याची, दुसऱ्यांस उपद्रव देण्याचे खोड जाणार नाहीं.

पळसाच्या झाडास सुंदर तांबडीं लाल फुलें येतात तीं पाहून, जर एखादा पोपट, त्या वृक्षापासून कांहीं दिवसांनीं आपणास गोड फळें मिळतील अशा आशेनें वाट पाहात बसला, तर त्याची अशा किती सफळ होणार आहे?– होणार नाहीं. तसें मनुष्याच्या छानछोकीवरून तो सज्जन आहे असें मानणें ही चूक आहे.

नीच लोकांचा मोठेपणा केवळ दुसऱ्यास उपद्रव करण्यांतच काय तो आहे; वाघानें एक दिवस उपवास केला तरी त्या उपवासाचें पारणे दुसऱ्या प्राण्यांचा जीव घेणें आहे!

दुसऱ्यांवर संकटें आलीं आणि आपला जरी नाश झाला तथापि दुष्ट हा आनंद पावतो : लढाईच्या मैदानांत योद्ध्याचें मस्तक तुटून गेल्यावर धडास मस्तकाच्या नुकसानीचा आनंद होऊन तें नाचूं लागते.

वृक्षांस वाऱ्याचें भय आहे, फुलांस हिंवाळ्याचें भय आहे, आणि चांगल्या मनुष्यास नीचाचें भय आहे.

मनुष्याचे मनास एकदां नीचाशीं गांठ पडल्यामुळें ठेंच लागली म्हणजे मग पुढें चांगले मनुष्य देखील त्यास नीचच आहेत असा संशय येतो; जसें लहान मुलाचें एकदां ऊन दुधानें तोंड भाजलें म्हणजे दहीं देखील फुंकून खातो!

जेथें आपलें अथवा आपल्या परिचयाचें कोणी नाहीं तेथें आपला द्वेष किंवा नाश कोणी करीत नाहीं. कुऱ्हाडीस दांडाच नसला तर झाडें कशाला तोडलीं जातील?

कस्तुरीची जमीन करून तेथें कापराचें आळें केलें आणि त्यांत कांदा लावून सोन्याच्या भांड्यानें गोड पाणी घातलें, तरी त्यांत पेरलेल्या कांद्यापासून सुवासिक कांदे येतील काय?

मोठमोठ्या समुद्रांचें उल्लंघन करण्यास नौका हा एक उपाय आहे, अंधार पडला तर दिवा लावून उजेड करणें अवघड नाहीं, अगदीं निर्वात झालें असतां पंख्यानें वारा घेतां येईल, आणि उन्मत्त हत्तींस आकलन करण्यास अंकुशाचें साधन आहे, अशीं सृष्टिकर्त्यानें सर्वांस अनेक साधनें

व अनेक उपाय करून ठेविले आहेत; परंतु दुष्टांस वाटेवर आणण्याचें एखादें साधन किंवा उपाय त्यास अद्याप आढळला नाहीं !

दुर्जनांस कांहीं तरी खुसपट काढून लोकांशीं वाद करणेंच बरें वाटतें; जसें, कावळ्यानें अनेक सुंदर सुंदर पदार्थ जरी पुष्कळ खाल्ले तरी त्यास घाणींत तोंड घातल्याशिवाय चैन पडत नाहीं !

दुर्जनाला किती जरी उपाय केले तरी तो चांगल्या मार्गावर येणार नाहीं : कडु निंबास दूध किंवा तूप जरी पाण्याच्या ऐवजीं घातलें तरी त्यास गोडपणा येईल काय ?

दुर्जन विद्यावान् जरी असला तरी त्यास दूरच ठेवावें; सापाजवळ रत्न असलें म्हणून तो आपणास सलगीला योग्य नव्हे !

दुर्जनांची जिव्हा ही सर्पाप्रमाणें असून त्यांच्या मुखरूप बिळांत ती राहते. व दुसऱ्यांच्या कानांशीं मात्र ती स्पर्श करून इतरांचे जीवच घेते !

## सज्जन

चांगल्या मनुष्यांच्या अंतःकरणांत कपट नसतें व त्यांचें बोलणें आणि करणें ह्यांत कधीं भेद पडत नाहीं. तर त्यांचे अंतःकरण, भाषण आणि कृतिहीं एक असतात.

दुष्टाबरोबरच सुद्ध वाढला असला अथवा सदोदित सहवासाला असला तरी त्याच्या सौजन्यांत भेद पडत नाहीं : जन्मापासून समजूं लागेपर्यंत कोकिळपक्षी कावळ्यांच्या पिलांबरोबर त्यांच्याच घरट्यांत पोसिले जातात; परंतु कावळ्यांचे आचार विचार अथवा भाषणही कोकिळांस लागत नाहीं !

कुलीन मनुष्याशीं सहवास, विद्वानांशीं मैत्री आणि आपल्या ज्ञातीशीं गोड असा मनुष्य कधींही कोणास नावडता होत नाहीं.

सुजनांचीं मनें प्रसंगीं दगडापेक्षांही कठोण होतात आणि प्रसंगविशेषीं फुलांपेक्षांही मऊ असतात !

सुशील लोकांची काय गोष्ट सांगावी ? ते संपत्ति तृणासारखी मानतात, आणि कदाचित् ती आलीच तर अगदीं नम्र होतात !

संकटसमयांतही सुजन लोक इतरांस पहिल्यापेक्षां आनंदवितात; चंदन जळूं लागला म्हणजे सर्वांस सुवास देतो. तसा पूर्वस्थितींत देत नाहीं !

सज्जनांस किती जरी उपद्रव देऊन त्यांची मानखंडना केली तरी ते पूर्वीप्रमाणेंच आपल्या कीर्त्तीस चढून प्रसिद्ध होतात : वृक्ष जरी तोडला तरी तो पूर्ववत् वाढतोच आणि चंद्राचा जरी क्षय होत चालला तरी तो पुढें वृद्धि पावतो; परंतु रागावत नाहींत !

चेंडू जमीनीवर जरी पडला तरी उडी घेऊन तो वर उडतोच. तद्वत् साधुवृत्तीचे जे लोक आहेत ते आपल्या वरील संकटें क्षणिकच मानतात !

आपल्या चांगल्या वर्त्तनानें मातापितरांस आनंदविणारा असा पुत्र, नवऱ्यांचेंच हित इच्छिणारी बायको आणि चालत्या आणि पडत्या अशा दोन्ही काळांतही सारखा उपयोगीं पडणारा व विश्वासु असा मित्र. हीं तिन्हीं या पृथ्वीवर जे पुण्यवान् आहेत त्यांसच मिळतात.

सज्जनांच्या संगतीची ज्यास इच्छा, दुसऱ्याच्या गुणावर प्रीति, वरिष्ठांशीं नम्र, विद्येचें ज्यास वेड, आपल्या स्त्रीवरच प्रीति, लोकोपवादास भिणारा, ईश्वराचे ठायीं भक्ति, इंद्रियदमन करणारा, आणि दुष्ट लोकांच्या सहवासापासून दूर असणारा, इतके गुण ज्यांमध्यें आहेत त्यांस नमस्कार करावा !

दुसऱ्यांना उपदेश मात्र करतां येतो. पण जसा उपदेश करतो तसेंच जो आपलें वर्त्तन ठेवितो तोच साधु किंवा सज्जन म्हणावा !

जरी सज्जन व विद्वान् यांणीं साक्षात् उपदेश केला नाहीं तरी त्यांची चाकरी करून असावें. कारण, कधीं काळीं स्वेच्छेनें जी माहिती किंवा सुविचार त्यांचे तोंडून निघतील, त्याच्या योगानेंच आपलें मोठें कल्याण होणार आहे!

आपत्काळीं धैर्य, मोठा अधिकार आला असतां क्षमा, सभेंत उभा राहिला असतां अस्खलित व मधुर भाषण, समरांगणांत पराक्रम, सुकीर्ति मिळविण्याची इच्छा आणि ज्ञानप्राप्तीची गोडी इतके गुण महात्मे जे आहेत त्यांजमध्यें जन्मतःच असतात.

चांगलीं मनुष्यें सहज जरी बोलून गेलीं तरी तो शिलालेख आहे. आणि मूर्ख मनुष्यांनीं शपथ-पूर्वक जरी वचन दिलें तरी तें पाण्यावर लिहिल्यासारखें व्यर्थ होय!

चांगलीं मनुष्यें भेटूं नयेत, भेटलीं तर त्यांचा स्नेह होऊं नये आणि स्नेह झाला तर त्यांची तुटातूट होऊ नये. कारण, तुटातुटीनें अंतःकरण फार सखेद मात्र होतें!

ओंजळींत असलेलीं फुलें दोन्ही हातांस सारखाच वास देतात. डाव्या हातास कमी आणि उजव्या हातास ज्यास्ती हा पंक्तिभेद तीं करीतच नाहींत. तद्वत् सुजन जे आहेत ते एकावर ज्यास्त प्रीति आणि दुसऱ्यावर कमी प्रीति असें कधीं करीत नाहींत.

चंदनाच्या रानांत तेथें असलेल्या दुसऱ्या लांकडांस त्यांच्या सहवासानें सुवास येतो; त्याप्रमाणें चांगल्या मनुष्यांच्या सहवासास असला तर नीच मनुष्यही चांगल्या अवस्थेंत येईल.

ग्रहण लागलें असलें तरी सूर्य हा फुलांस प्रफुल्लित करतो. तसे, चांगल्या स्वभावाचे जे लोक आहेत ते आपण जरी मोठ्या संकटांत पडले असले तरी दुसऱ्यांचें हित करून त्यांस आनंदवितात!

स्त्रियांस लुब्ध होत नाहींत, कधीं ज्यांस क्रोध येत नाहीं आणि विद्यासंपन्न असून संपत्तीचा ज्यांस लोभ नाहीं त्यांतस सर्व लोक सुमनुष्य व धीरवान् असें म्हणतात!

रानांत सिंह हे, हरिण वगैरे पशु मारूनच पोट भरतील, परंतु भुकेनें व्याकुळ झाले म्हणून कधीं गवत खाणार नाहींत : मोठे जे आहेत ते संकटकाळ आला म्हणून नीच कर्में कधीं ही करणार नाहींत!

मनुष्यानें चांगलें असणें अथवा वाईट असणें हा तर ज्याचा त्याचा स्वभाव गुण आहे : मातीवर जर पुष्कळ वेळ फूल राहिलें तर फुलाचा सुवास मातीला लागेल परंतु मातीची घाण फुलास लागणार नाहीं!

लोकांस आवडणार नाहीं अशा भाषणाविषयीं दरिद्री, गोड व मधुर भाषणानें श्रीमंत, आपल्या स्त्रीनेंच संतुष्ट आणि दुसऱ्यांस दोष देणें ज्यास आवडत नाहीं, अशीं मनुष्यरत्नें कधीं कधीं या पृथ्वीवर उत्पन्न होऊन पृथ्वीस शोभवितात!

मूर्ख मनुष्य जरी अद्वातद्वा बोलला अथवा त्याणें जरी इजा दिली तरी चांगले जे असतात ते गोडच बोलून त्याच्या उपयोगीं पडतात. चंदन अग्नींत टाकला तरी आपला सुवास देतोच, अथवा ऊंस चरकांत घातला तरी गोड रस देतोच!

जों जों चंदन तासून काढावें तों तों त्यास अधिकाधिक सुवास येऊं लागतो, ऊंस वरून जों जों कांपावा तों तों त्यास ज्यास्त गोडी लागते आणि सोनें जों जों जाळावें तों तों तें अधिक चांगलें दिसूं लागतें. ह्या प्रमाणें सुजन जे आहेत ते प्राणांताची जरी वेळ आली तरी त्याच्या स्वभावांत फेरबदल होत नाहीं!

हलके लोक एखादें कृत्य, त्यास अनेक अडथळे येतील म्हणून करीत नाहींत; आणि करूं लागले तर मध्येंच सोडून देतात. परंतु चांगले व निश्चयी जे आहेत ते एकदां हातीं धरलेलें काम शेंकडों विघ्नें आलीं तरी तें धैर्यानें शेवटास नेतात.

मोठ्यांवर संकट आलें तरी कधीं कधीं तें दुसऱ्यांस हितकरच होतें. पूर्वीं तुरुंगांची स्थिति फार वाईट होती आणि ती सुधारण्याकरितांच परोपकारी जान हावर्ड यास कैद भोगावी लागली! व तेथील सर्व दुःख अनुभवून त्या उदार सद्गृहस्थानें अनेक तुरुंगांची सुधारणा करविली!!

जीं मुलें उनाड असतात त्यांस पंतोजी शत्रु दिसतो. तसाच जो श्रीमंत असतो त्यास उनाडपणा, नम्रपणा आणि दुसऱ्याची सेवा हीं आवडत नाहींत.

दुसऱ्याचा आदरसत्कार व ताजिम तवाजा करण्यांत थोरपणा आहे.

श्रुती एकीचकडे राहतात आणि स्मृती भलतीचकडे राहतात; त्याच प्रमाणें मोठाल्या ऋषींनीं सांगितलेलीं वचनें ही बाजूलाच राहून थोर म्हणून जे गाजवतात त्यांजप्रमाणेंच इतर लोक वागतात.

चांगला मनुष्य कोणास ठकवीत नाहीं.

जो मनुष्य राग आदिकरून वाईट गोष्टींवर जय पावतो तो थोरपणाचे मार्गास लागतो, व जो पराभव पावतो तो नाशाचे रस्त्यास, लागतो.

बोलावें थोडें आणि करावें फार, हें थोरपणाचें काम आहे.

आपला अपराध कबूल करणें आणि पश्चात्ताप करणें हें थोराचें लक्षण आहे. त्याजवरून असें दिसतें कीं, तो मनुष्य अपराध करण्यासारखा नाहीं.

समुद्रांत कचरा जो असतो तो वरतीं येतो पण मोतीं खालींच असतात; थोर जे असतात ते आपले गुणांची प्रशंसा करीत नाहींत.

उत्तम पुरुषाचें अंतःकरण नारळा सारखें आहे. वरून तें दृढ दिसतें परंतु आंत आंत नरम असतें; व अधम पुरुष बोरा सारखा वरून चांगला दिसतो, परंतु आंत वाईट असतो.

शत्रूवर दया करावी हा थोरपणा मोठा आहे. पण शत्रूचा उपकार आपल्यावर घेणें या सारखा कनिष्ठपणा कोणताही नाहीं.

स्वतां चांगला तर जगही चांगलें वाटतें.

आपल्या पायावर धोंडा कोणी पाडून घेत नाहीं. आपला नाश करून दुसऱ्याचें हित करावयाचें असे साधु विरळ आहेत.

द्रव्य आणि अधिकार मिळवावा यांत थोरपणा नाहीं. परंतु आपलें हित सोडून आपले लोकांचें हित करणें यांत थोरपणा आहे.

थोरानें मान केला आणि बरोबरीच्यानें काम केलें, हें सारखेंच आहे. यास्तव थोरांनीं आदर सत्कार करणेंच जरूर आहे.

थोरांनीं वेडें म्हटलें तरी म्हणोत परंतु तो वेडा आहे असें आपण म्हणूंनये, मनांत मात्र म्हणावें.

थोरपणा, लहानपणा, गरीबी आणि मातबरी हे भेद मनुष्यांमध्ये आहेत. परंतु ईश्वराचे दरबारांत याचा भेदाभेद नाहीं.

थोर मनुष्य दुसऱ्याची निंदा करीत नाहीं. व आपणही सोशीत नाहीं.

गरीबीनें मनास निष्ठुरता येते आणि श्रीमंतीनें नम्रता येते !

थोरास गरज फार लागते.

आपला थोरपणा आपण सांगितला तर लोक अधिक मानीत नाहींत पण जर आपला थोरपणा लोकांस आपले आपण कळेल तर ते अधिक मानतील.

सत्पुरुषाचे भाषणासारखें आनंदकारक दुसरें कांहीं नाहीं.

थोराला डौल मात्र असतो परंतु त्याजमुळें त्याचें कपाळ दुखत नाहीं अथवा त्यास ज्वर येत नाहीं. असें नाहीं. कसाही श्रीमंत असो आणि त्यास कितीही मोठा अलंकार असो; परंतु त्यास एक वेळ वायु झाला म्हणजे तो आपला थोरपणा विसरून जातो !

सत्कुळांत बहुधा सत्पुत्रच होतात.

जो थोर आणि संभावित आहे त्यास अब्रु आणि प्रतिष्ठा राखण्यासारखी दुसरी काळजी नसते.

थोराचें सत्कीर्त्तियुक्त नांव बहुत दिवस राहतें.

फारच डौल जे करितात त्यांचा थोरपणा त्यांच्या डौलानें मुळींच झांकला जातो, आणि खरा थोरपणा दिसत नाहीं.

दिव्याच्या खालीं अंधार असतो. हें उदाहरण थोरांस लागू आहे.

जे सुजन संकटांत स्थिर, चालता काळ असतांना देण्यांस उदार, सभेंत वक्ते, युद्धांत धीरवान्, आणि सत्कीर्तीची आशा करणारे असे आहेत ते धन्य होत !

थोरावर उपकार केला तर तो ते पतकरतील ही आशा धरूं नये. कारण कीं, त्यांजवर उपकार केला तो ते सेवा केली असेंच समजतात, मेहेरबानी असें समजत नाहींत.

थोरपणा मिळवावयास बहुत काळ लागतो, घालवावयास क्षणही नको. जसें डोंगरावर धोंडा न्यावयास फार श्रम पडतात परंतु खालीं टाकावयास क्षणही नको.

बहुत लोक थोरांचें वर्णन करण्यांत अंधळे असतात, त्यांस कांहींच दिसत नाहीं. आणि थोरांनीं वाईट केलें तरी त्यांस ते थोरच म्हणतात !

आपण उपद्रव सोसतात परंतु दुसऱ्यास देत नाहींत अशाच लोकांस संभावित व सज्जन म्हणावें.

या, बसा असें म्हणतो, आदरसत्कार करितो, आणि अतिथी यांचें आतिथ्य करितो तो थोर म्हणावा.

थोरांच्या गुणांची आणि भलेपणाची कीर्ति होते, आणि त्यांचें लोक वर्णन करितात. तरी थोर म्हणविणाऱ्यांमध्ये बहुधा ते गुण नसतात; आणि यास्तवच राजाचा यत्किंचित् गुणही मोठा दिसतो.

थोरानें गरीबपणानें वर्त्तावें हें चांगलें. कारण कीं, त्यांत त्याला खर्च पडत नाहीं आणि मान आहे तोही कमी होत नाहीं.

भल्याचा राग क्षणभर आणि स्नेह जन्मपर्यंत असतो.

शरणांगताचें रक्षण करितो तो थोर, परंतु त्यास कांहीं विरुद्ध नसावें.

संपत्ती मोठ्यांनाच येते आणि विपत्तीही मोठ्यांनाच येते : चंद्रासच क्षय आणि वृद्धि आहे, ताऱ्यांना नाहीं !

सुजनांचे तोंडून दोषही गुणांत गणिले जातात परंतु दुर्जनांचें तोंडून गुणांची ही निंदा केली जाते; ह्यांत कांहीं मोठें आश्चर्य नाहीं : समुद्राचें खारें पाणी बाष्परूपानें मेघ घेऊन आपणास गोड्या पाण्याची वृष्टि करितात, आणि साप हे गोड दूध पिऊन त्याचें विषच करितात !

आपलें पाणी आपणच पिण्याकरितां नद्या वाहात नाहींत, आपली फळें आपणच खाण्याकरित वृक्ष फलद्रूप होत नाहींत आणि आपल्यापासून उत्पन्न होणारे धान्य आपणच खाण्याकरितां पाऊस पडत नाहीं. तर सज्जन जे आहेत त्यांचें जन्म केवळ परोपकारार्थच आहे !

उंसाच्या शेंड्यापासून खालीं प्रत्येक कांड्यास जशी जास्त जास्त रुचि आहे तशी सुमनुष्याच्या संगतीची दिवसेंदिवस ज्यास्त ज्यास्त गोडी आहे. आणि त्यांशीं जो कपट करील त्याला, उंसाच्या खालून वरच्या शेंड्यापर्यंत जशी कमी कमी गोडी लागते तशी कमी कमी प्रीति मिळेल !

संगतीच्या योगानें सुजनांचे स्वभावांत यत्किंचित्‌ही भेद पडत नाहीं. चंदनाशीं सदोदित साप असतात म्हणून तो विषारी होत नाहीं !

पडत्या काळांत ही सुजन मनुष्य आपले नुकसान करणाऱ्याशीं द्वेष करीत नाहीं ! चंदन तोडणाऱ्या कुऱ्हाडीच्या तोंडास तोच चंदन सुवास देतो !

दुष्ट प्राण्यांवरही साधु हे दया करितात : चांडालाच्या घरावरही चंद्र सूर्य प्रकाश पाडितात !

एखाद्याचे चांगले केल्यावर जो चांगल्या रीतीने आपल्याशीं वागतो तो साधु कोठला ? तर त्याचे अहित करून जर तो शांत वृत्तीने असेल तरच तो सज्जन !

महान् जे आहेत त्यांचीं सुखदुःखसमयीं एक स्थिति असत्ये. सूर्योदयीं व सूर्यास्तीं सूर्याचा रक्त वर्ण सारखाच असतो !

पृथ्वीवर अनेक जातींचे अनेक वृक्ष आहेत व त्यांत चंदन वृक्षही कोठें कोठें आहेत, सर्वत्र दगड माती आहे त्यांत कोठें हिरेही आढळतात आणि कावळ्यांचे काव् काव् शब्दाचें कर्कश ओरडणें नेहमी आहे परंतु त्यांत चैत्र वैशाखांत कोकिलांचेही मधुर शब्द ऐकूं येतात; तसे सर्व जगतीतलावर जरी दुर्जन फार आहेत तरी त्यांत कोठें कोठें सज्जनही आहेत.

## उद्योगी

जेणेंकरून सद्गुण लागतील तो उद्योग चांगला.

मनुष्यानें नेहमीं उद्योग करावा हें चांगलें आणि सरकारानेंही लोकांकडून उद्योग करवावा. तसेंच आळशी लोकांस रिकामें बसूं देउं नये. कारण, जे उद्योगी असतात आणि नेहमीं कामांत असतात त्यांस वाईट काम करण्यास वेळ सांपडत नाहीं. वास्तव उद्योग हा सद्गुणांचा पाया आहे.

नेहमीं उद्योग केला असतां मांजरा सारखें फळ मिळेल. मांजर जन्मापासून गाय न बाळगतां नित्य दूध पितें !

उद्योग्याचे घरीं सदैव लक्ष्मी वास करते आणि निरुद्योग्याचे घरीं अवदशा वास करते !

उद्योगी पुरुषासच संपत्ति मिळते. परंतु उद्योग न करितां दैवच काय करील तें करील असें म्हणणारे ते केवळ बायले होते ! दैव टाकून श्रम केले आणि त्यांत कांहीं प्राप्ति झाली नाहीं तर त्यांत आपल्याकडे दोष नाहीं.

उद्योगासारखा बंधु नाही. व उद्योग करीत असतां मनुष्य कधीं खिन्न होत नाहीं.

कोणतें ही काम उद्योगानेंच सिद्ध होतें; केवळ मनांत विचार केल्यानें होत नाही : सिंह निजला असतां त्याच्या तोंडांत आपाप कधीं भक्ष्य येऊन पडेल काय ?

उद्योग, शक्ति, साहस, धैर्य, बुद्धि आणि पराक्रम हीं सहा ज्या मनुष्यांत आहेत तो ईश्वरी अंशच समजावा व त्यासच देव सहाय होतो !

जो उद्योग सोडून केवळ दैव घेऊन बसेल तो गचीच्या वरवंडीवर करून बसविलेल्या वाघाप्रमाणें होय ! कीं, त्याजवर कावळे येऊन बसतात !!

स्वपराक्रमानें जो कांहीं द्रव्य मिळवीत नाहीं तो पुरुष केवळ पुरुष संज्ञेचा मात्र अधिकारी !

आपल्यास गुण नसून तो दाखविण्याचा उद्योग पुष्कळ लोक करितात. पण आपल्यास वस्तुतः गुण प्राप्त करण्याचा इच्छा बाळगून उद्योग करीत नाहींत हें चांगलें नाहीं.

उद्योगी हे, त्यांस सांगितल्या कामाहून ज्यास्ती काम करितात, पण आळशी कमी करतात.

आरोग्य मेहनतीशिवाय आणि उद्योगाशिवाय राहत नाहीं.

## आळशी

जे चेंगट आहेत ते जों-पर्यंत त्यांस दिरंग करण्याची संधि आहे तों पर्यंत काम करीत नाहींत.

मनुष्याच्या शरीरांत आळस हा केवळ रिपु आहे--याच्या योगानें इह परलोकच्या एकाही सुखाची प्राप्ति होणार नाहीं !

## खुशामत--स्तुति

मुर्ख लोक दुसऱ्याची स्तुति करितात. कारण कीं, ते स्वतां स्तुति करण्या जोगे नसून दुसऱ्यांनीं आपली स्तुति करावी असेंही काहीं त्यांजवळ नसतें.

जे तोंडावर स्तुति आणि मागें घात करितात ते दुधांत विष असल्याप्रमाणे आहेत. त्यांचा मुळींच त्याग करावा.

जे स्तुतिप्रिय आहेत ते खुषामती लोकांचे कबज्यांत असतात.

स्तुति ही ईश्वराची कन्या अजून कुमारिकाच आहे ! कारण, तिला गुणवान् व पंडित नवरा पाहिजे, परंतु ते तिला पतकरीत नाहींत; आणि निर्गुणी व लब्धप्रतिष्ठ तिला पतकरितात परंतु ती त्यांना वरीत नाहीं. सारांश, खऱ्या विद्वानांस स्तुति आवडत नाहीं, परंतु अविद्वान् असून उगीच ढोल मिरविणारांस ती आवडते ! !

मूर्ख राजाचे खुषामती करणारे फार असतात.

सद्गुणांची स्तुति कोणी करीत नाहीं परंतु हुशारीची करितात.

खुषामत करूं नये, त्यांत दोन दोष आहेत : एक असत्य आणि दुसरा दुसऱ्यास मूर्ख करणें.

शाहाणा मनुष्य दुसऱ्याची अतिशय तारीफ करीत नाहीं, तारीफ करणाराच अज्ञान म्हणून तारीफ करितो. जो शहाणा आहे तो तांत्रिक तारीफ करितो. अतिशय तारीफ करणें हें मूर्खांचेंच काम आहे.

जे लोकांची निंदा आणि आपली खुषामत करितात त्यांचें भाषण ऐकूं नये, कारण ते दुसऱ्याजवळ आपल्याविषयीं तसेंच करितील असें समजावें.

ज्यास दुसऱ्याची खुषामत करणें आवडत नाहीं तो दुसऱ्याचे खुषामतीस ऐकणार नाहीं.

खुषामत हें खोटें नाणें आहे, परंतु ती गर्विष्ठ मनुष्याजवळ खऱ्या नाण्यासारखी चालते.

गरीब लोकांची स्तुति होते ती खरी पण थोरांची स्तुति बहुधा खोटी होते !

आर्जवी लोकांचें हेंच काम आहे कीं, जशी वेळ येईल त्याप्रमाणें वागणें आणि खुषामत करणें. कारण तेणेंकरूनच त्यास धन मिळतें.

राजदरबारांत आर्जवी लोक फार असतात आणि दुसऱ्यास खुषी कसें करावें हाच त्यांचा अभ्यास असतो. यास्तव दरबारी लोक सर्व आर्जवी असतात. पण खेड्यागांवचे लोक अनाडी असून त्यांस खुषामत करतां येत नाहीं. कारण कीं, ते आपले मेहनतीनें मिळवितात. तसेंच, लोकसत्तात्मक राज्यांतही आर्जवी लोक नसतात तरी ते दांडगे असतात. कारण, त्यांस खुषामत करण्याची जरूरीच नसते.

## निंदा

निंदकाची खोड मोडण्यास दुसरें औषध नाहीं. मात्र उत्तर करूं नये आणि हंसण्यावर घालवावें.

शत्रूची निंदा करूं नये कारण कीं, ती कोणी वास्तवीक म्हणत नाहींत परंतु अदावतीची म्हणतात.

राजाची आणि थोराची निंदा आपले घरींही करू नये. कारण कीं, घरीं जरी त्याची निंदा केली तरी झाडावरचें पांखरूं देखील त्यांस ती कळवील !

निंदेचें भाषण घरीं व दरबारीं कधींच करूं नये.

लहानाचीही निंदा करूं नये. कारण कीं, लहान कसा ज्ञानी होईल याचा नियम नाहीं.

दुसऱ्याची निंदा करते वेळेस हा विचार करावा कीं, निंदेचें कारण आपल्या जवळही आहे कीं काय ?

निंदेचा राग केला तर ती अधिक होते. पण स्वस्थ राहिलें निर्दोषपणा प्रगटतो !

वेळ न जाणून बोलतो तो निंदेस पात्र होतो.

राजा, अधिकारी, स्त्री, केश आणि नखें हीं स्थानभ्रष्ट झालीं म्हणजे निंद्य होतात !

एखाद्यांत पुष्कळ गुण असून जर एकच अवगुण असला तर सर्व लोक त्यास निंदितात : सर्व औषधांत कांदा हा उपयोगीं पडतो. पण त्यास एक दुर्गंधि असल्यामुळें सर्व लोक त्याचा त्याग करितात !

## सुख

फार विश्रांतिही नाहीं आणि फार श्रमही नाहींत ती अवस्था सुखावह आहे.

दुःखमिश्र नाहीं असें सुख कोणतेंही नाहीं !

अति सुख झालें म्हणजे कंटाळा येतो, तशीच अवस्था द्रव्यवानाची आहे.

लोभी हे द्रव्य जवळ ठेवून सुख पावतात, पण उदार जे असतात ते खर्च करून सुखी असतात!

सुख बेतानें भोगावें म्हणजे त्यांतच रुचि असते.

जे अतिशय भोग भोगितात ते वास्तविक सुखी नाहींत. जसें मिष्टान्नाचे जेवण गोड आहे पण क्षुधा नसून जे तें जेवावयास बसतात त्यांस त्याची रुचि कोठून असणार?

काळजी आयुष्य क्षीण करते; हेवा आणि क्रोध हे सुख क्षीण करितात!

पापविरहित जें सुख तें मात्र मनास डांचीत नाहीं.

जवळ असून सुख नाहीं पण भोगून सुख आहे!

जे शांत तेच सुखी.

सदाचरणी आणि भला मनुष्य जगांत सुख पावतो. कारण कीं, जरी त्यास दौलत मिळाली नाहीं तरी तो लोकांचे सुख आणि दौलत हीं पाहूनच सुखी होतो. आणि दुसरें असें आहे कीं, जें द्रव्यानें आणि त्याचे शक्तीनें मिळावयाचें आहे त्याहून त्यास भगवान अधिक देतो व त्याज वरच त्याची नजर असते.

नियामकपणानें शरीरास आणि जीवास सुख होतें; पण मनस्वीपणानें दुःख होतें.

जे पहिल्यानें सुखी नसून सुखाचा त्रास करीत असतात त्यांस तें प्राप्त झालें म्हणजे ते पहिली वर्त्तणूक सोडून सुखासच लंपट होतात.

ज्यास भय नाहीं, खावयास आहे, निरोगी शरीर, आणि चांगला लौकिक आहे त्यास सुखी होण्यास आणखी काय असावें ? कांहीं नको.

जो कांहीं इच्छीत नाहीं तो, सर्व वस्तु त्याजवळ असल्याप्रमाणेच सुखी असतो !

ऐकून फार संतोष होतो पण पाहून तितका होत नाहीं.

जे लोक आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवितात ते सुखी असतात.

प्रियकर स्त्री, धनवृद्धि, निरोगीपणा, सत्पुत्र आणि पोट भरण्याची विद्या हीं सर्व सुखकारक आहेत.

काळजी नसली म्हणजे तेंच सुख.

जो आपले मेहनतीनें खातो तो तृप्त असतो; त्याचे सुखाची हानि लक्ष्मीशिवाय दुसरा कोणी करूं शकत नाहीं.

अभाळाची छाया, दुष्टाची प्रीति आणि तारुण्य यांपासून थोडा वेळ मात्र सुख मिळतें!

दुसऱ्याजवळ मागावयास जाण्याची गरज नाहीं, ह्यापरतें सौख्य दुसरें नाहीं.

सुखी व्हावयाचें असेल तर चहाडखोर, आणि निंदक यांस दूर करावें.

## दुःख

आपलें आपण दुःखांत पाडून घेतों, दुसऱ्याच्या हातानें थोडे पडतों.

सर्व गुह्य जाणण्याचा यत्न करूं नये. कारण कीं, तें दुःखास कारण होईल.

दुर्योधनास मरतेसमयीं दुःख झालें; भीष्म हा मरण इच्छूनच मेला, त्यास त्याचें भयच नव्हतें; आणि तसेंच कर्ण हा हौसेनें मरण पावला. तस्मात् आपले कर्मानें आपण दुःख भोगितों.

जो आपण दुःखी आहों असें समजतो तो फार दुःखी.

दुर्बुद्धि ही विपत्काळाची खूण आहे.

अतृप्त, गैरअब्रूचे, दुसऱ्याचें वाईट इच्छिणारे, रागीट, भित्रे, परस्वाधीन असे जे लोक असतात ते नेहमीं दुःखांत असतात.

देणें आणि दुखणें यासारखी विपत्ति दुसरी नाहीं.

पुत्र होतात आणि मरतात, हें दुःख, ते होतात आणि मूर्ख वाढतात या दुःखापेक्षां सुसह्य आहे.

संकट दूर आहे तोंच त्याला भिऊन तें टाळण्याविषयीं तजवीज करावी. पण तें जवळ आलें तर त्यावर चालून जावें.

दुःखावर डाग देणें हें दुप्पट दुःख आहे.

संकटांत भीति धरूं नये. कारण कीं, संकटाचाही कांहीं उपयोग असतो.

संकटांत बुल्या पडूं नये आणि संकट आलें तर भीति धरूं नये.

सर्व मनुष्यांस दुःखे आहेत; आणि दुसऱ्याचे संकटाचा विचार केला तर आपलीं संकटें त्याजपुढें कांहींच नाहींत असें वाटेल.

जो मित्राचा बोध ऐकत नाहीं त्यास दुःख प्राप्त होतें.

जसे गुलाबाचे डेंखास कांटे आहेत तशीं अथवा जितकी सुख संपदा मनुष्यास मिळते तितकींच त्याबरोबरच दुःखें घरांत येतात !

जे सुखानें अध असतात त्यांस दुःख सोसणें म्हणजे केवळ प्राण संकट आहे.

पूर्ववयांत जे उधळेपणा करितात ते वृद्धापकाळीं फारच विपत्ति भोगितात.

## धर्म

स्वर्गास जाण्याची शिडी धर्म आहे.

धर्म सुखानें करावा.

ब्राह्मण लोकांचा धर्म, इंग्रज लोकांचे इनसाफ करण्याचे कायदे, मुसलमानांचे मायने मरातब व पत्र लिहिण्याची चाल, आणि हिंदु लोकांचे वसुलाचें काम व बाबती वगैरे यांच्या एवढ्या घोटाळ्याच्या गोष्टी दुसऱ्या कोणत्याच नाहींत !

भूतदया म्हणजे अहिंसा हाच श्रेष्ठ धर्म होय.

बलवंतांनीं निर्बळाचे रक्षण करावें, हाच धर्म आणि हेंच दान.

जसा लोकांचा धर्म असतो त्याच मानानें त्यांच्या प्रकृती असतात. तसे मुसलमान यांचा धर्म क्षत्रियांसारखा मारावे, लढावें व जबरीनें राज्य घ्यावें असा आहे, त्याजमुळें ते लोकही क्रूर आहेत. हिंदुलोक यांचा धर्म स्वस्थपणाचा आहे, याजमुळें ते लोक मेंढरासारखे आहेत! तसेच इंग्रज लोक यांचा सावधपणाचा धर्म आहे याजमुळें ते सावध असतात.

सद्क्रियेची वृद्धि करण्याकरितां आणि दुःखनाशाकरितां द्रव्य किंवा दुसरे कांहीं रीतीनें सहाय करणें याचें नांव दान आणि धर्म.

शरीर रक्षून स्वधर्म आचरावा यास सत्वगुण म्हणतात. आणि क्लेश करून स्वधर्म आचरितात त्यास तमोगुण म्हणतात.

लोकांमध्ये ज्या वाईट चाली आहेत त्यांस जो दूषण देतो आणि त्याची वृद्धि करितो तोच धर्मात्मा म्हणावा.

## नास्तिक

जे नास्तिक असें म्हणतात कीं, या भुवनास ईश्वर कर्त्ता नाहीं व शरीरात आत्माही नाहीं तर हें केवळ यंत्र आहे; हें जेव्हां भंग होईल तेव्हा सर्व नाशास पावेल; आणि त्यांतील आत्मा किंवा दुसरा पदार्थ कांहीं शेष राहणार नाहीं. त्यांस उत्तर–जर सृष्टि आपल्या आपण उत्पन्न झाली तर एखादा वाडा किंवा देऊळ आपल्या आपण कां उत्पन्न होत नाहीं ? :–

एक साधु एक नास्तिक राजास यासंबंधी उपदेश करितांनां थकला तेव्हां एका अरण्यांत त्यानें एक हवेली बांधविली आणि राजा शिकारीस गेला असतां तिकडूनच त्यास मार्ग दाखविला. तेव्हां तो साधूस म्हणतो, हे साधो! एवढ्या रानांत ही हवेली कोणी बांधविली? त्यावर साधूनें उत्तर दिलें कीं, ती आपल्या आपणच उत्पन्न झाली असेल तिला बांधतो कोण? त्याजवर राजा उत्तर करितो छि: असें कसें होईल? साधूनें उत्तर केलें कीं हे चमत्कारिक जग आणि मनुष्यें हीं आपल्या आपण उत्पन्न झालीं असें जर तूं मानितोस तर मग हवेली आपल्या आपण उत्पन्न होण्याचें आश्चर्य नाहीं! असें साधूचें वचन ऐकतांच राजा उमजून त्याचे मनांत ही सर्व गोष्ट ठसली, आणि त्यानें नास्तिक पणाचा वाद सोडून तो केवळ ईश्वरभक्त झाला!

## वाद

नवरा बायको यांमध्यें भांडण लागलें असतां परस्पर मान ठेवीत नाहींत, व लोकही त्यांचा मान ठेवीत नाहींत.

वाद हा नाशाचें कारण आहे. हा ज्या देशांत उत्पन्न होईल देश सफाई बुडेल. त्याचप्रमाणे राज्यांत व घरांत वाद उत्पन्न झाला तर वरच्याप्रमाणेंच स्थिति होईल.

कलह वाढवूं नये, तो त्वरीत मिटवावा.

ठिकठिकाणीं महान् महान् पंडित असतात, त्या त्या पंडितांत तत्व ज्ञानाचे वाद चालले असतात, त्या वादांच्या योगानें तत्वज्ञान प्राप्त होते. आणि त्या तत्वज्ञानाचे योगानें ईश्वरप्राप्ती होते.

शैव व मध्व यांचे महान् महान् वाद आज शेंकडों वर्षे चालले आहेत. परंतु त्यापासून फलप्राप्ति काय होणार हें कळत नाहीं!

## भय

भयपासून युक्ति सुचतात आणि रागापासून धैर्य उत्पन्न होते.

लोक आपले नुकसानीस फार भितात मग ती वास्तविक असो अगर नसो. जसें, मोठे दरबारांत मसलतीस लोक बसतात ते इतकी काळजी करीत नाहींत; पण सोंगट्या बुद्धीबळें खेळण्याचा प्रसंग आले म्हणजे मग आपापले कामांत अगदीं तत्पर असतात आणि अखेर अगदीं बेतावर येतात!

जो मरणास भीत नाहीं तो दुसरें संकटास कशास भिईल?

भय आणि दुःख हीं मित्रीं आहेत. जर त्यांस अंगावर घ्याल तर फारच चेकळतील आणि लढाल तर पळतील!

शरीरानें कांहीं सुखोपभोग भोगूं म्हटलें तर त्यास अनेक रोगांचें भय आहे, कुळाला अब्रूचें भय, स्थावर जंगम मालमिळकतीस चोर व राजे यांचें भय, सन्मानास गरीबीचें भय. शारीर शक्तीस शत्रूकडून भय, शास्त्रें शिकल्यास त्यास पंडितांच्या वादाचें भय, गुणवान् झाल्यास दुष्टांचें भय आणि देहास मृत्यूचें भय असें सर्वत्र भय असून ईश्वराचे ठायीं लक्ष्य देणें हें मात्र एक निर्भय आहे!

ज्यास अजमास नाहीं तें भय फार भयंकर असतें.

एकास शिक्षा म्हणजे पुष्कळांस धाक.

## भित्रा

पुष्कळ लोक ज्यास भितात त्यास आपण भ्यावें.

भित्रा आहे तो आपल्यास मसलती म्हणवितो आणि कद्रु आपणास सावध म्हणवितो.

भयानें शूराचें शूरत्व वाढतें पण भित्रे लोकांचा भित्रेपणा वाढतो. कारण, शूरास थोडेंच भय आहे असें दिसतें आणि भित्रे जे असतात त्यांस भीतिच फार असते.

भित्रे बहुत वेळ मरतात पण शूर एकवेळ मात्र मरतो !

महाराष्ट्र देशांत मोठाले किल्ले आहेत याजवरून तें राज्य मोठें असावें हें खरें; परंतु तेथील लोक भित्रे असावेत असें वाटतें. कारण कीं, शूर जे असतात ते तरवारीनें उघड्यावर लढतात आणि भित्रे जे असतात ते किल्ले कोटांनी लढतात!

भित्र्याच्या हातांत शस्त्र आणि बावळ्यास विद्या हीं सार्थकीं लागत नाहींत.

भित्रे जे असतात ते अन्याय करितात आणि संशय धरितात.

योग्य दान न करणाऱ्यास संपत्ति हंसत्ये; हें माझें घर, ही माझी जमीन, हें माझें शेत असें म्हणणाऱ्यास पृथ्वी हंसत्ये, आणि मरणास भिऊन रणांगणांत पाठ दाखवून पळणाऱ्या शूरास मृत्यु हंसतो !

## शूर

कितीएक शूर बळेंच भयांत पडतात. कारण कीं, त्यांस दम धरण्याचें सामर्थ्य नसतें.

पराक्रमी पुरुषांनी आपले बरोबरीच्यांशीं डौल घालावा, गरीबांशी घालूं नये. सिंह मेघनाद ऐकून स्फुरण करितो, परंतु कोल्ह्याची हांक ऐकून करीत नाहीं. अथवा, वावटळ मोठे झाडास मोडते परंतु लहानाचें रक्षण करितो!

विस्तवाचा निखारा अमळ हालविला कीं, तो वरील राखेचें कवच टाकून आपलें तप्तरूप दाखवितो; अथवा नागास उपद्र दिला असता तो आपली फडा उभारून फों करून धांवतो. तद्वत् शूर जे आहेत. त्यांस दुसऱ्यांचा उपद्रव सहन होत नाहीं !

शूर हा दरिद्री असला तरी लोकांत सन्मान पावतो, आणि धनवान असून कृपण सर्वत्र फजिती पावतो. यावरून स्वभावसिद्ध गुण जे शौर्य आणि औदार्य हे सर्वत्र सन्मानच पावावयाचे, केवळ द्रव्यावर त्यांचा मोठेपणा नाहीं. कुत्र्याच्या गळ्यांत सोन्याच्या पुतळ्यांची माळ घातली म्हणून तो सिंहाच्या तोडीचा शूर आहे असें कोणी म्हणणार नाहीं !

शूर जो आहे त्यास आपला देश आणि परदेश हें कांहींच नाहीं. तो जेथें जाईल तो त्याचाच मुलूख होय ! सिंहास हें हत्तीचें रान, हें वाघाचें रान अथवा हें कोल्ह्याचें रान हीं कांहीं शंका नसते; तो जिकडे जाईल तिकडे त्यांचें स्वामित्वच आहे !

## धीर

लोक आपली निंदा करोत अथवा स्तुति करोत, श्रीमंती येओ अथवा गरीबी येओ, आणि आज मृत्यु येओ किंवा कालांतरानें येओ, धैर्यवान् मनुष्य त्यास बिलकुल डगमगत नाहीं.

शत्रु जरी आपल्याशीं गोड गोड बोलला तरी त्याच्याशीं स्नेह करणें किंवा त्याचे आर्जव करणें हें, आपलें बरें करून घेण्याची इच्छा करणाऱ्या धीरवान् मनुष्यानें कधीं करूंनये.

कोणताही बेत केला तर तो सिद्धीस जाण्यास पुष्कळ दिवस लागतात; आणि मोठी मसलतही घाईनें फसते. पण धीरानें ती गोष्ट मोठ्या युक्तीची जरी असली तरी सोपी होते.

## कद्रु

कृपणासारखा दाता कोणी नाहीं कीं, जो आपल्या द्रव्यास स्पर्शही न करितां अथवा कवडीचा ही उपभोग न घेतां मेल्यावर सर्व द्रव्य परक्यास दान करितो !!

जो कृपण आपल्या द्रव्याचा आपणही उपभोग घेत नाहीं आणि दुसऱ्यासही घेऊं देत नाहीं तो, शेतांत गुरें व पक्षी यांस भेडावण्याकरितां केलेल्या गवताच्या पुतळ्याप्रमाणें व्यर्थ होय !

कृपणानें आणि मेलेल्या मनुष्याच्या प्रेतानें कोणावर काय उपकार करावयाचा ? तरी पण, प्रेताचें मांस तरी कावळयांस खावयास मिळतें परंतु कृपणाकडून कोणासच कांहीं मिळावयाचें नाहीं !

कृपण आणि उदार यांत केवढें अंतर आहे ?—कृपण पहिल्यानें प्राण सोडून नंतर आपलें द्रव्य टाकतो, आणि उदार हा प्रथमतः द्रव्य टाकून नंतर प्राण सोडतो !

कृपण मनुष्य सोनें आणि रुपें यांसच थोरपणा समजतात. पण तीं थोरपणा मिळविण्याचीं साधनें आहेत असें समजत नाहींत.

कद्रु मनुष्य लोकांचा शत्रु असतो, आणि आपला आपणही शत्रु असतो.

कद्रु मनुष्यास कोणी मित्र नसतात आणि त्याचे स्वकीयही त्याचे तोडते काळीं व दुखण्यांत त्याचा त्याग करितात.

## उदार

हा माझा आणि हा परका असें मानणें हें हलक्या मनुष्याचें कृत्य आहे. परंतु उदार बुद्धीचे जे लोक आहेत ते पृथ्वीसारखे सर्वांत्र सारखी दृष्टि ठेवणारे आहेत !

जें आपण खाऊं पिऊं त्याशिवाय राहिलेलें द्रव्य कोणास ठेवावयाचें आहे ? असें म्हणून जो उदार आहे तो तें सद्धर्माकडे लावतो !

नीच असूनही जर तो उदारबुद्धीचा आहे तर त्याची सेवा करावी परंतु उत्तम कुळांतला असून जर त्याचे ठायीं उदारबुद्धि नाहीं तर काय उपयोगाचा ? तान्हेला मनुष्य पाण्यानें भरलेल्या समुद्रास टाकूनयःकश्चित् कुवा, आड, अथवा विहीर यांजकडे येतो ! कारण, तो एवढा मोठा तरी त्याजकडून घोटभर देखील पाणी मिळून तान्हेला तहान भागत नाहीं; परंतु यःकश्चित कुवा सर्वांची तहान भागवितो !

पशु पक्षी लढूं शकतील व पोपट व मैना मोठ्या पंडित होतील परंतु जवळ असलेलें द्रव्य उदारपणें जो दान करूं शकतो तोच शूर तोच पंडित !

दाता आणि याचक यांचा भेद त्यांच्या हातांनींच कळतोः दात्याचा हात वर असतो आणि याचकांचा खालीं असतो !

## चैनी (हलकट)

पुष्कळ लोक असे आहेत कीं, ते चैनीकरितां आणि खुषीकरिता बहुत पैसा विचार केल्याशिवाय खर्च करितात. पण तोच पैसा भाऊबंदांनीं अगर गरींब लोकांनीं मागितला तर त्यांस देण्यास त्यांना फार काळजी आणि विचार पडतो.

उथळ पाण्यास खळखळ फार असते. हें हलक्या लोकांचें उदाहरण आहे.

पृथ्वीवर बेवकूब लोक आहेत म्हणूनच बेवकूब लोकांचा सांभाळ होतो.

हलका मनुष्य कामावर चढला तर त्याचा मान आणि भय सर्व धरतात. परंतु पुन्हां तोच उतरला म्हणजे त्याजबद्दलचें भय आणि मान दोन्हीं जातात, आणि कोणी त्याची स्तुतिही करीत नाहीं.

जवळ असलेल्या द्रव्यापेक्षां चैनींत जास्त द्रव्य खर्चण्याची जी रीती त्यांचा थोड्या पैशामुळें जीव व्याकुळ होतो.

डौलानें अक्कल गुंग होऊं देऊं नये. कारण कीं, राजा गबर असला तरी तो मनुष्यच आहे.

चैनी मनुष्यास आपल्याजवळ बसविणें हें कपाळीं आठ्या बसणाराचें काम आहे.

साधे लोकांस आपल्यांत जे गुण नाहींत, ते आहेत असें दाखविण्यास मुळींच मेहनत पडत नाहीं. कारण, त्यांस त्याची इच्छाच नसते. पण डौली लोकांस नेहमीं तीच मेहनत असते !

## कर्ज

कर्ज काढतेवेळीं कांहीं वाटत नाहीं परंतु तें फेडतेवेळीं नाकीं नव येतात. या जगांत तोच सुखी कीं ज्याणें सावकाराचें आणि रागीट मनुष्याचें तोंड पाहिलें नाहीं!

विष हें विष नव्हे तर कर्ज हें विष आहे. कांतर--विष हें एकट्याने खाल्लें तर तो एकटाच मरेल; परंतु कर्ज एक करितो तें त्याच्या नातू पणतूंपर्यंत भोंवतें! ही स्थिति पडत्या काळांतही श्रीमंत म्हणवूनच डौलांत वागणाऱ्या जाहगीरदार वगैरेंची आहे!

पाप आणि कर्ज हीं करतेवेळीं मनुष्यास विशेष कांहीं वाटत नाहीं; परंतु त्यांचा परिणाम फार भयंकर असतो. त्यांत मोठे मोठेही साफ बुडतात!

आद्यापेक्षा जास्त खर्च करणारा, लग्नाकार्यांत व्यर्थ पैसा उडणारा आणि चैनबाज, ह्यांस कर्ज काढण्याचे प्रसंग येतात.

मोठमोठीं देशहिताचीं कार्यें, लढाया, फौजा, यंत्रज्ञान ह्याकरितां शिक्षित जनसमूहास कर्ज काढणें प्राप्त व योग्य आहे.

बुडीत खर्च करण्यास कर्ज काढणें हें शहाणपणाचें कृत्य नसून ते त्या ऋणकर्त्याची निंदाच करितात.

जारिणी आई आणि कर्जाचें टोपलें करून ठेवणारा बाप हीं मुलांना शत्रू होत.

## भाषण

दुसऱ्याजवळ भाषण करण्यांत मुख्य धोरण असें असावें कीं, स्तुती थोडी करावी. दुसऱ्याचें ऐकावें पुष्कळ आणि आपले अकलेवर भरवसा नाहीं असें दाखवावें.

भाषण करणें तें सहज केल्यासारखें दिसावें बुद्ध्या किंवा भयानें केले असें दिसूं नये.

आपल्या मनचें फार बोलणें आणि दुसऱ्याचें ऐकण्यास त्रासणें हें वाईट आहे.

शहाणे आणि चतुर भलतेंच बोलत नाहींत.

जो तोंड पाहून बोलत नाहीं, परंतु जसें त्यास वाटेल तसेंच बोलतो तो खरा.

ज्याचें भाषण संतोषकारक त्याचें अंतःकरणही चांगलें असतें.

थोडें बोलण्यानें बहुत तोटे होणार नाहींत.

बोलणें आणि लिहिणें तें असें असावें कीं, तेणेंकरून लोकहित होईल.

ज्याचें भाषण कडू आहे त्यास कोणी जवळ उभें राहूं देत नाहीं.

थोडें बोलणें महत्त्वाचें लक्षण आहे. आणि महत्त्व नसलें तरी महत्त्वाचा भाव तरी आणतें.

हातांनींही द्यावयाचें नाहीं आणि स्वतःच्या घरांतूनही देणें नाहीं. तरी परोपकारार्थ एखाद्या-बद्दल शिफारस करण्याचा कां आळस करावा.

प्रिय भाषणानें सर्वांसच संतोष वाटतो. मग तसें बोलण्याविषयीं दरिद्र कां असावें? कोकीळ काय कोणास देतो आणि गाढव काय कोणाचें नुकसान करतो? पण त्यांचे सुस्वर आणि कर्कश शब्द हें अनुक्रमें कारण आहेत!

मनुष्यास, मोठमोठ्या अलंकारांनीं अथवा बहुमोल कपड्यांनीं अथवा अंगास अनेक प्रकारचीं तेलें उटणें लाविल्यानें अथवा केंस सदोदित विंचरून तेल लावून साफ ठेविल्यानें व मोठे वाढवि-ल्यानें शोभा येत नाहीं; व हीं सर्व भूषणें मरंवशाचींही नाहीत, परंतु सदोदित टिकणारें व अत्युत्तम असें भूषण एक मधुर व नम्रतेचें भाषण हेंच होय.

तेंच भाषण योग्य होय कीं, ज्या योगानें स्वकीयांचीं, परकीयांचीं, विद्वानांचीं, अविद्वानांचीं, शत्रूंचीं आणि मित्रांचीं अंतःकरणें हा व्यापार सोडून आपल्याच भाषणश्रवणाकडे लागतात.

श्रोत्यांना स्तब्ध करितो, बोलगाऱ्यास गप बसवितो, एखादें करुणापर बोलत असतां श्रोत्यांचे डोळ्यांतून टिपेंच काढितो, सर्वांची दृष्टि आपलेकडे आकर्षून घेतो आणि भाषण चाललें असतां विद्वान श्रोते माना डोलवीत आहेत अशी ज्याची भाषण शैली आहे तोच खरा वक्ता होय!

तोच वक्ता म्हणावा कीं, ज्याच्या भाषणानें श्रोत्यांचीं अंतःकरणें आनंदभरित होत आहेत, भाषणांत वेळोवेळीं अंतःकरणाचे विकार बदलण्यास अनेक रस आणितो आहे, व त्या भाषणाचे योगानें भूक, झोंप, श्रम, इतर कार्ये आणि दुःख ह्यांचा भाषणाचे वेळांत अगदीं विसर पडावा!

मनुष्यास गुणावरून द्रव्य मिळत नाहीं, पण बहुधा भाषणावरून मिळतें. तसेंच द्रव्य गमावणें हेंहीं बहुधा दुर्गुणानें होत नाहीं पण भाषणानेंच होतें.

पंडितांचे भाषणाची शोभा चांगल्या श्रोत्यांवर आहे.

## मौन

बोलका हलवी राज आणि मुका करी काज हा मौनाचा प्रकार आहे.

मौन हाच गुण फार चांगला व लाभप्रद आहे.

बोलक्या स्वभावामुळें पोपट आणि मैना ह्या आपणास कैदेंत (पिंजऱ्यांत) पाडून घेतात परंतु बगळे व कावळे बोलत नसल्यामुळें चैनीनें व स्वतंत्रतेनें फिरतात!

आपल्या अविद्वत्तेचें उत्तम आच्छादन परमेश्वरानें मौन हेंच उत्पन्न केलें आहे. महापंडितांच्या सभेंत अविद्वान् जरी जाऊन बसला तरी मौन धरल्यानें तो पंडितांतच गणला जातो!

मूर्ख लोकांच्या समाजांत विद्वानांनी मौनच धारण करावें : वर्षाकाळीं जेथें बेडकाचें डरावणें चाललें आहे तेथें कोकिलाच्या सुस्वराचें काय महत्त्व?

## चोर

धर्म केल्यावांचून जो आहे तो चोर जन्मास आला, तोच चोर कर्म वर्त्ततो. आणि चोरच मरेल.

सर्व दुर्गुणांत चोरी, छिनाली आणि चाहाडी हे तीन दुर्गुण निंद्य होत.

जो वाईट हाताचा म्हणजे चोर आहे तो या जगांत कोणाचाही विश्वासपात्र होत नाहीं.

## दुष्ट मनुष्य

सर्पास दूध पाजिलें तरी विषच होतें. त्याच प्रमाणें दुष्टानें जर शास्त्र पाहिलें तरी तो आपला स्वभावगुण सोडीत नाहीं.

भयानें दुसऱ्याचे आर्जव करितात आणि आवले हितास्तव मग स्नेह दाखवितात ते नीच आहेत.

सापाच्या एका दांतांत विष असते आणि मधमाशीच्या व विंचवाच्या कांट्यांत मात्र विष असतें. परंतु दुष्ट मनुष्याच्या सर्व देहांत ओतप्रोत विष भरलें असतें!

दुष्टाची संपदा दुष्टच हरण करितात.

## पाप

पातकी यास रोग, दुःख, काळजी, व दरिद्र हीं फळें होतात.

डोंगरावरून पाण्याच्या धारा पडतात तसे हे दिवस जातात; पुन्हा परत येण्याची वार्त्ता नाहीं; ! करितां पापा पासून दूर असावें

पुत्रप्राप्तीसारखा लाभ नाहीं, सुशील बायकोसारखें सुख नाहीं, धर्मासारखा मित्र नाहीं आणि खोटें बोलण्यासारखें पाप नाहीं!

पातक्यास आपला जीव आपल्यासच नीट आवडत नाहीं.

महापातक आणि महापुण्य झालें तर त्याचें फळ लवकरच प्राप्त होतें.

जे पापी आहेत त्यांचें चित्त त्यांस खातें.

## चांगलें

शेजारी चांगले असले तर आपलें न्यून परिपूर्ण होतें पण पूर्णाचें न्यून होत नाहीं.

गरिबास थोडें दिलें तरी चांगलें पण आपण त्याचा बावगा खर्च केला तर नीट नाहीं.

असत्य बोलण्यापेक्षां मुका बरा, परस्त्री हरण करण्यापेक्षां नपुंसक बरा, पराची निंदा करण्यापेक्षां मृत बरा, कपटानें द्रव्य मिळविण्यापेक्षां दरिद्री बरा आणि मूर्खाची संगत असण्यापेक्षां एकटें राहणें बरें.

गरजेमुळें वाईट कर्म करण्यास परवानगी देतात पण तें कर्म चांगलें असें कोणी म्हणत नाहीं.

आपली अयोग्यता जाणून मला हा अधिकार नको असा कोणी म्हणणारा आहे काय ? नाही; याजवरून असें दिसतें कीं, प्रत्येक मनुष्यास मी चांगला व मिळेल तितक्या अधिकारास मी योग्यच आहें असें त्यास वाटतें; किंवा, ज्यास आपला दुर्गुण माहीत असेल तोही असें म्हणेल, तर, इच्छेनें आणि लोभानें त्यास खोटे कामास लाविलें असें म्हणावें.

## कर्मे

मनुष्याच्या हातून जीं कर्में जन्मादारभ्य होतात तीं तीन प्रकारांपासून होतात : एक ईश्वरेच्छा, दुसरें संयोगफल आणि तिसरें विच्छा. कारण कीं, ज्या सर्व गोष्टी ईश्वरेच्छेनें घडतात असें म्हणतात त्या मिथ्या आहेत. कारण जर सर्व गोष्टी ईश्वरसत्तेनें घडतील तर मग मनुष्यास पाप पुण्य नाहीं, व स्वर्ग व नरक हीं नाहींत असें होतें. ज्या सर्व गोष्टी संयोगजन्य फलानें होतात असें म्हणतात त्याही मिथ्या आहेत कारण कीं, जर अशा रीतीनें सर्व गोष्टी होतील तर सर्व नास्तिकपणा होईल. आणि सर्व मनुष्याच्या इच्छेनें घडतें असें म्हणतात तेंही मिथ्या समजावें. कारण कीं, आपण इच्छितों तसें सर्व घडत नाहीं. एखादे वेळेस एखादी गोष्ट इच्छेप्रमाणें घडून येतें तसेंही कधीं कधीं होतें. याजवरून ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे कीं, सर्व लोक एक तंत्रावर नाहींत, पण तिन्हीं कारणांनीं युक्त आहेत. जसें, शरीर हें ईश्वरेच्छेनें उत्पन्न झालें आहे व तें घड्याळासारखें फिरते बहुत दिवस वागविणें हें बाळगणाराचे जपणुकीवर आहे. जर तें घड्याळ एखादे दिवशीं हातांतून पडलें आणि फुटलें तर संयोगफल किंवा आकस्मिक अवस्था म्हणावी. ज्यानें घड्याळ केलें त्याची इच्छा अशी नाहीं कीं, तें हातांतून पडावें, व त्याचप्रमाणें बाळगणाराची ही अशी इच्छा नाहीं. परंतु तें आपल्या आपण पडून फुटलें. तद्वत् मनुष्याचीं कर्में त्रिविध आहेत.

आपले मागें आपलें धन व संपत्ति पृथ्वीवर राहावयाचीं, गाई गुरें गोठ्यांत राहणार, बायको घरांत राहावयाची, आप्त व इष्टमित्र स्मशानापर्यंत येतील आणि देह चितेंत राहून राख होऊन जाणार परंतु जीवाच्या बरोबर त्याचीं सदसत्कर्मेंच काय तीं जावयाचीं ?

मनुष्याची छाया जशी सर्वदा त्याचे बरोबर असते तसें सदसत्कर्म हें जीवाबरोबर असतें.

सुखदुःख देणारा दुसरा कोणी नाहीं व मी सर्व गोष्टी करतो असाही व्यर्थ अभिमान कोणीं धरू नये. तर ज्या काहीं गोष्टी घडतात त्या केवळ आपल्या चांगल्या वाईट कर्माप्रमाणें घडतात.

विपत्ति प्राप्त झाली असतां खेद करून काय उपयोग व संपत्ति प्राप्त झाली असतां आनंद मानूनही उपयोग नाहीं. सदसत्कर्मांनीं विपत्ति व आनंद प्राप्त होतो व तदनुरूप त्यांची गति असते.

वनांत असो, लोकांत असो, शत्रूंत असो, भरसमुद्रांत असो, जळल्या घरांत असो, पर्वताच्या भयंकर शिखरावर असो अथवा निजलेला असो, जागा असो, उभा असो किंवा बसलेला असो, सदसत्कर्माप्रमाणें मनुष्याचें रक्षण किंवा नाश होतो.

जसें, हजारों गाईंत वासरूं आपल्या आईस ओंळखून तिचे मागें जातें तद्वत् कोट्यावधि जनसमूहांतील प्रत्येक मनुष्याचे सदसत्कर्म त्याच्या पाठीशीं असतें.

## प्रारब्ध

ज्यास एखाद्या कामाचा आरंभ करण्याचा धीर नाहीं व आरंभिलेले काम शेवटास नेण्याचा दम नाहीं, अशा मनुष्याचें अखेरचें बोलणें असें येतें कीं, प्रारब्धीं असेल तें घडेल. परंतु उद्योगी मनुष्य जो असतो तो म्हणतो कीं, प्रारब्धास चालविलें पाहिजे. यास योग्य उदाहरण, चक्रां-खेरीज रथ चालूं शकत नाहीं.

कोठें कोठें प्रारब्धही बलिष्ट म्हणावें लागतें. शूर आणि पंडित यांस कदापि दुःखानुभव नसा-वयाचा; तरी पांडव येवढे शूर पण त्यांस वनवास भोगावा लागला.

प्रस्तुतचे गाइकवाड प्रारब्धवशानेंच हें राजपद पावले नाहींत असें कोण म्हणेल?

उद्योगाविणें प्रारब्ध पंगू होय.

जमिनीच्या ठिकाणीं एकदम बंगाल्यासारखा जलप्रलय झाला, अथवा मोठ्या अगींत सांपडून किंवा समुद्रांतील तुफानात सांपडून वांचला; अशा अद्भुत व आकस्मिक कारणांनी जो मनुष्याचा संहार किंवा रक्षण होतें त्यास लोक प्रारब्ध किंवा ईश्वरकृति म्हणतात.

बरोबरीचे विद्वान् आणि बरोबर सर्व विद्यांत निपुण पण एक मोठ्या अधिकारावर चढतो आणि एक हलक्याच कामावर राहतो. तेव्हां ही प्रारब्धाधीन गोष्ट आहे.

विद्येनें किंवा शूरत्वानें संपत्ति मिळते असें कोणीं समजूं नये. विद्या किंवा शूरत्व हें मनुष्याची योग्यता जास्त करील पण संपत्ति मिळणें हें प्रारब्धाधीन आहे!

संतति, संपत्ति, सुशील स्त्री आणि सदैव शांत व आनंदवृत्ति ही स्थिती प्रारब्धाशिवाय होणें नाहीं.

## दारिद्रय

गरिबीसारखा गुरु नाहीं.

गरीबी दुःखावह फार आहे याचें कारण तीमुळें आपण घाबरे फार होतों.

गरीब आणि श्रीमंत सारखेच, पण ज्याचें त्यास तसें वाटत नाहीं तितकाच फरक आहे. श्रीमंतास द्रव्याचें रक्षण करण्याची काळजी असतये परंतु गरीब या काळजीपासून दूर आहे.

गरीबास भयानें वश करितां येतें पण बरोबरीच्यास प्रीतीचे भाषणानी मात्र वश करितां येतें.

गरीब मनुष्य एखाद्या सिद्धासारखा आहे. तो सर्व लोकांस पाहातो पण त्यास कोणी पाहात नाहीं!

श्रीमंत असून दान न करणारा व दरिद्री असून ईश्वरभजन न करणारा या दोघांचें तोंडही पाहूं नये!

दारिद्य हें गरीब मनुष्याचे जवळ राहतें, पण सर्व गरीब लोक निर्मूल झाल्यावर तें कोठें राहील?

गरीबी आणि मृत्यु यांपैकीं मृत्यु बरा. कारण, मृत्यूनें एकदां काय ते क्लेश होतील परंतु दारिद्या-पासून अनेक हाल होतात!

कन्येस जसा गुणी नवरा पाहून त्यास मुलगी द्यावी तशी ईश्वराने गरीबी ही मुलगी विद्वान् व गुणी मनुष्याच्या गळ्यांत बांधिली आहे.

विद्वान् व गुणी बहुत करून दरिद्री असतात!!

स्वस्थपणांत गरीबी बरी, पण काळजींत श्रीमंती वाईट.

## द्रव्य

द्रव्य हें लोभाचें कारण आहे. परंतु द्रव्यानें लोभाचें परिमार्जन होत नाहीं.

लक्ष्मीचा उपयोग नीचास होत नाहीं, आणि दुष्टास विद्येचा होत नाहीं.

श्रीमंतास धनामुळें लोक मान देतात; त्याची सर्व लोक मैत्री करितात त्यास विद्वान् म्हणून मान देतात, आणि पराक्रमी म्हणून मर्यादा ठेवितात. परंतु गरीबास स्नेही जरी असले व तो पराक्रमी व विद्वान् जरी असला तरी देखील तो निंदेस पात्र होतो!

जो श्रीमंती मानतो तो विपत्तीनें वांकेल.

द्रव्याचें तात्पर्य असेंच आहे कीं, तें अंतःकरणास मळीणता आणतें.

श्रीमंत आहेत म्हणून गरिबाचें चालतें खरें, परंतु जर श्रीमंत नसतील तर गरिबीही नाहींशी होईल.

द्रव्याची ऊब मोठी असते, यास्तव द्रव्यवान् बहुधा उन्मत्त आणि बेतमा असतात!

द्रव्य प्रसंगाकरितां सांठवावें. परंतु जीवाचे रक्षणास सर्व गेलें तरी चिंता नाहीं. कारण कीं, जीव आहे तर सर्व आहे, नाहीं तर कांहीं नाहीं.

एकदम मोठेपणा व श्रीमंती येणें यासारखें बुद्धिभ्रष्ट होण्यास दुसरें कारण नाहीं.

दान करावें आणि भोगावें तितकें द्रव्य आपलें; बाकीचें द्रव्य आपलें नाहीं.

श्रीमंतींत लोक विचारावांचून खर्च करितात; पण त्यांजवर प्रसंग पडला म्हणजे मग त्यांस कोणी मदत करीत नाहींत.

द्रव्यासारखा परिक्षक दुसरा कोणी नाहीं.

चांगली वर्त्तणूक आणि सद्गुण सहज द्रव्य आणितात.

श्रीमंत लोक बागा करतील, वाडे बांधतील आणि डोली खर्च घेतील; पण गरिबास सुख देणें, मनुष्यास संकटांतून काढणें आणि गरजवंतांची गरज दूर करणें हें काय आहे हें त्यांचे लक्ष्यांतच नसतें.

श्रीमंतांची अवस्था कठीण असते, कारण कीं, भयाच्या आणि दुःखाच्या आपत्ती त्यांजवर फार, सुखाचीं कारणें अशीं थोडींच.

लोकनिंदा, गर्व, क्रोध, अहंकार इत्यादि श्रीमंतांचे पाठीमागें असतात! मग श्रीमंत होण्याची आशा कशास करावी?

फार श्रीमंती आणि सुख असलें म्हणजे ते लोक गरिबास, वेड्यांस व कुरूपांस वगैरे हंसतात. कारण कीं, त्या लोकांचे मनांत आनंद फार असतो तो वारंवार बाहेर पडतो. परंतु, साधारण लोक कारणाखेरीज हंसत नाहींत.

जवळ संपत्ति असली आणि मग तो नीच कुळांतला, मूर्ख, दुर्मार्गी, अज्ञान, तोत्रा किंवा बोबडा, आणि कुरूप असा जरी असला तरी लोक त्यास उलटें समजतात; कीं, तो कुलीन, शहाणा, सन्मार्गी, गुणपरीक्षक, वक्ता आणि सुरूप आहे असें म्हणतात.

ज्याजवळ संपत्ति नाहीं त्याची विद्या, कविताशक्ति, सौजन्य, तारुण्य, रूप आणि कीर्ति हीं धिःकृत होऊन, सर्व दुर्गुणांचें आगर असा जरी संपत्तिमान् मनुष्य असला तरी त्यास लोकांत मान मिळतो व गुणवान् लोक त्याचे दाराशीं तृणवत् समजले जातात !!

अगदीं मनुष्यघात करणारा चांडाल असूनही श्रीमंत असला तर तो लोकांत पूज्य होतो; आणि एखाद्या कीर्तिमान् कुळांतला असूनहि जर तो निर्धन असेल तर त्यास कोणी मानीत नाहीं!

मनुष्य निर्धन झाल्यावर त्यास त्याचे मित्र टाकतात, पुत्र सोडतात, बायको सोडते आणि आसही सोडतात. परंतु सुदैवानें पुन्हा संपत्ति मिळाली म्हणजे सर्व धो धो जवळ येतात. यावरून ह्या पृथ्वीवर मनुष्यास इष्टमित्र, व सोयरेधायरे काय तें एक द्रव्य आहे. तें असलें म्हणजे इष्ट मित्र, सोयरे धायरे नसले तरी नवे उत्पन्न होतात!!

कोणीकडून येतें, कोणीकडे जातें, आणि त्याची खरोखर गति काय आहे हें घना (मेघां) विषयीं आणि धनाविषयीं ज्ञान कोणालाच होत नाहीं!

कनका (सुवर्णा)चें माहात्म्य काय सांगावें ? कीं, ते नांव मात्र धोतऱ्यास मिळालें आहे तर, तो खाल्ला असतां मनुष्यास उन्मत्त करतो द्रव्य मिळालें म्हणजे ही मनुष्य उन्मत्त होतें ही प्रसिद्धि आहेच !

प्रमाणशीर व मधुर असें जरी दरिद्र्यानें भाषण केलें तरी तें अप्रमाण व कर्कश असें समजतात. परंतु खोटें आणि कठोर असें जरी श्रीमंत बोलला तरी त्यास सर्व माना डोलवितात ! !

द्रव्य प्राप्तीकरितां हातांत तरवार घेऊन लढाईंत लढतो अथवा महान् समुद्रांतून प्रवास करतो. तेव्हां ह्यापेक्षां तीं श्रीमंत होण्यास मनुष्य काय काय साहसाचीं कामें करणार नाहीं ?

संपत्ति प्राप्त झाली म्हणजे त्या मदानें मनुष्य कोणाचें भाषण श्रवण करीत नाहीं, कोणाशीं बोलत नाहीं आणि दूरवर पाहात नाहीं; ह्याप्रमाणे शरीराचे सर्व व्यापार स्तब्ध होऊन हळूहळू शरीरही पोस्तीपणा सुटून त्याचें त्यास जड होतें ! तेव्हां अशी श्रीमंती नसली तर बरी !!

निर्जीव असलेल्या नगाऱ्यांतूनही धन् धन् असा शब्द निघतो तेव्हां सजीव असा मनुष्य सदोदित 'धन धन' (द्रव्य द्रव्य) करतो ह्यांत आश्चर्य तें काय ? धन हें सजीव व निर्जीव ह्या दोघांसही प्रियच आहे !

मनुष्यानें संपत्ति मिळाली म्हणून आपणास कृतकृत्य मानूं नये. कारण कोणे वेळेस ती आपल्याजवळून जाऊन दुसऱ्याची भर होईल ह्याचा नियम नाहीं रहाट गाडग्यांतील मडकीं जशीं, कांहीं भरून वर जातात व भरलेलीं तीं रिकामीं होऊन खालीं येतात तशी संपत्तिमानाची सर्वदा स्थिति असते ।

लोक द्रव्य मिळवितात तें बहुधा शाश्वत नाहीं. आणि त्यांत अपकीर्तीनें ते मिळविलें तर त्याच्या शाश्वतीचा भरंवसाच नको !

अनेक पक्वान्नें आहेत पण खाण्याची व तीं पचविण्याची शक्ती असणें, आणि संपत्ति असतां दानशक्ति असणें ही साधारण पुण्याईची गोष्ट नाहीं.

लोक लबाडींत पुष्कळ पैसा खर्च करितात, पण सत्कर्मांत थोडा खर्चितात.

द्रव्यवानासही मेहनतीवाचून सुख होत नाहीं; मग गरिबास मेहनत पडते म्हणून कां रडावें ?

अन्यायानें द्रव्य मिळविलें आणि निष्कारणीं खर्च केलें तर तें पश्चात्तापास कारण होतें.

स्वस्थपणा आणि एकांत हें द्रव्याचें सुख आहे. परंतु द्रव्यवान हे तीं सुखें भोगीत नाहींत आणि बळेंच मेहनत करितात, तेव्हां द्रव्याचें सार्थक कोणतें ?

ज्यांचें द्रव्यामुळेंच लग्न झालें आहे ते नीट वागत नाहींत !

लक्ष्मी दासीप्रमाणें राखली तर चांगली; पण धनिणीप्रमाणें वागविली तर वाईट आहे !

## काळ

काळाच्या तीन अवस्था आहेत : एक गेला (भूत) काळ, दुसरी चालता (वर्तमान) काळ, आणि तिसरी येणारा (भविष्य) काळ. त्या तिघांचे तीन गुण आहेत ते येणेंप्रमाणें : गेला तो खरा, चालता तो क्षणभंगुर, आणि येणार तो संशयात्मक.

जे दुष्ट आहेत त्यांस गतकाळाकडे लक्ष्य देऊन उपयोग नाही कारण कीं, त्यांची कर्मे वाईट असतात. जे नेहमीं कामांत आहेत ते पाहतच नाहीत. जे रिकामे आणि ज्यांचा वृद्धापकाळ सुखानेंच चालणार ते मात्र आपलें पूर्व वयाचा विचार करितात. परंतु त्याच्या आचारांत सुख व्हावें अशी इच्छा असेल तर नेहमीं नीट काम करा म्हणजे तो काळ गेल्यानंतर तरी चांगले कामाचा विचार करून सुख होईल. नाहींतर मरणकाळींही, आपले अपराध पुढे उभे राहतील आणि परिणामीं दुःख होतें. पुढें आयुमर्यादा आहे त्याला मात्र काळ खाईल, पण गेलेल्या काळास तो खाऊं शकत नाहीं !

हें माझें शेतभात, हे माझें वस्त्रप्रावर्ण, ही माझी बायको, हे माझे सोयरेधायरे असें अक्षयीं माझें माझें करणाऱ्या पुरुषरूप मेंढरास काळरूप लांडगा केव्हांच ओढून नेतो ह्याचा ठिकाण लागत नाहीं.

## आयुष्य

आयुष्य थोडें पण विद्या फार आहे.

मुळीं आयुष्य थोडें आणि त्यांत ही लोक थोडा वेळ जगतात.

तारुण्य सौंदर्य, आयुष्य, आणि लक्ष्मी हीं अशाश्वत आहेत.

वय हें स्थिर नाहीं आणि तारुण्य हें तर वयापेक्षां कमी स्थिर आहे.

आयुष्य क्षणभंगुर आहे. यास्तव वाईट कर्म करूं नये. कारण की आपले पश्चात् काहीं शिल्लक राहत नाहीं, पण चांगलें किंवा वाईट काम मात्र शिल्लक राहते.

फार झालें तर मनुष्य शंभर वर्षे वांचतें. परंतु त्याचा व्यय कमी होतो पाहा : ह्या शंभर वर्षांपैकीं ५० वर्षे निवळ झोंपेंत जातात ! राहिलेल्या पन्नास वर्षांत प्रारंभींचीं १२ वर्षे बाल्यावस्थेंत व शेवटचीं १३ वर्षे वृद्धावस्थेंत जाऊन बाकीचीं २५ वर्षे अनेक प्रकारचे रोग, दुःख उदरपोषणार्थ दुसऱ्याची चाकरी करणें आणि तारुण्यसंबंधी सौख्योपभोग भोगणें यांत जातात. परंतु अखेरीस आपणास उत्पन्न करणाऱ्या त्या सर्वशक्त परमात्म्याचे चिंतन व सेवा करणें हीं तर अगदींच राहतात ! !

लहान असतो तोंपर्यंत खेळण्यांत चित्त असतें, तरुण असतो तोंपर्यंत विषयांत सक्त असतो आणि पुढें वार्धक्य आलें म्हणजे चिंतेंत बुडून जातो. एतावता ईश्वराकडे लक्ष्य लावण्याचें राहून जातें. करितां मनुष्यानें फार सावध असावें !

महान् पुण्यानें ही शरीररूप नाव ईश्वराकडून आपणास मिळाली आहे. तर तिला आयुष्यसमाप्तिरूप भोंक पडलें नाहीं तोंपर्यंत हा दुःखमूल संसाररूप समुद्र तरून गेलें पाहिजे; व त्यास एक परमेश्वराच्या प्रार्थनेशिवाय सुरक्षता दुसरी कोणतीही नाहीं.

आयुष्याचा भरंवसा नाहीं आणि दुःखांतही दिवस गेला तरी यम तो वेळ आपले हिशेबास लिहिण्यास चुकणार नाहीं. मग इतकीं लोकांशीं बाकडीं, स्पर्धा, द्वेष व कज्जे लोक कशास करितात ? आज मात्र एक राजा, एक प्रजा, एक चाकर, एक धनी असा फरक दिसतो; पण मरणानंतर सर्व सारखें ! जें करावें तें व्यर्थ जातें. आनंद किती वेळ टिकेल आणि जय मिळाला तरी त्याचें फळ काय व किती दिवस भोगणार ? यास्तव सदाचरण करावें, दया धर्म करावा, कोणाची निंदा करूं नये, स्वस्थपणानें जगावें आणि स्वस्थपणानें मरावें हेंच बरें.

## मृत्यू

गरीब लोक मरणाची काळजी करीत नाहींत पण श्रीमंत लोक मरणास भितात.

काळासारखा शास्ता आणि गुरु कोणी नाहीं. जे जी गोष्ट शिकावयाचे नाहींत ती गोष्ट त्यांस काळ शिकवितो.

मृत्यु ही दीर्घ निद्राच आहे.

मरणानंतर सुकृति आणि दुष्कृति यांच्याप्रमाणें सुख आणि क्लेश प्राप्त होतात.

रोगी, दरिद्री, आणि परकीयांचे घरीं राहणारा यांस मरण पुरवतें !

लढाईंत मरण सोपें वाटतें पण घरीं तेंच अवघड वाटतें कारण कीं, घरांत अंधेराचे खोलींत सभोंवार बायका पोरें रडतात, वैद्य आणि भट जमतात आणि त्यामुळें तीं दुश्चिन्हें पाहून आपल्यास मरणाचें अधिक भय उत्पन्न होतें !

काळानें गांठलें नाहीं तोंपर्यंत वाघाचे दाढेंतही जगतो. परंतु काळ भरला तर काडीनेंही मरतो !

मनुष्यें मरणास भितात आणि जिवंतपणीं दुःख भोगितात; तसेंच जिवंतपणाची आशा धरून मरणकाळीं दुःख भोगितात, हें फार वाईट होय!

जे जगण्याची इच्छा ठेवितात त्यांस मरण कठीण जातें. आणि जे मरणास सन्मुख होतात ते वीरश्रीचे आनंदांत मरणास तुच्छ मानतात.

मरावयाचें तर खरें, मग चांगलें नांव करून कां मरूं नये?

अयोग्य वेळीं एखाद्या महत्कृत्यास आरंभ करणें, स्वकीयांशीं व जातभाईंशीं द्वेष, आणि अतिशय इच्छा हे मृत्यूचे दरवाजे आहेत!

दुष्ट बायको, मूर्ख मित्र, उलटून बोलणारा चाकर आणि ज्या घरांत साप विंचू वसति करितात तेथें राहणें, हे मृत्यू होत!

पिकलेल्या फळास जसें झाडावरून खालीं पडण्याशिवाय भय नाहीं तसें मनुष्यास मृत्युशिवाय दुसरें भय नाहीं!

## प्रश्न

दिवा गेल्यावर समयींत तेल घालून काय उपयोग? आणि चोर चोरी करून गेल्यावर 'सावध रे सावध' असें म्हणून काय होणार?

फार मागण्यानें त्रास कोणास येणार नाहीं?

मूर्ख लोकांच्या सहवासापेक्षां दुःख तें कोणतें? वेळेवर कोणतेंहीं कार्य न होणें यापेक्षां नुकसानी ती कोणती? धर्माचे ठिकाणीं प्रीति असण्यापरती दुसरी हुषारी ती कोणती? आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवणाऱ्याहून दुसरा शूर कोण आहे? पतीनें सांगितल्याप्रमाणेंच चालणारी तिजपेक्षां दुसरी सुशील स्त्री कोणती? विद्येशिवाय दुसरें धन तें कोणतें? उदर पोषणार्थ गांवोगांव हिंडणें नसण्यापेक्षां दुसरें सुख तें कोणतें? आणि सर्व लोक आपले आज्ञेंत वागण्यापेक्षां दुसरें राज्य तें कोणतें असावें?

एखाद्या बकाली शहरांत गेलें तर द्रव्यप्राप्ति कोठून होणार? वाईट पुत्राकडून वृद्ध पित्याची शुश्रूषा ती काय राहणार? आणि मूर्ख शिष्यास शिकवून यश कसें मिळणार?

## परीक्षा

मनुष्याचे वर्तणुकेंत अकलेची परीक्षा आहे; आणि भाषणांत त्याच्या खऱ्या स्वभावाची परीक्षा होते.

लढाईंत शूरत्वाची परीक्षा होते. कर्ज फेडण्यांत खरेपणाची, गरीबींत स्त्रियांचे पातिव्रत्याची आणि संकटकाळीं स्नेहाची परिक्षा होते!

## स्थिति

डोळे ही दृष्टि नव्हे पण ज्ञान ही दृष्टि आहे. कारण कीं, अज्ञानी जे आहेत त्यांची अवस्था अंधळयाप्रमाणें आहे.

मनुष्यास एकमेकांशीं बोलण्याची शक्ति आहे. म्हणून त्यास इतकी अकल व बुद्धि ज्यास्त आहे. इतकें जर नसतें तर त्यांची स्थिति जनावरांप्रमाणें असती!

जसा दिव्यावर पतंग उडी घालितो तशी विषयी मनुष्याची अवस्था आहे.

## चाली

मनुष्यास मी मोठा आहें असें वाटतें. पण लोक दुसऱ्याचे बुद्धीनें आणि प्राचीन चालीनें चालतात. याचें कारण असें आहे कीं, ते लौकिकास फार जपतात, सत्य कोणी पाहात नाहीं!

कोणी कसाही मनुष्य असो परंतु आपल्यास तो मोठा म्हणवितो.

इतबार आणि स्नेह हीं बरोबरीच्यांशींच खरीं असतात.

आपली चूक दुसऱ्यावर घालविण्याकरितां थोडें निमित्त असलें तरी चालतें.

पाठीमागून जावें तें बरें पण पुढें चालणें वाईट.

लोकांचें पाहून त्यासारखे वर्तणारे फार असतात.

लोक अंधपरंपरा चालीप्रमाणें चालतात परंतु विचार करीत नाहीत. विचार करणारे थोडे, आणि चालीस वाईट म्हणून सोडून ती देणारेही थोडेच. लोकांस वडिलांचा मार्ग सोडणें विलक्षण दिसतें म्हणून ते सदोदित भितात.

योग्य दिसेल तें करावें. पूर्वीच्या वाईट चाली सोडणें पहिल्याने कठीण वाटेल पण ह्या सुधारलेल्या चाली पडल्या म्हणजे त्याच अवघड वाटणार नाहींत.

चालीस अनुसरूनच मतें असतात.

आपल्या कामांत ज्याचा तो खबरदार असतो.

लोकांस फलाणा विद्वान् आहे असें सांगितलें तर ते ऐकतील परंतु फलाणा चांगला आहे असें सांगितलें तर नाकें मुरडतील. तसेंच त्यास विद्या किती येतात हें पुष्कळ जण पुसतात पण असें पुसत नाहींत कीं, त्याचें सदाचरण कसें आहे?

मनुष्य आपली खोड आपण बाहेर सांगत नाहीं. जो विद्वान् असतो तो म्हणतो कीं, मी विद्या शिकावयास श्रम केले नाहींत; जो जुनी आठवणीची गोष्ट सांगतो तो कीं, म्हणतो मला फारशी स्मरण शक्ति नाहीं; व जो जय पावतो तो म्हणतो कीं, मी जय पावेन असा मला भरंवसा नव्हता!

चालीप्रमाणें चालेल तर लोक वाईट म्हणत नाहींत. तरी त्याचें विचाराप्रमाणें चालणें हें चांगलें. जी स्त्री कसबीण झाली तिच्याशी संग केल्याची शिक्षा राजा, अपराध्याचे वर्गांतील मनुष्यास जशी करितो तशी करीत नाहीं. कारण, त्याचीही समजूत इतर माणसांप्रमाणेंच आहे कीं, मळलेले रस्त्यांत चालल्यास दोष नाहीं! परंतु त्या कर्माची शिक्षा ईश्वरापाशीं मिळेल. कारण, ईश्वराचा न्याय खरा आहे आणि मनुष्यासारखें त्या न्यायाधीशाचें मन मळीण नाहीं.

लोकांचें आपण ऐकतों असें दर्शविलें तर लोक आपलें ऐकतात. जे मर्यादेचे असतात ते मताभिमान धरीत नाहींत; म्हणून लोक त्यांचे मताप्रमाणें सहज आणि आनंदानें चालतात.

नवीन कांहीं गोष्ट निघाली म्हणजे तरणे लोक ती लागलीच पतकरतात; परंतु वृद्ध लोक जुनी मात्र पतकरतात.

ज्यांणीं ल्हानपणीं लग्नें करण्याची चाल पाडिली त्यांणीं अल्पायुषी प्रजा करण्याचें बीज रोपिलें!

सशक्तानें अशक्तांस आपले कबजांत ध्यावें ही चालच आहे. स्त्रिया अशक्त म्हणून त्यांजविरुद्ध पुरुषांनीं केलेले अनेक जुलमी नियम त्यांस पाळावे लागतात : पुरुषांनीं मसणांस लांकडें गेलीं इतक्या वृद्धावस्थेपर्यंत वाटेल तितकीं लग्नें करावीं; आणि पांच वर्षांच्या मुलीचा दुर्दैवानें नवरा मेला तर तिणें आपलें सर्व आयुष्य दुःसह वैधव्यांत आणि काळोखांत तोंड लपवून काढावें! तेव्हां ही चाल व तिचा लोकांवरील पगडा कांहीं अवर्णनीय आहे!!

सतीची चाल दयाळू सरकारानें आपल्या शक्तीचें सामार्थ्यानें बंद केली. तिजबद्दल आतां कोणास कांहीं वाटत नाहीं. तशीच विधवांचें केशवपन बंद होण्याची चाल पडेल तो सुदिन समजला जाईल!

प्रस्तुतची स्थिति सर्वत्र अशी दृष्टीस पडते कीं, शास्त्र एकीचकडे राहून चाली ह्याच शास्त्राहून प्रबल होऊन बसतात!

जें करणें तें बुद्धिपुरःसर करावें, परंतु राग, लोभ इत्यादि मनोविकार ठेवून करूं नये. जे लोक मनोविकारानें वर्त्तणूक करितात, त्यांचें भय कोणी धरीत नाहीं. कारण शासन करणें तेंही तो विकारांच्या रागानेंच करितो, स्वतांच्या शहाणपणानें करीत नाहीं. म्हणून लोक असे एखाद्या

जनावरास तें पिसाळलें म्हणजे भितात, तद्वत् त्या माणसाचे रागास भितात, पण त्याचे बुद्धीस भीत नाहींत.

## प्रीति वगैरे मनोविकार

मनानेंच पाप होतें, शरीरानें होत नाहीं. ज्या शरीरानें प्रिय पत्नीस आलिंगिलें त्याच शरीरानें कन्येस आलिंगिलें. परंतु त्या दोन्ही वेळीं मनोधर्म वेगळाले असतात!

भिक्षेचे तुकडे व तेही एक वेळ खाऊन राहावयाचें, जमीनरूप बिछान्यावर निजावयाचें, सोबतीला आपणच काय तो, आणि अंगावर घेण्यास हजारों थिगळांचें एक वस्त्र अशी स्थिति असली, तरी मन हें विषयाकडे ओढ घेतेंच! त्याकरितां सुज्ञांनीं त्यास आपले स्वाधीन ठेवावें.

ज्यानें आपले मनोविकार जे षड्रिपु ते जिंकिले, तो शहरांत असला तरी योगीच आहे!

कोणाची आणि कोठली मुलगी आणि कोणाचा आणि कोठील मुलगा, परंतु रीतीप्रमाणें त्यांचा विवाहसंस्कार होऊन तीं तीं मोठीं झालीं म्हणजे एकमेकांस जीव कीं प्राण होतात हा विलक्षण मनोधर्म आहे!

पुरुष स्त्रीवर प्रीति करूं लागला म्हणजे ती वश होते. परंतु स्त्री पुरुषावर प्रीति करूं लागली तर तो तिचा त्याग करितो!

प्रीति, मद, मत्सर, इत्यादि मनोविकार मृत्यूस भीत नाहींत तर ते मृत्यूस जिंकितात! तेव्हां त्यापेक्षां मृत्यु हा काय म्हणून भयंकर म्हणावा?

थोडी प्रीति असून वियोग झाला तर ती जाते. परंतु फार प्रीति असल्यास वियोगानें ती वाढते! जसा, वारा दिवा घालवितो पण मशाल भडकवितो!!

व्यभिचार होतो हा प्रीतीनें होतो. आणि प्रीति करणें आणि न करणें हें कोणाचे स्वाधीन नाहीं. तसेंच प्रकृति नीट राखणें आणि न राखणें हेंही आहे. यास्तव जे व्यभिचार करतात त्यांनीं तो कबूल करावा म्हणजे तो व्यभिचार जरी असला तरी त्यांत खरेपणा होईल. परंतु एकामुळे दोन अपराध-व्यभिचार आणि असत्य-हे होणार नाहींत!

प्रीतीनें कितीएक अपराधांवर पांघरूण पडतें.

सुरूपावरच प्रीति होते असें नाहीं. तर प्रीति ही रुचीपासून होते; आणि रुचीचा तर अंत नाहीं!

आपण सद्गुणी थोडे असतों पण फार आहों असें दाखवितों.

## मदन

पुष्कळ तिरंदाज असून ते एका वस्तूचे दोन भाग करतात. परंतु दोन वेगवेगळ्या वस्तूंची एकत्र जुळणा करणारा असा विलक्षण तिरंदाज मदन हा एकच आहे! दोन वस्तु—स्त्री आणि पुरुष!!

व्यभिचारी जे पुरुष आहेत ते कोणत्याच स्त्रीवर प्रीति करीत नाहींत. कारण कीं, त्यांचे चित्तांत काम आहे, परंतु प्रीति नाहीं. काम आणि प्रीति यांचें फार अंतर आहे!

मदनानें या सर्व जगास आपल्या विलक्षण सामर्थ्यानें आकळून धरलें आहे कीं, त्या पाशांतून सुटणें महत्प्रयसाचें झालें आहे!

षड्रिपूंतील आद्य रिपु मदन हा असून सर्वांपेक्षा तो दुर्जय आहे.

मदन असणें हे सृष्टिक्रमास साह्यभूत खरें, परंतु तो स्वाधीन असावा व त्यास स्वाधीन ठेवणें हें प्रत्येक मानवी प्राण्याचें कर्त्तव्य आहे.

जगावर विषयी लोकांची संख्या विशेष असते व विषयामुळें शेंकडों वीर आपल्या आयुष्यास मुकले आहेत!

आपल्या विषयेच्छा दाबणें हाच श्रेष्ठ पराक्रम अथवा हेंच अनुपम पौरुष होय!

## क्षुधा

क्षुधेसारखा मनुष्यास दुसरा त्रास कोणताही नाहीं!

क्षुधा शांत न झाल्याकारणानें काय काय गोष्टी घडतात त्या पाहा :— रूपाचा नाश होतो, शरीर कृश होतें, पुत्र स्त्रियांची माया राहात नाहीं, सर्व अभिमानाचा नाश होतो, प्रज्ञोत्पत्तीस धक्का बसतो, ईश्वराकडे चित्त लागत नाहीं, मनुष्य सर्व धर्मापासून भ्रष्ट होतें, अनेक रोग उत्पन्न होतात आणि अखेरीस प्राणही जातात!

उत्तम बिछाना आहे, बहुमोल वस्त्रें आहेत, सुवासिक तेलें फुलें आहेत, सतारी मृदंग वगैरे वाद्यें आहेत आणि सुंदर स्त्री आहे. इतक्या गोष्टी सर्व अनुकूल असून क्षुधा शांत करण्यास मूठभर तांदूळ जर नाहींत तर इतर सर्व सुखें व्यर्थ आहेत!

## स्मरण

सासवांनीं लहानपणचें व नणंदांनीं सासरचें पक्कें स्मरण ठेवून आपल्या सुनांशीं व भावजयांशीं वर्त्तणूक ठेवावी!

आपल्यावरून जग ओळखण्याचें स्मरण बहुतेकांस नसतें ही फार दुःखाची गोष्ट आहे.

मी लहान होतों हे कोणी ध्यानांत वागवीत नाहीं. म्हणून लहानास तुच्छ मानितात आणि पोरपणाच्या निंदा करतात. याचें कारण, त्यास असें वाटतें कीं, पोरपणाचें सुख आतां आम्हांस नाहीं, त्यापेक्षां दुसऱ्यास ते सुख भोगतांना पाहिलें म्हणजे त्यांस वाईट वाटतें!

फार दिवस ज्या गोष्टीस झाले त्याचें स्मरण राहात नाहीं; म्हणून फार दिवसांमागें ज्या मनुष्यानें चाकरी केली त्यास थोडें बक्षीस दिलें तरी तो तृप्त होतो. यास्तवच कपटी लोक कामाचे वेळीं काम करणारास कांहीं देत नाहींत. कारण कीं, तेव्हां स्मरण ताजें असतें म्हणून मागाहून उशीरानें देतात, म्हणजे थोड्यांत तोंड पडते व व्याज वांचतें!

श्रीमंतींत गरीबीचें स्मरण ठेवावें व त्याचप्रमाणें गरीबींत श्रीमंतीचें स्मरण ठेवावें.

ईश्वरानें प्राणिमात्रास स्मरणशक्ति दिली आहे. आतां त्यांत कोणास कमी वा कोणास जास्त असा भेद दिसतो ही गोष्ट वेगळी. परंतु ही ईश्वराची केवढी देणगी आहे! मुक्या जनावरांसही ईश्वरानें ही विलक्षण स्मृतिशक्ति दिली आहे!

ग्रीस देशांत अशी एका ज्वराची साथ आली होती म्हणून प्रसिद्धि आहे कीं, तो ज्वर एकदां मनुष्यास आला म्हणजे त्यांतून तो बरा झाल्यास आजाराच्या पूर्वीं काय काय केलें ह्याचें त्यास स्मरणच राहूं नये! जणू ता नव्यानेंच जन्मून ह्या पृथ्वीवर आला आहे अशी स्थिती व्हावी!

विलक्षण स्मृतिशक्तीचे दाखले भोज कालिदासाचे वेळच्या इतिहासांवरून कळतात व ते पाहून आपणास फारच आश्चर्य वाटतें!

मनुष्याचें स्मरण, दुसऱ्यानें आपल्यावर उपकार केला हें ध्यानात ठेविण्यापेक्षां त्याणें केलेल्या अनुपकाराबद्दल मनांत चांगली गांठ मारून ठेवतें! ही हलक्या बुद्धीची गोष्ट आहे.

## मत व रुचि

वेगळीं वेगळीं मतें हीं जसे वेगळे वेगळे चेहरे असतात तशीं आहेत. आणि संभाषणांत तें मीठ आहे. यास्तव दुसऱ्याचा अभिप्राय वेगळा असला तर राग कशास पाहिजे?

जे हातांत आहे तें मिळणारच आहे त्याकरितां धीर टाकूं नये.

वस्त्राभरणांवरून ही लोक भुलतात!

मागला काळ चांगला होता असें सर्वकाळचे लोक म्हणत आले आहेत.

पुढें येणारे सुखाचा संतोष फार असतो परंतु जवळ आहे त्याचा संतोष थोडा असतो.

दुसऱ्यास आपले रस्त्यावर आणणें तर, त्यास दुसरी वाट नाहीं असें दाखविलें पाहिजे.

गर्व दुसऱ्याचे इष्टोत्पत्तीस आला तर तो चांगला गुण होईल.

थोराचें बोलणें वेडेपणाचें जरी असलें तरी तें चांगलेंच आहे असें लोक मानितात!

सर्व जिन्नस किमतीप्रमाणें विकतात पण मनुष्याची विक्री विलक्षण आणि खोटी होते. ज्याचा वाडा मोठा तो थोर म्हणविती. परंतु मग त्याचे गुण कसेही असोत!

डौलानें आणि झकफकीनें मनुष्य दबकतें!

आपलें वाईट केलें तर कडू लागतें व दुसऱ्याचें वाईट केलें तर गोड लागतें; याजवरून लोकांचीं मतें व रुचि किती तऱ्हेवाईक आहेत?

बहुत लोकांस आपले स्वबुद्धीचा आधार नसतो. परंतु त्यांस असें वाटतें कीं, आमचे बाप असें करीत होते, आमचे आजे असें करीत होते, इतर लोकही असेंच करितात, त्याजवरून आपणही त्याचप्रमाणें करावें. याप्रमाणें बहुतेकांच्या समजुती आहेत.

मीमांसकाचें असें मत आहे कीं, हें जग सर्व खोटें व केवळ मिथ्याभास आहे. आणि दुसरा शास्त्रवाद असा आहे कीं, हें जग खरें आहे व स्वर्ग व नरक हीं येथेच आहेत. परंतु दोहोंचें सार असें दिसतें कीं, पश्चात् लोकही खरा आहे आणि मृत्यु लोकही खरा आहे. हे दोन्हीही मिथ्या नाहींत. कारण कीं, या मृत्युलोकीं, परलोक दिसत नाहीं, आणि परलोकीं जे गेले त्यांस मृत्युलोक दिसत नाहीं. तस्मात् दोन्ही खोटे म्हणतां येत नाहींत. ते आपापले ठिकाणीं खरे आहेत, हेंच म्हणणे बरें दिसतें.

## वचन

खरे थोर जे असतात ते आपल्या वचनांत कधीं अंतर करत नाहींत. वचन म्हणजे अमुक गोष्ट विश्वासानें, करावयाचीच असें सांगणे.

या जगांत विश्वास हा काय तो सर्व गोष्टींत अत्युपयोगी आहे. आणि तो विश्वास, दिलेलें वचन किंवा बोललेलें भाषण पुरें करण्याने होतो. आणि म्हणून वचन किंवा विश्वास देतेवेळीं पूर्ण विचार करावा.

ज्याचें वचनप्रामाण्य नाहीं त्याजवर कोणी विश्वसत नाहीं आणि त्याजसारखी अप्रतिष्ठा दुसरी नाहीं.

वचन देण्यापूर्वीं पुरा विचार करावा. असें झालें नाहीं तर आपल्या हातून अन्याय घडतील.

जो लवकर वचन देतो तो त्याप्रमाणें पुरें करीत नाही.

वचनाप्रमाणें तें कृत्य हातून झाले नाहीं तर जिव्हा तोडून टाकणारे एकवचनी आज ह्या पृथ्वीवर कोणी नाहींत!

हरिश्चंद्रासारखा एकवचनी, तारामतीसारखी पतीव्रता, कर्णासारखा दाता, राम राजासारखा एक पत्नीव्रती आणि अर्जुनासारखा योद्धा हे अप्रतिम व इतिहासप्रसिद्ध आहेत.

जान (जीव) गेला तर जावो पण बचन (वचन) राहो! अशा अर्थाची म्हण रजपूत म्हणत असतात.

एकवचनी व एकपत्नी असा पुरुष, जनांनीं फार प्राचीन कालापासून श्रेष्ठ मानिला आहे.

## हेतु—मसलत

मसलत सिद्धीस जाण्यास हें जरूर आहे कीं, ती गुह्य ठेविली पाहिजे. प्रसिद्ध झाल्यावर अवघड आहे.

मसलत चांगली असल्यास तींत थोडे श्रमानें मोठें काम होतें.

भाषण, मुखश्री व नेत्र यांजवरून मनांतील भाव समजतो.

कोणताही हेतू किंवा मसलत अशीं असावीं कीं, आपल्या जीवाचे, कुटुंबाचे आणि एकंदर देशाचे रक्षण होऊन हित होईल.

राजद्रोहाच्या मसलती सर्वथैव वाईट व अहितकर आहेत. म्हणून सर्वांनी त्यांपासून सर्वप्रकारे अलिप्त असणें फार चांगले आहे.

## आशा–लोभ

दुसऱ्याचा मोठेपणा पाहून आपल्या इच्छा वाढतात. यास्तव सर्वांवर सारखा जुलूम ज्या राज्यांत होतो तेथे बंड नसते; पण ज्या राज्यांत कितीएकांवर जुलूम होतो आणि कितीएकांवर होत नाहीं तेथें दंगे फार होतात.

या जगांत सुख आणि दुःख मिश्र आहे. यास्तव आशा ही फार चांगली आहे. पुढे काय होणार ते जर आज कळेल तर चांगले नसून मनुष्यास आळशी करून ठेवणारे होईल.

इच्छा करण्याचे अगोदर विचार करावा. तो असा कीं, इच्छित पदार्थ मिळाल्यानें सुख होईल किंवा दुःख होईल?

द्रव्य आणि अधिकार मूर्खाचे स्वाधीन झाला म्हणजे पूर्वीपेक्षां त्यास जास्त आशा उत्पन्न होतात.

जर इच्छेनेंच प्राप्त होईल तर सुख नाहीं. कारण कीं, मनुष्यास मुख्य हेच सुख आहे कीं, आशा असावी.

नीतीचें उल्लंघन करून आपली इच्छा तृप्त करूं नये. कारण, नीति जर एकदा उल्लंघन केली तर तीच खोड लागेल.

इच्छा तृप्त झाल्यामुळें मोठे अनर्थ होतात; जसें, हर्षवायु इत्यादि!

वास्तविक सुख थोड्या इच्छा करणें हेंच आहे. आपण सदोदित तृप्त असावें म्हणजे आपलें सुख वाढतें व त्याचप्रमाणें दुःखही कमी होतें.

गरीब व अल्पसंतोषी लोक कांहीं पदार्थांची इच्छा करितात. पण लोभी जे असतात ते सर्वच असावें असें इच्छितात.

आशा हें पाप आहे. आशेनें शहाणेही भ्रांतींत आणि लोभांत पडतात, आणि अखेरीस नाश पावतात.

ज्यास अशी इच्छा असेल कीं, आपली स्त्री पतिव्रता असावी, तर त्यानें अगोदर स्त्रीव्रत धारण करावें आणि मग इच्छा करावी. आपण खरेपणानें वागल्याशिवाय दुसरा खरेपणानें वागत नाहीं; व आपण खरे असलों तर लबाडही आपले जवळ खरे होतात!

मरणप्रसंगीं आणि विपत्तिप्रसंगीं जे सदाचरणी व निरीच्छ असतात. ते मात्र परलोकसुखाची प्राप्ति करितात.

जीवाची आणि धनाची आशा सर्वांहून मोठी आहे.

आपले पेक्षां वरिष्ठ असतील त्यांसारखे आपण दिसण्याची इच्छा धरूं नये. ह्याबद्दल ईसापनीतींतील बेडकीची गोष्ट ध्यानांत ठेवावी.

अप्राप्त वस्तूची इच्छा प्राप्त असलेल्या वस्तूची गोडी कमी करिते.

चिरकाळ सुखाची आशा करावी; क्षणभंगुर सुख दुःखद होय!

इच्छेप्रमाणे कोणास प्राप्त होत नाहीं. राजासही किती न्यूनता असतात? तर इच्छेप्रमाणें प्राप्त झालें नाहीं म्हणून त्याबद्दल दुःख करूं नये.

महदिच्छा कधींही तृप्त होत नाहीं; ती जों जों होत जाते तों तों वाढत जाते. ह्यास जवळचें उदाहरण प्रस्तुतच्या रोजगारी लोकांचें स्पष्ट आहे.

आशेचे जे दास झाले ते सर्व लोकांचे गुलाम होत असें समजावें आणि आशा ज्यांची दासी झाली त्यांचें सर्व जग गुलाम आहे!

गाल सुरकुतून गेले, केंश पिकले, आणि हात पाय थरथर कापूं लागले तरी अशा म्हाताऱ्यास आशा ही तरुणासारखी अनेक खटपट करण्यास लाविते !

अंग लटपट कांपतें आहे, डोकें पांढरें फटक झालें आणि दात पडून तोंडाचें बोळकें झालें तरी अशा वृद्धास आशा ही हातीं कांठी देवून दारोदार हिंडविते !

तोच पंडित व तोच बहुश्रुत कीं, जो आशा मागें सारून निरीच्छ वृत्ति धारण करितो !

आशारूप बिडी ही विलक्षण आहे; कीं, जी पायांत असतां मनुष्य सर्व पृथ्वीवर भ्रमण करीत फिरतो आणि पायांत नसतां पांगळ्यासारखा एका ठिकाणीं बसून राहतो ! म्हणजे, आशाळभूत मनुष्य, हें मिळीव ते मिळीव असें करीत फिरत असतों; परंतु निरीच्छ हा हें सर्व व्यापार सोडून सुखानें एक ठिकाणीं असतो.

मनुष्य हा धन, जीव, स्त्री आणि भोजन यांविषयीं अक्षय आशाबद्ध असतो !

तेच धन्य व पुण्यवान् आणि तेच ह्या संसाररूप क्लेशसमुद्रांतून पार पाडतात, कीं जे, सर्व जगास दंश करून त्या विषलहरींत गुंग करणाऱ्या आशारूप सर्पिणीस जिंकितात !

भूक, तहान आणि आशा ह्या तीन बायका मनुष्यास आहेत. त्यांपैकीं पहिल्या दोघींस म्हातारपण येतें, परंतु शेवटची सदोदित आपल्या तारुण्यांतच असून अशी पतिव्रता आहे कीं, ती आपल्या मनुष्यास कधीं सोडीतच नाहीं !

मनुष्यानें एक आशा जर सोडून दिली तर त्यांत आणि साक्षात् देवांत काय अंतर आहे ? परंतु त्या आशेचा जर स्वीकार केला तर लोकांची गुलामगिरी डोक्यावर बसलीच !

तारुण्याचा म्हातारपण नाश करतें, आरोग्याचा रोग नाश करतात, आणि प्राणाचा मृत्यु हा नाश करतो; परंतु ह्या आशेचा कोणी नाश करीत नाहीं, ती आपली अगदीं निरुपद्रवी आहे !

लोभी लोकांचें कर्ज कधीं घेऊं नये कारण कीं ते, कर्ज दिलें असेल त्याचे चौपट घेणार, त्याच-प्रमाणें थोडें देणार आणि फार रागें भरणार व आज देणार आणि उद्यां घेणार !

## याचक–भिक्षुक

गवताहून कापूस हलका आहे, आणि कापसाहूनही भिक्षुक हलका आहे. मग कापूस जसा वाऱ्यानें उडून जातो तसा भिक्षुक कां उडून जात नाहीं ? तर, वाऱ्यानें त्यास उडवून नेलें असतें, परंतु वाऱ्यास असें वाटतें कीं, नको ही आपल्या जवळ पीडा, तो आपल्याजवळही कांहीं मागेल !

कांपत कांपत बोलायाचें, तोंडावर कळा नाहीं, दीन भाषण आणिस द्गदित स्वर काढावयाचा हीं जीं मरणाचीं चिन्हें तींच दाराशीं भीक मागणाऱ्या याचकांचे ठायीं दृष्टीस पडतात !

जोंपर्यंत लोकांजवळ तोंड पसरून 'मला द्या हो' असें म्हटलें नाही तों पर्यंतच मनुष्याचा गुण-वान्‌पणा, बुद्धिमत्ता, साधुत्व, शौर्य, कीर्तिमानता, निष्कलंकपणा, सन्मान, कृतज्ञभाव, कवित्व, दक्षिण्य, धर्मविषयक आधिक्य, सुशीलता आणि लोकांतील प्रतिष्ठा हीं कायम राहतात !

कावळ्यांस कांहीं पदार्थ आढळल्यास ते आपल्या इतर कावळ्यांना काव् काव् करून हांका मारतात व सर्व मिळून खातात. परंतु भीक मागणारा हा दुसरे भिक्षेकऱ्यांस कांहीं कळवित नाहीं. यावरून कावळे हे वरिष्ठ येतात !

लोकांजवळ याचना करणारास यातना प्राप्त होतात !

जोंपर्यंत लोकांजवळ तोंड वेंगाडून 'द्या' असें म्हटले नाही तोपर्यंतच मोठ्याचें महत्त्व असते. देवाने बलि राजाजवळ याचना केल्यामुळे त्यास वामनत्व (लघुत्व) आलें ! (वामनावतारावर हे म्हणणें आहे.)

एखादा भिकारी बैरागी जरी असला तरी भिक्षुक हे त्याच्याजवळ दक्षिणा मागतात ! जसे, अज्ञ लोक कोरड्या ठणठणीत नदीच्या वाळवंटांतही पाणी मिळेल म्हणून खांचा खणतात !

'मला द्या' हे वाक्य श्रवण केल्याबरोबर प्रत्येक मनुष्यामध्यें शोभा, लज्जा, बुद्धि, धृति (धैर्य) आणि कीर्त्ति ह्या पांच देवता (गुण) असतात त्या तत्काल त्यापासून निघून जातात! म्हणजे लोकांजवळ याचना केली कीं, सदरील गुण नाहींसे होतात!!

तोंडांतून याञ्चावाचक शब्द निघाला म्हणजे त्याबरोबर प्राणही निघून गेल्या सारखे होत! परंतु, दुसऱ्याने यांचने प्रमाणें 'देतो', म्हणणें म्हणजे हा भिकारी जसा पुन्हां जिवंत झाला असा होतो!!

तिखट धारेच्या तरवारीनें जिव्हा तोडून टाकणें बरें, पण परक्याजवळ 'मला द्या', 'मला द्या', हे म्हणून आपला अपमान करून घेणे नको!

भिक्षुकाच्या पुढें आशा असते आणि मागें लज्जा असते; अशा आशा आणि लज्जा यांमध्यें तो लोंबकळत असतो!

भिक्षुकवृत्तीसारखी नीच स्थिति कोणतीही नाहीं!

## संतोष

कोणी लंगोटी पटकुरें यांनीं व कोणी पुष्कळ संपत्ति मिळाल्याने संतोष पावतात. यांत लंगोटी पटकुऱ्यानें संतोष मानणाऱ्यास सर्वदा सुख आहे, परंतु संपत्तिमानाची संपत्ति जाण्याची भीती असून ती गेली म्हणजे तो दरिद्री होतो व त्यामुळें तो अक्षय असंतोषी असून दुःखी असतो!

संतोषासारखे या जगांत दुसरें सुख नाहीं.

संतोषरूप अमृतानें तृप्त अशा शांत मनाच्या मनुष्यांस जें अलौकिक सुख आहे तें, 'हें मला पाहिजे', 'ते मला पाहिजे' असे करून हारवलेल्या मनुष्यास कदापि मिळणार नाहीं!

ज्याणे आपणास उत्पन्न करून गर्भांतही आपले पोषण केले तो परमात्मा, आपण पृथ्वीवर आल्यावरही आपल्या जीवनाची काळजी करीत नाहीं असे नाहीं. मात्र उद्योगी, सदाचारी आणि संतोषी असावे.

दुःखे प्राप्त व्हावीं म्हणून जशी आपण इच्छा केली नाहीं व देवाची प्रार्थनाही केली नाहीं तरी तीं आपणावर येतात, तशींच इच्छा न करितां व प्रार्थनाही न करितां आपाप सुखेही येतील असे म्हणून संतोष वृत्तीचा मनुष्य आपलें समाधान करून घेतो.

मनुष्यास आरोग्य, विद्वत्ता, सज्जनांचा सहवास, श्रेष्ठ कुलांत जन्म आणि आपली इंद्रियें स्वाधीन ठेवणें यापेक्षां ते दुसरें ऐश्वर्य काय पाहिजे?

सर्प वायु भक्षण करून राहतो म्हणून तो दुर्बल नाहीं, शुष्क व वाळलेलें गवत खाऊन रानांतले हत्ती बलवान् होतात आणि योगाभ्यास व तपश्चर्या करणारे केवळ फल मूल खाऊन काल काढतात. सारांश, पुरुषाला संतोष हाच एक श्रेष्ठत्व देणारा आहे!

याचक हा लोकांजवळ दैना गातो, ज्याजवळ पैका आहे तो गर्विष्ठ होतो, आणि ज्याजवळ संपत्ति असून ती नाश पावते तो शोक करितो. परंतु जो निःस्पृह व संतोषी असतो त्यास हीं दुःखें कधीं स्पर्श करीत नाहींत!

मनुष्याला संतोषवृत्ति आणि कोणाजवळ हात न पसरणें हेंच महत्व, खरें सुख, कीर्त्ति, उत्साह आणि दैवशालीपणा होय!

## सृष्टिनियम

लोक जें घर बांधितात तें पडू लागतें. पण जें पेरितात तें उगवू लागतें. ह्याप्रमाणें वरचें खालीं आणि भुईंतील वरतीं येतें हा सृष्टीचा क्रमच आहे.

ईश्वरानें ही सृष्टि न्यायाने केली आहे यास उदाहरण. त्यानें, वाघास नखें आणि बळ दिलें आहे, परंतु त्यास अक्कल दिली नाहीं. मनुष्यास त्याने अक्कल दिली आहे परंतु त्यास निर्बल केलें आहे. मनुष्यासारखा निर्बल प्राणी जनावरांत कोणी नाहीं. मनुष्यास बालपणापासून किती जपावे

लागतें तें पहा—त्यास वस्त्र प्रावर्ण पाहिजे, औषधें पाहिजेत, घर बांधिलें पाहिजे वगैरे गोष्टींची खटपट लागते. परंतु जनावरांत तशी गोष्ट नाहीं व त्यांस ह्या वरील गोष्टींची मुळींच जरूर पडत नाहीं.

### स्वभाव

कावळे सुंदर फल पुष्पांवर प्रीति करावयाचे नाहींत, पोपट मैना हे मासे वगैरे प्राण्यांस अथवा इतर घाण पदार्थ खाणार नाहींत, मूर्ख हा विद्वानांबरोबर जाण्यास खुषी नसतो, चाकर एखाद्या मोठ्या यजमानाच्या गादीवर बसविला तर शोभणार नाहीं अथवा त्यास तें आवडणार नाहीं आणि दुष्ट व कुमार्गवर्त्ती मनुष्यांस सुस्वभावी व सुमार्गवर्त्ती मनुष्यांचा सहवास आवडावयाचा नाहीं. यावरून ज्याचा जो स्वभाव असेल त्या स्वभावाच्या मनुष्याशींच त्याचा स्नेह होतो हा नियम आहे.

अधिकाराचे भूषण सुजनपणा व क्षमा, शौर्याचे थोडें भाषण, ज्ञानाचें शांति, कुलाचे नम्रता, संपत्तीचें योग्य पात्रीं दान, तपाचें अक्रोध, धर्माचें दंभ न करणें आणि सर्वांचे सर्व भूषण असा एक सुस्वभाव होय.

ईश्वरास भितील त्यांस दुसऱ्या कोणास भ्यावयास नको.

प्रकृति चांगली राहण्यास पांच कारणें पाहिजेत: सुदृढ बीज, ब्रह्मचर्य, निःकाळजी, चांगलें अन्न आणि व्यायाम.

सदुद्योगाची संवय असल्यास दुर्गुण लागत नाहींत.

निद्रा ही प्रकृतीच्या स्वस्थतेस फार आवश्य आहे म्हणून ती टाळूं नये.

सर्वांस सर्व विषय समजत नाहींत. यास्तव ज्यास ते समजत असतील त्याजकडून समजून घ्यावे.

अज्ञान व अभिमान एकत्र झाले म्हणजे फार भयंकर परिणाम होतात. हे आलीकडे आमचे वैदिक ब्राह्मणांचे ठायीं फार दृष्टीस पडतात !

स्त्रियांस व पुरुषांस पुनर्विवाह करण्याची मोकळीक असावी हा न्याय दिसतो. एकानें वृद्धापकाळपर्यंत लग्नें करावीं व दुसऱ्यानें एकदां विजोड झाला कीं करूंनये हा पक्षपात दिसतो. परंतु पुरुषाचें अडले नाहीं तों पर्यंत त्यास हा विचार करण्याची जरूर नाहीं, कोणी न्यायी व दयाळु असतील ते मात्र करतील.

जाती ह्या गुणकर्मांवरून होतात, आईबापांवरून होत नाहींत, असा शास्त्रसिद्धांत दिसतो; त्याचप्रमाणें राजाचाही निर्णय दिसतो.

विद्येचा गौरव, शाळापद्धति व भूगोलादिकांचें सत्य ज्ञान हीं इंग्रज सरकारानें हिंदुस्थानांत आणिलीं. पूर्वी याविषयीं लोक अगदीं अज्ञान होते. तेव्हां हा ज्याचा त्याचा अंगस्वभाव होय.

हिंदुस्थानांत प्राचीन काळ चांगला व सांप्रत काळ वाईट हें स्पष्ट दिसतें. ह्याचे कारण अलीकडील स्वदेशीय राजे झाले ते अति दुष्ट झाले त्यांनीं काल वाईट केला. म्हणजे विद्येची अभिवृद्धि करण्याचें सोडून भलत्याच छंदास ते लागले.

जगांत कृतघ्न व मूर्ख पुष्कळ असतात, परंतु त्यांस भिऊन थोर आपलीं कर्में टाकीत नाहींत.

लोकांस स्वदेशाभिमान व दया असावी.

आपल्या चाली रीती जे सोडतात त्यांचा गौरव न होतां उलटी फजिती होते.

दुष्कर्माची अति व्याप्ति झाली म्हणजे त्यास कोणी हंसत नाहीं !

### संसार

संसार हा महान् दुःखाचा समुद्र आहे. तरी मनुष्य मायाजालांत सांपडून त्यांतच आनंद मानतो हा ईश्वरलीलेचा चमत्कारच होय !

संसार हा जरी दुःखाचें घर आहे तरी ह्यांत सत्संगति, ईश्वर भजन, पवित्र ठिकाणीं वास आणि नदीचें शुद्धोदक पान हीं सुखें फार अप्रतिम आहेत!

कोठें मोठ मोठ्या सभा भरून अनेक विषयांवर वादोपवाद चालले आहेत, कोठें दारूच्या पिठ्यांवरून व राजमार्गांवरून दारूबाज लोकांचे उन्मत्तपणानें अपसांत कलह चालले आहेत, कोठें सतारी झडताहेत आणि कोठें अनेक प्रकारच्या रोगांनीं आणि म्हातारपणानें जर्जर होऊन दुःख भोगीत पडले आहे! तेव्हां हा संसार उत्तम आहे किंवा वाईट आहे हें कांहींच समजत नाहीं!

मातोश्रीच्या गर्भांत आकुंचित व अनेक प्रकारच्या घाणेरड्या स्थलीं नऊ महिने राहून तिचे हाल व उदरविदारण करून या संसारांत यावयाचें! परंतु या सर्व यातना आपण सोसून व दुसऱ्यासही देऊन या संसारांत मनुष्य कांहीं तरी सुख भोगतो काय!

अशा दुःखमूल भवसागरांतून तरण्यास एवढाच उपाय आहे कीं वडिलांची आज्ञा पाळून आपणास निर्माणकर्त्या त्या सर्वेश प्रभूचे चिंतन करावें.

कोणत्याही प्राण्याच्या प्राणघातापासून दूर राहणें, दुसऱ्याचे द्रव्य हरण करण्याची कदापि इच्छा न करणें, सत्य भाषण, अनुकूल असल्यास योग्यकालीं व योग्य याचकास दान करणें, परस्त्रियांच्या गोष्टी सांगण्यास व ऐकण्यास मुकें व बहिरें असणें, अंतःकरणांत फार आशा वाटूं न देणें, श्रेष्ठ लोकांशीं नम्रतेनें राहणें आणि सर्व प्राणिमात्रावर दया करणें हेच सर्व शास्त्रांनीं आनंदानें संसार-सुख भोगण्यास उत्तम मार्ग दाखवून ठेविले आहेत!

घर आनंदानें भरलेलें, बुद्धिवान् मुलगे, मधुर बोलणारी व आपले मन न दुखविणारी बायको, चांगले मित्र, द्रव्याची अनुकूलता, आपल्याच बायकोवर प्रीति, हुकूम मानणारा विश्वासू चाकर, गरिबांस धर्म, ईश्वराचे ठायीं भक्ति आणि साधूंची संगति इतक्या गोष्टी ज्यास अनुकूल आहेत तोच गृहस्थ या संसारांत सुखी व धन्य होय!

न्यायानें द्रव्य संपादन करणारा, ज्ञानी, शास्त्र जाणणारा आणि सत्यवादी तोच गृहस्थ या संसारांतून तरेल!

संसारांत प्राणी आला म्हणजे जसें, समुद्रांत जहाज सुटतें आणि तुफान वारा वाहूं लागतो, मग तें कोणते बंदरास लागेल किंवा खडकावर हापटून फुटेल याचा नेम नाहीं, तसें आहे. याज-करितां हा भवबंध निर्माण करणारा जो ईश्वर त्याचे सहायानेंच सुस्थळीं पोहोंचेल. ज्यानें बिड्या घातल्या तोच काढूं शकेल म्हणून त्यांची प्रसन्नता मिळविली पाहिजे!

पृथ्वी निष्कंटक कोणी करूं शकत नाहीं. पण आपण पायांत जोडा घातला म्हणजे ती आपल्यास निष्कंटक झाली!

## स्त्री

प्रिय भाषण करणें हाच स्त्रीचा मोठा पराक्रम आहे.

स्त्रियांस मर्यादा असणें हेंच योग्य आहे.

जी प्रीतीनें आणि मधुर भाषणानें भ्रताराजवळ बोलते ती स्त्री योग्य आणि पुत्रास शिक्षा लावितो तो बाप योग्य.

जे स्त्री पुरुष वयानें, योग्यतेनें, आणि इतर सर्व गोष्टींनीं सारखे असतात ते लग्नानंतर नीट नांदतात.

जो स्त्रीची मर्जी संभाळितो त्याची स्त्री चांगली असते.

लज्जा आणि मर्यादा मुख्यत्वेंकरून स्त्रियांच्या ठायींच फार शोभतात.

स्त्रियांचे मृदुभाषणानें मनुष्य नम्र होतो परंतु दैत्य असला तर मात्र होत नाहीं!

स्त्रियांस ईश्वरानें मधुर कंठ दिला आहे हा भांडण्याकरितां दिला आहे असें नाहीं. आणि गर्विष्ठ होण्याकरितां निर्बल केलें असें नाहीं. म्हणून त्यांनीं गर्व आणि भांडण करूं नये.

जो स्त्री माहेरीं कैदेंत नसते, आणि सासऱ्याच्याही धाकांत नसते, ती दुर्गुणी होते.

बायकोनें लहानपणीं आईचे शिक्षेंत, मोठेपणीं नवऱ्याचे अंकित, आणि म्हातारपणीं मुलाचे अंकित राहून चालावें.

सुरूप, सुशील, व्यवहारचतुर, प्रेम करणारी, मधुर बोलणारी आणि कुलीन अशी पत्नी ज्यास मिळेल तो भाग्यवान होय!

नवरा बाहेरून घरीं आला असतां त्यास उभें राहून मान द्यावयाचा, त्याच्याशीं नम्रपणें भाषण करणें, त्याची सर्व प्रकारची तरतूद ठेवणें, त्याजबद्दल अंतःकरणांत पूज्यबुद्धि ठेवणें, तो निजल्यावर आपण निजणें, व तो उठण्यापूर्वीं आपण उठणें इत्यादि गोष्टी स्त्रियांत आवश्य असाव्यात.

पतीवर प्रीति करणें, चाकर माणसांवर दया असणें, सासू सासऱ्यांशी नम्र, जावांवर लोभ ठेवणें, वडिलांचा मान राखणें, कोणी अपराध केला असतां त्याचे अंगावर वसाखसा न जाणें, सदोदित आनंदवृत्तीनें असणें हीं चांगल्या स्त्रीचीं लक्षणें होत.

जो पतीशीं आनंदानें व प्रेमानें भाषण करते तीच स्त्री, जो आपल्या बापांस आपल्या सुकृतीनें आनंदवितो तोच पुत्र, आपल्याशीं विश्वासानें वागतो तोच मित्र आणि जेथें फार कष्ट न पडतां उदरनिर्वाह होतो तोच देश!

नवऱ्याचे आज्ञेशिवाय घराबाहेर पाऊल ठेवणें म्हणजे सापाच्या डोक्यावर पाय देतें असें जीस वाटतें, जीस आपलें घर सोडून दुसऱ्याचे घरीं जाणें म्हणजे एखाद्या दुसऱ्या देशांत गेलें असें वाटतें जिचें हंसणें खिदळणें एखाद्या धनलोभ्याच्या द्रव्यासारखें दुसऱ्या कोणाच्या दृष्टीस पडत नाहीं आणि आपल्या पतीशिवाय दुसऱ्या पुरुषास पाहणेंही जीस महत्संकट वाटतें, त्या स्त्रिया कुलीन जाणाव्या.

एखाद्या कृत्यांत योग्य सल्ला देणारी अशी हुषार, संसाराचें काम चाकरासारखी दक्षतेनें करणारी, अनेक प्रकारचीं पक्वान्नें करून नवऱ्यास सुग्रास भोजन घालण्यास समर्थ, आपल्या प्रेमभरित भाषणाने नवऱ्याचें व्यग्र अंतःकरण सानंद करणारी, धार्मिक आणि क्षमाशील अशी षड्गुणवती स्त्री दुर्लभ होय!

सदोदित स्वच्छ, गोड व थोडें बोलणारी, नवऱ्याचे आज्ञेंत वागणारी व त्याच्या शुश्रूषेंत दक्ष अशी स्त्री कोणास आनंद करणार नाहीं?

ज्याची बायको कुरूप, गदळ आणि भांडखोर आहे त्याच्या सारखा दुःखी कोणी नाहीं!

पंक्तींत एकाला एक व दुसऱ्याला दुसरें असें वाढणारी, नवऱ्याशीं कपट करून त्यास एक करून एक सांगणारी, घरांतील पदार्थ चोरून विकणारी आणि मुलांवर कमी प्रीति करून मुलींवरच विशेष लोभ करणारी अशी स्त्री दुःशीला होय!

संपत्तिमान्, सुरूप आणि तरुण असा नवरा आहे, आणि घरांत मुलें बाळें खेळताहेत अशी चांगली स्थिति असूनही जी स्त्री कांहींना कांहीं कुरकुर करीत असते ती सर्वांस निंद्य होते!

मैना, कोकिळा यांचा सुस्वर हेंच त्यांचें रूप; कुरूप मनुष्यास विद्या हेंच रूप; तपस्वी लोकांस क्षमा हें रूप आणि स्त्रियांस त्यांचें पातिव्रत्य हेंच रूप होय!

घरांत मुलगे आहेत, सुना आहेत, नातवंडे आहेत, चाकर माणसें आहेत; आणि त्यांत जर बायको नाहीं तर तें एवढें नांदतें घर शून्य होय!

पंडित हे अनेक प्रकारच्या विद्यांनीं शोभतात, राजे पराक्रमानें शोभतात, श्रीमान् योग्य दानानें शोभतात आणि कुलवान् स्त्रिया लज्जेनें शोभतात!

पुरुषांनीं सर्वदा स्त्रियांचा सन्मान ठेवावा.

एका पुरुषानें दोन स्त्रिया करणें हें मोठें पाप व अधमपणा आहे.

स्त्रीनें पतिव्रताधर्मानें असावें, तसेंच पुरुषानें एकपत्नीव्रतानें असावें.

धर्म, अर्थ व प्रीति यांत अंतर देणार नाहीं अशी लग्नांत देव ब्राह्मणांचे साक्षीनें नवरा प्रतिज्ञा करतो ती त्याणें अव्याहत पाळावी. कारण कीं, शपथ खोटी केल्याचा दोष येईल.

स्त्रीचें स्त्रीधन असेल तें कोणीं हरण करूं नये.

कन्या देऊन त्याबद्दल द्रव्य घेणें यासारखें बापास नीचत्व नाहीं.

स्त्रीधन दिल्यावांचून लग्न करणें यासारखें नवऱ्यास नीचत्व नाहीं.

अगदीं लहानपणीं पुरुषाचें किंवा स्त्रीचें लग्न करूं नये. पुरुषाची मर्यादा वीस वर्षांनंतर शास्त्राप्रमाणें आहे; त्याचे आंत लग्न करणें पाप व अहित आहे. स्त्रियांस मित्रभावानें वागवावें, दासीभावानें वागवूं नये.

स्त्रीस घरधनीन म्हणतात; म्हणजे घरचा कारभार तिजकडे असतो. तीस गृहिणी व स्वामिनी असेंही नांव आहे.

## पुत्र

अंगणांतून, ओटीवरून आणि सर्व घरभर रांगतो आहे, आणि कोंवळे कोंवळे आणि बोबडे बोल बोलून मातापितरांस आनंदवितो आहे अशी पुत्रप्राप्तीची स्थिति पुण्यवान् स्त्रीपुरुषांवांचून कोणास प्राप्त होणार आहे ?

एकच मुलगा असावा पण तो गुणवान् व नीतिमान् असावा. गुणांचा व नीतीचा ज्यांमध्यें अभाव असे कौरवांसारखे शेंकडों पुत्र असले तर काय कामाचे ? जसा आकाशांत कोट्यावधी तारे असूनही चंद्रावांचून प्रकाश पडत नाहीं तद्वत् सर्व कुलांत चांगल्या पुत्रावांचून शोभा नाहीं !

अरण्यांत एक वाळलेला वृक्ष असून त्यास अग्नि लागला म्हणजे तो आपले बरोबर सभोंवारच्या इतर वृक्षांसही जाळून टाकतो, तसा कुपुत्र हा आपला सर्व वंश दुष्कीर्तीनें जाळून टाकतो !

निपुत्रत्व, अथवा पुत्र होऊन मरणें, किंवा मूर्ख पुत्र होणें; ह्यांपैकीं पहिलीं दोन कलमें पुरवतील, पण तिसरे पतकरणार नाहीं. कारण, पहिल्या दोन स्थितींनीं तेवढा वेळ मात्र दुःख होईल परंतु मूर्ख पुत्रानें जन्मपर्यंत दुःख होईल !

ज्याचा मुलगा विद्वान् नाहीं, शूर नाहीं व नीतिमानही नाहीं त्याचें कुल, ज्या रात्रीं चंद्र नसून जिकडे तिकडे अंधार असतो, तसें अप्रकाशित असतें !

गर्भरूप शिंपींतून पुत्ररूप मोतीं प्राप्त होणें, व त्याचे योगानें सर्व वंश सुशोभित होणें ही आनंदकारक स्थिति सुदैवी यासच प्राप्त होते, मंदभाग्यास कोठून मिळणार ?

पुत्रप्राप्ति ही, स्त्रीपुरुषांच्या खऱ्या प्रेमानंदाचें संम्मेलन झाल्याचें दर्शकच आहे !

पुष्कळ संपत्ति असून त्यांत जर मुलगा नाहीं तर त्या स्त्रीपुरुषांचें व्यर्थ जन्म होय व लोक त्यांस पूज्य मानीत नाहींत. जसे प्रवासी लोक वाटेंत मोठाले वृक्ष पाहून त्यांना फळें नसलीं म्हणजे त्यांची निंदा करितात !

वाईट मुलगा जन्मास येऊन आपल्या आईच्या तारुण्यरूप वृक्षाचा नाश करणारा कुऱ्हाड मात्र निपजतो !

जी गाय दुधही देत नाहीं व फळतही नाहीं तिला पाळून काय उपयोग आहे ? तसाच जो विद्वानही नाहीं आणि नीतिमानही नाहीं असा पुत्र काय कामाचा ?

वृक्षाच्या ढोलींत अग्नि असला तर तो तेवढ्याच वृक्षाला जाळील; परंतु कुपुत्र आपल्या मागील पिढ्यांसही बट्टा लावील !

## भूषण

आकाशास सूर्य भूषण, भाषणास सत्य भूषण, घरास सुस्त्री भूषण, सभेस उत्तम व अप्रमाद भाषण हें भूषण, मनाचें भूषण सर्वांशीं स्नेह असणें, कुलाचें सत्पुत्र हें भूषण आणि सर्वांचें सर्वभूषण नम्रता ही आहे! त्याचप्रमाणें सर्व कलांचें भूषण गायन, कानांचें भूषण भगवत्कथाश्रवण, रात्रीचें भूषण चंद्र व देशाचें भूषण न्यायी राजा होय!

मदस्त्रावानें हत्ती शोभतो, कमलांनीं सरोवर शोभतें, घोडा चालीनें व वेगानें शोभतो, मंगलकार्यांनीं घर शोभतें, व्याकरणशुद्ध भाषणानें वाणी शोभते, आणि सभा पंडितांनीं शोभते!

## रीतभात

दुसऱ्यास रामराम किंवा नमस्कार करून विचारपूस करणें, परस्परांचे कुशलप्रश्न होणें आणि एकमेकांचें आदरातिथ्य करणें यांत फारसा अर्थ नाहीं तरी मनुष्यास हें करणें आवश्य आहे. कारण, यावरून त्याच्या कुलशीलाचें अनुमान होतें.

अनेक विषयांची माहिती असणें हें मनुष्यास अत्यावश्य असून, त्याशिवाय कोणत्याही संबंधांत बोलण्याविषयीं प्रौढता येणार नाहीं.

कोणास पदवीनें थोरपणा येतो, कोणास द्रव्यानें येतो, कोणास विद्येनें, कोणास अधिकारानें, कोणास वंशानें व कोणास सदाचरणानें येतो. या सर्व थोरपणांत सदाचारानें मिळालेल्या थोरपणांत ज्यास्त महत्त्व व शोभा आहे.

आईसारखें या भूतळावर कोणीही थोर नाहीं. म्हणून सदोदीत तिच्या आज्ञेत राहावें.

एका गृहस्थानें दुसऱ्यास प्रश्न केला कीं, ह्या पृथ्वीवर दुर्मिळ काय आहे?—त्यावर त्याणें उत्तर दिलें कीं, प्राण व आई. याशिवाय वाटेल तो पदार्थ व वाटेल तें नातें ह्या पृथ्वीवर मिळूं शकेल परंतु सदरील दोन चिजा मिळविणें अगदी अशक्य आहे! करितां, सत्कृत्यानें व सुनीतीने प्राणधारण व शक्तीप्रमाणें मातृसेवा आणि तिच्या आज्ञेचें अनुल्लंघन न करण्याविषयीं मनुष्यानें फार जपावें.

पृथ्वींतील दौलत, शूर विद्वान् व आर्जवी हे तीन प्रकारचे लोक हंमेष उचलितात!

मनुष्यानें मनुष्यास उच्च बुद्धीप्रत नेणें हाच मुख्य सुशिक्षेचा उद्देश आहे!

जे गृहस्थ लोकांचे हितकर्ते असतात त्यांचा लोक द्वेष करितात अशी उदाहरणें बहुत आढळतात!

धर्मद्वेष इतर द्वेषांपेक्षां फार कठीण असतो; करितां धर्माच्या उलाढालींत पडून वचवच करणें चांगलें नाहीं.

## म्हातारपण

म्हातारपणीं सर्व अवयव आंखडून जातात, चालतांना झोकांडे जातात, दांत पडतात, डोळ्यांनीं दिसेनासें होतें, कानांनीं ऐकूं येईनासें होतें, तोंडांतून लाळ गळते, मोठ्या कष्टानें तोंडांतून शब्द निघतो व ते बांधवजन ऐकत नाहींत, बायकोही शुश्रूषा करीत नाहीं आणि पुत्र ही शत्रूसारखे पाहूं लागतात! तेव्हां असें हें म्हातारपण दुःखकारक आहे तें मुळींच न आलें तर बरें!

पूर्ववयांत जें कांहीं करणें तें असें करावें कीं, तेणेंकरून म्हातारपण सुखांत जाईल.

आपल्या वृद्ध मातापितरांची योग्य सेवा करावी व हीच अवस्था आपणांसही येणार तेव्हां आपल्या पुत्रांनींही आपली योग्य रीतीने शुश्रूषा ठेवावी ही इच्छा बाळगून त्याप्रमाणें व्यवस्था राहील अशी पहिल्यापासून काळजी राखावी.

वाघासारखें म्हातारपण पुढें उभें राहून थरथर कांपवितें आहे, शत्रूसारखे रोग शरीरावर टोले मारीत आहेत, फुटलेल्या मडक्यांतील पाण्यासारखा आयुष्याचा एकसारखा पाझर चाललाच

आहे ! तरी लोक ईश्वराकडे लक्ष्य न देतां क्षणिक सुखास लुब्ध होऊन अनेक दुष्कर्मे करतात हें आश्चर्य नव्हे काय !

कोणत्याही कृत्यांत वृद्धांची मसलत श्रेयस्कर असते. कारण, ते जें कांहीं सांगतात ते त्यांच्या फारां दिवसांच्या अनुभवावरून दुसऱ्यास हितप्रद असेंच नेहमीं सांगतात.

दिवसेंदिवस वृद्धावस्था ही नव्या प्रजेच्या बहुतकरून दृष्टीस पडूं नये असा कांहीं ईश्वरी संकेतच झाला आहे काय न कळे !

वृद्धांस तरुणांनीं नेहमीं नम्र असावें, त्यांशीं औद्धत्य धरूं नये, ह्यांतच तरुणांस मोठेपणा आहे.

राज्य कारभारांत विद्वान्, विचारी आणि वृद्ध असेच मुत्सुद्दी असावे.

## राजा—राज्य

राजे मूर्ख असतात; कारण, त्यांचे सभोंवतीं खुषामती वगैरे लोकच फार असतात. त्याचप्रमाणें कोणाचेही जवळ खुषामती लोक असतील तर तोही राजाप्रमाणेंच मूर्ख होईल!

राजाचीं मुले घोडा चालवावयाची विद्या शिकतात पण उपयोगी पडण्यासारखीं विद्या शिकत नाहींत. घोड्यास राजा आणि प्रजा हीं सारखींच आहेत ! जसा इतर लोकांस तो पाडील तसा राजासही पाडील यांत संशय नाहीं !!

स्वतंत्र राज्याचा दरबार खोल असतो आणि त्याच्या मसलती कोणास कळत नाहींत. कारण कीं, त्यांत कपट फार असतें. परंतु लोकसत्तात्मक राज्यांत सर्व मसलती यथान्याय असतात म्हणून तें राज्यदरबार सर्व लोकांस उघड असतें.

क्रूर कायद्यानें लोक शहाणे होत नाहींत परंतु देश मात्र उजाड होतो !

सरकार नसावें हें योग्य नाहीं, परंतु सरकार असणेंच जरूर आहे. कारण कीं, लोक दुष्ट फार याजमुळें त्यांचा कोणी तरी शास्ता पाहिजे. स्वतांचे शहाणपणानेंच सर्व चालतात असें नाहीं. यास्तव कसें चालावे याचा मार्ग दाखविणारा कोणी तरी पाहिजे म्हणजे त्यांतच सुख आहे. कारण कीं, आपला रस्ता दुसऱ्यांनीं दाखवावा आणि आपण त्या रस्त्यानें चालावे हें बरें.

इच्छा थोडी आणि भय फार अशी राजाची अवस्था आहे. तरी राजा होण्याची इच्छा बहुत लोक करितात. वास्तविक पाहिलें असता राजास इच्छा करण्यास कांहीं कमी नसतें व याजमुळें तो क्षीण होतो आणि भय फार याजमुळें त्यास स्वस्थपणा नसतो !

राजाची स्तुति करितात ती खरी नाहीं; कारण कीं, त्या राज्याधिकाराची लोक स्तुति करितात, त्या राजपुरुषाची कोणी करीत नाहींत !

इतर लोकांस बाहेर फिरण्यास मोकळीक असते तशी राजास नाहीं. आणि त्याजपुढें जो जातो तो मारेकरी असेल असें त्यास भय वाटतें. इतर लोक खुशाल मोकळे फिरतात. परंतु राजाचा डौल आणि भय हेच त्यास बंदींत ठेवितात !

रूम शहरांत वृद्ध लोकांस न्यायाधीश नेमीत होते. ती चाल जेव्हा मोडली तेव्हां राज्य बुडावयास उशीर लागला नाहीं. कारण कीं, ज्यांस लहानपणींच सर्व अधिकार मिळाले त्यास उमेद राहिली नाहीं. पण त्यास इतकीच उमेद राहिली कीं, जें मिळालें तेंच सदोदित राहो; व म्हणून त्यांनीं तें सदोदित राहण्याकरितां अनर्थ केले !

राजाचा चांगलेपणा असणें यांत लोकांस भूषण आहे. आणि त्यास दुर्जनपणा असणें ही लोकांस लज्जा आहे !

शेतकी ही, चांगले राज्यांतच उत्तम प्रकारची उपजीविका आहे.

जसा सूर्य गरीब जंतु असला तरी त्यास सर्वांबरोबर सारखीच उष्णता देतो, तसा चांगला राजा आपले प्रजेतील मोठे, लहान, गरीब, मातब्बर या सर्वांचें सारखें संरक्षण करितो !

सर्वांहून राजे लोक फार लोभिष्ट असतात!

राजास जें वास्तविक सुख असतें तें रयतेसही असतें. परंतु राजास स्वस्थ झोंप नसते, आणि त्याची इच्छाही तृप्त नसते हें रयतेपेक्षां त्यास दुःख आहे!

राजानें आपल्यापासून, आपले शत्रूंपासून, आपले अधिकाऱ्यांपासून आणि आपले सेवकांपासून रयतेचें रक्षण करावें.

ज्या राज्यांत लोक दौलत मिळविण्याची हद्द ठरवून त्यावर राज्य वाढूं देत नाहींत तें राज्य चांगलें. कारण कीं, मिळवावयाचें तितकें मिळालें म्हणजे आणखी मिळविण्याची इच्छा राहत नाहीं; आणि तेणेंकरून स्वहिताची बुद्धि जाऊन लोकहितास मनुष्य लागतें.

लबाड प्रधान आणि सरदार राजाजवळ असले म्हणजे ते त्यास विनाकारण युद्धास नेतात आणि आपण पळतात.

जो प्रसन्न झाला तर संपत्तिमान् करून टाकतो, पराक्रमाचे ठायीं त्यास सदोदित जयच आहे आणि ज्यास राग आला तर केवळ यमच होय अशा तेजांनीं जो युक्त तोच खरा राजश्रीनें शोभतो!

कोणो पुरुष राजाचें वर्णन करितो कीं, हे राजा! तुझें दर्शन झाल्याबरोबर शत्रूचे हातांतील शस्त्र आणि विद्वानांचें दैन्य हीं तत्काळ गळून पडतात! म्हणजे इतका शूर व दानशील राजा असावा.

राजाची चाकरी म्हणजे जीवावरची पोळी आहे! किंवा शस्त्राची धार आहे! अथवा सिंहाला आलिंगन करणें आहे किंवा सापाच्या तोंडाचें चुंबन करणें आहे!!

प्रस्तुतचे राजे आणि सर्प यांची स्थिति सारखी आहे: राजे भोगी (विलासी) असतात, सर्प भोगी (भोगवान् असतात); राजे कंचुकासक्त (कवचानें आच्छादित) असतात, सर्पही कंचुकासक्त (अंगावर कातीनें आच्छादित) असतात; तसेच ते क्रूर, वांकड्या रस्त्यानें जाणारे, दुष्ट आणि मंत्रसाध्य (राजे मसलतींवर अवलंबून; आणि सर्प–भोळ्या लोकांचे मतें मात्र–जादू मंत्राचे स्वाधीन!) असे असतात!

अविचारी राजा असला म्हणजे त्याच्या चतुर प्रधानांचें चातुर्य व्यर्थ जातें!

राजा धार्मिक व संन्यायी असल्यास त्याची प्रजा धार्मिक व न्यायवर्त्ती होते; व पापबुद्धीचा व अन्यायी असल्यास प्रजाही क्रूर, दुष्ट आणि पापाचरणी होते!

राजा शहाणा आणि भला असला तर बरें, नाहीं तर दरबार वाईट व कुत्सित होतो.

राजे, स्त्रिया आणि वल्ली हीं त्यांजवळ जो असेल त्याचे नादीं लागतात!

जुलमी राज्यांत मनुष्याची किंमत मनुष्यास ठाऊक नसते ह्यामुळें तो गुलामगिरीस प्रवृत्त व पात्र होतो!

राजानें आपली प्रजा पितृभावानें पाळली म्हणजे ती प्रजा कधींही त्यास प्रतिकूळ होत नाहीं.

## सेवक

दरिद्री, रोगी, मूर्ख, उदरनिर्वाहार्थ गांवोगांव प्रवास करीत हिंडणारा आणि परक्याची सेवा करून राहणारा हे पांच जीवंत असून मेलेले आहेत!

जेवावयाला बसला म्हणजे आधाशासारखा पुष्कळ खाणारा, निजला म्हणजे कुंभकर्णासारखा, एखाद्याचा निरोप ऐकणें किंवा सांगणें म्हणजे बहिरा किंवा मुका, एखादी वस्तु शोधून काढण्यास अंधळा आणि बाहेर कोठें कामास पाठविणें तर त्याविषयीं लंगडा, अशा खायाला काळ आणि भुईला भार असणाऱ्या सेवकास धिःकार असो!

सेवा करणें हें एकंदरींत वाईट तर खरेंच; परंतु ज्या सेवेपासून लोकांत कीर्त्ति वाढते ती सेवा, अथवा ज्या यजमानाची चाकरी करणें त्याजपासून सज्ञान आणि सद्वर्त्तनाचा कित्ता ह्यांची प्राप्ति होईल तर, अशी सेवा सुखाला कारण असून ती आनंदानें करावी!

धन्याच्या आज्ञेंत राहणें, त्याशीं नम्रतेनें भाषण करणें आणि सदोदित त्याची अपल्यावर प्रसन्नता होईल अशी वर्त्तणूक ठेवणें हे चाकराचे मुख्य गुण आहेत.

## स्वातंत्र्य

स्वातंत्र्य चांगले आणि पारतंत्र्य वाईट. स्वतंत्र जे असतात त्यांचा नाश होत नाहीं. परंतु परतंत्री जे असतात त्यांस मुळींच सुख होत नाहीं.

स्वतंत्रतेची मीठ भाकर आणि परतंत्रतेचें पंचपक्वान्नांचें जेवण बरोबर आहे !

उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ चाकरी ही म्हण स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य यांवरूनच पडली आहे.

स्वातंत्र्याचे खरे भोक्ते अमेरिकेंतील लोक आहेत. पण त्यांजपेक्षां इंग्रज लोक विशेष आहेत. कारण इंग्रज लोक गुलाम पाळण्याचें मना करितात तसें अमेरिकन लोक करीत नाहींत ! यावरून इंग्रज लोक आपपराविषयीं खरे स्वातंत्र्यप्रिय आहेत !

हिंदु लोकांच्या स्त्रियांचें प्रस्तुत परमावधीस पोहोंचलेलें पारतंत्र्य चांगलें नाहीं असें आलीकडे बहुतेक विद्वानांस वाटूं लागलें आहे.

## प्रवास

बहुत प्रवास केला आहे ते हुषार दिसतात; पण प्रवास हा विचाराशिवाय आणि ज्या गोष्टी पाहिल्या त्या गोष्टी ध्यानांत ठेविल्याशिवाय प्रवास करणारे ज्ञानी होणार नाहींत.

कितीएक लोक प्रवासानें इतर देशचे गुण आणीत नाहींत पण दुर्गुण मात्र आणितात !

प्रवासानें बुद्धीस चातुर्य व प्रशस्तता येते, ठिकठिकाणीं अनेक चमत्कार नजरेस पडतात, अनेक ठिकाणच्या अनेक लोकांचे स्नेह होतात, अनेक आचार आढळतात, सर्व प्रकारच्या साहसकर्मांस पुढें सरण्याचें धैर्य येतें, गुणी असल्यास द्रव्यप्राप्ती होते, अनेक भाषा कळतात आणि असेच इतर अनेक प्रकारचे लाभ होतात. परंतु त्यांत कमीपणा ऐवढाच कीं, त्या प्रत्येक ठिकाणीं आपली घरच्याप्रमाणें तरतूद राहणे मात्र कठीण आहे !

सतत प्रवास करणें हें फार दुःखास्पद आहे, त्याहूनही दुसऱ्याच्या घरीं राहणें दुःखास्पद आहे, दुसऱ्याच्या घरीं राहण्यापेक्षांही हलकट लोकांची चाकरी करून किंवा त्यांच्या आश्रयाला राहणें हें अधिक दुःखकारक आहे आणि सर्वांहून महादुःख दारिद्र्य हें आहे !

व्यापारादिकेंकरून व अनेक देश फिरून जो आपला संसार न करितां केवळ घरीं पायावर पाय टाकून पूर्वार्जित द्रव्यावरच अवलंबून राहतो त्यास लौकर दारिद्र्य व दुःख यांची भेट होईल !

ज्यास प्रवास ठाऊक नाहीं त्यास कांहीं बोध झाला नाहीं असें समजावें. ज्यास संस्कृत समजत नाहीं त्यास हिंदुलोकांचें फारसें ज्ञान झालें नाहीं असें समजावें.

प्रवाशी व्हावे तर कोलंबस, मंगोपार्क यांजसारखे व्हावे; नाहीं तर केवळ पोटबाबू लोक अनेक ढोंगे करून आमच्या इकडे हरिद्वारापासून तों रामेश्वरापर्यंत, व दुसरीकडे जगन्नाथापासून द्वारकेपर्यंत फिरणाऱ्या मूर्ख व परोपजीवी बैरागी वगैरेंसारखे कोट्यावधी प्रवाशी व भटकत फिरणारे काय कामाचे ?

## गोप्य

जे कोणी एखादी गोष्ट गुप्त ठेवितात त्याचीं तीन कारणें आहेत.—एक ती गोष्ट मोठी व लज्जेची असते म्हणून; दुसरें, ती गोष्ट जर बाहेर फुटली तर आपला नाश आहे असें वाटतें म्हणून; आणि तिसरें कृत्रिम किंवा आपण करतों त्याचा लाभ दुसऱ्यास होऊं नये म्हणून. संस्कृत भाषा मूळापासून गुह्य ठेविली आहे, याचं कारण या तिन्हींपैकीं कांहींच तरी एक असावें. चौथें आढळत नाहीं.

अपमान, कर्ज, पतिपत्निप्रेम आणि गृहछिद्र हीं सर्वदा गुप्तच ठेवावीं.

## गुण

पुरुषांला जर कांहीं गुण असतील तर ते आपाप लोकांत प्रसिद्ध होतात, त्याबद्दल मोठीशी खटपट मुळींच नको; कस्तूरीचा वास किंवा साखरेची गोडी लोकांस सांगण्याकरितां मोठाल्या शपथा करणें नको व दुसऱ्याही खटपटी नकोत !

गुणांनींच उंचपणा येतो, परंतु उंच असनावर बसल्यानें येत नाहीं; राजवाड्याच्या सज्जावर कावळा बसला म्हणून तो मोराच्या योग्यतेस येणार नाहीं !

असेंही कधीं कधीं आढळण्यांत येतें कीं, गुणवानच दुःखांत पडून क्लेश भोगतात! पोपट, मैना यांस मनुष्यासारखें बोलतां येतें म्हणून तीं पिंजऱ्यांत पडतात; परंतु कावळे, बगळे हे निर्गुणी पक्षी चैनीनें स्वतंत्रपणें फिरत असतात!

गुण समजणारा हा गुणवानांवर प्रीति करतो परंतु जो गुणपरीक्षक नाहीं त्यास गुणवंतापासून संतोष होत नाहीं. मधुर फुलांकडे त्यांचें माधुर्य जाणणाऱ्या मधमाशा अरण्यांतून धांवून येतात; परंतु बेडूक ज्या डबकांत किंवा विहिरींत असतो त्यांतून त्यास बाहेर कोठेंही जावेंसें वाटत नाहीं व त्यास तत्संबंधीं ज्ञानही नाहीं!

गुण हेच लोकांना मान्य होतात; त्याबद्दल त्या मनुष्याचें कुल किंवा त्याचे आईबाप यांजकडे कोणी पाहात नाहीं. दशरथराजाचा मुलगा रामचंद्र, परंतु दशरथास टाकून लोक रामचंद्रास भजूं लागले; त्याचप्रमाणें वसुदेवास टाकून वासुदेवास (कृष्णास) भजूं लागले!

पुष्कळ गुणवान् जरी असला आणि जर त्यास कोणाचा आश्रय नसला तर फार दुःखाची गोष्ट आहे. याकरितां कोणाचा तरी आश्रय पाहिजेच. अमूल्य असा हिरा जरी असला तरी त्यास सोन्याचा आश्रय असल्यावांचून तो व्यर्थ आहे व सोनें असलें म्हणजे तो हिरा अंगठींत बसवून लोकांस त्याचें तेज तरी समजेल!

गुणांनींच लोकांस मान मिळतो, नुस्त्या संपत्तीनें मिळत नाहीं; पूर्ण चंद्रापेक्षां द्वितीयेच्या चंद्रासच लोकांत ज्यास्त मान मिळतो!

मनुष्यास गुण असले म्हणजे ते गुणच त्याचें चाकराचें काम करितात; केवड्याचा सुवासच भुंग्यांस व सापांस त्याजजवळ नेतो!

गुणवानांचा सहवास असला म्हणजे सर्वत्र गौरव प्राप्त होतो. यःकश्चित् सूत जर फुलाच्या आश्रयास असेल तर पुष्पमाळेबरोबर तेंही मोठमोठ्या लोकांच्या डोक्यावर बसेल किंवा त्यांच्या गळ्यांत वास करील. त्याचप्रमाणें फुलांतील मुंगीही देवाच्या मस्तकावर बसेल!

रेशमी किड्यांपासून पीतांबर होतो, पाषाणा (कसोटीचा दगड) पासून सोन्याची परीक्षा होते. शेणमातीपासून मोगऱ्या गुलाबांचीं फुलें होतात आणि लांकडापासून अग्नि उत्पन्न होतो. तेव्हां कोणत्याही वस्तूंची त्यांच्या उत्पत्तिस्थानावरून किंमत नसून केवळ त्यांच्या गुणांवरूनच किंमत होते!

गुणांविषयीं यत्न करावा, व्यर्थ खटाटोप करण्यांत यश नाहीं. बाजारांत दुभती गाय लोक लौकर घेतील; परंतु बिनदुभत्या गायीच्या गळ्यांत घंटा बांधली तरी तीस कोणी गिऱ्हाईक मिळणार नाहीं!

हरिण, मेंढरें, डुकरें हीं मांसाकरितां, कस्तूरी मृग कस्तूरीकरितां, वनगायी गंगावनाकरितां, हत्ती हस्तिदंतांकरितां, आणि मनुष्य द्रव्याकरितां मारिले व छळिले जातात; तेव्हां त्यां त्यां जवळील ते ते गुणच त्यांच्या नाशास कारण होतात!

सदोदित सर्पांनीं वेष्टिलेले, सर्वांगांवर काटे आणि झाडावरून काढण्यासही फार कठीण अशी जरी केवड्यांची स्थिति आहे तरी त्यांजवळ सुगंध हा एक गुण असल्यामुळें इतर सर्व दुर्गुण त्यांत लोपून जातात!

गुण हेच पूज्य होत, तेथें स्त्रीपुरुषभेद अथवा लहान मोठेपणा मुळींच नाहीं!

जेथें संपत्ति आहे तेथें नम्रता नाहीं, जेथें नम्रता आहे तेथें संपत्ति नाहीं, आणि जेथें नम्रता व संपत्ति आहे तेथें विद्या नाहीं. ह्याप्रमाणें सर्व गुणांचें एका ठिकाणीं वास्तव्य दिसत नाहीं!

गुणवान् नसून दुसऱ्यांनीं जर त्याची स्तुति केली तर लोक त्यास गुणवान् समजतात. परंतु आपल्या तोंडानें आपले गुण वर्णन करणें ह्यास लोक हलकें समजतात!

सोन्याला कधीं सुवास येणें नाहीं, उंसाला कधीं फळ येणें नाहीं, चंदनास कधीं फळें यावयाचीं नाहींत, विद्वान् धनवान् होणार नाहीं व धनवान् फार दिवस वांचणार नाहीं अशी परमात्म्यानें गुणांची योजना केली आहे असें दिसतें!

जो ज्याच्या गुणांचें महत्त्व जाणत नाहीं तो त्याची सर्वदा निंदा करतो ह्यांत काय आश्चर्य आहे? भिल्लांच्या बायकांस सुदैवानें कोठें मोत्यें सांपडलीं तर तीं टाकून त्यांना प्रिय असे गुंजांचेच अलंकार त्या वापरतात!

थोरांशीं नम्रतेनें वागणें हा मोठा गुण आहे व त्यावरून त्यांत फायदेही फार आहेत.

### वैद्य

जगतावर वैद्य हे प्रतिसृष्टेच आहेत! मात्र ते चांगले वहिवाटलेले, अनुभविक व शास्त्रवैद्य असावेत.

दिव्यांत तेल वात यथेच्छ असून मध्येंच त्यास गूल येऊन, तो कोणीं न झाडल्यामुळें जसा दिवा मालवतो, तशी आयुष्युरूप तेलानें व शरीररूपवातेनें ही जीवज्योति बराच कालपर्यंत अखंड राहावयाची; परंतु तीस मध्येंच अनेक रोगरूप गूल येऊन ते जेव्हां ही जीवाज्योति विझवावयास प्रवृत्त होतात तेव्हां ते गूल वगैरे साफ करून जीवज्योति स्थिर व शांतपणें प्रज्वलित ठेवणारा वैद्य हाच एक अप्रतिम दिवट्या आहे!

आजाऱ्याजवळ मोठमोठाले शास्त्री, पंडित, श्रोत्रिय, अग्निहोत्री, त्याचप्रमाणें पदव्या मिळविलेले विद्वान्, शिल्पकलाभिज्ञ, ज्योतिषी वगैरे अनेक तत्वविचारी लोक बसविले आणि त्यांत जर वैद्य नाहीं तर वरील विद्वानांच्या विद्वत्तेचा त्या बिचाऱ्या ज्वरी मनुष्यास काडीमात्र उपयोग न होतां, त्यास कदाचित् आपल्या अमूल्य जीवासही मुकणें प्राप्त होईल! म्हणून वैद्य हे आवश्य आहेत.

मनुष्यास तापलेल्या लोखंडासारखा ज्वर भरला आहे, वायूनें विचूक व भलभलतें बरळतो आहे, सर्व इंद्रियें ज्याचीं स्तब्ध झालीं आहेत आणि अशा त्याच्या अत्यवस्थेमुळें त्याचीं घरचीं मनुष्यें बावरल्यासारखीं व शोकाकुल होऊन त्याच्या बिछान्याजवळ बसलीं आहेत! अशा स्थितींत त्या सर्व कुटुंबास आनंद देणारा व आजाऱ्यास पूर्वस्थितीवर आणणारा असा एक वैद्याशिवाय, विद्वान् पुरुषांपैकीं कोणत्या वर्गाचे विद्वानाचा उपयोग होणार आहे? कोणताही नाहीं, परंतु एक वैद्यच!

ज्या वैद्यास नाडिज्ञान नाहीं, वैद्यशास्त्राचें पुरें अध्ययन केलें नाहीं, रोगाचीं निदानें ज्यास माहिती नाहींत, धातुभस्में आणि मात्रा यांची ज्यास परीक्षा नाहीं अशा मूर्ख वैद्यांचे योगानें रोगी बरा होणें तर एकीचकडे राहून तो व्यर्थ प्राणास मात्र मुकणार! तेव्हां असे नाकाडोळ्यांचे नांवाचे वैद्य काय उपयोगाचे?

चांगल्या वैद्यशास्त्रज्ञाजवळ अध्ययन केलेला, अनेक औषधें व भस्में करण्यांत जो चांगला वहिवाटलेला, निरीच्छ, धैर्यवान् आणि दयाळु अशा वैद्याचे हातूनच रोग्यास गुण येण्याचा विशेष संभव आहे!

रोग्यास भलभलतेच अनेक काढे व औषधें देणारा आणि भलभलतींच चाटणें व तेलें देणारा अशा वैद्यांकडून रोग जाण्याच्या ऐवजीं रोगाचा सांठा मात्र विशेष व्हावयाचा!

आजाऱ्यास बाजारांतलीं औषधें आणून त्याचे काढे करावयास सांगितलें आणि कांहीं लंघनें करावयास सांगितलीं; सुदैवानें आजाऱ्यास उतार पडला. परंतु त्याबद्दल जो वैद्य द्रव्य मागतो तेव्हां तो खरोखर उपहासाला पात्र होतो!

औषधाबद्दल द्रव्य घेणारे वैद्यांचीं औषधेंही घेऊन मनुष्यें मरतात, तेव्हां लोक अशा वैद्यांस यमापेक्षांही ज्यास्त क्रूर असें मानितात : यम हा मनुष्यांचे प्राणच काय ते हरण करतो, परंतु वैद्य हा त्याचें द्रव्य आणि प्राण हीं दोन्हींही हरण करतो!

## कवी

पृथ्वीवर कवी होते व आहेत म्हणूनच आज आपणास फार प्राचीन काळचा इतिहास मिळतो. नाहींतर पूर्वी काय झालें ह्याबद्दल सर्व शून्य झालें असतें!

कविता करण्याचा गुण फारच वर्णनीय आहे. मात्र त्याचे पुरस्कर्ते हे चांगले श्रीमान् भोजराजासारखे असावे.

कवि कविता करितो व तिचें पालन व लाड म्हणजे तिला वागविणें, हें उत्तम मनुष्याकडून होतें. जसें, वृक्ष हे फलें फुलें उत्पन्न करितात आणि त्यांचा सुगंध, वारा हा दूरवर नेतो!

कवींच्या कवितेनें कवींसच आनंद होतो इतरांस होत नाहीं. चंद्राच्या योगानें समुद्रास भरती येईल परंतु कुव्यास कधींही येणार नाहीं!

विद्वान् असणारे जे कवी तेच कवी होत, इतर कवी ते कवी नसून केवळ कपी होत!

जे कवी आपली कविताशक्ति केवळ श्रीमंताची स्तुतिस्तोत्रें करण्यांतच खर्चून त्यामुळें द्रव्यालंकार मिळवितात ती त्यांची कविताशक्ति वेश्येसारखी लोभी होय!

## ज्योतिषी-गणिती

ज्योतिषी व गणिती यांजमुळेंच पृथ्वीच्या, ताऱ्यांच्या व ग्रहांच्या गति, रात्रदिनमान, समुद्राची भरती ओहोटी, ग्रहणें, अनेक अगम्य स्थलांची लंबोंची असेच अनेक चमत्कार आपले दृष्टिगोचर होऊन अनुभवास येतात!

कोठें आकाश आणि कोठें पृथ्वी? परंतु पुढील ग्रहणादि व दिनमानादि आज यथार्थ व बिनचुक वर्त्तवितां येतात ही ज्योतिषशास्त्राची केवढी महती?

एका मनुष्या वरून सर्व पृथ्वीच्या जमाखर्चाचा अजमास काढतां येण्याची गणितशास्त्राची अप्रतिम शक्ति आहे.

अष्टादशावधांनी, शतावधानी वगैरेंसारखे साश्चर्य चित्त करणारे चमत्कार गणितशास्त्राचे प्रभावानेंच झाले आहेत व दिवसें दिवस ज्यास्त होतील?

ज्योतिषावरून सिद्ध झालेल्या ग्रहगतींच्या अनुरोधानें प्रत्येक व्यक्तीच्या सुखःदुखाचें भविष्य सांगणारे ज्योतिषी हे केवळ ढोंगी व अज्ञान लोकांस बुचाडणारे होत!

पूर्वीपासून ज्योतिष्यांकडून ग्रह वगैरे पाहवून आपली भावी स्थिति समजून घेण्याच्या नादीं लागलेले मोठमोठे लोकही धुळीस मिळाले आहेत! तेव्हां अशा गप्पांवर सुज्ञांनीं विश्वासूं नये.

पृथ्वी गोलाकार आहे, तिच्या ऋतुमानांतील बरोबर फेरफार, पृथ्वीवरील हवेचें मान वगैरे हीं सर्व प्रत्येक मनुष्यास घरांतून बाहेर पाऊलही न टाकतां बिनचूक समजतात; हा प्रभाव केवळ एका ज्योतिषाचा होय!!

पृथ्वीच्या ज्या भागांत ज्योतिष व गणित जाणणारा एकही नाहीं तेथील लोकांची व जनावरांची स्थिति सारखी होय! त्यांस तिथि, वार, ग्रह, नक्षत्रें, ऋतुमान वगैरेंच्या ज्ञानाचा अगदीं अंधार असतो!

जो निर्ज्योतिष प्रदेश आहे तेथें जर एखाद्या ज्योतिर्विदानें पुढील सर्वांस समजणारें असें व आपल्यापासून दूर अशा आकाशांतील फेरफारांचें भाकित सांगितलें, तर अनुभवांतीं ते अज्ञान लोक त्या ज्योतिष्यास साक्षात् देव समजतील ! कोलंबस हा नव्या सांपडलेल्या अमेरिका खंडांत गेल्यावर, थोडेच दिवसांनीं येणाऱ्या सूर्यग्रहणाबद्दल त्याणें आपल्या ज्योतिषज्ञानानें तेथील अज्ञान लोकांस सांगितलें व त्याप्रमाणें त्यांस अनुभव आल्यावर ते भोळे लोक त्यास देव मानूं लागले ! !

## दुर्गुण

जे दुर्गुण झांकण्याचा यत्न करितात ते आपला दुर्गुण फारच दृष्टोत्पत्तीस आणतात. जो म्हणतो कीं, मला कांहीं कळत नाहीं त्यास फार कळतें असें लोक मानतात. परंतु जो आपल्यास मी गरीब आहें असें म्हणतो त्यास कोणी गरीब म्हणत नाहीं !

आपलें आपणांस जर जाणावयाचें असेल तर लोकांच्या खोडी पाहून आपल्या खोडी जाणाव्या !

सद्गुण गरिबामध्येंही असला तरी चांगला पण दुर्गुण थोरामध्येंही वाईट !

सद्गुण आणि दुर्गुण म्हणजे, जें चांगलें असेल तें करणें याचें नांव सद्गुण व जें वाईट असेल तें न करणें याचें नांव दुर्गुण; परंतु वाईट आणि चांगलें सांगणें हें आपलें एकट्याचें काम नव्हे.

दुसऱ्याचे दोष काढावयास सोपें परंतु आपले काढणें अवघड !

जें वास्तविक असेल तें चोरून ठेवणें हा मोठा दुर्गुण आहे.

आपला दुर्गुण सोडण्यापूर्वी तो आपणांत आहे हें कळलें पाहिजे. यास्तव जे आपला दुर्गुण झांकतात ते लोकांस दिसूं देत नाहींत असें नाहीं. परंतु आपला आपणही पाहात नाहींत !

मुख्य दुर्गुण तीन आहेत : चोरी, चाहाडी आणि व्यभिचार. यां तिहींवांचून मनुष्य कसा असला तरी तो बरा असें लोक म्हणतात.

## मद्यपान

दारू पिण्यासारखा अनाचार, अनर्थ आणि जीवित्वास मातीमोल करून टाकणारें असें दुसरें कोणतेंही व्यसन नाहीं !

कोणत्याही धर्ममताचे लोक मद्यपान करणें सशास्त्र किंवा हितकर आहे असें म्हणत नाहींत, मग आलीकडे मद्यपानाचा जो एवढा प्रभाव माजला आहे हा किती दुःखाचा आहे ? त्यांत हिंदु लोकांस तर हा प्रभाव फारच अनिष्टकारक व दरिद्र उत्पन्न करण्याला कारण आहे !

शाक्त म्हणविणारांत मद्यपानाचा अतिनिंद्य प्रकार फारच प्रचलित आहे व त्यांजसारखे क्रूर, अधमाधम आणि पापकर्त्ते हिंदूंत आणि त्यांतही ब्राह्मणांत कोणी नसतील !

मद्यप्याजवळ सत्य कोठून वास करणार ? मांसभक्षकांस दया कोठली ? विषयीं जनांस विद्या कोठून होणार ? आणि दरिद्र्याकडून मोठमोठीं कृत्यें कशीं होतील ?

मनुष्य मद्य प्याला म्हणजे त्याची काय अवस्था होते ! त्याची शुद्धि जाऊन तो वाटेनें हेलपाटत व झोकांडे खात जातो, मद्यपानाचे व्यसनाने सर्व दौलत मातीस मिळते, तो वायू झाल्यासारखी बडबड करितो, त्याचा जीव व्याकूळ होऊन तो प्रतिक्षणीं जातो कीं काय असें त्यास वाटतें. आणि तो विषयांध होऊन त्यास आपपर कांहींच भान राहत नाहीं, असा त्यास सन्निपात होतो. व त्याचा परिणाम पाप आणि पापाचा परिणाम नरकवास हींच मद्यप्यास प्राप्त व्हावयाचीं ! !

## हट्ट

हट्टानें नाश फार, पण नफा थोडा.

स्वमतास हट्टानें अनुसरणें ह्यांत लोकांचा नाश आहे.

आपल्यास नीट दिसेल तसें आपण करावें. तसेंच लोकांनीं नीट दिसेल तसें त्यांस करूं द्यावें. आपले मतानें त्यांनीं चालावें हा हट्ट नसावा.

कधीं कधीं हट्टानेंच मोठमोठीं कार्यें होतात : मुसलमानी धर्मप्रसार, आणि ख्रिस्ती धर्मशास्त्राचीं भाषांतरें वगैरे मोठमोठीं कामें हट्टानेंच झालीं आहेत!

## अपराध

सहजवृत्त्या चूक झाली तर तो अपराध नव्हे.

जे स्वतां अपराधी असतात ते दुसऱ्याचे अपराध फार पाहतात.

लहान चुकीस आणि मोठे चुकीस सारखें मानूं नये आणि त्याच प्रमाणें सारखा राग करूं नये.

अपराधी यास कोडतांत शिक्षा न होओ. परंतु लोकांत त्याची अब्रू जाते व त्याचे मन त्यास खातें. याहून त्यास शासन तें कोणतें असावें?

आपला जरी स्वकीय असला आणि त्याचे हातून वास्तविक अपराध झाला, तर त्यास त्याचे भावानें न्यायाधीशाकडे नेला म्हणून त्याचा भाऊ दुर्गुणी किंवा अपराधी म्हणावा काय? नाहीं. विचारी लोक ह्या कामास योग्यच म्हणतील. कारण कीं, आपला बंधु झाला तरी त्याचा अपराध छपविणें हें वाईट काम आहे.

जो अपराध छपवितो त्यास आपल्यास छपविण्याची जरूर पडते.

## गर्व

शहाणा नम्र असेल तो चांगला; कारण कीं, उद्दामपणा हा मूर्खपणाचें चिन्ह आहे.

लोक अहंकारानें आपले दोष झांकतात आणि दुसऱ्याचे उघड करितात!

म्हातारपण रूपाचा नाश करितें, आशा धैर्य घालवितें, मृत्यु प्राण हरण करितो, धर्माचरणास मत्सर, सदाचरणास दुष्टाची सेवा, कीर्त्तीस क्रोध आणि सर्वांस सर्व प्रकारें गर्व हरण करितो!

मनुष्य गर्विष्ठपणानें दुसऱ्याची निंदा फार करितात; द्वेषानें करणारे थोडे.

रोज मोठीं दुःखें नाहींत. तरी लोक त्यास कंटाळतात; आणि सुखाचे दिवसांत गर्व, राग व उद्धटपणा याशिवाय दिवस जात नाहीं!

आपले महत्वाविषयीं गर्व करूं नका. द्रव्यवानास रावणासारखा गर्व असतो आणि गरीब पृथ्वीसारखा शांत असतो!

सोंग ढोंग मनुष्य करतें तें गर्वानें, अज्ञानानें किंवा दुसऱ्याचे तुच्छतेनें करतें!

जो आपली व लोकांची खोड जाणतो तो गर्व करीत नाहीं.

मनुष्यानें चांगले कर्माविषयीं अहंकार केला तर तो बरा.

आर्जवी लोक फार वाईट. कारण कीं, ते गर्वाचें पोषण करितात.

गर्विष्ठ मनुष्य इच्छितो कीं, आपली भक्ति सर्वांनीं करावी.

योग्य मनुष्य मोठे जाग्यावर असला तरी गर्व करीत नाहीं. कारण कीं, त्याचे मनांत असें असतें कीं, माझी योग्यता कमीच आहे.

जो मनुष्य गर्विष्ठ असून आपले हाताखालचे लोकांस तुच्छ मानतो तो मनुष्य आपलेहून वरिष्ठाचे फार आर्जव करितो.

दुसऱ्यानें इजा केली तर सोसते, पण गर्व सोसत नाहीं.

गर्वानें मनुष्य गैरशिस्त गोष्टी करितो.

## रोग

ज्याचें शरीर रोगी त्यास सर्व सुखें वृथा आहेत!

कांहीं रोग असे आहेत कीं, त्यांस त्वरित उपचार केले पाहिजेत आणि कांहीं रोग असे आहेत कीं, त्यांस दमा दमानें उपाय करावे लागतात. घाई करितां कामां नये.

मनुष्याची शरीर प्रकृति रोगी किंवा निरोगी ही त्याच्या आईबापांच्या प्रकृतीनुरूप होते. करितां आईबापांनीं आपल्या शरीराची जोपासना चांगल्या रीतीनें केली तर त्यांची संततीही सदृढ व निरोगी होईल.

क्षय, अपस्मार, कुष्ट, रक्तपिती, वेड, दमा, गर्मी, वायु, इत्यादि दुष्ट रोग परंपरेनें चालतात. व त्यामुळें तशा वंशांतील प्रजा क्षीण व रोगी निपजत जाते! अशा मनुष्यापासून संतत्युत्पादन जेणें-करून न होण्याचे जे उपाय अविवाह वगैरे, ते सर्वदा कायम राखण्याविषयीं देशहितेच्छूंनीं काळजी बाळगावी.

निरोगी प्रजा असेल तरच देशाचें हित आहे. आजपर्यंत जे जे शूर व विजयी पुरुष उदयास आले आहेत ते सर्व शरीरप्रकृतीचे दृढ असल्यामुळेंच आले असें सिद्ध होतें.

हिंदुधर्मांत लग्नसमयीं वधू व वर सगोत्रज व सप्रवर, असें न पाहतां वर हा हुशार, सशक्त व तरुण पाहावा आणि वधू ही सुंदर, सदृढ, जिला पुष्कळ भाऊ आहेत आणि तरुण अशी पाहावी म्हणून आज्ञा आहे; तिचा हेतु संतती निरोगी व सशक्त होण्याकरितांच आहे.

देशाचें हिताहित प्रजेच्या आरोग्यावरच अवलंबून आहे.

शरीर प्रकृतींत रोगांस विन्हाड देण्याची ज्यांची इच्छा नसेल त्यांणीं निर्व्यसन, परिमित गृहस्थाचार म्हणजे बहुतेक ब्रह्मचर्य, सात्विकान्नभक्षण व निष्काळजी राहण्याचे सदुपाय, इतक्या गोष्टी पाळिल्या असतां ते खरोखर निरोग, सशक्त व दीर्घायु राहतील.

## शुचिर्भूतता–स्वच्छता

शुचिर्भूतपणा म्हणजे केवळ वस्त्रप्रावरणाची व शरीराची स्वच्छता ठेवणें येवढेंच नव्हे; परंतु आत्म्याची व मनाचीही स्वच्छता आवश्य पाहिजे व त्यावांचून बाहेरील स्वच्छता मलीन होय. त्याचप्रमाणें, केवळ आत्मा व मन यांच्या शुचिर्भूतपणाकडे लक्ष्य देऊन वस्त्रप्रावरणाची, भांड्या-कुंड्यांची व शरीराची हेळसांड करतां कामा नये. कारण, शरीर असलें तर मनाच्या व आत्म्याच्या शुद्धीचा प्रयत्न, आणि वस्त्रप्रावरण व भांडेंकुंडें स्वच्छ असलें तर शरीराची वरील स्वच्छता राहील!

हिंदुधर्मांतील बहुतेक कर्में स्वच्छतेकरितां व शरीरारोग्यतेकरितांच धर्मशास्त्रकारांनीं लिहून ठेविलीं आहेत हें सर्वांस अनुभूत झालें आहे.

मनुष्य रूपानें व वर्णानें कसाही असो त्याच्या स्वच्छतेच्या झकाकी खालीं त्याची ती विगुणता सर्व लोपून जाऊन त्यामुळें त्याच्या सहवासाचा परक्यास सहसा तिटकारा येत नाहीं.

डोक्यांत घाणीनें उवा पडून डोकें कडाकड खात आहे, वर्षोवर्षांत कधीं शरीरास जलस्पर्शही झाला नाहीं, अंगावर कीट चढलें आहे व जवळ आला असतां ज्याची घाण येत आहे अशा मनुष्यास कोणी दाराजवळ देखील उभें राहूं देत नाहीं!

शौच, मुखमार्जन व स्नान हीं स्वच्छता देणारीं तीन कर्में, शरीरारोग्यतेला हिंदुधर्मशास्त्रांतील केवळ तत्वरूप सुवासिक आणि अंतर्बाह्य उटणें होत!

महामारीसारखे उत्पात मनुष्याच्या अस्वच्छतेनें व गैदीपणानें होतात म्हणून मनुष्याच्या कर्त्तव्यांपैकीं स्वच्छता हें एक पहिलें कर्त्तव्य आहे!

मनुष्यास सर्व प्रकारचे रोग होण्यास मुख्य कारण घाणेरडेपणा व अपरिमितता हेंच होय.

## अध्ययन व वाचन

अध्ययन हें सर्व आर्यजनांचें मुख्य काम आहे, त्याचप्रमाणें ब्राह्मणांच्या षट्कर्मांतीलही मुख्य गणिलें आहे.

अभ्ययनावांचून मनुष्याचा मनुष्यपणा नष्ट होतो असें सुज्ञ लोक म्हणतात. म्हणून कोणीही असंस्कृत व ठोंब्ये असें राहूं नये.

वाचनानें मनुष्याच्या विचारांस पुष्टता येते, ज्ञानाचा प्रसार होतो, मनास प्राशस्त्य येतें व तें अकलेस तेज आणतें. परंतु हें सर्व लक्ष्य देऊन वाचिलें तरच खरें आहे.

वाचनांत धर्म, नीति, दया, परोपकार आणि सत्य इत्यादि विषय प्रतिपादक आणि बोधपर असे ग्रंथच स्त्रीपुरुषांनीं वाचावे. शृंगारिक व बीभत्स ग्रंथांचा सर्वथा त्याग करावा.

## स्फुट

मिळालें म्हणजे खावें प्यावें, दान धर्म करावा व आनंदानें राहावें. पाहा, मधमाशा एवढें श्रम करून बिंदु बिंदु सांचवून मोठें थोरलें मधाचें पोळें करतात; परंतु त्याचा लाभ त्यांस न होतां भलताच कोणी आगंतुक त्यांचा नाश करून आपण उपभोग घेतो !

खायाला प्यायाला पुष्कळ मिळणें आणि त्याचा उपभोग घेण्यास शक्ति असणें, तसाच शरीरांत पराक्रम राहणें, आणि अनुकूल असून दान करण्याची बुद्धि असणें हीं साधारण तपाचीं फळें नाहींत !

व्यवहारशून्य कवि आणि पथ्य न करणारा रोगी यांस कोण हंसत नाहीं ? सर्व हंसतात !

राजाश्रय, चोरी, घोड्यांचा व्यापार आणि समुद्रांतून परदेशाशीं व्यवहार करणें हीं साधलीं तर पुष्कळ कल्याण होतें आणि विरुद्ध झालीं तर प्राणांशींच गांठ पडते !

मधाकडे माशा, नीतीनें वागणारा आणि गुण संपन्न त्याजकडे संपत्ति, लवणाकडे उदक आणि योग्यायोग्य शिक्षगाकडे बुद्धि हीं वळतात.

ज्याला तर्क नाहीं असा वैद्य आणि विवेकशून्य असा संन्यासी हे शोभत नाहींत.

एक पदार्थ असून त्यावर तिघांच्या तीन बुद्धी असतात; वैराग्यशील हा स्त्रीस मृत्तिकेचा पुतळा आहे असें मानतो, विषयी मनुष्य स्त्रीच आहे असें म्हणतो, आणि मांसाहारी वाघ वगैरे क्रूर पशु हे तें मांस आहे असें समजतात !

राजापुढें आणि विद्वानांच्या सभेंत प्रथम भाषण करितांनां हृदय सकंप होतें !

मनुष्याचे मनोव्यापार, संपत्ति, तारुण्य आणि जगणें हीं सर्व चंचल असून एक कीर्ति मात्र चिरंजीव आहे !

कधीं रागानें झळफळलेला व कधीं आनंदानें पूर्ण अशी अव्यवस्थित चित्ताची रुष्टतुष्ट स्थिति असून त्याजपासून परिणामही भयंकरच होतो !

एकानें कांहीं कृत्य केलें आणि तें जरी निंद्य असलें तरी दुसरें साधारण लोक तें पाहून आपणही करितात. तेव्हां लोक हे अंधपरंपरेंतील असून खरें तत्त्व जाणणारे थोडेच आहेत !

चांगला कुलीन वर पाहून मुलगी द्यावी, मुलाला विद्या शिकवावी, व सद्धर्मानें कीर्ति संपादावी !

ज्या संपत्तीच्या योगानें मनुष्य गर्विष्ठ होणार नाहीं तीच संपत्ति, ज्यानें सर्व आशा टाकल्या आहेत तोच सुखी, विश्वासपात्र तोच मित्र आणि आत्मसंयमन करणारा तोच पुरुष होय !

ईश्वरास ज्यानें जाणिलें त्यास स्वर्गसुख देखील तृणप्राय आहे, शूर पुरुषास जीव तृणप्राय वाटतो, आणि निरिच्छास सर्व जगत् तृणासारखें वाटतें !

वडील किंवा वरिष्ठ असून कुबुद्धीचा व दुःशील असला तर त्यास मान देऊं नये, परंतु नीच जातीचा असून सुबुद्धीचा व सज्जन असेल तर त्याची पूजा करावी.

दोन बायकांचा नवरा हा, बिळांत साप आणि बिळाबाहेर मांजर अशा स्थितींत असणाऱ्या उंदराप्रमाणें आहे.

जांवई, पोट आणि अग्नि यांस किती जरी दिलें, भरविले आणि जळण घातलें तरी बहुधा त्यांची तृप्ति होत नाहीं!

लोक दुःखपीडित झाले म्हणजे देवाची प्रार्थना करितात, रोगी झाले म्हणजे तप करितात आणि दरिद्री झाले म्हणजे दान धर्म करण्याची इच्छा करितात!

कृपणाचें द्रव्य आणि सिंहाचे केश यांस ते मेल्याशिवाय इतरांचा हस्तस्पर्शही होणें मोठें दूरापास्त आहे!

ज्या मनुष्यास संपत्ति प्राप्त झाली असून तिचा उपभोग कसा घ्यावा हें कळत नाहीं तो, आकंठ पाण्यांत जाऊनही जसें कुत्र्यास पाणी पितां येत नाहीं त्याप्रमाणेंच आहे!

चमत्कारिक बातमी, उत्तम विद्या, उत्तम कस्तूरीचा वास आणि जलाशयांत टाकलेला तेलाचा बिंदु हीं आपोआपच फार लांबवर पसरतात!

दुष्ट मंत्र्याच्या योगानें राजा बिघडतो, दुःसंगानें कुलीन पुरुष बिघडतो, लाडानें मुलगा नासतो, मनुष्याची बुद्धि अशिक्षणानें बिघडते, दुराचरणी मुलाच्या योगानें कुटुंबाची दुष्कीर्ति होते, दुर्जनांची चाकरी केल्यानें सुशिलता जाते, मद्यप्राशनानें निर्लज्ज होतात, बरोबर देखरेख न ठेविल्यानें शेतें खराब होतात, सदोदित प्रवासांत असल्यानें मित्रप्रीति कमी होते, अप्रामाणिकपणानें मैत्रींत वितुष्ट येतें आणि दूरवर विचार न करितां वाटेल तशी उधळल्यानें आणि गर्वानें संपत्ति जाते!

कुग्रामांत राहणें, नीचाची चाकरी करणें, जाडें भरडें व वाईट अन्न खाणें, मूर्ख मुलगा आणि बालविधवा मुलगी हीं पांच दुर्दैवी मनुष्यास विस्तवावांचून त्याच्या देहाची राख करणारीं आहेत!

मुकेपणा बरा परंतु खोटें बोलणें नको, मुळींच पौरुष नसलें तरी चांगलें परंतु परद्रव्य लुबाडून घेण्याची इच्छा न होवो, शून्य गोठा बरा परंतु त्यांत मारकीं व दांडगीं गुरें नकोत, निर्जन अरण्यांत राहाणें बरें परंतु अविचारी व जुलमी राजाच्या शहरांत राहणें नको आणि प्राणत्याग उत्तम परंतु अधर्म्याचा सहवास नको!

क्रमानें काम केलें तर घोंटाळा होत नाहीं.

जो लोकांत व्यापार धंदा करून अथवा दुसरें प्रकारानें माहितगार असतो तो मनुष्याची परीक्षा बरोबर करितो. परंतु गैरमाहित आणि ज्यास कोणत्याही गोष्टीचा अनुभव नाहीं तो परीक्षा करूं शकत नाहीं.

पुरुष आणि स्त्रिया यांची एकच व्यवस्था आहे.

जों जों फार वाढतें तों तों पडावयाचें लागीं येते!

पोरास वाईट खोड लागण्याचें कारण असें आहे कीं, त्यानें लाड करणें व तो जें मागेल तें देणें; तेणेंकरून त्याची मागणी वाढतात आणि शेवटीं आई बापास देण्याचें सामर्थ्य नाहींसें झालें म्हणजे मग तो अर्थातच दुर्व्यसनी होतो!

आईबाप आपले पुत्रास सुशिक्षेनें बारावे वर्षी संभवित व थोर करूं शकतात तसेच हयगयीनें जन्मपर्यंत थोराचें पोर (अज्ञान) असें ही तेच करितात!

मित्राचा भरंवसा धरला नाहीं तर तो कपट करील. आणि चोरावर ही भार ठेविला तर तो चोरी करणार नाहीं!

जो लवकर नाहीं म्हणून सांगतो तो निंमे काम करितो. कारण दुसरी तजवीज करण्यास तो आपणांस सावध करितो!

जो नेमानें निजतो, उठतो व जेवतो त्याची प्रकृति ठीक राहाते.

बुडल्याचा पाय खांचेंत असतो!

आधीं बुद्धि जाते नंतर भांडवल जाते!

अतिशय सुखाचा बोजा झाला म्हणजे रुचि नाहींशी होते !

राजाचे अश्रित असून परोपकार करण्याच्या नांवानें पूज्य, पुष्कळ संपत्ति असून कृपण, बुद्धिवान् असून आळसानें अभ्यास न करणारा, तरुण असून नेहमीं प्रवास करीत हिंडणारा, आणि ज्ञाता असून ईश्वर भक्ति न करणारा इतक्यांचे जन्म व्यर्थ होय !

मूर्ख लोक जेथें श्रोते आहेत तेथें वक्त्यांचे पांडित्य व्यर्थ होते : अंधळ्यापुढें उत्तम सुरूपस्त्री नेऊन उभी केली तरी तिच्या रूप दर्शनाचा त्यास आनंद होणें नाहीं !

कोडीचुंबकपणानें कीर्त्ति जाते, रागीटपणानें गुणांची किंमत उतरते, फुशारक्या मारल्यानें खरेपणा जातो, दुर्व्यसनानें संपत्ति जाते, व्यग्रतेनें मनाची स्थिरता जाते, गर्विष्ठपणानें प्रतिष्ठितपणा आणि नम्रता हीं जातात, लोकांचीं छिद्रें पाहून त्यांवर टीका करीत बसणाऱ्याचा कुलीनपणा जातो, दुराचरणानें पराक्रम नष्ट होतो, दारिद्र्यानें लोकांमधील आदर कमी होतो आणि ममतेनें सज्ञानपणा व्यर्थ होतो !

उद्योग करणाऱ्यास दारिद्र्य नाहीं, ईश्वरस्मरण करणाऱ्यास कधींही पातक स्पर्श करीत नाहीं, मित भाषण करणाऱ्याशीं कधीं कोणाची भांडाभांडी होत नाहीं आणि सावध असणाऱ्यास कधीं भीति येत नाहीं.

राजांनां त्यांचा नीतियुक्त कारभार शोभा देतो, गुणवानांस नम्रता ही शोभा देते, स्त्रियांनां लज्जा हें भूषण आहे, बुद्धिमानास त्याची कविता शक्ति भूषविते, भाषणास मधुरता, शरीरास सुरूपता, ज्याचें मन चांगलें आहे त्यास सच्छास्त्रावलोकन, योगी लोकांस शांतवृत्ति, सशक्तांनां क्षमा, आणि संसारी जनांस संपत्तीची अनुकूलता व सुशीलता हीं भूषणें होत !

ज्याला संपत्ति मिळविण्याची इच्छा आहे. त्याजकडून हांजी हांजी व्हावयाचीच, जो चढला तो पडेलच, विषयी मनुष्याची फजिती व्हावयाचीच, भिकाऱ्यास लोकांच्या घरीं हिंडावें लागणारच, ज्याचें अंतःकरण अस्वस्थ झालें आहे त्यास व्याकुलता यावयाचीच, दोषयुक्त मनुष्यास संशय उत्पन्न व्हावयाचेच, लोभी मनुष्याची दुष्कीर्त्ति व्हावयाचीच, आणि कधींच युद्धांत गेला नाहीं किंवा त्याविषयीं ज्यास माहिती नाहीं त्याचा पराभव होणारच !

मित्राला निष्कपटपणाने, शत्रूला नीति आणि शक्ति यांनीं, लोभ्याला द्रव्यानें, ईश्वरास परोपकारानें, सज्जनांस आदरानें, स्वस्त्रीला प्रेमानें, सोयऱ्या धायऱ्यांस शांतीनें, रागावलेल्यांस स्तुतीनें, वरिष्ठांस नम्रतेनें, मूर्खांस अनेक सुनीतीच्या गोष्टी सांगून, रसिकांस अलंकारिक भाषणानें, विद्वानांस अनेक प्रकारच्या विद्यांनीं आणि एकंदर सर्वांस आपल्या सुशीलतेनें आपलेंसें करावें !

जवळ नसेल त्याची इच्छा करावयाची आणि जवळ असेल त्यांत अतृप्त राहावयाचें ही एक लोकांची रीति आहे. तसेंच, अलभ्य असेल त्याविषयीं प्रयत्न करितात आणि जवळचें मात्र बोळवितात !

बहुतकरून हलक्या लोकांचें किंवा निस्सार पदार्थांचें अवडंबरच फार असतें. पहा :-- इतकें किंमतवान् सोनें पण त्यास हलक्या किंमतीच्या कांस्याइतका नाद नसतो; परंतु कांस्याचा घणघणाटच फार !!

दुसऱ्याला उपदेश करते वेळीं सर्व शिष्ट होतात. परंतु स्वतःवर तो प्रसंग बेतला म्हणजे तेच पुरस्कर्ते मागें राहतात हें फार वाईट !

जशी सोन्याची परीक्षा चार लोकांकडून कसोटीवर लावून, तोडून, तापवून आणि ठोकून अशा चार प्रकारानें होते, तद्वत् मनुष्याची परीक्षा त्याची विद्या, कुल, शील आणि वर्त्तन ह्यांवरून करितात !

जर नीतिशास्त्रनिपुण राजा धार्मिक झाला अथवा मोठमोठीं शास्त्रें म्हटलेला पुरुष विचारवान् पंडित झाला तर त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. तर, रूप-यौवन - संपन्न अशी स्त्री आपले पातिव्रत्य

रक्षून राहिली अथवा निर्दय असूनही कधीं पाप करीत नाहीं असा पुरुष असला तर मात्र आश्चर्य व आनंद खरा !

कोणाचेंही तोंड भरल्यावर (लांच वगैरे दिल्यावर) कोण बरे आपणास वश होणार नाही ? मृदंगाचें तोंड भरल्यावर तोही मधुर आवाज काढूं लागतो!

सोन्याचीं फुलें खऱ्या फुलांसारखीं करणारे शेंकडों कारागीर निघतील. परंतु खऱ्या फुलांतील जो सुवास तो त्यांत घालण्याविषयीं एक परमेश्वरच कारागीर आहे !

मनुष्य आजारी पडलें म्हणजे चौघांचीं चार मतें पडतात :– वैद्य म्हणतात यास कफ पित्त वगैरे झालें आहे; ज्योतिषी म्हणतात याचे ग्रह सद्ध्या अनिष्ट आहेत; पंचाक्षरी म्हणतात यास बाहेरबाधा झाली आहे आणि ज्ञाते जे आहेत ते ईश्वरिकृतीनें ह्या सर्व गोष्टीं झाल्या आहेत असें म्हणतात !

शांत वृत्तीसारखें तप नाहीं, संतोषासारखें सुख नाहीं, आशेसारखें दुःख व रोग नाहीं आणि दयेसारखा धर्म नाहीं !

राजे, श्रीमान्, लहान, म्हातारे, तपस्वी, विद्वान्, स्त्रिया, मूर्ख आणि वरिष्ठ यांस शहाण्या मनुष्यानें उलट उत्तर करूं नये.

सहा कानीं गेलेली कोणतीही गोष्ट सर्व जगास समजली असें समजावें, चार कानीं गेली तर काहीं तरी गुप्त राहण्याचा संभव आहे आणि दोन कानींच म्हणजे एकाच मनुष्यास माहित असेल तर कालत्रयींही कोणास कळणार नाहीं !

संशय हा सर्व ठिकाणीं जाचतो व सर्व कृत्याला तो एक विघ्नच आहे. म्हणून तो सर्वथैव टाकून दिला तरच हातीं धरलेलें कार्य सिद्धीस जाईल.

आपलें कार्य झालें म्हणजे चाकर यजमानाची पर्वा बाळगीत नाहीं, एकदां बायको मिळाली म्हणजे मुलगा आईची पर्वा ठेवीत नाहीं, मुलें झालीं म्हणजे बायको नवऱ्याची विशेष काळजी करीत नाहीं आणि रोग बरा झाला म्हणजे रोगी वैद्यास एका उत्तरानेंही पुसत नाहीं !

कोणी तरी एक मित्र असावा, मग तो भिकारी असो किंवा श्रीमंत असो; एका ठिकाणीं वस्ती करावी, मग ती एखाद्या गांवढ्यांत असो किंवा मोठ्या शहरांत असो; एक बायको करावी मग ती सुरूप असो अथवा कुरूप असो; आणि एकाच ईश्वराची भक्ति व पूजा करावी, खंडी भर देव पुजणें चांगलें नाहीं !

दरिद्रीपणा हा धैर्यानें शोभतो, कुरूपता सदाचरणानें चांगली दिसते, कसें तरी जाडें भरडें पण तेंच ऊन अन्न असलें तर तें गोड लागतें आणि हलकें व चिंध्या वाकळा असलेलें वस्त्र स्वच्छतेनें शोभतें !

उद्योग, कलह, खरूज, जुगार, मद्यपानादि दुर्व्यसनें, आहार, विषयेच्छा आणि झोंप हीं अभ्यासानें वाढतच जातात !

पाण्यांत तैलबिंदु, मूर्खाचे ठायीं गुप्तगोष्ट, थोडें जरी असलें तरी सत्पात्रीं दिलेलें दान आणि सूज्ञ मनुष्यांतील शास्त्रविचार हीं लोकांत आपोआपच पसरतात !

एकदां पाहिलें दोनदां पाहिलें, शंभरवेळां पाहिलें, अथवा पांचशें वेळां पाहिलें तरी सारखेंच. उगीच नादिष्टपणा करूं नये !

अतिलोभ केला असतां मस्तक फिरून जातें !

भिक्षुकानें दुसऱ्या भिक्षुकास पाहिलें, कुत्र्यानें दुसऱ्या कुत्र्यास आणि कोंबड्यानें दुसऱ्या कोंबड्यास पाहिलें असतां त्यांचा संताप होऊन ते व्यर्थ वर्दळीवर येतात !

माशा, वेश्या, उंदीर आणि भिक्षुक हे परक्यानें मिळविलेल्यावर आयते निर्वाह करणारे आहेत !

ज्योतिष, शकुन, धर्म, प्रायश्चित्त आणि वैद्यकसंबंधी औषधें वगैरे हीं अशास्त्र सांगणारा मूर्ख होय !

कुलांत परंपरेनें चाललेल्या विद्येंत निष्णात झालेला आणि गर्भश्रीमंत हे गर्विष्ठ व उन्मत्त होत नाहींत !

भांडीं फोडावीं, चव्हाट्यावर जाऊन पांघरुणाच्या चिंध्या करीत बसावें अथवा वाटेल तें बडबडावें आणि कोणीकडून तरी लोकप्रसिद्ध व्हावें अशी इच्छा बाळगणाऱ्यास धिक्कार असो ! व त्याजसारखा मूर्ख कोणी ही नसेल !!

सर्वांचा नाश होत असून अर्ध्याचा नाश होण्यानें अर्धा भाग वांचतो असें जर असेल तर सूज्ञ त्याप्रमाणें सर्वांची आशा धरून तेंही अर्ध गमावीत नाहीं.

भाषणचातुर्यानें संपत्ति मिळते; गोड भाषणानें मित्र, आप्त, हे आपल्यास अनुकूल होतात; भाषणानें बंदी भोगावी लागते; आणि प्रसंग विशेषीं भाषणानेंच मृत्यूही येण्याचा संभव आहे. करितां बोलते वेळीं वेळ प्रसंग पाहून योग्य तेंच बोलावें.

न्यायानें वागलें तर पशु देखील सहाय होतील; परंतु अन्यायानें वागूं लागल्यास सख्खे भाऊही सोडून देतील !

जन्म देणारा, पोषण करणारा; विद्या शिकविणारा आणि भयापासून रक्षण करणारा हे बापाप्रमाणें आहेत.

जो मोठ्या संकटांतही आपलें स्वरूप आणि मनोनिग्रह बदलीत नाहीं तोच धन्य !

इतरांच्या तोंडून कांहीं गैरशब्द आला तर लोक त्यास बाष्कळ व मूर्ख म्हणतात. परंतु सदोदित लोकांस आनंदविणाऱ्याचे तोंडून जर तसेच गैरशब्द निघाले तर त्यास लोक थट्टा समजून आनंद मानतात ! जसें इतर लांकडें जाळलीं तर त्यांपासून निघालेल्यास आपण धूर म्हणतों आणि चंदनाचीं लांकडें जाळून निघालेल्यास धूप म्हणतों !

ज्याची संपत्ति दान धर्मांत खर्च होते, विद्या पुण्यप्राप्तीकडे जाते; तपस्वी आपलें तप ईश्वरचिंतनाकडे खर्चितो आणि परोपकारार्थ जो ठिकठिकाणीं मोठमोठीं व्याख्यानें देतो व कीर्त्तनें करतो तो त्रैलोक्यांत वंद्य होय !

हळू हळू चालत असल्यास सर्व पृथ्वीवर पर्यटन होईल, हळूहळू चिंध्या जुळून केली तर एक गोधडी होईल, हळूहळू हिमालयासारख्या उंच पर्वताच्या शिखरावर मनुष्य पोंचेल, हळूहळू सर्वविद्यापारंगत होईल आणि हळूहळू द्रव्य मिळवून मितव्ययानें एखाद्या राजासारखेंही होण्याचा संभव आहे. तेव्हां कोणतीही गोष्ट सावकाश, अस्खलित आणि शांततेनें केला असतां सर्व प्रकारच्या अवस्था सुखकर होतात!

स्वबुद्धीनें सारासार विचारपूर्वक कोणतेंही काम करणें उत्तम आणि श्रेष्ठ लोकांच्या बुद्धीप्रमाणें वागल्यास त्याहूनही उत्तम, परंतु परकीयांच्या हलकट बुद्धीनें चालणाऱ्यास फार दुःख व नाशकारक आहे.

लोक हे बहुधा, त्यांस जो उपद्रव देतो त्यालाच लवून भजून असतात : मोठ्या हत्तीची कोणी पूजा करीत नाहीं किंवा सापांस मारणाऱ्या गरूड पक्ष्याचीही पूजा करीत नाहींत. तर सर्वांस ज्याच्यापासून भय अशा नागाची (सापाची) च ते पूजा करितात !

कपटी स्वभाव असणें हे नीचत्वदर्शक आहे. यास्तव शब्दानें किंवा अर्थानें देखील कोणाशीं कोणीं कपट करूं नये.

जन्मापासून अज्ञानी लोकांचे सहवासानें ज्या समजुती पडतात त्या गैर समजुती होत. त्या मनांतुन घालविण्यास मोठा संस्कार लागतो.

पूर्वापर सहवासानें पडलेल्या समजुती जरी वाईट असून परक्यानें त्या समजून सांगितल्या तरी मनुष्य त्या लौकर टाकीत नाहीं. याजकरितां त्यास हंमेषा विचाराच्या कसोटीवर घालून पाहात जावें.

दयेची वृद्धि जितकी होईल तितकी करावी हाच मनुष्याचा धर्म व थोरपणा आहे आणि हेंच विद्येचें व ज्ञानाचें सुफल आहे.

जशा जुन्या समजुती लौकर जात नाहींत तशा लहानपणापासून ज्या खोडी लागतात त्याही लौकर जात नाहींत. परंतु, कोणी त्या वाईट म्हणून सांगत असतांही जो वेडेपणानें व आपल्याच हेक्यानें टाकीत नाहीं तो निंद्य होय!

मनुष्याचें चापल्य व स्थिमिता म्हणजे घाई व थंडपणा हीं कधीं कधीं हित करतात. व कधीं कधीं अहित करतात. याकरितां कोणतेंही काम फार दूरवर विचारानें करावे.

स्वाभाविक आनंदी मनुष्य सुखी असतो आणि दुर्मुखलेला दुःखी असून त्याच्या कपाळच्या आठ्या कधींच जात नाहींत! व त्याच्या अशा स्वभावामुळें कोणासही सौख्य म्हणून कधींही मिळणें नाहीं!

काल अनुकूल असला म्हणजे व्हावयाच्या नाहींत अशाही गोष्टी होतात आणि तोच प्रतिकूल झाला म्हणजे साध्य गोष्टीही दुस्साध्य होतात! राम लक्ष्मणास म्हणाला, 'बा लक्ष्मणा! कालाची गति कशी आहे पाहा: तो प्रतिकूल होता तेव्हां मी राज्यारूढ होत असतांही त्यावेळीं पित्याच्या आज्ञेनें वनवास भोगावयास निघणें माझे कपाळीं आलें, आणि आतां काल अनुकूल आला तसें कधीं न होणारें असें हें पाण्यावर दगड तरण्याचें कृत्य घडत आहे!

ज्या घरांत मोठें कुटुंब नांदत असतें तेथें कोणी एकच दुर्दैवी राहतो, आणि जेथें एकच दंपत्य असतें तेथें मोठा कुटुंबविस्तार होऊन शेवटीं कांहीं राहत नाहीं! ह्याप्रमाणें रात्र आणि दिवस हे दोन फासे घोळून ह्या पृथ्वीरूप पटावर प्राणिरूप सोंगट्यांनीं ईश्वरानें डाव मांडिला आहे!!

---

## राजनीति

श्री. सवाईमाधवराव साहेब पेशवे यांस वाचण्याकरितां आत्या गुरूजी यांणी ही राजनीती मोडींत लिहिली होती. त्याची एक प्रत आम्हास मिळाली, ती इतर सर्व लोकांसही वाचण्यासारखी आहे असें समजून लोकहितार्थ प्रसिद्ध केली आहे.

**लोकहितवादी**

### नीतीची कलमें

(१) स्वधर्मी दृढ विश्वास असावा. (२) इंद्रियभ्रष्टाचा सहवास नसावा. (३) वृद्धपरंपरेची मर्यादा रक्षावी. (४) मिष्ट भाषण करावें. (५) समाधानवृत्ति असावी. (६) लोकापवादाचें भय धरावें, (७) शरीररक्षा असावी. (८) कुटुंबास आज्ञेंत ठेवावें. (९) स्वामित्वाचा गुण असावा. (१०) स्वामिभक्ति असावी. (११) पुत्रांस सुशिक्षण द्यावें. (१२) जमाखर्ची वाकब असावें. (१३) मुत्सद्दीपणा व राजकारस्थानीपणा असावा. (१४) न्यायनिष्ठुरता असावी. (१५) मामलतींत शाहाणें असावें. (१६) व्यापारांत शहाणें असावें. (१७) वतनांतील आचरण शुद्ध असावें. (१८) सत्पुरुषाचा सन्मान राखावा, (१९) पापद्रव्य मिळवूं नये, (२०) व्यर्थ खर्च करूंनये, (२१) दुष्ट व्यहारी ओळखावे, (२२) वरिष्ठांशीं सख्य ठेवाव.

(२३) बंधूंस अंतर देऊं नये. (२४) परोत्कर्षाचें सहन करावें. (२५) नाशकर्त्ते ओळखावें. (२६) मनुष्याचा गौरव करावा. (२७) सेवकवृत्तीनें धना आर्जवावे. (२८) स्वरूपज्ञान असावें. (२९) शरणागताचे संरक्षण करावें. (३०) शिक्षा व प्रतिबंध अनुभवला असावा. (३१) हिशेबाचा मोजबा वारंवार राखावा. (३२) जाबसालीं शाहणें असावें, (३३) सारासार विचार करावा. (३४) बंदोबस्ताच्या पद्धती असाव्या. (३५) स्नानसंध्यादि षट्कर्मी लक्ष्य असावें.

---

## नीतिगुण व त्यांची साधनांगें

**(१) स्वधर्मी दृढ विश्वास असावा : —**

(१) खरे बोलावें. (२) नियमानें चालावें. (३) लोक वाईट म्हणतील तें विचारास व शास्त्रास विरुद्ध नसेल तर टाकावें. आणि (४) वडिलांचे आज्ञेंत राहावें.

**(२) इंद्रियभ्रष्टाचा सहवास नसावा : —**

(१) असत्य बोलतो तो, जिव्हेंद्रिय भ्रष्ट समजावा. (२) लोभी. मनेंद्रियभ्रष्ट समजावा. (३) अविश्वासी म्हणजे कर्णेंद्रिय भ्रष्ट असणें हाच बुद्धिभ्रंश समजावा आणि, (४) कामातुर व परस्त्रीरत असणें हाच सर्वेंद्रियभ्रष्ट समजावा.

**(३) वृद्धपरंपरेची मर्यादा रक्षावी : –**

(१) कुलाचार पाहावा. (२) देशाचार पाहावा. (३) श्लाघ्य संबंध करावा. आणि, (४) नीचाचे बुद्धीनें वागून कोणाची अमर्यादा करूंनये.

**(४) मिष्ट भाषण करावें : –**

(१) कोणाचे मनाचा विनाकारण भंग करूंनये, (२) अहित विचार सागूंनये. (३) दीर्घद्वेष धरूंनये. आणि, (४) मित्रांशीं कृत्रिम ठेवूंनये.

**(५) समाधानवृत्ति असावी : –**

(१) लाभ होईल तो ईश्वरास निवेदन करावा. (२) अभिमान धरूंनये. (३) पांडवांचा वनवास स्मरावा व तेथेंही त्यांनीं धर्म सोडला नाहीं हें समजावें. (४) गमावल्या वस्तूचा शोक करूंनये. आणि, (५) करावयाचें तें आधीं बोलूंनये.

**(६) लोकापवादाचें भय धरावें : —**

(१) पापाविषयीं. (२) अपमानाविषयीं. (३) शापाविषयीं. आणि, (४) अपयशाविषयीं.

**(७) शरीररक्षा असावी : —**

(१) आहार नेमानें करावा. (२) औषधी उपाय कार्याकारण करावे. (३) व्यायाम — घोड्यावर बसणें, तालीम वगैरे करणें, इत्यादि गोष्टींचा अभ्यास असावा. (४) इंद्रिये स्वाधीन ठेवावीं; म्हणजे त्यांचे स्वाधीन आपण कदापि होऊं नये. आणि, (५) चिंता न लागे असा धंदा करावा.

**(८) कुटुंबास आज्ञेंत ठेवावें : —**

(१) भयेंकरून. (२) स्नेहेंकरून. (३) नित्यकर्मांच्या अर्गलेंकरून (अडसरानें). आणि, (४) वडिलांचे शिक्षेंत लज्जायुक्त व मर्यादेंकरून.

**(९) स्वामित्वाचा गुण असावा : —**

(१) कुलवानाचें महत्व रक्षावे. (२) ठरविलेला पगार सेवकास द्यावा. (३) चांगल्या मंत्र्यांचे उपदेशावर विश्वास ठेवावा. (४) खजिना बाळगावा. (५) पुत्रवत् प्रजा पाळावी. (६) सेना

क्षीण करूंनये. (७) मित्र कोण व शत्रु कोण हें ओळखावें. (८) संपादिलेल्या कीर्तीचें संरक्षण करावें. (९) यथार्थवादी असे प्रधान करावे. (१०) सहिष्णुता असावी. (११) दुर्व्यसनी लोकांचे जो आर्जव करितो तो शत्रु समजावा. (१२) बंधुवर्ग आज्ञेंत ठेवावे, व प्रसंगीं योग्यता पाहून कामास पाठवावे. (१३) प्रतिज्ञा सत्य करावी. (१४) औदार्य व शूरत्व असावें. (१५) दुष्टाचें पारिपत्य करून शिष्टाचें संरक्षण करावें. (१६) सेवक जनांचे सुबुद्धी पुत्र पाहून त्यांस अश्वशिक्षेप्रमाणें लहानपणा पासून, ज्या व्यवहाराचें कारण आहे त्या व्यवहारीं, एकसारख्या शिक्षेनें तयार करावें. (१७) काम सांगून कसोटी पहावीं. (१८) एखाद्या मनुष्याचें इमान कसें आहे हें लक्ष्यांत ठेवावें. (१९) इमानी मनुष्यास योग्यतेस चढवीत असावें. (२०) धन्यापासून अमर्यादा, अयोग्य दंड, व अधर्म घडल्यास तो धनी प्रजेस मान्य होत नाहीं हे समजून, एक मर्यादा हीच सारी संपदा अशा निश्चयाने धर्म सोडूं नये; सर्वांस एक सारखी शिक्षा असावी; गरीब मातबर हा भेद ठेवूंनये. आणि, (२१) पदरचे मंडळींत एकमत असावें, नाहीं तर एकाचे शहाणपण एकास मिळणार नाहीं अशीं माणसे व्यर्थ श्रम करून बाळगल्यानें त्यांच्यानें कांहीं संरक्षण होणार नाहीं. यास्तव जागोंजाग पद्धती घालून काम चालवावें.

**(१०) स्वामिभक्ति असावी :—**

(१) राजपत्नीशीं एकांत करूंनये. (२) वारंवार लोभ धरूंनये. (३) कोणाशीं असत्य बोलूं नये. (४) समयीं शरीराची आशा ठेवूं नये. आणि, (५) आज्ञाभंग करूं नये. [जो ज्याचा धनी तो त्याचा राजा].

**(११) पुत्रांस सुशिक्षण द्यावें :—**

(१) देशाटनें करवावीं. (२) पंडितांचा समागम करवावा. (३) राजसेवा करवावीं. (४) शिक्षायुक्त विद्याभ्यास करवावा. आणि, (५) पुत्र शहाणे करण्याकरितां, द्रव्याचा हात आंखडूं नये.

**(१२) जमाखर्चीं वाकब असावें :—**

(१) धन्याचे आज्ञालेखाची मर्यादा रक्षावी. (२) संशययुक्त अक्षर लिहूं नये. (३) लबाडाचा संग नसावा. (४) केलेल्या व्यवहाराचें स्मरण ठेवावें. (५) जमाखर्चांत चूक राहूं देऊं नये. (६) मनुष्याची योग्यता समजून विश्वास ठेवावा. आणि, (७) सर्व प्रकारचे हिशेब शिकावे.

**(१३) मुत्सद्दी व राजकारस्थानी असावें :—**

(१) धनी आपला म्हणून त्याची आज्ञा उल्लंघन करूं नये. (२) धन्यापाशीं धन्याचे अहित गुप्त ठेवूं नये. (३) परदरबारचा गुप्त लाभ हा लाभ मानूं नये. (४) धन्यास कळलें नाहीं तें आपण संभाळावें, व समयीं त्यास निवेदन करावें. आणि, (५) अधिकार जतन करावा.

**(१४) न्यायनिष्ठुरता असावी :—**

(१) दुसऱ्याचें नुकसान जाणावें. (२) शास्त्रपारंगत ज्ञान असावें. (३) पुढे दोष येणार नाहींत असा विवादपूर्वक निश्चय करावा. आणि, (४) न्यायाचे कामांत पुत्रास व परकीयास समान मोजावें.

**(१५) मामलतींत शहाणें असावें :—**

(१) शेताची लावणी वाढवावी. (२) हप्त्याचा बद्दल अगाऊ घ्यावा. (३) रयत राजी राखावी. (४) निभावणी होईल अशी सरकार किफायत समजून करावी. आणि, (५) लोभ धरून सीमाहरण किंवा वृत्तिच्छेद करूं नये.

**(१६) व्यापारांत शहाणें असावें :—**

(१) नफा उदीमांत गुंतवूं नये. (२) फार नफा घेऊं नये. (३) मूर्खाशीं धंदा करूं नये.

(४) देणें घेणें आहारीं ठेवावें (५) नियमानें सत्य बोलावें. (६) उधार विसरू नये; मुदतीस वसूल घेत जावा. (७) कोणी बोलेल असें करूं नये. आणि, (८) भांडवल व पत फार सावधपणें जतन करावी.

**(१७) वतनांतील आचरण शुद्ध असावें : —**

(१) भोगवटा चालवावा. (२) खोटे वाद उभे करू नये. (३) दायादभाग वांटून द्यावा. आणि, (४) वडीलपणाचें स्वामित्व रक्षावें.

**(१८) सत्पुरुषाचा सन्मान करावा : —**

(१) जो काहीं एक परमार्थ आचरतो तो सत्पुरुष समजावा. (२) जो प्रपंच सात्विकबुद्धीनें करतो तोही सत्पुरुषच जाणावा. (३) जो एकनिष्ठ सेवक तोही सत्पुरुष होय. आणि (४) परोपकारार्थ तळीं बांधणें, अन्नछत्र घालणें इत्यादि कामें जो करतो तो सत्पुरुषच असें समजावें.

**(१९) पापद्रव्य मिळवूं नये :-**

(१) विश्वासघाताचें जें द्रव्य तें पापद्रव्य होय. (२) धन्याचें नुकसान करून मिळविलेलें धन तें. (३) चांडाळसंबंधाचें द्रव्य तें आणि, (४) अतिलोभानें नाकबूल जावें व अज्ञानास फसवावें अशा प्रकारें मिळविलेलें द्रव्य तें.

**(२०) व्यर्थ खर्च करूं नये :-**

(१) घर आपल्या पुरतें बांधावें. (२) धर्मकार्य होईल तें पक्कें करावें. (३) अन्न वस्त्र कुटुंबास सारखें द्यावें; व असेल त्यांत पुरवून खावें. (४) मिळविलें किती व खर्च केला किती हें नित्य नेमानें पाहावें. (५) प्रयोजनीं नेमस्त खर्च करावा; कर्ज करूं नये. आणि, (६) रांडबाजी व किमया आणि द्रव्य काढावयाचा उद्योग हीं करूं नये.

**(२१) दुष्ट व्यवहारी ओळखावा :-**

(१) आत्महितार्थ दुसऱ्याचा नाश करितो तो दुष्ट व्यवहारी होय. (२) अतिवाद घालून, खोटा कागद व खोटा व्यवहार करतो तो. (३) गाफल राहून बेवकुबीनें गमावितो तो. आणि, (४) भयभीत होऊन अवसान घालवितो तो.

**(२२) वरिष्ठांशी सख्य ठेवावें :-**

(१) विद्या व बुद्धीनें जो ज्यास्त तो बळानें वरिष्ठ. (२) द्रव्यानें वरिष्ठ. आणि, (३) तपाने वरिष्ठ.

**(२३) बंधूंस अंतर देऊं नये :-**

(१) सन्मान ठेवावा. (२) मर्मस्पर्श न करावा. (३) वंचना करवून देऊं नये. आणि, (४) द्वेषबुद्धि धरूं नये.

**(२४) परोत्कर्षाचें सहन करावें :-**

(१) सद्वंश ओळखावा. (२) चित्त प्रशस्त असावें. (३) आपला स्वभाव बरा किंवा वाईट हें ओळखावें. (४) विनय, गुण, व निपुणता हीं असावी. आणि, (५) जें आपल्यास योग्य तेंच आचरावें.

**(२५) नाशकर्ते ओळखावें :-**

(१) दीर्घसूत्री. (२) वाचाळ. (३) आळशी. (४) छद्मी. (५) कुचर. (६) कपटी. (७) द्वेषी. (८) अहंकारी. (९) लोभी. (१०) असत्यभाषणी. आणि, (११) तारीफ करणारे.

**(२६) मनुष्याचा गौरव करावा :-**

(१) द्रव्यानें. (२) सन्मानानें. (३) कृपावलोकनानें. व (४) प्रियभाषणानें.

**(२७) सेवकवृत्तीनें धनी आर्जवावे :-**

(१) धन्याचा राग सोसून घ्यावा. (२) गुणांनीं धनी वश करावा. (३) धनी होईल त्याचा

लाभ इच्छावा. (४) धन्याशीं गरमाहितीची गोष्ट बोलूं नये. (५) त्याची खोटी खुषामत करूं नये. आणि, (६) आज्ञेस कोणतेंही निमित्त सांगूं नये.

(२८) स्वरूपज्ञान असावें :–

(१) सदाचाऱ्याचें स्वरूप. (२) व्यवहारकर्त्याचें स्वरूप. (३) पराक्रमी पुरुषाचें स्वरूप. आणि, (४) गुणी व इतर सर्व कामांत कुशल असणाऱ्या लोकांचीं नानाविध. स्वरूपें ओळखून गुण मात्र ग्रहण करावे; बहकूं नये.

(२९) शरणागताचें संरक्षण करावें :–

(१) अन्यायी संकटापासून सोडवावे. (२) उपयोग असल्यास उच्छेदिलेल्याचें स्थापन करावें. (३) अज्ञानी व रोगी यांची दया करावी. (४) अभिमान धरून प्रतिज्ञा सत्य करावी; मग त्या निमित्त आपला प्राण ही खर्च झाला तरी चिंता नाहीं. (५) उपकार केले म्हणून त्याजबद्दल उदकप्राशनाची देखील इच्छा धरूं नये.

(३०) शिक्षा व प्रतिबंध अनुभवला असावा :–

(१) वडिलांची शिक्षा भोगिली असावी. (२) गुरुशिक्षेचा अनुभव असावा. (३) धन्याचे शिक्षेचा अनुभव असावा. (४) ईश्वरप्राप्तीनिमित्त दुष्कर्माचा प्रतिबंध बाळगावा. (५) ईश्वरी दंडाचा प्रतिबंध इच्छावा.

(३१) हिशेबाचा मोजबा वारंवार राखावा :–

(१) झाल्या खर्चाचा मोजबा धन्यास समजवावा व त्यांत अंतर नसावें. (२) अंतस्थ कांहीं असेल तें दाखवावें. (३) धनी देईल तें बक्षीस घ्यावें. आणि, (४) तफावतीचें काम करूं नये.

(३२) जाबसालीं शहाणें असावें :–

(१) सभाचातुर्य. (२) शास्त्रचातुर्य. (३) विद्याचातुर्य. आणि, (४) समयीं स्पष्टवक्तृत्व.

(३३) सारासार विचार करावा :–

(१) आपण शहाणे आहों तर आपणाप्रमाणें दुसरेही लोक शहाणे असतील, किंबहुना अधिकही असतील असें समजावें. (२) आपण मूर्ख असलों तर दुसऱ्यांचें शहाणपण मातींत जातें हें समजावें. (३) गरजवंताची अक्कल जाते हें समजावें. (४) गरज नाहीं अशा वस्तूची किंमत हलकी पडते. (५) जो आतुर आहे त्यास स्वहित व अहित समजत नाहीं हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें. आणि, (६) लोभानें बुद्धि शाश्वत राहत नाहीं व लोभ सर्व गुणांचा नाश करणारा आहे हें समजावें.

(३४) बंदोबस्ताच्या पद्धती लिहिलेल्या असाव्या :–

(१) धन्याजवळ कोणत्या कामास कसें रहावें याची पद्धत. (२) सरदारी फौजेसंबंधी कशी तजवीज करावी त्याबद्दल पद्धत. (३) पहाडी व भुईकोट किले व आरमार यांतील लोकांनीं कशी हिंमत धरून वर्तावें व कशी तरतुद ठेवावी त्या पद्धती. (४) शहरचा बंदोबस्त कसा करावा ही पद्धत. (५) न्यायसभेची पद्धत. (६) रयतेचे अधिकाराची पद्धत आणि, (७) यांशिवाय इतर व्यवहारपद्धती.

(३५) स्नानसंध्यादि षट्कर्मी लक्ष्य असावें :–

(१) आराध्य देवतेचें पूजन करावें. (२) स्नानसंध्यादि आन्हिक कर्म थोडे वेळांत करावें. (३) सामर्थ्यानुरूप सत्पात्रीं दान द्यावे. (४) निष्पाप असावें. (५) विद्येची वृद्धि करावी. (६) पुत्र व शिष्य आपलेपेक्षां शहाणे करावे. (७) ब्राह्मण भोजनादि यथाशक्ति करावीं. (८) भूतमात्राचे ठायीं दया करावीं. (९) पापक्षयार्थ ईश्वरभक्ति व परोपकार करावे. आणि, (१०) सच्चिदानंदनामस्मरणें करून ऱ्हृदय आनंदित असावे.

• •

# ऐतिहासिक गोष्टी

व

# उपयुक्त माहिती

## (भाग दुसरा)

हें पुस्तक

लोकहितवादी

यांनी रचिलें

त्याची ही दुसरी आवृत्ति

मुंबईत

जावजी दादाजी यांच्या

'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी

यांनी छापून प्रसिद्ध केली.

इ. स. १८९३

किंमत १२ आणें

## सूचना

लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहितीचे पूर्वी तीन भाग होते. त्या गोष्टींस क्रम म्हणून मुळींच नव्हता. कर्त्यांस जसजशा त्या आठवल्या तसतशा लिहिल्या व छापल्या गेल्या. त्या सर्व गोष्टी ग्रंथकर्त्याच्या परवानगीनें आम्हीं एकत्र करून त्यांस इतिहासक्रमाने शिस्त लावून पहिला भाग ऐतिहासिक गोष्टींचा व दुसरा भाग उपयुक्त माहितीचा असे दोन निरनिराळे भाग केले. त्यांत मूळांत क्वचित् ठिकाणीं थोडा फेरफार केला आहे, ठळक चुका दुरुस्त करून केल्या आहेत, व कांही गोष्टी लोकहितवादीकृत निबंधसंग्रहांतून संगती जुळविण्याकरितां घेतल्या आहेत. या गोष्टी वाचून वाचकांस ज्ञान व मनोरंजन यांची प्राप्ती होईल अशी आमची खात्री आहे.

**तुकाराम जावजी,**

'निर्णयसागर' छापखान्याचे मालक.

## दुसऱ्या भागाची प्रस्तावना

प्राचीनकाळच्या गोष्टी माहीत असल्यानें चातुर्य वाढतें. आणि संभाषणांत साहित्याचा भरणा होऊन तें ज्ञान बोधक व मनोरंजक होतें; व अशा गोष्टींचा संग्रह केल्यानें त्याही नष्ट न होतां पूर्वीचा इतिहास माहीत होतो. सारांशानें गोष्ट समजली तरी जे बुद्धिवान् व जिज्ञासू असतात ते ती विस्तारपूर्वक समजून घेण्याची इच्छा व यत्न करितात; परंतु अनेक उद्योगांमुळे मोठाले ग्रंथ वाचण्यास त्यांस अवकाश सांपडत नाही. अशा लोकांस अशा सारांशरूपानें गोष्टी समजल्यानें त्यांची जिज्ञासा तृप्त होऊन लहान विद्याभ्यासी मुलांसही त्या मनोरंजक होतील. असे अनेक उपयोग आहेत. यास्तव हा दुसरा भाग प्रसिद्ध केला आहे.

## तिसऱ्या भागाची प्रस्तावना.

ऐतिहासिक गोष्टींचा हा तिसरा भाग प्रसिद्ध करितांना येथे इतकें सांगितलें पाहिजे कीं, यांत ज्या प्रकरणाविषयीं थोडी माहिती दिली आहे त्या प्रकरणाची विस्तारपूर्वक हकीकत मिळविण्याची वाचकांस जिज्ञासा उत्पन्न होऊन त्या त्या गोष्टीविषयी ते अधिकाधिक शोध करतील प्रत्येक पदार्थांस व मनुष्यास इतिहास व आयुष्य ही आहेतच. त्यांत जे पदार्थ व जीं मनुष्यें चांगली त्यांचा इतिहास जाणण्यापासून आपलें ज्ञान व आपले सद्‌गुण वृद्धिंगत होतात. परंतु आपल्या या देशांत बहुत काळापासून सर्व उत्तम व उपयुक्त गोष्टींविषयी अत्यंत औदासिन्य असलेलें दिसतें व त्यापासून अल्पज्ञता, आलस्य व अविचार ह्या दुर्गुणांचें मनस्वी प्राबल्य झालें आहे. तें अंशतः हटवून देशबांधवांस कांही तरी उपयोग व्हावा या हेतूनें या अल्प माहितीच्या गोष्टी लिहिण्याचा आमचा यत्न आहे. त्याचें साफल्य होण्यास ईश्वरकृपा समर्थ आहे.

ज्ञान हें सर्व सन्मानाचें, पराक्रमाचें कलांचे व ऐश्वर्यांचें मूळ आहे. त्यांचा जेथें अभाव तेथें सर्वथैव ग्लानी दृष्टीस पडते. हत्तीस त्याचा यःकश्चित् महावत अंकुशानें टोंचितो, गुरांचे मोठमोठे कळप आठ वर्षांचें पोर वळवून आणितें, मारवाडी कुळंब्यांस छळीतच असतो; हे सर्व प्रकार अज्ञानजन्य होत. ही या देशाची ग्लानि दूर होऊन ज्ञानाची वृद्धि होणें अवश्य आहे. त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं. आजपर्यंत अन्नसत्रें, सदावर्तें, दक्षिणा व ब्राह्मणभोजनें बहुत खर्चानें चालत आलीं. परंतु त्यांपासून देशांत विशेष सुखोत्पत्ति झाल्याचें दिसत नसून उलट सर्व गोष्टींविषयी प्रारंभी लिहिल्याप्रमाणे औदासिन्य व आलस्य ही वाढून हा सर्व देश अज्ञानव्यापित झाला व परदेशांतील ज्ञान कोट्यावधि रुपये खर्च करून उसनें घेण्याची गरज पडली आहे. ही गरज ज्ञान वृद्धींवाचून सरणार नाही. व या हेतूस्तव हा अल्प प्रयत्न जिज्ञासू लोकांस नजर केला आहे.

**लोकहितवादी**

# अनुक्रमणिका


स्थलवर्णन

१. देवस्थानें. ... ... १
२. साडेतीन पीठें. ... २
३. चार धाम. ... ... २
४. पंच प्रयाग. ... ... ३
५. पंच सरोवरें. ... ... ३
६. सप्त पुऱ्या. ... ... ४
७. अष्ट गणपती. ... १०
८. द्वादश ज्योतिर्लिंगें. ... ११
९. यात्रास्थानें. ... ... १५
१०. मायजीची यात्रा. ... १७
११. बेचराजींचें स्थान. ... १७
१२. हरसुब्रह्माचें स्थान. ... १८
१३. पंजाबांतील यात्रेचीं ठिकाणें. ... ... १८
१४. क्षेत्रें. ... ... १८
१५. पाहण्यासारखी स्थळें. ... १८
१६. वार्षिक झरे व उन्हाळीं. ... १९
१७. लेणीं. ... २०
१८. हेमाडपंती इमारती. ... २०
१९. जयस्तंभ. ... ... २१
२०. भुयारें. ... ... २१
२१. बिनमूर्तींचीं देवळें. ... २२
२२. अजमीरचा पीर. ... २२
२३. गिरनार पर्वत.... २३
२४. पालिठाण्याचा डोंगर व देवळें. २४
२५. गुजराथेंतील देवळें. ... २४
२६. मणिराम पारखजींचीं मंदिरें. २५
२७. चांपानेर. .. ... २५
२८. द्वारका व छाप. ... २७
२९. झिंझुवाडा. ... ... २८
३०. अहमदाबाद प्रांतांतील पाहण्याचीं ठिकाणें. ... २८
३१. अहमदाबाद. ... ... २९
३२. भडोच. ... ... ३०
३३. विजापुर ... ... ३१
३४. पुणें शहर. ... ... ३१
३५. नासिक. ... ... ३३
३६. सह्याद्रि पर्वत. ... ३३
३७ अष्टागर प्रांत.... ... ३४
३८. हिंदुस्थानाचा विस्तार. ... ३४
३९. महानद्या. ... ... ३५
४०. सरस्वती नदी. ... ३५

लोकवर्णन

४१. ब्राह्मणांच्या जातीं. ... ३६
४२. सामवेदी ब्राह्मण. ... ३६
४३. सारस्वत, राजगिरे व औदीच्य ब्राह्मण. ... ३७
४४. पाटील कुळकर्णी. ... ३७
४५. ब्रह्मक्षत्रिय. ... ... ३७
४६. रजपूत. ... ... ३८
४७. भाट ... ... ३९
४८. प्रसिद्ध भाट. ... ... ३९
४९. लिंगाईत. ... ... ४०
५०. गुजराथेंतील कुळंबी. ... ४०
५१. तोडे लोक. ... ... ४१
५२. कावे लोक. ... ... ४२
५३. मुंबईची वस्ती. ... ४२
५४. गोंवेकरिणी कसबिणी. ... ४३
५५. भुताळे. ... . . ४३
५६. पारशी लोक. ... ... ४३

ग्रंथ, ग्रंथकार, साधुपुरुष वगैरे

५७. वेद ... ... ... ४४
५८. ब्राह्मणें ... ... ४४
५९. स्मृति ... ... ४४

६०. सूत्रें. ... ... ४५
६१. संहिता. ... ... ४५
६२. पुराणें. ... ४५
६३. अष्टादशपुराणसंख्या ... ४५
६४. पुराणांतील भेद ४६
६५. उपपुराणें. ... ... ५१
६६. वेदभाष्यें. ... ... ५१
६७. जुने ग्रंथकार. ... ... ५१
६८. टीका व भाष्यें. ... ५२
६९. पौरुष ग्रंथ. ... ... ५३
७०. देव व त्याजवरील ग्रंथ. ... ५३
७१. शास्त्रादि ग्रंथ. ... ... ५४
७२. ज्योतिषग्रंथ. ... ... ५४
७३. हेमाद्रि व माधव. ... ५५
७४. कमळाकरभट्ट. ... ... ५६
७५. आपय्यादीक्षित. ... ५६
७६. तवारीख फेरिस्ता म्हणजे हिंदुस्थानाचा इतिहास. ... ५६
७७. शाहनामा. ... ... ५७
७८. प्राकृत ग्रंथकार. ५७
७९. मुकुंदराज. ... ... ५८
८०. ज्ञानेश्वर. ... ... ५९
८१. एकनाथाचा वंश. ... ५९
८२. सातारा प्रांतांतील पाच साधु. ५९
८३. रंगनाथ स्वामी. ... ५९
८४. पंचकवि व साधूंच्या पुण्यतिथि. ६०
८५. साधुसंतांच्या समाधि. ... ६०
८६. गोरा कुंभार. ... ... ६०
८७. जयदेव ... ... ६०
८८. मिराबाई. ... ... ६१
८९. सूरदास. ... ... ६२
९०. तुळशीदास. ... ... ६२
९१. महिपतबोवा ताहराबादकर. ६२
९२. नारायणबोवा पिंपोडेकर.... ६३
९३. माणिकप्रभु. ... ... ६३
९४. देवमामलेदार.... ... ६३
९५. अक्कलकोटचे स्वामी. ... ६३
९६. लाला भगत. ... ... ६४
९७. साधूंचा हेतु. ... ... ६४
९८. मराठी ग्रंथकार. ... ६४


धर्म व धर्मप्रवर्तक


९९. धर्मसंस्थापक आचार्य. ... ६५
१००. शेणव्यांचे स्वामी. ... ६५
१०१. शंकराचार्य. ... ... ६५
१०२. शंकराचार्यांचे मठ. ... ६६
१०३. रामानुजस्वामी. ... ६६
१०४. रामानुजांची परंपरा. ... ६७
१०५. रामानुजांचे मठ. ... ६८
१०६. निंबार्क. ६८
१०७. बंगाल्यांतील वैष्णव. ... ६९
१०८. राधावल्लभी पंथ. ... ७०
१०९. जोगी पंथ. ... ... ७०
११०. कबीरपंथ. ... ७१
१११. कबीराचे शिष्य व त्याचे ग्रंथ. ७२
११२. दादू पंथ. ... ... ७२
११३. वल्लभी पंथ. ... ... ७२
११४. वल्लभाचार्य. ... ७३
११५. मलूकदासी पंथ. ... ७४
११६. मध्वाचार्य. ... ७४
११७. जोतीपंत भागवत. ... ७४
११८. स्वामीनारायण. ... ७५
११९. माधवगिरीचा पंथ. ... ७६
१२०. शिख. ... ७६
१२१. वाममार्गी. ... ... ७७
१२२. शाक्तमत. ... ७७
१२३. भास्करराव शाक्त. ... ७७
१२४. भक्तिपंथ व त्यास वेदाचा आधार. ... ... ७८
१२५. शैव व वैष्णव मतें. ... ७८
१२६. आखाडे व गोसांवी. ७९
१२७. पंथ. ... ... ७९
१२८. जैन व रोमन क्याथलिक. ७९
१२९. मुसलमान लोक व मुसलमानी धर्म. ... ... ७९
१३०. पारशी लोक, त्यांच्या चालीरीति, धर्म व पुरातन ग्रंथ यांविषयी माहिती. ... ... १००
१३१. इस्रायल लोकांविषयीं माहिती. ११२
१३२. शीक लोकांविषयीं माहिती. ११२

किलीएक चाली, रीति

१३३. बाहेरवटे. ... ... १२०
१३४. त्रागा व झासा. १२०
१३५. निरनिराळ्या लोकांच्या रामराम नमस्कार वगैरे करण्याच्या रीति. ... ... १२०
१३६. मुद्रा. ... ... १२६
१३७. बोध करण्याच्या रीति ... १२६
१३८. धर्मापासून अनर्थ. ... १२६
१३९. वाईट चाली. ... १२७
१४०. अल्प वयांत लग्नें. १२७
१४१. हिंसा व बळी. ... १२८
१४२. स्त्रिया. ... ... १२८
१४३. मुली मारून टाकण्याची रीति १२९
१४४. सती. ... ... १२९
१४५. दासी व दास. ... १३०
१४६. मरीया. ... ... १३१
१४७. जुलूम. ... ... १३१
१४८. हिंदूंच्या गैर चाली. ... १३२

उपयुक्त माहिती

१४९. चार संप्रदाय. ... १३४
१५०. चार धर्म. ... ... १३४
१५१. पंच बदरी. ... ... १३४
१५२. ब्राह्मणांची षट्कर्मे. ... १३४
१५३. मुसलमानांचे सात नमाज. १३४
१५४. सप्तऋषि. ... ... १३५
१५५. आठ चिरंजीव. ... १३५
१५६. अष्टविवाह. ... ... १३६
१५७. नवग्रह. ... ... १३६
१५८. नवरत्नें व पाषाण. १३६
१५९. विक्रम सभेतील नवरत्नें. १३७
१६०. नवविधा भक्ति. १३८
१६१. त्रयोदश पुत्र. ... १३८
१६२. चोवीस अवतार. ... १३९
१६३. लोकांचें अज्ञान. ... १३९
१६४. पाखांडें ... ... १३९
१६५. जुना इतिहास ... १४०
१६६. परदेशीं गमन. ... १४०
१६७. हिंदूंचें सोंवळें. ... १४०
१६८. ब्राह्मणांस अवश्य माहिती. १४१
१६९. माहात्म्यें ... ... १४१
१७०. वाद. ... ... १४१
१७१. जैन. ... ... १४२
१७२. जैन ब्राह्मणांचे वेद. ... १४२
१७३. निरनिराळे मार्ग. ... १४२
१७४. पोकळ ग्रंथ. ... १४२
१७५. पिरान्पीर. ... १४३
१७६. ठिकठिकाणचे पुजारी. १४३
१७७. राम व हनुमान् यांच्या मूर्तीचे प्रकार. ... ... १४४
१७८. अधिक मास. ... १४४
१७९. भ्रष्टक्षत्रिय. ... १४४
१८०. स्त्रियांची योग्यता. ... १४५
१८१. वेदांचे महत्त्व. ... १४५
१८२. ऋषि. ... ... १४५
१८३. अग्निहोत्री. ... १४६
१८४. पुजारी. ... ... १४६
१८५. उपाध्याय ... १४७
१८६. सोन्याचे नाणें. ... १४७
१८७. धातु व पाषाणांच्या खाणी. १४९
१८८. शालग्राम. ... ... १५०
१८९. दगड. ... ... १५०
१९०. नौका व त्यांचे भेद. ... १५१
१९१. कोळ्यांची नांवें. ... १५१
१९२. धान्यें. ... ... १५१
१९३. तांदुळांच्या व गव्हांच्या जाती. ... १५२
१९४. जोंधळ्याच्या जाती. ... १५२
१९५. रानभाज्या. ... १५२
१९६. पवित्र पदार्थ. ... १५३
१९७. लोखंडाच्या जाती. ... १५३
१९८. कापसाच्या जाती. ... १५३
१९९. लुगडीं. ... ... १५४
२००. मापें. ... ... १५४
२०१. गणित. ... ... १५४
२०२. धर्म. ... ... १५४
२०३. वैद्यक. ... ... १५४
२०४. गायन. ... ... १५४
२०५. गायनांतील राग. ... १५५

२०६. नारायण व ब्रह्म शब्दांचा उपयोग. ... ... १५६
२०७. घोड्यांचे रंग. ... १५६
२०८. सापांच्या जाती. ... १५७
२०९. पिशाचें. ... ... १५७
२१०. ललित. ... ... १५७
२११. अविद्या. ... ... १५८
२१२. वेदोक्तजलप्रलयाची गोष्ट. १५८
२१३. हिंदूंचे सण. ... १५९
२१४. ईश्वरी शक्ति. ... १६०
२१५. जगातील स्त्रीपुरुषमर्यादा. १६०
२१६. टॉलेमी व त्याने काढलेला नकाशा. ... ... १६१
२१७. व्यास. ... ... १६१
२१८. तामस पुराणें व स्मृति. १६१
२१९. ढोंगी लोक. ... १६२
२२०. अघटित कल्पना. ... १६३
२२१. ईश्वरप्रार्थना हेंच औषध. १६४
२२२. व्याख्याते व उपदेशक. १६४
२२३. लांचेची बंदी. १६५
२२४. कावसजी पाटील पार्शी. १६५
२२५. बाबाजी तुळशीराम सोनार. १६५
२२६. पुनर्विवाहप्रतिपादक. ... १६६
२२७. कृष्णंभट पुराणिक. ... १६६
२२८. भिकोबा जोशी साष्टीकर. १६६
२२९. विद्यार्थ्यांची लोकहितबुद्धि. १६७
२३०. सुधारलेले मागें हटले! १६७

## कितीएक उपदेशपर गोष्टी

२३१. स्थावर व जंगम तीर्थे. १६७
२३२. दुर्योधनाचा आग्रह. १६८
२३३. कलावंतिणीचें योग्य मत. १६८
२३४. अडक्यास हत्ती. ... १६९
२३५. एका म्हाताऱ्याचे योग्य विचार. १६९
२३६. बिरबलाचें योग्य उत्तर. १७०
२३७. अकबर व एक पंडित. १७०
२३८. अकबरबादशाहाच्या काहीं गोष्टी. ... ... १७१

## किरकोळ टिप्पणें

२३९. गुजराथेंतील काळ. ... १७३
२४०. प्रसिद्ध पुरुषांच्या मृत्युतिथी. १७३
२४१. विधवांचे पुनर्विवाह व त्यांच्या तारखा. ... ... १७३
२४२. प्रार्थनासमाज स्थापनाच्या तारखा. ... ... १७४
२४३. ध्यानांत ठेवण्यासारख्या कितीएक गोष्टी व त्यांच्या तारखा. ... ... १७४

# ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती (भाग दुसरा)

## स्थलवर्णन

### १ देवस्थानें

या देशांत देवस्थानें बहुत आहेत. साडे तीन पीठें, चार धाम, पंच प्रयाग, पंच केदार, पंच बदरी, सप्त पुऱ्या, अष्ट विनायक, अष्टसिद्ध, अकरा ज्योतिर्लिंगे, आणि बारा महा नद्या इत्यादि. यांशिवाय किरकोल देवस्थानें आहेत तीं :— एकलिंगजी; नाथद्वार; येथील मूर्ति गोवर्धनावर होती. वल्लभचार्यपंथांत हें स्थान मुख्य आहे. झाडखंडी वैजनाथ हा कलकत्त्याजवळ आहे; गोकर्ण महाबळेश्वर कारवार जिल्ह्यांत आहे; पशुपतेश्वर नेपाळास; मुक्तनाथ-जेथें शाळिग्राम निघतात तें व दामोदरकुंड आणि अमरनाथ हीं काश्मीरांत; तप्तमणिकर्णिका व ज्वालामुखी पंजाबांत; रेवाळेश्वर; कुरुक्षेत्र; त्रिस्थळी म्हणजे प्रयाग, काशी व गया हीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. बेचराजी, अंबाजी व उत्कंठ महादेव हे गुजराथेत; प्रसिद्ध आहेतः ब्रह्मकपाट हिमालयांत, व्यंकटेश व कार्तिकस्वामी कर्नाटकांत धरणीधर गुजराथेंत; परशुराम चिपळोणास (कोंकणांत); कन्याकुमारी, पद्मनाथ व श्रीरंग कर्णाटकांत, शंभूमहादेव, जोतीबा, महाबळेश्वर, खंडोबा, पंढरपूर हीं दक्षणेंत, दर्भशयन, अनंतशयन, अमरकंटक, जनार्दन, मीनाक्षी, हंपी विरुपाक्ष हींही कर्नाटकांत आहेत; कामरूप बंगाल्यापलीकडे कामाक्षी देवी आहे.

### २ साडेतीन पीठें

देवीचीं पीठें चार आहेत; परंतु त्यांस ३॥ पीठेंच म्हणावयाचा पाठ आहे. जुने मराठी भाषेंत त्यांस औटपीठही म्हणतात.

·॥· कोल्हापूरची महालक्ष्मी;

१ तुळजापूरची भवानी;

१ मातापूरची रेणुका, परशुरामाची आई; आणि

१ जोगाईचे अंब्याची योगेश्वरी. ही चित्तपावन ब्राह्मणांची कुलस्वामिनी आहे.

### ३ चार धाम

चार धाम म्हणून यात्रेची चार ठिकाणें आहेत तीं :— केदार, रामेश्वर, जगन्नाथपुरी आणि द्वारका. यांपैकीं दोन धाम विष्णूचे आहेत; व दोन शिवाचे आहेत. स्मार्त हे बदरीकेदारास जातात व वैष्णव हे बदरीनारायणास जातात. केदाराचे वाटेनें पंच केदार व पंच प्रयाग आहेत.

चार धामांची यात्रा केली म्हणजे बैरागी मोठें श्रेष्ठत्व पावतो; मग तो कोणतेही जातीचा असला तरी त्याच्या हातचें सर्व बैरागी खातात, व महंत करणें असेल तर त्यासच करितात. बैरागी म्हणतात कीं, आम्हास जाति नाही; कारण हरिभक्त हे सर्व एकाच जातीचे आहेत. त्यांचा शुक्लवर्ण, अच्युत गोत्र आणि अनंत शाखा असें ते म्हणतात.

(१) बदरीकेदार हा श्रीनगरपासून ८० कोसांवर हिमालयांत आहे. याचें माहात्म्य सूतसंहितेंत आहे. या बदरीकेदारापासून ८० कोसांवर आहे त्यास बदरीनारायण म्हणतात. केदार व नारायण हे बैलखदि आहेत.

(२) रामेश्वर हा दक्षिणेंत मद्रासपासून ६० कोस आहे. येथें दोन सागरांची मर्यादा मानितात पश्चिम व दक्षिणेकडून आला आहे तो रत्नागिरीचा समुद्र व पूर्वेकडून आला आहे तो महोदधि समुद्र होय. या सेतूचें दर्शनमाहात्म्य असें लिहिलें आहे कीं,

शतयोजनविस्तीर्णं शतयोजनमायतम् ।
रामचंद्रसमादिष्टं मलसंचयसंचितम् ॥
सेतुं दृष्ट्वा ससुद्रस्य ब्रह्महत्यां व्यापोहतु ॥ (पराशरस्मृति.)

(३) जगन्नाथ या देवाचें देऊळ ज्या गांवांत आहे त्या गांवास पुरी म्हणतात. या प्रांतास उडसा (ओढीसा) किंवा उत्कलदेश म्हणतात व तो कलकत्त्यापासून ८० कोस आहे. येथें जगदीश्वर म्हणजे कृष्ण, बलदेव व सुभद्रा यांच्या कलेवर मूर्ति आहेत. या देवाचें देऊळ फार मोठें असून त्याचे शिखरावर वैष्णवी सुदर्शनचक्र स्थापन केले आहे. तेथें नैवेद्याच्या नेमणुका इतक्या आहेत कीं, त्यांचे अन्न सर्व गांव खाऊन उरतें म्हणून तें विकतात व वाळवून प्रसाद म्हणून वांटतात. त्याविषयीं असें म्हणतात :– 'जगन्नाथका भात, जग पसारे हात !' कोणाकडील दोन मण तांदुळाचा नैवेद्य व कोणाचा दहा शेरांचा, अशा नेमणुका देवास फार आहेत. आणि त्यामुळें येथें अन्न फार शिजलें जातें. इतक्या अन्नाचा नाश न व्हावा म्हणून त्यास दोष नाहीं असें ठरविलें आहे; व त्यामुळें सर्व वर्णांचे लोक तें अन्न विटाळ न मानतां एकादशीचे दिवशींही खाऊन एकादशी मानीत नाहींत !

(४) द्वारका हें क्षेत्र एक धाम आहे. या देवळांत रणछोडजी व विक्रमजी यांच्या मूर्ति असून कुशेश्वरमहादेवाचें देऊळही तेथेंच आहे.

## ४ पंच प्रयाग

पंच प्रयाग म्हणून जे म्हणतात ते हे होत :— यांत मुख्य लेटी व अलकनंदा या दोन नद्यांचा संगम जेथें आहे त्यास (१) विष्णुप्रयाग म्हणतात; पिंडार नदी व अलकनंदा या दोन नद्या जेथें मिळतात. त्यास (२) कर्णप्रयाग म्हणतात; मंदाकिनी व अलकनंदा जेथें मिळतात त्यास (३) रुद्रप्रयाग म्हणतात; भागीरथी व मंदाकिनी जेथें मिळतात त्यास (४) देवप्रयाग म्हणतात; यमुना व गंगा मिळतात त्यास (५) भूतप्रयाग व साताऱ्याजवळ कृष्णा व वेण्णा मिळतात त्यास सन्मानार्थ (६) दक्षिणप्रयाग म्हणतात.

## ५ पंच सरोवरें

या हिंदुस्थानांत पंच सरोवरें यात्रेची ठिकाणें आहेत :—

(१) नारायणसरोवर कच्छ देशांत भूज शहरापासून चाळीस कोस व द्वारकेहून मांडवी बंदरास गेलें म्हणजे तेथून जवळच आहे.

(२) पुष्करराज, हें अजमीरपासून तीन कोस आहे. तेथील ब्राह्मणांस पुष्कर ब्राह्मण किंवा पोखणें म्हणतात. शिवाय तेथें छनात नांवाचे ब्राह्मणही आहेत. छनात म्हणजे सवाई जयसिंगानें एकत्र केलेल्या सहा ज्ञाती, त्या :– (१) खंडेलवाळ, (२) गौड, (३) सारस्वत, (४) दायमा,

(५) पारीख व (६) पुष्करणे. यांची एक पंगत करून त्यांनी क्षत्रियांचें अन्न घ्यावें असें ठरविलें पुष्कर हें सरोवर डोंगरांत असून त्यांत पाणी फार खोल व उत्तम आहे. या क्षेत्रीं देवळे फार आहेत. त्या नजीकच ज्येष्ठ, कनिष्ठ व मध्यम असे तीन पुष्कर आहेत.

(३) बिंदुसरोवर, हें अहमदाबादेपासून ३० कोसांवर सिद्धपूर येथें आहे. त्यास मातृगया म्हणतात. कारण कीं, येथेंच कपिलमहामुनि यांनीं आपली देवहूती माता इजला ज्ञान सांगून मोक्षास नेले. तेथें जे तिचे अश्रू पडले त्यांचेंच हे सरोवर आहे असें म्हणतात. ते लहान आहे. या गांवी सरस्वती नदी आहे ती फार सुंदर आहे. सिद्धराज जयसिंग म्हणून जो पाटणचा राजा झाला, त्यानें येथे घांट व रुद्रमाल म्हणून चमत्कारिक इमारत बांधली आहे. परंतु ती हल्लीं पडीत आहे.

(४) पंपासरोवर, हे कर्नाटकांत किष्किंधेजवळ आहे; आणि

(५) मानससरोवर हिमालयांत आहे. परंतु त्याचा ठिकाण लागत नाहीं.

## ६ सप्त पुऱ्या

सप्त पुरी म्हणून सात पवित्र नगऱ्या धरिल्या असून तेथे लोक यात्रेकरिता जातात. त्या पुरींचीं नांवे : –

> अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका ।
> पुरी द्वारवती चैव सप्तैता मोक्षदायकाः ॥

यांचे अनुक्रमे वर्णनः –

(१) अयोध्या ही काशीपासून तीस कोस रेल्वेचे मार्गावर आहे. हा मार्ग औंध व बुंदेलखंड रेल्वे कंपनीनें केला असून तेथून नजीकच लखनौ आहे. अयोध्येजवळ तीन कोसांवर फैजाबाद म्हणून एक मुसलमानी शहर आहे. अयोध्या हा सर्व गांव राममंदिरांनीं भरला असून तेथें हनुमंतगढीं म्हणून मारूतीचें देऊळ आहे तेथें बैरागी राहतात. या ठिकाणाजवळच रामचंद्राचें जन्मस्थान म्हणून एक आहे. परंतु त्याजवर आतां मुसलमानांनी मशीद केली आहे; याजमुळे बैरागी व मुसलमान यांची नेहमी तक्रार चालत असते. तसेंच, तेथें दुसरें त्रेताराम म्हणून एक ठिकाण आहे. शिवाय स्वर्गद्वार या नांवाचा एक घाट असून तेथें शरयू म्हणून मोठी नदी आहे. येथें चोवीस अवतारांचें एक देऊळ आहे. हा मुलुख फार उत्तम आहे तरी येथें भिकारी फार आहेत. येथें सरवरिये ब्राह्मणांची मोठी वस्ती आहे. या गावांपासून दहा कोसांवर स्वामीनाराण यांचे छपय्या म्हणून गांव असून तेथें एक मोठे मंदिर बांधले आहे. अयोध्येस वानर पुष्कळ आहेत.

(२) मथुरा हें शहर यमुनेच्या कांठी असून त्याची शोभा फार उत्तम आहे. मथुरेंत आदिवराह, आदिकेशव इत्यादींचीं देवळें व मंदिरे पुष्कळ, सुरेख आणि मजबूत आहेत. तेथें यमुना नदीत कासवें पुष्कळ आहेत. याजमुळें यमुनेची मूर्ति काढावयाची असल्यास ती कच्छावर काढतात; व गंगेची मगरारूढ काढितात. कारण, गंगेमध्ये मगर फार आहेत. येथें विश्रामघांट म्हणून एक मुख्य घांट आहे. या गांवांत सर्व चोबे राहतात व कोठे दहा वीस दक्षिणी ब्राह्मणांची घरें आहेत. या शहरास दिल्लीचे रस्त्यावर हात्रस म्हणून स्टेशन असून त्या गांवापासून रेल्वेची शाखा पंधरा कोस नेली आहे. यमुना नदीच्या कांठीं मथुरेंतील दगडी घरांची शोभा काशीसारखी उत्तम दिसते. हा मुलुख फार रसाळ आहे. या प्रांतास व्रिज (व्रज) म्हणतात. मथुरेपासून जवळच डीग, भरतपूर, आग्रा हीं शहरें असून तेथें जाट लोकांची वस्ती पुष्कळ आहे. मथुरेपासून एका बाजूस तीन कोसांवर गोकुळ व दुसरे बाजूस वृंदावन आहे. वृंदावनांतही देवळें मोठीं व उत्तम आहेत. मथुरेंत वैष्णवमार्गी बंगाली लोक पुष्कळ येतात. येथें नित्यानंदमहाप्रभुजी म्हणून वैष्णवांचा गुरु झाला

त्याचें देऊळ आहे. शिवाय पारखजी यांचे श्रीरंगाचें देऊळ असून ती साठ लाख रुपयांची इमारत आहे. या गांवांत कदंब, कालियामर्दन, रमणरेती, वगैरेक्र ष्णलीलेची ठिकाणें दाखवितात. रमणरेतीची माती घेऊन वैष्णव कपाळी लावितात. याचप्रमाणें गोकुळ हें ठिकाणही जुनें असून तेथें नंदाचा वाडा व यमलार्जुन, ब्रह्मांडघाट, वसुदेवांनी श्रीकृष्णास गोकुळीं आणिलें ती वाट वगैरे अनेक बाळलीलेची ठिकाणें दाखवितात. गोकुळाजवळ वल्लभाचार्यांचे वंशज गोसांवी महाराज यांनींही एक स्वतंत्र गोकुळ केले असून तेथें त्यांची घरें आहेत. शिवाय, या ब्रिज प्रांतात गोवर्धन व वर्साणा म्हणून राधेचें गांव इत्यादि बहुत ठिकाणें चौऱ्यांयशी कोसपर्यंत आहेत. त्यांची प्रदक्षिणा वैष्णव लोक चार महिने राहून करितात. तेव्हां ते सर्व जमून मोठा संघ काढितात व त्या वेळीं त्यांजबरोबर रासधारी नांवाचे नाटककार असून ते दरएक ठिकाणचीं सोंगें घेऊन कृष्णलीला दाखवितात. ह्याप्रमाणें गोकुळ हे वैष्णव व त्यांतही विशेषेंकरून वल्लभपंथी लोकांचें मोठें ठिकाण आहे. मथुरेस जरासंधाच्या बायका सती गेल्या तद्दर्शक एक बुरूज आहे. या मथुरायात्रेचें माहात्म्य वल्लभवंशानें फार वाढविलें असून पूर्वी इतकें प्रसिद्ध नव्हतें असें म्हणतात.

(३) मायापुरी म्हणजे हरिद्वार; हें साहरणपूरचे स्टेशनापासून वीस कोसांवर आहे. तेथें गंगानदी आहे. या गांवीं गोसांवी, वैरागी व उदासी यांचा मेळ फार मोठा भरत असून संक्रांतीचे पर्वणीस प्रथम स्नान करण्याचा जो मान हल्लीं गोसांव्यांकडे आहे तो त्यांनी पूर्वी १८०४ मध्यें लढून मिळविला. येथें पूर्वी दिल्लीचे बादशाहाचा अंमल होता. पुढे तें ठिकाण शिख लोकांकडे गेलें, नंतर वीस वर्षेपर्यंत महादजी शिंद्यांकडे होतें आणि नंतर इंग्रजांनीं घेतलें. येथें जे गोसांवी व बैरागी यांचे बडे बडे मेळे भरतात त्यांत दहा दहा लक्ष लोक प्रत्येक मेळ्यांत असतात. पूर्वी त्यांचा विवाद सोडण्यास अदालत किंवा राजे असमर्थ होते. याजकरितां शिंद्यांचे कारकीर्दीत गोसांवी व बैरागी यांजमध्यें जेव्हां तंटा पडला तेव्हां सरकारी बंदोबस्त कच्चा असल्यामुळे त्यांस असें सांगण्यात आलें कीं, तुम्ही आपसांत लढून श्रेष्ठ कोण हे ठरवावें. त्याजवरून ते उभयतां वर लिहिल्याप्रमाणे १८०४ मध्यें लढले. त्यांत बैरागी व गोसांवी मिळून पंधरा हजार लोक मेले आणि गोसांव्यांची फत्ते झाली. तेव्हांपासून गोसांवी हेच प्रथम स्नान करितात. हल्लीं इंग्रजीत चांगला बंदोबस्त असतो याजमुळे विशेष तंटा होत नाहीं. याप्रमाणे गोसांवी व बैरागी म्हणजे शैव व वैष्णव यांचे मेळे उज्जनी त्रिंबक प्रयाग वगैरे ठिकाणीं जमतात तेथेंही त्यांचे मोठाले तंटे पडतात. परंतु तेथेही स्नानाचा अग्राधिकार गोसांवी यांजकडेच आहे. बैरागी हे वैष्णव असून त्यांचा सात्विक धर्म याजमुळें त्यांचा उपाय चालत नाहीं व याजकरितां त्रिंबक व उज्जनी येथें बैरागी मुळींच येत नाहींत. तसेंच, ज्या देवांस बळिदान होतें त्या ठिकाणींही बैरागी जात नाहींत. हिंगळाज माता, अंबाजी, विंध्यावासिनी, काली, वगैरे ठिकाणीं बैरागी जात नसून गोसांवी मात्र जातात.

(४) काशी हे क्षेत्र तर सर्वप्रसिद्ध आहे. तेथें जो संकल्प करितात तो असा :– 'अविमुक्तवाराणसीक्षेत्रे आनंदवने महास्मशाने गौरीमुखे त्रिकंटकविराजिते भागीरथ्यां पश्चिमे तीरे' इ. हें क्षेत्र शिवनिर्मित आहे असें काशी खंडांत वर्णन आहे. वैष्णव म्हणतात कीं, हें अयोध्यानगरीचें स्मशान होतें. भागीरथीचे दक्षिणतीरी रामनगर हें राजधानीचें शहर असून त्यास व्यासकाशी असे नांव आहे. परंतु त्यास शिवांनीं शाप दिला आहे असें म्हणतात. काशीक्षेत्री पुरातन असें कांहीं दिसत नाहीं, परंतु मुसलमानांनीं मुख्य स्थानें बहुतेक तोडून त्यांजवर मनोरे बांधले आहेत ह्यामुळे जुनीं स्थल मोडलेंीं असावीं. सारनाथ मात्र पुरातनचा आहे तरी पुढे मराठ्यांचे राज्यांत या क्षेत्रास ऊर्जितावस्था प्राप्त झाली ती अद्यापि आहे. काशीस महाराष्ट्र ब्राह्मणांची वस्ती चार पांच हजार आहे, काशीचें वर्णन शेरिंग साहेब नामक एका पाद्री गृहस्थानें फार चांगले लिहिलें आहे ते पाहिले असतां जिज्ञासूंची इच्छातृप्ति होईल.

(५) तुंगभद्रातीरी शिवकांची व विष्णुकांची ही क्षेत्रे आहेत. या शिवाय एक जैनकांचीही आहे.

(६) अवंतिका म्हणजे उज्जनी. हे क्षिप्रानदीचे तीरीं विक्रमाच्या राजधानींचें पुरातन शहर आहे. परंतु ते आतां पडीत झालें आहे. येथें महाकाल म्हणून शिवलिंग असून ते पूर्वी मुसलमानांनी फोडिलें होतें असे म्हणतात. परंतु तो महादजी शिंद्यांनीं स्थापिला. उज्जनी हें माळव मुलखाचें मुख्य शहर आहे.

(७) द्वारका ह्या चार आहेत; एक गोमती द्वारका, ही स्मार्तांची व बेट द्वारका ही वैष्णवांची आहे. शिवाय, कोडीनार ही मूळची द्वारका होय असें म्हणतात; आणि डाकोरासही द्वारकेची मूर्ति आहे असें म्हणतात; एकूण चार द्वारका झाल्या. गोमती द्वारकेस शंकराचार्यांचा शारदामठ आहे हें वर एके ठिकाणी सांगितलेंच आहे. तेथें एक डोकीयेवढें उंच असें श्रीयंत्र स्थापन केलें आहे. येथील देऊळ विश्वकर्म्यानें बांधिलें असें म्हणतात. येथें जी गाइकवाडांची गादी आहे तीस 'उग्रसेनाची गादी' म्हणतात. मुसलमानी धांदलींत बोडाणा रजपूत यानें या देवळांतील मूर्ति उचलून डाकोरास आणिली ती परत गेली नाहीं. पुढे स्थिरस्थावर झाल्यावर शंकराचार्यांनी द्वारकेचे देवळांत नवीन मूर्ति बसविली. तेथेंच शंकराचार्यांची गादी आहे. हें पाहून वल्लभाचार्यांचे पुत्र विठ्ठलनाथजी यांनीही असें सांगितलें कीं, 'मला स्वप्नांत विहिरींत श्रीकृष्णमूर्ति आहे ती स्थापावी असा दृष्टांत झाला.' असें सांगितल्यावर त्याप्रमाणे ती मूर्ति सांपडली तेव्हां तिची स्थापना गोमती द्वारकेपासून दहा कोसांवर दर्यांत जें द्वारका बेट आहे तेथें केली. ह्या बेटद्वारकेंतील हें मंदिर मर्यादी, म्हणजे वल्लभाचार्यांचे रीतीप्रमाणे पांच वेळ पूजा व पांच वेळ दर्शन मात्र व्हावयाचें असून इतर वेळेस देऊळ बंद असतें आणि ह्याच रीतीप्रमाणें जें देऊळ असेल त्यास मर्यादी असें म्हणतात; व जेथें सर्व वेळ दर्शन होते त्यास स्मार्त रीतीचें मंदिर म्हणतात. तेथें शंखोद्धार वगैरे अनेक तीर्थे असून अष्टनायकांची वगैरे देवळेंही पुष्कळ आहेत. येथें भाट्ये, वाणी, लवाणे वगैरे वैष्णव फार येतात. येथे गोसांवीमहाराजांचे शिष्यांचा अधिकार विशेष आहे. वैष्णवांचे छप्पन्न भोग वगैरे करणें तर येथेंच करितात. येथें देवाचे पैशाचीं दुकानें असून तेथें पैसाही फार आहे. या द्वारकेस जातांना दर्याचे कांठी आरमुडे म्हणून एक गांव असून तेथें तप्तमुद्रा देतात. त्याचे जवळच गोपीतलाव म्हणून एक गांव असून तेथे चार कोस भूमि सर्व गोपीचंदनाची आहे व त्यामध्यें एक तलावही आहे. येथें मुद्रा देण्याचा सांप्रदाय पीपाभगत म्हणून होता त्यानें काढिला असें म्हणतात. येथें मिराबाईचे मंदीर आहे. गोमती द्वारकेत गाइकवाडी मामलेदार राहतात व तो गांव मोठा आहे. गोमती द्वारकेची गोमती नदी ही खारे पाण्याची असून हें गांव बंदरही आहे. ज्या प्रांतांत ही द्वारका आहे त्यास उखामंडळ असें नांव आहे. हा प्रांत वाईट व खडकाळ असून त्यांत वाघीर लोकांचीं वस्ती आहे, वाघीर हे क्षत्रिय वंशज असून त्यांस काथेही म्हणतात. त्यांनीच कृष्णाचें राज्य घेतलें. पुढे ते १८०२ सालीं दर्यांत जहाजें घालून चोऱ्या वगैरे करूं लागले याजमुळें इंग्रज व गायकवाड हे एकत्र होऊन त्यांनीं त्यांचा प्रांत घेतला व त्यास पेन्शनें दिलीं. पुढें आलीकडे १८५६ सालीं ह्या वाघीरांनी पुनः दंगा केला व त्यांनी आपल्या प्रांतांतून गाइकवाडी मामलेदार पळवून लाविला. तेव्हां गायकवाडांनी इंग्रज सरकारची मदत घेऊन वार्टन साहेब याचे साह्यानें तो दंगा मोडून वाघीरांचे गांव उजाड करून टाकिलें. त्यांनी दहा वर्षे हा दंगा केला होता व त्यांत दोन्ही द्वारकेचें सर्व धन लुटीस गेले होतें परंतु देऊळ मात्र कायम राहिलें. हें देऊळ फार सुंदर व उंच असून तें पांच कोसांवरून दिसतें. द्वारकेस जाणें तें कोणी दर्यांतून जातात, कोणी राजकोटावरून जातात व कोणी पंचतीर्थी करीत दर्याचे कांठानें जातात. पंचतीर्थींत पहिले तीर्थ तुळशीश्याम. हें गीर पर्वतांत असून तेथे गोड्या पाण्याचीं उष्णकुंडे आहेत; दुसरें तीर्थ सोरटींसोमनाथ; तिसरें पोरबंदर

ऊर्फ सुदामपुरी; चौथें माधवपूर, येथे मधुवनांत श्रीकृष्णाचा व रुक्मिणीचा जो विवाह झाला आहे त्याचें बहुलें आहे; आणि पांचवें द्वारका क्षेत्र.. या वाटेनें गिरनार म्हणून एक वर्तलीशिखर आहे. गीर हा पर्वत चाळीस कोस लांब असून त्याचे एक शिखर उंच आहे त्यास गिरनार म्हणतात. त्याजवर श्रावक लोकांचीं देवळें आहेत व अंबाजी, दत्तात्रय वगैरे कांहीं हिंदूंचीही देवळें आहेत. या पर्वताचे खालीच अशोक राजाचा सुमारे २३०० वर्षांचा दगडावर कोरलेला जुना लेख आहे. त्या नजीकच भूतनाथमहादेव, दामोदरकुंड व गोसांवीमहाराजांची बैठक आहे गिरनाराखाली जुनागड म्हणून एक शहर असून तेथील राजा नबाब आहे. तो पूर्वी यादववंशीय हिंदु होता असे म्हणतात; परंतु अहमदाबादेस मुसलमानी राज्य झाले त्यावेळेस तो मुसलमान झाला. या प्रांतांत ज्या भागांत जुनागड आहे त्यास काठेवाड म्हणतात. हा प्रांत फार उत्तम असून त्यांत नद्या व डोंगर बहुत आहेत. तिकडे कापूस फार पिकत असल्यामुळें तेथील राजाचें उत्पन्न पूर्वीपेक्षां सहापट अधिक झालें आहे. गाइकवाडी अमलांत या प्रांतांत फार खराबी होती. त्या प्रांतांतील सर्व राजे गाइकवाडास खंडणी देत असून जुनागडचे राजासही पेषकष देतात. या प्रांतांत पोरबंदर जोडीया, वेरावळ, घोगो, भावनगर वगैरे शेंकडों बंदरे आहेत. हल्ली हा प्रांत सुखी आहे असें म्हणतात. यांत इंग्रजांचा एकही गांव नाहीं. परंतु राजकोटास पोलिटिकल एजंट याचें ठाणें आहे. पूर्वी यादवांचे वेळेस हा प्रांत एक बेट होतें. त्यांतच यादवांनीं वस्ती करून कृष्ण भगवान यांनी राज्य केलें. परंतु आतां समुद्र हटून गेला याजमुळे गुजराथेस हा प्रांत लागला आहे. तरी तेथे नळकंठा म्हणून समुद्राची जागा आहे त्या प्रांतासच लागून कच्छ देश आहे. तेथील वाणी, मेमण. वगैरे आफ्रिकाखंडांत, अरबस्तानांत व झांजिबार प्रांतीं वगैरे अनेक ठिकाणीं व्यापारास जातात. काठेवाडांत पालीटाणें म्हणून श्रावक लोकांचे एक मोठें देवस्थान भावनगराजवळ आहे. या देशांत स्मार्त, वैष्णव, बीजमार्ग, श्रावक, स्वामीनारायण, वल्लभाचार्य वगैरे धर्म चालतात. पूर्वी या प्रांतीं गायकवाडाची मोठी फौज असून त्याच्याछावण्या माणिकवाडा, अमरोळी, द्वारका, या ठिकाणीं होत्या व अद्यापिही तेथें थोडे बहुत लोक आहेत. या प्रांतास सौराष्ट्र असें नांव आहे; परंतु त्यास काठेवाड म्हणावयाचें कारण हें कीं, यांत काठी लोक राहतात.

## ७ अष्ट गणपती

पुणें प्रांतीं अष्टगणपती आहेत, त्यांची नावे :-

स्वस्ति श्रीगणनायको गजमुखो मोरेश्वरे सिद्धिदं
बल्लाळे मुरडो विनायक माहा चिंतामणिस्थेवरे।
लेण्याद्रौ गिरिजात्मकं सुवरदं विश्वेश्वरं ओझरे
ग्रामे रांजणसंज्ञके गणपतौ दद्याद् द्वयोर्मंगलम् ॥

## ८ द्वादश ज्योतिर्लिंगें

पुढील श्लोकांत बारा ज्योतिर्लिंगे वर्णिलीं आहेत :-

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैल्यं मल्लिकार्जुनम्
उज्जयिन्यां महाकालं ओंकारममरेश्वरम् ॥
केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरम् ।
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ॥
वैजनाथ चिताभूमौ नागेशं दारुकावने ।
सेतुबंधे तु रामेशं घृष्णेशं च शिवालये ॥

त्यांचें अनुक्रमें वर्णन :-

(१) सोमनाथास वेरावळ बंदर, सोमनाथपट्टण व प्रभास पाटण अशीं तीन नांवें असून हें क्षेत्र जुनागडच्या नबाबाचे राज्यांत काठेवाडांत समुद्रकांठी आहे. सोमनाथाचें प्राचीन देऊळ मुसलमानांनी लुटून त्याची मशीद केली; ते देऊळ अद्यापि तसेंच चुना लावलेलें ओसाड पडलें आहे. परंतु दुसरें देवालय अहल्याबाई यांनी बांधलें असून त्यास गाइकवाडाचे नामांकित दिवाण विठोबा देवाजी यांनी चार हजारांचीं इनामें वगैरे दिलीं आहेत. त्याजमुळें त्या देवस्थानास चौघडा व बरीच सेवकमंडळी असते. येथें समुद्र असून हेंच तीर्थ आहे. तेथें दुसरी एक हिरण्य-नदी असून याच नदीवर सर्व यादव मेले ती जागा दाखवितात. तसेंच तेथें श्रीकृष्णास बाण लागला ती जागा (भल्लुकाक्षेत्र) व त्यांनीं देह विसर्जन केला ती जागाही आहे. परंतु हल्ली तेथें नबाबाने एक मशीद बांधिली आहे. शिवाय सर्व गांवात शिवाचीं हजारों दगडी देवळें आहेत. यांजवरून ही शिवपुरी पूर्वी मोठी असेल असें वाटतें. येथे खाणींतील दगड फार चांगले निघतात. त्यांचीं देवळे व घरें होऊन विटांप्रमाणे त्यांचा उपयोग होतो. मुसलमानांनी मुख्य देऊळ लुटलें, परंतु त्याशिवाय जीं हजारों देवळें आहेत तीं तशींच राहिलीं असून तीं मोडावयास एक युग पाहिजे असे दिसतें आणि याच अडचणींमुळे ती तशींच राहिलीं आहेत. तरी आतां काही देवळें जुनीं होऊन पडलीं आहेत. सोमनाथाचे नवे देवळांत नर्मदेंतील दोन हात उंचीचा मोठा भव्य बाण बसविला आहे.

(२) श्रीशैल्य मल्लिकार्जुन हें प्रसिद्ध स्थल कृष्णानदीचे कांठीं निजामाचे राज्यांत असून श्रीशैलांचें देऊळ लहान आहे. हें क्षेत्र हल्ली आगगाडीच्या कृष्ण (स्टेशना) पासून पंचवीस कोस पडतें.

(३) महाकाल हा उज्जनी शहरीं आहे. हें शहर विक्रम राजाच्याही पूर्वीचें असून त्यास दोन हजार वर्षावर वर्षे झालीं. हल्लीं तेथें शिंदे सरकारचा अंमल आहे; व येथे क्षिप्रा नदी आहे. हें देऊळ विच्छिन्न झालें होतें तें महादजी शिंदे यांनी पुन्हां बांधले.

(४) ओंकार मांधाता या ज्योर्तिलिंगाचे देऊळ नर्मदेत एका खडकावर आहे. हें पूर्वी मांधाता म्हणून कोणी सूर्यवंशी राजा होता त्यानें बांधलें असें म्हणतात.

(५) बदरी केदार हा हरिद्वारापासून वर शंभर कोस आहे. तेथें एकंदर पंचबद्री असून त्यांत हा मुख्य आहे. येथें बदरीनाथाचे पुजारी राउळ ब्राह्मण आहे. आलीकडे येथून बारा कोसांवर शंकराचार्यांनीं ज्योतिर्मठ स्थापन केला असून तेथें ज्योतीश्वर महादेव आहे. केदारावर बर्फ फार पडतें यामुळे सहा महिन्यांनी जेव्हां उष्णकाळामध्यें उन्हानें तें विरून जातें तेव्हां त्या देवळास जाण्याला वाट होते आणि त्यावेळीं तेथें जाऊन पुजारी दरवाजा उघडतात तेव्हां यांज-बरोबर यात्रेकरी जातात, व पुनः संध्याकाळीं परत येऊन ज्योतिर्मठांत राहतात. या प्रांतांचे गरवाळ व कामाऊ असें नांव आहे. येथें कमिशनर असून तेथील राजा श्रीनगरचा आहे.

(६) भीमाशंकर हा खंडाळ्याचे घांटाजवळ डोंगरावर असून त्याजपासून भीमानदीचा उगम आहे. हें देऊळ नाना फडणविसांनीं बांधलें. त्या देवालयाचे रानास डाकिनीवन असें म्हणतात.

(७) विश्वनाथाचें देऊळ काशीस आहे. त्याचे जुन्या देवळाची तर मशीद झाली आहे, परंतु अर्धा भाग अद्यापि राहिला असून त्याच्या शेजारींच नवा विश्वनाथ स्थापन केला आहे. विश्वेश्वर-देवालयाचे शिखरावर रणजितसिंगानें सोन्याचा पत्रा बसविला आहे. व तेथें जवळच ज्ञानवापी वगैरे आहेत. येथून पुढें मैलभर मानमंदीर म्हणून सवाई जयसिंगानें ज्योतिषाचे शोधांकरितां बांधलेली वेधशाळा आहे. काशीस बौद्धांचे सारनाथ हें प्रसिद्ध ठिकाण आहे. काशीची सर्व वस्ती मराठी राज्यांतच झाली असून पूर्वीची काय तीं दोन चार ठिकाणें मात्र आहेत. बाकी सर्व घांट शिंदे, होळकर, पेशवे यांनींच बांधले असून घरेंही त्याच कारकीर्दीतील आहेत. येथें शिवालयें तर बहुत आहेत. याजवरून ही पूर्वापार शिवपुरी होती असें अनुमान होतें. काशी हें गंगेचे कांठी

मोठें भव्य शहर असून येथील सर्व घरें दगडी आहेत व ते दगड लांकडासारखे उपयोगी पडतात. काशींतील मुख्य देव पुढील श्लोकांत वर्णिले आहेत :—

विश्वेशं माधवं धुंडिं दंडपाणिं च भैरवम्।
वंदे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिकाम्॥

येथें कबीर व रामानंद यांचा संवाद झाला तें ठिकाण आहे; हरिश्चंद्र राजा डोंबाचे घरीं चाकरीस राहिला त्याची मठी आहे; व शिवालय नांवाच्या घांटावर गोंसाव्यांचा आखाडा आहे. येथें घांट पुष्कळ आहेत; शहरांतील रस्ते फार अरुंद असून नव्या सडका झाल्या आहेत; सरकारी कारखाने वगैरे शहरापासून दूर दूर बसले आहेत; येथें फार मोठी संस्कृत पाठशाळा असून तींत प्रसिद्ध बापुदेव शास्त्री, बाळशास्त्री रानडे, प्रमदादास बाबू, वगैरे मोठे मोठे विद्वान् गुरु आहेत. काशींत पुस्तकालय (लायब्ररी) ही चांगलें आहे. काशीची गंगानदी (भागीरथी) ही फार मोठी असून दक्षिणच्या पंचवीस नद्यांयेवढी विस्तृत आहे. शहरच्या दाट वस्तीमुळें घांटांजवळ पाणी मळकट असतें म्हणून पलीकडच्या तीरचें पाणी आणतात, किंवा वर सांगितलेल्या शिवालय घांटाकडील आणितात. येथें अन्नछत्रें तर बहुत आहेत. येथें नेहमीं यात्रा पुष्कळ येते व येथें सर्व प्रकारचे ब्राह्मण राहतात. हा प्रदेश फार चांगला आहे तरी येथें उन्हाळा फार तीव्र आहे. बौद्धानें आपला धर्म प्रथम येथेंच उपदेशिला. त्याचाच वर लिहिलेला सारनाथ म्हणून प्रसिद्ध बुरूज आहे. येथें कस्तूरी व कापडाचा व भांड्याचा व्यापार मोठा आहे.

(८) त्रिंबकराज हें ज्योतिर्लिंग पूर्वी अंजननेरीस असून तद्दर्शक तेथें शिवाचीं देवळें फार आहेत. पण ह्या देवाचें देऊळ मुसलमानी कारकीर्दीत लुटलें गेलें. पुढें सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे यांनीं त्रिंबक या गांवामध्यें नवी जागा योजून तेथें प्रस्तुतचें देऊळ बांधिलें. त्यांत लिंगस्थापन नसून देवाचे ठिकाणीं एक उखळासारखा खळगा आहे. त्रिंबकाचे आलीकडे अंजनी म्हणून गांव असून तेथें हनुमंताची माता राहत होती असें म्हणतात. हा गांव पूर्वी मोठी शिवपुरी असावी असें अनुमान होतें म्हणून वर म्हटलेंच आहे. येथील देवळें शके हजारामध्यें बांधलीं असे त्याजवर लेख असून त्यांतील कांहीं देवळें जैनांचीं असावीं असेंही दिसतें; आणि त्याच सुमारास नासिकचीं लेणीं झालीं असावीं. त्रिंबकास नारायणनागबळी म्हणून एक कर्म करण्याकरितां पुष्कळ लोक जातात. हें कर्म म्हणजे प्रेतास सद्गति देण्याचा विधि आहे. ज्या कोणास भ्रांति पडते कीं, आपले कुळांत कोणी पिशाच होऊन आपल्या कुटुंबांतील मनुष्यांस उपद्रव करितो, त्याची क्रिया करणें, याचें नांव नारायणनागबळी, हा केला म्हणजे तो मृत मनुष्य माननेल्या पिशाचयोनींतून मुक्त होतो अशी भोळ्या लोकांची समजूत आहे!

(९) वैजनाथ यास परळी वैजनाथ असेंही म्हणतात. हा निजामाचे राज्यांत आहे.

(१०) अवंढ्यानागनाथ हाही निजामाचे राज्यांतच आहे.

(११) लंकेस जाण्याकरितां रामचंद्रांनीं सेतु म्हणजे पूल बांधला तेव्हां त्याजवळ रामचंद्रांनी श्रीरामेश्वराची स्थापना केली अशी पुराणप्रसिद्ध आख्या आहे. हल्ली रामेश्वर हा बेटांत असून त्याचें मोठें देऊळ आहे. त्या बेटांत वस्तीही मोठी आहे. या सेतूजवळच्या समुद्रांतील वाळू प्रयागास गंगेत नेऊन टाकतात व प्रयागच्या गंगोदकाच्या कुप्या भरून रामेश्वरास स्नान घालतात. असें करण्यांत फार पुण्य आहे, असें जाणून स्वतांकरितां किंवा भाड्यानें लोकांकरितां बहुत लोक उद्योग करितात, असा उद्योग करणारांस कावडीवाले म्हणतात. ग्वाल्हेर, इंदूर, बडोदें या ठिकाणीं अशा कावडीवाल्यांचा रोजगार पुष्कळ आहे. कोणी दोनशें रुपयांस रामेश्वरास कावड पोंचविण्याचा मक्ता करितात, आणि जे कोणी ओंकारेश्वरास घालतात त्यांस पन्नास साठ रुपयांचा मक्ता देतात. कित्येक कावडीवाले कावडी भरून तेथें विकण्यासही आणतात.

(१२) घृष्णेश्वर म्हणून निजामाचे राज्यांतच औरंगाबादेजवळ वेरूळगांवी शिवलिंग आहे. त्याचा पूर्वी उच्छेद झाला असल्यामुळें हल्लीं अहल्याबाईनीं नवीन बांधला आहे. या देवाचे पाठीमागें डोंगर असून त्यात अद्‌भुत लेणीं आहेत. ही लेणीं कारलें, कान्हेरी, घारापुरी, शिवनेरी, नासिक इत्यादि ठिकाणी जीं लेणीं आहेत त्यापेक्षां फार मोठी आहेत. यांचे बरोबरीचीं दुसरीं लेणीं अजंठ्याचे घांटांत फर्दापूरचे डोंगराजवळ आहेत. त्यांस खानदेशांतील पाचोरा स्टेशनावरून मार्ग असून तीं स्टेशनापासून २० कोसांवर आहेत. या वेरुळच्या लेण्यांस काय खर्च लागला असेल याचें अनुमानच होत नाहीं! येथें अजमासें दहा पंधरा लेणीं आहेत, तीं सर्व डोंगर कोरून केलीं असून तीं अजमासें दोन हजार वर्षांपूर्वीं, जेव्हां इकडे बौद्ध धर्म चालत होता त्या काळी जैन साधूंस राहण्यास त्या काळचे राजांनी केलीं असावीं असे अनुमान आहे. बौद्धाचे देवळास चैत्य व धर्मशाळेस विहार असें म्हणतात. गुजराथींत त्यास देहरू आणि अपाश्रय अशीं नावें आहेत. वेरुळाजवळ दौलताबाद म्हणून किल्ला आहे; त्याचें पूर्वींचें नाव देवगिरी असें होतें. तेथें जाधव राजे असून त्यांस मुसलमानांनी पादाक्रांत केलें तरी त्यांचा वंश हल्लीं देऊळगांवीं राहतो. त्या वंशातीलच रामदेव जाधव व जगदेवराव जाधव हे तर प्रसिद्धच आहेत. याच जाधवाचे दिवाण हेमाडपंत हे असून त्यांचे हेमाद्रीनामक पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. देवगिरी येथील बालाजीस 'कानगो'चें उत्पन्न सुमारें लाख रुपये असून शिवाय जाधवांस देशमुखीचें उत्पन्न आहे.

## ९ यात्रास्थानें

हिंदुस्थानांत यात्रेचीं ठिकाणें फार आहेत. त्यात कांहीं स्नानाचीं, कांहीं दर्शनाचीं व कांहीं श्राद्धादिक करण्याचीं असून त्यांतही कांहीं सर्व लोकांची, कांहीं मतवाल्यांची, व काहीं प्रांतांतील लोकांची अशा भेदानें आहेत. गया हें सर्वांचें क्षेत्र; गधडें हे स्वामीनारायण पंथाच्या लोकांचें; रामदासी लोकाचें परळी हें स्थान; तसेंच पलिटाणें हें जैनांच्या यात्रेचें ठिकाण; छत्तीसगड हें कबीरपंथी लोकांचे; व आलंमाप्रभु लिंगाईत लोकांचें पवित्रस्थान. यांशिवाय कांहीं स्थानें जातिविशेषाकरितांच प्रसिद्ध आहेत :-- परशुराम चित्तपावन ब्राह्मणांचा; अहमदाबादेजवळ असणारी उंझामाता ती तिकडील कडवे कुळंबी मात्र पूजितात. देवांमध्ये देखील कांहीं धनगरांचे देव, कांहीं महारांचे देव, काहीं वाण्यांचे देव असे भेद आहेत. कांहीं ठिकाणीं पंढरपुराप्रमाणें मूर्तीच मुख्यतः पूज्य असतात; कांहीं ठिकाणीं नासिकाप्रमाणें विशेष माहात्म्यें असतात; कांहीं ठिकाणीं देहू, आळंदी वगैरे ठिकाणांप्रमाणें सत्पुरुषांच्या समाधीच यात्रास्थानाला कारण असतात. नैमिषारण्य, दशाश्वमेध, कुरुक्षेत्र, वगैरेंसारखीं कांहीं स्थलें पूर्वीं मोठाल्या गोष्टी घडल्यामुळें पुण्यक्षेत्रें झालीं आहेत. राजापुरची गंगा, उन्हाळीं, ज्वालामुखी वगैरे स्थलें हीं कांहीं चमत्कारिकपणामुळें लोकांस पूजार्ह होतात. याप्रमाणें जशीं स्थळें पवित्र धरलीं आहेत तसे कालही पवित्र धरले असून त्यांचीं माहात्म्यें वर्णिलीं आहेत. कार्तिकमाहात्म्य, एकादशीमाहात्म्य वगैरे हीं पवित्र कालाचीं उदाहरणें होत. कितीएक ठिकाणी शूद्र वगैरे मात्र बलि देण्याकरितां जातात. तीं स्थलें कोंढणपूर, विंध्यावासिनी, कलकत्याची काली वगैरे आहेत. कांहीं ठिकाणें भुतें व रोग काढण्याकरितां म्हणून प्रसिद्ध आहेत. नरसोबाची वाडी, सातान्याजवळ निंबचा कोटेश्वर वगैरे ठिकाणें ह्या संबंधी प्रख्यात असून तेथें सेवेकरितां शेकडो लोक जातात. नैमिषारण्य हें लखनौजवळ असून त्यास नीमसारही म्हणतात. तेथें द्वादश संवत्सरपर्यंत सत्र होऊन सूतांनीं पुराणें सांगितलीं. कोंकणास परशुरामक्षेत्र म्हणतात; दंडकारण्यास रामक्षेत्र म्हणतात; वऱ्हाडांत तापीचा उगम आहे तेथें व रामेश्वराचे दक्षिणेस कन्याकुमारी, वसईजवळ निर्मळक्षेत्र, हंपी विरुपाक्ष, उडपि सुब्रह्मण्य, अष्ट-विनायक, शाखांबरी, एलमा देवी इत्यादि अनेकशः यात्रांची ठिकाणें आहेत. कित्येक ठिकाणें नद्यांचे उगम, संगम व मध्य हेच विशेष ठरविले असल्यामुळें तेथें लोक जातात.

सर्वत्र सुलभा गंगा त्रिपु स्थानेपु दुर्लभा । हरिद्वारे प्रयागे च गंगां सागरसंगमे ॥

याप्रमाणें सर्व नद्यांचे उगम, मध्य व मुखें ठरविलीं असून त्यांत प्रत्येक ठिकाणच्या लोकांनीं आपआपल्या क्षेत्रांचे, नद्यांचे आणि देवांचें माहात्म्य श्रेष्ठत्वानें वर्णिलेले आहे : —

काश्यां माघे च यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलम् । तत्फलं समवाप्नोति साभ्रमत्यावगाहनात् ॥

साभ्रमतीमाहात्मय, पद्मपुराण.

दक्षिणाभिमुखीं गंगा यत्र देवो नृकेसरी । तत्र श्रीविजयो तीर्थे काश्यां शतगुणं भवेत् ॥

गोदातीरीं कुशतर्पण गांवाचें माहात्म्य.

याचप्रमाणें काशीस दंडण, प्रयागी मुडण व गयेस पिंडण असें ही त्या तीन स्थलींचें माहात्म्य आहे व हीच त्रिस्थली किंवा तिरस्थळी होय.

## १० मायजीची यात्रा

मायाजी म्हणून एका पाटलाची मुलगी होती ती सती गेली. तिचे देवळाजवळ मायजीची जत्रा म्हणून दरसाल मोठी यात्रा व त्या संबंधीचा मोठा बाजार भरत असतो. ही यात्रा एकसारखी महिनाभर असते.

## ११ बेचराजीचें स्थान

अहमदाबादेपासून २७ कोसांवर बेचराजी म्हणून एक देवीचें देऊळ आहे. ती देवी पूर्वी एका झाडाखालीं होती. पुढें गाइकवाडांचे दिवाणांनीं तेथें मोठें देऊळ बांधिलें, व त्यास कांहीं इनाम दिलें आहे. ही बाई एका राजपुतांची मुलगी असून ती आपल्या सासऱ्यास जात असतां मुसलमानांनीं धांदल करून तिचे पाठीमागें कांहीं स्वार लाविले. जेव्हां त्यांनी तिला धरण्याचा बेत केला व ती पुढें घोड्यावर बसून पळत असतां, आतां उपाय नाहीं, व स्वार तर जवळ आले असें तिनें पाहिले, तेव्हां ती आपले पोटात कटार मारून घेऊन तेथें एक वरखडीचें झाड होतें त्याखालीं उतरून बसली तों तिचा प्राण गेला. तीच देवी म्हणून लोकांत प्रसिद्ध झाली. पुढें वल्लभभट म्हणून एक कवि होता, त्यानें तिचें देवीरूपानें वर्णन करून कविता केली आणि तेव्हापासून तिची फार प्रसिद्धी झाली.

## १२ हरसुब्रह्माचें स्थान

श्रीकाशीक्षेत्रापासून कांहीं अंतरावर कर्मनाशा म्हणून नदी आहे. तिचे कांठीं चेनपूर म्हणून एक गांव आहे. त्या गांवांत पूर्वी राजा होता. तेव्हां त्या राजानें तेथील हरसुब्रह्म या नावाच्या ब्राह्मणाचें घर जबरीनें घेतलें. म्हणून तो ब्राह्मण राजाचे दारीं उपास करून मेला. ह्याचें हल्लीं मोठें देवस्थान झालें आहे व तो देव बहुतांस पावतो अशी ख्याति आहे. याजमुळें त्यास पुष्कळ नवस होतात, व तेथें यात्राही फार भरत असते.

## १३ पंजाबांतील यात्रेचीं ठिकाणें

पंजाबांत यात्रेचीं ठिकाणें आहेत तीं:—अनंतनाग, वेणीनाग, शेषनाग, हिंदुकुश, शारकादेवी, हरीपर्वत, नरसिंगकटास, जमदग्न्याश्रम, बडी ज्वालामुखी, रामतखत, भरतजन्म, अचलतीर्थ, चित्तपूर्णादेवी, जेनादेवी, त्रिलोकनाथ, जनकमैल, त्रिसंध्याकुंड, रुद्रसंध्या, दूधगंगा, भैरवघाटी, कमलसर, केसरकुंड आणि अमृतसर (येथें नानकगुरूचें देऊळ आहे).

## १४ क्षेत्रे

दत्तात्रयाचीं ठिकाणें गांडगापूर, औदुंबर, गिरनार व मातापूर अशीं आहेत. नरसिंहाच्या जागा नृसिंहपूर-भीमा व नीरा संगमीं, नरसोबाची वाडी-कोल्हापुराजवळ आहे. हीं स्थलें, अशींच वाई, माहुली, कऱ्हाड वगैरे ब्राह्मणवस्तीमुळें व कृष्णानदीमुळें क्षेत्रें आहेत.

## १५ पाहण्यासारखीं स्थळें

या देशांत पाहाण्यासारखी ठिकाणें बहुत आहेत. मोठे मोठे नदीसंगम-जसे, गंगायमुनेचा प्रीतिसंगम प्रयागास आहे, कृष्णेचा व कोयनेचा संगम कऱ्हाडास आहे, कृष्णेचा व वेण्येचा माहुलीस आहे, तसाच गोदावरी व प्रवरा यांचा संगम टोक्यास आहे आणि कृष्णा व भीमा यांचा संगम कांणूरास आहे, इत्यादि अनेक चमत्कारिक ठिकाणें आहेत. जबलपुरापासून ६ कोसांवर नर्मदेचे दोन्ही तटाकीं तर पांढराच दगड असून त्यामधून पाणी वाहतें, त्यामुळें ती जागा फारच चमत्कारिक व पाहण्यासारखी आहे. या दगडाच्या अनेक वस्तू करून जबलपूरचे स्टेशनावर पुष्कळ विकावयास येतात.

## १६ वार्षिक झरे व उन्हाळीं

कोंकणांत राजापूर येथें एक वार्षिक झरा आहे, तो माघांत प्रगट होतो, व दोन महिन्यांनीं जातो. त्यास राजापूरची गंगा म्हणतात. महिकांठ्यांत डाकुरापलीकडे गळतेश्वर महादेव म्हणून आहे, त्याचे जवळ उन्हाळीं फार आहेत; डाकुराजवळ लसुंद्रा आहे, तेथे १७ उन्हाळीं कुंडें आहेत; भिवंडीजवळ वज्रेश्वरीचीं ऊन व गोड पाण्याचीं कुंडें आहेत; सुरतेजवळ देवकीकुंड म्हणून ऊन पाण्याचा झरा आहे, आणि काठेवाडांत तुळशीशामाजवळ गोड पाण्याचें उष्ण कुंड आहे. नाशकाजवळ टाकेद म्हणून गांव आहे तेथें जटायूची समाधि असून तेथें सर्वतीर्थ म्हणून एक मोठा झरा आहे. तो कुंडांत येऊन बाहेर वहात आहे. त्या सर्वतीर्थाविषयीं अशी एक आख्यायिका आहे कीं, श्रीरामचंद्रांनीं जटायूचे मरणसमयीं सर्व तीर्थें येथें आणिलीं. कावनई किल्ल्याखालीं एक झरा आहे त्यास कपिलधारा म्हणतात. वांईजवळ पांचगणींस एक महादेव आहे, त्यांतून गंगा म्हणून पाण्याची धार वाहते. खटाव देशांत एरळा नदीचे कांठीं नागनाथ आहे. त्याचें दर्शन घेण्यास तर मोटा लावून पाणी काढून टाकावें लागतें तेव्हां त्याचें दर्शन होतें. त्या देवळांत नेहमीं पुरुषभर पाणी असतें. पुण्याजवळ बनेश्वर महादेवाचे देवळांतही पाणी फिरविलें आहे. त्याचप्रमाणें वांईजवळ लोहाऱ्यास भीमाशंकर आहे त्यांतही पाणी फिरविलें आहे. महाबळेश्वरास एक मोठा झरा आहे, त्यास पंचगंगा म्हणतात. भोराजवळ अंबवडें येथील नागनाथ म्हणून एक स्थान आहे तेथेंही पंचगंगा आहे. या दोन्ही ठिकाणीं साताऱ्चे अनगळ नाईक, सावकार यांनीं देवळें बांधलीं आहेत.

## १७ लेणीं

पूर्वी या देशांत बौद्ध धर्म फार चालत होता. त्या काळी बौद्ध साधूंस राहण्याकरितां मोठाले विहार व मूर्तीकरितां देवळें केली आहेत. त्यांस 'चैत्य' असें नांव आहे. या देवळांपैकीं कितीएक देवळें भूमींत व कितीएक डोंगरात आहेत. तीं अतिशय अद्भुत आहेत, व त्यांस खर्च किती लागला असेल याचाही हिशेब लागत नाहीं. त्याजवर बहुतकरून प्राचीन लेख आहेत. परंतु ते कांहीं आतां कोणास वाचतां येत नाहींत. या डोंगरावरील विहारास लेणीं म्हणतात. तीं औरंगाबादेजवळ वेरूळ म्हणून गांव आहे तेथें फार उत्तम आहेत. तशींच पाचोरा स्टेशनापासून वीस कोस फर्दापूर म्हणून आहे तेथें आजंठा घांट आहे तेथेंही फार मोठी व उत्तम लेणीं आहेत. शिवाय नाशकाजवळ एक धर्मराजाचें लेणें व दुसरें चाभारलेणें अशी दोन लेणीं आहेत. त्याचप्रमाणें मुंबईनजीक घारापुरी येथें एक आहे. नाणेघाटांत व शिवनेरीसही हीं लेणी आहेत; तुलशीतलावाजवळ कान्हेरीचीं लेणीं तर प्रसिद्ध आहेत; खंडाळ्याजवळ कारलें येथें वेहेराईचें लेणें आहे; आणि सर्वाहून श्रेष्ठ अशीं वेरूळचीं लेणीं तर सर्वप्रसिद्ध आहेत.

## १८ हेमाडपंती इमारती

या देशांत जो जुनीं कामें आहेत त्यांस हेमाडपंती किंवा पांडवांची कृत्यें असें म्हणावयाची वहिवाट आहे, परंतु अशा सर्वच इमारती त्यांच्या नसून त्या पृथक् पृथक् जैन व शैव राजांनी

बांधलेल्यां आहेत. या मासल्याची कामें कल्याणाजवळ अंबरनाथ या गांवाचे सीमेंत अंबरनाथ नामक महादेवाचें देऊळ आहे. हें फार चमत्कारिक असून चुन्यावांचून दगडावर दगड रचून बांधिलें आहे. त्यांत कारागिरी व कोरणीचें काम फारच चांगले आहे. हें देऊळ शके ९८० मध्ये बांधलें असें म्हणतात. याचप्रमाणें पुण्यापासून १३ कोसांवर येवतगांवचे डोंगरावर माळशिरसचे सीमेंत बोलेश्वरांचे देऊळ आहे. कसबे सिन्नर येथें गांवाबाहेर असेंच एक महादेवाचें देऊळ आहे. व त्याचप्रमाणें पुरंदराखालीं नारायणपुर म्हणून गांव आहे तेथेंही एक देऊळ आहे. त्रिंबकेश्वराचा गोदानदीचा घाट, करवीरचें अंबाबाईचें देऊळ. पंढरपुरचे विठोबाचें देऊळ, ही सर्व जुनीं असून चमत्कारिक व पाहण्यासारखीं आहेत. हीं सर्व देवळें हेमाडपंतांचे कारकीर्दीतील आहेत. यावरून त्या काळी म्हणजे शके १२०० चे पूर्वी चुना लावण्याचे ठाऊक असेल असें दिसत नाहीं. परंतु पुढें मुसलमानांच्या कारकीर्दीत ज्या इमारती झाल्या त्यांस चुना लावण्याचा प्रकार सुरू झाला असें दिसतें.

## १९ जयस्तंभ

प्राचीनकालीं लोखंडाचे व दगडाचे खांबांवर लिहून ते खांब उभे करण्याची चाल असे. या प्रकारचे स्तंभ या हिंदुस्थानांत बहुत ठिकाणीं आहेत. ते कांहीं लोखंडाचे व कांहीं दगडाचे असून त्यांजवर लेख आहेत. दिल्लीचे मैदानांत, प्रयागचे किल्ल्यांत, व दिल्लीचे दक्षिणेस फिरोगशिरचे दिल्लींत असे एकेक स्तंभ आहेत. पुराण्या दिल्लीतही एक लोखंडाचा स्तंभ आहे; त्यास कोणी लोखंडाचा म्हणतात व कोणी पंचरशी म्हणतात, याप्रमाणे ठिकठिकाणी लेख करण्याची पूर्वी चाल होती. यांजवर बालबोध अक्षर आहे परंतु ती प्राचीन लिपि असल्यामुळें ते वाचतां येत नाहीं.

## २० भुयारें

या देशांत देवांकरितां व तपस्वी लोकांकरितां भुयारें करण्याची चाल फार होती. अहमदाबादेस जीं भुयारें आहेत त्यांत तर मोठमोठीं देवळें आहेत. तेथें 'भररियो कुवो' म्हणून एक विहीर असून तींत एक भुयार काढलें आहे. याशिवाय तेथील लोकांचे घरांतही पुष्कळ भुयारें असून त्यांतील कित्येक हल्ली बुजून गेलीं आहेत. तेथील नदीचे कांठी, पांचपिंपळीजवळ असेंच एक भुयार आहे. व नदीच्या पलीकडे काश्मिरीबोवांच्या मठांत एक मोठें भुयार आहे. याचप्रमाणे प्रभासाजवळ गोरखमठी आहे तेथेंही एक भुयार आहे. अशीं ठिकठिकाणीं अनेक भुयारें आहेत. पूर्वी राजेलोक हीं भुयारें घरांत करीत होते. बडोद्याजवळ पावागड येथें पूर्वीच्या क्षत्रिय राजांचे जे महाल आहेत ते डोंगरांत कोरून त्यांस मजले केले आहेत. त्यांत माणसे व खुद्द राणी चंपावती राहत होती असे म्हणतात. परंतु हल्ली पाहिले असतां ते महाल अस्वलांस देखील राहण्यास योग्य नाहींत असें दिसते! मग त्या अंधारकोठड्यांतून राजे कसे राहत होते याची कल्पना होत नाहीं. याशिवाय कांठेवाड प्रांतांत जसदन येथें असलेले भुयार तर प्रख्यातच आहे. भरतपुराजवळ डीग म्हणून एक शहर आहे तेथील राजांनी 'भुवनें' म्हणून जमिनींत अशाच इमारती केल्या आहेत त्या पाहण्यासारख्या आहेत. या भुयारांतील इमारतींत थंडीचे दिवसांत व उन्हाळ्यांत राहणें सुखकर असतें व तेवढ्याकरितांच त्या केल्या असाव्या असा तर्क आहे.

## २१ बिनमूर्तीचीं देवळें

मूर्ती नाहींत अशी देवळें पुष्कळ आहेत. कडीजवळ बेचराची मातेचें मोठें देऊळ आहे; परंतु त्यांत मूर्ति नाहीं. अहमदाबादेंतील गोमतीपुरास नरसिंहाचें देऊळ आहे त्यांतहीं मूर्ति नाही. अंबाजी म्हणून अहमदाबादेहून ५० कोसांवर एक प्रख्यात ठिकाण आहे, त्या देवळांतही मूर्ति नाही; परंतु भक्तांकरितां एका कोनाड्यास दागिने वगैरे घालून मूर्तीचा देखावा करितात. याचप्रमाणें मद्रास इलाख्यांत पुष्कळ शून्य मंदिरें असून तीं महादेवाचीं देवळें होत असें म्हणतात.

परंतु त्यांत लोक आकाशलिंगाची म्हणजे रिकाम्या जाग्याचीच पूजा करितात. चिदंबराचें देऊळही याप्रमाणेंच मूर्तिरहित आहे.

## २२ अजमीरचा पीर

अजमीर हें शहर पूर्वी शिंदे अलिजा बहादर यांजकडे होतें. तेथील त्याचे तोफखाने वगैरे इमारती अद्याप आहेत. या शहरांत ख्वाजा पीर म्हणून एक मोठें पीराचें संस्थान आहे, आणि त्याचे पुजारी सय्यद लोक आहेत. या पीरास शिंदे वगैरे यांजकडून चाळीस हजार रुपयांची जहागीर आहे. या पीराचा दर्गा मोठा सुंदर आहे. यास दिल्लीचे बादशाह भजत असत. अकबरानें चितोडगड घेतला त्या वेळेस तेथील नगारे, दिवे व दरवाजे हे सर्व आणून स्मरणार्थ या पीराचे दरग्यांत ठेविले आहेत. ते अद्याप तेथें आहेत. या पीरास भोळे लोक नेहमीं नवस करीत असतात. मल्हारराव गाईकवाड गादीवर बसले तेव्हां त्यांनीं या पीरास बारा हजार रुपयांची नजर पाठविली! त्यांतील गलेफ वगैरे हल्लीं त्याजवर घातला असतो. ही माहितगारी तेथील सय्यद सांगतात. तसेंच शिद्यांस पुत्र झाला म्हणून पन्नास हजार रुपयांची नजर यावयाची होती असें तेथील लोक सांगतात. अजमीर हें शहर साताऱ्यासारखें डोंगराखालीं आहे व त्या डोंगरावर किल्ला आहे. त्याचें नांव तारागड आहे. हा किल्ला पूर्वी पृथ्वीराजाचा होता. हा पृथ्वीराज हिंदूंचा शेवटला बादशाह होता. त्यास मुसलमानांनी मारले. पुढें त्यांनी दिल्लीजवळ याचा किल्ला आहे तोहि घेतला. तेव्हां मुसलमानांचा सरदार कुतुबुद्दीन यानें दिल्लीपासून दहा कोसांवर मोठा जयस्तंभ बांधिला आहे. त्याला 'कुतुबमिनार' असें म्हणतात. या तारागडावर मीरासाहेब यांची कबर आहे. त्यानेंच पुढें हा किल्ला घेतला. अजमीर परगणा हल्ली गव्हर्नर जनरलाचे एजंट राजपुताना क्यांप अबू यांचे ताब्यांत आहे. मीरासाहेब हा हिंदूशी लढाई करीत असतां मेला. म्हणून त्यास षहीद झाला असें म्हणतात, व त्यास हिंदु व मुसलमान हे उभयतां भजतात. त्याविषयीं तेथील लोक कविता म्हणतात ती येणेंप्रमाणें—

**तारागडसा गड नाहीं खिंगऐसा घोडा ।**
**मीरासा नहीं मर्द जिने तारागड तोडा ।।**

मीरासाहेब हा मुसलमानांचा सरदार होता. त्याच्या घोड्याचें नांव खिंग असें होतें. मोठे मनुष्याचे घोड्यांचींही नांवें प्रसिद्ध होतात. जशीं—महंमद पैगंबर याच्या घोड्याचें नांव बुराक होतें; बापू गोखले यांच्या घोड्याचें नांव रामबाण व मारुति असें होतें. तसेंच, शिवाजीचे तरवारीचें नांव भवानी होतें. पेशव्यांचे जरीपटक्याच्या हत्तीचें नाव अल्लीबक्ष होतें.

## २३ गिरनार पर्वत

गिरनारा येथें अश्वत्थाम्याची शिळा दाखवितात, परंतु वास्तविक तो अशोक राजाचा लेख आहे व त्यांत धर्माज्ञा लिहिल्या आहेत. ह्या लेखास सुमारें २,३०० वर्षे झालीं. हा लेख एका डोंगराचे टोंकावर जागा साफ करून त्याजवर लिहिलेला आहे. गीर म्हणून काठेवाडांत एक विस्तीर्ण डोंगर आहे. त्यांतीलच हा भाग जुनागडाजवळ आहे, त्यास गिरनारी म्हणतात. सौराष्ट्र देशांत जीं पांच रत्नें म्हणून लिहिलीं आहेत त्यांतीलच हें एक आहे—

**सौराष्ट्रे पंच रत्नानि नदी नारी तुरंगमाः ।**
**चतुर्थे सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम् ।।**

या गिरनारी पर्वतावर जीं बहुत देवळें आहेत, त्यांत हिंदूंचींही देवळें आहेत. त्यांमध्येंच अंबाजी दत्तात्रय यांचें एक मोठें उंचस्थानी देऊळ आहे. या गडावर रायखिंगार म्हणून प्राचीनकाळी एक राजा होता त्याचा वाडा आहे, त्याचेनजीकच रैवत पर्वत व सुवर्णरेखा नदी अशीं आहेत. या नदीस लोक 'सुंदरिक' असेंही म्हणतात. या पर्वतावर जो किल्ला आहे त्याच

प्राचीन नांव जीर्णगड (जुनागड) असें आहे. ह्या नांवाप्रमाणें येथें अद्यापि भुईंत पुष्कळ इमारती सांपडतात. हल्लीं तेथें एके बाजूस मात्र थोडीशी वस्ती आहे; बाकी ओसाड पुष्कळ आहे. ही जुनागडच्या बाबीची राजधानी आहे.

## २४ पालिठाण्याचा डोंगर व देवळें

काठेवाडांत शत्रुंजी नदीचे कांठीं पालीठाणें या शहराजवळ एक डोंगर आहे त्या ठिकाणी श्रावक लोकांचीं अनेक मंदिरें आहेत; तशी मंदिरें पृथ्वीवर एका ठिकाणीं सुद्धां कोठेंही नसतील. ही मंदिरें कोट्यावधी रुपये खर्च करून बांधलीं आहेत. याचप्रमाणे अंबाजीचे डोंगरावर कुंभारी या गांवी व अबूचे पाहाडावरील देलवड्याची देवळेंही अद्‌भुत आहेत. तीं पाटणचे महाजन यांनी शके १,००० त बांधिलीं. पालीजवळचें राणिकपूरचें देऊळही अतिचमत्कारिक आहे. हीं सर्व देवळें जैन धर्माचीं आहेत. या डोंगरांचे येवढें माहात्म वाढण्याचे कारण हेंच की, याजवर बहुत तीर्थंकरांचे निर्याण झालें आहे.

## २५ गुजराथेंतील देवळें

पूर्वी गुजराथेंतील मुख्य राजधानी पट्टण शहर होतें. ते पट्टण हल्ली गाइकवाडाकडे आहे. तें कडी महालांत म्हणून कडीपट्टण म्हणतात. तें मुसलमानांनी मोडलें आणि अहंमदशाह बादशाहानें साबरमती नदीवर अहमदाबाद हें नवें शहर केलें, व तें पट्टणच्या नमुन्यावर बांधलें आहे. म्हणजे भद्र (अंतरकोट), तीन दरवाजे वगैरे दोहोंचे सारखे आहेत. या पट्टणचे महाजनांनीं आठशें वर्षांपूर्वी अबूचे शिखरावर देलवाडा म्हणून गांव आहे, तेथें जैन देवळें बांधलीं आहेत. अशीं देवळें पृथ्वीवर अन्यत्र नाहीत. याजवरून त्या वेळच्या द्रव्याचें अनुमान होतें. याचप्रमाणें गिरनारचे डोंगरावर मोठालीं देवळें आहेत. परंतु अबूवरील देवळांची बरोबरी कोणासही होणार नाहीं. हा डोंगर शिरोहीचे राजाचा असून हवेकरितां गव्हर्नर जनरलाचे राजपुतान्यांतील एजंट यांनीं राहण्यांकरितां घेतला आहे. व त्यामुळें त्याजवर बाजार, पोष्ट हाफीस, बागा व बंगले वगैरे पुष्कळ झाले आहेत.

## २६ मणिराम पारखजीचीं मंदिरें

मथुरेंत विष्णुमंदिर व वृंदावनांत श्रीरंगाचे मंदिर हीं मणिराम पारखजी यांनी बांधली आहेत व तीं फार अद्‌भुत आहेत. मणिराम पारखजी हे दौलतराव शिंदे यांचे पोतनीस होते. त्यावेळेस त्यांस बहुत पैसा मिळाला. सदरील देवळांपैकीं श्रीरंगाचे देवळास ६० लाख रुपये लागले असें म्हणतात. हें देऊळ त्रिचनापल्लीस जें देऊळ आहे त्याचीच प्रत केली आहे. वृंदावनांत नित्यानंद प्रभूचें दुसरें एक देऊळ आहे तेंही असेंच फार मोठें आहे. हीं देवळें किती भक्कम म्हणून सांगावयाचें झालें तर इतकें सांगितल्यानें वाचकांचे समाधान होईल कीं, प्रलयकाळ होऊन गेला तरी हीं देवळें जशींचीं तशींच प्रलयकालोत्तर दृष्टीस पडतील !

## २७ चांपानेर

बडोद्यापासून दहा कोसांवर पावागड म्हणून किल्ला आहे. याचें पावकाचलमाहात्म्यही आहे व या किल्ल्यावर महाकालीचें देऊळ आहे त्याचे खालीं चांपानेर किंवा चंपावती शहर होतें. तें माळव्याकडील अंगास आहे. तें पाहतां आतां अगदीं ओसाड आहे. परंतु त्याची प्राचीन स्थिती दाखविणारे त्याचे दरवाजे, मांडवी, लखी माहाल, तारणें, वगैरे बहुत ठिकाणें आहेत. ओसाड घरांच्या दगडी विहीरी पुष्कळ असून तलावही बहुत आहेत. हें गुजराथचा बादशाह महंमद बेगडा यानें उजाड केलें. तेथील राजा पटई रावळ होता. त्याचे माहाल व तोरणें विलक्षण असून शहरही मोठें होतें. महंमद बादशाहानें जुनागडचे यादव व पावागडचे रावळ यांस अशीं पत्रें लिहिली होतीं कीं, 'तुम्ही मुसलमान व्हाल तर तुमचीं राज्यें राहतील.' तेव्हां यादवांनी ती गोष्ट

कबूल केली. परंतु रावळांनी नाकबूल केली. तेव्हां त्यांजवर अहमदाबादेहून मोठें लष्कर रवाना झालें. तें लष्कर सर्व शहर घेऊन किल्ल्यावर चढलें. तेव्हां रावळांनी आपल्या स्त्रिया मुलें व म्हातारे हीं मुसलमानांचे हातीं सांपडूं नयेत म्हणून त्यांस ठार मारून झांबर तलावांत टाकून दिलें, आणि जवाहीर, मोतीं वगैरें होतें तें रागानें जात्यांत दळून टाकून मग आपण मरावयास निघाले. शेवटीं ते लढाईत मेले आणि मुसलमानांनी किल्ला घेतला, व शहर उद्वस्त करून टाकिलें. किल्ल्यावर एक काली देवीचें देऊळ मात्र आहे. तिच्या शिखरावर सज्जनसा म्हणून कोणी या लढाईत मेला होता त्याचें स्थान आहे. याप्रमाणे या शहराची व्यवस्था तीनशें वर्षांपूर्वी झाली. तेथें जे कांही लोक राहिले होते ते शहर सोडून भडोच, अहमदाबाद, सुरत वगैरे ठिकाणीं गेले. त्यांस चांपानेरी असें म्हणतात. मश्रू व किनखाप करण्याचें कसब या चांपानेरांत होतें. ते कारागीर जेव्हां पळून गेले तेव्हां त्यांनी हे कसब अन्य शहरीं नेलें. परंतु त्यांची बहुत दिवसपर्यंत अशी समजूत होती कीं, चांपानेरच्या विहिरीवरच तीं कापडें धुतलीं पाहिजेत व याजकरितां तीं तेथे धुवावयास पाठवीत! आलीकडे मात्र ठिकठिकाणीं धुवावयाच्या विहिरी काढिल्या आहेत. अहमदाबादेंत पांच कुव्यावरही कपडें धुवूं लागले आहेत. हा प्रांत शिंद्याकडे होता तो हल्ली इंग्रजांकडे आहे. हा प्रांत डोंगरी असून त्यांत हलोल, कलोल, गोद्रें, जालोद व दाहोद असे तालुके आहेत. त्यांस पंचमहाल म्हणतात. यांत जमीन चांगली आहे परंतु पाणी वाईट व वस्ती थोडी असून तेथें भावडे व कोळी लोक राहतात. या पंचमहालाची वहिवाट खेडा जिल्ह्याखालीं आहे.

### २८ द्वारका व छाप

चार ठिकाणीं द्वारका दाखवितात—एक डाकोर येथें जुनी मूर्ति द्वारकेहून आली आहे ती; दुसरी मूळद्वारका, ही समुद्राचे कांठी कोडीनार म्हणून एक गांव आहे तेथें होती असें म्हणतात; तिसरी गोमती द्वारका, ही हल्ली शंकराचार्यांचा शारदा मठ आहे ती होय. येथें एक फार मोठें देऊळ आहे व तें विश्वकर्म्यानें बांधिलें आहे असें म्हणतात. त्याचे पलीकडे दहा कोसांवरील गोपी-तलावावर चार पांच कोस गोपीचंदनाचीच जमीन आहे. आणि त्यानंतर चौथी द्वारका, द्वारकाबेट म्हणून गोसांवी महाराज याचे अधिकारांत आहे. या चौथे द्वारकेस जातांना वाटेंत आरगडें म्हणून एक गांव आहे. तेथें गाइकवाडाचा एक शिपाई रस्त्यांत शेगडी पेटवून बसलेला असतो; व त्या शेगडींत लोखंडाचे शिक्के नेहमी तापत असतात. तेथें जो यात्रेकरी येईल त्यास डाग देतात आणि त्याबद्दल मुद्रा घेणाराजवळून उलटे आणखी चार आठ आणे घेतात. हा कारखाना नेहमी चालूच आहे, व येणेंकरून उत्पन्नही बरेंच होतें. यात्रेकरी सुद्धां त्या मुद्रा मोठ्या हौसेनें घेतात. त्या तप्त मुद्रांचे डाग बरे होण्यास अजमासें तीन महिने लागतात, असें आहे; तथापि मूर्ख व धर्मभोळे लोक पैसा देऊन आपले शरीर डागवून घेतात! आंता हल्लीं बडोद्यांत इंग्रजी अंमल झाला आहे त्यांत तरी ही चाल बंद व्हावी हें योग्य आहे. परंतु ह्याकडे सुशिक्षित कामदारांचे जेव्हां लक्ष्य जाईल तेव्हां व्यवस्था होईल. ही डागण्याची इजा हजारों धर्मपिशा प्राण्यांस आहे तरी त्याजबद्दल सरकारास पांच सात हजार रुपये मिळकत आहे, यामुळें कदाचित हा प्रचार अजूनही बंद होत नसेल! या मुद्रा घेण्याचे चालीबद्दल अशी दंतकथा आहे कीं, वैष्णवांची जीं बावन्न द्वारें आहेत, त्यांपैकीं पीपाभगत म्हणून एक द्वार आहे म्हणजे त्या नांवाचा एक मोठा वैष्णव होता. तो जातीचा रजपूत असून द्वारकेस यात्रेला येत असे. एके दिवशी तो म्हणला कीं, 'पूर्वी जी सुवर्णाची द्वारका होती ती पाहण्यास मला देव बोलावीत आहे यास्तव मी जातों.' असें म्हणून तो समुद्रांत शिरला, व जातां जातां पुढें अदृश्य झाला. नंतर पंधरावे दिवशीं समुद्रांतून तो बाहेर आला. त्या वेळेस त्याचे हातांत शंख, चक्र, गदा व पद्म अशा सुवर्णाच्या चार मुद्रा

होत्या. पुढें त्या त्यांनें द्वारकेंत जे जुने राजे होते त्यांजवळ दिल्या आणि सांगितलेंकीं, 'येथें जे यात्रेस येतील त्यांचे अंगावर ह्या मुद्रा तापवून द्याव्या असा देवानें मला हुकूम केला आहे, व मी इतके दिवस समुद्रांत गुप्त झालों होतों तो द्वारकेंतच होतों.' या त्याच्या सांगण्यावरून ही चाल चालू झाली. पुढें सोन्याच्या मुद्रा झिजून गेल्या; तेव्हां आतां प्रस्तुतच्या ह्या लोखंडाच्या भक्कम मुद्रा चालत आहेत! अज्ञानकाळीं सदरील गोष्ट लोकांनीं सत्य मानिली असावी. परंतु त्याप्रमाणें आजच्या सज्ञानकाळींही ती गोष्ट अमलांत असणें फार दुःखास्पद आहे!

## २९ झिंझुवाडा

अहमदाबादेपासून ४० कोसांवर विरमगांव परगण्यांत झिंझुवाडा म्हणून एक प्राचीन शहर आहे. परंतु तें हल्लीं उजाड आहे तरी त्याचे दरवाजे, कोट, त्याचा जिना व तेथील गोमुखी गंगा वगैरे पाहण्याजोगीं आहेत.

## ३० अहमदाबाद प्रांतांतील पाहण्याचीं ठिकाणें

मुसलमानांनी अहमदाबादेस त्या शहरचे आसपास बारा कोसांत एकंदर १४०० मशीदी बांधिल्या आहेत असें म्हणतात. परंतु हल्लीं त्यांचे मोठमोठाले ढीग मात्र ठिकठिकाणी पडले आहेत. दगडी कामें लाखों रुपये खर्च करून केलीं होतीं परंतु तीं पडीत झालीं आहेत. अहमदाबादेस पाहण्यासारख्या इमारती, काकरिया तलाव व धोलक्याचा मुनसर तलाव हे सिद्धराज जयसिंग यांनी बांधिले आहेत. पांडवांची शाळा व ढवळके येथील मनोरे हे पाहाण्याजोगे आहेत. कपडवंजचें कुंड, शिहोरचें ब्रह्मकुंड व गौतमाश्रम हीं पाहाण्यासारखीं असून कोटेश्वरी अंबाजीचे डोंगरांत सरस्वतीचा उगम आहे व पट्टणाजवळ शांडिल्यांचा आश्रम आहे. ते आश्रम व सिद्धपूरची रुद्रमाळ हींही चमत्कारिक व प्रेक्षणीय आहेत. जुम्मामशीद, मिरजापूरची मशीद, शेख अहमद, खट्टगंजबक्ष याची जागा सरखेज गांवी आहे ती, शाहअलम, बटवा गांवीं कुतबे आलम, काकरिया तलावावरचें डच उर्फ कलंदेजी लोकांचें कबरस्थान, दादाहरीची विहीर, अढाळजगांवची विहीर (इचें मोठेंदगडी काम तर पांच सात लाख रुपयांचे आहे!), सय्यद उसमान माहजफीन खान शाहापूर याची मशीद, मीर आबू तुराब, चंद्रावतीची कबर, आसारव्याची विहीर, मलिक आलम, राणीशिप्री, कुतुबशा, मियाखान खिष्ती, आचरत बिबी, सारंगपूरची मशीद, मद्रसा (जेथें हल्ली तुरुंग आहे,) भद्रेंतील मशीद, नीलकंठ महादेव, हटीसिंगाची वाडी, प्रेमाभाईचा वाडा इत्यादि. या सर्व जागा पाहण्यालायक आहेत.

## ३१ अहमदाबाद

अहमदाबाद शहर यास पूर्वी राजनगर, सिंहपूर, श्रीनगर, कर्णावती, आशावळ, वगैरे नांवे होतीं असें म्हणतात; व तें पूर्वी फार भरभराटींत व संपत्तिमान होतें. परंतु हल्लीं हें शहर दारिद्र्यस्थितींत आलें असून अर्धे तर उजाड झालें आहे. या शहराचा घेर १२ कोस असून त्याचे सभोंवती मजबूत कोट आहे. त्या कोटांत दोन अंगांस दोन अंतरकिल्ले असून त्यास गायकवाडाची हवेली व भद्र अशीं नांवें आहेत. याचे बाहेर शहर आहे. त्यांत पूर्वी ३६० पुरे होते असें म्हणतात व त्यांपैकीं पांच सहा तर अद्यापि आहेत. फेरिस्ता यानें जो हिंदुस्थानाचा इतिहास लिहिला आहे, त्यांत त्यानें ह्या शहराचें फार वर्णन केलें आहे. हें शहर बांधण्यास पट्टनाहून दगड आणिले असें म्हणतात. याचे सभोंवते सरखेज व बटवा सरसपूर वगैरे गांवें आहेत. या शहरचे कोटावर बखेर अशी तारीख आहे; त्याजवरून हिजरी सन ८९१ हें साल निघतें, किंवा या शहरांत जो येईल तो निर्भय राहील असाही त्याचा अर्थ निघतो. आरबी गणितांत आपल्या हिंदु गणिताप्रमाणेंच दोन रीती आहेत. त्यांत अंकांनी लिहिणें त्यास रकम म्हणतात, व अक्षरांनी संख्या लिहिणें त्यास हिंदीसा म्हणतात. हिंदीसा या रीतीची योजना श्लोकांतही करितात, व तेणेंकरून

त्यांतून वर्ष व सुभाषित अर्थ अशी दोन्ही निघतात. पूर्वी मुसलमान लोक शहरांत रहात व हिंदुलोकांनी बाहेर वस्ती करावी असा ठराव होता. परंतु आतां सर्व हिंदु शहरांतच आले आहेत. अहमदाबादचा राजा बहादूरशाह यानें चितोडगडचा राणा विक्रमादित्य याजवर स्वारी करून त्याजपासून मोठी नजर घेतली. त्यांतच त्याजवळून मुकुट व साठ लाख रुपयांचा कमरबंद घेतला व तो इस्तंबूलचे बादशाहास नजर पाठविला. पुढें अकबरानें अहमदाबाद हें शहर इ. स. १५७२ सालीं घेऊन तेथें दिल्लीचा सुभा नेमिला. त्यानंतर १७३५ पासून दमाजी गायकवाड या प्रांतांत हिस्सा घेऊं लागले. पुढें मोंगलाचा हिस्सा जवामर्दखान बाबीकडे होता तो इ. स. १७५३ सालीं पेशव्यांनी घेतला व त्यामुळें गुजराथेंत दोन अम्मल झाले. पुढें इ. स. १७८० त जनरल गाडर्ड साहेब यानें राघोबाचे तर्फे हे शहर घेतलें, परंतु तें लागलीच मराठ्यांस परत दिलें. नंतर शेवटी १८१७ सालीं तें शहर इंग्रजांनी घेऊन तो जिल्हा केला.

## ३२ भडोच

भडोच हें शहर फार जुनें आहे. इसवी सन ४०० मधील त्याचें वर्णन चिनी लोकांचे बखरींत सांपडतें, व ११०० तील आरबांचे बखरींत सापडतें, हें शहर १५७२ सालीं अकबर बादशहानें घेतलें व पुढें तेथील नबाबांनी दंगा केल्यावरून पुनः हें औरंगजेबाने १७६० सालीं घेतलें. संभाजीनें प्रथम १६८५ त, या शहराची खंडणी घेतली. त्यानंतर पुढें इंग्रजांचा व नबाबाचा तंटा होऊन जनरल सर डेव्हिड वेडरबर्न यांनीं १७७२ त भडोच आपलेकडे घेतलें, परंतु ते तेथें ठार पडले. पुढें १७८२ त सालब्याचे तहनाम्यावरून तें शहर शिंद्यास दिले होतें. त्यानंतर १८०३ मध्यें कर्नल उडिंगटन यांणीं पुनः दौलतराव शिंदे याजकडून जें घेतलें तें तेव्हापासून इंग्रज सरकारांकडेसच आहे. भडोच येथें वलंदेजी लोकांचे कबरस्थान आहे. येथें रूपा मशीद व बाबारिहन याचा दरगा हीं पाहण्याजोगीं आहेत. बाबारिहन हा पीर भडोच येथें मुळी इ. स. १०७८ सालीं आला असें म्हणतात. भडोचपासून सहा कोसांवर शुक्लतीर्थ म्हणून एक गांव आहे त्याजवळ कबीरवड असून तेथें कबीराची समाधि आहे. भडोचेहून पांच कोसांवर रतनपुर म्हणून एक गांव असून तेथे अकीकाचे दगडांची खाण आहे.

## ३३ विजापुर

दक्षिणेंत विजापूरचे अदिलशाह बादशाहाची कारकीर्द मोठी झाली. हें राज्य औरंगजेबानें मोडलें, आणि विजापूरचें नांव मोडून दक्षिणचा सुभा केला. परंतु विजापुरास इमारती, किल्ला व तोफा एवढ्या मोठ्या आहेत कीं, ज्याने विजापूर पाहिले नाहीं त्यानें दक्षिणेत कांहीं पाहिलें नाहीं असें म्हणतात. कारण तेथील सर्वच कामें अद्भुत आहेत. तेथील मुलूखमैदान तोफ, इभ्राम रोजा, गोळ्या घुमट, उपल्या बुरूज, भंगी महाल, आसारमुबारक म्हणजे महंमद पैगंबराचा एक केंस कोणी अवलियानें बादशाहास दिला होता त्याचें देऊळ बांधले आहे तें, मोतीमशीद, ताजबावडी, अर्क किल्ला, पहिला कोट, त्याचे बाहेर तिकोट्याचा कोट, दफ्तरखाना, राजवाडा, या सर्व इमारती पाहण्यालायक आहेत, व त्यांस किती खर्च झाला असेल याचें गणित होत नाहीं. असें ह्मणतात कीं विजयनगरचा (अनागोंदीचा) राजा कृष्णराज याचें राज्य या आदिलशाहानें घेतलें तेव्हां दहाकोट सोन्याचे होन त्यास मिळाले. तेव्हां मुसलमान ह्मणूं लागले कीं, या राजाचे राज्यांत होनांचा पाऊस पडला असेल, नाहीं तर इतके होन कोठून आले? त्याच सर्व होनांचा विनियोग या इमारती बांधण्याकडे केला आहे.

## ३४ पुणें शहर

पुणें शहर हल्लीं जेथें आहे तेथें कसबे लोहोगांव ह्मणजे जेथें तुकाराम बोवांची सासुरवाड होती त्या कसब्याच्या तीन वाड्या होत्या. त्या-एक कासारवाडी, दुसरी पुणेंवाडी, आणि तिसरी पाडळी.

त्यांपैकी कासारवाडीवर पेठा कसबा झाला, पुणेंवाडीस मुंजेरी ह्मणतात आणि पाडळीस माळी राहत होते त्यास हल्लीं माळीच ह्मणतात. पुणेंवाडीचे पाटील झांबरे व कुळकर्णी राजऋषी होते. पुढें पुणें शहर वाढलें तेव्हां यांजकडे कांही पेठा राहिल्या व बाकी पेठांचे इतर कुळकर्णी झाले. पुण्याचे आग्नेयेस मुंजेरीची जमीन आहे व पूर्वेस माळीची जमीन आहे. परंतु तेथे झांबऱ्यांची पाटीलकी चालत नसून माळी, मेहेत्रे हेच अधिकार चालवितात.

पुण्याच्या पेंठांचे कुळकर्णी

| पेंठेचें नांव. | कुळकर्ण्यांचें नांव व जात. |
|---|---|
| १ सदाशिव पेंठ. ... ... ... | ठोंसर, कोंकणस्थ. |
| २ वेताळ पेंठ ... ... ... | शिंग्रे, देशस्थ. |
| ३ शुक्रवार पेंठ. ... ... ... | तुटकणे, ,, |
| ४ आदितवार पेंठ ... ... ... | मेणजोगी, ,, |
| ५ मंगळवार पेंठ किंवा न्याहाल पेंठ. ... | माळी, ,, |
| ६ बुधवार व शनिवार पेंठ ... ... | राजऋषी ,, |
| ७ रास्त्यांची पेंठ ... ... ... | मोकाशी, ,, |

बाकी राहिलेल्या पेंठांस कुळकर्णी नाहींत. पूर्वी फरोक्त व गहाणखतांचे हेच रजिस्ट्रार (नोंदणीदार) असून वसाहतीस जमिनी वगैरे हेच देत. ह्याच पेंठांस मुसलमानांनी जीं नांवें दिलीं आहेत ती खालीं लिहिल्याप्रमाणें :--

| **हिंदूंची नांवे.** | **मुसलमानांचीं नांवे.** |
|---|---|
| १ बुधवार पेंठ. ... ... | मुहियाबाद. |
| २ आदितवार पेंठ. ... ... | मलकापूर. |
| ३ शनिवार पेंठ ... ... | मूतुजाबाद. |
| ४ सोमवार पेंठ ... ... | शहापूर. |
| ५ मंगळवार पेंठ. ... ... | आस्तापूर. |

पेठ कसबा यास 'मोहतर्फा' ह्मणतात. याचे शेट्ये होनप ह्मणून गोळक होते. देशमुख, शितोळे, होनप, देशपांडे, चौधरी, शेट्ये, महाजन वगैरेंचे पूर्वी दुकानांवर हक्क पोहोंचत होते. पुण्यास एकंदर अठरा पेंठा आहेत, त्या येणेंप्रमाणे :- (१) कसबा, (२) सोमवारपेंठ, (३) मंगळवार पेंठ, (४) बुधवारपेंठ, (५) गुरुवारपेंठ, (६) शुक्रवारपेंठ (७) शनिवार पेंठ (८) आदितवार पेंठ, (९) शिवापुरी, (१०) भवानीपेंठ, (११) घोरपड्यांची पेंठ, (१२) सदाशिवपेंठ, (१३) नारायणपेंठ, (१४) गणेशपेंठ, (१५) हणमंतपेंठ, (१६) वेताळपेंठ, (१७) गंज आणि (१८) रास्ते यांची पेंठ, ज्यांनी ज्यांनी पेंठा वसविल्या त्यांनी आपलेकडे पुष्कळ जागा ठेविल्या. दीक्षितांची जागा रविवारांत, खासगीवाले लिमये यांच्या जागा शुक्रवारांत, रास्ते यांचे पेंठेंत रास्ते यांच्या जागा, वानवडीस शिंद्यांचे लष्कराची जागा, खडकीचे पुलावर होळकराची जागा, लकडी पुलावर गायकवाडाचे छावणीची जागा, आणि घोरपडे यांचे पेठेंत घोरपड्यांची जागा, ह्याप्रमाणें होत्या.

## ३५ नासिक

नासिकास सिंहस्थ हें मोठें पर्व असून तें शके १७४८ सालीं होतें. त्या सालीं तेथें जरीमरीनें माणसें फार मेलीं. त्यापुढें पुन्हां १७६८ सालीं जरीमरीचा मोठा प्रळय झाला. त्यानंतर पुढें शके १७८० सालीं कपिलाषष्ठी होती तेव्हां तेथें मोठी यात्रा भरली होती. पूर्वीची १२-१२ आणि १८-१८ पायल्यांची धारण जाऊन लोकांस महर्घता अशी या कपिलाषष्ठीच्या पर्वणीपासूनच प्राप्त

झाली! तिची या २-४ सालांत तर कमालच झाली. पुढें शके १७८४ त व नंतर शके १७९५ सालीं असे सिंहस्थ पाहाण्यांत आले. नासिक क्षेत्र हें फार द्रव्यवान असून सोन्यारुप्याचे दागिने घालून बायका गोदावरीवर पाण्यास येत त्यांचे हातांतील शेरभर सोनें दररोज गंगेचे घाटावर झिजत असे असें म्हणतात. परतु या क्षेत्रीं लुटी फार झाल्या. अजबसिंग, हरीपंत भावे, होळकराचे पेंढारी, अमृतराव पेशवे इत्यादिकांनी लुटून तेथील बहुत द्रव्य हरण केले. पुढें राज्यक्रांती झाल्यावर पेठे, राजेबहादर, हिंगणे वगैरे जे तेथील मोठाले गृहस्थ ते गरीब झाले. त्याजमुळें आतां नासिकांत कांहीं अर्थ राहिला नसून दारिद्र्यग्रस्त झालें आहे!

## ३६ सह्याद्रि पर्वत

सह्याद्रि डोंगर हा मध्यहिंदुस्थानाचे देश व कोंकण असे विभाग करतो. त्याचें स्वरूप घोण म्हणजे शतपदी म्हणून एक जीव असतो त्याप्रमाणें आहे. ह्या डोंगराचे चिमट्यांत हजारों नद्यांचे उगम झाले आहेत; व त्यांस खोरीं व नहरें म्हणतात. ह्या पर्वताच्या पाठीवर जेथें काहीं जमीन आहे तेथें वस्तीही आहे. त्या वस्तीस मुऱ्हे व पठार असें म्हणतात. मौजे कास, यवतेश्वर, मांढरदेव, महाबळेश्वर हे मुऱ्हे आहेत व मीन नहर, भाम नहर, कुकड नहर हीं नहरें म्हणजे जमिनीचे दुतर्फा डोंगर व मध्यें नदीचा प्रवाह, तीं होत. सह्याद्रि पर्वत हा नीलगिरीपासून खानदेशांतील सोनगडापर्यंत आहे. त्याचीं कांहीं ठिकाणीं फारच उंच शिखरे आहेत. त्यांपैकी नाशकाजवळ कळसुबाई, ठाण्याजवळ ढाक, सूर्यमाळ, दापूर माळ, आजापर्वत ही ठिकाणें बहुत उंच आहेत. या डोंगराचें वर्णनचें ज्या संस्कृत ग्रंथांत आहे त्यास 'सह्याद्रिखंड' असे म्हणतात.

## ३७ अष्टागर प्रांत

हल्लीं कुलाबा जिल्हा आहे त्यास अष्टागर प्रांत म्हणतात. ह्या प्रांतात जेथें नारळीचीं झाडेंदाट उवगतात अशीं जीं स्थळें आहेत त्यांस आगर असें म्हणतात. अशी आठ ठिकाणें ह्या प्रांतांत आहेत तीं :- (१) अलीबाग, (२) नागांव, (३) थळ, (४) चौल, (५) सासवणें, (६) साखर, (७) आक्षी आणि (८) किहीम अशीं आहेत. याशिवाय दक्षिण कोंकणांत वसई, अगाशी वगैरे आगरें आहेत. परंतु आठ एकत्र व जवळ जवळ अशीं याच प्रांतांत आहेत. मीठ पिकविण्याच्या जागा असतात त्यांस मीठागर म्हणतात. या प्रांतांत आगरी, कोळी, भंडारी, पांचकळशी, वगैरे यांची वस्ती पुष्कळ आहे. या प्रांतांत सागरगड, कुलाबा, उंदेरी, खांदेरी, कोरलाई, रेवदंडा वगैरे किल्ले आहेत. यांपैकी काहीं दर्यांत आहेत व काहीं डोंगरांवर आहेत. यांतील रेवदंडा हा प्रचंड किल्ला, फिरंग्यांनीं कोंकण घेतलें तेव्हां इ. स. १४५० त बांधिला, असा त्याजवर लेख आहे. हा प्रांत आंग्रे यांजकडे बहुत दिवस होता. ते कुलाब्यांत राहात असत, तेथें त्यांचे वाडे, देवळें अद्याप आहेत. आंग्रे, सावंत आणि धुळप हे कोंकण किनाऱ्यावर सरदार होते. आंग्रे यांचे अखेरचे दिवाण विनायक परशुराम बिवलकर हे होते. त्यांचे पुत्र हल्ली रावबहादूर धुंडीराज विनायक हे आहेत.

## ३८ हिंदुस्थानाचा विस्तार

सन १८७९ सालीं मिस्तर वालेंटैन साहेब इराणांत प्रवास करण्यास गेले होते ते बुशायर बंदराहून यज्द, किरमान व तेहेरान या शहरांवरून रश्त म्हणून कास्पियन समुद्रतीरावर एक गांव आहे तेथें जाऊन तेथून ते त्या लगतच बाकू नांवाच्या गावी गेले. तेथें रूस बादशाहाचा अम्मल आहे; तरी तेथें हिंदु लोकांचें शिवाचें मोठें देऊळ आहे, ते त्यांनी पाहिलें. त्याविषयीं ते असें म्हणतात कीं-- तेथें एक दगडी प्राकार असून त्याचे आंत एक चौकोनी दगडी देऊळ आहे. त्यांत पुढें एक घंटा आहे व आंत गणपति व शिव यांच्या मूर्ती आहेत. त्यांचा पुजारी एक बैरागी बोवा असून त्यानें सांगितलें कीं ते देऊळ ११०० वर्षांचें आहे. पूर्वीं हिंदु लोक

व्यापारासाठी तेथें येत होते. त्यावेळेस हें देऊळ बांधिलें आहे. व तेव्हांपासून लोहार व मुलतान येथून पुजारी पाठवून त्या देवळाचा संभाळ आजपर्यंत होत आला. परंतु आतां कोणी बोवा येत नाहीं याजमुळें मी (सांप्रतचा पुजारी) थकलों आहें, वगैरे. यावरून हिंदुधर्माचा विस्तार कोठ-पर्यंत झाला होता हें सर्वांस कळेल!

### ३९ महानद्या

भरतखंडांत ज्या पुण्यनद्या मानिल्या आहेत त्या :-- (१) भागीरथी, (२) यमुना, (३) सरयू (४) गोदा ऊर्फ वृद्धगंगा अथवा गौतमी, (५) कृष्णा, (६) साबरमती ऊर्फ काश्यपी गंगा, (७) नर्मदा ऊर्फ रेवा, (८) तुंगभद्रा, (९) कावेरी, (१०) वेण्या, (११) तापी, (१२) सरस्वती, इत्यादि.

### ४० सरस्वती नदी

सरस्वती नदी पांच ठिकाणीं प्रसिद्ध असून गुप्त झाली आहे असें म्हणतात :--

रुद्रावर्ते कुरुक्षेत्रे श्रीस्थले पुष्करेऽपि वा।
प्रभासे पंचमे तीर्थे पंच प्राची सरस्वती ॥

(१) रुद्रावर्त हिमालयांत आहे असें म्हणतात, तेथें सरस्वती आहे. (२) कुरुक्षेत्र दिल्ली-पलीकडे आहे, तेथें सरस्वती आहे. (३) श्रीस्थल म्हणजे सिद्धपूर हें गुजराथेंत असून तेथें सरस्वती आहे, ती अंबाजीचे डोंगरांतून कोटेश्वरापासून निघाली ती झिंझुवाडा याजवळ गुप्त झाली. म्हणजे, पुढें रेतीचा मुलूख आल्यामुळें त्यांत चालेनाशी झाली. (४) पुष्करतीर्थांतही ती आहे असें म्हणतात, आणि (५) प्रयागीं आहे असें म्हणतात. तेथून प्रभासाजवळ प्राची सरस्वती आहे, तिचें पाणी फार विषारी असून त्या ओघांत अधरमाधव म्हणून एक मूर्ति आहे. प्रभास, सोमनाथ व वेरावळ ही एकाच गांवाचीं नांवें आहेत. प्रभासास यादवांनीं जो आपला नाश करून घेतला तो हिरण्यानदीचे तीरीं झाला असें म्हणतात. जेथें श्रीकृष्णास बाण लागला तें भल्लुका क्षेत्र येथेंच आहे व त्याचा देह पडला तें देहोत्सर्गक्षेत्र आहे.

---

## लोकवर्णन

### ४१ ब्राह्मणांच्या जाती

ठाणे जिल्ह्यांत उंबरगांव डहाणूकडे जंबू ब्राह्मण राहतात. जुनागडास गिरनारे ब्राह्मण, मथुरेस चौबे, गोकुळांत सनाढ, द्वारकेस गुगुळिये ब्राह्मण, नाडियादेस रवाळ, खेड्यास खेडावाळ व वालिम् ब्राह्मण आणि अहमदाबादेस औदीच्य ब्राह्मण राहतात. परंतु औदीच्यांचे तीन सांप्रदाय आहेत. हळवद, सिहारे व सितपूर याठिकाणीं औदीच्य सहस्र म्हणून ब्राह्मण बहुत राहतात व त्यांचे सांप्रदायही वरिष्ठ गणले जातात; अलीबाग वगैरे अष्टागरांत किरवंत ब्राह्मण राहतात; पंढरपुरास बडवे ब्राह्मण आहेत; पंजाबांत सारस्वत ब्राह्मण राहतात; परंतु त्यांत दोन भेद आहेत; पंजाबी व सोरटिया. त्यांत सोरटिया सारस्वत हे काठेवाडांत राहतात. नाशकास मैत्रायणी ब्राह्मण राहतात; सावंतवाडीस शेणवी ब्राह्मण राहतात; सोरटी सोमनाथास सोमपुरे ब्राह्मण आहेत; गयेचे वाटेवर पुनः पुन्हा नदीचे कांठीं साकलद्वीपी ब्राह्मण राहातात; गयेस गयावळ राहतात; अयोध्येस सरवरिये ब्राह्मण राहतात; कनोजेस कनोजे; वऱ्हाडांत हिंगणघाट आहे तेथें कलंकी ब्राह्मण; नागपुरास चरक ब्राह्मण; वसईस सामवेदी ब्राह्मण; ठाण्यास पळशे ब्राह्मण;

भडोचेस भार्गव ब्राह्मण; अहमदाबाद, जुनागड, भावनगर येथें नागरब्राह्मण; कोंकणांत चित्तपावन ब्राह्मण; महाड तालुक्यांत गोवर्धन ब्राह्मण आहेत; जनकपुरास मैथील ब्राह्मण; जगन्नाथास उत्कल ब्राह्मण; त्रावणकोरास निंबोरी ब्राह्मण; बोरसदेस बोरसदी ब्राह्मण; आणि श्रीक्षेत्र काशी येथें सर्व जातीचे ब्राह्मण आहेत.

## ४२ सामवेदी ब्राह्मण

वसई तालुक्यांत सामवेदी ब्राह्मण म्हणून आहेत हे, पूर्वी कधी गुजराथेंतून येऊन वसले. ते हल्ली शेतीभाती करतात. हे जानवी घालतात. यांचे उपाध्ये पळशे ब्राह्मण आहेत. परंतु ते पळशांच्या हातचें खात नाहींत.

## ४३ सारस्वत, राजगिरे व औदीच्य ब्राह्मण

कच्छप्रांती सारस्वत, राजगिरे व औदीच्य ब्राह्मण आहेत ते अर्बस्तानांत, जंगबार (झांझिबार) व मोजांबिक या बंदरी जाऊन भिक्षावृत्ति करितात. तसेच ते विधवेचा पुनर्विवाह करितात व क्षत्रिय व कुळंबी यांचे घरी जेवितात. कच्छचे वाणी तर व्यापाराकरितां आफ्रिकाखंडांत व अरबस्तानांत बहुत जातात. परंतु त्यांजमध्यें दक्षिणी लोकांप्रमाणें परदेशगमन वर्ज व निषिद्ध नाहीं व येणेंकरून ते दक्षिणी लोकांपेक्षां सुखी आहेत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

## ४४ पाटील कुळकर्णी

कोंकणस्थ हे मूळचे देशस्थ असून ते परशुरामाचे आज्ञेनें घाटाखाली आले. कुळंबी हे मुळीं किष्किंधेस जेथें सुग्रीव व वालीचें राज्य होतें तिकडे राज्ञात असतां श्रीरामाज्ञेनें दंडकारण्यांत आले. ही दंडकारण्यांत वसती करण्याची आज्ञा प्रथमतः मारुतीस झाली; ह्याचें दर्शक प्रतिगावीं मारुतीची स्थापना असते. याप्रमाणें सर्व अरण्य वसविल्यावर मागाहून उत्तरेकडून आर्य लोक जोशी, कुळकर्णी व भट या रूपांनीं येऊन गावांत वस्ती करू लागले. परंतु मूळचे वस्ती करणारे पाटील हे शूद्र असतांही तेच वरिष्ठ राहिले ते राहिले. याप्रमाणें पाटील कुळकर्णी यांची स्थापना व वस्तीच्या कालाचें मान होतें. असेंच, हल्लीं दक्षिणेंत आपणास जे यजुर्वेदी ब्राह्मण दिसतात ते सर्व गुजराथेंतील ब्राह्मण असून ते दक्षिणेंत वस्तीस आले; तसेंच देशस्थ हे मूळचे तैलंग होते असें म्हणतात. व किरवंत हे प्रथमतः शेणवी लोकांबरोबर गोव्याकडून भट म्हणून आले असा शोध लागतो.

## ४५ ब्रह्मक्षत्रिय

ब्रह्मक्षत्रिय ही जात दिल्लीहून अकबराचे स्वारीबरोबर गुजराथेंत आली. त्या जातींतील तोडरमल्ल याजकडे मोठा हुद्दा होता. त्याचे दोन जांवई चितोडगडचे लढाईत मेले, तेव्हां त्याचे विधवा कन्यांचीं पुन्हा लग्नें करण्यास अकबरानें सांगितलें. परंतु त्यामुळें जातींत फूट होऊन, लवाणे हे मूळचे क्षत्रिय होते त्यांनीं मात्र ही चाल कबूल केली व त्याप्रमाणें ते हल्लीं पुनर्विवाह करीत आहेत. बाकीचे राहिले त्यांनीं पुनर्विवाह कबूल केला नाहीं. पुढें तोडरमल्ल याचे आश्रयानें अहमदाबाद, जुनागड, हैदराबाद (सिंध) आणि लखनौ या चार ठिकाणीं ब्रह्मक्षत्रिय यांची वस्ती झाली. यांचे गुरु परोत म्हणजे पुरोहित हे पंजाबी सारस्वत आहेत. सोरटीचे सारस्वत हे वैष्णव असल्यामुळें हिंसा करीत नाहींत परंतु पंजाबी सारस्वत हे हिंसा करितात. त्यांचें कुलधर्मही देवीसंबंधी असून त्यांत बळी वगैरे देतात.

## ४६ राजपूत

राजपूत (गिरासी) यांची वस्ती काठेवाड प्रांतीं फार आहे. तिकडील सर्व राजे व संस्थानिक याच जातीचे आहेत. त्यांचीं आडनावें येणेंप्रमाणें :– (१) गोहेल रजपूत हे पांडवांचे वंश म्हणवितात. हे ज्या प्रांतांत राहातात त्यास गोहेलवाड म्हणतात. भावनगरचा ठाकूर हाही गोहेलच

आहे. त्यांचे पोटांत वच्छाणी, गोविंदाणी, देवाणी, आदेराणी व लाखिया अशा पांच शाखा आहेत. (२) जाडेजा, यांस जाधवही म्हणतात. त्यांतून जे कांहीं बाटून मुसलमान झाले त्यांस मोले सलाम मोमने असें म्हणतात. जुनागड व कच्छभूज येथील राव हे जाडेजा या आडनावांचेच आहेत. (३) चव्हाण पूर्वी पृथ्वीराज हा दिल्ली व अजमीरचा राजा होता त्याचें हेंच आडनांव होतें. याजवळ चंद भाट होता. (४) सरवेया. (५) वाळा. (६) वाजा. (७) राठोड, हे बळीचे वंश म्हणवितात. याच जातीचे जोतपूरचे राणे आहेत. (८) सिसोदिया, या जातीचे उदेपूरचे महाराणे आहेत. (९) झाला, या लोकांचे वस्तीस झालावाड म्हणतात. (१०) चूडासमा. (११) वाघेला. (१२) चावडा, पूर्वी वनराज म्हणून राजा होता तो या जातीचा होता. (१३) परमार, धारचा विक्रम. (१४) सोळंखी, पाटणचा राजा सिद्धराज हा या जातीचा होता. (१५) बरया. (१६) सिद्धा. (१७) जेठवा, हे हनुमंताचे वंशज म्हणवितात. (१८) जाधव. (१९) कच्छवाड, जयपूरचे राजे या जातीचे आहेत. (२०) तुवर, आणि (२१) वाढेल, किंवा वाघीर हे या देशीं आहेत.

## ४७ भाट

पूर्वी भाट, चारण यांची प्रतिष्ठा फार असे. ते राजाचे उपाध्ये असत, आणि राजाच्या वंशाचें वर्णन कवितारूपानें करीत, व तें वर्णन वीररस उत्पन्न करण्याकरितां स्वारींत राजापुढें म्हणत. त्यांस 'वहिवंचे भाट' म्हणतात. राजांचीं वंशावळ त्यांजवळ लिहिलेली असते, व दर एक राजकुळास नेमलेला भाट असतो. तो वर्षास राजदरबारीं येतो, व त्यास कांहीं द्यावें लागतें. याप्रमाणें भीक मागून ते निर्वाह करितात. जामीन घेणें तरी त्यांस घेत; मुलीबरोबर पाठविणें तरी भाट पाठवित; त्यांचे सारखा विश्वासू कोणी नाहीं, व तो प्राण दिल्याशिवाय राहावयाचा नाहीं, अशी लोकांची समजूत असे. ते त्रागा करीत म्हणजे त्यांजवर कोणीं जुलूम केला तर ते आपले घरच्या म्हाताऱ्या माणसाचें डोकें मारीत; आणि जो जुलूम करील त्याचे घरीं त्या प्रेतास आणून त्याचें तोरण बांधीत व 'तुझ्यावर ही हत्या पडली' असें म्हणत! मरणाची तर त्यांस बिलकुल पर्वा नसे. अहमदाबादेंत एका भाटिणीवर सरकारांत खोटी फिर्याद झाली सबब ती आपले पोटांत कटार मारून घेऊन मेली! तिचें देऊळ हल्लीं शाहापुरांत आहे. कोणीं त्यांस नेमणूक वगैरे दिली नाहीं तर ते त्याचें चित्र करून, तें एका उंच काठीवर टांगून त्याजबद्दलचें कवन व निंदा सर्व मुलुखभर दाखवीत फिरत. व याजकरितां राजेसुद्धां त्यांस भीत असत, आणि त्यांचा संतोष राखीत! हल्लीं भाटांमध्यें ज्या अनेक जाती आहेत त्या:—ब्राह्म भाट, बारवट भाट, वहिवंचे भाट, कंकाली भाट, तुर्की भाट, श्रमण भाट वगैरे.

## ४८ प्रसिद्ध भाट

भाट लोक रजपुत लोकांपासून उपजीवन करितात. त्यांच्या कवितेस कुंडली, सवाई, चौपाई, छप्पा, कबीत, छंद, प्रबंध, दोहा, केहेवत, गीत, असें म्हणतात. हे असें म्हणतात कीं, कृतयुगांत वेलंग, बळास व भीमसी, हे मोठे भाट झाले; त्रेतायुगीं बळीराजाजवळ पिंगळ नामक भाट होता; रामाजवळ रंपाळ होता; द्वापारयुगांत पांडवांजवळ सूत व संजय हे होते; पृथ्वीराजाजवळ चंद भाट म्हणून होता, त्यानें 'रासा' म्हणून मोठा भारतासारखा ग्रंथ केला आहे; विक्रमाजवळ वेताळ भाट होता आणि तसाच अकबराजवळ गंग भाट म्हणून होता.

## ४९ लिंगाईत

लिंगाईत हे शैवमतानुयायी असून त्यांजमध्ये शीलवंत, दीक्षावंत व पंचम अशा जाती आहेत. त्यांचे ग्रंथ परमेश्वरतंत्र शंकरसंहिता, शिवरहस्य, परमरहस्य, अनुभवसूत्र, वीरागम, शैवागम, आचारकौस्तुभ, वीरशैवचिंतामणि, पाशुपतागम, बसवपुराण वगैरे आहेत. हे लिंग धारण करतात,

भस्म लावतात, कोणताही विटाळ धरीत नाहींत, मृतक्रिया करीत नाहींत, कोणाच्या हातचें खात नाहींत, आणि त्यांचें अन्नावर कोणाचीही दृष्टि पडली तरी तें अन्न विटाळतें! परंतु कोंकणप्रांती जे लिंगाईत गुरव आहेत ते शिवाची पूजा करितात आणि ब्राह्मणांकडे जेवतात. ते शिंग व वाजंत्रें वाजविण्याचा धंदा करतात. शिवाचे देवळांत यांची, गुरवांची, गोसाव्यांची किंवा जंगम, नाथ किंवा जोगी यांची पूजा असते. धारवाडाकडे लिंगाईत लोक व्यासंतोल म्हणून एक समारंभ करीत असतात. त्यांत उंच काठी घेऊन त्यास दोन पंजे बांधतात आणि मिरवत जातात. जातांना तोंडानें म्हणतात कीं, 'व्यासांनी शिवाची निंदा केली म्हणून व्यासांचे हात तोडले!' मग वैष्णव चिडतात! आणि मारामारी करण्यास उठतात! अशा समयीं त्याजबद्दल सरकारास बंदोबस्त ठेवावा लागतो.

## ५० गुजराथेतील कुळंबी

गुजराथेंत दोन प्रकारचे† कुळंबी पार आहेत. एक कडवे व दुसरे लेवे. कडवे म्हणण्याचें कारण असें आहे कीं, ते लोक कडी प्रांतात बसले म्हणून त्यांस कडवे असें म्हणतात. व नर्मदातीरीं वसलेले लोकांस लेवे (रेवे–रल्योर भेदात) असे म्हणतात. त्याच प्रमाणें तिसरे आंजणे म्हणून लोक आहेत. त्यांत दक्षिणचे कुळंबीही धरतात. लेवे व कडवे यांत जे श्रेष्ठ असतात त्यांस पाठीदार म्हणतात. आणि यांतच चौथी सतवडे म्हणून एक ज्ञाति आहे. कडवे यांचा संप्रदाय असा आहे कीं, बारा वर्षांनीं एक वेळ मुलींचीं लग्ने करावयाचीं! मौजे उझामा या गांवीं त्यांची एक देवी आहे. तिचा गुरव बारा वर्षांनीं एकदा तिथि सांगतो. म्हणजे हे लोक पत्रें लिहून त्याप्रमाणें इतरत्र पाठवितात. व जेथे त्या लोकांची वस्ती असेल तेथे त्यांस कळवितात. बऱ्हाणपुर, उज्जनी, उमरावती, रतलाम, इंदूर, येवले, मिरत, अमदाबाद, बडोदें वगैरे ठिकाणीं यांची बहुत वस्ती आहे; तेथे त्या कुंकूमपत्रिका आल्या म्हणजे ते लोक पत्रिका घेऊन येणाऱ्या जासुदाचा मान करून त्या घेतात; आणि मग त्याप्रमाणे सर्व चालतात. नंतर मुलीस वर पाहून कोणा एकास रुपया आठ आणे देतात व त्याशीं तिचे लग्न लावून त्याच बैठकीस त्यांची फारकत घेतात. मुलीस वर मिळाला नाहीं तर फुलांचे ढिगाशींच तिचा विवाह करितात; आणि मग तीं फुलें टाकून देतात. ह्याप्रमाणे त्या मुलीचा प्रथम विवाह झाला असे मानतात. आपल्या इकडेही ब्राह्मणामध्यें वधूचे वाईट ग्रह असले म्हणजे तिचा कुंभाशीं विवाह करितात आणि तो झाल्यानंतर मग खऱ्या नवऱ्याशीं तिचें लग्न करितात. ह्याप्रमाणेंच ही सदरची कडवे लोकांची रीति आहे. वधूचा फुलांचे ढिगांशीं विवाह झाल्यानंतर मग पाहिजे त्या काली दुसरे वराशीं विवाह लावावा असा प्रचार आहे. त्यास नातरा म्हणजे पुनर्विवाह म्हणतात. व हे पुनर्विवाह पाहिजे तितके वेळ आणि केव्हाही केले तरी चिंता नाहीं अशी रीति आहे. प्रथम लग्न मात्र त्यांच्या ठरलेल्या मुहूर्तावर झाले पाहिजे.

## ५१ तोडे लोक *

## ५२ गोवेकरिणी कसबिणी *

## ५३ मुंबईची वस्ती

शेणवी ब्राह्मणांची वस्ती पूर्वी सावंतवाडीकडे होती. पुढे गोव्यास फिरंगी यांचा अंमल झाला तेव्हा त्या कारभारात हे मुत्सद्दगिरी करू लागले. पुढे फिरंग्यांचा अंमल मुंबईस झाला तेव्हा

† गुजराथेंत कुळंब्यास 'रामसैन्य' म्हणण्याचा पाठ आहे यावरून वाल्मीकांनी रामायणांत ज्यांस वानर म्हटले ते अनार्य (शूद्र) च असतील असा ज्यांचा तर्क आहे तो खोटा म्हणवत नाहीं.

* या संबंधीची पाने उपलब्ध प्रतींतून गहाळ झाली आहेत. शोध घेऊन मिळत नाही.

त्याजबरोबर ते मुंबईत व अष्टागर प्रांतात आले याजमुळे मुंबईतील भुतेश्वर वगैरे जीं मुख्य मुख्य ठिकाणें आहेत तीं व त्यांचा अधिकार ही शेणवी यांजकडेच आहेत. त्यांचे मागून मुंबईत गुजराथेतील वाणी आले. आणि त्यानंतर परभू व त्यामागून भाटे, लव्हाणे, खोजे हे काठेवाड व कच्छ प्रांतातून व्यापाराकरितां आले. परंतु कायस्थ परभू मात्र फारसे तिकडे गेले नाहीत. बाकी पाताणे परभू साष्टी प्रांतात रहात होते ते, आणि पांच कळशी, भंडारी, खत्री वगैरे बहुतेक मुंबईत जाउन बसले.

## ५४ गोवेकरिणी कसबिणी *

## ५५ भुताळे

कोळवणं वगैरे डोंगरी प्रांतांत भगत असतात. ते कोणत्यातरी एका बाईचे नांव सांगतात कीं, हिच्याजवळ भूत आहे. आणि यामुळे गावांत ताप रोग वगैरे येतात. मग तेथील सर्व भोळ्या लोकांस तें सत्य वाटून ते मूर्खपणानें त्या बाईस मारतात झोडतात किंवा तिचा खून करितात. अशा बाईस डांकीण किंवा भुताळी म्हणतात. या अज्ञानी लोकांत ही गैर समजूत फार प्रचलित आहे आणि याजमुळे ठाणें अदालतीत असे खुनाचे खटले बहुत येतात. हा सर्व बंडावा अज्ञान लोकांस ज्ञान येईल तेव्हांच संपेल; तोंवर अशा कितीक स्त्रिया डांकिणी व भुताळ्या म्हणून मारल्या जातील हें कांहीं कळत नाहीं !

## ५६ पारशी लोक

इराणात मुसलमानांनी गर्दी केली तेव्हा तेथील लोक इ. स. ७१७ मध्ये हिंदुस्थानात आले. ते काठेवाडात दिव बेट आहे तेथे व नंतर कोंकणात संजाणास आले. पुढे उदवाडा म्हणून एक गाव आहे तेथे त्यांनीं राजाची परवानगी घेऊन अग्नीचे देऊळ बांधले व त्यांत आतष बहिरामाची स्थापना केली. त्या काळी कोंकणांत चंपानेरचे राजाचा अम्मल असून तो मुलूख जाधवांकडे होता. हे लोक पारसी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांणी हत्यार धरुं नये असा राजानें करार घेतला होता. पुढे त्यांची वस्ती गुजराथ प्रांतात नौसरी, खंबायत, भडोच वगैरे ठिकाणीं झाली. पुढे १५०७ साली अमदाबादचा बादशहा महंमद बेगडा याणे जेव्हा संजाणवर स्वारी केली तेव्हा तेथील अग्नीस वासंद्यास नेऊन ठेवले होते. पुढे १७६५ साली नौसरीस अग्नि मंदिर बांधून त्यांत तो अग्नि स्थापन केला. नवसरीस मोबेद (पार्शांचे उपाध्याय) लोकांची शाळा आहे.

## ५७ वेद

वेदांस निगम, छंद, श्रुती, अग्नि, ब्रह्म वगैरे नांवे पुष्कळ आहेत. परंतु या ग्रंथांखेरीज दुसरे ग्रंथांसही त्यांचे महत्त्वाचे कारणाने वेद म्हणण्याचा परिपाठ आहे. जसे आयुर्वेद, गांधर्ववेद, शिल्पवेद वगैरे भारतासही इतिहास वेद म्हणतात.

## ५८ ब्राम्हणे

हल्ली जे ब्राह्मण ग्रंथ उपलब्ध आहेत ते (१) तैत्तिरीय ब्राह्मण, (२) ऐतरेय ब्राह्मण, (३) शतपथ ब्राह्मण, (४) गोपथ ब्राह्मण, (५) कौशीतकी ब्राह्मण, (६) छांदोग्य ब्राह्मण, (७) सामविधान ब्राह्मण, (८) ताड्य ब्राह्मण, (९) मंत्र ब्राह्मण वगैरे. या ग्रंथांत यज्ञ याग क्रिया आहेत व त्याजवर ही पौरुष ग्रंथ झाले असून त्यांची संख्या मोठी आहे. अग्निष्टोम प्रयोग, हौत्र प्रयोग, चातुर्मास प्रयोग, रोगपद्धति, इष्टीविधान, ऋतुरत्न माळा वगैरे प्रकरणेंही त्यांमधीलच आहेत.

## ५९ स्मृति

मुख्य स्मृति वीस आहेत. असे म्हणतात त्या – (१) मनु, (२) याज्ञवल्क्य, (३) पराशर, (४) व्यास, (५) विष्णू, (६) अत्रि, (७) वसिष्ठ, (८) गौतम, (९) दक्ष, (१०) कात्यायन,

* या संबंधीची पाने उपलब्ध प्रतींतून गहाळ झाली आहेत. शोध घेऊन मिळत नाही.

(११) उशना, (१२) हारीत, (१३) शंख, (१४) लिखित, (१५) बृहस्पति, (१६) आपस्तंभ, (१७) यम, (१८) शातातप, (१९) संवर्त आणि (२०) अंगिरा.

या शिवाय पुष्कळ स्मृती आढळतात. त्यांस उपस्मृती म्हणतात. त्या - (१) दैवत, (२) कोकित, (३) बुध, (४) बौधायन, (५) अश्वलायन, (६) जाबाल, (७) लोगाक्षी इ. यांत लघु, वृद्ध, सात्त्विक, राजस, तामस असे भेद आहेत.*

## ६० सूत्रे

(१) आश्वलायन, (२) आपस्तंब, (३) हिरण्यकेशी, (४) कात्यायन, (५) लात्यायन (६) गोभिल, (७) शौनक, (८) बौधायन इत्यादि सूत्रें प्रसिद्ध आहेत.

## ६१ संहिता

संहिता पुराणासारख्या आहेत, त्या--(१) सनत्कुमार, (२) प्रल्हाद, (३) सूत, (४) ईशान, (५) वायवी इत्यादी.

## ६२ पुराणें

(१) मार्कंडेय, (२) मत्स्य, (३) अग्नि, (४) भागवत (देवी), (५) विष्णु, (६) शिव, (७) लिंग, (८) वामन, (९) कूर्म, (१०) बृहन्नारदीय, (११) आदित्य, (१२) गरुड, (१३) स्कंद, (१४) भविष्य, (१५) ब्रह्मांड, (१६) ब्रह्म, (१७) वाराह आणि (१८) पद्म अशीं अठरा मुख्य पुराणें आहेत. याशिवाय आणखी पुराणें आढळतात ती :--(१) गणेश, (२) कालिका, (३) ब्रह्मदैवत, (४) कल्की, (५) नृसिंह, (६) आत्म, (७) मुद्गल व (८) श्रीमद्भागवत वगैरे. यांत सात्त्विक, राजस व तामस असे तीन वर्ग असून त्यांविषयी वाद आहे.

## ६३ अष्टादशपुराणसंख्या

अष्टदश पुराणांची संख्या येणेंप्रमाणें आहे :--

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | ब्रह्मपुराण. | ११,००० | (१०) | ब्रह्मवैवर्तपुराण. | १८,००० |
| (२) | पद्मपुराण. | ५५,००० | (११) | लिंगपुराण. | ११,००० |
| (३) | विष्णुपुराण. | २३,००० | (१२) | वराहपुराण. | २४,००० |
| (४) | शिवपुराण. | २४,००० | (१३) | स्कंदपुराण. | ८१,००० |
| (५) | भागवत्पुराण. | १८,००० | (१४) | वामनपुराण. | १०,००० |
| (६) | नारदपुराण. | २५,००० | (१५) | कूर्मपुराण. | १७,००० |
| (७) | मार्कंडेयपुराण. | ९,००० | (१६) | मत्स्यपुराण. | २०,००० |
| (८) | अग्निपुराण. | १५,००० | (१७) | गरुडपुराण. | ७,००० |
| (९) | भविष्यपुराण. | १४,००० | (१८) | ब्रह्मांडपुराण. | १२,००० |

## ६४ पुराणांतील भेद

पुराणांत साधारण पांच प्रकार असतात :—

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणम् ॥

पुराणांचे सात्विक, राजस व तामस असे तीन वर्ग आहेत ते असे :--

वैष्णवं नारदीयं च तथा भागवतं शुभम् ।
गारुडं च तथा पाद्मं वाराहं शुभदर्शनम् ॥
सात्विकानि पुराणानि विज्ञेयानि शुभानि वै ॥

---

* या विषयी विशेष खुलासा आमच्या स्वाध्याय पुस्तकात पृ. ६६ पहावे.

ब्रह्मांडं ब्रह्मवैवर्तं मार्कंडेयं तथैव च।
भविष्यं वामनं ब्राह्मं राजसानि निबोधत ॥
मात्स्यं कौर्मं तथा लैंगं शैवं स्कांदं तथैव च।
आग्नेयं च षडेतानि तामसानि निबोधत ॥

यास दुसरी कसोटी दिली आहे ती अशी :--

सात्विकेषु पुराणेषु माहात्म्यमधिकं हरेः।
राजसेषु च माहात्म्यमधिकं ब्रह्मणो विदुः।
तद्वदग्नेश्च माहात्म्यं तामसेषु शिवस्य च ॥

अन्यत्र तर सर्वपुराणांस पांचवा वेद असेंच म्हटलें आहे :--

ऋग्यजुः सामाथर्वाख्या वेदाश्चत्वार उद्धताः।
इतिहासपुराणं च पंचमो वेद उच्यते ॥

पुनरपि--

पुराणं सर्वशास्त्राणां प्रथमं ब्रह्मणा स्मृतम्।
अनन्तरं च वक्रेभ्यो वेदास्तस्य विनिर्गताः ॥
पुराणमेकमेवासित्तदा कल्पन्तरे ऽ नघ।
त्रिवर्गसाधनं पुण्यं शतकोटिप्रविस्तरम् ॥

हीं पुराणें अठरा असून त्यांची नांवें वर दिली आहेत. त्यांचें येथे संक्षेपानें वर्णन देतो :-

(१) **ब्राम्हपुराण.**--यास आदि किंवा सौरपुराणही म्हणतात. यांत सूर्याची आराधना, उत्कल देशांतील, तीर्थे, जगन्नाथपुरी; वगैरेंची वर्णनें केलीं आहेत. हें पुराण पूर्वी ब्रह्मदेवांनीं दक्षप्रजापतीस सांगितलें व तेंच लोमहर्षण नामक सूतांनी ऋषींस कथन केलें आहे. यास एक उत्तरखंड म्हणून जोडलें असून त्यांत बन्नासनामक नदीचें माहात्म्य आहे. हें पुराण उत्तरखंड सुद्धां ११,००० आहे.

(२) **पद्मपुराण.**--हें ५५,००० असून त्यांत (१) सृष्टिखंड, (२) भूमिखंड, (३) स्वर्गखंड (४) पातालखंड व (५) उत्तरखंड असे भाग आहेत. हें पुराण उग्रश्रवा म्हणून वरील लोमहर्षण सूतांचा पुत्र होता त्याणें सांगितलें आहें.

(३) **विष्णुपुराण.**--हें २३,००० असून तें पराशरांनी मैत्रेयास सांगितलें. त्यांत वराकल्पांतील कथा आहेत असें खालीं लिहिलेले श्लोकावरून दिसतें :--

वराहकल्पवृत्तांतमाधिकृत्य पराशरः।
यत्प्राह धर्मानखिलांस्तदुक्तं वैष्णवं विदुः ॥

(४) **शिवपुराण.**--यास वायुपुराणही म्हणतात. हें सूतांनीं सांगितलें असून त्याचे प्रक्रिया, उपोद्घात, अनुषंग व उपसंहार असे चार पाद आहेत. त्यांत कल्प, मन्वंतरें, श्राद्धें, यात्रा वगैरे सांगितलीं असून ग्रंत्रसंख्या २४००० आहे. यांत श्वेतकल्पाच्या कथा असून त्यांत असें लिहिलें आहे:-

श्वेतकल्पप्रसंगेन धर्मान्वायुरिहाब्रवीत्।
यत्रैतद्वायवीयं स्यादुद्रमाहात्म्यसंयुतम् ॥
चतुर्विंशत्सहस्राणि पुराणं तदिहोच्यते।
शिवभक्तिसमो योगाच्छैवं तच्चापराख्यया ॥

(५) **भागवतपुराण.**- यांत सारस्वत कल्पांतील कथा असून तें अर्जुनाचा नातु परिक्षिति राजा यास श्रीशुकदेवांनीं सांगितलें व तेंच पुनरपि सूतांनीं ऋषींस सांगितलें असा ओघ लिहिला आहे. त्यांत १२ स्कंद असून त्याची श्लोकसंख्या १८,००० आहे त्याविषयीं असें म्हटलें आहे.

यत्राधिकृत्य गायत्रीं वर्ण्यते धर्मविस्तरः ।
वृत्रासुरवधोपतं तद्भागवतमुच्यते ॥
सारस्वतस्य कल्पस्य मध्ये ये स्युर्नरामराः ।
तद्वृत्तान्तोद्भवं लोके तद्भागवतमुच्यते ॥
ग्रंथोऽष्टदशसाहस्रो द्वादशस्कंदसंमितः ।
हयग्रीवो ब्रह्मविद्या यत्र वृत्रवधस्तथा ॥
गायत्र्या च समारंभस्तद्वै भागवतं विदुः ॥
स्कंदान्द्वादश एवात्र कृष्णेन विहिताः शुभाः ॥
द्वात्रिंशत्त्रिशतं पूर्णमध्यायाः परिकीर्तिताः ॥

(६) **नारदपुराण.** --यांत बृहत्कल्पांतील कथा नारदांनी सनत्कुमारास सांगितल्या असून त्यांची संख्या २५००० आहे :--

यत्राह नादो धर्मान्बृहत्कल्पाश्रयानिह ॥
पंचविंशत्सहस्राणि नारदीयं तदुच्यते ॥

इतर पुराणांत अशा अनेक कथा आहेत तशा वामन, ध्रुव, प्रल्हाद वगैरेंच्या कथा या पुराणांत आहेत, व यास बृहन्नारदीय पुराण असेंही म्हणतात.

(७) **मार्कंडेयपुराण.**--हें ९००० असून त्यांत सप्तशती म्हणून एक १३ अध्यायांचें देवी-माहात्म्य मध्येंच घेतलें आहे.

(८) **अग्निपुराण.** --हा १६००० ग्रंथ असून त्यांत ईशानकल्पांतील कथा आहेत. त्यांत अग्नीनें वसिष्ठास सांगितलेल्या ज्या कथा व्यासास मिळाल्या त्याच सूतांनीं पुनः सांगितल्या आहेत :--

यत्तदीशानकं कल्पवृत्तांतमधिकृत्यं च ।
वसिष्ठयाग्निना प्रोक्तमाग्नेयं तत्प्रचक्षते ॥
तच्च षोडशसाहस्रं सर्वक्रतुफलप्रदम् ॥

यांत तांत्रिक कर्मे पुष्कळ असून बीजें, दीक्षा, गुरूचें माहात्म्य, गयामाहात्म्य, कांहीं इतर पुराणांतील अध्याय, कांहीं स्मृतींतील अध्याय कांहीं वैद्यक ग्रंथांतील श्लोक, कांहीं व्याकरणशास्त्रातील माहिती, राजनीति व धनुर्वेदांतील कांहीं अध्याय वगैरे अनेक प्रकारच्या प्रतिपादनांनीं तें भरलें आहे.

(९) **भविष्यपुराण.** --याची संख्या १४००० असून त्यांत अघोरकल्पांतील कथा आहेत. याचे पोटीं एक भविष्योत्तर पुराण म्हणून आहे तें याच पुराणाचें परिशिष्ट असेल असें वाटतें. हें सुमंतूने शतानिकास सांगितलें असून त्यांत उत्पत्तिसंस्कार, संध्या, व्रतें, वर्णाश्रमधर्म वगैरेंचें प्रतिपादन आहे. त्याविषयीं असें म्हटलें आहे :--

तत्राधिकृत्य माहात्म्यादित्यस्य चतुर्मुखः ।
अघोरकल्पवृत्तांतप्रसंगेन जगत्स्थितम् ॥
चतुर्दश सहस्राणि तथा पंचशतानि च ।
भविष्यचरितं प्रायो भविष्यं तदिहोच्यते ॥

(१०) **ब्रह्मवैवर्तपुराण.**--हें सावर्णी मनूनें नारदास सांगितलें, त्याविषयी मीं असें म्हटलें आहे :-

रथंतरस्य कल्परस्य वृत्तांतमधिकृत्य यत् ।
सावर्णिना नारदाय कृष्णमाहात्म्यसंयुतम् ॥
यत्र ब्रह्मवराहस्य चरितं वर्ण्यते मुहुः ।
तदष्टादशसाहस्रं ब्रह्मवैवर्तमुच्यते ॥

यांत ब्रह्मखंड, देवीखंड, गणेशखंड आणि कृष्णखंड अशीं चार खंडे असून त्यांत राधाकृष्णाच्या कथा, गोलोकाचें वर्णन वगैरे आहे. याची ग्रंथसंख्या १८००० आहे.

**(११) लिंगपुराण.**—यांत अग्निकल्पांतील कथा अग्निलिंग महेश्वरांनीं सांगितल्या असा योग वर्णिला असून त्याची संख्या ११००० आहे. त्यांत असें म्हटलें आहे :—

यत्राग्निलिंगमध्यस्थः प्राह देवो महेश्वरः ।
धर्मार्थकाममोक्षार्थमाग्नेयमधिकृत्य च ॥

यांत शिवाचें अग्निलिंग प्रगट झालें, ब्रह्मविष्णूचे गर्व हरण केले, वैवस्वत मन्वंतरांतील राजे, पद्मकल्पांतील कांहीं कथा व शिवमाहात्म्य अशीं लिहिलीं आहेत.

**(१२) वराहपुराण.**—हें पृथ्वीस वराहरूपीं विष्णूनें सांगितलें असून त्याचे २४००० श्लोक आहेत. त्यांत वराहवतारांचें माहात्म्य असून त्याविषयीं असें म्हटलें आहे.—

महावराहस्य पुनर्माहात्म्यमधिकृत्य च ।
विष्णुनाभिहितं क्षौण्यै तद्वाराहमित्युच्यते ॥

यांत मथुरामाहात्म्य, व्रतें, अनेक तीर्थे, शिव-दुर्गावर्णन, स्तोत्रें, प्रार्थना वगैरे पुष्कळ संग्रह आहे.

**(१३) स्कंदपुराण.**—यांत तत्पुरुषकल्पांतील गोष्टी, कार्तिकस्वामी यांनी सांगितल्या असून त्याची संख्या ८१००० आहे. हें संपूर्ण कोठेंच नाहीं. त्याचे कांहीं भाग सापडतात, त्यांस खंडें, संहिता व माहात्म्यें असें म्हणतात. त्यांत खंडांपैकीं काशीखंड, उत्कलखंड, ब्रह्मोत्तरखंड, सह्याद्रीखंड, रेवाखंड, नागरखंड, कन्याकुमारिकाखंड, विंध्याद्रिखंड, शिवरहस्यखंड, हिमवत्खंड, हिंगुळाद्रिखंड वगैरे; संहितेपैकीं सूतसंहिता, प्रल्हादसंहिता, सनत्कुमारसंहिता, सौरसंहिता, कपिलसंहिता वगैरे; व तशींच माहात्म्यांत भीमा, गोदा, व्यंकटेश इत्यादि हजारों माहात्म्यें प्रसिद्ध आहेत. स्कंदपुराणाविषयीं असें म्हटलें आहे :—

यत्र माहेश्वराधर्मानधिकृत्य च षण्मुखः ।
कल्पे तत्पुरुषे वृत्तं चरितैरुपबृंहितम् ॥
स्कांदनाम पुराणं तदेकाशीतिर्निगद्यते ।
सहस्राणि शतं चैकमिति मर्त्येषु गद्यते ॥

**(१४) वामनपुराण.**— यांत शिवकल्पांतील कथा ब्रह्मदेवांनी सांगितल्या असून त्यांमध्ये त्रिविक्रममूर्ति जो वामन याचें माहात्म्य, शिवांनीं कामदेवाचें दहन केलें तें केदारमाहात्म्य, कुरुक्षेत्र-गोदा यांची माहात्म्यें, कार्तिकस्वामीचा जन्म, स्वारोचिषमन्वंतरांतील कथा, इत्यादि असून त्याची संख्या १०,००० आहे. हें पुराण पूर्वी पुलस्त्यांनीं नारदास सांगितलें होतें :—

त्रिविक्रमस्य माहात्म्यमधिकृत्य चतुर्मुखः ।
त्रिवर्गमभ्यधात्तच्च वामनं परिकीर्तितम् ॥
पुराणं दशसाहस्त्रं ख्यातं कल्पानुगं शिवम् ॥

**(१५) कूर्मपुराण.**— यांत लक्ष्मीकल्पांतील कथा कूर्मरूपी विष्णूनीं ऋषींस सांगितल्या त्याची संख्या १००० आहे :—

यत्र धर्मार्थकामनां मोक्षस्य च रसातले ।
माहात्म्यं कथयामास कूर्मरूपी जनार्दनः ॥
सप्तदशसहस्राणि लक्ष्मीकल्पानुषंगिकम् ॥

यांत ब्राह्मी, भागवती, सौरी व वैष्णवी अशा चार संहिता असून त्यांत अनेक अवतार, अंधकासुरांचें युद्ध काशीमाहात्म्य व ईश्वर गीता, व्यासगीता वगैरे स्तोत्रें आहेत.

**(१६) मत्स्यपुराण.** — हें मत्स्यरूपी विष्णूनीं मनूस सांगितलें असून त्याची संख्या २०,००० आहे.

(१७) गरूडपुराण. — यांत गरुडकल्पांतील कथा असून त्या विष्णूनें सांगितल्या आहेत. त्यांत तांत्रिक कर्मे, ज्योतिष, सामुद्रिक, रत्नपरीक्षा, आयुर्वेद, प्रेतकल्प वगैरे कथा आहेत. या पुराणाची संख्या ७००० असून तें ब्रह्मदेवांनीं सांगितलेलें आहे.

(१८) ब्रह्मांडपुराण. — याची ग्रंथसंख्या १२००० असून त्यांत पुढें होणाऱ्या कल्पांच्या कथा ब्रह्मदेवांनीं सांगितल्या आहेत. या पुराणाविषयीं असें म्हटले आहे :—

> यच्च ब्रह्मांडमाहात्म्यधिकृत्याब्रवीत्पुनः ।
> तच्च द्वादशसाहस्रं ब्रह्मांडं द्विशताधिकम् ॥
> भविष्याणां च कल्पानां श्रूयते यत्र विस्तरः ।
> तद्ब्रह्मांडपुराणं च ब्रह्मणा समुदाहृतम् ॥

या पुराणांत खंडें व माहात्म्यें पुष्कळ असून हयग्रीवांनीं अगस्त्यास उपदेश केल्याची कथा व ललिता देवीचें माहात्म्य आहे.

## ६५ उपपुराणें

वर जीं पुराणें सांगितलीं त्याशिवाय उपपुराणें आहेत, त्यांत (१) सनत्कुमार, (२) नृसिंह, (३) नारदीय, (४) शिव, (५) दुर्वास, (६) कपिल, (७) मानस, (८) उशनस, (९) वरुण, (१०) कालिका, (११) सांब, (१२) नंदी, (१३) सौर, (१४) पराशर, (१५) आदित्य, (१६) महेश्वर, (१७) भागवत, (१८) वसिष्ठ, (१९) शिवधर्म, (२०) गणेश, (२१) मुद्गल व (२२) कल्की इत्यादी पुराणें आहेत.

## ६६ वेदभाष्यें

माध्यंदिनी शाखेची यजुर्वेद संहितेवर सायन, कर्क, देवयाज्ञिक, उवट व महीधर हीं पांच भाष्यें आहेत; आणि ऋग्वेदावर, तैत्तिरीय संहितेवर आणि सामवेदावर सायनाचार्यांचें मात्र भाष्य आहे. परंतु अथर्ववेदावर भाष्य झालेलें आढळत नाहीं.

## ६७ जुने ग्रंथकार

प्राचीन ऋषींत मोठे विचारशील ग्रंथकार झाले आहेत; प्रमाणशास्त्रांत गौतम व कणाद मुनि; अर्थ ठरविण्याचे शास्त्रांत जैमिनी; वैद्यशास्त्रांत चरकाचार्य व सुश्रुत; व्याकरणात पाणिनि, शाकटायन, कात्यायन, पतंजली झाले; तसेच पुढें भट्टोजी कौमुदी करणारे; नागोजी शेखर करणारे; न्यायग्रंथ करणारे गदाधर; वैद्यकांत वाग्भट्ट; काव्यकारांत वाल्मिक; इतिहासभारतकर्ते व्यास; छंदःशास्त्रांत पिंगल; असे प्रख्यात होऊन गेले. संस्कृत काव्य करणारे कालिदास, भवभूति, बाणभट्ट, मयूरकवि इत्यादि मोठमोठे प्रसिद्ध कवि झाले व त्यांची काव्येंही प्रसिद्ध आहेत. ज्योतिषाचे ग्रंथकार वराहमिहिर, भास्कराचार्य (यांनी सिद्धांतशिरोमणि केला आहे), गणेशदैवज्ञ, इत्यादि असेच प्रसिद्ध आहेत. वैद्यकांत वाग्भट्ट, शार्ङ्‌धर वगैरे झाले. व विद्येची वृद्धि करणारे वीरबुक, भोजराजा, यांसारखे झाले. पुढें मुसलमानी अंमल झाल्यापासून त्या सर्वांस ग्लानी आली. परंतु त्यांत एक अकबर मात्र झाला. त्यानंतर तसा जयपूरचा सवाई जयसिंग राजा झाला.

## ६८ टीका व भाष्यें

मनूचे धर्मशास्त्रावर मेधातिथी, गोविंदार्णव, कुल्लुकभट्ट, नंदराजकृत व्याख्या व मन्वर्थमुक्तावली इत्यादि टीका आहेत. याज्ञवल्क्य योगेश्वर यांजवर विज्ञानेश्वरानें मिताक्षरा म्हणून टीका केली आहे. आणि याज्ञवल्क्यावरच पराशरावर माधवांनी टीका केली आहे, तिचें नांव पराशरमाधवी असें आहे. संस्कृत ग्रंथकारांची अशी रीति होती कीं, ते मूळ ग्रंथावर ज्या व्याख्या किंवा अर्थ करीत त्यास त्यांचे रीतीप्रमाणें अनेक नांवें पडत. जों जों संस्कृत ज्ञान बुडूं लागलें तों तों टीकांचीं जरूर फार पडत चालली. याजमुळें टीका ग्रंथही फार झाले. त्यांचीं नांवें :— भाष्यें,

वृत्ति, कारिका, चूर्णिका, दीपिका, व्याख्या, नौका अशीं आहेत. म्हणजे, वेदावर ज्या व्याख्या आहेत त्या ग्रंथास भाष्य म्हणतात, आणि पाणिनीच्या व्याकरणसूत्रांवर पतंजलीनें ज्या व्याख्या केल्या त्या ग्रंथास महाभाष्य म्हणतात. कारिका म्हणजे मूळ सूत्रें मोडून त्याचे श्लोक करितात त्या चूर्णिका म्हणजे श्लोक मोडून त्याचा बखरीसारखा गद्यरूप मजकूर लिहितात त्या; आणि मूळचा ग्रंथ सिंधु या नांवाखालीं असला तर त्याचे व्याख्येस नौका म्हणतात. निर्णयसिंध्वादि ग्रंथांच्या टीकांस नौका ही अन्वर्थक संज्ञा आहे. म्हणजे त्या ग्रंथरूप समुद्राचा पार लावणारी ही टीकारूप नौका होय!

## ६९ पौरुष ग्रंथ

ऋषी नष्ट झाल्यावर जे ग्रंथकार झाले त्यांनीं नवीन कल्पना किंवा शोध काढण्याचा केवळ राजीनामाच दिला! व म्हणून त्यांस केवळ 'पुरुष' म्हणून त्यांचे ग्रंथास आर्य म्हणजे ऋषिकृत ग्रंथ न म्हणतां पौरुष ग्रंथ किंवा साधारणः निबंध म्हणतात. या पौरुष पद्धतीचे ग्रंथ वीरमित्रोदय, दलपत इत्यादि निबंध आहेत. या पौरुष ग्रंथांची ही मेहनत पाहिली तर पराकाष्ठेची आहे. तरी ते ग्रंथ केवळ पूर्वीचे ग्रंथ शोधून त्यांचे सार काढलें असून त्यांत नवीन कांहींच नाहीं. फक्त ब्राह्मणांचे उपजीविकेच्या साधनांची वृद्धि करण्याकरितां व लोकांस ज्यास्त बंधनें होण्याकरितां या ग्रंथकर्तृत्वशक्तीचा उपयोग झाला. आणि हा हेतु पुराणांनी व तंत्रांनी तर नीटपणीं तडीस नेला असें म्हणावें लागतें. ग्रंथकार विद्वान होते हें निर्विवाद आहे; परंतु त्यांच्या बुद्धीचा कल फिरून त्यांस तरी मतिमांद्य आलें हें कालमाहात्म्य समजावें इतकेंच, परंतु आतां हीं बंधनें सोडविण्यास महाप्रयास आहेत.

## ७० देव व त्यांजवरील ग्रंथ

वेदांनी आप, तेज, वायु, आकाश, सूर्य, अग्नि, इत्यादिकांस देव मानिलें आहे, आणि पुराणिकांनीं वीर पुरुषांसच देव मानिले. तथापि त्यांत मनः कल्पित पुष्कळ देव केले. त्याचप्रमाणे तंत्रांत दश महाविद्या, चंडी, वेताळ, भैरव हीं अनेक कल्पित प्रकरणें उत्पन्न झालीं. वेदांत छंदोमय मंत्र आहेत, पुराणांत स्तोत्रमय मंत्र व तंत्रांत कवचें, दुर्ग, रक्षा, हृदय, वर्ग, सहस्रनाम, पटल, पद्धति अशा प्रकारचे मंत्र केले आहेत. मांत्रिकांस असें वाटत होतें कीं, मंत्र हेच आमचीं कवचें व दुर्ग आहेत. शिवकवच, गणेशदुर्ग, रामरक्षा, आदित्यहृदय, गायत्रीसहस्रनाम, हनुमानपटल, पुरश्चरणपद्धति इत्यादि मांत्रिकांचीं प्रकरणें होत. आतां हे सर्व प्रकार अन्नाच्छादन व छाया यांची विपुलता होती तेव्हां उत्पन्न होऊन विचार मंद पडला आणि भक्ति व भोळेपणा वाढला असें दिसतें.

## ७१ शास्त्रादि ग्रंथ

हिंदु लोकांनीं स्वयंपाकावर जे ग्रंथ केले आहेत त्यांस नलपाक, भीमपाक, भोजनकुतूहल, सूपशास्त्र वगैरे नांवें आहेत; गायनावर जयदेव, नारद, तुंबर यांनीं ग्रंथ केले असून नृत्यावर भरतशास्त्र आहे. कामशास्त्रावर रतिरहस्य, रतिमंजरी, कोकशास्त्र वगैरे पंडितकृत ग्रंथ झाले आहेत. आणि मोठमोठीं प्रकरणे, शिल्प, वैद्यक, गायन, युद्ध वगैरेस तर त्यांनीं उपवेदच म्हटला आहे; अर्थ व शब्दज्ञानार्थकोशही अनेक आहेत; सुभाषित, हितोपदेश, पंचतंत्र इत्यादि बोधपर ग्रंथ, आणि कादंबऱ्या, काव्यें नाटकें, भाण वगैरे करमणुकेचे ग्रंथ आहेत. हिंदु ग्रंथकार कांहीं शास्त्रांचा शोध करतां करतां फार पुढे गेले; परंतु पुढें वाईट काळ येऊन त्यांत वाईट ग्रंथ निर्माण झाले. त्याचे उदाहरणार्थ, वेदांतांतून तंत्रें, यामल वगैरे निघाले; वैद्यकांतून कर्मविपाक निघाला; गणितविद्येंतून मुहूर्त व फलग्रंथ निघाले; घोड्यांचे गुणवर्णन वगैरे कलांतून शालहोत्र वगैरे निघालें, धर्मशास्त्रांतून

पुराणें निघालीं, आणि स्वाध्यायांतून 'जटा माला शिखा रेखा' दि विकृति निघाल्या. आतां हीं सर्व बंडें भ्रांतीनें किंवा निरुद्योगीपणानें अथवा पोटाकरितां निघालीं असावीं असें वाटतें.

## ७२ ज्योतिषग्रंथ

ज्योतिषग्रंथ एकंदर चार लक्ष आहेत; त्यांत सिद्धांत, गणित, होरा, स्वरोदय, रमळ वगैरे भेद आहेत. पैकीं सिद्धांत १८ आहेत त्यांची नांवें : १ ब्रह्म, २ आर्य, ३ वसिष्ठ, ४ अत्रि, ५ मनु, ६ पौलस्त्य, ७ लोमेश, ८ मरीचि, ९ अंगिरा, १० व्यास, ११ नारद, १२ शौनक, १३ भृग, १४ यवन, १५ पवन, १६ गर्ग, १७ कश्यप आणि १८ पराशर. या सिद्धांताखेरीज मुहूर्त, जातकाभरण, केशवी इत्यादि फलग्रंथ आहेत. स्वरोदयप्रकरणीं पवनविजय, समरसार वगैरे ग्रंथ आहेत. भास्कराचार्यांचा सिद्धांतशिरोमणि हा ग्रंथ केवळ गणितप्रकरणी आहे.

## ७३ हेमाद्रि व माधव

विद्यारण्य स्वामी, ज्यांनी पंचदशी वगैरे वेदांताचे ग्रंथ केले, ते पूर्वी विजयनगरच्या राजाचे दिवाण होते. त्यांचें पूर्वाश्रमीचें नांव माधव असें होतें या माधवांची, आणि हेमांडपंत म्हणजे हेमाद्रि हे दौलताबाद म्हणजे देवगिरी येथील जाधव राजे होते. त्यांचे दिवाण, अशा उभयतां दिवाणांची पैज पडली होती कीं, 'जास्ती ग्रंथ कोण करतो?' एक माधव झाला म्हणजे एक हेमाद्रि होई. याप्रमाणें प्रत्येकानें बारा बारा ग्रंथ केले. कालमाधव, निदानमाधव, इत्यादि माधवाचे व त्याचप्रमाणें हेमाद्रीचेही ग्रंथ आहेत. हे उभयतां दिवाण पौरुषग्रंथांत बहुत प्रसिद्ध आहेत. शिवाय यांनी इमारती वगैरे बहुत बांधल्या आहेत. त्रिंबकास गोदावरीचा घांट, सिन्नरजवळचें देऊळ, वगैरे अशीं हेमाडपंती कामें बहुत प्रसिद्ध आहेत. त्यांस चुना वगैरे न लावतां एकावर एक दगड रचून तीं केलेलीं असतात. त्यांस कर्णखिळीची कळाशी म्हणतात. राजाची मदत फार असे म्हणून अशीं कामें करण्यास त्यांस अडचण नसे. पुढें त्यांनीं वेदाचें भाष्य करावयास आरंभ केला. तेव्हां माधवाचा वडील भाऊ सायनाचार्य म्हणून होता, त्यानें त्यास म्हटलें कीं, 'माधवा, तूं जे ग्रंथ करतोस त्यांजवर आपलेंच नांव घालतोस; माझें नांव राहूं नये असें तुझे मनांत आहे कीं काय?' तेव्हा माधवानें सांगितलें कीं, 'आजपासून जे ग्रंथ होतील त्यांजवर तुमचें नांव घालीत जाईन. त्याजवरून 'सायनाचें वेदभाष्य' असें म्हणतात. हे ग्रंथ, वैदिकमार्गप्रवर्तक जो वीरबुक राजा होता त्याचे कारकीर्दीत झाले आहेत. पूर्वीची ग्रंथ प्रसिद्ध करण्याची रीति अशीं असे कीं, ज्या राजाचे घरीं ग्रंथ होत, त्यानें लेखक बसवून पाचशें किंवा हजार प्रती कराव्या आणि क्षेत्रोंक्षेत्रीं ब्राह्मणसमुदाय पाहून त्यांस वांटून द्याव्या. ह्याप्रमाणें ग्रंथ प्रसिद्ध होत. त्यांस ते ग्रंथ विकावयाचें, त्याजकरितां दुकान घालावयाचें, अथवा त्याचे विक्रीचा हिशेब ठेवावयाचे माहीत नसे. त्याप्रमाणेंच महाभाष्यादि व भारतादि पर्वप्राय ग्रंथ तयार झाले आहेत!

## ७४ कमळाकरभट्ट

कमळाकरभट्ट यांनीं निर्णयसिंधु वगैरे ग्रंथ केले. एकवेळ भट्ट हे ग्रंथ लिहीत बसले असतां दहा वाजतां एक गृहस्थ त्यांस भेटावयास गेला; आणि जवळ पोथीचें पान पडलें होतें तें घेऊन पाहिलें तों त्याजवर प्रातःस्नानाचें माहात्म्य लिहिलें आहे. तेव्हां तो ते वाचून म्हणला, 'भटजी, आपण प्रातःस्नानाचें इतकें माहात्म्य आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे, आणि तुम्ही तर अद्याप स्नानही केलें नाहीं. याचें कारण काय?' भटजी म्हणाले, 'धर्म दोन प्रकारचे आहेत, एक स्वतांधर्म आचरण करणें आणि दुसरा दुसऱ्यास धर्माची प्रवृत्ति करणें. आतां ज्या अर्थी आम्ही हा दुसरा धर्म, हा ग्रंथ लिहून करीत आहों त्या अर्थी आम्ही पहिला धर्म वर्ज केला तरी चिंता नाहीं.'

## ७५ आपय्यादीक्षित

आपय्यादीक्षित यांनीं ग्रंथ लिहिला त्यांत संन्यासाची मोठी स्तुति करून संन्यासाशिवाय मोक्ष नाहीं असें लिहिलें आहे. पुढें ते मरणावसानी झाले तेव्हां त्यांचे स्नेही त्यांस म्हणाले कीं, 'तुम्हांस तुमचे लेखाप्रमाणें आम्ही संन्यास देतों.' त्यावेळीं त्यांनीं उत्तर केलें कीं, 'आम्ही शिवाचे भक्त आहों, शिवभजनानें आम्हांस मुक्ति होईल. आम्हीं संन्यासाविषयीं जें लिहिलें तें ग्रंथाचा जसा ओघ आला तसें लिहिलें परंतु आमचें मत तसें नाहीं.' याजवरून पूर्वींचे ग्रंथकार हल्लीचे वकिलांसारखेच होते असें दिसतें. म्हणजे जिकडून फी मिळेल अथवा जिकडे कल फिरेल त्याचा पक्ष घेऊन बोलत. व तसेंच, ते जो पक्ष हातीं घेत त्याचें यथेच्छ मंडण करीत. भर्तृहरि हा उत्कृष्ट कवि होता, परंतु त्यानें ज्या तोंडाने वैराग्यशतक लिहून स्त्रियांची निंदा केली त्याच तोंडानें शृंगारशतक लिहून स्त्रियांचे महत्त्व लिहिले! तेव्हां याजवरून त्यांस खरा स्वाभिप्राय कांहीं नव्हता असें दिसतें.

## ७६ तवारीख फेरिस्ता म्हणजे हिंदुस्थानाचा इतिहास

औरंगजेब बादशहाचे कारकीर्दींत हिंदुस्थानचा एकंदर इतिहास लिहिण्याविषयीं हुकूम झाला. व त्याजवर कितिएक माणसें नेमून सर्व दफ्तरे व दास्तानें हीं त्यांचे हवालीं केलीं. त्याजवर मुख्य फेरिस्ता म्हणून मोठा कामदार होता. त्याचेच नावानें तो ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यास 'तवारीख फेरिस्ता' म्हणतात. हिंदुस्थानाचे सर्व इतिहासांस प्रमाणभूत तोच ग्रंथ आहे. व त्याचा तर्जुमा इंग्रजींत झाला आहे. एलफिन्स्टन वगैरे हिंदुस्थानचा इतिहास लिहिणारे सर्व लोक यांनीं त्याच ग्रंथाचे आधारें आपले इतिहास लिहिले आहेत.

## ७७ शाहनामा

मुसलमानांनीं इराण घेतलें, तेव्हां तेथील प्राचीन पारसीक लोक यांची फार दुर्दशा झाली. त्यांचे राजे व सरदार मारले गेले; सर्व रयत डोंगरांत जाऊन राहिली; कांहीं परदेशांत गेली व कांहीं बाटली. पुढें मुसलमान राजे झाले. त्यांनीं पारशी रयतेस, हिंदु लोक ज्याप्रमाणें भिलकोळ्यांस वागवितात, त्याप्रमाणें वेठबेगारीस धरू लागले. पुढें महमूद गजनवी याचे मनांत असें आलें कीं, मुसलमानांनी मुलुख घेण्यांचे पूर्वीं दारा, खुसरू, नवशेरवान, रुस्तुम, वगैरे जे मोठमोठे राजे झाले त्यांची आठवण बुडेल हें ठीक नाहीं. याजकरितां फिरदोसी म्हणून एक मोठा कवि होता, त्यास मागील बादशाहांचा जितका इतिहास मिळेल तितका कविताबद्ध लिहून काढावा म्हणून हुकूम केला, व दरएक श्लोकांस एक मोहोर देण्याचा ठराव केला. त्याप्रमाणें तीस वर्षे बसून त्यानें 'शाहनामा' म्हणून ग्रंथ केला. तोच इराणचा इतिहास समजण्यास मुख्य ग्रंथ आहे. व त्याजविषयीं त्या कवीची प्रतिज्ञा अशी आहे कीं :--

> कसे राके शाहनामा खानी कुनद।
> अगर जन बुवद पहिलवानी कुनद॥

म्हणजे ह्या ग्रंथांत वीररस इतका आहे कीं, तो ग्रंथ स्त्रीनें वाचिला तर तीही मर्द होईल!

## ७८ प्राकृत ग्रंथकार

भरतखंडांत साधु संत होऊन ज्यानीं कीर्तन, भक्ति व ज्ञानमहिमा वाढविला त्यांची नांवें :— (१) मच्छिंद्रनाथ, (२) गोरखनाथ, (३) जालंदरनाथ, (४) कानींपा, (५) भर्तृहरि, (६) गोपीचंद, (७) चोखा महार, (८) रोहिदास चांभार, (९) सजणा कसाई, (१०) नरहरि सोनार, (११) गोरा कुंभार, (१२) सावंता माळी, (१३) मिराबाई, (१४) नागो परमानंद, (१५) धना जाट, (१६) गुरु दादू, (१७) एकनाथपंत, (१८) रामदास स्वामी चैतन्यब्रह्मचारी, (१९) कृष्ण जयरामस्वामी, (२०) वामन स्वामी, (२१) तुकाराम मराठा वाणी, (२२) बोधराज, (२३) कबीर, (२४) मध्वमुनीश्वर, (२५) अमृतराव, (२६) शंकराचार्य, (२७)

जयदेव स्वामी, (२८) चांगदेव, (२९) भानुदास, (३०) मुकुंदराज, (३१) निवृत्तिनाथ (त्रिंबकेश्वरी), (३२) ज्ञानेश्वर (आळंदीस), (३३) सोपानदेव सासवडकर, (३४) मुक्ताबाई, (३५) नामदेव शिंपी, (३६) कूर्मदास, (३७) बाजीत पठाण, (३८) लतीफखान, (३९) शाहहुसेन खान, (४०) मुकुंददास, (४१) रामानंद स्वामी, (४२) कन्याहरदास, (४३) केशव स्वामी, (४४) रंगनाथ स्वामी, (४५) आत्माराम स्वामी, (४६) मुक्तेश्वर, (४७) आनंदमूर्ती, (४८) निरंजन स्वामी, (४९) गणेशनाथ, (५०) कमाल, (५१) मालोपंत, (५२) स्वामी नारायण, (५३) मोरोपंत, (५४) सौभागशाह फकीर (अमदाबाद), (५५) नाभाजी, (५६) जनाबाई, (५७) मध्वाचार्य, (५८) निंबार्क स्वामी, (५९) रामानुज स्वामी, (६०) विष्णु स्वामी, (६१) वल्लभाचार्य, (६२) चैतन्यगुरु, (६३) नित्यानंद स्वामी, (६४) गुरु नानक, (६५) बोधले बोवा, (६६) सखारामबोवा कवाडकर, (६७) अक्कलकोटकर स्वामी, (६८) चंडिराम बोवा, (६९) जयराम नाना नगरकर, (७०) लाला भगत, (७१) कुबेरजी भगत, (७२) माधवगीर बोवा, इ. या साधूंच्या कथा व कविता बहुत प्रसिद्ध आहेत. त्यांच्या समाधिस्थानांचे दर्शनार्थ बहुत यात्रा भरतात. भक्तमाला, संतविजय, भक्तलीलामृत आणि भक्तिविजय वगैरे यांच्या चरित्रांचे ग्रंथ आहेत. त्यांत त्यांनीं जे चमत्कार केले ते किंवा त्यांजविषयीं जो लौकिक आहे तो सर्व लिहिला आहे. म्हणजे तुकाराम देहासहित स्वर्गास गेले, ज्ञानेश्वरांनीं भिंत चालविली, चांगदेव वाघावर बसत होते, इत्यादि अनेक कथा त्यांत ग्रथित केल्या आहेत.

## ७९ मुकुंदराज

प्राकृत ग्रंथ पूर्वी नव्हते यास्तव, साधूंनीं परोपकारार्थ प्राकृत ग्रंथ करण्याचा विचार केला. त्यांतील आद्य ग्रंथकार मुकुंदराज होत. यांनीं विवेकसिंधु व अमृतानुभव म्हणून दोन ग्रंथ केले. तेव्हांपासून प्राकृत ग्रंथ करणाऱ्यांचे ब्राह्मणांनीं वैर आरंभिले. ते म्हणत की, 'प्राकृत ग्रंथ झाल्यावर आम्हांस कोण विचारतो?' ही अदावत एकनाथ, तुकारामापर्यंत चालली होती. तुकारामाचा वैरी रामभट म्हणून होता.

## ८० ज्ञानेश्वर

प्राकृत कवींत मोठे असे ज्ञानेश्वर, एकनाथ, वामन, मुक्तेश्वर, मोरोपंत, तुकाराम वगैरे कवि झाले. त्यांपैकीं, ज्ञानेश्वराचा एक पंथ आहे व तुकाराम याचा वारकरी पंथ आहे. त्यांचें त्यांचे भक्त त्यांची पुण्यतिथी करितात, भजन करितात, व त्यांच्या कविता गातात.

## ८१ एकनाथाचा वंश

(१) भानुदास म्हणून एक पैठण प्रांतीं साधु होते. त्यांचा पुत्र (२) चक्रपाणी, त्याचा पुत्र (३) सूर्याजीपंत, त्यांचे पुत्र (४) एकनाथ पैठणकर, त्यांचे पुत्र (५) हरी पंडित, त्यांचा (६) मेघश्याम, त्याचा (७) नारायण बोवा, त्याचा (८) रामचंद्रबोवा, त्याचा (९) छायाबोवा, त्याचा (१०) कुशाबा, त्याचा (११) रामचंद्रबोवा, त्याचा (१२) बाळकृष्ण, त्याचे (१३) रंगनाथ व त्यांचे हल्लीं दत्तक घेतलेले (१४) बालकृष्ण बोवा. याप्रमाणें प्रसिद्ध एकनाथ महाराजांची पूर्वोत्तरपीठिका आहे.

## ८२ सातारा प्रांतांतील पांच साधु

सातारा प्रांतात पांच सत्पुरुष झाले, त्यांस पंचायतन म्हणतात. त्यांचीं नांवें : रामदासस्वामी परळीकर, हे शिवाजी महाराजांचे गुरू होते व त्यांचे ग्रंथ दासबोध वगैरे प्रसिद्ध असून त्यांचा रामदासी पंथ प्रसिद्ध आहे; दुसरे रंगनाथ स्वामी निगडीकर; तिसरे जयराम स्वामी वडगांवकर; चौथे आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर व पाचवे आणि शेवटचे केशव स्वामी हैदराबादकर. या पांचांच्या समाधि आहेत, व हे सर्व कवि होते.

## ८३ रंगनाथ स्वामी

रंगनाथ स्वामी हे मूळचे पंढरपुरजवळ नाझरें गांव आहे तेथील कुळकर्णी होते. त्यांचेच भावबंदातील श्रीधर बोवा हे होते. त्यांनीं पांडवप्रताप, रामविजय, हरिविजय वगैरे ग्रंथ केले, यास्तव शाहू महाराजांनीं त्यांस एक गांव इनाम दिला आहे, व रंगनाथ स्वामीस निगडी गांव हा इनाम आहे.

## ८४ पंचकवि व साधूंच्या पुण्यतिथि

वारकरीपंथांत साधूंचीं वाक्यें मुख्य मानितात. त्यांशिवाय इतरांचें वाक्य त्यांस ग्राह्य नाहीं. त्यांत मुख्य साधु पांच आहेत – ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, कबीर व तुकाराम. यांविषयीं त्यांचें म्हणणें असें आहे कीं, 'कलियुगीं संत पुष्कळ झाले, परंतु त्यांत पटाईत असे पांचजण आहेत :–

'रेडा बोलविला, घोंडा जेवविला। स्वयेंचि गेला, वैकुंठासी ॥
स्वर्गीचे पितर जेणें जेवविले। मरोनियां झाला तुळशी फुलें ॥

अशा साधूंच्या मरणतिथीचे उत्साह कितीएक ठिकाणीं होतात. त्या तिथि :– एकनाथ-फाल्गुन वद्य. ६. तुकोबा - फाल्गुन वद्य. २. रामदास-माघ वद्य. ९. रंगनाथ - मार्गशीर्ष (?) १०. जोतीपंत भागवत - मार्गशीर्ष वद्य. १३. जयरामस्वामी - भाद्रपद वद्य ११. ज्ञानेश्वर-कार्तिक वद्य. १३. चिंचवडकर देव - मार्गशीर्ष वद्य ६. आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर - भाद्रपद शुद्ध २.

## ८५ साधुसंतांच्या समाधि

जनार्दनस्वामींची समाधि दौलताबादचे किल्ल्यावर आहे; तुकारामाची समाधि पुण्याजवळ देहूस आहे; रामदासस्वामींची किल्ले परळीस; ज्ञानेश्वराची आळंदीस आहे; सोपानदेवाची सासवडास आहे; निवृत्तिनाथाची त्रिंबकास आहे; मुक्ताबाईची माहुर उर्फ मातापुरास आहे आणि मोरया देवाची चिंचवडास आहे.

## ८६ गोरा कुंभार

गोऱ्या कुंभार म्हणून जो साधु झाला त्याचें मूळगांव बोरगांव नांवाचें धाराशिवपासून ७ कोसांवर आहे.

## ८७ जयदेव

श्रीजयदेव स्वामी हे उत्कलदेशांत विक्रमाचे पूर्वी झाले. त्यांचीं स्त्री पद्मावती नामक होती. तिची कथा अशी आहे कीं, ही कोणी ब्राह्मणाची कन्या असून तो ब्राह्मण तिला जगन्नाथास अर्पण करण्याकरिता घेऊन जात असतां त्यास वाटेंत जयदेव भेटला. तो अगदीं गरीब होता. त्यास पद्मावतीच्या बापानें म्हटलें कीं, 'मी ही कन्या तुला देतों.' तेव्हां जयदेव हा ब्रह्मचारी असून त्याचा लग्न करण्याचा बेतही नव्हता. परंतु पद्मावतीचा पिता आपली मुलगी त्याचे पुढें टाकून गेला. तेव्हां जयदेवानें तिला विचारलें कीं, 'तूं पुढें काय करणार ?' ती म्हणाली, 'ज्याअर्थी मला माझ्या बापानें आपले हवालीं केली त्याअर्थी आपण माझा अंगिकार केला तर बरें आहे; नाहीं तर मी जीव देईन !' तेव्हां तो तिच्याशीं लग्न करून गृहस्थ झाला, आणि नंतर त्यानें 'गीतगोविंद' नांवाचें काव्य केलें व त्याचप्रमाणें नीलाचल (तत्कालीन उत्कलदेशाचा राजा) यानेंही एक अष्टपदी ग्रंथ केला, आणि त्या दोन्ही ग्रंथकारांनी आपलीं पुस्तकें जगन्नाथाचे देवळांत नेऊन देवापुढें ठेविलीं. तेव्हां राजाचा ग्रंथ देवळाबाहेर उडून गेला व जयदेवाचा ग्रंथ देवाचे पायावर पडला अशी त्याचे ग्रंथाची ख्याति आहे. शिवाय जयदेवानें आपली स्त्री पद्मावती मेलेली असतां उठविली असेंही लोक म्हणतात. जयदेवाची कविता फारच शृंगारिक असल्यामुळें कित्येकांस ती अयोग्य वाटते !

## ८८ मिराबाई

मिराबाई ही मेरठ्याच्या (जोधपूर प्रांत) राजाची मुलगी असून ती उदेपूरच्या राजास दिली होती. तिची सासू देवीउपासक असून तिचे व सुनेचें बनेना, सबब तिजला राजवाड्यांतून काढून दिलें होतें. एकवेळ तर तिला राजानें (नवऱ्यानें) विष दिलें होतें, परंतु त्यापासून तिचें कांहीं झालें नाहीं! पुढें ती श्रीकृष्णाची भक्ति करून द्वारकेस वृंदावनास यात्रा करी. नवऱ्यानें तिला नेमणूक करून दिली होती. पुढें उदेपुराहून तिला बोलावणें आलें. त्या वेळीं ती श्रीद्वारकेस देवाजवळ निरोप घेण्यास म्हणून गेली व तेथें स्वरचित पद्यें म्हणूं लागली. तों द्वारकाधिशाचे मूर्तीचे दोन भाग होऊन मिराबाई त्यांत शिरली व ती मूर्ति पूर्ववत् जडून गेली! त्यानंतर उदेपुरास व द्वारकेस तिची मूर्ति बसविली आहे.

## ८९ सूरदास

सूरदास म्हणून अकबर बादशाहाचे कारकीर्दींत एक हिंदुस्थानी अंधळा कवि होऊन गेला. त्यानें 'विनय' वगैरे बहुत ग्रंथ केले आहेत. सूरदासाप्रमाणेंच वृंद व ब्याहारी असे दोन हिंदुस्थानी वृंदसत्सई व ब्याहारीसत्सई म्हणतात.

## ९० तुळशीदास

तुळशीदास हा साधु व कवि चित्रकोटाजवळ राजापूर म्हणून गांव आहे तेथील राहणारा असून त्यानें संवत १६०१ सालीं हिंदुस्थानी भाषेंत रामायण रचिलें म्हणून त्यास 'कलिवाल्मिक' म्हणतात. यानें 'तुळशीविनयपत्रिका' म्हणून एक ग्रंथ, जहानगीर बादशाहाचे कारकीर्दींत म्हणजे संवत १६८० किंवा इ. स. १६२४ सालीं केला असें त्याचे ग्रंथांतच लिहिलें आहे :–

सवंत सोलहसय असी गंगाजीके तीर।
सावण शुक्ला सत्तमी तुलसी त्यजो शरीर॥

हा सरवरिया ब्राह्मण असून त्याचा गुरु जगन्नाथदास म्हणून होता. हे गुरुशिष्य काशीस राहत असत. तुळसीदासानें 'तुळशीसत्सई' म्हणून सातशें दोहोऱ्यांचा एक ग्रंथ केला असून शिवाय 'रामगुणावलि' व 'गीतावलि' या नांवाचे याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

## ९१ महिपतबोवा ताहराबादकर

महिपतबोवा ताहराबादकर यांनीं भक्तिविजय व कथासारामृत हे दोन ग्रंथ ओंवीबद्ध केले आहेत. एकांत कलियुगांतील साधूंच्या कथा व दुसऱ्यांत पुराणांतील चमत्कारिक कथा वर्णिल्या आहेत. ताहराबाद हें गांव नगराजवळ आहे.

## ९२ नारायणबोवा पिपोडेकर

सन १८३० सालीं साताऱ्याजवळ पिपोडें येथें एक कुळंब्याचा मुलगा नारायणबोवा म्हणून प्रसिद्ध झाला होता. त्याचीही मोठी जत्रा भरूं लागली होती. एक वेळ तर सातारचे महाराज व मालकम साहेब गव्हरनर हेही त्याचे भेटीस गेले होते, हा बोवा साप धरीत असे, ही त्याची करामत होती, परंतु पुढें तो मुलगा साप चावूनच मेला!

## ९३ माणिकप्रभु

हुमणाबाद येथें माणिकप्रभु म्हणून एक साधु सन १८६० सालीं झाले होते. त्यांचीही जत्रा भरत असे. त्यांस लाखों रुपयांचे लोक नवस करीत व ते रुपये ते उडवीत. अशीं दहा वर्षे त्यांची कीर्ति झाली. पुढें तेही समाधिस्त झाले.

## ९४ देवमामलेदार

यशवंतराव महादेव भोंसेकर हे मूळचे देशपांडे असून इंग्रजींत मामलेदार होते. पुढें त्यांस पेन्शनांत काढिलें. परंतु त्यांचे परोपकारीपणावरून त्यांचा लौकिक इतका वाढला कीं, हजारों

लोक त्यांचे दर्शनास जाऊं लागून त्यांस नवस करूं लागले. व त्यांस देवमामलेदार असें नांव पडलें. यांची परोपकारीं प्रवृत्ति फार असून ते स्वार्थावर मुळींच नजर देत नाहींत यामुळें त्यांस लोक फार चाहतात. यांवर 'यशवंतचरित्र' म्हणून एक पद्यात्मक पुस्तक झालें असून त्यांत त्यांचे बहुत वर्णन केले आहे.

## ९५ अक्कलकोटचे स्वामी

अक्कलकोट येथें एक स्वामी होते. ते दिसण्यांत वेड्यासारखे होते, परंतु त्यांचे वृत्तीचा लोकांस चमत्कार वाटून अक्कलकोट येथें त्यांजकरितां मोठी यात्रा भरत असे. ते स्वामी सन १८७९ सालीं समाधिस्त झाले. त्यांचीही स्वहितावर दृष्टि नसे, याजमुळे लोक त्यांस भजत. त्यांजवरहीं 'स्वामीचरित्र' नांवाचा एक ग्रंथ झाला असून त्यांत त्यांचे सर्व वर्णन आहे.

## ९६ लाला भगत

गुजराथेंत लाला भगत म्हणून एक साधु होऊन गेला. याचें मूळ ठिकाण वढवाणाजवळ सायला म्हणून गांव आहे तेथें आहे. गुजराथ प्रांतांत ठिकठिकाणीं याचीं मंदिरें आहेत. ज्याप्रमाणें पैठणाकडे नाथाचीं मंदिरें व अन्नदानाचा सांप्रदाय आहे त्याचप्रमाणें गुजराथेंत लालाचा प्रकार होता, व तोच सांप्रदाय अद्यापि त्याचे शिष्य चालवितात.

## ९७ साधूंचा हेतु

रामानंद, कबीर, शंकराचार्य इत्यादि जे साधू पूर्वी होऊन गेले त्यांनीं वर्णाश्रम धर्म काढून टाकण्याची पुष्कळ योजना केली असें दिसतें. कारण बहिरागी, गोसावी, शीख व कबीरपंथी यामध्यें चारी वर्णांचे लोक सामील होतात व भोजनादि व्यवहार चालतात. घरबारी झाले म्हणजे सोयरेधायरेही बनतात. 'भक्तमाळ' म्हणून एक ग्रंथ वैष्णवामध्यें प्रसिद्ध आहे, तो धेड जातीचा नाभाजी म्हणून होता त्यानें रचला व त्या ग्रंथांत त्यास 'नारायणदास' असें नांव आहे !

## ९८ मराठी ग्रंथकार

इंग्रजी ग्रंथांतून मराठी तर्जुमे करण्याचें काम प्रथम सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे यांनीं केलें. त्यांचे इसापनीति, बाळमित्र हे ग्रंथ फार प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. पुढें बापू जोशी साष्टीकर यांनीं निघंट म्हणून वैद्यशास्त्राचा ग्रंथ केला. पुढें छत्रे यांनीं बाळशास्त्री जांभेकर यांस आपले काम शिकविले व बाळशास्त्री यांनी दादोबा पांडुरंग वगैरे मंडळी तयार केली. तशीच प्रथमतः इकडे ज्यार्व्हिस् साहेब यांनी सर्व्हेची पाहणी करण्याची विद्या शिकविली, व गणिताची बुकेही प्रसिद्ध केलीं. पुढे डाक्टर तयार करण्याकरितां बुके झालीं. आणि त्यानंतर हरी केशवजी, गोंविद नारायण वगैरे पुष्कळ ग्रंथकार झाले व होत आहेत. परंतु हे ग्रंथकर्तृत्वाचे काम अद्यापि बहुत शिल्लक आहे, व लोकांस असून ह्याबद्दलची असावी तशी रूचिही नसून ज्ञानवृद्धीस आपले लोक फार पराङ्मुख व उदासीन आहेत ही मोठी दुःखाची गोष्ट आहे !

---

# धर्म व धर्मप्रवर्तक

## ९९ धर्म संस्थापक आचार्य

शंकराचार्य स्वामी यांस शिवाचा अवतार म्हणतात; रामानुज यास शेषाचा अवतार म्हणतात; मध्वाचार्यांस वायूचा अवतार म्हणतात; निंबार्कास सूर्याचा अवतार म्हणतात; वल्लभाचार्यांस

अग्नीचा अवतार म्हणतात; आणि स्वामी सहजानंद यांस नारायणाचा अवतार म्हणतात. याप्रमाणे अवतारी पुरुष मानण्याची लोकरूढीं आहे.

### १०० शेणव्यांचे स्वामी

जगद्गुरु शंकराचार्य यांचे दोन भेद आहेत. एक पंचद्राविडांचे शंकराचार्य आणि दुसरे पंचगौडांचे शंकराचार्य. यांची परंपरा अशी सांगतात :– शेणवी हे गौडब्राह्मण असून त्यांचे ज्ञातींत गौडपादाचार्य म्हणून मोठे स्वामी झाले. त्यांचे शिष्य गोविंद व गोविंदांचे शिष्य शंकराचार्य झाले. आणि म्हणूनच 'गोविंदपादपूज्य' असे शंकराचार्यांस विशेषण लिहितात. ही द्रविडशंकराचार्यांची परंपरा झाली. अशीच गौडपरंपराही आहे. ते शेणव्यांचे शंकराचार्य म्हणतात. शेणवीज्ञातींत पूर्वी रामाजी कामत म्हणून मुंबईच्या गव्हरनराचे कौन्सिलदार होते. व चतुर साबाजी म्हणून विजापुरास मोठे मुत्सद्दी होते तेही शेणवीच होते. सारांश, शेणवी हे ब्राह्मणांसारखेच चतुर, बुद्धिमान् व राजकारस्थानी आहेत.

### १०१ शंकराचार्य

शंकराचार्य हे मूळचे निंबोरी जातीचे ब्राह्मण होते. ही जात मलबारांत त्रावणकोर वगैरे पांड्य, चौल ह्या देशांत आहे. शंकराचार्यांचे आईस जातीबाहेर टाकिलें होतें, म्हणून या मुलाने लौकरच संन्यास घेतला. पुढे आई मेली तेव्हां स्वामी म्हणूं लागले कीं, मी तिची क्रिया करणार. परंतु ह्यासही ब्राह्मण अनुमत देईनात. मग त्यांनी आईस आपले घरींच चिता करून जाळून आपण तिची क्रिया केली. पुढे स्वामींस बहुत राजे अनुकूल झाल्यावर त्यांनी आपले ज्ञातीस अशी आज्ञा केली कीं, 'तुम्ही माझे आईस जाळण्यास हरकत केली म्हणून मीं तिला घरांत जाळिले, तर तुम्हीही आतां आपलीं प्रेते नेहमीं घरांत जाळीत जा.' व त्याप्रमाणें अद्याप ती चाल चालत आहे. ती शंकराचार्यांचे शापाने चालते असे म्हणतात. निर्मळास स्वामींचीं समाधि आहे. असे म्हणतात, परंतु ती मूळचे स्वामींची नसून त्याचे परंपरेंतील कोणाची आहे. यांच्या सर्व परंपरेस शंकराचार्य असेच म्हणतात. याजमुळे मुख्याचा व इतरांचा भेद राहिला नाहीं. परंतु मूळ शंकराचार्यांची समाधि कोठें आहे त्याचा ठिकाण नाहीं.

### १०२ शंकराचार्यांचे मठ

शंकराचार्यांचे चार मोठे शिष्य झाले त्यांनीं चार दिशेस चार मठ स्थापन केले. त्यांचीं नांवें:– (१) त्रोटकाचार्य यांचा उत्तरेस बद्रिकेदाराजवळ जोर्तिमठ; यांचे-पर्वत, सागर व गिरी असे तीन प्रकारचे गोसावी असून आनंद हे ब्रह्मचारी आहेत. हे गोसांवी (संन्यासी) यांचे सेवक होत. (२) शृंगेरीस पृथ्वीधराचार्य यांनी दक्षिणमठ स्थापन केला. यांचे शिष्य-सरस्वती, भारती व पुरी असे तीन प्रकारचे गोसावी असून चैतन्य हे ब्रह्मचारीं आहेत. (३) पश्चिमेकडे विश्वरूपाचार्य यांनीं द्वारकेस शारदामठ स्थापिला; त्यांचे शिष्य-तीर्थ व आश्रम असे दोन प्रकारचे गोसांवी असून स्वरूप हे ब्रह्मचारी आहेत. (४) पद्मपादाचार्य यांनी पूर्वेकडे जगन्नाथास गोवर्धनमठ स्थापिला; त्यांचे शिष्य वन व अरण्य असे दोन प्रकारचे गोसांवी असून प्रकाश हे ब्रह्मचारी आहेत. येणेप्रमाणें चार मठ, दशनाम गोसावी, आणि चार ब्रह्मचारी झाले. यांत या मुख्य चार मठांशिवाय संकेश्वर, हंपी, कुंभकोणम् वगैरे त्यांच्या शाखा आहेत.

### १०३ रामानुजस्वामी

रामानुजस्वामी शंकराचार्यांचे पाठीमागें झाले, त्यांस ८०० वर्षे झालीं. शंकराचार्यांनी वेदांतमत प्रसिद्ध केलें तें ठीक नाहीं असें रामानुजांचे पूर्वज नाथमुनि यांस वाटून त्यांनीं त्याविषयीं योगरहस्य व न्यायतत्व केलें. त्यापुढे पुंडरीकाक्षाचार्य, रामाचार्य व यामुनाचार्य हे झाले. रामानुजाचार्यांनीं श्रीभाष्य, वेदार्थसंग्रह, गीताभाष्य व गद्यत्रय वगैरे ग्रंथ करून बहुत शिष्य व

मठ केले. त्यांचे पुढे वेदांताचार्य झाले. त्यानंतर सुदर्शनाचार्य, ब्रह्मस्वतंत्र परतंत्र स्वामी, वरवरमुनि, वगैरे मोठाले पंडित होऊन त्यांनीं तें मत प्रसिद्धीस आणिलें. पुढे त्यांत वडगल व तैंगल, म्हणजे उत्तरेकडील व दक्षिणेकडील, असे दोन पंथ झाले. तैंगल म्हणजे दक्षिणेकडचे त्यांचा मुख्य तोताद्री-मठ असून त्यांचा आचार वेगळा आहे. ते आपलें सर्व कर्म 'द्रविडप्रबंध' म्हणून एक प्राकृत ग्रंथ आहे त्याजवरून करितात. ते विधवेचे वपन करीत नाहींत. व यज्ञांतही हिंसा करीत नाहींत. बैरागी वगैरे सर्व तैंगलमताचे आहेत. रामानुजाचा जन्म भूतपुरींत झाला व मृत्यु कावेरीतीरीं श्रीरंगास झाला.

## १०४ रामानुजांची परंपरा

श्रीरामानुजस्वामी यांस शेषाचा अवतार म्हणतात. यांचा इतिहास दिव्यचरित्र म्हणून एक कानडी भाषेंत ग्रंथ असून त्यांत असें लिहिलें आहे कीं :– रामानुज, हे श्रीकेशवाचार्य व भूमिदेवी यांचे पुत्र असून पिंडबर येथें यांचा जन्म झाला. यांनीं कांचीक्षेत्रीं अभ्यास करून श्रीरंग म्हणजे त्रिचनापल्लीस येऊन तेथें ग्रंथ केले आणि ते आपलें वैष्णवमत शिकवूं लागले. पुढे चोल देशाचा राजा शैव होता त्यानें त्यांस धरण्याचा बेत केला. परंतु ते पळून म्हैसूरच्या राजाश्रयास गेले. तेव्हां म्हैसूरचा राजा जैनधर्मी होता, परंतु त्यास त्यांनीं उपदेश करून श्रीवैष्णव केलें. आणि त्याचे नांव वितलदेव होतें ते बदलून विष्णुवर्धन असें ठेविलें. नंतर रामानुजांनी मैलकोटा येथें एक मठ बांधिला. पुढे चोळदेशचा राजा मेला तेव्हां ते पुनः श्रीरंगास आले. रामानुजांचा मंत्रोपदेश 'श्रीरामाय नमः' हा षडक्षरी असून तुळसी, गोपीचंदन, शालिग्राम, नारायण, विष्णु, राम, श्रीरंग, व्यंकटेश, लक्ष्मी, जगन्नाथ इत्यादि वैष्णव देव पूज्य मानतात. रामानुजानें अनेक ग्रंथ केले त्यांत श्रीभाष्य, गीताभाष्य, वेदांतसंग्रह, वेदांतप्रदीप, वेदांतसार वगैरे प्रसिद्ध आहेत. याचे मतें नारदपंचरात्र आणि विष्णु-नारदीय-गरुड-पद्म-वराह व भागवत ही सहा पुराणें मात्र प्रमाण व सात्विक ग्रंथ आहेत. याचे मतास विशिष्टाद्वैतमत म्हणतात. याचे शिष्य बहुत झाले. त्यांत देवनंद, हरीनंद, राघवानंद व चौथा रामानंद (इ. सन १४००) हे मुख्य झाले. यांज-मध्येंही वडगल व तैंगल असे दोन पक्ष असून त्यांचे मठ व आखाडे आहेत आणि त्यांत महंत असतात. रामानंदाचे १२ शिष्य होते त्यांची नावें :-- (१) आशानंद, (२) कबीर मेमण, (३) रोहिदास चांभार, (४) पीपा राजपूत, (५) सुरसुरानंद, (६) सुखानंद, (७) भावानंद, (८) धना भाट, (९) सेना न्हावी, (१०) महानंद, (११) परमानंद, व (१२) श्रियानंद; हे सर्व भिक्षुक होते व यांनी प्राकृत ग्रंथही बहुत केले आहेत. या सर्वांचे मोठमोठाले चमत्कार वर्णिले आहेत. पीपानें समुद्रांत जाऊन श्रीकृष्णापासून मुद्रा आणिल्या अशी ख्याति आहे. त्या मुद्रा लोक अद्यापि तापवून घेतात. त्यांचा इतिहास 'भक्तमाला' म्हणून नाभाजीनें एक ग्रंथ लिहिला आहे त्यांत पहावा. हा नाभाजी ऊर्फ नारायणदास डोम जातीचा होता.

## १०५ रामानुजाचे मठ

रामानुजाचे ७०० मठ आहेत असें म्हणतात. हे मठ अहोबलमठ, तोताद्री, रामेश्वर, श्रीरंग, कांची, मैलकोटा इत्यादि आहेत. पैकीं कांहींत संन्यासी अधिकारी आहेत व कांहींत आचार्य अधिकारी आहेत. रामानुजास त्याचे शिष्य शेषाचा अवतार असें समजत होते. रामानुजाच्या पित्याचें नांव श्रीकेशवाचार्य व आईचें नांव भूमिदेवी. याचा जन्म कांचीस झाला असें म्हणतात. या सांप्रदायाचे लोक अवैष्णव लोकांचे दृष्टीचा विटाळ मानितात व यास्तव ते पडदे लावून गुप्तपणें जेवतात. त्याचप्रमाणें लिंगाईत हे अशैवांचा विटाळ मानितात व त्यांकरितां त्यांच्या दृष्टीआड जेवतात खातात! ह्याप्रमाणे रामानुज आणि लिंगाईत हे परस्पर व्युत्क्रमस्थितींत असून ते आपाप-ल्यांस वीरवैष्णव व वीरशैव असें म्हणतात.

## १०६ निंबार्क

निंबार्क म्हणून वृंदावनांत एक आचार्य झाला. त्याचें पूर्वीचें नांव भास्कराचार्य होतें. एकदां त्यास भेटण्याकरितां एक जैन साधु आला असतां त्याशीं बोलतां बोलतांच संध्याकाळ होत आला. इतक्यांत त्यास आचार्यांनीं कांहीं अन्न दिले. तेव्हां तो म्हणाला कीं, 'सूर्यास्त झाल्यावर आम्ही कांहीं खात नाहींत.' तों आचार्यांनीं सूर्यास अस्त न पावण्यास आज्ञा केली, आणि जतीस सांगितलें कीं, 'आपण त्या निंबाचे झाडाखालीं बसून हे अन्न स्वस्थ भक्षण करावें; सूर्य कांहीं मावळणार नाहीं.' या विलक्षण सामर्थ्यावरून त्याचें नांव निंबार्क झालें असें म्हणतात. निंबार्काचें शिष्य मथुरा व जयपूरप्रांतीं पुष्कळ आहेत. निंबार्कास होऊन १४०० वर्षें झालीं असें म्हणतात.

## १०७ बंगाल्यांतील वैष्णव

बंगाल्यांतील वैष्णवपंथ उभा करणारे अद्वैतानंद, नित्यानंद चैतन्य असे त्रिवर्ग होते. त्या पंथाचा चैतन्यचरित्र म्हणून एक ग्रंथ असून त्यांत आदिलीला, मध्यलीला, आणि अंत्यलीला असे तीन भाग आहेत. त्या ग्रंथावरून असें समजतें की, ते तिघेही ब्राह्मण असून ते नदियाशांतिपुरास राहत होते. चैतन्याच्या बापाचें नांव जगन्नाथमिश्र व आईचे नांव सची असें होतें. चैतन्य हा कृष्णाचा अवतार असें म्हणतात. यास वल्लभाचार्यांची मुलगी दिली होती. परंतु हा २४ वे वर्षींच त्यागी व विरागी होऊन धर्मोपदेश करूं लागला. यानें मथुरा, वृंदावन व कटक येथें आपले वसतिस्थान केले होतें. हा बारा वर्षें धर्म सांगून शेवटी इ. स. १५२७ त जो नाहींसा झाला तो पुनः कोठेंही आढळला नाहीं. त्याचे शिष्य असें म्हणतात कीं, तो गोलोकास गेला. बंगाल्यांतील वैष्णव हे, अद्वैतानंदप्रभु, नित्यानंदप्रभु आणि चैतन्यप्रभु असे तीन प्रभु आहेत असे म्हणतात. या तिन्ही प्रभूंची देवळें वृंदावनांत असून तेथें बंगाली लोक दर्शनास येतात. या तीन प्रभूंचे सहा गोसांवी व अष्ट कवि शिष्य होते. त्यांनीं भक्तिमार्ग स्थापन करून राधाकृष्णाचें भजन करण्याचा उपदेश केला. चैतन्याचे शिष्यांनीं बहुत ग्रंथ लिहिले; त्यांत विदग्धमाधव, ललितमाधव, उज्वलनीलामणि, अष्टदास, लीलाखंड, गोविंदविरुदावलि, पद्मावली, मथुरामाहात्म्य, लघुभागवत, वज्रविलास, हरिभक्तिविलास, रासामृतसिंधु, भागवतामृत, सिद्धांतसार, भागवतसंदर्भ, भक्तिसिद्धांत, गोपालचंपु, उपदेशामृत, मनशिक्षा, गुणलेशरसायनमल्लिका, चैतन्य चंद्रोदय, स्तवमाला, स्तवामृतलहरी, श्रीस्मरणदर्पण, गोपिप्रेमामृत, कृष्णकर्णमृत, चैतन्यचरित्रामृत, चैतन्यमंगल, प्रेमभक्तिचंद्रिका, पाषांडदलन, वैष्णववर्धन, दानकेलिकौमुदी इत्यादि प्रस्थानिक ग्रंथ आहेत. चैतन्याचे अनुयायी हे राधाकृष्ण नांवाच्या मुद्रा आणि तुळसीमाळा हीं धारण करितात.

## १०८ राधावल्लभी पंथ

राधावल्लभी हा एक पंथ आहे. याचा मूळ ग्रंथ राधासुधानिधि नामक असून या पंथाचा एक मठ मथुरेस इ. स. १५८५ त स्थापन झाला. त्या पंथाचे लोक आपल्या मतप्रतिपादनास ब्रह्मवैवर्तपुराणाचा आधार घेतात. भारतभागवतांत राधा कोठें आढळत नाहीं, परंतु ब्रह्मवैवर्तपुराणांत असें लिहिलें आहे कीं, गोलोक म्हणून एक स्वर्ग असून त्यात इच्छा शक्ति ही राधारूप घेऊन कृष्णाजवळ राहते. तिच्यापाशीं गोपी बहुत असून कृष्णाजवळही बहुत गोप होते. पुढें एकेदिवशीं कृष्णाचें व राधेचें भांडण झालें म्हणून सुदामा नामक गोपानें तिला शाप दिला कीं, 'तूं मृत्युलोकीं जन्म घेशील.' तेव्हां तिनेंही त्यास शाप दिला कीं, 'तूं मृत्युलोकीं शंखचूड नामक दैत्य होशील.' त्याप्रमाणे राधा ही वैश्य जातींतील वृषभानु व कलावती याचे घरी अवतरली. आणि तिचे व कृष्णाचें लग्न झालें. पुढें तिचा व कृष्णाचा वियोग झाला आणि ती गोलोकी गेली. नंतर कृष्णावतार संपल्यावर कृष्णही तिकडे गेले. राधावल्लभी या पंथाचे शिष्य बरेच असून हे विशेषेंकरून सखीभाव म्हणजे राधेचें रूप नटतात.

## १०९ जोगी पंथ

जोगी हे बहुत दिवसांपासून हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहेत. ते आपलें मूळ शिवापासून गणितात. त्यांचे आचार्य झाले ते : – आदिनाथ, चौरंगीनाथ, मच्छेंद्रनाथ, मीननाथ, गोरखनाथ, नित्यनाथ, आनंदनाथ, निरंजननाथ, भैरवनाथ, बुद्धनाथ, या सर्वांविषयीं नाथचरित्र म्हणून मराठींत एक ओवीबद्ध ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला आहे. या नाथांची संस्थानें ठिकठिकाणीं आहेत. पैठणास शिवदिन नाथाचें एक मंदीर आहे नाथपंथी हे जोतपूरच्या राजाचे गुरु आहेत.

## ११० कबीरपंथ

कबीराचा काल मगर येथें संवत १५०५, भाद्रपद शुद्ध ११ रोजीं झाला. त्याविषयीं असें म्हटलें आहे :–

संवत पंदरहसेय और पांचमो मगर कियौ गबन।
अगहन सुदी एकादसी मिले पवनसो पवन॥

नानक याने कबीरपंथ धरूनच आपला सांप्रदाय चालविला होता. यावरून कबीर हा नानकाचे पूर्वी झाला होता असें दिसतें. शिवाय अबू फजल यानें असें लिहिलें आहे कीं, कबीर हा सुलतान सिकंदर याचे वेळेस होता. हा मेला, तेव्हां याचे देहाचीं फुलें व तुळशी झाल्या. त्याचे दोन भाग करून एक भाग काशीचा राजा वीरसिंह याने घेतला व त्यानें ती तुळशीफुलें पुरून टाकिलीं. त्या ठिकाणास कबीर चौथरा म्हणतात. आणि राहिलेला दुसरा भाग मगरचा नवाब बिजलीखान यानें घेऊन पुरला व त्याजवर एक कबर बांधिली. मगर हें गांव गोरखपुराजवळ आहे. कबीराचें पुढील वचन चमत्कारिक आहे : –

सबसे हिलिये सबसे मिलिये सबका लिजिये नाउ।
हांजी हांजी सबसे कीजिये वसे आपने गाउ॥

कबीरपंथी परस्परांस भेटले असता 'बंदगीसाहेब', 'सत्साहेब', 'गुरूकी दया' असें बोलतात. कबीरानें केलेले ग्रंथ खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत : – सुखनिधान, झुलणा, गोरखनाथकी गोष्टी, कहार, कबीरपंजी, हिंडोला, बालखकी, रामायणी, बारा मास, रामानंदकी गोष्ट, चंचरस, आनंदरामसागर, छतिसा, शब्दावलि, अलेफनामा, मंगल, रामेणी, वसंत, साकी, होळी, बीजक, रेखता, आगमवाणी. या ग्रंथातील कांहीं ग्रंथ स्वतः कबीराचे असून कांही त्याच्या शिष्याचे आहेत. बीजक हा ग्रंथ भागूदासानें केला आहे. परंतु तो आपला म्हणत नसून, कबीरानें सांगितला असें म्हणतो, व म्हणून ती वाणी कबीराचीच आहे असें म्हणतात. कबीरपंथी हे जाती, कर्म व मूर्ति मानीत नाहींत. तरी ते दयाधर्म मानतात. कबीरानें मुसलमान व हिंदु यांमधील द्वेष काढून दोघांची समजूत पाडण्याचा प्रयत्न केला. याचे मुख्य शिष्य श्रुत, गोपाळदास, भानुदास, नारायणदास, चूडामणदास, धर्मदास, जगोदास, जीवनदास, कमाल, साहेबदास वगैरे असून शिवाय या सर्व भरतखंडभर कबीराचे मेळे व मठ आहेत.

## १११ कबीराचे शिष्य व त्याचे ग्रंथ

कबीराचे मुख्य चेले श्रुत, गोपालदास, भानुदास, नारायणदास, चूडामणदास, जगोदास जीवनदास, कमाल, टांकसाळी, साहेबदास, आणि नित्यानंद असे दहा झाले. कबीराचे ग्रंथ २१ आहेत. त्यांस कबीरपंथी लोक वेदासारखे मानतात. त्यांचीं नांवे :– सुखनिधान, गोरखनाथकी गोष्टी, कबीरपंजी, बुलाखीकी गोष्टी, रामानंदकी गोष्टी, आनंदराम, सागर, शब्दावली, मंगल, वसंत होळी, रेखता, झुलणा, कहारा, हिंदोला, बारा मास, चंचरा, चोतिसा, आलेफनामा, रामेणी व दाखलबीजक.

## ११२ दादू पंथ

कबीर याचे मार्गे कमाल, नंतर जमाल, त्यानंतर विमाल, त्यामागून बुद्धुण व त्याचा शिष्य दादू हा होता. त्या दादूने आपला स्वतंत्र पंथ केला. त्याचा जन्म अहमदाबादेत झाला. नंतर तो अजमिरास गेला. हा अकबराचे कारकीर्दीत होता. परंतु पुढें तो कोठें गेला याचा ठिकाणा नाहीं. त्याचे चेले म्हणतात कीं, तो स्वर्गास गेला. याचे शिष्यांत विरक्त, नागे आणि विस्तारधारी, असे तीन प्रकार आहेत हे जयपूरास अजमीर येथें पुष्कळ आहेत. दादू याचा धर्म कबीरासारखाच आहे. याचा मुख्य शिष्य निश्चलदास हा असून त्यानें विचारसागर नांवाचा ग्रंथ केला आहे.

## ११३ वल्लभी पंथ

वल्लभाचार्य म्हणून लक्ष्मणभट्ट तैलंग ब्राह्मण याचे पुत्र असून ते गोकुळांत राहत होते. पुढें ते विजयनगर, उज्जनी, अहमदाबाद व काठेवाड वगैरे बहुत ठिकाणीं फिरले व त्या त्या ठिकाणीं त्यांच्या बैठक म्हणजे संस्थानें आहेत. नंतर ते वृंदावनांत आले. तेथें त्यांस देवाचा प्रसाद झाला. त्यांनीं बाळकृष्णाचे भजन करावें असें लोकांस सांगून शुद्ध द्वैतसांप्रदाय चालविला. ते गंगेत प्रवेश करून स्वर्गास गेले असें म्हणतात. यांचे संप्रदायांत वैराग्य आणण्याची मुळीच जरूर नसून शृंगारिक व संसारिक रीतीने भक्ती करण्याचें त्यांनीं प्रतिपादन केले आहे. मठांत राहणें व भिकारपणाचें मागणें हे त्यांनीं सर्वथैव वर्ज केले आहे. ते सप्तमुद्रा घेत नसून तिलक नैवेद्य व पूजन वगैरेही सर्व सुंदर व सुखकर असावें, असें त्यांचें मत आहे. त्यांच्या पंथांत समर्पण म्हणून एक विधि आहे. तो जे करितात त्यांस 'मर्यादी' म्हणतात. ते आपसांत 'जयगोपाळ' किंवा 'जयश्रीकृष्ण' असें म्हणतात. वल्लभी मतांचे ग्रंथ आहेत ते : – भागवतावरील सुबोधिनीटीका, अणुभाष्य सिद्धांतरहस्य, भागवत लीलारहस्य, विष्णुपद, ब्रिजविलास, व अष्टगणवार्ता वगैरे. वल्लभाची वंशावळ याप्रमाणे आहे :– वल्लभाचार्याचा पुत्र विठ्ठलनाथ; त्यास गिरधर, रायगोविंद, रायबाळकृष्ण, गोकुळनाथ, रघुनाथ, यदुनाथ व घनश्याम असे सात पुत्र होते. त्यांचा वंशविस्तार पुढें पुष्कळच झाला आहे. वल्लभाचे शिष्य वाणी, मारवाडी, लवाणे व भाट्ये यांजमध्यें पुष्कळ आहेत. यांचें मुख्य पीठ उदेपूर प्रांतांत नाथाद्वारा येथें आहे. वल्लभास महाप्रभुजी आचार्य असें म्हणतात.

## ११४ वल्लभाचार्य

वल्लभाचार्य हे गुजराथेंत व गोकुळपर्यंत प्रसिद्ध आहेत. त्यांचे अणुभाष्य, सुबोधिनी, सिद्धांत-रहस्य, भगवल्लीलारहस्य, एकांतरहस्य वगैरे ग्रंथ आहेत. यांचे मंदिरास 'मर्जादी' म्हणतात. म्हणजे त्यांत शेवेवर साचोर ब्राह्मण असावे. त्यांनीं नित्य आठ वेळेस पूजा कराव्या व तितकेवेळ दर्शन होण्याकरितां दारें उघडी ठेवून त्यानंतर बंद करावीं. त्या दर्शनाच्या वेळांस मंगळा, शृंगार, गोवाळ, बाळभोग, उत्थापन, राजभोग, संध्या व शयन असें म्हणतात. याशिवाय रासयात्रा, रथयात्रा व जळयात्रा वगैरे नैमित्तिक उत्साह करितात, व त्यामध्यें त्यांचे शिष्यांत जे अष्ट कवि झाले आहेत त्यांची मात्र कविता गातात; इतरांची गात नाहींत. याचे मंदिरांत तीन प्रकारचें पाणी असतें; खासा, मर्यादी व शेवकी. पहिले देवाकडे, दुसरे भक्तांकडे व तिसरे इतर सर्व कामांस लावतात तें डाकूर, श्रीनाथ व बेट द्वारका येथील मंदिरे हीं याच रीतीची आहेत.

## ११५ मलूकदासी पंथ

मलूकदासी हा पंथ अकबरबादशाहाचे वेळेस उत्पन्न झाला. हा रामानंदी पंथाची एक शाखा आहे. त्याची परंपरा अशी आहे :— प्रथम मलूकदास, त्यामागून रामस्नेही, त्यानंतर कृष्णस्नेही, नंतर ठाकुरदास, त्यावर गोपाळदास, पुढें कुंजविहारी, आणि त्यानंतर रामसाहू, शिवप्रसाददास

व गंगाप्रसाददास वगैरे. मलूकदासाचे मठ प्रयाग, वृंदावन, काशी, अयोध्या, लखनौ वगैरे ठिकाणीं असून जगन्नाथास त्याचा मुख्य मठ आहे. तेथेंच तो निवर्तला.

## ११६ मध्वाचार्य

महीजभटाचा मुलगा मध्वाचार्य यास पुढें वायुदेवाचा अवतार असें त्याचे शिष्य म्हणूं लागले. त्याचा जन्म ११९९ इसवींत झाला. यांनीं उडुपीस व सुब्रह्मण्यास वगैरे मठ केले आहेत. यांचें द्वैत मत म्हणजे, ईश्वर व जीव पृथक असून एक धनी व एक सेवक असें आहे. पूर्वी जसे हनुमान् व भीम हे वायूचे अवतार झाले तसे कलींत तुळवगांवीं मध्वाचार्य हे झाले असें म्हणतात. यांचे मतें विष्णु, नारद, गरुड, पद्म, वराह, आणि भागवत इतकीं सहा पुराणें मात्र सात्विक व वाचावयाजोगीं आहेत.

## ११७ जोतीपंत भागवत

जोती गोपाळ देशपांडे बुधकर हे अथर्ववेदी ब्राह्मण झांशीचे बुंदेले यांजकडे चाकरीस असतां त्यांस अनुताप होऊन ते काशीस गेले व तेथें त्यांनी भागवतधर्म स्वीकारला. यास जोतीपंत भागवत म्हणतात. यांनीं प्रत्येक गांवी जाऊन वर्गणी करून विठ्ठलमंदीर बांधावें आणि पुढें जावें. याप्रमाणे काशीपर्यंत गेले. आणि अशा रीतीनें त्यांनी हजार देवळें बांधिलीं असें म्हणतात. ही गोष्ट नानाफडणविसांचे कारकीर्दीतील आहे. पुण्यांत लाकडी पुलावर यांचें मंदीर आहे व सातार्‍यांतही आहे. अशीं यांची बहुत मंदिरें आहेत.

## ११८ स्वामीनारायण

स्वामीनारायण म्हणून, एक अयोध्येजवळ छपया गांव आहे तेथील एक सरवरिया ब्राह्मण होता. साधुवेषानें गुजराथेंत पेशवाई अमलांत फिरत असे. त्यांचे नांव प्रथमतः घनश्याम पांडे असें होतें व पुढे सहजानंद असें झाले: आणि नंतर स्वामीनारायण असेंही पडलें. पेशवाई अमलांत सुरळीत काम चालत नसे व व्यवस्था नीट नव्हती, याजमुळे बहुत तंटे होत. व ह्यामुळे तो हत्यारबंद होऊन फिरत असे. मुक्काम करणें झालें तर इंग्रजांचा गांव खेडा किल्ला होता तेथे राहत असे. इंग्रजीं अंमल झाल्यावर या उपदेशकास नीट फावलें आणि हजारों लोक त्याचे धर्मांत आले व कोट्यावधि रुपयांची संपत्ति त्यास अर्पण झाली. हल्लीं त्याचा मोठा पंथ आहे. या स्वामींनी अहमदाबादेंत एक मंदिर बांधण्याकरितां, दंडलाप साहेब कलेक्टर यांजपाशी सन १८२० सालीं जागा मागितली. तेव्हां साहेबांनीं त्यास विचारलें कीं, तुम्ही असे फिरता यापासून फायदा काय? तेव्हा त्याने उत्तर दिले कीं, 'आम्ही साहेबांपेक्षा सरकारची चाकरी चांगली करितों, कारण कीं, चोरांकडून चोरी सोडवितों, लुटारू यांजकडून लूट करण्याचें बंद करितों, लबाडांकडून असत्य भाषण सोडवितों, आणि या गोष्टी करण्याकरितां सरकार तुम्हास हजारों रुपये पगार देतें : परंतु, ज्या चोरास तुम्ही कैदेत टाकतां त्यास खर्च द्यावा लागतो आणि तेथेंही त्याचो सुधारणा न होतां तो सुटला म्हणजे पुन्हां चोरी करितो. तेव्हां सरकारचा खर्च किती व्यर्थ होतो? आणि आम्ही तर वेतन घेत नाही. आमचे उपदेशांत मनुष्य आला कीं, तो पुन्हां अधर्म करीत नाही. कोळी, काठी, मोणे, वाघरी इत्यादि दुष्ट लोकांस आम्ही नीति सांगून सद्धर्म दाखविला. आणि सरकारास एक पैसाही खर्च करावयास लागला नाहीं! तेव्हां आम्ही सरकारच्या किती उपयोगी आहों हें पाहावें.' हे ऐकून साहेब खुष होऊन त्यांनी एक मोठी रिकामी जागा पाहून त्यास मंदिर बांधावयास दिली. त्या ठिकाणींच हल्लीं अहमदाबादेंत मोठे मंदिर आहे. या स्वामींनी बहुत चोरटे लोकांस उपदेश करून त्यांस धर्म, सत्य, दया, हे मुख्य धर्म शिकविले. यांचे उपदेशानें दोन लक्ष माणूस सुधारले असे म्हणतात! यांचा दुसरा मठ वर्ताळ येथे आहे. तेथे चोरांचे मोठे

नाके होते. तेथेच यांनीं आपला मठ स्थापन केला ! येथील मोठा बंडवाला जो जोबन बर्तािळया म्हणून होता तो, दक्षिणेंत जसा उमाजी नाईक तसा गुजराथेंत कोळी होता.

## ११९ माधवगिरीचा पंथ

माधवगिरी या नांवाचा मनुष्य गुजराथेंत असून त्याचे शिष्यही बहुत आहेत. त्याचें वेदांत मत असून त्याचे शिष्य परस्परांस 'सच्चिदानंद' असें म्हणून भेटतात.

## १२० शिख

शिख म्हणून जो पंथ आहे तो मूळ नानकगुरु यानें उत्पन्न केला. त्यास आधार पंजाबी भाषेंत गुरुमुखी लिपीनें लिहिलेला एक ग्रंथ आहे. त्यास ग्रंथसाहेब असें म्हणतात. त्याची पूजा अमृतसर येथें सुवर्णाचे देवळांत होत असते, हा पंथ त्यागी बैराग्यांप्रमाणे असून त्याचा मुद्दा मुसलमानांचें व हिंदूंचें वांकडे मोडावें असा होता. नानकाचे पुढें गुरु अंगद, नंतर अमरदास, नंतर रामदास (हा अकबर बादशाहाचे वेळी होता.) पुढें अर्जुनमल (यास इसवी १६०० मध्यें कैदेंत टाकिले), पुढें हरगोविंद (यानें बंड केलें), त्याचा शिष्य हररा, त्यानंतर श्रीहरकिसन व त्यावर गुरु तेग्रबाहादर (याजवर १६७५ सालीं दिल्लीच्या फौजा येऊन त्यांनी त्यास मारलें व हाच शिखांचा पडता काळ आला), आणि शेवटीं दहावा गुरुगोविंद झाला. त्यास दसम पातशाहा असें म्हणतात. यानें आणखी राज्य मिळविण्याचा प्रयत्न केला होता. यानें 'वागुरूकी फत्ते' याप्रमाणे नमस्काराचे शब्द ठरविले व शिख लोकांस हत्यारें देऊन त्यांस 'खालसा' असें नांव ठेविलें. परंतु अखेरीस औरंगजेबाचे सैन्यानें त्यास पळविलें. पुढे थंडा बैरागी याने मुसलमानांस फार मारिलें, तेव्हां मुसलमानांनीं त्यास कैद करून मारिलें. शिखांमध्यें निर्मळ, उदासी व अकाली असे पंथ झाले व त्यांपैकीं कोणी चक्र बाळगितात. पुढें नादिरशाह व अहंमदशाह अबदल्ली यांचे गर्दीत पुनः जे शिख लोक उठले, त्यांतच पुढें रणजितसिंग वाढला व त्यानें राज्य मिळविलें. त्याचप्रमाणें सर्व पंजाब, काश्मीर व पेशावर हे प्रांत त्याचे कबजांत आले. पुढें रणजितसिंग मेल्यावर १८४८ सालीं फौजेनें गर्दी करून बंड केल्यामुळें इंग्रज सरकारनें तें शिखांचे राज्य सर्व खालसा केलें. तेव्हां रणजितसिंगाचा मुलगा दिलीपसिंग व त्याची विधवा आई चंदाराणी ही उभयतां विलायतेस जाऊन राहीलीं. त्यांत दिलीपसिंगानें तर धर्मांतर करून ख्रिस्तीधर्माचा स्वीकार केला. परंतु आई मात्र आपल्या मूळ धर्मांत होती, ती पारिस येथे वारली.

## १२१ वाममार्गी

शाक्तमार्गी असे म्हणतात कीं, दशावतारांतील परशुराम हा शाक्त होता. त्या परशुरामानें परशुरामसूत्र व परशुरामकृत कालीसहस्रनाम असे दोन ग्रंथ केलेले प्रसिद्ध आहेत. परंतु हा अवतारी परशुराम किंवा त्याच नांवाचा कोणी पंडित होता हें स्पष्ट कळत नाहीं. मोठ्याचें नांव घ्यावें ही चाल सर्वत्र आहे. याचप्रमाणें शंकराचार्यस्वामी हेही शाक्त होते असें म्हणतात व त्यास प्रमाण, एक प्रपंचसारसंग्रह व दुसरा कौलप्रशंसा हे दोन ग्रंथ त्यांचे नांवावर आढळांत येतात, परंतु हें खरें किंवा खोटें हें समजत नाहीं.

## १२२ शाक्तमत

पुण्यांत भाऊमहाराजांचें येथें कृष्णेंद्रस्वामी म्हणून फार दिवस राहात होते. ते अभ्यंतरीं शाक्त होते परंतु त्यांची बाह्यवर्तणूक शैवासारखी होती. पुढे यांचे शिष्य बहुत गृहस्थ झाले व त्यांचे शाक्तमतही फार वाढलें. तें सर्व कृष्णंभट गोखले पुराणिक यांनी फार मेहनत करून मोडले !

## १२३ भास्करराव शाक्त

मालेगांवकर रतनसिंग जाधवराव, यांचे उपाध्ये भास्करराव म्हणून देशस्थ ब्राह्मण होते. ते शाहूमहाराजांचे कारकीर्दीत मोठे सिद्ध शाक्त म्हणून प्रसिद्ध होते. पुढें त्यांचे शिष्य उमानंदनाथ

व दुसरे उपेंद्रबाबा तेलंग हे होते. सदरील राव साताऱ्यांतच राहात असत. त्यांनी अंतर्वरिवस्या व बहिर्वरिवस्या असे दोन ग्रंथ व सप्तशतीवर गुप्तवती नामक टीका व विधान अशीं दोन प्रकरणें केली आहेत. त्यांचे नातु मल्हारश्रौती हे पुण्यांत पेशवे कारकीर्दीत प्रसिद्ध होते. साताऱ्यास दुसरे असेच बचादेव माहूलीकर म्हणून मोठे शाक्त होते. मराठी राज्यांत मंत्रशास्त्री शत्रूवर अनुष्ठानें करण्याकरितां बाळगीत. यवतेश्वरचे द्रविड हे मंत्रशास्त्री म्हणूनच पेशव्यांनी त्यांस आणून नेमणूक देऊन ठेविले होतें.

### १२४ भक्तिपंथ व त्यास वेदाचा आधार

भक्तिपंथांत ईश्वराचें किंवा अवतारदिकांचें नामस्मरण करणें हें एक मोठें साधन गणलें आहे. त्याविषयीं श्रुतीचा आधार आहे असें भजन करणारे म्हणतात, व याविषयीं पुढील श्लोक भजनी लोक म्हणत असतात :–

वेदींही हरिकीर्तनींच महिमा केला असे आदरें,
कोठेंसा तरि विष्णुसूक्त अवघें शोधूनि पाहा बरें ।
त्यामध्येंच तृतीयवर्गहि 'भवांमित्रो' असे तो पहा,
त्याचो ही तिसरी ऋचा मग 'तमुस्तोतार' नामें पहा ॥

हा श्लोक ऋग्वेद— अष्टक २ अध्याय २ वर्ग २६ ची जी तिसरी ऋचा तदर्थक आहे.

### १२५ शैव व वैष्णव मतें

पुराणें झालीं त्याकाळीं शिव, विष्णु, ब्रह्मा इत्यादि देवांचे कैवारी बहुत होऊन ते दुसऱ्याची निंदा करीत. त्याचे दाखले पुढील श्लोकांत आढळतील :—

येऽन्यं देवं परत्वेन वदंत्यज्ञानमोहिताः ।
नारायणाज्जगन्नाथात्ते वै पाषण्डिनः स्मृताः ॥
यस्तु नारायणं देवं ब्रह्मरुद्रादिदेवतैः ।
सममन्यैर्निरीक्षेत स पाषण्डी भवेत्सदा ॥
किमत्र बहुनोक्तेन ब्राह्मणा येऽप्यवैष्णवाः ।
न स्प्रष्टव्या न वक्तव्या न द्रष्टव्याः कदाचन ॥

पद्मपुराणे, उत्तरखंडे, पाषाण्डाध्याये.

एको नारायण आसीन्न ब्रह्मा न च शंकरः ।
सर्वविष्णुमयं जगत् ॥

पुनरपि शैव म्हणतात —

सर्वव्यापी स भगवास्तस्मात्सर्वगतः शिवः ॥

### १२६ आखाडे व गोसांवी

गोसांवी व बैरागी यांचे आखाडे सात आहेत ते :— (१) वस्त्रधारी, (२) निरंजनी, (३) निर्वाणी, (४) निर्मोही, (५) दिगंबरी, (६) ताटंबरी, व (७) खाकी. यांपैकीं गोसांवी हे दशनाम म्हणवितात :— (१) बन, (२) अरण, (३) तीर्थ, (४) आश्रम, (५) गिरी, (६) पर्वत, (७) सागर, (८) भारती, (९) पुरी आणि (१०) सरस्वती. याशिवाय कोणी इंद्रही म्हणवितात.

### १२७ पंथ

हिंदुस्थानांत ६ दर्शनें, ३६ पाखांडें, १० दशनाम गोसांवी, ९ नाथ, ८४ सिद्ध, ४ वैष्णवी सांप्रदाय, ५२ द्वारा, आणि ७२ पंथ आहेत असें म्हणतात. याशिवाय वाममार्ग, जैनमार्ग, हे

आहेतच. मुसलमानांचे पंथ शिया, सुनी, हनफी, मालकी, हंबली, साफी आणि त्याशिवाय फकिरांचेही निरनिराळे मार्ग आहेत.

## १२८ जैन व रोमन क्याथलिक

ब्राह्मणांत जशा अनेक शाखा आहेत तसे जैनांमध्येंही ८४ गच्छ आहेत. जैन (श्रावक) लोकांमध्ये वर्षास आपलें पाप गुरूजवळ उच्चारून पश्चाताप करावा अशी चाल आहे. त्यास 'पंचखाण' म्हणतात. अशीच चाल रोमन क्याथलिक मताचे जे ख्रिश्चियन आहेत त्यांजमध्येंही असून ते त्यास 'कन्फेशन' म्हणतात. त्याचप्रमाणें सर्व उपाध्ये व धर्मगुरु अविवाहित व ब्रह्मचारी असावे असाही त्या दोन्ही धर्मांचा नियम आहे !

## १२९ मुसलमान लोक व मुसलमानी धर्म

आरबस्थानांत मक्काशहरामध्यें हजरत महंमद या नांवाचा एक पुरुष होऊन गेला. त्यानें नवीन धर्माचा लोकांस उपदेश करून कुराण या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला. तेव्हां कितीएक लोक त्यास हा तोतया असे म्हणूं लागले. म्हणून त्यावेळीं म्हणजे इसवी सन ६२२ त तो मक्का शहरांतून पळून गेला. त्याच काळापासून मुसलमान लोक पुढे हिजरी शक गणूं लागले. आरबी भाषेंत 'हिजरी' म्हणजे 'पळून जाणें' असा अर्थ आहे. महंमद पळून बाहेर प्रांती गेल्यावर त्यानें बरेच शिष्य जमविले व फौज ठेविली आणि मग जे लोक त्यास तोतया म्हणत होते व त्याचे विरुद्ध बोलत होते त्यांचें पारिपत्य केले व सर्व आरबस्थानांत आपला धर्म प्रसृत केला. नंतर तो आपल्यास बादशाह व पैगंबर म्हणवूं लागला. पुढें तो मरण पावल्यावर त्याचा सासरा हजरत अबू बक्कर व त्यानंतर हजरत उमर, हजरत उसमान व हजरत अल्ली असे चार इमाम झाले. इमाम म्हणजे त्या काळीं जे लोक मुसलमानी धर्मांत आले त्यांवरील सरदार. या इमामांनीं मोठाल्या फौजा जमा केल्या व रूमशाम म्हणजे तुर्कस्थान व सिरिया, तसेंच इराण, काबूल, तातार येथपर्यंत आपला मुसलमानीं धर्म चालू केला. व त्या देशांतून आपल्या धर्मांचे राजे स्थापिले, आणि त्यांस असें सांगितले कीं 'तुम्हीहीं इमामच आहां, या करितां धर्मवृद्धीचें काम तुमच्यानें आणखी पुढे चालवेल तितकें चालवा.' पुढे मुसलमानांनी पश्चिमेस युरोपांतही जाऊन किती एक प्रदेश जिंकले, व आफ्रिकाखंडांतही मुसलमानी धर्म चालू केला. असें म्हणतात की, ख्रिस्ती धर्म वाढण्यास सुमारे १००० वर्षें लागली; परंतु मुसलमानांनीं साऱ्या दीडशें वर्षांत आपला धर्म २० कोटी प्रजेस दिला. आतां हें खरें कीं, त्यांची धर्मप्रसृति करण्याची रीति कांहीं सामोपचाराची व काहीं जबरदस्तीची होती. त्यांचें जें लष्कर होतें त्यात एकच जातीचे लोक होते असें नाहीं. तुर्क, मोंगल, आरब, इराणी, शिद्दी, पठाण, सय्यद, इत्यादि बहुत जातींचे मुसलमान लोक होते व त्या सर्वांत एकदिल होऊन मुसलमानी धर्म त्या काळीं मोठ्या भरभराटीस आला.

मुसलमानी धर्मांत जातीचा व देशाचा भेद नाहीं. सर्व एकजात मुसलमान व त्यांत राजा असेल तो इमाम, त्यानें धर्माची वृद्धि करावी. धर्मांकरितां लढाईत मरण पावण्याएवढे दुसरें मोठें पुण्य नाहीं. मूर्तिपूजा करूं नये व हरएक प्रकारच्या मूर्तींचे दर्शन घेऊं नये. नित्य पांचवेळ ईश्वराचा स्तव करावा. ईश्वराखेरीज दुसऱ्याचे पायां पडूं नये. कुराण हें पुस्तक ईश्वरोक्त मानावें. व तें रसुल अल्ला, हजरत महंमद यांजकडून ईश्वरानें जगांत प्रसिद्ध केलें. यांकरितां त्यास पैगंबर व ईश्वराचा भक्त मानावे. गरिबास धर्म करावा; जो कोणी आपले धर्मांत येईल त्यास घ्यावा व तो आपले बरोबरीचा समजावा. मद्यप्राशन करूं नये. नियत म्हणजे ईश्वराचें नांव घेऊन जनावराची हिंसा केली तर पाप नाहीं. डुकरांचे मांस, मेल्या जनावरांचें मांस व ईश्वराचें नांव न घेतां मारलेले जनावरांचें मांस हीं हराम म्हणजे निषिद्ध आहेत, व बाकी सर्व हलाल म्हणजे विधियुक्त आहेत असें समजावे. अनुकूल असल्यास मक्केची यात्रा करावी. इच्छा असल्यास सुंता

करावी व दाढी ठेवावी. देव एकच मानावा व तो सर्व सृष्टीचा कर्ता आणि धनी आहे, त्यास दुसरा कोणी धरिक किंवा हस्तक नाहीं. त्याचें भजन अंतःकरणानें करावें. धूप, दीप वगैरे उपचार कांहीं करूं नयेत. सोवळें, ओवळें, विटाळ, मानूं नये. फक्त हातपाय धुवावे, किंवा स्नान करावें. कुराणांतील वाक्याचा मरतेसमयीं वगैरे प्रसंगोपात्त उच्चार करावा. याप्रमाणें मुसलमानी धर्मांत मुख्य मुख्य गोष्टी आहेत.

आतां आरबस्थान देशाचा इतिहास पाहिला तर मुसलमानी धर्माचे उद्‌भवापूर्वी हा देश प्रसिद्ध नव्हता व यांतील लोक मूर्तिपूजक होते. पण पुढें सर्व मुसलमान झाले. आणि मागच्या मूर्ति वगैरे होत्या त्यांचा उच्छेद झाला. आरबस्थानांत मोठमोठाले राजे झाले व त्यांनीं विद्वानांकडून अनेक विद्या, शास्त्रें व काव्यालंकार यांवर ग्रंथ करविले. त्यामुळें अरबी भाषेंत विद्या बरीच वाढली आहे. तरी युरोपखंडांतील सुधारलेल्या देशांप्रमाणे नाहीं. धर्माचा ग्रंथ जो कुराण तो आरबी भाषेंत आहें. यास्तव जेथें मुसलमानी धर्म चालतो तेथें या भाषेस मोठें महत्त्व आहे. ही भाषा आपले संस्कृत भाषेप्रमाणें फार सुधारलेली आहे.

आतां हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचा संचार केव्हां व कशा प्रकारें झाला त्याविषयीं लिहूं. काबूल कंदाहरांत मुसलमानी राज्य स्थापन झाल्यावर तेथील राजानें असें मनांत आणिलें कीं, हिंदुस्थानांत स्वारी करून तेथें आपला अंमल बसवावा, व मुसलमानी धर्म चालू करावा. म्हणून त्यानें सन १००० इसवींत हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. याकाळीं हिंदुस्थानांत सर्व देशभर क्षत्रिय राजे होते. व त्यांचे राज्यांत ब्राह्मण, वैश्य, शूद्र, इत्यादि हिंदु जाती होत्या. त्या राजांपैकीं, ब्रह्मवंश, मनुवंश, सूर्यवंश, सोमवंश, पुरुवंश, यदुवंश, पांडुवंश, नंदवंश, मौर्यवंश इत्यादि पुराणांतरीं प्रसिद्ध आहेत. याखेरीज पुराणांचे पुढचे काळांतील विक्रमवंश व चव्हाणवंश इत्यादि बहुत होते; व मथुरा, कनोज, उज्जनी, पट्टण, तगर, विजयनगर इत्यादि राजधान्यांतून ते राज्य करीत होते. मुसलमान काबुलांत येण्यापूर्वी पंजाब व काबुल हे देश हिंदुराजाकडेसच होते. असो. सदरीं सांगितल्याप्रमाणें मुसलमानांची हिंदुस्थानांत पहिली स्वारी झाल्यापुढें सुलतान महमुद गिजनी यानें हिंदुस्थानावर बहुत स्वाऱ्या केल्या. व मार्गांत जीं देवस्थानें वगैरे आढळली त्यांचा विध्वंस केला. एकवेळ त्याने मथुरा लुटली, दुसरे वेळी गुजराथेत येऊन सोरटी सोमनाथस्थान लुटलें व मूर्ती फोडिली. त्यापुढें महंमद गोरी नामें पुरुष येऊन त्यानें सन ११९१ त दिल्लीचें राज्य घेतलें. त्यावेळेस तेथें पृथ्वीराज नामें हिंदु राजा राज्य करीत होता. व त्यांचे तिघे भाऊ जयदेव, भीमदेव व जयपाळ हे कनोज, गुजराथ, पंजाब येथील राजे होते. या चौघा क्षत्रिय बंधूंनीं एकत्र होऊन लक्षावधी फौज जमविली आणि यमुना व सरस्वती या नद्यांचे मधील प्रदेशांत मुसलमानांशीं बऱ्याच लढाया मारिल्या; परंतु त्याकाळचे मुसलमान शरिराने सुदृढ व शूर आणि धर्माच्या आवडीनें जिवावर उदार झालेले होते. म्हणून त्यांपुढें या राजाच्या लष्करांचे कांही चाललें नाहीं. व ते पराभव पावले. नंतर महमद गोरी याने सन १२०५ त आपला सरदार कुतुबुद्दीन यास दिल्लीचे राज्यपदीं स्थापिलें. नंतर जे मुसलमान राजे झाले त्यांनीं बंगाला, पंजाब व माळवा यांत आपला अम्मल वाढविला व जिकडे तिकडे आपले सरदार नेमिले. त्यापुढें महमद तघलक बादशाह झाला. त्यानें नर्मदा नदी उतरून येऊन दौलताबादेस जाधव राजे होतें. त्यांचा पराभव करून तें शहर घेतलें. नंतर सन १३३५ इसवींत कलबुर्गें येथे ब्राह्मणी बादशाही स्थापन झाली. व सर्व दक्षिण प्रांताचा कारभार तेथे चालूं लागला. व त्याच वेळेस तैमुर यानें हिंदुस्थानांत स्वारी केली. पुढें दिल्लीस लोदीवंश राज्यावर बसला व त्यांनीं आग्रा हे राजधानींचें शहर केलें. नंतर सन १५२६ त तैमुराचा नातू बेबर यानें हिंदुस्थानांत स्वारी केली. व दिल्लीच्या राजास पदच्युत करून आपण तें राज्य घेतलें. सन १५५६ त बेबरानंतर हुमायुन गादीवर बसला. त्याचे कारकीर्दीत दंगे, धोपे मोडून राज्य सुयंत्र चाललें होतें. नंतर

अकबर बादशाह झाला. त्याचे कारकीर्दीत तोडरमल व मलिकंबर यांनीं जमाबंदीचा कानून प्रसिद्ध केला. व याकाळीं काश्मीर व काबूल धरून थेट उत्तर हिंदुस्थानापासून दक्षिण हिंदुस्थानचे समुद्रतीरापर्यंत एकछत्री मोंगलाई अम्मल झाला. पुढें जहानगीर व शाहजहान झाल्यावर औरंगजेब बादशहा झाला व तो सन १७०७ सालीं नगरास मृत्यु पावला. त्यानंतर त्याचा मुलगा बहादूरशाह व त्यानंतर महंमदशाह हे राजे झाले. व त्यांचे कारकीर्दीत इराणाहून नादरशहानें येऊन दिल्ली लुटली. त्यापुढें काबुलाचा अहमदशाह अबदाली दिल्लीवर आला. तेव्हां त्याची व मराठ्यांची सोनपत पानपत येथें मोठी लढाई झाली. नंतर दिल्लीचें राज्य बुडत चाललें. तें शेवटीं इतक्या थरावर आलें कीं सन १७९४ साली महादजी शिंदे यांनीं शाहअलम बादशाहास नेमणूक ठरवून देऊन त्याचें रक्षण केलें व तेव्हांपासून कितीएक वर्षे दिल्ली शहर महादजी शिंद्यांचे ताब्यांत होतें. पुढें दौलतराव शिंदे याची व इंग्रज सरकारची दक्षिणेंत अजिठ्यांचे घाटात लढाई झाली. तेव्हां इंग्रजांनीं चोहोंकडे फौजा पाठवून शिंद्याचा मुलख जप्त केला. त्याचवेळीं म्हणजे सन १८०४ त लॉर्ड लेक साहेब यांनीं दिल्ली व अंतरवेद वगैरे मुलुख घेतला. तेव्हांपासून दिल्ली इंग्रज सरकारचे ताब्यांत आली आहे. व बादशाहास नेमणूक देऊन हे त्यांचें संगोपान करू लागले आहेत.

कलबुर्ग्यास ब्राह्मणी बादशाही आडनांव ब्राह्मणी व जात मुसलमान स्थापन झाली, म्हणून मागें सांगितलें. तिच्या वंशाकडे सुमारें २०० वर्षे राज्य चाललें. पुढें त्याचे सरदार फुटून गोवळकोंडें, विजापूर, अहमदनगर वगैरे वेगवेगळालीं राज्यें झालीं. व द्रविडदेशापर्यंत दक्षिण हिंदुस्थान मुसलमानांकडून जिंकलें गेलें. दक्षिण व कर्नाटक हे प्रांत विजापूरचे बादशाहानें काबीज केले. व पुढें सन १६८७ त औरंगजेबानें विजापुरचें सर्व राज्य घेतलें. या कारकीर्दीत सन १६२७ त शिवाजी जुन्नरचे किल्ल्यावर जन्मास आला. व त्यानें स्वराज्याची स्थापना करून मराठ्यांचा उद्धार केला. पुढें याचे मुख्य प्रधानांनीं मोंगलाई बुडविली. व कोंकण प्रांतांतील फिरंग्यांचा अम्मल उडविला.

याप्रमाणें ७०० वर्षेपर्यंत मुसलमानांचें राज्य चाललें. वेळोवेळ मुसलमान लोक हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत. तेव्हां तार्तर, इराण, आरबस्थान, काबूल इत्यादि बहुत ठिकाणाचे हजारों मुसलमान लोक लष्कराबरोबर येत. त्यांपैकीं कितीएक हिंदुस्थानांतच राहिले व मुसलमान राजांनीं त्यांतून कितीएकांस सरकारीं कामें, सरदाऱ्या, इनामें, वतनें व धर्मादाय नेमणुका वगैरे देऊन त्यांची सोय केली. यामुळें गांवोगांव मुसलमानांची वस्ती झाली. व जितकी मुसलमानांची वस्ती अधिक तितकी आपले राज्यास बळकटी अधिक, अशी मुसलमान राजांची समजुत होती. सांप्रत पाहावें तर जेथे हिंदु आहेत तेथें मुसलमान आहेतच. पंजाबांत, बंगाल्यांत, सिंधेत, माळव्यांत, गुजराथेंत, दक्षिणेंत, द्रविडांत, कर्नाटकांत, तैलंगणांत, कोंकणांत, वगैरे सर्वत्र त्यांचीं वस्ती आहे. आतां ते जेथें राहिले तेथील लोकांची भाषा बोलतात, व हिंदु लोकांचा सहवास झाल्यामुळें त्यांस जातिभेदही प्राप्त झाले आहेत. उंचजातीचे मुसलमान विधवांचा पुनर्विवाह करीत नाहींत, व हलके जातीच्याशीं लग्न करीत नाहींत. हलके जातीचे मुसलमान खंडोबा, भवानी, पीर वगैरे पूजितात, व ताबुद करितात. यांचे सहवासानें आमचें हिंदुस्थानांत पीर पूजणें, ताबूद करणें वगैरे पतकरलीं आहेत. याशिवाय परदेशी ब्राह्मण आदिकरून बहुत हिंदुजातीचे लोक मुसलमान भिस्त्यांकडचें पाणी पितात, व मुसलमानांनीं भाजून तयार केलेलें अन्न खातात, व राजे वगैरे थोर लोक मुसलमानांचीं समोरासमोर पानें टाकून जेवतात. उदेपुरचा राजा खेरीजकरून बाकीच्या क्षत्रिय राजांनीं तर दिल्लीचे बादशाहास आपल्या मुली लग्नविधानें करून दिल्या होत्या. इत्यादि प्रकारांवरून पाहतां असें दिसतें कीं, हिंदु व मुसलमान या जातींची मिसळ होऊन त्यांच्यांतील विषमभाव अगदीं नाहींसा झाला आहे.

मुसलमानांनीं फार दिवस शिपाईगिरीवर निर्वाह केला; याजमुळें जिकडेतिकडे मुसलमान लोक हल्लीं फार गरिबीचे अवस्थेंत आहेत. पूर्वी त्यांचीं जीं वैभवाचीं ठिकाणें होतीं त्या ठिकाणींही त्यांस प्रस्तुत अतिशय दरिद्र आलें आहे. तरी अलीकडे त्यांनीं शेतकी, व्यापार यांकडे लक्ष लावलें आहे. कितीएक मुसलमान लिहिणारे असून कारकुनी वगैरे करितात. तसेंच हिंदुस्थानांत पारशीं लिपीचे तेथें कांहीं रोजगारी आहेत. गुजराथेंत मुसलमानास शिपाई किंवा तरकडे म्हणतात, व शिपाईगिरीशिवाय दुसरा धंदा तिकडे ते बहुधा करीत नाहींत. त्यांस धर्माची वगैरे अडचण नाहीं. व देशांतरास जाण्यास अटकाव नाहीं. असें असतांही हल्लीं मुसलमान लोक फार मागें पडले आहेत. कोणी विद्या शिकत नाहींत. ज्या शाळेंत धर्मग्रंथ कुराण शिकवीत नाहींत त्या शाळेंत शिकूं नये असा खिस्ती लोकांप्रमाणें यांचा आग्रह आहे. परंतु युरोपांतील खिश्चियन लोक माहितगार अधिक आहेत, व मुसलमान लोक अज्ञान फार. त्यांतून हिंदुस्थानांतील मुसलमान तर अगदीं कुणब्याप्रमाणें अज्ञानीं, याजमुळें त्यांस अडाणी जात असें म्हणतात. कोणी क्वचित् विद्याभ्यास करतात पण तो निरुपयोगी, म्हणजे ते बळेंच आर्बी व पारशी शिकतात, व ती त्यांची मेहेनत व्यर्थ जाते. कारण प्रस्तुत त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. मुसलमान लोकांमध्यें एकंदरींत पाहतां विद्या शिकण्याचा पाठ नसल्यामुळें ते गप्पा फार मारतात, व नानाप्रकारच्या भलत्याच गोष्टी खऱ्या म्हणतात. मोठी खिन्नता वाटते कीं, हिंदुलोकांपेक्षां पुढें होण्याचीं साधनें यांस अधिक असून केवळ आळशीपणानें हे मागें पडले आहेत. ब्राह्मण व पारशी या लोकांमध्यें जसे विद्वान् झाले आहेत व शाळेंत पुढेंपुढें आढळतात, तसे मुसलमान कोणत्याही शाळेंत आढळत नाहींत. सारांश ही जात खर्चीक, डौली, आळशी व अविद्वान् दिसते.

हिंदुस्थानांत पारशी, शीक, जैन, यहुदी, फिरंगी, खोंड इत्यादि बहुत जातींचे लोक आहेत. परंतु त्यांस त्याचें स्वतांचें धर्मशास्त्र नाहीं. कोणी हिंदूंचें धर्मशास्त्र घेऊन चालतात व कोणी मामूल चालीवरून चालतात. परंतु मुसलमान तसे नाहींत. हिंदुलोकांमध्यें जितकीं शास्त्रें आहेत तितकीं मुसलमानांमध्यें आहेत. मुसलमानांस आणखी असें वाटतें कीं आपण किताबी आहों, व हिंदु बेकिताबी आहेत. किताबांविषयीं मुसलमानांचें मत असें आहे की, ईश्वरानें प्रथम आदाम व हावा नामें स्त्रीपुरुषें उत्पन्न केलीं, व त्यांची संतति वाढवून पृथ्वीवर वस्ती केली. नंतर ईश्वरानें आपले कृपादृष्टीनें कित्येक पुरुषांस वारंवार उपदेश केला. असे पुरुष बहुत झाले, पण त्यांत पांच मुख्य गणिले आहेत. त्यांस पैगंबर म्हणतात. त्यांचीं नांवे व काल :--

(१) **इब्राम**--खलिलुल्ला. ३९६४ वर्षांपूर्वी. याची किताब सहिफा.
(२) **मूसा**--कवीमुल्ला. ३५१९ वर्षांपूर्वी. याची किताब जबुर.
(३) **दाऊद**--नबीउल्ला. ३००० वर्षांपूर्वी. याची किताब तौरेत.
(४) **इसा मसाहा**--रुहल्ला. १८६४ वर्षांपूर्वी. याची किताब एजील.
(५) **महंमद**--रसलुल्ला. १२५४ वर्षांपूर्वी. याची किताब कुराण.

मुसलमान असें म्हणतात कीं, या चार पुरुषांस ईश्वरानें किताब दिले, व ते त्यांनीं त्या त्या वेळीं प्रसिद्ध केले. म्हणजे लोकांनीं प्रथम एक किताब बिघडिला व ते उलटे चालूं लागले, तेव्हां देवानें दुसरा किताब दिला. असाच पुढें तिसरा व शेवटीं महंमदास कुराण दिलें. आणि त्या वेळेस ईश्वरानें असें कळविलें कीं, 'हा शेवटचा पैगंबर हा शेवटचा किताब. यास माझा असा आशिर्वाद आहे कीं, दुनया आहे तोंपर्यंत हा बिघडावयाचा नाहीं.' खिश्चियन लोकांचें तो बायबल आहे तो किताब खरा, परंतु बिघडल्यामुळें ईश्वरानें तो रद्द करून हल्लीं कुराण दिलें आहे. तेव्हां असा ईश्वरोक्त ग्रंथ ज्याजवळ आहे ते मात्र किताबी व बाकीचे बेकिताबी, अशी यांची समजूत आहे.

आरबस्थानास आरब लोक, 'जजीरत उल् अर्ब' म्हणतात. या देशांत महंमद जन्मास आला तेव्हां जुने धर्माचे मूर्तिपूजक होते ते लात, मनात, माना या देवींचें, व साव, बादउजा या देवांचें

व नवग्रहांदिकांचें भजन करीत व त्यांचीं मोठालीं देवळें आणि मूर्ती होत्या त्यांची ते पूजा करीत. शिवाय या देशांत त्या कालीं यहुदी व खिश्चियन धर्मांचा प्रवेश बराच झाला होता, व त्या मताचे लोक कित्येक होते. आरब लोक आपसांत फार दंगेखोर होते. मुसलमानी धर्म चालू झाल्यापासून हीं देवळें व दुसरे सर्व धर्म जाऊन एक धर्म झाला, व फतवा म्हणजे धर्माधिकारी याचा लेख घेतल्यावांचून कोणी कोणास शिक्षा करूं नये असें ठरलें. महंमदाचा मुख्य हेतु असा होता कीं सर्व धर्म बुडवून एक धर्म करावा व आपले स्वदेशीय लोकांस एक नीति व एक कायदा घालून द्यावा. हें काम त्यानें पूर्णपणें सिद्धीस नेलें, व हा धर्म चालू झाल्यानें सर्व पृथ्वीची उलटापालट झाली. नवीं राज्यें, नवे कारखानें, चालू झाले; व एकधर्म आणि एकमत चालू झालें. परंतु मनुष्यांचा असा स्वभाव आहे कीं, कोणी कसाही बंदोबस्त केला तरी ते तो बिघडविल्यावांचून राहणार नाहींत. याप्रमाणें कालेंकरून या धर्मांतही अनेक मतें व अनेक वाद उत्पन्न झाले. ही गोष्ट पृथक्, परंतु महंमदाचा हेतु सर्वत्र ऐक्य करावें, व एक ईश्वराचें भजन स्थापन करावें, आणि अनेक ढोंगें आहेत तीं मोडावीं, असाच होता हें स्पष्ट आहे.

महंमद हा संभावित कुलांत सन ५७० इसवींत जन्मला. याच्या आज्याचें नांव अबदुल मुतालेब व बापाचें नांव अबदल्ला व चुलत्याचें नांव अबू तालेब होतें. यांची जात खुरेशी आरब होती. महंमद हा प्रथम खदीजा म्हणून एक व्यापारीण होती तिच्याजवळ राहून उंटावर माल भरून आरबस्थानांतून सीरिया प्रांतांत दमषक् शहर आहे तेथें खेपा करीत असे, व हिंदुस्थानचा माल आरबस्थानांत आणी व आरबस्थानांतील तिकडे नेई. पुढें याची हुशारी चांगली पाहून खदीजाबिबीनें याशीं लग्न लाविलें. महंमद हा मक्केजवळ हरा म्हणून पाहाड आहे तेथें नित्य जाऊन बसत असे. तेथें यास एके दिवशीं दृष्टांत झाला कीं, 'तूं धर्म प्रसिद्ध कर'. हें वर्तमान त्यानें आपले स्त्रीस सांगितलें व तिनें ते तात्काल कबूल केलें. नंतर तिचे घरीं जीद म्हणून एक गुलाम होता, त्यासही तिनें तें सांगितलें. नंतर महंमदाच्या बापास, चुलत्यास व पुतण्या अल्ली यांस तें कळलें, तेव्हां त्यांनींही तें खरें मानिलें. यावेळेस महंमदाचें व सुमारें चाळीस वर्षांचे होतें, व येथून पुढें तेवीस वर्षेंपर्यंत त्यानें मुसलमानीं धर्म वाढविण्याचें काम चालविलें, आणि शेवटीं ता. ८ जून सन ६३२ सालीं ६३ वर्षांचे उमरींत तो मरण पावला. त्याची कबर मदीना येथें आहे.

महंमदाची मुलगी फातिकाबिबी ही पुतण्या अल्ली यास दिली होती. तिचे पुत्र हसन व हुसेन यांस पैगंबराचे नवासे म्हणजे दौहित्र असें म्हणतात. महंमदास स्त्रिया पांच–खदीजा, हाफसा, जैनाब, खैवार व आयषा ह्या होत्या. महंमदाचे घोड्याचें नाव बुराक. महंमदाचे हातचा कागद किंवा त्याचे डोकीचा केंस किंवा दुसरे हरपदार्थ अद्यापि मुसलमान लोक फार भक्तिनें बाळगतात. विजापुरास आसार मुबारक म्हणून एक मोठी इमारत आहे, तींत महंमद पैगंबराचा एक केंस आहे अशी आख्या आहे. तसेंच अल्लीचे घोड्याचा नाल व अंगावरचें चिलखत आणि त्यानें लिहिलेला वर्ख असे पदार्थ फार भक्तिनें बाळगतात. असे कित्येक पदार्थ कित्येक ठिकाणीं अद्यापि आहेत.

महंमद हा पुरुष सर्वगुणसंपन्न होता, व रूपानें, स्वभावानें, शहाणपणानें, धैर्यानें व भाषणाचे सौरस्यानें यांस मोठा श्रेष्ठ गणिलेला आहे. याचा स्वभाव फार दयाळू व निगर्वी होता. अगदीं लहान किंवा गरीब मनुष्य जरी आला तरी त्याजवर त्यानें दया करावी व त्यास मदत करावी. महंमदानें प्रपंचावर फारसें लक्ष्य नसून केवळ ईश्वरानें आपणास धर्म स्थापन करण्यास जन्म दिला आहे, व सर्व पृथ्वीवर एक धर्म केला पाहिजे, अशा समजुतीची याची वागणूक होती.

यानें प्रथम 'आपल्यास ईश्वरी दृष्टांत झाला व ईश्वराचा दूत येऊन त्यानें धर्म प्रसिद्ध करण्यास हुकूम दिला' असे आपले मंडळीस कळविलें. तेव्हां याची बहुतेक मंडळी यास अनुकूल झाली.

नंतर इतर लोकांसही हा धर्म सांगूं लागला. त्याकाळीं आरबस्थानांत मूर्तिपूजेचा, इस्रायल लोकांचा आणि ख्रिस्तियन असे तीन धर्म चालत होते, व त्यांतून हा धर्म वेगळा आहे असें प्रसिद्ध झालें. तेव्हां मक्का, षरीफ या शहरचे लोकांनीं याजवर हल्ला केला, व त्यामुळें हा आपली जन्मभूमि सोडून मदिना शहरांत गेला, व तेथेंही यानें तोच उद्योग चालविला. पुढें यास बहुत लोक मिळाले. तेव्हां त्यांस हा ईश्वराकडून आलेले ग्रंथांतील वचनें वारंवार सांगून 'अमुक करण्याविषयीं ईश्वराचा हुकूम आला आहे, तर त्याप्रमाणें आपण वर्तले पाहिजे' असें सांगे. गरिबीनें चालावें, ईश्वरी इच्छे-प्रमाणें चालावें, असे उपदेश यानें केले. याचे धर्माचें नांव इसलाम म्हणजे ईश्वरावर हवाला देऊन वागण्याचा धर्म. यास दीन व इमान अशीं ही दुसरी नावें आहेत. अस्तु. पुढे महंमदाजवळ लोक बहुत जमले तेव्हां त्यानें काफिर लोकाशीं लढाई करावयाची आज्ञा झाली म्हणून एक अध्याय प्रसिद्ध केला. त्यांत असें लिहिलें होतें कीं 'एक देव आहे. व त्यानेंच महंमदास खरा धर्म सांगण्यास नेमलें आहे तर ही गोष्ट जे कबूल करितील त्यांस आपल्यांत घ्यावें, आणि जे नाकबूल करितील त्यांस ठार मारावें.' असा अध्याय प्रसिद्ध केल्यावर महंमद त्या सेनेसहित मक्केवर आला, व त्यानें तें शहर घेतलें, आणि हजारों लोक मुसलमान केले. देवळें आणि मूर्ति होत्या त्या फोडून टाकिल्या. महंमदानें मोठे मोठे राजे होते त्यांस पत्रे पाठविलीं कीं, 'ईश्वरी धर्म प्रसिद्ध होत आहे तो तुम्ही मान्य करावा, व जुना खोटा धर्म सोडून द्यावा.' इराणचा राजा खुसरू यास महंमदानें एक पत्र पाठ-विलें. त्यांत 'महंमद बिन अबदल्ला, ईश्वराचा पैगंबर, याजकडून इराणचा खुसरू पातशाहा यास' असें वरतीं लिहिले होतें. तें पत्र बादशाहापाशीं एका मुसलमानानें आणून दिलें. तें पाहतांच 'पातशाहाचे अगोदर आपलें नांव लिहिणारा हा कोण आहे? यानें आपली बेअदबी केली,' असें म्हणून त्यानें भरदरबारांत ते पत्र फाडून टाकिलें. हें वर्तमान महंमदास कळलें. तेव्हां तो इतकेच म्हणाला कीं, 'माझें पत्र फाटलें त्याप्रमाणें त्याचें राज्य फाटेल.' पुढे ३० वर्षांनीं हें भविष्य खरें झालें. महंमदाचे वेळेस सर्व आरबस्थानांत अंमल बसून लोक मुसलमान झाले होते, व मुसलमानी फौज मोठी जमली होती.

पुढे महंमद मेल्यावर त्याची अयेषा स्त्री इनें असें प्रसिद्ध केलें कीं, 'माझा बाप अबू बकर यानें महंमदाचा अधिकार पुढें चालवावा, असें पैगंबरानें मरतेवेळेस सांगितलें आहे'. त्याजवरून त्याचा दौहित्र अली हा मागें पडून अबू बकर हाच खलीफा झाला. त्यास 'अमीर उल् मोमिनीन्' व 'इमाम उल् मुसलमान' असा किताब आहे. या सरदारानें मुसलमानी धर्म बहुत वाढविला. याज-कडे राज्य होतें, आणि लक्षावधि फौज होती तरी हा अगदीं फकिराप्रमाणें वागत असे. मरतेवेळेस एक उंट मात्र त्याजवळ होता. तोही त्यानें दान दिला. दौलत म्हणून त्याजवळ कांही नसे. मिळ-विलेले दौलतीपैकीं त्यानें स्वतांस अन्नआच्छादनाखेरीज कांहीं घेतलें नाहीं. तो गरिबास धर्म फार करीत असे. तो न्यायनिष्ठुर आणि उदार असे. यानें तुर्कस्थानचे व इराणचे सरहद्दीपर्यंत धर्म वाढविला, व मरतेवेळेस उमर यास मुक्त्यार नेमिलें.

उमर हा मक्केस जन्मला होता व हा पूर्वी मूर्तिपूजक असून मुसलमान झाला होता. नंतर महंमदाचे लष्करांत मोठे सरदारीवर चढला. याची मुलगी हाफसा ही महंमदास दिली होती. मुसलमानी धर्माविषयीं हा फार आग्रही व स्वभावानें अगदी साधा होता. आपले लष्करांतील शिपायास जें सुख तेंच आपल्यास असावें असे याचें ह्मणणे होतें. सबब हा शिपायाप्रमाणेंच सर्व कामें करी, व गरिबाप्रमाणें भुईवर बसे. मोठे मोठे राजांचे वकील व कारभारी याजकडे येत, तेही याची वृत्ति पाहून आश्चर्य पावत होते. यानें इराणचें राज्य बुडविलें, मिसरदेशांत मुसलमानी राज्य केलें व कोट्यावधि लोकांस मुसलमान केलें. जे मुसलमानी धर्म कबूल करीत नसत त्यांस हा तात्काल मृत्यूची शिक्षा करी. याचे कारकीर्दींत मुसलमानी धर्म फार वाढला, व लष्कर फार जोरावर

झाले. यानें कोणा सरदारास सुख, अलंकार किंवा डौल भोगूं दिला नाहीं. डौलाचा यास मोठा द्वेष होता. जरूशालेम शहर यानें घेतलें. मोठमोठाले राजवाडे व दागिने यास मिळाले होते, परंतु त्यांस त्यानें कधी स्पर्श केला नाही. छपर किंवा तंबू देऊन त्यांत हा राही, व पैका गरिबांस धर्म करी. तो ह्मणे की 'ईश्वरास खुष केलें ह्मणजे झाले' डौल करून माणसास काय दाखवावें ? कनिष्ठ प्रकारची भाकरी, पाणी व मीठ यांशिवाय यानें दुसरें कधीं कांहीं खाल्लें नाहीं. व लक्षावधि रुपये खर्च करून पुष्कळ मशिदी बांधिल्या व देवळे फोडिली. यानें राज्यकारभाराकडेही फार लक्ष दिले व न्यायमनसुबीचे आणि लष्करचे चांगले चांगले कायदे ठरविले. असें ह्मणतात कीं यानें ३६००० शहरे घेतलीं, ४००० देवळे पाडिली व १४०० मशिदी बांधिल्या. इराणचे बादशाहाचा सोन्याचा व कलाबतूचा एक गालीचा इतका उंच होता कीं, त्याची बरोबरी करणारे दुसरे कापड सर्व जगांत नसेल. तो गालीचा याचे सरदारानें पत्राबरोबर यास नजर पाठविला, आणि लिहिले कीं, 'हा आपण आपले स्वतांकरितां ठेवणे योग्य आहे.' पण तो पाहून याचे मन किंचित्‌ही त्याकडे वळलें नाहीं. त्याने त्याचे लहान लहान तुकडे करून सर्व फौजेत वांटले. याने शिकंदर्या शहरची रूमचे बादशाहाची मोठी लायब्ररी व इराणची लायब्ररी अशा दोन्ही जाळून टाकिल्या आणि असे ह्मणाला कीं, 'कुराणांत सर्व ज्ञान आहे. मग आणखी दुसरे ग्रंथ कशास पाहिजेत ?' हे त्याने फार वाईट केले असे ह्मणतात. याने हिजरी शक चालू केला. कुराणाची वाक्ये इकडे तिकडे चालत होती, तीं सर्व जमवून एक ग्रंथ केला. तसेच महंमदाच्या तोंडची भाषणे आठवणीने लिहून काढिलीं. याच्या रीतीवरून व स्वभावावरून हा मोठा चमत्कारिक पुरुष होता असे दिसत होते. यास पुढे एकाने अपघाताने ठार मारिले. तेव्हां मरतेवेळेस त्याने उस्मान यास सरदारी दिली. या वेळेसही अल्ली मागें पडला. वास्तविक पाहिले तर उमर याचीं कृत्ये मोठीं आहेत, परंतु शिया महजबाचे लोक याची निंदा करतात, व याचा मरणदिवस आनंदाचा सण मानितात. यापुढे उस्मान खलीफा झाला. हा गरीब होता. याने प्रथमतः दौलतीचा उपभोग घेण्यास प्रारंभ केला. हे पाहून इतर सरदारही डौल करूं लागले. तथापि याने कितीएक मुलखांत मुसलमानी धर्म स्थापिला. इराणाचे पलीकडे हिंदुस्थानापर्यंत याच्या फौजा आल्या. पुढें याचेच फौजेंत दंगा होऊन त्यांतील सरदार अबूबकर याचा मुलगा महंमद यानें यास ठार मारिलें. मरतेसमयी यानें अल्लीस सरदारी दिली व ती त्यानें कांही दिवस चालविली. नंतर त्याच्या सरदारांनीं पुन्हा बंड करून मोआवियास सरदार नेमिलें. पुढें अल्लीस सन ६६० सालीं एका मारेकऱ्यानें ठार मारिलें, व तेथून पुढें खलीफत बुडाली. महंमदानें 'माझे पाठीमागें तीस वर्षे खलीफा होतील' असें भविष्य सांगितलें होतें तसें झाले.

शिया मजहबाचे लोक बारा इमाम गणतात, व असें ह्मणतात कीं अबू बकर, उमर व उस्मान हे आसहाय नव्हते. यांनी जबरीनें राज्य केले. सबब अल्ली हाच पहिला इमाम व त्याचे पुढील दुसरे अकरा मिळून १२ इमाम. यांची नांवें :- (१) अल्ली, (२) हसन, (३) हुसेन, (४) दुसरा अल्ली, (५) महंमद, (६) जाफर, (७) मुसा, (८) तिसरा अल्ली, (९) महंमद, (१०) चवथा अल्ली, (११) हसन, (१२) महंमद.

हा शेवटचा महंमद सन ८७९ सालीं बारा वर्षांचा असतां मरण पावला, आणि येथून अल्लीचा वंश समाप्त झाला. परंतु शिया मुसलमान ह्मणतात की, 'हा मेला नाहीं; आकाशांत गेला आहे व हा पुन्हा खालीं येऊन राज्य करील.' महंमदानें असें भविष्य सांगितले आहे कीं 'माझा वंश आणखी एकवेळ राज्य करील. नंतर दुनया बुडेल'. याजकरितां कितीएक राजे या इमामाकरितां घोड्यावर खोगीर घालून घोडे तयार ठेवीत असतात.

महंमदास पैगंबर म्हणतात, आणि त्याचे नाव कोणीही मुसलमान नुस्ते घेत नाहींत त्याबरोबर दरुद म्हणजे आशिर्वाद पडतात तो असा :—

महंमद मुस्तफा सलेल्ला।
अलेहव आलहीव संलम्॥

आणखी त्यास पैगंबर आखरजमान म्हणजे शेवटला पैगंबर असे म्हणतात, व त्याचेमागून चार खलीफा झाले त्यांस 'आसहाब' असे म्हणतात. म्हणजे पैगंबराचे मित्र व हा या पांचांस 'पंजतन म्हणजे पांचजण असे म्हणतात. हे मुसलमानाचे पंचायतनच आहे. जे लोक मुसलमान नाहींत त्यांस त्यांचा एक सर्वसाधारण शब्द 'काफर' असा आहे. म्हणजे जितके कुराण व पैंगंबर मानीत नाहींत तितके सर्व काफर आहेत, व त्यांचे मतास 'कुफ्र' असे म्हणतात. काफराचे पोटीं बुत परस्त (मूर्तिपूजक), आतप परस्त (अग्निपूजक), नसारे (खिश्चियनधर्मी), यहूदी (इस्त्रायल) इत्यादि भेद आहेत. कुराणांत असे वाक्य आहे कीं :—

कुल्लगवल् दुनयदुलो।
आलेकतरन् अल् इसलाम॥

म्हणजे सर्व मनुष्ये प्रथम मुसलमान जन्मास येतात. परंतु त्यांचे आईबाप त्यांस बिघडवून पुढे खोटेधर्मास लावतात.

ज्यास मुसलमान व्हावयाचे असेल त्याने खाली लिहिलेला कलमा विश्वासानें पढावा लागतो:--

ला इला इल्लिल्ला।
महंमद रसूलिल्ला॥

म्हणजे एक देव आहे. अनेक देव नाहींत. व जो एक आहे त्यानें महंमदास खरा धर्म प्रसिद्ध करण्याकरितां योजिला आहे.

अकबराचे कारकीर्दींत मोहोर पाडिली त्या मोहोरेवर एकेबाजूस हा कलमा लिहिला आहे. या कारणास्तव लोकांमध्यें कांहीं विलक्षण समजूत पडली आहे. सराफ, सावकार वगैरे ही मोहोर बाटव्यांत बाळगतात, व तेणेंकरून बरकत आहे असें मानितात. या मोहोरेस पांचचार रुपये जास्त दर आहे. या कलम्यामध्यें विलक्षण गुण आहेत, असें मुसलमानही मानितात. हिंवतापाचे वगैरे दुखण्यांत हा चिठीवर लिहून गळ्यांत बांधतात. शिवाय कुराणांतील कित्येक वचनें मंत्र आहेत असें मानितात. कित्येक लोक त्यांचे जप करतात, व माळा घालतात. माळेस 'तसबी' म्हणतात.

मुसलमान कोणतेंही काम करणें असलें तरी पुढें लिहिलेले शब्द उच्चारून करितात :—

बिसमिल्लारहिमान्हीरहीम्।

म्हणजे हें परमदयाळू परमेश्वरास अर्पण होवो. सर्व किताबांत व रिसाल्यांत ह्मणजे मोठे पुस्तकांत व लहान पुस्तकांत हे शब्द वरती लिहितात. सनदपत्र वगैरे लिहिणें तरी वरती ईश्वराचें नांव व त्याचे खालीं राजाचें लिहितात. मध्यें लिहिण्याचा प्रसंग आला तरी तेथें जागा कोरी टाकून वरतीं तें लिहितात अशी आदब आहे. ईश्वरास मुसलमान 'अल्ला हुताला' ह्मणतात. शिवाय मौला, खुदा, करीम, वाहेद, हक्क इत्यादि त्यांचे सहस्त्रनाम आहे. कुराणाचें नुस्ते नांव घेत नाहींत. त्यास 'किताब मंजीद' किंवा 'कलाम उल्ला' असें ह्मणतात. नुस्तें नांव घेणें किंवा हा ग्रंथ भुईवर ठेवणें ही बेअदबी समजतात, व त्यासाठीं ते कोठेतरी उंच ठिकाणी ठेवितात.

मुसलमानांचे धर्मशास्त्र म्हणजे षरा याची रचना झाली आहे ती अशी :- सर्व मुसलमानी शास्त्राचें मूळ कुराण. हा ग्रंथ महंमद पैगंबरानें कधीएक अध्याय, कधी अर्धा अध्याय, लोकांस दिला. असा एकंदर तेवीस वर्षांत हा सर्व ग्रंथ प्रसिद्ध झाला, व पुढें पैगंबर मेल्यावर हे अध्याय लोकांचे तोंडी होते ते अबु बकरानें सर्वांस विचारून अनुक्रमानें लिहून काढिले व पुढे उस्मान यानें पुन्हां ते दुरूस्त करून व बहुत शोध लावून पैगंबरानें प्रसिद्ध केले याप्रमाणें सर्व अक्षरे शुद्ध

केलीं; व सन ३० हिजरींत त्याच्या बहुत नकला करून वांटल्या व मागील नकला सर्व परत घेऊन त्यांचा नाश केला.

दुसरे दर्जाचें प्रमाण असें आहे कीं, पैगंबर व त्याचे आसहाय लोक यांनीं स्वतां ज्या गोष्टी सांगितल्या त्यांस 'हदीस' किंवा 'सुन्ना' असे ह्मणतात. त्यांत दोन भेद आहेत :– 'कुदसी' व 'नवबी' ह्मणजे ईश्वरानें प्रेरिल्यावरून जी वचनें पैगंबराचे तोंडांतून निघाली ती 'कुदसी' आणि त्याच्या स्वतांच्या बुद्धीची ती 'नबबी' हा ग्रंथ मोठा आहे, व त्या काळचे लोकांनी हीं वचनें जमवून लिहून काढिलीं, ह्मणून यास कुराणाचे खालीं परंतु इतर सर्व ग्रंथांहून वरिष्ठ मानतात.

इजमा ह्मणजे पैगंबराचे ताबियनलोक ह्मणजे कृपेंतील शिष्य व त्यांचे जवळचे लोक यांनीं ठराव केले ते कांहीं कालपर्यंत स्मरणांत होते, व पुढें लिहून काढिले.

चौथे दरजाचें प्रमाण 'कियास' पंडितांनीं जे ग्रंथ लिहिले आणि जेथे कुराण व हदीस व इजमा या तिहींचेंही प्रमाण लागत नाहीं तर कसें करावें याविषयीं कुराणास अविरोधयुक्ति दाखविली आहे, असे जे ग्रंथ त्यांस 'कियास' ह्मणतात.

पांचवे दरजाचें प्रमाण 'फतावे' म्हणजे मुसलमान बादशाहांनी जे फैसल केले ते :–

धर्माचे दोन भेद आहेत. एक लाजिम आणि दुसरा सुन्नत. त्यांत लाजिम आहेत तीं कर्मे येणेंप्रमाणे :–

| | | |
|---|---|---|
| इमान | याचा अर्थ | धर्मावर श्रद्धा. |
| नमाज | ,, ,, | पांचवेळ दररोज ईश्वराची स्तुति करणें. |
| रोजा | ,, ,, | रमजान महिन्यांत नक्त करणें. |
| जकात | ,, ,, | शेंकडा २॥ रूपये धर्म करणे. |
| हज | ,, ,, | क्षौरबलिप्रदक्षिणापूर्वक महंमदानें मक्केची यात्रा केलीं त्याप्रमाणे करून काबा म्हणून इभ्रामच्या वेळचा एक दगड आहे त्याजवळ निमाज पडणें व पैगंबराची कबर पाहणें. |

हे धर्म कुराणांत ईश्वरानें फर्माविले ह्मणून फार जरूर आहेत. व यांखेरीज जे ते सुंता, दाढी, दागिने पुरुषांनीं न घालणें इत्यादि सुन्नत आहेत. पाहिजे तर करावे, नाही तर नाहीं. पैगंबरास हिरवे कपडे आवडत होते ह्मणून तो रंग मुसलमान मानतात.

मुसलमान निमाजाचे वेळेस जिकडे काबा तिकडे ह्मणजे पश्चिमेस तोंड करितात. सीजदा म्हणजे जमिनीस डोके लावतात. व फानेहात म्हणजे कुराणाचा पहिला अध्याय किंवा दुसरे अध्यायांतील वचनें ह्मणतात. जिकडे तिकडे धर्म प्रसिद्ध करावा, मशीदी बांधाव्या, हें एक त्यांच्या धर्मातील कलम आहे. मशिदीवर मुतवली (कारभारी), मुंजावर (स्वच्छ ठेवणारा), बांगी (निमंत्रण करणारा) असे कामदार असतात. त्यांत बांगीनें निमाजाची वेळ झाली ह्मणजे दरवाज्यावर उभें राहून 'अल्ला हो अकबर' हे शब्द उच्चारून निमाज पडण्यास बोलवावें. यास 'मौजन' असेंही ह्मणतात. या आमंत्रणाचें नांव 'बांग' किंवा 'अजा' असें आहे. मग गुसल व वजू ह्मणजे हातपाय धुणें व तोंड साफ करणे याप्रमाणे निर्मळ होऊन निमाज पडावी. प्रत्येक शुक्रवारी जास्त निमाज आहे ती ह्मणून मुसलमान राजे असतील त्यांस आशिर्वाद द्यावा, व धर्माची वृद्धि चिंतावी, व ईश्वराजवळ मागावी. परधर्माचे बादशाहास दुवा दिला असतां काफरपणा होईल. बादशाह दीन व गाजी ह्मणजे धर्माचें रक्षण करणारा असेल तोच आशिर्वादास पात्र; कारण की तो सर्व मुसलमानांचा अमीर उल् मोमिनीन् व इमाम आहे. सणाचे दिवशीं विशेष निमाज आहे. ती सांगणाऱ्यास 'खतीब' ह्मणतात. लढाईत, मरणकाळीं, वेगळाल्या पद्धती आहेत. न्यायाधिशास 'काजी' किंवा 'काजी उल कजात' ह्मणतात. मुसलमानांमध्ये धर्माचा आणि व्यवहाराचा फारसा

भेद नाहीं. राजानें मुख्यत्वेंकरून धर्माचेंच काम करावे. धर्माचे पोटीं न्याय याजकरितां काजीकडे न्याय, आणि धर्माबद्दलचे वाद मिका, तलाक, तोबा, निमाज हीं सर्व कामें त्याजकडेस असतात, असा मुसलमानी रिवाज आहे.

मुसलमानांमध्यें चार मरतबे मोठे आहेत. एक नबूबत, दुसरा विलायत, तिसरा बादशाहादत, चवथा शाहादत. यांचे अर्थ ईश्वरी प्रसाद, दुसरा विरक्तता, तिसरा राज्य व चवथा युद्धांत मरण. पैकीं तीन महंमदास मिळाले व चवथा ईश्वरानें त्याचे दौहित्रास दिला असें म्हणतात. धर्मार्थ युद्धांत जे उपास व हाल होऊन मरतात त्यांस 'षहीद' म्हणतात. हें घडलें असतां जन्माचें सार्थक आहे, व असें न घडलें तर प्रेताजवळ 'शाहादत' हा शब्द तरी उच्चारावा.

कुराणांत चांगल्यास स्वर्ग व वाइटास नर्क सांगितले आहेत. याखेरीज कियामत म्हणजे जितके लोक मरतात त्यांचीं शरीरें ईश्वर पुन्हा उठऊन इनसाफ करील तोपर्यंत त्या सर्वांचे जीव अमानत रहातील, परंतु जे नेक आहेत ते चांगले स्थितींत आणि वाईट आहेत ते दुःखात राहतील, आणि सर्व अखेर फैसल एक दिवशीं होईल, असें आहे. यांचे धर्मांत जन्मांतर नाहीं, सुतक वगैरे आचार नाहीं, जाती नाहीं, व सर्व मुसलमान बरोबर आहेत. धर्म सांगत असतां जो न मानील तो 'राजबुलकत्तल' (वधास योग्य) आहे, किंवा 'जेजिया' म्हणून कर आहे तो घेऊन त्यास सोडावा. कुराणांत कोठें कोठें फार क्रूर वचनें आहेत. म्हणजे काफराच्या स्त्रिया व मिळकत या मुसलमानास मुभा आहेत, व त्यांची कत्तल करणें सवाब म्हणजे पुण्य आहे. व या प्रमाणें मुसलमानी धर्माचे अब्बलीस बहुत झालें. धर्माचे स्थापनेकरितां किंवा वृद्धीकरितां जी लढाई करणें तीस 'जहाद' म्हणतात. असें करणें हा धर्मच आहे. कुराणाचे अध्याय ११४ यांस सुरे म्हणतात. प्रकरणें ३० यांस सिपारे म्हणतात. श्लोक ६००० त्यांस आयत म्हणतात. व हरफ ३२३०१५ गणले आहेत. यांतील धर्माचे दोन भाग आहेत. एक इमान म्हणजे विश्वास ठेवणें. यांत जें कांही कुराणांत आहे ते खरें समजावें. दुसरा दीन किंवा भक्ति म्हणजे आचार किंवा जें कांहीं करावें लागतें तें. म्हणजे निमाज इत्यादि कर्मे. कुराण हें पुस्तक फार सुरस व उत्तम शब्दांनीं लिहिले आहे. आर्बी भाषा मुळीं फार सुंदर आहे, व त्यांत हें उत्तम आहे असें सर्व लोक ह्मणतात. याविषयीं अशी गोष्ट आहे कीं महंमदाचे वेळेस एक मक्केस कवि होता, त्यांचे नांव लाबीद इब्न राबिया. यानें महंमदास सांगितलें कीं, 'माझे काव्यापेक्षां कुराण चांगलें नसेल.' तेव्हां त्यास एक अध्याय महमदानें दाखविला. तो पाहतांच त्या कवीस असें वाटलें कीं, अशी कविता ईश्वराशिवाय कोणाच्यानें होणार नाहीं. असे म्हणून तो लागलाच मुसलमान झाला. कुराण नित्य आहे, व ईश्वराजवळ एका मेजावर ते लिहिलेले आहे. त्याची प्रत भूमीवर मात्र ईश्वरानें कृपा करून पाठविली; परंतु तो नवीन झालें असे नाहीं. असें मुसलमान पंडितांचें मत आहे. या पुस्तकांत फिरषस्ते म्हणजे ईश्वराचे दूत आहेत म्हणून सांगितलें आहे. गेब्रील, आजराईल, मिचाईल, इत्यादि बहुतांची नांवें येतात. आजराईल हा हिंदुलोकांत यम जें काम करितो तेंच करितो. आणखी दुष्ट जीव आहेत असें लिहिले आहे. ते लोकांकडून पाप करवितात. त्यांचीं नांवे सैतान, इब्लिस इत्यादि आहेत. याशिवाय कितीएक भविष्ये आहेत. तीं अशीं कीं पुढें इनसाफाचा दिवस येईल त्याचेपूर्वी पृथ्वीवर अनेक अरिष्टें होतील. सूर्य पश्चिमेस उगवेल. याजूज व माजूज हे दंगा करतील. दुबाल या नांवाचा गाढवावर बसलेला इसाचा वैरी निर्माण होईल; नंतर इसा खुद्द येऊन त्यास मारील. व स्वतां मुसलमान होईल; व वरती जाईल. नंतर बारावा इमाम जो नाहींसा झाला आहे तो इमाम मेहेदी या नांवाने पुन्हा प्रकट होईल, व तो राज्य करील. नंतर कियामत होईल, ते इनसाफाचे काम हजार वर्षे चालेल. ईश्वरी दूत येऊन एकदां करणा वाजवील. व त्या आवाजाबरोबर सर्व मेलेलीं माणसे उठतील. आणि मग ईश्वर स्वतां महंमद व इसा यांस बरोबर घेऊन न्यायास बसेल. तेव्हां महंमदाची रदबदली चालेल.

ज्याच्या त्याच्या पुण्यपापाच्या चोपड्या ईश्वर काढील. त्याजवरून स्वर्ग किंवा नरक होईल. याप्रमाणें या जगाचा शेवट होईल.

मुसलमानी धर्मशास्त्राचे पोटीं बहुत ग्रंथ झाल्यामुळें त्यांची वेगळी वेगळीं शास्त्रें झाली आहेत. येणेप्रमाणें :—-

(१) इल्म कुराण. म्हणजे कुराणावरील टीका पाहून अर्थ बरोबर समजणें. यास इल्म तफसिरही म्हणतात. (२) इल्म हदीस. (३) इल्म फिका. (४) इल्म फरेज. (५) इल्म फत्तावे.

कुराण तोंडानें पाठ करितात त्यांस हाफिज म्हणजे संरक्षण करणारे असें म्हणतात. मौलवी आहेत ते मशिदींत 'वाज' म्हणजे धर्मोपदेश करितात. राजास जे शास्त्रार्थ सांगतात ते मुफती. व एक शास्त्र ज्यास येते त्यास आलीम म्हणतात. कुराणावर टीका व भाष्ये म्हणजे तफसीर पाव यांचे इतके ग्रंथ आहेत कीं त्यांचा अंतपार नाहीं.

मुसलमानांमध्यें महजब ह्मणजे पंथ दोन आहेत. एकाचे नांव शिया व दुसऱ्याचें नांव सुनी. यांचे पोटीं वेगळे वेगळे भेद १०० आहेत. शिया मुसलमान इराणांत फार आहेत, व हिंदुस्थानांत थोडे आहेत.

विजापूरचे बादशाह शिया होते. यांची भाष्यें व टीका वेगळीच आहे. यांचें ह्मणणें असें आहे कीं, ईश्वराचे मनांत अल्लीस पैगंबर करावे असें होतें. परंतु ईश्वराचा दूत चुकला. आणि त्यानें महमदाचे हातीं कुराण दिलें. महमदाचे पाठीमागे दुसरे तीन खलीफा झाले ते अन्यायानें झालें. त्यांनी अल्लीस बळेंच मागें टाकिलें. तात्पर्य हे अल्ली मानतात. याच कारणास्तव तीन खलीफा यांचे हदीस हे मानीत नाहींत. व त्यांचीं वचनें गाळून यांचीं पुस्तकें लिहिलेली आहेत. सुनी मुसलमान सर्वांस मानतात.

सुफी महजब ह्मणून एक मत आहे. तें अवलिया व फकीर मानतात. हें हिंदूंचे वेदांताप्रमाणें आहे. ह्मणजे सर्व ईश्वर आहे, व आपण ईश्वरच आहों, असें ते समजतात. यास्तव धर्मशास्त्राशीं हे मत विरुद्ध आहे. कुराणांतील शब्द मात्र ईश्वराचे व इतर शब्द लोकांचे असा भेद ते मानीत नाहींत. सर्व लेख ईश्वराचे. मग कुराणांतच विशेष काय असें ते ह्मणतात. याप्रमाणें सुफी साधू मुसलमानांमध्यें बहुत आहेत. व ते करामती करतात असें लोक समजतात. परंतु धरा जाणणारे हे अशुद्ध आहे असें ह्मणतात.

धर्मशास्त्रांत चार पंथ आहेत त्यांची नांवें :– १ हनफी शास्त्र, २ हंबली, ३ मालकी, ४ व षाफी. हनफी शास्त्र तुर्कस्तान, तार्तरी, अबिसिनिया व हिंदुस्थान ह्या देशांतील मुसलमानांमध्यें चालतें. हें मत आर्बस्थानांत कुफा शहरांतील अबू हनीफ या नावाचा महान पंडित हिजरी सन १५० त झाला. त्यानें स्थापन केलें. यानें कियास प्रमुख धरून ग्रंथ लिहिले. खलीफ तुलमन सुरयास काजी उलकजाआत ह्मणजे मुख्य न्यायाधिशी देत असता आपले हातून अन्याय होईल याचा जाब कोठे द्यावा या समजुतीनें यानें तो लाभ सोडला, आणि ग्रंथ करीत बसावयाचे पत्करिलें. असें उदाहरण युरोपांत देखील सांपडणें दुर्लभ.

हंबली हें मत आर्बस्थानांत चालतें. याचा स्थापक अहमदशाह बिन हबंल हा बगदाद शहरांत सन १६४ हिजरींत जन्मला. याचे ग्रंथ बहुत आहेत. ज्या दिवशीं हा मेला त्या दिवशी दोन लाख यहुदी व खिस्तियन लोक मुसलमान झाले व यास पुरण्यास आठ लाख लोक जमले होते अशी याची कीर्ति होती.

मालकी हा महजब आलजियर्स, तुनीस, त्रिपोली व सिनिगाल या देशांतील मुसलमान लोकांमध्ये चालतो. याचा स्थापक मालीक बिन अन्नास हा मदीना शहरांत हिजरी सन १५ सालीं झाला. यास इमाम दारूल हिजरीं असें ह्मणतात. यानें हदीस ह्मणजे पैगबराची व आस हाव यांचीं वचनें जमा केलीं व त्यांची व्यवस्था करून ग्रंथ रचले.

षाफी हा महजब महंमद षाफी नांवाचा पंडित हिजरी सन १५० त केरो येथें जन्मला. याचा महजब अर्बस्थानांत, खुरासान, मिश्र, मलाया या देशांतील मुसलमानांमध्यें चालतो व हिंदुस्थानांत कोंकण प्रांती मुसलमान आहेत त्यांमध्यें चालतो.

सदर्हु चार मतांखेरीज दुसरे एक मत अबू अबदल्ला सुफीयान सौरी यानें स्थापन केलें. हा हिजरी सन ९५ सालीं कुफा येथे जन्मला, व पुढे बसोरा येथें मरण पावला. यास काजी उल्कजा अतीचें काम बादशाह देत असतां हा ईश्वरभयास्तव व अन्यायाचे दोषास्तव घेईना. सबब बादशाह इतराज होऊन त्यास कैदेत टाकिले. तेथेच तो मेला. परंतु याने अधिकार घेतला नाहीं.

सहावे एक मत अबू दाऊद सुलेमान आज जाहिरी याने उत्पन्न केले आहे. हा हिजरी सन २०२ मध्ये जन्मला. हा कुफी होता म्हणजे कुफा येथे जन्मला, आणि बगदाद शहरांत मेला.

कुराणावर अनेक भाषेत ह्मणजे आर्बीत, तुर्कीत, फारशींत, उडदु मिसरी व सिंधी भाषेत वगैरे हजारो टीका झाल्या आहेत. त्यांस तफसीर ह्मणतात. त्यांपैकी प्रसिद्ध त्या लिहितो:-- (१) अबू जाफर तबरी. (२) अन्वर तंजील काषफी. (३) दुरतुल मनसूर. (४) जलालुद्दीन महंमद याची तफसीर (५) फत्ते ऊल अजीज (फारशी भाषेत) (६) तफसिरात अल्हं मदीयात.

हदीस या ग्रंथावरही टीका, व्याख्या व वृत्ति बहुत आहेत. या ग्रंथाचे आरंभी आसनाद ह्मणून एक वेदाच्या सर्वानुक्रमासारखे असते त्यांत कोणत्या मनुष्याच्या स्मरणावरून वचनांचा संग्रह केला त्याच्या सनदा म्हणजे परंपराचे दाखले ते लिहितात. त्याजवरून ती वचने खरी असे समजावयाचे. यांचे ग्रंथ कुतबसिता अल् हदीस. सही उल बुखारी इत्यादि आहेत.

तिसऱ्या प्रतीचे फिकाचे म्हणजे धर्मशास्त्राचे ग्रंथ पडित लोकांनी केले ते बहुत आहेत. त्यांतील प्रसिद्ध आहेत ते :—

(१) हिदाया हा शेख बुराणुद्दीन अल्ली यानें लिहिला. हा ग्रंथ हनफी मार्गाचा असून फार मोठा व अवघड आहे. यांत हरएक प्रकारचे विचार आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कर्ज | म्हणजे | ऋणदान. | विर्सा | म्हणजे | वारसा. |
| हीवा | ,, | बक्षिस. | तफरिक | ,, | वांटणी. |
| वसियत | ,, | मृत्युपत्र. | हकालत | ,, | विकरी फिरविणें |
| यूफिया, | ,, | अग्राधिकार. | ऐनत | ,, | निषिद्ध फायदा घेणें. |
| आरीयत | ,, | मोबदला. | इहीतिकार | ,, | निधिनिक्षेप. |
| हवालत | ,, | जामिनकी. | | | |

इत्यादि चारपांचशे विषय त्यांत आहेत व प्रथम धर्म, आचार, व्यवहार, शिक्षा इत्यादि लिहून पुढे दिवाणी फौजदारी वगैरे सर्व त्यांत लिहिले आहे. हिदायावर बहुत टीका आहेत त्यांतील मुख्य इनाया हिचा कर्ता शेख कमालुदीन, निवाया हिचा कर्ता हसनुदीन, किफाया हिचा कर्ता इमामुदीन, फत्तेउलकदर हिचा कर्ता कमालुदीन,

(२) कंजदकीक याजवर टीका उबेदल्ला यानें केली. तिचें नांव षरेतुलविकाया.

(३) फीका उल् अकबर.

(४) जामी उल कबीर म्हणून अबू अबदल्ला महंमद याचा आहे.

(५) जामी उल सगीर.

(६) जाहिर रवायत. याजवर टीका बहुत आहेत.

(७) नकाया.

(८) पीराजीया व षरीफीया. हे ग्रंथ इलम फरेज म्हणजे वांटणीबद्दल आहेत.

(९) दुरात उल इमाम.

(१०) मुलतक उल अभार. हा ग्रंथ इस्तंबुलास झाला.

असे ग्रंथ मोठाल्या पंडितांनी बुखारा, समरकंद, बगदाद, शिराज, तुस कुफा, हलब, मदिना, मक्का, केरो इत्यादि राजधानींत राहून केले आहेत.

हे सर्व सुनी तर्फेचे आहेत. याचप्रमाणे इराणांत वगैरे शिया महजब चालतो. त्या तर्फेचे ग्रंथ वेगळेच आहेत. त्यांची नांवे :– किताब हसनिया, हकुलयकीन, खुलास तुल अकबाल इत्यादि बहुत आहेत.

फिकाचे किताबानंतर फतावे म्हणून अनेक राजांचें फैसल्यांचा किताबा आहेत. त्यांतील मुख्य मुख्य लिहितों :–

(१) फतावे काजीखान. हा ग्रंथ इमाम फकिरूद्दीन हसम उर्फ काजीखान यानें सन ५९२ हिजरींत लिहिला.

(२) फतावे अनकीरावी, हा ग्रंथ शेख इसलाम यानें लिहिला. सन १०९८ हिजरींत.

(३) फतावे सिराजिया.

(४) फतावे हिमादिया.

(५) फतावे अबुल रहिमान एफेन्दी. हा ग्रंथ तुर्कस्थानांत झाला.

(६) खुलास तुल फत्तावे. हा ग्रंथ इफाती खारूद्दीन बुखारी यानें केला.

(७) जाहिरुल दुरानीया हा. ग्रंथ बुरानुदीन बुखारी यानें केला.

(८) फतावे अहल सदर खंड. हा ग्रंथ अबुल फता सदर खंडाचा राहणार याने केला.

(९) फतावे इमादिया.

(१०) फतावे जाहिरीया जाहिरूद्दीन बुखारी यानें केला.

(११) फतावे अलमगिरी, हा ग्रंथ अलमगिर बादशहाने पंडित जमा करून हिंदुस्थानांत लिहिला. या ग्रंथाचा तरजुमा बादशाहाची मुलगी जेबुनिसा इनें फारशीत तयार करविला. सन १०६७.

(१२) फतावे महंमदी. हा ग्रंथ टिपू सुलतान यानें करविला.

याप्रमाणें निवाड्यांचे हजारो ग्रंथ आहेत; व हे अरबी भाषेंत आहेत. ज्यास मुसलमानी धर्मशास्त्र किंवा दुसरा इलम पढणें असेल त्यास आरबी आल्यावांचून आरंभच करतां येणार नाहीं. पारशींत कांही थोडे तरजुमे आहेत. परंतु जे पूर्वी पंडित झाले त्यांनी आरबींत फार ग्रंथ केले व दुसऱ्या भाषेंत लिहूं नये हा त्यांचा अभिमान आहे. कुराण, हदीस, फिकाही मूळ आरबींत आहेत. तेव्हां तीं अस्सल पाहिल्याखेरीज त्यांचें मर्म समजत नाहीं. हा धर्मशास्त्राचा तपशील झाला. असे इल्म मंतिक (न्याय), सर्फनहो (व्याकरण), इल्म नजूम (ज्योतिष), इल्म हिकमत (वैद्यक), इल्म हिसाब (गणित), इल्म अर्ज (भूगोल), इल्म तारीख (इतिहास), इल्म रमल (प्रश्नविद्या), इल्म नर्ज (छंदशास्त्री), इल्म किमया (रसायन) इत्यादि ४० शास्त्रांवर पृथक पृथक ग्रंथ आहेत. व इतकीं ज्यास येतात त्यास मौलवी म्हणावें.

सांप्रत मुसलमानी विद्येचा ऱ्हास झाला आहे. व त्या विद्येंत परधर्माचा द्वेष फार आहे. याजकरितां परधर्माचे सरकारास या विद्येस उत्तेजन देणें योग्य नाहीं. यास उदाहरण :–मुसलमानाखेरीज कोणीएक साक्षीचे लायक नाहीं. इतर धर्माचा मनुष्य मुसलमानावर साक्ष देईल तर ती चालूं नये. शिंदळकीस मृत्यूची शिक्षा. नवऱ्यानें बायको पाहिजे तेव्हां सोडावी. इत्यादि बहुत जुलमी कायदे आहेत. याजकरितां असलें ज्ञान वाढवून उपयोग नाहीं. हल्लीं जगांत मोकळिकेची नीति चालत आहे. म्हणजे धर्मावरून कोणाचें नुकसान नसावें. इत्यादि जे दस्तूर हल्ली चालतात त्यांपासून लोकांचें बहुत हित आहे. असें सर्व शहाणे समजतात. व त्या नीतीस मुसलमानीशास्त्र फारच विरुद्ध आहे. यास्तव या विद्येस मुसलमानांशिवाय कोणी मदत देईल असें नाहीं. त्यास

सुज्ञ मुसलमानही देणार नाहीं. एकादा धर्मखुळा असल्यास देईल. अस्तु. मुसलमान लोकांतीलही दुराग्रह हल्लीं कमी होत चालले आहेत. त्यांचें गरीबीमुळें म्हणा, अथवा फार दिवसांचे या देशांत ते रहिवासी असल्यामुळें म्हणा, मुसलमानही सुधरत चालले आहेत. त्यांचे धर्माप्रमाणें हिंदूंचे देवास त्यांनीं मदत करूं नये परंतु शेंकडो देवळांत हल्लीं मुसलमान लोक चौघडे, वाजंत्रें वाजवितात. कितीएक साधू होऊन कथा करितात. कितीएक कबीरपंथी आहेत. कितीएक अवलिया, फकीर, पीर असून सर्व धर्मांस सारखें मानतात. कोणी वतनदार, पाटील, देशमुख असे आहेत, यांजमुळें लोकांच्या चालीप्रमाणें ते चालतात. व दसऱ्यास आपट्याची पूजा, नवरात्राचा घट, होळीची पोळी, इत्यादि मान घेतात. याप्रमाणें त्यांची क्रूरता कमी झाली हे ठीकच आहे. अकबर बादशाहानें देखील ही क्रूरता टाकून हिंदूंचें पालग्रहण चांगलें केलें अशी कथा आहे. हिंदुस्थानांत शिपाईगिरीचे नात्यानें क्षत्रिय लोक मुसलमानांस तरवारीचे भाऊ म्हणतात. कारण कीं या उभयतांस शूरत्वाची आढ्यता आहे ती सारखीच आहे. आतां या देशांतील मुसलमानांचें महत्त्व गेल्यास थोडे दिवस झाले. यामुळें हे इतर लोकांप्रमाणें संतोषवृत्तीनें नाहींत. हेंही खरें आहे. तत्रापि इंग्रज सरकारची नीति व धर्मसंबंधानें जुलूम करूं नये हा कायदा चांगला आहे, असें जे मुसलमान सुज्ञ आहेत त्यांस वाटतें. यांत संशय नाहीं आणि हाच सुज्ञपणा वाढावा अशी आमची आशा आहे. गीजा व जहात करण्याचे व षहीद होण्याचे दिवस गेले. हेंच खचित आहे. तत्रापि धर्मसंबंधी भाग सोडून बाकी इतिहास, कविता वगैरे ग्रंथ उपयोगी आहेत. फारशी व आरबी भाषा फार गोड आहेत. अद्यापि मुसलमान व फारशी लोक आपले पूर्वजांच्या या भाषा असें समजून कांहीं कांहीं शिकतात. मराठी भाषेंत त्यांचा संबंध फार आहे ही याजकरिता या भाषांची माहिती सर्वांस असावी हें योग्य आहे.

हिंदुस्थानांत मुसलमान लोक आले तेव्हां नर्मदेचे उत्तरभागीं रांगडी भाषा चालत होती. तीस हिदवी ब्रिजभाषा असें म्हणतात. ही भाषा अद्याप चालत आहे. तींत सत्यया, तुळशीदास वगैरे कवींच्या कविताही पुष्कळ आहेत. जेव्हां संस्कृत बुडोन प्राकृत भाषा झाली, तेव्हां ही एक प्राकृत भाषा संस्कृताच्या अपभ्रंशानें झाली. हींत संस्कृत शब्द पुष्कळ आहेत. पुढें मुसल्मानांचीं लष्करें हिंदुस्थानांत उतरलीं तेव्हां त्या लष्करांत अनेक जातीचे व अनेक देशचे लोक होते. म्हणजे कोणी तुर्की, कोणी कंधारी, कोणी इराणी, कोणी शिद्दी, कोणी मोंगल, कोणी आर्बी, कोणी मिसरी, कोणी बुखारी, कोणी फिरंगी असे होते. तेव्हां या लोकांमध्यें उडदू भाषा उत्पन्न झाली. हींत सर्वांचे शब्द आहेत. उडदू म्हणजे बाजार आणि हिंदुस्थानच्या मुसलमानांनीं हीच आपली भाषा ठरविली व जिकडेतिकडे त्यांनीं वस्ती केली तिकडे तिकडे ही भाषा चालते. पुढें दिल्लीस खुसरू. अबूफजल इत्यादि या भाषेंत ग्रंथकार झाले. त्यांनीं रेखते, गजल वगैरे कवनें केली. नंतर पूर्वी रांगडीभाषा देवनागरी म्हणजे बालबोधासारखें लिपीनें लिहित होते तें सोडून मुसलमान लोकही नवी भाषा फारशी हरपानें लिहूं लागले. यामुळें उडदूभाषा फारशी हरपाने लिहिण्याची रीति पटली. ती अद्याप चालत आहे. सांप्रत ही भाषा ज्यास येते, त्यास हिंदुस्थानचे कोणतेही भागीं संचार करण्यास अडचण नाहीं. बंगल्यांत कर्नाटकांत गुजरायेंत तैलगणांत सर्वत्र ही उडदू भाषा चालते. याचें कारण मुसलमानांची वस्ती सर्वत्र आहेच. उडदूभाषेंतही दोन प्रकार आहेत. एक दक्षिणी किंवा विजापुरी आणि दुसरी हिंदुस्थानी किंवा पेहलवी. ब्राह्मणांनीं पूर्वी संस्कृत भाषा सर्व देशभर स्थापिली, त्यानंतर मुसलमानांनीं उडदू चालू केली, व हल्ली इंग्रजी सर्वत्र चालू आहे. विजापुरी उडदूभाषा आहे तींत तैलंगी, द्राविडी, कर्नाटकी शब्द येतात, व दिल्लीची उडदु आहे तींत फारशी, आरबी व संस्कृत शब्द फार येतात. आतां जुनी रांगडींभाषा आहे ती गांव खेड्यांतून चालत आहे. व रजपूत, परदेशी, गौडब्राह्मण हीच बोलतात. परंतु तिला मुसलमान गव्हार म्हणतात. मुसलमानी दरबारांत व शहरांत उडदूभाषा चालते, यास्तव या भाषेस कोणी मुसलमानी

भाषाही म्हणतात. अजमीर, उदेपूर, जयपूर वगैरे ठिकाणीं रांगडी भाषा चालते. व कोठें कोठें देवनागरी लिपीही चालू आहे.

## १३० पारशी लोक, त्यांच्या चालीरीति, धर्म व पुरातन ग्रंथ यांविषयीं माहिती

आमचे देशांत पारशी ह्मणून एक जातीचे लोक आहेत. हें सर्वांस ठाऊक आहे. हे लोक हजार वर्षांपूर्वीं या देशांत आले व तेव्हांपासून गुजराथेत नवसारी, गणदेवी वगैरे प्रांतीं वस्ती करून राहिले आहेत. हे आल्यानंतर गुजराथेंत मुसलमान व मराठे पुष्कळ राजे होऊन गेले. परंतु यांस वैभव प्राप्त झालें नाहीं. कारण शिपाईगिरी, सावकारी, किंवा मुत्सदगिरी या प्रकरणांत हे फारसे शिरले नाहींत, आलीकडे इंग्रजी राज्य गुजराथेंत व दक्षिणेंत स्थापन झाल्यापासून मात्र या जातीचें ऊर्जित झालें आहे. म्हणजे यांमध्यें मोठमोठाले सावकार, विद्वान व धर्मशील असे बहुत लोक विख्यात झाले आहेत व अजून हे किती वाढतील याचा नेम नाहीं. यांणीं चीन, विलायत इत्यादि ठिकाणीं नुकतीच आपली वसाहत केली आहे. व हे आपणाविषयीं बहुत शोध करितात. प्राचीनकाळीं आपण कोण होतों याचा त्यांस विसर पडला होता याचें कारण दरिद्रदशा. दरिद्री अवस्था असली म्हणजे सर्वच व्यंग पडतें. परंतु तें दरिद्र कायम न राहतां ईश्वरकृपेनें या पारशी लोकांस वैभव आलें. आणि त्या वैभवाचा हे उत्तम प्रकारें व्यय करितात. हें पाहून संतोष वाटतो. वाढते काळाचीं जीं जीं चिन्हें असावीं तीं सर्व यांमध्यें आहेत. हे आपले लोकांमध्यें अनेक प्रकारचा बंदोबस्त करून विद्या व व्यापार वाढवीत आहेत. आणि बहुत चांगले कामांत पुढारी होऊन मोठे हिमायतीनें सुधारणा करीत चालले आहेत. सांप्रतकाळीं या देशांत जितक्या जाती व धर्म खूप आहेत तितक्या सर्वांत ही जात पुढारी आहे. व या जातीचे लोक थोडे आहेत तरी हे कोणतेही व्यापाराचे ठिकाणीं नाहींत असें नाहीं. यांच्यामध्यें बहुत लोक व्यापारी, वकील, जड्ज, वैद्य, इंजिनियर, मुत्सद्दी, वगैरे सर्व धंदे करणारे आहेत. व आलीकडे औदार्यानें यांची फार कीर्ति झाली आहे. याजमुळें विलायतेचे राजानींही यांस किताब देऊन या देशांतील जुने राजेरजवाड्यांच्या बरोबरीच्या मरातबीस आणिलें. या लोकांस आमचे लोकांसारखी भीक मागत फिरण्याची हौस नाहीं. उदीम करण्याची व देशांतर करण्याची हौस आहे. आपले मुलींस व मुलांस विद्या शिकवावी असें यांस मनापासून वाटतें. व आपणच सर्वांहून थोर व आपणास सर्व ठाऊक आहे, असा यांस पोकळ आग्रह नाहीं. एकादें शोधाचें काम आपले हातून न झालें तर इंग्लिश व जर्मन इत्यादि पंडितांचीं हे मदत घेतात. विद्वानांचा कटाळा करीत नाहींत. व 'काय करावें ? या राज्यांत आमचा हात चालत नाहीं,' असें ह्मणून हे कपाळास हात लाऊन गाऱ्हाणें सांगत बसत नाहींत. जे जे मार्ग खुले आहेत त्यांत त्यांत हे प्रवेश करून चांगले स्थितीवर येण्याचा उपाय करीत आहेत. याप्रमाणें यांची सांप्रतची स्थिति आहे.

आतां हे पूर्वी कोण होते व कोणते स्थितींत होते हें बहुतांश ठाऊक नसेल ह्मणून याविषयीं थोडें वर्णन करूं. पूर्वी जेव्हां हिंदु लोक हिमालयाचे पलीकडे देव क्षेत्रांत होते तेव्हां हिंदु व पारशी यांचें एकच राष्ट्र होतें. पुढें कांहीं कारणानें हें राष्ट्र देशोदेशीं फुटलें, तेव्हां पारशी इराणांत गेले आणि हिंदुस्थानांत गंगाप्रदेशीं आले. व मग हिंदुंची भाषा संस्कृत आणि पारशी लोकांची भाषा जेन्द, या निर्माण झाल्या. मूळच्या दुसऱ्या एका भाषेच्या या दोन्ही अपभ्रष्ट भाषा आहेत असें समजतें. पण या दोहोंची आई कोण होती तिचा पत्ता नाहीं. अस्तु. इराणांत पारशी लोक आल्यानंतर तेथें त्याचे एक मोठे राज्य स्थापन झालें, व त्यांच्यामध्यें जरदष्ट या नांवाचा एक पुरुष झाला. त्याणें एक धर्म स्थापन केला. त्या धर्मातील आचार बहुतकरून ब्राह्मणधर्माशीं मिळतो; म्हणजे त्यामध्यें यज्ञ, सोमपान, इष्टी, यज्ञोपवीतधारण, गोमूत्रशुद्धि, मंत्र, अग्निसेवा इत्यादि प्रकार आहेत.

हा धर्मप्रवर्तक पुरुष जरदष्ट कोणते काळीं झाला हें अद्यापि बरोबर समजत नाहीं. कोणी म्हणतात कीं तीनहजार वर्षांपूर्वी झाला. व दुसरे कोणी म्हणतात कीं त्यास सातहजार वर्षे झालीं. असा याविषयीं मतभेद आहे. जरदष्टाचे लेख जेन्द भाषेंत लिहिलेले अद्यापि आहेत. व तेच लेख पारशी धर्माची मूळपुस्तकें आहेत, आणि त्यांस एकंदर 'अवस्ता' हें नाव आहे.

वंदिदा, इजष्टा, इसपर्व, खुर्दा, अवस्ताजी, इत्यादि पुस्तकें आहेत. तीं याचे पोटविभागांत आहेत. वंदिदाद ग्रंथांत पापास शिक्षा कशा असाव्या हें सांगितलें आहे. हे सर्व ग्रंथ श्लोकबद्ध रचलेले आहेत. हुर्मजद म्हणजे ईश्वर प्रत्यक्ष होऊन जरदष्टाशीं बोलला. असें त्याचें अनुसंधान आहे. हिंदुलोकांस त्या काळीं हे लोक देव मानीत होते, व भ्रष्ट मानीत होते, अशाही त्यांचे ग्रंथांत कथा आहेत. यावरून आमच्या वेदांत देवादैत्यांच्या दंतकथा आहेत, त्याच काळाच्या सुमारास हीं पुस्तकें झालेलीं असावीं असें इतिहासाच्या मेळावरून वाटतें. अस्तु.

या पुस्तकाचे आधारानें पारशी लोकांकडून इराण देशांत व त्याचे आसमंतात भागीं अग्निसेवेचा धर्म स्थापन झाला. त्या धर्माचे मोठाले पराक्रमी राजे आरदेसर, गुस्ताप, हुरमुंज, दारा, खुसरू, जमशीद, फरीतून, शापूर, बेहेराम, फिरोज, नशिरवान, यजदजर्द इत्यादि उदयास आले. व यांतील कितीएकांनीं देवांशीं युद्धे करून त्यांचा पराभव केला. म्हणून यांस 'देवबंद' असा किताब आहे. पुढें यवनलोकांचा शिकंदर बादशाह येऊन त्यानें दाराबादशाहाचा आरबिला येथें पराभव करून त्याचें राज्य घेतलें. त्या काळचे इराणचे बादशाहाच्या दौलतीचें व फौजेचें मोठेंच वर्णन केलेलें आहे. परंतु अतिशय श्रीमंती आली म्हणजे अशक्तता येते तशी या राज्याची स्थिती झाली होती. म्हणून यवनांचा जोर चालला, व हें राज्य हस्तगत झाल्यामुळें शिकंदराचाही फार लौकिक वाढला. ही गोष्ट इसवी सनाचे पूर्वी ३३० वर्षांमागें घडलीं. याप्रकारें यवनांचे हातीं देश गेला तरी पारशी लोकांचा धर्म बुडाला नाहीं. कारण यवनांनीं त्यांचे धर्मावर जुलूम केला नाहीं, व देशांतही वस्ती केली नाहीं. फक्त येऊन जाऊन असत. याप्रमाणें यवनांचा अंमल शंभर वर्षे चालल्यावर रूमचे बादशाहानें त्यांचें राज्य घेतलें. त्यावर इराणांत पुन्हा अग्निसेवनरूप धर्माचे लोकांचा अम्मल होऊन आर्देसर राजा राज्य करूं लागला. व त्यापुढें कितीएक राजे होऊन पारशी लोकांचा धर्म पूर्ववत् चालत असतां आर्बस्थान देशांत इसवी सन ६०० यांत मुसलमानी धर्म प्रवृत्त झाला. व त्या धर्मांत हजारो लोक जाऊन त्यांच्या फौजा जमल्या व तरवारीनें तो धर्म स्थापन होऊं लागला. पुढें महंमदाचे पुढील चौथा इमाम किंवा खलीपा हजरत उमर याणें मोठी फौज जमा करून तुर्कस्थान वगैरे देश काबीज करून इराण देशांत प्रवेश केला. तेव्हां त्याशीं यजदजर्द नामें पातशाहा लढावयास आला. मग सन ६२६ त या देशाचें कादेसा गांवाजवळ मोठें युद्ध झालें. त्यांत इराणचा बादशाहा यजदजर्द पराभव पावला, व मुसलमानांनीं राज्य घेतलें त्यावर पुन्हां एकवेळ इराणी लोकांनीं नाहावंद येथें मुसलमानांशीं लढाई केली. परंतु तेथेंही ते हरले. याप्रमाणें मुसलमान प्रबल झाल्यावर पारशी लोकांचे धर्मावर मोठा जुलूम झाला. मग कितीएक नवे धर्मांत गेले, व कितीएक गुप्त राहिले. अग्नीच्या देवालयांचा विध्वंस झाला, व हजारों मुसलमान लोक दरसाल इराण देशांत येऊन वस्ती करूं लागले, व त्यांचें राजाकडून संरक्षण होऊं लागलें. आणि जुने धर्माचे लोकांस मुसलमान 'गिवार' किंवा 'अतष परस्त' असें म्हणूं लागले. व त्यांजवर अनेक प्रकारचे कर बसवून त्यांस बहुत उपद्रव देऊं लागले. तेव्हां तेथील लोक पळून इकडे तिकडे गेले. व त्याच धांदलींत कितीएक बुशायराहून गुजराथ प्रांतीं सुरतेस आले. हाच त्यांचा हिंदुस्थानांत येण्याचा आरंभ होय.

याप्रमाणें पारशी लोक सुरतेस आले. तेव्हां तेथें हिंदुधर्माचा राजा होता त्याजवळ त्यांनीं आपली दुःखभरित हकीकत निवेदन केली. तेव्हां त्यास फार दया आली आणि त्यानें निर्वेधपणें राहण्याकरितां नवसारी प्रांतांत जागा दिली. इतका मात्र करार करून घेतला कीं,

'तुम्ही तरवारीचा धंदा करून बखेडा करूं नये. व्यापार करून स्वधर्मानें राहावें.' त्यास मान्य होऊन हे लोक नवसारी प्रांतांत जाऊन राहिले. यांनी आपले बरोबर अग्नि व धर्मपुस्तकें आणिलीं होतीं, व कितीएक भटही यांत होते. पुढें हे लोक गुजराथेंतील इतर लोकांशीं मिसळून व्यापारधंदा करूं लागले, व हिंदुलोकांच्या चाली यांनीं पुष्कळ घेतल्या. म्हणजे बायका कुंकू लावूं लागल्या; लग्नें वगैरे संस्कृत भाषेनें करूं लागले, व पूर्वी ब्राह्मणापासून त्यांनीं पूजेचे पाठ व संकल्प शिकून घेतले होते. पण आपला धर्म मात्र सोडला नाहीं, आणि आपलीं पुस्तकें सांभाळून ठेविलीं. हल्लीं इराणांतही जुने धर्माचे कितीएक लोक राहिले आहेत. पण त्यांस धर्म चालविण्यास फार चोरी आहे, व त्यांस उपद्रव फार होतो. कारण जिकडे तिकडे मुसलमान लोकच फार व ते जबरदस्त आहेत. आणि राजाही त्यांच्याच धर्माचा आहे. इराण देश मुसलमानी झाला त्या पूर्वीच तेथील झेन्द भाषा बहुतकरून बुडाली होती, व पारशी भाषा चालत होती. तींत पुढें आरबी वगैरे शब्द मिसळून इराणांत तीच भाषा झाली, व मुसलमान लोक तीच बोलूं लागले. पुढें हिंदुस्थानांत जे पारशी आले यांची पारशी भाषा जाऊन गुजराथी भाषा झाली. तथापि जुने ग्रंथ मात्र त्यांनीं संरक्षण करून ठेविले होते. यांच्या पैकीं भटास पारशी व झेन्द भाषेंतील पुस्तकें वाचावयास येतात, परंतु अर्थ समजत नाहीं. तसेंच कितीएकांस पारशी चांगलें समजतें, व झेन्द नुसतें वाचतां येतें. याप्रमाणें आपल्यांत जसे भट वेद पाठ म्हणतात, तशी यांची स्थिती झाली. मुसलमानांचे अमलांत एका राजानें एक मोठें काम केलें, तें असें कीं फरदुसी म्हणून त्याजवळ एक उत्तम कवि होता. त्याजकडून त्यानें इराणदेशाचा मुसलमानांचे कारकीर्दीतील इतिहास लिहविला. त्या ग्रंथाचें नांव 'शाहनामा' त्याचे ६०,००० बयता म्हणजे श्लोक आहेत. इराण देशाच्या मागील इतिहासाची माहिती समजण्यास मुख्य आधार हाच ग्रंथ आहे. हा ग्रंथ शुद्ध पारशी भाषेंत आहे.

पुढे हिंदुस्थानांत आंटिकिल पेरु म्हणून जो फरांसीस फिरावयास आला होता, त्यास सुरतेस झेन्द भाषेचीं जुनीं पुस्तकें आढळल्यावरून तीं सर्व त्यानें विलायतेंत नेऊन प्रसिद्ध केलीं. तेव्हांपासून या जुन्या भाषेचा शोध जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स, इत्यादि देशांतील मोठाले पंडित करूं लागले. परंतु झेन्द भाषेचें व्याकरण किंवा कोश नाहीं, या अडचणीमुळें आज १२५ वर्षे चाललेल्या यत्नास पूर्ण म्हणण्यासारखी सिद्धी झाली नाहीं. तथापि कोणी म्हणत होते कीं ही भाषाच नाहीं. पण तो त्यांचा वाद तुटून ही भाषा खरी आहे व हींत पुस्तकें आहेत तीं खरी असें सैजील, बरनाफ, बाय, हौ इत्यादि विद्वानांनीं ठरविलें आहे त्याचा अद्याप शोध चालला आहे. डाक्टर हौ साहेब या नावाचे एक जर्मन शास्त्री पुण्याचे पाठशाळेंत होते त्यांस सरकारने या भाषेच्या पुस्तकांचा आणखी शोध करण्यास नवसारी वगैरे गांवीं जावयास सांगितलें होतें. त्याप्रमाणें ते गुजराथेंत फिरून त्यांनीं बहुत पुस्तकें जमवून आणिलीं. पारशी लोकांनीं त्यांस फार चांगली मदत केली. एक दोन जुने समजुतीचे लोकांनीं मात्र हरकत केली. ब्राह्मणांचीही मदत मिळण्यास बहुत हरकत झाली. तत्रापि कितीएक अथर्ववेदप्रकरणीं नवीन पुस्तकें जीं युरोपांत प्रसिद्ध नाहींत तीं हस्तगत झालीं.

अलीकडे मंचरजी हुरमसजी कामा या नामें पारशी गृहस्थांनीं आपले धर्मपुस्तकाचा इंग्रजी तर्जुमा एक लाख रुपये खर्च करून विलायतेहून क्लिक साहेबाकडून करवून आणून आपले लोकांत वाटून दिला आहे. या तर्ज्युम्यांत कांहीं चुका आहेत असें डांक्टर हौ यांचें म्हणणें आहे. ते म्हणतात कीं, झेन्द भाषेंत जितके ग्रंथ आहेत तितके जरदुष्टाचे नव्हेत. त्यांत गाथा आहेत तितक्या मात्र त्याचा वाक्जिंद, व पाजंद म्हणजे मूळ वाक्यावर टीका आहे. ती वेगळ्या कवीची आहे. तिचा भेद तर्जुम्यांत नाहीं. पारशी यांचे धर्मपुस्तकांत नीति, शुचिर्भूतपणा व ईश्वराचें भय बैबलाचे जुने करारापेक्षां जास्त आहे. पण हें कितीएक मिशनरी लोकांस आवडत नाहीं. यांचें

कारण पारशी लोकांचा धर्म वाईट असें आजपर्यंत म्हणावयाचा सांप्रदाय मिशनरी लोकांनीं घालून बहुत ग्रंथ लिहिले आहेत, व पारशी लोकांचे धर्मपुस्तकांत काय आहे हें अद्याप पुरतेपणीं प्रगट झालें नवतें, आणि त्यांचा जुनेपणाही प्रसिद्ध झाला नव्हता. आतां यापुढें मात्र या गोष्टीचा जों जों अधिक खुलासा होईल तों तों खरी हकीकत प्रसिद्ध होईल.

पारशी धर्माचीं पुस्तकें फार जुनीं आहेत. बैबलाचा प्रथमचा भाग ज्या मूसानें लिहिला त्याचे पाठीमागें बहुत दिवस तीं झालीं असावीं हें सिद्ध आहे. त्यांत नीति आणि ज्ञान मूळच्या ग्रंथां-पेक्षां चांगलें आहे, व हें कबूल केलें म्हणजे मूसानेच प्रथम धर्म प्रसिद्ध केला, व तो धर्म पूर्वी कोणास माहित नवता, हा अभिमान व हा ग्रह ख्रिश्चियन लोकांचा आहे तो नाहींसा होणार आहे. हेहीं एक हो साहेबास पारशी ग्रंथाबाबें वाद उत्पन्न करण्याचें कारण आहे. परंतु 'खऱ्यास कोठेंच मरण नाहीं' अशी म्हण आहे. त्या प्रमाणें याचा परिणाम होईल.

## १३१ इस्त्रायल लोकांविषयीं माहिती

आजपर्यंत कोणाची माहिती कोणी मनास आणूं नये असा आमचे हिंदु लोकांचा सांप्रदाय चालत आला आहे, व त्यापासून आपले लोकांचे फार नुकसान झालें आहे. आमचे लोकांप्रमाणें गैरमाहित लोक पृथ्वीवर थोडेच असतील. पहा. हजार पांचशें वर्षेपर्यंत वेगळेवेगळे प्रकारचे लोक आम्हांत मिसळून एकत्र राहिले आहेत. परंतु आमच्या मधील मोठ्या मोठ्या चतुःशास्त्री पंडितास देखील त्यांच्या राष्ट्राबद्दल एक लहानशीही गोष्ट विचारिल तर तो कानावर हात ठेवील. त्याच्याने कांहीं सांगवणार नाहीं. परंतु आलीकडे हें जुनाट अज्ञान बरेंच दूर होत चाललें आहे. अस्तु.

इस्त्रायल लोकांस ज्यू, हिब्रू, आर्मीनियन, इस्त्रायल व यहुदी अशीं नांवे आहेत. या लोकांची आपले हिंदुस्थानांत जागोजाग वस्ती आहे व अद्यापि परमुलखांतून व्यापार वगैरे करण्याकरितां या देशांत हे लोक नवेनवेही येतात. हे बहुत दिवसांपासून कोंकणप्रांतीं पुष्कळ आहेत. तेथे हे तेल्याचा धंदा करितात, म्हणून यांस तेलीच म्हणतात. जंजिरा प्रांतीं हे लोक पुष्कळ आहेत. तसेंच तळेंघोसाळें, दंडाराजपुरी वगैरे प्रांतीं यांची वस्ती बरीच आहे. आतां हे लोक कोण व यांचा धर्म काय, याविषयी आपण विचार करू. आलीकडे या जातीचे लोक पलटणींत व इस्पितळांत पुष्कळ नोकर आहेत. कित्येक मोठे नामांकित सावकारही आहेत. मुंबईचे हजरत दाउद सासून हे याच जातीचे आहेत. परंतु आर्बस्तानांतून येऊन मुंबईत यांनीं वस्ती केली. हे जुन्यांपैकीं नव्हेत. यांनीं पुण्यांत इस्पितळ व धर्मशाळा बांधण्याकरितां दोन लक्ष रुपये दिले, व यांनीं मुंबईत भायखळ्यावर आपले धर्माचें मोठें देऊळ बांधलें आहे. यांनीं पोरकीं मुलें शाहाणी करण्याकरितां एक मोठी धर्मशाळा स्थापिली आहे.

प्राचीनकाळीं आर्बस्थानाचे उत्तरेस इस्रायल लोकांचें एक मोठें राज्य होतें. त्या राष्ट्रास पालस्टैन, जुडिया, शिरिया, आर्मीनिया, षास अशीं नांवें आहेत. सांप्रतकाळीं हा प्रांत तुर्कस्थानचे मुसल-मान राजाचे अमलांत आहे.

इस्रायल लोकांचा इतिहास फार जुना आहे. व याचा तो इतिहास आणि धर्म बहुतकरून ख्रिश्चियन लोकांस व मुसलमान लोकांस मान्य आहे. ख्रिस्तियन आणि मुसलमानी धर्माचें मूळ इस्रायल लोकांचें धर्मपुस्तक आहे. यांचा इतिहास असा कीं ६००० वर्षांपूर्वी जग निर्माण झाल्यावर ईश्वरानें एक मोठें तुफान उत्पन्न करून सर्व मनुष्यें मरण पावविलीं व त्या वेळेस नोहा पैगंबराचें मात्र एके नौकेंत ईश्वरानें रक्षण केलें व त्यानंतर नोहा पैगंबराचा वंश वाढून पुन्हां वस्ती झाली. हें तुफान झाल्यास ४२०० वर्षे झालीं. असें या लोकांचें मत आहे.

पुढें या लोकांमध्यें इब्राम खलीलुल्ला म्हणून ३८०० वर्षांपूर्वी एक सिद्ध पुरुष झाला त्यास ईश्वरी प्रसाद होता व या लोकांचा मूळपुरुष तो होता असें म्हणतात. याचा पुत्र याकूब म्हणून

होता त्यास १२ पुत्र होते. त्यांची १२ गोत्रें होऊन पुष्कळ विस्तार झाला. त्यांपैकीं एकजणाचें नांव युसुफ म्हणून होतें. त्यांस मिस्त्रदेशांचे राजाजवळ मोठी पदवी प्राप्त झाली. परंतु युसुफाचे वंशास मिस्त्रदेशाचे राजाकडून उपद्रव झाला. पुढें या लोकांमध्ये मुसा पैगंबर म्हणून एक ईश्वरप्रसादी पुरुष झाला. त्यास ३३०० वर्षे झालीं त्याणें कितीएक करामती केल्या व आपले जातीचे सर्व लोकांस मिस्त्रदेशांतून काढून कनान प्रांतीं नेऊन स्थापिलें. तेव्हां मार्गात, रानांत आणि समुद्रांत मुसानें बहुत करामतीनें यांचें रक्षण केलें. अशा कथा आहेत.

हे लोक त्या काळीं आपल्यास फार पवित्र मानीत होते. ईश्वरास आपण फार प्रिय आहों आणि ईश्वर वारंवार आपले संरक्षणाकरितां अवतार घेतो, असें समजत होते. सभोंवतालचे दुसरे राष्ट्रांतील लोकांस 'हीदन' म्हणजे खोटे धर्माचे लोक असें यांनीं नांव दिलें होते. खोटे धर्माचे लोकांबरोबर युद्धें करून त्यांचे द्रव्य वगैरे हे हरण करित असत.

पुढें या लोकांमध्ये साल या नांवाचा एक मोठा राजा झाला. त्याचे पुढें दाउद राजा झाला. त्याणें या प्रांतीं जरुशालेम या नांवाचें एक शहर वसविलें. ती या देशाची मुख्य राजधानी झाली. मुसा व दाउद यांचे कायदे व धर्मोपदेशाचे ग्रंथ अद्याप आहेत. त्यांस ख्रिस्तियन लोक 'जुना करार' असे म्हणतात. करार म्हणण्याचे कारण असें आहे कीं ईश्वरानें इस्त्रायल लोकांस 'मी तुमचे कल्याण करीन. तुमचा मोठा विस्तार करीन. तुम्हांस स्वर्गीचें सुख देईन' असा करार केल्याची गोष्ट त्यांत आहे. म्हणून या सर्व पुस्तकास 'करार' असे म्हणतात. यांच ग्रंथास मुसलमान 'तौरेतवजबूर' असें म्हणतात. परंतु मुसलमानाचें मत आहे कीं कुराण ईश्वरानें लिहिलें तेव्हां हीं सर्व रद्द केलीं. अस्तु. दाउद राजाचा मुलगा सिलेमान झाला त्याचे कारकीर्दीत या लोकांचे महत्त्व फार झालें. या गोष्टीस २८९० वर्षे झालीं.

श्रीमंतीचा परिणाम सर्व ठिकाणीं वाईट होतो, तसा या लोकांमध्येही झाला. म्हणजे हे लोक पुढें धर्माविषयीं वगैरे आपसांत तक्रारी काढून भांडूं लागले. तेव्हां शेजारीं बाबिलन म्हणून एक मोठें पराक्रमी राज्य होतें. त्यानें या लोकांस आपले ताब्यांत घेतलें व पुढे बाबिलनचें राज्य इराणचें बादशहाने घेतलें. तेव्हां इस्त्रायल लोक पुन्हा स्वतंत्र झाले. पुढे इराणचें राज्य यवन लोकांचा शिकंदर बादशाह (आलेक्झांडर) याणें पालथें घातलें. तेव्हां इस्त्रायल लोक यवनांचे ताब्यांत गेलें. व पुढे यवनांचें राज्य रूमचे बादशहानें घेतलें तेव्हां हे लोक रूमचे ताब्यात गेले त्यास २००० वर्षे झालीं.

या लोकांत जे पैगंबर झाले त्याणीं असें लिहून ठेविलें होते कीं इस्त्रायल लोकांमध्यें मसीहा या नांवानें एकवेळ ईश्वर अवतार धारण करून या लोकांचें कल्याण करील आणि त्यांतील तंटेबखेडे सर्व मोडून स्वस्थता करील. या लोकांस जेव्हां वाईट काळ आला तेव्हां त्यां भविष्यावर उमेद धरून यांनी दिवस घालविले.

रूमचा बादशाह आगस्टस सीझर हा राज्यावर असतां बेथलेम या गांवांत इस्त्रायल लोकांमध्यें मेरीचा मुलगा इसा (येशूख्रिस्त) हा जन्मास आला. त्याचे जन्मापासून इसवी हा शक चालतो. हा पैगंबर होता असें मुसलमान म्हणतात. ख्रिस्ती लोक म्हणतात कीं हा देवाचा मुलगाच आहे. हें कसेंही असो. परंतु हा लहानपणापासून मीच मसीहा असें म्हणून लोकांस नवीन धर्म सांगूं लागला. परंतु हा फार गरीब असून फकीरासारखे वृत्तीनें गाढवावर बसून वगैरे फिरत असे. त्यास इस्त्रायल लोक म्हणूं लागले कीं, 'तू आम्हांस करामत दाखीव व आमचें कल्याण कसें करणार तें सांग. तेव्हां आम्हीं तुझें म्हणणें कबूल करूं.' त्याचें उत्तर तो असें देत असे कीं, 'मी मेल्यानंतरच तुमचें कल्याण करणार. भूमीवरचा थोरपणा नाशिवंत आहे. यास्तव याची उमेद तुम्हीं धरूं नये'. याचे धर्मातील सारांश इतकाच आहे कीं, ईश्वरास अंतःकरणानें भजावें; मूर्ती, धूपदीप वगैरे पूजासामुग्री कांहीं करूं नये; होम करूं नये; सुंता करूं नये. याप्रमाणें मार्गे चालत

आलेलीं कितीएक कलमें याणें फिरविलीं. तेव्हां इस्रायल लोकांनीं तट करून असे ठरविले की, 'हा मसीहा नव्हे. ढोंगी तोतया आहे. याचा हेतु इतकाच कीं प्राचीन धर्म मात्र भ्रष्ट करावा. 'तेव्हां रूमचे बादशाहाचे तर्फेने या प्रांतीं गवरनर होता, त्याजकडे इस्रायल लोक फिर्यादीस गेले. त्याजवरून त्या गव्हरनराने इसवी सन ३३ त इसास सुळावर दिलें. या विषयीं मुसलमान असें म्हणतात कीं, 'सुळीं देण्याचा हुकूम होतांच तो आकाशांत जाऊन ईश्वराजवळ बसला. 'ख्रिस्तियन लोक म्हणतात कीं, 'सुळीं दिला परंतु लोकांची खात्री करण्याकरितां तो पुन्हा जिवंत होऊन नंतर आकाशांत गेला..' इस्रायल म्हणतात कीं, 'तो ढोंगी होता सबब यथार्थ फांशीं गेला. मसीहा अजून पुढें होणार आहे.' असा त्यांचा अद्याप विश्वास आहे.

इस्रायल लोकांचे राष्ट्र होते त्या वेळची भाषा हिब्रु होती व ती अद्याप ख्रिस्तियन धर्मातील पंडित पढतात.

इसवी सन ७२ वे वर्षी या लोकांनीं रूमचे बादशाहावर दंगा केला. तेव्हां बादशाहानें मोठें सैन्य पाठवून या लोकांस मुलखाबाहेर घालवून दिलें. तेव्हांपासून हे लोक स्वदेशभ्रष्ट झाले. कोणी कोणत्या मुलखांत असे जाऊन राहिले. आतां हे विलायतेत, अमेरिकेत, आफ्रिकेंत, आर्बस्थानांत व हिंदुस्थानांत वगैरे बहुत ठिकाणीं येऊन राहिले आहेत. ज्या देशांत ते राहतात तेथील लोकांप्रमाणेच त्यांचा वेश व भाषा असते. एक धर्म मात्र त्यांणीं अद्याप संरक्षिला आहे. आर्बस्थानांतील इस्रायल आरबी बोलतात, व पोशाक आर्बाप्रमाणे करितात. विलायतेंतील इस्रायल इंग्रजी बोलतात. व इंग्रजांप्रमाणें पोशाक करितात. आणि हिंदुस्थानांतील इस्रायल कुळंब्याप्रमाणे वागतात.

मुसलमानी धर्म झाला तेव्हां कितीएक इस्रायल मुसलमान झाले. हे लोक खरे पैगंबराचे कुराण असतां मानीत नाहींत, म्हणून मुसलमान लोक यांस नीच मानितात. इसा पैगंबर खरा असतां त्यास त्यांणीं मानिले नाहीं, व त्याचा छळ केला, म्हणून ख्रिस्तियन लोकही त्यांस नीच मानितात, व याच कारणाने यांस देशभ्रष्टता आली असे म्हणतात. इस्रायल लोकांचा शनिवार हा विश्रांतीचा दिवस आहे.

इसवी सन ७०० सालीं मुसलमानांनी रूमचे राज्य घेतलें तेव्हां इस्रायल लोकांचा मुलुख जरुशालेम शहरसुद्धां हजरत उमर याणें घेतला. तेव्हापासून मुसलमानांचे ताब्यांत हा देश आहे व तेथें बहुतकरून मुसलमानांची वस्ती आहे. अद्याप कांहीं इस्रायल तेथें आहेत.

इस्रायल लोकांचे देशांत येशूची कबर आहे. तीस मुसलमान 'बैतुलमुकदम' म्हणतात. शिवाय तेथें जार्डन नदी, मुसा पैगंबराची स्थानें इत्यादि आहेत. म्हणून ख्रिस्तियन धर्माचे लोक तेथे यात्रेस वगैरे जातात येतात. ही ठिकाणें आपलें ताब्यांत यावीं म्हणून यूरोपखंडातील राजांनीं बहुत युद्धे केली आहेत. त्यांस 'क्रूसेड' असे म्हणतात. परंतु त्या काळी मुसलमान फार जबरदस्त होते. म्हणून त्यांनीं लक्षावधी ख्रिस्तियन फौजेचा पराभव करून आपला कबजा सोडला नाहीं.

तुर्कस्थानच्या राजास मुसलमान लोक रूमशामचा बादशाह म्हणतात. त्याचें कारण जुने रूमचे राजाचें ठिकाण इस्तंबूल तेही त्याजकडे आहे व शाममुलुखही त्याजकडे आहे.

वेळोवेळी इस्रायल लोक हिंदुस्थानांत येऊन राहिले व हल्ली इंग्रजी राज्यांत धर्माची मोकळीक सर्वांस आहे, याजमुळे कोणाचा कोणास जुलूम नाहीं. म्हणून इस्रायल लोकही हल्ली सुखरूप आहेत. व दिवसेंदिवस यांचे ऊर्जित होत चालले आहे. या लोकांचे महत्व गेल्यास युगें लोटली याजमुळें यांस राज्यकारणी अभिमान मुळीच राहीला नाही. हे लोक गरीब साळसूद असोन धंद्यात, उद्योगांत निमग्न असतात असा यांचा इतिहास आहे.

## १३२ शीक लोकांविषयी माहिती

हिंदुस्थानांत बेबर बादशाह राज्य करीत होता तेव्हां म्हणजे सन १५२५ इसवींत एक क्षत्रिय जातीचा दाणेकऱ्याचा मुलगा नानक या नांवाचा होता. त्यानें पंजाब प्रांतीं चोहों ठिकाणीं फिरून

आपण मोठे साधु व धर्मशील आहों, अशी प्रसिद्धी केली. पुढें सय्यद हसन दर्वेष म्हणून एक फकीर होता. त्याचा उपदेश घेऊन तो मक्केस व मदीनेस जाऊन परत आला. नंतर हिंदु व मुसलमान यांमध्यें जो विपरीत भाव आहे तो सर्व मिथ्या आहे, ईश्वर एक आहे, जातीधर्म नाहीं, मूर्ती वगैरे करूं नये, असें यानें लोकांस शिकवून त्या मताचा पंजाबी भाषेंत एक ग्रंथ रचला. त्यास 'आदिग्रंथ' म्हणतात. पुढें या मतांत शेंकडों मुसलमान व हिंदु आले. परंतु त्याकाळीं या नानकाचे शिष्यमंडळीची राज्य संपादन करण्याची इच्छा नव्हती. भजनाचा हा एक बरा मार्ग आहे. असें म्हणून कितीएकांनीं तो स्वीकारिला. हिंदूंपैकीं शीक झाले आहेत ते आपल्या जाती कायम ठेवून वागतात. व ब्राह्मणाचे हातून कर्मे करवितात. आणि जे मुसलमान शीक झाले ते मुसलमाना-प्रमाणें वागतात आणि नानकास गुरु असें मात्र समजतात. याप्रमाणें हें मत प्रथम चालू झालें.

नानकाचे पाठीमागें आगडशाहा यानें धर्मप्रसिद्धी केली. त्यानंतर अमरदास रामदास व त्याचा पुत्र अर्जुनमल्ल हे झाले. पैकीं अर्जुनमल्ल यानें नानकाचा ग्रंथ सुधारून मोठा केला. पुढे हरगोविंद झाला. तेव्हा त्यानें आपली शिष्यशाखा बरीच वाढविली आहे, असे पाहून त्या वेळीं सर्व पंजाब प्रांत मुसलमानांचे अंमलांत होता, व त्याची वहिवाट करण्याकरितां दिल्लीहून सुभा येत असे, तो लाहोरास राहून अंमल करीत असे. त्याशीं कलह लाविला. व आपले शिष्यांस हत्यारें धरण्यास सांगितलें. पुढें त्याचे मुलगे हरीराय व हरकिसन झाले. त्यानंतर तेगी बाहादर झाला. तो अलमगीर बादशाहाचे हुकुमानें ठार मारला गेला. पुढें त्याचा मुलगा गुरुगोविंद झाला. त्यानें आदिग्रंथ आणखी सुधारला, व मुसलमानांशीं लढाया केल्या, त्याचा शिष्य बंदागुरु या नांवाचा झाला. त्यानें तर मुसलमानांशी फारच वैर केलें व त्यांचा फार संहार केला. स्त्री किंवा अज्ञान यास देखील वगळिलें नाहीं. याजमुळें तेव्हांपासून मुसलमानांचें व शीकांचें अतिशय वैर पडलें, आणि दिवसेंदिवस मुसलमानांचे राज्य निर्बळ होत चाललें. ही शीक लोकांस चांगली संधी सापडली. त्यांणीं लागलीच आपल्यांतील कांही सरदार निवडून त्याचे हाताखालीं पृथक् पृथक् टोळ्या देऊन एकदम गर्दी केली. व मुसलमानांचा अंमल उठवून दिला. पुढें त्या सरदारांस चातशिंग व माहादशिंग म्हणून दोन पुरुष होते. त्यांनीं आणखीही कितीएक मुलुख हस्तगत केले नंतर सन १७९२ इसवींत माहादशिंग मरण पावला. याचा मुलगा रणजितशिंग हा सरदार झाला. व त्यानें सर्व राज्यास आळा घातला. यास 'पंजाबचा सिंह' असें म्हणतात. यानें सरदारांमध्यें श्रेष्ठता मिळवून काबूलवाले, नेपाळवाले व मराठे इत्यादि लोकांसीं तहनामें करून आपलें काम सुयंत्र चालविलें. व पहिल्यापेक्षां राज्यही फार वाढविलें. याजवळ १,१०,००० फौज होती. तींत ७०,००० कवाइतीची व ४०,००० फिरकोळी असे. शिवाय ३७० तोफा व ३७० गरनाळा असत. सन १८०५ सालीं यशवंतराव होळकराचे पाठीमागें लाटलीक साहेब लागले, तेव्हां तो अमृतसर येथें पळून जाऊन रणजितशिंगाची मदत मागत होता. परंतु इंग्रज सरकार जबरदस्त आहे, त्याचे कामांत आपण पडूं नये, हें बरें, असें रणजितशिंगानें मनांत आणून होळकराशीं तहनामा करविला. तीच इंग्रज सरकारची व शिकांची पहिली गाठ होय. पुढें बोनापार्ट फौज घेऊन हिंदुस्थानावर येणार अशी मसलत होऊं लागली. तेव्हां इंग्रज सरकारानें कलकत्त्याहून मेटकाफ साहेब रणजित-शिंगाकडे वकिलीस पाठवून त्यास असें सांगितलें कीं, 'समयास आह्मांकडे लक्ष ठेवून असावें. परंतु त्याचे रुकाराची वानवा दृष्टीस पडली. म्हणून करनेल अक्टरलोनी साहेब फौज घेऊन अमृतसरावर गेले. त्यांचें त्यांचें थोडें युद्ध झालें. त्यांत रणजितशिंगाची खात्री झाली कीं इंग्रजी कवायतीपुढें आपले फौजेचा उपाय चालणार नाहीं. तेव्हां त्यानें ता. २५ एप्रिल १८०९ इसवी रोजीं तह करून तंटा चुकविला. त्यानंतर सन १८३५ सालीं दुसरा तहनामा झाला. पुढें काबुल-कंदाहारचे मसलतीचे पूर्वी सन १८३८ त आणखी एक तहनामा झाला. व लार्ड आकलंड गव्हरनर जनरल हे रणजितशिंगाचे भेटीस गेले. मोठे समारंभानें दरबार होऊन त्यांच्या भेटी झाल्या,

व कवायती झाल्या. रणजितशिंग यानें सन १८२२ सालीं बोनापार्टीची फौज फुटली तेव्हां तींतील कितीएक फरांसीस सरदार बोलावून त्यांजकडून आपली फौज कवायतींत तयार करविली. तेव्हां जनरल कार्ट, जनरल वेंचुरा, करनेल फोर्ड इत्यादि युरोपियन सरदार त्याचे पदरीं बहुत होते. व त्यांस यानें जहागिरी व इलाखे मोडून दिले होते. युरोपियन लोकांचा पराक्रम, युक्ति, व कसब हीं यास फार आवडत असत. त्यांचा संग्रह तो फार करीत असे. युरोपियन डाक्टर व कारागीर याजवळ बरेच होते. पुढें सन १८४० सालीं हा मरण पावला. तेव्हां याजबरोबर याच्या ४ राण्या व ७ कलावंतिणी अशा ११ स्त्रिया सती गेल्या. नंतर याचा प्रधान ध्यानशिंग ह्मणून होता त्यानें खडकशिंग यास गादीवर बसविलें. रणजितशिंगाचे मरणकाळीं त्याचे खजिन्यांत ८ कोटी रुपये शिल्लक होते. इतकें द्रव्य विपुल व फौज मोठी आणि त्यांची व्यवस्था लावण्याचें कोणास सामर्थ्य नाहीं. ज्या राण्या राहिल्या होत्या त्यांस आपला आपला मुलगा गादीवर बसावा अशी इच्छा झाली. त्यामुळे त्यांनीं राज्य बुडविण्यास आरंभ केला.

हिंदुस्थानांत जे जे राजे पराक्रमी झाले त्यांनीं मोठे मोठे पराक्रमाने राज्ये मिळविलीं. परंतु त्यांस कायदा, ठराव किंवा लोकांत शहाणपण नसल्यामुळे त्यांचे मागे अशीच दुर्दशा होऊन तीं राज्यें बुडालीं. यास उदाहरणें पुष्कळ मिळतील. यशवंतराव होळकर मेल्यावर माळव्यांत अशीच स्थिति झाली. एकमेकांस मारून सर्व मरून गेले. महादजी शिंदे मेल्यावर त्याचे दौलतीची अशीच स्थिति झाली. सवाई माधवराव मेल्यावर असेंच झालें. हैदर नाईक मेल्यावर त्याचे राज्याची हीच अवस्था झाली. याप्रमाणें एकंदर हिंदु व मुसलमान राज्यांचा हा इतिहास एकसारखाच आहे. आपसांतील कलह होऊन एकमेकांचे गळे कापून सर्वांनीं मरून दौलतीचा नाश करावा. हीच रीति आहे. अस्तु.

खडकशिंग यास चेतशिंग यानें मारिलें व त्याचा मुलगा नवन्याहलशिंग राज्यावर बसविला. त्यानंतर शेरशिंग राजा झाला. त्यानें ध्यानशिंगास मारिलें. नंतर अजितशिंगानें शेरशिंग राजास १८४४ सालीं मारिलें, व राजकुळांतील पोरें बाळें मारून टाकिलीं. नंतर त्या अजितशिंगास हिराशिंग यानें मारिलें. व त्यास सुचितशिंग यानें हाकून लाविलें. त्या गडबडींत सर्व फौज बिथरून गेली. शिपाई व सरदार कोणी कोणाचें ऐकेना. एकानें एकास गादीवर बसविलें तर दुसऱ्याने त्यास हाकून द्यावें. याप्रमाणें जुने फरांसीस सरदारांशी द्वेष करून त्यांस हाकून दिलें. नंतर चंदाराणीनें आपला मुलगा दिलीपशिंग ८ वर्षांचा होता, त्यास गादीवर बसविलें. आणि आपले मर्जीतील सरदार लालशिंग व तेजाशिंग यांस कारभार सांगितला. तेव्हां त्यांजवर पेशोराशिंग व काशमीरशिंग हे उठले. शेवटीं असें झालेंकीं कोणासही चैन नाहीं, व कोण जिवंत राहील याचा नेम नाहीं. तेव्हां राणी व तेजाशिंग सेनापति यांनीं मिळून अशी मसलत केली कीं, 'इंग्रज सरकाराशीं कलह काढावा म्हणजे ते सर्व कारभार घेतील, आणि आपण या फौजेचे हातून सुटूं' याप्रमाणें गुप्त ठराव करून सर्व फौजेस सांगितलें की, 'इंग्रजांनी आपले मुलखांतील कितीएक भाग जबरदस्तीनें घेतला आहे, सबब त्यांशीं लढाई करावयाची.' तेव्हां ते सर्व सरदार एकवट होऊन इंग्रजांचे हद्दींत लढाईस आले. पण त्या सुमारास इंग्रज सरकारची तयारी पक्की नव्हती. सबब एकदोन लढायांत इंग्रजी फौजेचा पराभव झाला. तरी शेवटीं इंग्रजांची सरसी झाली, व शीक सरदार फौज सोडून पळून गेले. मुडकी, फिरोजपूर, आलीवालर, सोब्रान या चार ठिकाणीं लढाया झाल्या. शेवटील लढाई ता. १० फेब्रुवारी सन १८४६ रोजीं झाली. नंतर सर्व मुलुख इंग्रज सरकारचे ताब्यांत आला. तेव्हां त्यांनी शिकांची सर्व फौज बरतर्फ करावी असा ठराव केला. व सर हेनरी लॉरेन्स यांस रेसिडेंट नेमिलें. आणि यांचे मदतीस लालशिंग वजीर नेमिले. पुढें चंदाराणीनें कांहीं फितुराची मसलत केली सबब तिला कैद केलें. व तिचे मसलती गंगाराम व जनरल खानशिंग यांस फांशीं दिलें. आणि लालशिंग यासही कैद केलें. पुढें सर हेनरी विलायतेस गेल्यावर फ्रेडरिक

लारी साहेब कारभारी झाले. त्यांनीं कपतान आन्यु व अंडरसन यांस मुलतानास हिशेब घेण्याकरितां पाठविलें होतें. त्यांस मूळराज यानें ठार मारिलें. व त्या कामांत राणीचें अंग होते, म्हणून तिला तेथून काढून इंग्रजी अंमलात पोंचविली. पण ती तेथून पळून नेपाळांत गेली. पुढें मूळराजानें लढाईची सिद्धता केली. तेव्हा चार मोठ्या लढाया रामनगर, चिलियनवाला, मुलतान व गुजराथ या ठिकाणीं झाल्या व शेवटची लढाई तारीख १ मे १८४९ रोजीं होऊन मूळराज कैद झाला व दिलीपशिंगास कैद करून कलकत्त्यास पाठविलें आणि सर्व राज्य जप्त करून लॉर्ड डलहौसी गवरनर जनरल यांनीं कमिशनरी केली. आणि रणजितशिंगाची फौज खालसा व फरांसीस मिळून होती तिला निरोप दिला. याप्रमाणें शिकांचें राज्य संपले व पुढें सर जॉन लॅरेन्स व त्यांचें बंधु यांचे राज्य झाले.

शिकांत अकाली शीक म्हणून एक जात आहे तींतील लोक मोठे खराब आहेत. त्यांचे शरीरावर नखशिखांत हत्यारें असतात, व शिवाय पागोट्यांत चक्रे असतात. त्या चक्रांचा मार मोठा चमत्कारिक आहे. हें चक्र अंगठीसारखे असून त्यास धार असते. व शेवटावर गरगर फिरवून मारतात.

वागुरू हें शिकांचें नमन आहे. हे लोक मद्य फार पितात, व अफूही फार खातात. यांची वाटणी भाईबंदींवर किंवा चुडाबंदीवर होते. भाईबंदी म्हणजे जितके भाऊ तितक्यांस सारखी वाटणी व चुडाबंदी म्हणजे आईवर वाटणी. मग तिला कितीही मुलगे असोत. शीक लोक मोठे शूर आहेत, व हल्लीं चिनांत वगैरे त्यांचीं पलटणें इंग्रज सरकारनें पाठविलीं आहेत. जसे लखनौचे पुरभय्ये शिपाई तसेच शीक लोक बळकट व शूर आहेत. गोहत्येचे ते मोठें पातक समजतात. दाढी व डोकी दोन्ही ठेवितात. हिंदु व मुसलमान कोणीही आपले जातींत आला तर त्यास घेतात. मूळ धर्म स्थापण करणाऱ्याचा हेतु असा होता कीं, धर्मसंबंधी बांकडीं मोडावी. परंतु तीं कायम आहेत, इतकेच नाहीं, तर पहिल्यापेक्षां अधिक वाढत गेलीं आहेत. अस्तु. याप्रमाणें शीक लोकांविषयीं माहिती आहे.

---

# कितीएक चाली, रीति

## १३३ बाहेरवटे

या देशांत कितीएक लोकांमध्यें आग्रह करून दुसऱ्यांस वश करण्याच्या चाली होत्या. रजपूत लोकांत बाहेरवटे म्हणून होतात. म्हणजे, कोणास राजाचा जुलूम किंवा अन्याय झाला असें वाटूं लागलें म्हणजे, ज्यास तो जुलूम लागू होतो तो मनुष्य घर सोडून रानांत जाऊन अनेक प्रकारचे दंगे करितो, वाटा मारितो, व गांव लुटितो. असा दहा दहा वर्षे त्याचा उपद्रव चालतो. राजाच्या फौजा त्याजवर जातात; तरी तो सांपडत नाहीं. दक्षिणेंत रामोशी लोक याच प्रकारचे दंगे करितात. याप्रमाणें उमाजी नाईक १८२८ सालीं झाला, व राघोजी भांगऱ्या वगैरे याचप्रकारचे दंगे करून गेले. गुजराथेंतही ब्राह्मण व भाट हे झासा व त्रागा करितात; म्हणजे, खून करूं, लुटूं, अशा प्रकारची पत्रें लिहून झाडांस बांधितात; दुसऱ्याचे घरी जाऊन आपलाच गळा कापितात; किंवा आपल्या घरचें एखादें पोरबाळ नेऊन मारतात आणि त्याचें डोकें कापून त्याचें तोरण ज्याजवर त्रागा केला त्याचे घरास बांधितात; व जरी ते ती हत्या करितात, तरी 'ही हत्या तुझ्या वर आहे' असें त्यास म्हणतात. सन १८६० सालीं खंडेराव गाइकवाडांनीं पैमाष करण्याचा हुकूम केला, तेव्हां सर्व भाट वगैरे जमून 'पैमाष करू नये' म्हणून म्हणाले, आणि कितीएक तर

कडोस आपले अंगावर तेल ओतून उभे जळाले! तेव्हां अशा त्रागा करणाऱ्यांस धरून खंडेरावांनीं त्यांचें पारिपत्य केलें. तरी लोकांमध्यें त्यांचें भय फार आहे. व म्हणून अद्यापिही जामीन घेणें तर भाटास घेतात अशी पूर्वापर रीत चालू आहे. कर्नाटकांत काटक लोक आहेत, त्यांस कांहीं पीडा झाली किंवा पीडा नसूनही त्यांस ती पीडा अशी वाटली तर ते तळई करितात. म्हणजे ज्यांजकडून पीडा होते असें त्यांस वाटतें त्याचीं गुरें चोरतात, त्याचीं खळी व घरें जाळतात आणि शेतें कापतात, अशी कर्नाटकची रीत आहे. याचप्रमाणें आपले इकडे बाजारकरी वाणी यांस कांहीं विरुद्ध वाटलें म्हणजे ते हरताळ पाडतात; रयतेस वाईट वाटलें म्हणजे ती फरारी होते व गांव सोडून देते. अशा अनेक प्रकारच्या चाली या देशांत पूर्वी होत्या, परंतु त्या हल्ली इंग्रज सरकारचे राज्यांत वर्ज झाल्या व पूर्वीप्रमाणें पीडाही कमी झाल्या. तसेंच सरकार बलवान आहे याजकरितां लोकांचाही आग्रह चालत नाहीं. तरी खानदेशांत जेव्हां पैमाषी झाली तेव्हां लोक आडवे झाले व त्यावेळीं फौज पाठवून त्यांचा बंदोबस्त करावा लागला. अशीं उदाहरणें कधीं कधीं घडतात. अशा लोकांस यूरोपांत 'औटलॉ' म्हणतात. अशाच, जशा इकडे डाकिनी मानितात तशा तिकडे 'वीच' मानितात व त्यांस पूर्वी मारीत असत परंतु आतां ती चाल ज्ञानवृद्धीने बंद होत आहे.

## १३४ त्रागा व झासा

गुजराथ, मारवाड व राजपुताना या प्रांतीं भाट लोकांची फार वस्ती असून ते विश्वासूक आहेत अशीही त्यांची प्रसिद्धि आहे. त्या भाटांत कितीएक कवि असून त्यांचा धंदा लोकांच्या वंशावळी लिहून बाळगाव्या आणि त्यांची चरित्रें लिहावीं. त्याजबद्दल ते श्रीमान् लोकांपासून वर्षासनें घेतात व लग्नमुंजींत वगैरे हक्क ठेवतात. यावरून इतिहास लिहिण्याकरितां ही जाति उत्पन्न केली आहे असें दिसतें. या लोकांचा क्षत्रियांशीं फार संबंध असतो; कारण कीं, त्यांचीं चरित्रेंही लिहिण्यासारखी असतात. पूर्वीचे सूतपुराणिक व संजय हे याच भाट ज्ञातीचे होते. हे लोक दुसऱ्यास जामीन होतात व कांहीं जुलमी कायदा झाला तर आडवे पडतात. तसेंच त्यांज-वर कोणीं जुलूम केला तर त्रागा व झासा करितात. त्रागा म्हणजे आपले घरचा माणूस मारून त्याचें डोकें कापून सरकारचे कचेरींत किंवा शत्रूचे घरीं टाकतात. यासच त्रागा म्हणतात. आणि झासा म्हणजे अमक्याचे घर जाळूं किंवा अमक्यास मारूं असा कागद लिहून झाडास बांधतात आणि भय दाखवितात. या विलक्षण चाली पूर्वीच्या अंदाधुंद कारकीर्दीत पडल्या, परंतु त्या इंग्रजींत बहुतेक मोडल्या!

## १३५ निरनिराळचा लोकांच्या रामराम नमस्कार वगैरे करण्याच्या रीति

वाण्यांनीं वैष्णव धर्म घेतल्यापासून ते 'जय गोपाळ' म्हणतात; वैरागी 'जय सीताराम' म्हणतात; शीक लोक 'वागुरू' म्हणतात; स्वामीनारायणाचे पंथांतील सत्संगी लोक 'जय स्वामी नारायण' असें म्हणतात; कबीरपंथी जे आहेत ते 'सत्साहेब' म्हणतात; गोसावी व संन्याशी हे 'नमो नारायण' म्हणतात; ब्राह्मण हे ब्राह्मणांस 'नमस्कार' म्हणतात, व ब्राह्मणांखेरीज लोकांस 'आशीर्वाद' म्हणतात, आणि वैष्णव हे 'जय श्रीकृष्ण' असें म्हणतात. पूर्वी मराठे लोकांत 'जोहार (जयहर)' व 'दंडवत' म्हणण्याची चाल होती, परंतु रामदासस्वामींनीं शिवाजीस सांगितलें कीं, 'तूं रामराम म्हणत जा.' तेव्हांपासून मराठ्यांनीं 'रामराम' करण्याची चाल पाडिली व ती तशीच पुढें चालली आहे. महाराष्ट्र देशांत महार लोक मात्र 'जोहार' असें म्हणतात; परंतु इतर देशांत श्रावक वाणी वगैरे अद्यापही 'जोहार' असेंच कागदोपत्रीं लिहितात. मुसलमान लोक 'कुरनिसात', 'बंदगी', 'सलाम' असे शब्द म्हणतात. ते आपसांत, एक 'सलाम अलेकुम' व दुसरा 'अलेकुम सलाम' म्हणतो. आणि हिंदुस्थानांत शूद्र वगैरे लोक 'पावलगी' असें म्हणतात.

## १३६ मुद्रा

वैष्णव लोकांत मुद्रा घेण्याची चाल बहुत ठिकाणीं आहे, आणि त्या ज्याचे अंगावर नाहींत त्यास लोक ओंवळा व अशुचि (अपवित्र) असें समजतात. मध्व सांप्रदायांत त्यांचे स्वामी मुद्रा देतात व त्या मुद्रा स्त्रिया, पुरुष व मुलेंही घेऊन त्यांवर त्यांस दक्षिणा म्हणून कर देतात. याप्रमाणेंच ठिकठिकाणीं भोळे यात्रेकरू मुद्रा घेतात. अयोध्येंत, मथुरेंत, जनकपुरास, धरणीधर, तुळशीशाम अणि डाकोर वगैरे ठिकाणीं कोठें किरीट, कोठें धनुष्य बाण, कोठें शंखचक्र आणि कोठें सुदर्शन अशा प्रकारच्या मुद्रा देण्याची रीति आहे.

## १३७ बोध करण्याच्या रीति

पूर्वी मनुष्यास बोध करण्याच्या हिंदुलोकांच्या रीति अनेक होत्याः-- ते प्रश्नोत्तरानें बोध करीत, कल्पित गोष्ट सांगून बोध करीत, उदाहरणानें बोध करीत, शंका घेऊन समाधानें लिहीत, अथवा आज्ञा लिहून बोध करीत. ह्याविषयीं शांतिपर्व, गीता वगैरे भारतांत आहेत, हेंच पहिल्या रीतीचें उदाहरण आहे; पंचतंत्र हें दुसऱ्या रीतीचें उदाहरण होय; इतिहास हें तिसऱ्या रीतीचें उदाहरण आहे; षड्दर्शनें चौथ्या रीतीचें उदाहरण आहे व स्मृति हें पांचव्या रीतीचें उदाहरण होय.

## १३८ धर्मापासून अनर्थ

धर्माचे नांवावर या पृथ्वींत ज्या धांदली, दुष्ट व्यवहार आणि मूर्खपणाचे आचारविचार झाले आहेत, होत आहेत आणि होतील त्यांची गणती करणें म्हणजे अपरिमित आहे! सहगमनविधि व सुंतासंस्कार किती झाले? विधवांचीं वपनें किती झाली? झाडांची लग्नें किती लागलीं? धर्म-युद्धें किती झालीं? निर्दयपणा किती झाला? लुटी व खून किती झाले? उपद्रव व द्वेष किती झाले? परकीयपणा किती उत्पन्न झाला? अभिमान किती वाढला? आत्महत्या करून किती मेले? किती जणांनीं देह कर्वतून घेतले? जळसमाधी व जीवंत समाधी कितीकांनी घेतल्या? कड्यां-वरून कितीजणांनीं उड्या टाकल्या? लहानपणीं लग्ने झाल्यामुळें क्षयरोगी व व्याधिग्रस्त होऊन किती मनुष्यें मेली? जगन्नाथाचे रथाखाली किती मेलीं? त्याचप्रमाणें गंगेचे घाटावर अन्नपाणी टाकून किती मेलीं? आणि धर्माभिमानानें अग्नींत किती होमलीं? सारांश, हीं धर्माची बंडें वाढलीं म्हणजे कांहीं केल्या आटोपत नाहींत!

## १३९ वाईट चाली

हिंदू लोकांत अनेक घातकी, निरुपयोगी व अनर्थकाकारक चाली आहेत त्यां योगानें ते मरून चित होऊन गेले आहेत! या चालींपैकीं नवरमुलाचे व मुलीचे घटित पाहण्याची चाल आहे. या घटितानें मोठे राजास चांगली कन्या मिळत नाहीं. एखाद्या मूर्ख जोशीबोवांनीं अक मोजून सांगितले कीं, 'या मुलीचे खडाष्टक येते किंवा या मुलीचा गण मिळत नाहीं आणि ती गोष्ट राणी व राजे यांजकडे कळविली म्हणजे तीं अज्ञानी माणसें या अज्ञान ज्योतिषीबोवांचे फांशात सांपडून आपले कामास मूर्खपणानें विघ्नें करून घेतात; आणि चांगल्या कन्या टाकून वाईट कन्या करितात. तसेंच, येण्याजाण्यास मुहूर्त पाहून चांगली वेळा जोशीबोवा सांगतील त्याप्रमाणे जाण्याचा विचार होतो, याजमुळे फार विघ्नें उत्पन्न होतात. हिंदूलोकांनीं आपले अज्ञानानें अनेक फसवणुकांमध्यें पडून जी आपली धूळ करून घेतली त्यांतील हे एक उदाहरण आहे. याविषयीं लोकांनीं सावध व्हावे. याचप्रमाणें विनाकारण कार्यांत खर्च करण्याची चाल आहे तीही बहुत अहितप्रद आहे. परंतु हे आमचे लोकांस कळावे कधी?

## १४० अल्प वयांत लग्न

अल्प वयांत लग्न करण्याची वहिवाट सुरू झाली त्या दिवसापासून या देशात क्षयरोग लागला असें म्हटले तरी चिंता नाहीं. सर्व वीर्य, बल व पराक्रम जाऊन हल्लीं आहेत या प्रकारचे अनेक

भ्रांतींनीं बद्ध असे हे लोक होऊन बसले. हजारों श्रृंखला यांचे पायांत पडल्या आहेत व तेणें-करून महारोगग्रस्त मनुष्याची स्थिति होते त्याप्रमाणे या हिंदू लोकांची स्थिति सर्व जगतांतील राष्ट्रांशी तोलून पाहिली तर महारोग्यासारखी सर्व अंगे झडून अशक्तता आलेली अशी दिसते!

## १४१ हिंसा व बळी

काशींत दुर्गादेवीचे देवळांत व गयेस मंगळाईचे देवळांत जनावरें फार मारितात. त्याचप्रमाणें काशीजवळ विंध्यामाता, कलकत्त्यास काळिका व हिंगळाज माता इत्यादि ठिकाणी हिंसा फार असून या हिंसेचे भक्षक गौडब्राह्मण आहेत. दक्षिणी व कर्नाटकी ब्राह्मण यज्ञांत मात्र मांस भक्षण करितात, परंतु पंचगौडांत नित्यांतच बळीचें भक्षण करण्याची चाल आहे!

## १४२ स्त्रिया

या भरतखंडाचे पंडितांनीं स्त्रियांची जशी निंदा केली आहे अथवा त्यांजविषयीं जितकी असन्मानबुद्धि प्रकाशित केली आहे, अशी कोणतेही देशांतील पंडितांनीं केली नाही. कोणी म्हणतात त्यांस भूक फार, कोणी म्हणतात त्यांस काम फार, कोणी म्हणतात स्त्रिया प्रत्यक्ष राक्षसी, कोणी म्हणतात? स्त्रियांचे बुद्धीनें नाश होतो कोणी म्हणतात त्या कपटी असून त्यांचे चरित्र कोणा-सही समजावयाचें नाहीं, कोणी म्हणतात त्यांचे लग्न अगदीं लहानपणीं करावें व तें न केल्यास बापास फार पाप लागते, कोणी म्हणतात त्यांणीं मात्र पातिव्रत्यानें असावें परंतु पुरुषास अनीतीची वगैरे कांहीं चिंता नाहीं व कोणी म्हणतात स्त्रियांनीं एकवेळ मात्र लग्न करावें व पुरुषानें पाहिजे तितके वेळां करावें! बायको लंगडी किंवा अंधळी झाली तर मग पुरुषास तिला टाकून देऊन दुसरी करण्याची सनद मिळते, परंतु पुरुष रक्तपित्या जरी झाला तरी तिणें त्यास टाकूं नये! नवरा मेला तर स्त्रीनें संन्यासव्रतानें जन्मभर रहावें आणि तिकडे तर नवऱ्यानें बायकोचें सुतक फिटतांच लग्न करावें; इतकेंच नाहीं, तर त्याणें पाहिजे असल्यास तिच्या समक्ष तिला दोन चार सवती कराव्या! मुलीनें वरास शोधून काढावा परंतु वराचे पक्षानें पाहिजे ती दांडगाई करावी. अशी त्यास मुभा असून कन्येच्या पक्षानें खालीं मान घालून बसावें! पुरुषानें ऐशीं वर्षेपर्यंत लग्न करावें परंतु दुर्दैवानें मुलगी आठव्या वर्षीच विधवा झाली तरी तिणं पुनर्लग्न करू नये! यावरून हा सर्व अन्याय, निर्दयता व नीचपणा दिसतो.

## १४३ मुली मारून टाकण्याची रीति

कच्छ देशचे झाडीजे रजपूत बैसवड्याचे क्षत्रिय या लोकांमध्ये मुली जन्मास आल्या म्हणजे मारून टाकण्याची अतिशय क्रूर चाल होती. याचें कारण तें असें समजत कीं, लग्नास खर्च फार येईल व वरपक्षाकडे उन्मत्तपणा फार होईल. ह्या कन्या मारणें म्हणजें सुरी, चाकू किंवा खिळा यांनी भोंसकून न मारतां एका भांड्यांत पुष्कळ दूध ठेवून त्यांत त्या बाळाला बुडवून मारीत! या प्रयोगास दूधपिती म्हणतात. परंतु इंग्रज सरकारनें याविषयी बंदोबस्त करण्याकरितां एक सुपरिन्टेडेन्ट नेमून त्याने गर्भार बायकांची नांवें लिहून घ्यावीं व त्या प्रसूत झाल्यावर तपास करून गुन्हा शाबित झाल्यास शिक्षा करावी असा बंदोबस्त केला. तसेंच याजबद्दल ग्रंथ लिहून अशी बालहत्या करणें हें पाप आहे असें लोकांचे मनांत भरवून दिलें. आणि तेणेंकरून ही चाल बंद झाली. या संबंधाचा प्रथम ग्रंथ सरकारच्या जाहिरातीवरून १८४७ सालीं डा. भाऊ दाजी यांनी केला व त्याबद्दल त्यांस बक्षीस मिळालें होतें. नंतर त्या ग्रंथाच्या प्रती सरकारानें त्या लोकांस वांटल्या. तरी अशा दुष्ट चाली केवळ ग्रंथांनींच बंद होणाऱ्या नसून त्याबद्दल राजबलानेंच विशेष बंदोबस्त होतो.

## १४४ सती

सती जाण्याचा प्रकार हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं मानिला होता. कितीएक ठिकाणीं राजवाड्यांत तर अशी चाल होती कीं, राजा किंवा ठाकूर मेले म्हणजे मोठी गर्ता (खांच) खणून त्यांत अग्नि पेटवून त्यांस जाळीत. नंतर चिता पंधरा दिवसपर्यंत तशीच पेटलेली असे व त्यांत वरचेवर लांकडे टाकींत. तेव्हां त्या चितेजवळ त्यांचे पदरचा भाट जाऊन ढोंग करून, 'महाराज माझे अंगी आले आहेत' असें म्हणें; आणि मग 'महाराज स्वर्गास बसले आहेत त्यांनीं फलाण्या मनुष्याची याद केली आहे', असें सांगे. म्हणजे लागलीच त्या मनुष्याने येऊन त्या खाईत उडी टाकावी. असा समारंभ पंधरा दिवस नित्य होऊन त्या वेळांत त्याप्रमाणें नावें घेतलेलीं दहा वीस मनुष्यें त्या खाईत जळून पडत! मेलेले मनुष्यांच्या मुलाबाळांचे परिपोषण दरबाराकडून चालवीत, परंतु हा अनर्थ फार माजला होता. त्या मृतराजाच्या किंवा ठाकुराच्या बायका, दासी, चोपदार व भाट हे सर्व याप्रमाणें सती जात! ही चाल इंग्रजांनीं मोडण्याकरितां बहुत प्रयत्न केला. तरी कित्येक प्रसंगी लोकांचा याजबद्दल फार दुराग्रह पाहून कितीएक ठिकाणीं सती जाणाऱ्या बायांस, त्यांस आज्ञा व उत्साह देणाऱ्या भटांस व त्या समयीं तेथें असणाऱ्या लोकांस काळेपाण्यावरही पाठविलें. त्याचप्रमाणें याविषयीं राजांस ताकिदी देऊन त्यांचे लेख करून घेतले कीं, 'आमचे मुलखांत सती जाणार नाहीं.' मराठे राजे, क्षत्रिय राजे, व असेच इतर सर्व जातींचे राजे यांजकडूनही असे लेख घेतले. परंतु त्यांत साताराचे बुवासाहेब महाराज यांनी इंग्रज सरकारचे विरुद्ध दुराग्रहानें कितीएक वर्षेपर्यंत हीं गोष्ट कबूल केली नाहीं. तेव्हां शेवटी ते पदच्युत झाल्यावर १८४० सालीं त्यांचे बंधु अप्पासाहेब यांनीं इंग्रज सरकारच्या म्हणण्याप्रमाणें हा करार करून लिहून दिला.

## १४५ दासी व दास

या हिंदुस्थानांत दासी व दास करण्याचा प्रकार फार चालला होता. दानखंडांत दासीदान लिहिलें आहे. हे दास व दासी काळांत व लढाईत विकत घेत. याप्रमाणें पुण्यात बहुतेक गृहस्थांच्या घरीं लेकवळे, कुळंबिणी व गुलाम असत. असाच सर्व देशभर हा प्रकार होता. दासींचे लग्न होत नसे व त्यामुळें त्यांचे व्यभिचारापासून झालेले संततीस शिंदे, पोर्गे असें म्हणण्याची रूढी पडली आहे. पुण्यांत तर एके रस्त्यास शिंदे आळी असेंच नांव आहे व त्यांत त्यांचीच वस्ती असे. शिवाय कसबिणी, पोरी वगैरे विकत घेत व त्यांशी मोठमोठे लोकांमध्ये जे सोदे लुच्चे निघत ते मिशी (लग्न) लावीत; असे अनेक प्रकारचे दुराचार चालत होते, ते इंग्रज सरकारनें बंद केले. गुलामगिरी बंद करण्याचा कायदा केला व इतर राजे रजवाडे यांजपासूनही त्याप्रमाणें कौल कसर लिहून घेतले, त्यामुळें ह्या वेड्या चालींना सर्व बंदोबस्त झाला.

## १४६ मरीया

गोंडवण प्रांतांत अशीं चाल होती कीं, एक मुलगी मारून तिचा होम करावा. त्यास मरीया म्हणतात. तेथील लोकांची अशीं समजूत असे कीं, याप्रमाणें केलें असतां गांवचीं शेतें चांगलें पीक देतात. व याकरितां सर्व गांवकरी आपले गांवांतील कोणाजवळ तरी मुलगी मागत. मग ती देण्यास तो मोठ्या हौसेनें कबूल होई. कारण, सर्व गांवचें काम, आपली मुलगी दिल्यानें सर्व गांवची आबादीं होते, त्या अर्थी एवढ्या महत्कार्यास आपण ना म्हणूं नये, अशी लोकांची समज होती. परंतु हीही चाल इंग्रज सरकारांनीं अगदीं बंद केली. यजुर्वेदात नरमेध करण्याविषयीं असेंच तपशीलवार विधान लिहिलें आहे. तें विचक्षण वाचकांस श्रुत असेलच.

## १४७ जुलूम

पूर्वी उंच जातीचे लोकांचा जुलूम नीच जातीचे लोकांवर फार असे : तो आतां नाहींसे होऊन ज्याप्रमाणें वाघ व बकरीं एके ठिकाणीं पाणी पिऊं लागावीं तसेच नीच जातीचे लोक एके ठिकाणीं व सारख्या न्यायानें राहू लागले आहेत. एक वेळ निपाणकर यांच्या घोड्याचे अंगावर मळ दिसला म्हणून त्यांनी खासदारास फटके मारण्याचा हुकूम केला व तो बिचारा त्या मारानें प्राणास मुकला ! कनोजचा एक क्षत्रिय ठाकूर होता, त्याचे आबदारानें विड्यांस अधिक चुना लावल्यामुळें त्याचें तोंडास फोड आले, म्हणून बचकभर चुना आणून तो आबदारा-पुढे तरवार काढून उभा राहिला आणि त्याजकडून तो खावविला; व तेणेंकरून तो मरण पावला! याप्रमाणें पूर्वी अंदाधुंदी होती. जबरदस्तीनें कोणीं कांहीं केलें तरी त्यास कोणी कांही बोलत नसे. झुलू लोकांची वगैरे नीति याप्रमाणेंच आहे. यावरून ज्यांस शास्ता कोणी नाहीं त्यांची स्थिति अशीच असते.

## १४८ हिंदूंच्या गैर चाली

या देशांत पूर्वीपासून ज्या कांही गैर चाली चालत आल्या त्या कांहीं भोळेपणाने, कांहीं अज्ञानानें, कांहीं भयानें व कांहीं पाखंडानें वगैरे अनेक कारणांनीं उत्पन्न झाल्या. उंच जातींत म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांजमध्ये नवरा मेला म्हणजे स्त्रिया सती जात. ही चाल मोठी प्रबळ झाली होती व स्त्रियाही हा मोठा मान समजून अग्नींत उड्या टाकीत ! शाहू महाराजा मेले तेव्हां त्यांजबरोबर एक राणी व एक नाटकशाळा अशा दोन स्त्रिया सती गेल्या व रणजित-सिंग मेला तेव्हां त्याच्याही सात राण्या सती गेल्या. रजपुतान्यांत हे पाखंड तर फारच माजलें होतें. ईडर येथील राणी सती जात असतां मोठी तक्रार पडली होती. पोलिटिकल एजंट याने तिला मनाई केली; परंतु राणीचे भावानें तिला हट्टाने सती जाऊं दिलें. पुढे तो भाऊ बाहेरवट्या (बंडखोर) निघाला. अस्तु. याचप्रमाणे बहुत तक्रारी होऊन नंतर ठिकठिकाणीं इंग्रज सरकारने नेटिव राजांपासून करारनामे घेतले. आणि ही चाल बंद केली. असें आहे तथापि जंग बहादूर यांच्या दोन राण्या कांही वर्षांपूर्वी सती गेल्या ! असा याचा मधून मधून उगम होतो. यांस कांहीं लोभ मान वगैरे अनेक कारणे असतात. म्हणजे, जी राणी सती जाते तिच्या मुलास मोठा मान मिळतो. जो भाट आपल्या धन्याच्या चितेत मरतो त्याचें सरकार चालवितात व त्याचा दावा सरकारवर मजबूत होतो अशा अनेक कारणांनीं पूर्वी लोक मरत होते. दुसरी चाल दासदासी (गुलाम) करण्याची होती. ती इंग्रज सरकारनें कायदे करून व राजांशीं तहांत ठरवून बंद केली. तिसरी चाल आत्महत्त्या करण्याची होती. ती अशी :— एखादी मोठ्या वृक्षाची ढोल पाहून त्यांत बसत आणि सभोंवतीं लांकडांची रास घालून ती पेटवीत. यास गोरांजनमोक्ष म्हणत. किंवा जेथे पाण्यांत डोह असेल तेथे उड्या टाकून जीव देत. त्यास जळसमाधि म्हणतात. त्याचप्रमाणें जिवंतपणी पुरून घेत व त्यास सजीवसमाधि म्हणत. अशा समाधी आज बहुत आढळतात. अहमदाबादेस एक बैरागी भांग खाऊन, 'मला समाधि द्या' असे म्हणत असे; व लोक त्याचे नादीं लागले होते. शेवटीं त्यास कोणीं जिवंतपणींच पुरलें व त्याजवरून सरकारांत काम चाललें होतें परंतु त्याचा पत्ता लागला नाहीं ! चौथी चाल माणसे बळी देण्याची होती व माणूस मारून काळिकादेवीस त्याचें रक्त अर्पण करीत. ही चालही कायद्यानें बंद झाली. आतां रेडेजत्रा, बकऱ्याची जत्रा व बळी हे बहुत ठिकाणीं आहेत ते प्रसिद्ध आहेत. जनावर मारून त्याचें रक्त गांवच्या सीमेंत पाडावे म्हणजे पीक चांगलें येते, ही लोकांची समजूत अद्यापि आहे. गायकवाड वगैरे अद्यापि दसऱ्याचे दिवशीं रेडे मारतात. कितीएक ठिकाणीं तर रेडे बांधून त्यांचे जिवंतपणींच काळीज काढून देवीस अर्पण

करितात, व याप्रमाणें वाईजवळ मौजे खावली येथें दरसाल करीत असतात आणि तें केल्या-वाचून तेथील रयतेस चैन पडत नाहीं. असें मोठें अज्ञान माजलें आहे. डोंगरी व मावळी राजे जेथें असतात तेथें या अज्ञानाची प्रवृत्ति फार असते, कारण तेथें ज्ञानाचे वारे अगदीं नसतें. पांचवी चाल मुलगी झाली म्हणजे मारून टाकावी हो. हो चाल कच्छ व हिंदुस्थानात रजपूत राजे यांनीं फार स्वीकारली होती. परंतु तिजपासूनही इंग्रज सरकारानें त्यास बहुतकरून मुक्त केलें. सहावी चाल प्रयागास माणसास करवतून त्यांने जो संकल्प केला असेल तो सिद्ध होईल अशी समजूत पडली होती. त्याचप्रमाणें जगन्नाथाचे रथाखाली पडून कितीएक चिरडून घेत व शूलपाणि वगैरे ठिकाणीं तर उंच कड्यांवरून नर्मदेत उड्या टाकून मरत ! तसेच कितीएक गळ टोंचून टांगून घेत ! या सर्व पाखंडांचीही बंदी इग्रज सरकारांतूनच झाली. सारांश, या देशांत आज दोन हजार वर्षांपासून जो विचार बंद पडून अनेक पाखंडे उभी राहिलीं होतीं, त्यांची तरी समाप्ति झाली.

---

# उपयुक्त माहिती

## १४९ चार संप्रदाय

पद्मपुराणांतील उत्तरखंडात चार संप्रदायांविषयीं लेख आहे, त्याजवरून ते खंड ते चारी संप्रदाय सुरू झाल्यावर लिहिलें असावें, असें वाटतें. परंतु तें लिहितांना तें संप्रदायचतुष्टय पुढें होईल असे लिहिले आहे :--

संप्रदायविहीना ये मंत्रास्ते निष्फला मताः। अतः कलौ भविष्यंति चत्वारः संप्रदायिनः॥
श्रीमाध्वी रुद्रसनका वैष्णवाः क्षितिपावनाः। चत्वारस्ते कलौ देवीसंप्रदायप्रवर्तकाः॥

## १५० चार धर्म

भीष्मांनीं शांतिपर्वात व अनुशासनपर्वात जे चार धर्म सांगितले आहेत ते दानधर्म, राजधर्म, मोक्षधर्म व आपद्धर्म हे असून हे चारीही फार चांगले आहेत.

## १५१ पंच बदरी

बद्रिकाश्रमाजवळ पंच बदरी व पंच केदार आहेत. त्यांपैकीं पंचबदरी आहेत ते :-- योगबदरी, ध्यानबदरी, आदिबदरी, वृद्धबदरी आणि विषादबदरी.

## १५२ ब्राह्मणांचीं षट्कर्मे

ब्राह्मणांची षट्कर्मे मनूनें लिहिलीं आहेत ती : --

अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा। दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माण्यग्रजन्मनः॥

म्हणजे-दुसऱ्यास पढविणे, आपण पढणे, स्वतः यज्ञ करणें, दुसऱ्याचे घरीं यज्ञ करणें, दान करणें आणि दान घेणें.

## १५३ मुसलमानांचे सात नमाज

मुसलमानांचे धर्माप्रमाणें नित्य सात वेळ नमाज म्हणजे संध्या करावी असें आहे. त्या संध्यांचीं नावे खालीं लिहिल्याप्रमाणे आहेत :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| फजर | म्हणजे | प्रातःकाळ. | ईषा. | म्हणजे | रात्रि. |
| जोहर | ,, | अपराण्ह. | तहजुद | ,, | उत्तररात्र. |
| आसेर | ,, | सायंकाळ | इषराक | ,, | उषःकाळ. |
| मगरीब. | ,, | प्रदोष. | | | |

## १५४ सप्तऋषि

सप्त ऋषि म्हणून जे म्हणतात त्यांचीं व त्यांच्या स्त्रियांचीं नावेः—

| ऋषि | | स्त्रिया | ऋषि | | स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|
| (१) कश्यप. | ... | दिती वगैरे १३. | (५) विश्वामित्र. | ... | माधवी. |
| (२) भरद्वाज. | ... | वीरा. | (६) गौतम. | ... | अहल्या. |
| (३) अत्रि. | ... | अनसूया. | (७) वसिष्ठ. | ... | अरुंधती. |
| (४) जमदग्नि. | ... | रेणुका. | | | |

## १५५ आठ चिरंजीव

पूर्वींचे कितीएक पुरुष मेले नसून चिरंजीव आहेत असें मानतात. ते चिरंजीव आठ असून खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत

(१) श्रीदत्तात्रय योगी, कोल्हापुरास, (२) श्रीव्यास, श्रीकाशीक्षेत्रीं, (३) अश्वत्थामा, अशिरीचे किल्यावर, (४) श्रीमारुति, कर्नाटकांत, (५) परशुराम, चिपळुणास, (६) बिभीषण, लंकेस (सिलोन) येथे, (७) बलीराजा, पाताळीं (अमेरिकेंत), (८) श्रीकार्तिक स्वामी, शेषाद्रिपर्वतावर. आतां हे अष्ट चिरंजीव कीर्तीनें जीवमान आहेत किंवा देहानें जीवंत आहेत यांचा विचार वाचकांनीच करावा.

## १५६ अष्टविवाह

पूर्वीं आठ प्रकारचीं लग्ने चालत होतीं ती—

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽ धमः ॥२१॥ मनुस्मृति अ. ३.

म्हणजे— १ ब्राह्म, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गांधर्व, ७ राक्षस, आणि ८ पैशाच. पैकीं पहिली चार प्रकारचीं लग्नें ब्राह्मणांनी करावीं असा ठराव आहे.

## १५७ नवग्रह

नवग्रहांचे देश व गोत्रें आश्वलायनपरिशिष्टांत लिहिली आहेत, ती अशीं–सूर्य कलिंग देशात उत्पन्न झाला, त्याचे गोत्र काश्यप; सोम यमुनातीरीं झाला, त्याचें गोत्र आत्रेय; मंगळ आवंतीमध्यें झाला, त्याचें गोत्र भारद्वाज; बुध हा मागध देशात झाला, त्याचें गोत्र अत्रि; गुरु हा सिंधु देशांत झाला, त्याचें गोत्र आंगिरस; शुक्र हा भोजकट देशांत झाला, त्याचें गोत्र भार्गव; शनि सौराष्ट्र देशांत झाला, त्याचे गोत्र काश्यप; राहू बर्बर देशांत झाला, त्याचे गोत्र पैठीनस; व केतु मध्य देशांत झाला, त्याचें गोत्र जैमिनी. ह्याप्रमाणें लिहिलें आहे. या पुरुषांची योजना ग्रहांत कशी झाली त्याचा विचार इतिहासकारांनीं व इतिहासज्ञांनींच करावा.

## १५८ नवरत्नें व पाषाण

नवरत्नें म्हणजे हिरा, मोतीं, माणिक, प्रवाळ, नीळ, पाच, वैडूर्य, गोमेद व पुष्कराज, हीं असून तीं नवग्रहावर योजितात. वैडूर्य रत्नास राहु किंवा लसण्या म्हणतात; पुष्कराजास बृहस्पति म्हणतात. नीळास शनि म्हणतात; व त्यांचे संस्कृतांत मरकत हे नांव आहे; मोतीं (चंद्र), प्रवाळ (मंगळ), माणीक (सूर्य), पाच (बुध), हिरा (शुक्र), आणि गोमेद (केतु). यांशिवाय

या देशांत दुसरे बहुत मौल्यवान पाषाण आहेत. त्यांचीं नावें स्फटिक, हकीक, चंद्रकांत, यमुनी शीलान वगैरे पन्नास प्रकारची आहेत. शिवाय इमारती व मूर्ती वगैरे करण्याचे संगमरवर वगैरे बहुत जातीचे रंगारंगाचे दगड असून आग्रा, जयपूर, गया, खंबायत वगैरे ठिकाणी यांचा व्यापार आहे.

## १५९ विक्रम सभेंतील नवरत्नें

विक्रमादित्य राजाचे सभेंत नवरत्नें म्हणजे नऊ पंडित श्रेष्ठ होते. त्याविषयीं ज्योतिर्विदाभरण ग्रंथात असे लिहिले आहे :–

वर्षे स्मृतिश्रुतिविचारविवेकरम्ये श्रीभारते खधृतिसंमितदेशपीठे ।
मत्तोऽधुना कृतिरियं सति मालवेन्द्र श्रीविक्रमार्कनृपराजवरे सभासीत् ॥
शंकु सुवाग्वररुचिर्मणिरंशुदत्तो अन्येऽपि संति कवयोऽमरसिंहपूर्वीः ।
यस्यैव विक्रमनृपस्य सभासदोऽमी सत्यो वराहमिहिरः श्रुतसेननामा ॥
श्रीबादरायणमणित्थुकुमारसिंहा श्रीविक्रमार्कनृपसंसदि संति चैते ।
धन्वंतरिः क्षपणकोऽमरसिंहशंकुर्वेतालभट्टघटकर्परकालिदासाः ।
ख्यातो वराहमिहिरो नृपते सभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य ॥

पुनः असें म्हटलें आहे कीं :—

शंकादिपंडितवराः कवयस्त्वनेके ज्योतिर्विदः समभवं च वराहपूर्वीः ।
श्रीविक्रमार्कनृपसंसदि मान्यबुद्धिस्तेरप्यंहं नृपसखा किल कालिदासः ॥
काव्यत्रयं सुमतिकृद्रघुवंशपूर्व पूर्व ततो ननु कियश्रुतिकर्मवादः ।
ज्योतिर्विदाभरणकालविधानशास्त्रं श्रीकालिदासकवितो हि ततो बभूव ॥

ज्योतिर्विदाभरण या ग्रंथाची मिती अशीं लिहिली आहे :

वर्षैः सिंधुरदर्शनांबरगुणैर्याते कलौ संमिते
मासे माधवसंज्ञकेन विहितो ग्रंथक्रियोपक्रमः ।
नानाकालविधानशास्त्रगदितं ज्ञानं विलोक्यादरादेर्जे
ग्रंथसमाप्तिरत्र विहिता ज्योतिर्विदां प्रीतये ॥

विक्रमानें, या देशांत शक म्हणून म्लेंच्छ शिरले होते त्यांचा पराभव करून इसवी सनाचे पूर्वी ३३ वे वर्षी किंवा कलियुगाचे ३०६८ व्या वर्षी हिंदुराज्य स्थापन केलें. हे शक हिंदुस्थानांत कोठून आले याचा इतिहास सांपडत नाहीं. परंतु त्यांचे पराभवामुळें विक्रमास चक्रवर्ती म्हणतात. शालिवाहन हा शकजातीयच एक राजा होता, असेंही कित्येक म्हणतात.

## १६० नवविधा भक्ति

भक्त म्हणतात कीं, देवाची भक्ति नऊ प्रकारची आहे. ती नवविधा भक्ति व ती पूर्वी कोणीं कोणीं केली त्याविषयी पुढील दोन श्लोक आढळतात :–

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥
श्रीकांतः श्रवणे परीक्षितिरभूद्वैयासिकी कीर्तने
प्रल्हादः स्मरणेऽध्रिपद्मभजने लक्ष्मीःपृथुःपूजने ।
अक्रूरस्त्वभिवंदने कपिपतिर्दास्ये ऽसख्येऽर्जुन :
सर्व स्वात्मानिवेदने बलिरभूत्कैवल्यमेषां पदम् ॥

## १६१ त्रयोदश पुत्र

धर्मशास्त्रांत त्रयोदश पुत्र लिहिले आहेत ते :- (१) औरस, (२) दत्तक, (३) दौहित्र, (४) क्षेत्रज, (५) गूढज, (६) कानीन, (७) पौनर्भव, (८) क्रीत, (९) कृत्रिम, (१०) स्वयंदत्त, (११) सहोढज, (१२) अपविद्ध, आणि (१३) द्वामुष्यायन. हे तेराही प्रकारचे पुत्र पूर्वयुगीं चालत होते. परंतु हल्ली औरस व दत्तक हे दोन मात्र चालत असून बाकीचे अकरा रद्द केलें आहेत.

## १६२ चोवीस अवतार

कितीएक पुराणांमध्ये विष्णूचे १० अवतार वर्णिलेले आहेत, परंतु भागवतांत २४ लिहिले आहेत, त्यांचीं नावें: (१) श्रीयज्ञ, (२) कपिलमहामुनि, (३) कुमार, (४) ऋषभ, (५) दत्त, (६) मनु, (७) मोहिनीं, (८) हंसमूर्ति, (९) कृष्णद्वैपायनव्यास, (१०) पृथु, (११) ध्रुव, (१२) हयग्रीव, (१३) भिषक् म्हणजे धन्वंतरि, (१४) देवर्षि, (१५) नारायण, (१६) कच्छ, (१७) कूर्म, (१८) वराह, (१९) नरहरि, (२०) खर्व, (२१) स्त्रीरासामिधा, (२२) बुध, (२३) कल्की, आणि (२४) कृष्ण (द्वारकाधीश).

## १६३ लोकांचे अज्ञान

लोकांमध्ये हल्ली असें म्हणण्याचीं रीती पडली आहे की शास्त्रांत जो फेर किंवा मोबदला झाला तो शंकराचार्यांनी केला. परंतु बौद्धमत मोडण्याचा क्रम जैमिनीपासून चालला होता तो कुमारिल भट्टाचार्यापर्यंत तसाच चालला. हे आचार्य शंकराचार्यांचे पूर्वी तीनशें वर्षे झाले. त्यांची आश्वलायनसूत्रावर कारिका म्हणजे श्लोकबद्ध एक ग्रंथ आहे. परंतु, बुद्धाचे मत असें होतें की, कर्म करणे हे व्यर्थ आहे. परंतु त्याचे वादी यांनी कर्मस्थापना केली. तो कर्ममार्ग होतां फारच वृद्धिंगत झाला. व लोक ईश्वरास सोडून कर्मासच ईश्वर व वेदास देवता म्हणूं लागले ! या मताचें खंडन शंकराचार्यांनी करून कर्म हें मोक्षार्थी नव्हे, तर केवळ चित्तशुद्धीचे कारण आहे असें ठरविले. उत्तरमीमांसाप्रतिपादनाखेरीज त्यांनी कांहीं केलें नाहीं.

## १६४ पाखांडें

पहिले लोक जेव्हा भोळे होते तेव्हां नानाप्रकारचीं पाखांडे उभी राहात होतीं. खानदेशांत एक खंडूबोवा म्हणून होता, व सप्तशृंगास सीतारामबोवा म्हणून होते. यांपैकी सीतारामबोवा यानें गोपाळराव चांदवडकर यांस आपले नादी लावून त्यांजकडून लाखो रुपयांची दौलत खराब केली, व शेवटी तो गोसांवी होऊन निघून गेला. तसेंच, बडोद्याचे प्रसिद्ध गोपाळराव मैराळ यांची पत्नी पुत्र होण्याकरितां ह्या सीतारामबोवांच्या सेवेंत तत्पर असे! व ह्यामुळें बोवांचे माहात्म्य फारच वाढलें पूर्वीचे काळी गोपीचंदराजा यास मच्छेंद्रनाथानें राज्यावरून काढून टाकिलें अशा-विषयीही गोसांवी, गोंधळी व नाटककार वगैरे सांगत असतात.

## १६५ जुना इतिहास

महाभारत, विष्णुपुराण, हरिवंश व भागवत इत्यादि संस्कृत ग्रंथांवरून, सुमारें तीन हजार वर्षां-पूर्वी जे वंश झाले ते लिहिलेले आढळतात. त्यापुढें मुसलमान येईपर्यंत इतिहास मिळविण्याचें फार संकट पडतें. तुटक दाखले मात्र सांपडतात, त्यांजवरून ज्या राजांचीं नांवें मिळतात, तीं येणेप्रमाणें -- नंद, चंद्रगुप्त, शिलादित्य, अशोक, संपत्तिराज, सिद्धराज जयसिंग, वनराज, विक्रम, भोज, इत्यादि. परंतु यांचा अनुक्रमानें इतिहास लागत नाहीं. मुसलमान हे दिल्लीस आले तेव्हां त्यांनीं पृथ्वीराजास मारून आपलें राज्य स्थापन केलें.

## १६६ परदेशीं गमन

पूर्वी विद्येकरितां लोक परदेशांत जात होते असें यवनांचे ग्रंथांवरून ज्योतिषांतील ताजक, रमल वगैरे ग्रंथ पंडितांनीं रोमकपत्तनांत जाऊन आणिले त्यावरून समजतें. भास्कराचार्य व वराहमिहिर इत्यादि पंडित, यवनांचीं शास्त्रें तपासून घेण्यालायक गोष्टी आपल्या ग्रंथांत दाखल करीत असत. हेमाडपंत हे पूर्वी लंकेत गेले होते आणि तेथून कितीएक वस्तूंचा त्यांनी संग्रह केला अशीही दंतकथा आहे.

## १६७ हिंदूचें सोंवळें

हिंदु लोक सोंवळ्याचे इतके छंदी झाले होते कीं, जेव्हां फिरंगी लोक कोंकणचे बंदरांवर आपली जहाजें लावून गांव घेऊं लागले, तेव्हां कोंकणपैकीं बरेच भाग त्यांचे अमलाखालीं आले. पुढें त्यांनी हिंदु लोकांस बाटविण्याचा प्रयत्न केला व त्यांत फारसे श्रम पडले नाहींत गांवांत जें तळें किंवा विहीर असेल त्यांत एखादा पावाचा तुकडा टाकावा, म्हणजे तितकेच कारणानें लोक म्हणत कीं, 'आम्हीं बाटलों! 'व दुसरे लोक ही म्हणत कीं, 'अमका गांव बाटला!' याप्रमाणें हजारों लोक बाटले गेले!

## १६८ ब्राह्मणांस अवश्य माहिती

ब्राह्मणांस आपले कुळासंबंधीची माहिती असावी असे पूर्वापार सांगत आले आहेत. ती माहिती म्हणजे जात, नांव, आडनांव, शाखा, सूत्र, गोत्र, प्रवर, मूळगांव, कुळस्वामी, देव, त्रिपुरुष ह्या गोष्टी आणि वतनवाडी वगैरे असल्यास तें, असें ठाऊक असावें.

## १६९ माहात्म्यें

प्रथम काशीचे माहात्म्य वाढलें असें अनुमान करितां येतें. नंतर त्याचा नमुना पाहून दुसरे क्षेत्रींचे ब्राह्मणांस उमेद येऊन त्यांनीं आपले गांवचीं माहात्म्यें लिहिलीं. त्यांत मुख्य विषय असा असतो कीं, आमचे क्षेत्र काशीपेक्षां मोठे व श्रेष्ठ आहे. यांचीं उदाहरणे --

आजन्म मरणाभ्यासाद्वाराणस्यां तु यत्फलम् । तत्फलं निमिषार्धेन पंचवट्यां तु राघव ॥

पंचवटीमाहात्म्य.

दक्षिणाभिमुखे गंगा यत्र देवो नृकेसरी । तत्र श्रीर्विजयो तीर्थं काश्यां शतगुणं भवेत् ॥

कुशतर्पणमाहात्म्य.

रेवातीरे तपः कुर्यान्मरणं जान्हवीतटे । दानं दद्यात्कुरुक्षेत्रे त्रिविधं गौतमीतटे ॥
केदारे च कुरुक्षेत्रे पुष्करे श्रीस्थले तथा । प्रयागे पंच वर्षाणि माघस्नानं करोति यः ॥

पद्मपुराण, उत्तरखंड.

काश्यां माघे च यत्पुण्यं सर्वतीर्थेषु यत्फलम् । तत्फलं समवाप्नोति साभ्रमत्यवगाहनात् ॥

साभ्रमतीमाहात्म्य

काशीयात्रा पांच, द्वारकेच्या तीन; । पंढरीची जाण एक यात्रा ॥

तुकाराम

इत्यादि शतशः उदाहरणें आहेत.

## १७० वाद

या देशांत जीं कितीएक मतें चालतात व ज्यांचा अद्यापि सिद्धांत झाला नाहीं, त्यांस वाद म्हणतात. त्यांपैकीं कित्येक वादच आहेत ते : --द्वैतवाद, अद्वैतवाद, पदार्थवाद, मायावाद, ईश्वरवाद, अनात्मवाद, अनादिवाद, कर्मवाद, उद्योगवाद, ब्रह्मवाद, शुद्धाद्वैतवाद, निर्गुणवाद, सगुणवाद, विशिष्टाद्वैतवाद, पुनर्जन्मवाद, परिणामवाद, विग्रहवाद, वगैरे. असेच पहिली एकादशी,

व दुसरी एकादशी, प्रत्यक्षपशु किंवा पिष्टपशु इत्यादि अनेक वाद सारखे चालले आहेत. यांचे सिद्धांत कालयत्रीं होण्याचें चिन्ह दिसत नाहीं !

### १७१ जैन

जैन लोकांचीं क्षेत्रें--काठेवाडांत पालिटाणा, गयेजवळ सम्मतशिखरजी, आबूपर्वत, जुनागड, आकोल्याजवळ अंत्रिक, राधनपुराजवळ पारखजी संकेश्वर, भडोचेजवळ कावी इ. आहेत.

### १७२ जैन ब्राह्मणांचे वेद

म्हैसुरास व बंगळूरास जैन ब्राह्मण आहेत ते चार वेद पढतात. त्यांचीं नांवें--१ सद्धर्मवेद, २ तत्वार्थवेद, ३ आगमार्थवेद, आणि ४ द्वादशांगवेद.

### १७३ निरनिराळे मार्ग

प्राचीन मनूनें होमहवनें करण्याची रीति स्थापन केली, ती बहुतकालपर्यंत चालली. पुढें त्या खटपटीचा लोकांस कंटाळा येऊन त्यांनीं ज्ञानमार्ग काढला. तेव्हां प्रथम सांख्य निघाले. नंतर षड्दर्शनें निघालीं व शेवटीं बौद्ध अवतार होऊन ज्ञानत्याग संन्यास वाढला. परंतु त्यासही लोक कंटाळले तेव्हां भक्तिमार्ग निघाला. कर्मकांडांत लहान मोठे देव, ज्ञानकांडांत सर्वत्र देव व भक्तिमार्गांत एक देव असें झालें.

### १७४ पोकळ ग्रंथ

ज्याचे लांबीरुंदीचा पत्ता नाहीं त्यांत सर्वांस शिरण्यास सांपडतें. ज्याचें गोत्र ठाऊक नाहीं त्याचें गोत्र काश्यप. जो विषय कोठें आढळत नाहीं त्यास जागा बौधयनसूत्रः म्हणजे, त्या सूत्राचा पत्ता नसून पाहिजे त्यानें त्याचाच आधार सांगावा. जी उपासना वेदांत नाहीं ती उपनिषदांत पाहावी. आणि याचप्रमाणें अनेक महात्म्यें व कथा याविषयीं स्कंदपुराणाचा पत्ता नाहीं म्हणून त्याचें नांव घेण्यास सर्वांस सांपडतें !

### १७५ पिरान्पीर

पैगंबराचे पाठीमागें सय्यदाचे वंशांत बगदाद येथें एक साधु झाला, त्याचें नांव कुतबरबानी ऊर्फ पीरान्पीर किंवा अबदुल् कादर जिलानी ऊर्फ महबूब सुभानी. या पुरुषास फकीर लोक फार भजतात आणि त्यानें पुष्कळ करामती केल्या असें म्हणतात. खंडेराव महाराज यास फकीर लोकांनीं या पिराच्या करामती सांगून व तो नवसास पावतो म्हणून त्याचे मनांत भरविलें होतें. याजमुळें खंडेरावानें बावन्न लक्ष रुपयांची मोत्यांची व रत्नांची चादर त्या मनुष्याचे कबरेवर बगदाद शहरास पाठविण्याकरितां तयार केली होती व बडोद्यास मोठाल्या सरकारी दुकानांस या पीराचींच नांवें दिलीं होतीं. कुतबरबानी मौलाअल्ली, महबुब सुभानी हीं नांवें बडोद्याचे वेशीवर कोरलीं होतीं. कीं, तेणेंकरून त्या शहरास सर्वदा बरकत यावी. जसे फकीर गुरु सांगत तसे महाराज करीत होते. या साधु पुरुषाचे वंशांत सय्यद अहमद रफई साहेब म्हणून एक पुरुष झाला त्याचे नांवावर अद्यापि मुसलमान आपले शरीरास पीडा करून घेऊन लोकांस तमाशे दाखवितात, आणि रफई साहेबाचे आशीर्वादानें हें होतें म्हणून लोकांस भ्रम घालतात. गालांतून चाकू घालतात. अंगांत सुरी टोंचितात व पोटांत चाकू घालतात. परंतु यांत रफई साहेबांचें नांव मात्र असून ही सर्व कृति व युक्ति आहे.

### १७६ ठिकठिकाणचे पुजारी

पंढरपूरचे पुजारी यांस बडवे म्हणतात. सप्तशृंगचे पुजारी यांस भोपे म्हणतात. त्रिंबकचे तुंगार, व्यंकोबाचे दासरी, तुळजापुरचे भुते, जेजूरीच्या खंडोबाचे वाघे, मथुरेचे चौबे, कलकत्याच्या कालीचे पंडे, काशीचे गंगापुत्र, द्वारकेचे गुगुळिये, यलंमा व बनशंकरीच्या भाविणी, गयेचे गयावळ, प्रयागचे प्रयागवळ, ह्याप्रमाणें ठिकठिकाणच्या देवांचे पुजाऱ्यांस नांवें आहेत.

## १७७ राम व हनुमान् यांच्या मूर्तींचे प्रकार

श्रीरामाचीं देवळें बांधतात त्यांत दोन प्रकार असतात :– एक वनवासी राम, म्हणजे राम लक्ष्मण व सीता यांच्या उभ्या मूर्ती करतात. व दुसरी पट्टाभिषिक्त राम, म्हणजे पांच मूर्ती बसलेल्या करून त्यांत भरत व शत्रुघ्न हे जास्ती असतात. कोणी तेरा मूर्ती करतात. त्यांत वरील पांचांशिवाय नळ, नीळ, जांबुवंत, अंगद वगैरे दरबार असतो. याचप्रमाणें हनुमंताचे मूर्तींच्या दोन तऱ्हा आहेत. वीर हनुमान् व दास हनुमान्. पहिली मूर्ती उड्डाण करिते आहे अशी असते, व दुसरी हात जोडून उभी असते.

## १७८ अधिक मास

अधिकमास यास धोंडा, मलमास व पुरुषोत्तममास असें म्हणतात. ते १२ वर्षांत चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे अधिक होतात. १८ वर्षांनीं आषाढ अधिक येतो. २४ वर्षांनीं भाद्रपद अधिक येतो. १४१ वर्षांनीं अधिक आश्विनमास येतो. व ७०० वर्षांनीं अधिक कार्तिकमास येतो. आश्विन व कार्तिक हे दोन महिने अधिक आले तरी त्यांस अधिक म्हणत नसून भाद्रपदापर्यंत मात्र अधिक म्हणतात. ज्या वर्षी अधिक आश्विन पडतो त्या वर्षी पौषक्षय होतो. व त्या वेळीं दोन प्रहरपर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहरांनंतर पौष होतो. आणि याप्रमाणें त्या दोन्ही महिन्यांचीं धर्मकर्मेही एकाच महिन्यांत करितात. या जोडमासाचें नांव सवसर्प आहे. कार्तिकापुढील चार महिने अधिक होत नाहींत व आश्विनाचे पूर्वी क्षय मास होत नाहींत.

## १७९ भ्रष्टक्षत्रिय

मनूनें असें लिहिलें आहे कीं, क्षत्रियांनीं मुख्य आठ राष्ट्रें वसविलीं, परंतु पुढें क्रियालोपानें त्यांस ब्राह्मणांचें गुरुत्व सुटल्यामुळें तीं भ्रष्ट झालीं :–

> पौंड्रकाश्चौंडद्रविडाः कांबोजा यवनाः शकाः ।
> पारदाः पल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥ ४४ ॥
> शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
> वृषलत्वं गता लोके ब्राह्मणानामदर्शनात् ॥ ४६ ॥ मनुस्मृति अ. १०.

## १८० स्त्रियांची योग्यता

स्त्रियांना पुरुषांनीं मान द्यावा. कारण, तेणेंकरून ईश्वराची प्रसन्नता राहते. याविषयीं मनूचें मत पुढें लिहिलें आहे. त्याजवरून पूर्वीचा समज व सद्विचार कसा होता हे ध्यानांत येतें :–

> यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।
> यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ५६ ॥
> संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
> यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ ६० ॥ मनुस्मृति अ. ३.

परंतु ह्याविरुद्ध लोक विधवादिकांस छळून कल्याण इच्छितात, तें कसें होईल?

## १८१ वेदाचें महत्त्व

वेदाची महती मनूनें वर्णन केली आहे, ती अशी कीं, चार वर्ण, चार आश्रम, स्वर्ग, नरक, भूत, भविष्य आणि वर्तमान हीं सर्व वेदानें सांगितलीं आहेत. त्याजपासून तीं शिकावी :–

> चातुर्वर्ण्यं त्रयो लोकाश्चत्वारश्चाश्रमाः पृथक् ।
> भूतं भव्यं भविष्यं च सर्वं वेदात्प्रसिद्ध्यति ॥ ९७ ॥ मनुस्मृति अ. १२.

## १८२ ऋषि

पूर्वीपासून बहुतकरून ऋषिंचे ग्रंथ आहेत व ते ऋषि ग्रंथकर्ते असून ते नवीन धर्मशास्त्रप्रतिपादक होते. हे ऋषि सहा प्रकारचे धरिले आहेतः– (१) छंदऋषि, (२) ब्रह्मर्षि, (३) महर्षि, (४) राजर्षि, (५) गोत्रऋषि, आणि (६) देवऋषि. यांपैकीं पहिल्या वर्गांतील वसिष्ठ, कण्व इत्यादि छंदऋषि होत; दुसऱ्यातील अत्रि वगैरे हे ब्रह्मऋषि; तिसऱ्यांतील भृगु वगैरे महर्षि; चवथ्यांतील विश्वामित्र, प्रियव्रत, जनक, ऋतुपर्ण वगैरे राजर्षि; पांचव्यांतील शांडिल्य, कौंडिण्य वगैरे गोत्रऋषि, आणि सहाव्यांतील नारद हा देवऋषि होय. हे सर्व ऋषि ब्राह्मणांचेच वंशज नसून त्यांत क्षत्रिय वैश्य शूद्र व अप्सरापुत्र इत्यादि होते. म्हणून ऋषिचें कुळ व गंगेचें मूळ शोधूं नये असें म्हणतात. कवषऐलुष हा छंदऋषि शूद्र असून राजर्षि हे क्षत्रिय होते; ब्रह्मर्षि हे ब्राह्मण, आणि देवर्षि हे आर्य लोकांचे मूळ भूमींतील रहिवासी होत; छंदऋषि म्हणजे वेदांचे मंत्र ज्यांनीं केले ते; महर्षि म्हणजे ज्यांचे वंश मोठे ते; त्यांस प्रजापति असेंही नांव आहे. आणि गोत्रऋषि म्हणजे हल्लींच्या ब्राह्मणांचे पूर्वज ते, परंतु पुढें ह्या ऋषींविषयीं पुराणिकांनीं अद्भुत गोष्टी प्रसिद्ध केल्या. कीं, कोणी सागर पीत, कोणी गंगेस मांडींत दाबून टाकीत, कोणीं साठ खंड्या अन्न खात. अशीं खोटसाळ व असंभाव्य माहात्म्यें प्रसिद्ध झाली. आणि तशी सामर्थ्यें सांप्रतच्या ब्राह्मणांत जेव्हां दिसेनात तेव्हां ऋषि नष्ट झाले असें ठरलें. ब्राह्मणांचे महत्त्व जाण्यास दुसरें कारण असें कीं, ते लोभी होऊन विद्यातपहीन झाले. तिसरें कारण असें झालें कीं, ब्राह्मण ही ज्ञाति वंशपरंपरा ठरली, तेव्हां एकाच जातीत सर्व ऋषि व्हावे हें असंभाव्य आहे. पूर्वी जेथें ऋषित्व दृष्टीस पडे तो ऋषि ठरत असे. परंतु पुढें त्याचा संकोच झाल्यामुळें आतां कोणी ऋषि नाहीत असें ठरलें, हें मोठें अनिष्ट झालें. एकाच जातींत जसे सर्व वीर किंवा सर्व भक्त झाले नाहींत त्याचप्रमाणें ऋषीही एकाच जातींत उत्पन्न झाले नव्हते. देवऋषि ह्मटलेल्यांस जाति होती असें दिसत नसून ते जातीधर्म झाल्याचे पूर्वीचे लोक होते असें वाटतें.

## १८३ अग्निहोत्री

पूर्वी, अग्निहोत्री ब्राह्मणांस बोलावून आणून त्यांना घरें व नेमणुका करून देऊन ब्रह्मकर्म करावयास लाविलें असतां त्यांत मोठें पुण्य आहे असें मानीत असत. यास्तव क्षत्रिय राजे व इतर हिंदुराजे हे त्याप्रमाणें ब्राह्मणांची वस्ती करवीत. यांचीं उदाहरणें बहुत आहेत. वाईस माधवराव रास्ते यांणीं धर्मपुरी वसविली. त्या वस्तीकरितां सरकारांतून मौजे केंजळ हे गांव इनाम करून देऊन ब्राह्मणांस घरे करून दिलीं आहेत. खंडेराव रास्ते यांस मौजे वाकरूळ हे आंग्र्यांचे इनामी गांव असून तेथें वस्ती करण्याकरितां आंग्रे सरकारांनीं एक मोठी खार दिली आहे, तिच्या उत्पन्नाचे भाग करून देत असतात. याचप्रमाणे प्रतिनिधींनीं कऱ्हाडास ब्राह्मण वसवून अग्रहार गांव दिले आहेत. गोपिकाबाई पेशवे यांणीं नासिकाजवळ गंगापुरास याचप्रमाणें वस्ती करविली आहे. शिवाय गोपिकाबाईंनीं निफाड तालुक्यांतील चितेगांव हे १३ ब्राह्मणांस व्यतिपाताबद्दल दान केल्याचें प्रसिद्ध आहे. अहमदाबादेस आबा शेळूकर यांजकडे गुजराथ सुभा झाला तेव्हां त्यांनीं जे पांच अग्निहोत्री दक्षिणेंतून नेऊन व त्यांस वर्षासनें करून देऊन अहमदाबादेस भद्रेंत घरें देऊन ठेविले आहेत, त्यांचीं नावे —

(१) वैजनाथभट, यांचे पुत्र रामभट तुळजापूरकर; (२) श्रीनिवासभट पुणतांबेकर, यांचा मुलगा बाळकृष्ण किणगी. (३) शिवरामभट अयाचित नासिककर; (४) रंगभट नासिककर; (५) राजारामभट जामखेडकर. प्राचीनकाळीं सिद्धराज जयसिंग म्हणून अन्हिलपूरचा राजा होता, त्याणें हिंदुस्थानांतून सहस्रब्राह्मण नेऊन व त्यांस स्वास्थ्य देऊन गुजराथेंत वसविलें. ह्या जातीस हल्लीं औदीच्यसहस्र असें म्हणतात. त्याकाळीं कितीएकांची अशी प्रतिज्ञा असे कीं, दान म्हणून

घ्यावयाचेंच नाहीं. राजे पाठीस लागत कीं, 'दान द्या;' आणि त्यांत जो दान घेई त्यास जातीबाहेर ठेवीत. याजमुळें औदीच्य टोळकिया ही जात गुजराथेंत उत्पन्न झाली. ब्राह्मणांस इच्छाभोजन द्यावें अशी प्राचीन चाल होती; त्याची श्रियाळ राजाचे आख्यानांत तर पराकाष्ठा वर्णिली आहे. याप्रमाणें ब्राह्मणांनीं सर्वस्वी लोकांस आपले कबजांत आणून स्वकीय महत्त्व वाढविलें होतें. अद्यापिही बाया बापड्या व त्यांजसारखेच जे गृहस्थ आहेत त्यांजमध्यें ही समजूत कायम आहे. आतां यापासून देशाचें हित झालें किंवा अहित झालें याचा विचार सर्वांनीं करावा.

## १८४ पुजारी

मालवणचे किल्ल्यांत शिवाजी महाराजांची मूर्ति आहे, तिची पूजा अभ्यंकर म्हणून ब्राह्मण आहेत ते करितात व त्या मूर्तीवर अभिषेक करितात. दुसरे ब्राह्मणही तेथें अभिषेकास जातात. या देवळाचे कारभारी राणेराव म्हणून मराठे आहेत. त्याचप्रमाणें बावामलंग म्हणून कल्याणाजवळ एक पीराचें स्थान आहे त्याचे पुजारी केतकर उपनांवाचे ब्राह्मण आहेत. अव्वल इंग्रजींत कांहीं मुसलमानांनी या ब्राह्मणाशीं तंटा करून सरकारांत फिर्याद केली, तेव्हां ब्राह्मणांनीं साहेबांचे विद्यमानें पीरास चिठ्ठ्या टाकण्याचें ठरविलें व ज्यास पीर कबूल करील त्यास पुजारीपणा द्यावा असें ठरल्यावरून पीरापुढें चिठ्ठ्या टाकल्या. त्यांत ब्राह्मणाचेंच नांव आलें. त्याप्रमाणें केतकर हे पीराची शुश्रूषा ठेवितात. हा पीर पेशव्यांस पावल्यावरून त्यांनीं मुळी हें संस्थान केतकरांकडे दिलें असें म्हणतात. असेंच मारवाडांतही जैनांचे देवळांत देवाचे पुजारी ब्राह्मण असतात!

## १८५ उपाध्याय

कितीएक ज्ञातींत दुसऱ्या कितीएक ज्ञातींचे ब्राह्मण पुरोहित नेमिलेले आहेत :— भंगसाळी, लवाणे व ब्रह्मक्षत्रिय यांचे उपाध्ये सारस्वत ब्राह्मण आहेत. याजवरून त्या चारी जाती पंजाबांतील असाव्या असें दिसतें. त्याचप्रमाणें भाटे यांचे उपाध्ये पोकर्णे ब्राह्मण आहेत.

## १८६ सोन्याचें नाणें

पूर्वी कर्नाटकांत सोन्याचें नाणें चालत होतें. होनाचीं नांवें तर कृष्णशाई होन, सदाशिवशाई होन, हुकेरी, आनंदराई, वराही, मत्स्यहोन (हें चार रुपयांचें नाणें), वगैरे अनेक आहेत. पुढें मुसलमानांनीं एक सुलतानी होन केला; त्यास इंग्रज 'पेगोडा' असें म्हणतात. त्याचीही किंमत चार रुपयेच आहे. या होनांचे पोटीं अर्धा होन, पाव होन, हे भागही आहेत. त्यांची किंमत दोन रुपये, एक रुपया, अशी आहे. याशिवाय 'फनम' म्हणून अर्धा रुपया किंमतीचें नाणें आहे. त्याचे पोटीं चुणी व डाळी याप्रमाणें चार आण्यांचें सोन्याचें नाणें आहे. रामटकी म्हणून एक ५० रुपये किंमतीचें सोन्याचें नाणें आहे, त्याजवर रामाची व हनुमंताची मूर्ति असते. याशिवाय मुसलमानांचे कारकीर्दीत झाडशाई, अकबरी, जहानगिरी वगैरे मोहोरा पाडून तें नाणें सुरू झालें आणि युरोपाशीं व्यापार असतांना त्या वेळीं व्हेनिस येथून हिंदुस्थानच्या मालाचे मोबदल्यांत पुतळ्याचें नाणें इकडे आलें तेंही चालू आहेच.

## १८७ धातु व पाषाणांच्या खाणी

महाबळेश्वर, नरवर, पंचमहाल, बरवाई, वगैरे ठिकाणीं पूर्वी लोखंडाचे कारखाने असून ते चालविणारी जात धावड म्हणून होती. धावडांनीं लोखंड केलें म्हणजे घिसाडी, लोहार हे त्याचे नग करीत. याचप्रमाणें हल्ली कापडवंजास व दिल्लीस कांचेचे कारखाने आहेत. पावसाळ्यानंतर ऊस म्हणून जमिनीवर एक प्रकारचा मातीसारखा पदार्थ होतो; तो जमा करून त्याची भट्टी लाविली म्हणजे कांच होते. त्या कांचेच्या शिशा, बांगड्या असे पदार्थ इकडे होतात. परंतु ही कांच चांगली नसून ज्या लोकांचे हातीं हे कारखाने आहेत ते अगदीं भिकारी आहेत व त्यांस

कोणत्याही प्रकारचें उत्तेजक नाहीं. ईडरचे डोंगरांत स्लेटीचे नरम दगड असून त्याच्या वाट्या, पेले, मूर्ति वगैरे घडून विकावयास आणितात. रतनपूर, चुडाराणपूर वगैरे ठिकाणीं हकीक, यमुनी स्फटिक, वगैरे उंच किमतीचे दगड सांपडतात. त्याचप्रमाणें गयेस व कावी म्हणून भडोचेजवळ एक बेट आहे तेथेंही असेच अनेक प्रकारचे मूल्यवान् दगड सांपडतात. गयेस कथील, तांबे, कोळसे, यांच्या खाणी डोंगरांतून आहेत व सुवर्णही कांहीं ठिकाणीं सापडतें. ऊसमातीचा इकडे साबणही होतो. या साबणाचे कारखाने गुजराथेंत असून ते बोहरी लोकांकडे आहेत. या देशांत सोरा काढण्याचे कारखानेही बहुत ठिकाणीं होण्याजोगे आहेत. पावागडाखालीं सोन्याची जमीन पुष्कळ आहे. तेथून तो काढून जर विलायतेंत पाठविला तर बहुत नफा होईल. जुनागडची सुंदरीक नदी उर्फ सुवर्णरेखा यांत सोनें आहे. जामनगरचे रानांत मोकळगांवाजवळ तांब्याची खाण आहे. परंतु जे धंदे करितात ते भिकारी असून त्यांस सामर्थ्य व उत्तेजन नाहीं आणि जे श्रीमंत आहेत ते धुंदींत असून उल्लू आहेत. याचप्रमाणें हे उद्योग यंत्रांवांचून पडून राहिले आहेत.

### १८८ शालग्राम

शालग्रामशिला ही वैष्णव लोक प्रत्यक्ष विष्णुमूर्ति मानितात, त्याचें तीर्थ घेतात व त्यास नैवेद्य दाखवितात. पुराणांत त्याचे परीक्षेवर पुष्कळ अध्याय आहेत त्यांवरून त्यांच्या मूर्ति कोणत्या प्रकारच्या आहेत याची जी परीक्षा आहे ती त्याचीं चक्रें व मुखें व मोजून त्याचा निश्चय होतो. याविषयीं पुराणांत माहात्म्य लिहिलें आहे ते :—

शालग्रामशिलायां तु नित्यं संनिहितो हरिः ।
तेषां स्पर्शनमात्रेण मुच्यते सर्वकिल्बिषैः ॥ १ ॥
हिरण्यवज्रकीटेन निर्मितं चक्रमुत्तमम् ।
तत्र स्नानमवाप्नोति वाराणस्याः शताधिकम् ॥ २ ॥
म्लेच्छदेशेऽशुचौ वापि चक्रांको यत्र तिष्ठति ।
योजनानां तथा त्रीणि मम क्षेत्रं वसुंधरे ॥ ३ ॥
यो मृतस्तत्समीपे तु मृते वा नियतेंऽतकम् ।
सर्वमोक्षमवाप्नोति सत्यं सत्यं न अन्यथा ॥ ४ ॥
शालग्राममयी मुद्रा संस्थिता यत्रकुत्रचित् ।
वाराणस्यां यवाधिक्यं संगताद्योजनत्रयम् ॥ ५ ॥

पद्मपुराण.

नेपाळांत परशुपतिनाथ आहे, त्यापासून वर १५० कोसांवर मुक्तनाथ म्हणून शिवस्थान आहे, तेथें गंडकी नदींत हे पाषाण सांपडतात. तेथें या पाषाणाचा मोठा पर्वतच असून त्याचे दगड आणून त्यांच्या मूर्ती करितात व त्यांजवर यंत्रें कोरतात. शिवाय त्या पाषाणाचे खल होतात व सोन्याच्या कसोटीलाही हाच दगड उपयोगी पडतो. शालग्रामास स्त्रिया व शूद्र यांणीं स्पर्श करूं नये असें मत आहे. परंतु हें ब्राह्मणांचें मत वैराग्यांनीं गुंडाळून ठेवून ते वाटेल त्यास शालग्रामाची पूजा करूं देतात. वैष्णवांमध्ये शालग्रामपूजा श्रेष्ठ धरिली आहे. इतर ब्राह्मण जें प्रायश्चित्तार्थ पंचगव्य घेतात त्याबद्दल वैष्णव हे शालग्रामावर पाणी घालून त्याचें तीर्थ घेतात. या दगडांवर सोन्याच्या बारीक रेघा असतात. त्यांवरून ते सोन्याच्या खाणींशीं संलग्न असणारे दगड असावे असें अनुमान होतें.

### १८९ दगड

दगड फोडून नग करितात त्यांचीं नांवे :—- गुंडा, पाटथरा, डबर, बेंदरी, चिरा, ढापा, फरस, बांडकी, तोड, उथळी, लादी, वगैरे.

## १९० नौका व त्यांचे भेद

दर्यांत नावा असतात त्यांचें रूप, आकृती व बांधणी यांवरून त्यांचीं वेगवेगळी नांवे असतात : - (१) बंदरबोट, (२) तर, (३) होडी, (४) नाव, (५) डोणी, (६) पडाव, (७) पनेळ, (८) बतेला, (९) गुराब, (१०) डिंगी, (११) उलमी, (१२) जंक, (१३) जॉली बोट, (१४) केबिन बोट, (१५) गलबत, (१६) तारूं, (१७) जहाज, (१८) बार्कस, (१९) तिर्कटा, (२०) आगबोट, (२१) मनवार (म्यान् ऑफ वॉर), (२२) महागिरी, (२३) फतेमारी, (२४) बगला, (२५) मचवा, (२६) बर्कीण, (२७) तराफ.

नावेचे पोटसामान असतें तें :— (१) नाळ, (२) सुकाणु, (३) डोलकाठी, (४) वल्हें, (५) शीड, (६) नांगर, (७) दोर, (८) शिडाची शिंकाळी, (९) ताज, (१०) कपी, (११) वालदी, (१२) गमत वगैरे.

याशिवाय खलाशांची परिभाषा आहे ती :— वरवा, घोस ह्मणजे डावी बाजू; दमण ह्मणजे उजवी बाजू; निरीम ह्मणजे ओझें; वगैरे.

## १९१ कोळ्यांचीं नांवें

गुजराथेंत कोळ्यांस ठाकोर ह्मणण्याची चाल आहे. शिवाय त्यांस बारिया, धराळा व पगी असेंही ह्मणतात.

## १९२ धान्यें

या देशांत सर्व धान्यें पिकतात परंतु ग्रंथांतरीं अठरा धान्यें ह्मटलीं आहेत त्यांची यादी :—

| संस्कृत नांवें | | प्राकृत नांवें | संस्कृत नांवें | | प्राकृत नांवें |
|---|---|---|---|---|---|
| (१) गोधूम | ... | गहूं | (१०) प्रियंगव | ... | राळे |
| (२) व्रीही, शाली | ... | तांदूळ | (११) श्यामक | ... | सांवे |
| (३) तुवरी | ... | तूर | (१२) यवनाल | ... | जोंधळे |
| (४) मुद्र | ... | मूग | (१३) लंक | ... | लाख |
| (५) चणक | ... | हरभरे | (१४) हरीक | ... | कोद्रे |
| (६) तिल | ... | तीळ | (१५) चवली | ... | चवळ्या |
| (७) यव | ... | जव | (१६) नीवार | ... | भगर वगैरे |
| (८) माष | ... | उडीद | (१७) कुलित्थ | ... | कुळीथ |
| (९) मसुरा | ... | मसुरा | (१८) वाटाणे (?) | ... | वाटाणे |

शिवाय नाचणी, मका, बाजरी, राजगिरा वगैरे धान्येंहीं इकडे सर्वसाधारण आहेत. यांपैकीं जोंधळे, बाजरी, मका, हीं राक्षसी धान्ये ह्मणतात; कारण तीं आर्यावर्तांतील नसून हेमाडपंतांनीं लंकेकडून आणिली आणि दक्षिण दिशा ही सर्वदा राक्षसभूमि ह्मटली आहे.

## १९३ तांदुळांच्या व गव्हांच्या जाती

तांदुळांमध्यें पुढें लिहिल्याप्रमाणें बहुत जाती आहेत :- अंबेमोहोर, तांबसाळ, पंखाळी, जिरेसाळ, कमोद, इलाची, सुतरसाळ, पटणी, बहाड, कचरी, दोडकी, महाडी, कोळंबा, वोडकें किंवा कोथिंबिरी, निपुंज, महाद्या, वरंगळ, भडस, तवसाळ, साठी, सुखवेल, रायभोग, दोडका, घोसाळवेल, कानडा, हळवा, कृष्णसाळ इ. याचप्रमाणें बक्षी, खपला, जोडपोट्या अशा अनेक जातींचे गहूं असतात.

## १९४ जोंधळ्याच्या जाती

जोंधळ्याच्या जाती बहुत आहेत. त्यांपैकीं शाळू, अरगडी, हुंडी, मालदांडी, पिंवळा, तांबडा, गुडदी, कावली, काठे, मोतिया, कुचकुची, कोल्ही, दुधमोगरा वगैरे मुख्य आहेत.

## १९५ रानभाज्या

पावसाळ्यामध्यें रानांत आपले आपण भाज्या उगवतात, त्यांतील चाई, करटुलीं, गोमेटी, खारीभाजी, पाणथरी वगैरे प्रसिद्ध आहेत. यांशिवाय एक श्लोक आढळला आहे त्यांत अशा भाज्यांचीं वीस नांवें सांपडतात. तीं अशीं :–

काकी, आकुल, चोच, फांद, मुरवा, दिंडा, कुरा, पेंढरें,
भारंगे, कवल्ल, डहाण, कुरडू, चिंचोरटी, भोकरें, ।
तेरें, नांवळ, टाकळा, फटकुरी, औदांबरें, पाखरी,
शाखा या वनिंच्या करूनि भुपती भोक्ता म्हणावा हरी ॥

यांशिवाय आबई, कोळाई, चाई, शेवगा, गोडकुचली वगैरे अनेक वनभाज्या आहेत.

## १९६ पवित्र पदार्थ

हिंदु लोकांत, कित्येक जनावरांचे अंश असतात तेही पवित्र मानतात. ते पदार्थ :

| अंश. | जनावर. | उपयुक्त व पवित्र पदार्थ. |
|---|---|---|
| आस्थी. | गेंड्याच्या, हत्तीच्या इ. | खडकपात्र, शंख, शिंपले, हस्तिदंत. |
| केश. | डुकराचे. | कुंचे, (देव उजळण्याकरितां) |
| मांस. | मृगाचे, गाईचें. | कस्तूरी, गोरोचन. |
| चर्म. | सर्प, हरिण, व्याघ्र. | कांत, कृष्णाजिन, व्याघ्रांबर. |
| नख. | वाघाचें. | वाघनख. |
| कृमी. | किरमिज, मधुमक्षिका. | किरमिजी रंग, मेण. |
| पंख. | मोर. | मोरचेल. |
| विष्ठा, मूत्र. | गाईचें. | गोमय, गोमूत्र. |
| उच्छिष्ट. | वासरांचें. | धारोष्ण दूध. |
| वमन. | माशीचें. | मध. |

## १९७ लोखंडाच्या जाती

लोखंडाच्या जाती पुष्कळ आहेत व त्या वेगळाल्या कामास लावितात. सिकई, रूपाशाई, रेल, मनवरी, बाबशाई (रोलछाप), बीड, पोलाद, गजवेल, माळवी, इ.

## १९८ कापसाच्या जाती

कापसाच्या अनेक जातीं आहेत त्यांत लाळिया, जडियां, वागड, कानमी, नरमा, इ. मुख्य आहेत. कोणाचें बोंड फुटून कापूस बाहेर पडतो, कोणाचें फुटत नाहीं, कोणाची तार लांब असते, कोणाचें झाड मोठें असतें, कोणाचें झाड पांच वर्षे राहतें, व कोणाचें वर्षास पेरावें लागतें. नरमा जातीच्या कापसास देवकापूसही म्हणतात. त्याच्या बिया वेगळ्या नसून जडलेल्या असतात व त्या फोडून पेराव्या लागतात.

## १९९ लुगडीं

बायकांच्या साड्यांमध्यें अनेक जाती आहेत त्या :– चंद्रकळा, रास्ता, गुलाली, अंजिरी, रूद्र-कांठी, पोफळी, बाळपट्टी, गोमीकांठीं, मोतेचूर, नारळीपदरी, दंडिया, धावडी, येवली, अहमदा-बादी, सोलापुरी, कर्नाटकी, गर्भसुती, शालू, पैठणी, कर्वतीकांठी, रुइफुली, वगैरे.

## २०० मापें

अनेक ठिकाणीं मापें चालतात तीं :– पल्ला, कळशी, माप, पायली, फरा, चिपटें, खंडी, मुडा, मण, अधोली, टिपरी, शेर, वगैरे.

## २०१ गणित

गणिताचे तीन भाग आहेत :– होरा, गणित आणि संहिता. होरा म्हणजे जातक, ताजक, व प्रश्न केला तर उत्तर सांगणें; गणित म्हणजे देशकालज्ञान; आणि संहिता म्हणजे मुहूर्त व त्याचीं फलें वगैरे.

## २०२ धर्म

धर्माचे चार भाग किंवा पाद आहेत ते : तप, सत्य, व्रत, व दान.

## २०३ वैद्यक

वैद्यक हें हेतु, लिंग व औषध असें त्रिस्कंद आहे. हेतु म्हणजे रोगाचीं कारणें; लिंग म्हणजे रोगपरीक्षा; व औषध म्हणजे ते रोग दूर होण्यास उपाय.

## २०४ गायन

पूर्वी गायन व नृत्य या कलेंत शिव, नारद, तुंबर, जांबुवंत, बृहन्नडा (अर्जुन) व सरस्वती हे प्रसिद्ध होते. पुढें मुसलमानांचे कारकीर्दीत बिजूबावरा, तानसेन, मसीदखान, गुलामरजा, जामी, मीरखुसरू, हाफीज वगैरे मोठाले वस्ताद झाले. आतां पुरुषांचा गळा मोठेपणीं फुटतो, परंतु, बायकांचा फुटत नाहीं हें त्यांस एक ईश्वरी देणें आहे. आणि वस्तुतः पाहिले असतां गायन व नृत्य ह्या कला त्यांजकरितांच आहेत व म्हणूनच नाटकशाळा यांनीं ते कलाभाग उचलले आहेत. परंतु दुष्टाश्रयत्वामुळें गतीं बायकांनी त्या कलांचे अगदी त्यागच केला. कारण, त्यांस असे वाटतें कीं, त्या कलांचा अंगीकार केला असतां उपमानाप्रमाणें किंवा साहचर्यदोषानें आपली गणती नाटकशाळांतच होईल! तरी, हल्लीं कन्याशाळा चालू होऊन तेथें गाणें शिकविण्याचा क्रम सुरू झाला आहे असे मुंबई येथील अनेक शाळांमध्ये अभ्यास करून तयार झालेल्या मुलींच्या शिक्षण-क्रमावरून दिसतें.

## २०५ गायनांतील राग

गायनांत मूळ सप्तसूर आहेत त्यांचीं नांवें :– सा री ग म प ध नी. यांचे री सा, सा री असे उलट पालट सूर म्हणून सुमारें ५२०० प्रस्तार होतात. याजपासून वर्जावर्ज यानें राग होतात त्यांचीं नांवें:– भैरव, मालकंस, परज, सोनी, कालंगडा, हिंडोल, मारू, बसंत, पंचम, ललत, केदार, बिहाग, खमाज, आडाना, बागेसरी, कानडा इ. त्यांचे पोटीं दरबारी, मियाचा. कौशीक, वगैरे भेद आहेत. तसेच कल्याणांतही नऊ भेद आहेत :– शाम, यमन, पूर्वी, शुद्ध, हमीर, जयत, मोहन, कमोद आणि भूप. श्रीरागांत सहा भेद आहेत :- जयताश्री, दीपश्री, मालवश्री, पूर्वीश्री, धवलाश्री आणि ललताश्री. शिवाय, सोरट, पिलू, मुलतानी देश, मालव, गुर्जरी, शाहाना, सरपर्दा, तोडी, शंकराभरण, जोगी, बागेसरी, धनासरी, मार्वा, केदार, निषापुरी, काफी, झिंझुटी, विभास, सिंधी, अलैय्या, तैलंग, बिलावल, वगैरे आहेत. यांतील तोडीचे भेद पांच आहेत :– देशी, जीवन-पुरी, मियाचा, लक्ष्मणपुरी, आणि आसावरी; शिवाय खट, रामकली, गुणकरी, सुगराई. बिलावलचे तीन भेद :– यमनबिलावल, कोकबिलावल व मियाचा बिलावल. सारंगाचेही भेद तीनच आहेत :- वृंदावनी, मधुमाध व गौड. मल्हाराचे पांच भेद आहेत :– मियाचा, गौड, सूर, मेघ, व देशी; शिवाय सोरट, धनाश्री, अहंग, मधुमाधवी, वगैरे. बाहाराचे भेद चार :– वसंताचा, बागेसरीचा, कानड्याचा व केदाराचा. यांशिवाय अनंतभैरवी, कांभोज, जयजयवंती, दीपचदी, खुरजन, गेहनावती, वगैरे बहुत राग असून ते केव्हां केव्हां म्हणावे याच्या जाणते लोकांनीं वेळा व ऋतु ठरविले आहेत. त्यांत मुख्य राग व रागिण्या यांत आमेज, धुन वगैरे भेद आहेत. गायनाच्या बाण्या चार आहेत :– नारद, तुंबर, रंभा व गंधर्व. शिवाय गोवर, हार खडार, डागर,

बिंद्राबनी वगैरे आहेत. यांस जे ताल असतात त्यांत आदिताल, चौताल, झंपा, बिलंदी, त्रिवट वगैरे नांवें आहेत. स्वर केवळ नादब्रह्म असून त्यांचे लगत चर्मतारादियुक्त अनेक वाद्यें कंठास साह्य करितात. मृदंग, सारंगी, सतार, सारमंडळ, बीन, ताऊस रुद्रवीणा वगैरे वाद्यें हीं गायनशास्त्रास आणखी साह्य करितात. ज्याचा अंतपारच नाहीं असें हें शास्त्र आहे. या संबंधानें मनुष्याची एक एका वाद्यांत चांगली गति होण्यास एकेक आयुष्य पाहिजे!

## २०६ नारायण व ब्रह्म शब्दांचा उपयोग

नारायण हें श्रेष्ठत्वदर्शक नांव पांच ठिकाणीं लावितात :- (१) अग्निनारायण, (२) वेदोनारायण, (३) व्यासोनारायण, (४) आपोनारायण, आणि (५) सूर्यनारायण, तसेंच ब्रह्म हें व्याप्तिदर्शक नाम नादब्रह्म, अन्नब्रह्म, आकाशब्रह्म, इत्यादि पदार्थांस लावून म्हणतात.

## २०७ घोड्यांचे रंग

घोड्यांचे रंग फार असतात. त्यांपैकीं कितीएक रंगांचीं नांवे : (१) कुमाइत अबलक, (२) मैला सबजा, (३) जरदा, (४) समन जरदा, (५) अष्टमंगळ, (६) शामकर्ण, (७) सुरंग, (८) चंपा जरदा, (९) श्रीखंड जरदा, (१०) चितोडा, (११) सारंगा, (१२) गांगा, (१३) मवा सुरंग, (१४) अबलक, (१५) तांबडा अबलक, (१६) सोनकळा बोर, (१७) काळा कुमाईत, (१८) बोर सुरंग, (१९) मोतिया सबजा, (२०) सफेद निळा. इ. याविषयीं शालहोत्र म्हणून एक ग्रंथ आहे. त्यांत त्यांची परीक्षा व औषधी लिहिल्या आहेत. त्याप्रमाणेंच घोड्याचे भोंवऱ्यांवरून त्याचे धन्यास लाभ व नाशाचें भविष्य करण्याच्या भ्रांतीही त्यांत फार लिहिल्या आहेत. कन्येचें घटित पाहण्याच्या मूर्ख चालींप्रमाणेंच हें एक आहे.

## २०८ सापांच्या जाती

सापांच्या अनेक जाती वेगळाल्या आहेत त्या :-साप, नाग, विरोळा, खड्यानाग, काळा-पिंवळा-शुभ्र-नाग, धामण, घोणस, आर, फरड, चुंडेल, जानेठा, मणिधार, दुतोंड्या, फुरसे, आधेले, अजगर, चितळा, नाणेठी, बीस खोपरा, हरणबाळा, कांडर, घो वगैरे. यांतील कांहीं निर्विष आहेत, व कांहीं सविष आहेत. पैकीं निर्विष साप फार आहेत म्हणूनच गांवोगांवीं बहिरोबा, देवी आणि मंत्री यांचे गुण येतात! सविष सर्पदंशावर कधींच कोणताही उपाय चालत नाहीं.

## २०९ पिशाचें

भुतांवर ज्यांचा विश्वास आहे ते त्यांमध्येंही अनेक वर्ग मानितात. जसे–ब्रह्मराक्षस, जखीण, खविस, समंध मार्का, लावसट, झोटिंग, हडळ प्रेत, इत्यादि. परंतु वस्तुतः हा सर्व भ्रम आहे असें तत्वज्ञान्यांचें व विचारी लोकांचे मत आहे.

## २१० ललित

उत्साहांत ललित करण्याचा सांप्रदाय आहे. त्याचा मुद्दा असा आहे कीं, ईश्वरभक्तीस्तव जीं सहा दर्शनें व छत्तीस पाखंडें निर्माण झालीं त्यांची फोड करून, जे ईश्वरप्राप्तीविषयीं खटपट करितात, त्यांजवर ईश्वरानें प्रसाद करावा असें हें ललितरूप नाटक करून दाखवून प्रार्थना करावी. हीं सहा दर्शनें एके ठिकाणी खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन केलीं आहेत :—

कापालिकश्च जैनश्च ब्राह्मणो जंगमस्तथा ।
संन्यासी च तथा सौरी षड्दर्शनमपि स्मृताः ॥

ललितांत सोंगें घेतात तीं :—कापालिक, भराडी, दाकोता, जोशी, भाट, ब्राह्मण, लेखक, पंडित, वासुदेव, गोंधळी, मानभाव, फकीर, जंगम गोसावी, नाथ, जती, रावळ, वगैरे. या सर्वांवर ईश्वरानें प्रसाद करावा अशी त्या ललिताचे शेवटीं प्रार्थना करितात.

## २११ अविद्या

जुन्या काळीं म्हणजे हजार पंधराशें वर्षांपूर्वी ऋषी होते तेव्हां विद्येची चर्चा या देशांत मोठी होती असें त्यांचे ग्रंथावरून दिसतें. ज्योतिष, वैद्यक, तर्कशास्त्रें व मोठ्या मोठ्या कविता या त्याकाळीं झाल्या; परंतु पुढें विद्येच्या नांवें अगदीं पुज्य पडलें. गृहस्थांस लिहिणें, वाचणें व हिशेब वगैरे येत. परंतु जुन्या ग्रंथांवरून मराठी भाषेंत उतरलेल्या भारत भागवताच्या कथा हेच काय ते त्या काळीं वाचनाचे ग्रंथ होते. याजमुळें खोट्या गोष्टी व खोटे भूगोल यांचे दृढतर समज लोकांचे अंतःकरणावर फार झाले. भिक्षुकांची विद्या पाहिली तर कांहीं वेदमंत्र पाठ करीत. अशा वेदपाठींस 'वैदिक' म्हणत, आणि शास्त्रांतील वाक्यें पाठ करणारांस 'शास्त्री' म्हणत; आणि हेच काय ते विद्वान म्हणून मानले असत. परंतु त्यांजमध्यें अर्थाविषयीं पूज्य असे. असा अनिष्ट काल बहुत दिवस चालला. भिक्षुक लोक जुन्या पोथ्या घरांत बाळगून त्या कोणास न दाखवितां मोठ्या गुप्त रीतीनें ठेवीत व ह्यामध्येंच त्यांस मोठी अब्रू वाटे. पूर्वीचे वैद्यांनीं कोणास औषध वगैरे न सांगता सर्व प्रकार गुप्त ठेवण्याचा प्रघात पाडला. परंतु हल्लीं इंग्रजी अमलांत हें सर्व अज्ञान जाऊन सर्व देशभर प्रकाश पडला आहे. पृथ्वीचे नकाशे व गोल चोहोंकडे प्रसिद्ध झाले; इतिहास लिहून त्यांचीं मराठी पुस्तकें करून सर्व मुलांकडून तीं वाचवितात व भूगोल वगैरे विद्या शिकवितात यांमुळें विद्वानांचीं संख्या वाढत आहे, असें दिसूं लागलें आहे. अमेरिका व विलायतपर्यंत लोक जाऊन बाहेर काय आहे हें पाहूं लागले, याजमुळें पूर्व अज्ञान दूर होत चालले; हें इंग्रजांच्या सहवासाचें फळ आहे. अज्ञान व भ्रम यांचें डोंगर या देशांत हिमालय व सह्याद्रीपेक्षांही मोठे झाले होते ते बसत चालले आहेत, हा एक इंग्रजी राज्याचा लाभ आहे.

## २१२ वेदोक्तजलप्रलयाची गोष्ट

यजुर्वेदाचें शतपथ ब्राह्मण याचे पहिले कांडांत सहावे अध्यायीं जळप्रळय झाला त्यांत ईश्वर-कृपेनें मनु वाचला व त्यास देवानें नावेंत बसवून संरक्षण केलें असें लिहिलें आहे. तें असें कीं:--

मानवे ह वै प्रातः अवनेग्यमुदकमाजर्हुर्यथेदं पाणिभ्यामवने

जना या हरन्त्येवं तस्यावने निजानस्य मत्स्यः पाणी आपेदे स हास्मै वाचमुवाद ॥१॥

बिभृहि मा पारयिष्यामि त्वेति कस्मान्मा पायिष्यसीत्यौघ

इमाः सर्वाः प्रजा निर्वोढा ततस्त्वा पारयितास्मीति कथं ते भृतिरिति ॥२॥

पुढें ही कथा बरीच लांब आहे. तिची प्रत भागवतात उतरली असून त्याच कथेचे आधारानें मनुमत्स्यसंवादरूप मत्स्यपुराण आहे. शिवाय हीच कथा नोहाचा प्रळय व नूहाचें (नोहाचें) तुफान म्हणून बायबलांत व कुराणांतही असून त्यांतील नौकेचें रक्षण वगैरेंचा तपशीलही सारखाच आहे ! तेव्हां या कथेचें मूळ कोठें म्हणावें ? वेदांत किंवा बायबलांत किंवा कुराणांत किंवा पुराणांत ? जगांतील बहुमतानें पाहिलें असतां वेदास प्राचीनत्व आहे, त्या अर्थी वेद हेच या कथेचे व शोधाचे प्रतिपादक असून बायबलवाले आणि कुराणवाले यांणीं तो कथाभाग यथाप्रत आपले पुस्तकांत उतरून घेतला आहे हें सिद्ध होतें.

## २१३ हिंदूंचे सण

हिंदुलोकांमध्यें अनेक प्रकारचे सण आहेत. जेव्हां सुकाळ असून खाण्यापिण्यास पुष्कळ होतें व कोणतीही फिकीर नव्हती त्या काळीं असे सण, अनेक यात्रा, जेवणावळी व अनेक उत्सव पुष्कळ असणें हे साहजिक आहे. आतां सणांच्या योजनेचेही निरनिराळे प्रकार व त्यांचीं कारणें आहेत तीं खालीं लिहिल्याप्रमाणें :–

(१) ऋतूचे आरंभी कांहीं सण आहेत. जसे–दिवाळी, होळी, संक्रांत व नारळी पौर्णिमा वगैरे.

(२) शेतीची मेहनत संपण्याचे आनंदाकरितां कांहीं सण आहेत. जसे–पोळा, चुडीपौर्णिमा, अक्षय्यतृतीया इ.

(३) मोठे मनुष्य व वीर पुरुष (ज्यांस अवतार असें म्हणतात) यांचे स्मरणार्थ कांहीं दिवस आहेत ते :– इंद्रास राज्याभिषेक झाला त्याबद्दल वर्षप्रतिपदा, रामजयंति, दसरा, परशुराम-जयंति, नृसिंहजयंती इ.

(४) नवीन पदार्थ पिकला म्हणून त्याचे उत्सवाकरितां सण आहेत ते :- नव्याची पौर्णिमा, तुळशींचे लग्न वगैरे.

(५) धर्मसंबंधानें कांहीं कल्पित कथानकावरून : – गणेशचतुर्थी, अनंतव्रत, वटपौर्णिमा, हरितालिका वगैरे.

## २१४ ईश्वरी शक्ति

ईश्वरी सृष्टींत त्या सर्व शक्तिमंताची योजना फार अचिंत्य व चमत्कारिक दृष्टीस पडते व याविषयीं जों जों विचार करावा तों तों मनव्यामोहित होतें. पहा–बाळाचे पोषणाकरितां त्याचे जन्माबरोबरच आईस दूध उत्पन्न होतें! प्रतिवर्षास पावसानें पाणी शुद्ध होतें व जेथें पाणी असतें तेथें त्यास साफ करण्यास वाळू असते. ही योजना विलक्षण केली आहे. पाण्यामध्यें मळ खालीं किंवा बाजूस टाकण्याची शक्ति तरी किती अप्रतिम आहे! असेंच आंब्याचे फळ प्रथम अगदी आंबट असतें परंतु पांच सात दिवसांत तीच सर्व साखर होते. ही ईश्वर रसायनक्रिया ईश्वरच जाणे!

## २१५ जगांतील स्त्रीपुरुषमर्यादा

जगामध्यें पुरुष व स्त्रिया सारख्याच असून त्यांच्या आयुष्याचें प्रमाण सरासरी ३३ वर्षांचे आहे असा शोधक लोकांनीं अजमास काढिला आहे. यांशिवाय आणखी असाही शोध काढला आहे कीं, जगांतील एकंदर वस्तीचा एक चतुर्थांश लोक १७ वर्षांच्या वयांतच मरतात. प्रत्येक हजारांत एकच मनुष्य शंभर वर्षें वांचतो व शेंकडा ६ मनुष्यें देखील ६५ वर्षांच्या उमरीस येण्याची मुष्कील पडते. पांचशें मनुष्यांत एकच मनुष्य ८० वर्षांपर्यंत वांचला तर वांचतो. पृथ्वी-वर शतकोट वस्ती आहे. त्यांतील प्रत्येक वर्षी ३,३३,३३,३३३ लोक मरतात. म्हणजे प्रत्येक दिवशीं ९१,८२४ किंवा प्रत्येक तासास ३,७३७ अथवा प्रत्येक मिनिटास ६० लोक मरण पावतात. शिवाय असाही शोध काढला आहे कीं, अविवाहितापेक्षां विवाहित मनुष्य जास्ती वांचतो. याच-प्रमाणें बाताबेतानें राहणाराही जास्त वांचतो. उंच मनुष्य ठेंगण्यापेक्षां जास्त टिकाव धरतो. स्त्रियांस पुरुषांपेक्षां पन्नास वर्षांपर्यंत आयुष्याचें मान अधिक असून पुढें कमी होत जातें. जे वसंत ऋतूंत जन्मतात ते बळकट असतात. त्याचप्रमाणें जन्म व मृत्यु हीं रात्रीपेक्षां दिवसास अधिक होतात. एका हजारांत ७५ लोकांचीं लग्नें झालीं असतात. तरी, एकंदर पुरुषांत हत्यारें घेण्याजोगे लोक एक-चतुर्थांशच मिळतील.

## २१६ टॉलमी व त्यानें काढलेला नकाशा

टॉलमी म्हणून एक प्रसिद्ध भूगोलशास्त्राचा तपास करणारा इ. स. १५० मध्यें हिंदुस्थानांत आला होता. त्या वेळेस या देशाचा जो नकाशा केला आहे त्यांत नासिक, पैठण, व चौल वगैरे स्थळें लिहिलीं आहेत. टॉलमी हा मिश्र देशांत राहात असे. ह्याचप्रमाणें फार पूर्वी हुएनत्संग ह्मणून एक चीनचा प्रवासी येथें आला होता. व त्यापुढें अलबिरुणी मसूदी ह्या नांवाचा आरब विद्वान हा ११०० इसवींत आला होता. त्याचेही या देशाच्या संबंधाचे लेख इतिहास पाहण्यास फार उपयोगीं आहेत.

## २१७ व्यास

आदिपर्वांत व्यास या नावाची उत्पत्ति अशी दिली आहे कीं :–

विव्यास वेदान्यस्मात्स तस्माद्व्यास इति स्मृतः ॥
यो व्यस्य वेदांश्चतुरस्तपसा भगवानृषिः ।
लोके व्यासत्वमापेदे कार्ष्ण्यात्कृष्णत्वमेव च ॥

परंतु व्यास बहुत झाले असे लेख असून तें खरेंही असेल. कारण, पुराणांतून उलट पालट अशीं जीं पुष्कळ क्षेपक वचनें आढळतात, त्यांजवरून दुसरे व्यास होऊन त्यांनींच ती अदलाबदल केली असेल. तरी पुराणाचे लेख २४०० वर्षांपलीकडील असावे असें अनुमान होतें.

## २१८ तामस पुराणें व स्मृति

जीं पुराणें व ज्या स्मृति तामस असतील त्या टाकाव्या असें वैष्णवाचें मत आहे. यास प्रमाण :–

किमत्र बहुनोक्तेन पुराणेषु स्मृतिष्वपि ।
तामसा नरकायैव वर्जयेत्तान्विचक्षणः ॥

## २१९ ढोंगी लोक

भाकितें सांगणारे देव व देवऋषी पुष्कळ प्रसिद्ध आहेत; मंत्र व अनुष्ठानें करणारे ढोंगीही पुष्कळ आहेत; व भूतप्रेतांची बाधा काढणारे पंचाक्षरी, भगत व जाणते ही मंडळीही बहुत आहे. शिवाय किमया करणारे असतात ते तांबें कथील यांचें सोनें रुपें करतों असें म्हणून फसवितात. त्याचप्रमाणें भूमींत पुरलेलें द्रव्य काढून देणारेही पुष्कळ आहेत. अहमदाबादेंत जार्डिन साहेबांच्या विधवा मडमेला एक बाई तिचे विहिरींतून द्रव्याच्या घागरी काढतें असें ह्मणून तिजकडून हजार रुपये खाऊन गेली. पुढें तीस दीड वर्षांची शिक्षाही झाली. असेच मुहूर्त, शकुन, व ग्रहबाधा सांगणारेही भोळ्या लोकांस भुरळ घालतात. कितीएक तर गुरुमंत्र देऊन लोकांपासून द्रव्य काढतात; कितीएक मांत्रिक असतात ते दृष्टीचा, उसणीचा, मूठ मारण्याचा, घुसळणीचा, गुराचें दूध उडविण्याचा वगैरेंचे अंगारे देऊन व मंत्र जपून लोकांस भ्रम घालून पैसा घेतात. संतती देणारे फकीर, पीर व बीर प्रसन्न करणारे अवलिया व ताईत, पेट्या देणारे बोवा हे तर सर्वत्र प्रसिद्धच आहेत, आणि शिंक पाहणें व पाल किंवा दिवा पडला तर त्याजवरून भविष्य काढणें वगैरे प्रकारची भुरळ घालणारी मंडळीही दुनयेंत ठिकठिकाणीं बहुत असून त्यांच्यापासून फारच सावध राहिलें पाहिजे. कोणी बाण व शालिग्राम गिळून व कोणी कांच खाऊन सिद्धाई दाखवितात, व कोणी रफई साहेबाचे चेले म्हणवितात. परंतु या सर्व गोष्टींस अनुभव, तर्क, पंचेंद्रियें आणि विचार हीं साक्षी देत नाहींत. शिवाय हीं कामेंही गुप्त चालवितात व त्यांस रात्र व भोळीं माणसें असलीं म्हणजे तर फसविण्यास चांगलेंच फावतें. ह्याप्रमाणेंच कितीएक गोष्टींविषयीं पाहिलें असतां फक्त त्यांच्या नांवांच्या शब्दावरून अर्थाचे अनर्थ झालेले दृष्टीस पडतात. शाबरी विद्या व तसेंच इंद्रजाल म्हणून जादूचे व अनेक चमत्कारांचे ग्रंथ असून त्यांविषयींच्या बहुत आख्या सर्व लोकांत पसरल्या आहेत. शाबरी विद्येवरूनच गुजराथेंत असणाऱ्या साबरमती नामक नदीचे नांवांत 'साबर' हीं अक्षरें असल्यामुळें लोकांनीं असें ठरविलें कीं, शाबरी मंत्रानें ही नदी उत्पन्न झाली ! व असा भ्रम बहुतांस आहे !! परंतु वस्तुतः पाहिलें असतां पर्जन्यादि कारणांनी नद्या उत्पन्न होतात. याचप्रमाणें याही दोन नद्या मिळून एक साबर-मती नदी झाली आहे. त्यांत एकींचें नांव साबर व दुसरीचे नांव मती. हीं दोन्ही नांवे मुळा मुठा नदीच्या नांवाप्रमाणें एकत्र होऊन चालतात. याचप्रमाणें तित्तिर म्हणून एक वैशंपायनाच्या शिष्याचें नांव होतें तो जी शाखा पढला तीस तैत्तिरीय शाखा

असें म्हणतात. तित्तिर हें एका पक्ष्याचेंही नांव आहे. त्याजवरून तित्तिरपक्ष्यांनीं ती शाखा गिळिली, वगैरे बाष्फळ गोष्टी प्रसिद्ध झाल्या ! रोम म्हणून पूर्वी एक मोठी बादशाही तक्ताची जागा होती परंतु 'रोम' या शब्दाचा अर्थ 'केश' असाही होतो व इतक्यावरूनच गाईचे केश पडून त्यांचीं माणसें होऊन त्यांनीं शहर वसविलें आणि त्याचें नांव रोम ठेविलें, अशी कल्पना केली ! नाग म्हणून एक जात असून त्यांचीं नागपूर वगैरे शहरें होतीं. परंतु 'नाग' शब्दाचा अर्थ 'सर्प' ही होतो, व इतक्यावरूनच नागकन्या म्हणजे सापाच्या कन्या आणि त्यांशीं मनुष्यांचीं लग्ने झालीं, वगैरे कथा उत्पन्न झाल्या ! मावळांत ताप आला म्हणजे कागदाचा ताव जाळतात आणि म्हणतात कीं, ताव जाळून टाकला ह्मणजे ताप जाईल ! ही फक्त नांवांवरून भ्रांति झाली. अशा अनेकार्थी नांवांवरून अनेक भ्रांती उत्पन्न होऊन अर्थांचे अनर्थ झाले आहेत !

### २२० अघटित कल्पना

पूर्वापार अघटित कल्पना लोक करीत आले आहेत. पांडवांस सूर्यानें स्थाली म्हणजे तपेली दिली होती व तींतून प्रार्थिला जिन्नस निघून मोठाल्या मेजवान्या होत ! परिसाच्या गोष्टी तर पुष्कळ प्रसिद्ध आहेत. बदरीनारायणाची मूर्ति परिसाची आहे व तिला पूर्वी, पंढरीच्या विठोबाप्रमाणें सर्व भक्तमंडळी शिवून नमस्कार करीत असे. परंतु एका काळीं एका सोनाराचे हातांतील लोखंडाची अंगठी, तो नारायणाचें दर्शन करून बाहेर आला असतां सोन्याची झाली व लोखंडाचें सोनें होणे हा पूर्वप्रसिद्ध आख्येप्रमाणें परिसाचा गुण होय असें समजून आपली आंगठी नारायणाचे पायाशीं घांसली गेल्यामुळें हें सोनें झालें असा त्या सोनारानें तर्क बांधिला. पुढें त्यास हें अदृष्टपूर्व सुवर्णोत्पादक रसायन प्राप्त करून घेण्याची इच्छा उत्पन्न होऊन दुसऱ्या वेळेच्या दर्शनास त्यानें संधि राखून नारायणाच्या एका पायाची करंगळी कापून घेतली ! त्याबरोबर देवाच्या पायांतून रक्ताचा स्राव चालला व हें दुष्टकृत्य उघडीस आलें आणि तेव्हांपासून त्या देवास पुजाऱ्याशिवाय इतरांनीं शिवण्याची बंदी झाली, अशी गोष्ट भोळ्या लोकांत प्रसिद्ध आहे.

### २२१ ईश्वरप्रार्थना हेंच औषध

फकिराप्पा लिंगाइत वकील निसबत सदर अदालत व रामचंद्र नरसिंह सोलापूरकर क्लार्क पोस्ट आफिस, हे मुंबईस बहुत दिवस राहतात. परंतु ते कोणत्याही प्रकारचें औषध न घेतां, त्यांस व्याधि झाला तर ते देवाची प्रार्थना करून तीर्थ घेतात म्हणजे झालें व त्याजवर त्यांचा निर्वाह होत आहे ! असे कांहीं नैष्ठिक व एकविचाराचे लोक या जगावर आहेत !

### २२२ व्याख्याते व उपदेशक

सन १८५५ सालीं विष्णुबोवा गोखले ब्रह्मचारी हे मुंबईत उपदेश करूं लागले. त्यांनीं कांहीं ग्रंथ केले आहेत. हे पूर्वी जकातखात्यांत कारकून होते व पुढें तपस्वी होऊन उपदेशक झाले. हेच प्रथमचे उपदेष्टे. हे चांगले वक्ते होते. याचप्रमाणें प्रथमतः वाईकर महादेव गोविंद शास्त्री कोल्हटकर यांनीं सभेंत उभें राहून भाषण करण्याची रीति प्रकट केली व भाषणसंबंधानें त्यांचा जो मोठा लौकिक आहे, तो अद्यापि चालत आहे. असेच सोलापूरकर गणेश बाबाजी माटे वकील यांनीं कथा करून स्वदेशाभिमानाचा व स्वदेशकल्याणाचा उपदेश करण्याची प्रथम रीति चालविली. त्यांचे कथेचाही असाच लौकिक आहे. यांशिवाय गोविंद बाबाजी जोशी वसईकर, नासिकचे श्रीधर गोपाळ पट्टेकर, अण्णा सोवनी पुणेंकर, मुनशी शेख हुसेन वल्लद शेख चांद जुन्नरकर व विष्णुपंत बापट निगडीकर या पांच जणांनीं रस्त्यांत उभें राहून धर्म, व्यवहार व नीति यासंबंधीं भाषण करण्याची रीति चालविली. आणि गणेश वासुदेव जोशी व गोपाळराव नरसिंह देशपांडे इंदापूरकर हे लोकस्थिति सुधारण्याविषयी उत्कंठापूर्वक सार्वजनिक सभेचे पुरस्कर्ते होऊन तेही मोठमोठ्या सभेंत व दरबारांत भाषण करण्याविषयीं कुशल व तत्पर होते. या देशांत दैवयोगाने

पार्लमेंट सभा होऊन सरकारी कारभार प्रजेच्या संमताने चालावा असा पुढें कधीं प्रसंग येईल तर अशा लोकांचा अतिशय उपयोग होईल. पंडित स्वामी दयानंद सरस्वती हेही धर्मसंस्थापक आचार्य बनून सर्व देशभर धर्मोपदेश करीत फिरत होते. त्यानीं ठिकठिकाणीं आर्यसमाज स्थापन केले असून त्यांचे मतें वैदिकधर्मप्रतिपादनानें इतर धर्मीयांचे वखेडे मोडावे म्हणून त्यांची सक्त मेहनत चालली होती. त्यांची निस्पृहता, विद्या व वक्तृत्व हीं फार अलौकिक होतीं. असे लोक सार्वजनिक कामें करितात; परंतु त्यांस लोकांकडून अतिस्वल्प साह्य मिळतें. त्यामुळें त्यांचा निर्वाहही चांगले रीतीनें होत नाहीं, ही गोष्ट मोठी दुःखाची आहे. सार्वजनिक हितकर्ते, देशाभिमानी लोक व धर्मोपदेशक यांस युरोपियन व अमेरिकन लोक फार साह्य करितात व लक्षावधी रुपये त्यांस देतात. हें उदाहरण समक्ष असतां आपले लोकांची उदासीनता पराकाष्ठेची आहे. असें कां असावें बरें?

### २२३ लांचेची बंदी

कंपनी सरकारचे गुमास्ते पैसा फार घेऊन शिवाय इकडील राजेरजवाड्यांकडून नजरा फार घेऊं लागले, म्हणून १७६४ पासून लांच न घेण्याचा करार लिहून घेण्याचें ठरलें व हेंच सनदी नौकर लोकांचें मूळ होय.

### २२४ कावसजी पाटील पार्शी

मुंबईत कासवजी पाटलाचे तळें प्रसिद्ध आहे. सवाई माधवराव यांच्या जन्माचे सालीं इंग्रजांनीं ठाणे, साष्टी, वसई वगैरे घेतलो. तेव्हां तेथील पेशव्याचा सुभेदार आनंदराव विवलकर हा पुण्यास पळून गेला त्या वेळीं इंग्रजांनीं साष्टीची पाटिलकी कावसजीशेट यांजकडे सांगितली असून त्यानीं तेथें बहुत वर्षेपर्यंत रिव्हिन्यू, कोतवाली व न्यायाधिशी हे सर्व अम्मल चालविले.

### २२५ बाबाजी तुळशीराम सोनार

बाबाजी तुळशीराम सोनार ह्या नांवाचा एक मनुष्य निरानरसिंगपूरचा राहणारा होता. हा पुरुष मोठा बळकट होता. त्यानें अहमदाबाद येथें बेचरदास यांचे धर्मशाळेंत मिस्तर बारोडेल कलेक्टर साहेब यांचेसमक्ष तारीख ३ आगष्ट सन १८६८ रोजीं जे शारीरशक्तीचे चमत्कार दाखविले ते येणेंप्रमाणे होते :—

(१) हातानें कवड्या चुरल्या.

(२) नारळ डोकीवर मारून फोडले व काहीं नारळ बुक्या मारून फोडले.

(३) पानाच्या विड्या बोटांत घालून अडकित्यासारख्या कापल्या.

(४) दोन बोटांएवढी जाड सुताची रश्शी तोडली.

(५) हातांत पाण्यानें भरलेल्या दोन घागरी, डोकीवर मनुष्य बसलेला व एक पाण्यानें भरलेला पक्के चार मणांचा हांडा त्यास दोरी लावून तो दांतानें धरून उचलला.

(६) मोठी लोखंडाची कांब हातानें लवविली.

हें त्या मनुष्याचें सर्व कृत्य पाहून सर्वांस फारच चमत्कार वाटला!

### २२६ पुनर्विवाहप्रतिपादक

विधवेचा पुनर्विवाह करावा व तो सशास्त्र आहे असें प्रतिपादन मुळीं विष्णुशास्त्री बापट यांणीं पुणें येथें १८४० सालीं केलें. त्यानंतर कलकत्त्यास १८५५ सालीं ईश्वरचंद्र विद्यासागर पंडित यांणीं केलें. व त्यानंतर मुंबईत विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांणीं १८६३ सालीं केलें. या त्रिवर्गाचे त्याविषयीं बहुत ग्रंथ असून या कामाची कीर्ति म्हणून फक्त उभय पंडितांस आहेच.

### २२७ कृष्णंभट पुराणिक

विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांनीं कृष्णंभट गोखले पुराणिक यांस पुण्यांत १८६७ सालीं विचारिलें कीं, 'कलीमध्यें पुनर्विवाह चालण्यास हरकत काय आहे?' तेव्हां पुराणिक बोलले कीं,

'काहीं हरकत नाहीं; परंतु जो पुनर्विवाह करील त्यानें रीतिबाहेर चाललों हें समजून जास्ती धर्मिष्ठपणानें राहिलें पाहिजे. त्यानें धाराग्नि वगैरे ठेवून धार्मिक बुद्धीनेच लग्न केलें असें दाखविलें असतां आम्हीही त्याचे घरीं जेवूं. परंतु पुनर्विवाह करणारे उनाडपणा करितात. याजमुळें लोकांस त्याविषयीं धर्मबुद्धि उत्पन्न होत नाहीं व त्यामुळें तक्रार पडते, इतकेंच तात्पर्य आहे.'

## २२८ भिकोबा जोशी साष्टीकर

मुंबईस प्रथम पुनर्विवाह झाला तेव्हां भटांनीं आपले रोजगार पिकविण्याकरितां जिकडे तिकडे ग्रामण्यें उभीं केलीं. ह्या लोभी व दुष्ट भटांनीं दूर दूर पर्यंत डांका पाठविल्या व थोतांडें उभीं केलीं; परंतु ठाणें येथें ब्राह्मणांत प्रमुख भिकोबा जोशी म्हणून आहेत त्यांनीं आपले गांवीं पत्रें आलीं तीं तशींच बांधून ठेवून ग्रामण्य म्हणून होऊं दिलें नाहीं व सर्व स्वस्थतेनें व्यवहार चालविले. असें हें एकच गांव सर्व हिंदुस्थानांत आढळेल. याजवरून सुज्ञ लोक जेथें आहेत तेथें मूर्खांनीं कसेही व कितीही दुष्ट उद्योग केले तरी बंडाळी उत्पन्न होत नाहीं.

## २२९ विद्यार्थ्यांची लोकहितबुद्धि

केवळदास वाणी यानें अहमदाबाद येथें दिवाळी नांवाच्या विधवेशीं पुनर्विवाह केला. पुढें तिला रोग होऊन ती तारीख १ अक्टोबर सन १८७६ रोजीं मृत्यु पावली. तेव्हां तिला नेण्याची मोठी अडचण पडली. परंतु ट्रेनिंग स्कूलांतील विद्यार्थ्यांस हें वर्तमान कळतांच त्या सर्वांनीं जाऊन तिचें दहन केलें. असा ह्या मुलांचा लोकहिताविषयीं कळवळा पाहून शहरचे सर्व लोक आश्चर्य पावले!

## २३० सुधारलेले मागें हटले!

कितीएक दिवसपर्यंत कांहीं मनुष्यें सुधारणुकेचें कामीं अगदीं पुढारी असतात, परंतु पुढें त्यांचे बुद्धीचा पालट होऊन ते मागें हटून पुनः धर्मभोळ्या लोकांप्रमाणें वर्तूं लागतात. याचीं उदाहरणें : भास्कर दामोदर पाळंदे, सदाशिव बल्लाळ, गोंड्ये, बापू रावजी मांडे, जनार्दन सखाराम गाडगीळ, वगैरे आहेत. असा पालट होण्यास वास्तविक काय करणें असतील तीं असोत.

---

# कितीएक उपदेशपर गोष्टी

## २३१ स्थावर व जंगम तीर्थें

एक मुलगा आपल्या आईबापांची वृद्धावस्था झाल्यामुळें त्यांची सेवा करीत असतां एके दिवशीं त्याचा शेजारी काशीस जाऊं लागला. तेव्हां तो त्यास म्हणाला कीं, 'तूं माझेबरोबर काशीक्षेत्रास येतोस का?' त्यानें उत्तर दिलें, 'तीर्थें दोन प्रकारचीं आहेत; एक जंगम आणि दुसरे स्थावर. त्यांत जंगम तीर्थें विशेष पूज्य आहेत, आणि स्थावर तीर्थें साधारण आहेत. म्हणजे आई, बाप, बायको, गुरु, पुत्र, आचार्य हीं जंगम तीर्थें, यांची सेवा करणें ही मोठी यात्रा; आणि नद्या, क्षेत्रें, देवालयें, हीं स्थावर किंवा जड तीर्थें. यांचीं यात्रा ज्यांस जंगम तीर्थें नसतील त्यांनीं करावीं असें आहे. याजकरितां मला काशीस जाण्याचें प्रयोजन नाहीं.' हें ऐकून शेजारी यास चांगला बोध झाला!

## २३२ दुर्योधनाचा आग्रह

युद्धाचे पूर्वीं शेवटचा निरोप घेऊन श्रीकृष्ण दुर्योधनाकडे गेले आणि पांडवांकरितां पांच गांव मागून म्हणाले कीं, इतकें दिलें तरी पांडवांची समजूत पडेल!' ते पांच गांव हे होते :—

इंद्रप्रस्थं यमप्रस्थं जयंतं वारुणावतम् ।
देहि मे चतुरग्रामान्पंचमं हस्तनापुरम् ॥

ह्या पांच गांवांचीं हल्लींची नांवें :-- दिल्ली, कलकत्ता, जयपूर, प्रयाग आणि पाणिपत हींच होत असें म्हणतात. परंतु दुर्योधनानें सांगितलें कीं, 'सुईचे अग्रावर बसेल इतकी मृत्तिकाही येथें मिळावयाची नाहीं!' भाऊबंदकीच्या कब्जेकफावतींचा हाच उगम दिसतो, व प्रस्तुत तर तो सर्वत्र अनुभवास आहे!

## २३३ कलावंतिणीचें योग्य मत

काशींत एक पंडित एका कलावंतिणीचे घरासमोर बिऱ्हाडास राहिला होता. एके दिवशीं त्या कलावंतिणीचे घराखालून एक प्रेत गेलें, तेव्हां तिनें आपले दासीला सांगितलें कीं, 'हा मेलेला मनुष्य स्वर्गास गेला किंवा नरकांत गेला, याचा तपास करून ये.' हें पंडितानें समोरचे माडींतून ऐकिलें. तेव्हां तो मोठा आश्चर्ययुक्त झाला. त्यानें कलावंतिणीस विचारलें कीं, 'हें जें तूं म्हटलेंस, याचा अर्थ काय? व हें तुला कसें समजतें? तें मला सांग.' तेव्हां ती म्हणाली :--

जिसनें जगमें खुल्ककों राजी रखा ।
बस वोही मर्जी खालिकमे रहा ॥

म्हणजे, 'ह्या पृथ्वीवर त्याविषयीं लोकांत जी वार्ता असेल तिजवरून मी त्याचे गतीची परीक्षा करितें.' हें तिचें उत्तर ऐकून पंडित मनांत फार आश्चर्य पावला!

## २३४ अडक्यास हत्ती

एका गृहस्थाकडे एक हत्ती विकावयास आला व हत्तीवाला म्हणाला कीं, 'मी एका अडक्यास हा हत्ती देतों.' हें ऐकून त्या गृहस्थाचे मुलानें आग्रह केला कीं, 'हा हत्ती घ्यावाच.' तेव्हां गृहस्थ म्हणाला कीं, 'आपल्यास हत्ती नको.' पुढें कांहीं काळानें तो गृहस्थ फार श्रीमंत झाला, त्या काळीं दुसरा एक हत्ती विकावयास आला व या हत्तीवाल्यानें त्याची किंमत पांच हजार रुपये सांगितली. तेव्हां गृहस्थ म्हणाला कीं, 'मुला, आतां हा हत्ती घे.' तेव्हां मुलगा म्हणाला, 'बाबा, अडक्यास हत्ती मिळत होता त्यावेळेस तो तुम्हीं घेतला नाहीं, आणि आतां त्याची किंमत पांच हजार रुपये सांगतो तरी म्हणतां कीं स्वस्त आहे. याचें कारण काय?' तेव्हां बाप म्हणाला, 'बाबारे, त्या काळीं आपल्यास अडक्याची किंमत पांच हजारांपेक्षां जास्ती होती! यास्तव घेतला नाही!'

## २३५ एका म्हाताऱ्याचे योग्य विचार

एक नव्वद वर्षांचा म्हातारा आंब्याचीं झाडें लावीत होता. त्यास लोकांनीं विचालें कीं' 'म्हातारे बाबा, हीं झाडें तुम्हीं लावतां त्यांस फळें येऊन तुम्हीं खाण्याची उमेद धरतां कीं काय?, तेव्हां त्याने उत्तर दिलें कीं, 'मी आजपर्यंत लोकांनीं लावलेल्या झाडांचीं फळे खात आलों. तशीं मीं लावलेल्या झाडांचीं फळें लोक खातील. सर्व उद्योग, आपले पोटावरच नजर देऊन पूर्वी लोकांनीं केले असते तर मीं जीं आजपर्यंत फळें खाल्लीं, तीं मला कोठून मिळालीं असतीं? याजकरितां जगताचे कल्याणावर नजर देऊन मी हें काम करीत आहें!'

## २३६ बिरबलाचें योग्य उत्तर

अकबर बादशाहानें बिरबलास सांगितलें कीं, 'पूर्वी जसे भारत झालें तसा आमचे हकीकतीचा एक ग्रंथ तयार करावा.' त्याजवर बिरबल बोलला कीं, 'ही गोष्ट होण्यास एक अडचण मोठी दिसते. ती अशी कीं, द्रौपदीस पांच भ्रतार होते त्याचें कसें करावें?' तेव्हां बादशाह बोलला कीं, 'तर त्याची गरज नाही!'

## २३७ अकबर व एक पंडित

अकबर बादशाहाकडे एक पंडित गेला असतां त्यास बादशाहानें दोन मोहरा दिल्या व पंडितानें त्या आपले शिष्याचे हातीं दिल्यानंतर बाहेर जातां जातां शिष्य म्हणाला कीं, 'येवढ्यानें काय होतें?' तेव्हां पंडित बोलला:—

'शाकाय वा स्थाल्लवणाय वा स्यात्.'

तें कोणी जवळच्या मनुष्यानें ऐकून त्याणें बादशाहास सांगितलें कीं, 'पंडित असें बोलले' तेव्हां बादशाहानें पंडितास बोलावून आणून विचारलें कीं, 'तुम्ही काय बोलला?' पंडित बोलले कीं, 'माझा शेवटचा चरण कोणीं ऐकून तुम्हास सांगितलें असेल. आपण सर्व श्लोक ऐकिला तर आपणास मीं काय म्हटलें तें कळेल.' बादशाहा म्हणाला कीं, 'तुम्हीं कोणता श्लोक शिष्यास सांगितला?' तेव्हां पंडितांनीं लागलेच मागील तीन चरण नवीन जोडून सांगितले:—

दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथं पूरयितुं समर्थः।
अन्येयन केनापि नृपेण दत्तं शाकाय वा स्थाल्लवणाय वा स्यात्॥

## २३८ अकबरबादशाहाच्या कांहीं गोष्टी

अकबर बादशाहा राज्यावर स्थापन झाल्यावर २४ वर्षांनीं म्हणजे इ. स. १५८० त, त्याचे धर्मसंबंधी विचार फिरले. त्याचा इतिहास अबदुल कादर मलुकशा बीदोणी यानें 'मन्त खाबुत् तवारिख' (संक्षिप्त इतिहास) या ग्रंथांत लिहिला आहे. त्याजवरून असें दिसतें कीं, अबू फाजिल व फेजी वगैरे जे बादशाहाचे कृपेंत होते त्यांचा हा ग्रंथकार सोबती होता. यानें भारत, रामायण व राजतरंगिणी इत्यादि ग्रंथाचे फारशी भाषेंत तरजुमे करण्याला बहुत मदत केली. अकबर बादशाहा हा आग्र्याजवळ फत्तेपूर सिकरी येथें एक मोठासा महाल बांधून राहिला होता. त्या ठिकाणीं नित्य विद्वान लोकांची सभा होत असे. या बादशाहानें मुसलमान पंडित, ब्राह्मण पंडित, पाद्री व नवसरी येथून दस्तुरजी नांवाचे पार्शी गृहस्थ असे जवळ ठेविले असून ते सर्व तेथें जमत व बादशाहाचें समक्ष व्याख्यानें देऊन त्यांचीं संभाषणें चालत. कधीं कधीं हीं भाषणें चाललीं असतां उजाडेही! असें होतां होतां बादशाहाची मुसलमानी धर्मावरील श्रद्धा उडत चालली, व तो म्हणूं लागला कीं, 'ईश्वरदत्त पुस्तकें, साधु व करामती ह्या तिन्ही गोष्टी सर्व धर्मांमध्यें असून, वेगळाले पंथही सर्व धर्मांमध्ये आहेत.' त्याशिवाय, सुनी व शिया वगैरे लोकांचे तंटे याजसमोर इतके चालत कीं, ते परस्परांस नास्तिक म्हणत व वाईट बोलत. तों तों त्यास त्या उभय मतवाल्यांचा पोकळपणा व धर्माविषयीं दुराग्रह व्यक्त होऊं लागला. बादशाहा म्हणे कीं, 'अधर्म व पाप हें सर्व धर्माध्यक्ष समजतात, मग इतका आग्रह लोक कशाकरितां धरतात?' असें त्यास वाटून आपण नवा धर्म स्वीकार करावा असें त्याचे मनांत आलें. पुढें तो पुराणिकांकडून पुराण श्रवण करूं लागला. त्याच्या हिंदु बायका होमहवनें करीत, त्यांत बादशाहाही सामील होऊं लागला. पुनर्जन्म, व हिंदुशास्त्रांतील सूर्य व अग्नि हीं दैवतें त्यास खरीं वाटूं लागलीं. तेव्हा त्याच्या तर्फेचे लोकही त्यास पुष्टीकरण करूं लागले. तरी कितीएक मुसल्मान आग्रही होते ते रुसून गेले व कितीएकांनीं तद्विषयक लहान लहान पुस्तकें लिहिलीं. परंतु कित्येकांनीं बादशाहाच्या मताचेच पुष्टीकरणार्थ कांहीं ग्रंथ लिहिले. त्यांत सुफी महजब जाणणारे ताजुद्दीन साहेबही अनुकूल होऊन राजा बिरबल व अबू फाजिल, फेजी, खानखानम, वगैरे मुख्य प्रधानही 'बादशाहाचाच पक्ष योग्य आहे' असें बोलूं लागले. 'राजा हाच किबला व काबा आहे व त्याचा हुकूम तोच ईश्वराचा हुकूम' असेंही ते म्हणूं लागले. या बादशाहाचे पदरीं राजा बिरबल हा विलक्षण हजरजबाबी मनुष्य होता. त्यास बादशाहानें मलिकुषोरा असा किताब दिला असून त्याजकडे नागरकोटचा किल्ला व शिवाय महाल जाहगिरीही होत्या. त्यास काबूलचे स्वारीवर पाठविलें

असतां त्यांत तो पडला. बादशहानें नौरोज जलाली म्हणून एक नवीनच सण केला. त्याचा सात दिवस उत्साह असे. दस्तुरजी या पारशी पंडितांनीं तर सूर्य व अग्नि हेच देव असून त्यांत सूर्य तर अगदीं निरुपद्रवी व अतिशय उपयोगी अशी ईश्वराचे दयेची प्रतिमा आहे, यास्तव त्याचेंच भजन बादशाहाचे मनांत उतरून दिलें. व त्याजवरून बादशाहा हा प्रातःकाळीं व सायंकाळीं सूर्याची स्तुति करूं लागला. तो रक्षाबंधन व कधीं कधीं तिलकही करी. शेवटीं मुसलमानी धर्माची निंदा दरबारांत फार होऊं लागली. बादशाहाचे मतास जो विरुद्ध असें दाखवी त्याजवर त्याची अवकृपा होऊं लागली. तथापि मुसलमानी धर्मही कधीं कधीं बादशाहा मानीत असे. त्याणें अजमीर येथें खाजे बंदनावज याची यात्रा केली; व त्या वेळेस तो पांच कोश पायांनीं चालला. त्यानें आपले वाड्याजवळ खाजेचिस्ती याची मशीद बांधली. ती तर अत्युत्तम असून अद्यापि आहे. पुढें त्यानें, 'हिंसा करूं नये' असा हुकूम करून गोवध बंद केला. व त्याचप्रमाणें सती जाण्याची बंदी केली. चवदा वर्षांनंतर मुलीचें लग्न व्हावें, पुरुषानें एका स्त्रीशीं मात्र लग्न करावें, असें फरमान पाठविलें. तेव्हां ब्राह्मण लोक त्यास अवतारी पुरुष व गोब्राह्मणप्रतिपालक असें म्हणूं लागले. त्याचे मतास पुष्टि आणण्याकरितां ब्राह्मणांनीं 'अल्लोपनिषद्' रचिलें. तो असें म्हणू लागला कीं, 'मुसलमानी धर्माचें आयुष्य काय तें हजार वर्षे आहे.' व तीं वर्षे भरलीं. यास्तव त्यानें हिजरी शक बंद करून 'तारिखइलाही' म्हणून एक नवाच शक सुरू केला. त्याच-प्रमाणें त्यानें 'लाइल्ला इलिल्ला महंमद रसूल अल्ला' असे शब्द होते, ते बदलून 'बल्लअकबर खलीफ दुल्ला' असे जोडले. त्यानें आपल्या या नवीन धर्माचें नांव 'दिनइलाही' असें ठेविलें. लोकांस सलामाचे ठिकाणीं 'अल्लाह अकबर' व त्याचा जाब 'जिलजलालहू' असें म्हणण्यास सांगितलें. त्यानें आपले वाड्यांत मुसलमानांचे अपवित्र पशु जीं डुकरें व कुत्रीं तीं ठेविलीं व आपला मुलगा सेलिम (पुढें जहानगीर) याचें लग्न राजा भगवानदास याचे कन्येशीं हिंदूरीतीनें लाविलें. त्या मुलीस दोन कोट रुपये स्त्रीधन दिलें. त्या लग्नाची वरात वगैरे बादशाह व राजा यांणीं स्वतः फिरून मिरविली, व त्यावेळीं त्याचे बायकांनीं कपाळीं कुंकू लावून त्यानें तिलक केला होता. याप्रमाणें बहुतांनीं नवीन धर्म कबूल केला. बादशाहाचे घरीं संक्रांतीचे दिवशीं मोठा उत्साह होऊं लागला. त्यानें आपल्या तसबिरा काढून लोकांस वांटल्या. त्यानें आपले वाड्याजवळ जोगी यांचा आखाडा ठेविला होता. शेख कमाल बीयाबानी यास खेचरी विद्या म्हणजे आकाशांत चालण्याचें सामर्थ्य आहे अशी प्रसिद्धि होती, म्हणून त्यास अकबरानें बोलावून आणून 'ती विद्या मला शिकीव' असें सांगितलें. परंतु ती तो सांगेना म्हणून त्याचे हातपाय बांधून त्यास नदीत टाकण्यास सांगितलें. आणि 'खेचरविद्या असली तर तो आकाशांत जाईल व नसली तर अशा खोट्या पाखांड्याला शिक्षा होईल' असें ठरविलें. तेव्हां तो फकीर कबूल होऊन, 'ही गप्प शिष्यांनीं उठविली व ती खोटी आहे' असें सांगूं लागला. मुसलमानांचे कुराणांत असें लिहिलें आहे कीं, 'जितकीं मुलें जन्मतात तीं सर्व मुसलमानी धर्मावर जन्मतात परंतु पुढें आईबापांचे संगतीनें अन्य धर्मांत जातात.' यास्तव बादशाहानें कित्येक लहान मुलें जमा करून चार पांच वर्षे त्यांस एका जागीं ठेवून 'त्यांजवळ कोणीं बोलूं नये' असें सांगितलें. पुढें तीं मुलें मोठीं झालीं तेव्हां तीं सर्व मुकीं झालीं. म्हणून त्या जाग्याचें नांव 'मुंगामहाल' असें ठेविलें, व कुराणांतील वाक्य अगदीं अप्रमाण असें प्रसिद्ध केलें त्याणें सर्वांचें धर्माप्रमाणें ज्यांणीं आपलीं देवळें वगैरे बांधावीं म्हणून परवानगी दिली. त्याचप्रमाणें सुंता करणे ती बारा वर्षांनंतर मुलाची खुषी असल्यास करावी असेही हुकूम दिले. त्याणें हिंदु व मुसलमान यांस निष्पक्षपातानें सारखें मानून उभयतां-सही मोठ्या पदवीवर चढविलें. याजमुळें या बादशाहाची कीर्ति फार वाढली. हिंदूंमध्ये कज्जा पडला तर तो ब्राह्मणांनीं तोडावा व मुसलमानांमध्ये तंटा पडला तर काजीनें फैसल करावा असा त्यानें ठराव केला होता. धर्मसंबंधी इतका विचार चालला होता तरी राज्यकारणावर बादशाहाची

नजर चांगली असे. त्याणें काबूल गुजराथ वगैरे प्रांत काबीज केले व लोकांच्या सौख्याकरितां अनेक प्रकारच्या तजविजी करून रयत आबाद केली अशी त्याची आख्या आहे.

---

# किरकोळ टिप्पणें

## २३९ गुजराथेंतील काळ

गुजराथेंत अहमदाबाद प्रांतीं काळ पडून त्यांचीं नांवें त्या त्या सालावरून लोकांचे तोंडीं चालतात तीं : —

| नांवें | संवत् | इसवी सन |
|---|---|---|
| (१) चहोत्रा. | १७७४ | १७१७ |
| (२) सत्यैशिया. | १७८७ | १७३० |
| (३) अठ्यैशिया. | १७८८ | १७३१ |
| (४) तीहोत्रा. | १८०३ | १७४८ |
| (५) अडताळा. | १८४८ | १७९१ |
| (६) अगनोत्रा. | १८६९ | १८१२ |

## २४० प्रसिद्ध पुरुषांच्या मृत्युतिथी

प्रसिद्ध पुरुषांच्या मृत्यूच्या तारखा खालीं लिहिल्याप्रमाणे :—

(१) तारीख ३० मे १८७४ रोजीं डाक्टर भाऊ दाजी हे मरण पावले.

(२) तारीख ४ सप्टेंबर १८७४ रोजीं रा. परशुराम पंत गोडबोले हे मरण पावले.

(३) तारीख १७ दिजेंबर सन १८७४ रोजीं रा. ब. भास्कर दामोदर पाळंदे हे मरण पावले.

(४) तारीख १६ जुलई सन १८७५ रोजीं डा. नारायण दाजी हे मरण पावले.

(५) तारीख २९ मे १८७६ रोजीं वे. शा. सं. विष्णु परशुराम शास्त्री पंडित हे मृत्यु पावले! यांसारखा पुरुष पुनरपि होणें कठीण!

येणेंप्रमाणें ह्या प्रसिद्ध पुरुषांचा निर्याणकाल आहे.

## २४१ विधवांचे पुर्नविवाह व यांच्या तारखा

विधवा स्त्रियांचे पुनर्विवाह झाले ते येणेंप्रमाणें :—

(१) तारीख २३ नवेंबर सन १८६५ रोजीं नारायण जगन्नाथ भिडे व बयाबाई गोडबोले यांचा विवाह वांद्रें मुक्कामीं झाला.

(२) तारीख २५ जून सन १८६९ रोजीं वामनराव प्रभाकर परांजपे यांची बहीण वेणूबाई इचें लग्न झालें. इजबद्दल गणेशशास्त्री मालवणकर म्हणून एक पुण्यांतील ब्राह्मण होता, त्यानें इतर लोकांस चेतावणी करून व आपण पुढारी होऊन पुष्कळ भांडला. परंतु शेवटीं त्यास त्याच कामांत सेशनकोडतांतून कैदेची शिक्षा झाली!

(३) तारीख २५ आगष्ट सन १८७२ रोजीं लल्लुभाई वाणी व जीवकुवर या उभयतांचा मुक्काम अहमदाबाद येथें विवाह झाला. ही मुलगी द्वितीय विवाह करणार असें तिचे मामास व चुलत्यास कळल्यावरून त्यांनीं तिला पळवून कोंडून ठेविली व तिचें बलात्कारानें वपन केलें. पुढें ह्याबद्दल भडोचचे माजिस्ट्रेटासमोर फिर्याद जाऊन त्यांनीं तिला तेथें हजर केलें. नंतर चौकशी होऊन हाल करणारांस सहा सहा महिन्यांची शिक्षा व पांच पांचशें रुपये दंड झाला!

(४) तारीख २४ सप्टेंबर १८७४ रोजीं लल्लु खुशाल शरमाली वाणी यांचा बाई जडाव या नांवाच्या स्त्रीशीं अहमदाबाद येथें विवाह झाला !

(५) तारीख २५ सप्टेंबर सन १८७२ रोजीं शामकुवर नांवाच्या स्त्रीचा द्वितीय विवाह मुक्काम मुंबई येथें झाला.

(६) तारीख १८ जून सन १८७३ रोजीं गजानन पांडुरंग मोहरीरकर इलाखा नागपूर व कोंडुबाई यांचा मुक्काम मुंबई येथें विवाह झाला.

(७) माधवदास रघुनाथदास यांशीं धनकुवर नांवाच्या स्त्रीनें द्वितीय विवाह केला. (?)

## २४२ प्रार्थनासमाज स्थापनाच्या तारखा

(१) मुंबईस तारीख १४ मार्च सन १८६८ रोजीं प्रार्थनासमाज स्थापन झाला.

(२) पुण्यास तारीख ५ दिसेंबर सन १८७० रोजीं झाला.

(३) अहमदाबाद येथें तारीख १७ दिसेंबर १८७१ रोजीं प्रारंभ झाला.

ह्या तीनही ठिकाणीं मंदिरें असून ह्या समाजांस एकेश्वरी मंडळीं असेंही नांव आहे.

## २४३ ध्यानात ठेवण्यासारख्या कित्येक गोष्टी व त्यांच्या तारखा

(१) ता. २७ डिसेंबर १८४७ रोजीं बडोद्याचे थोरले सयाजीराव महाराज गायकवाड हे वारले.

(२) ता. ५ एप्रिल १८४८ रोजीं साताऱ्याचे श्री. शहाजी छत्रपति साताऱ्यास वारले.

(३) ता. १२ जुलई १८५३ रोजीं वाईंत कृष्णेस पाणी येऊन दोन आळ्या वाहून गेल्या.

(४) ता. २० जून १८५७ रोजीं साताऱ्यास मानसिंग शिपाई निसबत नाझर कचेरी यास बंडाचे गुन्ह्यावरून फांशीं दिले. पुढें हे तुफान पुष्कळच वृद्धिंगत झालें.

(५) ता. ८/९/१० आगष्ट १८६८ रोजीं अहमदाबादेस अतिवृष्टि होऊन प्रचंड वारा सुटला. त्यांत दहा हजार घरें पडलीं. त्यामुळें मोठी धांदल उडाली, व गरिबागुरिबांना आश्रय नाहींसा झाला. परंतु मुंबई वगैरे बाहेरील ठिकाणची लाख रुपये मदत आली. यामुळें गरिबांचीं घरें पुन्हा सरासरी झाली. रेल्वे, टपाल, तार वगैरे सर्व बंद पडलें होतें. त्या वेळेस तेथें रिची साहेब हे कलेक्टर होते.

(६) सन १८६९ सालीं मारवाडांत मोठा दुष्काळ पडून हजारों लोक उठून गेले व मेले.

(७) ड्यूक आफ एडिन्बरो राणीसाहेबांचे द्वितीय पुत्र हे मुंबईस तारीख १० मार्च १८७० रोजीं आले.

(८) खंडेराव महाराज गायकवाड यांचा मृत्यु बडोदे येथें तारीख २८ नोवेंबर १८७० रोजीं चंपाषष्ठीस झाला.

(९) कोल्हापूरचे राजाराम महाराज हे युरोपांत फ्लारेन्स शहरांत आर्नो नदीचे तीरीं तारीख ३० नवेंबर सन १८७० रोजीं मृत्यु पावले.

(१०) चिमणाजी पंडित सचीव हे तारीख १२ फेब्रुवारी सन १८७१ रोजीं वारले.

(११) रा. ब. मोरोबा कान्होबा यांनीं आपल्या पुनर्विवाहित स्त्रीसह तारीख १७ फेब्रुवारी सन १८७१ रोजीं जीव दिला. यांचें हें लग्न तारीख २६ मार्च १८७० रोजीं झालें होतें.

(१२) रा. ब. विष्णु परशराम रानडे पंढरपूरचे डेप्युटी कलेक्टर हे तारीख ८ आगष्ट सन १८७१ रोजीं मृत्यु पावले.

(१३) हिंदुस्थानचे गवर्नर जनरल लॉर्ड मेयो यास तारीख १५ फेब्रुवारी सन १८७२ रोजीं पोर्ट ब्लेर येथें मारेकऱ्यानें मारलें.

(१४) कर्नल फेर हे बडोद्यास तारीख १८ मार्च सन १८७२ रोजीं रेसिडेंट होऊन आले.

(१५) मल्हारराव गायकवाड यांनी भाऊ शिंदे माजी दिवाण यांस विषप्रयोगानें तारीख १ मे १८७२ रोजीं मारविलें! नंतर रावजी मास्तर व गोविंदजी नाईक वगैरे गृहस्थांस ठार मारविलें!

(१६) बडोद्याचे प्रसिद्ध सावकार व दानशूर श्री. गोपाळराव मैराळ हे तारीख २६ मे सन १८७२ म्हणजे वैशाख व. ४ शके १७९४ मंगळवार रोजीं बडोद्यास वारले. असा धर्मात्मा पुनरपि होणें कठीण.

(१७) जोतपूरचे तखसिंग राजे हे तारीख १२ फेब्रुवारी सन १८७३ रोजीं मेले. या महाराजांस १७५ स्त्रिया होत्या!

(१८) जनरल मीड साहेब ह्यांस बडोद्याचे मल्हाररावप्रकरणाचे चौकशीस कमिशनर नेमिलें, व त्याचप्रमाणें त्यांची कचेरी तारीख ५ नोवेंबर १८७३ रोजीं सुरू झाली.

(१९) श्री. मल्हारराव गायकवाड यांची द्वितीय पत्नी लक्ष्मीबाई इचें लग्न नवसरीस तारीख ७ मे सन १८७४ रोजीं झालें. तेव्हां नवसरीचे सुभे नारायणराव वासुदेव खारकर हे होते. या लग्नांत बाई ही गर्भार होती, तरी उखा व शकुंतला या पुराणप्रसिद्ध स्त्रियांच्या दाखल्यांनीं तिच्याशीं लग्न करण्यास चिंता नाही असा १६ शास्त्रांनीं मल्हारराव यांस शास्त्रार्थ लिहून दिला होता.

(२०) ह्या लक्ष्मीबाईस तारीख १६ अक्टोबर सन १८७४ त पुत्र झाला. पुढें मल्हारराव गाईकवाड यांची चौकशी तारीख २२ फेब्रुवारी सन १८७५ रोजी कोर्ट भरून सुरू झाली. ते त्यांजवर आलेल्या विषप्रयोगाचे आरोपांतून मुक्त झाले, तरी त्यांस गैरवर्तणुकीमुळें तारीख २२ एप्रिल सन १८७५ रोजीं मद्रासेस रवाना केलें. पुढें त्यांचेमागून बडोद्याचे गादीवर जे सयाजीराव बसले त्यांचे दत्तविधान तारीख २७ मे सन १८७५ रोजीं श्री. जम्नाबाईकडून झाले.

(२१) तारीख २३ सप्टेंबर सन १८७५ रोजीं अहमदाबादेंत साबरमती नदीचें पाणी शिरून नदीच्या कडेचीं दोन तीन हजार घरें पडलीं व माधवपुरा व लष्कराचा बाजार वगैरेही वाहून गेले. हें पाणी अहमदाबादेंत दोन दिवस होतें ह्या जलप्रलयानें वीस लक्षांचें नुकसान झालें! ह्या वेळीं बारोडेल साहेब हे कलेक्टर असून त्या प्रसंगास उचित अशी सरकारनें व लोकांनीं पुष्कळ मदत केली.

(२२) तारीख २३ नोवेंबर सन १८७५ रोजीं युवराज प्रिन्स आफ वेल्स हे बडोद्यास आले.

(२३) मिस मेरी कार्पेंटर हा प्रसिद्ध व विद्वान बाई विलायतेहून अहमदाबादेस तिसऱ्यानें तारीख १८ फेब्रुवारी १८७६ रोजीं आली. तिचा सर्वकाळ उद्योग हिंदुस्थानांतील स्त्रियांची स्थिती सुधारावी हाच होता.

(२४) आणंदचे स्टेशनाजवळ कुबेरजी भगत म्हणून एक कोळीं जातीचा मनुष्य सारसा येथें राहणारा असून तो हल्लीं नवीन धर्म स्थापन करीत आहे.

## विक्रीस तयार

**चंद्रहास.** – ह्यांत ईश्वरभक्तीचा महिमा वर्णन केला आहे. मनुष्यावर कसाही विकट प्रसंग आला असतां परमेश्वरावर भार घालून एकनिष्ठपणें जर तो त्याची आराधना करील तर त्या संकटांतून त्याची मुक्तता हरप्रकारें होते ह्याचें सुरेख वर्णन आहे. त्याचप्रमाणें आपल्या स्वार्थासाठीं अन्यायानें दुसऱ्यांचा छळ करणारे अधम घातकी यांची दुष्कृत्यें जरी कांहीं काळपर्यंत अबाधित चाललीं तरी तीं पुढें त्यांच्याच नाशास कारणीभूत होतात याचेंही ह्यांत उत्तम प्रकारें निरूपण केलें आहे. किंमत ८॥। आणे, ट. ह. ६॥ आणा.

**लहानसा गजरा.** – बालबोधामध्यें आलेल्या कांहीं बोधपर कवितांचा संग्रह यामध्यें केला आहे. फुलांचा वास कितीही वेळां घेतला, तरी तो प्रतिक्षणीं अपूर्वसाच वाटतो, व पुनः पुनः घ्यावा अशी इच्छा होते. त्याप्रमाणें हीं सुरस पद्यें वाचकांना प्रतिक्षणीं अपूर्व भासून आल्हाददायक होतील अशी आशा आहे. किंमत २ आणे, ट. ह. ६॥ आणा.

**दाशरथीरामचरित्रामृत.** – (वे. शा. रा. रा. गोविंद शंकरशास्त्री बापटकृत.) उत्तम भाषेंत लिहिलेले ग्रंथ तयार करवून प्रसिद्ध करण्याच्या उद्देशानें कैलासवासी जावजी दादाजी निर्णयसागर छापखान्याचे मालक यांच्या व दुसऱ्या कांहीं मंडळीच्या परिश्रमानें धी प्रिंटर्स पब्लिशर्स ॲन्ड बुक-सेलर्स असोशिएशेन (सभा) स्थापित झाली असून तिच्या मार्फत हें पहिलेंच पुस्तक छापून प्रसिद्ध झालें आहे. नीति-व्यवहार-चतुरता आणि राजकारण हे विषय ज्या एका चरित्रांत ओतप्रोत भरलेले सांपडतात, असा हा रामचरित्रग्रंथ फारच सुरस भाषेंत लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ आहे, असा बहुतेक सर्व पत्रकारांचा अभिप्राय आहे. वाचणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या उपयोगीं पडण्यासारखें आज-मितीला या पुस्तकासारखें दुसरें पुस्तकच नाहीं असा विद्वान लोकांचा अभिप्राय आहे. हें पुस्तक उत्तम टाइपांनीं व चांगल्या कागदावर छापलें असून याची १२ पेजी सांच्याचीं १५० पृष्ठें आहेत, व या मानानें या पुस्तकाची किंमत फारच कमी म्हणजे आठ आणे ठेविली आहे. शिवाय ट. हां. ६। आणा, पडेल.

**हिंदुशास्त्रांतील संख्यावाचक दुर्बोधशब्दार्थकोश.** – ह्या कोशांत संख्यावाचक मूळशब्द सातशें आहेत, व त्यांचे निरनिराळ्या अर्थांचें शब्द दहा हजारांवर आहेत. याची किंमत ८ आणे, ट. हां. १ आणा.

**मराठ्यांची बखर.** – नवी आवृत्ति. ह्या आवृत्तींत मूळचे दोनही भाग एक केले आहेत. थोर पुरुषांचीं चित्रें घातलीं आहेत. हिंदुस्थानाचा नकाशा जोडिला आहे. मागच्या आवृत्तींतलीं अशुद्धें काढून टाकिलीं आहेत, कागद, शाई, छापणी, कापडी बांधणी, वर भवानी तरवारीचें आणि वाघनखांचें चित्र, सोनेरी नांव, हीं सगळीं उत्तम केलीं आहेत. पृष्ठें सुमारें चारशें झालीं आहेत. किंमत १॥। रु. ट. हां. ६॥ आणे.

**मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्गार.** – ह्यांत मराठ्यांच्या संबंधाची प्राचीन काळापासूनची माहिती मोठ्या प्रयासानें मिळवून तिच्या सत्यासत्यतेबद्दल प्रमाणें दाखविलीं आहेत. आरंभी मराठा शब्दाची व राष्ट्राची उत्पत्ति देऊन पुढें मराठ्यांच्या संबंधानें मिळणारी अर्वाचीन काळची ऐतिहासिक माहिती दिली असून त्या राष्ट्रामध्यें गणले जाणारे योद्ध्यांच्या हातून कोणकोणतीं शौर्योदार्याचीं कृत्यें घडली; व त्यांचीं तीं कृत्यें पुढें मराठेशाई नष्ट होण्यास कितपत कारणीभूत झालीं; मराठेशाई चिरस्थायी होण्यास त्यांनीं काय केलें पाहिजे होतें वगैरे गोष्टींचें सुरेख व वाचकांच्या मनांत पूर्ण ठसेल अशा रीतीनें वर्णन केलें आहे. पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून ह्यांचीं डेमी अष्टपत्री सांच्याचीं २६० पृष्ठें आहेत. कागद मोहरेदार वापरले असून छपाई व बायंडिंग उत्तम आहेत. किंमत १। रुपया. ट. हां. ६॥ आणे.

हीं पुस्तकें मुंबईत काळबादेवीच्या रस्त्यावर निर्णयसागर छापखान्यांत रोख पैसा पाठविला असतां अथवा व्हाल्युपेएबलद्वारा विकत मिळतील.

# दशपत्रे

## बाहेरून आलेले पत्र नं. १

ज्ञानप्रकाशकर्ते यांस–पत्र नं. १ विनंती विशेष–सांप्रत कालचे थोर लोक माझे बहुत पाहण्यांत आहेत, त्यातून कोणास नक्त उत्पन्ने आहेत, कोणास जाहागिरी, इनामगी व (व) कोणास संस्थाने व कोणास मोठाली संस्थाने राज्यासारखी आहेत. व सांप्रत काली यांची सर्व काळजी जाऊन निश्चित आहेत. पूर्वी त्यास मोहिमी लढाई या शत्रूंपासुन संरक्षण, भिल्ल पेंढारी याजपासुन माफिजत करावी लागत असे. याजमुळे खर्चही पुष्कळ होत असे. परंतु आता बहुत करून सर्वांचे आसमंतात भागी दौलत मदार कंपनी इंग्रज बाहादूर यांचा अम्मल आहे. याजमुळे शत्रू किंवा स्वारी व लुटारू यांचे किमपि भय नाही. तेव्हां याजवरून अशी कल्पना होते की यांणीं आपले प्राप्तीचा सध्यय (सद्व्यय) यथाधर्में करून अहिल्याबाईसारखा स्थळोस्थळी लौकिक करावा व आपले यत्किंचित् राहिलेले प्रदेश अबाद करावेत, सत्कीर्तीची वृद्धी करावी हा उत्तम प्रकारचा यांस प्रसंग प्राप्त आहे. असें असता हे बहुधा कोठेच आढळत नसून केवळ अपकीर्ति व दुराचरणे अव्यवस्थित खर्च हेच पाहण्यात येते. याचप्रमाणे हे थोर लोक बुध्या आपला काळही आळशी-पणांत घालवितात त्याचा तपशील लिहिला असता चांगली समजूत पडेल. यास्तव याचे विवरण करून दाखवितो की ह्या मोठे लोकांचा बहुत करून जन्म थोरा घराण्यांत झालेला असतो म्हणजे मुळी गरिब असून आफती भोगीत मोठे झालेले असे तर स्वदेशीय थोर विरला परंतु वारशाचे कारणाने प्रायः थोर आहेत. ते लहानपणापासून स्वछंदी होऊन आर्जवी लोकांनी वेष्टित असून मोठाले अल्काबांनी त्यास रावसाहेब, भाऊसाहेब सरकार महाराज असे जवळचे लोक म्हणत असतात व बहुत करून वाड्याशेजारी एखादे देऊळ असले तर तेथे मात्र त्यांचा प्रवेश असतो बाकी घराबाहेर काय आहे याची त्यास माहितगारी किंवा समज नसोन अज्ञानाचे महत्वाभिमानाचे भरांत निमग्न राहून अन्नोदक वस्त्रालंकार याची ददाती नसल्यामुळे अधिक समजावे किंवा समजून घ्यावे याची फिकीर किंवा कल्पनाही त्यांचे अंतःकरणात वागत नाही. आर्जवी कारकून भिक्षुक व शिलेदार हे आपले पोटावर नजर देऊन बहुत तारीफ करतात. आणि त्यातच यजमानास गुंग करून ठेवितात. अशी सवय लावितात कीं दाहा पावलांवर पलीकडे धनी गेला तर बरोबर लवाजिमा दाहा पांच लोक, मशालची चोपदार वगैरे असलेच पाहिजेत. त्याखेरीज बाहेर जाणे किंवा वेगळेपणाने गुपचुप एकादे काम करून सर्वांवर जरब उत्पन्न करणे त्यास ठाऊक नसून, त्यास गोंधळ्या सारखे इकडेतिकडे फिरावयाची सवय पडते, काम कारभार काहीच सुचुं देत

नाहीत व सुचला तर लबाड आर्जवी याचा घातच आहे यामुळे याजविषयी ते फार बंदोबस्त ठेवितात. अशी सवय पडल्यामुळे त्या थोर माणसास जातीनें व स्वपराक्रमाने काम करण्याची लज्जा वाटते तो इतका परस्वाधीन होतो की सर्व गोष्टी त्याला दुसऱ्याचे मार्फत कराव्या लागतात. ह्या थोर लोकांपाशी काही गोष्ट बोलले असता त्यांच्याने उत्तर होत नाही. दिवाणास कारकुनास व आर्जवी लोकांस पुसले पाहिजे त्या खेरीज त्यांच्याने स्वतः लहान सहान गोष्टींचा देखील जबाब होत नाही. त्यांस मुळापासून हे आर्जवी लोक असे शिकवितात, कोणास उपद्रव करू नयें व कोणाचा घात करू नयें, बारीक नजर म्हणजे कोणी अपराध केला तर त्यांस शिक्षा देऊ नये, एक वेळ ज्यास आपला म्हणविला त्याचा त्याग करू नये हे केवळ महत्वाचे चिन्ह होय. हे नसल्यास थोर कुलांत जन्म झाला याचे फल नाही. यात अब्रू फार आहे असे मागील गोष्टीवरून व वडिलांचे हकीकतीवरून इत्यादिक लाघवें करून त्यांच्या मनांत या प्रकारे ठसवून घट्ट केले असते. याजमुळे व्यवहारात ते अगदीच नालायक होतात आणि आपले कारभार करीत नाहीत परंतु कारकून मुत्सद्दी यांजवर सोपवितात. आता मनुष्य मात्रास काहीतरी नित्य काम पाहिजे या वाचून त्याचा काल जायाचा नाही व चैन पडणार नाही यास्तव हे आर्जवी लोक त्यास शिकवितात की स्नान-संध्या पुष्कळ वेळ करावी म्हणजे जन्माचे सार्थक झाले बाकी काम आम्ही आपले पदरी करीत आहों असे मनांत वागविल्याने या थोर लोकांचा क्रम असा होतो कीं पहाटेस उठून गाई असतील तेथे जाऊन गाईस स्पर्श करून प्रथम पापनाशांचा उपाय करीतात. नंतर स्नान करून पुजेचा थाट. कोणाची अग्निकुंडे कमळ मांडून शिष्ये दोहींकडे उभे करून फुले तुळशी वाहण्याचा खेळ करि-तात. त्यांतच गायन पंडीत वगैरे भेटणारीं मंडळी व स्तुतीचे श्लोक म्हणणारे भट वगैरे जमतात. हे सर्व दाहा घटका दिवसापर्यंत होते. मग सर्व आपले घरोघर जातात, यजमानाची जेवायची सिद्धता असतेच. ते लागलेच जेवून ११ वाजतां माडीवर जातात. तो सकाळपासून ताटकळला असतो तेव्हा विश्रांतीवर इच्छा असतेच, लागलाच विडा सुपारी खाऊन बाराचे सुमारास बिछाना पसरून निद्रा करितात. कोणास वेळ सापडल्यास सोंगट्या बुदबळे खेळतात. नंतर निजतात ते चार वाजता उठतात. मग दोन घटका इकडे तिकडे वेळ घालवून घोड्यावर किंवा पायाने देवळात जातात. तेथून परत येवून बसतात तो नाच तमाशाची तयारी करण्याचा हुकुम. आर्जवी लोक सांगतात त्या प्रमाणे सर्व सिद्धता करून आठ वाजतां जेऊन नाचास बसतात. ते कृत्य अकरा वाजता तो पर्यंत होते मग पुनः निजतात ते पहाटेस उठतात. याप्रमाणे दिवसाचे दिवस आयुष्य घालवितात. आता जर मनुष्याने दर दिवसास एक प्रहरभर काम नियमाने केले म्हणजे अधिक करण्याची जरूर नाही असे होते. स्नान संध्या होऊन एक प्रहर त्याच्या हिताचे काम त्यांस होत नाही म्हणून ते लोक कारभारांत अगदी वेडे असतात. ही काळाचीं व्यवस्था झालीं, पुढले पत्रीं खर्च संबंधी व्यवस्था निवेदन करीन ही विनंती.

ज्ञानप्रकाश, ५ नोव्हेंबर १८५५ लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. २

विनंती विशेष-सांप्रतकालचे थोर लोक स्वदेशीय जे आहेत त्यांचे हातून लोकोपयोगी कृत्यें घडून येत नाहीत आणि त्यास प्राप्ती असल्ये तीतर खर्च होऊन उलटे कर्जाचे पेचात असतात. यांचे कारण काय असें मनांत आणिलें तर उघड दिसते कीं, यांचे प्राप्तीपैकीं यांचे अज्ञानामुळे व गैरमाहितीमुळे शेकडा साठ रुपये होतात ते कोण खातो याचा त्यांस ठिकाण नसतो. कितीएक गांव अव्यवस्थेंमुळे खराबीस येतात. पडजमीनी पडतात, महाल मजकूर चिटी वगैरे, कारकून वहिवाटदार फुगवितात. परंपरागत दरकदार फडणीस, चिटणीस, मामलेदार हे भोजन भाऊ

असल्यामुळे खरा हिशेब कोणीच पहात नाही, फुकट जेवावयास मिळून झोप पुष्कळ सांपडावी याजवर त्यांचे पूर्ण लक्ष असून त्यांचे झोपेस व भोजनास व्यंगोमी त्यांचे यजमानानें न आणावीं यासाठी तजवीज राखीत असतात ती इतकीच कीं, तोंडपुजेपणा, आर्जवीपणा समूर दाखवून नानाप्रकारांनीं ममता दृढ ठेवीत असतात, व अपराध पोटी घालणें, मुरवत, मीड, व क्षमा, अगत्यवाद, पदरच्यांचे संगोपन करणें हे गुण त्यांचे बुद्धीमध्ये इतके भरवितात कीं, ह्यांनी जरी त्या यजमानाचे खरोखरी नुकसान केलें तरी त्याणें असे म्हणावें कीं, जर आतां मी ह्याचा दोष काढून शासन किंवा बडतर्फी करीन तर परंपरागत जो मोठेपणा माझे अंगी आला आहे त्याची हानि होईल असे त्यास वाटलें असून त्याअन्वये तो कांही एक न करून गोगलगाईप्रमाणें वर्तणूक करीत असतो, व ह्या थोर लोकांपासून कोणतींही सुधारणा किंवा पहिल्यापेक्षां बरें होत नसून जें पूर्वीपासून चालत आलें त्याप्रमाणें चालवितात आणि बहुतकरून त्यातही कमीच पडून सर्व कारभार सैल पडतात व मंद प्रकृतीचें थोरलोक हे पराधीनपणें काहीं एक न करितां दिवस काढीत असतात. अशा प्रसंगांत त्यांस खर्चाचे प्रकार कांही लोकहितोपयोगी किंवा लोकनीति उत्तेजन किंवा विद्यावृद्धीकारक असे गुण कांही सुचत नाहीं पण जवळच्या लोकांची भोजनें व झोंप वाढविणारे खर्चच करण्यास त्यास लोक सांगतात आणि ते करतात म्हणजे हत्ती बाळगावे आणि पंचवीस मनुष्यांची उपाजीविका त्या एकट्या निरुपयोगी जनावरास खाण्यास घालावे. वार्षिकी किंवा नैमित्तिक उत्साह मोठाले वाढवावे, ब्राह्मण संतर्पण करावे, तमाशे नाच रंग करावे आणि पुष्कळांस पुष्कळ जेवावयास घालून द्रव्याचा व्यय करावा असे हे अल्पदर्शी लोक त्यास शिकवून त्या यजमानाचे हातून तसे करवितात. एका थोराचा घरचा मी जमाखर्च मी पाहिला त्यांत लाख रुपयांचें उत्पन्न होतें. त्यापैकी दाहाहजार रुपये उत्साह, धर्मादायास खर्च दाहाहजार, अनुदाने, वरण्या, खान्या वगैरे कर्जाबद्दल दाहाहजार, व्याजखर्च दाहाहजार, पागा घोडीं जनावरें थट्टी तहबेल खर्च दाहाहजार, भटशास्त्री, पंक्तिस भोजनकरून राहणारे त्यांजबद्दल दाहाहजार, खाशांस नाचतमाशे दाहाहजार, दरबार खर्च म्हणजे लोकांचे आर्जव करून त्यास लांच वगैरे देण्यास लागतात. वकील ठेवावे त्याणी वरचेवर लबाडीने अनर्थ सुचवून हलकेत लोकांचे भय घालून पैका न्यावा त्याजबद्दल दाहाहजार, कापड, कार्य प्रयोजन वगैरे वीसहजार, वेतन खर्च चाकर लोकांस एकूण लाख रुपये दरसाल उडत होते. तेव्हा याजपैकी निमे भट ब्राह्मण वगैरे खाऊन गेले; निमे यजमानांच्या डौलास व मिरवणुकेस व सुखास व मूर्ख पणास खर्च झाले त्यापैकी लोकांच्या विद्यासंग्रहास किंवा लोकांची गरीबी दूर होण्यास व लोक चांगले होण्यास एक पैसा देखील खर्च नसून अजमासे हजार रुपये इमारत खर्च वगैरे आढळला. पण तो खाशांच्या वाड्यास पडदे व आरसे महालाकरितां झाला होता. त्याप्रमाणे जितका पैसा आला तितका लुच्या लोकांनी खाल्ला आणि आर्जव्यांनी वेष्टित हीं थोरांचो मुले अशी वेड्यासारखी समजून त्यास त्यांचे कारभारी दरवेशासारिखी साहेब लोकांच्या घरी फिरवितात, हे अमुक नानासाहेब आले व दादासाहेब आले असे सांगतात. परंतु त्या सर्व कृत्यापासून साहेबलोक त्या मूर्खास ओळखून त्याची वास्तविक स्थिती काय आहे हे समजून त्याचा बाह्यात्कारी आदर करितात पण अंतर्यामी त्यास पशुसारखे मानितात आणि हयगय करितात. परंतु असा मानसिक अपमान ह्या थोर लोकांस कळत नाही कारण की त्यांस कांहीच समजत नाहीं व अंगी कोणतेही काम करण्यास सामर्थ्य नसते व अक्कल नसते यामुळे ते लाचार घरमिंदीस्थितीत जन्मपर्यंत आपले घरात मात्र थोरपणा मिरवून राहातात. बायका, षागिर्द, खिजमतगार, भट, कारकून यांनी स्तुति करण्यास योग्य असतात. दुसरा कोणी त्यास नांवाजित नाही, याजविषयी थोरांनी लौकर सावध व्हावे, ही विनंती.

ज्ञानप्रकाश, १९ नोव्हेंबर १८५५ — लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ३

ज्ञानप्रकाशकर्ते यास.

विनंती विशेष–मागीलपत्री थोर लोकांची खर्च करण्याची चाल सांगितली, आता कोणास इच्छा होईल की ह्या थोर लोकांनी कोणत्या रीतीने वर्तावे हे मी बोलून दाखवावे तर ह्या प्रश्नाचे उत्तर ऐकावे–

थोर लोकांनी प्रथमतः आपला स्वभाव सुधारला पाहिजे तो असा कीं त्यांणी डामडौल अगदी सोडून द्यावा आणि एकटे फिरण्याची व बोलण्याची व आपले पेक्षां जे शहाणे आहेत त्यांशी संभाषण करण्याची व आपले अंगावर जबाबदारी वागवून स्वतः कामकाजाची मेहनत करण्याची सवय करून घ्यावी. एकटे फिरण्याने त्यास कोणी लुटणार नाही व एकटे स्वतः शाहणपणाने एकांती दुसऱ्याजवळ जाऊन बोलण्याने त्याची अक्कल दृष्टीस पडेल असेही होत नाही. जरकरितां दहाविस वेळ मूर्खपणा दिसेल तरी शिक्षा लागून बोलावयास सुचेल व शाहणपण येईल, असे करतां करतां कारभार कसा करावा व दुसऱ्यास हरेक प्रकरणी जाब कसा करावा हे समजू लागेल परंतु हे शहाणपण जोपर्यंत दशावताऱ्याच्या सोंगासारखें राळ पेटवून पडदा मागे सारून नरसिंह येतो, तशारितीने मशाल लावून पाठीमागे दाहा स्वार व दाहा कारकून घेऊन स्वारीची मिरवणूक करू लागले तर दुसऱ्यास ही त्रास येतो व कारकून लोक बोलणे थोडक्यांत आटपितात आणि खासे बेवकूब आहेत तसेच रहातात यास्तव खरोखरी मेहनती मुत्सदगिरीच्या बाण्याने थोरांनीं वागावे, जे त्यांस वेडे करणार व दरवेशाप्रमाणे बाळगणार ते तर इच्छा करतील कीं, एकटे फिरूं नये, माजघरांतून ओटीवर आले तरी स्वारीचा थाट राखतील; परंतु अशाने वेडेंपणा होतो आणि मागील थोरपणा व्यर्थ जाऊन मूर्खपणांचे भांडवल मात्र पदरी होते; आणि गुण असल्यावाचून लोक थोर म्हणत नाहीत या करितां थोरलोकांनी आपले गांवोगांव जाहगिरींत दुसऱ्याच्या घरी, देऊळांत, अगदी डौल न करिता फिरत जावें, गांवचे पाटील, कुळकर्णी, जमीनदार रयत यांजपाशी स्वतः बोलावें, रयतेस पाहिजे काय, नको काय हे विचारावे, कामगारांनी वर्तणूक कशी केली, जमाबंदी काय, हिशेब कसे होतात, धारे फार किंवा कमी आहेत हे सर्व विचारावें. बोलून बोलून मनुष्यांस पुष्कळ समजते व शाहणपण येते त्यांत हे थोर लोक बोलले तर लोक फार आनंदाने मजकूर समजवितात. तेणेंकरून माहिती होते, पदरचे कामदारांवर जरब राहते. यजमानास काय बातमी लागली काय नाही व त्याचे नजरेस काय आले व कसे झालें यांची जरब पडून ते लोक हुशार राहतात व कोणाची गैरवर्तणूक असली तर कळते आणि कळली तर लागलीच भीड मुरवत न धरितां शिक्षा यथायोग्य करित जावी म्हणजे घरातील सर्व बंड मोडेल. लबाडांचे काही चालणार नाही, रोज दोनचार गाव फिरून यावें. दिवाणी फौजदारी मुलकी काम कसे चालले आहे ते पाहावे. लोकांमध्ये गरीबी कोणास आहे व ती दूर कशानें होईल हे पाहावे, अज्ञान लोकांस आहे व ते कशाने जाईल, लोकांस व्यापारास व मुशाफरीस अडचणी काय आहेत हे सर्व स्वतः फिरल्यावाचून व अनुभविल्यावाचून समजणार नाही. रयतेस उत्पन्न काय आहे व सरकारास काय देतात व किती द्यावे, ते उत्पन्न अधिक होण्यास मार्ग कसे आहेत हे सर्व विचार ध्यानात आणावे म्हणजे त्याच थोर लोकांची मोठी शोभा पडून भूषण वाटून रयतेस आमचा धणी असे वाटू लागेल. नाहीतर निज्जामाच्या बायकांस नवऱ्यांचे सुख आणि जाहगीर दाराच्या रयतेस धन्याचे सुख हे सारखे असते, लोकांस सांगावास मात्र तो नवरा व हा धनी परंतु उपयोग काही नाही. कधी दृष्टीस पडायाचा नाही व कधी विचारपूस करावयाचा नाही. उघडा दरबार नाही, फिर्याद चालत नाही. कोणी मनात आणित नाहीत यामुळे लोक रंजीस होऊन राहीले असतात त्यास असे वाटते की हा धनी आहे आणि नाही

सारखाच. या पेक्षा इंग्रज बरा, आमचीं दाद तरी लागते. आर्जी केली तर जाब तरी मिळतो, पण आमच्या धन्यास काहीच समजत नाही. याजमुळे फार अपकीर्ती होते व त्यास कोणी पुसत नाही व त्यास काही समजत नाही, इश्वराने बाहेर फिरण्या योग्य थोडी माणसे दिली आहेत व राज्य दिले आहे तर त्याचा उपयोग करावा, जागृत राहावे, हुशारी ठेवावी, कर्तृत्व दाखवावे हे प्रथमतः केले पाहिजे. ही विनंती.

ज्ञानप्रकाश, २६ नोव्हेंबर १८५५ लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ४

विनंती विशेष–मागील पत्री थोर लोकांनी डौल टाकून देऊन स्वपराक्रमाने व जातीचे शहाण-पणाने राहत जावे ये विषयी लिहीले. आता दुसरे त्याणी काय केले पाहिजे ते लिहितो. त्याने आपले घरांतील कलह व्याजवर पदराच्या मंडळीचे उपजीवन आणि कारभारी यांचा रतीब असतो ते सर्व मोडून टाकावे आणि नातलग माणसे घरांत ठेऊ नयेत. ह्या थोर लोकांच्या घरात त्यांच्या आई बापाचे व भावाचे देखील घरात भांडण असते आणि किती एक ठिकाणी त्यांच्या बायकांचे देखोल त्यांच्याशी बनत नाही. याचे कारण हेच आहे की ते पुरुष गैरवर्तणुकीचे असतात या कारणाने घरात नाना प्रकारचे बखेडे होऊन वाईट स्थिती होते. यास्तव जसे बाजवी रितीने वागून यथा योग्य प्रतिपालन करुन त्यांणीं भावास वगैरे हिस्सा देणे योग्य आहे तो निर्लोभपणे देऊन सर्व तंटे मिटवावे म्हणजे एक दुर्दशेचे द्वार बंद झाले. कळवांतिणी वगैरे घरांत ठेविल्या असतील त्यास निरोप देऊन लबाड लोक काढून द्यावे–भट पुराणीक हे बायकास नेहेमी धर्म सांगण्यास लागतात परंतु त्यांचा उपयोग नेंहमी कलह माजण्याचा असतो याजकरिता यास अगदी घरात ठेऊ नयेत, कामापुरते असावे व उद्योगावाचून राहू देऊ नयेत, व प्रामाणिक लोक बाळगावेत–आपले राज्यात न्याय मनसुबी चांगली होत असावी याजकरिता जे साहित्य व माणसे पाहिजेत ती ठेऊन त्यांजवर स्वतः नजर पोचवून सर्वांकडून आपापली कामे चांगले रितीने करावी, कोणी पैसा खाऊन अन्याय करू नये व आळस करू नये अशारीतीने काम करणारे लोक वागतात किंवा नाहीं हे स्वतः पाहावें, आपले शाहणपणाचे व पापभीरूपणाचे व बेमुर्वतीचे भय सर्वास वाटावे अशी तज-वीज ठेवावी. असे करण्यास इंग्रजी राज्याचा कित्ता ह्या थोर लोकांच्या समोर आहे त्यापेक्षा काही अवघड नाही. परंतु त्याप्रमाणे केले मात्र पाहिजे, कायदे कानून इंग्रजांनी आपले राज्यात घातले आहेत तेच स्विकारले म्हणजे काहीच श्रम नाहीत. दिवाणी व फौजदारीचे काम साफ झाले म्हणजे चौथ्याने करावयाचे काम असे आहे कीं रयतेचे मुलकी कामाची सुधारणा करावी म्हणजे (म्हणजे) धारे भारी आहेत किंवा कमी आहेत हे पाहुन चांगले रितीने सारखा कर लोकांवर बसेल असे ठरवावे, हलके धंद्यावर बाबी असतील त्या सर्व सोडून द्याव्या व जमिनीचे करही मामुल रिती-प्रमाणे जुलुमाचे असल्यास उतरावे आणि प्रजा सुखी होऊन मेहनतीचे फल यांस निर्भयपणे मिळोन त्यांच्या पोराबाळासुद्धा खाण्याची कमती पडणार नाही अशाप्रकारे त्यास वर्तवावे. ज्या ठिकाणी नद्यास बांध व शेतास ताल व उस्तवारी करणे असेल ती सरकारने मदत करून तगाई देऊन करावी, रयतेस कर्जवाम लागेल ते हलके व्याजाने देत जाऊन त्यांची उबावणी करावी आणि माहार, भिल्ल, रामोशी, कोळी वगैरे जातीचे लोक बहुतकाळापासून गावाबाहेर जुलुमानें पिटून लावले आहेत आणि त्याची परमावधींचीं लाच्यारी अन्नवस्त्र नसून पोरेबाळे बायका केवळ विपत्ती भोगीत हिंडतात व हमेषा चोऱ्या दरवडे घालून जे उद्योगानें मिळत नाही तें अनाचाराने मिळ-वितात याजकरिता त्यांस जमिनी रानें कौलाने मिराशीनें देऊन त्यास इतर रयतेप्रमाणे सौख्य प्राप्त होईल आणि ते दुराचरण न करिता चांगले वागावे अशा त्यांस रखवालदारीच्या वगैरे जागा

देऊन पोटापुरते द्यावे घर बांधून त्याणी मिरासदार होऊन सुखाने गावांत नांदावे अशी तजवीज करावी, असे करण्यास एक मुख्य नेम धरला पाहिजे की आपण बाहेरगांवी हिंडताना किंवा कारकून शिपाई हिंडताना त्यांजकडून अशी सावधगिरी ठेवावी की त्याणी कोणापासून काही जिन्नस दाणा भाजी, वैरण लाकडे वगैरे फुकट घेऊ नये मग पैकातर कोठून घेतील. ही चाल फार वाईट आहे आणि ह्या चालीमुळे किती एक गावी भाजी वगैरे झाडे फळ फळावळ कोणी लावीत नाही. त्यास असे भय वाटते की जो येईल तो आम्हाजवळ फुकट मागेल आणि त्यांस न द्यावे तर आदावत करील तेव्हा थोडक्यासाठी अधिकाऱ्यांशी वाकडे पाडावे हें ठिक नाहीं असे मनात आणून आपले घरीच नसले तर कोण मागेल असे समजून ही झाडे लावीत नाही यास्तव फुकट घेणाऱ्यास मोठी शिक्षा असावी, देशमुख देशपांडे व पाटील कुळकर्णी हे आर्जवी असतात. याज-मुळें लोकांच्या शेतातील जबरीने उपटून आणून देतात हा सर्व जुलूम आहे. तसेच मामलेदारही आर्जवाकरिता रयतेवर जुलूम करून थोरांची मर्जी संपादन करितात. मराठे लोक हे बहुत दिवसा-पासून लुटी करीत आले आहेत सबब त्यांचे अंगी असा स्वभाव उत्पन्न झाला आहे कीं लोकांचे फुकट घ्यावे. शिपायापासून तो राजापर्यंत लोकांनी फुकट द्यावें असे त्यांस वाटतें. दर मुकामास स्वारीची सर्व तयारी असावी व खर्च काही पडू नये हा लुटारू स्वभाव सर्व मराठे लोकांच्या अंगी दृढतर जडला आहे. या करिता सर्व जिनसांचे निरख बांधून द्यावे त्याप्रमाणे सर्वांनी खरेदी करावे व द्यावें, मराठ्यांचा आणखी एक स्वभाव आहे की त्यास दुसऱ्याच्या मिळकतीच्या नुकसानीची भिती नसल्ये व दुसऱ्याचे हरण करण्याचा अधिकार प्राप्त होईल तर चांगला असे समजतात व अधिकाराचा मुख्य उपयोग तोच असे समजतात व जर अधिकार असून अशा अटकावांत ते असले तर रोजगारीची शोभा नाही, मुक्त्यारी नाही म्हणून गिल्ला करितात. परंतु हे सर्व त्यांचे लुटारू स्वभावामुळे होते व एकाने लुटलें तर दुसरा जरी त्यास प्रतिकूल असला तरी त्यास असा धीर होत नाही की मी याजबद्दल फिर्यादी होऊन वाद चालवून हा अन्याय दूर करीन असे कोणास वाटत नाही. याजमुळे गुन्हेगारास मारण्याची वगैरे वाईट वहिवाट चालत आली आहे व ती वृद्धींगत होण्याचे कारण हेच कीं ती मोडण्याकरिता कोणी छातीस हात लावून उभा राहत नाही, अमुक अधिकारी कसें का करिनात आपण कशास बोलावे असे सर्वांच्या तोंडात असतें. यामुळे गुन्हे न सांपडून लोकांची दुःखे कमी होत नाहीत व दुष्ट अधिकारी यांचे पारिपत्य होत नाही, मराठे लोक एकमेकांचे दुःख पाहून ओरडणारे नाहींत, ज्याजवर जुलूम होतो तो ओरडतो परंतु त्यास कोणी मदत मिळत नाही. या करिता किती एक ठिकाणी तो आपला परिणाम पाहून उगाच बसतो. याकरिता अशा लोकांस उत्तेजन फार पाहिजे आणि फिर्याद हमेष ऐकून घेण्याची फार तजवीज ठेवली पाहिजे आणि रयतेस असे कळले पाहिजे कीं जरी आम्हास कोणी मदत नाही तरी ज्यावर जुलूम जास्ती होईल त्याचा वाली यजमान आहे तो सर्व तजवीज करील असे सर्वांस वाटले पाहिजे. अधिकार फक्त सुखाकरिता नाही, तर मेहेनतीकरिता आहे असे त्यांणी समजून वागावें व अधिकारी यास नेहेमी आपले अधिकाराचे ओझे वाटले पाहिजे, या करिता प्रत्येक कामदार काम करण्या लायक व मेहनती असावा, आणि अशाप्रकारे राज्य चालवून रयतेची अबादानी वाढवावी हें चौथे कलम झाले, बाकी राहिलेले पुढचे पत्री लिहिन ही विनंति.

ज्ञानप्रकाश, १० डिसेंबर १८५५ — लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ५

विनंती विशेष– स्वदेशीय थोर लोक व राजे याणी करावयाच्या चार गोष्टीं सांगितल्या आतां पांचवीं सांगतो. आपले राज्यामध्ये कायदा असावा याकरिता लिहिलेला कायदा चालू करावा,

मग तो इंग्रजांचा असो अथवा दुसरे शहाणे लोक ठरवतील तसा करावा. परंतु सर्व कामगारांनी कशा प्रकारे वागावे व आपला अधिकार किती व कोणते रीतीने काम करावें व कोणास काय शिक्षा होईल हे सर्व त्या कायद्यात ठरविले पाहिजे, धर्म संबंधी व व्यवहार संबंधी मोकळीक ठेवली पाहिजे. म्हणजे स्मार्त ब्राह्मण कायदा करील तर वैष्णवांविषयी काहीतरी त्यात वाईट लिहिल तर असें असूं नये. पाहिजे त्याणे पाहिजे तो धर्म आपले समजुती प्रमाणे त्याणी करावा व तो स्वीकारल्यामुळे त्याचे नुकसान होऊ नये, याचे कारण त्या देशात अनेक धर्म व अनेक मते चालू आहेत त्यांपैकी एकाने म्हटले कि माझेच चालावे व दुसरी सर्व मोडावी तर स्वाधीन नाही याजकरिता ह्या कारणावरून कोणाचा द्वेष करणे नीट नाहीं. तशीच व्यापार संबंधी मोकळीक म्हणजे, माहार आहे त्याने दुकान घालू नये किंवा कुणबि आहे म्हणून त्याने कारकुनीचे काम करू नये ही समजूत अगदि वाईट आहे, ज्याचे अंगी असा गुण असेल तसे त्याने हा देश जसा कुणब्याचा तसाच ब्राह्मणाचा आहे, त्यांत बहुत करून तर कुणब्याचा आहे याजकरिता थोडा अंश ज्या लोकांचा आहे त्याणी राज्य करणे हे नीट नाही व असा भेद ठेविल्याने त्यास वाईट वाटून ते राजास प्रतीकुल होतात व तरफदारी समजतात याकरिता सर्वांस समान पहावें. दरबारांत सोंवळें काही उपयोग नाही. कारण की ब्राह्मण लोकांच्या स्नानसंधेची जागा दरबारात नव्हे. या करता सर्वांची सारखी दाद लागली पाहिजे म्हणून अतिनीच जातीचे लोकांस देखील आत येण्याची व बोलावण्याची परवानगी असली पाहिजे नाहीतर त्यांची सर्वथा बेवाद होईल. दरबारच्या रितीनेच दरबारचे काम झाले पाहिजे. ब्राह्मणांची समजूत अशी आहे कि, आपण डोंगरात स्नानसंध्या करण्यास तर बसू नयें, दरबारचे अधिकार सर्व लोकांवर आपणास मिळावे आणि तेथे पण आपले सोवळे बेतबात संरक्षण व्हावे तर ही समजूत उलटी आहे आणि त्याचा परिणाम इतकाच होईल की, अशा लोकांचा पाय दरबारातून निघून दौलतीचा भाग जो त्यास मिळत होता तो मिळणार नाही याकरिता त्याणी ती सर्व समजूत सोडून सर्व रयत राजाने राजकी संबंधांविषयी सारखी लेकरांप्रमाणे मानावी ह्या गोष्टी सर्व सिद्धीस जाण्याकरिता राजाची स्वता वर्तणूक चांगली व त्याचा राज्यात जो कायदा चालतो जो निर्दोष पाहिजे आणि कायद्याची बळकटी येवढी मोठी त्याणे संरक्षण केले पाहिजे की त्याणे आपणासही प्रतिबंध करून घेतला पाहिजे. कारण की जर आपण कायदा मोडिला तर दुसरे लोक तो कायदा मानणार नाहीत कायदा हेच शास्त्र अशी त्याची मातबरी रक्षावी आणि राजाने आपला वश कसा चालेल व आपला अधिकार काय आहे हेही सर्व कायद्यावरून ठरविले पाहिजे. हे कायदे शहाण्यांपैकी सर्व जातीचे व सर्व धंद्याचे लोक जमा करून त्यांचे अनुमते ठरविले पाहिजेत. परंतु शास्त्री पंडित ह्या कामास इतके नालायक आहेत की त्यांस कदापि अशा कामांत बसवू नयेत. त्याचे अज्ञानाने सर्व बिघाड होऊन उलटे होईल याजकरिता आडाणी व व्यापार उमजणारे वाणी कुणबी किंवा ब्राह्मण गृहस्थ चांगले ह्यांचे हातून हे काम घ्यावे आणि सर्व राज्य राजाने कायद्याच्या हुकूमाने चालवावे. प्रत्येक कामदाराने राजापासून स्वतंत्र होऊन कायद्याप्रमाणे काम चालवावे आणि राजा म्हणजे एक वरिष्ठ कामगार म्हणून त्याणे राहावे. आता ज्याचे ज्ञान अल्प आहे यास ही सर्व कारणे म्हणजे समुद्रमंथन किंवा आकाश खाली येण्यासारखे अवघड वाटेल. परंतु असे काही नाही उद्योग केला तर सर्व सुलभ आणि घडून येईल, आणि राजाचे वंशात कलह उत्पन्न होतात जे होणार नाहीत व जरी राजाही मूर्ख निघाला तरी कारभाराची गती बांधली असली म्हणजे त्याचे मूर्खपणामुळे लोकांस उपद्रव होणार नाही आणि चांगला असल्यास अधिक फायदा होईल, चाकर लोकांस वेतने थोडी असून त्यांस बक्षिसे वरचेवर पुष्कळ देत जावी म्हणजे उमेद येते, तसेच शिपायांसाठी बक्षिसे देत जावी आधि दुसऱ्यापासून त्यांणी काही न घ्यावे म्हणून सांगून त्यांच्या तशा मिळकतीच्या मोबदला त्यांस बक्षीस द्यावे म्हणजे तशा प्रकारे ते पैसा मिळविणार

नाहींत, दरएक चांगले कामास त्यांस बक्षीस असावे, पगार थोडा असावा ही युक्ती इंग्रजांनी अद्याप धरली नाहीं, परंतु स्वदेशीय लोकांस धरण्यास अवघड नाही कायद्याचे स्वाधीन राज्य करून मजबूत रीतीने चालविण्याची कल्पना नाना फडणीसास देखील सुचली नव्हती म्हणून पेशव्यांचे राज्य ही धुमश्चक्री होऊन नाश लौकरच झाला-ज्या सावकाराचे दुकान कायद्याप्रमाणे चालत असते ते बहुत दिवस टिकते यास उदाहरण दयाराम आत्मारामाची पेढी. तसेच राज्यही आहे. दिवाणी, फौजदारी, मुलकी, फौजसंबंधी खासगी सर्व कायदे पाहिजेत व ते कायदे चालविणारे चांगले कायदे समजणारे पाहिजेत. परंतु लहान जहागीरदार वगैरे जे आहेत त्यांस हे करण्याची जरूरी नाही. कारण की ते केवळ पराधीन होऊन राहिले आहेत. सबब त्यांणी इंग्रजांचे कायदे ग्रहण करून मुलकी व न्यायाधीशी सुधारणा करून चालवावे त्यांचे राज्यावर कोण बसणार हे काही त्यांचे स्वाधीन नाही तथापी कारभार संबंधीं सर्व कायदे त्यानी करावे. फैसला कोणी किती करावा याजवर तपासणी कोणी करावी हे सर्व ठरवावे, व मागाहुन अनुभव येतील तसे नवे कायदेही केले पाहिजेत. परंतु हे जसा ज्याचा तालुका विस्तीर्ण असेल तदनुसार फार किंवा थोडे काम होईल त्याप्रमाणे तारतम्य पाहून करावे. बाकी राहिले ते पुढे लिहू. ही विनंती.

ज्ञानप्रकाश, २४ डिसेंबर १८५५ लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ६

विनंती विशेष – मागील पत्रीं कायद्यांचा उपयोग लिहिला आतां याप्रमाणें संस्थानची सुधारणेची मजल आली म्हणजे यापुढें असें केलें पाहिजे कीं लोकांचे अज्ञान व दुःख दूर होण्याकरितां उपाय केले पाहिजेत याकरितां शाळा, पुस्तकगृहे, विद्वानांचा संग्रह व ग्रंथांचा संग्रह व नवीन प्राकृत भाषेत उपयोगी ग्रंथ व्हावे असे उत्तेजन दिले पाहिजे, जसे परगावी बहुत करून शिमग्याचा तमाशा व मारुतीची सांजवात हा खर्च इनाम जमीनी देऊन किंवा चिल्हरखर्च म्हणजे गांवखर्च ठरवून देऊन करीत असतात तसे विद्येचे उपयोगाकरितां व लोकांस कायदे वगैरे समजण्याकरिता व नेमणुकीखर्च झाला पाहिजे. तसेच जे मोठे गांव आहेत तेथेही पुष्कळ झाला पाहिजे. याकरितां जरी पृथक्कर रयतेवर बसविला तरी चिंता नाही. त्याजबद्दल सरकाराने आपला कर एकादा सोडावा किंवा इनाम जमीन द्यावी आणि हे काम मोठे उमेदीने चालवावे, जे वाचीत लिहित नाहीत त्यांस लिहितां वाचितां यावे, माहितगारी व्हावी, सर्वांस अधिक शहाणपण व व्यवहारिक ज्ञान येईल असें करावें आणि जे मेहेनती लोक आहेत त्यांस चार घटका विराम पाहिजे याज-करितां विद्या शिकण्याचे काम असे रंजनीय करावें कीं तशा लोकांस गंमतही वाटावी आणि संभाषण करणारे विद्वान यांणीं सुरस भाषणें करून लोकांची समजूत पाडावी, प्राकृत विद्या वाढवावी म्हणजे सर्व लोकांस समजूत पडते, तसेच विद्या शिकलेले लोक असतील त्यांस रोजगार द्यावे, बक्षिसें द्यावीं म्हणजे लोक हौसेने शिकतील व सर्वांस काळजी लागेल असें हरएक प्रकारांनी विद्या वाढवावी. परंतु लोक विद्या म्हणजे संस्कृत भाषा पढणें व जे पढले आहेत त्यांस जेवण्यास घालणें यातच विद्यावृद्धी समजतात. परंतु हे बरोबर नाहीं, संस्कृत ग्रंथ काही चमत्काराकरितां पाहण्यासारखे आहेत त्यांची भाषांतरे करावी परंतु बहुतेक ग्रंथ उपयोगी नाहीत व ती भाषाही चालू नाही सबब आतां तींत नवीन ग्रंथ लिहिणें हे केवळ मढ्यास अलंकार घालण्यासारखें आहे. म्हणजे त्याचा काही उपयोग नसून आंधेरांत टाकून त्यापासून कोणाचाही उपयोग नाही असें करणें आहे याकरितां मृतभाषेची थोरवी टाकून देऊन जी भाषा हल्ली चालत्ये व ज्यांत आपले व्यवहार चालतात व जी भाषा जन्मापासून लोकांस समजते तींतच सर्व ज्ञान आणिले पाहिजे, त्यांतही वैद्यशास्त्र व धर्मशास्त्र बहुत करून दुसरीही शास्त्रे निरूपयोगी आहेत यास्तव त्यांची वृद्धी

करणे जरूर नाही, परंतु प्राकृत भाषेचेच भूषण केले पाहिजे. त्यांतील पंडितासच उपयोगी पडतो म्हटले पाहिजे, याजकरितां ही गोष्ट पक्के पणें थोर लोक उमजले पाहिजेत. कारण कीं, संस्कृत भाषेचे उत्तेजनार्थ अल्पदर्शी थोर लोक पुष्कळ पैसा खर्च करितात व तिचे पोषण करितात आणि तो सर्व खर्च व्यर्थ होऊन पाण्यात बुडतो, तोच खर्च सांप्रतच्या लोकांस ज्ञान आणून देणारी जी प्राकृत विद्या तिचे पोषण केले पाहिजे, आणि जुनी समजूत पडली आहे तिचा विचार करून त्याग केला पाहिजे. याकाली प्राकृताची हेलना करणें हा अगदी मूर्खपणा आहे, कारण कीं, सर्व लोक संस्कृत भाषा शिकून विद्या शिकतील अशी आशा व्यर्थ आहे याजकरितां सांप्रतची चालू भाषा हीच वाढवावी तेणे करून लोकांची स्थिती नीट होईल विद्यावृद्धी सारखेंच दुसरें असें केले पाहिजे की, रस्ते तळी, झाडे, बांध खाणी ही लोकांस करण्यास शक्ती नसते सबब ही कामे सरकारने करावी किंवा दुसरा करील तर त्यास त्याचे उत्पन्न घेण्याची आज्ञा असावी तशीच लोकांची कसबे, गुण, कलाकौशल्य वाढविण्याचा उपयोग करावा व त्याचा खप होण्याकरितां व्यापार बाजार स्थापित करून वाढवावे व तारवे व गाड्या अशी यंत्रे जी आहेत ती चांगली होतील व पुष्कळ होतील असें करावें, जे अज्ञान लोक आहेत त्यांस ज्या ज्या अडचणी आहेत त्या दूर कराव्या ह्या सर्व युक्ती थोर लोकांचे लक्षांत येत नाहीत कारण कीं, ह्या पायरीपर्यंत त्यांची मजल येत नाहीं, बहुतकरून घरची सुधारणा त्यांची होत नाहीं मग राज्याची व जनाची कशी होईल हे उघड आहे. सर्व लोक उद्योगात एकनिष्ठ व्हावे व प्रामाणिकपणा वाढण्याची साधने काढावी. व्यर्थ खर्च व व्यर्थ काल घालविण्याच्या चाली आहेत त्या सर्व सोडाव्या, व दुर्गुण वृद्धीकरणाऱ्या चालीही टाकाव्या. व लोकांस योग्य मोकळिका आहेत त्या वाढवाव्या, जुलूम होऊ देऊ नये हे शेवटचे कर्तव्य आहे. ही विनंती.

ज्ञानप्रकाश, ३१ डिसेंबर १८५५ — लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ७

विनंती विशेष-मागील पत्रीं लिहिल्याप्रमाणें थोर लोकांनी वागल्यास इंग्रजांच्या राज्यापेक्षां त्यांचे संस्थान, जहागीर, किंवा राज्य, अधिक सुशोभित दिसूं लागेल आणि इंग्रजासही त्यांचें उदाहरण घ्यावे लागेल–आणि रयत फार सुखी होईल कारण कीं, रयतेपासून जो पैका उत्पन्न होतो तो स्वदेशीय राष्ट्रांत पुनः त्याच लोकांस परत जातो ती गोष्ट इंग्रजांच्या राज्यांत घडत नाहीं, कारण कीं इंग्रजी राज्य चांगले शिरस्त्याप्रमाणें चालवितात व कायदा कानून न्याय मनसुबीची पद्धति त्यांणीं चांगली ठेविली आहे तरी साहेब लोकांचे ऐन पगार संबंधी फार खर्च असल्यामुळें तो सर्व पैसा विलायतेस जातो. याजमुळे इंग्रजी मुलुखांत रयतेची नेहमी जिकीर असत्ये व नेहमीं त्यांची दुर्दशा असून पैशाची चणचण असत्ये सर्व बरे आहे. परंतु पैसा नाहीं, रोजगार नाही हे त्यांचे म्हणणे दर गावी ऐकतो आणि जरी त्यांणी दर आकार जमीनीचे व सायर बाबी माफ करुन कित्येक बाबी कमती केल्या तरी रयतेस पुरे पडत नाहीं. कारण कीं, दरसाल पैसा कमी होऊन विलायत पहातो सबब रयतेमध्ये कमी होतो असा पर्याय स्वराज्यांत नसतो परंतु भाग्यहीन स्वदेशीय राजे व थोर लोक यांची कृती इतकी वाईट आहे कीं, सर्व लोक इंग्रजी राज्यास बरे म्हणतात परंतु यांशीं संबंध नसावा, कारण की यांचा उपद्रव फारच असतो. तसेच दुसरे थोर लोक असें म्हणतात कीं साहेब लोक ही वाईट रितीने चालणारे व ज्ञानहीन नसतात कीं काय? तर हें खरे परंतु थोर लोकांनीं असा विचार केला पाहिजे की आपले राज्य लयास जात चाललें आहे यास्तव आपली सर्व प्रकारे हुशारी दिसली पाहिजे. रोग्याने खाण्यापिण्यां विषयी निरोग्याचे उदाहरण घेऊ नयें तसे इंग्रजांचे लष्करची इभ्रत

मोठी आहे आणि पराक्रम एवढा आहे कीं, त्याजकडे कोणी वर डोळा, करुं शकत नाही कारण कीं फौजेची तयारी मोठी व एकोपा मोठा याजमुळें त्यांची इभ्रत मोठी आहे व रयतेवर जुलूम जास्ती नाही यामुळे जरी कितीही एकादा मूर्ख असला तरी त्याचा बोभाट होत नाही, शिरस्त्या-प्रमाणें काम चालून तजवीज होत असते–या देशात बारीक सारीक वर्तमान वहिवाटी इंग्रजांस माहीत नाहीत याजमुळें त्या विषयीं ते अज्ञानी आहेत, व किती एक फार दुर्वृत्त ही असतात हे खरे आहे परंतु हे त्यांचे दुर्गुंण बहुतांचे उद्योगानें आच्छादिले जातात, त्यांत उद्योगी पुष्कळ आणि हे इंग्रज लोकच आमचे लोकांचे हातून काम घेऊ जागत. गांव खात्यांत व लष्करात बहुत काळें लोक असतात पण फार सुरळीतपणे काम करितात त्याप्रमाणे आमचे लोक आपल्या लोकांच्या हातून काम करणार नाहीत याचा कांही संशय नाहीं कारण कीं प्रथम एकतर त्याची आळसावर मोठी प्रवृत्ती, जरा फुरसद सापडली म्हणजे लागलेच रिकामे गोष्टी सांगत बसतील, प्राण गेला तरी काम करणार नाहींत. दुसरें असे कीं, परकी लोकांची आज्ञा ते चांगले रीतीने पालन करितात पण स्वकीय लोकांत भांडत बसतात, दुसरा काम करीत असला तर त्यास हरकत करतील पण एकमेकांस मदत करणार नाहीत व एकमेकांचा मान राखणार नाहीत असा स्वभाव त्यांचा आहे. याजकरितां जरूर आहे की, ह्या लोकास मोठा धाक पाहिजे व कित्येकास शिक्षा योग्य कारणावरून मोठमोठ्या दिल्या पाहिजेत व जो अपराधी असेल तो बहुधा छपणार नाही असे त्यांस वाटून त्यांचे वरचे कामगार जे असतील ते वर्तणुकीने वगैरे चांगले पाहिजेत तेंव्हां त्यांचा धाक व जरब राहील नाहीतर त्यांस ज्या शिक्षा मिळतील. ते त्या थट्टेसारख्या मानितील तेव्हा त्या लोकांस वर्तविणारा स्वता चांगल्या वागणुकीचा व न्यायी व आळसाविषयी खबरदार पाहिजे. तेव्हा इंग्रजीत काम करितात तसे स्वराज्यात काळे लोक काम करतील नाहींतर सर्व धामधूम हल्ली असत्ये तशीच राहील. याजकरिता कोणी इंग्रज लोकात मूर्ख अज्ञानी असेल तर त्यांचे उदाहरण आमचे थोर लोकांनी घेऊ नये परंतु त्यात जे चांगलें असतील त्यांचे घ्यावे आणि त्यांचे राज्याची शिस्त आहे तशी आपली ठेवावी. असे करण्यास ह्या देशचे लोकांचा पुनर्जन्मच झाला पाहिजे व मागील सर्व रिती फिरविल्या पाहिजेत. कारण की बहुत काळापासून आळसाची प्रवृत्ति व स्वस्थ बसण्याची रिती चालत आली आहे ती सुटण्यास मोठा यत्न पाहिजे. इतरांच्यानें व जुनें जें आहेत त्यांच्याने हे सिद्धीस जाणार नाही व त्यांच्या रितीं बदलतील हे ही होणे कठीण आहे. असे जर झाले तर स्वराज्य किंवा संस्थान जहागीर असो ते असें शोभू लागेल की इंग्रज तालुक्यापेक्षा सुंदर दिसेल आणि लोक त्या राजास फार च्याहतील आणि इंग्रजही चकीत होऊन राहतील आणि फार तारीफ करतील. राजाने असे लक्ष ठेवावे की माझ्या राज्याच्या हद्दीत पाय कोणी ठेवीला म्हणजे त्यास सुधारणा दिसू लागाव्या, रयत बहुत करून शहाणी असावी, रस्ते, पाट वगैरे सुख-कारक जागोजागी धर्मशाळा वगैरे रहाण्याच्या जागा उद्योग जिकडे तिकडे फार झालेला असावा. भिकारी थोडे ··· परंतु वास्तविक जे अंध, पंगु असतील त्यांस सुखाने खाण्यास मिळावे, औषधी मिळण्याचे दवाखाने जागोजागी असावे. दुर्व्यसन नाहीसे होत असावे व थोरांची वर्तणुक लोकांनी पाहण्या जोगी असावी. रयतेवर धारे थोडे झाल्यामुळे त्यास वस्त्र पात्र पागोटे व धान्य मिळून सुखी असावे या प्रमाणे चोहोकडे आबादानीं असावी. म्हणजे लोकांची दुर्दशा जाऊन दीना-सारखे लाचार झाले आहेत ते स्थिती बदलून स्वातंत्र्यसौख्य भोगितील असे थोरांनी करीत जावे ही विनंती.

ज्ञानप्रकाश, ७ जानेवारी १८५६ — लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ८

विनंती विशेष – मागील पत्रीं स्वराज्याची स्थिती कशी असावी हे लिहिले परंतु हल्ली कशी आहे याची तुलना कोणी ऐकणार असेल तर त्याविषयी मी सांगतो की मला हे स्वराज्य किंवा कोणाची जाहागीर किंवा संस्थान कसे दिसते म्हणाल तर त्यात पाय टाकीताच असे भासते की ही कोणी एक मोठी बाग त्याणे केली. त्याणें पराकाष्ठेचे श्रम, सायास व खर्च करून तयार केली असावी. परंतु हल्लीचा माळी यास रक्तपिती वगैरे आजार होऊन निरोगी होण्याकरिता नाना-प्रकारची विषे खातो परंतु त्यास आरोग्य न होता हातपाय अधिकच झडून जातात. तथापि त्यांची तो फिकीर न करता आपले अंग शोभवण्याकरिता अलंकार लेऊन पोषाक घालतो आहे अशा समयी त्याचे बागेतील चाकर आपापली कामे सोडून त्याचेजवळ बसले आहेत आणि त्यास म्हण-तात की तुमची नीट झाली तुम्हासारखा बळकट कोणी नाही अशी निर्फळ स्तुती ऐकून जो संतुष्ट होत्साता त्या गड्यास काही कामही करावयास सांगत नाही आणि स्तुति ऐकत बसला आहे आणि त्या गड्यास फुकट खाण्यास मिळावे काही वजन पडू नये म्हणून तो त्यांचे अंगाची दुर्गंधी सोसून त्यास सुगंध दिव्यदेह असे भासवित आहेत आणि बागदानाची इंद्रीये काष्ठ होऊन गेली. याजमुळे त्याचे नाकास त्याची घाण येईनाशी झाली. ह्या व्रनानें त्या आर्जवी लोकास तो खरे समजत आहे, यजमानास बाहेर उठून जाण्याची देखील शक्ती नाही. दुसऱ्यानी हात धरला पाहिजे याजमुळे त्याची बागेवर नजर राहीलीच नाही असे बागेतील घरात व्यवस्था पाहून पुढे जातो तो बागेचे बैल बांधले आहेत. त्याजपुढे वैरण नाही, फार दुबळे झाले आहेत. परंतु त्यांचे पोटास पाहिजे म्हणून बागेत कोठे कोठे गवत उगवले होते ते आपल्या तोंडाने उपटून ते खात होते. त्याजवर जे गडी होते ते मुळीच त्याजकडेस पहात नव्हते व ती बिचारी जनावरे फार कृश होऊन त्यास कोणाचा आधार नाहीसा झाला. परंतु ती अज्ञान मुकी जनावरे त्याची दुर्दशा त्यास देखील बोलता येत नाही याजमुळे ते दुःख सोसून दुसऱ्याचे तोंडाकडे पहात उभी राहिली आहेत. मोठाले फळाचे वृक्ष यांस भुंगे लागले आहेत परंतु कोणी माणसे म्हणतात की यांचा नाद चांगला, कोणी म्हणतात की हे जितकी झाडे नाशितील तितकी बरकत अधिक आहे. असे म्हणून त्यांचे निवारण कोणीच करीत नाही. परंतु किती एक उलटे त्या भुंग्याची पूजा करीत आहेत. कोणी त्यास भुदेव म्हणत आहेत, आणि बागवान त्यांचे नाद ऐकून फार विद्वान म्हणून त्यांचे पालन करीत आहे आणि त्याची वृद्धी होईल ते उपाय करीत आहेत. तेणे करून त्यांची इतकी वृद्धी झाली आहे की एकही वृक्ष त्या शिवाय राहीला नाही. पुढे चाललो तो सुंदर बांधलेल्या विहीरी, आत पाणी पुष्कळ परंतु मोटा व थारोळी व नाडदोरे सर्व सामान बिघडून गेले आहे व त्या विहीरीचे पाणी शेजारी एक सुंदर बाग परगावचे पाटलाने केली होती त्याने कुंपण मोडून आत शिरुन ह्या विहिरीचे पाणी आपले बागेत नेत असे परंतु त्यास कोणी फारसा प्रतिबंध करीत नसे. कदाचित एकदा ह्या बागवाल्याचा गडी त्यास म्हणे की तुम्ही हे पाणी का नेता तर तो पाटील म्हणे की तुम्हास त्याचा उपयोग करता येत नाहीं व वर्षांची वर्षे मोटा फाटून पडल्या आहेत. याज-करितां मी घेईन असे म्हटल्यावर पुढें कोणी बोलत नसें. गांवचे लोक आंत शिरून चांगली चांगली फळे तोडून नेत ते बागवानाच्या अंगावरून जात. परंतु तो म्हणत असे कीं आपले नांव गाजि-वण्याकरितां मी नेऊ देतो अशी हलकी गोष्ट बोलतो. माझे तोंडात तर कधीं नाहीं व नको अशीं अक्षरें येत नाहीत. हे बोलल्यावर मग लौकिक काय राहील, त्याच गोष्टीचा उद्धार करून जवळचे लोक वाहावा करीत बागेंतील झाडे बहुत करून सर्व खराब झाली. कांही द्राक्षीवर घड आले होते ते बाहेरचे लोक नेत असत अशीच दुसऱ्या झाडांचीही अवस्था होती. फुलझाडांचे तक्त्यात पुढें चाललों तो गुलाब वगैरे कांही तक्ते वाळून गेले होते. तथापी काही पर्जन्याच्या योगानें जमले

होते त्यांजवर फुले आली होती. ते बागेंतील चाकर लोक तोडून हातात गळ्यांत गजरे करीत असत. परंतु त्या बागेच्या उस्तवारीकडे कोणाचें चित्त नसून जागोजाग वाटा पडल्या, किती एक ठिकाणी पाणी साचले, किती एक ठिकाणी चिखल झाला होता तरी तिकडे कोणी लक्ष पुरवीना. ज्या ज्या चांगल्या राहिल्या होत्या त्याजवरच वहिवाट करून स्वस्थ बसले. असा फिरत फिरत बागेच्या बंगल्याच्या पाठीमागे आलो तो एक असा नामी आरसे महाल तयार होत आहे. तेव्हां मी विचारिले कीं ह्या बागेच्या धन्यास रोग होऊन पडला आहे त्याला हा बंगला कशास पाहिजे ? त्याजवर लोकांनी उत्तरे केले कीं आमचा धनी तुम्हांस ठाऊक नाहीं. तो मोठा हौशी आहे. सगळी बाग बुडाली तरी चिंता नाही परंतु बंगला बिघडला तर उपयोगास पडणार नाही अशी आमच्या यजमानांची मर्जी आहे. मग त्याच्या घरांतील अवस्था मीं विचारिली तो सांगू लागले कीं, यास मूल बाळ कोणीं नाही, बायका त्रासून उठून गेल्या त्यांस चार पाच वर्षे झाली. आता हा एकटा एथें आहे, परंतु जवळ पैका वडीलांचे वेळेस मिळविलेला पुष्कळ आहे, शंभर वर्षे खाल्ला तरी पुरेल. याप्रमाणें त्याची व्यवस्था होती. तो इतक्यांत महिना पंधरा दिवसांच्या अवकाशांत त्यांस मृत्यु प्राप्त झाला तेव्हां माझ्या डोळ्यांदेखत ती सर्व बाग शिवेशेजारी पाटलानें आपले बागेंत सामील केली. दोन्ही बागांच्या मध्यभागी कुंपण होतें तें उपटून टाकिलें तेव्हां ह्या बागवानाचे चाकर लोक त्याशी बोलण्यास उभे राहिले परंतु त्यांस तो पाटील ह्मणें की, तुमचा धनी कोंठें आहे आतां बोलतां कोणत्या आधारावर, तेव्हां ते उगेच राहिले. पुढें त्यांणी आपल्या धन्याच्या बायकांचा ठिकाण लावून तेथें गेले. तेव्हां त्या म्हणूं लागल्या कीं, नवरा होता तोपर्यंत तुम्ही आम्हांस चैन पडू दिलें नाहींत आता कशास आले आहात. इतक्यात त्या पाटलाने त्यांची समजूत पाडून ठरविले कीं यास अडशेरी दाहामण दाणे दरसाल द्यावे, तितक्यावर त्यांची समजूत पडून त्या घरी राहिल्या, व होळीचे होळकर हे सर्व भीक मागु लागले. बागेत बाग मिळून गेली. कोणास ठिकाणही राहिला नाही. हें बागेचे वर्णन केले आहे हेच संस्थानचे आहे असे समजावें. ही विनंती.

ज्ञानप्रकाश, १४ जानेवारी १८५६. लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. ९

विनंती विशेष– मागील पत्री थोरांची राज्यें व संस्थानें व दौलती कशा असतात हे सांगितले याचा कोणास संशय वाटेल तर त्यास मी असें म्हणतों कीं कोणतेही आपले लोकांचे संस्थान उदाहरणार्थ घेतले तरी चिंता नाहीं. लाहान तागाईत मोठे एक सारखा प्रकार आहे तेथील रयत जुलुमांत सांपडलेली आणि लुटारू यांचे हातांत जेर झालेली असते याचे कारण गरीब लोक जे शेतभात करितात त्यांचे सर्वस्व जबरदस्ती हरण करितात. मामलेदारापासून शिपाई, हवालदार, नाईकपर्यंत जो गांवावर जातो त्यांस यत्किंचित आधार सरकारचा असला म्हणजे गरीब लोकांचे येथे धान्य भाजी वगैरे जे पिकलेले असते तेही त्याप्रमाणें घेतात. मामलेदाराचे येथें लग्न निघाले म्हणजे तालुक्यांतून भाजी तूप वगैरे आधिकाराचे जोरामुळें लुटून आणितात आणि पाटील कुळकर्णी जमीनदार हेही चोर आपले संरक्षणावर नजर देऊन लुटीस मदत करून त्यांत आपलेही पोट भरितात अशी रयतेची हलाखी असत्ये. सावकार वगैरे जे मध्यम प्रतीचे लोक असतात त्यांस गुलामगिरीत राहवे लागतें परंतु ते बहुधा सरकारी लोकांचे जुलुमांस प्रतिबंध न करितां सरकारी लोकांची मर्जी संपादून त्या लुटीचा हिस्सा आपणही अनुभवितात तथापि मला वाटतें की स्वराज्यांत हे लोक बरे असतात. आतां याहून जे वरिष्ठ ते सरकारी कामगार, हे बिनभांडवली लोक हे व्यापार धंदा करीत नाहीत परंतु सरकारचे म्हणून लोकांस लुटून त्यावर पोट

भरितात व हे लोक स्वराज्यांत फारच वाइट असतात याचें कारण सरकार महामूर्ख असतें, याजकरितां जो काळ त्यांस सांपडेल तो द्रव्य मिळविण्यांत घालवितात व त्या द्रव्याचा उपयोगही ते फार वाईट रीतीनें करितात. आतां जर गाईकवाडाचें किंवा लखनोचें इत्यादि संस्थानाकडे पाहिलें तर असें दिसेल की रयत फार भिकारी आणि पराधीन आहे व मध्यम प्रतीचे लोक बरे आहेत, परंतु त्यामध्यें एवढा दुर्गुण असतो की ते सरकारीं लोकांचे दास असतात. नेहमी त्यांचे आर्जवांत त्यांची सरबरा करण्यामध्यें गुंग आणि स्वता निरूपयोगी मूर्ख असतात – याखेरीज त्यांजमध्ये दुर्गुण नसतात व सरकारी लोक महा लबाड कुभांडी असतात व त्यांस पाहिजे ते करण्याचे सामर्थ्य असते. म्हणजे इंग्रज सरकारचा प्रतिबंध त्यांस पुष्कळ असतो. तत्रापि जो गरीब आणि ज्याची किंमत चोहीकडे पेरलेली असत्ये त्याला थोराशी वाद घालण्यांत यश येत नाही. याजमुळें लोक दीन होऊन असतात आणि जूलुम सोसतात. याजमुळे सरकारी कामदारास फारच फूस सांपडत्ये आणि त्यांची आचरणें पाहिलीं तर फारच वाईट असतात. कोणी दुर्गुणी मूर्ख, कोणी भांग्ये दारूबाज असतात, किती एक ठिकाणी ह्या लोकांची फारच वाईट स्थिती असत्यें आणि देशाचे सरकार अशा लोकांनी वेष्टीत असते म्हणून तो मुख्य धनि मूर्खाचा शिरोमणी असतो. यत्किंचित इंग्रज सरकारचा कामगार असला तरी त्या लाखो रूपयांच्या जहागिरीच्या मालकास नाना प्रकारची भये घालितो, नाना प्रकारच्या भुलथापी देतो. एक शिपाई जरी रसिदंटाकडील आला तरी उंदिर जसे मांजरास भितात तसं हे थोर लोक आपले दरबारात शिपायास देखील भितात. त्यांस लांच देतात. व बक्षिसे देतात, त्यांचा बहुमान धन्याप्रमाणे करितात. याचे कारण, हे थोर लोक जातीने अगदींच नादान, गैरसमज, सर्वकाल धुंद, कोणत्याही गोष्टीची खबर ठेवीत नाहीत याजमुळे ते सजिवलेले चित्राप्रमाणे अलंकार भूषणानी युक्त परंतु पराक्रमहीन व ज्ञानशून्य दिसतात, याजमुळे कोणासही, त्यांचे भय वाटत नाही. साधारण मनुष्यही त्यास गुरकावितो, आणि हे बिचारे लोकांची भये बाळगून पराक्रमाने जो मान मिळवावयाचा ती शक्ती यांच्यात नाही म्हणून लोकांस लांच वगैरे देऊन मान मिळविण्यास इच्छितात. परंतु असें करण्यांत अगदींच फसतात व अधिक त्यांची कुचेष्टा करुन लोक नापत करीतात. या प्रमाणें अवस्था आहे कीं नाहीं हें सर्वांस माहीत आहेच – तर यांस शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न फार अवघड आहे. जवळचे सर्व भ्रामक पुरुष अगदी दूर केले पाहिजेत. आर्जवी लोक अगदी यजमानास बिघडून टाकीतात. त्यांसी संगत तोडलीं पाहिजे, स्वता बुद्धी चालविण्याचा त्यास यत्न शिकवीला पाहिजे. असें कृत्य करण्यास फारच अवघड असे का मी म्हणतो याचे कारण; जो असें कोणी करण्यास प्रवृत्त होईल त्याचे हे सर्व लोक शत्रुत्व करतील व जे कंपनी सरकारचे नोकर लोक ह्या थोरांचे संस्थानावर लांच वगैरे मिळवितात त्यांचा नफा बुडतो म्हणून तेही द्वेष करतील. तस्मात सर्वांचे शत्रुत्व झाल्यावर एकाचा प्रयत्न सिद्धीस जाणें अवघड आहे – मुळी ज्याणी ही राज्ये व संस्थानें व जहागिरी मिळवल्या आहेत ते महापराक्रमी शूर असतील यात संशय नाही. परंतु सांप्रतकाळचे त्यांचे उपभोगकर्ते जे आहेत त्याची स्थिती पाहून फार वाईट वाटतें कीं ह्या सर्वांचा जसा काही काळ सन्निध्य येऊन व्याधींत व्याधीं रोगावर रोग होऊन घटका घटका मरण जात असत्ये तद्वत ह्या थोर लोकांची अवस्था दिसते जशी कौरवांची सेना श्रीकृष्णानें आपले दाढेत अर्जुनास मरणोन्मुख झालेली दाखविली तद्वत हे या काळी सर्व राज्ये व संस्थाने एका पाठीमागून एक लयास जाणार असें विश्वरुप दर्शन होत आहे असे मला वाटते. याज करिता मी अनेक प्रकारांनी ह्या थोरलोकांत सुचवितो कीं कठीण शब्दांचा रोष न करितां त्यांतील मर्म जाणून कांही आपली भलाई करुन घ्या. चांगले लोक सत्वस्त आपले जवळ करा, चांगली मसलत कोणती हें पहा. शेजारी इंग्रजांचे राज्याचा बिवलकरी कित्ता आहे तो पहा. तुम्हास स्वता शाहणपणा वरुन कोणी मान देईल असं करा. तुमचे भरजरी झगे, मुलांचे दागिने, व चोपदारांची बोंब पाहुन तुम्हास लोक

उठतात उभे रहातात, परंतु हा अंतःकरणाचा धर्म नव्हे; कारण बहुधा तुमचे लोक दिवाण कारभारी वकील, हे महाठक. तुम्हास बुडविणारे याखेरीज तुम्हांस चांगले कोणी म्हणत नाही आणि उलटे तुम्हांस तुच्छ मानून निंदीतात. तुमचे संस्थान तुम्हांपासून गेले तर तुमची योग्यता पांच रुपये दरमहा मिळविण्याची नाहीं. व कोणत्याही कामाच्या उपयोगी तुम्ही नाही हें सर्वांस विदित आहे. गाइकवाडास त्याचे पाठीमागे तो उठून जातांच हा घोडेवाल्या इतका देखील शाहाणा नाही असे साहेब लोकांनी म्हटलेले मी ऐकिलें आहे. तसेच बहुत संस्थाणी लोकांच्या दुर्दशा मी पाहील्या आहेत -- केवळ जरुरी करिता मात्र साहेब लोक तुम्हास उठुन उभे रहातात; परंतु ते आपल्या मनांत तुम्हांस चिरटाप्रमाणे समजतात याचे कारण ज्या संस्थांनावर तुम्हीं आहां तेथे माणसासारखी तुमची काहीच रीति नाहीं व तेथील लोकांचे कल्याण जो तुमचे थोरपणाचा हेतु तो अगदी तुम्हांस ठाऊक नाही. तुम्हीं निद्रा, नाच, यात निमग्न आहां तर ही गर्भ श्रीमंतीची झोंप टाकून सत्वर सावध झालेत तर कांही तुम्ही आपले कुळाच्या व रयतेच्या उपयोगी पडाल नाहींतर कुत्र्याचे मरण्यानें मराल आणि फजितीस कारण होऊन तुमचें नाव, निशाण, कांही राहाणार नाहीं हा कळवळा मला वाटतो. म्हणून माझे मागील पत्रांतील बोध मनांत आणून त्याप्रमाणें बरे वाईट दिसेल याचा विचार करावा ही विनंती.

ज्ञानप्रकाश, १८ फेब्रुवारी १८५६ लोकहितवादी

---

## बाहेरून आलेले पत्र नं. १०

विनंति विशेष – तुमचे मागील पत्री पुण्यातील कांही भटभिक्षुक पुनर्विवाहाचे कायद्याविषयी तक्रार अर्ज करणार म्हणून एका बाहेरील पत्रांत दर्शविले आहे, त्यास याविषयी माझे म्हणणेंही तुम्ही प्रसिद्ध करावें.

बंगाल्यांतील वर्तमान पत्रावरून मला ठाऊक आहे की ईश्वरचंद्र विद्यासागर म्हणून कलकत्त्याचे संस्कृत पाठशाळेंतील मुक्त्यार मोठा विख्यात पंडित आहे. त्याणे कायदे करणारे कौन्सिलास असें लिहून दिले आहे कीं, पुनर्विवाह ब्राह्मण स्त्रियानी न करावा असा हिंदुशास्त्राचा वास्तविक अर्थ नाही, परंपरा चाल मात्र आहे. तोच मजकूर कायद्याचे मसुद्यांत नमेस धरला आहे. तेव्हां ह्या धर्मवेत्त्या पंडिताचे म्हणणे रद्द करण्यास कोणी पुढारी न होता व्यर्थ तक्रार करतील तर त्यांची योग्य किंमत सरकार समजून एकीकडे ठेवील यांत संशय नाही.

दुसरे, कन्या, भगिनी, ह्या सर्वांस आहेत. त्यांची दुर्दशा व्हावी असे इच्छिणार जे ते धर्मबुद्धी पुरुष नव्हत कारण कीं लहांन मुलींची व मुलांची लग्ने होतात व कितीएक अगदी अल्पवयांत विधवा होतात. तेव्हां जन्मपर्यंत त्यांची व्यवस्था काय व्हावी यांविषयीं बहुतेक लोकांचे विचार किती एकांचे हृद्गतच कित्येकांचे लौकिकांत प्रसिद्ध आहेत ते असें कीं बहुतकालचीं जरी परंपरा चाल असली तरी तिजपासून अति अनर्थ होतो हे वारंवार अनुभवावरून सिद्ध आहे याजकरितां ती मोडावी हे उत्तम व शास्त्रासंबंधी नियम ब्राह्मणांनी आजपर्यंत सहजांत किती मोडले आहेत व किती मोडीत आहेत याची गणना व्हावयाची नाही. तेव्हां प्राण घातकी एकादा नियम मोडला तर चिंता नाही हे उघड आहे. हा नियम प्राणघातकी आहे किंवा नाही याविषयीं कोणत्याही पक्षास संशय नाही. परंतु एक पक्ष विहिरींत पुढे पडत असतात हे कानांनी ऐकत व डोळ्यानी पहात असता वेड्यासारखा आपण धांवून त्याच खांचेंत पडून मरणार व दुसरा पक्ष जरी पुढे परंपराविहिरींत पडत आलेले दिसतात तरी विचार करून ती परंपरा सोडू पहातो, इतका भेद आहे.

पुनर्विवाहाबद्दल बहुत दिवस वादविवाद होत येऊन अनुकूलपक्ष चांगला सबल झाला आहे असें मला वाटते. व प्रतिकूलपक्ष जरी बहुत आहे तरी निर्बळ आहे व दिवसेंदिवस त्यास क्षय लागला आहे कारण कि जो वृद्ध जुन्या समजुतीचा मनुष्य मरतो त्याची जागा भरत नाहीं परंतु त्या पक्षाचा तो ऐन तोटाच आहे; परंतु अनुकूल पक्षात वृद्धि आहे. असो. ह्या विचाराखेरीज मला असें वाटतें कीं, लोकांनीं केवळ ह्या कामास अंधळे होऊं नये आणि कोणता विचारहीन आयुक्त नेम आहे तो जोंपर्यंत लोक अज्ञान आहेत तोंपर्यंत निभतो लोक शहाणे होतांच त्याजबद्दल तंटा पडतो तसें हें आहे.

हल्लीं जो फायदा होत आहे त्याचा अर्थ इतकाच कीं जो कोणीं पुनर्विवाह करण्यास इच्छितो त्याणें केल्यास त्यास शास्त्रासंबंधी उपद्रव होऊं नये, त्यास त्या लोकांचे यांत कांही गेले नाहीं. ज्यांनी पुनर्विवाह न करण्याचा त्यांनी करू नये परंतु ज्यास करणें हें यथाशास्त्र दिसतें त्यांणीं केल्यास करूं द्या. इतकेच तात्पर्य आहे. तर हे लोक स्त्रियांस दुःखांत ठेवीत आले व पुढेंही त्यांस बुडविण्यास इच्छितात आणि आतां त्याहूनही पुढें गेले म्हणजे ज्या विधवेनें लग्न केलें तिला व तिचे दुसरे नवऱ्यास दोघांसही बुडवूं पाहतात. सांप्रतचे कायद्यावरून अशा पुरुषांस व स्त्रियास उपद्रव करण्याचा अधिकार लोकांस नाही. कोणी आता लग्न करील तर खुशाल लोकां-मध्ये राहू शकेल परंतु त्यास वारसादायाद भाग देणार नाहीत इतकें मात्र शिल्लक आहे तें नवीन कायद्यानें दुरुस्त होत आहे तर ज्याणें पुनर्विवाह विधवेशी केला त्यास खाण्यास वगैरे कांही असू नये असा अभिप्राय लोकांचा आहे की काय ? जर तुम्ही जिवंत ठेवाल तर त्यास खाण्यास नको म्हणतां हें काय ? यापेक्षा लोकांनीं पाहिजे तर सरकारास अशी अर्जी करावी कीं असें लग्न जो कोणी करील त्यांस ब्राम्हणांचे स्वाधीन करून घाशीरामासारखें करावें असा अधि-कार ब्राह्मण लोकांस दिला तर बरें परंतु मध्येच त्यांस राहूं देऊन मिळकत देऊ नये हें म्हणणें विसंगत आहे. याजकरिता हें पुण्यातील लोकांचें करणें अगदी दुराग्रही, अभिमानी, अज्ञानाचे व स्वहिताचे घातक आहे. पुरुष लग्नें करितात आणि स्त्रियांनीं काय अपराध केला आहे ? ह्या अर्जिवर सह्या घालणारे इनसाफी असल्यास त्यांणीं त्यांस एक कलम ल्याहावे कीं, आमच्या स्त्रिया मरतील तर आम्ही तात्काळ संन्यास घेऊन तीर्थयात्रेस भीक मागत जाऊं. तर मी त्यास खरे इनसाफी ह्मणेन. नाहीतर हे स्त्रियांस जनावरा प्रमाणें पाहणारे ह्मटल्यास चालेल. स्त्रियांचा असा घात जन्मापर्यंत करणें आणि त्यांची दुर्दशा करणें, व त्यांचा अपमान असा कीं तिचे तोंड पाहिलें तरी अपशकुन होतो. तिणें दोन वेळ जेऊं नये, चोळी घालू नये. अन्नास तिला कोठे थारा असू नये. पृथ्वी वरील जें काही सौख्य ते तिला जन्मभर प्राप्त होऊं नये, असें जे इच्छितात व जे अशा करण्यांत आनंद पावतात त्यांस हीं केवळ "दुःशासन" ह्मणतों. महादुरत्यय, राक्षसी स्त्री-घातक ते आहेत असें ह्मणण्यास चिंता नाहीं. अल्पमतीची लहान बालके ज्यांस स्त्री पुरुषांचा भेदही समजत नाहीं. त्यांचा असा घात करणें अयोग्य आहे मृत्यु कोणाचे स्वाधीन नाही. ब्राह्म-णांनीं असा नियम केला म्हणून आजपर्यंत मृत्यूस दया येऊन त्या ब्राम्हणाच्या विधवा होत नाहीत असें नाहीं. तर पुनः विवाह करण्यास कां परवानगी असू नये, शुद्रादिक जे करीतात त्यांचे व्यवहार बंद झाले नाहींत, त्यातही मोठाले राजे वगैरे आहेत, ब्राम्हणास ह्या नियमापासून इतके वर्षात अमूक नफा झाला आहे असे दिसत नाहीं तर केवळ अभिमानानें हा स्त्रियांवर उघड जुलूम आहे हा तात्काळ बंद करावा. हीं चाल बदलावी यास शास्त्राधार नाहीच. असला तरी चिंता नाही. बहुत रूढी शास्त्राविरुद्ध आहेत तशीच ही एक. परंतु स्त्रियांचा अपमान, हाल, अपेष्टा मृत्यूपेक्षा अधिक अशी दुर्दशा, हीं फार वाईट आहेत. स्त्रिया अज्ञान आहेत तोंपर्यंत हें

पडतरडत सरासरी चालेल. परंतु शत्यानीं विचार करावा कीं हें करणें मनुष्यासारखें आहे किंवा व्याघ्रासारखे आहे. आणि जो पक्ष नीट दिसेल तो ग्रहण करावा हें उचित आहे. केवळ कायदा होऊन निर्वाह होणार नाही कारण प्रत्यक्ष रूढी फिरली पाहिजे, बहुत काळाची, अंधपरंपरा सतीसारखी रुढी चालत आहे खरी. परंतु सारासार विचार करावा हें बरें. ही विनंती.

ज्ञानप्रकाश, ३ मार्च १८५६

लोकहितवादी

• •

# लोकहितवादी : नवे संशोधन : ३

## लोकहितवादीकृत इंग्रजी लिखाण

[मराठी वाङ्मयांत लोकहितवादीच्या लेखनाला एक विशिष्ट स्थान आहे. त्यापैकी बरेचसे लेखन पुस्तक रूपाने आज उपलब्ध आहे, वाचकांच्या परिचयाचे आहे. त्यांचे जे कांही इंग्रजी लिखाण उपलब्ध झाले आहे, त्यांतील कांही विषयभाग नवीन आहे. प्रस्तुत लेखांत ते वाचकांसमोर आणण्याचे योजिले आहे.]

### इंग्रजीवरील प्रभुत्व

लोकहितवादी इंग्रजींत उत्तम भाषणही करू शकत असत. १८८०-८२ या तीन वर्षांसाठी त्यांची गव्हर्नरच्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिलचे ॲडीशनल मेंबर म्हणून नियुक्ती झाली होती. या कौन्सिलच्या सभांमधून झालेली लोकहितवादींची इंग्रजींतील भाषणे सरकारी दफ्तरांत उपलब्ध आहेत. या सगळ्याचा मतितार्थ हा आहे, की त्यांचे इंग्रजीवर चांगले प्रभुत्व होते. त्यांच्या उपलब्ध असलेल्या इंग्रजी लिखाणावरूनही हीच गोष्ट दिसून येते.

इंग्रजीमधून केलेले काही लिखाण पुढीलप्रमाणे –

(१) गव्हर्नर लॉर्ड फॉकलंड (१८४८–५२) यास उद्देशून विधवांच्या स्थितीबद्दलचे लिहिलेले अनावृत्त पत्र.

(२) थिओसोफीकल सोसायटीचे मुखपत्र 'The Theosophist' या मासिकांतून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आठ लेख.

### थिओसोफीस्ट मधील लेख

The Theosophist या इंग्रजींतून प्रसिद्ध होणाऱ्या मासिकांत लोकहितवादींचे जे आठ लेख आले होते ते येणेप्रमाणे :

(१) The Jain View of Om मे १८८० पृ. २१२ (२) Synopsis of the Aryan Literature, जुलै १८८० पृ. २४६-४७ (३) Beggars in India, नोव्हेंबर १८८०, पृ. ४१-४२ (४) Sacred Places of India, डिसेंबर १८८०, पृ. ५५-५६ (५) Hindu Chronology, जाने. १८८१ पृ. ८०-८१ (६) Dnyaneshwari : The Book from the Tomb. मे, १८८१, पृ. १७३-७४ (७) Sacred Indian Trees, ऑगस्ट १८८१, पृ. २३६-३७ (८) The Great Sadhus of India, मे १८८२

"Miseries of and Crimes incidental to Brahmin widowhood; with Suggestions for their removal".

**'ब्राम्हण विधवांची दुःखे, तदनुषंगाने होणारी गुन्हेगारी व त्यांच्या निवारणार्थ सूचना.'**

महाराज,

ज्या विषयांसंबंधी मी हे नम्र प्रतिपादन करीत आहे तो विषयच असा आहे की आपली सहानुभूति व लक्ष वेधल्याशिवाय रहाणार नाही; कारण तो हजारोंच्या कल्याणाशी व त्यांच्या जीवनांच्या बऱ्यावाईटाशी निगडीत आहे. इतका महत्त्वाचा असूनही हा विषय दीर्घकाल अक्षम्य विस्मृतीचा पडद्याआड राहिला आहे. पण आपण हे जाणालच की, ज्या धोरणांची सुज्ञता सामाजिक व नैतिक सुधारणेमध्ये व कृत्रिम दुःखाचा भार हलका करण्यामध्ये अंतर्भूत आहे, अशा धोरणांकडून इतःपर मानवतेची गळचेपी होता कामा नये. तीव्र अनुकंपेची भावना प्रत्यही घडणाऱ्या दुःखद प्रसंगाचे वर्णन करण्यास मला भाग पाडते. ज्या प्रसंगाबद्दल उदासीन प्रेक्षक सुद्धा असाच निर्वाळा देईल, की ते मानवतेला धक्का देणारे व मानवाच्या प्रतिष्ठेला कलंक लावणारे आहेत.

महाराज, आपणास कल्पना असेलच की हिंदू समाजात व्यावसायिक शिक्षणात श्रेष्ठ असलेले पण अंधश्रद्धा व पूर्वग्रह याबाबतीत अधिक ख्यात असलेले ब्राह्मण आपल्या विधवांना पुनर्विवाहाची संधी नाकारून त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध व मनाविरुद्ध जबरदस्तीने ब्रह्मचर्य पाळावयास लावतात. ते आपल्या कन्यांचे विवाह अतिशय लहान वयात ४ पासून १० वर्षांपर्यंत करतात. धर्मशास्त्र किंवा हिंदूकायदा असे सांगतो-लबाडीच्या कि अंधश्रद्धेच्या पोटी हे मी आतांच ठरविणार नाही—की स्त्रियांनी आयुष्यांत एकच पति करावा; व जर मृत्यू पावला तर त्याचे प्रेताबरोबर स्वतःस जिवंत जाळून घ्यावे. परोपकारी इंग्रजांनी हा क्रूर रानटीपणा आता थांबविला आहे. आणि कांही दुर्लक्षणीय अपवाद सोडले तर केप कामोरिन ते हिमालयापर्यंत धर्माच्या नांवाखाली होणारी स्त्रीची अनुचित हत्या आतां बंद झाली आहे. या गुन्ह्याच्या कायदेशीर उच्चाटनाने खरोखर असंख्य विधवांचे प्राण वांचलेले आहेत. पण त्यांच्या उर्वरित आयुष्याच्या वाट्यास दसपट गुन्ह्यानीं युक्त असे लाजिरवाणे जीणे आले आहे. अजूनही अशी प्रथा अस्तित्वात आहे की जिच्यामुळे विधवांचे जीवन कमालीचे दुःखी व गुन्हेगारीचे झाले आहे. सततचे वैधव्य व तदनुषंगिक दुःखे व छळणूक यांचा उल्लेख मला करायचा आहे. सती न जाणाऱ्या विधवेस अपमानास्पद वागणूक दिली जाते. उदा., तिचा पति मरण पावताच तिला झालेल्या दुःखात भर म्हणून नापिताकडून तिचे अपमानास्पद रीतीने केशवपन केले जाते. सधवा स्त्रीची वैशिष्ठ्ये ठरणारी सौभाग्य लक्षणे व अलंकार विधवा स्त्रीकडून हिरावून घेतली जातात. अशा मानहानीपुढे मान तुकवण्यास खंबीरपणे नकार देणाऱ्या काही धैर्यशाली स्त्रिया दक्षिणेत आहेत पण अशी उदाहरणे विरळाच व कोकणांत तर ती अजिबात आढळत नाहीत. तिचा चेहरा विद्रुप केल्यानंतर तिचे आप्त व मित्र तिला सांगतात की तिचे दैव वाईट आहे; आणि आयुष्यांत वाट्यास आलेल्या कटु प्यालावरच तिने समाधान मानले पाहिजे. तिला असे सांगितले जाते की तिचे जीवन आता निरुपयोगी आहे आणि म्हणून ते साधेपणानेच तिने जगावे, आणि स्वतःवर लादून घेतलेल्या दुःखानीच आपले शरीर तिने झिजवावे. त्यानुसार तिच्या गरजा मर्यादित केल्या जातात आणि सुखापासून तिला वंचित केले जाते. तिने दोनदा जेवता कामा नये. तिने चोळी व कर्णभूषणें वापरता कामा नये, आणि फक्त एकच वस्त्र परिधान केले पाहिजे. सहानुभूतीस पात्र असलेला जीव म्हणून पाहाण्याऐवजी सारा समाज तिच्यांकडे देवाच्या कोपाचा विशेष बळी म्हणून पाहतो. ज्यांत असे काही दुर्दैवी जीव अथवा दुःखपूर्ण

जन्मठेप वाट्याला आलेले कैदी नाहीत. असे ब्राह्मणाचे एकही घर आढळणार नाही. (वैधव्य प्राप्तीमुळे) वाटणाऱ्या लज्जेच्या जाणीवेचे प्रतिक म्हणून विधवेने (पतिनिधनानंतरचे) पहिले दहा किंवा अधिक दिवस घरांतील अंधाऱ्या खोलीत बसण्याची चाल आहे. ही तिच्या वैधव्यावस्थेची सुरुवात असते. स्वतःच्या अवस्थेपुरतीच ती दुर्दैवी मानली जाते एवढेच नव्हे तर आपल्या नजरेने वा संबंधाने ती इतरांच्या भवितव्यावर सुद्धा (वाईट) प्रभाव पाडते असे समजले जाते. म्हणून कोणताही ब्राह्मण सकाळच्या प्रहरी दिसणारा तिचा चेहरा पुढे वाढून ठेवलेल्या कोणत्या तरी वाईट घटना सूचित करणारा अपशकुनच समजतो. कोणत्याही कामासाठी वा प्रवासासाठी घराबाहेर पडताक्षणी जर विधवेचे दर्शन घडले तर ज्याला आपले काम वा प्रवास अयशस्वी होऊ नये असे वाटते तो ते पुढे ढकलतो. विधवेने विवाहाच्या किंवा तत्सम मिरवणुकीत भाग घेता कामा नये; तिने घरात राहून आपला चेहरा लपविला पाहिजे आणि तसाच अटळ प्रसंग असल्याशिवाय घराबाहेरही पडता कामा नये. ब्राह्मणांचा प्रभाव असेपर्यंत ती राष्ट्रीय, सामाजिक आणि कौटुंबिक हक्कांना मुकणार आहे. पतीच्या निधनाबद्दलचे दुःख प्रगट करण्याआधीच तिचे मंगळसूत्र व बांगड्या हिरावून घेतल्या जातात व पतीच्या चितेबरोबरोबर जाळल्या जातात; समाजामध्ये कोणत्याही अधिकारांना ती पात्र रहात नाही.

या दुर्दैवी जीवांचे तीन प्रकार संभवतात–

(१) स्वतंत्र (२) परावलंबी आणि (३) एकाकी व स्नेहविरहित. पहिल्या वर्गात स्थावर मिळकत वा उत्पन्नाचे साधन जवळ असलेल्या विधवांचा समावेश होतो. दुसऱ्यात स्वतःचे (उत्पन्न) काही नाही परंतु नातेवाईकांवर चरितार्थाकरिता अवलंबून राहू शकतात अशांचा अंतर्भाव होतो. ज्या विधवांना यांपैकी काहीच उपलब्ध नाही व मित्रही नाहीत त्यांचा तिसरा वर्ग पडतो. पहिल्या वर्गातील विधवा तरुण असतील तर सर्व प्रकारचे दुष्कृत्ये करतात आणि आपल्या कुटुंबाच्या (प्रतिष्ठेचा) व स्वतःच्या दर्जाचा विचार न करता उघडपणे वेश्याजीवन जगतात. अशा तऱ्हेने कलंकीत न झालेले दक्षिणेत किंवा इतर ठिकाणी एकही घर आढळणार नाही; यास प्रथम दर्जाची सरदार घराणीही अपवाद नाहीत. अर्थात यास अपवादही आहेत. ज्यांचे पती वृद्धत्वामुळे मृत झाले अशा (कांही) विधवा आपल्या पवित्र आचरणासाठी ख्यात आहेत. पण अशा शंभरात केवळ पाचही नाहीत. असे मला वाटत नाही की त्यांचे खाण्यापिण्याचे हाल केले जातात. कारण त्यांना चरितार्थाची साधने उपलब्ध असतात व त्या स्वतःची उपासमार कोणाकडूनही होऊ देणार नाहीत. दुसऱ्या वर्गात मोडणाऱ्या विधवांना (मात्र) फारच वाईट वागणूक दिली जाते. त्यांच्या कुटुंबांना त्याचे ओझे वाटते; याचा परिणाम म्हणून त्यांना खावयास चांगले अन्न दिले जात नाही, झोपण्यासाठी चांगले अंथरुण पांघरूण व आजारी असताना औषधे देण्यांत येत नाहीत. त्यांना निष्काळजीपणे वागविले जात असतानाच त्यांच्याकडून हलकी कामे व घरकामे करून घेण्यांत येतात. घराबाहेर काढले जाण्याच्या भीतीपोटी त्यांना सगळ्यांच्या आज्ञेत रहावे लागते. त्यांची स्थिती फार दुःखदायक असते आणि बहुधा त्या आश्रयासाठी आईवडिलांच्या घरी जातात व तेथे अनेक दुर्गुणांना बळी पडतात. या तरुण (विधवा) मुलीचे वडील कधीकधी स्वतः करता धनप्राप्ति करून घेण्यासाठी त्यांच्या बाल्यावस्थेचा फायदा घेतात व त्यांचा एखाद्या जराजर्जर माणसाशी विवाह लावून देतात. पति सत्तर वर्षांचा व त्याची पत्नी केवळ सात वर्षांची आहे असे जोडपे मला माहिती आहे. अशा स्त्रीचे जीवन दुःखी होणारच; (कारण) असा नवरा बहुधा पत्नीला ऋतुप्राप्ति होण्याच्या आतच मृत्यु पावतो. ती (स्त्री) दुर्दैवी आहे असे मानले जाते. एकजण म्हणतो की ज्योतिषाने लग्नाचा मुहूर्त काढताना चुक केली तर दुसरा म्हणतो की कन्येच्या जन्माचे वेळी ग्रहमानच असे वाईट होते. त्यामुळे एखाद्या तरुणाशी जरी तिचा विवाह होता तरी ती खात्रीने विधवा झाली असती.

विवाहाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी (म्हणजेच) अंगाची हळददेखील पुसली गेली नाही तोच केवळ अपघाताने अथवा (मानवी शक्तींच्या) नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे वैधव्य प्राप्त झालेल्या ४ ते १० वर्षांच्या मुली मी पाहिल्या आहेत. कधी कधी असे घडते की तिच्या (मृत) पतीचे नातेवाईक तिच्या संपत्तीचा अपहार करतात, तिला निराधार करून सोडतात. आणि आधारसाठी (तिच्या) पित्यावर अवलंबून राहाण्यास लावतात. हिंदू कुटुंबियांचे वैशिष्ट्य ठरणारी कटु भांडणे त्यामुळेच उद्‌भवतात.

तृतीय वर्गांत येणाऱ्या विधवा या सर्वांमध्ये अधिक निराधार व असहाय असतात. श्रीमंत ब्राह्मणांच्या घरी या हलकी सलकी कामे करून रहातात. ज्या हिंदू धर्मशास्त्रानुसार ब्राह्मणांना ब्राह्मणेतराच्या हातचे अन्न खाण्यास प्रतिबंध केला आहे त्याच शास्त्राने पुनर्विवाहास अनुमती नाकारली असावी. जेणेकरून हलकी सलकी कामे करणारे नोकर अतिशय स्वस्त दराने व जवळ जवळ गुलाम असे विपुल प्रमाणांत ब्राह्मणांना मिळावेत. या स्त्रिया बहुधा स्वयंपाकी म्हणून काम करतात व कधी कधी त्यांच्या लहानग्यांना घेऊन निर्वाहाकरिता भीक मागतांना आढळतात. हिंदुधर्मशास्त्रामुळे अनेक विधवांना निराधार व्हावे लागले पण त्याने (शास्त्राने) अशा स्त्रीयांचा जेथे स्वीकार होईल अशा एकाही इस्पितळाची सोय केली नाही. किंवा त्यांच्या मुलांना शिक्षण देईल अशी एकही शाळा काढली नाही. या विधवा सर्वसाधारणतः वर्णनातीत दुष्ट असतात. अर्थात मला हे प्रामाणिकपणे कबुल केले पाहिजे की प्रत्येक वर्गात यास काही अपवाद आहेत परंतु बऱ्याच जणींची वागणूक अनिर्बंध व अयोग्य असते.

या सर्व वर्गातील विधवा कुप्रसिद्ध म्हणून माहिती असतात. पण ही दुःखाची गोष्ट आहे की त्यांची कुप्रसिद्धी पडद्याआड झाकली जाते. त्यांच्या कुप्रसिद्धीचा एकमेव पुरावा म्हणजे त्यांची गरोदर अवस्था; अतएव ती काळजीपूर्वक नष्ट करणे क्रमप्राप्त होते. एखाद्या विधवेच्या ठिकाणी गरोदरपणाची लक्षणे दिसली तर तिला कोणाकडूनही पाणी मिळणार नाही किंवा (गरोदरपणाची) लाज लपविण्यासाठी रहावयास जागाही मिळणार नाही, त्यामुळे तिला गर्भपात करून घेणे क्रमप्राप्त होते. आणि (अशा प्रकारे) अविवेकाने भ्रुणहत्या होते. ह्या (गर्भपात करून घेणाऱ्या) मातेचे ठायी अनैसर्गिकता असते असे मात्र समजता उपयोगी नाही. तिलाही अपत्य प्रेम असतेच परंतु या कृत्यामुळे होणाऱ्या मानहानीची तिला भीती वाटत असते. अशा स्त्रीचा सगळीकडे तिरस्कार होतो. जीवन म्हणजे तिच्या दृष्टीने नर्क ठरेल. जिचा अलिकडेच मृत्यु झाला आहे अशा एका स्त्रीने आठ वेळा गर्भपात करवून घेतला अशी मला खात्रीलायक माहिती कळली आहे. आता याचा अर्थ अितक्या बालहत्या झाल्या किंवा काय हे ठरविण्याचे काम मात्र सुज्ञांवर सोपविले पाहिजे. यापैकी बरेच गुन्हे पोलीस अधिकाऱ्यांच्या नजरेस आणले जातात, पण पुराव्या-अभावी ते दखल पात्र होऊ शकत नाहीत. हे उद्वेगजनक गुन्हे फार मोठ्या प्रमाणावर सतत चालू असतात. अशा पापी हेतूकरता औषधे देण्याचा व्यापार करणारे एतद्देशीय धंदेवाईक व सुईणी असल्याचे मला ठाऊक आहेत. या अमानुष कृत्यांचे वर्णन करणे कंटाळवाणे ठरेल व ते ऐकणे क्लेशकारक होईल. या घृणास्पद गोष्टींच्या तपशीलाने मी आपल्या श्रवणेंद्रीयांना उबग आणू इच्छित नाही. या गुन्ह्यांना अप्रत्यक्ष जबाबदार असलेल्या ब्राह्मणांचे मार्ग बदलण्यास त्यांचे मन वळविणे योग्य आहे किंवा नाही अथवा ज्या कायद्यामुळे हे गुन्हे होतात तो रद्द करावा की नाही, तसेच ब्राह्मणविधवा या जाडेजां प्रमाणेच आहेत किंवा नाहीत, याचा निर्णय घेणे हे मला आपणावरच सोपविले पाहिजे. बहुतांशी अचूक अंदाजावर आधारलेल्या माझ्या कल्पनेप्रमाणे केवळ एका पुणे जिल्ह्यांत पाच वर्षांच्या काळांत अशा गुन्ह्यांची संख्या जवळ जवळ एक हजार भरते!!! गरीब ब्राह्मण विधवांकडून आणि त्यांच्या (रिवाजांचे) अनुकरण करणाऱ्या इतरांकडून ही गर्हणीय कृत्ये केली जातात. ब्राह्मण समाज सुधारणा घडवून आणण्याइतका पुरेसा सुशिक्षीत

नाही. तो समाज रुढीचा अंध उपासक व पूर्वग्रहदूषित आहे. ब्राह्मण जितका अधिक संस्कृत पंडीत तितका पूर्वग्रहदूषित व जुन्या संस्कृतमध्ये लिहिलेल्या पुरातनाचा वृथाअभिमानी असतो व ही हितावह आणि परोपकारी सुधारणा घडवून आणण्यास अनुत्सुक असतो. सतीची चाल रद्द केल्याने असंख्य विधवांचे ज्वालांपासून रक्षण झाले. तसेच पुनर्विवाहाची पद्धत सुरू करून अनेक विधवांना दुःखापासून व अनेक अर्भकांना मृत्यूपासून वाचविता येईल. गर्भावस्थेतील वा जवळ जवळ पूर्ण वाढ झालेली पुष्कळ अर्भके कुंपणांत, डबक्यात वा नदीच्या पात्रात सापडतात. त्यांच्या मातांचा ठावठिकाणा लागत नाही. त्यामुळे असे गुन्हे पुराव्याअभावी शिक्षा न होता सुटतात. असे काही गुन्हे प्रकाशात आणले जातात पण जी गुन्हेगार स्त्री गुन्हा कबुल करते व न्यायधिशा जवळ आपल्या दुर्दैवी अवस्थेमुळे व संकटामुळे दयेची याचना करते तिला न्यायाधिश शिक्षा तरी काय करणार ? न्यायाधिशाला या गुन्हेगाराबद्दल अनुकंपाच वाटेल. असे गुन्हे शेजारी पाजारी लपवितात कारण कधीकाळी आपणही अशा बिकट अवस्थेत सापडू असे त्यांना वाटते. त्यांचे पुत्र मृत्यु पावतील व त्यांच्या सुनांवरही तसाच प्रसंग येईल. परस्परांतील समान भिती ते गुन्हे उघड करण्यापासून त्यांना परावृत्त करते. खरोखरच त्या स्त्रियांना दोष देता येणार नाही, कायद्या-लाच तो द्यावा लागेल. महाराज, ही सुधारणा करून आपण आपले नाव अजरामर कराल. पुनर्विवाहाची चाल सुरू करूनच ही पापे नाहीशी करता येतील. मी काही उपाय सुचवीन त्यांचा सर्व दृष्टीने विचार केला जाईल अशी आशा करतो.

(१) प्रथमतः इलाख्यातील सर्व मुलकी अधिकाऱ्यांना सावध राहण्याविषयी हुकुम दिला जावा; आणि प्रत्येकाने एक खास अहवाल सादर केला पाहिजे ज्यात या गुन्ह्याचे स्वरूप आणि व्याप्ति, त्याचे मूळ आणि ते नाहीसे करण्याविषयी करावयाची योजना, सुचविलेली असावी. श्री. ए. बेल. पुण्याचे एक न्यायाधीश व माजी एजंट यानी परोपकारीवृत्तीनें या विषयासंबंधी चळवळ सुरू केली होती, व सरदार आदींना सुधारणा (करण्यास) सुचविली होती; त्याना जर यश आले असते तर सैनिकी लढायांपेक्षा तेजस्वी अशी नैतिक लढाई ते जिंकले असते; लोकांना दुखविण्यास किंवा सरकारला दुखविण्यास ते नाखूष होते की काय ते समजत नाही, परंतु त्याना यश मिळाले नाही. आता लोकांच्या प्रवृत्तींत बराच बदल झाला आहे; सुधारणेस ते पाठींबा देऊ इच्छितात. एतद्देशियांच्या धार्मिक समजुतीबाबत ढवळाढवळ करावयाची नाही हे तत्व म्हणजे सरकारी धोरणांतील चातुर्याचा भाग आहे; परंतु सतीची चाल बंद झाली यावरून असे समजण्यास हरकत नाही की ढवळाढवळ न करण्याचे तत्त्व हे फक्त निरुपद्रवी पूर्वग्रह व समारंभ यांच्या बाबतीतच लागू करावयाचे आहे, सतीच्या चालीसारख्या राक्षसी असणाऱ्या अपराधमूलक कायद्यांबाबत नाही.

(२) पुनर्विवाहाच्या बाजूने एतद्देशीय भाषांत निबंध वगैरे लिखाण करण्यास शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व इतराना प्रोत्साहन देण्याबद्दल विशेषतः संस्कृत कॉलेजच्या व्यवस्थापकाना व इतर शाळांना सूचना द्याव्यात. हिंदु कॉलेजे म्हणजे पूर्वग्रहांचे बालेकिल्ले आहेत; तरी सुद्धा जेथे (सुधारणांच्या) कैवाऱ्यांना मोठाली बक्षिसे जाहीर होतील तेथे अनेकजण पुढाकार घेतील. सामान्य गुणवत्तेखेरीज अशा निबंधाच्या (दर्जा) वरून वार्षिक पारितोषके ठरविली जावीत. वरचा मुद्दासुद्धा याच तत्त्वावर दिला जावा. यामुळे हिंदुशास्त्राच्या ज्ञानामुळे ज्यांचा समाजावर प्रभाव आहे असे लोक या विषयाची चर्चा करण्यास प्रवृत्त होतील आणि त्यांच्या लेखण्या अशा वापरल्या गेल्यावर चांगला परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही. संघटितरीत्या लोकांची बुद्धी चांगल्या कामी लागेल व सर्व पूर्वग्रहांचा नायनाट होईल.

(३) पुण्याचे जिल्हाधिकारी सरकारच्या वतीने हरदासाना व गोसाव्यांना धर्मादाय वर्षासने देतात. (हिंदु) तत्वज्ञानाचे व पुराणांचे कथन करणारे ते (हरदास, गोसावी) लोकप्रिय प्रचारक

आहेत. ही वर्षासने देताना त्यांनी राष्ट्रीय दुष्प्रवृत्तींविरुद्ध काही विशिष्ट ठिकाणी प्रचार करावा अशी अट त्यांच्यावर घालणारा कायदा करावा. या अटीवर नवे उमेदवारही घेण्यांत यावेत. यामुळे लोकांचा आणि प्रभावी वक्त्यांचा–खरोखरीच काहीजण उत्तम वक्ते आहेत–एक गट कार्यान्वित होईल आणि निःसंशयपणे आवश्यक असलेली सुधारणा घडवून आणील.

(४) अनेक हिंदु तरुण पुनर्विवाहाच्या पक्षाचे आहेत. त्यांना लेखन प्रवृत्त करावे आणि बक्षिसे ठेवावी. थोड्याशा खर्चाने हे काम भागेल.

(५) अर्थात्च लोकांना जाणीव न होईल अशा बेताने हे काम सावकाश केले पाहिजे. म्हणून पति निवर्तला आहे अशा चौदा वर्षाच्या आंतील मुलीशी विवाह करण्यास एतद्देशियांना प्रोत्साहन देऊन व त्यांचे मन वळवून ह्या कामास सुरवात केली पाहिजे. हिंदु धर्मशास्त्रावरील एका ग्रंथांत असा पुनर्विवाह कायदेशीर आहे असे म्हटले आहे. हे केल्यावर अर्थात्च ती चाल रुढ होईल.

(६) विधवांशी जे विवाह करतील त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं एक विधवाफंड उभारला पाहिजे. या महत्त्वाच्या विषयाचा विचार करण्यास मदत व्हावी या हेतूने मी नम्रपणे ह्या सूचना केल्या आहेत. महाराज, मी आशा करतो की या वाईट गोष्टींचे परिमार्जन करण्यासाठी आपण कृतिशील भाग घ्याल व अनेक जीवांना अधोगती, दुःख व अपराधापासून वाचविण्यास कारणीभूत ठराल. मी एवढेच म्हणू शकेन की लोकांची नीतीमत्ता सुधारणाऱ्या या गोष्टीचे अंतिम पर्यवसान इंग्रज सरकारच्या कीर्तीत (भर पडण्यांत) होईल. आणि आपल्या तेजस्वी कारकीर्दीची स्मृति हिंदुस्थानांत चिरकाल टिकेल.

आपला आज्ञाधारक आणि नम्र सेवक

२६ मे १८४८ लोकांचे हित इच्छिणारा

## (१) ॐकाराविषयी जैनांचे मत

विद्वर्य रा. ब. दादोबा पांडुरंगांनी दिलेल्या ॐसंबंधीच्या स्पष्टीकरणाच्या संदर्भांत मी असे सांगू इच्छितो की अथर्व वेदाच्या गोपथ ब्राह्मणाच्या पहिल्या प्रकरणांत प्रणवोपनिषद् समाविष्ट केलेले आहे. त्याच्या सुरवातीची ओळ अशी आहे :

ॐ कारं पृच्छामः को धातुः किं प्रतिपादिकं इ. इ. तांत्रिक ग्रंथकारांच्या भाषेंत ओम म्हणजे बीज. त्या संबंधी यांत (प्रणवोपनिषदांत) छत्तीस प्रश्न विचारून त्यांची उत्तरे दिली आहेत. मनु आपल्या ग्रंथांत म्हणतो––

आद्यंयत्र्यक्षरं ब्रह्म त्रयीयस्मि न्प्रतिष्ठिता ।
सगुह्यो न्यास्त्रिवृद्धे दोयस्तं वेदसवेदवित् ॥ अ. ११–श्लोक २६५

ज्याला प्रणव समजले त्याला सर्व वेद समजले असा याचा अर्थ आहे.

पद्मपुराणामध्ये याविषयी खालील श्लोक आहे.

ॐकार प्रणवो ब्रह्म सर्व मंत्रेषु नायकः ।
आदौ सर्वत्र युंजित मंत्राणांच शुभानने ॥

अर्थ—ब्रह्माचे गूढ नांव असलेले ॐ हे अक्षर सर्व प्रार्थनांच्या अग्रभागी असते. म्हणून हे सुवदने, (शिव दुर्गेला उद्देशून म्हणतो) सर्व प्रार्थनांच्या सुरवातीला ॐकाराचा वापर होवो.

वरील आज्ञेप्रमाणे ॐ हा सर्व शुभगीतांच्या सुरवातीस उच्चारला जातो.

वायु पुराणांत यावर एक प्रकरण आहे. त्यांतून खालील दोन श्लोक घेतलेले आहेत.

ॐमित्ये तत्रयोवेदास्त्रयो लोकास्त्र योग्नयः ॥
विल्लुक्रमास्त्रयस्त्वेते ऋग्सामानियजूंषिच ॥
इत्यतदक्षरं ब्रह्म परमोंकार साज्ञितः ॥
यस्तु वेदयते सम्यक् तथा ध्यायति बापुनः ॥

संसार चक्रमुत्सृज्यं मुक्तवच्चनं बंधुनः ॥
अचलं निर्गुणं स्थानं शिव प्राप्नोत्यसंशयः ॥

श्रीमद् भगवद्गीतेत खाली दिलेला श्लोक आहे–

ॐ मित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ॥
यप्रयाति त्यजंन्देहं सयाति परमांगति ॥ अ. ८, श्लो. १३

मांडुक्य उपनिषदांत ॐ काराची मोठीच प्रशंसा केलेली आहे.

जैन लोकांच्या मते ॐ हा शब्द अतिशय पवित्र आहे. याची ते पांच अक्षरांत फोड करतात– अ, अ, आ, उ आणि म् त्यांतील पहिल्या अक्षराने ज्याचा आत्मा मुक्त झाला आहे व ज्याने तिर्थंकराची पातळी गाठली आहे अशी व्यक्ती सूचित करते (=अरिहंत)

ज्याची मर्त्य देहापासून सुटका झाली आहे असा आत्मा (=अशरीर किंवा सिद्ध) दुसऱ्या अ ने दर्शविला आहे.

आ वरून आचार्य किंवा वरिष्ठ गुरुचा बोध होतो तर उ वरुन कनिष्ठ गुरुचा बोध होतो.

पाचव्याचा (म्) अर्थ मुनि किंवा संत असा आहे. या पांचांना एकत्रितपणे 'पंचपरमेष्ठि' असे संबोधले जाते. (म्हणून) ॐ हा भक्तीस पात्र असलेल्या व ज्यांना ती दररोज अर्पण केली जाते अशा (या) पांच व्यक्तींच्या समान आहे.

अरिहता असरीरा आचरीय उवइज्ञाय
तहेव मुणिणो पचस्खर निष्पन्नो ओंकारोपंचपरमिष्ठि.

वरील मागधी भाषेतील ओळीचा अर्थही वर सांगितल्याप्रमाणेच आहे.

वरील पाचांपैकी प्रत्येक व्यक्ती अनेक सद्गुणानी युक्त आहे असे वर्णन केले आहे. पहिल्या व्यक्तीचे बारा, दुसरीचे आठ, तिसरीचे छत्तीस, चवथीचे पंचवीस व पाचव्या व्यक्तीचे सत्तावीस असे एकूण एकशे आठ गुण आहेत. या एकशे आठ गुणांची स्मृति म्हणून ते (जैन) एकशे आठ मण्यांची जपमाळ करतात व ॐ अक्षराचा सकाळ संध्याकाळी जप करतात.

सृष्टीचा कर्ता म्हणून परमेश्वराला अस्तित्त्व नाही असे जैन लोकांचे मत आहे. विश्वाला ना आदी ना अंत अशी त्यांची श्रद्धा आहे. ते असेही समजतात की पदार्थ कशाही स्वरुपांत असला तरी तो अविनाशी आहे.

मुंबईच्या निर्णयसागर छापखान्यांत छापलेल्या शा. भिमजी माणक यांच्या **रत्नाकर** (खंड १ला) या ग्रंथाच्या पृ. ७४३ च्या सुरवातीची ओळ अशी आहे–

इश्वरवादी कहे छे के (इ. इ.). (त्यांत) पुढे म्हटले आहे कीं सृष्टीचा (कोणी) निर्माता आहे असे गृहित धरले तर त्या निर्मात्याचा निर्माता असलाच पाहिजे. प्रत्येक ठिकाणी कार्यकारण-भाव असलाच पाहिजे व त्यावरून (असे म्हणता येईल की) देवाचा कोणीतरी देव असलाच पाहिजे. आत्मा हा अमर आहे असे म्हटले आहे. त्याला सुरवात नाही, परंतु त्याचे ठायी उच्च-सद्गुणांचा संचय आहे, त्याला उच्चावस्था प्राप्त होऊ शकते व त्याची मुक्ती होऊ शकते. सृष्टी-कर्त्यासंबंधी जैनांचा हा दृष्टिकोण आहे. ईश्वरास अस्तित्त्व नाही हे सिद्ध करण्यासाठी जो युक्तीवाद जैन लोक मांडतात. त्यांतील उपरोक्त मत हा एक भाग आहे. त्यांच्या दृष्टीने निर्माता नाही व प्रार्थनाही नाही. त्यांचा असा विश्वास आहे की प्रत्येक कृत्याचा कांहीतरी बरा वाईट परिणाम ठरलेला असतो, त्यापासून एकतर दुःख प्राप्त होते किंवा आनंद. आपल्या मासिकांत कोणा एका बंगाली लेखकाने असे लिहिले होते कीं जैनांचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास आहे पण वर उद्धृत केलेल्या 'रत्नाकरा' प्रमाणे हे बरोबर नाही.

थिऑसफीस्ट, मे १८८०

## (२) आर्य ग्रंथांची सामान्य माहिती

दक्षिणमार्गी ब्राह्मण आर्यांच्या पवित्र ग्रंथांची विभागणी तीन विभागांत करतात :—

श्रुतिपासून झालेले श्रौत ग्रंथ (किंवा वेद)

ऋषींनी रचलेले आर्य ग्रंथ

पुरुषरचित पौरुषग्रंथ

तंत्रमार्गाचा अवलंब करणारे म्हणजे वाममार्गी ब्राह्मणांचा दृष्टीकोण मात्र वेगळा आहे. या ग्रंथाचे ते दोन विभाग मानतात – वेदग्रंथ किंवा निगम आणि तंत्र किंवा आगम वाङ्मय. तंत्र-शास्त्र हे योग्यांचे उपास्य दैवत शंकर याच्या द्वारा प्रकट झाले म्हणून ते श्रुतीसारखेच आहेत असे तांत्रिक ब्राह्मणांचे मत आहे. मनुस्मृतीचा भाष्यकार कुल्लुक भट म्हणतो :—

वैदिकी तांत्रिकिश्चैव द्विविधाश्रुति कीर्तिता ॥

(वेद) संहिता, ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद, परिशिष्ट आणि सूत्र अशा सर्व वेदग्रंथांचा समावेश श्रौत वाङ्मयांत होतो. या सर्वांना मिळून शाखा असे म्हणतात. वेगवेगळ्या वेदांच्या वेगवेगळ्या शाखा आहेत. तसेंच वेदांच्या भिन्न वाचनावरूनही वेगवेगळ्या शाखा मानतात.

वेदांना पूरक असलेल्या शास्त्रांना उपवेद असे म्हणतात. आयुर्वेद, शिल्पवेद, गांधर्ववेद आणि धनुर्वेद यांचा उपवेदांत समावेश आहे.

खालील श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणे श्रुति म्हणजे सहा अवयव असलेली व्यक्ति असे कल्पिलेले आहे.

छंदः पादौतुवेदस्य हस्तौ कल्पोथ पाठते ॥
ज्योतिषामयनंन्वक्षुः निरुत्रश्रोत्र मुच्यते ॥
शिस ध्राणंतुवेदस्य मुखं व्याकरणं स्मृतं ॥
तत्मात्सांगमधी त्येव ब्रह्मलोके महीयते ॥

या श्लोकांनुसार—

त्याचे पाय म्हणजे छंद
त्याचे हात म्हणजे कल्प किंवा सूत्र
त्याचे डोळे म्हणजे ज्योतिष
त्याचे कान म्हणजे निरुक्त आणि निघंट
त्याचे नाक म्हणजे शिसा
त्याचे मुख म्हणजे व्याकर्ण

जो कोणी वरील सहा अवयवांच्या सहाय्याने वेदपठण करतो तो स्वर्ग प्राप्त करून घेतो.

ज्याला षड्दर्शने म्हणतात ती सांख्य, न्याय, योग, वैशेषिक, मीमास (? मीमांसा) आणि वेदांत ह्यांना श्रुतीची उपांगे म्हणतात. म्हणूनच वेदांच्या संपूर्ण अभ्यासाला सांगोपांग वेदोप-वेदाध्ययन किंवा स्वाध्याय असे म्हणतात.

वेदमंत्र विशिष्ट आठ प्रकारच्या तालांत म्हणण्याची पद्धत आहे. यानाच विकृति असे म्हणतात. त्यांचे वर्णन खाली दिल्याप्रमाणे आहे.

जटामाला शिखारेखा स्वाध्वजो दंडोरमोघनः ॥
अष्टौविकृतयः प्रोक्ताक्रमपूर्वा मनीषिभि ॥

विकृतीचे उगमस्थान शब्दांच्या विग्रहांत आहे; तसेंच क्रमात (त्यांच्या विशिष्ट प्रकाराने करावयाच्या पुनरुक्तीत) आहे. क्रम, अभिक्रम, उत्क्रम, संक्रम आणि व्युत्क्रम असे पांच क्रम आहेत.

आर्यग्रंथांचा दुसरा वर्ग म्हणजे आर्षग्रंथ. यांत नियम व रीती यांवरील भाष्य म्हणजेच श्रुति व धार्मिक आख्यायिका म्हणजेच पुराणे यांचा समावेश आहे. या सर्वांना मिळून धर्मशास्त्र असे नाव आहे.

हे ग्रंथ असंख्य आहेत व त्यांची लक्षणेही भिन्नभिन्न आहेत त्या वरून ब्राह्मणांनी त्यांचे तीन भागांत वर्गीकरण केले आहे--सात्विक, राजस आणि तामस. (वर्गीकरणाचे) हेच तत्त्व कित्येकदा श्रुतिग्रंथानाही लावले जाते. वेदांचा आधार असला तरी अभिचारकर्म हे तामस म्हणून समजले जाते.

स्मृतीचे वृद्धस्मृति व लघुस्मृति असे वर्गीकरण करतात. पुराणांचे सुद्धा महापुराण व उपपुराण असे वर्ग पाडतात.

आर्यग्रंथाच्या याखेरीज दुसऱ्याही शाखा आहेत. त्यांचीं नांवे येणे प्रमाणे :— (१) नीतिशास्त्र (२) भक्तिशास्त्र (३) अलंकारशास्त्र (४) पाकशास्त्र (५) कामशास्त्र (६) मंत्रशास्त्र (७) अर्थशास्त्र.

आर्यग्रंथांचा तिसरा वर्ग म्हणजे पौरुषग्रंथ. ऋषीनंतर आलेल्या कलियुगांतील विद्वानांनी (गेल्या) १५०० वर्षांत लिहिलेले हे ग्रंथ होत. संस्कृत भाषा लोकभाषा म्हणून वापरण्यास खंड पडल्यानंतर हे ग्रंथ झाले. या सर्वांना निबंध असे म्हणतात. त्यानाच असलेली इतर भिन्न नावे अशी-:--

अर्क, कमलाकर, कल्प, कौमुदि, गणपति, तत्त्व, दर्पण, पारिजात, मयूख, मंजिरी, रत्न, रहस्य, राज, विवेक, शेखर, सेतु, संग्रह, हेमाद्रि इ.

विद्वानांनी लिहिलेले वरील ग्रंथ नेहमींच त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या ऋषिरचित ग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेले असत. ऋषींनी आपले ग्रंथ श्रुतिग्रंथावर आधारले. श्रुतीना मात्र कोणाचाच आधार नाही व त्यांत इतर कोणत्याच (पूर्वी झालेल्या) ग्रंथांचा संदर्भ आलेला नाही. म्हणूनच त्यांना शब्दं स्वतः प्रमाणं असे म्हणतात.
थिऑसफीस्ट, जुलै १८८०

## (३) हिंदुस्थानातील भिक्षुकवर्ग

हिंदुस्थानपेक्षा अधिक भिकारी आहेत, असा जगांत एकही देश नाही. आजारपण वा वृद्धत्व यामुळे भिक्षा मागणे भाग पडते अशा भिकाऱ्यांचा एक वर्ग आहे. ते रस्त्यावर हमेशा दिसतात. समाजाच्या दयेस पात्र असलेल्या अशा खऱ्याखुऱ्या भिकाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामानाने धर्माच्या नांवाखाली भिक्षुकी करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. शहर त्यांनी गजबजून गेलेले असते. लोकही त्याना मोठ्या उत्साहाने खाऊपिऊ घालतात; खऱ्या भिकाऱ्यांची मात्र अशाने आबाळ होते. कोणतेही काम न करता केवळ भिक्षेवरच जगण्याचा ज्यांनी चंग बांधला आहे अशा भिक्षुकांचे वर्गीकरण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

हिंदुसमाजाची प्रथमतः दोन वर्गांत विभागणी करता येईल--साधु व संसारी. सर्वसंग परित्याग केल्याचा आव आणणारे व काहीतरी उद्योग धंदा करून संसारी वृत्तीने राहणारे.

अगदी पहिला व जुना पुरातन भिक्षुकांचा वर्ग म्हणजे ब्राह्मण-म्हणजे भिक्षुकी करणारे ब्राह्मण; गृहस्थी ब्राह्मण नव्हे. भिक्षुकी ब्राह्मण खालीलपैकी कोणत्यातरी प्रकारांत बसतात-

संन्यासी, ब्रह्मचारी, प्रदक्षिणी, कावड्ये, माधुकरी, वारकरी, तीर्थवासी, वैदिक, पंडित, हरदास, पुराणीक, जोशी इ. इ.

या मूळ प्रकारांच्या जोडीला बौद्धांनी व जैनानी आणखी भर घातली आहे ती अशी-

साध्वी, यति, शिपूज.

यांत शिवाय नाथपंथीयानी कमालीची भर टाकली आहे.

कानफाटे, अवघड, सरभंगी व तत्सम इतर. स्वामी शंकराचार्यांनी यांत १० प्रकारच्या गोसाव्यांची भर घातली आहे. त्यांची नांवे येणेप्रमाणे—गिरी, पुरी, भारति, पर्वत, अरण, वन, इंद्र, सरस्वति इ. ब्राह्मणांप्रमाणे या गोसाव्यांनीसुद्धा आपले 'त्यागी' व 'घरबारी' असे भेद केले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निरुद्योगी लोकांना खायला घालण्यास असमर्थ समाज ठरल्यामुळे साहजिकच ही अशी विभागणी झाली.

तांत्रिक धर्माचा प्रसार करणाऱ्यांनी यांत उपासक, मंत्रशास्त्री, ओझे इ. ची भर घातली आहे. शंकराचार्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या तत्त्वज्ञानाला विरोध होऊ लागला. 'अहंब्रह्मास्मि' हे त्यांचे तत्त्व लोकांना न रुचल्यामुळे शंकराचार्यांच्या शैवउपासनेविरूद्ध चार आचार्यांनी चार वैष्णव-संप्रदाय स्थापन केले. मध्व, रामानुज, निंबार्क व विष्णुस्वामी हे ते चार आचार्य, एक महान उपकारकर्ता व मानवी आत्म्याचा आणि विश्वाचा निर्माता मानलेल्या व्यक्तीगत देवाविषयीच्या प्रेमाची म्हणजेच भक्ती मार्गाची शिकवण त्यांनी दिली. त्यांच्या शिकवणीला वेगवेगळी नांवे आहेस. द्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैताद्वैत, आणि शुद्धद्वैत. ही सर्व मते शंकराचार्यांनी सांगितलेल्या अद्वैताविरुद्ध आहेत. धर्मशाळांमधून व अन्न सदावर्तांतून सर्वांस आढळणाऱ्या वैराग्यांचा प्रकार त्यांच्यामुळे निर्माण झाला. सानुग्रह (मोफत) अन्न मिळण्याची अशी सुमारे २० ठिकाणे आहेत.

कांही कनिष्ट आचार्यही निर्माण झाले. त्यानी कबरी, नरक वल्लभ, स्वामी नारायण अशासारखे स्वतःचे (भिक्षुक) वर्ग काढले.

आपल्या मतांचा प्रसार करणारा एकादा वर्ग (हाताशी) असल्याशिवाय आपल्याला यशप्राप्ति होणार नाही असा प्रत्येक आचार्यांचा समज झालेला होता म्हणून प्रत्येकाने स्वतःच्या तत्त्वांचा प्रसार करण्यासांठी भिक्षुकांचा एकादा वर्ग आपलासा केला.

हिंदुस्थानावरील मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळे हिंदुस्थानांत अनेक प्रकारच्या भिक्षुकांची भर पडली, त्यांत सयद, फकीर, पीर, हाफीज वलि, मुजावर, मुतवलि इ. चा समावेश आहे. ह्या सर्वांना चांगला आश्रयही मिळालेला होता.

असे म्हणतात की योगी लोकांचा वर्ग एकेकाळीं हिंदुस्थानांत फार प्रभावी होता; आणि त्यांना नवनाथांची व चौऱ्याऐंशी सिद्धांची मदत असे. योग्यांच्या अनुयायांची हिंदुस्थानांत अनेक वसतिस्थाने आहेत. जोधपूरमध्ये ते राजवंशाचे धर्मगुरु आहेत. अहमदाबादमध्ये माणिकनाथ नांवाचा एक योगी रहात असे. त्याच्या वरूनच तेथील रस्त्याचे नांव माणिक चौक व नगर संरक्षक भिंतीचे नांव माणिक बुरुझ असे पडले. असे म्हणतात की ही भिंत अहमदशहाने बांधली त्यावेळी हा योगी (माणिक नाथ) जीवंत होता आणि अहमदशहाला त्याची कृपा संपादन करावी लागली होती.

पंथ, पाखांड-पंथ एकूण बारा आहेत व छत्तीस पाखंडे आहेत. त्यांतील काहींची नांवे त्या त्या आचार्यांवरून पडलेली आहेत. उदा., मलुकदासी-गुरु नानकपंथी, रामदासी-गुरु कबीरसाहेब पंथी, दादुपंथी-सत्संगी, मानभाव-हरीजन, रामश्नेही बिजमार्गी.

या प्रत्येकांत अनेक प्रकारचे भिक्षुक मोडतात. काही जण विशिष्ट देवतांच्या मूर्तींची पूजा करतात. वैष्णवांचे ठाकुरद्वार असतात; इतरांच्या राम किंवा शिव मूर्ति असतात. कबीरपंथी व रामश्नेही कोणत्याच मूर्तीची पूजा करीत नाही. त्यांच्या मठांत त्यांचे धर्मग्रंथ आणि त्यांच्या धर्मगुरुंच्या पायांचे ठसे यांची पूजा होते. नानकाचे अनुयायी कोणत्याही मूर्तींचा स्वीकार करीत नाहीत; मूर्तींची जागा ग्रंथसाहेब घेतो. त्याच्या शिष्यांना उपदेशी म्हणतात. व जे शस्त्र धारण करतात त्यांना खालसा असे म्हणतात. यानीच दिल्लीच्या बादशहाशी लढाया केल्या होत्या.

प्रत्येक तीर्थक्षेत्रांत (आणि ती असंख्य आहेत) भिक्षुकांचा एक ठराविक वर्ग असतो. उदा., बनारसचे-गंगापुत्र, गयेचे-गयावळ, अलाहाबादचे-प्रयागवळ, मथुरेचे-चोबे, पंढरपूरचे-बडवे,

जगन्नाथचे–पंड्ये, जेजुरीचे–वाघ्या आणि मुरळी, गिरी वेंकोबा–दासरी, तुळजापूरचे–भुत्ये, रामेश्वरचे–पूजारी, नाशिकचें वृत्तिवंत सप्तशृंगीचे–भोपे, शंभूमहादेव येथील–जंगम, उज्जनचे–उपाध्ये, द्वारकेचे–गुगुळी, यांशिवाय अजूनही काही भिक्षुक आहेत–प्रणामी, डौरी, सरवदे, गुरव, गोंधळी, गंधर्व, राऊळ, मदारी, गोपाळ, चित्रकथी, भर्तरी, भाट, वासुदेव, भोजक, नट, डाकोते, तरगाळे, भराडि, पांगुळ, दरवेशी, गरोडा, कुळगुरू.

हिंदुस्थानांतील भिक्षुकांची संख्या एकूण लोक-संख्येच्या एक दशांश इतकी आहे; आणि त्यांना आश्रय देण्यांत बरीच मालमत्ता व त्रास व्यर्थ खर्ची पडतात. प्रत्येकाला यांचे (भिक्षुकांचे) ओझे वाटते आणि अनाथ, विधवा, अंध, लुळेपांगळे आणि रोगी यांच्याकडे दुर्लक्ष होते. शेतकरी, व्यापारी सरदारउमराव आणि प्रवासी यांवर हे वेगवेगळ्या प्रकारचे भिक्षुक नुसते तुटून पडतात व याना घेरून ठेवतात. त्यांची सर्व शिल्लक स्वाहा करतात व औद्योगिक योजनांसाठी काहीच (धन) शिल्लक ठेवीत नाहीत. हे भिक्षुक म्हणजे हिंदुस्थानला मिळालेला शाप आहे; त्यानीं देशाला अज्ञानांत व दारिद्र्यांत ठेविले आहे.

या भिक्षुकांना धर्माच्या नावाखाली आश्रय देणे व पोसणे हे हिंदुस्थानांत मानाचे लक्षण समजले जाते. भिन्न भिन्न पंथांच्या भिन्नतत्त्वप्रणाली आहेत, देवता आहेत, भिन्नभिन्न जपमाला आहेत व कपाळी धारण करण्याच्या भिन्नभिन्न मुद्रा आहेत. काहीजण कडक तपसाधना करतात, उपवास करतात, शुष्क होऊन मृत्युपंथाला लागेपर्यंत हात वर करून (उभे राहातात). काहीजण नग्न राहून स्वतःला दिगांबर (दिगंबर) म्हणवितात. कांहीजण अहोरात्र जप करीत असतात. आपल्या देवतांचे नामस्मरण करीत असतात. मठाच्या प्रमुखाला महंत असे म्हणतात. हा माणूस बहुधा निवडला जातो. त्याची मुख्य गुणवत्ता म्हणजे तो लुळापांगळा असता कामा नये व कनिष्ट जातींतील असता कामा नये (म्हणजेच तो धट्टाकट्टा व उच्च जातीतील असावा. त्याने मुख्य तीर्थस्थळांना भेटी दिलेल्या असल्या पाहिजेत. गोसावी हे बैराग्यांपेक्षा वरिष्ट. कधीकधी त्यांच्यामध्ये कडाक्याचे वाद होतात. इ. स. १८०३ मध्ये या दोन पंथीयांच्यांत घनघोर लढाई झाली होती. हरद्वारला गंगेमध्ये स्नान, करण्याचा अग्रहक्क प्रत्येक पंथाच्या महंताने सांगितला. शिंद्यांचे सरकार दुबळे असल्याने त्याने गोसाव्यांना हा वाद तलवारीच्या जोरावर मिटवण्यास सांगितले. दोन्ही पंथाचे लोक (आपापसांत) लढले. दहा हजार बैराग्यांना रणांगणावर मूठमातीं मिळाली. (अशा प्रकारे) गोसाव्यानी आपला प्रथम स्नान करण्याचा हक्क प्रस्थापित केला व तो आजपर्यंत अव्याहत चालू आहे. इंग्रज येथे स्थिरस्थावर होण्यापूर्वी हे गोसावी तुकड्या तुकड्यानी सशस्त्र (होऊन) सर्व देशभर भटकत असत, आणि लोकांना त्यांचा फार उपद्रव होई. खेडुतांकडून ते खंडणी वसूल करीत. (हे) गोसावी मद्यमांस भक्षण करतात; बैरागी मात्र यांपासून दूर रहातात. वैष्णवांचे तत्त्वज्ञान अनेक बाबतींत जैन तत्त्वज्ञानांशी मिळते जुळते आहे.
थिऑसफिस्ट, नोव्हेंबर १८८०.

## (४) हिंदुस्थानातील तीर्थक्षेत्रे

हिंदुस्थानाएवढी तीर्थक्षेत्रे जगांत इतर कोणत्याही देशांत सापडणार नाहीत. येथील (जवळजवळ) प्रत्येक पर्वत, नद्या, शहर, वृक्ष, तास, दिवस, पुरुष व स्त्रिया (काही ना काही) दैवत म्हणून गणले जातात. येथील लोक अज्ञानी, भोळे अतीव धार्मिक वृत्तीचे आहेत.

तीर्थयात्रांच्या ठिकाणांचे तीन प्रकार आहेत: शाश्वत (सार्वत्रिक), प्रादेशिक, आणि सांप्रदायिक.

(१) काशी–गंगेच्या काठी बनारस (येथे), (२) प्रयाग–गंगा-यमुना यांच्या संगमाजवळ अलाहाबादला, (३) गया–फाल्गू नदीवरील गया. या तिघांचे मिळून एकत्रित नाव 'तिरस्थळी' असे नाव आहे. यानंतर सप्तपुरी म्हणून ओळखली जाणारी (खालील) सात गांवे आहेत :

(१) अयोध्या-फैझाबादजवळ; (२) मथुरा-यमुनातीरी, (३) माया किंवा हरिद्वार-गंगाकाठी, (४) काशी-उर्फ बनारस, (५) कांची-तुंगभद्रेच्या काठी, (६) अंवतिका किंवा उज्जैन-माळव्यांत, (७) द्वारका-काठेवाडच्या पश्चिम टोकास.

(वरील) पहिल्याची प्रभु रामचंद्रांचे जन्मस्थान म्हणून ख्याति आहे. दुसऱ्या ठिकाणी कृष्णाचे बालपण गेले म्हणून प्रसिद्धी आहे. चवथे शंकराचे वसतीस्थान म्हणून ओळखले जाते तर सातव्या गावाचा श्रीकृष्णाची राजधानी म्हणून मान आहे.

खालील बारा गांवाचा उल्लेख जोतिर्लिंगे म्हणून केला जातो. शिव संप्रदायाचा प्रभाव असलेल्या काळांत बांधली गेलेली शिवमंदिरे त्यांत आहेत, ती अशी : (१) सोमनाथ-काठेवाडांतील वेरावळ जवळ, (२) श्रीशैल्यमल्लीकार्जुन-निजामाचे राज्यांत, (३) महाकाल-माळव्यांतील उज्जैन येथे, (४) ओंकार-नर्मदा तटाकी, (५) केदार-हिमालय पर्वतांत, (६) भीमा शंकर-पुण्याजवळ भीमेच्या उगमस्थानापाशी, (७) विश्वेश्वर-बनारस येथे, (८) त्रिंबकेश्वर-नाशिकजवळ, (९) वैजनाथ-निजामाचे राज्यांत, (१०) नागनाथ-निजामाच्या राज्यांत, (११) रामेश्वर-मद्रासजवळ, (१२) घृष्णेश्वर-औरंगाबादेजवळ. यांपैकी बरीचशी ज्योतिर्लिंगे या देशावर झालेल्या मुसलमानी आक्रमणांत नाश पावली. हिंदुस्थानच्या इतिहासांत सोमनाथची कथा प्रसिद्धच आहे. 'महाकाल' क्षेत्राची महादजी शिंद्यानी पुनः उभारणी केली. विश्वेश्वराचे देवालय नव्याने बांधले गेले. (तेथील) मूळ देवळाचें मशिदींत रूपांतर करण्यात आले आहे. अहिल्याबाई होळकर हिने घृष्णेश्वरची पुनर्स्थापना केली. सोमनाथ मंदिराचीही मशिद बनविण्यांत आली परंतु अहिल्याबाईच्या मदतीने गायकवाडानी तेथे नवीन देऊळ बांधले.

याशिवाय खालील चार धाम ही आहेत.

(१) रामेश्वर, (२) केदार-दोन ज्योतिर्लिंगे, (३) द्वारका-सप्तपुरीपैकी एक, (४) जगन्नाथ-ओरीसामध्ये,

गंगेला मिळणाऱ्या प्रत्येक नदीला तिची उपनदी समजण्यांत येते व त्यांच्या संगमाला पवित्र स्थळ किंवा प्रयाग म्हणतात. दुसऱ्या पवित्र नद्यांनाही प्रयाग स्थळे आहेत.

(१) नंदप्रयाग-अलकनंदा व मंदाकिनी यांचा संगम, (२) कर्णप्रयाग-अलकनंदा व गिंदार यांचा संगम, (३) रुद्रप्रयाग-मंदाकिनी व गंगा यांचा संगम, (४) देवप्रयाग-अलकनंदा व गंगा यांचा संगम, (५) भूतप्रयाग-यमुना व गंगा यांचा संगम, (६) दक्षण प्रयाग-कृष्णा व वेण्णा यांचा साताऱ्याजवळ झालेला संगम.

खालील पांच पवित्र सरोवरे आहेत.

(१) नारायण सरोवर-कच्छमध्ये, (२) मान सरोवर-तिबेटमध्ये, (३) पुष्कर सरोवर-मारवाडमध्ये, (४) बिंदु सरोवर-अहमदाबादजवळ, (५) पंपा सरोवर-मद्रास जवळ,

खालील साडेतीन देवीपीठे आहेत.

(१) मातापूर, (२) अंबा-निजाम राज्यांत, (३) कोल्हापूर-दक्षिणेंत, (४) तुळजापूर-सोलापूरजवळ. हे अर्धे पीठ गणले जाते.

याशिवाय तीर्थयात्रांची अनेक ठिकाणे आहेत. ती अशी :

(१) बडोद्याजवळील डाकोर-असे म्हणतात की गुजरातेवरील मुसलमानी आक्रमणाच्या वेळी द्वारकेची मूर्ति लपविण्यासाठी येथें आणण्यांत आली होती.

(२) श्रीनाथ-गोकुळांतील मूर्ति मुसलमानी आक्रमणाचे भीतीने येथे आणली होती. उदयपूरजवळील या देवालयास मुंबईचे व्यापारी तीन लाख रुपये कररूपाने देतात. येथील देवाला श्रीजी म्हणतात. गुजरात, काठेवाड आणि कच्छचे भाटीया, लुवाण, वाणी लोक व गोसावी महाराज यांची पूजा करतात.

(३) वेंकोबा – मद्रासला जाताना लागणाऱ्या त्रिपोट स्थानकाजवळ आहे. या देवाचा (देवालयाचा) खजिना समृद्ध आहे. टिपू सुलतानाला हे देऊळ वार्षिक तीन लाख रुपयांचा कर भरीत असे. देवस्थानच्या उत्पन्नावरील कर इंग्रज सरकारने मात्र माफ केला आहे.

(४) कार्तिकस्वामी – शेषाचल पर्वतावर हे पवित्रस्थान आहे. कार्तिकस्वामींचे ते निवासस्थान म्हणून ओळखले जाते. कांही पुराणांत तो ब्रह्मचारी होता असे म्हटले आहे. तर काहींत तो विवाहीत असल्याचे सांगितले आहे. तो शंकराचा पुत्र तसेच त्याचा सेनापतीही गणला जातो. (म्हणून) त्याला सेनानी असे म्हणतात. हिंदुस्थानात त्याने शिवसंप्रदाय स्थापन केला असावा.

(५) वैजनाथ – बारा ज्योतिर्लिंगापैकी असलेल्या परळी वैजनाथहून हे वेगळे आहे. जडखंडी नामक कलकत्याजवळील जंगलांत ते वसले आहे.

(६) पशुपतेश्वर – हे नेपाळमध्ये आहे.

(७) अमरनाथ – काश्मीरमध्ये.

(८) ब्रह्मकपट – बद्रीकेद्वारजवळ आहे.

(९) बद्रीनारायण – बद्रीकेद्वार जवळ आहे.

(१०) मुक्तनाथ – दामोदरकुंड – शाळीग्रामाचे दगड येथे गोळा केले जातात ती ही जागा. विष्णूची प्रतिमा म्हणून त्यांचा उपयोग करतात.

(११) नोधर माधव – काठेवाडांत.

(१२) महाबळेश्वर – साताऱ्याजवळ.

(१३) चित्रकूट – येथें श्रीरामचंद्रांचे वास्तव्य झाले म्हणून या जागेला पवित्र मानले जाते. ही अलाहाबादेजवळ आहे.

(१४) विंध्यवासिनी – या देवतेचे हे पवित्रस्थान मिरझापूरजवळ आहे. तिला दररोज रक्ताचा नैवेद्य दाखविण्यात येतो.

(१५) यल्लामा – दक्षिण भारतांतील ही देवता आहे.

(१६) तुळशीशाम - गिर पर्वतराजीमध्ये असलेली ही जागा काठेवाडांत आहे. तेथे गरम पाण्याचे झरे आहेत. व त्यांचे पाणी मधुर आहे.

(१७) सुदामपूरी – काठेवाडांतील या जागेला गोरेबंद म्हणतात. श्रीकृष्णाने आपल्या मित्रास – सुदाम्यास ही जागा दिली होती.

(१८) माधवपूर – काठेवाडांतील ही जागा कृष्ण रुक्मिणीच्या विवाहासाठी प्रसिद्ध आहे.

(१९) गोपी तलाव – बेट द्वारकेजवळ ही जागा आहे. ज्या जागी हा तलाव आहे त्यांत गोपीचंदन म्हणून ओळखली जाणारी पांढरी माती सांपडते. सर्व वैष्णवपंथी लोक याने आपल्या सर्वांगावर पट्टे काढतात.

(२०) कुरुक्षेत्र – दिल्लीजवळ ही जागा आहे आणि भारत येथे घडले (भारतीय युद्ध) त्यासाठी प्रसिद्ध आहे.

(२१) हंपी विरुपाक्ष – हे बंगलोर जवळ आहे.

(२२) उडपी सुब्रामन्य – मंगलोर जवळ आहे.

(२३) धरणीधर – गुजरातेंतील दीसा जवळ आहे.

(२४) श्रीरंग – हे त्रिचनापल्लींत आहे. येथील देऊळ सर्व हिंदुस्थानांत मोठे आहे.

(२५) अनंतशयन – त्रावणकोर मध्ये आहे. श्री अनंतपुरम् याचाच त्रिवेंद्रम् हा अपभ्रंश आहे.

(२६) कन्याकुमारी – हें हिंदुस्थानचे अगदी दक्षिणेकडील टोक. तीनवेल्लीजवळ आहे.

(२७) जनार्दन – मलबारमध्ये आहे.

(२८) दर्भशयन – रामेश्वरजवळ आहे.

(२९) पद्मनाथ–मलबारमध्ये आहे.

(३०) गोकर्ण महाबळेश्वर–कारवारजवळ आहे. येथील मूर्ति रावणानें येथे स्थापली असे म्हणतात.

(३१) एकलिंग–उदयपूरजवळ आहे. येथील खर्च भागविण्यासाठी मोठे उत्पन्न मिळते.

(३२) हिंगळज–हे बलुचिस्थानांत आहे. गोसाव्यांचे हे आवडते दैवत आहे. येथे प्राणी बळी देतात. जेथे असे बळी देतात त्या स्थानाना भेट देण्याचे बैरागी लोक कटाक्षाने टाळतात.

(३३) पंढरीनाथ किंवा विठोबा–हे ठिकाण पुणे जिल्ह्यांत आहे. वारकरी किंवा तुकाराम पंथीयांचे हे आवडते स्थान आहे.

(३४) शकांबरी – हिंदुस्थानच्या दक्षिणेकडील ही देवता आहे.

(३५) कामाक्षी – बंगालमध्ये आहे.

(३६) नूनक्षीर – मदुरेंत आहें. हिंदुस्थानांतील मोठ्यापैकी हे एक देऊळ आहे.

(३७) अमरकनलर्क (अमरकंटक ?) – नर्मदेचे हे उगमस्थान आहे.

(३८) अष्टविनायक – ही आठ देवळे पुणे जिल्ह्यांत आहेत.

(३९) पंचकेदार – अहमदाबाद जिल्ह्यात पांच देवळे आहेत. त्यांना फक्त प्रादेशिक महत्त्व आहे.

(४०) अष्टसिद्ध – ही आठ स्थळे सातारा जिल्ह्यांत आहेत.

(४१) बेचरजी – गायकवाडींत आहे.

(४२) खंडोबा – पुण्याजवळील हे दैवत कुणबी व धनगर यांचे आवडते आहे. होळकर हे धनगर जातीचे असल्याने या देवाचे पूजक आहेत.

(४३) ज्योतिबा - कोल्हापूरजवळील हे (दैवत) शिंद्यांचे कुलदैवत आहे. शिंद्याच्या राजमुद्रेमध्ये त्याचे नाव येते.

(४४) आळंदी – पुण्याजवळील हे गांव ज्ञानेश्वरांच्या समाधीसाठी प्रसिद्ध आहे.

(४५) ज्वालामुखी – पंजाबमधील जालंदर जवळ आहे.
येथे सतत धुमसणारा ज्वालामुखी आहे; पण त्यापासून प्रवाश्यांना कोणताही उपद्रव होत नाही.

(४६) देहू–तुकारामाचे वसतीस्थान म्हणून ख्यात आहे.

(४७) परळी–हा किल्ला असून त्यावर रामदासस्वामींची समाधी आहे.

(४८) सिद्धपूर–अहमदाबादेजवळ असून कपिल महामुनींच्या वस्तीचे ठिकाण म्हणून मशहूर आहे.

(४९) निर्मल–वसईजवळ असून तेथे शंकराचार्यांची समाधी (?) आहे.

(५०) चिपळूण–रत्नागिरीजवळ आहे. ज्याने कोकणस्थ ब्राह्मणांची वसाहत बसविली त्या परशुरामाने येथे एकांतवास पत्करला यासाठी हे स्थान प्रसिद्ध आहे.

(५१) पुण्याजवळ चिंचवड–मोरयादेव या संताचे वसतीस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

(५२) तप्त मणिकर्णिका–पंजाबमधील उष्ण झऱ्यांचे ठिकाण.

(५३) राजापूरची गंगा–रत्नागिरी जिल्हा. वर्षाने उत्पन्न होणारा हा एक झरा असून सुमारे दोन महिने वाहात असतो व मग बंद होतो. म्हणून लोक याला गंगा म्हणतात.

(५४) रेवाळेश्वर–पोहोणारा पर्वत पंजाबात आहे.

(५५) वज्राबाई–ठाणे जिल्ह्यातील भिवंडी जवळ असून तेथील देवीच्या देवळासाठी विख्यात आहे. तेथे अनेक उष्ण पाण्याचे झरे आहेत. त्यांचे पाणी मधुर असून रोग्यांवर त्याचा (चांगला) परिणाम दिसून येतो. असे असूनदेखील हिंदुस्थानांतील कोणाही डाक्टराने या विषयाकडे अद्याप लक्ष पुरविले नाही. असे एकादे ठिकाण युरोपांत फार महत्त्वाचे ठरले असते; हिंदुस्थानांत ते जंगलातील एक दुर्लक्षित ठिकाण ठरले आहे.

(५६) देवकी कुंड–सुरत जिल्ह्यांत हे उष्ण झरे आहेत. या झऱ्यांच्या अंगी औषधी गुण आहेत; परंतु आता पर्यंत त्याकडे फक्त भक्तमंडळीच आकर्षिली गेली आहेत, शोधक नाही.

(५७) लसुंद्र कुंड–खारट पाणी असलेले हे कुंड डाकोरजवळ आहे.

(५८) गळतेश्वरकुंड–पंचमहाल (जिल्ह्यांत) थासरा या गावाजवळ.

(५९) नरसोबाचीवाडी–कोल्हापूर जवळ असून तेथे अनेक आजारी माणसे आरोग्य प्राप्तीसाठी आसरा घेतात.

(६०) काली–कलकत्याजवळ हे देऊळ आहे.

(६१) किष्किंधा–दक्षिण हिंदुस्थानांत आहे. रामायणांत या जागेचा उल्लेख लंकेच्या मोहिमेंत रामास सामील झालेल्या सुग्रीवाची राजधानी म्हणून केला आहे.

गंगा, यमुना, संयू, गोमती, सरस्वती, नर्मदा, तापी, सिंधू, गोदावरी, कृष्णा, वेणा, भीमा, क्षीप्रा इ. सर्व मोठ्या नद्या पवित्र आहेत. या नद्यांच्या काठी, उगमापाशी किंवा मुखाशी वसलेली नाशिक, पैठण वा शुल्क तीर्थासारखी गांवेही पवित्र मानले जातात.

काही विशिष्ट पंथीयांनी पवित्र मानलेली सांप्रदायिक पवित्र क्षेत्रेही आहेत. गघाडा (गोध्रा ?) हे स्वामी नारायण पंथीयाचे पवित्र स्थळ आहे. कबीर पंथीयांचे नागपूरजवळील छत्तीसगड हे पवित्रक्षेत्र आहे. अलमप्रभू हे लिंगायतांचे प्रमुख क्षेत्र आहे, शीखांचे अमृतसर आहे. इ. जैन लोकांची क्षेत्रे सर्व हिंदुस्थानभर पसरलेली आहेत. अनेक यात्रेकरू प्रतिवर्षी या ठिकाणांना भेटी देतात. या यात्रेकरूंच्या समूहाला संघ असे म्हणतात. श्रीमंत लोक या संघाचा खर्च भागवतात. या जागा अशा आहेत. संमेतशिखर, पालिठाणा, गिरनार, अंत्रिक पारसनाथ, आब्बु, आंबाजी वगैरे. प्रत्येक ठिकाणच्या जत्रेचे दिवस ठरलेले असतात. यापैकी प्रमुख जत्रा हरद्वार, अलाहाबाद, अुज्जन (अुज्जैन ?) आणि त्रिंबक या प्रत्येक ठिकाणी दर बारा वर्षातून एकदाच (ती जत्रा) भरते (= कुंभमेळा).

प्रत्येक स्थानाचे महात्म्य ग्रंथरूपाने लिहिलेले असते. ही स्थानमहात्मे आपला धंदा व नफा वाढवू इच्छिणाऱ्या आळशी ब्राह्मणांकडून लिहिली गेलेली असतात. या ग्रंथात केवळ स्थानाचेच महात्म्य असते असे नाही तर महिने, दिवस, तास, झाडे इ.चेही असते. उदा.–

प्रयागमहात्म्यांत अलाहाबादला भेट देण्याचे पुण्य काय लाभते ते सांगितले आहे.

कार्तिक महात्म्यांत काही ठराविक समारंभ कार्तिक महिन्यांत करण्यामुळे मिळणाऱ्या पुण्याचा महिमा सांगितला आहे.

व्यतिपत महात्म्य<br>शिवरात्री महात्म्य } यांत दिवसांचे महत्त्व वर्णिले आहे.

तुळशी महात्म्य–तुळस पूजेचे पुण्य यांत सांगितले आहे.

एकादशी महात्म्यांत या एका दिवसाचे पुण्य सांगितले आहे.

प्रत्येक देवळांत, घरात, रस्त्यांत, खेड्यांत व गावांत वरील वर्णनाची अनेक पुस्तके प्रसृत झालेली आहेत व ती ब्राह्मणांकडून वाचली जातात. ज्यानी हाच आपला उद्योग बनविला आहे त्यांना पुराणिक असे म्हणतात. आणि त्यांची संख्या इतकी आहे की पाद्री लोक त्यांच्या 'एक विसांश' देखील भरणार नाहीत. ते (ब्राह्मण) लोकांना व विशेषतः स्त्रियांना फार धार्मिक बनवितात. त्याचप्रमाणे त्यांना अज्ञानी आणि भोळसटही करून सोडतात. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी आपल्याला मुक्ती लाभेल, अशा आशेने लक्षावधी लोक आपली घरेदारे सोडून दूरदूरच्या ठिकाणांना (भेटी देण्यासाठी) जात असल्याचे नेहमीच आढळते. काही जण नद्या किंवा तलाव यांचे ठिकाणी शरीर शुद्धीसाठी स्नान करतात तर काही देवळांचे व मूर्तींचे दर्शन घेतात. महात्म्य सांगणाऱ्या ग्रंथात असे सांगितलेले असते की प्रत्यक्ष यात्रिकानाच मुक्ती मिळते असे नव्हे. त्यांच्या

तीर्थयात्रेमुळे त्यांच्या माता पित्यांनाही मुक्ती लाभते. अशाच हेतूमुळे वित्त व काल यांचा अपव्यय करून लोक पवित्र स्थाने, नद्या व तलाव यांच्या शोधार्थ इतस्ततः भटकण्यास प्रवृत्त होतात.
थिओसोफीस्ट : डिसेंबर १८८०

## (५) हिंदू कालगणना

हिंदूमध्ये कालगणना करण्याची पद्धत मोठी मनोरंजक आहे. वेळेला ते 'काल' किंवा 'महाकाल' असे म्हणतात. काल हा अनादीअनंत आहे; परंतु खगोलशास्त्र व इतिहास यांच्या (अभ्यासासाठी) त्याची खालीलप्रमाणे विभागणी केली आहे :-

१५ निमिष = १ काष्ठा, ३० काष्ठा = १ कला, ३० कला = १ मुहूर्त, १ मुहूर्त = २ घटी, ६० घटी = १ अहोरात्र, १५ दिवस = १ पक्ष, २ पक्ष = १ मास, २ मास = १ ऋतू, ३ ऋतू = १ अयन, २ अयने = १ वर्ष, ६० वर्षे = १ संवत्सरचक्र, ७२००० (?) संवत्सरचक्रे = १ कलियुग, ६ शतकर्तार = १ कलियुग, ४,३२,००० वर्षे = १ कलियुग, ८,६४,००० वर्षे = १ द्वापारयुग, १२,९६,००० वर्षे = १ त्रेतायुग, १७,२८,००० वर्षे = १ कृतयुग, ४ युग = १ महायुग, १० अवतार = १ महायुग, ३६० वर्षे = १ दिव्ययुग, ७१ महायुग = १ मन्वंतर, १४ इंद्र = १ मन्वंतर, १४ मन्वंतर = १ कल्प किंवा ब्रह्मदेवाचा १ दिवस, १,००० महायुग = १ कल्प, ३६,००० कल्प = १ ब्रह्मदेवाचे आयुष्य, १,००० ब्रह्मे = विष्णुची १ घटी, १,००० विष्णु = शिव निमिष, १,००० शिव = महामायेचे १ निमिष.

सूर्य, चंद्र, गुरु, पितृ (?) आणि देव यांच्या फेऱ्यांनुसार वेळ मोजण्याच्या अनेक पद्धती आहेत.

३६० मानवीवर्ष = १ दिव्यवर्ष, १,२०० दिव्यवर्ष = १ कलियुग, २,४०० दिव्यवर्ष = १ द्वापार, ३,६०० दिव्यवर्ष = १ त्रेता, ४,८०० दिव्यवर्ष = १ कृत. प्रत्येक युगांत संधी आणि संध्यांश असतो. १०० दिव्यवर्ष = कलिचा (१) संधि, २०० दिव्यवर्ष = द्वापाराचा (१) संधि, ३०० दिव्यवर्ष = त्रेतायुगाचा संधि, ४०० दिव्यवर्ष = कृतयुगाचा संधि, १०० दिव्यवर्ष = कलितील संध्यांश, २०० दिव्यवर्ष = द्वापारांतील संध्यांश, ३०० दिव्यवर्ष = त्रेतायुगांतील संध्यांश, ४०० दिव्यवर्ष = कृत युगांतील संध्यांश.

कलियुगांतील पहिली १०० वर्षे म्हणजे संधि व शेवटची १०० वर्षे संध्यांश; आणि मुख्य युग १,००० वर्षांचे. ज्या काही चालीरिती अनुसरण्यास कलियुगांत बंदी आहे त्या संधि (काला) मध्ये (जो कलियुगाचा भाग नाही) चालू ठेवण्यास हरकत नाही असे काही स्मृतिकारांचे मत आहे. १०० दिव्य वर्षे म्हणजे ३६००० मानवी वर्षे. प्रत्येक युगाचे चार भाग म्हणजेच चरण म्हणतात. सध्यांचे चालू वर्ष ९ म्हणजे कलियुगाच्या सुरवातीपासूनचे ४९८१ वे वर्ष होय.

१४ मनु पुढीलप्रमाणे आहेत :— (१) स्वायंभु, (२) स्वारोचिष, (३) औतम, (४) तामस, (५) रैवत, (६) चाक्षुष, (७) वैवस्वत, (८) सूर्यसावर्णि, (९) प्रौच्य, (१०) ब्रह्मसावर्णि, (११) धर्मसावर्णि, (१२) रौद्रसावर्णि, (१३) दक्षसावर्णि, (१४) भौत्य.

खरे ब्रम्हाच्या जीवनांत ३६,००० कल्प येतात. प्रत्येक पुराणांत विशिष्ट कल्पाचा इतिहास दिला असल्याचा दावा केला आहे. काही कल्पांची नावे पुढे दिली आहेत. (१) वामदेव, (२) श्वेतवाराह, (३) नीललोहित, (४) रथंतर, (५) रौरव, (६) देवकल्प, (७) बृहत्कृष्ण, (८) कंदर्प, (९) संद्य, (१०) इशान, (११) तम, (१२) सारस्वत, (१३) उदान, (१४) गारुड, (१५) कोर्म, (१६) नारसिंह, (१७) समान, (१८) आग्नेय, (१९) सोम, (२०) मानव, (२१) तत्पुरुष, (२२) वैकुंठ, (२३) लक्ष्मी, (२४) सावित्री, (२५) घोर, (२६) वाराह, (२७) वेराज, (२८) गोरी, (२९) महेश्वर, (३०) पितृ.

प्रत्येक कल्पात १४ मनु असतात; प्रत्येक मनुची ७१ महायुगे; १,००० महायुगाना १४ ने भागल्यास प्रत्येक मनुत ७१ महायुगे येतील. म्हणजे एकूण ९९४ (महायुगे – ७१×१४) येतील. उरलेल्या ६ (महायुगांचा) काळ म्हणजे एक मनु बदलून दुसरा सुरू होण्याच्या मध्यंतरीचा काळ होय. महाकाळाचे वा काळाचे देवता स्वरुप म्हणजे गळ्यामध्ये नररुंड माला घातलेली मूर्ति; ही नररुंड माला कालौघांत होऊन गेलेल्या पिढ्यांची प्रतिक आहे. ही मूर्ती एकतर स्मशानांत किंवा पेटलेल्या मैदानात बसलेली दाखविण्यात येते, आणि जगाचा विनाश घडवून आणणे हा तिचा उद्योग आहे (अशी कल्पना) महाकाळ किंवा शिव म्हणजे दुसरे तिसरे काही नसून कालाचे देवस्वरुप आहे.

थिओसोफिस्ट, जानेवारी १८८१.

## (६) ज्ञानेश्वरी : समाधींतून निर्माण झालेला ग्रंथ

मराठे ज्याला 'ज्ञानोबा' म्हणतात त्या ज्ञानेश्वर नांवाच्या महान् संताची व योग्याची समाधी पुण्याजवळील आळंदी नामक खेड्यांत आहे. ही समाधी ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची शिकवण अनुसरणारे वारकरी, ज्यांची संख्या दिवसें दिवस वाढत आहे, यांचे यात्रेचे पवित्र स्थान आहे. तुकारामानी इ. स. १६४९ मध्ये देहू येथे अनेक लोकांच्या उपस्थितींत स्वर्गाकडे उड्डाण केले असे समजले जाते; मुंबई सरकारच्या आश्रयाखाली प्रसिद्ध झालेल्या तुकारामाच्या गाथेस जोडलेल्या त्याच्या चरित्रांत तसा उल्लेख आहे. भगवद्गीतेवरील आपले प्रसिद्ध भाष्य ज्ञानेश्वरांनी इ. स. १२९० त लिहिले. आपल्या या ग्रंथासह जिवंतपणी त्यानी समाधींत प्रवेश केला व त्याना जिवंतच पुरण्यांत आले असे समजतात. पुढे तीनशे वर्षांनंतर दुसरा एक संत, पैठणचे एकनाथ महाराज याना त्यानी स्वप्नांत दर्शन देऊन असे सांगितले की त्यांच्या ग्रंथाची पूर्ण सुधारीत आवृत्ती तयार असून ती त्यानी (एकनाथानी) प्रसिद्ध करावी. म्हणून एकनाथ आळंदीला आले व त्यानी समाधी उघडली. (आंत) त्याना आपले पुस्तक घेऊन बसलेले ज्ञानेश्वर दिसले, ज्यानी ते पुस्तक एकनाथांना दिले. ज्ञानेश्वरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रंथाची कथा ही अशी आहे. ती ओवीबद्ध आहे. ती मुंबईत छापण्यांत आली असून दक्षिणेत मोठ्या प्रमाणावर वाचली जाते. ज्याना वारकरी खरे साधू मानतात त्या पांच कवीखेरीज इतर कवींचा समावेश ते लोक आपल्या कीर्तनांत करीत नाहीत. शिवाजीमहाराजांचे धार्मिक गुरु रामदास यानाही त्यानी वगळले आहे. वामन (पंडीत) व मोरोपंत यानाही ते मानीत नाहीत. त्याना ते (वारकरी) ऐच्छिक वृत्तीचे व राजाश्रित समजतात. ज्या महान साधूंचा ते आदर करतात ते असे : नामदेव, ज्ञानेश्वर, कबीर, एकनाथ आणि तुकाराम. ज्या श्लोकांत त्यांची चमत्कार शक्ती वर्णिली आहे ते येणे प्रमाणे :

> कलिमाजी संत जाहाले अनंत । परि पटाईत, पांच जण ॥ १ ॥
> रेडा बोलविला, धोंडा जेवविला । मरोनिया जाहाला, तुलसी फुले ॥ २ ॥
> स्वर्गीचे पितर जेणे जेवविले, । देहासहित गेले, वैकुंठाशी ॥ ३ ॥
> ऐसा हा तुका, त्याचे, महिमान, । वर्णिल कोण, जगा माजी ॥ ४ ॥

